UNIVERSITY OF TORONTO
3 1761 00100371 4

SHASTRI INDO-CANADIAN INSTITUTE
156 Golf Links,
New Delhi - 3, India

Digitized by the Internet Archive
in 2011 with funding from
University of Toronto

http://www.archive.org/details/madhyayugnabhrat03vaid

# हिंदु भारताचा अन्त

# ग्रंथकर्त्यांचीं इतर पुस्तकें.

## मराठी.

| | |
|---|---|
| मध्ययुगीन भारत भाग १ | ४–० |
| ” भाग २ | ३–८ |
| गझनीच्या महमुदाच्या स्वाऱ्या | १ |
| शिवाजी व चंद्रराव मोरे | ४ |
| दुर्दैवी रंगू | १–८ |

( परचुरे पुराणिक मुंबई. ल. ना. गोडबोले पुणे. )

## संस्कृत.

| | |
|---|---|
| संक्षिप्त महाभारत | २–८ |
| संक्षिप्त रामायण | १–८ |

( रामचंद्र गोविंद काळबादेवी मुंबई. )

## इंग्रजी.

History of Mediaeval Hindu India

| | |
|---|---|
| Vol I | 6-8 |
| ” Vol II | 6-8 |
| ” Vol III | 7-8 |
| Mahabharata a critiicism | 2-8 |

To be had of D. B. Taraporvala Son & Co
Fort, Bombay.
& Oriental Book Supplying Agency
Budhwar Poona city.

Madhyayugina Bharata

# मध्ययुगीन भारत

अथवा

हिंदुराज्यांचा उद्भव, उत्कर्ष आणि उच्छेद

( ख्रु. ६०० पासून १२०० इ. )

## भाग तिसरा

V.3

# हिंदु भारताचा अंत

( १०००–१२०० इ. )

Vaidya, Chintaman Vinayak

हा ग्रंथ

**चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए. एलएल्. बी**

आनररी फेलो, मुंबई युनिव्हर्सिटी

आणि

हाभारत ए क्रिटिसिझम, रिडल आफ् धि रामायण, एपिक इंडिया
या इंग्रजी, संक्षिप्त रामायण व संक्षिप्त महाभारत या संस्कृत
आणि महाभारत उपसंहार, श्रीरामचरित्र, श्रीकृष्ण-
चरित्र व भारतीयवीरकथा या मराठी
पुस्तकांचें कर्ते यानी लिहिला

---

1926

सन १९२६

---

किंमत चार रुपये

प्रकाशक—चिंतामण विनायक वैद्य,
भारतेतिहास संशोधक मंडळ
३१२ सदाशिव पेठ पुणें.

DS
457
V318
1920
V.3

( सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत )

LIBRARY
NOV 16 1971
UNIVERSITY OF TORONTO

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले
सेक्रेटरी, श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स;
४९५ शनवार पेठ, पुणें.

हें पुस्तक

ग्रंथकर्त्यानें

# कैलासवासी लोकमान्य

# बाळ गंगाधर टिळक

यांच्या

## पूज्य व प्रिय स्मृतीस

त्यांच्या अनेक गुणांबद्दल व हिंदुस्थानच्या प्राचीन इति-
हासाच्या गहन अभ्यासाबद्दल, तसेंच भारतवर्षाच्या
प्राचीन वैभवाच्या अभिमानाबद्दल आणि शेवटी
या ग्रंथाच्या लेखनांत ग्रंथकारास वारंवार
दिलेल्या प्रोत्साहनाबद्दल सादर व
साभार अर्पण केलें
असे.

# प्रस्तावना

ईश्वराच्या कृपेनें मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा हा तिसरा भाग, कित्येक वर्षांमागें या इतिहासाची रूपरेषा ज्याप्रमाणें ठरविली होती त्याप्रमाणें, तयार होऊन वाचकांपुढें हा शेवटचा भाग मी मांडीत आहे. या भागास 'हिंदु भारताचा अन्त' (Dowufall of Hindu India ) हें नांव दिलें आहे. किंबहुना या समग्र इतिहासाची कल्पना ' रोमन साम्राज्याचा ऱ्हास व अन्त ' ( Decline and fall of the Roman Empire ) या गिबनच्या इतिहासावरून मला सुचली. मध्ययुगीन हिंदु साम्राज्य आणि रोमन साम्राज्य यांच्या ऱ्हासांत बरेंच साम्य आहे. मध्ययुगीन हिंदु साम्राज्य रोमन साम्राज्याप्रमाणेंच तुर्कांनीं* उच्छिन्न केलें; आणि ज्याप्रमाणें बॉस्फरसच्या किनाऱ्यावरील कॉनस्टॅन्टिनोपल तुर्कांनीं हल्ला करून घेतल्यानें रोमन साम्राज्याचा अन्त झाला, त्याप्रमाणें गंगेच्या किनाऱ्यावरील कनोज राजधानी पडली तेव्हां हिंदु साम्राज्याचा अंत झाला. तसेंच युरोपांतील ग्रीकांच्या साम्राज्य देशांत तुर्की मुसलमानांचें साम्राज्य कायम झालें, त्याचप्रमाणें हिंदु भारतांत तुर्क–अफगाण मुसलमानांचें साम्राज्य प्रस्थापित झालें. ग्रीक म्हणजे प्राच्य रोमन लोक शौर्यादि गुणांत फारच हीन झाले होते, आणि हीच स्थिति सामान्यतः हिंदु लोकांची झाली होती. ( रजपूत मात्र ग्रीकांच्या विरुद्ध शौर्य आणि स्वातंत्र्यप्रीति या विषयींच्या त्यांच्या उज्वल कीर्तींत कमी झाले नव्हते, आणि अजूनहि राजपुतान्याच्या डोंगरांत आणि रेतस्थानांत ते आपलें स्वातंत्र्य अर्धेमुर्धें संभाळून आहेत ). पृथ्विराज आणि जयचंद शेवटच्या ग्रीक बादशहांप्रमाणें शूरत्वांत कमी नसून त्यांनी आपलें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत रणसंग्रामांत शूरत्वानें लढून व रणांगणी आपले देह ठेऊन अजरामर केलें आहे. तथापि हिंदु भारतांतील सामान्य लोक अनेक कारणांमुळें गरीब झाले होते आणि जोराचा राष्ट्रीय विरोध न करितां त्यांनीं पारतंत्र्य कबूल केलें.

या भागांत, याप्रमाणें बहुतेक उत्तर हिंदुस्थान मुसलमानांपुढें पडलें, तेथपर्यंत म्हणजे सु. इ. स. १२०० पर्यंत हिंदुस्थानचा इतिहास आला आहे. हिंदु

---

* शिहाबुद्दीन स्वतः अफगाण होता तरी त्याच्या सैन्यांत तुर्कच जास्त होते, आणि रजपूत आपल्या शत्रूंस 'तुरकडा' च म्हणत.

भारताच्या ऱ्हासास प्रारंभ या भागांतील कालविभागाच्या आरंभींच झाला; आणि काबूल व पंजाब सुमारें इ. स. १००० पासून इ. स. १००९ पर्यंत महमुदानें जिंकलें. या भागांतील पहिल्या म्हणजे सहाव्या पुस्तकांत आम्ही हिंदुस्थानावरील महमुदाच्या स्वाऱ्यांचा इतिहास दिला आहे. हा इतिहास मुसलमानी आणि हिंदु मूळ आधार–ग्रंथांवरून आम्ही पुनः नवीन तयार केला आहे असें म्हटलें असतां चालेल. लाहोरचा राजा जयपाळ, काबूलच्या त्याच नांवाच्या राजाहून भिन्न आहे अशी साधारण समजूत आहे. परंतु उपलब्ध पुराव्याचा काळजीपूर्वक विचार केल्यावरून ही समजूत चुकीची आहे असें दिसून आलें; आणि आम्ही या इतिहासांत दाखविल्याप्रमाणें काबूलच्या शाहींचें पॅरोपॅमिसस पासून सतलजपर्यंत पसरलेलं विस्तृत हिंदु राज्य महमुदापुढें नष्ट झालें. पंजाबचे लढवय्ये हिंदु, गझनीच्या मुसलमान तुर्कांपुढें, कां पडले याचीं कारणें दाखविण्याचा प्रयत्न आम्ही या पुस्तकांत केला आहे. या रीतीनें पंजाब हिंदु भारताच्या बाहेर या कालविभागाच्या आरंभीं गेला. ७१२ इसवींत सिंध पूर्वीच बाहेर गेलें होतें.

हिंदुस्थानच्या इतर भागांत हिंदु राज्यें सुमारें २०० वर्षें रजपूत राजांच्या सत्तेखालीं नांदलीं आणि निरनिराळ्या राज्यांत वेळोवेळीं माळव्याचा भोज, गुजराथचा जयसिंह, कनोजचा गोविंदचंद्र आणि कल्याणचा विक्रम यांसारखे सामर्थ्यवान् राजे उत्पन्न झाले. तथापि उत्तर हिंदुस्थान १२०० इसवी सुमारें शिहाबुद्दीन घोरीपुढें,हिंदु राज्यांचें स्वातंत्र्य रक्षण करण्यास पृथ्विराज आणि जयचंद यांसारख शूर राजे असतांहि, नष्ट झालें. या आपदेचीं कारणें पंजाबच्या ऱ्हासाच्या कारणांहून भिन्न असून तीं आम्ही सातव्या पुस्तकाच्या शेवटीं विवेचलीं आहेत. हें विवेचन वाचकांस मनोवेधक निदान विचारोत्तेजक वाटेल.

पण सर्वांत अधिक मनोवेधक या भागांतील शेवटचें पुस्तक ( आठवें ) वाचकांस वाटेल. या पुस्तकांत हिंदुस्थानच्या या कालविभागांतील सामान्य परिस्थितीचें विवेचन आम्हीं केलें आहे. हिंदु लोक राष्ट्र या नात्यानें दुर्बल कां झाले याचें कारण या परिस्थितींत आहे. या कालविभागांत मुख्य जातींत हजारों पोटजाति कशा झाल्या, धार्मिक ऐक्य निरनिराळे पंथ उत्पन्न होऊन कसें नष्ट झालें, त्याचप्रमाणें अहिंसा तत्त्व प्रबल होऊन अनेक लोकांनीं शाकाहाराचा स्वीकार कसा केला आणि शेवटीं धर्मभोळेपणा वाढून निरनिराळे आगम, उप-

स्मृत्या आणि उपपुराणें कशीं उत्पन्न झालीं हें आम्हीं दाखविल आहे. आमच्या इतिहासाचा हा भाग सर्वांत अधिक महत्त्वाचा असून या पुस्तकांत आम्ही जीं मतें नमूद केलीं आहेत त्यांचा विचार आमचे हिंदु वाचक काळजीपूर्वक करतील अशी आशा आहे.

सातव्या पुस्तकांत दिलेला या कालविभागांतील हिंदु राज्यांचा इतिहास आम्ही मुख्यतः कोरीव लेखांवरून तयार केला आहे. प्रसिद्ध युरोपियन व हिंदु विद्वान संशोधकांनीं हे कोरीवलेख शोधून काढून प्रसिद्ध केले असून या कालविभागाचा संगतवार इतिहास या कोरीवलेखांत आलेल्या हकीकती एकत्र करून आम्ही दिला आहे त्याचें सर्व श्रेय सदर संशोधकांस दिलें पाहिजे. कित्येक मुद्यांसंबंधें या विद्वान् लोकांचा व आमचा मतभेद मधून मधून झाला आहे; आणि कोठें कोठें आम्ही त्यांच्या मताविरुद्ध टीका केली आहे हें खरें; पण त्यांचा आदरयुक्त गौरव करून, हिंदुस्थानचा मुसलमान-पूर्व इतिहास बनविण्यास त्यांचेच परिश्रम साधनीभूत झाले आहेत, हें अत्यंत आभारपूर्वक आम्ही येथें नमूद करितों. ज्या ज्या आधारांचा उपयोग आम्ही या इतिहासांत केला आहे तो नेहमींप्रमाणें खालीं टिपेंत न देतां पुस्तकांतच वाचकांच्या समोर तात्काळ येण्यासाठीं जेथल्या तेथेंच दिला आहे. कांहीं राज्यांचा इतिहास डॉ॰ भांडारकर, फ्लीट, ल्युवर्ड व लेले वगैरे विद्वानांनीं पूर्वीच संगतवार दिलेला आहे, तोच बहुतेक थोड्याबहुत फरकानें आम्ही येथें घेतला आहे. पण इतर राज्यांचा इतिहास, विशेषतः कनोजच्या गाहडवालांचा इतिहास, आम्हीं प्रथमच या भागांत संगतवार दिला आहे आणि त्या संबंधाचे कांहीं कठीण प्रश्न, उदाहरणार्थ गाहडवाल आणि राठोड यांचें एकत्व, आम्ही या भागांत सोडविले आहेत.

आमच्या ग्रंथाचा शेवट या भागानें झाला. कारण हिंदु भारताचा अंत येथें झाला; पुढें हिंदु व मुसलमान यांचें मिळून भारतवर्ष आहे असेंच म्हणतां येतें. कांहीं हिंदु राज्यें दक्षिण हिंदुस्थानांत आणखी शंभर वर्षें नांदलीं हें खरें; पण या भागांत सांगितलेल्या कारणांमुळें तींहि थोडक्याच धक्यानें पडण्यास योग्य झालीं होतीं. आणि त्याप्रमाणें तीं अल्लाउद्दीन आणि त्याचा सेनापति मलिक्‌काफुर यांनीं सुमारें इ. स. १३०० त केलेल्या हल्ल्यानें एकदम पडलीं हें प्रत्यक्ष आपल्यास इतिहासांत दिसतें. महाराष्ट्र ( देवगिरी ),

तेलंगण ( वरंगळ ), आणि कर्नाटक ( द्वारसमुद्र ) हीं एकामागून एक मलिक् काफुरनें एका स्वारींत जिंकलीं व त्यानें ही स्वारी कन्याकुमारी पर्यंत पोहोंचविली. दक्षिण हिंदुस्थान ( मद्रास इलाखा ) पुनः विजयानगराच्या राज्याखालीं उभें राहिलें, पण तेंहि शेवटीं १५६५ इसवींत महाराष्ट्रांतील एकवटलेल्या मुसलमानीराज्यांपुढें तालीकोटच्या लढाईत पडलें.एका रीतीनें असें ह्मणतां येईल कीं, हिंदुसाम्राज्याचा अंत या वर्षी झाला आणि विजयानगर हेंच हिंदुस्थानचें कॉन्स्टॅन्टिनोपल होय. ( कॉन्स्टॅन्टिनोपल हल्लीं हयात आहे पण विजयानगर अस्तित्वांतून नष्ट झालें आहे ). हिंदु भारताच्या अवशेषाचा हा अलीकडचा इतिहास देवगिरीच्या उच्छेदापासून सुरू होऊन विजयानगरावर आलेल्या या विपत्ती पर्यंत येतो. तो एका स्वतंत्र भागांत देण्यासारखा आहे; आणि ज्या दृष्टीनें हा इतिहास लिहिलेला आहे त्याच दृष्टीनें तो लिहावयास पाहिजे; पण हें काम आम्ही दुसऱ्यावर सोंपवितों.

हिंदुस्थानचा या काळचा राजकीय नकाशा तयार करून या ग्रंथास जोडलेला वाचकांस मनोरंजक वाटेल. पण त्याहिपेक्षां अधिक मनोरंजक जे तीन नजरी नकाशे आम्ही स्वतः त्या त्या जागा पाहून तयार करून दिले आहेत ते म्हणजेः—( १ ) पंजाबचें स्वातंत्र्य ज्या लढाईच्या मैदानावर गेलें तें छछचें मैदान, त्याचप्रमाणें (२) कोट कांगडा आणि ( ३ ) पृथ्विराजाची जुनी दिल्ली यांचे नकाशे वाचकांस वाटतील. शेवटीं जोडलेली मुख्य वृत्तांची सनवारी आणि सूची या दोन्हा या ग्रंथांचा उपयोग करण्यास वाचकांस मदत करताल.

शेवटली गोष्ट ही कीं, ग्रंथाच्या तपासण्यांत आमच्या स्वतःच्या निष्काळजीपणानें आणि छापखान्याच्या हयगयीनें अनेक चुका ग्रंथांत राहिल्या आहेत, यावद्दल वाचकांची आम्ही माफी मागतों. अर्थाकडे आणि हकीकतीकडे वाचकांनीं लक्ष दिल्यास त्या चुका वाचकांच्या सहज नजरेस येऊन वाचकांचा मनोभंग होणार नाहीं अशी आम्हांस आशा आहे. कित्येक ठिकाणीं सनांच्या आकड्याच्याहि चुका आहेत, त्या महत्त्वाच्या नसून त्याकडेहि वाचक दुर्लक्ष करतील असें समजून शुद्धिपत्र आम्ही यासाठीं मुद्दाम दिलें नाहीं.

पुणें ता. ३१ जानेवारी १९२६ चिं. वि. वैद्य.

# विषयानुक्रमणिका.

## पुस्तक सहावें.

### गझनीच्या महमुदाच्या स्वाऱ्या.


| प्रकरण | नांव | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | हिंदुस्थानची राजकीय भूगोलिक माहिती- | १ |
| | टि. राजशेखरकृत हिंदुस्थानचें भूगोलिक वर्णन. | ११ |
| २ | बुखाऱ्याचे सामानी बादशहा व गझनी राज्याची स्थापना. | १५ |
| | टि. १ हिंदुस्थानचा राजा जयपाळ २ मोह्याल ब्राह्मण. | ३३ |
| ३ | सबुक्तगीन आणि जयपाळ. | ३४ |
| ४ | महमूद आणि जयपाळ. | ४५ |
| ५ | भाटियावरील स्वारी. | ५२ |
| ६ | मुलतानवरील स्वारी. | ५९ |
| ७ | संयुक्त हिंदूंची शेवटली लढाई. टि. संयुक्त लढाईचें ठिकाण. | ७४ |
| ८ | नगरकोटची स्वारी. टि. कांगडा येथील किल्ला व देवळें. | ७९ |
| ९ | १ पंजाबचें मांडलिकत्व. २ पंजाब खालसा झाला. | ८५, ८९ |
| | टि.१ नंदनचा किल्ला, २ उत्तरशाही राजांच्या दुरुस्त केलेल्या तारखा. | ९५ |
| १० | ठाणेश्वरावरील स्वारी. | ९८ |
| ११ | मथुरेची लूट. | १०४ |
| १२ | कनोज पडलें. | ११२ |
| १३ | कालंजरवरील स्वारी, | १२० |
| | टि. १ या स्वारीचा स्मिथने दिलेला चुकीचा वृत्तान्त | १२७ |
| | ,, २ काबुल-पंजाबाचे शाही राजे | १३० |
| १४ | सोमनाथावरील स्वारी, टि. १ सोमनाथ; २ सादी व सोम. | १३९ |
| १५ | महमुदाचा मृत्यु, त्याचें स्वभाववर्णन व राजनीतिनिपुणत्व. | १४१ |
| | टि. महमूद किंवा शिवाजी लुटारु होते काय ? | १५३ |
| १६ | पंजाब-काबूलचा उच्छेद, भासणारीं कारणें. | १६२ |

१७ पंजाब–काबूलचा उच्छेद, संभवनीय कारणें. १७३
टि. १ आक्षेपांचें निरसन २ पंजाबांतील धर्मशैथिल्य दाखविणारे महाभारतांतील उल्लेख. १८४
१८ महमुदाच्या मागूनचे राजे. टि. गझनवी राजांची नाणीं. १९५
परिशिष्टें १ हिंदूंची मूर्तिपूजा; २ कांहीं मुसलमानी नांवाचे उच्चार व अर्थ २१३

# पुस्तक सातवें.

## तिसरीं हिंदु राज्यें.


| प्रकरण | नांव | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | सांभर व अजमीर येथील चाहमान | २२१ |
| २ | मेवाडचे गुहिलोत | २३१ |
| ३ | धारचे परमार राजे—भोज | २३९ |
| ४ | भोजानंतरचे परमार राजे | २६० |
| ५ | बुंदेलखंडचे चंदेल्ल. टि. खजुराहो व महोबा.- | २७६, २८६ |
| ६ | चेदीचे कलचूरी हैहयराजे. टि. त्रिपुर राजधानी | २८८ |
| ७ | अनहिलवाडचे चालुक्य | २९८ |
| ८ | कनोजचे गाहडवाल | ३२१ |
| | टि. १ राठोड आणि गहरवार, | ३३० |
| | २ राठोड म्हणजे गाहडवाल दक्षिणचे आहेत काय ? | ३३९ |
| ९ | बंगालचे पाल राजे | ३४२ |
| १० | लखनौतीचे ( बंगाल ) सेन | ३५२ |
| ११ | ठाण्याचे शिलाहार | ३६१ |
| | टि. १ घारापुरीची एलिफंटा लेणी | ३७४ |
| | २ हञ्जमनगर | ३७५ |
| १२ | कल्याणचे उत्तर चालुक्य | ३७९ |
| | कल्याणचे कलचूरी | ३९४ |

१३ त्रिकलिंगाचे प्राच्य गंग. ओरिसा ३९७–४०४
१४ तंजावरचे चोल ४०७
१५ दक्षिणेंतील महत्वाचीं मांडलिक राजघराणीं. ४१९
( १ ) देवगिरि यादव ४२० ( २ ) काकतीय आंध्र ४२१ (३) हलेबीड होयसल ४२३ (४) पांड्य ४२४ (५) केरल ४२५ (६) येलबुर्ग शिंदे ४२७ (७) सौदत्तीचे रट्ट ४२९ (८) हनगळचे कदम्ब ४३१ (९) गोव्याचे कदम्ब ४३२ (१०) कऱ्हाडचे शिलाहार ४३६ वंशावळी ४३०
१६ उत्तर हिंदुस्थानांतील महत्वाचीं मांडलिक घराणीं ४४१
( १ ) रतनपुरचे हैहय ४४१ ( २ ) अम्नीचे गोतम ४४२ (३) जगमनपुरचे सेंगार ४४२ (४) मीरतचे डोर ४४४ (५) बदाऊंचे राठोड ४४५ (६) अबूचे परमार ४४६ (७) नड्डूलचे चव्हाण ४४७ (८) ग्वालेरचे कच्छवघात ४४७ (९) दिल्लीचे तोमर ४५२
टि. कच्छपघातांच्या उत्पत्तिविषयीं हरप्रशादशा. चें चुकीचे मत ४५३
१४ हिमालयांतील राज्यें १ काश्मीर, २ नेपाळ, ३ चंबा, ४ नुरपूर ४५७
टि. १ नुरपुर येथाल किल्ला व देवळें ४६५
५ मंडी आणि सुकेत ६ कस्तवार ४६६
७ बल्लापूर ( बलोर ) अथवा बर्सोहली ४६९
८ कांगडा ४७०
१८ शेवटचा हिंदु सम्राट् रायपिठोरा ४७३
१९ शहाबुद्दीन घोरी आणि हिंदूंची शेवटची लढाई ४८१
२० पृथ्विराजाशीं युद्ध ४८४
टि. १ महमद घोरी आणि पृथ्विराज ४९०
२ शेवटल्या लढाईतील मुसलमानांची चाल ४९१
३ शेवटल्या लढाईचें रासांतील वर्णन ४९३
२१ अजमीर व दिल्ली यांचा उच्छेद ४९६
टि. १ पृथ्विराजाची जुनी दिल्ली ४९८
२ कुतुबमिनार ५०१

२२ कनोज आणि बनारस यांचा उच्छेद ५०६
२३ उत्तर हिंदुस्थानांतील इतर रजपूत राज्यांचा उच्छेद भा. १ ५११
२४ ,, भा. २ ५२२
२५ उत्तर हिंदुस्थानचा उच्छेद—मुख्य कारणें ५२८
२६ ,, आनुषंगिक कारणें ५३९

# पुस्तक आठवें.

## सामान्य परिस्थिति.

१ जातींचें उपजातीकरण ५४७

ब्राह्मणांच्या पोटजाति ५५० टि. मार्को पोलोनें वर्णिलेले लाड ब्राह्मण. ५५७ रजपुतांच्या पोटजाति ५६१ टि. क्षत्रियांचीं ३६ राजकुलें ५६८.कायस्थ ५७१.वैश्य ५७२. शूद्र, अस्पृश्यजाति ५७४

२ विवाह वगैरे चालींत बदल ५७७

३ धर्मैक्यनाश व धार्मिक द्वेष ५८५

मुसलमानी धर्म, ५८५ जैनधर्म ५८८ नवें वैष्णव मत ६०१ नवीन अथवा वीर शैवमत ६०७ टि. वीरशैव पंथ व त्याचे संस्थापक याविषयीं राइसचा लेख ६१५ शैववैष्णवमताच्या एकीचा प्रयत्न ६१८ पंढरपूरचा विठोबा ६२१ टि. १ मोक्षाविषयींच्या भिन्न कल्पना ६२२ टि. २ कित्येक भागांतील परमतसहिष्णुता ७२४

४ हिंदूधर्माचें बदललेलें स्वरुप ६२७

वेद ( ६२७ ) वैदिक यज्ञ ( ६२९ ), नैमित्तिक यज्ञ ( ६३० ), मूर्तिपूजा ( ६३१ ), मठ आगम आणि तंत्रग्रंथ ( ६३८ ), संस्कार व कर्में यांची वाढ (६३९), पुराण ग्रंथांची वाढ (६४१), उपस्त्मत्या आणि उपपुराणें (६४२ ) कलिवर्ज ( ६४३ ), शुद्धिकरणाचा निषेध ( ६४५ )

टि. अल्बेरुनीनें परिगणित केलेलें उपवास व उत्सवादिन ( ६४५ )

५ राजकीय परिस्थिति ६४८
टि. शिवाजीचे अष्टप्रधान ६५९
६ राज्यकारभार— ६६२
अंमली कारभार ( ६६३ ), न्यायपद्धति ( ६७५ ),
दक्षिण हिंदुस्थानांतील लोकसभा ( ६७७ ), फौजी व्यवस्था
(६८० ), सन्मानाचें उगमस्थान ( ६८१ )
७ भाषा व वाङ्मय— ६८२
परिशिष्ट
१ डॉ. ग्रियरसन यांच्या 'हिंदुस्थानच्या भाषांचें निरीक्षण' ग्रंथां-
तील उतारा. ६८८
कानडी, तेलगू; ( ६८८ ); बंगाली, प्राच्यहिंदी, पश्चिमहिंदी,
मराठी, ( ६८९ ).
२ कांहीं आक्षेपांस उत्तर ६९०
३ निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या संस्कृतप्राकृत उच्चाराची
तऱ्हा ( राजशेखर ) ६९६
४ मूळ कोरीव लेखांतील उतारे ६९७
५ महत्वाची सनवारी. ७०९
सूची व नकाशा.

## साधनग्रंथ

या ग्रंथाचे साधनग्रंथ कोणते आहेत तें सांगणें फायदेशीर होईल अशी एका मित्रानें सूचना केल्यावरून ते आम्ही पुढें देतों. हा ग्रंथ किंबहुना हा सर्व इतिहास कोरीवलेखांच्या आधारें लिहिला आहे. हे लेख ( १ ) इंडियन अँटिक्करी, ( २ ) एपिग्राफिया इंडिका, ( ३ ) बाँबे ब्रँच रॉयल एसियाटिक सोसायटीचें जर्नल, ( ४ ) बेंगॉल एसियाटिक सोसायटीचे जर्नल आणि त्याचप्रमाणें कॉर्पस् एस्पिकृशियोनेरम् यांचे व्हॉल्यूम यांत छापले आहेत. हे सर्व ग्रंथ तपासून पाहणें कठीण आहे हें सांगणें नको. पण किलहॉर्ननें उत्तरेकडील कोरीव लेख आणि दक्षिणेकडील कोरीवलेख यांच्या याद्या, एपिग्राफिया इंडिका भाग ५ व ८ यांत छापिल्या आहेत. या याद्या निरनिराळ्या राजवंशानुरूप केलेल्या असून सनवारीनें, लेख कोणकोणत्या पुस्तकांत छापले आहेत ह्यांच्या तपशीलासह, दिल्या आहेत. या रीतीनें आमच्या कालविभागाच्या संबंधीचे कोरीवलेख आम्हांस सहज काढतां आले व ते आम्ही मुळांत वाचून त्यावरून आम्ही आपलीं मतें बनविलीं आहेत. या नंतरचे एपिग्राफिआ इंडिकाचे व इंडियन एन्टेक्करीचे भाग आम्हांस चाळून पहावे लागले हें सांगणें नको.

( ६ ) निरनिराळ्या प्रांतांतील जिल्ह्यांचे गॅझेटियर यांत ' इतिहास ' आणि ' लोक ' या सदरांखालीं महत्त्वाची माहिती दिलेली आहे, तीहि वाचण्यांत आली. आणि शेवटीं (७) मुसलमानी हकीकतीसाठी इलियट भा. १व२ तसेंच 'अल्बेरूनीचा हिंदुस्थान,' 'यमीनी ' आणि ' तबकात्-इ-नासिरी ' या तीन ग्रंथांचीं इंग्रजी भाषांतरें यांचा आम्हीं उपयोग केला.

चिं. वि. वद्य.

# मध्ययुगीन भारत.

## भाग ३ रा.

### पुस्तक–सहावें.

## गझनीच्या महमुदाच्या स्वाऱ्या.

### प्रकरण १ लें.

### हिंदुस्थानची राजकीय भूगोलिक माहिती.

( इ. स. १०३०, अल्बेरूनी. )

या भागांतील इतिहास चांगला निश्चित होण्यास हिंदुस्थानची राजकीय भूगोलिक माहिती प्रसिद्ध आरब ग्रंथकार अल्बेरूनी यानें आपल्या 'इंडिया' या ग्रंथांत दिलेली अत्यंत उपयोगी पडणारी असून फार महत्वाची आहे. हिंदुकालविभागाच्या पहिल्या भागास म्हणजे इ. स. ६००–८००पर्यंतच्या काळास जसें चिनी प्रवासी ह्यूएनत्संग याचें प्रवासवृत्त अत्यंत उपयोगी पडलें, तसेंच महत्वाचें हिंदुस्थानचे अल्बेरूनीनें लिहून ठेविलेले वर्णन या कालविभागास म्हणजे १०००–१२००च्या कालास उप-

योगी आहे. दोघेहि परस्थ होते, दोघांनीं हिंदुस्थानांत राहून व प्रवास करून संस्कृताचा अभ्यास केला होता आणि दोघेहि बुद्धिवान आणि ऐतिहासिक चिकित्सक बुद्धीचे होते. अल्बेरूनी दोघांमध्यें ज्यास्तच भरवंशाचा ठरेल. कारण तो मुसलमान होता तरी सुद्धां आग्रह-रहित त्याची दृष्टि स्पष्टपणें दिसते; ( ह्यूएनसंग बौद्ध असून हिंदू-विषयीं थोडासा दूषित मनाचा दिसतो ). अल्बेरूनीनें हिंदू लोकां-विषयीं, त्यांच्या धर्माविषयीं, त्यांच्या तत्वज्ञानाविषयीं,त्याचें शास्त्रज्ञान व कलाज्ञान याविषयीं अनादरबुद्धि दाखविली नाहीं. दोघांनींहि हिंदुस्थानांत राहून हिंदुस्थानच्या पंडितांपासून माहिती मिळविली होती. ( ह्यूएनत्संग हा नालंदा मठांत कित्येक वर्षे राहिला होता ). अल्बेरूनीनें आपली माहिती मुलतान व पेशावर या दोन ठिकाणी राहून हिंदु पंडितांपासून संपादन केली होती. हिंदुस्थानच्या भूगो-लाविषयीं माहिती त्यानें हिंदु व मुसलमान प्रवाशांपासून संपादन करून त्याची जांचहि केली होती. तो मूळचा राहणारा ख्वारिझमचा होता. जेव्हां महमुदानें तो देश जिंकला तेव्हां त्या देशांतील कैद्यां-बरोबर महमूद त्यास गझनी येथें घेऊन आला. अल्बेरूनी तेव्हांच विद्वान, विशेषतः गणिती व ज्योतिषी होता. ज्योतिष—गणित व फल—ग्रीक लोकांकडून आरबांस मिळालें होतें तें सर्व तो शिकला होता. त्यावेळीं हिंदु ज्योतिष ग्रीकांच्याहि पुढें निदान बरोबरीचें होतें, तें अल्बेरूनी मोठ्या हौसेनें येथें शिकला. हिंदुस्थानच्या समग्र स्थितीचे समालोचनाच्या वेळीं आम्हांस अल्बेरूनीच्या या पुस्तकाचा फार उपयोग होणार आहे; कारण त्यानें हिंदूचें शास्त्र, तत्वज्ञान, इतिहास, वाङ्मय वगैरे अनेक विषयांवर माहिती मिळवून नमूद करून ठेविली आहे. पण येथें आम्हीं प्रथम हिंदुस्थानची भूगोलिक माहिती त्यानें दिलेली देत आहों. कारण त्यावेळची राजकीय परि-स्थिति समजण्यास ती फारच उपयोगीं आहे. ती माहिती अल्बे-

रूनीनें हिंदु भूगोलिक पुस्तकांवरून, त्याचप्रमाणें जाणकार हिंदु व मुसलमान प्रवाश्यांकडून मिळवून दिलेलीं दिसते. राजशेखर याचा भूगोलाचा ग्रंथ बहुधा अल्बेरूनी समोर असावा. आह्मी एका टिप्पणींत राजशेखराच्या ग्रंथाचाहि सारांश देत आहो. प्रवाशांकडून मिळालेली अन्तरांची माहितीहि अल्बेरूनी देतो पण, हीं अन्तरें त्यानें फरसाख (फारशी योजन) मध्यें दिलेली असल्यानें बरींच संशयित आहेत. एक फरसाख ४ इंग्लिश मैलांबरोबर सरासरी मानतात. एवढी प्रस्तावना करून अल्बेरूनीच्या वरील ग्रंथांतील भूगोलिक अध्यायावरून आम्ही पुढील माहिती उध्दृत करतों. हा ग्रंथ अल्बेरूनीनें इ. स. १०३०त पुरा केला. महमूद त्यावेळीं नुकताच मेला होता.

आरब ग्रंथकारांनीं नेहमीं हिंदुथानचे सिंध आणि हिंद असे दोन भाग पाडले आहेत. आरबांनीं सिंध पूर्वींच जिंकून आपल्या राज्यांत व धर्मांत सामिल केलें होतें; अर्थात् ते हिंदुस्थानापासून निराळें पडलें होतें. हिंदुस्थानचा मुख्य भाग म्हटला म्हणजे मध्यदेश (हें नांव महाभारतांतहि आहे) आणि मध्य देशाचा मध्य म्हणजे कनोज शहर. यावेळीं कनोज हिंदुस्थानचें राजकीय दृष्टयाहि केन्द्र होतें. अल्बेरूनी म्हणतो "कनोज हें हिंदुस्थानांतील सर्वांत श्रेष्ट असलेल्या राजाची राजधानी व राहण्याचें ठिकाण होतें." दुसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें यावेळीं प्रतिहार सम्राटाचें कुल कनोजेत राज्य करीत होतें. किंबहुना कनोज हिंदुस्थानची सार्वभौम राजधानी हर्षापासूनच झाली होती. अर्थात् चारशें वर्षांच्या वैभवामुळें, हिंदु संस्कृति, विद्वत्ता व कला यांचेंहि तें केन्द्र बनलें होतें. संपन्न, विद्वान आणि शूर लोक तेथें ओढले गेले होत. तेव्हां हें साहजिकच आहे कीं हिंदुस्थानची भूगोलिक माहिती कनोजला मुख्य धरून व त्याच्या दिशेनें अल्बेरूनीनें दिली आहे. (रामायणांत हिंदुस्थानचा भूगोल कुरुक्षेत्रास मुख्य धरून दिला आहे). किंबहुना राजशेख-

रानें आपल्या काव्यमीमांसेंत कनोजपासून अन्तरें व दिशा सांगाव्या असें स्पष्ट म्हटलें आहे. या म्हणण्यास अनुसरूनच अल्बेरूनीनेंहि हिंदुस्थानचा भूगोल सांगितला आहे. गंगायमुनेमधील प्रदेश अन्तर्वेदि हिंदुस्थानचा खरोखर मध्य आहे, तेव्हां पूर्वाचार्यांनीं अन्तर्वेदीला मध्य बिन्दु धरून भूगोल सांगावा असें म्हटलें तें योग्य आहे. अन्तर्वेदीचाहि मध्य बिन्दु कनोज आहे आणि तेथें प्रतिहार साम्राटाचा राजकवि या नात्यानें राजशेखर राहत असे तेव्हां अर्थात् त्यानें आणखी कनोज मध्य धरून भूगोल सांगावा असा नियम घातला हेहि ठीक आहे. " गंगायमुनयोर्विनशनप्रयागयोरन्तरमन्तर्वेदी । तदपेक्षया दिशो विभजतेत्याचार्याः । तत्रापि महोदयमधिकृत्येति यायावरीयः " ( महोदय म्हणजे कनोज आणि यायावरीय म्हणजे राजशेखर हें येथें सांगितलें पाहिजे ).

असो, प्रथम अल्बेरूनी असें सांगतो कीं "जर तुम्हास सिंधला जावयाचें आहे तर तुम्ही सिजिस्तान मधून गेलें पाहिजे, पण हिंदला जावयाचें असेल तर काबूलवरून गेलें पाहिजे " ( आरब लोकांकरितां अल्बेरूनी सांगतो आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच ). "हिंदुस्थानच्या सरहद्दीवर अनेक हिंदु किंवा त्यासारख्या जाती आहेत त्या अतिशय अशिक्षित असून नेहमीं बंडें करितात " यावरून हें स्पष्ट आहे कीं, या सरहद्दीवरील आफ्रिदी वगैरे शूर जाति अद्याप मुसलमान झाल्या नव्हत्या आणि हल्लीप्रमाणें त्या तेव्हांहि सम्राटास त्रास देत. अशा रस्त्यानें कनोज पोंचून तो म्हणतो " कनोज गंगेच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. पण हल्लीं हें शहर उध्वस्त आहे ( महमुदानें ते लुटलें व मोडले होतें. ) हल्लीची राजधानी गंगेच्या पूर्वेस बारी येथें एक दिवसाच्या मजलीवर ( २४ किंवा ५० मैल ) आहे " हें बारी शहर हल्लीचें कोणतें हें अद्याप निश्चित झाले नाहीं. असो, याप्रमाणें कनोज मुख्य धरून प्रथम आग्नेयीकडील शहरें सांगताना

जाजमहु वगैरे ठिकाणें सांगून त्यानें प्रयाग येथील गंगायमुना-संगमावरील वृक्षाचा उल्लेख केला आहे. यावरून हा वटवृक्ष अद्याप तेथें असून त्यावरून जिवाला कंटाळलेले लोक संगमांत जलसमाधि घेत असें दिसतें ( हल्लीं अलाहाबादाच्या किल्ल्यांत ह्या वटवृक्षाचें खोड दाखविलें जातें ). प्रयागापासून दक्षिणेकडे समुद्र--किनाऱ्यापर्यंत अल्बेरूनी गावें (मुख्य) सांगतो. आणि शेवटीं दारुर देशाच्या जोर राजाचें राज्य आहे असें वर्णन करतो, अर्थात द्रविड देशाच्या चोल राजांचें हें खरोखरीचें यावेळीं साम्राज्य असून त्यांच्या अमलाखालीं कांजी, (कांची), मलय,आणि कुंक (कोंकण) असल्याचें त्यानें सांगितलें आहे. तात्पर्य बहुतेक हल्लीचा मद्रास इलाखा त्यावेळीं चोलांच्या साम्राज्याखालीं असून त्यांत कांहीं लहान संस्थानें म्हणजे मांडलिक राज्यें होतीं

यानंतर बारीच्या पुर्वेकडील भूगोल सांगण्यास तो वळतो आणि अयोध्या, बनारस, पाटलिपुत्र व मोंगीर ही शहरें उल्लेखितो. मोंगीर म्हणजे मुद्गगिरि. येथें बंगालच्या पाल राजांची राजधानी यावेळी होती. पुढें चंपा डुगमपुर ( ? ) आणि शेवटीं गंगासागर, जेथें समुद्रास गंगा मिळते, त्यानें सांगितलें आहे.

पुन्हा बारीपासून पूर्वेस ( म्हणजे ईशान्येस थोडेसें ) गेलें असता भूतान आणि तिबेट लागतें, येथील लोक काळे असून **तुर्क लोकांसारखे बसक्या नाकांचे** आहेत. नंतर त्याच्या पूर्वेस कामरूप आणि उलट दिशेस नेपाळ व त्यापलीकडे सर्वांत उंच पर्वत भूतेश्वर आहे.

“ आतां कनोजहून नैऋत्य दिशेस जातां प्रथम जजहूति लागते. याची राजधानी खजुराहो आहे आणि यांत दोन मजबूत किल्ले कालंजर व गवालियार आहेत. ” चंदेल्ल राजांच्या अमलाखालील बुंदेलखंण्डचें ( हल्लीचें ) राज्य येथें बरोबर वर्णिलें आहे. “ याच्याहि दक्षिणेंस डाहालचे राज्य असून त्याची राजधानी तेऊर

( त्रिपुर ) आहे आणि गांगेय हल्लीं राजा आहे " हेंहि यावेळच्या हैहयांच्या चेदि राज्याचें बरोबर वर्णन आहे. आणि यावरून हें सिद्ध होतें की यावेळीं (स. १०३०) चेदीचा प्रसिद्ध राजा गांगेयदेव हयात व राज्यावर होता. अल्बेरूनीच्या ग्रंथांत यावेळच्या दोनच हिंदु राजांचें नांव आलें आहे, गांगेय आणि भोज ( धारचा परमार राजा ).

" पुन्हा कनोजहून नैऋत्य-पश्चिमेस जाता असी, सहन्य, जेन्द्र, राजोरी आणि गुजरातची राजधानी बझांन लागतात. " हें शहर कोणते हें ठरविणें अशक्य आहे, पण गुजरात म्हणजे हल्लीचें गुजरात नसून त्याकाळीं कोरीवलेखांवरून हें नांव जयपुरच्या भोंवतालच्या भागास होतें. हा इलाखा हल्लीच्या मारवाडांत मोडतो. बझान आमच्या मतें भिनमाल असावें. कुचलो अथवा गुजरातची ल्युएन्संगनें हींच राजधानीं सांगितली आहे. कारण अल्बेरूनी असेंहि येथें सांगतो कीं बझान शहर वैराण असून तेथील लोक जडीरा नांवाच्या शहरास गेले होते. " वझानास मुसलमान लोक नरेना म्हणतात. " याचें कारण असें दिसतें कीं बझान भिनमाळ येथें सूर्याचें ( नारायणाचें) प्रसिद्ध देवालय होतें ( भाग १ पा.५०) व भिनमाल याचेंच नांव श्रीमाल आणि श्रीमाळी ब्राह्मण व वाणी हल्लीं प्रसिद्ध उपजाति आहेत. अल्बेरूनी असे सांगतो की "कनोजहून मथुरा जितकी दूर तितकेंच मथुरेहून बझान दूर आहे. " कदाचित् या शहरानें त्यानें सांबरच्या चाहमानाच्या राज्याचा उल्लेख केला आहे. अजमेर अद्याप स्थापन झालें नव्हतें व तेथें चौहानाची राजधानीहि नव्हती तेव्हां अजमीर अल्बेरूनी सांगत नाही हें ठीकच आहे.

मथुरेहुन थेट दक्षिणेस उज्जनीस नेतांना वाटेनें दोनचार शहरें अल्बेरूनीनें सांगितली आहेत तीं निश्चित करतां येत नाहींत. भैलस्वामि अथवा भेलसा हें नांव आपल्या ओळखीचें आहे. पण भैल-

स्वामि नांवाचा तेथें देव आहे म्हणून त्या शहरास हें नांव आहे, ही माहिती नवी व महत्त्वाची आहे. भैलस्वामि हें नांव त्यावेळच्या कोरीव लेखांतहि आलें आहे, पण या नावांचें कारण आपल्यास अल्बेरूनींत सांपडतें. स्वामी या पदावरून हा देव विष्णु होता असें दिसतें. भेलशाजवळ एक प्रसिद्ध विष्णुमंदिर असून त्याच्या पुढील गरुडस्तंभावर यवन बौद्ध राजाचा इ. स. पू १०० च्या सुमाराचा लेख सांपडला आहे हें विदित असेलच. पण संस्कृत वाङ्मयांत भेलशाचे नांव विदिशा असें येतें हें सांगितलें पाहिजे.

" आतां बझान पासून दक्षिणेस मेवाडचें राज्य आहे. त्याची राजधानी जित्रोर ( चितोरगड ) आहे. तेथून दक्षिणेस माळव्याची राजधानी धार आहे. धारेच्या पूर्वेस ७ फरसाखावर उज्जनी आहे आणि उज्जनीच्या पूर्वेस दहा फरसाखावर भेलसा आहे. " माळवा आणि त्यांतील मुख्य शहरें याचें हें बरोबर वर्णन आहे.

धारच्या दक्षिणेस कांहीं शहरें सांगितलीं असून त्यांत गोदावरी वरील वंगर आणि नर्मदेवरील नेमार याचा उल्लेख आहे. " नेमावरच्या दक्षिणेस ' मराठ ' देश लागतो आणि मग कोंकण लागतें त्याची राजधानी ठाना समुद्र–किनाऱ्यावर आहे. " यावरून परकीय लोकांच्याहि तोंडीं या वेळी मराठ देश हें नांव झालें होतें. कोकणांत ठाना राजधानींत शिलाहाराचें राज्य यावेळीं असलेलें चांगलें प्रसिद्ध होतें.त्याची ख्याति काश्मीरापर्यंत होती हें आपण पुढें पाहणारच आहों.

बझान पासून नैर्ऋत्येस अनहिलवाड आहे आणि समुद्र किनाऱ्यावर सोमनाथ. अनहिलवाडच्या दक्षिणेस लाडदेश व त्याची राजधानी भडोच. व समुद्रकिनाऱ्यावर रिहंजूर. ( या प्रान्तास गुजरात नांव नव्हतें, लाट प्रसिद्ध संस्कृत नांव होतें ).

" बझानच्या पश्चिमेच मुलतान आणि भाटी आणि पश्चिम–नैर्ऋत्य अरोर, बाहमनवा, मनसूर आणि पुढें सिन्धुनदीच्या मुखा-

वर लहरानी. " हीं शहरे सिंध मध्यें होतीं आणि आरबांच्या ताब्यांत सिंधप्रान्त होता.

येथोन अल्बेरूनी पुन्हा कनोजला येतो आणि कनोजच्या उत्तर वायव्येस डोंगरांत शीर्षारह व पिंजोर असून त्यासमोर मैदानांत थानेश्वर आहे. डोंगराच्या पायथ्याशीं जलंदरची राजधानी डहमाल. नंतर बल्लावर, पश्चिमेस लद्दा व किल्ला राजगिरि, पुढें काश्मीरची हद्द.

पश्चिमेस कूती, आनार, मीरत, पानिपत, " दोहोंच्या दरमियान यमुना वाहते " कावठल आणि सुनाम. नंतर उत्तरेस जातां आदितहौर, जाजमीर, लुहावरची राजधानी मन्दहकुर राबी नदीवर, चन्द्रभागा, बिआस, नंतर कंधरची राजधानी वहिंड सिंधु नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर, परशावर, डुनपुर,काबुल आणि शेवटीं गझनी.

यापुढें अल्बेरूनीनें काश्मीरचें वर्णन दिलें आहे. तो म्हणतो, " काश्मीरांत घोडे किंवा हत्ती नाहींत. श्रीमंत लोक पालखींतून फिरतात. ज्यू लोकांशिवाय दुसऱ्या कोणासहि काश्मीरांत येऊं देत नाहींत. जेलम नदीवर बारामुला सांगून ही नदी जेथून गंगा निघते तेथूनच निघते असें त्यानें सांगितलें आहे. तेथें बर्फ कधीं वितळत नाहीं. जेलम काश्मीरांत आल्यावर तिच्या दोन्ही कांठावर राजधानी वसली आहे. नंतर नदी एका दलदलीत शिरते. तेथोन बाहेर पडून एका दरींतून मैदानांत येते. या दरीच्या दरवाज्यावर पहारा असतो.

" सिध नदी कुलर्जक पर्वतापासून निघते, तेथें गिल्गिट वरून पोंचतात. तेथें भट्ट तुर्क राहतात. त्यांच्या राजांस भट्ट शहा अशी संज्ञा आहे. त्यावरून असें दिसतें कीं हे तुर्क लोक अद्याप हिंदु होते. गिल्गिटमध्यें अद्याप वैदिक संस्कृति बाकी आहे हें डाक्तर सर-ग्रीयर्सन ( हिंदी-भाषा-कोविद ) यानें दाखविलें आहे. किंबहुना वैदिक भाषाहि येथें अवशिष्ट आहे. काश्मीरच्या दक्षिणेस लाहूर आणि राजगिरि आहेत. "सर्वांत अत्यंत मजबूत असे हेच दोन किल्ले

मी पाहिल्यांत आहेत. ही हिंदुस्थानची उत्तर सीमा; पश्चिमेस अफगाण जाती राहतात.

हिंदुस्थानची दक्षिण सीमा समुद्र आहे. लहान मोटी सिन्धूची मुखें सोडली म्हणजे समुद्रकांठानें प्रथम कच्छ लागतें व सोमनाथ. ह्या दोन्ही ठिकाणीं चांचे फार आहेत.समुद्र कांठचीं शहरें एणेंप्रमाणें, तवल्लेश्वर, लोहरानी, कच्छ, बरोर, सोमनाथ, कंबाया, असाविल, बहरिज, सिन्दान, सोपारा, ठाना. नंतर लारां देश मुख्य शहर जिसूर नंतर वल्लभ, दरवाड, शेवटीं सेरेदिब (सिलोन ). अल्बेरूनीनें शेवटीं रामेश्वरचें वर्णन सेतूसह पश्चिम व पूर्व समुद्रांचे संगमावर असल्याचें केलें आहे. व त्यानें दीव बेटांचेंहि वर्णन केलें आहे. "हीं बेटें बाहेर येतात व पुन्हा बुडतात" (हा चमत्कार पुष्कळांना नाकबूल आहे.)

अल्बेरूनी म्हणतो "मुलतान येथें पाऊस मुळींच पडत नाहीं. पण डोंगरांजवळ पाऊस आषाढापासून चार महिने पडतो. आणि खुद्द हिमालयांत श्रावणापासून अडीच महिने पाऊस असतो. हिमालयापलीकडे पाऊस मुळींच पडत नाहीं. काश्मीरांत माघ महिन्यांत बर्फ पडतें व चैत्रांतहि कांहीं बर्फाची वृष्टि होते. अल्बेरूनीनें हिंदु महिन्यांचीं नांवें सांगितलीं आहेत, कारण ऋतूंचा बदल त्यांत होत नाहीं. मुसलमानी महिने सर्व ऋतूंत फिरतात म्हणून तो मुसलमानी महिने वापरीत नाहीं हें साहजिक आहे. शिवाय हिंदुज्योतिषाची त्यास पूर्ण माहिती होती.

दुर्दैवानें त्यानें कोणत्याहि राज्यांचीं नावें किंवा तेथील राजाचीं नांवें दिलीं नाहींत. त्याचप्रमाणें त्यावेळीं चाललेल्या राजकीय घडामोडीबद्दलहि तो उल्लेख करीत नाहीं. त्यांजविषयीं त्यास माहिती असलीच पाहिजे. महमुदाच्या कोणत्याहि स्वारीचा तो उल्लेख करीत नाहीं. कनोज वैराण झालें आहे एवढेंच तो म्हणतो पण महमुदाच्या लुटीमुळें तसें झालें हें सांगत नाहीं. तसेंच सोमनाथ

सांगतांना महमुदाच्या नुकत्याच झालेल्या विलक्षण स्वारीचा, देऊळ उध्वस्त केल्याचा किंवा मूर्ति फोडल्याचा तो बिलकुल उल्लेख करीत नाहीं. प्रत्यक्ष समोर घडलेल्या अशा महत्त्वाच्या वृत्तांचा उल्लेख न करणें अशक्य आहे असें कोणासहि वाटतें. तथापि कोणतेंच राजकीय वृत्त तो उल्लेखीत नाहीं हें निश्चित दिसतें. हें त्याचें मौन जाणून बुजून असावें. यामुळें या मौनामुळें अशा वृत्तांच्या सत्यतेविषयीं प्रतिकूल अगर अनुकूल कोणतेंच अनुमान निघूं शकत नाहीं.

तथापि त्याच्या वरील भूगोलिक वर्णनावरून हिंदुस्थानची त्यावेळची राजकीय स्थिति आपल्यासमोर चांगली उभी राहते यांत शंका नाहीं. प्रथम प्रतिहाराचें बलिष्ठ साम्राज्य त्यावेळीं अस्तित्वांत होतें, आणि त्याच्या पूर्वेस बंगालच्या पालांचें मोंगीरचें राज्य होतें. भूतान, नेपाळ, वामरूप आणि तिरहूत याही राज्यांचा उल्लेख निघतो. दक्षिणेकडे केवळ चोलांचे नांव त्यानें सांगितलें आहे. यावेळीं मद्रास इलाख्याभर चोलांचे साम्राज्य निश्चित होतें. कालंजरचें चन्देल्लांचें राज्य आणि त्रिपुरच्या चेदींचें राज्यहि दिसून येतें. त्याचप्रमाणें मेवाड व माळवा यांच्या चितोड व धार राजधान्या उल्लिखित आहेत. नाहरवाला ( पाटण ) लाट, व कोंकण या तीन राज्यांचाहि चांगला निर्देश आहे. कछ व सिंधहि उल्लेखित आहेत. बझान या शहरानें आमच्या मतें सांबर अथवा मारवाडच्या चौहान राज्याचा निर्देश होतो. कनोजच्या उत्तरेस ( वायव्येस ) पानिपत, मीरत, थानेश्वर आणि कपित्थल यांचा उल्लेख योग्य रीतीनें आला आहे. येथें दिल्लीचा उल्लेख नाहीं हें योग्यच आहे. दिल्ली त्यावेळीं क्षुद्र जागा होती. कदाचित् हें शहर अस्तित्वांतहि नव्हतें आणि तोमर राजेहि त्यावेळेस महत्त्वाचें नव्हते, लाहोर त्यावेळीं एका राज्याची किंवा महत्त्वाच्या प्रान्ताची राजधानी होती. जलन्धर आणि राजोरी ही निराळीं राज्यें असावीं. यावेळीं काश्मीर बलाढ्य राज्य होतें आणि

काश्मीरचें विस्तृत वर्णन येथें आहे. यानंतर कन्दाराची राजधानी वहिंड सिन्धूच्या पश्चिम किनाऱ्यावर सांगून शेवटीं काबूल व गझनी सांगितली आहे. यावेळीं हिंदुस्थानचें जे राजकीय विभाग होते त्यांचें वर यथायोग्य वर्णन आहे. महाराष्ट्र व कर्नाट राज्यांचा उल्लेख यांत आला नाहीं हें आपल्या लक्षांत येतें; पण आमच्या मतें त्यांचा निर्देश 'मराठ देश नर्मदेच्या दक्षिणेस' या शब्दांत तसेंच वल्लह व दरवाड म्हणजे चालुक्यांचें धारवाड या शब्दांत येतो.

## टिप्पणी राजशेखरकृत हिंदुस्थानचें भूगोलिक वर्णन.

कनोजचा महीपाल ( प्रतिहार सम्राट् ) याचा गुरू आणि राजकवि राजशेखर यानें ( ९१०-९४० ) आपल्या काव्यमिमांसा ग्रंथांत हिंदुस्थानचा विस्तृत भूगोल सांगितला आहे. बहुधा हा ग्रंथ किंवा यांत उल्लेखिलेला त्याचाच 'भुवनकोश' हा ग्रंथ शंभर वर्षांनंतर ( १०३० ) अल्बेरूनीनें आपला ग्रंथ लिहिला तेव्हां त्यापुढें असावा असें वाटतें. अलंकारशास्त्रावरील ग्रंथांत हिंदुस्थानचा भूगोल कशाला आला याबद्दल कदाचित कोणास आश्चर्य वाटेल. परंतु कवीनीं भूगोलिक चुक्या करूं नये, कारण श्रोत्यांच्या किंवा वाचकांच्या मनाला धक्का पोचतो हें सांगून त्यानें हें भूगोलिक वर्णन केलें आहे. ( उ. काशी वर्णन करतांना गोदेच्या पाण्याचें वर्णन ऐकणारास कसेंसेंच वाटेल ). काचीं हिंदुस्थानच्या पूर्वभागांत आहे किंवा हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागाच्या लोकांचा वर्ण भलताच दाखविणें हेहि चुकीचें आहे असें त्यानें स्पष्ट म्हटलें आहे. ( भूगोलाच्या चुक्या कवीनें करूं नये, इतिहासाच्या केल्या तरी चालतील). कालिदासानें रघुवंश६सर्गमध्यें रामाचा पूर्वज अज यास स्वयंवरांत इंदुमतीनें वरिलें त्यावेळीं तिच्या दासीच्या तोंडीं कृष्णाचा उल्लेख घातला आहे ही ऐतिहासिक चुकी आहे. पण सामान्य लोकांस इतकें ज्ञान नसतें. काशीजवळ गोदा सांगितली तर ती त्यांस तात्काळ चमत्कारिक वाटेल ). असो एवढें निश्चित आहे कीं काव्यमिंमांसेतील हा

भूगोलिक अध्याय ( संबद्ध असो वा नसो ) फार महत्त्वाचा आहे. ज्याप्रमाणें आमच्या पहिल्या काल विभागाच्या ( ६००--८०० इ. स. ) इतिहासास वराहमिहिराचें भूगोल-वर्णन महत्त्वाचें आणि दुसऱ्या कालविभागाच्या इतिहासास ( ८००--१००० इ. स. ) स्कंधपुराणांतील हिंदुस्थान-वर्णन महत्त्वाचें, त्याचप्रमाणें या तिसऱ्या कालविभागांस ( १०००--१२०० ) हें राजशेखरकृत भूगोलवर्णन फारच उपयोगाचें आहे. मात्र एवढें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं आमचे हे स्वदेशी ग्रंथकार अल्बेरूनीइतके विश्वसनीय नाहींत. कारण पूर्ण चौकस बुद्धीनें ते लिहीत नाहींत. प्राचीन परंपरागत गोष्टी चालत आल्या तशा हल्लीं असोत किंवा नसोत, ते धुसडुन दिल्या शिवाय रहात नाहींत. त्याप्रमाणें राजशेखरनें पुष्कळ जुन्या देशांची नांवें आपल्या यादींत दिलीं आहेत. एवढी प्रस्तावना करून काव्यमीमांसा अध्याय १७ यांत राजशेखरनें दिलेली हिंदुस्थानची भूगोलिक माहिती पुढें देतों.

हिमालयापासून दक्षिण समुद्रापर्यंत भरतखंडास जो जिंकितों त्यास सम्राट् म्हणतात. आणि कुमारीपुरीपासून बिंदूसरापर्यंत सर्व देश जो जिंकेतो त्यास चक्रवर्ती म्हणतात,

हिंदुस्थानांत मलयादि सात पर्वत ( कुलपर्वत ) आहेत. पूर्व पश्चिम समुद्रांमधील व हिमालय-विंध्य पर्वतामधील प्रदेशास आर्यावर्त म्हणतात- ( या लक्षणांत आर्यावर्ताची मर्यादा पूर्वेस वाढवून त्यांत बंगाल सामील केला आहे ) या देशांतील लोकांपासून आचार शिकावा.

यापैकीं बनारसच्या पूर्वेकडील भागास पूर्वदेश म्हणतात. तेथील लोक म्हणजे देश अंग, कालिंग, कोसल. उत्सल मगध मुद्गर विदेह नेपाल पुड्र प्राराज्योतिष ताम्रलिप्ति मलद मत्त वर्तक सुह्म ब्रह्मोत्तर इत्यादि आहेत. मोठे नद शोण आणि लौहित्य आणि नद्या गया करतोया कशिपा इत्यादि आहेत, तेथील मुख्य वस्तु लवली ग्रंथपर्णिका अगरु द्राक्ष, कस्तूरी वगैरे आहेत.

माहिष्मतीच्या दक्षिणेस दक्षिणापथ आहे. तेथील लोक महाराष्ट्र माहिषक अश्मक, विदर्भ, कुंतल, ऋथकैशिक, शूर्पार, कांची, केरल, कावेर, मुरल, वनवासिका, सिंहल, चोड, पाण्डव, पल्लव, गंग नासिक्य

कुंकण, कोल्लगिरि, वल्लर, वगैरे आहेत तेथील नद्या नर्मदा, तापी, पयोष्णी, गोदावरी, कावेरी, भीमरथी, वेणा, वंजुरा, तुंगभद्रा, ताम्रपर्णी, उत्पलवती, रावण, गंगा वगैरे होत उत्पन्न होणारे विशेष पदार्थ म्हणजे मलयावरील चन्दन आणि मोतीं.

देवसभा नदीच्या पश्चिमेस पश्चिमदेश. तेथील लोक म्हणजे देवसभा सुराष्ट्र, दासेरक, त्रवण, भृगुकच्छ, कच्छ, आनार्त, अर्बुद, ब्रह्मवथ, यवन वगैरे होत नद्या सरस्वती प्रभावती, मही, हुंडिरा वगैरे आहेत, तेथील विशेष उत्पन्न होणारे पदार्थ करीर, पीलु, गुगुल, खर्जूर व क्रमेलक (उंट) होत.

पृथूदकाच्या उत्तरेस उत्तरापथ—तेथील लोक शक, केकय, बोकण, हूण, वपायुज, काम्बोज, वाल्हिक, बल्लव लिम्पाक; कुलूत; कीर; तंगंण; तुषार; तुरुष्क, हारहूण, हूहूण, साहुड, हंसमार्ग, रामठ; करकण्ठ इत्यादि राहतात. नद्या गंगा, सिन्धु, सरस्वती, शतद्र, चन्द्रभागा, यमुना, ऐरावती, वितस्ता, विशापा, कुहा देविका इत्यादि. उत्पन्न होणाऱ्या विशेष वस्तु सरळ देवदारु, रुद्राक्ष, कुंकुम, चमर, अजिन, सौवीर, स्रोतोंजन सैंधव आणि घोडे.

"या चार देशांच्यामधील प्रवेश मध्यदेश होय." दुःखाची गोष्ट ही कीं मध्यदेशाबद्दल त्यानें वरप्रमाणें सविस्तर वर्णन न करतां एवढेंच म्हटलें आहे कीं, येथील लोक, नद्या व उत्पत्तीचे पदार्थ सर्वांस ठाऊकच आहेत. यामुळें पुढीच काळाचे लोक या महत्त्वाच्या माहीतीस मुकलें.

"गंगा यमुना मधील प्रदेश विनशनाच्या पूर्वेस आणि प्रयागाच्या पश्चिमेस अन्तर्वेदी होय. या देशाला उद्देशून दिशा सांगाव्या असें प्राचीन ग्रंथकार सांगतात. मी (यायावर गोत्री) असें आणखी सांगतो कीं यांतहि महोदय (कनोज पासून दिशा व अन्तरें सांगावीं.

निरनिराळया देशांतील लोकांचे वर्ण येणें प्रमाणें. पूर्वेकडील लोकांशा सांवळा, दक्षिणेकडी लोकांचा काळा, पश्चिमेकडील लोकांचा पाण्डु आणि उत्तरेकडील लोकांचा श्वेत. कवीच्या वर्णनांत सांवळा आणि काळा यांत फारसें अन्तर नाहीं. तसेच पाण्डु व श्वेत यांत नाहीं. विशेष गोष्ट हीं कीं पूर्वेकडील देशांतील रजपूतादि स्त्रियांचा वर्ण गौरच दाख-

वावा पाण्डु किंवा श्वेत ). त्याप्रमाणें दक्षिणेकडील लोकांतहि दाखवावा.

वरील वर्णासंबंधींची विधानें महत्त्वाचीं आहेत. यावरून असें दिसतें कीं पूर्वेकडील व विशेषतः दक्षिणेकडील लोकांत जास्त भरणा द्रविडीवंशाच्या लोकांचा असतो. आणि पश्चिमेकडीकडे व विशेषतः उतरेकडे आर्य वर्णांचें लोक जास्त आहेत. दक्षिण व पूर्व इकडेहि वरिष्ट जातीचे लोक रजपूत-ब्राम्हण वगैरे पाण्डु किंवा गौर वर्णाचे असत हें विधान आजमितीस या चारी प्रान्ताच्या लोकांस लागू पडतें,

उत्तरेकडील लोकांत काश्मीर व काबूल मुख्य आर्यदेश यांचा उल्लेख नाहीं याचें आश्चर्य वाटतें. आणि जे लोक सांगितले आहेत ते बहूतेक तुराणी जातीचे किंवा तुराणी-आर्य मिश्र जातीचे आहेत. यवनांचा उल्लेख पश्चिमेकडे आहे, अर्थात ते सिंधचे आरब मुसलमान होत. दहाव्या शतकाच्या प्रारंभीं काबुल अद्याप यवनानीं किंवा तुर्कांनीं जिंकलें नव्हतें. ज्या वेळीं राजशेखरानें हा ग्रंथ लिहिला त्या वेळीं काबूलनें अद्याप पंजाब जिंकलें नव्हतें, परंतु काश्मीरचा उल्लेख येणें जरूर होतें. त्याचप्रमाणें त्रिगर्तजालंदराचा. पंजावच्या नद्या सर्व सांगितल्या आहेत; ( काबुल नदी ) ही सांगितली आहे; व उत्पन्नांत मीठ व केशर पंजाब व काश्मीरच्या वस्तु यांचा उल्लेख आहे.

# प्रकरण २ रे.

## बुखाऱ्याचें सामानी बादशहा.

गझनीच्या तुर्की राज्याची संस्कृति आणि शक्ति नीट लक्षांत येण्यासाठीं ज्या सामानी बादशाहीखालीं गझनीचें राज्य उत्पन्न होऊन वृद्धि पावलें त्या बादशाहीची माहिती वाचकांस होणें अवश्य आहे. रा. ए. सो. च्या जर्नल बंगाल जिल्द १५ भाग १ मध्यें एका लेखकानें उतबीय इतर इतिहासकार यांतून माहिती एकत्र करून सामानी बादशाहा संबंधें एक लेख लिहिला आहे, त्यांतून पुढील त्रोटक हकीकत आम्ही देतों. हें साम्राज्य एका पारशी जरतुष्ट धर्मी पण पुढे मुसलमान झालेल्या एका सरदारानें स्थापिलें. त्याचें नांव असद. त्याचा पुत्र अहमद हा ज्यास्त पराक्रमी होऊन त्यानें समरकंद, बुखारा, आणि या प्रान्तावर सत्ता बसविली. त्याचा पुत्र नस्र. त्याचा पुत्र इस्माइल हा सामानी वंशाचा पहिला प्रख्यात बादशाह इ स. ९०३ मध्यें गादीवर आला. यानें शास्त्र आणि वाङ्मम ( पर्शियन व आरबी ) यांचा पुरस्कार केला आणि बोखारा शहर प्रख्यातीस आणिलें. या बादशहांस अमीर म्हणत. ही संज्ञा पुढें छोटे जागीरदारहि घेऊं लागले. सबुक्तगीनानेंहि हीच पदवी धारण केली व तेथून हिंदुस्थानांत हम्मीर या स्वरूपानें आली. इतिहासकारानीं इस्माइलापासून प्रत्येक अमीरास एक विशिष्ट विशेषण लाविलें आहे. या पहिल्या बादशहास अमीर ‘ माजी ’ असें म्हणतात. याचा पुत्र अहमद, अमीर शहीद ( धर्म युद्धांत मेल्यानें ) या नांवानें प्रसिद्ध आहे. याचा पुत्र नस्र ( दुसरा ) अमीर

सईद किंवा गंभीर हें नांव पावला. या राजाच्या अमदानींत एक तांब्या पितळ्याचे काम करणारा (कासार) याकूब-इ-लेस या नांवाचा मोठा धाडसी उपद्व्यापी वीर उनाड लोकांची टोळी जमवून हिंदुस्थानावर चालून आला. त्यानें प्रथम हिरात घेतलें ( ३०१ हि. ९१२इ. स.).या वेळचें हिंदुस्थान म्हटलें म्हणजे बहुतेक सर्व अफगाणिस्तान व्यापून होतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे.या सिन्धु-पश्चिम भागांचे काबुलिस्तान व झाबुलिस्तान असे दोन प्रान्त होते. ह्मणजे काबुल व झाबुल यापैकीं उत्तरेकडील काबुल प्रान्तांत लल्लिय यांनें स्थापित केलेला ब्राह्मण शाही वंश राज्य करीत होता. ( लल्लिय ऊर्फ कल्लर भाग १ पृ. पाहा ) दक्षिणेकडील झाबुल प्रान्तांत भाटी जातीचे (बहुधा) क्षत्रिय राजे राज्य करीत होते.याकुब इ लेसने झाबुल घेतले इतकेच नव्हे तर काबुलहि घेतले आणि त्या दिवसापासून काबुलचा किल्ला मुसलमानांच्या ताब्यांत राहिला, हिंदूनी परत घेतला नाहीं. काबुलच्या शाही हिंदु राजांनीं शहर परत घेतलें आणि त्यांनीं आपली राजधानी सिन्धु नदीच्या पश्चिम किनाऱ्यावरील वाहिंड ( उदभांड) येथे केलीं. या राजधानी विषयी आम्ही पुढें अधिक सांगणार आहों याकूब इचेस यानें गझनी ( एक लहान खेडें ) जवळ किल्ला बांधून गझनी शहराचा पाया घातला. भोंवतालचा सर्व झाबुलिस्तान प्रान्त जिंकून रजपूतांस पूर्वेस हाकून दिलें. हे भाटी रजपूत सिंधु ओलांडून पंजाबांत येऊन राहिले. हा हल्लीच्या अफगाणिस्थानाचा भाग त्या वेळच्या इतिहासांत रहभुतांचा देश म्हणून प्रसिद्ध आहे.पर्शियन लिपींत रजपूतबद्दल रहभूत वाचलें गेले असल्यानें ही चुकी स्पष्टपणें झालेली दिसते ( रॅव्हर्टीचा अफगाणिस्थान पहा ). परंभु याकुब इलेस यास सामानी राज्यास हाकून देता आले नाहीं किंवा गझनी येथें राजा स्थापिता आले नाहीं. तो धूमकेतूप्रमाणें कांहीं दिवस तपली आणि मग अदृश्य झाला.

नस्र दुसरा याचा पुत्र नुह यास अमीर हमीद संज्ञा आहे. या शद्वाचा अर्थ स्तुत्य असा आहे ( ३३४ हि=९४३ इ.). याच्या वेळीं प्रथम तुर्की गुलाम नोकरींत राहून वर्चस्व स्थापूं लागले. प्रथम सामानी राजांनीं यांस आपले रक्षक ( Guards ) म्हणून ठेविले. जक्झर्तीस नदी सरहद्द असून पलीकडील तुर्क लोक सैन्यांतहि भरती होऊं लागले. तुर्की मुलें गुलाम म्हणूनहि विकत घेतले जात आणि शूर आणि धाडसी वीर तरुण तुर्की गुलाम फौजेंत अधिकाराच्या जागेवरहि नेमले जाऊं लागले. प्राच्य देशांच्या इतिहासांत परकी लोक रक्षक म्हणून किंवा सैन्यांत भरती होऊं लागले म्हणजे रक्षिताचा किंवा नेमणाऱ्यांचा नाश अखेर होतो असें दिसतें. याप्रमाणें बुखारा येथील पर्शियन ( सामानी ) राज्याचा तुर्कांनीं नाश केला व गझनी येथें आपले राज्य स्थापिलें; या गझनीच्या राज्याचा नाश ( दिल्ली येथील ) अफगाणांनीं केला; दिल्ली येथे अफगाणांचा अशाच रीतीनें मोंगलांनीं रक्षक होऊन नाश केला, मोंगलांचा मराठ्यांनीं आणि मराठयांचा इंग्रजांनीं पुणें येथें केला. तात्पर्य जें राष्ट्र किंवा राजकुल परकीयांस सैन्यांत भरती करून त्यावर आपली भिस्त ठेवतें तें लयास गेलेंच पाहिजे, मग तें सैन्य थोडें का असेना ?

नूहच्या अमदानींत घडलेली एक मनोरंजक गोष्ट येथें सांगण्यासारखी आहे; त्यावरून एखादा न्यायी पण कडक मंत्री असंतुष्ट सरदारांच्या रोषास कसा बळी पडतो हें वाचकांस दिसेल. राजवाड्याचा समोर दोन सुरूचे वृक्ष होते त्यांस जोरानें वाकवून एका अप्रिय झालेल्या नूहच्या मंत्र्याच्या दोन्ही पायांस बांधले आणि मग ते सोडून दिले, तेव्हां साहजिकच ते सरळ उभे होऊन त्या मंत्र्याचें शरीर वर उचललें जाऊन फाडलें गेलें. इतिहासकार म्हणतो

कीं "न्यायीपणाचा अतिरेक अथेन्सप्रमाणें बुखारा येथेंहि प्राणघातक झाला."

नूहच्या पश्चात् त्याचा पुत्र अबदुल मलिक बादशाह झाला. यास अमीर रशीद ( धर्मस्थिर ) असें नांव मिळालें आहे व त्याच्या नंतर मनसूर गादीवर आला ( ३४९ हि० ९५९ इ. ). यास अमीर सदीद ( धीर ) म्हणतात. याच्या वेळीं बलिष्ठ तुर्की सरदार स्वतंत्र लहान राज्यें स्थापूं लागले. अबदुल मलिक याचा हाजिब ( द्वाररक्षक ) अलप्तगीन तुर्क होता त्यानें याप्रमाणें गझनीचे लहान स्वतंत्र संस्थान स्थापिलें. याचा गुलाम सबुक्तगीन हाहि कांहीं दिवस सामानी बादशहांचा प्रतिहार होता.

मनसूरच्या मागून नूह दुसरा राज्यावर आला याने ९८६ इ. पासून १००१ इ. पर्यंत राज्य केलें. यापूर्वीच अल्पतगीन मरण पावून त्याच्या नादान मुलास बाजूस सारून तुर्की अमलदारांनीं त्याचा जावई सबुक्तगीन यास गझनीच्या राज्यावर बसविले होतें. सबुक्तगीन मोठा शूर असून अत्यंत न्यायी होता. ही योजना नूहनेंहि मान्य केली. पुढें जेव्हां काशगार येथील तुर्कांचा राजा इलेकखान यानें बुखाऱ्यावर स्वारी केली तेव्हां नूहने सबुक्तगीनची मदत मागितली. आणि आपल्या धन्याच्या मदतीस सबुक्तगीन मोठी फौज आणि हिंदुस्थानच्या राजापासून मिळविलेले तीनशे हत्ती ( याची हकीकत पुढें येईल ) घेऊन स्वतः गेला. या युद्धांत सबुक्तगीनचा पुत्र महमूद हा लहान होता तरी हाजर होता व त्यानें लढाईच्या कसबांत आपला पहिला धडा घेतला. या लढाईत इलेकखानाचा पराभव झाला. आणि बादशाह नूहने संतुष्ट होऊन सबुक्तगीनास नसीरुद्दौला ( दौलतीचा आधार ) ही पदवी दिली आणि महमुदास सैफ्उद्दौला ( दौलतीचा खड्ग ) ही पदवी दिली.

काश्गारच्या तुर्कांचा याप्रमाणें पराभव झाला तरी सामानी बाद-

शाहांचें दिवस मोंजके बाकी होते; व राज्यांत नोकर झालेले तुर्क आणि राज्यावर बाहेरून स्वाऱ्या करणारे तुर्क यांनीं त्यांचें राज्य लौकरच लयास नेलें. या नाशाच्या पायऱ्या मनोवेधक आहेत. नूह मरण पावून त्याचा पुत्र मनसूर गादीवर आला परंतु लौकरच त्याच्या अधिकाऱ्यांनीं त्याचे डोळे काढले आणि गादीवर एक मूल अबदुल मलिक बसविलें. ही संधि साधून इलेकखानानें बुखाऱ्यावर पुन्हा स्वारी केली आणि शहर काबिज करून बादशाहीच्या प्रत्येक वारसास पकडून कैदेंत टाकलें. पण मुंतसिर नांवाचा एक वारस राजपुत्र स्त्रीच्या वेशानें कैदेंतून पळाला. त्यानें राज्य परत मिळविण्यासाठीं शूरत्वानें अनेक प्रयत्न केले. परंतु दारा शिकोह प्रमाणेंच तो दुर्दैवी असल्यानें त्याला जागजागीं अधिकाऱ्यांनीं, किंबहुना महमुदाच्याहि अधिकाऱ्यांनीं विरोध केल्यामुळें एका शहरांतून दुसऱ्यास या प्रमाणें सारखें पळावें लागलें. शेवटीं जंगलांत एक अरबांचा तांडा पडला होता त्यांत आश्रय घेण्यास तो गेला. रात्रीं तांड्याच्या मुख्यानें त्याजवर हल्ला करून त्यास ठार केलें. आपल्या पूर्वीच्या मालकाबद्दल महमुदास बराच आदर असल्यानें त्यानें या गुन्हेगारास पकडून त्यास हालहाल करून मारिलें. याप्रमाणें सामानी वंशाचा आणि राज्याचा अन्त झाला.

सामानी राज्याची संस्कृति व राज्यव्यवस्था साहजिकच गझनीच्या राज्यांत वारसदारीनें आली. सामानी साम्राज्य फार मोठें असून त्यांत खोरासान आणि मवारुन्नहर हे मुख्य प्रान्त असून शिवाय सीस्तान, कर्मान्, जुर्जान, रे, तबरिस्तान वगैरे आणखी मुलूख सामील होते. सामानी राजांच्या राज्यकाल इस्माईलपासून शंभर वर्षें असून वर दोन वर्षें आणि १६ दिवस असा नक्की, तारीख-इ-यमीनी (यमीन म्हणजे महमूद याचा इतिहास) या ग्रंथांत उतबीनें दिला आहे. (उतबीनें प्रत्येक राजाचें नांव व पदवी

व दिवसांसह राज्यकाल आपल्या ग्रंथांत दिला आहे). म्हणजे इ. स. ९०३ पासून सुरू होऊन १००५मध्यें हें साम्राज्य लयास गेलें. या साम्राज्याचे पुष्कळ भाग महमुदानें जिंकून आपल्या राज्यास जोडले हें साहजिकच होते. मुख्यतः खोरासान आणि ख्वारिझम हे सुपीक भाग या अर्वाचीन पार्शियन साम्राज्याच्या संस्कृतीचे केन्द्र होते, ते महमुदानें प्रथम जिंकून आपल्या सत्तेखालीं आणिलें. पार्शियन भाषा या प्रान्तांतील विद्वानांनीं या वेळीं फार उर्जित स्थितीस पोंचविली. अर्थात् हिंदुस्थानच्या मध्ययुगीन काळांत अन्तर्वेद आणि काश्मीर व त्याहून अर्वाचीन काळांत महाराष्ट्र ज्याप्रमाणें पंडितांचे प्रान्त होते त्याप्रमाणें सामानी काळांत खोरासान व ख्वारिझम हे प्रांत विद्वानांचें वसतिस्थान होतें. अर्थात् विद्वान लोक या प्रांतांतून गझनीच्या दरबारांत व पुढें दिल्लीच्या दरबारांत येत राहून मान व अधिकार पावत. यामुळेंच सरकारी कामाची सामान्यभाषा गझनी व दिल्ली या दोन्ही ठिकाणीं पर्शियन होती आणि आरबी भाषा धार्मिक कामाची व परराष्ट्रीय किंवा विशेष महत्त्वाच्या राजकीय लेखांची भाषा होती. राजव्यवस्थेची पद्धत आणि अधिकाऱ्यांचीं नांवें बोखाऱ्यांतूनच घेतलीं गेली यांत नवल नाहीं. या स्थितीचें आणि भरतखण्डांत मध्ययुगीन कालांत असलेल्या स्थितीचें बहुतेक साम्य आहे. मध्ययुगीन हिंदुराज्यांत संस्कृत (आरबीप्रमाणें) राजकीय महत्त्वाच्या लेखांची भाषा होती. दरबारांत विद्वान लोक प्राकृत भाषा ( पर्शियन प्रमाणें) बोलत आणि सामान्य लोक यावेळीं अस्तित्वांत आलेल्या संस्कृत-प्राकृत-मिश्रित हल्लींच्या लोकभाषा हिंदी,मराठी वगैरे बोलत. गझनीमध्यें तीन भाषा या वेळीं चालत. धर्माकरितां आरबी, वरिष्ट लोकांच्या दरबारी व्यवहारांत पर्शियन आणि फौज व गुलाम यामध्यें तुर्की भाषा चाले. बैहकीच्या

ग्रंथावरून असें दिसतें कीं महमूद सुद्धां नोकरांशीं जेव्हां कांहीं खासगी बोलावयाचें असे तेव्हां तुर्की भाषेंत बोले.

## गझनी राज्याची स्थापना.

जें गझनीचें राज्य पुढें महमुदाचे वेळीं इतकें बलिष्ठ झाले कीं, पश्चिमेकडे खुरासान, ख्वारिझम वगैरे प्रांत व पूर्वेकडे सबंध पंजाब प्रान्त त्याच्या सत्तेखालीं आले, तें प्रारंभीं अल्पतगीन यानें स्थापिलें हें वर आलें आहे. बुखाऱ्याचा सामानी बादशहा मनसूर याचा तो सरदार होता. महमुदाचा इतिहास शिवाजीच्या इतिहासाशीं इतका जुळता आहे कीं त्यांचे बाप व आजे यांचेहि इतिहास सारखे आहेत. भोसल्याच्या राज्याचें केंद्र महाराष्ट्रांतील जागा जशी प्रथम मालोजीला मिळाली, त्याप्रमाणें गझनीच्या साम्राज्याचें केंद्र गझनीची जागीर प्रथम अल्पतगीनानें संपादन केली. तो प्रथम मनसूरचा बाप अबदुल मलिक याचा हाजिब ( द्वाररक्षक ) होता. तो नंतर खुरासानचा सुभेदार झाला. अबदुल मलिक वारल्यावर गादीवर मनसूर बसते वेळीं त्यास त्यानें विरोध केला, त्यामुळें त्यास सामानी साम्राज्य सोडावें लागलें. हिंदुस्थानाच्या प्रान्तांत शिरून त्यानें प्रथम गझनी येथें लहान राज्य स्थापिलें. त्याचा गुलाम सबुक्तगीन प्रथम त्याप्रमाणें सामानी बादशहाचा द्वाररक्षक होता; व त्यास त्यानें आपली मुलगी दिली होती.जरी गझनीची जागीर त्यानें स्वतः कमाविलेली होती तरी तो आपल्यास सामानी बादशहांचा मांडलिक समजत असे. शहाजीनें त्याचप्रमाणें पुणें व सुपे ही जागीर स्वपराक्रमानें निजामशाहींतून मिळविली होती तरी तो आपल्यास व आपल्या जागीरीस विजापुरकराच्या सत्तेखालील मानीत असे. सबुकतगीनाजवळ चांगली तयार फौज असल्यामुळें त्याचा मान व अधिकार सामानी दरबारांत मोठा असे; त्याचप्रमाणें शहाजीजवळहि निवडक व कसलेली फौज

असल्यानें विजापुर दरबारचा तो एक महत्त्वाचा महाली होता. आणि सबुक्तगीन सामानी दरबारच्या शत्रूशीं लढण्यांत नेहमीं गुंतला असे, ज्याप्रमाणें शहाजी विजापुरकराच्या शत्रूशीं नेहमीं लढण्यास जाई. यामुळें शहाजीप्रमाणें सबुक्तगीनासहि बऱ्याच आणखी विस्तृत जागिरी मिळाल्या. बहूतेक अंशीं ते दोघेहि स्वतंत्र सत्ताधारी होते तरी दिसण्यांत ते आपल्या वरिष्ट बुखारा किंवा विजापुर येथील सत्तेचे मांडलिक असत. दोघांनींहि स्वतंत्र राज्याचा पाया घालून त्याची जरूरी सामुग्री (फौज व मुलूख ) संपादन केली होती; परंतु त्या दोघांनीं आपल्या आयुष्यांत स्वातंत्र्य पुकारण्याची महत्त्वाकांक्षा धरली नाहीं. हे कार्य दोघांनींहि आपल्या पुत्रांवर टाकून स्वातंत्र्यस्थापनेचें श्रेय पुत्रांस दिलें.

सबुक्तगीनाची नेहमींची पदवी अमीर असून इलेकखान तुर्काचा पराभव करण्याबद्दल बादशहा नूहनें त्यास नासिरुद्दीन हा खिताब दिला होता. महमुदाचा समकालीन इतिहासकार अल्उतबी सबुक्तगीनास नेहमीं नासिरुद्दीन या नावानें संबोधितो. त्याच्या न्यायीपणाची आणि शिस्त राखण्याची उदाहरणें पुढें देऊं. एका तुर्की शिपायाच्या हातांत कोंबड्या पाहून, कोठून आणल्या विचारतां विकत घेतल्या असा जबाब मिळाला. दाखविलेला विकणारा विचारपूस करतां म्हणाला " तुर्क शिपाई कधींच पैसे देत नाहींत." तेव्हां सुबुक्तगीनास अतिशय राग येऊन त्यानें त्या तुर्की शिपायास सर्व फौजे समोर उभा करून त्याच्या कानास भोकें पाडून त्या कोंबड्या त्याच्या कानांस लटकावल्या. अर्थात् त्यांच्या फडफडण्यानें त्याचा जीव अर्ध मेला झाला. अशा कडक शिस्तीनें त्या अडदांड तुर्कांस त्यानें आपल्या कह्यांत ठेविलें आणि लोकांच्या उत्कर्षांत भर टाकली.

अशा न्यायी राजास आणि विशेषतः महमुदाच्या बापास उत्तम कुळांत घालणें हें लोककल्पनेला साहाजिक पसंत वाटलें.

असें मानतात कीं सबुक्तगीन हा अल्पतगीनचा गुलाम असला तरी तो एका तुर्की सरदारांच्या कुळांत जन्मला असून हें कुळ पर्शियन लोकांचा शेवटचा बादशाह यज्दगिर्द याच्या एका मुलीपासून उत्पन्न झालें होतें. ही गोष्टहि शहाजीप्रमाणेंच दिसते, आणि शहाजीच्या कालींच तो शिसोदिया रजपुतांच्या वंशांतील आहे असें मानलें गेलें. उच्च वंशात सबुक्तगीन जन्मला असल्याची हकीकत खुद्द महमुदानें सांगितली (तबकात नासिरी). महापुरुषाची उत्पत्ति एखाद्या विख्यात कुळांतच झाली पाहिजे अशी अवश्यकता नाहीं. परंतु राष्ट्राच्या महापुरुषांना विख्यात कुलोत्पत्ति, कल्पित किंवा खरी, सांगितल्याशिवाय लोकसमजुतीचें समाधान होत नाहीं. असो, ही यज्दगिर्दाच्या वंशातील उत्पत्ति खरी असो वा खोटी असो शहाजी व सबुक्तगीन यांचें साम्य याहि बाबींत दिसतें.

लोकसमजुतीनें ज्याप्रमाणें शिवाजीस देवाचा अवतार मानतात त्याचप्रमाणें मुसलमान लोक महमुदाच्या जन्मासंबंधानेंहि दैवी अंश मानतात. कारण जसा हिंदूंना शिवाजी धर्मदृष्ट्या प्रिय आहे तसा धर्मदृष्ट्या मुसलमानांना महमूद प्रिय वाटतो. सबुक्तगीन शिकारीस गेला असतां एक हरिणाचें पाडस त्यास मिळालें. तें घोड्यावर घेऊन तो घरीं येऊं लागला. त्या पाडसाची माता घोड्यामागें दूरवर धांवत येत असलेली पाहून सबुक्तगीनाच्या अन्तःकरणांत दया उत्पन्न झाली व त्या मातेची कीव करून त्यानें तें पाडस सोडून दिलें. त्यास स्वप्नांत रात्रीं पैगंबर दिसून त्यानें त्याच्या या दयाशील कृत्याची प्रशंसा केली व त्यास मोठें राज्य मिळेल असा आशीर्वाद दिला. अशीहि आख्यायिका आहे की, महमुदाचा जन्म झाला त्या रात्रींहि सबुक्तगीनास एक भाविवैभवसूचक स्वप्न पडलें व आपल्या स्वयंपाक घरांतून एक प्रचण्ड वृक्ष उत्पन्न झाला असें दिसलें. हें स्वप्न तो मंत्र्यास सांगत असतां महमुदाच्या जन्माची त्यास खबर पोंचली.

पैगंबर ज्या वारीं उत्पन्न झाला तो वार ते दिवशीं असल्यानें सबुक्तगीन उद्गारला, " मी पुत्राचें नांव महमूद ठेवितों." अशा गोष्टी वीरांबद्दल त्यांच्या महत्वप्राप्तीनंतर उत्पन्न साहाजिकपणें होतात हें सांगावयास नको. तिसरी आख्यायिका अशी आहे कीं ज्या दिवशीं महमूद जन्मला त्या दिवशीं वहिंड शहरांतील मुख्य देवालय खालीं पडलें. मुहम्मद पैगंबराच्या जन्माबरोबर पर्शियन बादशहांच्या राजवाड्यांतील आतशघर धरणीकंपानें नष्ट झाले या आख्यायिकेसारखी ही गोष्ट असून यावरून असें सूचित केलें जातें कीं हिंदु लोकांच्या मूर्तिपूजेवर महमूद आपल्या आयुष्यभर हल्ला चढविणार. या आख्यायिका नमूद केल्यावर ऐतिहासिक दृष्टया वर्णन करावयाचें म्हणजे तबकातनासिरीमध्यें महमुदाची जन्मतिथि हिजरी स. ३६१ मोहरम ता. १० अशी दिली आहे. ही तिथि म्हणजे इ. स. ९७१ आक्टोबर २ होय (इलियट २ पा. २६१). परंतु फिरिश्ता हि. ३५७ मुहरम ८ ही तिथि देतो ( सदर ). ही तारीख चार वर्षें सुमारें अगोदर पडते. ( आश्चर्याची गोष्ट कीं शिवाजीच्याहि जन्ममिती बद्दल दोन मतें असून त्यांत तीन वर्षांचा फरक आहे. )

सबुकतगीनानें ९७७ इ. पासून ९९७पर्यंत राज्य केलें. त्यानें आपलें राज्य दक्षिणेकडे कन्दहार व झाबुलिस्तानची राजधानी बस्त जिंकून वाढविलें होतें. पूर्वेकडे हिंदुस्थान होतें तिकडेहि राज्य वाढविण्याचा त्यानें प्रयत्न केला होता. हिंदूंचा आणि तुर्कांचा लढा मुख्यतः सबुक्तगीनच्या वेळीं सुरू झाला. या बाजूकडील त्याचा शेजारी समकालीन राजा जयपाळ हा होता. या जयपाळाचें वर्णन मुसलमानी तवारिखांत हिंदुस्थानचा राजा, काबुलचा राजा, आणि लाहोरचा राजा असें निरनिराळ्या तऱ्हेचे येतें. तेव्हां हा राजा कोण व कोठील होता हें पुढील टिप्पणींत ठरविलें आहे, कारण सर व्हिन्सेंट

स्मिथ पर्यंत सुद्धां हा प्रश्न अनिश्चित दिसतो आणि निरनिराळीं मतें आपल्या दृष्टीस पडतात.

## टिप्पणी—हिंदुस्थानचा राजा जयपाळ.

मुसलमान इतिहासकारांनीं सांगितलेला "हिंदुस्थानचा राजा जयपाळ" हा कोण व कोठील होता ? आमच्या मतें स्पष्टपणें हा काबूलचा शाही ब्राम्हण राजा जयपाल होय. पूर्वभाग (पृ. १५७ पा. २०२) यांत वर्णिलेल्या लल्लिय राजानें स्थापिलेल्या शाही राजघराण्यांतील चौथा राजा जयपाल हाच मुसलमान तवारिखांचा जयपाल होय असें स्पष्ट दिसतें. परंतु हें स्पष्ट व साहजिक अनुमान हल्लीं आधारभूत मानलेल्या सर व्हिन्सेंटस्मिथ यांच्या हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास या पुस्तकांत अमान्य केलें आहे. या पुस्तकाच्या १९१५च्या तिसऱ्या आवृत्तींत पुढील मजकूर आहे. "या काळांत जयपाल नांवाचा राजा पंजाबांत राज्य करीत असून याची राजधानी भटिंडा होती. हें शहर लाहोरच्या दक्षिण नैऋत्य दिशेस आणि पतियाळाच्या पश्चिमेस आहे.याचें राज्य सिन्धु नदीचें वरील खोरें तसेंच पंजाबचा बहुतेक प्रदेश सिन्ध प्रान्ताच्या उत्तरेस पश्चिमडोंगरापासून पूर्वेस हक्रा नदीपर्यंत इतक्या मुलुखांवर होतें." हें या प्रदेशाचें वर्णन जरी बहुतेक बरोबर आहे तरी यांत गर्भित रीतीनें असें दाखविलें आहे कीं हा राजा आणि पूर्व–वर्णित काबुलचा ब्राम्हण राजा जयपाल ह्या भिन्न व्यक्ति होत. या पानावरील (पृ. ३८२ खालच्या) टिपेंत स्मिथ आणखीं असें म्हणतो कीं "हल्लींच्या मताविरुद्ध असलेलें हें संक्षिप्त विधान रॅव्हर्टीच्या मतानुसार दिलें आहे" याचा ज्यास्त खुलासा स्मिथनें इं. अॅ. व्हा. ३७ (१९०८) यांत चन्देलांविषयीं जो लेख लिहिला आहे त्यांत केला असून तेथें "तबकात–इ-नासिरी' या ग्रंथाचे रॅव्हर्टीनें केलेल्या भाषान्तराचा हवाला 'बाहिंडा वरील टीपेंत असा दिला असून आपल्या टीपेंत आणखी असे म्हटलें आहे कीं जयपाल म्हणजे वाहिंडचा जयपाल असें जें मिस डफनें आपल्या "Chronology" या पुस्तकांत म्हटलें तें चुकीचें आहे, हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पृ. ३८३ खालील टिपेंत स्मिथ आणखीं

असें म्हणतो कीं ओहिंड येथील राजवंश आणि भटिंडा येथील राजवंश यांचा इलियटनें घोंटाळा केला आहे. आणि यामुळें त्यानें दिलेली सर्व हकीकत दुर्बोध झाली आहे." परंतु रॅव्हर्टीनें दिलेली वरील टिपेंतील प्रमाणें व त्याचप्रमाणें या विषयावर जो पुरावा हल्लीं उपलब्ध आहे त्यांतील प्रमाणें यांचा विचार करतां आम्हास असें वाटतें कीं या जयपालाचें जें एक निराळें राज्य स्मिथनें स्थापित केलें आहे तें चुकीचें असून पूर्वींचें इलियट व मिस डफ या लेखकांचें मत ग्राह्य आहे. याची मिमांसा पुढील प्रमाणें.

प्रथम हें सांगणें अवश्य आहे कीं रॅव्हर्टी यानें जो हा नवीन राजा कल्पिला याचें कारण असें दिसतें कीं नासिरी ग्रंथांत वाहिंडच्या ऐवजीं वामंड असें वाचलें गेलें. हा शब्द प्रथम नासिरी ग्रंथांत पुढील वाक्यांत आला आहे." ज्या दिवशीं महामुदाचा जन्म झाला त्या दिवशीं पर्शावरमधील इंडस्नदीच्या कांठीं वामंड शहरांत एका मूर्तीचें देवालय पडलें" रॅव्हर्टीनें हें देवालय सिंन्धुनदीच्या पूर्वेस असलें पाहिजे असें मानून वामंड हें नांव निरनिराळ्या तऱ्हेनें वाचण्याचा प्रयत्न केला. येथें हें सांगितलें पाहिजे कीं पर्शियन लेखांत व कित्येकदां आरबी लेखांतहि हिंदी नांवांचा योग्य उच्चार करण्यांत टिंबें गाळलीं गेल्यानें वारंवार चुक्या होतात; कारण ब, प, त, न हीं अक्षरें विशिष्ट टिंबें गळल्यानें सारखींच दिसतात, तसेंच व आणि द यांचाहि घोंटाळा होतो आणि ह, च, ज यांचा भेद राहत नाहीं. कित्येक तर्क केल्यावर कर्नल रॅव्हर्टीनें शेवटीं हें शहर बाथिंडा असलें पाहिजे असें ठरविलें व याला आधार जम्मूच्या राजांचा एक पर्शियन भाषेंतील इतिहास घेतला. हा इतिहास एका हिंदुलेखकानें लिहिला असून त्यांत असें विधान आहे कीं जयपालची राजधानी व राहाण्याचें ठिकाण 'बथिंडा' होतें. हा इतिहास कोठें आहे व कधीं लिहिला गेला याचा खुलासा नाहीं. आणि हें शक्य आहे कीं या इतिहासाच्या प्रतींत वाचतांना किंवा लिहितांना बाथिंडा हा शब्द पर्शियनमध्यें मुळच्या वाहिंडच्या ऐवजीं वाचला गेला किंवा लिहिलाहि गेला. शिवाय हा जम्मूचा बखरकार अलीकडील लेखक दिसतो; महमुदाचा समकालीन नसावा. अर्थात् त्यानें हे विधान पूर्वील

एखाद्या पर्शियन इतिहासावरून केलें असावें, आणि त्यानें स्वतःच चुकीनें वाहिंडच्या ऐवजीं बाथिंडा वाचलें असावें. रॅव्हर्टीसारख्या माहितगार इतिहाससंशोधकांची या जम्मुबखरीमुळें दिशाभूल झाली याचें आम्हास आश्चर्य तर वाटतेंच, पण त्याहिपेक्षां रॅव्हर्टीच्या टिप्पणींतील या विधानानें सर व्हिन्सेंट स्मिथची दिशाभूल व्हावी याचें आम्हास जास्त आश्चर्य वाटतें. असो, या समजुतीविरुद्ध ज्या प्रमाणभूत गोष्टी आपल्या समोर येतात त्यांचा आपण विस्तारानें ऊह करूं.

पहिली गोष्ट ही कीं महमुदाचा समकालीन व विश्वासार्ह इतिहासलेखक अल्बेरूनी हिंदुस्थानचा भूगोल वर्णितांना या जयपालाच्या राजधानीचा बिलकुल उल्लेख करीत नाहीं. आम्हीं मुद्दाम अल्बेरूनीच्या हिंदुस्थानावरील ग्रंथांतून हा भूगोलविषयक अध्याय पुस्तकाच्या आरंभीं दिला आहे त्या वरून वाचकांस महमुदाच्या वेळीं हिंदुस्थानची राजकीय परिस्थिति कशी होती हें कळेल. अल्बेरूनीनें वाहिंडचा कंधारची राजधानी म्हणून स्पष्ट उल्लेख केला आहे आणि कंधार म्हणजे गांधार हें सांगावयास नको. वाहिंड सिन्धूच्या पश्चिमकिनाऱ्यावर आहे असेंही त्यानें सांगितलें असून वाहिंडहून पेशावर, तेथून काबूल, तेथून गझनी अशीं शहरें दिलीं आहेत. त्यानें "रावीच्या पूर्वेस लोहावरची राजधानी मन्दहकूर" असें लिहिलें आहे. हें मन्दहकूर कोणतें ठिकाण हें ठरवितां येत नाहीं. पण मन्दहकूर हें बंथिडा नव्हे, कारण तसें तें चुकीनेंहि वाचतां येणार नाहीं. आणि शिवाय ते रावीवर पूर्वेसहि नाहीं. (कदाचित् येथें भाषांतरांत मन्दहकुरची राजधानी लोहावर रावीच्या पूर्व किनाऱ्यावर असें असलें पाहिजे होतें तें चुकीनें उलटें झालें असावें). वाहिंड आणि लाहोर यांच्या दरम्यान महत्वाचें दुसरें शहर नसावें आणि यावरून असें दिसतें कीं काबुलचेच राजे पंजाबावर राज्य करीत होते. मुसलमानी तवारिखांवरून स्मिथनें दिलेला जयपालाच्या राज्याचा विस्तार बरोबर आहे. सिन्धुनदीच्या पश्चिमेकडील डोंगरापासून हें राज्य घग्गर नदीपर्यंत म्हणजे मुसलमानाची हक्रा नदी येथपर्यंत पसरलें होतें. परंतु हें राज्य काबूल–वाहिंड राज्यापासून निराळें करतां येत नाहीं; म्हणजे दोन्ही राज्यें एकच होत.

दुसरी गोष्ट अशी कीं अल्बेरूनी पूर्वीं कांहीं वर्षांनीं लिहिणारा आरबी इतिहासलेखक अल-इद्रिसी सांगतो कीं गंगेवरील अत्रसा हा एक कनोज राज्याचा सरहद्दीवरील मजबूत किल्ला आहे व कनोजची हद्द काबूल-लोहावर पर्यंत लागली आहे. यावरून त्यावेळीं काबूल व लाहोर एकच राज्य होतें असें दिसतें व त्याची हद्द व कनोजची हद्द एक होती. हिंदुस्थानचे राजकीय विभाग अल्बेरूनीच्या लेखावरून दिसतात. त्यांत पंजाबचें निराळें राज्य दिसत नाहीं. अरबप्रवासी अल-मसूदी लिहितो कीं ( ९५३ इ. स. ) सिन्धु नदी सिन्ध, कनोज, काश्मीर, गांधार आणि ताफन या मुलुखांतून येते. यांत फक्त चार राज्यें सांगितलीं आहेत; त्यांपैकीं कंधार म्हणजे गांधार होय व त्याची राजधानी पशांवर (पेशावर) प्राचीन पुरुषपुर ही होती. शेवटीं हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं तबकात-इ-नासिरीमध्येंहि वामंड ( म्हणजे वाहिंड ) परशावरमध्यें म्हणजे पेशावर प्रान्तांत आहे असेंच सांगितलें आहे. जेथील देऊळ पडलें ती जागा पेशावर प्रान्तांतील. बाथिंडा सतलजच्या दक्षिणेस आहे.

वर दिलेल्या भूगोलिक प्रमाणांप्रमाणेंच ऐतहासिक प्रमाणेंहि हेंच अनुमान सिद्ध करतात. प्रथम हें कीं तिन्ही राजांचीं नांवें दोन्ही ठिकाणीं एकच आहेत आणि त्यांचा क्रमहि तोच आहे. काबुल-वंशांत जयपाल त्याचा पुत्र आनन्दपाल व त्याचा पुत्र त्रिलोचनपाल आहेत आणि या कल्पित बथिंडा राजवंशांतहि तेच राजे त्याच क्रमानें सांगितले जातात-स्मिथनें आपल्या इं० अं. व्हॉ ३७ मधील लेखांत तिसऱ्याचें नांव ब्राह्मण. पाल असें दिले आहे. परंतु हीहि पर्शियन लिपींत भलतेंच वाचण्याची चुकी आहे. आरंभीचा त, ब वाचल्यानें व पुढील ह च वाचल्याने त्रिलोचनपालच्या ऐवजीं ब्राह्मणपाल वाचलें गेलें आहे. असें वाचलें जाणें किती साहाजिक आहे हे कोणाहि पर्शियन लिपि जाणणाऱ्यास कळणारें आहे. हेंच मुसलमानी इतिहासांत दिलेलें नांव कित्येकांनीं प्रथम तिरोजनपाल असें वाचलें. ब्राह्मणपाल हें नांव हिंदुलोकांत दिसत नाहीं आणि हें नांव त्रिलोचनपाल असावें अशी शंका अनेक युरोपीय पंडितांसहि आली होती. ( हें नांव राजतरंगिणीवरून प्रथम निश्चित कळलें आहे ).

असो; तिन्ही नांवें एक आणि एकाच क्रमानें आल्यामुळें दोन्ही राज्यें एकच आहेत हें निश्चित दिसतें.

दुसरें, मुसलमानी तवारीखांत हे " हिंदुस्थानचे राजे " ब्राह्मण होते असेंच बहुतेक सर्वत्र दिलेलें असतें; आणि काबुलचे शाही राजे हे ब्राह्मण होते हें अल्बेरूनीवरून ठरतें. यावेळीं फक्त काबुलांत ब्राह्मण राजे होते, इतरत्र सर्व ठिकाणीं रजपूत राजे होते; यावरूनहि हीं दोन्ही राज्यें एक असावीं. तिसरें, वाहिंड संस्कृत उदभांड येथील शाही राजांच्या वैभवाचें जें वर्णन राजतरंगिणीकार कल्हणानें केलें आहे, तें त्याचें राज्य लहानसें काबूल–पेशावर पुरतें मानलें तर जुळत नाही. आणि ज्याच्या नाशाविषयीं त्यानें इतकें दुःख केलें आहे, त्यांचे राज्य विस्तृत असून पंजाबभर पसरलें होतें असें मानलें तरच त्याचें वैभव मोठें होऊं शकतें. आणि शेवटली गोष्ट ही कीं, मुसलमानी बखरकार जेव्हां असें वर्णन करतात कीं पेशावर जवळील युद्धांत जयपालाचा पराभव केल्यावर महमुदानें एकदम वाहिंडवर हल्लाकरून ती राजधानी हस्तगत केली, तेव्हां आपल्यास बहुतेक निश्चय होतो कीं हें वाहिंड पेशावरजवळ सिंधच्या पश्चिमेस असलें पाहिजे. तें बाथिंडा असूं शकत नाहीं, कारण बाथिंडा येथें पोंचण्यास महमुदास पंजाबच्या पांची नद्या ओलांडून सतलजच्याहि दक्षिणेकडील पतियाळाच्या पश्चिमेपर्यंत जावें लागतें. तात्पर्य, हिंदुस्थानचा राजा जयपाल याची राजधानी वाहिंडच ठरते.

मुसलमानी ग्रंथांत जयपाल यास कधीं हिंदुस्थानचा कधीं काबूलचा राजा आणि पुष्कळदां लाहोरचा राजा असें म्हटलेलें आढळतें. याचें कारण काय हें येथें दाखविणें मनोरंजक होईल. प्रथम हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं दहाव्या शतकांपर्यंत हेलमंड नदीच्या पूर्वेकडील सर्व भाग हिंदुस्थान समजला जाई. जेव्हां याकूब–इ-लेस यानें गझनी प्रथम घेतली त्यावेळीं ती हिंदुस्थानांतच मोडत होती ( भाग १ पृ. १९१ पहा ). आणि कन्दहारहि हिंदुस्थानांतच होतें. त्यास राजपुतांचा देश म्हणत. ( अलमसऊदी ९५३ इ० ). गझनी राज्य प्रथम स्थापित झालें तेव्हां ते हिंदुस्थानांतून निराळें पडलें. तरी त्याच्या उत्तर, पूर्व, दक्षिण, आणि पश्चिमहि बाजूस हिंदुस्थानचीच हद्द होती. सबुक्तागिनानें जवळचे चारी

दिशांकडील थोड थोडे भाग जिंकून गझनी राज्यांत सामील केले. गझनीच्या पूर्व व उत्तर बाजूस जयपालचें राज्य होतें या प्रदेशास हिंदुस्तानच म्हणत आणि येथील लोक अद्याप हिंदु होते. ललिय यानें स्थापित केलेला ब्राह्मण राजवंश आरंभीं काबुल येथें राज्य करीत होता. याकूब-इ- लेस यानें काबुल जिंकून काबुलचा किल्ला जेव्हां आपल्या ताब्यांत घेतला तेव्हां असें दिसतें कीं काबुलच्या शाही राजांनीं आपली राजधानी वाहिंड येथें केली. तथापि काबुलच्या शहराचा कबजा त्यांनीं सोडला नाहीं, किल्ला मात्र मुसलमानांच्या ताब्यांत राहिला. भोंवतालचा मुलूखहि त्यांच्या कबज्यांत होता. काबुलचा किल्ला मूसलमानांकडे कां त्यांनीं राहूं दिला हें एक गूढ आहे. काबुलचा किल्ला मुसलमानांच्या ताब्यांत राहिला याबद्दल शंका नाहीं, कारण मुसलमानी लेखक तसें स्पष्ट सांगतात. कदाचित् काबुलच्या शाही ब्राह्मण राजांनीं मुसलमानांची साम्राज्य-सत्ता कांहीं वेळ मान्य केली असावी (भा. १ पृ. १९३ पहा). एक काबुल शहा गझनीच्या वरिष्ट मुसलमानी सत्तेस तुर्कांविरुद्ध मदत करण्यासहि तयार झाला होता हें आपण पहिल्या भागांत पाहिलेंच आहे (पृ. सदर). कारण कोणतेहि असो, काबुलच्या शाही ब्राह्मण राजांस आपली राजधानी सिन्धूच्या पश्चिम किनाऱ्यावरील वाहिंड (उदभाण्ड-कल्हण) येथें नेणें सोइस्कर वाटलें.

पण काबुल शहराचा ताबा त्यांकडेच होता आणि ही आपली जुनी राजधानी अशी त्यांची तिजविषयीं सादर श्रद्धा होती. मुसलमानी इतिहास-लेकक असें लिहितात कीं, काबुलच्या प्रत्येक शाही राजाचा राज्याभिषेक काबुल येथेंच होतो. "असें झाल्याशिवाय लोक त्यास राजा म्हणून मान्य करीत नाहींत." (भा. १ पृ. २०१). यावरून असें दिसतें कीं हे ब्राह्मण शाही राजे वाहिंड येथें नेहमीं राहत असले तरी राज्याभिषेकासाठीं काबुलास जात. ह्या त्यांच्या पद्धतीची योग्य कल्पना येण्यास

---

× अलमसऊदीचें भाषान्तर स्प्रेंन्गर यानें केलें आहे त्यांत पुढील वाक्य आहे. "हिंदु लोक खुरासानच्या पर्वतापासून तिबेटच्या पर्वता-पर्यंत पसरले आहेत.

अलीकडील इतिहासांतील पेशव्यांचें उदाहरण पुरे आहे. पेशवे पुण्यास रहात पण पेशवाईची म्हणजे कारभाराची वस्त्रें घेण्यास साताऱ्यास नामधारी राजांकडे जात. पेशव्याप्रमाणेंच काबुलचे ब्राह्मण राजे मुळांत तेथील क्षत्रिय राजाचे सेनापति होते ( स्फलपति ही त्यांची संज्ञा असे ). अर्थातच शाही राजांनीं काबुलास येऊन राज्याधिकार धारण करावा अशी जरूरी लोक समजत. तात्पर्य मुसलमानी ऐतिहासिक लेखकांचे वरील विधान सकृद्दर्शनी विलक्षण वाटतें. पण मूळ राजधानी कबूल होती नवी वाहिंड होती हें लक्षांत घेतलें म्हणजे यांतील चमत्कारिकपणा नाहींसा होतो.

काबुलच्या शाही राजांची सत्ता पंजाबावर दहाव्या शतकांत प्रस्थापित झाली, अगोदर नव्हे असें दिसतें. नवव्या शतकांत लल्लियास जिंकून काश्मीरनें कांहीं दिवस काबुलवर कबजा केला होता हें आपण पहिल्या भागांत पाहिलेंच आहे. पंजाबांत त्यावेळीं एका टांक राजाची तसेंच काश्मीरची आणि कनोजच्या प्रतिहार राजांचीहि सत्ता होती. मुलतानच्या मुसलमानी राजांची सत्ता मुलतानजवळील कांहीं भागावर असणेंहि संभवनीय आहे. अल्मसऊदीच्या पुराव्यावरून असें दिसतें कीं दहाव्या शतकांत काबुलच्या राजांची सत्ता लाहोरवर असून त्यांच्या राज्याची सीमा कनोजच्या राज्यास लागून होती. पंजाबांतील त्यांची राजधानी लाहोर असावी. हें शहर प्रथम कोणी वसविलें हें सांगतां येत नाहीं. लोकदन्तकथेंत त्याची स्थापना लवानें केली असें सांगितलें जातें ( लाहोर गॅझेटियर ). ऐतिहासिकरीत्या विचार करतां ज्या अर्थी ह्युएन त्संगने याचा निर्देश केला नाहीं त्याअर्थीं त्यानंतर हें शहर अस्तित्वांत निदान प्रसिद्धीला आलें असें ठरतें. बहुधा या शाहीराजांच्या अमदानींतच तें प्रसिद्धि पावलें, यामुळेंच या राजांस हिंदुस्थानचे राजे, काबुलचे राजे, वाहिंडचे राजे व लाहोरचे राजे असे मुसलमानी तवारिखकार निरनिराळे नांव देतात. प्राचीन मुसलमानी लेखांत लाहारचें रूप लोहावुर आणि लोहुर असें आढळतें, हा स्पष्टपणें लोहपुरचा प्राकृत अपभ्रंश होय.

आर्किआलॉजिकल सुपरिंटेंडेंट राय ब. दयाराम साहनी यांनीं स. १९१७ सालच्या आर्किआलाजिकल रिपोर्टांत या राजांचे तीन शिलालेख वर्णिले

आहेत. या राजांस साहानी काबुल-पंजाबचे राजे म्हणतात हें योग्यच आहे. हे शिलालेख लाहोरच्या म्यूझिअममध्यें ठेविले आहेत. पहिला लेख भीमाचा असून त्यास या लेखांत " राजाधिराज गदाधारी भीमदेव कलक (म) लवर्मन्‌चा पुत्र " असें वर्णिलें आहे. दुसरे दोन लहान लेख जयपालचे असून त्याचें वर्णन 'भीमदेवपुत्र जयपालदेव' असें आहे. रायबहादर साहनी 'कमलवर्मन्' शब्दावरून असें अनुमान काढतात कीं 'हा क्षत्रिय होता, अल्बेरूनी म्हणतो किंवा अल्बेरूनीवरून समजूत करून घेणारे इतिहास-लेखक म्हणतात त्याप्रमाणें तो ब्राह्मण नव्हता.' परंतु आमच्या मतें अल्बेरूनीसारख्या चौकस व माहितगार समकालीन लेखकाचें विधान बाजूस सारणें योग्य नाहीं. हे राजे क्षत्रिय असते तर अल्बेरूनी ब्राह्मण कां म्हणतो याचें कारणहि ध्यानांत येत नाहीं. हिंदु नांवाचें उपपद, मग तें वर्मा, गुप्त, किंवा दास असो, जातीसंबंधानें निरुत्तर पुरावा नव्हे. कारण हीं उपपदें मन्वादि स्मृत्यनुरूप क्षत्रिय, वैश्य, व शूद्र यांचीं अनुक्रमें असलीं तरी प्राचीन काळापासून अनुलोमरीत्या पाहिजेल त्या जातीचा मनुष्य धारण करी असें दिसतें. × त्याप्रमाणें ब्राह्मणानींहि केल्याचीं उदाहरणें आहेत. शिवाय कमलु वगैरे शाही राजे क्षत्रिय कर्म करीत किंबहुना ते बहुतेक सर्वस्वी क्षत्रिय होते. तेव्हां कमलूचें नांव कमलवर्मन् असें शिलालेखांत दिलें आहे यांचें आश्चर्य नाहीं. तात्पर्य हे राजे वर्णानें ब्राह्मण होते असें अद्यापहि मानण्यास हरकत नाहीं. त्यांच्या मुली क्षत्रियांस दिल्या जात व ते क्षत्रिय कन्या करीत यांतहि कांहीं वावगें नाहीं.

---

× ऋग्वेदाचें ऐतरेय ब्राह्मण सांगणारा महीदास ऐतरेय हा ब्राह्मण होता. इतरायाः पुत्रः ऐतरेयः अशा व्युत्पत्तीनें हा शूद्रापुत्र होता अशी आख्यायिका रचली आहे. पण शूद्रापुत्र असला तरी त्यावेळच्या वर्ण नियमानुसार व्यासाप्रमाणें तो ब्राह्मणच ठरतो. ऋग्वेदांतील सुदास कित्येक लोक चुकीनें शूद्र राजा समजतात पण, सूर्यवंश व चंद्रवंश दोन्हींत सुदास राजा येतो. पंचतंत्राचा लेखक विष्णुगुप्त हा ब्राह्मण होता. चन्दनदास वैश्य नारायणदास ब्राह्मण वगैरे आणखीं उदाहरणें अनेक आहेत.

## टिप्पणी २–मोह्याल ब्राह्मण.

मोह्याल ब्राह्मण सारस्वत ब्राह्मणांची एक शाखा असून पंजाब प्रान्तात बहुतेक सर्वत्र, वायव्य सरहद्दीवरील प्रान्त, आणि अफगणिस्तान या प्रदेशांत राहतात. मोह्याल ब्राह्मण असें मानतात कीं जयपाल व आनंदपाल मोह्याल ब्राह्मण होते. ही त्यांची समजूत योग्य व न्यायाची दिसते. कारण मुसलमानांच्या, शिखांच्या व ब्रिटिशांच्याहि अमदानींत शिपाई व फौजी आफिसर या नात्यानें त्यांनीं आपलें नांव गाजविलें आहे. त्या ब्राह्मणांचा असा दावा आहे कीं, आम्हांस दान घेणें किंवा व्यापार करणें निषिद्ध आहे. महाभारतांतील प्रसिद्ध ब्राह्मण योद्धे अश्वत्थामा, कृपाचार्य वगैरे पासून आपली उत्पत्ति आहे असें ते मानतात. ही गोष्ट खरी असो वा नसो, काबुलच्या ब्राह्मणशाही राजांच्या वेळेपासून ही ब्राह्मणजात क्षत्रियधर्म वागवूं लागली आणि नांवालौकिकास चढली यांत संशय वाटत नाहीं. ही यांची परिस्थिति अलीकडील इतिहासांतील चित्पावन ब्राह्मणांच्या परिस्थितीशीं जुळते. पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ याच्या वेळेपासून चित्पावन ब्राह्मण क्षत्रिय धर्म चालवूं लागले. आणि ते पेशव्यांच्या सर्व अमदानींत फौजी व मुलकी अम्मलदारीच्या जागा करीत होते. पैकीं मुलकी नोकऱ्या अजूनहि ब्रिटिश अमदानींत ते बजावीत आहेत. हल्लीं फौजी नोकऱ्या करीत नाहींत हें साहजिक आहे.

मोह्याल ब्राह्मणांचीं सात कुलें आहेत, व ते कुलाच्या बाहेर पण जातीच्या आंतच लग्नें करतात. या कुलांचीं नांवें दत्त, वैद्य, बाली, छिब्बर, मोहन, बमवाल आणि लव अशीं आहेत. जयपालादि ब्राह्मण राजे दत्त कुलांतील असून त्यांचें गोत्र भारद्वाज आहे, हें येथें सांगण्यासारखें आहे. प्रसिद्ध रामभुज दत्त चौधरी हे मोह्याल ब्राह्मण होते. माजी अफगाणिस्तानचे अमीर यांचे मुलकी कारभारी दिवाण नरंजनदास हे भेराचे राहणारे असून मोह्याल ब्राह्मण आहेत व अद्याप काबुलांत हयात आहेत. हीं दोन नांवें सांगितलीं म्हणजे मोह्याल ब्राह्मण पंजाब व काबूल येथें कसे नामांकित आहेत हें वाचकांस कळून येईल. ज्या अनेक मोह्याल वीरांनीं मुसलमानी व शिख अमदानींत कीर्ति मिळविली त्यांचीं नांवें येथें देणें अवश्य नाहीं.

# प्रकरण ३ रें.

## सबुक्तगीन आणि जयपाळ.

हिंदुमुसलमानांच्या झगड्याचा, विशेषतः महमुदाच्या हिंदुस्थानांतील स्वाऱ्यांचा इतिहास मुसलमानी ग्रंथकारांनीं महमुदाचा समकालीन अल्उत्बीपासून दक्षिणेस १५०० इ. स. सुमारें झालेल्या फिरिश्तापर्यंत, तसेंच पाश्चात्य ग्रंथकारांनीं प्रतिभाशाली गिबनपासून इलियट व एल्फिन्स्टन व लेनपूल व स्मिथपर्यंत, त्याचप्रमाणें नामांकित फ्रेंच व जर्मन इतिहासकारांनीं लिहिला आहे. डॉ. व्हिन्सेंट स्मिथ यानें तर हिंदुस्थानांतील कोरीव लेख व नाणीं यांपासून मिळणाऱ्या माहितीचाहि प्रकाश या इतिहासावर अधिक पाडला आहे. तरीहि या इतिहासाची हिंदी दृष्टीनें व हिंदुस्थानांत झालेल्या अलीकडच्या संशोधनावरून पुनः विचार करण्याची आवश्यकता आहे. ऐतिहासिक शक्याशक्यतेच्या मुशींत घालून ऐतिहासिक टीकेच्या अग्नींत हा इतिहास तावून सुलाखून घेतला पाहिजे. कांहीं नवीन माहिती मिळणें शक्य नाहीं, पण जुन्या चमत्कारिक गोष्टी व कल्पना काढून टाकणें शक्य आहे. हेंच आम्ही पुढील प्रकरणांत करणार आहों आणि या इतिहासावर हिंदुस्थानांतील अलीकडील संशोधनाचा प्रकाश पाडून हिंदु लोकांच्या दृष्टिकोनानें त्याजकडे पाहून आमचे विचार वाचकांपुढें मांडणार आहों. हें सांगणें नको कीं समकालीन इतिहासकार उत्बी नंतर झालेल्या लेखकांपेक्षां जास्त भरवंशालायक आहे; पण उत्बीचीहि विधानें ऐतिहासिक टीकेच्या कसोटीवर घासून घेतलीं पाहिजेत.

सबुक्तगीन गझनी येथील लहानशा राज्यांत स्थिर झाल्यावर तें राज्य वाढविण्याच्या प्रयत्नास साहजिकच लागला. गझनीची लहानशी मांडलिकी हिंदू–समुद्राच्या पाण्यावरील लहानशा तैल-बिंदूसारखी होती. पण हें तेल चारी बाजूंस प्रसरण पावलें. तें इतकें कीं, त्याचा पुत्र महमूद याच्या वेळीं अफगाणिस्थान, पंजाब व खुरासान वगैरे प्रांतभर तें पसरिलें. सबुक्तगीनानें प्रथम कंदहार व रजपूत राज्याची राजधानी बस्त ही जिंकून घेतली. त्यानें नंतर अल्रुखज् म्हणजे ग्रीकांचा अराचोसिया प्रांत, ज्याला पार्थियन लोक ‘ पांढरें ’ हिंदुस्थान म्हणत ( भाग १ पान १९१ ), तो जिंकून घेतला. त्याचप्रमाणें त्याची राजधानी कसदार जिंकून तेथील राजास मांडलिक बनवून त्याच्या नाण्यावर आपलें म्हणजे सबुक्तगीनाचें नांव घातलें ( उत्बी. पान ३३ ). याप्रमाणें आपली पिछाडी मजबूत करून त्यानें पूर्व व उत्तर जिंकण्याची महत्त्वाकांक्षा धरली. तेव्हां अर्थातच वाहिंद व काबूल यांचा राजा जयपाळ याशीं त्याचा झगडा सुरू झाला.

प्रथम आगळीक कोणीं केली हें पाहण्याचीं जरूरी नाहीं. कारण राजे लोकांचा किंबहुना राष्ट्रांचा, मागील काळांतच नव्हे तर हल्लींच्या विसाव्या शतकांतहि, कायदा व जनावरांचा कायदा एकच आहे. जो सशक्त असेल त्यानें अशक्तांस लुबाडावें; किंबहुना ठार मारावें. उत्बी एवढेंच लिहितो कीं, कसदार जिंकल्यावर विधर्मीयांकडे सबुक्तगीनानें आपलें लक्ष फिरविलें. ‘ मुलुख जिंकण्याच्या बरोबर, खऱ्या ईश्वरभक्तांची धर्मश्रद्धाहि वाढली. परमेश्वरास तुष्ट करण्याच्या शुद्ध हेतूनें आणि खऱ्या अन्तःकरणाच्या धर्मभावनेनें त्यानें या पवित्र लढाईचे श्रम सोशिले. आणि त्या दूरदेशांतील पुष्कळ किल्ले व गढ्या हस्तगत केल्या. ’ ‘ त्यानें आपल्या राज्याची सीमा हे किल्ले व प्रांत जिंकून वाढविली. पण हिंदुस्थानचा राजा जयपाल यानें

जेव्हां या गोष्टी पाहिल्या आणि आपली सरहद्द एकसारखी मागें हटत आहे हें लक्षांत आणलें आणि आपल्या राज्यावर हरक्षणीं अनेक प्रकारचें नुकसान कोसळत आहे असें जाणलें, तेव्हां दुःखानें तो बेचैन झाला. (उत्बी पान ८४).यासाठीं त्यानें आपलें सर्व सैन्य सबुक्तगीनास विरोध करण्यासाठीं जमविण्याचा उद्योग मांडिला. अनेक दोस्तांचें सैन्य घेऊन सबुक्तगीनाच्या राज्यांत तो शिरला.त्यास टक्कर देण्याकरितां सबुक्तगीन गझनीहून पुढें आला. आणि एक भयंकर लढाई पुष्कळ दिवस चालली. उत्बी वर्णन करतो कीं, " महमुदानें आपल्या बापास शेवटीं एक युक्ति सुचविली ती अशी कीं, शत्रूच्या छावणीजवळ एका झऱ्याचें उत्तम पाणी आहे. त्यांत जर एखादी अशुद्ध वस्तु टाकली, तर एकदम प्रचंड वारें वाहूं लागतें आणि अतिशय कडक थंडी पडते असा गुण आहे." हें ऐकून नासिरुद्दीन (सबुक्तगीन) यानें दारूचे कित्येक घडे त्या झऱ्याच्या पाण्यांत फेकाविले. अर्थात् एकदम आकाशांत धूम्र वर्णाचें धुकें दिसूं लागलें. अतिशय थंडी पडली. आणि जयपाळाच्या सैन्याचे फार हाल होऊं लागले. तेव्हां त्यानें तहाचें बोलणें लाविलें; व असाहि धाक घातला कीं, तह न झाला तर सर्व रजपूत आपल्या तलवारी घेऊन लढून धारातीर्थी देह ठेवतील. तेव्हां सबुक्तगीनानें या अटीवर तह केला कीं, कांहीं द्रव्य व कांहीं हत्ती आणि जयपाळाच्या राज्यांतील कांहीं किल्ले मुसलमानांस द्यावे. तेव्हां जयपाळ आपल्या हद्दींत परतून गेला, पण स्वराज्यांत पाहोंचतांच त्यानें किल्ले देण्याचें नाकारिलें. आणि किल्ल्यांचा कबजा घेण्यास जे लोक आले होते त्यांस कैदेंत टाकलें. हें ऐकून सबुक्तगीन गझनीस परतला होता, तो पुनः उलटला, आणि जयपाळाचा प्रांत लुटीत, लोक ठार मारीत, पोरेंबायका गुलाम करीत चालला (उत्बी पान ३९). त्यानें लम्घानचा मुलूख अगदीं

नागवा केला, आणि तो कबजांत घेऊन त्यांतील देवळें पाडून तेथें माशिदी बांधिल्या."

"जयपालानें या प्रमाणें आपल्या राज्याचा नाश पाहिला व तहाचें बंधन विश्वासघातानें मोडल्याचें फळ भोगलें, तेव्हां तो अगदीं हताश झाला. शेवटीं त्यानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या राजे लोकांस पत्रें पाठवून मदत मागितली. एक असंख्य फौज जमा होऊन गझनी-वर चालून आली. आपली फौज शत्रूहून थोडी आहे हें पाहून अमी-रानें आपल्या घोडेस्वारांच्या कित्येक टोळ्या करून, त्यांकडून शत्रू-वर एकामागून एक हल्ले करविले. अशा रीतीनें त्यानें शत्रूस मागें हटविलें आणि त्यास घाबरून सोडिलें. शेवटीं सर्व टोळ्यांनीं एक-दम हल्ला केला, आणि कित्येक कैदी केले व बाकीचे लोक हत्यारें टाकून पळून गेले." येथें कुराणांतील वाक्य उत्बीनें उध्दृत केलें आहे. "ईश्वराचा न्याय जे त्याच्या मार्गांतून भलतीकडे जातात त्याविरुद्ध असतो. आणि हा विरुद्ध हुकूम टाळतां येणें अशक्य आहे" हिंदूंनीं पुनः सबक्तगीनावर स्वारी केली नाहीं. आणि त्यांचा हा प्रांत इस्लामाच्या राज्यास कायमचा जोडला गेला. आणि तेथील रहिवाशी "त्यांचा उत्कर्ष करणाऱ्या काळजीच्या छत्रा-खालीं आणले गेले. आणि ज्या ज्या वेळेस त्यास (सबुक्तगीनास) जरूर लागेल, त्या त्या वेळेस एक हजार घोडेस्वार त्याच्या तैना-तीस राहूं लागले."

सबुक्तगीन आणि जयपाल यांच्यामधील झालेल्या लढायांचें उत्-बीनें वरप्रमाणें वर्णन केलें आहे. या लढाया दोन झाल्या असें दिसतें. यापेक्षां जास्त लढाया सांगण्यासारख्या सबुक्तागिनानें जय-पालाशीं केल्या नाहींत. त्याचें लक्ष पश्चिमेकडे आपला सम्राट् म्हणजे सामानी राजा मनसूर बिन नूह यास मदत करण्याकडे, त्याच्या दर-बारांत आपलें वजन वाढविण्याकडे व जाहगिरीदाखल कित्येक प्रांत

मिळविण्याकडे गुंतलें होतें. या दोन्ही लढायांत व पश्चिमेकडील सामानी राज्यांतील खटपटींत महमुदानें आपल्या बापास मदत केल्याचें वर्णन आहे.

उत्बीनंतरचे मुसलमानी इतिहासकार या हकीकतींत बरीच आणखी भर घालतात. ती सोडून दिली तरी उत्बीची ही हकीकत सुद्धां शक्याशक्यतेचा विचार व ऐतिहासिक टीका यांच्या कसोटीस लावून पाहिली पाहिजे. उतबीनें या लढायांच्या तारखा दिल्या नाहींत. उत्बीनें दिलेल्या तारखाहि पुष्कळदां चुकीच्या असतात. ( इलि-२ ). सबुक्तगीन इ. स. ९७७ पासून ९९७ पर्यंत राज्य करीत होता; या दृष्टीनें ही हकीकत इ. स. ९८० पासून इ. स. ९८५ पर्यंत झाल्याचें मानतां येईल. जर महमुदाचा जन्मकाल इ. स. ९७१ ऑक्टोबर धरला, तर तो वयानें या वेळीं लहान असून या लढायांत भाग घेऊं शकणारा नव्हता. परंतु जन्मकाल चार वर्षें अगोदर मानला तर त्याचें वय १४पासून १७पर्यंत येतें. आणि या वयाचा तरुण राजपुत्र विशेषतः प्राच्य देशांत लढाईस योग्य मानला जातो आणि प्रत्यक्ष युद्धांतहि तो पाठविला जातो. परंतु त्याच्या बापास त्यानें सल्ला मसलत दिली असें मानणें योग्य होणार नाहीं. आणि अलीकडील मुसलमान इतिहासकार जे लिहितात कीं, महमुदानें शेवटपर्यंत लढाई चालविण्याचा आग्रह धरिला तें तर संभवनीय दिसत नाहीं. दुसरी गोष्ट या हकीकतींत जो दैवी चमत्काराचा भाग आहे तो टाकून दिला पाहिजे. अतिशय थंडी पडली, धुकें उत्पन्न झालें, किंबहुना बर्फ पडूं लागलें आणि पहिल्या लढाईंत हिंदूंची गाळण उडाली ही गोष्ट संभवनीय आहे. पण ती निसर्ग-नियमानें झाली, झऱ्यांत कांहीं दैवी गुण होता त्यानें झाली नाहीं. झऱ्याचें पाणी हिंदु लोकांच्या छावणी जवळील मुसलमानांनीं अशुद्ध केलें हें मानतां येईल. शत्रूचें पाणी खराब करणें ही लढा-

ईंतील एक चाल आहे. आणि त्या वेळचे रजपूत, विशेषतः राज्य करणारे राजे, दारू पीत नसत ही गोष्ट तत्कालीन अरबी प्रवाशांनींहि लिहून ठेविली आहे ( भाग इ. २ पान १८५ पहा ). विशेषतः जयपाळ ब्राह्मण असल्यानें दारू न पिणारा असला पाहिजे. शत्रूचें पाणी बिघडविण्याची युक्ति महाभारतांतहि सांगितली आहे. पाश्चात्य लढायांच्या वर्णनांतही ती अवलंबिलेली दिसते. गेल्या युरोपीय महायुद्धांत तिचा प्रकार झाला. शुद्ध पाणी पिण्यास न मिळाल्यानें आणि एकाएकीं पडलेल्या थंडीच्या कडाक्यानें त्रस्त होऊन ( अशा हवेची संवय उत्तर सपाट हिंदुस्थानांतून आलेल्या शिपायांस नसणें साहाजिक आहे ) हा हिंदूंचा जमाव या कारणांनीं आपलें कार्य करूं शकला नाहीं. तथापि त्याचा पराभव झाला नव्हता आणि जरूर पडल्यास रजपूत प्राणांतिक युद्ध करण्यास तयार होते. यामुळें असें मानणें जरूर आहे कीं, या वेळीं ठरलेल्या तहाच्या अटी दोन्ही पक्षाच्या इज्जतीस संभाळून होत्या. बहुधा कांहीं नगदी रक्कम व कांहीं हत्ती देऊनच दोस्त राजे परतून घरोघर गेले असावे.

ही अशी हकीकत हिंदुस्थानांतील कोरीव लेखांच्या पुराव्यावरून जास्त मजबूत होते. पूर्वीं भाग २ यांत दाखविल्याप्रमाणें असें दिसतें कीं, चंदेल्लराजा धंग या हिंदु राजांच्या जमावांत आला होता. त्याचें वर्णन शिलालेखांत ' हम्मीरसम ' असें केलें आहे. यावरून ही लढाई बरोबरीची झालेली दिसतें,व असह्य थंडीमुळें केवळ हिंदु परतले. ही लढाई इ. स. ९८० मध्यें झाली असें मानलें पाहिजे. धंग इ. स. ९५० च्या सुमारास राज्य करूं लागला व इ. स. १००० पर्यंत त्यानें राज्य केलें; मरणसमयीं त्याचें वय १०० वर्षांवर होतें.

फिरिश्ता व इतर अलीकडील लेखक लिहितात कीं, दिल्ली, अजमीर, कनोज, कालंजर वगैरे राजे या लढाईंत होते. पण यांत

निःसंशय अतिशयोक्ति आहे. कारण यांत नंतर प्रसिद्ध झालेल्या राज्यांचींहि नावें आहेत. आपण पाहिलेंच आहे कीं, इ. स. ९८० त दिल्ली क्षुल्लक होती. आपल्या भुगोलिक वर्णनांत अल्बेरुनीनें दिल्लीचा उल्लेख केलेला नाहीं. आणि अजमीरची ह्या वेळेस स्थापनाहि झाली नव्हती. सांभरचे चौहान राजे अजून इतके सामर्थ्यवान् नव्हते कीं ते कांहीं मदत पाठविते. माळव्याचा भोज तर इ. स. १०१०त गादीवर आला. उत्बीनें हिंदुस्थानांतून कोण कोण राजे मदतीस आले होते याचा तपशील दिला नाहीं. हिंदुस्थानांतील कोरीव लेखांच्या पुराव्यांत केवळ धंगाचें नांव मिळतें. प्रतिहार सम्राट् कनोज या लढाईंत सामील होणें संभवनीय आहे. चंबा गॅझेटियरवरून असें दिसतें कीं, या धार्मिक युद्धांत चंबाचा राजा साहिलवर्मन् होता.

दुसऱ्या लढाईचें वर्णन जें उत्बीनें दिलें आहे तें मात्र संशयित दिसतें. पहिली गोष्ट ही कीं, पहिल्या लढाईंत हिंदूंचा नांवाला पराभव झाला होता. तेव्हां जयपालाच्या हद्दींतील कित्येक किल्ले मुसलमानांना देण्याची अट घातली गेली नसावी, निदान ती मान्य झाली नसावी. ती मान्य झाली असती तर विश्वासघात करून मोडण्याइतका नीतिभ्रष्ट जयपाल नव्हता. हे काबूलचे ब्राह्मण राजे किंवा सर्व हिंदुस्थानांतील रजपूत राजे सच्चे इमानाचे होते. खुद्द अल्बेरूनीनें या काबूल राजांच्या उदात्त स्वभावाचें वर्णन केलें आहे. जरी हा ग्रंथकार मुसलमान होता, तरी त्यानें हिंदूंच्या स्वभावाचें यथार्थ वर्णन केलें आहे. त्यानें काबूलच्या शाही राजांच्या सत्यनिष्ठेचें आणि चांगुलपणाचें पुढील प्रमाणें प्रशंसायुक्त वर्णन केलें आहे ( सचाऊ भाग २ पान १० ); " यांच्या सर्व व्यवहारांत जें योग्य व न्याय्य आहे तेंच करण्याच्या उत्कट इच्छेंत हें कधीं मंदावले नाहींत. उदात्त विचार आणि उदात्त आचार करणारे हे पुरुष आहेत. " अर्थात

जयपाळानें शर्त मानून तोडली असेल हें संभवनीय नाहीं. दुसरी गोष्ट हिंदुस्थानच्या निरनिराळ्या राज्यांतील लोक पहिला प्रयत्न फुकट गेल्यानंतर पुनः इतक्या लौकर जमले असतील हें संभवनीय नाहीं. तिसरी गोष्ट, संयुक्त सैन्य इतकें प्रचंड होतें तर त्यांचेजवळ शेंकडों हत्ती असले पाहिजेत आणि सबुक्तगिनानें पांचपाचशें घोड्यांच्या टोळ्या करून वारंवार हल्ले चढविण्याची जी युक्ति योजिली ती सिद्धीस जाणें संभवनीय वाटत नाहीं व हिंदूंचा भयंकर पराभव होणें शक्य नाहीं. पोरसशीं झालेल्या लढाईंत अलेक्झांडरनें हीच चाल चालविली होती असें सर व्हिन्सेंट स्मिथनें म्हटलें आहे. पण अलेक्झांडरचें घोडदळ शिस्त शिकलेलें होतें. सबुक्तगिनाचें अश्वसैन्य अलेक्झांडरच्या सैन्यासारखें शिस्तीचें नसावें. याशिवाय रजपूतांचीहि प्रसिद्धि त्यांच्या अश्वसैन्याबद्दल होती व आहे. आणि एवढया मोठ्या हिंदु सैन्याच्या जमावांत हिंदूजवळ अश्वसैन्य नव्हतें ही गोष्ट संभवनीय नाहीं. खुद्द आरबी लेखकांच्या लेखांवरून कनोजचे प्रतिहार राजे त्यांच्या मोठया व कर्तबगार घोडदळाबद्दल प्रसिद्ध होते. उत्तर हिंदुस्थानचा प्रसिद्ध सम्राट् व जयपालाचा शेजारी असा कनोजचा राजा जयपालाच्या मदतीस आलेल्या राजांमध्यें असलाच पाहिजे; व मुसलमानी इतिहासकारांनीं कनोजचा राजा मदतीस आला होता असें लिहिलेंहि आहे. असें संभवनीय दिसतें कीं, या दुसऱ्या लढाईचें वर्णन अतिशयोक्तीचें आहे. आणि त्यांत पहिल्या लढाईंतील अनेक राजे जमा झाल्याची पुनरुक्ति केली आहे. जयपाळ परतल्यावर व संयुक्त फौजा घरीं गेल्यावर कांहीं निमित्त काढून सबुक्तगिनानें जयपाळच्या राज्यावर पुनः स्वारी केली असावी. किंबहुना प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें अशा प्रसंगीं सबब दाखविण्याचीहि आवश्यकता नाहीं. अर्थात् आपल्याच राज्यांतून जयपाळास जितकी फौज जमवितां आली, तितकी त्यानें जमविली

असावी व शेवटीं त्याचा पक्का पराभव झाला असावा. त्याचा सिंधुनदाच्या पश्चिमेकडील पुष्कळसा प्रांत यावेळीं गेला. परंतु हल्लींचा वायव्य सरहद्दीचा मुख्य भाग म्हणजे गांधारचा प्रांत गेला नसावा. त्याचा दक्षिणेकडील भाग म्हणजे बन्नू गेला असला तरी उत्तरेकडील भाग कायम राहून परशावर व वहिंड येथें जयपाळ पुढेंहि राज्य करीत असल्याचें आपल्यास दिसतें. सबुक्तगिनानें जिंकलेल्या मुलुखास तेथील राहिवाशांस जबरदस्तीनें मुसलमान करून पूर्णपणें आपल्या राज्यास ज़ोडलें. इलियटचें असें मत आहे कीं, या दोन्ही लढाया लम्घान अथवा जलालाबादच्या खोऱ्यांत झाल्या ( इलियट २ पान ४३३ ). आणि लम्घान व काबूल नदीच्या उत्तर-दक्षिणचा भाग जयपाळाच्या राज्यांतून कायमचा निघून गेला. काबुलचा कोतवाल अथवा अस्पहदाद याच्या धर्मांतराची जी मजेशीर हकीकत अल्बेरूनीनें सांगितली आहे, ती यावेळीं घडली असावी. कित्येक लोक अल्पतगिनाच्या वेळेस ती झाली असें जें मानतात ( ईलि. २ पा. ४२० ) तसें नसावें असें वाटतें. कारण कित्येक काळपर्यंत जयपाळास काबूलचाहि राजा वर्णिलेलें आढळतें.

यानंतर उत्बी म्हणतो कीं, सबुक्तगिनाचें लक्ष सामानी राज्यांतील घडामोडीकडे वेधलें, आणि हें शक्य दिसतें. कारण त्याच्या राज्याची पूर्वेकडील सीमा सिंधूपलीकडील डोंगराची ओळ ही होऊन ती सुरक्षित होती. या सुमारास मनसूरहि वारला, आणि त्याचा पुत्र नूह गादीवर बसला. नूहनें आपल्या कित्येक प्रांतांतील बंडें मोडण्याकरितां सबुक्तगिनाची नोकरी सांगितली, व ती त्यानें आनंदानें व स्वामिभक्तीनें बजावून हीं बंडें मोडलीं. या नोकरीबद्दल त्यास खुरासानाची अधिकाऱ्याची जागा मिळाली व त्यानें ती महमुदास दिली. या प्रांतावर असतां एक बंडखोर अबूअली महमुदावर

चालून आला; आणि या लढाईंत महमुदाचें वैयक्तिक शौर्य प्रथम दिसून येऊन त्याची कीर्ति सर्वत्र झाली. याच लढाईंत महमुदानें आपल्या तर्फे हिंदु शिपाई व हत्ती घेतले होते. अन्यत्र आम्हांस वर्णन करणें जरूर पडणारच आहे कीं, हिंदु शिपाई बापडे जो कोणी तनखा देईल त्याच्या वतीनें लढण्यास कोणतीहि हरकत मानीत नाहींत. पण येथें मुख्य गोष्ट सांगावयाची ती ही कीं, महमुदास हत्तींचा उपयोग उत्तम करतां आला, आणि त्याविरुद्ध शत्रूच्या घोडदळास कांहीं करतां आलें नाहीं. " लढवय्ये हत्तींनीं घोडेस्वारांस आपल्या सोंडांनीं धरून त्यांच्या पाठी आपल्या पाया-खालीं मोडल्या, आणि अगणित लोक याप्रमाणें या लढाईंत मेले. ( उत्बी पान. १६२ )

शेवटीं सामानी साम्राज्यांत आपल्या कसलेल्या जबरदस्त सैन्यानें सबुक्तगीन इतक्या वजनास चढला कीं, तो बुखारा येथें वझीर नेमूं लागला व बरखास्त करूं लागला. अशाच प्रकारें शहाजीलाहि निजामशाहींत सुलतान बसवतां व काढतां आले. व ज्याप्रमाणें शहाजीचा दरारा विजापुरास होता, त्याप्रमाणें सबुक्तगिनाचाहि सामानी बादशहा नूह याच्या दरबारांत राहिला. सबुक्तगीन गझनी सोडून बल्ख येथेंहि अलीकडे राहूं लागला. आणि शेवटीं त्याचा तेथेंच अन्त झाला. त्याच्या मनांत गझनी येथें परत जावयाचें होतें, परंतु ईश्वरी इच्छा निराळी होती. त्यानें आपल्या शेवटच्या मृत्यु-पत्रांत गझनीचें राज्य आपला पुत्र इस्माइल यास दिलें. महमूद खुरासान प्रांताची राजधानी निशापूर येथें रहात असे तो खुरासान प्रांताच्या अधिकाऱ्याच्या जाग्यानें संतुष्ट राहील असें सबुक्तगिनास वाटलें असावें. ही हकीकत शहाजी–शिवाजीसारखीच झाली. शहाजीनें नवीन संपादलेलें बंगलोरचें राज्य आपल्या दुसऱ्या पुत्रास दिलें आणि शिवाजीला पुण्याच्या जाहगिरीनें संतुष्ट ठेविलें. महमूद

आणि शिवाजी अधिक कर्तृत्ववान् होते तरी आपल्या भावांपेक्षां पित्यास कमी प्रिय होते असें दिसतें. दोन्ही हकीकतींत अधिक कर्तृत्ववान् पुत्रानें आपला हक्क शेवटीं बजावला आणि तो एकंदर राज्याचा मालक झाला. महंमुदानें गझनीच्या राज्यावर आणि तेथें जमा असलेल्या खजिन्यावर आपला हक्क सांगितला, व विरोध उत्पन्न झाल्याबरोबर तो गझनीवर चालून गेला. शहराखालीं त्याची व इस्माईलची लढाई झाली व शेवटीं इस्माईलचा पराभव होऊन तो कैद झाला वगैरे हकीकत विस्तारानें सांगण्याची जरूरी नाहीं. एवढें मात्र सांगण्यासारखें आहे कीं, या लढाईत इस्माइलच्या बाजूनें हत्तींचे काळेकुट्ट झुंडच्या झुंड लढले पण त्यांचा उपयोग झाला नाहीं. हत्तींचा उपयोग कांहीं एका मर्यादेंत आहे. सबुक्तागिनानें व इतर मुसलमान सेनापतींनीं हत्ती ठेवून त्यांचा लढाईत उपयोग केला आहे. यावेळीं सबुक्तागिनाचे हत्ती इस्माईलच्या कबजांत होते. पण त्याच्या नालायकीनें त्यांचा परिणामकारक उपयोग त्यास करतां आला नाहीं. या लढाईनें महमूद गझनीच्या राज्याचा पूर्ण मालक झाला (इ. स. ९९७).

# प्रकरण ४ थें.

## महमूद आणि जयपाळ.

गादीवर बसल्यावर कांहीं काळ महमुदाचें लक्ष पश्चिमेकडे वेधलें होतें. आपल्या बापाचे मानमरातब व अधिकार आपल्याकडे चालावेत अशी त्यानें सामानी बादशाहा नूह यास विनंति केली व नूहनें ती मान्य करून बल्ख, हिरात, बोस्त व सरमध येथील राज्यकारभार त्याचे हातींच चालूं ठेवला. निशापूरची ( खोरासान ) सुभेदारी व सेनापतित्व हीं मध्यंतरीं बेक्तुझून यांस देण्यांत आलीं होतीं. बेक्तुझून हा राजनिष्ठ आणि कर्तृत्ववान् होता व नूहच्या गादीवर नुकताच आलेला त्याचा पुत्र बादशहा मनसूर यानें तीं बेक्तुझूनकडेच चालू ठेवावींत असें ठरविलें. परंतु महमूद यास हें खपलें नाहीं आणि तो आपलें सैन्य घेऊन बेक्तुझूनवर चाल करून गेला. परंतु मनसूर स्वतःच आपल्यावर चाल करून येत आहे असें पाहतांच राजनिष्ठ महमुदाला त्याच्या विरुद्ध शस्त्र उचलवलें नाहीं; तो माघारा फिरला व एका सुरक्षित जागीं त्यानें आपला तळ ठोकला. सामानी राज्याला आतां पक्की उतरती कळा लागली होती. उलट्या काळजाच्या कांहीं अधिकाऱ्यांनीं तरुण बादशहा मनसूर यास पकडलें आणि त्या अल्पवयी व सुंदर राजाचे डोळे काढले. या गोष्टीनें महमुदास त्वेष आला व त्यानें या बंडखोर अधिकाऱ्यांवर स्वारी केली. तेव्हां मनसूरच्या जागीं त्यांनीं ज्याला गादीवर बसविलें होतें त्या नवीन राजाला बरोबर घेऊन ते पळूं लागले. या वेगडी बादशहाचें आधिपत्य अर्थातच महमुदानें नाकबूल केलें आणि खोरासन व गझनीचे आपण स्वतंत्र राजे झालों आहोंत अशी त्यानें द्वाही

फिरविली. बगदादचा खलिफा कादर बिल्ला यानें महमुदास स्वतंत्र राजा म्हणून मान्यता दिली, त्याला अधिकाराचीं वस्त्रें पाठविलीं आणि यमीनुद दौलत् व अमीनुल खिलत् म्हणजे पातशाहीचा उजवा हात आणि धर्माचा संरक्षक अशी पदवीहि दिली. खलिफाच्या संदेश–वाहकांचें महमूदनें मोठ्या आदरानें स्वागत केलें. त्याच्या बापानें व त्यानें अमीर ही पदवी पूर्वींच वापरण्यास सुरुवात केली होती. स्वतंत्र राजा झाल्यावर जी पदवी त्यानें धारण केली ती अमीर ही नसून सुलतान अशी होती. सुलतान ही पदवी त्या पूर्वीं कोणत्याहि मुसलमान राजानें वापरली नव्हती. यापुढें हीच पदवी प्रचारांत आली आणि अमीर म्हणजे हाताखालचा एखादा सरदार असा अर्थ होऊन बसला. उत्बीनें असें लिहून ठेविलें आहे कीं महमूदनें खोरासानमध्यें न्यायानें व शहाणपणानें राज्य केलें आणि आपल्या प्रजाजनांस सुखांत ठेविलें. पूर्वींच सांगितल्याप्रमाणें सामानी पातशाहीची राजधानी बोखारा ही काश्गरचा तुर्की राजा इलेक्खान यानें हस्तगत केली व सामानी घरण्यांतील सर्व वारसांस त्यानें कैद केलें. त्यांस पुढें बहुधा मारूनही टाकण्यांत आलें असावें. अशा तऱ्हेनें महमुदाच्या कारकीर्दीच्या सुरुवातीस सामानी घराणें नष्ट होऊन गेलें. या वृतांतांत आणि विजापूरच्या राज्याच्या अंताच्या वृत्तान्तांत केवढें साम्य आहे ! गागाभट्टाकडून राज्याभिषेक करवून घेऊन शिवाजी महाराजांनीं आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. महमुदाच्या स्वतंत्र राज्यपदाला धर्माची आवश्य ती मान्यता देऊन बगदादच्या खलीफानें जशी त्याला सुलतान ही पदवी दिली तशीच गागाभट्टानें शिवाजीस अभिषेक करून छत्रपति ही पदवी अर्पण केली. त्यानंतर थोड्याच दिवसांत हिंदुस्थानचा इलेक्खान म्हणजे अवरंगजेब यानें शिवाजीचा स्वामी विजापुरचा राजा याचा मोड करून राज्याच्या शेवटच्या वारसास दिल्लीस नेलें आणि विजापुरचा

उरलेला प्रांत मोगल साम्राज्यांत सामिल करून घेतला. मानवी स्वभाव हा सगळीकडे सारखाच व त्यामुळें त्याच्या करवीं आपलें कार्य करून घेणाऱ्या नियतीच्या खेळांतहि सगळीकडे साम्य दिसावें हेंहि स्वाभाविक आहे.

प्रारंभींच्या गोष्टी इ. स. ९९७ व १००० यांचे दरम्यान घडल्या ( पुढें पांच वर्षांनीं १००५ मध्यें सामानी राज्याचा पूर्ण अंत झाला ); आणि महमूदच्या राज्यछत्राखालीं सामानीं राज्याचा बराच मोठा भाग आला. खोरासानाचा समावेश त्यांत झालेलाच होता. सामानी राज्यांतील सिस्तान हा प्रांत जिंकण्याच्या तो गडबडींत असतां जयपाल सैन्याची जमवाजमव करीत आहे अशी महमुदास बातमी आली. बहुधा त्याच्या सेनापतीनीं जयपालाच्या मुलुखावर स्वारी केली असावी आणि त्यामुळें जयपाल लढाईची तयारी करीत असावा. शिवाजीप्रमाणेंच ताबडतोब निश्चय करण्याबद्दल आणि त्वरेनें सैन्याच्या हालचाली करण्याबद्दल महमुदाचीहि ख्याति आहे. याहिवेळीं या गुणांचा उपयोग करून त्यानें पश्चिमेकडून आपलें तोंड पूर्वेकडे फिरविलें आणि १५००० घोडेस्वार घेउन झपाटयानें तो जयपालाच्या राज्यांत घुसला. अशा त्वरेच्या हालचाली करावयास घोडदलच फार उपयोगीं पडतें आणि महमूद काय आणि शिवाजी काय अशा प्रसंगीं घोडदळाचाच उपयोग करीत, असें आपल्यास दिसून येतें. “ परशावर ( पेशावर ) त्यावेळीं हिंदुस्थानच्या भूमीच्या केंद्रावर होतें ” ( उत्नी. पा. २८० ). या विधानावरून असें दिसून येतें कीं, अजूनहि सिंधूच्या पश्चिमेकडील प्रदेशावर जयपालाचें राज्य चालू होतें. ( हा प्रांत म्हणजे अर्वाचीन वायव्य सरहद्दीचा प्रांत होय व त्याची राजधानी वहिंड येथें होती. ) जयपालाची लढाईची तयारी पूर्ण झाली नव्हती असें दिसतें. त्यानें मागून येणारें सैन्य रणक्षेत्रावर येऊन दाखल व्हावें म्हणून लढाईचें

तोंड सुरू करण्याचें लांबणिवर टाकलें ( उत्बी. ८१ ). परंतु सुलतानानें ही अनुकूल संधि ओळखिली आणि ताबडतोब जयपालावर हल्ला केला. लढाई निकराची झाली आणि मध्यान्हाच्या सुमारापर्यंत ५००० हिंदूंची मुंडकीं तरवारीनें रणक्षेत्रांत पडलीं. जयपाल, त्याच्या बायका, त्यांचीं मुलेंबाळें, त्याच्या कुटुंबांतील इतर लोक व त्याचे सरदार यांच्यासह कैद झाला. लुटींत अगणित दागदागिने सांपडले. पाडाव केलेल्या राजघराण्यांतील माणसांच्या गळ्यांत आणि जखमी झालेल्या व मेलेल्या शिपायांच्या अंगावर हिरे, माणकें व मोतीं यांनीं खचित केलेले हार इतके सांपडले कीं, इस्लामी फौजेस अमर्याद संपत्ति लाधली. हिंदी राजे व सरदार यांच्या दागिन्यांच्या सोसाचा उल्लेख अरबी प्रवाश्यांनींहि केला आहे ( भाग २ पान १८७ पहा ). परंतु जयपाल, त्याचे सरदार व सैनिकही लग्नांतील मिरवणुकींतल्याप्रमाणें दागिन्यांनीं नटून रणक्षेत्रावर युद्धास जावेत हें विचित्र आहे. बहुधा ते लढण्याच्या तयारींत नसतांच तळावरच त्यांच्यावर हल्ला करण्यांत आला असण्याचा संभव आहे. त्या प्रांतांत हजारों तरुण पुरुष, मुलें व मुली हस्तगत करण्यांत आलीं आणि “ खोरासानच्या बाजूच्या [ म्हणजे सिंधूच्या पश्चिमेकडील ] सर्व हिंदी प्रांतांनीं सुलतानाची सत्ता मान्य केली ”“हा जय हि- ३९२ (इ. स. १००१) च्या मोहोरमच्या ८ व्या तारखेस मिळाला आणि त्याची बातमी अत्यंत दूरच्या प्रदेशांतहि पसरली. ”

पेशावरच्या मैदानांत इ. स. १००१ मध्यें अशा प्रकारचें हें संस्मरणीय युध्द झालें आणि त्यामुळें सिंधुनदीच्या पश्चिमेकडील प्रांतांवरील हिंदु राज्याचा अंत झाला आणि तेथील लोकांचें हिंदुत्वहि नाहींसें झालें. आपल्या जयाची पूर्णता करण्यासाठीं सुलतान रेटीत रेटीत जयपालाची राजधानी वहिंड येथें चालून गेला आणि त्यानें ती सर करून हस्तगतहि केली. कांहीं लेखकांचें म्हणणें असें आहे

कीं भातिंडा हेंच वहिंड होय; परंतु हें शक्य दिसत नाहीं. कारण भातिंडा सतलज नदीच्या दक्षिणेस असल्यामुळें पेशावरपासून फार दूर होईल. पूर्वीच म्हटल्याप्रमाणें आणि ईलियटनें फारा दिवसांपूर्वींच निर्देश केल्याप्रमाणें (२ पा. ४३८) महमुदाला आपलें लहानसें सैन्य घेऊन सबंध पंजाब प्रांत ओलांडून भातिंडा येथें जाणें शक्य नव्हतें. सिंधूच्या पश्चिमेचा सर्व प्रदेश, किंवा उत्बीच्या म्हणण्याप्रमाणें 'खोरासानच्या बाजूचा प्रदेश' महमुदाच्या राज्यांत सामील करण्यांत आला आणि तेथें मुसलमानी राज्य स्थापन करण्यांत आलें, इतकेंच नव्हें तर लोकांस जबरीनें मुसलमानी धर्माची दीक्षा देऊन "तेथील किळसवाणा अधार्मिकपणा नाहींसा करून तो सबंध शुद्ध करण्यांत आला." "ज्या हिंदी वीरांनीं सरहद्दीवरील डोंगरांत व किल्ल्यांत बंड उभारून दुष्टपणा केला त्यांच्यावर तरवार चालवून त्यांना शिक्षा करण्यांत आली." पेशावरावर जातांना अर्थात् त्यास खैबर वगैरे घाटांतून जावें लागलें आणि हल्लींप्रमाणेंच त्यावेळीं सरहद्दीवरील जातींनीं महमुदासहि त्रास दिला आणि त्यानें त्यांचें निष्ठुरपणें पारिपत्य केलें. त्यांना आणि सिंधूच्या पश्चिमेकडील लोकांना बाटविण्यांत आलें तें या वेळीं. महमुदाला जिंकलेले प्रांत आपल्या राज्यांत सामील करण्याचें माहीत तर होतेंच, परंतु शिवाय सामील केलेल्या प्रांतांतील लोकांस बाटवून आपलें राज्य चिरस्थाई कसें करावें हेंहि माहीत होतें. या विषयावर पुढें आम्ही ज्यास्त लिहिणार आहों.

आतां आपण जयपालाकडे वळूं. असें सांगतात कीं महमुदानें जयपालास व त्याच्या कुटुंबास खोरासान मधील एका किल्ल्यांत कोंडून ठेवण्याचा हुकूम दिला. जयपालास इतक्या लांबच्या जागीं नेलें असो किंवा नसो, त्याच्यापासून खंडणीदाखल ५० हत्ती घेऊन व त्याच्या मुलास ओलीस ठेवून घेऊन त्यानें जयपालास लवकरच

सोडून दिलें, आणि त्याला आपल्या राज्यांत जाऊं दिलें. तें राज्य आतां सिंधूच्या पूर्वेस होतें. आपल्या राज्यांत परत येण्याऐवजीं चितेंत जळून तो भस्मसात् झाला. शत्रूनें आपल्याला पाडाव करून कैद केलें यामुळें झालेली अप्रतिष्ठा त्याला सोसवली नाहीं. त्या काळांत पुष्कळ लोक, राजे देखील, अशा तऱ्हेनें प्राणत्याग करीत. आपण फार वृद्ध झाल्यामुळें राज्य करण्यास नालायक आहोंत असेंहि त्यास वाटलें असावें. उत्बीनें असें म्हटलें आहे कीं, महमुदाकडे ओलीस असलेल्या मुलास त्याच्या या प्राणत्यागाबद्दल पत्र आलें होतें. बहुधा त्याचा हा मुलगा आनंदपाळ असावा. त्यास महमुदानें सोडून दिलें व आपल्या राज्यांत जाऊन शांतपणें राज्य करूं दिलें. जयपालाच्या या शोचनीय अंतामुळें आणि दुर्दैवी दीर्घ जीवितामुळें त्याच्या-बद्दल कींव वाटल्याखेरीज राहात नाहीं व त्याच्या तेजस्वी प्राण-त्यागाबद्दल तर आदरच वाटतो.

या प्रसंगानंतर सुलतान महमुदानें पश्चिमेकडील आपली सत्ता दृढ करण्यासाठीं तुर्की राजा इलेक्खान याच्याबरोबर तह केला. या पूर्वींच इलेकखानानें बोखारा आपल्या ताब्यांत घेतलें होतें. खोरासान वगैरे आक्सस नदीच्या दक्षिणेकडील प्रांत महमुदास मिळाले आणि नदीच्या उत्तरेकडील मवरुन्नहर प्रांत आणि सामानी राज्याची राज-धानी बोखारा हीं इलेकखानाकडे राहिलीं. आपल्या मुलास इलेक्-खानाची मुलगी करून घेऊन हा तह महमुदानें बळकट केला असावा असें दिसून येतें. आपल्या राज्याच्या पश्चिम बाजूस अशा तऱ्हेनें सुरक्षितता झाल्यामुळें महमुदाला आपलें लक्ष हिंदुस्थानाकडे द्यावयास मोकळीक झाली. " तेथील संपत्तीनें त्याचा लोभ आणि मूर्तींनीं त्याचा धर्मोत्साह प्रदीप्त केला." तथापि हिंदुस्थानच त्याच्या विचाराचें ध्येय किंवा सार होतें असें मानण्याची जरूरी नाहीं. कारण त्याच्या कर्तृत्वाला आणि त्याच्या उत्साहाला पूर्वेप्रमाणेंच उत्तरे

कडेही क्षेत्र मिळण्याची आवश्यकता होती व तो वाव त्याला मिळालाहि. उत्बीनें दोहोंकडील स्वाऱ्यांचें सारख्याच विस्तारानें वर्णन केलें आहे. परंतु आम्हांला आमचें लक्ष हिंदुस्थानांतील त्याच्या कामगिरी पुरतेंच मर्यादित करणें उचित आहे. कित्येक वेळां असें भासविण्यांत येतें कीं दरसाल हिंदुस्थानावर स्वारी करण्याचा महमुदानें पणच केला होता. वस्तुतः ही गोष्ट खरी नाहीं. महमुदाच्या हिंदुस्थानी वृत्तान्त—लेखकांस मागाहून सुचलेली ही कल्पना आहे. उत्बीनें अशा पणाचा उल्लेख केलेला नाहीं.

# प्रकरण ५ वें.

## भाटियावरील स्वारी.

उत्तरकालीन इतिहासकारांनीं महमुदाच्या बारा स्वाऱ्यांची गणती केली आहे आणि युरोपीय इतिहास-कारांतही हिं संख्या परंपरेनें कायम झाली आहे. या स्वाऱ्या बारा पेक्षां अधिक होत्या यांत संशय नाहीं. आपल्या दुसऱ्या भागाच्या परिशिष्टांत ईलियटनें सतरा स्वाऱ्यांची गणती दिली आहे. या स्वाऱ्यांच्या संख्येबद्दल विवरण करण्याची या ठिकाणीं जरूरी नाहीं. तो प्रश्न महत्त्वाचाहि नसून केवळ पांडित्याचा आहे; आणि म्हणून या स्वाऱ्यांचा अनुक्रम लावीत न बसतां आम्ही या स्वाऱ्यांचें सविस्तर वर्णन देत आहों. पेशावरवहिंड घेतल्यानंतर महमुदानें ज्या स्वारीची तयारी केली ती भाटिया वरील स्वारी होय. दुर्दैवानें भाटियाची नक्की भौगोलिक स्थिति अजून निश्चित करितां येत नाहीं. कारण या बाबतींत इतिहासकारांत महत्त्वाच्या बाबींबद्दल मतभेद आहे. आणि अमुक एका स्थळालाच भाटिया म्हणावें तर त्या मताच्या समर्थनाला भक्कम असा पुरावा नाहीं. पहिल्यानें उत्बीनें जें या स्वारीचें वर्णन केलें आहें तें देऊं ( पा. ३२२-२४ ). " सीस्तान मधील कारभाराची व्यवस्था लागल्यानंतर भाटिया जिंकण्याचा संकल्प पार पाडण्याचा सुलतानानें निश्चय केला. त्यानें सिहून ( सिंधु ) ओलांडली, मुलतानचा प्रांत बाजूस टाकला आणि भातियापुढें आपला तळ दिला. त्य शहराचे तट इतके उंच होते कीं गरुडांनांच फक्त त्यांवर जातां येई आणि त्या तटांवरील पहारेकऱ्यांस मनांत आल्यास शुक्राच्या चांदि णीच्या ओष्टांवर आपल्या चुंबनाचा ठसाहि उमटवितां आल

असता ( !!! ). त्याच्या भोंवताली समुद्राप्रमाणें विस्तीर्ण आणि खोल अशा खंदकाचें वलय होतें. आपल्या विद्यात योद्धयांच्या पराक्रमाची घमेंड असलेला तेथील राजा शहराबाहेर पडला आणि त्यानें लढाई-दिली. सुलतानानें तीन दिवस युद्ध केलें. चौथे दिवशीं सूर्य आकाश-सागराच्या मध्यावर आला असतां 'अल्लाहो अकबर' या आरोळयांनीं आकाश दुमदुमून गेलें, मुसलमानांनीं हल्ला चढविला आणि त्यांत काफिरांचा काळेपणा धुतला गेला. बहुतेक सर्व शत्रूचे वीर किल्लयांत पळून गेले. परंतु धर्माच्या संरक्षकांनीं किल्ल्याचा रस्ता मागोमागच हस्तगत केला. सैन्यांतील तरुण लोकांनीं खंदक भरून काढला आणि रस्ता रुंद केला. किल्ल्याच्या तटावरून दोर सोडून त्यावरून विजयराज खालीं उतरून डोंगराच्या विवरांत निसटला आणि त्यानें जंगलाचा आश्रय केला. तेथें त्याचा पाठलाग करण्यांत आला. इतक्यांत आपला खंजीर काढून त्यानें आपला जीव घेतला. त्याच्या सैन्याचा मोठा भाग तरवारीला बळी पडला व एकशें साठ हत्ती पाडाव करण्यांत आले. त्या देशांतील मूर्तिपूजेचें पाप धुवून काढावें म्हणून त्या शहरांत सुलतानानें आपलें ठाणें वसविलें. त्यानें लोकांस मुसलमान केलें, मशिदी बांधण्याची व्यवस्था केली आणि इमाम नेमून दिले. तो परत जात असतां त्याच्या सैन्यावर अनेक अनर्थ कोसळले. माणसें मेलीं व सामानाचाहि नाश झाला. कित्येक अप-कीर्तीनें मेले आणि कित्येक भीतीनें हैराण झाले. सुलतानाचे अमूल्य प्राण मात्र वांचले. महमुदाच्या विश्वासांत असलेल्या अबुल फत बो-स्तीनें त्याला उत्कृष्ट सल्ला दिला आणि असल्या आकांक्षांच्या आणि साहसांच्या विरुद्ध आपलें मत दिलें, परंतु सुलतानानें त्याचा सल्ला मानला नाहीं. "

उत्बीच्या लेखणींतून उतरलेलें हें लांब लचक वर्णन आम्ही येव-ढ्याच करितां दिलें आहे कीं त्यामुळें त्याच्या वर्णनाची काव्यमय

पद्धति वाचकांच्या ध्यानांत यावी आणि या वर्णनावरून उत्पन्न होणाऱ्या अडचणींची कल्पना व्हावी. या गोष्टी उत्बीच्या प्रत्यक्ष नजरेखालून गेल्या नाहींत. महमुदाचा चिटणीस या नात्यानें मिळालेल्या माहितीवरून त्यानें त्या लिहिल्या आहेत. ही येवढ्या लांबच्या प्रांतावर स्वारी करण्याचें महमुदानें कां ठरविलें हेंच कळणें प्रथम कठिण आहे. उत्बीनें त्याचें कांहींच कारण दिलें नाहीं. पुढें झालेल्या इतिहासकारांनीं असें म्हटलें आहें कीं विजयराज हा जयपालाचा सामंत होता आणि महमुदाला द्यावयाच्या खंडणीपैकीं त्याच्या वांटयाचा भाग त्यानें दिला नाहीं. परंतु महमुदानें विजयराजावर स्वारी करावयास हें कारणच होऊं शकत नाहीं. शिवाय जयपालाची महमुदानें मुक्तता केली तेव्हां त्यानें महमुदाला कोणतीही खंडणी देण्याचें कबूल करून घेतलें असावें असें दिसत नाहीं. आनंदपालालाहि सोडून दिलें तें खंडणी देण्याच्या अटीवर नव्हे. वस्तुतः महमुदानें जयपालाच्या राज्याचा बराचसा मोठा भाग लुबाडला होता; आणि तो त्याच्या मुक्ततेबद्दल पुरेसा मोबदला होता. तेंव्हां या स्वारीचें कारण या खंडणीपेक्षां काहीं तरी निराळें असावें. उत्बीच्या बखरींत त्याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. बहुधा भाटियाचा राजा हा मुलतानच्या नैऋत्येस एक प्रबळ व स्वतंत्र राजा असावा, व त्यानें सिंधूच्या पश्चिम बाजूच्या मुलुखावर आपला हक्क सांगून तेथील लोकांस चिथाविलें असावें. आपण मागेंच पाहिल्याप्रमाणें भट्टी राजे हे सुरुवातीला झाबुलिस्थानचे मालक होते. जयपाळ, आनंदपाळ वगैरे राजे ब्राह्मण नसून भट्टी होते अशी जी एक कल्पना आहे ती आमच्या मतें बरोबर नाहीं. शाही ब्राह्मण घराण्यांत नांवाच्या शेवटीं लावावयाचें मानपद जरी 'देव'चे ऐवजीं 'पाल' झालें असलें तरी तेवढ्यावरून राजघराण्यांतच पालट झाला असावा असें होत नाहीं. क्षत्रिय राजानींहि पालप्रमाणेंच देव हें मानपदहि

लाविलें आहे आणि शाही राजे जरी ब्राह्मण असले तरी व्यवहारांत ते क्षत्रियच बनले होते. त्यांनीं आपल्या मुली क्षत्रिय कुमारांनां दिल्या होत्या आणि क्षत्रिय मुली आपल्या कुलांत करून घेतल्या होत्या. सारांश, भाटियाचा राजा हा जयपालाचा कोणी संबंधी असून त्यानें कांहीं अपराध केल्यावरून महमुदानें भाटियावर स्वारी करण्याचें ठरविलें असावें असें दिसत नाहीं.

ही लांबची आणि दुःसाध्य स्वारी करण्याचें महमुदानें कोणत्याही कारणानें ठरविलें असो, ती त्यानें आपल्या नेहमींच्या उत्साहानें पूर्णपणें पार पाडली. विजेराय ( विजयराज ) हि शौर्यानें लढला. त्यानें आपल्याला कैद करूं दिलें नाहीं. जयपालाप्रमाणें आपली अवमानना होण्यापूर्वींच आपल्या छातींत खंजीर भोंसकून घेऊन प्राणत्याग केला. भाटियाच्या लढवय्या नागरिकांनीं प्रायः आपले प्राण धारातीर्थीं अर्पिले. इतर लोक मुसलमान झाले. लोकांना कैद केल्याचें किंवा लुटालूट केल्याचें वर्णन येथें आढळत नाहीं. तेव्हां ही स्वारी लुटीसाठीं किंवा एखादी प्रसिद्ध मूर्ति फोडण्यासाठीं करण्यांत आली असावी असें वाटत नाहीं. भाटियाचे लोक आणि त्यांचा प्रांत सिंधु नदीच्या पूर्वतीरावर गझनी प्रांताच्या अगदीं जवळ होता. यामुळें तें काळजीचें स्थान होतें आणि म्हणूनच तो प्रान्त पूर्णपणें ताब्यांत आणून बाटविण्यांत आला असावा.

परंतु भाटिया शहर कोठें असावें ? तें शहर महत्वाचें होतें यांत शंका नाहीं. कारण अल्बेरुनीनें आपल्या भूगोलांत वझानच्या पश्चिमेस मुलतान, पलीकडे भाटिया होतें असा उल्लेख केला आहे. मुलतान हें वझानच्या अगदीं पश्चिमेस नसून थोडेसें वायव्येस आहे आणि भाटिया हें मुलतानच्या वायव्येस नसून नैऋत्येस असावें. तेव्हां तें भावलपूर नसावें. शिवाय भावलपुराशेजारीं पर्वतहि नाहींत. बाकी येथें हेंहि नमूद करून ठेवणें जरूर आहे कीं भाटिया शह-

राच्या किंवा किल्ल्याच्या वर्णनावरून असें दिसून येतें कीं भाटिया हें अगदीं पर्वताजवळ नसावें. कारण, डोंगरी किल्ल्याचें तट गगन-चुंबी असले तरी त्याच्या भोंवतीं खोल खंदक असणें शक्य नाहीं. उत्बीचीं वर्णनें स्वतःच्या माहितीनें लिहिलेलीं नसून तीं काव्यमय आहेत हें उघड आहे. महमुदानें मुलतान प्रांत बाजूस टाकला असें वर्णनांत आहे तेव्हां तो मुलतानच्या नैऋत्येस आला असावा. त्यानें फक्त सिंधु नदी ओलांडली, दुसरी कोणतीही नदी ओलांडली असें या स्वारीच्या वर्णनांत नाहीं; तेव्हां हें शहर मुलतानच्या नैऋत्येस सिंधु व सतलज यांचें दरम्यान कोठें तरी असावें. अल्बेरुनीनें त्याची जी जागा दिली आहे तिच्याशीं ही कल्पना जुळती आहे. बिजेरायानें सिंधूच्या तीरावरील डोंगरी अरण्यांत आश्रय घेतला असें जें फेरिस्तानें म्हटलें आहे तेंहि भाटिया हें सतलज व सिंधु यांचे दरम्यान होतें असें मानल्यास बरोबर ठरतें.

ईलियटच्या मतें मात्र भाटिया हा पाठ चुकला असावा, व तो शब्द भाटिया नसून भेरा असावा. त्याच्या म्हणण्याप्रमाणें हें शहर झेलमच्या डाव्या किनाऱ्यावर मुलतानच्या वायव्येस मिठाच्या डोंग-रांजवळ कोठें तरी असावें ( पान ४४० ). जयपाल--आनंदपालादि वाहिंडचे पाल हे भाटी असून बिजयरायाचे नातलग होते अशी त्याची कल्पना आहे. परंतु वर सांगितल्याप्रमाणें ही कल्पना बरोबर नाहीं व तिची आवश्यकताहि नाहीं. या स्वारीसाठीं महमूद बन्नूच्या खिंडीनें कुरम खोऱ्यांतून येऊन त्यानें सिंधु नदी ओलांडली आणि मुलतानच्या प्रांतांत न शिरतां त्याच्या कडेनें तो भाटियावर आला असें जें ईलियटनें म्हटलें आहे तें निःसंशय बरोबर आहे. आनंद-पालाच्या किंवा मुलतानच्या परकीय शत्रूच्या प्रांतांत घुसून आपल्या मार्गांत अडचणी उत्पन्न करून घेण्याची महमुदाला इच्छा नव्हती आणि म्हणून तो आड वळणाच्या लांबच्या मार्गानें आला

हें आपल्याला लवकरच दिसून येईल. परंतु यावरून भाटिया मुलतानच्या वायव्येस येत नाहीं, कारण तसें असतें तर महमुदाला मुलतानच्या कडेनेंही जावें लागलें नसतें. बिजेरायानें डोंगरावरील अरण्यांत पळून जाऊन आश्रय घेतला असें उत्बीनें जें वर्णन केलें आहे, त्यामुळें उत्पन्न झालेला पेंच उत्बीचें वर्णन अतिशयोक्तीचें आहे; भाटियाजवळ पर्वत नसून केवळ डोंगऱ्या होत्या असें म्हणटल्यानें सहज सुटण्यासारखा आहे. कसेंही असो, कोणतेंही अर्वाचीन शहर हें भाटिया होय असें दाखवितां येण्यासारखें नाहीं. अल्बेरुनीच्या काळांत तें शहर प्रसिद्ध असून तें मुलतानच्या नैऋत्येस सिंधु व सतलज नद्यांमध्यें होतें येवढेंच सांगून ते आजच्या भूगोलांत निश्चित न करतां स्वस्थ बसणें भाग आहे.

## टिप्पणी-भाटिया.

१ भापलपूर गॅझेटिअरमध्यें भाटिया म्हणजे भतिंडा होय असें मानून पुढें असें म्हटलें आहे कीं "इ. स. १००४ मध्यें महमुदानें भतिंडा सर केलें. तेथील राजा बिजयराज यानें आपला सम्राट् आनंदपाल याच्या विरुद्ध बंड केलें होतें व महमुदाच्या अधिकाऱ्यांस त्रास दिला होता" "पुढील स्वारींत भतिंडाचें मार्गानें महमूद मुलतानवर चालून आला" महमुदाच्या स्वारीचें उत्बीनें जें वर्णन केलें आहे त्या वरून ही दोन्हीही विधानें संभवनीय वाटत नाहींत.

२ भाटनेर, (हनुमानगड) बिकानेर संस्थान; या नावाखालीं इंपीरिअल गॅझेटिअरमध्यें असें म्हटलें आहें कीं, महमुदानें या स्थळावर इ. स. १००४ मध्यें स्वारी केली अशी समजूत आहे." परंतु याबद्दल शंका आहे असेंही पुढें म्हटलें आहे.

(३) बिकानेर गॅझेटिअरमध्येंहि अशातऱ्हेचा उल्लेख असून आणखी असेंहि म्हटलें आहे कीं राजा दलचंद नांवाच्या एका भट्टी राजापासून तैमूरनें हा किल्ला घेतला. तो किल्ला अति मजबूत असून

त्याची चांगली तटबंदी केलेली होती. " तो सर्व हिंदुस्थानांत प्रख्यात होता " असें त्याचें वर्णन केलेलें आहे ( पा. ३९७ )

४ जैसलमिर गॅझेटिअरमध्यें भट्टींची प्राचीन परंपरा अशी दिली आहे:—" ते यदूचें वंशज होते. यादव मथुरा सोडून गेल्यानंतर ते सिंधु नदीच्या पलीकडे गेले आणि गज नांवाच्या एका राजानें गझनी हें शहर वसविलें. एका खोरासान राजानें त्यांचा पराभव केला व ते पुनः सिंधु ओलांडून परत आले व पंजाबांत वसती करून राहिले. त्यांनीं गझनी पुनः सर केली, परंतु बलंद राजाच्या वेळीं त्यांना पुनः गझनी बाहेर हांकून देण्यांत आलें. बलंदाचा मुलगा भट्टी यानें भोंवतालचे अनेक राजेरजवाडे जिंकले. त्याच्या मागून त्याचा मुलगा मंगळराव त्याच्या गादीवर आला. परंतु त्याचें भाग्य त्याच्या बापासारखें थोर नव्हतें. गझनीच्या राजानें त्याच्यावर स्वारी केली तेव्हां त्यानें आपलें राज्य सोडून दिलें. सतलज ओलांडून तो पळून गेला व त्यानें राजस्तानच्या वाळवंटांत आश्रय घेतला. तेथेंच त्याचे वंशज तेव्हांपासून आपलें घर करून राहिले आहेत. " भाटिया नांवाचें एक शहर सिंधु व सतलज यांच्या दरम्यान कोठें तरी होतें या म्हणण्याला या लोककथेनें दुजोराच मिळतो. या शहराचा तुर्कांनीं विध्वंस केला तेव्हां भट्टींनीं सतलज ओलांडली आणि वाळवंटांत शिरून ते जैसलमीर येथें येऊन राहिले.

# प्रकरण सहावें.

## मुलतानवरील स्वारी.

महंमूद हा दूर हिंदुस्थानांत लढाईंत गुंतला आहे असें पाहून इलेक्खानानें महंमुदाच्या पश्चिमेकडील प्रांतांवर स्वारी केली; व चीनच्या कादिरखानास सहायाला घेऊन तो जेहून ( आक्सस ) नदी ओलांडून आला. ही बातमी कानावर येतांच महंमूद विद्युल्लतेच्या वेगानें गझनीस परतला व तेथून बल्खमध्यें गेला. इलेक्खानाबरोबर घनघोर लढाई होऊन त्याचा पूर्ण मोड झाला व तो आक्सस पलीकडे पळून गेला. उत्बीनें असें नमूद केलें आहे कीं, या लढाईंत महमुदाच्या सैन्यांत तुर्क, खिलजी, अफगाण व हिंदू लोक होते; सैन्याच्या मध्यभागीं त्यानें पांचशें हत्ती उभे केले होते; तो स्वतः एका मस्त हत्तीवर बसला होता; व त्यानें इलेक्खानाच्या निवडक पांचशें संरक्षकांवर हल्ला करून आपल्या हत्तीकडून त्यांतले बरेच लोक मारविले. यावरून असें दिसून येतें कीं जी साधनसामुग्री कर्तृत्वहीन नेत्याच्या हातांत कुचकामाची ठरली तिचाच उपयोग करून कर्तबगार सेनापतीनीं यश मिळविलें. ज्या हिंदूसैनिकांस व हत्तींस जयपालास यश मिळवून देतां आलें नाहीं त्यांचाच उपयोग महमुदानें आपल्या स्वतःच्या तुर्कांविरुद्ध अत्यन्त यशस्वी तऱ्हेनें केला.

गझनीस परतल्यावर मुलतानच्या धर्मभ्रष्ट राज्याधिकाऱ्यास मुलतान काबीज करून तेथून हांकून लावावयाचें असें त्यानें ठरविलें. मुलतान हें त्यावेळीं स्वतंत्र राज्य होतें सिंधच्या मुसलमानी प्रान्तात उत्तरेला मुलतान आणि दक्षिणेला मनसुरा अशीं दोन राज्यें होतीं.

मुलतानचा राजा मुसलमान होता; परंतु तो करमाती पंथाचा होता. हा पंथ अवदुल्ला बिन मैमान नांवाच्या एका परशियन उपदेशकानें स्थापिला होता. सातवा इमाम अल्ली ' हा शेवटचा इमाम असें तो आपल्या उपदेशांत सांगे. मृत आत्म्याचें कल्पान्ती पुनरुत्थान होतें ही कल्पना त्याला मान्य नव्हती व अवतारावर त्याचा विश्वास होता. इराणांतून या पंथाचें उच्चाटन जेव्हां करण्यांत आलें तेव्हां त्या पंथाचे लोक हिंदुस्थानांत आले व त्यांस येथें पुष्कळ अनुयायी मिळाले. ( बहुधा हीं दोन्हीं तत्वें हिंदुधर्मावरूनच घेतलीं असावींत ). सात आणि बारा या संख्यांचें पावित्र्य, दीक्षेच्या निरनिराळ्या पायऱ्या, गूढ खुणा व अर्थ, इत्यादि विशेषतः हिंदुस्थानांतील साध्या भोळ्या धार्मिक माणसांस आवडणारीं गूढ तत्त्वेंहि त्या पंथांत होतीं. मुलतानचा राजा व तेथील पुष्कळ लोक करमाती पंथाचे होते. महमूद हा कडवा मुसलमान होता. ही धर्मभ्रष्टता हिंदुस्थानांतूनहि नाहींशी करावयाची असा त्यानें निश्चय केला. किंबहुना असेंहि दिसून येतें कीं मुलतानच्या गव्हर्नराच्या बापाला सबुक्तगीननें खोरासान मधून हांकून दिलें होतें.

मुलतानला जाण्याच्या समोरच्या मार्गांतील अडचणी आणि धोके महमुदाला माहीत होते. मागें सांगितल्याप्रमाणें भाटियाहून परत जातांना त्याच्या सैन्यास त्रास देण्यांत आला होता. त्याचें सामानसुमान नाहींसें झालें व त्याचा जीवहि धोक्यांत पडला होता. दरबारी उत्बीनें याचा खलासा हि केला नाहीं, मग वर्णन कोठचें ? या इतिहासलेखकानें महमुदाच्या विजयाची काव्यमय वर्णनें विस्तारानें लिहिलीं आहेत; परंतु त्याचे पराजय वर्णितांनां तो अगदीं संक्षेपानें लिहितो. बहुधा आपल्या राजाच्या व राजधानीच्या झालेल्या शोचनीय अन्तामुळें चिडून जाऊन भातिया प्रांतांतील लोकांनीं महमूद परत जात असतां त्याच्या विरुद्ध उठावणी करून त्याच्या सैन्याला

त्रासवून सोडलें असावें.किंवा हल्लींच्या वायव्य प्रान्ताच्या सरहद्दीवरील दऱ्याखोऱ्यांत व गिरिकंदरांत राहणाऱ्या टोळ्यांनीं महमुदावर हल्ले केले असावेत; हें अधिक संभवनीय आहे. या अडचणीचें खरें स्वरूप कोणतेंहि असो, या वेळीं लांबच्या व वळणावळणाच्या परंतु कमी त्रासदायक मार्गानें जाण्याचें त्यानें ठरविलें आणि पंजाबचा राजा आनंदपाल याला त्याच्या प्रांतांतून जाण्याबद्दल परवानगी मागितली. यावरून आनंदपालाचें राज्य पंजाबांत तरी खास होतें व तो स्वतंत्र राजा होता असें निश्चितें ठरतें. परंतु मुलतानचा अधिपति आनंदपालाचा दोस्त असल्यामुळें त्यानें परवानगी दिली नाहीं. मुलतानच्या अधिपतीनें सबक्तगिनाबरोबर झालेल्या लढाईंत जयपालाला सहाय्यहि केलें असें म्हणतात. महमूद आनंदपालानें परवानगी दिली नाहीं म्हणून स्वस्थ बसणारा नव्हता. त्यानें अगोदर आनंदपालावर आणि नंतर मुलतानवर स्वारी करण्याचें ठरविलें. आनंदपालाचा पराभव झाला व काश्मीरपर्यंत त्याचा पाठलाग करण्यांत आला. ही लढाई पेशावर प्रांतांत झाली असें ईलियट म्हणतो; परंतु पेशावर महमुदाच्याच ताब्यांत होतें. या लढाईचें रणांगण पंजाबांत सिंधुनदीच्या पूर्वेस कोठें तरी असावें. उत्बीनें लढाईच्या स्थळाचा मुळींच उल्लेख केलेला नाहीं. तो फक्त इतकेंच म्हणतो कीं, " तेव्हां सुलतानानें शहरें व खेडीं लुटून उध्वस्त करून जाळून टाकण्याचा सैन्याला हुकूम दिला. त्यांनीं आनंदपालावर संकटामागून संकट उभें केलें व शेवटीं त्याला काश्मिरांत हांकून दिलें. " आनंदपालाची अशी दशा झालेली पाहतांच अबदुल फतेहनें आपली सगळी संपत्ति गोळा करून उंटाच्या पाठीवर घालून सेरेंदिब (सीलोन) येथें पाठवून दिली व तो स्वतः मुलतान सोडून पळून गेला.

महमुदानें मुलतानमध्यें प्रवेश केला व तेथील नागरिक धर्मभ्रष्ट झाले आहेत असें पाहून त्यांच्यावर जबर दंड बसविला. " या धर्म

स्थापनेचा वृत्तांन्त सर्व शहरांत पसरून इजिप्तमध्येंहि पसरला आणि त्या सर्व भागांतील अश्रद्धा आणि पाखंडीपणा यांचें मुख्य उगमस्थानच म्हणजे मुलतानचे बंड तोडून टाकण्यांत आलें. " (उत्बी ३२८-३२९ ). करमाती नास्तिकवादाप्रमाणें खिलाफती बद्दलचाहि वाद त्या वेळीं अस्तित्वांत होता. कांहीं लोक बगदादचा खलीपा हा खरा खलीपा म्हणून मानीत तर इतर इजिप्तच्या खलीफाचें पुढारीपण कबूल करीत व खुत्ब्यांत ( काझीच्या प्रार्थनेच्या वेळीं राजाचें व खलिपाचें नांव घेतात त्यास खुत्बाम्हणतात) त्याचेंहि नांव घालीत, महमूद स्वाभाविकपणेंच बगदादच्या खलीफाच्या बाजूचा होता. यावेळीं इजिप्तच्या खलीफानें पाठविलेलीं सन्मानाचीं वस्त्रें त्यानें स्वीकारिलीहि नाहींत.

महमूद मुलतानला कोणत्या मार्गानें गेला व कोणत्या मार्गानें तो परत गेला हें उत्बीनें नीट सांगितलेलें नाहीं. परंतु पुढील इतिहासकार तो भतिंडाच्या मार्गानें गेला असें म्हणतात; तसा तो गेला नसावा असें वाटतें. भेराच्या म्हणजे उत्तर मार्गानें परत गेला असें ईलियटनें म्हटलें आहें तें योग्य आहें ( ई. पा. २ पा. ४३२ ). ही स्वारी कोणत्या वर्षीं झाली हेंहि नक्की कळत नाहीं. कांहीं इतिहासकारांच्या मतें ती इलेक-खानाच्या पराभवानंतर झाली, कांहींच्या मतें आधीं झाली. उत्बीला प्रमाण मानून ती अगोदर झाली असावी असें इलिर्यटला वाटतें. परंतु उत्बीचा वृत्तान्त कालानुरोधानें लिहिलेला नाहीं आणि त्यानें या स्वारीचें साल दिलेलें नाहीं. परंतु इलेक्खाना बरोबरची लढाई आम्ही या स्वारीच्या पूर्वीं दिली आहे. कारण, आम्ही अपल्या इतिहासाच्या पहिल्या भागांत ( पा. १९९ ) उध्दृत केलेल्या अलबरुनीनें दिलेल्या आनंदपालाच्या पत्रानें ( अल्बेरुनी भा. २ पा. १० ) या महत्वाच्या प्रसंगाच्या वृत्ताची सरणी व्यवस्थित रीतीनें जुळते.

" तुर्कांनीं तुमच्या विरुद्ध बंड केलें आहे असें मी ऐकितों. तुमची इच्छा असेल तर मी स्वतः येईन किंवा ५०० घोडे १००० सैनिक व १०० हत्ती बरोबर देऊन मी आपल्या मुलाला पाठवीन. माझा तुम्ही पराभव केला आहे. दुसऱ्या माणसानें तुमचा पराभव करूं नये अशी माझी इच्छा आहे. " मुलतानवर स्वारी करतानां निष्कारण स्वारी होऊन पराभव झाल्यानंतर आनंदपालानें अशा तऱ्हेचा दाक्षिण्ययुक्त मदत करण्याचा प्रस्ताव केला असता असें वाटत नाहीं. आंतरराष्ट्रीय भाषेंत बोलावयाचें तर खुद्द अल्बेरुनीच्या म्हणण्याप्रमाणें आनंदपालाचेंच वर्तन जसें नेहमींच न्याय्य व योग्य असे तसेंच याहि वेळीं होतें. त्यानें तेव्हां आपल्याला मित्रस्थानीं असलेल्या मुलतानसारख्या राज्यावर किंवा एखाद्या त्रयस्थ राष्ट्रावरहि स्वारी करण्याला आपल्या हद्दींतून महमदाला जाऊं देण्याचें नाकबूल केलें हें न्यायाचें व योग्यच होतें; परंतु फ्रान्सवर स्वारी करण्याकरितां जर्मनी आपल्या सरहद्दींतून जात असता बेलजमनें जर्मनीला जाण्याची परवानगी न दिल्यामुळें जर्मनीची स्वारी आपल्यावर ओढून घेतली त्या वेळीं जर्मनीनें ज्याप्रमाणें तो अडथळा मानला नाहीं त्याप्रमाणेंच बलिष्ठ राष्ट्रें किंवा राजे असली अडचण मानीत नाहींत. महमुदानें जर्मनी सारखेंच वर्तन केलें. त्यानें अगोदर आनंदपालाला गांठला व त्याचें शासन केलें. महमुदाच्या अशा तऱ्हेच्या उघडाउघड अयोग्य वर्तनानंतर आनंदपालानें वरील पत्र लिहिणें संभवनीय नाहीं. अल्बेरूनीनें म्हटल्याप्रमाणें तो महमुदाचा हाडवैरी बनला. अल्बेरूनीनें त्याचे कारण निराळें दिलें आहे. " जेव्हां त्याच्या मुलाला कैद करण्यांत आलें तेव्हां याच आनंदपाल राजाच्या मनांत अगदीं विरुद्ध अशा भावना उत्पन्न झाल्या. त्याचा मुलगा त्रिलोचनपाल बापाहून अगदीं निराळा होता ". ह्मणजे मुसलमानांशीं तो स्नेहभावानें वागला आणि त्याला

त्यांच्याबद्दल प्रेम व आदर वाटत असे. त्रिलोचनपालाला कधीं कैद करण्यांत आलें तें निश्चित करितां येत नाहीं. तो या मुलतानच्या स्वारींत देखील महमुदाच्या हातांत पडला असेल व शेवटीं त्याला महमुदानें सन्मानानें सोडून दिलें असेल, व त्यामुळें त्याची मनोरचना निराळ्या प्रकारची बनली असेल. हें पत्र देतांना "त्यांचे परस्पर संबंध हें पत्र लिहितेवेळीं शिथिल होत चालले होते" असें अल्बेरुनीनें लिहिलें आहे हें खरें, परंतु त्या वाक्यांत महमुदानें स्वारी करून आनंदपालाला जागोजाग त्याचा पाठलाग करून काश्मिरांत हांकून लाविलें या सर्व गोष्टींचा अंतर्भाव होण्यासारखा नाहीं. त्यानें फक्त पूर्वीचे साधे संबंध--जे कधींच स्नेहाचे नव्हते ते--दाखविले जातात असें आम्हांस वाटतें.

मुलतानहून परत आल्यावर महमुदानें जरी आनंदपालाचा मुलुख पूर्वी सांगितल्याप्रमाणें लुटून उध्वस्त केला होता तरी तो आपल्या ताब्यांत घेतल्याचें दिसत नाहीं. महमूद सिंधूच्या पलीकडे गेल्यावर आनंदपाल आपल्या राज्यांत परत आला असला पाहिजे. आपल्या पराभवाचें शल्य त्याच्या हृदयास टोंचून राहिलें व त्यानें यझनीच्या राजाची सत्ता नाहींशी करण्याचा जोराचा प्रयत्न करण्याचा निश्चय केला. त्याचें वर्णन पुढील प्रकरणांत करण्यांत येईल.

# प्रकरण सातवें.

## संयुक्त हिंदूंची शेवटली लढाई.

आनंदपालानें आपल्या मदतीला हिंदुस्थानच्या अनेक राजांना बोलावलें. आपल्या धर्मावरील व स्वातंत्र्यावरील या वाढत्या संकटाचा नायनाट करण्यासाठीं हिंदुस्थानानें एकत्र होऊन केलेल्या या शेवटच्या प्रयत्नाचें फेरिस्तानें फारच अतिशयोक्तिपूर्ण वर्णन केलें आहे. परंतु उत्बीनें या प्रयत्नाला अशा तऱ्हेचें व्यापक स्वरूप दिलेलें नाहीं. नेहमीप्रमाणेंच सत्य या दोहोंच्यामध्यें आहे. आपल्याला हें माहितच आहे कीं काल जसा मागें पडत जातो तसतशा बखरा जुन्या प्रसंगाचें वर्णन अतिशयोक्तीनें करितात. मागाहून येणारा प्रत्येक बखरकार अद्भुततेंत भर घालीत असतो. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासालाहि हीच गोष्ट लागू पडते; रामायणाच्या किंवा महाभारताच्या प्रत्येक नवीन आवृत्तींत मूळ गोष्टींत अद्भुत वृत्तांची अधिकाधिक भर पडत गेली आहे. मुसलमान इतिहासकार कांहीं या नियमाला अपवाद नाहींत, आणि त्यांनाहि विस्मयावह गोष्टींची भर घालण्याचा स्वाभाविक मोह आवरितां आला नाहीं. फेरिस्ता म्हणतो, ( ई. २ पा. ४४६ ):—

“ महमुदानें हि. ३९९ ( इ. स. १००८ ) मध्यें आपलें सैन्य गोळा केलें, आणि हिंदस्थानांत स्वारी करून आनंदपालाचें पारिपत्य करण्याचा निश्चय केला. मुलतानच्या मागल्या स्वारीचे वेळीं आनंदपाल अतिशय उद्धटपणानें वागला होता. आनंदपालानें इतर हिंदूराजांची मदत मागितली. मुसलमानांस हिंदुस्थानांतून हांकून

देणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे असें त्यांस आतां वाटूं लागले होतें. मदतीच्या निमंत्रणावरून उज्जनी, ग्वाल्हेर, कालंजर, कनोज, दिल्ली व अजमीरच्या राजांनीं संघ केला आणि सबुक्तगिनाविरुद्ध केव्हांहि उभारलें नव्हतें येवढें सैन्यें गोळा केलें. आनंदपालानें स्वतः सैनापत्य पतकरिलें आणि तो महमुदावर चालून गेला. दोन्ही सैन्यें पेशावर येथें भेटलीं आणि एकमेकांसमोर तळ देऊन राहिलीं. तीं अशा तऱ्हेनें ४० दिवस स्वस्थ पडून होती. कोणत्याहि बाजूला लढाईला सुरवात करावयाची उत्सुकता होईना. मूर्तिपूजकांच्या सैन्यांत दररोज भर पडत होती. काफिर गख्खारहि मोठें सैन्य घेऊन येऊन मिळालें. हिंदुस्त्रियांनीं आपले दागदागिनें विकले आणि लांब लांबच्या प्रदेशांतून या विक्रीचे आलेले पैसे आपल्या नवऱ्यांच्या आवश्यक गरजा भागविण्यासाठीं पाठवून दिले. ज्या गरीब होत्या त्यांनीं सूत कातून किंवा इतर श्रम करून सांचविलेल्या पैशांतून आपली मदत पाठवून दिली. ”

या लढाईचा समकालीन उत्बी यानें जो वृत्तांन्त दिला आहे त्याच्याशीं वरील वर्णन ताडून पाहिलें तर तें खरोखरच अतिशयोक्तिपूर्ण ठरलें “ सुलतान वामंद नदीवर आला तेव्हां वबाल बिन अद्ब-पाल हा त्याला मोठें सैन्य घेऊन आडवा झाला. युद्धाचा अग्नि-सकाळपासून संध्याकाळपर्यंत जळत होता. सुलतानाचें सैन्य पराभव पावून काफिरांच्या हातांत विजय पडतो कीं काय अशी वेळ आली होती. परंतु इस्लामी धर्माला जयाचें मिळालेलें आश्वासन खरें झालें. सुलतानानें आपल्या खास शरीरसंरक्षकांस घेऊन हल्ला केला आणि त्यापुढें बंडखोरांचे पाय तग धरूं शकले नाहींत (उत्बी,पा.३४०—४१)

आपले दागिने विकून आणि सूत कातून अथवा दुसरे कोणते तरी श्रम करून त्याची मिळालेली मजुरीची रक्कम पाठवून स्त्रियांनीं सैनिकांच्या खर्चाकरितां मदत पाठविली हें फिरिस्ताचें विधान शुद्ध

अतिशयोक्तीचें आहे. आपल्या सैन्याचा खर्च भागविण्या इतके हिंदू-राजे श्रीमंत होते. आणि जरूरच तर व्यापारी आणि देवळें यांच्या-पासून वर्गण्या गोळा करितां आल्या असत्या. उत्बीनें उल्लेख केला नसला तरी निरनिराळ्या अनेक हिंदू राज्यांतून फौजा आल्या, यावर विश्वास ठेवतां येईल. कारण गोळा झालेलें सैन्य इतकें प्रचंड होतें कीं जयाचे पारडें हिंदूच्या बाजूस कांहीं काळपर्यंत झुकत होतें. शिवाय कोरीव लेखांच्या पुराव्यावरूनहि कांहीं राजे आनंदपालाच्या मदतीला आले होते असें दिसून येतें. परंतु याहि बाबतींत उत्तरकालीन इतिहासाचें अधिष्ठान करून कल्पनेला सुचलीं त्या राज्यांचीं नावें फिरिस्तानें दिलीं आहेत. उज्जनीला जरी मालवाधिपति भोज राज्य करीत होता आणि सैन्य पाठविण्या इतका जरी तो प्रबळ होता तरी उज्जनी या लढाईंत सामील झाल्याचें दिसत नाहीं. परमारांच्या इतिहासांत सांगितल्याप्रमाणें भोजानें तुर्कांशीं युध्द केलें असा एका कोरींव लेखांत उल्लेख आहे; परंतु त्यांत त्याला जय मिळाला असें म्हटलें आहे. कालंजरनें या युध्दांत भाग घेतला यांत संशय नाहीं. धंगानें पूर्वीच्या संयुक्त प्रयत्नांत सबुक्तगिना विरुध्द झालेल्या लढाईंत भाग घेतला होता, त्याचें अनुकरण करून त्याचा मुलगा गंड या युध्दांत सामील झाला होता. कनोजला उत्तर हिंदुस्थानची सम्राट् पदवी असल्यामुळें तेथून सैन्य यावें हें स्वाभाविक. ग्वाल्हेर कालंजरच्या राजाचें मांडलिक होतें; तेथें कच्छपघात ( अर्वाचीन कच्छवाह ) कुलांतील समर्थ सामंत राजा राज्य करीत होता. आणि कोरींव लेखांत त्याचा उल्लेख नसला तरी ग्वाल्हेरहून हि फौज आली असावी. दिल्ली किंवा अजमीर यांचीं राज्यें त्यावेळीं स्थापित झालीं नसावींत किंवा त्यांना या युध्दांत भाग घेण्याची ताकद तरी नसावी. आनंदपालाच्या ताब्यांतील पुष्कळ पंजाबी रजवाड्यांनीं त्याला सहाय्य केलें असावें. फिरिस्तानें काश्मीरचा उल्लेख केलेला

नाहीं. आणि या प्रसंगीं आनंदपालाच्या मदतीला सैन्य पाठविण्यांत आलें, अशा तऱ्हेचा उल्लेख राजतरंगिणींतहि नाहीं. कसेंही असो, आपलें स्वातंत्र्य आणि आपला धर्म यांच्या नाशाचें संकट उभें करणाऱ्या गझनीच्या नव्या वाढत्या सत्तेपासून हिंदुस्थानचें रक्षण करण्यासाठीं केलेल्या या जोराच्या प्रयत्नांत आनंदपालानें प्रचंड सैन्य जमविलें होतें असें निःसंशय दिसून येतें.

ही हिंदुस्थानच्या भवितव्यतेचा निर्णय करणारीं लढाई पेशावरच्या मैदानांत झाली असें फिरिस्तानें म्हटलें आहे. परंतु ईलियटला हें संभवनीय वाटत नाहीं. उत्बीनें युद्धाचें क्षेत्र दिलेलें नाहीं. परंतु वाहिंद आणि सिंधूच्या पश्चिमेकडील प्रदेश महमुदाचे अमलाखालीं पूर्वींच असल्यामुळें निष्णात सेनापतीप्रमाणें शत्रु-सैन्याला त्याच्याच हद्दींत गांठण्याची तजवीज त्यानें केली असावी. उत्बीनें वमंद-नदीच्या तीराचा उलेख केला आहे (पा. ३४०). परंतु ही नदी कोणती हें निश्चित करितां येत नाहीं. ही नदी ओलांडण्यांत आली होती कीं नाहीं आणि असल्यास कोणी हेंहि त्यानें सांगितलें नाहीं. अटक जिल्ह्याच्या गॅझेटिअरमध्यें या लढाईची जागा त्या जिल्ह्यांतील अटक आणि हजरो यांच्या दरम्यान असलेल्या छच्छच्या मैदानांत होती असें म्हटलें आहे, व रावळपिंडीच्या गॅझेटिअरनें त्याचीच पुनरुक्ति केली आहे. दोहोंच्याहि मतें ही लढाई महमूद व शाहि-काबूल राजा आनंदपाल—तो पंजाबचाहि राजा होता—यांचे दरम्यान झाली. उत्बीच्या बखरींत हें नांव वबाल बिन अद्वपाल असें दिलें आहे. परंतु तो खास फारशी अक्षर वाचण्याचा दोष आहे. नावांतला शेवटला भाग तरी आनंदपालच असला पाहिजे. वबाल हें त्याच्या मुलाचें नांव असूं शकेल.

या लढाईचा प्रकार आणि तिचा कालावधि याचें फिरिस्तानें केलेलें वर्णन इ. स. १७६१ सालीं पानिपतच्या रणांगणावर हिंदू

मुसलमानांमध्येंच झालेल्या लढाईच्या हकीकतीशीं इतकें तंतोतंत जुळतें कीं फिरिस्तानें केलेलें वर्णन हें सदाशिवरावभाऊ व अहमद-शहा अबदालीं यांच्यात झालेल्या लढाईच्या वर्णनावरून त्यानें नक्कल करून लिहिलें आहे, असा तर्क करण्याचा कोणासहि मोह झाला असता. परंतु ती दुसरी लढाई होण्यापूर्वींच दोनशेंपेक्षां अधिक वर्षें फिरिस्तानें आपलें पुस्तक लिहिलें असल्यामुळें आपल्याला फक्त इतिहासाची पुनरावृत्ति होते या नियमाची आठवण या युद्धामुळें होते. अटकनजीक छछच्या मैदानावर इ. स. १००८ मध्यें हिंदु व मुसलमान सैन्यें समबल असल्यामुळें दोन पहिलवान एकमेकांशीं भिडूनहि कांहीं वेळ हालचाल न करितां स्तब्ध राहतात, त्याप्रमाणें प्रतिपक्षावर सरशी मिळविण्याची योग्य संधि पहात चाळीस दिवस भोंवतालीं खंदक खणून एकमेकांसमोर तळ देऊन दोन्हीं सैन्यें बसलीं होतीं. ज्यांची संख्या अतिशयोक्तीनें तीस हजारपर्यंत फुगली आहे, अशा अर्धसंस्कृत व अनावृतशिर गख्खरांनीं* हिंदूंच्या सहाय्यास येऊन मात्र एकाएकी मुसलमानी खंदक ओलांडून मुसलमानांच्या तळावर हल्ला चढविला आणि दहापांच मिनिटांत दहापांच हजार मुसलमान शिपाई कापून काढले. झालें, लढाईस सुरवात होऊन दोन्हीं सैन्यें एकमेकांस भिडलीं आणि मध्यान्हापर्यंत उत्बीनेंहि म्हटल्याप्रमाणें हिंदूंची सरशी होती. परंतु यावेळीं भरती पूरी होऊन ओसरूं लागली. अकस्मात् असें होण्याला काय कारण घडलें तें उत्बीनें दिलेलें नाहीं, परंतु फिरिस्ता म्हणतो "गख्खरांचा आवेश

* गख्खार हे आतां मुसलमान झालेले असून विशेषतः रावळपिंडी जिल्ह्यांत आहेत. राजा जहांदादखान नावांच्या एका गख्खार संस्था-निकानें असें म्हटलें आहे कीं फिरिस्तानें खोक्करांऐवजीं गख्खार हें नांव चुकून दिलें आहे, हल्ला केला तो खोक्करांनीं. ही जातहि आतां मुसल-मान झाली आहे.

पाहून लढाई त्या दिवशीं थांबवावी म्हणून सुलतान स्वतः लढाईच्या धुमश्चक्रींतून बाहेर पडला. परंतु विधिघटना अशी कीं, आनंदपाल ज्या हत्तीवर बसला होता तो हत्ती त्याच्यावर फेंकलेल्या नक्तेलाच्या गोळ्यानीं आणि बाणांनीं एकाएकीं भडकला आणि तोंड फिरवून पळत सुटला. आपल्या सेनापतीनें ही पळण्याची इशारत दिली असें वाटून हिंदू सैन्यानें लढाई सोडून पळावयास सुरुवात केली. त्यांचा अवद्दला ताईनें पाठलाग केला आणि आठ हजार हिंदू कापून काढलें."

ही हकीगत उत्बीनें दिलेलीं नाहीं. परंतु त्यानें दुसरी एक गोष्ट सांगितली आहे व ती अधिक महत्त्वाची आहे. ती गोष्ट अशी "सुलतानानें आपल्या खास शरीरसंरक्षकांस घेऊन हल्ला केला व त्यापुढें काफिरांचा टिकाव लागला नाहीं." ही हकीकत मराठे व अफगाण यांच्या दरम्यान पानिपतांवर झालेल्या लढाईंत घडलेल्या हकीकतीबरहुकूम आहे. दोनप्रहरपर्यंत जय मराठ्यांकडे होता. इभ्राइमखानाच्या पलटणींच्या तोफा आणि हुजुरातीच्या स्वारांचे हल्ले कहर करीत होते. अकस्मात् विश्वासरावाला गोळी लागली व तो आपल्या हत्तीवर मृत्यु येऊन पडला; आणि सेनापति पडला अशी बातमी पसरतांच मराठी सैन्य फुटलें. त्या हितावह क्षणांत महमुदाप्रमाणेंच अवदालीनें राखून ठेवलेलें ( रिझर्व ) अफगाण सैन्य घेऊन निकराचा हल्ला केला आणि मराठी सैन्य पराभव पावून पळूं लागलें. बहुधा शूर परंतु दुर्दैवी भाऊसाहेबाप्रमाणेंच आनंदपालहि हत्तीवरून उतरून लढाईच्या गर्दीत सामील झाला असावा व धारातीर्थी त्यानें आपला देह ठेविला असावा. कारण लढाईनंतर त्या दोघांचेंहि काय झालें तें आपल्याला नक्की माहीत नाहीं. ते जिवंत किंवा प्रेतावस्थेंत सांपडल्याचेंहि आपण वाचिलें नाहीं. हिंदू व मुसलमान यांच्या दरम्यान १००८ इ. स. मध्यें झालेलें हें अत्यंत महत्त्वाचें युद्ध अशा तऱ्हेचें असून सात शतकांनंतर होणाऱ्या त्यांमधील युद्धाची

पूर्वावृत्तिच होतें. पानिपतच्या लढाईनंतरहि हिंदूंचें सामर्थ्य जसें कांहीं काळ टिकलें तसेंच या युद्धानंतरहि हिंदूंचें प्राबल्य कांहीं कालपर्यंत पंजाबांत होतें. परंतु हा मर्मीं घाव बसला आणि मुसलमानांस हिंदुस्थानांतून हांकून देण्याचें हिंदूंचें सामर्थ्य या दोन्ही लढायांत कायमचें नष्ट झालें.

आमच्या इतिहासाचें कथन पुढें चालू ठेवण्यापूर्वीं येथें थोडें थांबून हिंदूंच्या परभावाच्या कारणांचा विचार करणें अवश्य आहे. पानिपतांत काय किंवा छच्छच्या मैदानांत काय मनुष्यबळाची हिंदूंस कमतरता नव्हती. किंबहुना असेल तर संख्याबल त्यांच्याच बाजूला अधिक होतें. पानिपतप्रमाणें येथेंहि हिंदू शौर्यानें आणि जिवावर उदार होऊन लढले. तिसरी गोष्ट, कोणत्याहि लढाईंत मुसलमानांचीं शस्त्रास्त्रें हिंदूंच्या शस्त्रांस्त्रांपेक्षां अधिक तेजस्वी नव्हतीं. पानिपतास दोघांच्याहि जवळ तोफा होत्या आणि हिंदूंचाच तोफखाना अधिक कारगर होता. छच्छच्या लढाईंत तोफा किंवा बंदुका कोणाहि कडे नव्हत्या. त्यांचा त्यावेळीं शोधच लागला नव्हता. दोघांकडेही तींच शस्त्रें म्हणजे तरवार व भाले हीं होतीं. हिंदूंचे भाले आणि तरवारी मुसलमानांच्या भाले-तरवारींपेक्षां अधिक तीक्ष्ण नसले तरी कमीहि नव्हत्या. छच्छमध्यें आणि त्याचप्रमाणें पानिपतालाहि दैवच मुसलमानांस अनुकूल झालें असें कदाचित् म्हणतां येईल. दैव हें जय मिळवण्याच्या कारणांपैकीं एक कारण आहे असें जे कबूल करीत नाहींत त्यांना असें म्हणावयास हरकत नाहीं कीं, दैवरूपी कारणाचा संबंध या मानवी जगांतील प्रत्येक प्रसंगाशीं निगडित झाला आहे. परंतु दैव अनुकूल किंवा प्रतिकूल आहे असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां म्हणण्याचा आशय असा असतो कीं मनुष्याच्या हातांत नसलेल्या अशा कांहीं आकस्मिक गोष्टी विजयीपक्षाला मदत करितात आणि पराजित पक्षाची निराशा करितात.


सबुक्तगिनाशीं यापूर्वीं सिंधु नदीच्या पलीकडे झालेल्या लढाईंत एकाएकीं बर्फाचें वादळ उठलें आणि उष्ण देशांत राहणाऱ्या हिंदु लोकांस तसल्या थंड हवेची संवय नसल्यामुळें त्यांची दैना उडाली. या लढाईंत आनंदपालाचा हत्ती बाणांच्या व नक्तेलाच्या गोळ्यांच्या तडाक्यांत बेफाम झाला आणि तोंड फिरवून पळूं लागला. परंतु आपल्याला हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं लढाऊ हत्ती असल्या अस्त्रांचा मार सहन करण्यास शिकविलेले असतात. बाण किंवा गोळे नवे किंवा विलक्षण नव्हते. ते या लढाईतच प्रथम उपयोगांत आणले होते असें नाहीं. या अपघातांत आणि पानिपनतच्या लढाईंत विश्वासरावास प्राणास मुकविणाऱ्या अपघातांत काडीचें अंतर नाहीं. हत्तींच्या लढाईची कांहींहि माहिती नसलेल्या अशा हल्लींच्या लोकांस अनेक शतकांचें अंतर पडलेल्या अशा त्या कालांत सेनापतींनीं आणि विशेषतः स्वतः सैनापत्य अंगिकारिलेल्या राजांनीं हत्तींवर बसून गोळे, बाण आणि विशेषतः बंदुकीच्या गोळ्या यांस सहजासहजीं बळी पडावें हें खरोखर विलक्षण आहे असा शेरा मारण्याचा मोह होतो. परंतु बल्खनजीक इलेकखानाशीं लढतांना स्वतः महमूदहि हत्तीवरच स्वार झाला होता असें आपणांस पूर्वींच दिसलें आहे. तेव्हां आनंदपालानें हत्तीवर बसण्यांत घोडचूक केली अशी आपल्याला कल्पना करितां येणार नाहीं. परंतु विश्वासरावानें पानिपतास हत्तीवर बसून आपल्यावर बदुकीच्या गोळ्या घालण्याची शत्रूस मुभा दिली ही घोर चूक केली असें म्हणतां येतें. आनंदपालाच्या काळांत बंदुका नव्हत्या. त्याच्यावर जीं अस्त्रें फेंकतां आलीं असतीं तीं बाण आणि नक्तेलाचे गोळेच होते आणि त्यांपासून रक्षण करण्यास त्याचें व त्याच्या हत्तीचें चिलखत पुरेसें होतें.

दैव प्रतिकूल झालें व हत्ती फिरला असें मानलें तरी इतिहासकाराला असें म्हटल्याखेरीज गत्यंतर नाहीं कीं, अकस्मात् एखादी

प्रतिकूल गोष्ट मार्गांत आडवी आली असतां शूर व कणखर माणसांनीं जें धैर्य व जो युक्तिबाजपणा दाखवावा अशी आशा करण्यांत येते तसें धैर्य किंवा तसा युक्तिबाजपणा केव्हांहि हिंदूंनीं दाखविला नाहीं. हा आमचा दोष आम्ही पूर्वींच भाग २ (पा. २४६) मध्यें दाखविलेला आहे.आणि पुष्कळदां खरोखर पराजय झाला नसतांहि नायकत्व करणाऱ्या राजाला एखादा अपघात झाला असतां हिंदुस्थानांतील सैन्यें पळूं लागून जी विचित्र वर्तणूक करितात तें राष्ट्रीयत्वाच्या कल्पनेचा पूर्ण अभाव असल्यामुळें हिंदी सैनिकांस लढाईंत जय मिळविण्यांत स्वतःचें असें कांहींच हित वाटत नसतें म्हणून असें दाखवून दिलें आहे. कसेंहि असो, हिंदी स्वभावांतील किंबहुना हिंदु व मुसलमानहि लोकांचा हा दोष नमूद करण्यास हरकत नाहीं कीं, पाश्चात्य आणि विशेषतः ब्रिटिश सैनिकांचा या गुणाबद्दल लौकिक आहे; तसा आपत्काळीं कणखरपणें लढण्याचा हा गुण हिंदी लोकांच्या अंगीं नाहीं. सेनापतीला अत्यंत आवश्यक असलेला हा गुण महमुदाच्या ठिकाणीं होता यांत संशय नाहीं. शिवाजीप्रमाणें तोहि दैव प्रतिकूल दिसलें असतां कधीं निराश न होतां चिकाटीनें लढे. शिवाय महमूद हा खरोखरच विख्यात सेनापति होता. अहमदशाहा अबदालीप्रमाणें त्याच्या जवळहि निश्चयी आणि शूर शरीरसंरक्षकाचें राखून ठेवलेलें ( रिझर्व ) पथक होतें. गझनीचे राजे व विशेषतः महमूद हें पथक फार खर्च करून जय्यत तयारीनें बाळगीत असत. अहमदशाहा अबदालीप्रमाणें महमुदानें योग्यक्षणीं या शरीरसंरक्षकांस घेऊन स्वतः हल्ला केला आणि त्या संस्मरणीय युद्धांत शेवटीं जय मिळविला. त्या जयानें अखिल हिंदुस्थानचें नसलें तरी पंजाबचें नशीब कायम ठरविलें आणि हा प्रान्त लवकरच मुसलमानांच्या ताब्यांत गेला.

## टिप्पणी—संयुक्त लढाईचें ठिकाण.

पूर्वी सांगितलेंच आहे कीं फिरिस्ताच्या मतें ही लढाई पेशावराजवळ झाली आणि कित्येक हिंदी ग्रंथकार पेशावर व जमरूद यांच्या दरमियान ही लढाई झाली असें नक्की ठिकाण सांगतात. प्रत्येक बाजूस निदान लाख फौज अशा प्रचण्ड संख्येमधील लढाईइतकें हे मैदान विस्तीर्ण आहे हेंहि खरें. पण अटक आणि रावळपिंडी जिल्ह्याच्या गॅझेटीयरमध्यें ही लढाई सिंधु नदीच्या पुर्वेकडील छछच्या मैदानांत हजरोजवळ निश्चितपणें झाल्याचें विधान आहे. किंबहुना अटक जिल्ह्याच्या प्राथमिक शाळांत चालू असलेल्या भुगोलांत ही लढाई हजरोजवळ झाली असेंच स्पष्ट लिहिलें आहे. आमच्या मतें गॅझेटियरचें हें विधान मान्यकरण्याजोगें आहे. हें विधान कोणत्या आधारावर केलें आहे याचा अद्याप आम्हास ठाव लागला नाहीं. उत्बीनें एक वामंड नदी उल्लेखिली आहे व ती सुलतानाने वलांडली. पेशावर प्रांन्तांत या नांवाची नदी नसल्यानें आपल्यास येथे दुरस्ती करून नदी (सिन्धु) वहिंड येथें वलांडली, असें धरतां येईल. या लढाईत व इ. स. १७६१ च्या पानिपतच्या लढाईत पुष्कळ साम्य असल्याचें आपण पाहिलें आहे; त्यावरून असें सुचतें कीं ज्याप्रमाणें भाऊसाहेब यमुना उतरून अन्तर्वेदींत अबदालीस गाठण्याचा




छछच्या मैदानाचा नकाशा

विचार करीत आहेत तोंच अबदाली यमुना उतरून भाऊसाहेबांसमोर झाला त्याप्रमाणें महमूद स्वतः सिन्धु उतरून आनंदपालास आडवा झाला असावा; बहुतेक आनंदपाल दाक्षिणेकडून चाल करीत हजरोस पोंचून वहिंड जवळ सिन्धु उतरण्याचा विचार करीत असावा. पुढें दिलेल्या नजरी नकाशावरून येथील लढाईच्या ठिकाणाची स्थिति वाचकांच्या लक्षांत येईल. शत्रूचें भारी सैन्य व मजबूत ठिकाण पाहून महमुदानें आपल्या-भोवतीं खंदक खोदला. आनंदपालानें महमूद सिंधु उतरत असतां त्यास कां अडथळा केला नाहीं याचें कारण असें दिसतें कीं महमूद सिन्धु उतरून इकडे येईल असें त्यास वाटलें नसावें, किंवा त्यास योग्य वेळी बातमी नसावी किंवा सिन्धूच्या पूर्वेकडेंसच त्याशी लढावें अशी त्याची इच्छा होती. चचानें महंमद कासमास सिन्धु उतरताना विरोध केल्याचें वर्णन जसें सिन्धच्या इतिहासांत आढळतें तसें येथें आनंदपालानें केल्याचें आढळत नाहीं. कदाचित् आनंदपाल येऊन पोंचण्यापूर्वीच महमूद सिन्धु नदी उतरून आला असेल. या कल्पनेंत हजरोचा कबजा महमुदाचा असावा. हजरोच्या दाक्षिणेकडील छछचें मैदान अशा प्रचण्ड फौजांच्या लढाईला योग्य असें विस्तीर्ण आहे. या मैदानांत जवळ, १०।१५ फुटावर विपुळ पाणी लागतें. मैदानांत खाच खळगे किंवा उंचवटे नसून पानिपतच्या ( किंवा कुरुक्षेत्राच्या ) मैदानासारखें तें सपाट आहे आणि घोडदळांच्या हालचालींस योग्य आहे. हल्लीहि या मैदानांत ब्रिटिश फौजांच्या कवायती होतात.

# प्रकरण आठवें.

## नगरकोटची स्वारी.

हिंदु संयुक्त सैन्याचा धुव्वा उडवून त्याला उधळून लावल्यावर महमुदानें त्या अनुकूल परिस्थितीचा फायदा घेतला व नगरकोटावर एकदम चाल केली. तेथील विख्यात मूर्ति आणि अगणित संपत्ति याबद्दल नगरकोट प्रसिद्ध होतें. केवळ अमर्याद लूट मिळविण्याच्याच एका हेतूनें महमुदानें केलेली अशी ही पहिलीच स्वारी. केवळ लुटीसाठीं महमुदानें हिंदु देवालयांवर हल्ले केले याबद्दल त्याला दोष देतां येईल किंवा नाहीं याचें विवरण पुढें करण्यांत येईल. येथें येवढेंच सांगितलेंलें पुरे कीं त्यानें शिवाजीप्रमाणें वाकबगार अशा बातमीदारांचें स्वतंत्र खातें बाळगून लूट कोठें मिळेल याची बरोबर माहिती गोळा केलेली असली पाहिजे. उत्तरहिंदुस्थानांतील हिंदुराज्यांत त्याचे बातमीदार उघडपणें किंवा गुप्तरीतीनें फिरत असावेत. नगरकोट हा कांगडा राज्यांतील किल्ला होता. तेथें एक प्रसिद्ध मूर्ति होती. ती कोणत्या देवतेची होती तें कोठें आढळत नाहीं. ज्वालामुखी देवळाचा व या देवळाचा कांहींवेळां घोंटाळा करण्यांत येतो पण ज्वालामुखी हें निराळेंच देऊळ आहे. आणि ज्वालामुखी नगरकोटपासून पंधरा मैलांवर आहे; तेथें एका टेंकडीच्या शिखरापासून वायूचे ( गॅसचे ) उत्क्षेप उडतात व यातेकरू आले असतां पुजारी ते पेटवितात. येथें बहुतकरून दुर्गेचें देऊळ असावें. ज्यालामुखीप्रमाणेंच नगरकोट येथील मूर्तीची पूजा करण्यासाठीं दूरदूरचे लोक येत व मौल्यवान वस्तू देवाला अर्पण करीत. तेथील किल्ला फार मजबूत असल्यामुळें मुसलमानी इतिहासकारांनीं

म्हटल्याप्रमाणें हिंदुस्थानचे राजे आपले खजिनेहि तेथें ठेवीत. नगरकोट हें अर्वाचीन नांव आहे. प्राचीन नांव भीमनगर होतें. महाभारतांतील वीर पुरुष भीम यानें तें शहर वसविलें असें सांगतात. परंतु बहुशः तें काबूलच्या ब्राह्मणशाही भीमदेवानें वसविलें असावें. उत्बीनें त्याचें नांव "वहीम किल्ला" असें दिलें आहे. फारशींत वहीमच्या ऐवजीं भीम सहज वाचतां येईल. उत्बीनें या स्वारीचा वृत्तांत दिला आहे तो असाः—

"आणि मग तो (महमूद) वहीमबगरा (भीमनगर) किल्लयाच्या पायथ्याशीं येऊन पोंचला. हा किल्ला पाण्यांत पर्वताप्रमाणें उंच आहे. हिंदुस्थानांतील राजांनीं आपल्या प्रसिद्ध मूर्ति तेथें आणून ठेविल्यामुळें तो त्यांचा खजिनाच बनला होता. मौल्यवान वस्तु आणि जवाहिर यांचीं ओझींच्या ओझीं मुक्ति मिळण्यासाठीं तेथें पाठविलीं होतीं. सुलतानानें त्या किल्लयाला चोहोंबाजूनें वेढा दिला. किल्लयांतील लोक किल्लयाचें रक्षण करण्यासाठीं निश्चयानें व चिकाटीनें लढूं लागले. ........शेवटीं........ते शरण आले. आणि त्यांनीं सुलतानाच्या छत्राखालीं नोकरी करण्याचें मान्य केलें. जवाहीर, हिरे आणि दूर्मिळ संग्राह्य वस्तु सुलतानास इतकीं सांपडली कीं हातांनीं तीं मोजतां आली नाहींत आणि हिशेबाच्या वह्या त्यांची नोंद करावयास पुरेनात. सोनें व रुपें सुलतानाने आपले खजिनदार अलतूनताश व इस्तरजिन यांचे ताब्यांत दिलें आणि जवाहीर आपल्या स्वतःच्या ताब्यांत ठेवून तें सर्व उंटांच्या व माणसांच्या पाठीवर घालून नेलें. त्यांतील जेवढयाची गणती करितां आली तेवढयावरून दिऱ्हमचीं १०७० पुडकीं आणि ७००८०० मण सोनें व रुपें त्या लुटींत सांपडलें असें दिसतें. रेशमी कापड व कपडे याविषयीं म्हणाल तर तीं इतकीं होतीं कीं सरकारी कारकुनांस त्यांची व्यवस्थित मोजदादच करितां येईना. अशा तऱ्हेचें कसब व रम्य बनावट

आपण कोठेंच पाहिलीं नाहीं असें लोकांनीं कबूल केलें. त्यांना एक रुप्याचें प्रशस्त सबंध घर सांपडलें. तें साठ हात लांब व पन्नास हात रुंद होतें. त्यांत दोरांच्या सहाय्यानें अशी योजना केली होती कीं सर्व घरांत एकच दालन करावें किंवा निरनिराळ्या खोल्या पाडाव्या. तें घर लहान मोठें करितां येत असे. त्यांत ग्रीकपद्धतीचे जरतारीचे काम केलेले रेशमी पडदे होते. शिवाय दोन सोन्याचे व दोन रुप्याचे पुतळे होते. अत्यंत विश्वासु असा अधिकारी किल्ल्याच्या रक्षणासाठीं ठेवून सुलतान गझनीला परतला. तेथें एका दिवाणखान्यांत गालिच्यावर त्यानें हिरे, मोत्यें, पुष्कराज व पाचू यांचें प्रदर्शन केलें आणि निरनिराळ्या देशाचे मांडलिक रजवाडे व प्रांतांतून आलेले प्रतिनिधि आणि तुर्कांच्या राज्याचे वकील यांनीं तें पाहून आश्चर्यानें तोंडांत बोटें घातलीं. " महमुदाला त्याच्या स्वाऱ्यांत कशा अवाढव्य लूटी मिळत याची वाचकांस कल्पना यावी व अशा तऱ्हेचीं वर्णनें पुनः पुनः द्यावीं लागूं नयेत म्हणून नमुन्यादाखल हें लुटीचें वर्णन आम्हीं दिलें आहे. येथें हें हि वाचकांच्या नजरेस आणावयास हरकत नाहीं कीं, शिवाजीप्रमाणें महमुदहि लुटींत जी संपात्ति तो मिळवी तिचा तपशीलवार हिशोब ठेवीत असे. त्या लुटीची योग्य तऱ्हेनें किंमत करण्यांत येत असे. सरकारचा एक मोठा विशिष्ट भाग काढून ठेवून बाकीची लूट शिपायांत वांटण्याबद्दलचें कांहीं नियम पाळण्यांत येत असले पाहिजेत. नवीन धर्माच्या प्रसारार्थ सुरुवातीला आरबांनीं केलेल्या लढायांत सरकार किंवा खलिफा आणि शिपायी यांत लुटीची विभागणी करण्याचे जे नियम होते ते कडकपणें पाळण्यांत येत असत. सारांश, शिवाजीच्या अमदानींतल्याप्रमाणें लूट करण्याला व ती वांटून घेण्याला एक पद्धत होती.

नगरकोट किल्याभोंवतालीं जें दुस्तर पाणी होतें तें ईलियटच्या मतें बाणगंगा व बियाही नद्यांचें. भीमनगर किल्ल्यापासून सुमारें एक

मैलावर आहे, हल्लीं जेथें भवानी (देवी) आहे, तेथें होतें (ई. २ पा. ४४'२). ही नगरकोटची स्वारी छछहजरो येथें संयुक्त हिंदु सैन्याचा पराभव झाल्या बरोबर करण्यांत आली असली पाहिजे. कारण उत्बीनें योजिलेल्या ' आणि मग ' या शब्दांनीं तोच अर्थ स्पष्टपणें दर्शविला जातो. परंतु कांहीं इतिहासकारांनीं ती इ. स. १००९ मध्यें दिली आहे.

## टिप्पणी—कांगडा येथील किल्ला व देवळें.

कांगडा हें एक हिमालयांतील उंचावर मैदान आहे. त्याच्या पाठीशीं बर्फाच्छादित रांग आहे; व त्यांतून तीन चार खड्ड म्हणजे लहान नद्या बारा महिने वाहणाऱ्या वाहतात. हा प्रदेश अतिप्राचीन काळीं आर्यसंस्कृतीखालीं आला असावा. आणि महाभारताच्या काळापासून येथें चंद्रवंशी क्षत्रिय राजे ( त्यांस हल्लीं कटोच म्हणतात ) राज्य करीत आले, हें आपण पाहिलेंच आहे. त्यांची आश्रयाची मजबूत जागा म्हणजे कांगड्याचा किल्ला हा एक पुराणा किल्ला आहे. ज्यावेळेस तोफा माहीत नव्हत्या, त्यावेळेस हा किल्ला अजेय होता. दोन खोल खड्ड उर्फ नद्या, बाणगंगा आणि मनूनी, यांच्या संगमावर हा किल्ला आहे. ह्या खोल नद्यांच्या संगमाच्या ठिकाणीं त्यांच्या दरम्यान फारच अरुंद जमीनीची पट्टी आहे. नदींच्या कडेची किल्याची बाजू बहुतेक उभी सुमारें तीनशें फूट उंच आहे. नद्यांमधील अरुंद जमीनीच्या पट्टींत एक मोठा खंदक खोदला आहे आणि किल्यांत जाण्याचा दरवाजा या कृत्रिम खोलीच्या पलीकडे आहे. या ठिकाणीं थोड्याशा संरक्षकांस किल्याचे संरक्षण करितां येईल. मुसलमानी इतिहासकारांच्या लेखांवरून या किल्यांत एक प्रसिद्ध देऊळ होतें, हें देऊळ कोणाचें होतें हें ठिकाणावर मिळविलेल्या माहितीवरून व इ. स. १९०५ च्या ऑर्किआलॉजिकल सर्व्हे रिपोर्टावरून आपण ठरविण्याचा प्रयत्न करूं. या रिपोर्टांत इ. स. १९०५ च्या धरणीकंपापूर्वीं जीं देवळें कांगडांत होतीं त्यांची विस्तृत माहिती दिली आहे.

या रिपोर्टांत ह्या किल्याचा इतिहास येणेंप्रमाणें दिला आहे. (पा. ११) " अजेय महमुदानें इ. स. १००९ त हा किल्ला घेतला. इ. स.

१३३७ त तो पुनः महंमद तघलकानें आणि इ. स. १३५१ त त्याच्या पुढील सुलतान फिरोजशहा यानें पुनः घेतला. मुसलमानांच्या हातांत जेव्हां तो जहांगीरनें १६५१त जिंकला, तेव्हां तो कायमचा पडला. जेव्हां मोंगलांची सत्ता कमी झाली तेव्हां तो संसारचंद दुसरा यानें पुनः परत घेतला. कर्नल जनकचंद जम्मू व काश्मीर कौन्सिलचे मेंबर ( हें स्वतः कटोच आहेत ) यांच्या मतें संसारचंदाचा बाप घमंडचंद यानें किल्ला परत घेतला ( इ. स. १७८६ ). तो त्यांनीं पुनः रणजीतसिंगास इ. स. १८०९ मध्यें दिला. शीखांनीं तो ब्रिटिशांस इ. स. १८४६ त दिला. ब्रिटिश फौज इ. स. १९०० पर्यंत किल्यावर रहात होती." (हल्लीं तो धरणीकंपानें पडला आहे.)

किल्यांतील मुख्य संस्मरणीय ठिकाणें म्हणजे लक्ष्मीनारायण आणि शीतला यांचीं देवळें होत. हीं दोन्ही परवाच्या धरणीकंपांत पडलीं. आपल्यास असें गृहीत धरतां येतें कीं, महमुदानें हा किल्ला लुटल्यानंतरचीं हीं देवळें होतीं. अंबिकेचें देऊळ ( अद्याप येथें पूजा होते ) ही एक साधी इमारत आहे. धरणिकंपानें तें बिघडलेलें नाहीं. या देवळाच्या कृतीवरून असें दिसतें कीं, तें मुसलमानी अमदानींत बांधलें गेलें. अंबिकेच्या दक्षिणेस दोन जैन मूर्ति आहेत. एक नुसती पादुकाची आहे. दुसऱ्यावर आदिनाथाची बसलेली मूर्ति आहे. त्याखालीं अंशतः नष्ट झालेला एक लेख आहे. कानिंगहमच्या मतें-त्याजवर १५२३ संवत् ( १४६६ इसवी ) मिती दिली आहे. अर्थात् तो संसारचंद पहिला याच्या वेळचा आहे. (पान १५)


" तिसरें चित्र कांगडा शहरांतील इंद्रेश्वर देवळाचें आहे. हें देऊळ शिवालय असून तें इंद्रचंद्रानें बांधलें असें म्हणतात. कल्हणानें अनंतदेवाचा ( इ. स. १०२८-१०६३ ) समकालीन म्हणून ज्या इंद्रचंद्राचें नांव सांगितलें आहे, तोच हा इंद्रचंद्र असें मानलें तर हें देऊळ अकराव्या शतकापासून आहे असें दिसतें. या देवळाच्या बाजूलाहि दोन जैन मूर्ति आहेत. त्यापैकीं एकावर 'लोककाल' ३० ही मिति दिलेली आहे. बैजनाथ देवळांतील प्रशस्तीच्या समकालीन हा लेख आहे असें प्रथम समजलें गेलें. अर्थात् तो इ. स. ८५४ चा मानला गेला पण

हल्लीं बैजनाथ लेख संवत् १२०४ चा ठरला आहे, तेव्हां ही मूर्ति इ. स. ११५४ मधली असावी. चार खांबावर असलेला देवळाचा मंडप धरणीकंपानें जमीनदोस्त झाला आहे. पण बाकीचें देऊळ जैन मूर्तींसह जसेंच्या तसें आहे. ( पा. १६ )

"कांगडा जिल्ह्यांतील सर्वांत प्रसिद्ध पूज्यस्थान म्हटले म्हणजे वज्रेश्वरीचें देऊळ होय. हें कांगडा शहराचा एक बाहेरचा भाग भवन नांवाचा आहे त्यांत आहे. प्राचीन काळापासून हें ठिकाण पवित्र आहे. पण भूकंपांत जें देऊळ पडलें तें प्राचीन नव्हतें. जुन्या देवळाचा दरवाजा कायम असून त्यांत एक लेख आहे त्यावरून 'श्रीमहंमदाच्या वेळीं' हें देऊळ बांधलें असें दिसतें. कनिंगहॅनच्या मतें हा दिल्लीस इ. स. १५२३ पासून १५४६ पर्यंत राज्यकरणारा महंमद सय्यद होय. हें देऊळ बांधलें त्यावेळेस कांगडयांत संसारचंद राजा होता." हें देऊळ हिंदुसमाजानें आतां पुनः बांधलें आहे हें सांगितलें पाहिजे.

वरील माहितीवरून असें ठरतें कीं, जें देऊळ महंमुदानें पाडलें तें किल्ल्यांतील लक्ष्मीनारायणाचें किंवा शीतळादेवीचें देऊळ नव्हे; किंवा शहरांतील इंद्रेश्वराचें देऊळ नव्हे. कारण या तीन्ही इमारती महमुदानंतरच्या आहेत. बाकी राहतात किल्यांतील अंबिकेचें देऊळ व भवन येथील वज्रेश्वरीचें देऊळ. हें वज्रेश्वराचें देऊळ पुनः बांधतांना हिंदू समाजानें जें एक छापिल प्रसिद्धिपत्र काढलें आहे, त्यांत असें म्हटलें आहे कीं, महमुदानें हें देऊळ इ. स. १००९ मध्यें तोडलें. तें कांगड्याच्या एका राजानें इ. स. १०४३ त पुन्हां बांधलें. इ. स. १३३७ त महंमद तघलकानें तें पुनः तोडलें. तें हिंदूनीं पुनः बांधलें; पण फिरोजनें इ. स. १३६०त पुनः तोडलें. इ. स. १४४०त संसारचंद पहिला यानें पुनः बांधलें; पण शेरशहाचा सेनापति खवासखान यानें इ. स. १५४० त तें पुनः तोडलें. तें राजा धरमचंद यानें अकबरच्या वेळेस पुनः बांधलें. हल्लींचे गुलेरचे महाराज बहुश्रुत आणि विद्वान् असून मोठ्या सभ्य चालीचे आहेत; त्यानीं आम्हांस असें सांगितलें कीं, "महमुदानें जें देऊळ तोडलें तें भवनमधील वज्रेश्वरीचें देऊळ होय. आणि पूर्वकाळीं भवनाच्या

भोंवतीं कोट होता. " पुष्कळांचें मत असेंच आहे. पण आम्हांस असें वाटतें कीं, वज्रेश्वरीचें पहिलें देऊळ संसारचंद पहिला यानें बांधलेलेंच होय. या मताचीं कारणें पुढील प्रमाणें आहेत. मुसलमानी लेखकांच्या सर्व वर्णनांत महमुदानें कांगडाचा किल्ला घेऊन तेथील देऊळ तोडलें असें येतें. वज्रेश्वरीचें देऊळ किल्यांत नाहीं; भवन येथें आहे. हा भाग कांगडा किल्ला किंवा कांगडानगर यापासून दोन मैल दूर आहे. तेथील जागेची स्थिति वाचकांच्या लक्षांत येण्यासाठीं आम्ही एक कोट कांगडा,




कोट कांगड्याचा नजरी नकाशा

नगरकोट आणि भवन यांची स्थिति दाखविणारा नजरी नकाशा येथें देत आहों. भवनाभोंवतीं कोट असला तरी तो मजबूत नसावा. त्यास घेणें कोट कागड्याइतकें कठीण नसावें. तघलकानें जें देऊळ मूर्तीसह पाडलें तेंहि किल्यांतच असून हा किल्ला त्यानें घेतल्याचें दिसतें. कटोच राजांनीं किल्ला परत घेतला, आणि पुनः देऊळ बांधलें. पण फिरोज तघलकानें पुनः किल्ला घेतला. अशा वारंवार आपत्तीनंतर संसारचंद पहिला याच्या वेळीं हिंदूनीं हें देऊळ भवनमध्यें खालीं आणलें असें वाटतें.

ही आणखी गोष्ट सांगितली पाहिजे कीं, हल्लीच्या वज्रेश्वरी देवळांतील मूर्ति हातांनीं केलेली नसून स्वयंभू मूर्ति आहे. म्हणजे जमीनींतून थोडेसें वर आलेल्या एका दगडास डोक्याचा निदान डोळयांचा आकार

आहे. देवीची स्वयंभू मूर्ति आम्ही हीच प्रथम पाहिली. या स्वयंभू स्थानाविषयीं अशी आख्यायिका आहे कीं, एक शेतकरी शेत नांगरीत असतां नांगराचा फाळ देवीस लागून रक्त बाहेर आलें, त्यामुळें ही देवी सांपडली. स्वयंभू देवाच्या प्रकट होण्याची गोष्ट नेहमीं अशीच असते. असें संभवनीय दिसतें कीं, बनारस किंवा उज्जयिनी येथें मुसलमानी सत्ता स्थापन झाल्यावरहि ज्याप्रमाणें तोडलेल्या जुन्या देवाच्या शेजारीं त्याच देवाचें दुसरें देऊळ हिंदूंस बांधूं दिलें, त्याचप्रमाणें कांगड्यांतहि किल्ला मुसलमानांच्या ताब्यांत राहून हिंदूंस त्याच देवतेचें भवन येथें एक निराळें देऊळ बांधण्यास परवानगी मिळाली. हें वज्रेश्वरीचें देऊळ संसारचंद पहिला यानें इ. स. १४४०त बांधलें. पण मूर्तिभंजक शेरशहा यानें शंभर वर्षांनंतर तें तोडलें. धर्मासंबंधीं समतोल बुद्धि ठेवणारा अकबर यानें धरमचंदास तें देऊळ पुनः बांधूं दिलें. वरील मनोरंजक इतिहासावरून कांगड्याच्या कटोच राजांची उत्कट हिंदुधर्मश्रद्धा चांगली दिसून येते. इ. स. सोळाशेंच्या सुमारें धरमचंदानें बांधलेलें देउळ इ. स. १९०५च्या भूकंपापर्यंत कायम होतें. हिंदु समाजाच्या जोरदार धर्मभावनेनें हें देऊळ पुनः बांधलें गेलें आहे. फक्त कळसावर सोनें चढणें बाकी आहे.

ही गोष्ट आणखी सांगितली पाहिजे कीं किल्ल्यावरील अंबिकेच्या देवळांत अजून कटोच रजपूत पूजा करण्यास जातात. किंबहुना किल्ल्यांतील अंबिका देवीसमोर प्रत्येक कटोच गोदान संस्काराच्या वेळीं कापलेले आपले केस नेऊन ठेवितो असें आम्हांस कळलें. या गोष्टीवरून आणि वज्रेश्वरी देवीच्या प्रकट होण्याच्या कथेवरून आम्हांस असें वाटतें कीं, महमुदानें तोडलेलें कांगडांतील प्रसिद्ध देवालय अंबिकेचें असावें, ( हल्लींचें अंबिकेचें देवालय ऑर्कियालॉजिकल सर्व्हेच्या रिपोर्टाप्रमाणें महमुदाच्या नंतरचें आहे ) किंवा तें किल्ल्यांतील वज्रेश्वरीचें मूळचें देऊळ असावें. अंबिकेच्या देवालयांतील हल्लीची मूर्तीहि हातानें न केलेली म्हणजे स्वयंभू आहे. अशा देवळांत चलमूर्ति निराळ्या असतात आणि उत्बीनेंहि स्पष्ट सांगितलें आहे कीं या ठिकाणीं हिंदुस्थानच्या लोकांनीं आपल्या अनेक मूर्ति आणून ठेवल्या होत्या.

उत्बीनें जें वर्णन केलें आहे कीं, ‘ बहीमवग्राच्या किल्ल्याजवळ महमूद पोहोंचला तो किल्ला पाण्यामध्यें पर्वतासारखा उंच होता आणि तेथें अलंघ्य खाडा होता ’ ( पा. ३४१ ), तें या दोन नद्यांच्या संगमावर असलेल्या या किल्ल्याला बरोबर लागू पडतें. बहीमवग्रा हा शद्ब भीमनगर असा वाचला पाहिजे. काबूलच्या भीमशहानें भवन शहर वसविलें अशी समजूत आहे; पण उत्बीचें पुढचें वर्णन भवनास लागू पडत नाहीं. तेव्हां भीमनगर या शब्दांत नगरकोट, भवन आणि कांगडा किल्ला या तिहींचा समावेश करावा.

# प्रकरण नववें.

## (१) पंजाबचें मांडलिकत्व.

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, महमुदाचें लक्ष पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे सारख्याच सावधगिरीनें विभागलेलें असे. त्याची दूरदृष्टि आणि त्याची अविश्रांत चळवळ दोन्ही दिशांस सारख्याच जागरूकतेनें चालत असे. किरमान आणि कोहिस्तान या पश्चिमेकडील व उत्तरेकडील दोन प्रांतांतील उद्भवलेल्या अडचणींचा बंदोबस्त करून पंजाबचा प्रश्न कायमचा सोडविण्याकडे त्यानें लक्ष दिलें. पंजाबच्या राजाला त्यानें वाकविलें होतें आणि त्याच्या राज्यांतील एक मजबूत किल्ला कांगडाकोट आपल्या कबजांत घेतला होता. पंजाब राजाच्या आश्रयाचा दुसरा किल्ला नारदीन घेण्याच्या उद्योगास तो आतां लागला आणि हिंदुस्थानाच्या प्रांतांत घुसून ( उत्बी वर्णन करतो ) "त्या प्रांताचा विध्वंस करण्यास, मूर्तिपूजकांना शिक्षा देण्यास, मूर्ति फोडण्यास व गरीब व श्रीमंत लोकांस त्रास देण्यास त्यानें प्रारंभ केला. त्या लोकांचा राजा त्यानें नरकास पाठविला ( ठार मारिला ). हा प्रकार जेव्हां 'हिंदच्या' राजानें पाहिला आणि आपले जवळचे व दूरचे प्रांत उध्वस्त झालेले पाहिले तेव्हां शरण जाऊन महंमुदाचें मांडलिकत्व कबुल करण्यास त्यानें आपले नातेवाईक त्याकडे पाठविले" ( उत्बी पान ३६१ ). उत्बीनें या स्वारीचें असें थोडक्यांत वर्णन केलें आहे. या भागाच्या मथळ्यांत नारदीन हल्ला करून घेतलें असें जरी त्यानें म्हटलें आहे, तरी त्या हल्याचें त्यानें वर्णन केलेलें नाहीं. उत्बीनंतर लिहिलेल्या बखरींवरून इलियटनें असा तर्क केला आहे कीं "या स्वाऱ्या दोन होत्या, कित्येक

इतिहासकार म्हणतात त्याप्रमाणें एक नव्हती; आणि नारदीन शब्दांत गुजराथची राजधानी नहरवालाकडे उत्बीचा रोख दिसतो. दुसरी स्वारी नंदन किल्यावरील होय." हिचें वर्णन फिरिस्ता आणि इतर इतिहासकार यांनीं केलें आहे तें पुढें येणारच आहे. उत्बीच्या लेखांवरून दोन स्वाऱ्या झाल्याचेंहि स्पष्ट दिसतें; आणि दुसरीचें वर्णन त्यानें पुढें केले आहे. पण नारदीन म्हणजे नहरवाला असा एकीभाव करणें कठिण आहे. कारण मध्यंतरीचा पंजाब काबीज केल्याशिवाय महमुदास इतकें दूर दक्षिणेस जाणें शक्य नव्हतें. आमच्या मतें नारदीन म्हणजे पंजाबांतलीच एक जागा असावी, आणि महमुदानें ती घेऊन पंजाबची नासाडी केल्यानें पंजाबच्या राजास त्याचें मांडलिकत्व कबुल करणें भाग पडलें असावें. या राजाचें नांव काय होतें हें उत्बीनें सांगितलें नाहीं, आणि एक राजा ठार झाल्याचेंहि त्यानें वर्णन केलें आहे. यावरून असें संभवनीय वाटतें कीं, आनंदपाल स्वतः या युद्धांत मारला गेला असावा, आणि त्याचा पुत्र त्रिलोचनपाल यानें मांडलिकत्व कबूल केलें असावें. अल्बेरूनीच्या सांगण्याचा उल्लेख पूर्वीं आलाच आहे कीं, आनंदपाल हा अलीकडे महमुदाचा कट्टा शत्रु बनला होता, पण त्याचा पुत्र त्रिलोचनपाल याची मनःस्थिति महमुदाविषयीं अनुकूल होती. या सर्व गोष्टींवरून आम्हांस असें वाटतें कीं, संयुक्त हिंदूनीं केलेल्या पूर्वीच्या लढाईंत मारला न जातां आनंदपाल यावेळीं मारला गेला (इ. स. १००९ किंवा १०१०) आणि त्रिलोचनपालानें मांडलिकत्वाच्या शर्ती मान्य करून महमुदाशीं तह केला. या शर्तीमुळें पंजाब गझनवी साम्राज्याचा एक प्रांत बनला. या शर्ती उत्बीनें अशा दिल्या आहेतः— "(१) पंजाबच्या राजानें खंडणी देण्याचें कबूल केलें आणि गझनवी राज्याचें मांडलिकत्व मान्य केलें. (२) ही खंडणी साठ हत्तीचे जोड (?) आणि एक नगदी रक्कम दोन्ही पक्षाच्या संमतीनें ठरेल

ती पंजाबच्या लोकांनीं व सरदारांनीं गझनीच्या खजिन्यांत भरावी. ( ३ ) गझनीतर्फे आम्हीं राज्य करितों हें दाखविण्यासाठीं गझनी येथें दोन हजार फौज नोकरीस ठेवावी. ( ४ ) दर वर्ष, महिना व दिवस आपलें मांडलिकत्व जाहीर करावें. ( ५ ) पुढील येणाऱ्या राजानींहि पुढें याच शर्ती चालवाव्या. सदर शर्तीवर सुलतान राजी झाला ! ! आणि ही ठराविक रक्कम गझनवी साम्राज्याच्या फडणिशी दप्तरांत एक मोठी उत्पन्नाची बाब होऊन गेली. या तहानें व्यापारी व जाणारे येणारे लोक यांचे तांडे खुरासान व हिंदच्या प्रांतामध्यें सुरक्षित रीतीनें जाऊं लागलें." ( पा. ३६२ )

हरएक राज्याच्या उच्छेदाच्या पायऱ्या एकामागून एक वरप्रमाणें ठरलेल्याच आहेत. आठशें वर्षानंतर झालेल्या मराठी राज्याच्या उच्छेदाची येथें आपणांस आठवण होते. प्रारंभीं इ. स. १८०३मध्यें मराठे आणि इंग्रज यांजमध्यें कडाक्याचें युद्ध झालें. ज्याप्रमाणें हिंदूंच्या संयुक्त सैन्याचा पराभव इ. स. १००८मध्यें हजरोजवळ महमुदाच्या सैनापत्याच्या कौशल्यानें झाला, त्याचप्रमाणें इ. स. १८०३ मध्यें असईच्या लढाईंत मराठी संयुक्त फौजेचा पराभव इंग्लिशांचा कुशल सेनापति वेल्स्ली यानें केला. ज्याप्रमाणें त्रिलोचनपालानें मांडलिकत्व कबूल केलें व तैनाती फौज ठेविली, त्याचप्रमाणें बाजीरावानेंहि मांडलिकत्व कबूल करून ब्रिटिश शिपायांची एक तैनाती फौज पुणें येथें ठेविली. या तैनातीचा प्रकार मात्र दोन्ही ठिकाणीं उलट होता. आनंदपालाच्या पुत्रानें त्या वेळच्या अंकित राजांच्या पद्धतीप्रमाणें गझनी येथें मुसलमानी साम्राज्याच्या चाकरीसाठीं आपल्या खर्चानें दोन हजार आपली फौज ठेविली. याच्या उलट ब्रिटिशांची तैनातीची पद्धत होती. त्यांनीं अंकित राजाच्या दरबारीं म्हणजे राजधानींत ब्रिटिश फौज अंकिताच्या खर्चानें तैनात ठेवण्यास भाग पाडलें. शेवटचा उच्छेद करण्यास ही दुसरी पद्धत

फार पीरणामकारक आहे हें सांगावयास नकोच; आणि यांत एका प्रकारची जबरदस्त खंडणी आणखीं उत्पन्न होते. असो, हा शेवटचा उच्छेद त्रिलोचनपालावर लौकरच म्हणजे चार वर्षांतच कोसळला हें आपण पुढच्या प्रकरणांत पाहूं. बाजीरावाच्या समान उदाहरणांत शेवटच्या उच्छेदानें सुमारें पंधरा वर्षांनंतर बाजीरावास गांठलें.

अशा प्रकारानें पंजाबचे कांहीं दिवस मांडलिकत्व कबूल करून घेणें महंमुदास जरूर होतें. कारण पश्चिमेकडे ज्या अडचणी उत्पन्न झाल्या त्यांजकडे यामुळें स्वस्थ चित्तानें त्यास लक्ष देतां आलें. या पैकीं मुख्य अडचण आम्हीं येथें वर्णन करितों. कारण हिंदी वाचकांस तिचें महत्व आहे. गझनीस पश्चिमेकडे लागूनच घोरचा एक लहानसा डोंगराळ प्रदेश आहे. यांत एका कडव्या अफगाण लोकांची जात रहात असे, व ती प्रवाशी व व्यापारी यांच्या तांड्यास नेहमीं त्रास देत असे. हा प्रांत गझनीला जवळच असल्यानें हा प्रकार महमुदाच्या नाकावर माशी बसल्याप्रमाणें महमुदास त्रासदायक होई. हे लोक विधर्मी असून मोठे कुरेबाज असत आणि व्यापाऱ्यांच्या व यात्रेकरूंच्या तांड्यांपासून आपल्या कठिण डोंगरांच्या आश्रयानें जबरदस्त खंडण्या वसूल करीत. अर्थात् त्यांचा पक्का बंदोबस्त करणें महमुदास भाग पडलें. त्यांच्या कठिण चढावाच्या जाग्यांत त्यांजवर हल्ला करण्याचा महमुदानें आपल्या सैन्यास हुकूम केला, व तो स्वतः आपले शरीरसंरक्षक घेऊन गेला. अडचणीच्या घाटांतून घुसून घोरच्या राज्याच्या किल्लयाजवळ तो जाऊन पोहोंचला. तेथें घनघोर युद्ध झालें आणि महमुदानें नेहमीच्या युक्तीप्रमाणें आपल्या शिपायांस पाठ फिरवून पराभव पावून पळत असल्याचा देखावा दाखविण्यास इशारा केला. उत्बी लिहितो, " ते दैवहत फसले. त्या हिंदूंस स्थिर राहवेना, व लुटण्याच्या इच्छेच्या

मोहानें डोंगर सोडून ते मैदानांत आले. सुलतानानें फौजेचें तोंड फिरवून त्या सर्वांस जमिनीवर निजाविलें. त्या लोकांच्या मुख्याचा पुत्र कैद झाला व त्या किल्ल्यांत पिढयानुपिढया मिळविलेली लूट व हत्यारें आणि संपत्ति महमुदाच्या हातीं लागली. त्या पुत्रानें आपल्या आंगठींत असलेलें विष चोखून प्राण दिला. " (पा. ३६४–६५). हें वर्णन आम्हीं मुद्दाम विस्तारानें दिलें आहे. वाचकांचें लक्ष दोन तीन महत्वाच्या मुद्याकडे वेधेल. या घोरच्या दरींत राहणारे लोक अजून हिंदु होते. यांनींच पुढें मुसलमान झाल्यावर बाराव्या शतकांत हिंदुस्थानवर स्वारी करून हिंदुस्थान जिंकलें. महमुदानें या वेळीं त्यांस जिंकून जबरदस्तीनें बाटविलें. ते कडवे मुसलमान बनून त्यांनीं पुढें हिंदुस्थानच नव्हे तर गझनीच्या तुर्कांचें राज्यहि जिंकलें. दुसरी गोष्ट ही कीं, शिवाजीप्रमाणेंच महमूदहि लढाईंत गनीमी काव्याचा उपयोग करी. तिसरी गोष्ट ही कीं उत्तम राज्यकर्त्यांच्या लक्षणाप्रमाणें महमुदाचें लक्ष व्यापाराच्या उत्कर्षासाठीं रस्त्यांच्या सुरक्षिततेकडे असे. खुरासानचा व्यापार वाढावा आणि खुरासान व हिंद यांचे दरम्यान व्यापाऱ्यांचे तांडे सुरक्षित फिरावे अशी त्याची इच्छा होती. त्यावेळीं अलीकडच्या काळाप्रमाणेंच डोंगरांतील रानटी लोक मध्यवर्ती राजसत्ता ढिली पडली म्हणजे या व्यापाऱ्यांच्या तांड्यांवर छापे घालून जबरदस्त दंड वसूल करीत. त्यांचा बंदोबस्त जितक्या दक्षतेनें व सक्तीनें हल्लीं ब्रिटिश साम्राज्य करितें, तितक्याच सक्तीनें व दक्षतेनें महमूद करी, ही गोष्ट वाचकांस दिसून येईल.

## (२) पंजाब खालसा झाला.

या पुढें चार वर्षेंपर्यंत पंजाब व हिंदुस्थान सुरक्षित राहिलें. बहुधा त्रिलोचनपालानें कबूल केलेली खंडणी तक्रार न करतां सालो-

साल दिली. शिवाय महमुदाचे लक्षहि पश्चिमेकडे गुंतलें होतें. खुरासान प्रांत व त्याची राजधानी निशापुर येथें दरम्यान एक भयंकर दुष्काळ पडल्याचें वर्णन उत्बीनें केलें आहे. तुर्कांचा राजा इलेक्‌खान यानें या अडचणीचा फायदा घेऊन कांहीं त्रास दिल्याचेंहि वर्णन त्यानें केलें आहे. गर्जिस्तान अथवा जॉर्जिया हा प्रांत सामानी साम्राज्याचा एक भाग होता, तेथील शॉर ( जॉर्जियाच्या राजास शॉर म्हणत, जसें हिंदूंच्या राजास राय, तुर्कांच्या राजास खान आणि ग्रीकांच्या राजास सीझर म्हणत ) महमुदास जुमानीनासा झाला. तेव्हां महमुदानें नेहमींच्या तडकाफडकीनें व पूर्ण तयारीनें त्यावर झडप घालून त्यास जिंकलें. या अडचणींतून बाहेर पडल्यावर महमुदाला हिंदुस्थानकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला. पंजाब नुसता मांडलिक झाला आहे तो पुरा खालसा करण्याची इच्छा मानवी स्वभावाप्रमाणें त्यास होणें साहजिकच होतें. आणि त्याच मानवी स्वभावानें बंड करून आपल्यावर घातलेलें जोखड फेकून देण्याची इच्छा त्रिलोचनपालास होणेंहि साहजिकच होतें. तात्पर्य, एका पक्षानें किंवा दुसऱ्या पक्षानें कांहीं तरी सबब काढून युद्धास सुरवात केली. वर सांगितलेल्या समान उदाहरणांत इ. स. १८१८ मध्यें पुनः मराठा युद्ध अशाच तऱ्हेनें सुरू होऊन बापू गोखल्याचा पराभव झाल्यावर बाजीराव कायमचा राज्यभ्रष्ट झाला हें वाचकांस अवगत आहेच.

या युद्धाचें वर्णन उत्बीनें पुढील प्रमाणें केलें आहे. (पान. ३८९–३९२) "इ. स. १००९ मध्यें ( ४०० हिजरीमध्यें ) हिंदुस्थान जिंकून, तेथें मशीदी बांधून टाकल्यावर विधर्मीयांचा देश पूर्णपणें काबीज करण्याची इच्छा सुलतान करूं लागला. यासाठीं त्यानें आपल्या विजयी फौजा जमा केल्या आणि त्यांच्यावर मोठ्या सन्मानाचा पूर केला. हिंदुस्थानांत आल्यावर पुष्कळ बर्फ पडलेलें

पाहून तो गझनीस परतला. पण वसंतांत पुनः फिरला. हिंदुस्थानचा राजा एका डोंगराचा आश्रय घेऊन बसला होता, व घाटाच्या अरुंद रस्त्यांत त्यानें हत्ती उभे केलें होते. त्यांनें आपल्या राज्यांतील घोडदळ आणि पायदळ जमा केलें. एक मोठी विधर्मीयांची फौज हिंदुस्थान, सिंध व चारी दिशा येथून जमा होऊन माशांप्रमाणें गोंगाऊं लागली, व युद्ध सुरू होऊन रणांगणावर डोकीं चेंडूप्रमाणें उडूं लागलीं. जेव्हां जेव्हां हत्ती लढाईस पुढें येत, तेव्हां तेव्हां मुसलमानी फौज हत्तींच्या सोंडा तलवारीनीं तोडीत व गळे भाल्यांनीं भोसकीत. ज्या वेळेस आपला सरदार 'अबदल्लाताई' पेचांत पडलेला महमुदाच्या दृष्टीस पडला, तेव्हां त्यानें आपल्या निवडक गारदांपैकीं कांहीं तारे त्याच्या मदतीस पाठवून दिले. याप्रमाणें युद्धाचा अग्नि पेटत राहून शेवटीं विजयाच्या पाण्यानें विझला; आणि महमुदाच्या सुदैवाच्या एका फटकाऱ्यानें शत्रूंचे सर्व प्रयत्न धुळीसारखे उडून गेले, आणि मुसलमानांनीं त्यांची चीजबस्त व हत्ती लुटून घेतले.........या रीतीनें हा प्रांत इस्लामाच्या राज्यांत उच्च दर्जावर येऊन बसला, आणि महमुदाच्या स्वाऱ्यांच्या रजिस्टरांत हा विजय नोंदला गेला."

वरील वर्णनावरून असें दिसतें कीं त्रिलोचनपालानें अनेक हिंदुराज्यांतून फौजा जमवून महंमुदाला शेवटची टक्कर देण्यासाठीं तिसऱ्यानदां संयुक्त प्रयत्न केला. आणि एक जोराची भयंकर लढाई होऊन त्यांत महमुदाच्या चांगल्या नशीबानें व त्याच्या शरीररक्षकांच्या शौर्यानें त्यास पुन्हां जय मिळाला. ही लढाई ४०४ हिजरी अथवा इ. स. १०१३मध्यें झाली.या तारखेबद्दल इलियटनें उत्बीचाच आधार घेतला आहे. पण कित्येक प्रतींत वर सांगितल्याप्रमाणें ४०० हिजरी हेंच वर्ष दिलेलें आढळतें, व तीच तारीख कित्येक इतर मुसलमान इतिहासकार देतात. ही लढाई कोठें झाली ह्याजबद्दलहि बराच वाद आहे. उत्बीनें आपल्या अध्यायाच्या मथळ्यांत नारदीन् शब्द दिला आहे.

दुसरे लोक नंदूना हें नांव देतात. कांहीं लोकांचें असें मत आहे कीं ज्यूडच्या डोंगरांत झेलम नदीवर असलेल्या बालनाथच्या टेकडीजवळ हें युद्ध झालें. पण इलियटचें असें मत आहे कीं ज्या घाटाचा उल्लेख उत्बीनें केला आहे, तो मर्गला घाट असावा (इलियटर पान. ४५१). याच लढाईचें निजामुद्दीन अहमद यानें ज्यास्त सविस्तर वर्णन दिलें आहे त्यावरून पुढील अधिक माहिती इलियट देतो.

"४०४ हिजरीमध्यें सुलतानानें बालनाथ डोंगरांत असलेल्या नंदुना किल्ल्यावर आपलें सैन्य चालविलें. पुरु-जयपाल त्याच्या रक्षणाकरितां निवडक सैन्य ठेवून स्वतः काश्मीरच्या दऱ्यांत निघून गेला. खालीं सुरुंग लावून व इतर रीतीनें किल्ला घेतल्यावर सुलतान पुरुजयपालावर चालून गेला. पण तो आणखी डोंगरांत पळून गेला. सुलतानाला पुष्कळ लूट आणि गुलाम मिळाले. अनेक काफरांस बाटवून आणि इस्लामधर्माचा प्रसार करून सुलतान गझनीला परत आला." इलियटचें असें मत आहे कीं, "नंदूना किल्ल्यांत लढणारा हिंदु अधिकारी जयपालाचा पुत्र भीम असावा. किंबहुना उत्बीमध्येंच हें नांव निडरभीम असें आलेलें आहे." ज्या भाषांतराचा आम्हीं येथें उपयोग केला आहे त्यांत आम्हांस हें नांव सांपडलें नाहीं. कदाचित् उत्बीच्या भिन्न प्रती उपलब्ध असतील. पुरुजयपाल हा कोण हें इलियटनें विवेचिलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. हेंहि नांव चुकीनें वाचलें गेलें आहे हें स्पष्ट होय. कारण यावेळीं त्रिलोचनपाल हा राजा होता आणि पर्शियन किंवा आरबी लिपींत 'त्रिलोचनपाल' हा शब्द पुरुजयपाल असा वाचला जाणें शक्य आहे. जयपाल आणि आनंदपालहि यावेळेस जिवंत नव्हते. पंजाबातील शाहींच्या गादीवर त्रिलोचनपाल होता. त्याचा पुत्र भीम आणि त्रिलोचनपाल आपल्या निर्भय पुत्रास लढाई करण्यास ठेवून काश्मीरांत निघून गेला असें संभवनीय दिसतें. या लढाईंत निडरभीमा-

चाहि पराभव झाला. उत्बीनें पुढें जें वाक्य घातलें आहे त्यावरून असें दिसतें कीं, सर्व पंजाब निदान त्याचा मोठा भाग यावेळीं खालसा होऊन गझनीच्या राज्यास जोडला गेला. अल्बेरूनीच्या लिहिण्याप्रमाणें त्रिलोचनपाल यानंतर इ. स. १०२१ पर्यंत जिवंत होता; तेव्हां वरील दुसऱ्या हकीकतीचा मेळ घालून असें म्हणतां येतें कीं तो आणि भीम काश्मीरांत जाऊन काश्मीरच्या लगतच्या पंजाबच्या कांहीं प्रांतांत हिमालयाच्या पायथ्याशीं आणखीं सात वर्षें राज्य करीत होता.

राजतरंगिणीचा प्रकाशक स्टीन याचें असें मत आहे कीं, त्रिलोचनपाल आणि महमूद यामध्यें तौशी नदीवर जी महत्त्वाची लढाई झाली आणि ज्याचें विस्तृत वर्णन काश्मीरच्या वरील इतिहासांत कल्हणानें केलें आहे ती लढाई याचवेळीं म्हणजे हिजरी ४०४ किंवा इसवी १०१३ मध्यें झाली. ही नदी हजारा जिल्ह्यांत पश्चिमेकडून झेलमला येऊन मिळते. हा जिल्हा काश्मीरच्या सरहद्दीला लागून आहे. या लढाईंत काश्मीरची एक फौज तुंगाच्या हाताखालीं त्रिलोचनपालाच्या मदतीस आली होती. " या कावेबाज तुर्कांशीं संभाळून लढाई कर " असें त्रिलोचनपालानें तुंगास बजाविलें, व डोंगराच्या आश्रयानें त्यास लढाण्याची सल्ला दिली. पण महमुदानें आपल्या नेहमीच्या चालीप्रमाणें एक फौजेची तुकडी तौशी नदीपलीकडे पाठविली. तिचा तुंगानें पराभव केला आणि ती पळून नदी उतरून अलीकडे आली. या चालीनें फसून तुंगास जोर चढून तो नदी उतरून मैदानांत येऊन महमुदाशीं लढूं लागला. लढाई मोठया खडाजंगीची झाली. अनेक काश्मीरचे सरदार मृत्युमुखीं पडले व त्रिलोचनपालानेंहि स्वतः फार पराक्रम केला. परंतु हिंदूंची बाजू दुर्दैवानें पडणार असेंच ठरलें असल्यानें महमुदाचा जय झाला. त्रिलोचनपाल काश्मीरांत जो पळाला तो पुनः दिसला

नाहीं. काबूलच्या शाही राज्याचा येथेंच शेवट झाला, त्याविषयीं कल्हणानें जो काव्यमय दुःखोद्गार काढला आहे तो आम्हीं पहिल्या भागांत दिलाच आहे. त्रिलोचनपालानें इ. स. १०२१ पर्यंत राज्य केलें आणि भीमानें नंतर पांच वर्षें केलें असें जें अल्बेरूनीनें लिहिलें आहे, त्याचा मेळ दोन तीन तऱ्हेनें घालतां येईल. ( १ ) ही लढाई इ. स. १०२१तच झाली असें मानावें. किंवा ( २ ) त्रिलोचनपाल हिमालयाच्या डोंगराशीं लगत अस लेल्या एखाद्या क्षुल्लक पंजाबच्या प्रांतांत तेथपर्यंत राज्य करीत राहिला. किंवा ( ३ ) कनोजेस जाऊन तो १०२१ सालांत पुनः महमुदाशीं लढून मारला गेला.

झेलम गॅझेटियरमध्यें निंदूना म्हणजे मिठाच्या डोंगरांतील नंदन नांवाचा डोंगरी किल्ला होय अशी मनोरंजक माहिती दिली आहे. या ठिकाणीं काश्मीरच्या अमलाच्यावेळीं बांधलेल्या इमारतीचे अवशेष अद्याप आहेत. पान ६२ वर असें म्हटलें आहे कीं, हा जिल्हा प्रथम काश्मीरच्या ताब्यांत होता आणि नंतर काबूलच्या शाहींच्या ताब्यांत गेला. जयपाल आणि आनंदपाल असे जे मुसलमान इतिहासकारांनीं लाहोरचे राजे म्हणून वर्णिले आहेत ते वस्तुतः काबूलचे शाही राजे होत असेंहि ह्या गॅझेटियरमध्यें म्हटलें आहे. फिरिस्ताचा आधार देऊन हा नंदन किल्ला इ. स. १००८ मध्यें महमुदानें घेतला असें जें गॅझेटियरमध्यें म्हटलें आहे तें मात्र बहुधा चुकीचें आहे व ४०४ च्या ऐवजीं ४०० हिजरी चुकीनें वाचलें गेलें असावें. दुसरें, मिठाच्या डोंगरांतील रजपुतांचे मुसलमानी धर्मांतर शिहाबुद्दीन घोरीच्या वेळीं झालें असें ह्या गॅझेटियरमध्यें म्हटलें असून आणखी असें म्हटलें आहे कीं, येथील राजपूत, जाठ व इतर लोक ह्यांस महमुदानें जरी जबरदस्तीनें बाटविलें तरी त्याची पाठ फिरतांच ते पुनः हिंदु झाले असावे. पण हा जिल्हा महमुदाच्याच ताब्यांत

ह्यापुढें राहिला व त्याचे पुढचेहि राजे त्या जिल्ह्यावर राज्य करीत होते ही गोष्ट आपल्यास लक्षांत ठेवावयास पाहिजे. मिठाच्या डोंगरांतील मुसलमान झालेले जंजुआ राजपूत हे पंजाबचे फार जुने रहिवाशी आहेत. ययातीचा पुत्र अनु याचे ते वंशज आहेत असें मानतात. किंबहुना लाहोरचा जयपाळ हा जंजुआच होता अशी समजूत आहे ( झेलम गॅझेटियर ).

उत्बीनें असें वर्णन केलें आहे कीं त्या देवळांत एक दगड सांपडला; त्यावरील लेखांत हें देऊळ चाळीस हजार वर्षांपूर्वी बांधलें असें म्हटलें होतें. तें ऐकून सुलतान उद्गारला, " केवढा मूर्खपणा! जगतांतील सर्व शहाणे लोक जगच सातहजार वर्षांहून पुराणें नाहीं असें मानतात. " या विसाव्या शतकांत आपल्यास ह्या दगडावरचें विधान आणि त्यावरची महमुदाची टीका दोन्ही वेडसर वाटतील. बहुधा हा प्राचीन शिलालेख अशोकाच्या वेळचा असावा, व सभोंवतालच्या लोकांस त्याची खरी मिति माहीत नसल्यानें त्याचा अत्यंत प्राचीन काल त्यांनीं मानला असावा. असो, मिठाच्या डोंगरांतील नंदन हें ठिकाण अत्यंत प्राचीन असावें हें तेथील परिस्थितीवरूनहि दिसतें.

## टिप्पणी १–नंदनचा किल्ला.

झेलम गॅझेटियरमध्यें ह्या किल्ल्याचें वर्णन पुढील प्रमाणें आहे. ( पृ. ४६–४७ ). "चोआ सैदानशा याच्या थेट पूर्वेस चौदा मैलावर डोंगराच्या खालीं बादनवाला गांव व वर आरागांव यांच्या दरम्यान मिठाच्या बाहेरील डोंगरांच्या ओळीमध्यें एक मोठी खिंड आहे. ह्या खिंडींतून जाणाऱ्या रस्त्यावर जेथून पक्का मारा आहे अशी एक जवळ पाषाणमय उभी टेकडी आहे. त्या टेकडीवर एक देऊळ, एक किल्ला आणि एक मोठा गांव यांचे विस्तृत अवशेष आहेत. देऊळ पडकें आहे. याच ओळींतील इतर देवळाप्रमाणें हें देऊळ काश्मीरी पध्दतीचें आहे.

ज्या चबुतऱ्यावर हें देऊळ बांधलें आहे तो देवळाहून जुना, अतिशय प्राचीन काळचा आहे. देवळाच्या नंतरच्या काळांत देवळाजवळच एक मशीद बांधली गेली, तीहि अगदीं पडक्या स्थितींत आहे. देवळाच्या भोंवतालच्या आंगणांत बहुधा त्याच वेळचा एक शिलालेख आहे. त्याची अक्षरें इतकीं खराब झालीं आहेत कीं तो लेख आतां वाचणें शक्य नाहीं. गझनीच्या महमुदानें हा किल्ला घेतला होता, ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष झालें आहे ह्याचा चमत्कार वाटतो. ''

आणखी येथें असें सांगण्यासारखें आहे कीं, नंदनापासून सुमारें बारा मैलांवर भेरा शहर आहे. वहिंड गेल्यावर बहुधा आनंदपाल येथें राहिला असावा. हल्लींचें भेरा शहर झेलम नदीच्या पूर्वकांठावर आहे. परंतु पूर्वकाळीं जुनें शहर पश्चिम कांठावर होतें. त्याची जुनी जागा उंच ढिगारावरून अद्याप निश्चित दिसते. व तेथें जुनी नाणीं अद्याप सांपडतात. हल्लींचें भेरा शहर विद्वत्ता, व्यापार व कलाकौशल्य यांचें केंद्र असून तें पंजाबचें पुणेंच आहे. पंजाबांतील वकील एंजिनियर वगैरे विशिष्ट बुद्धिवान् लोक पुष्कळसे भेरा येथीलच असतात. हे जातीनें क्षात्रिय ( खत्री ) असतात. यांनीं लष्करी पेशा सोडून मुलकी धंदे उचलले आहेत. भेरा येथें विद्वान् ब्राह्मणांचीहि वस्ती आहे. लाकूड, लोखंड आणि कापूस याची उत्तम कारागिरीहि येथें आहे. तात्पर्य प्राचीन राजधानीचीं सर्व लक्षणें भेरा येथें आहेत. लाहोर आणि वहिंड यांच्या दरम्यान बरोबर मध्यावर तें असल्यानें शाहिराजांची ही लाहोरच्या खालोखाल तिसरी राजधानी असावी. इंपीरियल गॅझेटियरमध्यें भेराशद्वाखालीं पुढील माहिती दिली आहेः—पुराणें शहर नदीच्या पश्चिम किनाऱ्यावर होतें. तें महमुदानें लुटलें, व पुनः जंगिसखानाच्या एका टोळीनें लुटलें. नवीन शहर नदीच्या पूर्वेस असलेल्या एका मशिदी भोंवतीं इ० स० १५४९ त वसलें. हें हल्लीं एक मोठें रेल्वे स्टेशन आहे.

## टिप्पणी २–उत्तरशाही राजांच्या दुरुस्त केलेल्या तारखा.

भाग १ पान २०१ व भाग २ पान १५७ यांत शाहिराजांच्या प्रत्येक पिढीला वीसवर्षें सरासरी धरून अल्बेरूनीनें त्रिलोचनपालाचा

अन्त इ० स० १०२१ दिला. येथून मागें मोजीत, आम्ही शाही राजां च्या तारखा रकान्यांत दिल्याप्रमाणें धरल्या आहेत. त्या तारखा

जयपाल ९६० ते ९८०,
आनंदपाल ९८० ते १०००,
त्रैलोचनपाल १००० ते १०२१

हल्लीं निश्चित माहिती उत्बी व इतर मुसलमानी इतिहासकार यांवरून मिळते, तदनुरूप उत्तर राजांच्या मित्या दुरुस्त करावयास पाहिजेत. जयपाल इ० स० १००१ पर्यंत राज्य करीत होता हें आपण आतां पाहिलें आहे. तो अत्यंत वृद्ध झाल्यानें व शेवटीं मानहानि झाल्यामुळें चितेवर जळून मेला. तेव्हां त्याचें राज्य बरींच वर्षें टिकलें असें मानावयास हरकत नाहीं. मुख्य राजधानी वहिंड ही महमुदानें घेतल्यावर आनंदपाल राज्यांतील दुसरें शहर भेरा येथें रहात असावा. वहिंड पासून लाहोरच्या रस्त्यावर हजरोच्या मार्गें मर्गला खिंडींतून नेहमीं व्यापारी लोक काबूलचीं फळफळावळें लाहोर—मुलतानास व हिंदुस्थानचा कापड वगैरे माल काबूलास नेत असत. आनंदपाल नारदीनच्या लढाईत १००९ मध्यें मारला गेला. आणि त्रिलोचनपालानें महमुदाचें स्वामित्व कबूल करून इ० स० १०१४ पर्यंत राज्य केलें. त्यावर्षीं महमुदानें हिंदुस्थानावर स्वारी केली व त्रिलोचनपालानें मर्गला खिंडींत त्याचा विरोध केला. त्याचा पराभव होऊन तो काश्मीरांत निघून गेला. निडरभीम भेराच्या रस्त्यावरील नंदनाकिल्ल्यांत लढला पण तोहि पराभव पावून काश्मीरांत पळून गेला. आणि भेरा महमुदानें घेतलें आणि लुटलें. त्रिलोचनपालानें काश्मीराजवळील पंजाबच्या डोंगराळ प्रांतांत इ० स० १०२१ पर्यंत राज्य केलें. किंवा तात्काळ इ० स० १०१४ मध्येंच महमुदानें त्याचा पाठलाग करून तौशीनदीवरील लढाईत त्याचा पराभव केला. आणि तो काश्मीरांतून कनोजच्या राज्यपालाकडे गेला असावा. तथापि पुढील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें हें संभवनीय दिसत नाहीं. मुसलमानी इतिहासकार राज्यपालाच्या ऐवजीं चुकीनें हें नांव देतात. भीम कदाचित् कनोजेस गेला असावा आणि पुढें वर्णिलेल्या राहिब

नदीच्या लढाईंत तो मारला गेला असावा. या चार राजांचे दुरुस्त केलेले काळ येणेंप्रमाणें:—

जयपाल इ० स० ९६० ते १००१.
आनंदपाल इ० स० १००१ ते १००९.
त्रिलोचनपाल इ० स० १ ०९ ते १०२१.
भीम इ० स० १०२१ ते १०२६.

या घराण्यांतील पुढील एका राजानें माळव्याच्या भोजाचा आश्रय केला होता असा उल्लेख आढळतो.

# प्रकरण दहावें.

## ठाणेश्वरावरील स्वारी.

येथें थोडेसें थांबून गझनीचे प्रारंभीचे लहान राज्य यावेळीं किती मोठें झालें होतें तें आपण पाहूं. पुष्कळ विद्वान् लोक असें समजतात कीं महमुदानें केवळ लुटीसाठीं स्वाऱ्या केल्या, त्यानें राज्यें जिंकून एक बलिष्ठ राज्य स्थापन करण्याचा कधींच हेतु धरला नाहीं. परंतु महमुदाच्या राज्याचा विस्तार आतां पावेतों कसा झाला हें पाहतां ही समजूत चुकीची ठरते. त्यानें आपल्या राज्याचा समजून उमजून विस्तार केला आणि जबरदस्तीनें लोकांस बाटवून राज्याची मजबूती केली. ह्या बाटविण्यांत धार्मिक उत्साह तर होताच, पण राष्ट्राचें सामर्थ्य कोणत्या गोष्टींत असतें याचीहि त्यास चांगली कल्पना असावी त्यानें आपल्या राज्याच्या पश्चिमेकडील खुरासान व इतर प्रांत लगत असलेले प्रथम आपल्या राज्यास जोडले. या प्रांतावर सामानी साम्राज्याच्या वेळेपासूनच सबुक्तगीनाचा ताबा होता. महमुदानें यानंतर आपलें लक्ष पूर्वेकडे वळविलें. जलालाबाद आणि काबूल हे प्रांत ( लमघानात ) पूर्वींच जिंकून सामील झाले होते व

तेथील लोकांस जबरदस्तीनें मुसलमान केलें होतें. हल्लींच्या वायव्य सरहद्दीच्या प्रांतांतील बन्नूचा इलाखा महमुदानें प्रथम जोडला. हा हिंदूंचा प्राचीन प्रांत काबूलच्या शाहींच्या ताब्यांत होता. बन्नूजवळ मोठमोठाले मातीचे ढिगार आहेत. रामाचा भाऊ भरत यानें हा प्रांत प्रथम वसाविला अशी आख्यायिका आहे. असा हा जुना हिंदु प्रांत काबूलशाहीच्या ताब्यांत होता. कारण या ढिगारांतून जुनीं नाणीं, इंडोसिथयन काळांतील अझीज व वासुदेव यांचीं, सांपडतात तशीच शेवटच्या काबूलच्या ब्राह्मणी राजांचीहि सांपडतात. परंतु कोण-त्याहि मुसलमानी राजांचीं नाणीं या ढिगारांत सांपडत नाहींत. या-वरून बन्नूचें जुनें शहर महंमुदानें विध्वस्त केलें असें दिसतें. हिंदु-स्थानांत गझनीहून जाण्याचा जुना रस्ता बन्नूवरून कुरमखोऱ्यांतून होता. तो खैबर खिंडीतला रस्ता सुरू झाल्यापासून मागें पडला आहे ( बन्नू गॅझेटियर ). हा प्रांत महमुदानें प्रथम आक्रमून तेथील लोकांस जबरदस्तीनें बाटविलें व हिंदुस्थानांत सुलभतेनें जाण्याची सोय करून घेतली. नंतर पेशावर प्रांत वहिंडसह महमुदानें जय-पाळाचा पराभव पेशावरच्या मैदानांत केल्यावर आपल्या राज्यास जोडला. काबूलच्या राज्याची वहिंड ही राजधानी होती. आणि हिंदुस्थानास जाण्याचा दुसरा रस्ता वहिंडखालून व सिंधु आणि काबूलनदीच्या संगमावर होता. क्रमु आणि कुभा ( कुरम आणि काबूल ) या दोन नद्यांची खोरीं ऋग्वेदांत सुद्धां प्रसिद्ध असलेलीं व वैदिक आर्यांच्या प्रथम वस्तीतील असलेली याप्रमाणें महंमुदानें आपल्या कबजांत घेतली, आणि हे देश मुसलमान केले. यानंतर महमुदानें सामानी साम्राज्याचे दूरचे प्रांत जिंकून आपल्या राज्यास जोडले आणि पूर्वेकडे पूर्वीच मुसलमान झालेलें मुलतानचें राज्य आपल्या राज्यास जोडलें. पण त्यापूर्वी भाटियाचें राज्य जिंकून सामील केलें. हें राज्य पूर्वी सांगितल्याप्रमाणें मुलतानच्या नैऋत्येस

सिंधु आणि झेलम यांच्या दरम्यान होते. शेवटीं काबूलशाहीचा राहिलेला प्रांत पंजाब जिंकून त्यानें आपल्या राज्यास जोडला. या प्रांतांतील लोकांस जबरदस्तीनें मुसलमान करण्याची पद्धत महमुदानें सक्तीनें लाविली नाहीं. (त्याच्या कारणाचा विचार आपण पुढें करूं). तरी पण या प्रांतातहि पुष्कळ लोकांस त्यानें बाटविलें असें संभवनीय आहे. याप्रमाणें या मर्यादेपर्यंत आपलें राज्य जवळ जवळचे प्रांत हळुहळू खाऊन त्यानें वाढविलें. याच रीतीचा नमुना ब्रिटिश राज्याच्या वाढीचा कलकत्ता, मुंबई व मद्रास या केंद्रांतून हळुहळु लगतचे प्रांत सत्तेखालीं आणून झालेला आपल्यास दिसतो. प्रथम ब्रिटिश लोकांनीं बंगाल मिळविलें. नंतर बहार, नंतर यू. पी, व शेवटीं शिखांस जिंकून पंजाब. महमुदाप्रमाणेंच राज्य खालसा करण्याचा ब्रिटिशांचा रस्ता एकच होता. प्रथम पूर्वींची सत्ता जिंकून तीस कांहीं दिवस खंडणी देण्यावर कायम ठेवणें; नंतर शेवटचा उच्छेद करणें. असो, याप्रमाणें पंजाब जिंकून तेथें आपली सत्ता कायम केल्यावर पंजाबच्याहि पूर्वेकडे असलेले प्रांत लुटण्याकडे व जिंकण्याकडे महमुदानें आपलें लक्ष फिरविलें. अर्थात् पहिला लगतचा देश पंजाबच्या आग्नेयीस असलेला ठाणेश्वर, त्याजवर त्यास हल्ला करणें प्राप्त झालें.

ठाणेश्वर येथें एक स्वतंत्र राज्य असावें असें संभवनीय आहे. कारण अल्बेरूनीनें आपल्या भौगोलिक वर्णनांत ठाणेश्वरचा निर्देश केला आहे. (गंगा आणि यमुना याच्या दरम्यान एक आणि हल्लीं आहे तेथें पुनः ठाणेश्वरचा दोनदां उल्लेख आला आहे. बहुधा पहिलें नांव दुरुस्त करून घ्यावयास पाहिजे). त्याशिवाय ठाणेश्वरास एक प्रसिद्ध देव होता व हल्लींहि आहे. अलीकडील मुसलमान बखरकार याचें नांव जगसोम देतात. ह्या शब्दाचें योग्य संस्कृत रूपांतर करितां येत नाहीं. हिंदुस्थानचा प्रसिद्ध शेवटचा बौद्ध सम्राट् हर्ष

याचा बाप प्रतापवर्धन याचें राज्य येथेंच होतें. येथें कांहीं उत्तम हत्ती होते ते मिळण्यासाठीं महमुदानें ही ठाणेश्वरवर स्वारी केली असें म्हणतात. उत्वीनें ह्या हत्तींचें नांव सिल्मान असें दिलें आहे. त्या अलीकडील बखरकार त्यास मुसलमान म्हणतात. कारण गुडघे टेकून प्रार्थना करतांना जसें मुसलमान नमतात तसें हे हत्ती नमत असत. बहुधा महमुदाच्या स्वाऱ्यांचे सर्वच हेतु त्या स्वारींत होते. लूट मिळविणें, प्रसिद्ध हिंदु देवालयें फोडणें आणि जवळचें राज्य जिंकून नमविणें. उत्वीनें या स्वारीचें वर्णन पुढीलप्रमाणें केलें आहे. " याप्रमाणें महमूद धार्मिक लढाईच्या शाळेंत शिकलेली आपली फौज घेऊन ठाणेश्वरवर चालला. व त्यास असें एक भयंकर रेतस्थान लागलें कीं, तेथील हवेंत एक पक्षीहि फिरकत नव्हता. परंतु परमेश्वरकृपेनें त्यास मदत मिळाली व तो त्या जागेस जाऊन पोहोंचला. समोर एक पाण्यानें भरलेली वाहती नदी होती. त्याच्यामागें एक उंच डोंगर आणि मध्यंतरीं अडचण करणाऱ्या मोठ्या धोंड्यांनीं भरलेली जमीन. शत्रू डोंगरांत जाऊन बसला. दोन उतारांनीं नदी उतरून सुलतानानें शत्रूवर हल्ला केला, आणि त्यास फत्तरामध्यें विस्कळून टाकलें. शत्रूचें भरंवशाचे आधार, पाय हपटणारे हत्ती ते जागेवरच सोडले. सुलतानाच्या हत्तीनीं त्यास वळवून मुक्कामावर आणलें. सैन्यानें युद्धांत इतकें रक्त काढलें कीं, नदीचें पाणी पिण्यालायक राहिलें नाहीं. "

ही हकीकत सरळ आहे. मोठ्या योद्धयाशीं (या राजाचें नांव दिलें नाहीं ) घनघोर युद्ध झालें. आणि ज्या हत्तीकरितां विशेषतः महमुदानें ही स्वारी केली होती ते हत्ती त्यास मिळाले. येथें एखादी मूर्ति तोडल्याच्या उल्लेख नाहीं. पण प्रारंभीं उत्वीनें मूर्ति तोडण्याचा हेतु ह्या स्वारींत होता असें वर्णन केलें आहे, या ठाणेश्वरचा निश्चय करणें शंकास्थान झालें आहे. कारण एका रेंगस्थानां-

तून एका नदीवर पोहोंचल्याचें जें वर्णन आहे तें प्रसिद्ध ठाणेश्वराच्या परिस्थितीशीं जुळत नाहीं व दगडाळ जमीन व उंच पर्वतहि येथें नाहीं ( इलियड. २ पान ४५२ ). पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं उत्बी स्वतःच्या माहितीनें लिहीत नाहीं आणि तो वर्णन नेहमीं अतिशयोक्तीचें करितो. ठाणेश्वराजवळ सरस्वती नदी आहे, व कर्नाळ जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्यें देशाचें वर्णन करितांना असें म्हटलें आहे कीं, ठाणेश्वरच्या उत्तरेस कांहीं डोंगराळ प्रदेश आहेत, त्यांतून वर्षाकाळांत भरण्याऱ्या सरस्वती वगैरे नद्या येतात. ही लढाई ठाणेश्वराच्या अगदीं जवळ नव्हे पण तेथून थोड्या अन्तरावर झाली असावी. इ. स. १०१४ मध्यें ही लढाई झाली असें योग्यरीतीनें म्हणतात, व कर्नाळ गॅझेटियरमध्यें तसेंच म्हटलें आहे. पंजाब खालसा केल्यावर दुसऱ्याच वर्षी मुलतानच्या बाजूनें रेतस्थानांतून येऊन महमुदानें ठाणेश्वरवर अचानक छापा घातला असावा असें आम्हांस वाटतें. सर्व पंजाब त्याच्या कबज्यांत होता व त्यास पाहिजेल तो मार्ग घेणें शक्य होतें. यापूर्वीं मुलतानला दुसऱ्यानदां भेट देऊन कार्माती पाखंडांत पुनः पडल्याबद्दल तेथील मुसलमानांस त्यानें शिक्षा केली होती.

या स्वारीची फिरिस्तानें दिलेली हकिकत सर्वच काल्पनिक आहे असें आम्हांस वाटतें. तो चारशें दोन हिजरी म्हणजे इ. स. १०११ मध्यें ही स्वारी घालतो व असें वर्णन करितो कीं, ठाणेश्वरवर हल्ला करून तेथील प्रसिद्ध जगसोमदेव भ्रष्ट करण्याचा महमुदाचा विचार आनंदपालाला कळला, तेव्हां तो जरी महमुदाचा अंकित होता तरी त्याबद्दल त्यानें मोठ्या अदबीनें महमुदाचा निषेध केला. पण तो महमुदानें मानला नाहीं व त्यानें असें उत्तर पाठविलें कीं महमदी धर्माचे भक्त स्वर्गांत पुण्यफल मिळण्यासाठीं मूर्तिपूजा नष्ट करण्याचा नेहमीच प्रयत्न करितात. दिलीच्या राजानें हें ऐकून ठाणेश्वरच्या

मूर्तींचें रक्षण करण्यासाठीं सर्व हिंदुस्थानचे हिंदु बोलाविले. पण हे हिंदु जमण्यापूर्वींच महमुदानें ठाणेश्वरावर हल्ला केला. ठाणेश्वर काबीज केल्यावर दिल्लीवर चढाई करण्याची महमुदाची इच्छा होती; पण त्याच्या सरदारांनीं त्यास सांगितलें कीं, जोपर्यंत आपल्या पाठीवरील पंजाब आपण जिंकून घेतला नाहीं, तोंपर्यंत दिल्लीवर चढाई करणें सुरक्षित नाहीं. ही सर्व हकीकत कपोलकल्पित आहे. कारण दिल्ली यावेळीं अस्तित्वांत नव्हती. निदान तें राज्य हिंदुस्थानास निमंत्रण करील इतक्या मोठ्या पदवीस चढलें नव्हतें. तें एक मांडलिक लहान राज्य होतें. दुसरें उत्बीच्या वर्णनावरून नंदनच्या लढाईंत आनंदपाल मरून गेल्यावर व पंजाब खालसा झाल्यानंतर ही स्वारी झाली असें दिसतें. या स्वारीस मागील वर्षांत घालून फिरिस्तानें कल्पित, प्रशंसायुक्त एक वर्णन तयार केलें आहे. यमीनी मध्यें दिलेल्या हकीकतीवरून दिल्लीचा येथें कांहींच संबंध दिसत नाहीं. समकालीन लेखकांनीं दिल्लीचा कोठेंहि उल्लेख केलेला नाहीं. असें खुद्द इलियटनेंहि योग्य-रीतीनें येथें म्हटलें आहे. 'गझनी संबंधानें दिल्ली व तेथील राजे यांचा जो फिरिस्ता उल्लेख करितो तो पायाशुद्ध नाहीं. असेंहि इलियटनें म्हटलें आहे ( पा. ४५४ ). मुख्य कारण हें कीं, चार पांच शतकानंतर लिहिणाऱ्या लेखकांस आपल्या भोंवतालची परिस्थिति विसरणें अशक्य होतें; आणि आपल्या वेळीं प्रसिद्ध असलेल्या दिल्लीस त्यांना वगळतां येत नाहीं, कोठेंतरी घालावेसें वाटतें.

# प्रकरण अकरावें

## मथुरेची लूट.

मागील स्वारीवरून महमुदास कळून चुकलें कीं, मध्य हिंदुस्थानांत स्वारी करणें शक्य आहे. मध्य हिंदुस्थानांतील मथुरा शहर तेथील अनेक देवळें व त्यांतील अमोल संपत्ति याबद्दल प्रसिद्ध होतें. मध्यदेशाचा राजा राज्यपाल याविरुद्ध लढण्यास महमुदास कारणहि मिळालें होतें. कारण त्यानें पंजाबच्या राज्यास महमुदाविरुद्ध लढण्यास वेळोवेळीं मदत केली होती. पण ही दूरची स्वारी करण्यापूर्वी त्यानें युद्धाची चांगली तयारी केली. आपली पिछाडी सुरक्षित राहण्यासाठीं पश्चिमेकडील प्रांतांतील अडचणींचा बंदोबस्त करणें जरूर होतें. उत्बीनें या अडचणींचें आपल्या ग्रंथांत विस्तारानें वर्णन केलें आहे. गझनी येथें प्रधानाची घालमेलहि त्यास करावी लागली. गझनी येथील राज्यपद्धति व्यवस्थित होती; आणि प्रांतावरील अधिकाऱ्यांवर महमूद करडी नजर ठेवी. विद्वत्तेचें केंद्र त्यावेळीं खुरासान होतें, व भाषा पर्शियन होती; पण नवा नेमलेला वझीर स्वतः कवि व विद्वान् असल्यानें त्यानें सर्व पत्रव्यवहार अरबींत करावा असा हुकूम सोडला. तुर्कांचा राजा इलेक्खान ह्याच सुमारास मरण पावला, व त्याचा भाऊ त्याच्या गादीवर बसला. महमूद हिंदुस्थानांतील मुर्तिपूजकांवर चढाई करून त्यास जिंकीत असतां चीनचें व मोगोलियाचे मूर्तिपूजक काश्गर येथील मुसलमान तुर्कांवर एक लाख सैन्य घेऊन घसरले. ही पुढें होणाऱ्या चंगिसखान व तैमूर यांच्या भयंकर मोगली स्वाऱ्यांची दोनशें वर्षांपूर्वी सूचना होती. इलेक्खानाचा बंधु तोगनखान यानें सर्व महमदी राजांस या स्वारीस

विरोध करण्यासाठीं मदत करण्याविषयीं विनंति केली व महमुदानेंहि एक तुकडी मदतीस पाठविली. यावेळीं मोगल-तुर्कांचें घनघोर युद्ध झालें, आणि चीनच्या मूर्तिपूजकांचा हिंदुस्थानच्या मूर्तिपूजकांप्रमाणें पराभव होऊन बहुतेक सर्व मारले गेले. तोगनखानाच्या तुर्काशीं महमुदानें पूर्वीप्रमाणेंच सख्यभाव ठेवला, आणि आपला मुलगा मसऊद याच्याशीं इलेक्खानाच्या मुलीचा विवाह करून हें सख्य वाढविलें. या मसऊदास त्यानें बल्कचा अधिकारी नेमिलें.

उत्बीनें आणखी असें येथें वर्णन केलें आहे कीं महमुदाची मुसलमानी धर्माच्या आस्थेविषयीं ख्याति पसरली. व त्याच्या बुद्धिमत्तेमुळें तो धर्म विवेचण्याचीहि त्यास पात्रता आहे असें लोक समजूं लागले. महमुदानें ठरलेलीं इस्लामीं मतें नवीन कल्पनांनीं बिघडलीं जाऊं नयेत याविषयीं पूर्ण लक्ष ठेविलें. पाखंडी लोक कोण कोण आहेत आणि ते कोठें सभा भरवितात हें शोधून काढण्यासाठीं त्यानें हेर ठेविले. राज्याच्या निरनिराळ्या प्रांतांतून व शहरांतून हे पाखंडी हुडकून दरबारांत आणीत आणि मग झाडावर खिळ्यांनीं खिळून किंवा दगडांनीं ठेंचून मारीत. अबूबकर एक धार्मिक व आदरणीय सरदार या कामांत सुलतानाला पाठिंबा देत असे. टाहिरटी नांवाचा एक मनुष्य इजिप्तचा राजा व खलीफा याजकडून मी वकील आलों आहे व बरोबर पत्रें व पोषाख आणला आहे असें म्हणत गिझनीस येत होता. हा आपल्यास सय्यदहि म्हणवी. पण महमुदाच्या हुकमानें त्यास हिरात येथेंच थांबवून खुरासानची राजधानी निशापूर येथें परत नेलें. पाखंडाबद्दल तेथें त्याची चौकशी झाली व बगदादचा खलिफा कादिरबिल्ला याच्या संमतीनें त्यास देहांत शिक्षा दिली गेली. आपल्या विस्तृत राज्यांत याप्रमाणें महमुदानें पाखंडाचा बंदोबस्त केला, इतकेंच नव्हे तर खिलाफतीचाहि तंटा नाहींसा केला. यामुळें सर्व मुसलमानी प्रदेशांत त्याची कीर्ति पसरली (पान ४४४).

धर्मोत्साहानें गझनी येथें काफिरांविरुद्ध केलेल्या स्वाऱ्यांत लढण्यासाठीं लढवई लोक जमा होऊं लागले यांत आश्चर्य नको. त्यांस मूर्तींचा भंग करून आणि देवळें लुटून परलोकांत आणि इहलोकांत या लढण्यानें फल प्राप्त होण्यास वाव मिळण्याची आशा होती.

" ख्वारिझम येथें बंड झालें होतें तें मोडून व तो प्रांत आपल्या राज्यास जोडून महमुदानें तिसरी धर्मविजयाची स्वारी करण्याचा विचार केला व बोस्त येथें येऊन आपल्या सुभ्यांचे त्यानें जमाखर्च पाहिले. हिंदु लोकांपासून जिंकून इस्लाम राज्यांत मिळविलेले प्रांत द्रव्यानें भरपूर होते, व काश्मीराशिवाय कोणत्याहि ठिकाणीं मूर्तिपूजेचा अंधकार उरला नव्हता. ऑक्सस नदी पलीकडील मवरुन्नहरच्या मैदानांतून वीस हजार लढवय्ये इस्लामी धर्मोत्साहानें आले. त्यामुळें सुलतानाचा विचार पक्का झाला आणि या लोकांसह कनोजवर स्वारी करण्याचा बेत कायम झाला. परदेशी राज्यांस हा कनोजचा मुलूख अगदीं अज्ञात होता. "

उत्बीनें कनोजवरील कूचाचें आणि मथुरेजवळील लढाईचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

" जिहून ( सिंधु ), झेलम आणि चंद्र नद्या ओलांडून तो थेट तिबेटास गेला. तो जेथें जेथें मुक्काम करी, तेथें तेथें लोकांचे वकील येऊन, अंकितत्व मान्य करून राजनिष्ठा जाहीर करीत. काश्मीरच्या हद्दीवर तो पोहोंचला तेव्हां काश्मीरचा सेनापति शासीन याचा पुत्र हवालीं नोकरीस दाखल झाला. इस्लामी धर्म ज्यानें स्वीकारला नाहीं त्यास सैन्यांत जागा नाहीं असें त्यांस जेव्हां सांगितलें, तेव्हां पुढील बीनीच्या लुटारूंत सामील होऊन तो सैन्यापुढें चालूं लागला. एकामागून एक दऱ्या ओलांडीत फौज चालली तेव्हां पहाटेस कोंबडा आरवण्याबरोबर सनई व नगारे वाजूं लागत. ( भाग १ पान १४३ यांत दिलेलें हर्षाच्या कूचाचें वर्णन येथें स्मरतें ). हिजरी सन ४०९

( इ. स. १०१८ )च्या रज्जबच्या विसाव्या तारखेस त्यांनीं यमुना मागें टाकिली, आणि हरून राजाच्या बरणच्या किल्ल्यास ते येऊन पोहोंचले. हा राजा हिंदुस्थानच्या राजांत फार मोठा होता. पण त्यानें जेव्हां महमुदाचा सेनासमुद्र पाहिला, तेव्हां त्यानें दहा हजार माणसांसह किल्ल्याखालीं उतरून इस्लामी धर्माचा स्वीकार केला. येथून फौज कलजंदच्या किल्ल्याजवळ पोहोंचली. या कलजंदजवळ अतिशय संपत्ति, मजबूत घोडदळ आणि मोठें पायदळ सैन्य होतें. त्यानें आपलें पायदळ, घोडदळ व हत्ती लाऊन तो एका अरण्यांत सुलतानाच्या येण्याची वाट पहात राहिला. या अरण्यांत झाडांची इतकी गर्दी होती कीं, सूर्याचे किरण त्यांत प्रवेशत नव्हते. वरून एखादी सुई पडती तर झाडांच्या फांद्यांतून व पानांतून ती खाली आली नसती. सुलतानानें अशा अरण्यांतहि घुसण्याचा आपल्या बिनीस हुकूम केला, व वरच्या किल्ल्याजवळून एक रस्ता काढला. जेव्हां हिरव्या सेनासमुद्रानें ‘ अल्लाहो अकबर ’ अशी आरोळी ठोकली, त्यावेळेस शत्रूचें सैन्य कांहीं वेळ कायम उभे राहिलें व त्यांनीं आपल्या ठिकाणावरून हल्लेहि केले. पण शेवटीं असें कळून आलें कीं, सर्व गोष्टी दैवाधीन आहेत आणि तरवार कितीहि चांगली असली, तिचा जोर कितीहि असला, तिची धार कितीहि तीक्ष्ण असली तरी ती जेव्हां मुसलमानाच्या रक्तापर्यंत पोहोंचते, तेव्हां ती दैवी हुकुमाच्या अंकित असते. शेवटीं निरुपाय झालेले शत्रु प्राण वांचविण्यासाठीं नदींत पडले. परंतु कित्येक तरवारीनें मेले व कित्येक बुडून मेले. याप्रमाणें पांच हजार मृत्युमुखीं पडले तेव्हां कल्जंदानें प्रथम आपल्या बायकोस खंजिरानें मारून आपलें पोट फाडून नरकगमन केलें. त्याच्या संपत्तीपैकीं एकशे पंचाऐशीं हत्ती व पुष्कळ उत्तम लूट मुसलमानांस मिळाली. शहरामध्यें हिंदु लोकांच्या पूजेचें एक स्थान होतें. तेथें सुलतान पोहोंचला तेव्हां आश्चर्यचकित करणाऱ्या

कल्पनेनें बांधलेले एक शहरच त्यास दिसलें. तें पाहतांच हें स्वर्गांतील भवन आहे असें त्यास वाटलें."

हें जें काव्यमय व संक्षिप्त वर्णन महमुदाचा शिरस्तेदार उत्बी गझनींत राहून करतो, त्यावरूल या स्वारीचा प्रकार इतर लेखकांच्या मदतीनें आपल्यास निश्चित करतां येतो. महमुदाजवळ यावेळीं सुमारें एक लाख सैन्य होतें. त्यांत ऑक्सस नदीपलीकडील वीस हजार बिनाशिस्तीचे मौजेसाठीं आलेले तुर्की शिपाई होते. पण महमुदानें कूच करीत असतां कुशल सेनापतीप्रमाणें जरबेची शिस्त ठेविली होती. पहाटेस उठून तो दिवसभर चालत होता. आंपल्या जलद चालीनें शत्रूस बेसावध गांठण्याचा त्याचा विचार होता. हिमालयाच्या पायथ्या पायथ्यानें तो चालला.बहुधा पंजाबांतील मोठ्या नद्या उगमाजवळ ओलांडण्याचा त्याचा हेतु असावा. रस्त्यांत जो जो किल्ला आला, तो तो या प्रचंड सैन्यासमोर तगला नाहीं. पण त्यानें हिंदु लोकांस अंकितपणा मान्य करण्याच्या सबबीवर आपल्या सैन्यांत मिळूं दिलें नाहीं. असें केलें असतें तर त्याच्या सैन्यांत एक विरोधी भावनेचें व वेळेस दगा देणारें अंग उत्पन्न झालें असतें. याचसाठीं काश्मीरच्या फौजेस त्यानें फौजेच्या पुढें चालण्यास हुकूम दिला.- (काश्मीरांतून एखादी फौज खरोखरच आली असेल ह्याविषयीं आम्हांस शंका आहे, याजविषयीं पुढें जास्त लिहूं). रज्जबच्या विसाव्या तारखेस म्हणजे इ. स. १०१८च्या डिसेंबरांत यमुना नदी उतरून गंगा न उतरतां तो दक्षिणेस अन्तर्वेदींत घुसला. कारण कनोज गंगेच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे. व कनोजवर हल्ला करतांना दरम्यान गंगानदी ठेवणें इष्ट नव्हतें. कित्येक मांडलिक रजपूत सरदारांनीं त्यास हरकत केली. पण बरणच्या राजाप्रमाणें पुष्कळांनीं नमस्कारच केला असावा. बरण म्हणजे हल्लीचें बुलंदशहर होय यांत शंका नाहीं. हें नगर जुनें असून महाभारतांतील वारणावत होय असें मानतात. येथें

इ. स. पू. दुसऱ्या शतकांतील शकक्षत्रापांची व कुशनांचीं नाणीं सांपडलीं आहेत, व गुप्त काळांतील एक ताम्रपटहि सांपडला आहे. येथें एक मांडलिक राजा डोर रजपूत वंशांतला हरदत्त नांवाचा यावेळीं असावा. याचें नांव पर्शियनमध्यें हरून असें वाचलें गेलें असावें. या राजकुलाचा एक लेख इ. स. १०९६चा सांपडला आहे. त्यामध्यें या कुलाची वंशावळ दिली असून सातवा राजा हरदत्त हा महमुदास शरण गेला असावा (बुंदलशहर गॅझेटियर). दहा हजार अनुयायांसह हा मुसलमान झाला ही बहुधा उत्बीची अतिशयोक्ति आहे. येथून दक्षिणेकडे महमूद गेला, तेव्हां त्यास कल्जंदानें मोठ्याशा सैन्यानिशीं मथुरेजवळ विरोध केला; व त्यानें अत्यंत धैर्यानें व चिकाटीनें महमुदाच्या प्रचंड सैन्याशीं टक्कर घेतली. हा बहुधा कनोजचा प्रतिहार सम्राट् राज्यपाल याचा सेनापति व मांडलिक असावा.

हिंदूंचें विशेषतः वैष्णवाचें अत्यंत पवित्र मथुरा नगर प्रतिहारांच्या साम्राज्याच्या मध्यभागीं होतें. आणि प्रतिहार सम्राट् पुष्कळदां विष्णुभक्त असत. मथुरा शहर रामाचा बंधु शत्रुघ्न यानें वसविलें असून तें श्रीकृष्णाचें जन्मस्थान होतें. बौद्धांनाहि मथुरा पुण्यस्थान आहे. हिंदु काळांत तर मथुरेचें महत्त्व पूर्वींपेक्षांहि अधिक वाढलें. अर्थात् तेथें बांधलेलीं अप्रतिम देवालयें आणि त्यांत जमलेलीं अमूप संपत्ति विरोध केल्याशिवाय मूर्तिभंजक लुटारूंच्या स्वाधीन करणें शक्यच नव्हतें; आणि राज्यपाळ स्वतः समोर होण्यास जरी नाखुष होता, तरी त्यानें महमुदाशीं लढण्यास मोठें सैन्य पाठविलें असलें पाहिजे. ही लढाई एका अरण्यांत झाली असें वर्णिलें आहे. नकाशांत दिलेल्या महावन गावांजवळ या लढाईचें स्थान ठरवितात. त्यावेळीं या गावांभोंवतीं मोठें अरण्य असावें. याच अरण्यांत नंद रहात असून त्यानें श्रीकृष्णास वाढविलें होतें. यामुळें अलीकडच्या कालापर्यंत हें वन तोडीत नसावेत. ही जागा मथुरेपासून सहा मैलावर आहे. या जंगलांत

शहाजहानानें वाघाची शिकार केल्याचें दाखले आहेत ( मथुरा गॅझेटियर ). येथें एक लहान टेकडी असून त्याजवर किल्लाहि आहे. या गांवचा वंशपरंपरेचा रक्षक कुलचंद्र असावा. तो आपल्या पायदळ, घोडदळ व हत्तींसह मोठ्या निकरानें लढला. उत्बीनें नेहमींप्रमाणें महमुदाच्या विजयाचें कारण देवाची इच्छा असेंच दिलें आहे. महमूद जरी एका प्रचंड अप्रतिकार सेनेसह आला होता, तरी महमुदाला आपलें पवित्र नगर लुटण्यास व विध्वस्त करण्यास, हिंदूंनीं त्यास बचावण्याचा जोराचा प्रयत्न केल्याशिवाय, मोकळें सोडलें नाहीं, ही गोष्ट हिंदूंस भूषणावह आहे. पण दैवाची गति चुकत नाहीं असें पाहून कुलचंद्रानें रजपुतांच्या नेहमींच्या रिवाजाप्रमाणें प्रथम आपल्या बायकोस ठार मारून नंतर आपल्यासहि मारून टाकलें. मथुरा नगरीचें केवळ अतिमानुष वैभव आणि महमुदास मिळालेली अवाढव्य संपत्ति याचें वर्णन उत्बीनें पुढीलप्रमाणें केलें आहे. " एक हजार किल्लेवजा मूर्तींचीं मंदिरें बांधलेलीं असून शहराच्या मध्यभागीं सर्वांहून उंच असें एक मंदिर बांधलें होतें. त्याच्या सौंदर्याचें आणि त्यावरील नक्षीचें वर्णन करणें लेखकांच्या लेखणीस किंवा चितार्‍यांच्या कलमास अशक्य आहे. या प्रवासाचा जो वर्णनात्मक लेख सुलतानानें लिहिला आहे त्यांत तो म्हणतो कीं 'अशा प्रकारची इमारत कोणी बांधण्याचें हल्लीं मनांत आणील तर त्यास एक हजार दीनारांच्या एक लक्ष थैल्या त्यावर खर्च कराव्या लागतील. आणि अतिशय कुशल कारागिरांच्या मदतीनेंहि दोनशें वर्षांत ती पुरी करतां येणार नाहीं.' मूर्तींचे जे ढीग सांपडले त्यांत पांच मूर्ति शुद्ध सोन्याच्या पांच हात उंचीच्या होत्या. आणि एका मूर्तीवर एक रत्न बसविलेलें मिळालें, तें इतकें उत्तम होतें कीं, बाजारांत पन्नास हजार दीनार देऊन सुलतानानें खुशीनें तें विकत घेतलें असतें. दुसऱ्या मूर्तीवर एक नीलवर्णाचा नीलमणि चारशें

मिसकाल वजनाचा मिळाला. एका मूर्तीच्या पायाच्या सोन्यांतून चार लक्ष चारशें मिसकाल वजनाचें सोनें मिळालें. चांदीच्या मूर्ति तर इतक्या होत्या कीं, त्यांचें वजन करतां करतां वजन करणारे लोक थकले. त्या सर्व नगराचा विध्वंस करून आपल्या फौजेचा मोठा हिस्सा तेथें ठेऊन सुलतान कनोजकडे गेला."

कनोजच्या प्रतिहार सम्राटांच्या उतरत्या काळांत महमुदानें केलेल्या मथुरेच्या लुटीची हिंदूंना हृदयद्रावक अशी ही हकीकत आहे. अशक्तांकडून सशक्तांकडे संपत्ति नेहमींच जात आली आहे. रोमन साम्राज्याच्या उतरत्या काळांत अलारिकनें केलेल्या रोमन लुटीची गिबननें रसभरित रीतीनें वर्णन केलेली हकीकत या ठिकाणीं आम्हांस स्मरते. "या बादशाही शहराच्या स्थापनेनंतर एक हजार एकशे साठ वर्षांनीं ज्या शहरानें मनुष्य जातीचा मोठा हिस्सा जिंकून सुधारला, तें शहर जर्मनीच्या आणि सिथियाच्या रानटी जातींच्या हल्ल्याच्या वावटळीच्या भक्ष्यस्थानीं पडलें. गॉथ लोक नुकतेच ख्रिस्ती झाले असल्यामुळें त्यांनीं व्हॅटिकन नामक (ख्रिस्ती) इमारतीचा बचाव केला व तेथें आश्रयास आलेले अनेक ख्रिस्ती झालेले रोमन लोक वांचविले. पण इतर रोमन लोकांची निर्दयपणें कत्तल झाली. सुवर्ण आणि रत्नें लुटली गेलीं. रोममधील अनेक राजवाड्यांतील बहुमोल सामान काढले गेले. शेंकडों मूर्ति त्यांतील किंमती धातूसाठीं आटविल्या गेल्या आणि अनेक सुंदर भांडीं लढाईच्या फरशूनीं फोंडलीं गेलीं. जे दुर्दैवी लोक सन्माननीय स्थानापासून आणि उत्कर्षाच्या वैभवापासून एकदम कैद्यांच्या दुःखदायक स्थितीच्या रसातळास पोहोंचले, त्यांची संख्या सांगणें अशक्य आहे. रोममधून पळालेल्या लोकांनीं रोमचे प्रांत भरून गेले, आणि चकित झालेल्या रोमन साम्राज्यांत रोमच्या ह्या भयंकर दैवापघातानें दुःख आणि भीति पसरून दिली."

# प्रकरण बारावें.

## कनोज पडलें.

दु:ख आणि भीति यांनीं उत्तर हिंदुस्थानचा सम्राट व्याप्त झाला. सम्राट राज्यपाल मथुरा किंवा कनोज येथें न राहतां, रोमचा बादशहा ऑनोरेरिअस याप्रमाणें जो पळत सुटला तो थेट गंगेच्या पलीकडे बारी येथें जाऊन पोहोंचला. हें ठिकाण अजून निश्चित झालें नाहीं. आपल्या बातमीदारांकडून हा सर्व वृत्तान्त महमूद यास कळलाच असावा. तथापि त्यानें कुराणावरून शकुन पाहिला, आणि थोडेसें सैन्य घेऊन राज्यपालाचा गंगेच्या पलीकडे पाठलाग केला. राज्यपालाला लढाई देण्याचा मोह पडेल अशी त्याची समजूत होती. राज्यपाल हा हिंदुस्थानांतील राजांत अग्रगण्य होता व इतर सर्व राजे त्याच्या पुढें मान वांकवीत आणि त्याचें सामर्थ्य आणि महत्पद मान्य करीत असें उत्बीनें जें वर्णन केलें आहें तें योग्य आहें. या राजाचें नांव राज्यपाल असें होतें हें आतां आपल्याला कळून चुकलें आहे. राज्यपाल याचे ऐवजीं फारशींत 'राजा जयपाल' किंवा हयपाल असें वाचलें जाणें अगदीं संभवनीय आहे. आपल्याला उपलब्ध झालेल्या कोरींव लेखांच्या पुराव्याच्या अभावीं हा राजा म्हणजे लाहोरचा मृत राजा जयपालच होय असें कित्येकांनीं ठरविलें यांत आश्चर्य नाहीं. लाहोरच्या जयपालाचें राज्य मध्य हिंदुस्थानांतहि असावें असें ईलियट यांस कदाचित् वाटलें असावें. पुढील काळांतील मुसलमान इतिहासकारांनीं त्याचा अनेक निरनिराळ्या नांवांनीं उल्लेख केला आहे. परंतु ते सर्व कल्पनेचे खेळ आहेत. कांहींनीं त्याला जयपालाचा पुत्र (मुलगा कुंवरपाल) असेंहि म्हटलें आहे. शाबानच्या ८ व्या तारखेस

( जानेवारी १०१९ ईलियट पा. ४५७ ) " महमूद कनोजला पोंचला. तेथें त्याच्या समोर एक पर्वत उभा राहिला. पळत असलेल्या सम्राटाचा पाठलाग करण्यासाठीं त्याचें सैन्य गंगा उतरलें. राज्यपालास बहुधा त्याला गांठता आलें नाहीं. तेव्हां महमुदानें गंगा नदीच्या किनाऱ्यावरील कनोजचे साती किल्ले सर केले"(उत्बी ४५७). "या किल्ल्याच्या आंत जवळ जवळ १०,००० देवळें बांधलेलीं होतीं आणि तीं दोन तीन हजार वर्षांपूर्वीं बांधलेलीं होतीं असें तेथील असत्यवादी मूर्तिपूजकांचें म्हणणें होतें." कनोज हें प्राचीन शहर आहें. पुराणांत वर्णन केलेला विश्वामित्राचा पिता राजा कुशिक तेथें राज्य करीत असे अशी कल्पना आहे. मथुरेप्रमाणेंच कनोजची पवित्रताहि विशेष मानण्यांत येत असे. या काळीं तें शहर भरभराटींत होतें. त्याच्या वैभवाला चारशें वर्षांपूर्वीं हर्षाच्या काळांत सुरुवात झाली होती. हुएनत्सँगनें वर्णिलेल्याप्रमाणें हर्षाच्या काळींच त्या शहराचा विस्तार फार मोठा जाहला होता. त्याचें वर्णन पहिल्या पुस्तकांत ( पान २८ ) उद्धृत केलें आहें. अर्धे अधिक लोकांनीं शहरांतून आधींच पळ काढला होता. सुलतानानें एकाच दिवसांत सर्व किल्ले घेऊन ते लुटून टाकले. कनोज मथुरे इतकें भव्य असावेंसें दिसत नाहीं. महमुदानें केलेलें रसभरीत वर्णन चुकून केव्हां केव्हां कनोजला लाविलें जातें; परंतु उत्बीच्या पुस्तकावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं तें वस्तुतः मथुरेचेंच आहें. येथील देवळें मथुरेच्या देवळांप्रमाणें महमुदानें उध्वस्त केल्याबद्दल स्पष्ट उल्लेख आढळत नाहीं.

" कनोजहून महमूद मांज नांवाच्या तटबंदी केलेल्या ब्राह्मणांच्या किल्ल्याकडे वळला. ब्राह्मणांनीं थोडा काल त्याचा प्रतिकार केला. परंतु आपल्या प्रतिकाराचा कांहीं उपयोग नाहीं असें पाहिल्यावर

त्यांनीं किल्ल्यावरून खालीं उड्या टाकल्या. कित्येक जणांनीं भाल्यांनीं किंवा तरवारीच्या धारेनें आपल्यास मारून घेतलें. " मांज कोणतें स्थळ आहे याचा अजून निर्णय लागलेला नाहीं. तें गंगा-नदीवर दक्षिणेकडे हल्लींच्या इटावा जिल्ह्यांत असलें पाहिजे. "तेथून सुलतान अस्तर किल्ल्यावर आला. तो किल्ला संतापी जंदबाल याच्या ताब्यांत होता. हा किल्ला एका अरण्यांत टेंकडीवर बांधलेला होता; व त्याच्या भोंवतालीं खोल खंदक खोदला होता." अस्तर म्हणून फत्तेपूर जिल्ह्यांत गंगा नदीच्या पश्चिम तीरावर मजबूत किल्ला आहे. या किल्ल्याचा मालक बहुधा कनोजचा मांडलिक असावा व त्याच्याकडून आपल्यास अडथळा होण्याचा संभव असल्यानें, त्याला जिंकून महमुदानें आपले मोर्चे "चंद्रराजाकडे वळविले. त्याच्या ताब्यांत एक फार मजबूत किल्ला होता." हा चंद्रराज म्हणजे चंदेल्ल राजा होय. कालंजरचा अजिंक्य किल्ला त्याच्या ताब्यांत होता. तो स्वतंत्र राजा होता. उत्बीनेंहि त्याचें असें वर्णन केलें आहे कीं 'त्यानें कधीं दुसऱ्याचें मांडलिकत्व कबूल केलें नाहीं. गर्व आणि आत्मश्लाघा यांखेरीज दुसरें कांहीं त्याला माहीत नव्हतें' (पा. ४५०).

संतापी जंदवाल (हा बहुधा प्राचीन गौतम कुलांतील एक संस्थानिक असावा. या कुलाचे लोक अजूनहि फत्तेपूर जिल्ह्यांत वस्ती करून आहेत-फत्तेपूर गॅझेटिअर-अथवा तो यमुनेच्या दक्षिणेस जालौन जिल्ह्यांतील जगमनपूरचे महाराजे म्हणून प्रसिद्ध असलेल्या सेंगार घराण्यांतील एक संस्थानिक असावा) आणि चंद्र-राय यांचे दरम्यान भांडण चाललें होतें असें उत्बीनें म्हटलें आहे. हें भांडण कशाबद्दल होतें तें कळत नाहीं. त्यांचें हें भांडण चालू असतांच महमूद चंद्राजावर चालून आला. चंद्रराजानें "ज्यापुढें शत्रूला उभें राहवणार नाहीं असें आपलें प्रचंड सैन्य आणि आपला किल्ला यांच्या जोरावर सुलतानाला विरोध करण्याचा निश्चय केला.

परंतु "युद्ध करूं नको असा हयबालानें त्याला सल्ला दिला आणि तो आपलें सैन्य व खजिना घेऊन पर्वतांत मागें हटला." हयबालानें हा जो सल्ला दिला तो सुलतानानें चंद्ररायाचा पराभव केल्यावर काल्पींचा किल्ला आपण आपल्या ताब्यांत घ्यावा या दगलबाजीच्या हेतूनें दिला असें उत्बीचें म्हणणें आहे. परंतु किल्ला सर करण्याच्या भानगडींत न पडतां "महमुदानें सारखे तीन दिवस चंद्रराजाचा तो जाईल तेथें पाठलाग केला आणि पुष्कळ माणसांस मारून त्यांचीं हत्यारें व लढाईचा सरंजाम हीं पाडाव केली. त्यांनीं कांहीं हत्ती पकडून नेले व कित्येक हत्ती आपखुषीनें त्यांच्या बरोबर गेले, व त्यांस त्यांनीं खुदादाद म्हणजे देवानें दिलेलें असें नांव दिलें." "चंद्रराय्याच्या खजिन्यांत त्यांना सोनें, चांदी, जवाहीर व इंद्रनीलमणि यांचीं तीन हजार पुडकीं सांपडली. त्यांना गुलाम तर इतके मिळाले कीं त्यांना प्रत्येकीं दहा दिऱ्हमापेक्षां अधिक किंमत आली नाहीं. सुलतान गझनीला परत आला आणि त्याच्या वैभवाची कीर्ति दिगंत पसरली."

कानपूर आणि काल्पीपर्यंत दक्षिणेस आलेली ही महमुदाची स्वारी त्याच्या सर्व स्वाऱ्यांत खरोखर अत्यंत लांबवर गेलेली, अतिशय फायद्याची, आणि अप्रतिम पराक्रमाची अशी होती. पुढील काळांतील मुसलमान इतिहासकारांनीं आणि विशेषतः फिरिस्तानें त्या काळच्या वास्तविक इतिहासाच्या आणि अंतर्वेदीच्या भुगोलविषयक अज्ञानानें कित्येक गोष्टी विसंगत सांगितल्या आहेत व कांहीं गोष्टींत वाटेल ती भर दडपून दिली आहे. आणि फिरिस्तावर अवलंबून राहून महमुदाच्या हालचाली समजावून सांगतांना युरोपीय इतिहासकारांची धांदल उडाली आहे. परंतु ईलियटनें दाखवून दिल्याप्रमाणें हा सर्व घोंटाळा अधिक विश्वसनीय व समकालीन माहितीकडे लक्ष न देतां फिरिस्तावर सर्वस्वी अवलंबून राहण्यानें उत्पन्न झाला आहे (पा. ४०८). अशा तऱ्हेची

माहिती उत्बीच्या यमीनी बखरींमध्यें सांपडते आणि आम्ही वर लिहिलेला इतिहास त्यानें लिहिलेल्या वृत्तान्तावरूनच दिला आहे. खरोखर महमुदाच्या स्वारीचा मार्ग बहुशः असा असावा. अंतरवेदींत आल्यावर तो मीरत आणि बरणच्या मार्गानें दक्षिणेस ( मथुरेजवळील ) महावनापर्यंत आला; व नंतर यमुना उतरून त्यानें मथुरा लुटली. त्यानें पुनः यमुना ओलांडली व तो कनोजला गेला. राज्यपालाला भिवविण्यासाठीं तो गंगेपलीकडे थोडासा गेला आणि पुनः माघारें वळून त्यानें कनोज हस्तगत केलें. अंतर्वेदींतून दक्षिणेस जाऊन त्यानें एका प्रबळ संस्थानिकाचा पराभव केला. आणि काल्पीला यमुना पुनः ओलांडून त्यानें पर्वतांत चंद्ररायाचा पाठलाग केला; परंतु तो कांलजरपर्यंत गेला नाहीं. त्यानें काल्पीजवळ यमुना पुनः ओलांडली व मागें वळून आल्या मार्गानें तो अन्तर्वेदींतून परत गेला. निझाम—उद्दीन आहमदच्या इतिहासांत त्याच्या स्वारीचा मार्ग अशाच तऱ्हेनें वर्णिला आहे व ईलियटनें त्याचा एक उतारा दिला आहे ( भा. २ पा. ४६०–६१ ), त्या उताऱ्यांत निजामुद्दिनानें उत्बीच्या वर्णनांत फारच थोडा फरक केला आहे.

खरी अडचण आहे ती हिंदूराजांचीं नांवें आणि त्यांनीं दिलेल्या लढाया हीं निश्चित करण्यांत आहे. कोरींव लेखांच्या पुराव्यावरून पूर्वींच आम्ही असें दाखवून दिलें आहे कीं कनोजचा राजा यावेळीं प्रतिहार सम्राट् राज्यपाळ हा होता आणि चंद्रराय हा चंदेल्ल राजा गंड होता. हा कोरींव लेखांचा पुरावा ईलियटला उपलब्ध नव्हता तो आतां आपल्यास उपलब्ध झाला आहे. हे दोघेहि राजे महमुदाच्या बरोबर झालेल्या लढाईंत आनंदपालाला सहाय्य करण्याकरितां गेले होते. त्यांची खोड मोडल्याखेरीज महमूद खास परत जाताना. हयबालानें ( राज्यपालानें ) चंद्ररायाला दिलेला सल्ला मित्रत्वानें दिला होता असें आम्हांस वाटतें. ते दोघेहि महमुदाच्या तावडींत न सांप-

डतां निसटून गेले. यामुळें महमूद चिडून गेला असावा आणि म्हणून उत्बी, निझामुद्दीन अहमद व फिरिस्ता यानीं वर्णन केल्याप्रमाणें पुढील वर्षीं त्यानें पुन: त्यांजवर स्वारी केली.

उत्बीनें या स्वारीचा सन दिला नाहीं. निझामुद्दिनानें तो हि. ४०० असा दिला आहे तर फिरिस्ताच्या म्हणण्याप्रमाणें तो ४१२ आहे व ईलियटला तोच अधिक संभवनीय वाटतो. निझामुद्दीन म्हणतो कीं कनोजच्या राजानें सुलतानाची सत्ता मान्य करून तो त्याचा अंकित झाला म्हणून राजा नंदानें त्याला मारून टाकलें असें ऐकिल्यावरून महमुदानें त्याच्या प्रान्तावर पुन्हां स्वारी करण्याचें ठरविलें. परंतु ही हकीकत पुढें घडली असावी आणि हें कारण देतांना निझामुद्दिनाची चूक झाली आहे. कारण तसें असतें तर पुढें उत्बी व निझामुद्दीन या दोघांच्या वर्णनांत आल्याप्रमाणें कनोजवर स्वारी करून तेथील राजा हयब्राल याचा राहिबच्या लढाईंत पराभव करण्याचें कारणच उरत नाहीं. शिवाय उत्बीनें कोठेंहि म्हटलें नाहीं कीं जयपालानें (राज्यपालानें) सुलतानाचें स्मामित्व कबूल केलें. तो बारीला पळून गेला होता. त्याची व महमुदाची लढाईच झाली नाहीं. महमुदानें दुसरी स्वारी केली ती त्याचा पूर्ण पाडाव करण्यासाठीं.

असो, या दुसऱ्या स्वारीच्या वेळीं शिवाजी किंवा एखाद्या कसलेल्या सेनापतीप्रमाणें आपण राज्यपालावर स्वारी करीत आहोंत हें महमूदानें आपल्या सैन्यासहि कळूं दिलें नाहीं असें दिसतें. उत्बी म्हणतो कीं पर्वतांतील निबिड व बळकट जागीं व्यापारी तांड्यांना त्रास देणाऱ्या अफगाण दरोडेखोरांना शिक्षा करण्यासाठीं आपण जात आहोंत असा महमुदानें बहाणा केला. हें कार्य उरकल्यावर त्यानें एकाएकीं हिंदुस्थानाकडे आपला मोर्चा वळविला, जंगलें ओलांडलीं आणि नद्यांचे उतार उतरून भोंवतालचा प्रदेश उद्ध्वस्त करीत जिच्या भोंवऱ्यांत घोडेस्वारहि वाहून जातात अशा राहिब नदीवर

(ही नदी कोणती तें अजून ठरलें नाहीं ) येऊन तो उतरला. नदी-पलीकडे एका सुरक्षित ठिकाणीं राज्यपालानें आपला तळ दिला होता व तो कोणालाहि नदी उतरूं देत नव्हता. महमुदानें चामड्याचे मोठाले फुगे करावयास सांगितले. रात्रीच्या अंधारांत आठ पुरुष नदींत उतरले. राज्यपालानें त्यांना अडथळा करण्यासाठीं पांच हत्ती व एक पथक पाठविलें; परंतु महमुदाच्या शिपायांनीं त्यांस दाद दिली नाहीं. त्यांनीं हत्तींना बाण मारून जेर केलें आणि त्यांच्या बरोबरच्या लोकांना जमिनीवर लोळविलें. "सर्व आयुष्यभर विश्रांति उपभोगण्यासाठीं आपण एक दिवसाचे श्रम सहन केले पाहिजेत" असें सांगून सुलतानानें प्रत्येकाला उत्तेजन दिलें. घोड्यांची आयाळ धरून लोक नदी पोहून गेले. येथें कनोजवर हल्ला करितांना तिसऱ्या गोविंदानें केलेल्या अशाच एका अचाट पराक्रमाची आठवण होते. त्याचें वर्णन आमच्या दुसऱ्या भागांत ( पा. १६७ ) आलें आहे. महमुदाच्या लोकांनीं राज्यपालाच्या पुष्कळ लोकांस ठार मारले व सत्तर हत्ती पाडाव करून जबरदस्तीनें धरून सुलतानाच्या गोटांत नेले. काफीर लोक आपला खजिना टाकून पळाले व सुलतानाला ती लूट मिळाली. सुलतानानें कुराणावरून शकुन घेतला होता, तो शकुन खरा ठरला. सुलतान आतां न्यायासना (राज्या )च्या उच्चपदावर निश्चल झाला आणि वाढत्या वैभवाची आणि साम्राज्याची त्याला खात्री येऊन चुकली." या स्वारीचा उत्बीनें दिलेला वृत्तान्त येथें संपला. परंतु येथें हि राज्यपालानें महमुदाचें स्वामित्व कबूल केलें किंवा महमूद गझनीला परत गेला असा उल्लेख त्यानें केला नाहीं. तथापि असें वाटतें कीं राज्यपालकडून आपलें स्वामित्व कबूल करून घेतल्याखेरीज महमूद परतला नाहीं. ( 'राज्याच्या उच्चपदावर निश्चल झाला' या वाक्यांत तो अर्थ गर्भित आहे ). राज्यपालानें सुलतानाला दरसाल खंडणी देण्याचें कबूल केलें असलें पाहिजे.

याबद्दलचा उल्लेख पुढें येईल. चंद्राच्या आधिपत्याखालीं गाहडवालांनीं प्रतिहारांना उखडून काढिलें तोंपर्यंत प्रतिहार घराण्याचे राजे राज्य करीत राहिले तरी या नमण्यानें व करभार देण्यानें कनोजच्या वैभवशाली साम्राज्याचा अंत झाला.

इतर इतिहासकारांनीं पुरुजयपालाचा या स्वारींत संबंध आणला आहे. निझामुद्दिनानें त्याचा उल्लेख केला असून महमूद यमुना उतरून जात असतां पुरुजयपालानें त्याला विरोध केला असें म्हटलें आहें. फिरिस्तानें तो पंजाबचा राजा जयपाल याचा नातु होता असें लिहिलें आहे. येथें यमुनेचा उल्लेख राहिबच्या ऐवजीं चुकून करण्यांत आला असावा. राहिब ही घग्गर किंवा अवध प्रांतांतील दुसरी एखादी मोठी नदी असावी. बारीहि त्याच प्रान्तांत आहे. औध कनोजच्या राज्यांत होतें हें सांगावयास नको. आणि ईलियटनें तर्क केल्याप्रमाणें तौशीच्या लढाईंत काश्मीरच्या सरहद्दीवर पराभव झाल्यानंतर त्रिलोचनपाल हा कनोजचा राजा राज्यपाल याच्या आश्रयास आला असणें शक्य आहे. अल्बेरूनीनें त्रिलोचनपाल इ. स. १०२१ ( हि. ४१२ ) मध्यें मरण पावला असें म्हटलें आहें. राहिब नदीवरील लढाई त्या सालीं झाली असावी आणि त्रिलोचनपाल हा त्या लढाईंत शौर्यानें लढून व शिकस्त करून धारातीर्थी पतन पावला असावा.

# प्रकरण तेरावें

## कालंजर वरील स्वारी.

महमुदाचा समकालीन ग्रंथकार व त्याचा चिटणीस उत्बी यानें लिहून ठेवलेल्या वृत्तांताचा मार्गदर्शनाच्या कामीं होणारा उपयोग येथपासून पुढें आपल्यास होत नाहीं. आणि महमुदानंतर दोन किंवा तीन शतकांनी ज्यांनीं आपल्या हकीकती लिहिल्या त्या इतिहासकारांवर किंवा बखरकारांवर अवलंबून राहणें भाग येतें. ! उत्बीनें आपला वृत्तांत येथेंच कां थांबवावा हें सांगणें कठीण आहे. तो हि. ४२० पर्यंत किंबहुना त्याहिनंतर हयात होता यांत अणुमात्र शंका नाहीं. कारण त्या वर्षी काजी अबदुल्ला सय्यद मक्केच्या यात्रेला गेला असा त्यानें उल्लेख केला आहे. त्याचप्रमाणें तो परत आल्यावर त्याच्या व अबु बकरच्या दरम्यान जो वाद माजला त्याचाहि निर्देश त्याच्या पुस्तकांत आला आहे. या निर्देशाखालीं दिलेल्या पादटिपेंत त्याच्या भाषांतरकारानें असें म्हटलें आहे कीं, हें साल जर बरोबर असेल तर उत्बीच्या हयातीची जी समजूत आहे ती पेक्षां तो अधिक कालपर्यंत जगला असला पाहिजे ( पा. ४७४ ), आणखी, 'महमुद दीर्घकाल जगला' असें उत्बीनें एकेजागीं म्हटलें आहे; आणि भाषांतरकारानें पादटीपेंत असा शेरा मारला आहे कीं महमुदाच्या हयातीतील ज्या काळांत उत्बी मेला असावा असा समज आहे त्यापेक्षां अधिक दीर्घ काळपर्यंत तो जिवंत असला पाहिजे ( पा. ४८३ ). तेव्हां उत्बीनें आपला वृत्तांत हि. ४२० म्हणजे १०२९ इ. स. पर्यंत कां लिहूं नये हें गूढ आहे. कदाचित् महमुदाच्या भाग्याच्या पराकाष्टेच्या उत्कर्षाबरोबर ( इ. स. १०२० , उत्बीनें आपला वृत्तान्त थांबविला असावा. त्या वेळीं महमुदाचें साम्राज्य इतकें

विस्तारलें होतें कीं वायव्येस ख्वारिझम आणि जॉर्जियाचा समावेश करून कास्पियन समुद्रापर्यंत आणि अग्नेयीस पंजाब आणि ठाणेश्वर यांचा अन्तर्भाव करून सरस्वती नदीपर्यंत तें पसरलें होतें. शिवाय उत्तरहिंदुस्थानाच्या सम्राटाचा राहिब नदी वरील लढाईंत पराभव करून व त्याला हतगर्व करून त्याच्यावर महमुदानें वार्षिक खंडणी बसविली होती. आणि इकडे आक्झसनदीच्या पलीकडे तुर्की राजाचा बहुधा पराभव करून त्याच्याशीं त्यानें दोस्तीचा तह केला होता. शेवटची गोष्ट ही कीं, मथुरा व कनोजच्या स्वाऱ्यांत अगणित संपत्ति त्यानें मिळविली होती. मानवीस्वभावानुरूप ती संपत्ति गझनीस एक भव्य मशीद बांधून तिच्यावर खर्च करण्यास त्यास इच्छा झाली. मथुरेचीं अतिशोभायमान देवालयें पाहून त्याला ही प्रेरणा झाली असावी. हीं देउळें "उत्तम कारागिरासही दोनशें वर्षांत बांधतां आलीं नसावीं" असें त्यानें आपल्या खलित्यांत लिहिलें होतें. तेव्हां त्यानें गझनीला दैदीप्यमान्य मशीद बांधण्याचा संकल्प केला व त्याप्रमाणें ती बांधलीहि यांत आश्चर्य नाहीं. तेथें जी पूर्वींची मशीद होती तींत बेताच्या लोकांचा समावेश होई. गझनीचें राज्य लहानसें असतांना ती बांधलेली होती. उत्बीनें गझनीच्या या विशाल मशिदीचें वर्णन असें केलें आहे "हिंदुस्थान आणि खोरासान येथील गुलाम तिच्यावर रात्रंदिवस खपत होते आणि सढळ हातानें पगार दिलेले अधिकारी सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत त्यांच्यावर देखरेख करीत होते. हिंदुस्थान आणि सिंध यांमधून लांकूडकामासाठीं वृक्ष आणले होते. दूरदूरच्या प्रदेशांतून संगमरवरी दगडांच्या चौकोनी व अष्टकोनी प्रचंड शीला आणल्या होत्या. कारागिरांनीं सज्जांवरील घुमट इतके तंतोतंत वर्तुलाकार केले होते कीं 'त्यांच्याशीं तुलना केली असतां आकाशाच्या कमानीचा वर्तुळाकारहि काल्पनिक ठरावा.' तिच्यावर काढलेल्या रंगीत चित्रांत

आणि ठिकठिकाणीं दिलेल्या सोन्याच्या पाण्यांत शुद्ध सोनें हात सैल सोडून वापरलें होतें. सोन्याच्या मनुष्याकृति आणलेल्या मूर्ती बडवून दरवाज्यांत आणि भिंतींत पत्रे ठोकले होते. आपल्या स्वतःच्या बसण्याकरितां सुलतानानें तींत एक स्वतंत्र जागा बांधविली होती. इमारतीची रचना चौकोनी असून चारी बाजूस पुढें आलेलीं दालानें एकमेकांत गुंतलेल्या कामानींनीं जोडलीं होतीं. तिची फरसबंदी पांढऱ्या शुभ्र संगमरवरी दगडांची केलेली होती. प्रार्थनेच्या मोठ्या दिवाणखान्यांतील भिंतीवर सोनेरी पाण्याचीं चित्रें काढलीं होतीं आणि त्यांत जागोजाग वैदूर्यमाणि बसविले होते. ही इमारत पाहणारा प्रत्येक मनुष्य आश्चर्यानें तोंडांत बोट घाली आणि म्हणे 'ज्यानीं ज्यानीं दमास्कसची मशीद पाहून आश्चर्यानें थक्क होऊन अशा तऱ्हेची दुसरी इमारत बांधणें शक्यच नाहीं असें म्हटलें त्यांनीं गझनीची मशीद येऊन पहावी.' समोरच उत्सवांसाठीं आणि प्रार्थनांसाठीं विस्तीर्ण असा सभामंडप होता. त्यांत एकाच वेळीं सहा हजार ईश्वरसेवकांस आपलें काम करितां येत असें. मशिदी लगतच त्यानें एक पाठशाळा बांधून तींत मौल्यवान् आणि दुर्मिळ अशा अध्यात्मग्रंथांचा संग्रह करून दिला होता. विद्यार्जनाच्या या पुण्यस्थळीं इमाम,अध्यापक आणि विद्यार्थी हे गोळा होत असत. पाठशाळेला देणग्यांतून त्यांना जेवण व इतर आवश्यक पदार्थ मिळत. त्याना महिन्याच्या किंवा वर्षाच्या कांठीं कांहीं वेतनहि मिळत असे. सुलतानाच्या कारकीर्दींत गझनीचा विस्तार इतर सर्व शहरांपेक्षां वाढला व ती भव्य आणि मजबूत इमारतींनीं गजबजून गेली. इतर भव्य इमारतींत हजार हत्ती व त्यांचे महात व इतर नोकर राहतील अशी हजार खोल्यांची एक गजशाला होती. परमेश्वराच्या अशीर्वादानेंच देशाची ही सर्व भरभराट वृद्धिंगत झाली आहे." (उ. पा. ४६८–६९). सुलतानाच्या न्यायी कारकीर्दींचें व त्याच्या कनिष्ठभावाच्या खोरासानमधील राज्य-

कारभाराचें वर्णन शेवटीं देऊन उत्बीनें आपली बखर संपविली आहे. महमुदानें आपल्या धाकट्या भावास खोरासानचा अधिपति नेमलें होतें; परंतु दुर्दैवानें तरुणपणींच तो मृत्यु पावला. महमूद अशा तऱ्हेनें वैभवाच्या शिखरावर पोंचला असतां तेथेंच उत्बीनें आपला वृत्तांत संपविला असावा. ग्रंथाचा शेवट अकस्मात रीतीनें येथेंच झालेला दिसत नाहीं. परंतु त्यामुळें आजच्या काळांत या कर्तृत्ववान् राजानें या पुढें केलेल्या पराक्रमांचा वृत्तांत उत्बीनें लिहिलेला वाचावयास न मिळाल्यामुळें आपला फार तोटा झाला आहे. ईलियटनें राहिब नदीवरील लढाई ही तेरावी स्वारी असें म्हटलें असून निझामुद्दीन आणि फिरिस्ता यांच्या आधारावर तिच्या नंतर आणखी चार स्वाऱ्यांचा उल्लेख केला आहे. निझामुद्दीन किंवा फिरिस्ता यांनीं कोणत्या आधारावर या स्वाऱ्यांची आपली हकीकत लिहिली तें ते सांगत नाहींत. तथापि फार मोठा काळ लोटल्यामुळें आणि या स्वाऱ्यांच्या स्थळांविषयीं गैरमाहिती असल्यामुळें त्यांनीं फार चुकीचीं विधानें केलीं असलीं तरी त्यांस खात्रीलायक माहितीचा आधार असण्याचा संभव आहे. स्वाऱ्यांच्या नोंदीचें रजिस्टर अथवा महमुदानें स्वतः लिहून ठेविलेल्या आठवणी अशा तऱ्हेच्या सरकारी लेखांचा उत्बीनें उल्लेक केला आहे. तसेंच त्या काळच्या बैहकी साख्यांच्या हल्लीं अनुपलब्ध लेखांतूनहि त्यांना माहिती मिळाली असण्याचा संभव आहे. तेव्हां या पुढील काळच्या इतिहासकारांनीं केवळ स्वकपोलकल्पित गोष्टी लिहिल्या असाव्या हें संभवनीय वाटत नाहीं. त्यांचें वृत्तान्त आपण सावधगिरीनें मात्र वाचले पाहिजेत आणि ते हिंदुस्थानांतील कोरीव लेखांतील पुराव्यांशीं ताडून पाहिले पाहिजेत. उदाहरणार्थ, नंद नांवाच्या एका राजानें सुलतानाला शरण जाण्याबद्दल कनोजच्या राजाचा वध केला ( ई. भा. २ पा. ६३ ) हें तत्कालीन एखाद्या मुसलमान लेखकाच्या आधारावर निझामुद्दिनानें केलेलें विधान चंदेल्ल

आणि कच्छपघात शिलालेखांवरून खरें असल्याचें दिसून येतें. त्या शिलालेखांनीं या विधानाला दुजोरा आला आहे. गंडाचा मुलगा विद्याधर यानें कान्यकुब्जाच्या राजाचा नाश केला ( ए. इ. १ पा. २२२ ) व या कृत्यांत त्याला भोज व कलचुरी राजा यांनीं मदत केली असें एका चन्देल्ल कोरीव लेखांत म्हटलें आहे. पुढें चंदेल्लाच्या इतिहासांत या शिलालेखाबद्दल अधिक उल्लेख येणारच आहे. या संयुक्त स्वारीचें नेतृत्व ग्वाल्हेरच्या एका कच्छपघात राजाकडे होतें. शिलालेखांत पुढें असेंहि म्हटलें आहे कीं दुबकुंडाच्या ( ग्वाल्हेर प्रदेशांत ) " अर्जुन नांवाच्या दुसऱ्या एका कच्छपघात सामंतानें त्या तुमुल युद्धांत विद्याधर राजाच्या सेवेंत राज्यपालाचा आपल्या बाणांनीं कण्ठच्छेद केला. " मथुरेच्या मूर्तींचा विध्वंस करणाऱ्या एका परकीय राजाला राज्यपालानें शरण जावें ही गोष्ट त्यावेळच्या रजपूत राजांना आवडली नाहीं आणि चंदेल्ल, कलचूरी, परमार व कच्छपघात राजांच्या संयुक्त सैन्यानें कनोज येथें राज्यपालावर हल्ला केला व त्याचा वध केला. यावरून त्या काळच्या रजपुतांच्या धर्माभिमानी वृत्तीची चांगली कल्पना येते. बहुधा त्यांनीं या पलीकडे अधिक कांहीं केलें नसावें आणि राज्यपालाचा मुलगा त्रिलोचनपाल सरळ वारशाच्या हक्कानें कनोजच्या राज्यावर बसला असावा.

अशा रीतीनें राज्यपालाच्या वधाची हकीकत खरी असली तरी ही हकीकत महमुदानें 'राजा जयपाला' ( राज्यपाला ) वर केलेल्या स्वारीच्या व मागें वर्णिलेल्या राहिबच्या लढाईच्या पूर्वीं देण्यांत आणि आठ लोकांनीं खोल राहिब ओलांडली असें म्हणण्याऐवजीं त्यांनीं यमुना ओलांडली आणि तेथेंही पुनः 'पुरुजयपालानें' महमुदाला विरोध केला असें म्हणण्यांत निझामुद्दिनानें चूक केली आहे. पुढें निझामुद्दिनानें असेंही म्हटलें आहे कीं हे लोक बारीवर चाल करून

गेले. परंतु दुसऱ्या कोणत्याही लेखकानें या गोष्टींचा उल्लेख केला नाहीं ( ई. २ पा. ४६४ ). राज्यपाल बारीला जाऊन राहिला होता असें अल्बेरुनीवरून दिसतें, तेव्हां बारीवरील स्वारी आणि बारीचा पाडाव हीं बरोबर असावींत. असो, वरील गोष्टी राहिबच्या लढाईनंतर झाल्या असल्या पाहिजेत आणि राज्यपालानें त्यावेळीं शरण जाऊन खंडणी द्यावयाचें कबूल केलें असावें. यानंतरच चंदेल्ल राजाच्या नेतृत्वाखालीं हिंदू राजांच्या संघानें राज्यापालावर स्वारी केली असली पाहिजे व त्यास ठार केलें असावें. आणि ही बातमी ऐकून महमुदानें चंदेल्लांचें व ग्वाल्हेरच्या राजांचें पारिपत्य करण्याचें योजिलें असावें. शेवटीं निझामुद्दिनाच्या म्हणण्याप्रमाणें चन्देल्ल राजावर महमुदानें दोनदां स्वारी केली. एकदां बारी जिंकल्यावर आणि दुसऱ्यांदा ग्वाल्हेर आणि कालंजरवर स्वारी केली तेव्हां. निझामुद्दिनाच्या आधारावर ईलियटनें ही दुसरी स्वारी म्हणून दिली आहे. राहिबच्या लढाईनंतर महमुदानें चंद्ररायावर स्वारी केल्याचा उल्लेख उत्बीच्या ग्रंथांत नाहीं, कारण त्यावेळीं राज्यपाल मारला गेला नव्हता. चंद्ररायावर दोन स्वाऱ्या न होतां एकच झाली असण्याचा संभव आहे.

महमुदानें १०२२ इ. स.मध्यें किरात, नूर, लोहकोट आणि लाहोर ( ईलियटनें ही पंधरावी स्वारी म्हटली आहे ) यांवर स्वारी केली. पहिलीं दोन ठिकाणें अनुक्रमें स्वात आणि बजौर होत. तेथें "हिंदुधर्म अजून थोडा बहूत शिल्लक उरला होता व तेथील लोक सिंहाचे उपासक होते." ईलियटच्या मतें हा सिंह म्हणजे शाक्य सिंह अथवा बुद्ध असावा. हा प्रांत हुएनसँगच्या काळांत कट्टा बौद्धधर्मी असला तरी या प्रदेशांत दहाव्या आणि अकराव्या शतकांत बैद्धधर्म पार विलयास गेला होता असें आमचें मत आहे. या सिंहाचा संबंध विष्णूच्या नर-सिंह अवताराशीं आहे. आम्ही आपल्या

पहिल्या भागांत नरसिंहाची भक्ति पंजाबांत प्रचारांत होती असें दाखविलें आहे. मुलतान हें प्रऱ्हादपूर म्हणजे नरसिंहभक्त प्रऱ्हाद याचें शहर म्हणून प्रसिद्ध होतें. महमुदानें हा प्रांत जिंकला आणि तेथील लोकांस मुसलमानी धर्माची दीक्षा दिली. नंतर तो लोहकोटला म्हणजे काश्मीरच्या आजिंक्य किल्ल्यावर चाल करून गेला. परंतु त्या दुर्गम देशांत जावयास मार्ग न मिळाल्यामुळें तो सोडून हिंदुस्थानांतील प्रांताची राजधानी जी लाहोर*तेथपर्यंत जाऊन तो परत फिरला. येथें त्याला कनोजची बातमी कळली असावी आणि त्यानें ग्वाल्हेर व कालंजरवर पुढील पावसाळ्यांत स्वारी करण्याचा निश्चय केला असावा.

ही पुढील स्वारी त्यानें हि. ४०४ (इ. स. १०२३) मध्यें केली. ग्वाल्हेरच्या राजाचें अगोदर पारिपत्य करावयाचें असल्यामुळें त्यानें यमुना ओलांडली असण्याचा संभव नाहीं. ग्वाल्हेरचा राजा लढाई न करतांच त्याला शरण आला. आणि तो कालंजरच्या राजाचा केवळ सामंत असल्यामुळें महंमूद तेथें फारसा न थांबतां गंडावर चाल करून गेला. मुसलमान लेखकांनीं त्याला चुकीनें नंद म्हटलें आहे. कांहीं युरोपीय ग्रंथकारांना ही स्वारी घडली असावी कीं नाहीं याबद्दल शंका आहे व या स्वारींत ग्वाल्हेरचा समावेश कां करण्यांत यावा याचा ईलियटला उलगडा करितां आला नाहीं ( ई. भा. २ पा. ४६७ ). ग्वाल्हेर व कालंजर येथलि राजांनीं मिळून राज्यपालावर स्वारी केली होती हें आपणांस कोरीव लेखांवरून कळून चुकल्यामुळें आपल्याला ग्वालेरवरील स्वारीची सत्यता व आवश्यकता कबूल करावयास हरकत तर उरत नाहींच, पण ग्वाल्हेरवर सुरुवातीस

* लाहोर गॅझेटिअरमध्यें असें म्हटलें आहे कीं महमूद कधींच लाहोरला गेला नाहीं. वरील विधानानें त्याचें खंडन होतें. गॅझेटिअरमधील हें विधान विश्वसनीय दिसत नाहीं.

स्वारीकरून तेथील राजाचा पराभव महमुदानें कां केला हेंहि आपल्या ध्यानांत येतें. या स्वारीचें सविस्तर वर्णन करून निझामुद्दीन म्हणतो कीं महमुदानें कालंजरवर दुसऱ्यानदां स्वारी केली; परंतु ही केवळ पुनरुक्ति आहे. वस्तुतः कलंजरविरुद्ध ही पहिलीच स्वारी. (इ. स. १०१८त कनोज आणि मथुरा घेतल्यावर काल्पीवर केलेली स्वारी ध्यानांत घेतल्यास ही दुसरी स्वारी होईल). यावेळीं गंड कालंजरपर्यंत मागें हटला. महमुदानें कालंजरला वेढा दिला. निझामुद्दीन म्हणतो "मजबुतीच्या दृष्टीनें हा किल्ला सर्व हिंदुस्थानांत अद्वितीय होता. नंदानें तीनशें हत्ती नजर केले आणि तहाचें बोलणें लाविलें." सुलतानाची स्तुति करणाऱ्या कांहीं कविताहि त्यानें पाठविल्या, त्या त्या देशांतील विद्वान् लोकांस आणि दरबारी कवींस दाखविण्यांत आल्या. त्यांनीं त्या कवितांची फार स्तुति केली. सुलतान खुष झाला, आणि कांहीं नजराणा पाठवून त्यानें नंदाला पंधरा किल्ले दिले. कालंजर किंवा ग्वाल्हेर सारखे किल्ले जिंकण्यांत आपली शक्ति वाया घालवावयाची नाहीं असेंच बहुधा महमुदानें शहाणपणानें ठरविलें. आणि तेथील राजांनीं त्याचें वर्चस्व मान्य केलें आणि कनोजच्या राजाला महमुदास खंडणी देण्यांत ते आडवे येणार नाहींत असे बहुधा कबूल करून घेतलें असल्यानें त्याचें समाधान झालें. राज्यपालामागून त्याच्या गादीवर आलेल्या त्रिलोचनपालानें बापानें कबूल केलेली खंडणी वर्षाचे वर्षास द्यावयाचें कबूल केलें असलें पाहिजे हें सांगावयास नको.

## टिप्पणी.

निझामुद्दिनानें दिलेला वृत्तान्त सर्वस्वी मान्य केल्यामुळें सरव्हिन्सेंट स्मिथनें इंडियन ॲंटिक्वेरी भाग ३७ (पा. १४२) मध्यें लिहिलेल्या चंदेल्लां वरील निबंधांत या प्रसंगाची निराळी आणि बहुशः चुकीची अशी हकीकत दिली आहे अशी आमची समजूत आहे. स्मिथनें असें

लिहिलें आहे कीं, " बाराव्या स्वारींत जानेवारी १०१९ मध्यें राज्यपाल शरण आला आणि त्यानें दहा लाख दिऱ्हेम आणि ३० हत्तींची खंडणी देण्याचें कबूल केलें. राज्यपालानें महमुदाचें हें वर्चस्व कबूल केलें म्हणून गंडाच्या पुत्रानें त्याचा १०१९ मध्यें वध केला. महमुदानें पुनः स्वारी केली आणि त्यावेळीं फारशी अक्षरांच्या अपूर्णतेमुळें ज्याचें नांव नीट लागत नाहीं परंतु जो हजार हिश्शांनीं राज्यपालाचा मुलगा त्रिलोचनपाल असावा अशा गंडाच्या मित्रानें यमुनेवर त्याला विरोध केला. परंतु त्यांत त्याला अपयश आलें. महमुदानें नदी ओलांडली. बारी शहर घेऊन तें लुटले आणि नंतर तो दक्षिणेस गडाचें पारिपत्य करण्यास त्याच्या स्वतःच्या राज्यांत धुसला. नेहमींच्या हिंदु पद्धतीप्रमाणें गंडानें ३६००० घोडेस्वार, १,१५,००० पायदळ आणि ६४० हत्तींचें मोठें थोंरले सैन्य उभारलें. हें प्रचण्ड सैन्य पाहून सुलतान अस्वस्थ झाला आणि त्यानें एका उंच टेंकडीवर जाऊन त्याच्या सैन्याची पाहाणी केली. पण रात्रीं गंड पळुन गेला. शत्रूनें कदाचित् कपट केलें असेल अशा समजुतीनें सुलतानानें सावधगिरीनें हल्ला केला; आणि अगणित लूट मिळविली. शत्रूंचा भ्याडपणा आणि अवाढव्य लूट यामुळें या प्रदेशावर ग्वाल्हेरमार्गानें पुनः स्वारी करण्याची महमुदाला इच्छा झाली. आणि त्यानें १०२३ इ. स. मध्यें कालंजरला वेढा दिला. गंडानें त्याला ३०० हत्ती आणि अमर्याद नजराणा दिला आणि त्याच्यापासून कालंजर आणि पंधरा किल्ले घेण्याचें कबूल केलें. हा महमुदानें मिळविलेला जय अगदीं सहजासहजीं मिळाला असतांही १८० वर्षें मुसलमानांनीं चन्देल्लांच्या राज्यावर स्वारी केली नाहीं आणि गंडाच्या वंशजांना आपलें राज्य स्वतंत्रपणें चालवूं दिलें. " वर सांगितल्याप्रमाणें स्मिथनें निझामुद्दिनावर निःशंकपणें विश्वास टाकल्यामुळें ह्या हकीगतींत अगदीं उघडाउघड दिसणाऱ्या विसंगत विधानांची गर्दी झाली आहे. निझामुद्दिनानें कालंजरच्या स्वाऱ्या एकी ऐवजी दोन दिल्या आहेत आणि त्या दोन्हीहि चन्देल्लानी राज्यपालाचा पराभव करून त्याचा वध केला त्यानंतर दिल्या आहेत. यामुळें दुसरी स्वारी अगदीं अनवश्यक ठरते. कारण ती केवळ लुटीसाठीं आणि कोणतेही कारण नसतां ग्वाल्हेरच्या मार्गानें केली आहे. त्याचप्रमाणें

आपल्याजवळ मुसलमानापेक्षां फार मोठें सैन्य असतां गंडानें रात्रीं पळ काढला हें म्हणणें उघडाउघड वेडसरपणाचें आहे. उत्बीनें असली वर्णनें दिली नाहींत. परंतु हिंदु राजाकडे प्रचंड सेना असूनहि तो लढाई न करितांच पळुन जातो अशा तऱ्हेच्या सामन्यांची कल्पना करण्याचा मोह पुढील काळच्या मुसलमान लेखकांस झाला यांत नवल नाहीं. गंड हा स्वतंत्र, अभिमानी आणि शूर राजा होता असें उत्बीनें देखील त्याचें वर्णन केलें आहे. निजामुद्दिनानें वर्णन केलेला प्रसंग केवळ काल्पनिक आहे. कारण त्याच्याच म्हणण्याप्रमाणें राज्यपालाच्या वधासाठीं कालंजर राजाला शासन करावें म्हणून ही स्वारी करण्यांत आली असेल तर यमुना उतरण्याची आणि कनोजवर चाल करून जाण्याची जरुरीच नव्हती. ज्याला त्याचा बाप शरण गेला होता त्या महमुदाला त्रिलोचनपाल विरोध करील हेंहि संभवनीय वाटत नाहीं. शेवटीं आठ बारा माणसांनी न जुमानतां जी तुफान नदी ओलांडली त्या राहीबच्या लढाईनंतर महमुदानें नंदाविरुद्ध स्वारी केली असें उत्बी म्हणत नाहीं. याचें योग्य स्पष्टीकरण असें आहे कीं, नंदावरील स्वारीचा उल्लेख याठिकाणीं करण्यांत आणि त्याचप्रमाणें नंदानें कनोज राजावर स्वारी करून त्याचा वध केला तो प्रसंग, राहीबच्या लढाईपूर्वीं वर्णन करण्यांत निझामुद्दिनानें चूक केली आहे.

आमच्या मताप्रमाणें या प्रसंगाची संगति अशी आहे. कनोजविरुद्ध केलेल्या बाराव्या स्वारींत (१०१९) राज्यपाल शरण गेला नाहीं; तो बारीला पळून गेला. तेराव्या स्वारींत महमुदानें आपलें सैन्य राज्यपालावर बारीस नेलें आणि बारीच्या लढाईत त्याचा पराभव करून त्याच्याकडून खंडणी घेण्याच्या अटीवर त्याला त्यानें सोडून दिलें (१०२१) ग्वाल्हेरच्या साहाय्यानें मेमध्यें नंदानें राज्यपालावर स्वारी केली व त्याला मारून टाकलें. ही बातमी महमूदाला लाहोर येथें १०२२ च्या मार्चांत समजली आणि त्या वर्षीं डिसेंबरांत त्यानें ग्वाल्हेर व कालंजर या दोहोवर स्वारी केली आणि गंडाला १०२३ जानेवारींत शरण आणलें. ही संगति स्वीकारली असतां गंड हा मानी असून अगदीं भित्रा म्हणून दाखविला जातो तसा भित्रा दिसणार नाहीं.

## टिप्पणी–नं. २ काबुलपंजाबचे शाही राजे.

या राजांनीं काबूलपासून लाहोरपर्यंत राज्य केलें असें बहुतेक सर्व इतिहासकारांनीं कबूल केलें आहे. अल्बेरूनीच्या ग्रंथाचा भाषांतर करणारा सचाऊ यानें त्याच्या 'हिंदुस्थान' या ग्रंथाची प्रस्तावना लिहितांना म्हटलें आहे कीं, "काबुलिस्तानापासून पंजाबपर्यंत राज्य करणारें पाल घराणें अल्बेरूनीनें आपले ग्रंथ लिहिले तेव्हां इतिहासाच्या रंगभूमीवरून नाहींसें झालें होतें. आणि त्यांचें राज्य महमूद आणि त्याचे गुलाम अधिकारी यांच्या ताब्यांत पूर्णपणें गेलें होतें." त्यांनीं येवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर राज्य केलें हें निर्विवादपणें सिद्ध झालें आहे. कारण या राजांचीं नाणीं सर्व पंजाबभर सांपडतात. लुधियाना जिल्ह्याच्या गॅझेटिअरमध्यें असें वाचण्यास सांपडतें कीं, काबूल आणि पंजाबचा राजा सामंतदेव याची नाणीं पडक्या सुनेत शहरांतिल मातीच्या ढिगांत सांपडतात. कुशनप्रभृति प्राचीन राजांचीं नाणीं तेथें सांपडत असून दिल्लीच्या हिंदु किंवा मुसलमान राजांचीं नाणीं तेथें मुळींच सांपडत नाहींत. यावरून गझनीच्या महमुदानें सुनेतचा विध्वंस केला असें दिसून येतें.

शाही घराण्यांत सामन्त हा प्रख्यात राजा होऊन गेला. तो ९३५ मध्यें सिंहासनावर बसला असें थॉमस म्हणतो ( परंतु हें निश्चित नाहीं– ई. २ पा. ४२५ ). त्यानें पंजाब जिंकला असावा असें दिसतें. त्याचीं नाणीं तेथें अतिरिक्त सांपडतात. भीमाचीं नाणीं काबुलिस्तानांत सर्वत्र सांपडतात. परंतु पंजाबांत तीं क्वचितच आढळतात. त्यानें कोट कांग्राच्या खालच्या बाजूला भीमनगर वसविलें हें आपण पाहिलेंच आहे. काश्मीरची प्रख्यात निष्ठुर राणी दिद्दा हिचा तो आजा होय. जयपालाचें एकहि नाणें अजून सांपडलें नाहीं हें विचित्र आहे. परंतु आनंदपालाचीं नाणीं पंजाबांत आणि गंगेच्या दुआबाच्या उत्तरभागांत प्रभूतपणें सांपतात ( सदर ). त्रिलोचनपाल किंवा भीमपाल यांचें एकही नाणें सांपडत नाहीं. बहुधा पंजाबांत कोठेंच त्यांचें राज्य नसावें.

हे राजे शैव असावेत असें त्यांच्या नाण्यांवरून दिसतें. त्या नाण्यांवर नंदीची आकृति काढलेली आहे. परंतु पहिला भीम हा वैष्णव

असावा, कारण त्यानें काश्मिरांत केशवाचें देवालय बांधलें असा तरंगि-णींत उल्लेख आहे. याचा निर्देश पूर्वींच भाग २ मध्यें ( पा. २–६० ) आला आहे. त्या कालांत पंजाबांत व त्याचप्रमाणें काबुलिस्तानांतहि वैष्णवधर्म प्रचलित होता असें दिसतें.

शेवटचा राजा भीम यानें चंद्रराजाला ( बुंदेलखंडचा ) तूं महमुदाशीं लढाई करण्याच्या भानगडींत पडूं नको असा उपदेश करणारें पत्र लिहिलें असें इलियटनें म्हटलें आहे. आणि प्रमाण म्हणून उत्बीचा उतारा त्यानें दिला आहे ( पा. ४२७ ). तो उतारा पान ४८ वर दिला आहे ( इ. २ ), हें पूर्वींच सांगितलें आहे. यमीनीच्या निरनिराळ्या प्रतींत कांहीं ठिकाणीं विशेषत: नांवांच्या बाबतींत निरनिराळे पाठ पडले आहेत. आम्ही जें यमीनीचें भाषांतर उपयोगांत आणलें आहे त्यांत हें नांव आढळत नाहीं. हा चंद्ररायाला माघारा फिरण्याचा केलेला उपदेश कनोजच्या राज्यपालानें केला असावा असें आम्ही धरलें आहे, तें अधिक संभवनीयहि आहे. कारण भीम दक्षिणेकडे इतका खालीं येणें शक्य नाहीं. त्याचा बाप त्रिलोचनपाल यानें ज्याप्रमाणें उपदेश केला असें म्हणतात त्याप्रमाणें भीमानेंही जर केला असेल तर तो महमुदाचा जसा मांडलिक झाला होता तसाच मित्रहि असला पाहिजे. त्याच्या चुलत्याला मुसलमान करण्यांत आलें असा उल्लेख एका प्रतींत आहे तो सेवक-पालाबद्दल असावा. जयपालाच्या या नातवानें ( मुलीच्या मुलानें ) मुस-लमानी धर्म स्वीकारला होता व महमुदानें त्याला पेशावरचा अधिकारी नेमलें होतें. पुढें त्यानें बंड केलें. महमुदानें त्याच्यावर हल्ला केला व शेवटीं तो मारला गेला.

# प्रकरण चौदावें.

## सोमनाथावरील स्वारी.

महमुदाच्या मूर्तिभंगाच्या व लुटालुटीच्या चरित्रांतील अत्यंत संस्मरणीय अशा वृत्तांताशीं आतां आपण येऊन पोचलों आहोंत. तो वृत्तांत म्हणजे सोमनाथावरील स्वारी होय. शिवाचें अत्यंत पवित्र देवस्थान म्हणून सोमनाथाची त्यावेळीं ख्याति होती. ९ व्या शतकांतील स्कंद पुराणांत त्याचें सविस्तर वर्णन आहे. अल्बेरुनीनेंहि तीर्थक्षेत्र आणि चांच्यांचें निवासस्थान असें त्याचें वर्णन केलें आहे. सोमनाथावर हल्ला करून तेथील अपरंपार संपत्ति लुटावी असें महमुदास वाटण्याजोगें तें खास होतें. उत्बी हि. स. ४२० ( इ. स. १०२९ ) पर्यंत म्हणजे या स्वारी नंतर चार वर्षें जिवंत असूनहि आपल्या पुस्तकांत दुर्दैवानें महमुदाच्या या महापराक्रमाचा उल्लेख करीत नाहीं. या नंतर दोन शतकांनीं आपली बखर लिहीत असतां रशीदुद्दीननें आणि त्यानंतर वीस वर्षांनीं लिहिणाऱ्या हमीदुल्लानें या स्वारीचा उल्लेख केलेला नाहीं ( ई. २ पा. ४३०–४३१ ). या स्वारीचें पहिलें वर्णन सांपडतें तें इब्न् असीर याच्या पुस्तकांत. नंतरच्या लेखकांनीं हेंच वर्णन अधिक खुलवून दिलें आहे ( ई. २ पा. ४६८ ). गुजराथच्या सोळंखी राजांचा इतिहास त्या घराण्याचा मूळ पुरुष मूलराज याच्या काळापासून गुजराथच्या जैन व हिंदु बखरकारांनीं पूर्णपणें दिला आहे. परंतु सोळंखी राजांच्या अत्यंत वैभवाच्या दिवसांत गुजराथवर आलेल्या या आपत्तीचें त्यांत नांवहि नाहीं. मूलराज हा अनहिलवाडच्या गादीवर ९६१मध्यें म्हणजे सबुक्तगीनच्या पूर्वी १६ वर्षें बसला, हा वृत्तांत पुढें एका प्रकरणांत येणार आहे. आजपर्यंत जे कोरीव लेख उपलब्ध झाले

आहेत त्यांत या आपत्तीबद्दल एक अक्षरहि आढळत नाहीं. यामुळें गुजराथसारख्या लांबच्या प्रांतांत, जेथें जावयाचें तर एक विस्तीर्ण वाळवंट ओलांडणें आवश्यक तेथें, महमुदानें खरोखर स्वारी केली असेल कीं नाहीं याची शंका सहज उत्पन्न होते. तथापि आपल्या अत्यंत पवित्र देवस्थानावर आणि राजावर कोसळलेल्या या अनर्थाचा उल्लेख करण्याबद्दल हिंदु लेखक हे अनुत्सुक असणार व ज्या मुसलमान लेखकांनीं या स्वारीबद्दल लिहिलें आहे त्यांनीं तें शेंकडों वर्षांनीं लिहिलें असलें तरी त्यांच्या पुढें त्याबद्दलचा कांहीं तरी लेख असावा, त्यांनीं अगदींच काल्पनिक गोष्ट लिहिली असण्याचा संभव नाहीं, असा विचार मनांत आणून ईलियटनें इब्न् असीर याच्या पुस्तकांतून जो उतारा घेतला आहे त्यावर हा वृत्तान्त द्यावयाचें आम्हीं ठरविलें आहे ( ई. २ पा. ४६९ ).

सुरुवातीसच आम्हांस हें सांगितलें पाहिजे कीं या अतिशयोक्तिप्रचुर वृत्तातांत पुढील लेखकांच्या लेखांत विस्मयावहतेच्या बाबतींत अधिकाधिक भर पडली आहे. मुख्यतः महमुदाच्या धार्मिक गौरवाची खुलावट करण्याच्या इच्छेनें स्वकपोलकल्पित अशा गोष्टी त्यांनीं या वृत्तांताला जोडून दिल्या. उदाहरणार्थ सोमनाथाच्या मूर्तींत अगणित संपत्ति सांठविली होती, तेथील ब्राह्मणांनीं खंडणी दाखल कोटयावधि रुपये महमुदास द्यावयाचें कबूल केलें, त्याच्या सेनापतीनीं ते घेण्याचा त्याला सल्ला दिला, परंतु महमुदानें सांगितलें कीं ईश्वराच्या दरबारीं आपण मूर्ति विक्रय करणारे म्हणून न ठरतां मूर्तिभंजक म्हणून प्रसिद्ध व्हावें अशी माझी इच्छा आहे, ही गोष्ट—गिबननें सुद्धां सांगितली आहे—फेरिस्ताची नसली तर दुसऱ्या कोणाची तरी कपोलकल्पना आहे. सोमनाथाच्या हकीकतीच्या बनावटीबद्दल टीका करतांना खुद्द ईलियटनें ज्याचा उतारा घेतला आहे तो वुइलसन म्हणतो कीं “ या मूर्तीचे अवयव छिन्न विछिन्न

करण्याबद्दल पूर्वीच्या मुसलमानांच्या लेखांत कोणताहि उल्लेख नाहीं. वस्तुतः त्या मूर्तीला अवयवच नव्हते, किंवा त्या मूर्तींतील संपत्ति असल्याबद्दलहि उल्लेख नाहीं. ती मूर्ती भरीव असल्यामुळें तींत संपत्ति लपविली असणेंहि शक्यच नव्हतें. मूर्तींत लपवून ठेवलेल्या हिऱ्यांचा व माणकांचा जो शोध फिरिस्तानें लावला आहे त्याला कशाचाहि आधार नाहीं." ही गोष्ट अगदीं उघडाउघड वेडसरपणाची आहे. कारण सोमनाथाची मूर्ति म्हणजे एक भरीव दगड असला पाहिजे. त्याचप्रमाणें एका विश्वासघातकी हिंदु वाटाड्यानें महमुदाला एका निर्जल वाळवंटांत महमुदास नेलें, परंतु ईश्वराची प्रार्थना करतांच त्यास पाणी सांपडलें ही गोष्ट; किंवा गुजराथ प्रांत सुपीक असून त्यांत सोन्याच्या खाणीं असल्यामुळें महमुदाच्या मनांतून तेथेंच राहावयाचें होतें, परंतु खोरासान ही आपली जन्मभूमि, तीच राहावयास सोईस्कर असें सांगून ती कल्पना सोडून देण्यासाठीं त्याचें मन अधिकाऱ्यांनीं वळविलें ही गोष्ट विश्वसनीय नाहीं. परत जातांना महमुदानें त्या देशाचा राज्यकारभार पळून गेलेल्या राजाच्या नातेवाईक असलेल्या व संसार सोडून विरक्त झालेल्या दाबशिलीमवर सोंपविला ही गोष्टहि—गुजराथचा त्या वेळचा राजा भीम याचा तो चुलता होता आणि तो खरोखरच सरस्वती नदीच्या तीरीं विरक्त होऊन राहिला होता असें दाखविण्यांत येत असलें तरी,—विचित्र असून विश्वास बसण्यासारखी नाहीं.

ईलियटनें या स्वारीबद्दलचे पुष्कळ इतिहासकारांचें उतारे दिले आहेत; व ज्यांना विशेष इच्छा असेल त्या वाचकांनीं ते ईलियटच्या ग्रंथांतून वाचावेत. इब्नअसीरच्या मूळच्याच अतिशयोक्तीनें भरलेल्या वृत्तांतात आणखी तिखट मीठ घालून आपलें वृत्तांत या इतिहासकारांनीं लिहिलेले असल्यामुळें त्यांचा सारांश देण्याची आम्हांस गरज दिसत नाहीं. इब्नअसीरनें दिलेल्या वर्णनाचें सार मात्र आम्ही

देत आहोंत. “ सोमनाथाची मूर्ति ही अखिल हिंदुस्थानांत अत्यंत प्रसिद्ध होती. विशेषतः चंद्रग्रहणाच्या रात्रीं तेथें फार लोक जमत असत. माणसें मेल्यावर त्यांचें आत्मे त्या ठिकाणीं जातात अशी समजूत होती. त्या देवालयाला १०००० गांवें इनाम दिलेली होतीं ( ! ! ! ). त्या मूर्तीच्या अभिषेकासाठीं दररोज गंगेचें पाणी आणण्यांत येत असे. एक हजार ब्राह्मण देवाची पूजा करीत आणि यात्रेकरूंना दर्शन करवीत. यात्रेकरूंची श्मश्रू करण्यांत तीनशें न्हावी गुंतलेले असत. देवळाच्या दरवाजांत तीनशें स्त्रिया गाणी म्हणून नाच करीत. ( कालिदासानें मेघदूतांत वर्णिल्याप्रमाणें शिवाच्या मूर्तीसमोर प्राचीनकाळीं गाणारणी गात व नाचत असत. दक्षिणेंतील शिवाचें देवालयांत ही चाल अजूनहि प्रचारांत आहे. गोवा प्रांतातील मंगेशाच्या देवळांत ती मला दृष्टीस पडली). महमुदाचा प्रतिकार त्यांनीं केला नाहीं म्हणून सोमनाथ इतर हिंदु देवांवर रागावला होता अशी समजूत प्रसृत झाली होती. ती जेव्हां महमुदाच्या कानावर गेली तेव्हां सोमनाथाची मूर्ति फोडून हिंदूंचें देव खोटे आहेत हें त्यांच्या प्रत्ययास आणल्यास ते खऱ्या धर्माचा स्वीकार करतील असा त्यानें विचार केला.

असा निश्चय करून त्यानें ३०००० घोडदळ आणि कांहीं बाजारबुणगे घेऊन साबानच्या दहाव्या तारखेस गझनी सोडली. व तो रमजान महिन्याच्या मध्यभागांत मुलतानला येऊन पोंचला. बरोबर ३०००० उंटांवर धान्य व पाणी घेऊन वाळवंटांतून अनहिलवाडला जाण्याकरितां तो निघाला. तेथील राजा भीम हा सुरक्षितपणासाठीं एका किल्ल्यावर पळून गेला. ( पुढील ग्रंथकारांनीं त्या किल्ल्याचें नांव कन्दन असें दिले आहे. बहुधा तो कच्छमधील कंथड किल्ला असावा, ). महमुद वाळवंटांतून सोमनाथाला गेला. (अनहिलवड घेतल्याचें किंवा ते लुटल्याचें वर्णन येथें

नाहीं). तो वाळवंटांतून दबलवाराला पोंचला.हे स्थळ सोमनाथापासून दहा मुक्कामांच्या अन्तरावर होतें. सोमनाथ महमुदाचा नाश करील अशा विश्वासानें तेथील लोक पळून न जातां राहिले होते. परंतु महमुदानें तें शहर घेतलें आणि तेथील लोकांची कत्तल करून त्यानें सोमनाथाकडे कूच केलें.

जिल्काद महिन्याच्या मध्यावर एका गुरुवारीं तो सोमनाथास येऊन पोंचला आणि लाटांनीं धुतलेल्या समुद्रकिनाऱ्यावर त्यानें एक प्रबळ किल्ला पाहिला. किल्लयावरील तटावर उभे राहून हिंदु मुसलमानाकडे पाहून हंसत होते आणि सोमनाथ तुम्हां सर्वांचा नाश करील असें त्यांस सांगत होते. शुक्रवारीं मुसलमानानीं हल्ला चढविला; हिंदू पळून गेलें, शिड्या लावून मुसलमान तटावर चढलें, व किल्ल्यांत उतरले. नंतर भयंकर कत्तल सुरू झाली. पुष्कळसे हिंदू देवळांत शिरले, त्यांनीं जमिनीवर देवापुढें साष्टांग नमस्कार घातला आणि जय मिळावा म्हणून देवाची करुणा भाकली. ( येथें दुसरी तटबंदी असावी ).

दुसऱ्या दिवशीं सकाळीं लढाईला पुनः सुरवात झाली, आणि मुसलमानांनीं हिंदूंना देवळांत रेटलें. देवळाच्या दारांत दारुण कत्तल झाली. हिंदू लोक देवळांत शिरत आणि रडून आणि हात जोडून देवाची प्रार्थना करीत, आणि देवळांतून बाहेर पडून मृत्युमुखीं पडेतों लढत. कांहीं लोक नावांत बसून समुद्रांत उतरले. परंतु तेथेंहि त्यांच्यावर हल्ला करण्यांत येऊन त्यांना मारण्यांत किंवा बुडविण्यांत आलें.

शिशानें मढविलेल्या छप्पन लांकडी खांबावर सोमनाथाचें देऊळ उभारलें होतें. मूर्ति आंतल्या एका खोलींत होती. ती पांच हात उंच असून तिचा घेर तीन हातांचा होता. ती दोन हात तरी जमिनींत खोल गेलेली असावी. ती घडविलेली दिसत नव्हती. तिचा कांहीं भाग महमुदानें जाळून टाकिला व कांहीं भाग गझनीला पाठ-

विला. तेथें जामीमशीदींत दाराशींच पायरी म्हणून तो घातला गेला. देवळांत अंधार होता, परंतु तेथें रत्नजाडित झुंबरांचा प्रकाश पडला होता. मूर्तीजवळ सोन्याची सांखळी असून त्याला घंटा लावल्या होत्या व ब्राह्मणांना पूजेला उठविण्यासाठीं त्या वेळोवेळीं वाजविण्यांत येत. खजिना जवळच होता, व त्यांत सोन्यारुप्याच्या मूर्ति आणि अत्यंत मौल्यवान् रत्नांनीं जडवलेलें पडदे ठेविले होते. सगळ्या लुटीची किंमत वीस लाख दिनारांपेक्षां अधिक होती, आणि पन्नास हजारापेक्षां जास्त लोक मृत्युमुखीं पडले " (ई. भा. २ पा. ४६९-७१).

हा वृत्तान्त अगदीं सरळ आणि विश्वसनीय आहे. ब्राह्मणांनीं अथवा पाहिजे तर क्षत्रियांनीं म्हणा देवळाजवळ क्रोधानें संतप्त होऊन प्रतिकार केला. पण तें केवळ मृत्यूला कवटाळणेंच होतें. गुजराथचा राजा भीम याला सोमनाथाच्या बाहेरच शत्रूला जोराचा प्रतिरोध करितां आला असता. तो आपल्या नांवाला आणि रजपूत ब्रीदाला जागता तर त्याला महमुदानें आणलेल्या सैन्याहून अधिक मोठें सैन्य, किंबहुना घोडदळ हि, रणांगणावर उभे करितां आलें असतें. परंतु हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं यावेळीं आपल्या सतत मिळविलेल्या जयांनीं महमुदाची इभ्रत नेपोलियनप्रमाणें पराकाष्ठेला पोंचली होती. एक नेपोलियन म्हणजे लाख माणसांची मदत मानली जाई. परंतु अशा नेपोलियनलाहि वॉटर्लूच्या समरांगणावर जर्मन व इंग्रज यांनीं निकराचा विरोध केला. आपत्तीच्या निराशकाळांत जोमाचा कणखरपणा हिंदुलोकांच्या अंगीं दिसत नाहीं. तात्पर्य भीमानें कच्छमधील एका किल्लयाचा आश्रय केला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. कच्छच्या रणांतील पाण्याचा अडथळा असतां व भरतीच्या वेळीं पाणी वाढावयाचा संभव असल्यामुळें त्यांतून जाणें धोक्याचें होतें तरीहि सोमनाथ घेतल्यावर महमुदानें त्याच्यावर तेथेंहि हल्ला केला असें म्हणतात. विजेता महमूद येत आहे

असें पाहिल्याबरोबर भीम तेथूनहि पळाला. तेथोन वाळवंटांतून सिंधच्या मार्गानें महमूद गझनीला परत गेला. वाळवंटांत पाणी सांपडणार नाहीं हें त्याला माहीत होतें. तो पाण्याचा मार्गच नव्हता, तेव्हां विश्वासघातकी हिंदू वाटाड्यांना त्याला फसविण्याची सोयच नव्हती. सिंधूमधील चांच्यांनीं त्याला फार त्रास दिला. हे चांचे जूड* देशांतले असावेत असा समज आहे. पुढें या जाटांविरुद्ध शेवटची स्वारी करून महमूदानें त्यांना यथायोग्य शासन केलें.

महमूद सोमनाथाला आला तो मुलतानवरून वाळवंटांतून, रस्त्यावर अजमीर आणि अनहिलवाड घेऊन, पूर्वेच्या रस्त्यानें आला आणि कच्छहून परत जातांना मार्गांत मनसूर घेऊन मुलतान, सिंधुनदी या मार्गानें गेला असें कित्येक म्हणतात. माळव्याचा परमारदेव ( भोज ) त्याच्याशीं लढाई करण्याची तयारी करीत होता व त्यानें त्याला रस्त्यांत गांठलें असतें म्हणून तो या पश्चिमेकडील मार्गानें गेला. हिंदु लोकांबरोबर लढावें लागलें तर आपली येवढी थोरली लूट कदाचित् जाईल अशी त्याला भीति वाटली असावी असेंहि कित्येकांनीं लिहिलें आहे.

## टिप्पणी—सोमनाथ.

सोमनाथपट्टण अथवा सोमनाथ शहर हें काठेवाडच्या पश्चिम किनाऱ्यावर वसलेलें आहे. हल्लीं तें जुनागडच्या राज्यांत आहे. शहर गायकवाडच्या ताब्यांत आहे. १८४३ मध्यें एका प्रवाशानें तें पाहून ज. रॉ. ए. सो. भा. १ पान १७३ वर त्यानें त्याचें वर्णन दिलें आहे तें असें, " प्राचीन देवालय नाश पावलें आहे आणि जुन्या देवळाच्या जागेजवळच अहिल्याबाईनें नवें देऊळ बांधलें आहे. परंतु त्याच्या नष्ट झालेल्या

---

* १०२४ मध्यें सोमनाथाहून परत जात असतां मिठाच्या डोंगरांतील जाटांनीं त्याला हैराण केलें असें म्हणतात; परंतु हे जाट दक्षिण सिंधूवरील असावेत ( झेलम गॅझेटिअर पा. ८३ ).

स्थितींतहि त्याचें विशाल वैभव दृष्टोत्पत्तीस येतें. " आमच्या मतें हें जुनें म्हणून म्हटलेलें देवालय सिद्धराज जयसिंह व कुमारपाल यांनीं बांधलेलें देवालय असावें. व महमुदानें ज्या देवालयाचा विध्वंस केला तें बहुधा परमारांच्या एका शिलालेखांत म्हटल्याप्रमाणें माळव्याच्या भोज परमारानें बांधलेलें असावें. या कोरीव लेखाची हकीकत परमारांच्या इतिहासांत येईल. मुसलमान इतिहासकारांनीं वर्णिल्याप्रमाणें भोजानें बांधलेलें देवालय बहुधा लांकडाचें असावें. ती इमारत बहुतकरून इ. स. १०२६ मध्यें बांधण्यांत आली असावी. देवळाची नवी दगडी इमारत अनहिलवाडच्या जयसिंहानें बांधावयास सुरुवात केली आणि कुमारपालानें ती पुरी केली. हें गुजराथच्या इतिहासग्रंथावरूनच दिसून येतें इतकेंच नव्हे तर सोमनाथपट्टनच्या देवालयांतील एका शिलालेखावरूनहि हें दिसून येतें. अनहिलवाडच्या इतिहासांत त्या शिलालेखाचा उल्लेख येईल. या भद्रकाली-देवालय-प्रशस्तीचा सन ११६९ इ. स. असून ती चित्ताकर्षक आहे. तिच्या सुरुवातीस एका ब्राह्मणाचें वर्णन दिलें आहे. तो बनारसचा असून त्यानें नाश पावलेल्या देवालयांचा उद्धार करण्याचें काम हातीं घेतलें होतें असें वर्णन आहे. [ हीं देवालयें बहुधा महमुदानें विध्वस्त केलेलीं असावींत ]. या पुण्यकारक कार्यासाठीं तो सर्व हिंदुस्थानभर हिंडला. तो उज्जनीहून सोमनाथाला आला. पुढील काळांतील मुसलमान इतिहासकारांनीं महमुदाच्या सोमनाथाच्या स्वारीची व तेथील देवालयाच्या विध्वंसाची जी हकीकत सांगितली आहे तिला या पवित्र ब्राह्मणाच्या प्रयत्नाबद्दलच्या उल्लेखानें बळकटी येते अशी आमची समजूत आहे. या प्रशस्तींत असें स्पष्ट म्हटलें आहे कीं आतां तें देऊळ दगडांनीं बांधण्यांत आलें आहे. हें दगडाचें देवालय चवदाव्या शतकांत गुजराथच्या मुसलमान राजांनीं फोडलें. सोमनाथाच्या देवळाचे चंदनी दरवाजे महमुदानें गझनीला नेले, ह्या आख्यायिकेवर आधुनिक विद्वानांचा काडीचा विश्वास नाहीं. आणि अफगाणिस्थान जिंकल्यावर १८४३ सालीं इंग्रजांनीं जे दरवाजे आणले ते आग्र्याच्या किल्ल्यांत धूळ खात पडले आहेत ( सरदेसाई ).

## टिप्पणी २—सादी व सोमनाथ.

सादीनें आपल्या बोस्तानमध्यें सोमनाथाचा उल्लेख केलेला आहे, हें येथें सांगितलें पाहिजे. त्यांत त्यानें एक विचित्र गोष्ट सांगितली आहे, आणि ती बहुधा त्याच्या स्वतःचें डोक्यांतून निघालेली असावी. आपल्या फार मोठ्या प्रवासांत तो सोमनाथाला आला, तेथें त्यानें एक हस्तिदंती मूर्ति पाहिली. ती सागाचें सिंहासनावर सोन्याचें चौरंगावर बसविलेली होती. तिच्या अंगावर मूल्यवान् हिरें सुंदर आकारांत बसविले होते. ब्राह्मण पुजाऱ्यानें अशी एक युक्ति केली होती कीं ती मूर्ती आपला हात वर उचली. कर्मधर्मसंयोगानें ही युक्ति सादीच्या लक्षांत मूर्तीमागें गाभाऱ्यांत शिरल्यानें आली. हें पाहून तो ब्राह्मण पळूं लागला आणि या फसवणुकीनें रागावलेला सादी त्याच्यामागें लागला; आणि त्यानें त्याला ठारहि मारलें. सर्व ब्राह्मण आतां आपला सूड घेतील या भीतीनें सादी त्या देशांतून पळून गेला. ही गोष्ट कल्पित आहे हें अगदीं उघड दिसत आहे. सादीला मुळीं त्या मूर्तीचें जवळ देखील जाणें अशक्य होतें; मग तिच्या मागें जाऊं देण्याची गोष्ट कशाला? शिवाय हस्तिदंताच्या मूर्ती करण्याचा प्रघातहि पूर्वीं होता असें वाटत नाहीं. तथापि इतिहासकारांनीं सादीचा हा सोमनाथाचा उल्लेख ध्यानांत घेण्याजोगा आहे. कारण त्यांत महमुदानें सोमनाथावर स्वारी केली आणि तेथील प्रसिद्ध शिवमूर्ति भंगिली याचा इषाराहि या हकीकतींत नाहीं. या स्वारीचा उल्लेख व्हावयास हवा होता असे कोणासहि वाटेल. त्या उल्लेखाचें अभावामुळें महंमुदानें सोमनाथावर स्वारी केली होती या गोष्टीचे सत्यतेबद्दल कांहीं वेळां जी शंका प्रकट करण्यांत येते; तिला दुजोरा मिळतो. सादी इ. स. ११७५ मध्यें जन्मला व तो ४० वें वर्षाच्या सुमारास म्हणजे अदमासें १२१५ मध्यें हिंदुस्थानांत आला असावा. त्यानें आपलें बोस्तान ८० व्या वर्षीं म्हणजे १२५५ चे सुमारास लिहिलें. या दोन्ही सालांत गुजराथ नसलें तरी दिल्ली मुसलमानांच्या ताब्यांत होती. ज्या पहिल्या लेखकानें सोमनाथच्या स्वारीचें वर्णन केलें आहे तो इब्नअसीर होय. कितीहि लवकर म्हटले तरी त्याचें पुस्तक १२७० चे सुमारास लिहिलेलें असावें. अर्थात् सादीनंतर ही हकीकत

ठरते. परंतु कांहीं झालें तरी एखाद्या गोष्टीच्या उल्लेखाचा अभाव, तो उल्लेख असणें अपरिहार्य असल्याखेरीज किंवा तो उल्लेख करणें अत्यंत आवश्यक असल्याखेरीज, पुरेसा पुरावा नाहीं. आणि म्हणून त्यावर आपल्याला अवलंबून राहून महमुदाची सोमनाथाची स्वारी काल्पनिक आहे असें आपल्याला ठरवितां येणार नाहीं. सादीनें या स्वारीचा उल्लेख केला नाहीं हें कदाचित् काकतालीय असेल.

# प्रकरण पंधरावें.

## महमुदाचा मृत्यु आणि त्याचें स्वभाववर्णन.

सोमनाथची लढाई जिंकून आणि सोमनाथाचें देवालय उध्वस्त करून आपल्या पराक्रमावर कळस चढविल्यावर महमुदानें कोणतीहि महत्त्वाची स्वारी अंगावर घेतली नाहीं. कदाचित् अलक्झांडरप्रमाणें त्याला जिंकावयास पृथ्वीवर कोणताहि प्रदेश उरला नसावा. त्याच्या शेवटल्या पराक्रमाची कीर्ति बगदादेस जाऊन पोंचली तेव्हां सर्व बगदाद सोमनाथाच्या विध्वंसाची उत्कर्षवर्धक कथा ऐकून विस्मय करीत होतें. आणि खलीफानें महमुदाला 'कैफुद्दौलत् वल् इस्लाम ' म्हणजे ' महंमदी धर्माचा आणि दौलतीचा रक्षक ' अशी आणखी एक पदवी समर्पण केली. ( गिबन् व ईलियट् २ पान ४७४ ). खलिफानें त्याचें मुलगे मसऊद, महंमद व यूसफ यांसहि पदव्या दिल्या. याप्रमाणें महंमदी धर्माच्या अध्वर्यूनें गौरव केलेला आणि यशाच्या परमावधीस पोंचलेला महमूद कशांतहि उणेपणा न येतां या विख्यात पराक्रमानंतर सुमारें तीन वर्षांनीं हिजरी ४२० ( इ. स. १०२९ ) मध्यें ६१ व्या वर्षीं वयस्क होऊन आणि आपल्यामागें कर्तेसवर्ते मुलगे आणि अनुभवानें मुरलेले मंत्री आणि सेनापति ठेवून मृत्युवश झाला.

तहत गिबनपासून अनेक इतिहासकारांनीं महमुदाच्या चारित्र्या-

बद्दल अत्यंत गौरवपर अनेक वर्णनें केली आहेत. गिबननें म्हटलें आहे कीं, " दुर्दैवानें इतिहास ज्यांनीं खचून भरून गेला आहे, अशा रक्तपाताच्या वृत्तांतास नजरेआड करून थोडा वेळ जगांत निस्संशय अत्यंत विख्यात राजांपैकीं होऊन गेलेल्या महंमुदाच्या आंगच्या सद्गुणांचें विवेचन करणें आल्हाददायक आहे. पौर्वात्य देशांत त्याच्या नांवाबद्दल अजूनहि आदर व्यक्त केला जातो. त्याच्या प्रजाजनांस शांतता आणि संपन्नता याचें सुख उपभोगावयास सांपडलें. त्याचे न्यायप्रियत्व आणि औदार्य यांची अनेक उदाहरणें बखरींत दिलेलीं आढळतात, महमुदाचें उत्कृष्ट चरित्र एकाच लोभाच्या दोषानें कलंकित झालेलें आहे. सदैव वाढणारी आणि कधींहि संतोष न पावणारी तृष्णा त्याच्याच ठिकाणीं पूर्ण समाधान पावली. मृत्यु समीप आला असतां इतक्या श्रमानें मिळविलेली, येवढ्या कष्टानें रक्षिलेली आणि जगाच्या नियमाप्रमाणें कायमची सोडून द्यावी लागणारी आपली सर्व संपत्ति त्यानें आपल्या पुढें पसरविली आणि डोळ्यांत चमकणाऱ्या अश्रुबिंदूंतून ती डोळेभर पाहून घेतली. एक लक्ष पायदळ, पन्नास हजार घोडेस्वार व तेरा हजार लढाऊ हत्ती इतकें आपलें विशाल सैन्य हि त्यानें शेवटचें अवलोकन केलें. "

महमूद हा अतिशय विख्यात असा सेनानायक होता हें सर्वांनींच कबूल केलें आहे. लेनपूलनें त्याचें असें वर्णन केलें, आहे कीं " महमूद हा प्रसिद्ध योद्धा होता; त्याचें शौर्य अमर्याद होतें, आणि त्याचा शारीरिक आणि मानसिक उत्साह कधींहि मंदावला नाहीं. " लेनपूलनें त्याच्या सुव्यवस्थित राज्यपद्धतीची व न्यायाप्रियतेचीहि तारीफ करून ' महमूद हा न्यायप्रिय, विद्वानांचा चाहता, स्वभावाचा उदार आणि धर्मशील होता ' अशारीतीनें सेलजुकच्या प्रसिद्ध वजिरानें केलेल्या त्याच्या वर्णनाचा पुनरुच्चार केला आहे. ( पान ३५ ). " ज्योतिषशास्त्रविशारद अल्बेरुनी, तत्ववेत्ता अल्-

फरीबी, शिरस्तेदार अल्उत्बी, खुशमस्कऱ्या अल्बैहकी यांचे सारखें जोरदार अरबी लेखक आणि अनसूरी, फरुकी, अस्जूडी सारखे प्रभावशाली फारशी कवि व सर्वांत फारशी वाङ्मयांत होमरप्रमाणें झळकणारा फिरदोसी हे सर्व त्याचें दरबारीं येऊन राहिले होते व त्यानें त्यांना आश्रय दिला यावरून तो विद्वान लोकांचा पुरस्कर्ता किती होता हें सिद्ध होतें." अशा तऱ्हेनें महमुदाच्या मोठेपणाची योग्य ती वाखाणणी करीत असतां लेनपूलनें शेवटीं आपलें असें मत दिलें आहे कीं, " महमुदाचें राजनीतिनैपुण्य बेताचेंच होतें. त्यानें राज्यकारभाराच्या नवीन संस्था स्थापल्या नाहींत किंवा राजशासनाची नवीन पद्धति अमलांत आणली नाहीं. त्यानें जे प्रदेश जिंकले ते एकजीव करून त्यांत सुव्यवस्था उत्पन्न करण्याचा प्रयत्न केला नाहीं. आणि यामुळेंच तो मरण पावतांच त्यानें अव्यवस्थितपणें आपल्या राज्यछत्राखालीं दाखल केलेले प्रदेश भराभर स्वतंत्र झाले. "

महमुदाविरुद्ध केलेल्या टीकांचा विचार करण्यापूर्वीं प्रसिद्ध योद्धा, निपुणसेनापति व न्यायप्रिय राजा येवढेंच नव्हे तर एक जगद्विख्यात पुरुष म्हणून आम्हांलाहि महमुदाच्या स्तुतिपर चार शब्द काढले पाहिजेत. आमचें असें ठाम मत आहे कीं, शिवाजी, हर्ष, वॉशिंग्टन, विख्यात पीटर इत्यादि, ज्यांनीं जगाच्या इतिहासांत नांव केलें आहे व ज्यांनीं राष्ट्रांच्या भवितव्यता बदलून टाकल्या आहेत अशा विधिघटनेंनेंच दीर्घ कालानें उत्पन्न होणाऱ्या असाधारण कर्तृत्वाच्या थोर पुरुषांपैकीं महमूद हा एक होता. त्याची वागणूक कडक शिस्तीची होती. त्याच्या स्वाऱ्यांच्या वर्णनांत शहरें आणि देवळें लुटण्याबद्दल, कत्तलींबद्दल व पाडाव केलेल्या लोकांना गुलाम करण्याबद्दल जीं वर्णनें आहेत त्यांत त्यानें स्त्रियांस मारल्याचा किंवा त्यांच्यावर अत्याचार झाल्याचा उल्लेख सांपडत नाहीं. त्याला न्यायाचें इतकें प्रेम आणि गुन्ह्याची इतकी चीड होती कीं व्यभि-

चार करतांना त्याचा स्वतःचा मुलगा सांपडता तरी त्यानें त्याला देहांत प्रायश्चित्त दिलें असतें. आपल्या प्रजाजनांचें सुख सर्व बाजूनीं वाढावें म्हणून त्यानें खटपट केली. त्यानें चोरांवर जरब बसवून व्यापाराचें संरक्षण केलें, आणि निरनिराळ्या प्रांतांतील दळणवळणाचे मार्ग सुरक्षित केले. यामुळें खोरासान आणि लाहोर यांच्या दरम्यान व्यापारी तांडे बिनधोक व मोकळेपणानें जात असत. ( उत्बी ). त्यानें निरनिराळ्या प्रांतांवर चांगले अधिकारी नेमले आणि त्यांच्यावर असा वचक ठेवला कीं त्यांनीं प्रजेवर कधीं जुलूम केला नाहीं. निशापूर खोरासन येथें त्याचा भाऊ नझीर हा प्रांताधिपति होता. उत्बीनें त्याचें असें वर्णन केलें आहे कीं " नझीराची राज्यव्यवस्था उत्कृष्ट होती, व तो इतका दयाळु होता कीं त्यानें कधीं कोणाला कठोर शब्द वापरला नाहीं, कधीं कुणाला दुखविलें नाहीं, किंवा कधीं कोणावर अन्याय केला नाहीं. " ( पा. ४८६ ) महमूद हा गरिबांचा उत्कृष्ट वाली होता अशी जी उत्बीनें त्याची प्रशंसा केली आहे त्यांत अतिशयोक्तीचा किंवा खुशामतीचा भाग नाहीं. " त्यानें दरिद्री विधवा आणि श्रीमंत सरदार यांस सारखेंच वागविलें, त्याच्या कारकीर्दींत गर्वाचे व जुलुमाचे दरवाजे कायमचे बंद झाले होते. " " त्यानें वजनें व मापें तपासण्यासाठीं एक अधिकारी नेमला होता. बाजारांत व्यापाऱ्यांकडे जाऊन त्यांचीं वजनें व मापें ठरीव परिमाणांचीं आहेत कीं नाहींत हें पाहण्याचें काम त्याला करावें लागे. त्यानें रस्ते व्यवस्थित व मोठे केले. दुकानांची सोय केली आणि गाढवें व ऊंट रस्त्यांतून स्वतंत्र जाण्याची व्यवस्था केली. पूर्वीं पेठेंतील रस्ते उघडे असल्यामुळें धूळ व पाऊस यांचा पेठेंतील लोकांस मोठा उपद्रव होत असे. त्यानें बाजारांतील रस्त्याच्या दोहों बाजूंच्या घरांचीं छपरें सारखीं करवून मधील रस्ते आच्छादून टाकण्याचा हुकुम केला व दोन महिन्यांत सर्व रस्ते आच्छादले गेले. या रस्त्यां-

तून सर्व ठिकाणीं सूर्याचे किरण येऊन बाजारांत उजेड पडण्याचीहि व्यवस्था केली होती व त्यामुळें सूर्यप्रकाशाचा आनंद कोणालाहि मिळूं शके" (उत्बी पा. ४८६). "लोकांस न्याय मिळावा व लोकांच्या सुखसोईंत भर पडावी म्हणून आदरसत्काराच्या व धार्मिक देणग्यांत तो वर्षाकांठीं जवळजवळ एक लाख दिनार खर्चींत असे" (सदर). या वरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, प्रजारंजन तत्परता हें राजाचें कर्तव्य आहे ही जाणीव महमुदाच्या ठिकाणीं जिवंत होती.

महमूद हा खरा कर्तव्योत्सुक असा मुसलमान होता, हें सांगावयास नकोच. आपल्या धर्माच्या ठिकाणीं त्याची पूर्ण श्रद्धा होती. आणीबाणीच्या वेळीं लढाईच्या पूर्वीं आणि नंतर तो ईश्वराची प्रार्थना करी. "धर्मनिष्ठांच्या सहाय्याला देव तत्पर आहे" या कुराणांतील वचनावर त्याची श्रद्धा होती. इतर बाबी प्रमाणें या बाबींतहि शिवाजींत व महमुदांत साम्य आहे. शिवाजीचीहि आपल्या धर्मावर व आपल्या पवित्र कार्यावर अढळ निष्ठा होती. आणि संकटाच्या वेळीं तोहि आपल्या इष्ट देवतेची सहाय्य व मार्गदर्शन मिळण्यासाठीं आराधना करीत असे. त्या दोघांच्याहि बाबतींत अशा प्रार्थना आपल्या अनुयायांचा उत्साह व विश्वास वाढविण्यासाठीं केल्या असण्याचा संभव नाहीं असें नाहीं; परंतु बहुधा त्या श्रद्धेमुळेंच करण्यांत येत असाव्यात. शिवाजी ज्याप्रमाणें संकटसमयीं भवानीची प्रार्थना करून समाधींत देवीचे उत्साहवर्धक व मार्गदर्शक शब्द बोले त्याच प्रमाणें महंमद कुराणावरून आपले शकुन पाही. आमची अशी खातरी आहे कीं दोघेहि या गोष्टी छद्मानें करीत नसून देवावरील अढळ श्रद्धेनें व उत्कट धार्मिक भावनेमुळें करीत. मात्र शिवाजीच्या मनोरचनेंत हा फरक होता कीं त्याची आपल्या धर्मावर कितीहि श्रद्धा असली तरी दुसऱ्यांच्या धर्माबद्दल त्याच्या ठिकाणीं सहिष्णुता

होती. महमुदानें धर्मोत्साहाच्या भरांत मूर्तींचा विध्वंस केला आणि मूर्तिपूजकांचा निष्ठुरतेनें नाश केला. परंतु शिवाजीनें मशिदी व फकीर यांचें रक्षणहि केलें व त्यांचा आदरहि ठेविला. आमच्या मतें महमुदाच्या अंगचा मोठा दोष म्हणजे त्याचें इतर धर्मांबद्दल असहिष्णु असलेलें धर्मवेड होय. इतर प्रत्येक बाबतींत तो अकबरापेक्षां श्रेष्ठ होता, परंतु या बाबतींत मात्र आमच्या मतें त्याला अकबराची सर नाहीं. महमूद हा स्वभावानें क्रूर नव्हता. दोनतीन शतकांनंतर चंगीझ किंवा तैमूर यांनीं आशियांत किंवा त्याहिनंतर दक्षिणेंतील मुसलमान राजांनीं हिंदुस्थानांत जशा निरपराध व असहाय माणसांच्या निर्दयपणें कत्तली केल्या तशा त्यानें केल्या नाहींत.

आतां स्वभाव–दोषाचा विचार करतां महमुदाचा लोभ फारच अतिशयोक्तीनें वर्णिला जातो अशी आमची समजूत आहे. दुसऱ्या कोणत्याहि माणसास इतिहासांत जमवितां आली नाहीं इतकी संपत्ति त्यानें जमविली यामुळेंच तो लोभी असावा अशी लोकांची समजूत असावी. मृत्युसमयीं आपली अगणित संपत्ति पाहून आणि आतां ती आपल्याला कायमची मुकणार हें मनांत येऊन तो रडला ही गोष्ट बहुधा कल्पनानिर्मित असावी व ती खोडसाळपणानें प्रसृत करण्यांत आली असावी. तो इतका धर्मनिष्ठ होता कीं माणसाला अपरिहार्य असलेल्या मरणाबद्दल तो रडला असेल हें संभवत नाहीं. शिवाय त्याला मुलगेहि होते; आणि मनुष्याची मनोदुर्बलता आपला धनसंग्रह आपल्या मागें मुलाच्या स्वाधीन करावयास हौशीनें आणि आनंदानें तयार असते. अगणित संपत्तीचे वारस होणारे ( मिळविणारे नव्हे ) राजे जसे मुक्त हस्तानें खर्च करितात तसा तो खर्चिक नव्हता यांत संशय नाहीं. परंतु सेलजुकच्या वजिरानें म्हटल्याप्रमाणे तो उदार होता यांतहि तिळमात्र संशय नाहीं. समकालीन वजिराचे हें उद्गार मागाहून प्रसिद्ध झालेल्या गोष्टींपेक्षां अधिक विश्वसनीय आहेत

विद्वज्जनांना उत्तेजन देण्यासाठीं दरवर्षीं तो पुष्कळ द्रव्य खर्च करी. त्यानें एक पाठशाळा स्थापन केली होती, तिला मोठ्या देणग्या दिल्या होत्या. तींत पगारी अध्यापक नेमले होते. पूर्वींच सांगितल्याप्रमाणें (पान ४६६) त्यानें बांधलेल्या जागीं मशिदीच्या शेजारीं या पाठशाळेंतील विद्यार्थ्यांस सरकारी खर्चानें राहण्यासवरण्याची व्यवस्था ठेविली जात असे. फिरदोशीला त्यानें दर हजार कवितांस हजार सोन्याचे दिनार द्यावयाचें कबूल केलें असतां ६०००० कवितांचें शहानामा काव्य तयार झाल्यावर त्यास महमुदानें सोन्याचे दिनार न देतां रुप्याचे दिले अशी जी गोष्ट सांगण्यांत येते त्या गोष्टींत जरी महमुदावर लोभाचा जो आरोप करण्यांत येतो त्या आरोपाची उत्पत्ति नसली तरी त्या गोष्टीनेंच बहुधा या आरोपाला दृढता आलीं असावी. ही गोष्टहि कालान्तरानें नवी रचण्यांत आली असावी. कारण फिरदोसीच्या परंपरेनें चालत आलेल्या चरित्रकथांतील बराचसा भाग अर्वाचीन विद्वानांनीं अग्राह्य ठरविला आहे." (एन्‌सायक्लोपीडिया ब्रिटानिका). आमच्या मतें तर या प्रचलित गोष्टीनें महमुदाऐवजी फिरदोसीचेच लोभ व क्रोध हे विकार स्पष्ट दिसून येतात. कसेंहि असो, या विद्याप्रिय राजानें वाङ्मयाच्या अभिवृद्धीसाठीं आणि इराणच्या पुराण इतिहासाचें संरक्षण व्हावें म्हणून विद्वज्जनांस जें उत्तेजन दिलें त्याची या गोष्टीवरूनच साक्ष पटते. फिरदोसी हा शिया असतां व कदाचित् पाखंडी असतांहि अग्निपूजक इराणचा इतिहास चिरस्थायी करण्याकरितां हें काव्य लिहिण्याचें काम कट्टया मुसलमान महंमुदानें त्यालाच सांगितलें. यावरून महमुदाची वाङ्ममयावरील भक्ति कशी निर्हेतुक होती हें दिसून येतें. "महमूद स्वतः सुन्नी व कडवा मुसलमान असतां हि त्यानें आरबी संस्थांची आबळ करून फारशी वाङमयाला व विद्येला मदत करून त्यांचें संवर्धन केलें (सदर). याप्रमाणें

ज्ञान आणि विद्वत्ता यांचे ठिकाणीं महमुदाचे जसें निर्हेतुक प्रेम होतें तसें अकबराचें नव्हतें. या बाबतींत अकबराहून महमूद हा श्रेष्ठ दिसतो. अकबरानें संस्कृत विद्येला उत्तेजन दिलें खरें परंतु तो कट्टा मुसलमान नव्हता. इराणाचा पौराणिक इतिहास लिहिण्याचें सामानी राजांनीं सुरू केलेलें काम पुरें करण्यास त्याच्या कवीस महमुदानें सांगितलें होतें. परंतु फारशी कवींचें निवासस्थान जें खोरासान त्यांतलि तूस गांवांत जन्म पावलेला फिरदोसी हा आपल्या अद्भुत काव्यशक्तीनें आणि इराणच्या प्राचीन कथांच्या माहितीनें तें काम करण्यास अत्यंत पात्र आहे असें दिसून आल्याबरोबर त्यानें तें काम फिरदोसीस सांगितलें. अलबिरूनीला त्यानें जें साहाय्य केलें त्यावरून तर संस्कृत वाङ्मय,तत्त्वज्ञान व शास्त्रीय ज्ञान यांविरुद्धहि त्याचा आक्षेप नव्हता असें स्पष्ट दिसून येतें. अलबिरूनी व फिरदोसी सारख्या असाधारण बुद्धिमत्तेच्या अनेक पंडितांनीं, कवीनीं व तत्त्ववेत्त्यानीं त्याचा दरबार उज्वल करून प्राचीन काळच्या विक्रमादित्याप्रमाणें किंवा अर्वाचीन काळच्या अकबराप्रमाणें महमुदाची कीर्ति अजरामर केली आहे. या कारणांमुळें महमुदावर जो लोभिष्टपणाचा सर्वप्रचलित आरोप करण्यांत येतो, त्यांत फारसें तथ्य आहे असें आम्हाला वाटत नाहीं.

टिप्पणी. तबकात--इ नासिरी मधलि महमुदाचें गुणवर्णन.

महमुदानें आपल्या वीर्य, शौर्य, धैर्य, शहाणपणा, दूरदृष्टि, विवेकयुक्त सल्लामसलत व परिणामकारक उपाययोजना या गुणांनीं पूर्वदिशेला फार मोठा प्रांत जिंकून तेथें मुसलमानीराज्याचा विस्तार केला. खुरासान, ख्वारिझम, तबरिस्तान, इराक, निमरोज व फार्स हे प्रान्त व घोर व तुखरिस्थानचा डोंगराळ मुलुख हे सर्व त्याच्या अंमलात आले होते व त्यावर त्याचे अंमलदार अंमल करीत होते. तुर्कस्थानच्या मलिकांनीं त्याचें मांडलिकत्व कबूल केलें होतें. त्यानें जिहून ( ऑक्सस ) नदीवर पूल बांधला, व तुराणावर स्वारी केली. तुर्कस्थानच्या खाकानांनीं

त्याच्या तळावर येऊन त्याचें सम्राटत्व मान्य केलें त्याच्या विनंतीवर महमुदानें सेलजुकच्या मुलाला आपले सर्व भाऊबंद व आश्रित यांस घेऊन जिहून उतरून खुरासानमध्यें जाण्याची परवानगी दिली. त्या काळचे दूरदृष्टिचे लोकांना ही परवानगी देतांना महंमुदानें मोठी चूक केली असे वाटलें, कारण महंमदाच्या मुलाबाळांस यांत धोका आहे हें त्यांच्या ध्यांनीं आलें होतें. पा. ८६.

## महमुदाचें राजनीतिनिपुणत्व.

महमूद हा राजनीतिनिपुण राजा नव्हता असें जें लेनपूलनें त्याचे बद्दल म्हटलें आहें त्याला कांहीं आधार आहे असें आम्हांस वाटत नाहीं. तो मृत्यु पावतांच त्याचें साम्राज्य ढासळूं लागलें तें तो राजनीतिनिपुण नव्हता म्हणून नव्हे. त्याचीं कारणें अगदीं निराळीं आहेत. महमुदानें राज्यकारभाराची एखादी नवीन पद्धति सुरू केली किंवा नाहीं, अथवा त्यानें हस्तगत केलेले प्रांत निगडित करून सुसंघटित करण्याचा प्रयत्न केला किंवा नाहीं, हेंच अगोदर खात्रीलायक सांगतां यावयाचें नाहीं. हें म्हणणें सिद्ध करण्यास किंवा तें खोडून टाकण्यास कोणताहि लेखी पुरावा नाहीं. अकबराचे कारकीर्दीचे सविस्तर वर्णन अबुलफझलनें आपल्या ऐने-अकबरींत लिहून ठेवलें आहें. परंतु महमुदानें आपल्या साम्राज्याचा कारभार कसा चालविला याचें वर्णन करणारा ग्रंथकार कोणी झाला नाहीं. तथापि त्याचें राज्य सुसंघटित व सुव्यवस्थित होतें याबद्दल संशय नाहीं. उत्बीनें असा उल्लेख केला आहे कीं गझनीस त्याच्या स्वाऱ्यांची हकीकतहि लिहून ठेवली जात असे आणि महमूद स्वतः लढाईच्या धामधुमींतहि आपल्या हालचालीच्या हकीकती (Dispatches) लिहून बाबराप्रमाणें घरीं पाठवीत असे. लढाईच्या धुमश्चक्रींत व लुटीच्या धांदलींतहि मथुरेच्या देवालयाच्या सौंदर्याची प्रशंसा करणारा त्यानें मथुरेहून पाठविलेल्या एका वर्णनांतील एक

पूर्वोल्लिखित उतारा उत्बीनें दिला आहे. निरनिराळ्या प्रांतांचे व त्यांच्या जमाखर्चाचे तक्ते ठेवण्यांत येत असत; व प्रांताधिपतींवर तपासणी करण्यासाठीं एक स्वतंत्र प्रधान नेमलेला असून त्याची कचेरी व्यवस्थितपणें काम करीत असे. बैहकीनें दिलेल्या ऐकींव गोष्टींवरूनहि असें स्पष्ट दिसून येतें कीं, त्याच्या राज्यकारभारांत सुयंत्रितता होती. तेव्हां त्याच्या राज्यकारभाराची पद्धति कशी होती हें आपणांस माहित नसलें तरी ती सुव्यवस्थित होती यांत संशय नाहीं. ती पद्धति नवीनच होती कीं पूर्वीं गझनीचा ज्या सामानी साम्राज्यांत अंतर्भाव होत होता त्या सामानी साम्राज्याच्या राज्यपद्धतीचें तींत अनुकरण केलें होतें हें सांगतां येण्याजोगें नाहीं. आणि जुन्याच पद्धतीचें महंमुदानें काळजीपूर्वक व सूक्ष्मपणें अनुकरण केलें, असें असलें, तरी त्यांत त्याची मुत्सद्देगिरीच दिसून येते. शिवाजीनें सुद्धां आपल्या स्वराज्याच्या व हिंदुपदपातशाहीच्या नव्या भावनेला आवश्यक असे अनेक फेरफार केले तरी बव्हंशानें विजापुरकरांची जुनीच राज्यपद्धति कायम ठेविली होती. अकबराची राज्यपद्धति नवीन आणि अपूर्व होती हें खरें; परंतु वंश व धर्म यांनीं भिन्न असलेल्या विस्तृत अशा साम्राज्यावर त्याला राज्य करावयाचें होतें आणि त्यांतील निरनिराळे प्रांत जमीन, हवापाणी आणि जनता या सर्व बाबतींत एकमेकांपासून अत्यंत भिन्न होते.

आतां लष्करी व्यवस्थे संबंधें पाहतां अकबर किंवा शिवाजी यांनीं आपल्या लष्कराची व्यवस्था कशी केली होती हें इतिहासांत प्रसिद्ध आहे, परंतु या बाबतींत महमुदाची व्यवस्था कशी होती याची माहिती उपलब्ध नाहीं. तथापि त्याच्या लष्कराची संघटना सुसंबद्ध व सुदृढ असावी; कारण कनोज किंवा सोमनाथासारख्या दूरच्या प्रदेशांत, नद्या, पर्वत, व वाळवंटें यांतून नेण्यासारखीं व तटबंदीवर मारा करण्याजोगी उत्कृष्ट साधनें व यंत्रें त्याच्या सैन्यांत

होतीं हें निर्विवाद आहे. गार्डस अथवा रक्षक यांच्या पथकांची त्यानें केलेली रचना फक्त त्याच्याच सैन्यांत दिसून येते. आपल्या लोकांतून निवडून काढलेल्या या उत्कृष्ट ५००० शरीर–रक्षकांचा ( बॉडी गार्डचा ) महंमुदानें ऐन वेळीं योग्य उपयोग करून घेऊन नेहमीं लढाईंत यश संपादन केलें हें प्रसिद्ध आहे.

तेव्हां महमुदानें आपल्या राज्यकारभारांत नवीन पद्धति सुरू केली नाहीं किंवा आपल्या प्रांतांना सुसंघटित व एकजीव करण्याचा प्रयत्न केला नाहीं असें म्हणण्यास कांहीं एक कारण दिसत नाहीं. इतकेंच नव्हे तर त्याची मुलकी व लष्करी व्यवस्था सुयंत्र व सुदृढ होती असेंच म्हणणें जरूर आहे. त्याचें साम्राज्य तो मरण पावतांच विस्कळलें यांचें कारण आमच्या मतें असें आहे कीं त्याच्यामागून त्याच्या गादीवर आलेले राजे राज्यकारभार करण्यास आणि सैन्याचें नेतृत्व स्वीकारण्यास नालायक होते. सर्वच अनियंत्रित राज्यपद्धतींचा हा प्रमुख दोष आहे. मोंगल वंशाप्रमाणें मनानें आणि शरिरानें तेजस्वी असे एकामागून एक झालेले राजे क्वचितच दृष्टोत्पत्तीस येतात. त्या घराण्यांत मात्र बाबरापासून अवरंगजेबापर्यंत अनुक्रमानें सहा सम्राट् कर्तृत्वानें व सामर्थ्यानें विख्यात असे होऊन गेले. शिवाजीहि महंमदाप्रमाणेंच आपल्या वारसाच्या बाबतींत अभागी होता. आणि अठराव्या शतकांत मराठी राज्याची जी भरभराट झाली ती पेशव्यांच्या प्रभावानें झाली. त्यांच्या चार पिढ्या सारख्याच जोमाच्या झाल्या आणि ते सर्वच प्रसिद्ध मुत्सद्दी व सेनापतिहि होते. ब्रिटिश साम्राज्याची बळकटीहि त्यांच्या राज्यव्यवस्थेचा चांगुलपणा नसून वर इंग्लंडांतील शासनपद्धतीच्या असाधारणपणावर अवलंबून आहे. इंग्लंडांत अनियंत्रित राज्यपद्धति तर नाहींच, पण तेथील राज्यकारभार राजा, उमराव व लोकप्रतिनिधि यांचे हातांत असल्यामुळें जुलमी व विषयासक्त राजे राज्यावर येणें

आणि नालायख व महत्वाकांक्षी गव्हर्नर किंवा गव्हर्नरजनरल हिंदुस्थानांत राज्य करण्यास येणें अशक्य आहे. कायदे निर्दोष नसले किंबहुना चांगले नसले तरी चालतील. राज्याची बळकटी व भरभराट कायद्यांचा पूर्ण अंमल करण्यावर अवलंबून असते. इंग्लंडांतील राज्यपद्धतींत कायद्यांची अंमलबजावणी शिथिल होणार नाहीं, अशी काळजी घेतलेली असल्यामुळें कर्तृत्ववान शास्त्यांचीं व सेनानायकांची अव्यावहत परंपरा चालू आहे. अनियंत्रित राज्यपद्धतींत अनेक राजानां केवळ जन्मामुळें अमर्याद राजसत्तेचा वारसा प्राप्त होत असल्यामुळें ते चैनी निपंजतात आणि सामर्थ्यहीन झाल्यामुळें त्यानां महत्वाकांक्षी सेनानायकांस अगर प्रांताधिकाऱ्यांस आपल्या कह्यांत ठेवतां न आल्यामुळें निरानिराळे प्रांत राज्यांतून फुटून बाहेर पडतात व शेवटीं राजघराणेंहि नष्ट होतें. आणखी मर्यादित राजसत्तेंत व लोकसत्तेंत राष्ट्रीय भावनेचें संवर्धन होतें व त्यामुळें राज्याची किंवा साम्राज्याची शक्ति दृढ होते. कारण मध्येंच एखादा प्रांताधिकारी किंवा सेनापति महत्वाकांक्षी निघाला तरी जोमदार राष्ट्रीय भावनेमुळें प्रजा अथवा सैन्य त्यास मदत करण्यास पुढें येत नाहीं. सारांश महमुदाच्या साम्राज्याचे त्याच्या निधनानंतर जे तुकडे तुकडे झाले, ते त्याच्या राज्यपद्धतीच्या सदोषतेमुळें नसून तिच्या अनियंत्रिततेमुळें झाले. अनियंत्रित राज्यपद्धतींत कर्तृत्ववान राजांची व लायक आणि महत्वाकांक्षाविन्मुख प्रांताधिकाऱ्यांची परंपरा राहणें कठिण असतें. त्याचप्रमाणें महत्वाकांक्षी प्रान्ताधिकाऱ्यांस स्वतंत्र गादी स्थापणें अशक्य करणारी लोकांच्या हृदयांतील राष्ट्रीय भावना त्यावेळीं उद्भूत झाली नव्हती हें हि त्याच्या साम्राज्याच्या विलयाचें कारण आहे. त्याचें साम्राज्य त्याच्या पश्चात् विस्कळित झालें यावरून महमूद हा मुत्सद्दी अथवा राज्यकार्यधुरंधर नव्हता असें ठरत नाहीं.

## टिप्पणी–महमूद किंवा शिवाजी लुटारू होता काय ?

व्हिन्सेन्ट स्मिथ यांनीं लिहिलेल्या ऑक्स्फर्ड हिस्टरी ऑफ इंडिया या ग्रंथांत महमुदाबद्दल सर्वांत अधिक निंदास्पद विधान केलेलें आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं, " हिंदुस्थानच्या बाबतींत तरी महमूद हा केवळ लुटारू होता. त्याच्या लुटारूपणाचें प्रमाण प्रचंड होतें येवढेंच. पंजाब व्यतिरिक्त इतर प्रदेश त्यानें कायमचा जिंकण्याचा प्रयत्न केला नाहीं आणि अमोलिक वस्तु व चिरस्मरणीय देवालयें यांच्या विध्वंसापलीकडे त्याच्या स्वाऱ्यांचा परिणाम कांहींएक झाला नाहीं. " शिवाजीप्रमाणेंच महमुदानें हिंदुस्थानांत लुटीसाठीं केलेल्या स्वाऱ्या इतक्या अनेक आणि यशस्वी होत्या कीं कोणाचेंहि लक्ष स्वाभाविकपणेंच या लुटींवर वेधून जातें व शिवाजी काय किंवा महमूद काय प्रख्यात चोर, यशस्वी लुटारू, होता अशा दृष्टीनें त्यांच्याकडे पाहण्याची प्रवृत्ति होते. अनेक इतिहासकारांनीं महमुदाबद्दल अशाच दृष्टीनें लिहिलें आहे व त्यानें केवळ लुटालूट केली, कोणताहि प्रांत कायमचा काबीज केला नाहीं असें म्हणून त्याची किम्मत कमी लेखिली आहे. परंतु एखादा प्रांत हस्तगत करून राज्यविस्तार करणें हें लुटारूपणापेक्षां कमी निंद्य आहे काय ? आमच्या मतें तर राज्य खालसा केल्यानें दुसऱ्यांच्या स्थावर मालमत्तेचा व विशेषतः त्यांना अत्यंत मौल्यवान् वाटणाऱ्या त्यांच्या जमिनीचा अपहार करण्यांत येतो. आणि राज्य खालसा करितांना जरी जिंकलेला प्रदेश कायमचा काबीज होऊन त्यांत व्यवस्थित राज्य सुरू होते तरी त्यानें नवीन सुखावह राज्यपद्धति अमलांत येते असें नाहीं. मुसलमानी राज्यपद्धति हिंदु राज्यपद्धतीपेक्षां अधिक चांगली कधींच नव्हती आणि तशी ती होऊंहि शकली नसती. आणि कोणतेंहि परराज्य स्वराज्यापेक्षां केव्हांहि वाईटच. कारण त्यामुळें प्रजाजनांची व्यवस्थित व कायदेशीर लूट मात्र सतत चालू होते. परकी राज्यांत अपरिहार्य जबर करबंदी झाल्यानें प्रजाजनांच्या संरक्षणास आवश्यक असलेल्या करांपेक्षां अधिक कर–वसूल होऊं लागल्यानें केवळ व्यवस्थित तऱ्हेनें लूट चालू होते असें म्हटलें पाहिजे. महमुदानें हिंदुस्थानचा कोणताहि प्रांत आपल्या राज्यांत

सामील करण्याचा किंवा कायमचा काबीज करण्याचा प्रयत्न केला नाहीं, असें म्हटलें तर खरोखरच महमुदास उच्च कोटींत नेऊन बसवावा लागेल. कारण त्यानें दुसऱ्यांचें स्वातंत्र्य हिरावून घेण्याची किंवा त्यांच्यावर परराज्याचें जूं लादण्याची हांव धरली नाहीं असें म्हणावें लागेल. परंतु हें अलौकिक यश त्याच्यागाठीं बांधतां येण्याजोगें नाहीं. कारण सामान्य राजांप्रमाणेंच त्यानें हिंदु राजांचे प्रांत खालसा करून आपल्या राज्यांत सामील करण्याचा शक्य तो प्रयत्न केला हें आपणांस दिसून येतें. ब्रिटिशांनीं ज्याप्रमाणें मुंबई, मद्रास व कलकत्ता या आपल्या केंद्रांतून राज्यविस्तार केला त्याप्रमाणेंच एखाद्या चाणाक्ष मुत्सद्याप्रमाणें किंवा राजनीतिनिपुणाप्रमाणें गझनीभोंवताली क्रमाक्रमानें आपल्या राज्याचा विस्तार करीत महमुदानें आपलें साम्राज्य कसें उभारलें तें पाहूं या.

सुरुवातीस तो झबुलिस्तानचा म्हणजे गझनीच्या भोंवतालच्या प्रांताचा राजा होता. हा प्रांत एका कालीं रजपूतांच्या ताब्यांत होता. त्यांपासून तो त्यानें घेतला. तो सामानी सम्राटांच्या वतीनें खोरासानचा प्रांताधिकारीहि होता. ऑक्झसच्या पलीकडील तुर्की टोळ्यांच्या स्वाऱ्यांनीं सामानी साम्राज्य जेव्हां खिळखिळें करून बुडविलें तेव्हां त्यानें खोरासान आपल्या राज्यांत सामील करून घेतलें; व इलेक्खान् तुर्काला सामानी साम्राज्यांतील ऑक्झस पलीकडील उत्तरेचा प्रांत म्हणजे मवरुन्नहर काबीज करू दिलें. याप्रमाणें या दोघां प्रबळ राजांनीं एकमेकांची सोय करून घेतली. पुढें इंग्रजांप्रमाणेंच क्रमाक्रमानें महमुदानें झाबुलिस्तानच्या पूर्व बाजूस व खोरासानच्या पश्चिम बाजूस आपल्या राज्याचा विस्तार केला. हेंहि पुनः त्यानें घाईनें एकदम केलें नाहीं. महमुदानें किंवा त्याच्या बापानें अगोदर काबुलिस्तान हस्तगत केलें; नंतर हल्लींच्या वायव्य सरहद्दी प्रांताचा खालचा भाग बन्नु व त्या लगतचा प्रदेश यांवर आपला अंमल बसविला व शेंवटीं उत्तरेकडचा भाग पेशावर व वहिंद हे आपले करून घेतले. आपल्याला हें माहितच आहे कीं हे तिन्ही प्रांत काबूलचा शाही वंशाचा ब्राह्मण राजा जयपाल याचे होते. जयपाल सर्व पंजाबावरहि राज्य करीत असे. इंग्रजांनीं ज्याप्रमाणें दक्षिणेंत मुंबईत बसून पेशव्यांचे हातून वसई वगैरे एकामागून एक जिल्हे आपल्या राज्यांत सामील

केले त्याप्रमाणेंच महमुदानें जयपालाचा एक एक प्रांत हस्तगत करण्याची युक्ति केली, त्यास एकदम निराश करून टाकलें नाहीं. बाजीरावाप्रमाणें आनंदपालाकडे सिंधूच्या पश्चिमेकडील सर्व राज्य गेल्यानंतर पंजाबचा प्रांत शिल्लक ठेवण्यांत आला होता. त्याच्याकडून त्या प्रांताबद्दल खंडणी घेण्यांत येत असे. अखेरीस अपरिहार्य असणारा शेवटचा घाव त्यावर पडला आणि बाजीराव व आनंदपाल या दोघांचींहि राज्यें नाहींशीं झालीं व तीं विजयी सत्तांनीं आपल्या राज्यांत सामील करून टाकलीं. महमुदाच्या पूर्वेकडील साम्राज्यांतील अत्यंत मोठा प्रांत जो पंजाब त्याचा अपवादानें उल्लेख करण्यांत व्हिन्सेन्ट स्मिथनें महमुदानें आपल्या निरनिराळ्या स्वाऱ्यांत मोठमोठे प्रांत कसे काबीज केले व आपल्या राज्याचा विस्तार केला याची कबुलीच दिली आहे.

इतकेंच नाहीं; जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांस जबरीनें बाटवून व मुसलमान करून आपल्या साम्राज्याचें दृढीकरण करण्याचाहि महमुदानें प्रयत्न केला. राज्याच्या एकीकरणास त्या राज्यांतील लोकांच्या धर्मभावना एकच असणें कसें ज़रूर आहे हें महमुदानें ओळखलें होतें. त्यानें उत्तरेस घोर प्रांतात व अफगणिस्तानच्या ईशान्य भागांत स्वात व बिजौर या प्रांतांतील लोकांस बाटविण्याचा पद्धतशीर प्रयत्न पण सुरू केला. पण सिंधूनदीच्या पश्चिमेकडील भागात जितक्या जोरानें हा उपक्रम करण्यांत आला तितक्या जोरानें तो पूर्वभागांत झाला नाहीं. पंजाबांत बाटविण्याच्या उपक्रमाचा जोम फार दिवस टिकला नाहीं. तरी सुद्धां पंजाबांत विशेषतः पश्चिमभागांत बहुतेक लोकांस सक्तीनें मुसलमान करण्यांत आलें आणि आजमितीलाहि या सक्तीच्या धर्मत्यागाचें परिणाम स्पष्ट दिसत आहेत. हिंदूंच्या दृष्टीनें ही फार मोठी आपत्ति होती. परंतु मुसलमान राजा या नात्यानें आपल्या राज्यालगतच्या व आपल्या अंमलाखालीं आलेल्या प्रांतांतील लोकांस बाटविण्यांत महमुदाचे राजकीय धोरण दिसून येतें यांत संशय नाहीं. *

---

*सर्व लोकांस मुसलमान केल्यास पंजाबांतील पूर्वीचे हिंदु लोक मुसलमानांच्या बरोबरीचें हक्क मागतील व बंडहि करतील तेव्हां सर्वांस न बाट-

याविरुद्ध असा आक्षेप काढितां येण्याजोगा आहे कीं, महमुदाच्या शेवटच्या स्वाऱ्या, म्हणजे मथुरा, कनोज व सोमनाथ यांवरील स्वाऱ्या केवळ लुटीसाठीं केलेल्या होत्या; राज्यविस्ताराची किंवा जिंकलेला प्रदेश कायमचा आपल्या अंमलाखालीं आणण्याची महमुदाची त्या स्वाऱ्यांत तरी इच्छा नव्हती. परंतु हें म्हणणें देखील सत्याला धरून नाहीं. अंतर्वेदी, औध अगर गुजराथसारखे दूर अंतरावरचे प्रदेश एकाएकीं राज्यांत सामील करून टाकतां येणें किंवा त्यांवर कायमचा अंमल बसविणें शक्य नव्हते. सुरुवातीस खंडणी अथवा कांहीं लाग वसूल करणें व शेंवटीं दरम्यानचा प्रांत सर्वस्वी पचून गेल्यानंतर पुढचा आपल्या राज्यांत सामील करून ठराविक पद्धतीनें क्रमाक्रमानेंच राज्यविस्तार करणें अवश्य होतें. याच पद्धतीनें इंग्रजांनीं बंगाल, त्यानंतर बिहार, त्यानंतर औध व शेवटीं पंजाब कायमचे आपले केले. कनोजचा राज्यपाल हा प्रथम महमुदाच्या हातून निसटला तेव्हां महमुदानें पुनः औधवर स्वारी केली, बारी हस्तगत केली आणि शेवटीं राज्यपालाला खंडणी देण्यास भाग पडलें हें ध्यानांत धरलें पाहिजे. कनोजच्या राज्यानें ही खंडणी गझनीस अनेक वर्षें पावेतो दिली असावी. कारण कोरीव लेखांत आपल्याला असा पुरावा सांपडतो कीं सर्व कनोज राज्यांत जमिन महसुलाबरोबरच हा खंडणीचा कर सर्व प्रजेकडून वसूल करण्यांत येत असे. विद्वान् लोकांस या वेळच्या ताम्रशासनांतील " तुरुष्कदंड " या शब्दाचें (तुर्कांसाठीं वसूल केलेला कर याचें) इंगित लक्षांत आलें नाहीं याचें आश्चर्य वाटतें. या कालांतील कनोज प्रांतांतील कोरीव लेखांतच तुरुष्कदंडाचा उल्लेख आढळतो. त्रिलोचनपालाच्या झुशी येथील १०२६इ.च्या शिलालेखांत तुरुष्कदंडाचा उल्लेख नाहीं. परंतु या नंतरच्या कोरीव लेखांतील उल्लेखांवरून गाहडवाल राजे देखील त्यांचा गझनीच्या राज्यांशीं कोणताहि संबंध नसतां हा कर वसूल करीत असत असें दिसून येतें. बेजबाबदार राजे एकदां सुरू झालेला व फार वर्षे वसूल होत असलेला कर त्याचें प्रयोजन नाहींसें झाल्यावरहि वसूल करतात हें

---

वितां अर्ध्यांसच बाटवावें व अशा तऱ्हेनें दुही कायम राखावी म्हणूत महमुदानें निम्मे लोकांसच मुसलमान केलें असावें काय ?

स्वाभाविक आहे. ते तो क्वचितच बंद करणार. असो, या तुरुष्कदंडावरून मराठ्यांच्या चौथेची आठवण होते. चौथ वसूल करण्यासाठीं मोंगलांच्या राज्यांत मराठ्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांची व्यवस्थित योजना केली होती, त्याचप्रमाणें तुर्की सैनिक व अधिकारी हा दंड वसूल करण्यासाठीं कनोजच्या राज्यांत राहिले असण्याचा संभव आहे. व याच तुर्कांस भोजानें अथवा कर्णानें हांकून लाविलें असावें असें आम्हीं यांच्या वृत्तान्तांत दाखविलें आहे. तुरुष्कदंडाचा उल्लेख फक्त कनोज राज्याच्या प्रांतांतील दानलेखांतच आहे. तो चेदी किंवा बंगाल प्रांतांतील कोणत्याहि दानलेखांत नाहीं; त्याचप्रमाणें परमार किंवा सोलंखी राजांच्या ताब्यांतील मुलुखांतील म्हणजे माळवा व गुजराथ प्रांतांतील कोरीव लेखांत कोठेंहि त्याचा उल्लेख नाहीं, याची आम्ही खात्री करून घेतली आहे. यावरून असें निर्विवाद दिसून येतें कीं, महमूदानें कनोजवर कायमची खंडणी बसविली होती. इंग्रजांनीं एकोणिसाव्या शतकांत ज्याप्रमाणें आपलें धोरण अबाधित राखलें त्याप्रमाणें महमुदानंतर त्याच्या गादीवर आलेल्या राजांनीं जर त्याचें धोरण जोमानें पुढें चालविलें असतें तर कांहीं कालानें कनोज त्यांच्या राज्यांत सहज सामील होऊन गेले असतें. सोमनाथाची स्वारी देखील कधीं काळीं सफल होणाऱ्या राज्य-विस्ताराच्या इच्छेनेंच महमुदानें केली होती. अशा तऱ्हेच्या स्वाऱ्या केवळ लुटीसाठीं केलेल्या असल्या तरी त्यांनीं शेजारच्या राज्यांची शक्ति ढांसळते व शेवटीं राज्य-विस्ताराचा मार्ग मोकळा होतो. या कारणांनीं महमूद हा केवळ लुटारू होता, त्याला राज्य-विस्ताराची इच्छा नव्हती अशी त्याच्या बद्दल कल्पना करून घेणें इतिहासकारास शक्य नाहीं. त्यानें काबूलापासून लाहोरपर्यंतचें सर्व विस्तृत शाही राज्य आपल्या राज्यांत सामील करून टाकलें. तें काय थोडें होतें ? हें स्पष्ट दिसत असतां महमुदाला राज्य-विस्ताराची कल्पना नव्हती असें म्हणणें हें मानवी स्वभाव व प्रत्यक्ष इतिहास या दोहोंच्याहि विरुद्ध आहे.

परंतु राज्य-विस्ताराचा कोणताहि हेतु मनांत न धरितां केवळ लुटीसाठीं म्हणून महमुदानें हिंदुस्थानांत स्वाऱ्या केल्या असें धरून चाललें तरी पुष्कळ इतिहासकारांनीं महमुदाचे जे डाकू, लुटारू म्हणून वर्णन केलें

आहे तें योग्य होईल काय ? हाहि प्रश्न विचारार्ह आहे. अशा तऱ्हेच्या चुकीच्या वर्णनानें अयथार्थ कल्पनांचा प्रादुर्भाव होतो व त्यामुळें कसे अनर्थकारक परिणाम होतात हें विस्तारानें सांगण्याची अवश्यकता नाहीं. आणि म्हणून इतिहासांत वापरावयाचे शद्व अधिक काळजीनें वापरले पाहिजेत व ऐतिहासिक व्यक्तींचें वर्णन वस्तुस्थितीला धरून केलें पाहिजे. इतिहासांत दोन प्रसिद्ध पुरुषांच्या बाबतींत या प्रकारचा फार मोठा अन्याय झाला आहे. महमूद व शिवाजी यांचें बहुधा दरोडेखोर किंवा लुटारू असें वर्णन बहुशा करण्यांत येतें. त्यांनीं लुटीसाठीं केलेल्या अनेक स्वाऱ्या; त्यांत त्यांस सदैव मिळालेला विजय आणि त्यामुळें त्यांना प्राप्त झालेली अमर्याद संपात्ति यामुळें वाचकांचे डोळे दिपावतात व त्यांस हें वर्णन खरें वाटूं लागतें. पण आपण हें विसरतों कीं महमूद आणि शिवाजी यांस वास्तविकपणें दरोडेखोर किंवा लुटारू म्हणणें योग्य नाहीं. आणि या शब्दांनीं जेव्हां त्यांचें वर्णन केलें जातें तेव्हां या शब्दांनीं जो नैतिक अधःपात सूचित होतो तो वगळूनच ते शब्द समजले पाहिजेत. खून आणि दरोडे हे कायद्यानेंच नव्हेत तर नैतिक दृष्टीनेंहि गर्हणीय आहेत हें विसरतां कामा नये. ‘ अलेक्झांडर व दरोडेखोर ’ यांची गोष्ट विनोदपूर्ण आहे परंतु तिनें प्रस्थापित होणारे तत्व मात्र चुकीचें आहे. दरोडेखोर हा आपल्याच देशबांधवांची संपात्ति बळजबरीनें लुटतो तर अलेक्झांडर आपल्या शत्रूंचा प्रदेश लुटीत होता आणि तो दरोडेखोराप्रमाणें नीति–दृष्टया दोषी नव्हता. एखाद्या व्यक्तीनें प्रजा होऊन एखाद्या सरकारची सत्ता कबूल करणें म्हणजे कोणत्याहि प्रसंगीं आपल्या मनगटाच्या शक्तीचा उपयोग न करितां आपल्या फिर्यादींची दाद सरकारच्या मार्फत लावून कोणाचीहि वस्तु कायदेशीर रीतीनें घेईन, अन्य रीतीनें घेणार नाहीं असें मान्य करणें आहे. व आपल्या अशक्त शेजाऱ्याची स्थावर किंवा जंगम मिळकत त्याच्या स्वतःच्या संमतीशिवाय किंवा कायद्याच्या मार्गाखेरीज आपण हिरावून घेणार नाहीं, किंवा केवळ संरक्षणाच्या कायदेशीर प्रसंगाखेरीज दुसऱ्यास इजा करणार नाहीं, असा करार तो करितो; यामुळें ती व्यक्ति जेव्हां आपल्या प्रजाबन्धूंचा जीव अथवा मालमत्ता अन्यायानें हरण करिते तेव्हां ती खून किंवा दरोडा हा गुन्हा करिते आणि तिनें केलेला गुन्हा

कायद्याप्रमाणेंच नव्हे, नीति-दृष्टयाहि मानलेला असतो. स्वतंत्र देशांचें किंवा राष्ट्रांचें संबंध या प्रमाणें व्यक्त किंवा अव्यक्त कबुलीवर अजून रचले गेले नाहींत. राष्ट्रांच्या व्यवहारांत पाशवी शक्तीचा किंवा मात्स्य-न्याय सर्व इतिहासभर चालत आलेला दिसतो. या मात्स्यन्यायानें, म्हणजे मोठ्या राष्ट्रानें लहान राष्ट्रावर केव्हांहि व कोणत्याहि कारणासाठीं झडप घालावी आणि त्याचा प्रदेश व संपत्ति यांचा अपहार करावा ही जी अनिष्ट परंपरा सुरू होते ती गेल्या युरोपीय महायुद्धानें सर्व राष्ट्रांच्या नजरेस स्पष्टपणें आल्यानें राष्ट्रसंघाची व्यवस्था अमलांत आली आहे व यापुढें अशक्त राष्ट्रास स्वतंत्र राहण्याचा हक्क आहे हे मान्य होईल. पण मागील काळांत परंपरागत रूढीनें व लोकांच्या सामान्य समजुतीप्रमाणें प्रत्येक बलिष्ठ राष्ट्राला बलहीन राष्ट्रावर स्वारी करून त्याचा प्रदेश व त्याची संपत्ति हिरावून घेण्याचा निर्विवाद हक्क असे. जरी एखादी अपवादक व्यक्ति मी बलाचा उपयोग दुसऱ्याचे राज्य हरण करण्यास करणार नाहीं अशा उच्च तत्वाची इतिहासांत सांपडेल. 'नेशे बलस्येति चरेदधर्मम्' या महाभारतोक्त महान् तत्वाप्रमाणें चालणारी एखादी 'मेरीया थेरेस्सा' पोलंडवर स्वारी करणार नाहीं. किंवा एखादा अशोक कलिंग जिंकतांना लाख मनुष्यें मारलेली पाहून तीव्र पश्चात्ताप होऊन मी यापुढें युद्ध करणार नाहीं, अशी प्रतिज्ञा करणारा राजा मिळेल. पण या अपवादानें सामान्य नियम अधिक सिद्ध होतो आणि इतिहासांत बलिष्ठ राष्ट्रें अशक्तास गिळंकृत करतानांच नेहमीं दिसतात. भारतीय दिग्विजय तरी याच तत्वावर झाले. युद्धमान राष्ट्रास लुटीचा हक्क तर पूर्वीपासून सर्वत्र मानला गेला आहे. गेल्या महायुद्धांत जर्मनीनें फ्रान्सास लुटलेलें आपण पाहिलें आहे. अशा लुटीमुळें दुर्बळ राष्ट्राची बचावाची ताकद कमी होते व प्रबल राष्ट्राची चढाईची शक्ति वाढते हें लक्षांत लिहिलें नाहीं. इंग्लंडनें ही गोष्ट कैक वेळां केली आहे. इंग्लंड व स्पेन यांचे दरम्यान युद्ध चालू असतां ड्रेक व हॉकिन्स यांनीं अमेरिकेहून सोनें भरून येणारीं स्पेनचीं जहाजें कित्येक वेळां लुटलीं आहेत. युद्धाची सबब नसतांहि ड्रेकनें चिली व पेरूचीं शहरें लुटलीं, परंतु इंग्रजी इतिहासकारांनीं त्याच्या या कृत्यावरून त्यास दरोडेखोर म्हणून संबोधिलें नाहीं. हिंदुस्थानच्या

इतिहासांत इंग्रजांनीं पॉंडीचरीस फ्रेंचांस लुटलें आणि १८५७ च्या बंडांत लढाईस उभे राहून वेढ्यांत पडलेलें झांशी शहर हस्तगत झालें, तेव्हां तेथील नागरिकांची कत्तल करून तें शहर लुटण्यांत आलें. पण असें असूनहि हीं इंग्रजींचीं कृत्यें खून आणि दरोडे आहेत असें त्यांचें कायद्याच्या किंवा नीतिशास्त्राचे दृष्टीनेंहि वर्णन करितां येणार नाहीं किंवा त्यांचा अधिक्षेप करितां येणार नाहीं. महमुदानें किंवा शिवाजीनें आपल्या प्रजांस तर कधींच लुटलें नाहीं, हें ध्यानांत ठेवले पाहिजे. चोऱ्या करणाऱ्यांस त्यानें नेहमीं शासन केले आहे. शिवाजीला राजा या नात्यानें आपण करावयाच्या कर्तव्याची जाणीव इतकी जागृत होती कीं जेव्हां जेव्हां त्याच्या प्रजाजनास त्याचे किंवा शत्रूचेहि सैनिक लुटीत तेव्हां तेव्हां तो त्यांच्या नुकसानीबद्दल भरपाई करून देत असे. तात्पर्य शिवाजी किंवा महमूद यांचा इतिहासांत लुटारू किंवा दरोडेखोर म्हणून जेव्हां उल्लेख करण्यांत येतो तेव्हां त्या शब्दांचा जो स्वाभाविक निंदाव्यंजक अर्थ तो कधींहि अभिप्रेत नसतो हें पूर्णपणें ध्यानांत वागविलें पाहिजे. हे ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं शिवाजीनें स्वराज्य स्थापनेच्या उच्च उद्देशानेंहि खून कधींच केला नाहीं किंवा तो करण्यास कोणास प्रवृत्त केलें नाहीं * आणि शिवाजीनें मोगल किंवा विजापुर राज्यांतील श्रीमंत शहरें लुटलीं तीं त्या राज्यांशीं त्याचें युद्ध असतां व आपण स्वतंत्र राजे आहों अशी स्पष्ट वा प्रत्यक्ष राजसत्ता धारण केल्यावर लुटलीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. अशा रीतीचा लुटण्याचा हक्क वर सांगितल्या-

---

* चंद्रराव मोरे याचा खून शिवाजीनें करविला अशी समजूत कित्येकांची व यदुनाथ सरकारचीहि आहे. पण ती चुकीची आहे. शिवाजीनें जावळीवर स्वारी केली तेव्हां मुख्य चंद्रराव मोरे हा दत्तक आलेला अज्ञान होता व तो रायगडला निसटून गेला हें आतां सिद्ध झालें आहे. त्याचप्रमाणें त्याचा दत्तक देणारा बाप लढाईत मारला गेला. प्रस्तुत स्थलीं ह्या विषयाचा ज्यास्त ऊहापोह न करितां चंद्रराव मोरे आणि शिवाजी हा मराठींत निबंध आम्ही लिहिला आहे तो वाचण्याची वाचकांस शिफारस करतो.

प्रमाणें युद्धमान राष्ट्रे (Belligerents) यांनीं नेहमीं चालविला आहे.

सारांश महमूद किंवा शिवाजी यांचे नेहमींच्या अर्थानें दरोडेखोर म्हणून वर्णन करणें ऐतिहासिक व तत्वज्ञानाच्याहि दृष्टीनें चुकीचे आहे. त्यांचीं कृत्यें राजा या नात्यानें दुसऱ्या राजाशीं प्रत्यक्ष युद्ध करीत असतां झालेलीं आहेत. अर्थात् त्यांस सामान्य कायद्याची किंवा नीतीचीं तत्वें लावतां येत नाहींत. राष्ट्राराष्ट्राचें व्यवहार प्राच्य देशांत व पाश्चात्य देशांत ज्या तत्त्वावर होतात, त्या तत्वानें बलिष्ट राष्ट्राचा क्षुल्लक कारणानें किंवा कारण नसतांहि बलहीन राष्ट्रावर स्वारी करण्याचा अधिकार मान्य केला आहे आणि जित राष्ट्रास लुटण्याचा त्यानें अधिकार नेहमींच चालविला आहे. हजारो लोकांस महमुदानें जबरदस्तीनें बाटाविलें हें कृत्य प्रत्येक मनुष्यास ईश्वराची भक्ति युक्त वाटेल त्या रीतीनें करण्याचा हक्क आहे त्या हक्कास बाध आणणारें असल्यानें निंद्य आहे. हिंदूंचीं देवळें किंवा मूर्ति फोडणें हें महमुदाचें कृत्यहि मानुष्यकाच्या उच्च दृष्टीनें रानटी धर्मवेडाचें म्हणून निःसंशय निंद्य आहे. पण एकाराजानें दुसऱ्या राजाविरुद्ध युद्धांत केलेलें कृत्य कायदा किंवा नीति यांच्या दृष्टीनें दूष्यम्हणतां येत नाहीं. आणि जरी या कृत्यांत कित्येक संस्मरणीय उत्तम वस्तूंचा नाश झाला तरी महमुदास सुद्धां शिवाजीची दरोडेखोर संज्ञा लावितां येणार नाहीं असें मत नमुद करणें आम्हास भाग आहे.

# प्रकरण सोळावें.

## पंजाब-काबूलचा उच्छेद-भासणारीं कारणें.

सिंधचा उच्छेद महंमद कासमच्या नेतृत्वाखालीं अरबांनीं केला. (इ. स. ७१२), पंजाबचा उच्छेद महमुदाच्या नेतृत्वाखालीं तुर्कांनीं केला (१००९), आणि उत्तर हिंदुस्थानचा उच्छेद महंमद घोरीच्या नेतृत्वाखालीं अफगणांनीं केला ( ११९३ १२०० ), या प्रत्येक उच्छेदाचीं कारणें एकच नव्हती म्हणजे वस्तुतः फारच निरनिराळीं होती. भाग १ मध्यें आम्ही सिंधच्या ऊच्छेदाच्या कारणांचा विचार केला. आणि आपल्यास असें दिसलें कीं, सिंधचा उच्छेद मुख्यतः चचच्या कांहीं मांडलिक राजांच्या फितुरीपणामुळें आणि बौद्ध लोकांच्या मनोदौर्बल्यामुळें झाला. त्यावेळीं जसें सिंधवर एका ब्राह्मणाचें राज्य होते,त्याचप्रमाणें यावेळीं पंजाबवर एक ब्राह्मण राजा राज्य करीत होता. परंतु दाहर आणि आनंदपाल हे दोघेहि रजपुतांच्या शौर्यानें लढले. हीं दोन्ही ब्राह्मण राजकुलें आचरणानें क्षत्रियच होती, आणि प्राचीन काळापासून म्हणजे महाभारतयुद्धांत लढणाऱ्या द्रोणापासून अलीकडच्या पेशव्यापर्यंत ब्राह्मण राजे व सरदार क्षत्रियांइतकेंच शौर्यानें लढत आले आहेत. किंबहुना उत्तर हिंदुस्थानांतील पांडे वगैरे ब्राह्मण शिपाई इतर शिपायाप्रमाणेंच ब्रिटिश फौजेंत शूरत्वानें लढलें. दैवी चमत्कारानें जो अपघात दाहरवर येऊन पडला. तोच आनंदपाल याजवर त्यांच्या अत्यंत जोरानें चालविलेल्या युद्धांत येऊन पडला आणि जसा दाहरचा हत्ती रणांगण सोडून पळाला तसा आनंदपालाचाहि पळाला. दाहरचा हत्ती तर मुळींच न थांबता एका सरोवरांत जाऊन पडला, आणि त्यानें

आपला ताप पाण्यानें शमन करीत असतां, दाहरला तलावांत फेंकून देलें. पण असले अपघात प्रत्येक मनुष्याच्या आयुष्यांत घडतात. ते उच्छेदाचें खरे हेतु मानतां येत नाहींत. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें या जगताच्या घडामोडींत सर्वव्यापी आणि सर्वांवर ताबा करणारा दैवाचा भाग चाललाच आहे. यासाठीं कारणांची ऐतिहासिक मीमांसा करितांना दैवास विचारांतून वगळलें पाहिजे. सिंधच्या आणि पंजाबच्या परिस्थितींत वरील दोन गोष्टी एकच असल्या तरी पंजाबच्या उच्छेदाची वरीं कारणें सिंधच्या उच्छेदाच्या कारणांहून भिन्न आहेत. कोणी हिंदु राजानें किंवा सरदारानें दगलबाजी केली असें पजाबच्या इतिहासांत आपल्यास आढळत नाहीं. कदाचित् मुसलमान इतिहासकार उत्बी हा महमुदाचा चिटणीस असल्यानें त्यास सर्व गुह्ये ठाऊक असूनहि याचा उल्लेख त्यानें आपल्या बखरींत मुद्दाम केला नसावा. तथापि याअर्थीं सिंधचे मुसलमान इतिहासकार सुद्धां हिंदूंच्या फितुरी गोष्टी लेहितात त्याअर्थीं असा उल्लेख पंजाबच्या इतिहासांत नसल्यानें, पंजाबच्या उच्छेदाच्या कारणांत राजद्रोहाचा समावेश करितां येणार नाहीं, असें म्हणण्यांस हरकत नाहीं. त्याचप्रमाणें पंजाबमध्यें धर्मभेद नव्हता अर्थात् त्यापासून उत्पन्न होणारें मनोदौर्बल्यहि नव्हतें. दुसऱ्या भागाच्या शेवटल्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें हिंदुस्थानांत यावेळीं सर्वत्र एकच धर्म म्हणजे हिंदुधर्म नांदत होता. आणि वैष्णव आणि शैव या मतांच्या भांडणानें हिंदुधर्माची जी त्रिस्थळीं धांदल पुढें उडाली, तीहि भांडणें यावेळीं नव्हतीं. त्या भागांत सांगितल्याप्रमाणें देशांत एकच धर्म असल्याची जी अत्यंत सुखी अवस्था ती यावेळीं हिंदुस्थाना भोगीत होता. कारण बौद्धधर्म यावेळीं नष्ट झाला होता आणि मुसलमानी धर्म अद्याप दूर होता. दुसऱ्या अनेक बाबतींत या दहाव्या शतकांत भारतदेश सुखीं होता. व सामर्थ्य आणि उत्कर्ष यांच्या परमावधीस पोहोंचला होता. अर्थात् डोंगराच्या शिखरावर पोहोंचलें म्हणजे

जसा पुढें उतारच लागतो त्याप्रमाणें हिंदुस्थानाच्या वैभवास निसर्ग-नियमानेंच उतार लागला. हा उतार कोणत्या रस्त्यांनी लागला हें सांगण्याचें काम इतिहासकारांचें आहे.

या उताराची निरनिराळ्या ग्रंथकारांनीं निरनिराळीं कारणें सांगितलीं आहेत. आणि लोकहि निरनिराळी कारणें समजतात. परंतु हीं कारणें पंजाबांत बहुतेक मुळींच नव्हती, किंवा तीं खरीं कारणें होऊं शकत नाहींत, असें आमचें मत आहे. उदाहरणार्थ लेनपूल म्हणतो, " एकी आणि भांडणें, उत्तर आणि दक्षिण, वंश आणि हवापाणी या बाबतींत दोन्हीकडे विरोध असून, त्यांत आणखी मुसलमानांचा धार्मिक उत्साह आणि लुटारूंचा लोभ यांची भर पडली" फ्रेंच इतिहासकार सचाऊ म्हणतो कीं, "उत्तरहिंदुस्थानचे राजे इतके अदूरदृष्टि होते कीं, त्यांस भावी संकट दिसलें नाहीं, आणि ते एक झालें नाहींत ( अल्बेरूनीच्या भाषांतराची प्रस्तावना पहा ). सरदेसाई यांचें मत असें आहे कीं, " हिंदुस्थानांत लहान लहान राज्यें असून तीं एकमेकांत नेहमीं भांडत असतात, हें महमुदानें जाणलें. शिवाय त्याजजवळ मोठी फौज असून तिचा खर्च चालविणें, व तिचा कोठेंतरी उपयोग करणें त्यास प्राप्त होतें".पण हीं निरनिराळीं मतें साधार नाहींत असें आम्हांस वाटतें तें कसें याचा आपण विस्तारपूर्वक विचार करूं.

हिंदुस्थानांतील हिंदु राजांना भावीसंकटाची कल्पना नव्हती. आणि त्यांनीं एकीनें विरोध केला नाहीं, ही कल्पना मुळांतच अवास्तव आहे व ही गोष्ट मुसलमानांनींच लिहिलेल्या इतिहासावरून दिसते. हिंदुस्थानच्या सरहद्दीवर एक नवा भयप्रद धर्म येऊन थडकला,आणि त्यानें इ. स. ७१२ मध्यें सिंध खाल्ला, त्यावेळींच मेवाड आणि सांबर यांतील पहिल्या रजपूत वीरांच्या नेतृत्वाखाली, ( भाग दोन पान ८ यांत दाखविल्याप्रमाणें) हिंदूंनीं अरब लोकांस जोराच

प्रतिकार केला, आणि त्यांचा पूर्वेकडील आक्रम कायमचा बंद केला. तीनशें वर्षानंतर तुर्क लोक नव्या धर्मांतराच्या धर्मवेडानें प्रोत्साहित होऊन गझनी येथें येऊन स्थिर बसले व तेथून हिंदूस त्रास देण्यास आणि त्यांच्या देवळांचा विध्वंस करण्यास त्यांनीं प्रारंभ केला. पण याहि पूर्वीं सुमारें ६० वर्षें भावी संकटाचा अनुभव हिंदू लोकांस आला. कारण **याकूब-ई-लेस** यानें जेव्हां जाबुलिस्थान घेतलें, तेव्हां त्याच्या अधिकाऱ्यानें सखावंद या शहरांतील एक प्रसिद्ध हिंदु देवालय पाडून टाकिलें, आणि काबूलचा ब्राह्मणशाही राजा कमलु या धर्मोच्छेदक कृत्यानें चकित झाला ( ईलि २ पा. १७२ ). तात्पर्य हिंदु राजांना बऱ्याच वर्षांच्या अनुभवानें भावी संकटाची कल्पना पूर्वींच आली होती. आणि त्यांनीं तीनदां एकत्र होऊन महमुदाच्या सैन्यापेक्षां मोठीं सैन्यें त्याच्या विरुद्ध जमविली. पण तिन्ही नामोहरम झालीं. तेव्हां हिंदु राजे संकटाज्ञानांत घोरत पडले होते, आणि त्यांनीं एकी केली नाहीं ही कल्पना ऐतिह्याच्या विरुद्ध आहे.

याहि पुढें जाऊन असें म्हणतां येतें कीं, हिंदुराजांनीं एकवटून लढण्याची अवश्यकताच नव्हती. हिंदुराज्यें यावेळीं लहान होतीं ही कल्पना अवास्तव आहे. पंजाब व काबूल मिळून शाही राज्य सबुक्तगीनाच्या किंवा खुद्द महमुदाच्या प्रारंभीच्या लहान गझनी राज्यापेक्षां कितीतरी मोठें होतें ! शाहीराज्य जर योग्य तयारींत असतें तर त्या एकटया राज्यास गझनीचा विध्वंस करण्यास शक्य झालें असतें. याहिपेक्षां कनोजचें राज्य विस्तीर्ण आणि सामर्थ्यवान् होतें. किंबहुना आरब प्रवाशांनींच लिहून ठेविलें आहे कीं, कनोजच्या राज्यांत चार फौजा नेहमीं जय्यत चार दिशास असत. आणि त्या इतक्या सामर्थ्यवान् होत्या कीं, त्यास मुलतान घेऊन सिंधमधून अरबांस हांकून देतां आले असतें. चंदेल्ल राजा धंग याचें राज्यहि कांहीं लहान नव्हतें आणि कनोजचा राजा राज्यपाल याचा प्रसिद्ध

भोज याच्या तुलनेनें त्याचा जरी अगदीं अधःपात झाला होता तरी कालंजर व ग्वालेर किल्ल्यांचा राजा धंग इतका शूर व शक्तिमान् होता कीं, त्यानें एकटयानें महमुदाचा नाश केला असता. तात्पर्य महमुदाचेंच राज्य यावेळीं लहान होतें, आणि त्याचीच फौज यावेळीं थोडी होती याची जाणीव पुष्कळांस नाहीं. त्याची फौजहि एकाच जातीची व लोकांची नव्हती. तींतील शिपायी तुर्क, अफगाण, कुर्द, आणि पर्शियन अशा जातीचें असून या लोकांत आपसांत भांडणें नेहमीचीं असत. तात्पर्य महमूद एकाच जातीचें असंख्य लोक घेऊन जंगिसखान किंवा तैमूर लंग जसा सात किंवा चार लाख मोगल स्वार घेऊन वावटळीप्रमाणें अशियाखंडांत कास्पियन समुद्रापासून सिंधुनदापर्यंत देश उध्वस्त करीत व पांचशें वर्षांतहि दुरुस्त होणार नाहीं, इतका नाश पांच वर्षांत करीत आला, तसा आला नव्हता. महमुदाची फौज जयपालाच्या फौजेच्या मानानें पहिल्या मोठ्या लढाईंत लहानच होती. किंबहुना ती आनंदपालाच्या दुसऱ्या लढाईंतील फौजेच्या मानानेंहि लहान होती, असें मुसलमानी इतिहासावरून दिसतें. तीहि हिंदुफौजेपेक्षां जास्त एकजीवाची होती व तेणेंकरून एकी आणि भांडणें यांचा विरोध लेनपूलनें म्हटल्याप्रमाणें दोन्ही पक्षांत होता असें मानतां येत नाहीं. त्याचप्रमाणें उत्तर आणि दक्षिण हाहि विरोध नव्हता. किंबहुना काबूलच गझनीच्या उत्तरेस आहे आणि काबूलच्या जयपालाचे शिपाई अद्याप न बाटलेले असे अफगाणच होते. आणि हे न बाटलेले अफगाण मुसलमान झालेल्या अफगाणापेक्षां कमी शूर होते असें मानतां येणार नाहीं. तुर्क आणि आर्य असा वंशभेद असला तरीहि दोन्ही फौजांच्या युद्धसामर्थ्यांत कांहीं फरक पडतो असें आम्हांस वाटत नाहीं. उत्तरेकडील रानटी लोक, तुर्क व अफगाण, पंजाब आणि राजपुताना यांतील आर्यांपेक्षां जास्त शूर व कष्ट सोसणारे अशी एक भ्रांत साधारण समजूत दिसते. अव-

दालीच्या अफगाणांनीं पानिपतच्या लढाईंत मराठ्यांचा जो पराभव केला, त्याचें एक कारण अशा प्रकारचा वंशभेद होता हे संभवनीय आहे. मराठ्यांपेक्षां अफगाण शरीरबलानें, शूरत्वानें आणि क्रौर्यानें अधिक आहेत ही गोष्ट आमच्या मतें कबूल केली पाहिजे. पण सिंधूनदीपलीकडील तुर्क व अफगाण आणि पंजाब व राजपुताना यांतील आर्य यांच्यांत अशा प्रकारचा फरक पूर्वीं होता किंवा हल्लीं आहे, असें इतिहासावरून किंवा हल्लीच्या परिस्थितीवरून दिसत नाहीं. पंजाबचे जाट व रजपूत, मग ते शीख, हिंदु किंवा मुसलमान असोत, हिंदुस्थानांतीलच नव्हे तर सर्व जगांतील उत्तम शिपायांत गणले जातात. आणि हे जाट व रजपूत महमुदाच्या काळीं सर्वच हिंदु होते. ब्रिटिश हिंदी सैन्याच्या भरतीचा मुख्य प्रदेश हल्लीहि पंजाब आहे. अमृतसर गॅझेटियरमध्यें म्हटलें आहे कीं (पान ३३), " मांझा प्रदेशांतील शीख जाटांत असे लोक सांपडतात कीं, ते जगतांतील कोणत्याहि देशांत मानवी जातीचे उत्तम नमुने म्हणून मानले जातील." राजपुतान्यांतील रजपुतांविषयीं म्हणावें तर, तुर्क व अफगाण, मोगल व पर्शियन यांच्याशीं झालेल्या अनेक लढायांत त्यांनीं आपलें नांव गाजविलें आहे. जसवंतसिंगाच्या राठोडांनीं अवरंगजेबाच्या वेळीं कित्येक वर्षें अफगाणिस्तानावर ताबा चालविला आहे.तात्पर्य शारीरिक सामर्थ्य आणि शौर्य यांच्या बाबतींत जयपाल आणि आनंदपाल यांचे शिपाई महमुदाच्या तुर्क व अफगाणापेक्षां हीन होते असें कधींहि म्हणतां येणार नाहीं.

पंजाबच्या उच्छेदाची कारणमीमांसा स्पष्टपणें न करितां सर व्हिन्सेन्ट स्मिथनें पुढील वाक्यांत कांहीं कारणें सूचित केलीं आहेत. " धर्म, सामाजिक रीति, कल्पना आणि लढाईची तऱ्हा या बाबतींत अगदीं नवीन असलेली एक परकी शक्ति हिंदुस्थानच्या रंगावर या वेळीं अवतीर्ण झाली." ह्या वाक्याचा विचार करितां प्रथम

हें मान्य केलें पाहिजे कीं, शस्त्रास्त्रांचें वैशिष्टय आणि फौज चालविण्याच्या विशेष रीति हें एका राष्ट्राचें दुसऱ्या राष्ट्रावर वर्चस्व स्थापित होण्यास महत्त्वाचें साधन आहे. शस्त्र आणि शिस्त यांत ब्रिटिश फौज हिंदुफौजेपेक्षां अधिक सुधारली असल्याकारणानें ब्रिटनपुढें हिंदुस्थान केव्हांहि पडणारच होतें. परंतु यावेळीं मुसलमानांच्या बाजूस हें कारण अनुकूल खचित नव्हतें. महमुदानें तोफांचा उपयोग केला या फिरिस्ताच्या म्हणण्यांत अॅनॅक्रॉनिझम् ( कालवैपरीत्य) आहे. अशाच तऱ्हेनें तो महमुदाविरुद्ध लढण्यास दिल्ली व अजमीर येथील राजे आले होते असा कालविपरीत निर्देश करितो. ज्याप्रमाणें दिल्ली व अजमीर या राजधान्या महमुदाच्या वेळीं अस्तित्वांतच नव्हत्या, तशा तोफाहि नव्हत्या. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकामध्यें "गनपौडर" ( बंदुकीची दारू ) या शब्दाखालीं जी माहिती दिली आहे, त्यावरून पुढील विधानें करितां येतात. ( १ ) बंदुकीच्या दारूचा शोध एका जर्मनानें इ. स. १३४५ मध्यें लाविला किंवा राजर बेकननें इ. स. १२२५ मध्यें लाविला असें मानतात. ( २ ) या दारूची माहिती प्राचीन ग्रीक, हिंदु किंवा अरब लोकांस नव्हती. त्यास बभकणारी वस्तु उत्पन्न करण्याची एक रीत माहीत होती, व ते तिचा उपयोग लढाईंत करीत. पण ( एक्सप्लोजिव्ह ) स्फोटक मिश्रणाची त्यांस माहिती नव्हती आणि बंदुका किंवा तोफा त्यांजजवळ नव्हत्या. ( ३ ) हिंदुस्थानांत स्फोटक दारूचीं शस्त्रें उपयोगांत आणल्याचा पहिला दाखला इतिहासांत पानिपतच्या लढाईंत बाबरनें केल्याचा आढळतो. ( ४ ) पश्चिमेकडेहि तोफांचा प्रथम उपयोग क्रूझेडमध्यें इ. स. १०२८ पासून इ. स. १२०० पर्यंत आढळत नाहीं. यावरून आपल्यास असें खात्रीनें म्हणतां येतें कीं, महमुदाजवळ अग्न्यस्त्रें नव्हतीं आणि हिंदूप्रमाणेंच त्याचीहि भिस्त साध्या शस्त्रांवर, तलवारी, बर्च्या आणि भाले यांवरच होती. मुसलमान

बखरकार या शस्त्रांचींच वर्णनें काव्ययुक्त करितात ( इली. २ ), हें उत्बी व बैहकी यांच्या लेखांवरून दिसून येतें. किंबहुना शस्त्रांचें वर्चस्व जर असेल, तर तें हिंदूंच्या बाजूसच होतें. असें स्पष्ट दिसतें कीं, हिंदूंना उत्तम पोलाद करण्याची कला अवगत होती. दिल्ली येथील लोहस्तंभ कसा बनविला याचें अलीकडील शास्त्रज्ञांस गूढच आहे. हवा, पर्जन्य खाऊनहि तो मुळींच गंजत नाहीं, अशा बनावटीचें लोकांस आश्चर्य वाटतें. महमुदाचे शिपाई हिंदुस्थानच्या तरवारीस फार चहात. उत्बीनें काव्यमय वर्णन करतांना एका तुर्की शिपायाच्या तलवारीकडून " मी उत्तम कुळांतील एक हिंदु आहे " असें वदविलें आहे ( पान २१६ ). अर्थात् येथें हिंदुस्थानांत केलेल्या तलवारींचें पोलाद जास्त चांगलें असें या गोष्टीकडे इशारा आहे. आपल्यास असेंहि दिसून येतें कीं, रणभूमीवरील लुटींत मारल्या गेलेल्या हिंदु शिपायांच्या तरवारी व इतर हत्यारें यांकडे मुसलमानांचें विशेष लक्ष असे. ( पंजाबांत काला-बाग येथें अद्याप लोखंड निघतें आणि भेरा व निजामाबाद या शहरांची तेथें तयार होत असलेल्या उत्तम तरवारीबद्दल अद्याप ख्याति आहे. या तरवारींचे नमुने लाहोरच्या म्युझियममध्यें पाहण्यास सांपडतात ). फौजेच्या शिस्तीचें मुसलमानाकडे वैशिष्ट्य होतें आणि हल्लींच्याप्रमाणें कवाइती पायदळ फलटणा होत्या, असें आम्हांस वाटत नाहीं. घोडे मुसलमानाकडे अधिक चांगले असतील; कारण अफगाणिस्थान व पर्शिया ह्या देशांत चांगले घोडे निपजतात हें राजशेखरानेंहि लिहिलें आहे. पण राजपुतान्यांतहि निपजलेले घोडे वाईट नसतात; आणि अरबस्थान व पर्शिया येथील घोड्यांची आयात त्या वेळींहि पुष्कळ असे. कनोजचे प्रतिहार सम्राट् राजपुतान्यांतील मूळचे असल्यानें, आपल्या घोडदळाबद्दल प्रसिद्ध होते. आणि त्यामुळेंच त्यांस हयपति ही संज्ञा होती, हें आपण पाहिलेंच आहे. या-

शिवाय हिंदूकडे सैन्याचें एक जबरदस्त अंग अधिक होतें. मुसलमानाकडे हत्ती मुळींच नसून हिंदूकडेसच ते होते. पुढच्या काळांत तुर्कांनांहि ह्या अंगाचा लोभ उत्पन्न झाला व त्यांनीं तें वाढविलें. कारण सबुक्–तगीन व महमूद यांनीं काश्गारच्या तुर्कांविरुद्ध हत्ती उपयोगांत आणल्याचा आणि फायदेशीर रीतीनें आणल्याचा दाखला आपल्यास सांपडतो (उत्बी). सांगण्यास चमत्कार वाटतो कीं, महमुदाच्या तुर्कांविरुद्ध हिंदूंस हत्तींचा उपयोग फायदेशीर रीतीनें करतां आला नाहीं; पण महमुदास त्याच हत्तींचा उपयोग इलेक्–खानाच्या तुर्कांविरुद्ध फार परिणामकारक रीतीनें करतां आला. ही गोष्ट महमुदाच्या उत्कृष्ट सैनापत्याची व हिंदु सेनापतींच्या कमी कौशल्याची साक्ष पटविण्यास पुरे आहे. महमुदानें हें हिंदु सैन्याचें अंग कसें निरुपद्रवी केलें, याचें वर्णन मुसलमानी ग्रंथकार करीत नाहींत. अलेक्-झांडरनें पोरसचें गजसैन्य कसें नामोहरम केलें, याचें वर्णन ग्रीक इतिहासकार देतात. हेंहि आणखी सांगितलें पाहिजे कीं, सबुक् तगीन व महमूद यानीं हत्तींचा उपयोग आपल्या सैन्यांत करूं लागल्यावरहि हत्तींचे महात हिंदूच असत. गझनी येथें पुढील एका राजाच्या वेळीं हत्तींचे हिंदु महात आपल्या कामांत गाफिल राहिल्यामुळें त्यांस जबर शिक्षा केल्याचा दाखला इतिहासांत मिळतो (बैहकी). हल्लीं ही कला हिंदूंमधून नष्ट झाली असून हत्तींचे सर्व महात हल्लीं मुसलमानच असतात ही चमत्कारिक गोष्ट नमूद करण्यासारखी आहे (इली. २ पा. १४३).

वरील सर्व हकीकतीवरून तुर्कांची लढण्याची पद्धति कशी निराळीं होतीं हें दिसून येत नाहीं. मात्र तुर्क जिंकलेल्यांना जास्त निर्दयतेनें वागवीत हा फिरक दिसतो. सर्व जगतांतील लोकांत हिंदुलोक जिंकलेल्या लोकांना अत्यंत सदयतेनें वागवीत असें इतिहास निःसंशय सांगतो. महमुदाचे तुर्क जशी लढवय्ये लोकांची बहुधा

कत्तल करीत तशी कत्तल हिंदूंनीं कधींहि केली नाहीं. महमूद क्रूर नव्हता असें जें आम्ही पूर्वीं म्हटलें आहे, तें इतर मुसलमान जेत्यांच्या तुलनेनें, विशेषत: मोगल जंगीजखान किंवा तैमूर यांच्या तुलनेनें म्हटलें आहे. हिंदु जेत्यांच्या तुलनेनें पाहिलें असतां, महमुदाची पद्धत हिंदुस्थानच्या अधिक सदय लोकांच्या अन्त:करणांत धडकी भरविणारीच होती. लढणारे लोक बहुधा कत्तल केले जात, निरपराधी लोक गुलाम केले जाऊन दूर देशीं पाठविले जात आणि गांव व शहरें उध्वस्त केली जात. युरोपांतहि प्राचीन व हल्लींच्या काळींसुद्धां हिंदु कालांतील लढायांपेक्षां जास्त क्रूरतेनें युद्धें होतात असें म्हणावें लागतें. ग्रीक व रोमन लोक तर जिंकलेल्या लोकांशीं फारच क्रूरतेनें वागत आणि कत्तल व गुलामगिरी हे लढाईतील पराजयाबरोबरचे नेहमींचेच परिणाम असत. या दृष्टीनें पाहतां महमुदाची लढाईची पद्धत नवीन होती. परंतु पंजाबाच्या उच्छेदाचें कारण हें मानतां येणार नाहीं. कारण हिंदु फौजा प्रथम कां जिंकल्या गेल्या याची आपण मीमांसा करीत आहों; कदाचित् एका लढाईंत जिंकल्या गेल्यानंतर जो परिणाम हिंदूंस भोगावा लागला, त्यानें पुढील लढायांत हिंदु शिपायांचें मनोधैर्य खचणें शक्य आहे.

तुर्कांच्या व हिंदूंच्या राजकीय कल्पना एकाच तऱ्हेच्या होत्या. प्रातिनिधिक संस्थांची फार प्राचीन काळीं कदाचित् हिंदूंना कल्पना असेल. पण या वेळीं दोघांनाहि प्रातिनिधिक राज्यपद्धति, लोकांचे हक्क किंवा राजांचा जबाबदाऱ्या यांची कल्पनाच नव्हती. त्यांना एकच राज्यपद्धति ठाऊक होती, ती अनियंत्रित राजसत्ताक होय. अर्वाचीन काळांत राष्ट्र अथवा लोक यांची जी कल्पना उत्पन्न झाली आहे, त्याचा त्यांस गंधहि नव्हता. अर्थात् राष्ट्रीयत्व किंवा स्वदेशभक्ति ही भावना त्यांस मुळींच नव्हती. राजवंशांत जन्मल्यानें राज्य पद मिळे, किंवा युद्धांत जयरूपानें प्रकट झालेल्या परमेश्वरी कृपेचें

फळ राज्यपद असें मानीत. यामुळें राष्ट्रीयत्वाच्या आणि स्वदेश-प्रीतीच्या उच्च प्रेरणेनें गेल्या युरोपीय महायुद्धांत जर्मन आणि फ्रेंच जसे लढले, तसे महमुदाचे तुर्क किंवा जयपालाचे हिंदु लढले नाहींत. तात्पर्य चिकाटीची लढाई राष्ट्रीय भावनेनें प्रेरित होऊन केल्यानें तुर्कांस नेहमीं जय मिळत गेला असें म्हणतां येत नाहीं. अशी भावना तुर्कांत नव्हतीच. ते महमुदासाठीं लढत होते, राष्ट्रा-साठीं नव्हे. मुहम्मदी–धर्माचा उत्साह स्वदेशप्रीतीच्या जागीं होता हें खरें आहे. नवीन धर्मांतर केलेल्या तुर्क व अफगाण लोकांचा धर्मोत्साह महमुदाच्या विजयाचें एक कारण निःसंशय होतें. परंतु हा धर्मोत्साह म्हणजे कल्पनांचें नावीन्य नव्हे. आणि जर हिंदूंचा तितकाच प्रबळ धर्मोत्सह त्यास आडवा आला असता तर पंजा-बच्या उच्छेदाचें कारण तो होऊं शकता ना.

शेवटीं ही गोष्ट सांगावयाची कीं तुर्कांच्या चालीरीतींतहि असें कांहीं नावीन्य नव्हतें कीं तें हिंदूंच्या अपजयाचें कारण होऊं शकेल तुर्क आणि हिंदू यांच्या राजकीय कल्पना जशा सारख्या होत्या, तशा त्यांच्या चालीरीतीहि सारख्याच होत्या. पंजाब आणि काबूलचे हिंदु त्यावेळीं मांसाहारीच होते. हल्लींहि हिंदुस्थानच्या इतर प्रांतां-पेक्षां पंजाबांत मांसाहाराचा प्रघात अधिक आहे. पंजाब काबुलांतील हिंदु त्यावेळीं गोमांस–भक्षक नव्हते ही गोष्ट खरी आहे. पण काबुल–पंजाबाच्या पराजयाचें हें एक कारण असेल असें आम्हांस वाटत नाहीं.

# प्रकरण सतरावें.

## पंजाबचा–काबूलचा उच्छेद—संभवनीय कारणें.

राष्ट्रें. लोक किंवा राज्यें यांच्या नाशाचीं कारणें हा एक अत्यंत खोल विचाराचा पण मनोरंजक प्रश्न प्राचीन व अर्वाचीन इतिहासकारांपुढें असतो; आणि निरनिराळ्या प्रसंगीं इतिहासकार निरनिराळे सिद्धांत बांधतात. अर्थात् हे सिद्धांत सर्वव्यापी असूं शकत नाहींत. ग्रीसचा उच्छेद रोमनें केला, रोमचा गॉथ लोकांनीं केला, आणि कॉनस्टॅनटिनोपलचा तुर्कांनीं केला; या तिन्ही प्रसंगीं निरनिराळी परिस्थिति होती. साहजिकच तिन्ही नाशाचीं कारणें निराळीं मानलीं पाहिजेत. याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि सिंधच्या इ. स. ७१२ मधील, पंजाबच्या इ. स. १०९९ मधील, उत्तर हिंदुस्थानच्या इ. स १२०० मधील. आणि दक्षिण हिंदुस्थानच्या इ. स. १३०० सुमारें झालेल्या नाशांचीं कारणें निराळीं आहेत. आणि हिंदुस्थानच्या इतिहासकारापुढें या प्रत्येक प्रसंगीं निरनिराळीं असलेलीं नाशाचीं कारणें काय आहेत हें दाखविण्याचें कठिण काम उभें असतें. असें जरी आहे तरी रोमन बादशाहीच्या ऱ्हासाचा प्रसिद्ध इतिहासकार गिबन याचे सामान्य विचार शाश्वत महत्त्वाचे आहेत. आणि त्यांत कित्येक सिद्धांत असे आहेत कीं, ते सर्वत्र लागू पडतील. पश्चिमेकडील रोमन बादशाहीच्या अंताचीं कारणें पंजाबच्या उच्छेदाला जीं कारणें सांगतां येतात त्याहून भिन्न असलीं तरी गिबनचे विचार आपल्या या मीमांसेच्या प्रसंगीं बरेच मार्गदर्शक होतील, यासाठीं ते आम्ही येथें उध्दत करतों.

‘ रोमचे सुदैव हेंच ग्रीसच्या दुर्दैवाचें कारण ’ असें साहजिक मानण्याकडे प्रवृत्ति होते, तिचा प्रथम विरोध केला पाहिजे. तो

ग्रीक लोकांचा मोठा इतिहासकार पोलिबियस् यानें रोमच्या राज्यव्यवस्थेचें अद्वितीय गुण आणि रोमच्या मोठेपणाचीं खोल कारणें वर्णन करून केला आहे. या राज्यव्यवस्थेंत लोकांच्या सभेची स्वतंत्रता आणि सीनेटचे (वरिष्ट लोकांच्या लोकसभेचें) शहाणपण व त्याच प्रमाणें बादशहाचा अमलबजावणीचा अधिकार यांची योग्य सांगड घातलेली आहे. प्रत्येक नागरिकानें दहा वर्षे देशाच्या सेवेसाठीं फौजेंत नोकरी केलीच पाहिजे अशा निर्बंधानें नेहमीं फौजेंत तरुण व स्वातंत्र्यप्रिय शिपायांचा सारखा ओघ कसा येत असे, रोमच्या फौजी शिस्तेत मॅसिडोनियन लोकांच्या फॅलँक्स पेक्षांहि रोमन लिजन् ही प्रत्यक्ष काम करण्यास अधिक क्षम कशी होती, हें त्यानें दाखविलें आहे. तात्पर्य पॉलिबियसच्या मतानें शांतता व युद्ध या दोहीं वेळीं अमलांत असलेल्या विशिष्ट राज्यव्यस्था यानींच रोमन लोकांना भीतिशून्य व आलस्यरहित करून नेहमीं विजय मिळत असे. सर्व जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा रोमन लोकांनीं धरली, आणि सिद्धीस नेली. यांत न्यायाचा जो श्वाशत नाश होत असतो, तो शहाणपणा आणि शौर्य या दोन राजकीय सद्गुणांच्या जोरानें चालविला" असें होतें तरी सुद्धां रोमन राष्ट्र लयास गेलें. " अतिशय वाढ होणें याचा हा सहज आणि अपरिहार्य परिणाम आहे. वैभवांत ऱ्हासाचीं मुळें उत्पन्न होतात. नाशाचीं कारणें नवीन नवीन विजयाच्या वाढींत वाढतात. दूरदेशाच्या लढाईंत विजयी फलटणें भाडोत्री शिपायांचे दुर्गुण शिकले. आणि त्यांनीं प्रथम रोमचें प्रजासत्ताक राज्य गाडून पुढें बादशाहीचाहि अंत केला. ज्या शिस्तीमुळें फलटणी आपल्या शत्रूस, भयप्रद होत त्याचप्रमाणें आपल्या राजास झाल्या. ती शिस्त बिघडून टाकण्याची युक्ति बादशहास अमलांत आणावी लागली. आणि फौजी राज्यव्यवस्थेचे नियम ढिले पडून रोमन बादशाही रानटी लोकांच्या पूरांत गडप झाली. "

" रोमन राज्यांत ख्रिस्ती-धर्माचा शिरकाव, व निदान या वेळीं झालेला ख्रिस्तीधर्माचा ऱ्हास याचाहि कांहीं संबंध रोमन बादशाहीच्या अंताशीं आहे. ख्रिस्ती धर्मोपदेशक सहनशीलतेचा आणि मनोदौर्बल्याचा उपदेश करूं लागले. अर्थात् लोकांस कार्यक्षम करणारे सद्गुण कमी लेखण्यांत येऊं लागले. शौर्यादि स्फूर्तीचा जो थोडा अवशेष होता तो मठांत पुरला गेला. सरकारी आणि सावकारी वित्ताचा मोठा भाग भक्तीच्या व दयाधर्माच्या कामांत खर्च होऊं लागला. जो पगार शिपायांवर खर्च व्हावयाचा तो स्त्रीपुरुषांच्या भिकारी झुंडींवर खर्च होऊं लागला व त्यांस आम्ही संसार सोडून ब्रम्हचर्य बाळगून राहलों आहों या पलीकडे दुसरा गुण दयेच्या पात्रतेस दाखवितां येत नव्हता. धर्मसंस्था व राज्यसंस्था या दोन्ही धार्मिक विवादांनीं भांबावून गेल्या व बादशहाचें लक्ष फौजेच्या कवायतीकडून धर्मसभेच्या भांडणाकडे लागलें. रोमन बादशाहींत एक नवीनच प्रकारचा जुलूम चालू झाला. आणि धर्म-मता करितां निरनिराळ्या लोकांचा छळ होऊं लागून हे लोक साहजिकच राष्ट्राचे शत्रु बनले. " ( बरीचा गिबन भाग. ४ पान १७२-१७५) हा उतारा बराच लांब आहे. पण यांत आलेले विचार व याच प्रकरणांतील आणखी विचार शाश्वत महत्त्वाचे असून, व ते सर्वत्र लागू पडतात. आम्हांस येथें पंजाबच्या नाशाचींच कारणें पहावयाचीं असून पश्चिमेकडील रोमन बादशाहीच्या नाशाच्या कारणांहून तीं अगदीं भिन्न असलीं तरी या विचारांनीं दाखविलेली दिशा बिनमोल आहे. तिचा उपयोग यावेळीं जितका आहे, त्याहिपेक्षां पृथ्विराजाच्या काळीं उत्तर हिंदुस्थानचा नाश कां झाला या प्रश्नाचा आम्हांस या पुस्तकाच्या शेवटीं विचार करणें आहे, त्यावेळीं जास्त उपयोग होईल.

पंजाबांतील हिंदुलोकांची परिस्थिति आणि गझनीच्या मुसल-

मानांची परिस्थिति यांचा विचार करून राष्ट्राची शक्ति वाढविणाऱ्या कोणत्या गोष्टींत मुसलमान अधिक होते व हिंदु कमी होते हें आपण पाहिलें असतां पंजाबच्या उच्छेदाची खरी कारणें कोणतीं आहेत याचा आपल्यास निर्णय करतां येईल. हिंदूंच्या बाजूला तंटे आणि मुसलमानांच्या बाजूला एकी अशी परिस्थिति नव्हती हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे. तंटे व भांडणें हे जितके हिंदूंचें ब्रीद होतें, तितकेंच तुर्कांचेंहि होतें. ऑक्सस नदी पलीकडील तुर्कांमधील बेर्कांचें वर्णन करतांना उत्बी कुरणांतील पुढील वाक्य उध्दृत करतो. " ते जर एक असतील, तर त्यांची शक्ति खरोखरच मोठी आहे. पण त्यांचीं अन्तःकरणें विभिन्न आहेत. त्यांच्यामध्यें द्वेष आाण शत्रुत्व आम्ही कायमचे पाठविले आहे."दुसरें, तुर्क लोक हिंदूंच्या इतकेंच सुधारलेले किंवा रानटी होते. त्यांचीं शस्त्रें एकच होतीं. त्यांच्यांत लोकांच्या राजकीय सभा नव्हत्या. त्यांच्यांत राष्ट्रीय भावनाहि नव्हती. आणि त्यांच्यांत लिजन् अथवा फॅलॅक्स अशा प्रकारच्या शिस्ती फलटणीहि नव्हत्या. तिसरें, पंजाबचें हिंदु राज्य अवाढव्यहि झालें नव्हतें. अर्थात् रोमन बादशाहीप्रमाणें ते आपल्या भारी वजनानेंच खालीं पडलें असें म्हणतां येत नाहीं. गॉथ आणि व्हॅन्डाल् यांच्या असंख्य झुंडी रोमज राष्ट्रावर जशा कोसळल्या तशा तुर्कांच्या झुंडीहि हिंदुस्थानावर आल्या नाहींत. चौथी गोष्ट ही कीं, काबुलच्या अफगाणापेक्षां किंवा पंजाबच्या रजपुतांपेक्षां तुर्क लोक जास्त शूर किंवा शरीरसामर्थ्याचेहि नव्हते किंवा लढाईंतील मेहनतीस जास्त सरावलेलेहि नव्हते. किंबहुना महमूद व त्याचे मागचे सुलतान यानीं आपल्या लढायांत पंजाबच्या हिंदूंचा उपयोग केला आहे. महमुदाची ऑक्सस नदी पलीकडील तुर्कांचा राजा इलेक्खान याशीं जी लढाई झाली तींत महमुदाच्या तर्फे हिंदू मोठ्या शौर्यानें लढले असें वर्णन आहे. पांचवे पंजाबचे हिंदु राज्य वाईट

रीतीनें चालले होतें असेंहि दिसत नाहीं. आणि यामुळें मुसलमानाकडे कांहीं हिंदु लोक फितुर झाले असेंहि वर्णन सांपडत नाहीं. शेवटची गोष्ट ही कीं, महमुदाचें गझनी येथील राज्य जयपालाच्या काबूल–पंजाब राज्यापेक्षां प्रारंभीं लहानच होतें. अर्थात् त्याचें सैन्यहि जयपालाच्या सैन्यापेक्षां प्रारंभीं थोडें असलें पाहिजे. जयपालाच्या राज्यांत धार्मिक किंवा राजकीय तंटे बखेडेहि असल्याचें दिसून येत नाहीं. तात्पर्य एक पक्ष सबळ किंवा दुर्बळ होण्याचीं हीं जीं प्रथम दर्शनी कारणें, तीं नसल्यानें आपणांस बाजूस ठेविलीं पाहिजेत. व तुर्कांचें वर्चस्व हिंदूंवर कोणत्या अन्य बाबतीनें होतें किंवा हिंदु हीन होते याचा आपणास विचार करावयास पाहिजे.

( १ ) तुर्कांची मोठी वर्चस्वाची बाब म्हणजे त्यांचा नेता महमूद याचें वैयक्तिक सामर्थ्य हें होय. आपणांस व्यक्तीच्या सामर्थ्याची नेहमीं योग्य किंमत असत नाहीं. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें निसर्गानें वेळोवेळीं बौद्धिक व शारीरिक अत्यंत सामर्थ्य असलेले पुरुष उत्पन्न होतात, व ते राष्ट्रांचे दैव किंवा मानवी जातीचें स्वरूप बदलून टाकतात. एक बुद्ध किंवा एक जीजस यांचें सामर्थ्य एवढें होतें कीं, अर्धें जग शांततेच्या मार्गाकडे त्यामुळें वळलें, तर एका महमुदानें दुसरें अर्धें जग धर्मतत्त्वाच्या प्रसारांत बलाचा उपयोग करण्याच्या तत्त्वाकडे प्रवण झालें. राजकीय घडामोडीकडे आपण पाहिलें तर एका शिवाजीनें मराठे लोकांस दोनशें वर्षें स्वातंत्र्य मिळवून दिलें आणि त्यांची कीर्ति हजारों वर्षांकरितां कायम केली. आमची अशी पक्की समजूत आहे कीं, शिवाजीच्या वैयक्तिक सामर्थ्याशिवाय मराठ्यांनीं जो पराक्रम केला तो त्यांस करतां आला नसता. आणि आमचें असें पक्कें मत आहे कीं, महमुदाच्या व्यक्तीशिवाय तुर्कांना पंजाबच्या हिंदूंचा पाडाव करितां आला नसता. महमुदाची

स्थिति शिवाजीच्या स्थितीसारखी हुबेहूब आहे. कधीं न डगमगणारें शौर्य आणि कधीं न थकणारा उत्साह दोघांसहि असून दोघांनींहि मोठीं धोरणें बांधलीं आणि दोघांसहि निश्चय व युक्तिमत्ता असल्यानें त्यांनीं आपली कल्पना सिद्धीस नेली. मुसलमानी अमलाच्या जोखडांतून जवळील विजापुरची सत्ता नाहींशी करून किंवा दूरच्या मोगल बादशाही फौजांचा पराभव करून महाराष्ट्राला सोडवितां येईल अशी कल्पना शहाजीच्या वेळीं कोणासहि झाली नसती. पण शिवाजीनें हा अशक्य दिसणारा बेत केला आणि तो आपल्याच आयुष्यांत आपल्या अद्वितीय संघटनाशक्तीनें व आपल्या आध्यात्मिक वजनानें सिद्धीस नेला. त्याचप्रमाणें गझनीचें लहानसें राज्य जवळील काबूलच्या शक्तिमान राज्यास धुळीस मिळवील, किंवा दूरच्या कनोजच्या बादशाही फौजांचा पराभव करील ही गोष्ट त्यावेळीं कोणासहि संभवनीय वाटली नसती. असें असूनहि महत्त्वाकांक्षेनें प्रेरित होऊन हा धाडसाचा घाट महमुदानें घातला, आणि आपल्या उत्साहानें व वैयक्तिक वजनानें तो सिद्धीस नेला. शिवाजी आध्यात्मिक दृष्ट्या महमुदापेक्षां उच्चतर पायरीवर अधिष्ठित होता यांत शंका नाहीं. कारण आपल्या लोकांस परकीय सत्तेच्या व परकीय धर्माच्या कचाटींतून सोडविण्याचें उदात्त कार्याकडे त्यानें आपलें सामर्थ्य लाविलें. या उलट महमुदानें परकी लोकांस गुलामगिरींत आणण्याचा आणि परराज्यें जिंकून त्यांवर आपला परकीय धर्म लादण्याचा उपक्रम केला व सिद्धीस नेला. असें जरी आहे तरी दोघांनींहि अशक्य दिसणारे बेत केले आणि ते आपल्या अद्वितीय गुणांनीं सिद्धीस नेले असेंच म्हटलें पाहिजे. दोघांपाशींहि प्रारंभीं एक लहान राज्य व एक लहान सैन्य होतें. पण दोघांनींहि आपल्या घटनासामर्थ्यानें व युक्तिमत्त्वानें आपलें राज्य व सैन्य वाढविलें. शिवाजीला तर बापाच्या वेळची फारच थोडी फौज मिळाली होती.

पण तिचेंच त्यानें असें सामर्थ्यवान् सैन्य बनविलें कीं, तें बादशाही मोगल फौजांना पराभूत करून धनसंपन्न मोगल शहरांना लुटींत होतें. हाच प्रकार महमुदानें केला, व त्याचें सैन्य इतकें वाढलें कीं, मरणसमयीं तें एक लाख पायदळ, पन्नास हजार घोडे आणि तेराशें हत्ती इतकें मोठें होतें. सरदेसाई म्हणतात कीं, " महमुदाजवळ प्रारंभींच मोठें सैन्य होतें; त्यास खाऊं घालून हिंदुस्थान जिंकण्यांत त्याचा उपयोग करणें त्यास भाग होतें." पण ही गोष्ट खरी दिसत नाहीं. कदाचित् महमुदाजवळ शिवाजीपेक्षां प्रारंभीं अधिक सैन्य असेल. तथापि महमुदाजवळ प्रारंभीं मोठें सैन्य होतें असें मानलें तरीसुद्धां तो जर नालायक असता तर हळू हळू फौजेस रजा देऊन सैन्य कमी करण्यास त्यास कोण आडवा आला असता ? तुर्क किंवा अफगाण लढवायी माणसें पुष्कळ नोकरीस मिळण्यासारखीं असलीं तरी, त्यांस देण्यास पगार कोठून आणावयाचा ? देवळें आणि मूर्ति यांची लूट मागाहून आली. शिवाजीलाहि प्रारंभीं साधनें कोठून मिळालीं ? शिवाजीचें तर शिपाई प्रारंभीं शांत स्वभावाचे मावळे होते, कज्जाख तुर्क नव्हते. महापुरुषांचें महत्त्व यांतच दिसून येतें कीं, ते आपल्या शक्तीनें माणसें व द्रव्य मिळवितात, आणि माणसांस योग्य रीतीनें तयार करतात. आणि द्रव्याचा योग्य उपयोग करितात. हें मोठेंपण अढळ निश्चय आणि जळजळणारी इच्छा यांतच असतें. महाभारतांतील प्रसिद्ध विदुलाख्यानांत पराभव पावून व राज्यभ्रष्ट होऊन रडत बसलेल्या आपल्या पुत्रास विदुला म्हणते, "पुनः लढण्याचा दृढ**निश्चय** करून राज्य परत मिळविण्याचा **उद्योग** कर, ऊठ. तुला मनुष्यें व धन लागेल तें मिळालेंच पाहिजे."शिवाजी व महमूद यांचें संघटनासामर्थ्य व आध्यात्मिक वजन यांवरून स्पष्ट होतें कीं, त्यांनीं आपल्या लोकांस चिकाटीनें लढण्यास लायक करून त्यांच्यासाठीं प्राणहि देण्यास उद्युक्त केलें. इतकेंच नव्हे तर हें जें

तेजस्वी शस्त्र त्यांनीं बनविलें, तें त्यांनीं आपल्या कह्यांतहि ठेविलें. गिबननें म्हटल्याप्रमाणें लढवयी पलटणी शत्रूसच भयप्रद नसून मालकासहि भयप्रद होतात. जेथें राष्ट्रीय भावना जागृत नसून राजद्रोही अधिकारी अथवा सेनापति यांच्या महत्त्वाकांक्षेस आळा घालण्यास समर्थ असत नाहीं, तेथें धन्याच्या वैयक्तिक तेजानेंच असले महत्त्वाकांक्षी लोक ताळ्यावर राहतात. धन्याची दाब ठेवणारी व्यक्ति नाहींशीं झाली म्हणजे हेंच भयप्रद सैन्य आपल्या धन्याचाच नाश करितें. महमुदाच्या मागून आलेले राजे नालायक असल्यानें असा प्रकार गझनीसच घडून आला. पुष्कळ मांडलिक स्वतंत्र झाले, आणि एक गझनीचा राजा त्याच्या सेनापतींनीं धरून आंधळा केला. तात्पर्य महमूद अथवा शिवाजी यांनीं जें सामर्थ्यवान् सैन्य तयार केलें आणि आपल्या कामाकडे त्याचा जो यशस्वी रीतीनें उपयोग केला, त्यावरूनच शिपायांच्या व फौजी अधिकाऱ्यांच्या अन्तःकरणावर त्यांच्या आध्यात्मिक वजनाचा दाब किती होता हें स्पष्ट होतें.

आतां महमुदाच्या विरुद्ध पक्षाकडे पाहिलें तर सेनापति किंवा घटक, या बाबीचें सामर्थ्य असलेलें कोणी पुरुष दिसत नाहींत. जयपाळावर जो प्रसंग येऊन पडला, तो त्यानें धैर्यानें आणि तेजस्वितेनें निभाविला. पण ज्या वेळेस त्यास भावी संकट दिसूं लागलें, तेव्हां मजबूत फौज तयार करण्यास त्यास काय हरकत होती? किंबहुना प्रारंभापासूनच कोणत्याहि प्रसंगास तोंड देण्यास समर्थ असें शक्तिमान सैन्य नेहमीं बाळगण्यास काय अडचण होती ? कोणताहि राजा किंवा राष्ट्र याचें प्रथम कर्तव्य हें आहे कीं, लोकांचें अंतस्थ व बाहेरील शत्रूपासून रक्षण करण्यास समर्थ अशी जय्यत फौज ठेवावी. जयपालाला मनुष्य किंवा धन या साधनांची उणीव मुळींच नव्हती. किंबहुना हर्षाजवळ प्रारंभीं मध्यम प्रमाणाचीच फौज होती. तिच्या जोरावर त्यानें उत्तर हिंदुस्थान जिंकलें, तेव्हां तो नेहमीं

एवढी मोठी जय्यत फौज ठेवी कीं, तिचें एक अंग ६००००हत्तीचें होतें. आणि एवढया अवाढव्य सैन्याचा खर्च कोणतीहि शहरें किंवा देवळें लुटल्याशिवाय तो चालवी. एवढें करूनहि प्रयाग येथें भरलेल्या दर पांचवार्षिक दानसमारंभांत ब्राह्मण व श्रमण यांना लाखों रुपयाचें दान करी. महमुदाच्या विरुद्ध लढणाऱ्या हिंदु राजांचा मोठा दोष असा दिसतो कीं, काबूल व कनोज या दोन्ही ठिकाणच्या राजांनीं त्यांचे प्रसिद्ध पूर्वज भीम व भोज यांच्या उदाहरणाविरुद्ध सैन्याची हयगय केली. गिबनच्या अजरामर शब्दांत बोलावयाचें तर बहुधा शिपायांचा तनखा देवळांचे भोग व मूर्तींचे अलंकार यांत खर्च झाला. कारण दोन्ही ठिकाणीं यावेळीं खड्या फौजा असल्याचें वाचण्यांत येत नाहीं. दहाव्या शतकांतील अरबी प्रवाशांनीं लिहून ठेविलें आहे कीं, हिंदुस्थानाची ख्याति तेथील फौजांविषयीं आहे. ही ख्याति अकराव्या शतकांत हिंदुस्थानांतील राज्यांनीं गमावली. काबूलपंजाबचें राज्य एक मोठी फौज बाळगण्याइतकें खचित विस्तृत होतें; आणि वास्तविकपणें शेजारील राजांची मदत मागण्याचें आणि संयुक्त सैन्य जमा करण्याचें कांहीं कारण नव्हतें. या संयुक्त सैन्यासहि कांहीं करतां आलें नाहीं. कारण तीस कोणी मोठा सेनापति–नेपोलियनच्या विरुद्ध लढण्यास समर्थ असा ड्यूक ऑफ वेलिंगटन–लाधला नव्हता. कांहीं लोकांची अशी समजूत आहे कीं, संयुक्त सैन्याचा उपयोग एकजीव फौजेसारखा होत नाहीं. पण हें बरोबर नाहीं, कारण संयुक्त फौजा फ्रान्सच्या मैदानावर मागील आणि चालू शतकांत यशस्वी रीतीनें लढल्या आहेत. एक नेता व नियामक संयुक्त सैन्यास पाहिजे यांत संशय नाहीं. हिंदुस्थानांत संयुक्त फौजा यावेळीं जयपाल किंवा आनंदपाल यांच्या

एकटयाच्याच नेतृत्वाखालीं होत्या.* त्यास जय आला नाहीं याचें कारण सैनापत्यांत ते महमुदाच्या बरोबरीचे नव्हते. असो, त्यास जय न येण्याचीं आणखीं जीं कारणें झालीं त्यांचा आपण आतां विचार करूं.

( २ ) हिंदू लोकांच्या धार्मिक भावनांचा कोमलपणा पंजाबच्या उच्छेदाचें एक कारण आहे यांत शंका नाहीं. दोन्ही बाजूला जी भावना प्रधान होती, ती राष्ट्रीय नसून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें निःसंशय धार्मिक होती. पण मुसलमानांची धार्मिक भावना उत्कट आणि जळजाळित होती, तर हिंदूंची धार्मिक भावना मृदु आणि बहुतेक मळमळित होती. लेनपूलच्या शब्दांत म्हणावयाचें तर मुसलमानी धर्मोत्साह व लुटारूंचा लोभ महमुदाकडे प्रोत्साहक असला तरी या स्थितीचा प्रतिकार हिंदू-धर्माचा तितकाच प्रबल धर्मोत्साह आणि लुटल्या जाणाऱ्या लोकांचा संताप यांनीं झाला असता तर मुसलमानांचें कांहींच चाललें नसतें. कारण देवळें लुटलीं गेलीं, मूर्तींचे दागिने काढले गेले, इतकेंच नसून शेंकडों किंबहुना हजारों हिंदू जबरदस्तीनें बाटविले गेले.अशा परिस्थितींत बाटलेल्या व लुटलेल्या लोकांच्या शौर्यानें व संतापानें हिंदु लोकांनीं लढले पाहिजे होते असें आपल्यास वाटतें. शिवाय, दोन्ही फौजांची संख्या व संस्कृति सारखीच असतां, किंबहुना हिंदूंच्या बाजूला वर्चस्व असतां, हिंदूंनीं पराभव कधींहि मान्य करावयास नको होता. परंतु हिंदूंची धर्मभावना जरी खोल असते, तरी ती अनेक कारणांनीं नेहमींच नरम असते.पहिली

---

*स्मिथच्या ऑक्सफर्ड हिस्टरी ऑफ इंडिया या पुस्तकांत असें म्हटलें आहे कीं, दुसऱ्या संयुक्त सैन्याचें नेतृत्व अजमीरचा राजा बीसलदेव यानें घेतलें होतें. पण ह्या विधानाला आधार दिलेला नाहीं; आणि ही गोष्ट सत्यहि दिसत नाहीं. खरी मानली तरी सुद्धां बीसल मोठा सेनापति होता अशी त्याची ख्याति नाहीं.

गोष्ट, हिंदू नेहमीं सहिष्णु असतो. हा एक साधारण अनुभव आहे कीं, कुराणाची किंवा पैगंबराची थोडीशी निंदा ऐकून मुसलमानाला तीव्र संताप येतो, तर हिं‌‌ वेदांची किंवा रामकृष्णांची निंदा शांतपणें ऐकून घेतो. दुसरी गोष्ट, हिंदु स्वभावानें मारामारीवर न येणारा असतो. हिंदुधर्मांत अहिंसेचा मुख्यतः उपदेश असल्यानें हिंदूला शांततामय मार्गाची नेहमीं संवय असते. तिसरें, हिंदूंच्या मूर्तिविषयक कल्पना चुकीच्या होत्या व अजून आहेत. जेव्हां मूर्तीनां आपल्या सामर्थ्यानें मुसलमानांचा प्रतिकार करितां आला नाहीं, तेव्हां धर्मभोळेपणानें हिंदूंस असें वाटलें कीं, जर देव सुद्धां नम्र होणें योग्य समजतात, तर मनुष्यांनीं विरोध करणें निरर्थक आहे. पण ही गोष्ट ध्यानांत ठेविली पाहिजे कीं, मूर्ति म्हणजे एक प्रतीक आहे, प्रत्यक्ष देव नव्हे. आणि या प्रतीकाचा जर अपमान झाला, तर तो मूर्तीच्या धातूचा किंवा दगडाचा अपमान नव्हे किंवा ज्या देवाची ती प्रतिमा असेल त्या देवाचा नव्हे. कारण देव अपमानाच्या कक्षेच्या वर आहे. तर जे लोक त्या मूर्तीला मानतात, त्या लोकांचा खरोखर तो अपमान आहे. मुंबईमध्यें व्हिक्टोरियाच्या पुतळ्याच्या तोंडाला जेव्हां कोणीं काळें फांसलें, तेव्हां त्या संगमरवरी दगडाचा तो अपमान नव्हता किंवा त्या चांगल्या राज्ञीचा नव्हता. पण तो अपमान ज्या ब्रिटिश राष्ट्रानें तो पुतळा उभारला होता, त्याचा तो अपमान होता, व या कृत्यांत हेतुहि त्याचाच अपमान करण्याचा होता. पण चुकीच्या समजुतीनें किंवा भोळसटपणानें हिंदूची अशी कल्पना झाली कीं, या कलियुगांत सनातन धर्माचा अवमान होणें ठरलेंच असल्यामुळें महमुदाच्या विरुद्ध देवतांचेंहि सामर्थ्य चालत नाहीं. अशा भलत्याच समजुतीचा परिणाम हिंदूंच्या मनावर झाल्याशिवाय राहिला नाहीं. आणि प्रत्यक्ष जेव्हां कित्येक अपघात महमुदाला अनुकूल असे घडले, तेव्हां तो समज दृढ झाला

आणि हिंदुलोकांनीं संतापानें व तीव्रतेनें युद्ध केलें नाहीं. ज्या लोकांचीं देवळें भ्रष्ट झालीं, आणि ज्या लोकांचीं घरें उध्वस्त झालीं त्या लोकांस अशा तऱ्हेचा संताप व तीव्र दुःख जरूर यावयास पाहिजे होतें.

( ३ ) पंजाबच्या उच्छेदाचें कारण लोकांची राजकीय उदासीन वृत्ति हेंहि एक होतें. दुर्दैवानें यापूर्वीं बारा शतकें पंजाबावर परकी राजांची सत्ता होती. किंबहुना असेंहि म्हणतां येतें कीं, पोरसच्या काळापासून तों रणजीतसिंगापर्यंत वीस शतकें पंजाबांत स्वराज्य नव्हतें. परकी म्लेच्छ किंवा हिंदु राजे एकामागून एक पंजाबावर अलेक्झांडरपासून महमुदापर्यंत राज्य करीत आले होते. मॅसिडोनियन, मौर्य, शक, बॅक्ट्रियाचे ग्रीक, कुशान, हूण, काश्मीरी, सिंधी व शेवटीं काबूलचे शाही राजे पंजाबावर राज्य करीत आले होते. आणि महमुदानंतर गझनी व दिल्लीच्या राजांनीं पंजाबावर आठशें वर्षें राज्य केलें. अर्थात् शीखांचा राजा रणजीतसिंग होईपर्यंत दोन हजार वर्षें पंजाबावर स्वदेशी राजा झाला नाहीं. महमुदानें पंजाब जिंकला त्यावेळीं पंजाबच्या लोकांच्या अंतःकरणांत स्वराज्य–भावना लुप्त होती. पंजाबचे लोक जरी आर्य आहेत, तरी त्यांना सामर्थ्य असूनहि स्वराज्य भोगण्याची इच्छा नव्हती. यामुळें गझनीहून मुसलमान तुर्कानें राज्य केलें काय किंवा काबूलहून हिंदु अफगाणानें राज्य केलें काय हें त्यांस सारखेंच होतें. राजकर्त्यांत जो यावेळीं बदल होत होता, त्याविषयीं ते उदासीन होते. स्वातंत्र्याच्या रक्षणाकरितां झगडणाऱ्या लोकांचा जोराचा प्रतिकार, अर्थात् पंजाबच्या लोकांनीं महमुदाविरुद्ध केला नाहीं; आणि पंजाब प्रांत हिंदुस्थानांतून एका लढाईंत तुटून निराळा झाला. एका लढाईंत राज्यें गेल्याचीं उदाहरणें पाश्चात्य इतिहासांत आहेत. खुद्द इंग्लंड विल्यम दि कॉंकररनें एका लढाईंत जिंकलें. पण इंग्लंडमधील लोकांनीं नॉर्मन राजे आपले

केले; याउलट गझनीच्या मुसलमान राजांनीं पंजाबचे लोक आपले केले. आणि ज्याप्रमाणें सिंध इ. स. ७१२ मध्यें मुसलमानी राज्यांत सामील झाला, त्याप्रमाणें पंजाब इ. स. १००९मध्यें हिंदुस्थानांतून निराळा पडला.

## टिप्पणी आक्षेपांचें निरसन.

येथें असा एक आक्षेप उत्पन्न होतो कीं, हीं दोन कारणें--धार्मिक भावनांचें शैथिल्य आणि राजकीय उदासीनता--पंजाबच्याच उच्छेदाचीं नव्हे तर सर्व हिंदु राज्यांच्या उच्छेदाचीं कारणें आहेत. किंबहुना बहुतेक आशियांतील राष्ट्रें याच कारणानें पडलेलीं आहेत ही गोष्ट खरी आहे. व याच भागांत सातव्या पुस्तकाच्या अंतीं उत्तर हिंदुस्थानाच्या उच्छेदाचीं कारणें काय झालीं याचा विचार करतांना या दोन कारणांचा आम्हांस उल्लेख करावा लागणार आहे. नरम धार्मिक भावना आणि राजकीय परिस्थितीविषयीं औदासीन्य हें सर्व हिंदुस्थानांतील लोकांचे प्रमुख स्वभावदोष आहेत. पण आम्हांस येथें विशेष हें सांगावयाचें आहे कीं, इ. स. १२०० च्या सुमारें झालेल्या उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत राज्यांच्या विध्वंसाचीं जीं निराळीं मुख्य कारणें झालीं, तीं पंजाबांत मुळींच नव्हतीं. म्हणजे जातींचें कडकबंधन व आपसांतील लढाया या पंजाबांत मुळींच नव्हत्या. उलटपक्षीं पंजाबांत जीं दोन कारणें अस्तित्वांत होतीं, त्यांचा परिणाम इतर ठिकाणापेक्षां पंजाबांत जास्त जोराचा होत होता. तेव्हां पंजाबाच्या उच्छेदाचीं हींच दोन मुख्य कारणें आहेत असें ठरवावें लागतें. तें कसें तें आपण विस्तारानें पाहूं. लोकांच्या धार्मिक अथवा राजकीय वृत्ति त्यांच्या ऐतिहासिक परिस्थितीमुळें उत्पन्न होतात आणि त्या कशा बदलतात याचें परीक्षण इतिहासावरून करतां येतें.

पंजाब प्रारंभापासून वैदिक आर्यांचा देश आहे यांत विवाद नाहीं. येथेंच वेदाचे मंत्र बहुतेक सर्व तयार होऊन गाइले गेले. येथेंच उत्तरकालीन वैदिक संस्कृति परिणत झाली. व्याकरणाचा आचार्य पाणिनि आणि तत्त्वज्ञानाचा गुरु अश्वपति यांचे देश गांधार व मद्र होत. सिंधु-

नदीच्या पश्चिम व पूर्व बाजूच्या या देशांतील ब्राह्मण क्षत्रियांचे बहुविध उल्लेख उपनिषदांमध्यें आहेत. पण " सिंधुषष्ठ पंचनदा"चा हा देश पुढील काळांत मगधाच्या खालोखाल बौद्ध धर्माचा माहेरघर बनला. बुद्धानें खुद्द अफगाणिस्थान व पंजाब या देशांत यशस्वी रीतीनें आपला धर्मोपदेश केला. आणि याच देशांत पुढील काळांत कनिष्काच्या वेळेस महायान बौद्ध पंथ निर्माण झाला. पुरुषपुर आणि तक्षशिला हीं वैदिक काळांतील प्रसिद्ध स्थानें बौद्धधर्माचीं विद्याकेंद्रें बनलीं. तेव्हां पंजाब जरी वैदिक आर्यांचा मूळ देश असला, (आणि अजूनहि पंजाब मुख्यतः भारतीय आर्य आहे ही गोष्ट सर एच् रिस्ले यांनीं इ. स. १९०१ च्या सेन्सस वेळीं घेतलेल्या शीर्षमापावरून सिद्ध झाली आहे) तरी हिंदुस्थानच्या इतर भागांपेक्षां पंजाबची हिंदु--धर्मभावना कमी तीव्र होती. इ. स. पूर्व २५० च्या सुमारास हल्लींच्या स्वरूपांत आलेल्या महाभारताच्यावेळींहि हा फरक दिसत होता (टिप्पणी पहा). हुएनत्संग इ. स. ६३० मध्यें हिंदुस्थानांत आला, त्यानेंहि लिहून ठेविलें आहे कीं, कपिश अथवा काबूल नगर म्हणजे जलालाबादसह, व उद्यान म्हणजे स्वात तक्षशिलेसह हे देश पूर्ण बौद्ध होते. आणि पेशावर व पंजाब अर्धे बौद्ध होते. (भाग १ पान २४४ पहा.) पंजाबांत वैदिक काळांतच जातिबंधनें शिथिल होतीं, तीं बौद्ध–काळांत अधिक शिथिल झालीं. सरस्वतीच्या प्रदेशांत ब्राह्मण धर्म वाढला. आणि उत्तर हिंदुस्थानांत जातिसंस्था जोरावली; पंजाबांत मात्र जातिबंधनें शिथिल राहिलीं. " आज ब्राह्मण, उद्यां क्षत्रिय, परवां वैश्य, तेरवां नापित आणि मग पुनः ब्राह्मण पंजाबांत होतो " असें महाभारतांत वर्णन आहे. हर्षानंतर कुमारिल व शंकर यांच्या प्रयत्नानें बौद्ध धर्माचा उत्तर हिंदुस्थानांत उच्छेद झाला आणि हल्लींचा हिंदुधर्म उदय पावला, त्यावेळेस पंजाबांतूनहि बौद्धधर्म नष्ट झाला. परंतु हिंदुधर्माचीं केंद्रें दक्षिणेंत दूर असल्यानें पंजाबांत असलेल्या वर्णशैथिल्यावर त्याचा प्रभाव पडला नाहीं व खानपानादि व्यवहारहि पंजाबांत निराळा राहिला. यामुळें महमुदानें ज्या वेळेस पंजाब जिंकला त्यावेळीं लोकांची हिंदुधर्मभावना इतरत्रपेक्षां अधिक नरम होती. वर्णाश्रमधर्मावर जो दृढ विश्वास गंगायमुना-प्रदेशांतील लोकांचा आहे तो

पंजाबांत नव्हता. यामुळें पंजाबांतील लोकांनीं जबरदस्तीच्या बाटविण्यास विशेष जोराचा प्रतिबंध केला नाहीं. व महमुदानें फोडलेल्या मूर्तींची पूजा करणें, आर्यवंशाचे सर्व शारीरिक सामर्थ्य असलेल्या हिंदु जनतेंत जितकी सुलभता दिसणें शक्य नाहीं तितक्या सुलभतेनें त्यांनीं सोडून दिलें.

राजकीय औदासीन्यासंबंधीं पाहतां हिंदुस्थानच्या इतर भागांपेक्षां पंजाबांत हें औदासीन्य जास्त होतें. म्हणजे याहि बाबतींत पंजाबची स्थिति अधिक वाईट होती. फार प्राचीन काळापासून पंजाबांतच नव्हे तर सर्व हिंदुस्थानांत राजकीय भावना निद्रिस्तच आहे. बहुतेक सर्व प्राच्य लोकांच्या राजकीय कल्पना अजूनहि असंस्कृत आहेत. राष्ट्र लोकांचें आहे, राजाचें नव्हे, ही कल्पना अलीकडील काळांतच उत्पन्न होत चालली आहे. अनियंत्रित राजसत्तेखालीं नेहमींची राजकीय कल्पना म्हणजे देश राजाचा आहे, राजा देशाचा नव्हे. अर्थात् लोकांपैकींच राजा असला पाहिजे अशी आवश्यकता नाहीं. वैदिक काळांत आर्यांच्या यापेक्षां जास्त पायाशुद्ध कल्पना होत्या. आणि लोक म्हणजेच खरोखर राष्ट्र समजलें जाई. वैदिक काळांत राष्ट्राचें आणि राजाचें नांव लोकांवरूनच असे. एकवचनी लोकांचें नांव राजार्थीं आणि अनेक वचनीं राष्ट्रार्थीं वापरीत. उदाहरणार्थ मद्र, कुरु, शाल्य, पांचाल इत्यादि शब्द पहा. अलेक्झांडरच्या काळापर्यंतसुद्धां पंजाबांत असे कांहीं लोक किंवा राष्ट्रें होतीं कीं, त्यांच्यांत राजाच नव्हता. अरायन इतिहासकारानें लिहिलें आहे कीं, "मालव, यौधेय, शाल्व वगैरे लोकांत राजा नव्हता. त्यांच्यांत राज्यव्यवस्था लोकसत्ताक होती. महाभारतांत अशा लोकांना गण संज्ञा आहे. असो, वैदिक काळांत किंवा भारतकाळांत निराळी स्थिति असली तरी त्या अलीकडच्या काळांत सर्व देशांत राजसत्ताच चालू झाली. आणि देश किंबहुना देशांतील लोक राजाची खासगी मिळकत मानूं जाऊं लागले. अर्थातच अशा राजव्यवस्थेखालीं राष्ट्रीय भावना उत्पन्न होणें शक्य नव्हतें. पण पंजाबचा व इतर प्रांतांचा फरक हा कीं, उत्तर हिंदुस्थानांत स्वदेशी राजे असल्यानें तेथें थोडी तरी राष्ट्रीय भावना जागृत होती. परंतु पंजाबांत सारखें परकी राज्य शतकेंच्या शतकें चालू असल्यानें तेथें ही थोडीहि राष्ट्रीय धुगधुगी बाकी नव्हती. यामुळें राज्य कोण

करतो आहे, याविषयीं लोक पूर्ण उदासीन असत. या कारणानें जेव्हां आनंदपाल लढाईत हरला तेव्हां साधारण लोकांनीं मुळींच विरोध केला नाहीं आणि शांतपणें महमुदाची राजसत्ता मान्य केली.

या सर्व कारणांवरून हिंदु धार्मिक भावनेचें शैथिल्य व राजकीय औदासीन्य यामुळेंच पंजाबाचा महमुदाच्या हल्ल्यापुढें सहज उच्छेद झाला. ब्रिटिश सत्तेखालीं आणि एकंदर सुधारलेल्या जगताच्या बदललेल्या परिस्थितींत पंजाबांतहि राष्ट्रीय भावना जागृत होत आहे. परंतु पंजाबांत भिन्न धर्मांच्या झगड्यांत हिंदूंना आपलें स्थान कायम ठेवणें असेल तर त्यांनीं आपली धर्मश्रद्धा, जरी ती स्थिर आहे तरी, इतकी मजबूत केली पाहिजे कीं, तिची शक्ति शीख किंवा मुसलमान यांच्या धार्मिक भावनेच्या शक्तीबरोबर होईल.

याच राजकीय कल्पनांच्या चुकीमुळें हिंदू शिपायांचा मोठा जो एक दोष दिसतो व ते पाश्चात्य आर्य लोकांप्रमाणें डांबून युद्ध करीत नाहींत तो उत्पन्न झालेला आहे. देश राजाचा, लोकांचा नव्हे अशी कल्पना असल्यानें लढाईच्या जयापजयांत आपलेपणाचें हित शिपायांना वाटत नसतें. लढाई हरली तर एक नवीन राजा येईल आणि तो जुन्या राजा इतकाच मान्य करावयास हरकत नाहीं, कारण राजा आपल्या देशाचा नसला तरी चालतो अशी समजूत असते. महाभारतकाळीं आर्यांची मनःस्थिति निराळ्या प्रकारची होती. यामुळें भारतीययुद्धांत ते चिकाटीनें शेवटपर्यंत लढले. भारतीयुद्धाच्या शेवटच्या दिवशीं जेव्हां दुर्योधन रणांगणांत दिसेनासा झाला, तेव्हां कांहीं शिपाई व फौजी अधिकारी राजा कोठें आहे म्हणून विचारूं लागले. पण इतरांनीं जबाब दिला कीं, " राजाची चौकशी कशास करितां ! तुम्ही चिकाटीनें लढा आणि जय मिळवा. मग राजाविषयीं आपण विचार करूं. " हें महर्षि व्यासांचें वर्णन मननीय आहे. अशा प्रकारची मनःस्थिति पुढील काळांत राहिली नाहीं. कारण राष्ट्र राज्य झालें, राजाची मिळकत, लोकांची नव्हे अशी कल्पना झाली. तात्पर्य हिंदु शिपायांची पळून जाण्याची प्रवृत्ति, मृत्यूच्या भीतीमुळें नव्हे तर स्वदेशभक्तीची स्वहिताची कल्पना त्यांस लढाईच्या जयापजयांत नसते, ह्यामुळें होते. बैहकीनें एक मजेची गोष्ट सांगितली

आहे. हिंदु शिपायी नाइक ऑक्सस नदी पलीकडील तुर्कांविरुद्ध झालेल्या लढाईंत गझनी राजांच्या तर्फे लढत. किंबहुना त्यांच्या शौर्याची बैह-कीनें तारीफ केली आहे. एके प्रसंगीं लढाईंत पराजय झाला व हे लोक पळाले, गझनीस परतल्यावर त्यांच्यावर पळाल्याच्या आरोपावरून चौकशी बसून ते नोकरींतून बरखास्त केले गेले. तेव्हां कांहीं जणांनीं शिक्षा ऐकतांच अपमानामुळें आपल्या पोटांत कटयारी खुपसून तेथेंच प्राण दिले. मसऊद सुलतानानें त्यांजविषयीं दुःख दाखविलें नाहीं किंवा त्यांच्या आत्मयज्ञाची प्रशंसा केली नाहीं. " या लोकांनीं याच कटयारी शत्रूवर चालवीत असतां आपला प्राण कां वेचला नाहीं ? " असें जें मसऊद म्हणाला यांत तथ्य आहे. आत्महत्त्या करण्यांत जी मृत्यूची निर्भयता दिसते ती शत्रूशीं शेवटपर्यंत लढण्यांत कां दाखविली जात नाहीं ? असो. हिंदु शिपायांचा हा स्वभावदोष त्याच्या चुकीच्या राज्यकल्पनेमुळें व त्यांस युद्धाच्या निकालांत कांहींच स्वहित वाटत नसल्यामुळें उत्पन्न होतो, मृत्यूच्या भीतीमुळें नव्हे असें आम्हांस वाटतें.

येथें आणखी असा प्रश्न उपस्थित होईल कीं, पंजाबांत या वेळीं किंवा पूर्वकाळीं क्षत्रिय नव्हते काय ? आणि असतील तर त्यांनीं आपलें राज्य स्थापण्याचा कां प्रयत्न केला नाहीं ? पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, पंजाबांतील बहुतेक लोक आर्य आहेत. अर्थात् महमुदाच्या वेळीं व तत्पूर्वीं हजारों क्षत्रिय व वैश्य शुध्द आर्य-रक्ताचे पंजाबांत होते. परंतु अलेक्झांडर व तदुत्तरचे जेते यांनीं नेहमीं लढवय्यी लोकांची कत्तल केली असल्यामुळें राज्यकरणारीं घराणीं पंजाबांत नष्ट झालीं. ज्या शूर क्षत्रिय जातींनीं अलेक्झांडरला विरोध केला, त्यांचे म्हणजे शिबि, मालव, मद्र, योधेय वगैरे यांचे वंशज अद्याप पंजाबांत आहेत व महमुदाच्या वेळीं होते. पण ते सर्व शेतकरी झाले होते. विशेषतः गांवचे पाटील बनले होते. अशा प्रकारचा आपद्धर्म क्षत्रियांकरितां स्मृत्यांमधून—मुख्यतः पराशरस्मृतींत—सांगितला आहे ( भाग २. पान ३२३ पहा ). यामुळें

पंजाबांतील क्षात्रियांना, ते शूर, सामर्थ्यवान् असूनहि त्यांचा प्राचीनकाळापासून चालत असलेला स्वभाव जो ईश्वरभाव अर्थात् दुसऱ्यावर राज्य करण्याची इच्छा व दुसऱ्यांचें राज्य सहन न करण्याचा निश्चय हा जो क्षत्रियांचें स्वभावजकर्म म्हणून भगवद्गीतेंत सांगितला आहे तो पारखा झाला होता. आपल्या गांवांत जोंपर्यंत एकाप्रकारचें अर्थस्वातंत्र्य उपभोगावयास मिळत आहे, तोंपर्यंत देशावर कोण राज्य करीत आहे ह्याकडे ते लक्ष देत नसत. राजकीय सत्ता मग ती ग्रीक, शक, कुशान, हूण किंवा तुर्क या परकीयांची असो किंवा सिंध अथवा काश्मीर येथील स्वदेशी राजांची असो, अशा जमीनदारांना कधींहि त्रास देत नसे. त्यामुळें हें गांवोगांव पसरलेले क्षत्रिय राजास त्रास देत नसत. यामुळें एक भेद, राज्य करणारे क्षत्रिय आणि शेती करणारे क्षत्रिय असा उत्पन्न झाला. हा भेद पंजाबांत अद्याप मानला जातो. राज्य करणारे क्षत्रिय म्हणजे रजपूत, प्रत्यक्ष राज्य करणारांचे पुत्रपौत्र, कधींहि शेती करीत नसत व नाहींत. एक गांव कां होईना तेवढ्यावर ते राज्य करीत. ही राज्य करण्याची क्षत्रियांची लालसा महाभारतांत युधिष्ठिरानें दुर्योधनापाशीं जी शेवटची मागणी केली तींत प्रतिबिंबित आहे. “ आम्हांला निदान पांच गांवें दे. एका भावाला एक. आणि बाकीचें राज्य तूं भोग. ” या वाक्यांत दिसणारा रजपूतांचा राज्य करणारा स्वभाव, पंजाबांत जे रजपूत शिल्लक उरले त्यांना पंजाबाच्या बाहेर पूर्व हद्दीवरील हिमालयाच्या पायथ्याचे प्रदेश किंवा राजपुतान्याचीं वाळवंटें किंवा तेथूनहि पूर्व व दक्षिण देश यांत घेऊन गेला. भाग २ यांत दाखविलेंच आहे कीं, राजपुतान्यांतील हल्लींचीं राज्य करणारीं घराणीं ग्रीक, शक, कुशान, हूण, तुर्क यांच्या स्वाऱ्यांच्या वेळीं पंजाबांतून निघालेलीं आहेत. मुख्यतः चव्हाण, परमार, भाटी किंबहुना राठोड सुध्दां पंजाबांतून आलेले आहेत,आणि पंजाबचे हिंदु तसेच मुसलमान झालेले रजपूत आपणांस

वर सांगितलेल्या रजपूत कुलांचेच मानतात. तुर्कांच्या स्वाऱ्यांमुळें झाबुलिस्थान प्रांत भाटी रजपुतांच्या कबजांतून गेला, तेव्हां ते पंजाबांत पसरले, आणि शेवटीं राजपुतान्यांत जेसलमीर येथें स्वराज्य स्थापून राहिले. मिठाच्या डोंगरांतील मुसलमान जंजुआ रजपूत हे अनूच्या वंशांतले आनव मानले जात असून पंजाबांतील अत्यंत शूर क्षत्रियांमध्यें त्यांची गणना आहे. हे व इतर लढवय्ये हल्लींचे क्षत्रिय लोक जे रजपूत गांवाचे पाटील बनून व कधीं शेतकरीहि होऊन स्वतंत्रता बाळगून राहिले त्यांचेच वंशज आहेत.

आतां हे जे क्षत्रिय गावांगावांतून राहिले त्यांनीं सुद्धां प्राचीन काळीं राज्यें स्थापण्याकडे दुर्लक्ष केलें याचें कारण असें कीं, बाहेरील जे म्लेच्छ राजे राज्य करीत ते जितांचा धर्म स्वीकारून स्वदेशचि राजे बनत. ज्याप्रमाणें नॉर्मन लोक जेते होते तरी जितांच्याच ख्रिस्तीधर्माचे असल्यानें ब्रिटन व सॅक्सन यांच्याशीं एकजीव झाले, त्याचप्रमाणें ग्रीक, कुशान, आणि हूण हे हिंदुस्थानांत आल्यावर बौद्ध किंवा वैष्णव होत ( शेवटचा मिहिरकुल हा कडकडीत शैव बनला होता ). यामुळें त्यांचें राज्य परकी राज्यासारखें भासलें नाहीं. काश्मीर, सिंध व काबूल यांचे राजे पुढें पंजाबावर राज्य करूं लागले, ते तर हिंदूच होते, आणि रितीभाती व संस्कृति यांत लोकांशीं एकजीवच होते. त्यांचें राज्य परकीय असें कधींच वाटलें नाहीं. तुर्कांनीं जेव्हां पंजाब जिंकला, तेव्हां मात्र जित व जेते यांच्या धर्मभेदामुळें, विशेषतः देवळें व मूर्ति फोडल्या गेल्यानें, हे परकी राज्य असह्य झालें असलें पाहिजे. ह्याशिवाय मुसलमानी राज्य हिंदुराज्यापेक्षां जास्त जुलमी असे हें आम्हीं पुढें दाखविणारच आहों. असें होतें तरी पंजाबांतील शूर जमीन धारण करणाऱ्या क्षत्रियांनीं आपलें राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न केला नाहीं. याचें दुसरें कारण झालें तें या बहुतेक जाति जबरदस्तीनें बाटविल्या गेल्या हें होय.

पंजाबच्या पश्चिमेकडील भागांतील बहुतेक लढवय्या जाति मुसलमान झाल्यामुळें पंजाब प्रांतांतील लोकांत एक मोठी फट पडली आहे. हिंदुस्थानांतील सर्व लोकांत पंजाबचे लोक शूर व सशक्त असूनहि या दुभंगामुळें सर्वांत स्वराज्य मिळविण्यास अत्यंत अशक्त झाले आहेत. या क्षत्रिय जातींनीं जबरदस्तीनें बाटविण्यास कां जोराचा विरोध केला नाहीं याची उपपत्ति अशी दिसते कीं, एक तर कत्तलींतून आपणास बचावण्याची प्रबल इच्छा.आणि दुसरें आपल्या जमिनी व आपल्या वंशपरंपरागत पाटिलक्या इत्यादि वतनें कायम ठेवण्याची लालसा. याशिवाय हिंदूंची धर्मभोळेपणाची समजूत अशी आहे कीं मनुष्य एकदां गोमांस खाऊन किंवा असेंच इतर पातक जबरदस्तीनें कां होईना करून बाटला म्हणजे तो पुन्हां हिंदू होऊं शकत नाहीं; यामुळेंहि या कायमचे मुसलमान बनलेल्या लोकांची सहानुभूति, जरी ते मूळचे क्षत्रिय होते तरी, साहजिकच मुसलमानी राजाकडेच वळणार. यामुळें या परकी अमलांतहि स्वदेशी राज्य स्थापण्याचा प्रयत्न शेवटीं शीख राजे १८ व्या शतकांत होईपर्यंत पंजाबांत झाला नाहीं. शीख धर्मानें मुसलमानी जुलमाचा प्रतिकार एका प्रकारची कॉन्स्क्रिप्शन,म्हणजे प्रत्येक मनुष्यांस शिपाई शिक्षण देण्याची पद्धत, प्राचीन ग्रीस किंवा रोम अथवा अर्वाचीन जर्मनी किंवा फ्रान्स या देशांत जारी आहे तशी अंमलांत आणून केला आणि मुसलमानांस जिंकलें. गुरु गोविंदसिंगास प्रत्येक शिखास शिपाई बनविण्याची आवश्यकता कळून आली, आणि पंजाबांतील लोक जात्याच लढवय्ये असल्यानें गुरु गोविंदसिंगास मुसलमानी धर्माप्रमाणें शीख धर्मास लढवय्या धर्म बनविण्यांत यश आलें. पंजाबचा इतिहास शिखापर्यंत थोडक्यांत असा आहे व शिखांपावेतों पंजाबांत स्वराज्य कां स्थापन झालें नाहीं व तेथील लोकांत राजकीय औदासीन्य कां होतें याचें विवरण असें आहे. पुढील परिस्थितींत पंजाबच्या लोकांची

जागृत झालेली राजकीय भावना हल्लीं लोक दूभंग नसून त्रिभंग झाले आहेत अशा वेळीं काय करूं शकेल हें सांगणें या ग्रंथाच्या उद्देशाच्या बाहेरचें आहे. तें राजकीय बाबींत पुढाकार घेतलेल्या वर्तमान व भावी लोकांवर सोपविलें पाहिजे.

उत्तर हिंदुस्थानांतील हिंदू राजांनीं पंजाबावर आपलें राज्य स्थापण्याचा प्रयत्न कां केला नाहीं याचें कारण थोडक्यांत सांगूं. पंजाबचे अर्धे लोक मुसलमान झाले होते, आणि ते अशा प्रयत्नास अनुकूल झाले नसते. काश्मीर किंवा कनोज असा प्रयत्न करण्यास यावेळीं समर्थ नव्हता. सांबरचे चव्हाणांचें राज्य दूर होतें आणि त्यांच्यातहि इतका कोणी प्रबल राजा झालेला दिसत नाहीं. बीसल तिसरा हा जर आणखी कांहीं वर्षें वाचता, तर त्यानें कदाचित् हा प्रयत्न केला असता. आपल्या वंशजांनीं असा प्रयत्न करावा असा त्यानें आग्रहाचा उपदेश आपल्या एका शिलालेखांत त्यांस केला आहे त्याचा उल्लेख पुढें चव्हाणांच्या इतिहासांत येईल.

## टिप्पणी–पंजाबांतील धर्मशैथिल्य दाखविणारे महाभारतांतील उल्लेख.

कर्णपर्व अध्याय ४० ते ४६ यांत कर्ण आणि शल्य यांमधील एक जोराचा संवाद दिला आहे. त्यांत पंजाबच्या लोकांचें धार्मिक अनाचार आणि वाईट चालीचे प्रकार कर्णानें दाखविले असून शल्यानें त्याचें उत्तर फारसें दिलेलें नाहीं. यावरून त्या काळीं आर्यावर्ताचे लोक म्हणजे हल्लीच्या यू. पी. व दिल्लीचे लोक पंजाबांतील हिंदूकडे क्षुद्र दृष्टीनें कसे पहात तें दिसतें. “लोक आपल्या घरामध्यें हंसत खिदळत, गोमांस खात व दारू पीत नाचतात आणि सक्तु व मासे खातात. मद्र देशांत व सिंधुपलीकडील गांधार देशांत शुद्धता राहिली नाहीं. विंचू चावण्यावर जो मंत्र आहे त्यांत एक वाक्य असें आहे. ‘मद्र देशाच्या लोकांशीं

मी व्यवहार ठेवणार नाहीं. या पुण्यानें हें तुझें विष नष्ट होवो.' (अध्याय ४३). अध्याय ४४ मध्यें आणखी असें सांगितलें आहे. "वाहिक देशांत, जेथें पांच नद्या आणि सहावी सिंधु वाहते तेथें, कोणी जाऊं नये. कारण तो देश हिमालयानें किंवा गंगा, यमुना व सरस्वतीनें पवित्र झालेला नाहीं. किंवा त्यांत खरा धर्म व शुद्धताहि राहिली नाहीं. गोमांस लशुनासह खाणारे आणि गूळ व तांदुळ यापासून केलेली सुरा पिणारे लोक शीलवर्जित आहेत. या देशाचें नांवच आरट्ट आहे. आणि तो धर्महीन आहे, मनुष्यानें तेथें जाऊं नये. तो व्रात्यांचा म्हणजे धर्मसंस्कार-हीनांचा आणि यज्ञहीनांचा देश आहे. जर तुम्ही युगंधर नगरांत पाणी प्याल आणि अच्युतस्थलांत रहाल किंवा भूतलव्याच्या तलावांत स्नान कराल तर तुम्हास स्वर्ग कसा मिळेल ! आरट्ट वाहिक देशांत आर्यानें दोन दिवस राहूं नये. तेथें ब्राम्हण आज क्षत्रिय होतो, मग वैश्य, मग शूद्र आणि शेवटीं नापित होऊन पुनः ब्राम्हण होतो." शल्यानें आपल्या जबाबांत एवढेंच उत्तर दिलें आहे कीं चांगले व वाईट लोक प्रत्येक देशांत असतात.

# प्रकरण अठरावें.

## महमुदाच्या मागूनचे राजे.

महमुदानें हस्तगत केलेला पंजाब व काबूल हे प्रांत जरी यापुढें हिंदु हिंदुस्थानचे भाग उरले नाहींत तरी महमुदाच्या नंतरच्या राजांच्या कारकीर्दीतील गझनीच्या राज्याचा त्रोटक इतिहास, त्यांत आलेल्या हिंदु हिंदुस्थानच्या उल्लेखांच्या अनुसंधानानें, देणें आवश्यक आहे. गझनीच्या राजघराण्याचा संक्षिप्त इतिहास मिनाजउस्सिराजनें तबकात-इ-नासिरीमध्यें दिला आहे. मिनाजउस्सिराज हा विद्वान् गृहस्थ पुष्कळ राजांच्या कारकीर्दीत—नासिरुद्दीन व घिआसुउद्दीन यांच्या कारकीर्दींतहि—दिल्लीचा व त्याभोंवतालच्या साम्राज्याचा काझी होता ( इलिअट् २ पान २६० ). त्यानें हा इतिहास लिहून हि. स. ६५० च्या सुमारास तो नासिरुद्दीन यास अर्पण केला. बैहकीनें मसाउदच्या कारकीर्दीचा सन १०५० च्या सुमारास लिहिलेला गोष्टीरूपाचा सविस्तर वृत्तांतहि उपलब्ध आहे. त्यानें लिहिलेल्या गोष्टी बहुधा त्याच्या डोळ्यादेखत घडलेल्या आहेत. आणि हा वृत्तांत माहितीनें भरलेला आहे. ह्या दोन पुस्तकांवरून हिंदु हिंदुस्थानच्या उल्लेखांस उद्देशून जरूर असलेला महमुदानंतरच्या गझनवी राजांचा त्रोटक इतिहास या प्रकरणांत आम्ही देणार आहोंत.

महमुदाचे दोघेहि मुलगे मसाऊद व महंमद हे एकाच दिवशीं दोन मातांच्या पोटीं जन्मास आले. मसाउद हा शरीरानें असा शक्तिमान् होता कीं, त्याची गदा खुद्द महमुदासहि पेलत नसे. परंतु तो उच्छृंखल आणि भांडखोर होता. महंमद हा शांत आणि हुशार होता; आणि त्यामुळें बापाची त्याच्यावर मर्जी होती. मसा-

ऊद प्रजेला व सैन्याला पीडा देईल अशा समजुतीनें महमुदानें महंमदाला युवराज नेमिलें आणि खलिफाकडून खुतब्यांत त्याच्य नांवाचा समावेश करण्याची परवानगी मिळविली. याबद्दल एका अधिकाऱ्यानें खासगी संभाषणांत मसाउदचें सांत्वन केलें असतां मसाउदनें मुसलमानांच्या नेहमींच्या उत्साहानें उत्तर दिलें "सिंहासनाच्या निर्णयाचा अधिकार कागदाच्या भिंडोळ्यांपेक्षां तरवारींतच चांगला दिसून येतो." आणि अपेक्षेप्रमाणेंच वस्तुस्थिति घडून आली. महमुदाप्रमाणेंच बापाच्या मृयुत्समयीं मसाऊद हा खोरासानचा प्रांताधिकारी होता. आणि गझनीच्या राज्यावर बसलेल्या महंमदावर, महमुदानें जशी आपला भाऊ इस्माएल याचेवर स्वारी केली होती तशीच, मसाउदनें तात्काळ स्वारी केली. पण मसाउदनें महमुदावरहि ताण केली. त्यानें आपल्या भावाचें डोळे काढले आणि त्याला सदैव कडक कैदेंत वागविलें. महमुदाचें प्रचंड साम्राज्य आपल्या अधिकारांत आणल्यावर त्याच्या भावानें निरनिराळ्या अधिकाऱ्यांस दिलेला पैसा त्यांचें हाल करूनहि एकूणएक मसाऊदनें वसूल केला. महमुदांत व शिवाजींत जसें साम्य होतें तसें हरएक बाबतींत त्याचा मुलगा मसाउद आणि संभाजी यांच्यातहि होतें. संभाजीहि मसाऊदप्रमाणेंच शरीरानें सामर्थ्यवान् होता; आणि त्यानेंहि बापाच्या मृत्यूनंतर आपला भाऊ राजाराम यास पदच्युत करून त्याच्या आईचा जीव घेतला. त्यानें साधारणपणें दहा वर्षें जोमानें राज्य केलें; शेवटीं अवरंगजेबानें त्यास पकडून त्याचा क्रूरपणें अंत केला. मसाउदचाहि दहा वर्षांच्या तेजस्वी कारकीर्दीनंतर असाच शोचनीय अंत झाला. संभाजी व मसाउद या दोघांचाहि आपआपल्या धर्मावर पूर्ण विश्वास होता. महमुदाप्रमाणेंच मसाऊदनेंहि धर्मसुधारकांचा छळ केला आणि हिंदुस्थानावर धर्मप्रसारार्थ कांहीं स्वाऱ्या केल्या.

महमुदानें आपल्या घराण्याच्या हातीं दिलेल्या राज्याची कारभार-पद्धति कशी व्यवस्थित होती हें बैहकीनें लिहिलेल्या तपशीलवार सरस वृत्तांतावरून दिसून येतें. प्रधानांना वस्त्रें द्यावयाचीं तीं मोठ्या समारंभानें देण्यांत येत. सर्व गोष्टींत सुलतान आपल्या प्रधानाचा शिरस्त्यानें सल्ला घेत असे व सुलतान व प्रधान यांचें दरम्यान जो खलित्यांचा व्यवहार होई तो सुलतानाच्या प्रायव्हेट सेक्रेटरीमार्फत होत असे. सर्व हुकूम लेखी सुटत असत. हिंदुस्थानांतील पंजाबप्रांताचा कारभार काझी व सेनापति यांचें मार्फत चालविण्यांत येई. ते दोघेहि लाहोरास रहात. मुलकी राज्यकारभार काझीचें हातीं असून तो कर वसूल करी व न्याय देई. आणि लढाया करण्याचें, तसेंच खंडण्या वसूल करण्याचें, आणि हत्ती पाडाव करून आणण्याचें व बंडखोर हिंदूंना जिंकून शासन करण्याचें काम सेनापतीकडे असे (ईलियट २ ,पा. ११९). अहमद निआल्तगिन याची जेव्हां हिंदुस्थानचा सेनापति म्हणून नेमणूक झाली तेव्हां त्याला सुलतानाकडून खिल्लत आणि सुलतानाचा तोंडी हुकूम मिळाला, व लगेच एक लेखी सनद देण्यांत आली. नंतर शपथेचा विधि झाला, आणि आपण सुलतानाची नोकरी एकनिष्ठपणानें बजावूं अशा अर्थाच्या करारावर त्यानें आपली सही केली. आणि मग हे सर्व कागद सुलतानास दाखवून दप्तरदाराचें हवालीं करण्यांत आले (ईलियट २ पा. ११९). निआल्तगिन हिंदुस्थानांत आला तेव्हां त्याचें बरोबर गुलामीतून मुक्त केलेले कांहीं बंडखोर सैनिक व गुलाम पाठविण्यांत आले होते. त्यांच्यावर देखरेख करून त्यांना उद्योग लावण्याचें काम निआल्तगिन यास सांगितलें होतें. मौजेची गोष्ट ही कीं, त्यांना चंद्रभागेचें पलीकडे जाऊं देऊं नये किंवा लाहोरच्या सैन्यांत मिसळूं देऊं नये असा हुकूम देण्यांत आला होता. ते लाहोरास गेल्यास त्या राजाधानीच्या शहरीं कांहीं बखेडा

उत्पन्न करतील, आणि स्वतंत्र हिंदुस्थानांत जाऊं दिल्यास ते घोटाळा माजवतील अशी समजूत असावी.

सेनापतीच्या अनेक कामांपैकीं हें एक काम असे कीं, त्यानें पंजाब-हिंदुस्थानांत स्वाऱ्या करून तेथील ठाकुरांपासून खंडण्या वसूल कराव्यात. हे ठाकुर म्हणजे लढाऊ व स्वतंत्र बाण्याचे आणि ताब्यांत ठेवण्यास कठिण असे जमीनदार होते. ते क्षत्रिय वर्णाचे असून त्यांचें वर्णन पूर्वी करण्यांत आलेंच आहे. निआल्तगीनानें हिंदुस्थानांत स्वारी केली व तो बनारसेपर्यंत चाल करून गेला. "महमूदहि इतका खालीं उतरला नव्हता" असें बैहकीनें म्हटलें आहे. यावरून असें निर्विवाद दिसून येतें कीं, महमुदानें राज्यपालाचा राहिब नदीवर पराभव केला तेव्हां तो बारीच्या अलिकडे आला नसावा. राहिब ही औंधमधील कोणती तरी (घागरा किंवा गोमती) असावी. निआल्तगीन व काझी यांच्यांत कांहीं बाबतींत तंटा उपस्थित झाला. (ब्रिटिश हिंदुस्थानांतहि मुलकी व फौजी अधिकाऱ्यांत तंटे होऊन अतिशय नुकसान झाल्यानें शेवटीं हिंदुस्थानच्या राज्यपद्धतींत गव्हर्नर जनरलाची हुकमत सेनापतीवर कायम झाली आहे). मुख्य प्रधानानें निआल्तगीनला असें सांगितलें आहे कीं, तुं हिंदुस्थानचा सेनाध्यक्ष आहेस व काझीची कोणत्याहि तऱ्हेची तुझ्यावर हुकमत नाहीं (ईलिअट २, पा. १२८). निआल्तगिननें काझीशीं भांडण केलें व मसाउदच्या संमतीनें हिंदुस्थानांत स्वारी केली. काझीशीं झालेल्या भांडणांत मसाउदनें निआल्तगिनाचा पक्ष उचलला होता.

या स्वारीचें वर्णन बैहकीनें पुढीलप्रमाणें केलें आहे. "निआल्तगीन गंगा उतरला आणि दक्षिण तीरानें चाल करून गेला. त्यानें आपलें सैन्य अकस्मात् बनारस पुढें उभें केलें. तें शहर गंगाच्या राज्यांत होतें. त्याचें क्षेत्र दोन चौरस फर्लांग (५ मैल) होतें व त्यांत पाणी विपुल होतें. (गंगाच्या) भीतीमुळें सैन्य शहरांत फक्त

सकाळपासून दुपारपर्यंतच राहिलें. सैन्यांतील लोकांनीं सुगंधी विकणारे, जवाहिरे व जरतारी काम करणारे यांचीं दुकानें लुटून फस्त केलीं; व सोनें, चांदी, सुगंधी द्रव्यें आणि जवाहीर यांच्या लाभानें आभर होऊन ते सुरक्षितपणें परत गेले." बैहकीनें हें सर्व आपल्या डोळ्यानें पाहिलें असण्याचा संभव आहे. तो त्यावेळीं हयात होता यांत तर वाद नाहीं. त्यानें या स्वारीचा काल इ. स. १०३३ दिला आहे. बनारस शहर हें त्रिपुरचा कलचूरी राजा गांगेयदेव याच्या राज्यांत या वेळीं होतें असें दिसतें.

गांगेयदेव हा सामर्थ्यवान् राजा होता. त्याचें सैन्य बहुधा जवळच कोठें तरी असावें, आणि त्याचें सामर्थ्य प्रसिद्ध असल्यामुळें तुर्क त्याला फार भीत असत. बाजारांत कापडवाले, गंधी व जवाहिरे यांचीं दुकानें होतीं. या धंद्यांची अजूनहि बनारसेंत भरभराट आहे. बनारसेंत पाणी मुबलक होतें असा जो उल्लेख आहे तो विहिरीच्या पाण्यास किंवा शहराभोंवतालच्या प्रदेशांतील पाण्यास उद्देशून असावा. खुद्द बनारस गंगेच्या तीरावरच वसलेलें आहे.

या यशस्वी स्वारीनें निआल्तगिनाचें डोकें महत्वाकांक्षेनें फिरून गेलें आणि आपलें स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या कल्पना त्याच्या मनांत घोळावयास लागून तुर्कस्थानांतून तुर्की लोकांस सैन्यांत दाखल करण्यास त्यानें सुरवात केली. परंतु ही गोष्ट काजीनें मसाउदच्या कानावर घातली. त्यानें निआल्तगिनाला बडतर्फ केलें आणि त्यास शक्यतर जिवंत पकडण्यासाठीं एका हिंदु सेनापतीस हुकूम दिला. निआल्तगिनाचा अखेर पराभव झाला आणि सिंधूनदीवर जाटांनीं त्याचा पाठलाग केला व त्याला मारून टाकलें. प्रबळ सेनापति किंवा गुलाम हे शत्रूप्रमाणेंच मालकासहि कसे पीडाकारक होतात हें या गोष्टीवरून प्रत्ययास येतें.

या महत्वाच्या व विश्वासाच्या कामगिरीवर हिंदुसैनिकांची व

सेनापतीची योजना करण्यांत आली होती, यावरून गझनीच्या मुसलमान राजांच्या अंमलाखालीं हिंदूंस जबाबदारीच्या जागांवर नेमण्यांत येत असे असें दिसून येतें. मुसलमान लेखकांनीं देखील त्यांच्या शौर्याचें वर्णन केलें आहे. हिंदु सैनिकांच्या भरतीस महमुदाच्याच कारकीर्दींत सुरवात झाली. जयपालानें २००० सैनिकांचें दळ कांहीं कालपावेतों गझनीस ठेविलें होतें. हिंदुस्थानच्या हिंदु सैनिकांनीं आपला अतिशय छळ करणाऱ्या आपल्या शत्रूकडे भाडोत्री शिपाई म्हणून राहावें हें ईलियटलाहि विचित्र वाटलें, ( ई. २ पा. ४४८ ). परंतु हिंदुलोकांचें पूर्वींच वर्णन केलेलें धार्मिक व राजकीय औदासीन्य ध्यानांत घेतलें असतां त्यांनीं परकीय अंमलांत नोकऱ्या धरून नेहमींच आपल्या राजनिष्ठेनें व युद्ध–प्रावीण्यानें गौरव कसा संपादन केला याचें आश्चर्य वाटणार नाहीं. हिंदूंना आरंभींच मिळालेल्या या व इतर मानांचा ईलियटनें उल्लेख केला आहे. आपल्या राज्यारोहणाला विरोध करणाऱ्या आपल्या सरदारांविरुद्ध सावंद नांवाच्या हिंदूंची मसाउदनें योजना केली. ( या लढाईंत सावंद हा आपल्या सैनिकांसह गारद झाला ). विजयराजाला महमुदानेंच सेनापति नेमलें होतें व मसाऊदच्या नंतर पुढील सुलतानांनीहि पुनः त्याला नोकरीवर बोलाविलें. अशा अनेक उदाहरणांचा ईलियटनें उल्लेख केला आहे ( ई. २, पा ६० ). जाटांनीं निआल्तगिनाला ठार मारलें तेंहि आपल्या राजाच्या राजनिष्ठपणें सेवेंत.

निआल्तगिनाची बनारसेवरील स्वारी यशस्वी झाली यावरून कनोजचें राज्य कसें दुर्बळ झालें होतें हें दिसून येतें. त्याला आतां साम्राज्य-पदवी उरली नव्हती. राज्यपाल मरून गेला होता. त्रिलोचनपाल त्याच्या गादीवर आला होता. प्रयागास त्यानें केलेल्या दानपत्राचा उल्लेख मागें आलाच आहे बनारस प्रमाणें प्रयागहि गांगेयाचे ताब्यांत गेलें असावें. कलचूरींच्या इतिहासांत गांगेयाचा अंत

प्रयागास झाला याचा उल्लेख येणार आहे. त्रिलोचनपालानें किती वर्षें राज्य केलें व त्याच्यामागून राजा कोण झाला हें माहीत नाहीं. कोलब्रुकनें प्रसिद्ध केलेल्या लेखांतील एका भंगलेल्या शिलालेखांत एका यशःपालाचा उल्लेख आहे ( २ पा. २७८ ). या लेखांत त्याला महाराज ही पदवी लावली आहे परंतु परमेश्वर या नेहमींच्या पदवीचा उपयोग केलेला नाहीं. त्यानें यमुनेचें दक्षिणेस व प्रयागाचें नैऋत्येस कौसंबी--मंडलांत एक दानपत्र केलें आहें. कनोजचा औधवर पूर्ण अंमल होता. परंतु निआल्तगिनाच्या स्वारीनें प्रोत्साहन मिळून तुर्क लोक औधमध्यें अधिकाधिक घुसूं लागले. महमुदाचा भाचा सालार मसऊद याच्याबद्दल जी एक असंभाव्य गोष्ट सांगण्यांत येते तीवरून असें अनुमान करावयास खास जाग आहे कीं, तुर्कांनीं विशेषतः औधमध्यें बऱ्याच स्वाऱ्या केल्या असल्या पाहिजेत;कारण या गोष्टींचा सर्व प्रसंग औध प्रान्तांतील आहे. त्यावेळीं सालार मसाउदचा तळ औध प्रांतांतील सध्याच्या बाराबांकी जिल्ह्यांत सत्रेख येथें होता व तेथून त्यानें अवधांत निरनिराळ्या भागांत स्वाऱ्या केल्या अशी समजूत आहे. औधमधील अनेक जिल्ह्यांत या साधुपुरुषाच्या जागा आहेत अशी कल्पना आहे.या स्वाऱ्या इ.स. १०३८ पासून १०५० पर्यंत झाल्या. सालारची गोष्ट अगदींच कल्पनिक नाहीं; कारण बदाऊन येथें सांपडलेल्या ( ए. इं. २, ६४ ) एका राठोड शिलालेखांत असें म्हटलें आहे कीं, राठोड राजांपैकीं मदनपाल राजानें कोणत्याहि अमिराला स्वारी करणें अशक्य करून टाकलें. या शिलालेखाबद्दल विस्तृतपणें विवेचन आम्ही दुसऱ्या एका प्रकरणांत करणार आहोंत. या शीलालेखांत काल दिलेला नाहीं व त्यामुळें मदनपालाचा काळ निश्चित करितां येत नाहीं. तथापि आमची समजूत अशी आहे कीं हा स्वाऱ्यांचा उल्लेख निआल्तगिन किंवा सालार मसाऊद यांस उद्देशून

असला पाहिजे. हिंदुस्थानांतील रजपूत राजांना विशेषतः या पवित्र तीर्थावरील स्वाऱ्यांमुळें क्रोध आला. आणि मालवाधिपति भोज ( इ. स. १०४० ), त्रिपुरचा राजा कर्ण कलचूरी व शेवटीं गाहडवाल चंद्रराजा यांनीं तुर्कांस व इतर परकीयांस उत्तर हिंदुस्थानाबाहेर हांकून लावून " परकीयांच्या जुलमांतून देशाची सुटका केली; " हा कथाभाग पुढें येणार आहे. चंद्रानें कनोज काबीज केलें व तेथें आपलें प्रबल राज्य प्रस्थापित केलें. अशा तऱ्हेनें प्रतीहारांचें दुर्बल झालेलें घराणें इ. स. १०८० त नष्ट झालें. हे अलीकडचे प्रतीहार राजे पूर्वींच सांगितल्याप्रमाणें गझनीचे मांडलिक बनले होते. त्यांनीं आपल्या राज्यांतील गांवांवर तुरुष्कदंड नांवाचा कर बसविला होता. गाहडवालहि तो दंड वसूल करीत परंतु तो त्यांनीं तुर्कांस दिला नाहीं असे दिसतें. दान दिलेल्या गांवीं तो इनामदारास मिळे.

हा वृत्तान्त आवश्यक असला तरी प्रस्तुत विषयाला सोडून केवळ प्रासंगिक असा आहे, तेव्हां आतां आपण पुनः गझनवीच्या राजांच्या वृत्तान्ताकडे वळूं. बैहकीनें असें लिहिलें आहे कीं एका वर्षीं गझनी नदीला एकाएकीं पूर आला व त्यामुळें शहरांत भयंकर नुकसान झालें. नदीवरील पूल सबंधच्या सबंध वाहून गेला. याकुबइलैस व त्याचा भाऊ यांनीं बांधलेला गझनीचा किल्ला मात्र जशाचा तसा कायम राहिला. गणितांत पारंगत असलेल्या मसाउदनें नवीन एक प्रचंड एकाच कमानीचा पूल बांधला. त्यानें अनेक राजवाडेहि बांधले आणि सुंदर बागाहि लाविल्या.

परंतु सामर्थ्य, शौर्य, विद्वत्ता, प्रजाहितबुद्धि वगैरे अनेक सद्गुण अंगीं असतांहि मसाउदची कारकीर्द दुर्दैवाची झाली; व कमनशिबानें आपल्या राज्याच्या अर्ध्या अधिक भागास त्यास मुकावें लागलें. बैहकी म्हणतो ' अमीर मसाउदमध्यें वैगुण्य असें कोणतें होतें ?

त्याच्या जवळ विश्वासू नोकर, उत्तम अधिकारी, नामांकित योद्धे आणि प्रसिद्ध विद्वान् हे सर्व होते. परंतु नियतीनें असें योजिलें होतें कीं, त्याची कारकीर्द कष्टाची व त्रासाची व्हावी आणि खोरासान, ख्वारिझम, रे आणि जव्वाल हे प्रांत त्याच्या अमलांतून निघून जावेत." "या अमिरानें आपली पराकाष्ठा केली आणि मोठाली सैन्यें उभारलीं. निरनिराळ्या योजनांचा विचार करण्यांत त्यानें झोंपेशिवाय रात्रींच्या रात्री घालविल्या. परंतु त्याची स्थिति खालावतच गेली" ( ईलियट २). कदाचित् त्याच्या विचारांचें अनिर्बद्ध स्वातंत्र्य आणि दुसऱ्याचा सल्ला ऐकून घेण्याची नाखुषी हें त्याच्या अपकर्षाचें कारण असावें. महमुदानें खोरासानमध्यें कांहीं सेल्जुकी तुर्कांस वसाहत करण्याची परवानगी चुकीनें दिली होती. आणि तेथेंच बंडाला सुरुवात झाली. मसाउदचा थोरला मुलगा शहाजादा मौदूद हा नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणें खोरासान व बल्ख या प्रांतावर अधिकारी होता. तो अधिकारी असतांना सेल्जुकी तुर्कांनीं बंडाचा झेंडा उभारिला. गझनीच्या सैन्याचा पराभव झाला.त्या प्रांतावर आक्ससच्या उत्तरेकडूनहि स्वारी करण्यांत आली. तेव्हां प्रधान व इतर अधिकारी यांनीं मसाउदाला जातीनें तुर्कांवर चालून येण्याविषयीं सल्ला दिला. हा सल्ला न जुमानतां मसाउदनें हिंदुस्थानांत धर्मप्रसार करण्याच्या हेतूनें स्वारी करून सतलजच्या दक्षिणेस सांप्रतच्या हिस्सार जिल्ह्यांत हान्सीला वेढा दिला; व अशा रीतीनें आपलें राज्य पंजाबापलीकडे वाढविण्याचा प्रयत्न केला. ही स्वारी इ. स. १०३७त झाली. त्या प्रांतावर व किल्ल्यावर ताबा कोणत्या राजाचा होता हें निश्चित झालेलें नाहीं. हिस्सार गॅझेटियर ( पा. १९ ) मध्यें असें म्हटलें आहे कीं, हान्सीचा हा प्राचीन किल्ला चाहमान विशालदेवाचा पुत्र अनुराज याच्या ताब्यांत होता. अनुराजाचा पुत्र तेष्टपाल यास तेथून

हांकून देण्यांत आलें. त्यानें पुढें बुंदीचें हाडा घराणें स्थापिलें. × परंतु पुढें चाहमानांच्या इतिहासांत आपल्याला असें दिसून येईल कीं, या काळांत त्यांचा वाक्पति राजा राज्य करीत होता आणि गौरीशंकर ओझा यांचें असें म्हणणें आहे कीं, बुंदीचें चाहमान घराणें नड्डूलच्या चाहमान घराण्याचा १२ वा राजा आसराज याचे पासून उत्पन्न झालें. किल्ल्यावरील राजाचें नांव कांहींहि असो, तो चाहमान होता व तो शौर्यानें लढला यांत संशय नाहीं. बैहकीनें या वेढयाचें वर्णन असें केलें आहे, " वारंवार अत्यंत निकराच्या लढाया होत असत. किल्ल्यावरील शिवदींनें जिवावर उदार होऊन किल्ला लढविला. विजयी सैन्यांत ( मुसलमानांत ) गुलामहि अतिशय शौर्यानें लढले. सरतेशेवटीं पांच ठिकाणीं सुरुंग खोदण्यांत आले व रबिउल अव्वल पूर्वी १० दिवस एका सोमवारीं किल्ल्याच्या भिंती कोसळल्या. किल्यावर मारा करून तो पाडाव करण्यांत आला. ब्राह्मण व इतर प्रमुख लोकांस ठार मारण्यांत येऊन त्यांच्या बायका पकडून नेण्यांत आल्या. सांपडलेला सर्व खजिना सैन्यांत वांटण्यांत आला. हा किल्ला हिंदुस्थानांत विशुद्ध किल्ला म्हणून प्रसिद्ध आहे." ( इ. २, १४० )

वरील वर्णनावरून दोन नवीन अशा गोष्टी दृष्टोत्पत्तीस येतात. पहिली सुरुंगाची. त्या काळीं बंदुकीच्या दारूचा शोध लागला नव्हता अशी हल्ली समजूत आहे. तेव्हां दुसरें कोणतें तरी स्फोटक द्रव्य वापरण्यांत आलें असलें पाहिजे खास. तें काय होतें हें सांगणें मात्र कठिण आहे. ब्राह्मणांची कत्तल ही दुसरी गोष्ट होय. महमुदाच्या लढाईंतील क्रौर्यांत यामुळें पुढें पाऊल पडलें. ( उत्बीनें आपल्या सविस्तर वर्णनांत या गोष्टीचा उल्लेख केला नाहीं. कदाचित् हा

× हा मजकूर कोठून घेतला आहे हें समजणें कठीण आहे.

उल्लेख चुकून राहिला असावा. ). पंजाबातील क्षत्रिय व चाहमान वगैरे उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत यांच्या स्वभावांत फरक होता. या रजपुतांनीं राज्यें केली होती, त्यांना दुसऱ्याच्या अंमलाखालीं राहण्याचें माहित नव्हतें. यामुळें लवकरच दिल्लीच्या तोमरांनीं हा किल्ला व त्या भोंवतालचा प्रांत तुर्कांच्या ताब्यांतून सोडवून घेतला असें दिसून येतें. फिरिस्तानें लिहिल्याप्रमाणें इ. स. १०४३ मध्यें हे तोमर चांहमानांच्या आश्रयाखाली उदयास येत होते.

गझनीस परत आल्यावर आपण मोठी चूक केली असें मसाऊदला आढळून आलें. अग्नेयीकडे आपलें राज्य वाढवीत असतां वायव्येकडील अत्यंत महत्त्वाचा खोरासान प्रांत तो गमावून बसला होता. महमुदालाच फक्त पूर्व व पश्चिम या दोहों दिशांस अनुसंधान राखतां आलें. मसाउदचें लष्कर दूर हिंदुस्थानांत लढाईंत गुंतलें आहे असें पाहून सेलजुकी तुर्कांनीं खोरासानवर स्वारी केली आणि त्या प्रांताला खालसा केलें. ते आतां गझनीवर चालून येण्याची तयारी करीत होते; आणि त्यामुळें मसाऊद भांबावून गेला. आपलें सर्व कुटुंब व खजिना घेऊन हिंदुस्थानांत निघून जाण्याचा त्यानें निश्चय केला व त्याप्रमाणें हुकूमहि सोडले. त्याचे सरदार, सेनापति, सैन्यांतील अधिकारी व त्याची आईहि यामुळें संतापून गेली व त्या सर्वांनीं त्याचा क्रोधपूर्ण निषेधहि केला. परंतु नेहमीप्रमाणेंच मसाउदवर त्याचा कांहीं परिणाम झाला नाहीं. त्याला उपदेश करण्याची किंवा सल्ला देण्याची सोयच नव्हती. मौज ही कीं, त्या शूर राजाचा हा निश्चय ज्योतिषावर उभारलेला होता. + महंमदानें जरी आपल्या धर्मांत ज्योतिष पाहण्याचा तीव्र निषेध केला आहे, तरी तुर्क आणि अरब यांचा हिंदूप्रमाणेंच ज्योतिषावर विश्वास असे "त्याच्या मुख्य प्रधा-

---

+ अल्बिरुनी हा गणितज्योतिषी व फलज्योतिषी होता.

नानें मसाउदच्या या निश्चयाचा निषेध करून त्यास असें कळविलें कीं, आपली बायका माणसें व खजिना घेऊन उत्तर हिंदुस्थानांत निघून तुम्ही गेलात तर ही बातमी शत्रूंत व मित्रांत पसरल्याबरोबर प्रत्येकाला आपली सत्ता वाढविण्याची हांव असल्यामुळें संकट ओढवल्याखेरीज राहाणार नाहीं." परंतु तो निरोप ऐकून तो दुर्दैवी मसाऊद उत्तरला कीं, "या वेडयाला आपण काय म्हणतों आहोंत हेंच कळत नाहीं.मी जें जें ठरविलें आहें तेंच योग्य आहें. तूं प्रेमानें लिहिलें आहेस हें मला कबूल आहे. स्वस्थ रहा आणि माझे हुकुम पाळ. कारण मला जें दिसतें आहे तें तुला दिसूं शकणार नाहीं." मसाउदनें शहर व किल्ला कोतवाल बुअल्ली याचे हवालीं केला व त्याला सांगितलें कीं, "युवराज मौदूद, प्रधान व बरेंचसे सैन्य हीं सर्व दूर राहतील. कांहींहि होवो, उन्हाळ्यांत सर्व नीट जुळवून घेईन. ज्योतिषांनीं असें सांगितलें आहे कीं हिंवाळा मला अनुकूल नाहीं." कोतवालानें त्याला विनवून सांगितलें कीं, झनाना व व खजिना कोठें तरी बळकट किल्लयांत सुरक्षित ठेवावा व तुम्ही येथें रहावें; परंतु सुलतानानें त्याला उत्तर केलें हीं, "आपल्या बरोबरच बाळगावयाचीं."असें म्हणून हिंदुस्थानच्या प्रवासांत आपल्याला शांति व सुख मिळावें यासाठीं त्यानें देवाची प्रार्थना केली. ( बैहकी ई० २ पा० १६२ ).

हिंदुस्थानांत जाऊन आपल्या ग्रहांची अनिष्टता टाळावी असा सुलतानाचा हेतु होता. आजच्याप्रमाणें त्या काळींहि वहिंद, मार्मिनारा (?) बरशौर (पेशावर) व किरिल(?) हीं शहरें व त्याभोंवतालचा सिंधूच्या पश्चिमेकडील प्रांत हिंदुस्थानांत मोडत होते (ई. २ पा. १५० ). असो, हिंदुस्थानांतहि अनिष्ट ग्रहांनी मसाउदचा नाश करावयास कमी केलें नाहीं. मार्गीलन घाटांतून ( हसन—अबदालच्या पश्चिमेस थोड्या मैलावर रावलपिंडी व अटक यांच्या दरम्या-

नच्या डोंगरांत ) तो जात असतां मुसलमान व हिंदु बंडखोर गुलामांनींच त्याला पकडून कैद केलें. त्यांनीं अंध महंमदाला कैदेंतून बाहेर काढलें आणि त्याला राज्यावर बसविलें व मसाउदला गिरीच्या किल्ल्यावर नेऊन मारून टाकण्यांत आलें. मसाउदच्या या शोचनीय अंतानें संभाजीच्या करुणास्पद मृत्यूची आठवण होते. त्यानेंहि मसाउदप्रमाणेंच आपल्या बापानें कमाविलेल्या राज्यांतील फार मोठा मराठी भाग घालवून दूर कर्नाटकांत लहानसा प्रान्त शिल्लक ठेविला आणि तो भाग गझनीच्या राजांना हिंदुस्थान जसा आश्रयास उपयोगी पडला त्याप्रमाणें राजारामास आश्रयस्थान झाला. दोघेहि अत्यंत शूर, विद्वान् व धर्मोत्साही असूनहि आपल्या हट्टानें आणि सदुपदेशाचा अव्हेर करून दुःखांत बुडाले. विपुल साधनसामुग्री असून तिचा उपयोग करण्याची पात्रता नसेल तर ती कुचकामाची ठरते हें दोघांच्याहि चरित्रावरून स्पष्ट दिसून येतें. सुरुवातीस पुरेशी साधन संपत्ति नसतांहि महमूद व शिवाजी हे मोठेपणास चढले ( यांतच त्यांचा थोरपणा आहे ) आणि मसउद आणि संभाजी विपुल साधनें असून हि राज्यनाश होऊन मारले गेले.

आम्ही मसाउदच्या कारकीर्दीचा इतिहास इतका सविस्तर दिला आहे तो अशासाठीं कीं, त्याच्या सान्निध्यानें महमुदाचें महत्व स्पष्ट होतें आणि शिवाय त्याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत आणखी प्रांत काबीज करण्याच्या हेतूनें बनारसच्या व हान्सीच्या दोन * महत्वाच्या स्वाऱ्याहि झाल्या. आतां गझनीच्या इतर राजांचा इतिहास हिंदुस्थानशीं संबंध येणाऱ्या गोष्टींचा उल्लेख करून थोडक्यांत देऊं.

---

* सरदेसाई यांच्या ग्रंथांत तिसऱ्या एका स्वारीचा उल्लेख आढळतो त्या स्वारींत त्यानें काश्मीरांत सरस्वती नदीवरचा एक किल्ला हस्तगत केला. परंतु बैहकीनें या स्वारीचा उल्लेख केला नाहीं, काश्मीरांत सरस्वती नांवची नदी नाहीं, आणि तरंगिणीतहि या स्वारीचें नांव नाहीं-

महंमदानें सहा महिनेच राज्य उपभोगिलें. मसादउचा मुलगा मौदूद हा आपल्या बापाचा सूड उगविण्याकरितां बल्ख मधून तांतडीनें निघाला. तो बल्ख प्रांताचा सुभेदार होता. त्यानें अफगाणिस्थान आपल्या ताब्यांत घेतलें आणि हिंदुस्थानांत येऊन आपल्या चुलत्याचा पराभव केला व त्याला व त्याच्या सर्व मुलांना कैद केलें. त्यांचा व आपल्या बापास कैद करणाऱ्या तुर्की व हिंदु गुलामांचा त्यानें वध करविला. नंतर तो गझनीस परत गेला व तेथें त्यानें नऊ वर्षें राज्य केलें. त्याचे मुलगे कर्तृत्वहीन होते. त्याच्या सरदारांनीं व अधिकाऱ्यांनीं त्याचा एक मुलगा व चुलता अल्ली या दोघांस एकदम राज्यावर बसविलें. परंतु ते दोघेहि दुर्बल निघाले व त्यांच्या कारकीर्दींत सर्वत्र गोंधळ माजला. दोन महिन्यानंतर त्यांना एका किल्लयावर पाठविण्यांत आलें व इ. स. १०५०मध्यें महमुदाचा तिसरा मुलगा अबदूल रशीद यास राज्यावर बसविण्यांत आलें. इराण व खोरासानचा सेलजुक राजा अल्प अर्स्लान हा गझनविर चाल करून आला; परंतु महमुदाचा एक सरदार तुघ्रील यानें त्याचा पराभव केला. तुघ्रील हा महमुदाच्या शिस्तींत वाढलेला निधड्या छातीचा गुलाम होता व महंमदानें त्याला गझनीच्या सैन्याचा सेनापति केलें होतें. जय मिळवून परत आल्यावर त्यानें अबदुल रशीदला ठार मारून त्याची गादी बळकावली. त्यानें आणखी अकरा राजकुमारांचा वध केला आणि फार निष्ठुरपणानें राज्य चालविलें. त्यानें चाळीस दिवस जुलुमानें राज्य केल्यावर एका तुर्की शिलेदारानें त्याचा सिंहासनावरच खून केला.

एका किल्लयांत दोनच राजपुत्र न मरतां बंदींत शिल्लक राहिले होते. तुघ्रीलानें त्यांचीहि व्यवस्था लावण्याचा हुकूम सोडला होता. पहारेकऱ्यानें एकच दिवस हुकुम अंमलांत आणण्याला उशीर केला, इतक्यांत तुघ्रीलच्या खुनाची बातमी येऊन पोंचली. सुदैवानें अशा

रीतीनें त्या राजपुत्रांचे प्राण वांचले आणि हे राजपुत्र फरुक्जाद व इभ्राइम दोघेहि अनुक्रमानें सुलतान झाले. दोघांनींहि न्यायानें आणि दयाशीलतेनें राज्य केलें. इभ्राइम हा अत्यंत धर्मशील होता. त्यानें कुराणाचें फारशींत भाषांतर केलें. त्याला चाळीस मुली व छत्तीस मुलगे होते. यामुळें राजघराणें पुनः एकदां राजपुत्रांनीं गजबजून गेलें. सुलतानानें आपल्या मुलींचीं विद्वान लोकांशीं लग्नें लाविलीं. त्यांपैकीं एक मुलगी प्रसिद्ध ग्रंथकार नासिरी याच्या पणजास दिली होती. इभ्राइम हा शाहूसारखा होता. शांतींत व वैभवांत ४२ वर्षें राज्य करून तो इ. स. ११००मध्यें मरण पावला. त्याचा मुलगा मसाउद यानें बापापेक्षांहि अधिक न्यायानें आणि उदारपणें राज्य केलें. त्यानें सर्व महमुदी प्रांतांतील त्रासदायक कर बंद केले ( आणि सर्व साम्राज्यांतील ) व झाबुलिस्तानांतील हे कर अजिबात उडवून टाकले. त्याच्या कारकीर्दीत त्याच्या हेजिबानें हिंदुस्थानावर धार्मिक स्वारी केली व तो गंगा उतरून "महमुदाखेरीज दुसरा कोणी जेयवर गेला नव्हता अशा ठिकाणापर्यंत हिंदुस्थानांत आला होता." या स्वारीच्या स्थलाचा व कालाचा उल्लेख आढळत नाहीं. परंतु यामुळें सालार मसाउदाच्या स्वारीची असंभमनीयता दिसून येते; कारण महमूद औधमधील बारीच्या अलिकडे आला नव्हता. १७ वर्षें राज्य करून हा राजा ५०९ हि. (इ. स. १११८) मध्यें मृत्युवश झाला. यावरून याचींच औधमधील स्वारी अमीराची शेवटची स्वारी असावी, आणि बहुधा बदाउनच्या शिलालेखांत जिचा उल्लेख आहे ही हीच स्वारी असावी.

त्याचा वडील मुलगा अर्स्लान हा त्याच्या नंतर गादीवर आला, परंतु अर्स्लानचा धाकटा भाऊ बेहराम यानें त्यास हांकून लाविलें. या कामीं त्याला त्याचा मामा संजर सुलतान याची फार मदत

झाली. त्यानें पुष्कळ वर्षें ( ४१ ) राज्य केलें परंतु त्याची कारकीर्द त्याला सुखाची झाली नाहीं. हिंदुस्थानांतील प्रांताधिकाऱ्यानें दोनदां बंड केलें व दोनदां सुलतानाला त्याच्यावर स्वारी करावी लागली, एकदां मुलतानाजवळ व दुसऱ्यांदा शिवालिक डोंगरांत. त्या बंडखोराचा अखेर नाश झाला. घोरी ( गोरच्या ) सरदारांनीं बेहराम हिंदुस्थानांत गेला असतां तिकडे गझनी हस्तगत केली आणि ती जाळून नष्ट केली. त्याचा इतिहास पुढें घोरीच्या वृत्तांतात येईल. बेहराम हिंदुस्थानांत कांहीं दिवस राहिला व घोरी सरदारांनीं गझनी सोडून दिल्यानंतर परत गेला. त्याचा मुलगा खुश्रू हा त्याच्या मागून हि. ५५२ इ. स.११ ५९) मध्यें राजा झाला. घोरी सरदारांनी गझनीच्या राज्याचा पायाच डळमळीत केला असल्यामुळें आणि खुश्रू हा दुर्बल राजा असल्यामुळें गॉझ् तुर्कांच्या टोळ्यांनीं गझनीवर हल्ला केला व तें शहर हस्तगत करून, गिआसउद्दीन घोरीनें त्यांना घालवून देईतों, बारा वर्षें पावेतों तें आपल्या कबजांत ठेविलें. मागील वहिवाटीप्रमाणें खुश्रू हा लाहोरास येऊन राहिला व तेथें त्यानें सात वर्षें राज्य केलें. त्याचा मुलगा शांत खुश्रू यानें पुढें थोडी वर्षें राज्य केल्यावर, त्यास हि. ५८७ इ. स. ११९१ मध्यें महंमद घोरीनें कैद केलें व त्याला व त्याच्या मुलाला घीआसउद्दीन घोरीच्या हुकुमावरून हि. ५९८ इ. स. १२०६ मध्यें मारून टाकण्यांत आलें. अशा तऱ्हेनें महमुदाच्या वंशाचा अंत झाला.

बेजबाबदार राज्यपद्धतीला आळा घालणारी राष्ट्रीय भावना प्रजेंत उत्पन्न झाली नसली म्हणजे अशा राज्यपद्धतींत कसे भयंकर अनर्थ घडतात हें गझनीच्या राजांच्या इतिहासावरून ठळकपणें दिसून येतें. प्रत्येक देशांत राज्याच्या वारशाबद्दल कांहीं तरी नियम असतात. ( पाश्चात्य देशांत हे नियम स्पष्ट व व्यवस्थित स्वरूपाचे आतां झाले आहेत ). परंतु महत्वाकांक्षी व पापपुण्याचा विचार न करितां

निःशंकपणें वागणाऱ्या लोकांस ताळ्यावर आणणाऱ्या राष्ट्रीय भावनेचा उदय प्रजेंत झालेला नसतो तेव्हां राजे व राज्यघराण्यांतील राज्यपदावर येण्यासारखे कोणतेहि नातलग या सर्वांचे अशा घोर तऱ्हेनें व इतक्या मोठ्या प्रमाणांत खून करण्यांत येतात कीं राजघराण्यांत जन्माला येणें ही एक मोठी आपत्तिच होते. हिंदु राज्यांतहि जरी ही राष्ट्रीयत्वाची भावना अस्तित्वांत नव्हती तरी असे प्रसंग क्वचित आढळून येतात. बहुधा हिंदु लोकांच्या स्वभावांत कायद्यांचीं बंधनें पाळण्याची इच्छा अधिक व क्रूरता कमी असल्यामुळें असें झालें असें म्हणतां येतें.

हें पुस्तक येथें संपलें पुढच्या पुस्तकांत गझनवी राजघराण्याला खो देणाऱ्या घोरी राजांचा इतिहास पृथ्वीराजाच्या वृत्तांताबरोबर देण्याचें योजिलें आहे. कारण त्यांनीं पृथ्वीराजाचा पराभव केला आणि हिंदुस्थान कायमचें जिंकिलें. येथें हेंहि आणखी नमूद केलें पाहिजे कीं, वर वर्णिलेल्या स्वारी व्यतिरिक्त अनेक लहान सहान स्वाऱ्या साहसप्रिय व महत्वाकांक्षी तुर्कांनीं हिंदस्थानांत केल्या असल्या पाहिजेत. त्यांचा उल्लेख मुसलमान ग्रंथकारांनीं केला नसला तरी पुढील पुस्तकांत येणाऱ्या अनेक रजपूत राज्यांच्या इतिहासांत ही गोष्ट निदर्शनास येईल.

## टिप्पणी—गझनवी राजांची नाणी.

जर्नल रॉयल एशिआटिक सोसायटी भाग ९ पान ६७ व भा. १७ पान १५७ मध्यें मि. थॉमस् यांनीं लिहिलेल्या निबंधांत पुढील मनोरंजक माहिती आढळते. आपल्या राज्याभिषेकाची आठवण राहण्यासाठीं गझनीच्या प्रत्येक राजानें आपल्या नांवाचीं नाणीं पाडलीं होतीं. हिंदुस्थानांतील बहुतेक राजे अशा तऱ्हेनें नांणीं पाडीत असत. आपल्याला अल्पतगिन,सबुक्तगिन व इस्माइल यांचीं नांणीं सांपडतात व त्यांवरून ते या अनुक्रमानें गझनीच्या गादीवर बसले असें दिसून येतें. परंतु या सर्व नाण्यांवर सामानी बादशाह मनसूर अथवा नूह यांचीहीं नावें कोरलेली आहेत व त्यावरून हे गझनीचे राजे सामानी सम्राटांचे मांडलिक होते

असें दिसून येतें. महमूद हि. ३८९ ( इ. स. १००० ) मध्यें स्वतंत्र झाला असावा. कारण त्यासालच्या नाण्यांत सामानी राजाचे नांव पहिल्यानेंच वगळलेलें दिसतें. त्याच्या सुरवातीच्या नाण्यांवर महमुदाला सैफुद्दौला असें म्हटलें आहे.ही पदवी नूहनें त्याला हि.३८४ (इ.९९५) मध्यें दिली. नंतरच्या नाण्यांत खलिफानें दिलेल्या अलअमीर--यमीन-उदौलत व अमीन—उल्मिल्लत या पदवीचा उल्लेख आढळतो. त्या नंतरच्यांत "मलीक उल् ममालिक" ( राजांचा राजा ) असा उल्लेख आहे. शेवटी तो विख्यात होऊन पदवीची कोणतीच जरूर नसल्यामुळें नुसतें महमूद येवढेंच नाण्यांवर खोदलेलें आहे. त्यानें आपल्याला सुलतान किंवा गाझी असें कोठेंच म्हटलेलें नाहीं. सुलतान ही पदवी प्रथम इब्राइमच्या नाण्यांवर आढळते (हि ४६१ इ. स. १०६१).

महमुदाची फारशी व संस्कृत अशा दोन्ही भाषांत खोदलेलीं नाणींहि सांपडलीं आहेत. तीं हिंदुस्थानांतील प्रजेकरितां होतीं. त्यांतील देवनागरी लिपींतील छाप मनोरम असून त्यावरून महमुदाच्या दरबारीं हिंदी पंडित असावेत असें दिसतें. तो छाप असा आहेः—"अव्यक्तमेक महम्मद-अवतार नृपति महमूद." त्यांनीं महमुदाला पैगंबर महंमदाचा अवतार बनविला असून पैगंबराला अव्यक्त असें म्हटलें आहे. कांहीं वेळा अयं टंक महमूद संवत् ४१२ येवढेंच लिहिलेलें आहे. हीं नाणीं लाहोरास पाडलीं होतीं. लाहोर, निशापूर व पश्चिमेस आणखी तीन चार ठिकाणें येथें टांकसाळी होत्या. काबुलांस टांकसाळ नव्हती.

सामंतदेवाच्या नांवाचीं जीं काबूलच्या शाही राजांची नाणीं आहेत त्यांचें अनुकरण आपल्या नाण्यांत गझनवी राजांनीं केलेलें आहे. त्यांत एका बाजूला कुशीवर पडलेला नंदी असून दुसऱ्या बाजूला घोडेस्वार व महमूद किंवा मसाउद याचें नांव आहे. मौदूदच्या व पुढें इब्राइमच्या हि. ४३२ ( इ. स. १०४१) नाण्यांवरहि नंदी कोरलेला आहे. सबुक्तगिन व महमूद यांच्या नाण्यांचें वजन काबूलच्या हिंदु राजांच्या बाणांच्या वजना इतकें आहे. शाही ब्राह्मणराजांची नाणीं रुप्याचीं होतीं(दिऱ्हाम-द्रम्म) गझनी व निशापूर टांकसाळींतील नाणीं सोन्याचीं होतीं ( दिनार ). हिंदु व मुसलमान राजांची तांब्याचीं व लहान चांदीचीहि नाणीं होती.

# परिशिष्ट

## हिंदूंची मूर्तिपूजा.

सोमनाथाच्या मूर्तिभंगाच्या व लुटीच्या हकीकतीवरून वरील विषयावर कांहीं सुचलेले विचार गिबनप्रमाणें इतिहासाचा क्रम थांबवून न देतां ते येथें परिशिष्टरूपानें आम्हीं देत आहों. दहाव्या शतकाच्या अंतीं मूर्तिपूजेसंबंधानें बराच भोळसटपणा हिंदुस्थानांत वाढून त्यापासून मुसलमानी धर्माच्या लोकांस फायदा घेण्यास साधन झालें होतें. महमुदाच्या मूर्तिभंजक स्वाऱ्या हिंदु लोकांच्या या भोळेपणाच्या प्रकारासंबंधें डोळे उघडण्याकरितांच झाल्या असें म्हणतां येईल. या स्वाऱ्यांपासून निघणारा बोध अद्याप हिंदूंनीं घेतला नाहीं असें दुर्दैवानें म्हणावें लागतें. मूर्तिपूजा वेदांत सांगितली आहे कीं नाहीं, किंवा ती बुद्धीस पटते किंवा नाहीं, हा धर्मविषयक प्रश्न आम्ही येथें विवेचित नाहीं. हल्लीच्या हिंदुधर्मांत मूर्तिपूजा निःसंशय मान्य आहे आणि ईश्वर-प्रणिधानाच्या दृष्टीने ती योग्य तऱ्हें मान्य आहे असें म्हणतां येतें. पण मूर्तिपूजेपासून कांहीं भ्रांत समजुती मनुष्याच्या मनांत रूढ होतात. विशेषतः मूर्तींतच त्या देवतेची शक्ति आहे ही चुकीची समजूत उत्पन्न होते. ही गोष्ट हिंदूंनाच लागू नसून प्राचीन काळापासून जेथें जेथें मूर्तिपूजा चालू होती तेथें तेथें होती. बौद्ध धर्म आरंभीं ईश्वराचेंच अस्तित्व आहे कीं नाहीं ह्या विषयीं मुग्ध होता. पण पुढें तो भयंकर मूर्तिपूजेंत शिरला आणि बुद्धाच्याच मूर्ति चोहोंकडे पुजूं लागल्या. हुएनत्संग कितीहि विद्वान् व तत्त्वज्ञानी असला तरी बुद्धाच्या शरीराचे अवशेष किंवा बुद्धाच्या मूर्ति यांत चमत्कारांचें सामर्थ्य होतें असें मानी, हें पाहून आपल्यास आश्चर्य वाटतें.(भा.१,पा.१–१५०). हिंदु लोकांत मूर्तिपूजा पूर्वींच थोडीबहुत रूढ होती, ती बौद्ध धर्म उच्छेदिल्यावर त्याच्या अनुकरणानें अधिकच वाढली आणि मूर्तींचें पावित्र्य व त्यांच्या ठिकाणीं असलेलें अद्भुत सामर्थ्य या विषयींच्या कल्पना इतक्या वाढल्या कीं कनोजचे प्रातिहार सम्राट् मुलतान घेण्यास

समर्थ होते तरी ज्या ज्या वेळेस ते मुलतान घेण्यास जात त्या त्या वेळीं तेथील मुसलमान अधिकारी 'सूर्याची येथील प्रसिद्ध मूर्ति तुम्ही पुढें याल तर आम्ही फोडून टाकूं' अशी धमकी देऊन त्यांस मागें परतवीत (भा. २ पा. २६९). पश्चिमेकडे सुद्धां रोमन व ग्रीक इतर लोकांपेक्षां तत्त्वज्ञानांत पुढें होते तरी त्यांचा कांहीं मूर्तींच्या अद्भुत सामर्थ्यावर विश्वास असे. ख्रिस्तीधर्मांत प्रारंभीं निराकार देवाचा उपदेश केला गेला आणि त्याचा प्रसार मूर्तिपूजक रोमन व ग्रीक लोकांत मूर्तीत कांहीं सामर्थ्य नाहीं असें सिद्ध करूनच झाला. सोमनाथाच्या पुजाऱ्यांच्या मूर्तींचा अनादर करणाऱ्या महमुदाचा नाश करण्याविषयीं सोमनाथाच्या मूर्तीस केलेल्या निरर्थक केंविलवाण्या प्रार्थना वाचतांना आपल्यास अलेक्झांड्रिया शहरांत अशाच प्रकारचा देखावा त्यापूर्वी सहाशें वर्षें झालेला गिबननें हुबेहुब वर्णन केला आहे त्याची आपल्यास आठवण होते. थिओडोशियस बादशहाच्या (३८९ इ.) हुकुमानें अलेक्झांड्रिया येथील सिरॅपिसची मूर्ति फोडली गेली, त्यावेळचें वृत्त वर्णन करतांना गिबन म्हणतो, "अलेक्झांड्रिया सिरॅपिस् देवतेच्या मूर्तींच्या विशेष संरक्षणाखालीं आहे अशी समजूत असल्यानें सिरॅपिसचें शहर असें नांव घेण्यांत या नगरास भूषण वाटे. त्याचें देऊळ रोमच्या कॅपिटल भागांत असलेल्या इमारतींपेक्षांहि विस्तीर्ण आणि वैभवशाली होतें. शहरच्या सपाटीवर शंभर फूट उंच केलेल्या एका कृत्रिम प्रशस्त उंचवट्यावर हें देऊळ बांधलें होतें. थिओडोशस् बादशहानें मूर्तिपूजकांचे यज्ञ सर्वत्र बंद केले होते तरी सिरॅपिसच्या शहरांत व देवळांत चालू होते. कारण अशी भोळसट समजूत ख्रिश्चन लोकांची सुद्धां होती कीं, हे विधि जर बंद झाले तर नाईल नदीला पूर येणार नाहीं, इजिप्तमध्यें पिकें येणार नाहींत आणि कॉनस्टॅनटिनोपल राजधानीस खावयास मिळणार नाहीं. परंतु शेवटीं सिरॅपिसचें देऊळ व मूर्ति तोडण्याविषयीं बादशहाचा सक्तीचा हुकुम आला. निरनिराळ्या धातूंचे अनेक पत्रे एका ठिकाणीं ठोकून सिरॅपिसची भव्य मूर्ति बनविली होती. ती एवढी प्रचंड होती कीं, गाभाराच्या दोन्ही भिंतीस ती लागली होती. उजव्या हातांत राक्षसस्वरूपी एका सर्पाचें डोकें व धड असून त्याच्या शेंपटीला तीन

फांटयांच्या शेवटीं कुत्रा, सिंह आणि लांडगा यांची डोकीं होतीं. या मूर्तीचा उपमर्द करण्यास कोणी हात उठवील, तर लागलीच आकाश व पृथ्वी एक होऊन एकदम सृष्टयारंभीचा कल्लोळ माजेल असा विश्वास होता. एक निधड्या छातीचा शिपाई हातांत कुऱ्हाड घेऊन शिडी लाऊन वर चढला. पाहणाऱ्यांच्या गर्दीतील ख्रिस्ती लोकसुद्धां या उपमर्दाच्या भयंकर परिणामाच्या भीतीनें गांगरून गेले. सिरॅपिसच्या मूर्तीच्या गालावर शिपायानें एक जोराचा प्रहार केला आणि तो तुटून खालीं पडला, पण आकाश व पृथ्वी यांत कांहीं एक गडबड न होतां तीं नेहमीच्या शांत, निश्चल व व्यवस्थित स्थितींत राहिलीं. कांहीं एक झालें नाहीं, यामुळें तो शिपाई जास्त जोरांत येऊन त्यानें अनेक प्रहार मारून मूर्तीचे तुकडे तुकडे केले. आणि ते तुकडे अलेक्झँड्रिया शहरांतून अपमानास्पद रीतीनें ओढून नेले. नाईल नदीला उशीरानें कां होईना नेहमीप्रमाणें पूर येऊन इजिप्तच्या सपाट प्रदेशांत पुष्कळ पीक आलें, आणि भावी वर्तविणाऱ्यांचें भयंकर भविष्य खोटें झालें. पुष्कळ लोक अलेक्झँड्रियाचें रक्षण करणाऱ्या मूर्तींत कांहीं सामर्थ्य नाहीं असें पाहून ख्रिस्ती झाले. ”

गिबननें या ठिकाणीं विषयांतर करून मूर्तींच्या अद्भुत सामर्थ्यावर धर्माची सत्यासत्यता मानणें कसें अयोग्य आहे हें दाखविलें आहे. मूर्ति धातु किंवा दगड किंवा लाकुड यांच्याच बनलेल्या असून त्यांत अद्भुत सामर्थ्य असणें शक्य नाहीं, असें सामर्थ्य आपल्या भक्तींत आहे. असो, ख्रिस्ती धर्महि बौद्ध धर्माप्रमाणें पुढें मूर्तिपूजेंत शिरून जो भोळसटपणा त्यानें प्रारंभीं निषेध केला,त्याच भोळसटपणांत शिरून जिसस व मेरी यांच्या मूर्ति पुजूं लागला. याच्या विरोधानें त्याचा सहज परिणाम मुसलमानी धर्माचा उदय झाला. याच प्रकारचे मूर्तींविषयीं असलेले भोळसर समज दूर करण्यास महमुदाच्या स्वाऱ्या झाल्या असें म्हणतां येईल. पण आणखीहि एक दुसरी भोळसर समजूत दूर करण्यासाठीं या स्वाऱ्या झाल्या असें म्हणतां येतें. देवळें व मूर्ति यांत सोनें आणि जवाहीर अतिशय लादणें हा वेडसर प्रकार आहे असें लोकांच्या निदर्शनास या स्वाऱ्यांनीं आणलें. कारण मूर्तिभजकांच्या धार्मिक समजुतीस त्या द्रव्याविषयींच्या लोभाची आणखी

भर पडते. सबंध सोन्याची मूर्ति बनविण्यांत गुण कोणता ? किंवा त्याजवर अमोल जवाहिर घालण्यांत पुण्य कोणतें ? केवळ सोन्याची पांच हाताची मूर्ति ईश्वर-प्रणिधान करण्यास जास्त साधनीभूत होत नाहीं. हिंदुधर्माचे प्राचीन आचार्य लहान लहान निरनिराळे साहजिक स्थितींत असलेले दगड शिव, विष्णु, गणपति व सूर्य यांचे प्रतीक मानतात आणि वैदिक ऋषि तर प्रत्यक्ष सूर्य व वायु यांची उपासना करीत. परंतु सुंदर मूर्ति बनविणें हें मनुष्याच्या मनास साहजिक आवडतें, व त्याजवर बिनमोल जवाहीर लादण्याकडेहि मनाची प्रवृत्ति होते. शिवपूजेंतहि मुख्य लिंगपूजा म्हणजे दगडांच्या कांहीं सहज आकृतींची पूजा प्रशस्त मानली आहे. पण तेथेंहि वैभवशाली राजे स्वयंभू लिंगाच्यावर सोन्याचे मुकुट हिरे माणकांनीं सुशोभित केलेले घालतात; आणि मूर्तिभंजक मुसलमानासच नव्हे तर हिंदू चोरांस किंबहुना भावी लोभी राजांस किंबहुना पुजाऱ्यांसहि लोभ उत्पन्न करून देवाचा अपमान करण्यास प्रवृत्त करतात. हिंदुस्थानच्या इतिहासांत नवीं देवळें बांधून त्यांस मौल्यवान् देणग्या देण्याची अनेक उदाहरणें आहेत. विशेषतः मथुरा, कोटकांगडा, सोमनाथ व उज्जयिनी वगैरे पुण्यस्थानांत शेकडों वैभवशाली राजे आणि हजारो श्रीमंत व्यापारी यांच्या देणग्यांनीं संपत्ति भरून गेली होती. इतिहासकार व शासनशास्त्रवेत्ते असें म्हणूं शकतात कीं, या संपत्तीचा उपयोग राजांनीं समर्थ सैन्यें ठेवण्यांत व श्रीमंतांनीं समाजाची सुस्थिति वाढविण्यांत करावयास पाहिजे होता. पण त्याकडे दुर्लक्ष होऊन देवळांत व मूर्तींवर संपत्ति अमोप जमा झाली, व यामुळें देशाच्या ऱ्हासास दोन्ही रीतीनें मदत झाली. एकीकडे बाहेरील विजेत्यास लोभ उत्पन्न होऊन त्यांचें आर्थिक सामर्थ्य वाढलें आणि दुसरीकडे आमच्या राजांचें व लोकांचें विरोधाचें सामर्थ्य कमी झालें. अद्यापहि या दोन गोष्टीकडे हिंदु लोकांचें लक्ष जितकें वेधावें तितकें वेधत नाहीं. मूर्तिपूजा सोडणें जरूर नाहीं; पण विशिष्ट मूर्तींत अद्भुत सामर्थ्य आहे अशी भोळसर भावना वाढूं न देतां आपल्या भावनेंत सामर्थ्य आहे ही कल्पना दृढ झाली पाहिजे. त्याचप्रमाणें मंदिरास किंवा मूर्तीस द्रव्य ज्यास्त देण्यांत विशेष पुण्य आहे हीहि कल्पना कमी झाली पाहिजे. कारण अशा द्रव्यापासून महंत किंवा

पुजारी यांची नीतिमात्र बिघडते आणि चोरांच्या किंवा मूर्तिभंजकांच्या देवतेचा उपमर्द करण्याच्या इच्छेस जोर येतो.

तथापि मनुष्यस्वभाव एकाच तऱ्हेनें मनुष्यास एकच कृत्य करावयास प्रवृत्त करतो हे शेवटीं सांगण्यासारखें आहे.मूर्तिभंजक व देवळें लुटणारा महमुद यालाहि याच स्वभावाच्या प्रवृत्तीनें गझनी येथें एक प्रचंड मशीद बांधून लुटून आणलेल्या सोन्यानें व हिरे माणकांनीं तिच्या भिंती श्रृंगारण्याची इच्छा झाली. आणि ज्या लोभानें तो प्रवृत्त झाला होता तोच लोभ पुढील विजेत्यांस त्यानें उत्पन्न करून ठेवला. ऐतिहासिक लेखांवरून असें दिसतें कीं, ही मशीद तेथील मौल्यवान् शृंगाराच्या लोभानें चीनच्या मूर्तिपूजक प्रचंड टोळ्यांनीं विध्वंसिली.जंगिसखानानें बुखारा येथील जामी मशीदीची केलेली अवमानना जुवैनीच्या जहानकुशाग्रंथांत ( इलियट भा. २ पा. ३८८ ) वर्णिलेली आहे. आणि बुखारा येथील हें त्याचें कृत्य तेथून पळून आलेल्या एका मुसलमानानें पुढील लहान पण जोरदार वाक्यांत केलें. " मोंगल आले व खोदून, जाळून, कत्तल करून, लुटून परत गेले."हाच जंगिसखान जलालुद्दीन याचा पाठलाग करून ६१८ हिजरी(१२२६ इ.)मध्यें परतला तेव्हां गझनीवर आला. त्यानें सर्व रहिवाशांस बाहेर काढलें व मोजिलें आणि त्यांतील कारागीर निराळे करून बाकीच्या सर्वांची कत्तल करण्याचा हुकूम दिला. त्यानें शहरहि उध्वस्त केलें व ओगताई मेलेल्यांची प्रेतें पुरून हिरातेकडे निघून गेला ( इलियट २. पा. ३९० ). दुसऱ्या एका उताऱ्यांत असें सांगितलें आहे कीं ओगताईनें चार महिने वेढा दिल्यानंतर हल्ला करून गझनी शहर घेतलें व पायासह खोदून तें त्यानें जाळून टाकलें व सुमारें दोन लक्ष लोक त्यानें कत्तल केले ( इलि. २. पा. ५६९ ).

# परिशिष्ट २

## कांहीं मुसलमानी नांवांचे बरोबर उच्चार व अर्थ.

कित्येक मुसलमानी नांवें चुकीच्या प्रकारानें लिहितात, तसें न हो-ण्याचा या पुस्तकांत प्रयत्न केला आहे आणि त्या नांवाचा अर्थ पुढें दिल्याप्रमाणें कोशावरून मिळतो.

| नांव | अर्थ |
|---|---|
| १ अल्प तगीन ( तुर्की ) | अल्प = सशक्त तगीन, तिगीन, = पेहलवान. |
| २ सबुक्तगीन ,, | सबुक=चपळ, तगीन=पेहेलवान. |
| ३ महमूद ( आरबी ) | स्तुति केलेला. |
| ४ मुहम्मद ,, | स्तुतिकरणारा ( हें नांव पैगंबराचेंहि आहे ) |
| ५ शिहाबुद्दीन ,, | शिहाब = उल्कातारा, उत = चा, दीन = धर्म. |
| ६ कुतुबुद्दीन ,, | कुतुब = ध्रुवतारा, उत = चा, दीन-धर्म. |
| ७ धियासुद्दीन ,, | धर्माचा मदतगार |
| ८ ( यिएल्तामिश ) अल्तमष | फौजेचा सरदार |
| ९ अल्बैरूनी. | अल् = तो, बेरूनी = बाहेरचा. |

कित्येक प्रांतांची व शहरांचीं नांवें शुध्दरीतीनें पुढीलप्रमाणें लिहिलीं आहेत. खोरासान, सीस्तान, बल्ख, बगदाद ( बाग = उपवन, दाद = न्याय ), निशापूर, बुखारा.

# सालवारी.

इ. स.

७१२ सिंध प्रांतांचा उच्छेद.

९०३ इस्माइल पहिला, बुखाऱ्याचा सामानी वंशीय बादशहा.

९०३-१०१५ सामानी साम्राज्य.

९१२ याकूब--इ--लेस कासारहा प्रथम हिंदुस्थानांत गझनीवर येतो.

९४३ तुर्की गुलाम सामानी राजांचे संरक्षक म्हणून राहतात.

९५९ मनसूर सामानी बादशहा होतो व ह्याच्या कारकीर्दीत तुर्की गुलाम सरदार बनून लहान राज्यें स्थापन करतात.

९६७ सप्तंबर ३० } महमुदाचा जन्म. ( या विषयीं
९७१ आक्टोबर २ } मतभेद आहे )

९७७–९९७ सबुक्तगीन.

९८० सबुक्तगिनाची वहिंडचा व काबूलचा राजा जयपाळ यावर स्वारी.

९८६–१००१ दुसरा नूह पातशहा.

१००१ महमुदाची जयपाळ राजावर पेशावरचे मैदानांत स्वारी.

१००४ ,, भाटियावर स्वारी.

१००८ ,, संयुक्त हिंदूराजांसह आनंदपालाची लढाई.

१००९ ,, नगरकोटची स्वारी.

१०१३ ,, त्रिलोचनपालाची शेवटली लढाई.

१०१४ ,, ठाणेश्वरची लढाई.

१०१८ ,, मथुरा व कनोजवर स्वारी.


१०१९ महमुदाची कनोजवर पुनः स्वारी.
१०२१ राहिब नदीवरील लढाई.
१०२२ महमुदाची स्वात वगैरेवर स्वारी.
१०२३ महमुदाची कालंजरवरील स्वारी.
१०२५ महमुदाची सोमनाथावरील स्वारी.
१०२९ महमुदाचा मृत्यु.

---

१०३० अल्बेरुनी आपला ग्रंथ संपवितो.

---

९१०--९४० राजशेखर कवि.
९५०--१००० धंगराजा.
९६०—१००१ जयपाल.
१००१—१००९ आनंदपाल.
१०१० त भोजराजा माळव्याचे गादीवर येतो.
१००९—१०२१ त्रिलोचनपाल.
१०२१—१०२६ भीम.
१०३० गांगेयदेव ( चेदीचा राजा ).



# पुस्तक सातवें

## तिसरीं हिंदु राज्यें

## प्रकरण पहिलें

### सांभर व अजमीर येथील चाहमान.

सांभर येथील चाहमानांचें घराणें हें मागील कालविभागांतील विख्यात रजपूत घराण्यांपैकीं एक होतें. या कालविभागांतहि तें भरभराटींत राहिलें, किंबहुना, त्याचें वैभव या कालविभागांत अधिकच वाढलें. आम्ही आपल्या चौथ्या पुस्तकाच्या तिसऱ्या प्रकरणांत ( पानें १४१ते१४७ ) त्यांच्या अभ्युदयाचा इतिहास दिला आहे. सांभर किंवा ज्याला सपादलक्ष म्हणजे सव्वालक्ष गांवांचा प्रांत म्हणतात, तेथें राज्य स्थापणारा या घराण्याचा मूळ संस्थापक सामंत होता. सिंधमधून अरबांनीं इ. स. ७५० किंवा ७७५च्या सुमारास ज्या स्वाऱ्या केल्या त्यांचा मोठ्या जोमानें प्रतिकार केल्यामुळें तो विख्यात झाला. या घराण्यांतील शेवटचा राजा पृथ्वीराज याच्यापर्यंत चाहमानांच्या सिंहासनावर एकामागून एक आलेल्या सर्व राजांस मुसलमानांशीं अखंड लढत राहावें लागलें; आणि त्यांनीं हा लढा उत्साहानें व चिकाटीनें चालविला. दुसऱ्या भागांत या सामन्तानंतरचा प्रख्यात राजा पहिला गूवक याचेपासून ज्याचा संवत १०३० ( इ. स. ९७३ ) चा हर्ष शिलालेख उपलब्ध झाला आहे त्या दुर्लभापर्यंतची वंशावळहि दिलेली आहे. या भागांत दुर्लभा-

पासून चाहमान घराण्यांतील शेवटचा चक्रवर्ती राजा पृथ्वीराज याच्या पर्यंतची वंशावळ आम्ही देत आहों. कविराज श्यामलदासांनें बंगालच्या रॉ. ए. सो. च्या जरनलमध्यें बिजोलिया शिलालेखांत दिलेली ही सर्व वंशावळ प्रसिद्ध केली आहे; तिच्याबद्दल कीलहार्ननें ए. ई. भाग ८ मध्यें व रायबहादुर गौरीशंकर ओझा यांनीं टॉड्च्या राजस्थानच्या हिंदी आवृत्तींत ( पा. ३९४ ) चर्चा केली आहे. टॉडनें आपला सुप्रसिद्ध ग्रंथ लिहिल्यानंतर उपलब्ध झालेल्या अनेक लेखांवरून बहुतेक विद्वानांच्या मतें असें सिद्ध झालें आहे कीं इतिहास या नात्यानें पृथ्वीराजरासेला जवळ जवळ कांहींच किंमत नाहीं. तेव्हां मुख्यतः पृथ्वीराजरासेवरून टॉडनें दिलेली चाहमान राजांची वंशावळ व त्यांच्या तारखा या स्वाभाविकपणेंच चुकीच्या असून खऱ्या वंशावळीकरितां व तारखांकरितां आपल्याला कोरीव लेखांचा आधार घेणें जरूर आहे. आणि निरनिराळ्या राजांचे काल गणितानें जुळवूनच ठरविलें पाहिजेत. राजपुताना ग्याझेटिअर भाग ३ ( पा. ६५ ) मध्यें चाहमानांची वंशावळ दिलेली आहे, ती अर्थांतच बिजोलिया शिलालेखावरून दिलेली आहे. परंतु आमच्या मताप्रमाणें दुरुस्त करण्याजोग्या अशा चुका तींत थोड्या आहेत. दुर्लभापासून तहत पृथ्वीराजापर्यंत आमच्या मतानें बरोबर असलेली सांबरच्या चाहमानांची वंशावळ देऊन तिच्याच जोडीला राजपुताना ग्याझेटिअरमध्यें दिलेली वंशावळ आह्मीं देतों व पंडित गौरीशंकर ओझा यांनीं निरनिराळ्या राजांबद्दल प्रदर्शित केलेल्या विचारांचाहि निर्देश करतों.

**बिजोलिया शिलालेख.** **राजपुताना ग्याझेटिअर.**

१ दुर्लभ इ. स. १७७ | १ दुर्लभ
२ गोविंद रा. ९८८ | २ गोविंद
३ वाक्पति (रा. १००३) ४ वीर्यराम | ३ वाक्पति
५ श्रीचंद (रा. १०३३) | ४ पुत्र विजयराम
६ गोपेन्द्र ७ विग्रहराज उर्फ वीसल ३रा (रा. १०६३)=राजदेवी | ५ दुर्लभ ६ विग्रह
८ पृथ्वीराज १ला (रा. १०७८) | ७ पृथ्वीराज
९ अजयदेव (रा. १०९३) = सौमल्यदेवी | ८ अजयपाल
१० अर्णोराज अथवा आना | ९ अर्णोराज पुत्र किंवा पौत्र
जगदेव ११ विग्रहपाल वीसल ४था १३ सोमेश्वर ले. ११६९इ.स. | १० वीसल (विग्रह)
१२ पृथ्वीभट २रा ले. ११६३इ. | ११ पृथ्वीराज १२ सोमेश्वर
१४ पृथ्वीराज ३ रा. रा. ११६९. शहाबुद्दीना बरोबरच्या लढाईत ११९२ सालीं पडला. | १३ पृथ्वीराज

तिसऱ्या किंवा शेवटल्या पृथ्वीराजाबद्दल आम्ही स्वतंत्र प्रकरण लिहिणार आहोंत, कारण शहाबुद्दीन घोरी बरोबर त्यानें केलेल्या

संग्रामांत उत्तर हिंदुस्थानचा, किंबहुना परिणामतः सर्व हिंदुस्थानचाच, पाडाव झाल्यामुळें त्याचें चरित्र विस्तृत रीतीनें द्यावयास पाहिजे. त्याच्या राज्यारोहणाचा काळ सन ११६९ घेण्यास कोणतीहि हरकत नाहीं. या बद्दलची चर्चा आम्हीं पुढें करणार आहों. दुर्लभाच्या कारकीर्दीस इ. स. ९७३ मध्यें सुरुवात झाली असावी. तेथून तिसरा पृथ्वीराज सन ११६९ मध्यें राज्यारूढ होईतों १९६ वर्षांच्या कालांत तेरा राजे होऊन गेले. प्रत्येक राजाच्या कारकीर्दीचें सरासरी प्रमाण १'५ वर्षांचें पडतें. चाहमानांच्या वंशावळीच्या मागल्या भागांत निरनिराळ्या राजांचे राज्यारोहणकाळ ठरविण्यासाठीं आम्ही सरासरी प्रमाण पंधरा वर्षांचेंच धरलें आहें हें वाचकांचें ध्यानांत असेल.

वेगवेगळ्या राजांबद्दल बोलावयाचें तर दुर्लभराज हा त्याच्यापूर्वी झालेला राजा विग्रहराज याचा भाऊ होता असें हर्ष-शिलालेखांत आहें. विग्रहराज हा खरोखरच लोकविख्यात होता. हा वीसल राक्षस झाला व त्यानें अजमीरचा उच्छेद केला अशी बाष्कळ कथा पृथ्वीराजरासेंत दिली आहे. पृथ्वीराज—रासेंतील धुंडा दानव हाच विग्रहराज होय असें म्हटलें तर तें चालण्यासारखे आहे. परंतु पूर्वीच सांगितल्याप्रमाणें विशेषतः ३ ऱ्या पृथ्वीराजाच्या पूर्वजांच्या बाबतींत तरी पृथ्वीराजरासेची इतिहासांत गणना करणें शक्य नाहीं. आणि त्यामुळें बिजोलिया लेखांत सांगितलेले राजे पृथ्वीराज—रासेंतील राजांतून हुडकून काढून ते अमुकच आहेत असें निश्चित ठरवीत बसण्यांत कांहीं एक अर्थ नाहीं. त्या कथेंत आणखी असेंहि सांगितलें आहें कीं, धुंडादानव हा पृथ्वीराजापूर्वी ३०० वर्षें होऊन गेला; व त्याला सारंगदेव नांवाचा मुलगा होता. सारंगदेव हें नांव शिलालेखांतील वंशावळींत आढळूनहि येत नाहीं. सारंगदेवाला आर्णोराज नांवाचा मुलगा होता असें रासेंत सांगितलें आहें. परंतु शिला-

लेखांवरून असें दिसून येतें कीं अर्णोराज हा दुसऱ्या वीसलाचा किंवा तिसऱ्या विग्रहाचा नातू होता. विग्रहाचा राज्यारोहणकाल अदमासें इ. स. १०६३ असावा. आणि यावरून तो तिसऱ्या पृथ्वीराजापूर्वी फक्त १०० वर्षेंच होऊन गेला हें स्पष्ट आहे. तेव्हां रासेचा विचारच सोडून दिला तर आपल्याला असें दिसून येईल कीं, वाक्पति हा इ. १००३ पासून सांबरचा राजा होता; आणि अतएव तो गझनीच्या महमुदाचा समकालीन असावा. परंतु त्याच्या आयुष्यांत महमुदाचे तुर्क व चाहमान यांच्यांत संग्राम झाला असावा असें दिसत नाहीं. कारण महमूद हा अजमीरपर्यंत केव्हांहि आला नाहीं. इ. स. १००० मध्यें अजमीर ही चाहमानांची राजधानीच नव्हती. सबुक्तगीन अथवा महमूद यांना विरोध करणाऱ्या राजसमाजांत सामील असल्याबद्दल अजमीरच्या राजांचाहि उल्लेख फिरिस्तानें केला आहे. परंतु ही केवळ त्याची कल्पना आहे. शिहाबुद्दीन घोरीच्या काळांत अजमीरचे राजे प्रसिद्धीस आलेले असल्यामुळें अजमीरचा काळ मागें लोटूनहि त्यानें असें विधान केलें असावें. यानंतर, बिजोलिया शिलालेखांतील श्रीचंद्रा ऐवजीं पंडित गौरीशंकर यांनीं चामुंड हें नांव दिलें असून चामुंडानें (हम्मीरकाव्यांत वर्णिल्याप्रमाणें) मारवाडांत—येथें विष्णूचें देवालय बांधिलें असेंहि म्हटलें आहे. इकडे, कीलहार्न सिंहट व दूसल अशीं दोन वेगवेगळ्या राजांचीं नांवें देतो (पहा. ए. इं. ८ परिशिष्ट). पहिल्या पृथ्वीराजानें रणथंभोर येथील जैन देवालयास सुवर्णकुंभ अर्पण केला अशीं आख्या गौरीशंकरनें दिली आहे. त्याचा मुलगा अजयदेव यानें अजमीरचा किल्ला बांधला, ११ व्या शतकाच्या शेवटीं हल्लीचें अजमीर त्यानें वसविलें व आपली राजधानी सांबरहून हलवून अजमिरास नेली असें म्हणतात. त्याच्या व त्याची राणी सोमलादेवी हिच्या नांवचीं पाडलेलीं नाणीं सांपडलीं आहेत (इं. ॲ. १९१२). या

वरून तो राजा वैभवशाली असला पाहिजे. त्याचा पुत्र अर्णोराज ऊर्फ आना हा अधिकच वैभवशाली होता. त्यानें बंधारा घालून (अजमीरचा) आनासागर तलाव बांधला आणि अशा तऱ्हेनें "मुसलमानांच्या स्वारीनें अपवित्र झालेली जागा शुद्ध करून घेतली." (पृथ्वीराजविजय काव्यांतील ही बहुधा कविकल्पनाच असावी. कदाचित् याच्या वेळीं अजमीरवर मुसलमानांनीं चढाई केली असावी). हरविलास सारडा यांनीं त्याची कारकीर्द इ. स. ११२५ ते ११५० दिली आहे.* वंशावळींत आम्ही जो गणित करून अनुमानानें काल दिला आहे, त्याच्यांत व यांत फारसा फरक नाहीं. गुजराथच्या कुमारपालानें सं. १२०७ किंवा सन ११५० मध्यें अर्णोराजाच्या कारकीर्दींत अजमीरवर स्वारी केली असें पंडित गौरीशंकर यानीं म्हटलें आहे. इंडियन ॲन्टिक्वेरी १९०२ मध्यें लिहिलेल्या निबंधांत मि. हरविलास सारडा यांनीं असें दाखविलें आहे कीं अर्णोराजानें गुजराथच्या कुमारपालाबरोबर दोनदां युद्ध केलें; एकदां संवत १२०२ मध्यें व पुनः १२०७ मध्यें. (यावर्षीं अर्णोराजास दिलेल्या आपल्या बहिणीचा अर्णोराजानें केलेल्या अपमानाचा सूड उगवण्यासाठीं कुमारपालानें अजमीरवर स्वारी केली). अर्णोचा दुसरा मुलगा वीसलदेव किंवा ४था विग्रहराज हा आपला ज्येष्ठ भाऊ जगदेव यास बाजूस सारून राज्यावर बसला. जगदेव हा आनाचा खून करून पितृघाती झाल्यानें त्यास बहुतकरून गादीवर बसूनच दिलें नसावें. वीसलदेव हा आनापेक्षांहि प्रख्यात असा राजा होऊन गेला. हल्लीं दिल्लीस असलेल्या (अशोकाच्या ?) लोहस्तंभावर त्यानें आपला एक लेख खोदविला असून त्यांत त्याच्या पराक्रमाचें उत्कट

---

* रा. सारडा यांनीं अन्यत्र अजयपालाच्या कारकीर्दीचा काल इ. स. ११६५ ते ११७५ कसा दिला असावा हें सांगणें कठीण आहे. बहुधा हे आंकडे चुकीनें छापले गेले असावेत.

असें वर्णन केलेलें आहे. +“हा यात्रेला निघाला असतां, त्यानें विन्ध्यापासून हिमालयापर्यंत ज्या राजांनीं त्याचा प्रतिकार केला त्यांस जिंकलें व ज्यांनीं त्याच्यापुढें मान वांकविली त्यांच्यावर अनुग्रह केला. आणि मुसलमानांच्या कत्तली करून आर्यावर्त हें पुनः एकदां खरें खुरें आर्यावर्त म्हणजे आर्यांचें वसतिस्थान केलें. तो आपल्या वंशजांस असा जोमाचा उपदेश करीत आहे कीं, विंध्य आणि हिमालय यांच्या दरम्यानच्या मुलखावर आम्ही कर बसवून तेथील राजांस आमचे सामंत केलें आहे; उरलेली पृथ्वी जिंकण्याविषयीं तुमचीं मनें उद्योगशून्य होऊं देऊं नका.” त्यानें आपल्या राज्याचा कारभार मोठया जोमानें केला आणि थोर कृत्यें करण्याची महत्त्वाकांक्षा धरली असें यावरून दिसून येतें. पंजाब जिंकून तो प्रांत आपल्या राज्याला जोडून टाकल्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांनीं अनेक स्वाऱ्या केल्या आणि पुष्कळ ठिकाणीं आपलीं ठाणीं बसविलीं हें आम्हीं यापूर्वींच सांगितलें आहे. बीसलदेवानें या मुसलमानांस पंजाबांत हांकून लाविलें आणि आर्यावर्त त्यांच्या जुलमांतून मोकळें करून पुनः एकदां त्याचें नांव अन्वर्थ केलें. वीसलदेवानें दिल्ली जिंकली असा बिजोलिया लेखांत जो उल्लेख आहे त्याबद्दल

---

\+ आविंन्ध्यादाहिमाद्रेर्विरचितविजयस्तीर्थयात्राप्रसंगात्
उद्ग्रीवेषु प्रहर्ता नृपतिषु विनमत्कन्धरेषु प्रसन्नः।
आर्यावर्तं यथार्थं पुनरपि कृतवान् म्लेंच्छविच्छेदनाभिः
देवः शाकम्भरीन्द्रो जगति विजयते वीसलो क्षोणिपालः ॥
ब्रूते संप्रति चाहमानतिलकः शाकंभरी-भूपतिः
श्रीमाद्विग्रहराज एष विजयी सन्तानजानात्मजान् ।
अस्माभिः करदं व्यधापि हिमवद्विन्ध्यान्तरालं भुवः ।
शेषस्वीकरणाय मास्तु भवतामुद्योगशून्यं मनः ॥
(इ. ॲ. १९पा. २१८)

शंका प्रदर्शित केली जाते; परंतु या अशोकस्तंभावरील लेखानें त्या गोष्टीची सत्यता पटून येते. 'प्रतोल्यां च वलभ्यां च येन विश्रामितं यशः। ढिल्लिकाग्रहणश्रान्तमाशिकालाभलंभितम्॥' ह्या बिजोलिया लेखांतील श्लोकाचा अर्थ लावणें बरेंच कठिण आहे. प्रतोली व वल्लभी आणि त्याचप्रमाणें ढिल्लिका व आशिका हे शब्द द्व्यर्थी आहेत यांत संशय नाहीं (त्यांवरून या नांवांचीं शहरें व घराचे निरानिराळे भाग दर्शविले जातात). परंतु त्यावरून हें स्पष्ट दिसून येतें कीं दिल्ली सर करण्यास वीसलदेवास मोठा प्रयास पडला. जिज्ञासु वाचकांकरितां बिजोलियाचा लेख व लोहस्तंभावरील लेख हे मुळांत परिशिष्टांत दिले आहेत.

वैकुंत, जाबालिपुर, पल्ली आणि दिल्ली यांचा विजेता (बिजो-लिया शिलालेख) वीसलदेव हा जसा विख्यात योद्धा होता, तसाच तो अजरामर कीर्ति संपादन केलेल्या धारेच्या भोजराजाप्रमाणें कवि आणि कवींचा चाहताहि होता. अजमीर येथें अलिकडे दोन शिला सांपडल्या आहेत. त्यांपैकीं एकीवर खुद्द वीसलदेवानें लिहिलेलें एक नाटक कोरलें असून दुसरीवर त्याच्या दरबारच्या एका कवींचें नाटक कोरलें आहें. हरकेलि हें नाटक स्वतः वीसलदेवानें लिहिलेलें असून त्यांतील संविधानक किरातार्जुनीय या सुप्रसिद्ध महाकाव्यावरून घेतलेलें आहे. आपल्यास अर्जुनाप्रमाणें शिवानें दर्शन दिलें असें या नाटकांत वीसलदेवानें दाखविलें आहे. हें नाटक सं. १२१० (इ. स. ११५३)मध्यें रचिलें आहे असें दिसतें. दुसऱ्या नाटकाचें नांव ललितविग्रहराज असें असून तें दरबार कवि सोमदेव यानें रचिलें आहें. त्या नाटकांत असें दाखविलें आहे कीं विग्रहराजाचें वसंतपाल नावांच्या राजाच्या (हा राजा बहुधा काल्पनिक असावा) कन्येवर प्रेम जडलें; तिलाहि तो आवडला होता; व त्यानें तिला अमीराबरोबरचें युद्ध संपल्याबरोबर तुजकडे येतो असा निरोप पाठ-

विला आहे. ही गोष्ट ऐतिहासिक दृष्ट्या खरी असावी. या हम्मीरा-(अमीरा) जवळ अगणित तुर्क, (ते बहुधा अफगाण असावेत) होते असें म्हटलें आहे. दोघांनींहि आपले गुप्त बातमीदार एक-मेकांच्या सैन्याच्या तळांत पाठविले होते. शेवटीं दूतांमार्फत दोघांत संधि झाला असें दर्शविलें आहे.

वीसलसर नांवाचा तलाव बांधून आनासागर बांधणाऱ्या आपल्या पित्याप्रमाणेंच वीसलदेवानें आपलें नांव अजमीरमध्यें चिरस्थायि केलें आहे. त्यानें आपल्या लोहस्तंभ-लेखांत आपला पिता आना याचें नांव अवेल्लदेव असें दिलें आहे. (या आनानें आनासागर नांवाचा तलाव बांधला, त्या तलावाच्या कांठावर पुढें शहाजहानानें संगमरवरी बारादरी बांधली आहे). वीसलदेवानें संस्कृत विद्यार्थ्यांसाठीं एक विद्यालयहि बांधिलें होतें. त्या विद्यालयाची शहाबुद्दीन घोरीनें मशीद बनवून टाकली. ती आज 'अढाई दीनकी झोंपडी' या नांवानें प्रसिद्ध आहे.

वीसलदेवाचा शेवटचा उपलब्ध असलेला लेख (दिल्लीचा लोहस्तंभ) संवत १२२०सन ११६३चा आहे. त्याच्या मागें त्याचा अज्ञान मुलगा अपरगांगेय याचा बिजोलिया शिलालेखांत उल्लेख आलेला नाहीं. पितृघा-ती जगदेवाचा मुलगा म्हणजे वीसलदेवाचा पुतण्या पृथ्वीभट किंवा दुसरा पृथ्वीराज हा या अज्ञान मुलाला बाजूला सारून गादीवर बसला. त्यानें थोडींच वर्षें राज्य केलें. त्याच्यानंतर वीसलदेवाचा कनिष्ठ बंधु सोमेश्वर हा सिंहासनावर बसला. त्यानेंहि अल्पकालच राज्य केलें. त्याच्यानंतर त्याचा पुत्र व चाहमान घराण्यांतील शेवटचा राजा ३ रा पृथ्वीराज राज्य करूं लागला. पृथ्वीराजाबद्दलच्या प्रकरणांत सोमेश्वर व पृथ्वीराज यांच्या राज्यारोहण-शकाची ज्यास्त चर्चा आम्ही करणार आहों. परंतु येथें येवढें सांगणें जरूर आहे कीं सोमेश्वरानें कांहीं दिवस तरी राज्याचा उपभोग घेतला असला पाहिजे. कारण बिजो-

लिया शिलालेखांत सोमेश्वरानें रेवना नांवाचा गांव दान दिल्याचा उल्लेख असून या उल्लेखानेंच तो लेख संपला आहे. तेव्हां तो लेख सं. १२२६ सालीं फाल्गुन वद्य ३ स इ. स. ११६९ मार्चच्या सुमारास लिहिण्यांत आला तेव्हां सोमेश्वर राज्य करीत असला पाहिजे.

आमच्या दुसऱ्या भागांत ( पा. १४ ) सिद्ध करून दाखविल्या-प्रमाणें व पृथ्वीराजविजय आणि हम्मीरकाव्य यांत वर्णिल्याप्रमाणें चाहमान हे सूर्यवंशी रजपूत आहेत. ते अग्निकुल होत ही अलिकडची कल्पित कथा असून त्या कल्पनेचा शिलालेखांमुळें परिस्फोट झाला आहे. पंडित गौरीशंकरांचें मतहि असेंच आहे. परंतु पंडित गौरीशंकर हे चाहमानांस चंद्रवंशी क्षत्रिय मानतात हें मात्र विचित्र आहे ( पहा टॉडच्या राजस्थानची हिंदी आवृत्ति). पण ही बहुधा छापण्यांतील चूक असावी.

---

# प्रकरण दुसरें
## मेवाडचे गुहिलोत.

बप्पा रावळानें स्थापिलेलें राज्य या कालविभागांत जसेंच्या तसें अबाधित राहिलें; आणि मागील विभागांतल्या प्रमाणेंच या विभागांतलेंहि मेवाडचे गुहिलोत राजे तितकेच शौर्ययुक्त आणि स्वातंत्र्यप्रिय होते. त्यांचें स्वातंत्र्यावर मनापासून इतकें प्रेम होतें कीं, इतर राष्ट्रांच्या किंवा कुलांच्या प्रदेशाचा किंवा स्वातंत्र्याचा अपहार करून आपला प्रदेश वाढविण्याचा प्रयत्न त्यांनीं कधींच केला नाहीं. याच्या पूर्वींच्या काय किंवा या कालविभागांत काय इतर राजघराण्यांतील राजाप्रमाणें सम्राट् किंवा चक्रवर्ती पदाची आकांक्षा त्यांनीं केव्हांहि धरली नाहीं. चाहमान, कलचूरी, गाहडवाल हीं घराणीं या कल्पनेनें भारलीं गेलीं होतीं. वस्तुतः हिंदुस्थानांत साम्राज्य स्थापण्याचा हा मोह कौरवपांडवांच्या प्राचीन कालापासून तो तहत पृथ्वीराजाच्या कालापर्यंत हिंदुस्थानच्या अनर्थाचें कारण झाला आहे, आणि त्यापासून स्वाभाविक होणारा फायदा मात्र यत्किंचितहि झालेला नाहीं; कारण या साम्राज्याच्या कल्पनेंत जर्मन साम्राज्याप्रमाणें सर्व उत्तर किंवा दक्षिण हिंदुस्थान एका राजछत्राखालीं संघटित करण्याचा हेतु नव्हता; इतर राजांकडून ‘ जितोऽस्मि ’ असें म्हणवून घ्यावें, पण त्यांच्या राज्याला कोणत्याहि तऱ्हेनें धक्का लावूं नये अशी कल्पना होती. असो, येथें येवढेंच सांगणें पुरें कीं, सम्राट् पदाचा मान मिळविण्याच्या अहंकाराला मेवाडचे राजे केव्हांहि बळी पडले नाहींत; पण त्यांनीं आपल्या स्वातंत्र्याचें जिवापाड जतन केलें. बाराशें वर्षांच्या अनेक कष्टकर प्रसंगांत आणि परिवर्तनांतहि मेवाडचें राज्य आजपर्यंत

अबाधितपणें कायम राहिलें यांतील इंगित हेंच असावें. ते आपल्या प्रदेशांत आणि गौरवांत संतुष्ट होते, आणि म्हणूनच बप्पा रावळानें प्रस्थापित केलेल्या राज्यांतील सर्व प्रदेशावर आजहि ते राज्य करीत आहेत.

या कालविभागांत ( १०००–१२०० इ. ) मेवाडचें राजे परराज्यांच्या आणि विशेषतः मुसलमानांच्या स्वाऱ्यांपासून प्रायः सुरक्षितच राहिले. काबूल किंवा कनोज येथील चक्रवर्ती राजांस मुसलमान हिंदुस्थानचे राजे असे मानीत. मेवाडचे हे त्या अर्थानें हिंदुस्थानचे राजे नसल्यामुळेंच बहुधा महमुदाच्या तुर्कांनीं देखील मेवाडवर स्वारी केली नाहीं. कदाचित् तें राज्य संपन्न नसावें आणि त्यांत द्रव्याच्या संग्रहानें भरून गेलेलीं देवस्थानें अथवा तीर्थक्षेत्रेंहि नसावींत. यामुळें मेवाडचे राजे अनायासानें अबाधित राहूं शकले आणि तेथील ओजस्वी राजघराणें विलयांत अंत पावणारी ऱ्हासाचीं नुसतीं चिन्हेंहि उत्पन्न न होतां अविच्छिन्नपणें राज्य करीत राहिले.

दुसऱ्या भागांत आटपुरा येथील संवत १०३४ म्हणजे इ. स. ९७७ च्या शिलालेखावरून बप्पारावळापासून शक्तिकुमारापर्यंतची मेवाडच्या राजांची वंशावळ दिलेली आहे. या भागांत त्या वंशावळीचा शक्तिकुमारानंतरचा इ. स. १२०० पर्यंतचा उत्तरभाग देत आहों. पृथ्वीराज-रासेंत समरसिंह हा अजमीर आणि दिल्ली येथील तिसऱ्या पृथ्वीराजाचा समकालीन राजा म्हणून दिला आहे तें चुकीचें आहे हें आतां सर्वत्र मान्य करण्यांत आलें आहे. समरसिंहाच्याच शिलालेखांवरून समरसिंह हा १३ व्या शतकाच्या अखेरीस होऊन गेला हें स्पष्ट दिसत आहें. दुर्दैवानें रासेंतील हकिकत सर्व रजपुतांच्या राज्यांतील भाटांनीं मान्य केल्यामुळें त्यांच्या वंशावळी चुकीनें दूषित झाल्या आहेत. मेवाडच्या गुहिलोतांचा ज्यांत संबंध आला आहे असे नानाप्रकारचे कोरिव लेख व त्यांत दिलेल्या त्यांच्या वंशावळी

यांचा एकत्र विचार करून रासेनें दिलेली चुकीची कथा प्रचारांत कधीं आली, हें आपल्याला बहुतेक निश्चित करितां येते. अशा तऱ्हेचे जे कित्येक कोरीव लेख आहेत, त्यांतील पहिला म्हणजे सं. १३४२ ( इ. १२८५ ) चा अबू अचलेश्वराचा शिलालेख होय. त्यांत पुष्कळ राजांची सविस्तर वर्णनें आहेत. त्यानंतर जोधपूर प्रांतातला सं. १४९६ [इ. स. १४३९] चा राणपुरा [ बाणपुरा ] येथील शिलालेख; त्यांत बप्पा पासूनची वंशावळ अगदीं मोजक्या शब्दांत दिली आहे. शेवटचा शिलालेख म्हणजे रायसागर येथील सं. १७३२ [इ. १६७५] चा शिलालेख. समरसिंहाचें लग्न पृथ्वीराजाची बहीण पृथा हिचेबरोबर झालें होतें व शहाबुद्दीन घोरी बरोबर झालेल्या शेवटल्या लढाईंत पृथ्वीराजाबरोबर समरसिंह मृत्यु पावला, ही रासेंत दिलेली कथा या लेखांत प्रथम दृष्टोत्पत्तीस येते. या लेखांत खुद्द रासेचा उल्लेख केला असून त्यामुळें मागील दोन लेखांत दिलेल्या वंशावळींत फिरवाफिरव करणें अवश्य झालें. समरसिंह हा, ज्या जैत्रसिंहाच्या कारकीर्दीत इ. स. १२१६ मध्यें मेवाड व तुर्क यांची पहिली लढाई झाली त्या जैत्रसिंहाच्या तेजसिंह नांवाच्या मुलाचा मुलगा होता असें त्या लेखांत दिलें आहे. अबूच्या लेखांत तर तुरुष्क सैन्यरूपी समुद्राचा अगस्त्यच असें जैत्रसिंहाचें कीर्तिप्रद वर्णन केलें आहे* या लढाईविषयीं आम्ही पुढें लिहिणार आहोंत, परंतु येवढयाहि वर्णनावरून असें स्पष्ट दिसून येईल कीं, समरसिंहाचा आजा जैत्रसिंह हा देखील पृथ्वीराजाला समकालीन नव्हता. तात्पर्य इ. स. १४३९ च्या रणपुरा लेखाचे नंतर आणि इ. स. १६७५ च्या रायसागर लेखाचे पूर्वीं पृथ्वीराज–रासेंतील कथा प्रचारांत आली असली पाहिजे. तिजकडे दुर्लक्ष करून, अबू

---

* तुरुष्कसैन्यार्णवकुंभयोनिः ।

आणि बाणपुरा येथील शिलालेखांवरून टॉड्च्या राज-स्थानाच्या हिंदी आवृत्तींत पंडित गौरीशंकरांनीं या काळांतील मेवाड घराण्याची जी वंशावळ तयार केली आहे तीच आम्हीं देणार आहोंत. याच घराण्यांतील विजयसिंह नांवाच्या एका राजाचा सं. ११६४ (इ. स. ११०७) चा आणि जैत्रसिंहाचा सं. १२७० (इ. स. १२१३) चा असे दोन उपलब्ध शिलालेख आहेत. इ. स. ९७७ च्या आटपुरा शिलालेखांतील शक्तिकुमारापासून पासून विजयसिंहापर्यंत १० राजे झाले. त्यांच्या कारकीर्दींची सरासरी $\frac{११०७ - ९७७}{१०} = \frac{१२०}{१०}$ = १२ वर्षांची पडते; आणि शक्तिकुमारापासून जैत्रसिंहापर्यंत १९ राजे झाले असून त्यांच्या कारकीदींची सरासरी $\frac{१२१३ - ९७७}{१९} = \frac{२३६}{१९} = १२\frac{८}{१९}$ वर्षें अशी बसते. यावरून असें दिसतें कीं, मागील काळाप्रमाणेंच या काळांतहि गुहिलोत राजांच्या कार-कीर्दींचें सरासरी मान इतर राजघराण्यांच्या मानानें बरेंच कमी आहे. ही वंशावळ तारखांसह निश्चित करण्यासाठीं गुहिलोतांच्या वंशा-वळींतील या भागांतील राजांच्या कारकीर्दींची सरासरी १३ व ११ वर्षें धरून व त्याप्रमाणें निरनिराळ्या राजांच्या अनुमानिक कारकीर्दी कल्पून आम्ही ही वंशावळ समरसिंहापर्यंत देत आहोंत आणि निरनिराळ्या राजांच्या बाबतींत पंडित गौरीशंकर यांची टॉडच्या राजस्थानाच्या आवृत्तींतून व इतर ठिकाणांतून घेतलेल्या माहितीचा उपयोग करणार आहों.

## गुहिलोत वंशावळ.

१ शक्तिकुमार ( राज्यारंभ इ. स. ९७७ )
|
२ अंबाप्रसाद ( ,, सु० ९९० )
|
३ शुचिवर्मा ( ,, १००३ )
|
४ नरवर्मा ( ,, १०१६ )

५ कीर्तिवर्मा ( ,, १०२९ )
|
६ योगराज ( ,, १०४२ )
|
७ वैरट ( ,, १०५५ )
|
८ हंसपाल ( ,, १०६८ )
|
९ वैरिसिंह ( ,, १०८१ )
|
१० विजयसिंह ( ,, १०९४ )
| शिलालेख ११०७ )
\+ ११ अरिसिंह ( राज्यारंभ इ. स. १११८ )
|
१२ चंड ( ,, ११२९ )
|
१३ विजयसिंह ( ,, ११४० )
|
\+ १४ रणसिंह ( ,, ११५५ )
|
१५ भीमसिंह ( ,, ११६२ )
|
१६ सामंतसिंह ( ,, ११७३ )
|
१७ कुमारसिंह ( ,, ११८४ )
|
१८ मथनसिंह ( ,, ११९५ )
| लेख १२०३
१९ पद्मसिंह ( ,, १२०६ )
|
२० जैत्रसिंह ( ले. १२१३, १२२२ )
|
२१ तेजसिंह ( ले. १२६७ )
|
२२ समरबिंह ( ले. १२७८, १२८३, १२८७, )

आतां या वंशावळींतील राजांबद्दल व्यक्तिशः विचार करूं. सुरुवातीस हें सांगितलें पाहिजे कीं अबू व चितोडगड येथील शिला-

लेख एकाच सुमाराचे असून दोन्ही वेदशर्मा नांवाच्या एकाच लेखकानें लिहिलेले आहेत. परंतु चितोडगडच्या शिलालेखांत अंबाप्रसाद व शुचिवर्मा हे शक्तिकुमारानंतर आणि नरवर्म्याच्या पूर्वी दिलेले आहेत. शिवाय दैत्यांप्रमाणें उग्र असलेल्या अशा धर्मशत्रूंचा शक्तिकुमारानें निःपात केला असाहि त्यांत उल्लेख आहे. हा उल्लेख खास मुसलमानांबद्दल असला पाहिजे. आटपुरा शिलालेखावरून या राजाची कारकीर्द ९७७ इ. मध्यें सुरू झाली असें आम्हीं दिलें आहे. याच सालांत गझनीचा सबुक्तगीन तक्तनशीन झाला; आणि हिंदुस्थानास ग्रासून टाकणाऱ्या संकटाचा प्रादुर्भाव झाला. काबूलच्या जयपालानें इ. स. ९८९मध्यें सबुक्तगीनाविरुद्ध उभारलेल्या हिंदु राजांच्या संघांत शक्तिकुमार सामिल झाला असावा असें मानण्यास जागा आहे ( स्मिथची अ. हि. इं. ).

चितोडगडच्या शिलालेखांत नरवर्म्याच्या नंतरचे राजे अबूच्या शिलालेखांतल्याप्रमाणेंच दिले आहेत; व यामुळें आम्ही त्याची प्रमाणलेखांत गणना केली नाहीं. परंतु अबूच्या शिलालेखांत अंबाप्रसाद आणि शुचिवर्मा यांचा उल्लेख नसला तरी त्याच्याच लेखकानें लिहिलेल्या चितोडगडच्या शिलालेखांतील राजांच्या यादींत या राजांचा समावेश केलेला असल्यामुळें आम्हीहि आमच्या वंशावळींत त्यांचा समावेश केला आहे. यावरून असेंहि दिसून येतें कीं अबूचा शिलालेखांतील आणखीहि कांहीं नांवाचा उल्लेख यावयाचा राहिला असावा; आणि तो तसा राहिला आहे असेंहि आढळून येतें. अंबाप्रसाद नांवाचा राजा यादींत विचित्र वाटतो. पण हें नांव दुसऱ्या राजघराण्यांतील लेखांत आले आहें ( कलचूरी ); आणि चितोडगडच्या शिलालेखांत त्याचा उल्लेख आला असल्यानें त्याबद्दल संशय बाकी रहात नाहीं. योगराज [ ६ ] व हेमपाल [ ८ ] हीं नांवें परकी वाटतात. त्यांचा उल्लेख अबूच्या शिलालेखांत आलेला

आहे आणि त्यांत हंसपालऐवजीं वंशपाल असें नांव दिलें आहे. पूर्वीच सांगितल्याप्रमाणें सं ११६४ चें विजयसिंहाचें एक ताम्रपत्र मिळालें आहे. अबूच्या व बाणपुराच्या लेखांत विजयसिंहाचें ऐवजीं विक्रमसिंह असें नांव दिलें आहें.रणसिंह किंवा कर्णसिंह याचा उल्लेख अबूच्या लेखांत नाहीं, परंतु तो बाणपुराच्या लेखांत आहे. असें असण्याचा संभव आहे कीं भाटानीं आपल्या कल्पनेनें कांहीं निर्माण केलेल्या राजांचीं नांवे या लेखांत दिलीं असावींत आणि या नांवाचें राजे होऊन गेले कीं नाहीं हा संशयच आहे. रणसिंहापासून पुढें दोन शाखा झाल्या, मोठी रावळ, आणि शिसोदा येथें जाऊन राहिलेली धाकटी राणा, अशी जी दंतकथा आहे तिचा उल्लेख अबूच्या शिलालेखांत नाहीं. परंतु या दंतकथेबद्दल संशय उरत नाहीं. कारण चितोडच्या प्रारंभीच्या राजांस रावळ म्हणत व हमीरापासून पुढच्या राजांस राणे म्हणतात. तें कां याचें विवेचन टिपेंत केलें आहें.*बाप्पारावळापासून एकंदर २६ रावळ झालें असें रायसागरच्या कालक्रमानें अखेरच्या असलेल्या शिलालेखांत म्हटलें आहे. त्या शिला-लेखांत ही दन्तकथा संग्राहित झालेली दिसते.

रणसिंहापासून भीमसिंहाखेरीजचीं बाकीची नांवें सर्व लेखांत सारखींच आहेत. अबूच्या व राणपुराच्या लेखांत भीमसिंहाऐवजीं क्षेमसिंह असें नांव दिलें आहें. हे राजे अबूच्या शिलालेखाच्या काळा-तील किंवा नुकतेच पूर्वी होऊन गेलेले असल्यामुळें त्यांच्या बाब-

---

* रावळ म्हणजे लहान राजा हें नांव बप्पा पासून चालू झालें.राणा म्हणजे ( राजानक ) मांडलिकराजा. हें नांव हम्मीर छोट्या घराण्यांतून येऊन गादीवर बसला तेव्हां पासून उदेपुरचे राजे लावूं लागले.तेंच हल्लीं वीर मोठ्या अर्थाचें झालें आहे.

तींत चूक होण्यासारखी नाहीं. सांमतसिंहाच्या कारकीर्दीची सुरुवात बहुधा इ. स. ११७९ मध्यें झाली असावी असें अनुमान आहे. तो तिसऱ्या पृथ्वीराजाचा समकालीन असावा. पंडित गौरीशंकरांच्या कल्पनेंप्रमाणें रासेंत भर टाकणारा किंवा आपल्या स्वतःच्या कविता चंदाच्या म्हणविणाऱ्या नवीन कवीचा सांमत व समर या नांवांत घोंटाळा झाला आणि त्यामुळें इ. स. १२८२ चा समरसिंह हा पृथ्वीराजाचा समकालीन बनविण्याची त्यानें घोडचूक केली.

# प्रकरण तिसरें.

## धारचे परमार राजे.

### १ भोज.

मुंज व सिंधुराज यांनीं माळव्यांतील परमारांचें राज्य पूर्वीच स्वतंत्र व वैभवशाली केलें असल्यामुळें या कालविभागाचे सुरुवातीसच परमारांची गणना प्रबळ राजांमध्यें होऊं लागली होती. भोजचे कारकीर्दींत परमार राजांचें वैभव व कीर्ति अधिकच वाढली; इतकेंच नव्हे तर ती अगदीं शिखरास जाऊन पोहोंचली. मुंज मृत्यु पावला त्या वेळीं लक्ष्मी आणि इंद्राणी यांचा आधार तुटला नसला तरी सरस्वती देवीचा आधारच तुटला असें वाटून कवि निराश झाले.* लक्ष्मी आणि वीरश्री यांस कोठेंतरी दुसरीकडे आश्रय मिळेल परंतु सरस्वती मात्र आतां कायमची अनाथ झाली अशी त्यांस चिंता वाटूं लागली. परंतु भोजानें त्यांची ही चिंता निरर्थक आहे असें प्रत्यास आणून दिलें. लक्ष्मी, वीरश्री आणि सरस्वती या तिघींसहि त्याचे पदरीं सारखाच आश्रय मिळाला. पौराणिक कालांतील राम व युधिष्ठिर आणि तदनंतरचे कालांतील विक्रम व हाल यांचेप्रमाणें शस्त्र आणि शास्त्र या दोहोंतहि निष्णात असलेला भोज हा ऐतिहासिक कालांतील उत्कृष्ट क्षत्रियत्वाचा आदर्शच होऊन गेला.

भोजानें विद्वज्जनांचा परामर्ष तर घेतलाच पण शिवाय तो प्रसिद्ध ग्रंथकार होता. त्यानें अनेक व विविध विषयांत प्रावीण्य संपादन केलें होतें. त्यानें ज्योतिष, अलंकार, शिल्प,योग व व्याकरण

---

* लक्ष्मीर्यास्यति गोविंदे वीरश्रीर्वीरवेश्मनि ।
गते मुंजे यशःपुंजे निरालंबा सरस्वती ॥

शास्त्रांचा अभ्यास केला होता आणि या प्रत्येक विषयावर त्यानें आजहि प्रमाणभूत मानण्यांत येण्यासारखे ग्रंथ लिहिले आहेत. अलंकारशास्त्रावरील सरस्वतीकंठाभरण, योगशास्त्रावरील राजमार्तंड व ज्योतिषशास्त्रावरील राजमृगांक-करण हे त्याचे ग्रंथ सुप्रसिद्ध असून त्यांवरून त्या त्या शास्त्रांत त्यानें केवढें मोठें प्रावीण्य संपादन केलें होतें हें स्पष्ट दिसून येतें. या ग्रंथांनीं विद्वत्तेविषयीं त्याची कीर्ति इतिहासांत चिरस्थायी झाली आहे. धार येथें त्यानें संस्कृत विषयांच्या उच्च आध्यापनासाठीं पाठशाला बांधली होती, आणि त्या पाठशालेंतील शिलांवर अनेक विषयांवरील संस्कृत सुभाषितें कोरलीं होतीं. मुसलमानांनीं या पाठशालेची मशीद बनवून टाकिली; कमालमौला मशीद या नांवानें आज ती धार येथें अस्तित्वांत आहे. संस्कृत सुभाषितें कोरलेल्या शिलांचा फरशीं ऐवजी या मशिदींत उपयोग करण्यांत आला असून आतां त्या इतक्या झिजल्या आहेत कीं त्यांवर कोरलेलीं अक्षरें ओळखणें शक्य राहिलें नाहीं. परंतु या सरस्वती-सदनाला किंवा भारती-भुवनाला लागून एक जुनाट विहीर आहे, ती ' अक्कलकुवी ' या नावानें प्रसिद्ध आहे; आणि ती पाहून ज्या कालीं त्या पाठशालेंत अध्ययन करणारे व सरस्वतीसदनाच्या दिवाणखान्यांत वादविवाद करणारे विद्वज्जन या विहिरीचें पाणी पिऊन आपल्या ज्ञानांत व शहाणपणांत भर टाकीत होते त्या कालाची आठवण होते. कर्नल ल्युआर्ड व मि. लेले यांनीं 'धार आणि माळव्याचे परमार ' या नांवाच्या आपल्या पुस्तकांत भोजाच्या वाङ्मय--विषयक श्रेष्ठत्वाबद्दल ह्या व इतर दुसऱ्या ज्या कित्येक लहान मोठ्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या खरोखरच मनोवेधक आहेत; आणि या दोघा विद्वान ग्रंथकारांनीं धारच्या परमारांचा सुसंबद्ध व सविस्तर इतिहास देण्यासाठीं परमारांच्या माहितीसाठीं उपलब्ध असलेल्या हरएक साधनांचा उपयोग करून घेतलेला असल्यामुळें

या इतिहासांत अवश्य देण्याजोग्या गोष्टी त्यांच्या या ग्रंथामधून उध्दृत करून घेण्यास कोणतीच हरकत नाहीं

( १ ) जरी भोजाचा हिंदुधर्मशास्त्रावरील असा कोणताहि ग्रंथ उपलब्ध नाहीं, तरी त्या शास्त्रावरील ग्रंथकार म्हणून कित्येक सुप्रसिद्ध ग्रंथकारांनीं भोजाच्या मताचा उल्लेख केलेला आहे. अशा तऱ्हेनें शूलनाथानें प्रायश्चित्त--विवेकांत व रघुनंदनानें मनुटीकेंत व विज्ञानेश्वरानेंहि आपल्या सुप्रसिद्ध मिताक्षरेंत भोजाचा उल्लेख केलेला आहे. या गोष्टीनें भोजाच्या बुद्धीचें नुसतें विविधगामित्वच दृष्टोत्पत्तीस येतें असें नाहीं, तर त्याच्या राजशासनांतील नैपुण्याचीहि खात्री पटते. (२) धर्मशास्त्राप्रमाणेंच मुलकी राज्यकाभारपद्धति ही पूर्ण अवगत असल्याखेरीज हिंदुधर्म--शास्त्रावर त्याला आपला ग्रंथ लिहिताच आला नसता; कारण, हिंदु लोकांत धर्म--पुस्तकांत या दोहोंचाहि समावेश होतो. ( ३ ) भोजानें आपल्या प्रजाजनांच्या शिक्षणाकडे व त्यांच्या ऐहिक सुखाकडे पुष्कळ लक्ष पुरविलें होतें. एका विस्तीर्ण खोऱ्या भोंवतालच्या टेंकड्यांत बंधारे घालून त्यानें 'भोजसर' नांवानें प्रसिद्ध असलेला तलाव बांधिला आणि बहुतकरून त्याचे कालवे काढून त्यानें त्यांचा शेतीसाठीं उपयोगहि केला असावा. हाच तलाव हल्लीं फोडून एक सुपीक परगणा भोपाल राज्यांत झाला आहे. (४)त्याच्या उपलब्ध झालेल्या दोन दानपत्रांवरून त्याच्या सरकारी दफ्तराची भाषा कशी सुटसुटीत होती हें दिसून येतें. या दफ्तराचा उल्लेख आम्ही पुढें करणारच आहों. परंतु येथें येवढें नमूद करून ठेवणें जरूर आहे कीं त्याच्या राज्यकारभाराची पद्धाति आणि व्यवस्था हीं नमुनेदार होतीं.

भोजाचें वाङ्मयांतील उच्चपद जसें सुप्रसिद्ध आहे तसें त्यानें राजकारणांत संपादन केलेलें महत्व प्रसिद्ध नाहीं; आणि अजून पावेतों निश्चितपणें ठरविण्यांतहि आलेलें नाहीं. तो इ. स. १०१०

चे सुमारास सिंहासनारूढ झाला ( क. ल्युआर्ड व मि. लेले यांचें मतें या पूर्वींच तो गादीवर आला असावा ); आणि त्यानें कमींतकमी चाळीस वर्षें तरी राज्य केलें. सर व्हिन्सेंट स्मिथनें त्याचा मृत्युकाल इ. स. १०६०चे सुमारास म्हणून दिला आहे. पंडित गौरीशंकर यांच्या म्हणण्याप्रमाणें तो १०५५चे थोडा पूर्वीं ( म्हणजे संवत् १११२ ) असावा. त्यानें अनेक हिंदी राजांबरोबर युद्धें केलीं. उदेपूर प्रशस्तींत वर्णिल्याप्रमाणें चेदीचा राजा इंद्रनाथ, गुजराथचे राजे पहिला जोग्गल व भीम, आणि कर्नाट, लाट व त्याचप्रमाणें गुर्जर व तुरुष्क राजे यांच्याबरोबर त्यानें केलेल्या युद्धाचा उल्लेख प्रामुख्यानें करण्याजोगा आहे ( ए. इं. १ पान २२२). यापैकीं त्याची ( तुरुष्क ) तुर्कांबरोबर जी लढाई झाली तिचा पहिल्यानें विचार करूं. या लढाईपूर्वीं मुंज राजानें एका हूण राजावर विजय संपादन केला होता असें या प्रशस्तींत जवळच म्हटलें आहे; आणि अर्थात यावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं या प्रशस्तींत हूण व तुर्क शब्द एकमेकांबद्दल समानार्थी म्हणून योजिले जाऊन गोंधळ केलेला नसून त्यांच्यातील भेद कायम राखिला आहे. तेव्हां पूर्वीं उल्लेखिलेला हूण राजा हिंदु राजा असला पाहिजे, कारण त्याकालीं हिंदुस्थानांत हूण लोक आलेले किंवा राहिलेले नव्हते, आणि शिवाय हूण ही संज्ञा एका रजपूत कुळालाहि लाविलेली आढळते. मुंज राजाचा राज्यकाल ९९७ इ. ते १०१० इ. हा आहे; आणि या कालावरून अमीर सबुक्तगीन याचे विरुद्ध लढण्यासाठीं रजपूत राजांनीं केलेल्या संघांत मुंज राजाहि सामील झाला असावा असें कोणासहि स्वाभाविकपणें वाटेल. परंतु त्याप्रमाणें तो सामील झाला असावा असें वरील उल्लेखावरून ठरत नाहीं. गझनीच्या महमुदाच्या कोणत्या स्वारींत भोज त्याचे विरुद्ध लढला हें निश्चित करणें कठीण आहे. सोमनाथ येथें महमुदाबरोबर जे राजे लढले त्यांत तो नव्हता येवढें खचित. कारण

त्यानें तुर्कांचा पराभव केला असें या प्रशस्तींत म्हटलें आहे. तबकात्--इ--अकबरीमध्यें असा एक उल्लेख आहे कीं, महमुदानें सोमनाथ येथें हिंदु राजांचा पराभव केल्यावर हिंदुस्थानांतील अत्यंत प्रबळ अशा राजांपैकीं परमारदेव हा आपल्याला आडवून धरण्यासाठीं तयारी करीत आहे असें कळल्यामुळें महंमुद आपली मिळविलेली लूट घेऊन मुलतानच्या वाळवंटाच्या पश्चिम भागांतून निघून गेला. या उल्लेखाच्या जोरावर क. ल्युआर्ड व मि. लेले यांनीं सुचविलेल्या कल्पने प्रमाणें महमुदाचें हें मुलतानच्या रेतमैदानांतून निघून जाणें हाच त्याचा कदाचित् भोजानें केलेला पराभव असावा. तबकात्-ई-अकबरीमध्यें हिंदुस्थानांतील प्रबळ राजांपैकीं एक म्हणून ज्या परमारदेवाचें वर्णन केलें आहे तो भोजच असला पाहिजे. तें वर्णन दुसऱ्या कोणत्याहि परमार राजास जुळण्याजोगें नाहीं. शिलालेख लिहिणारे लेखक बहुशः स्तुतिपाठक असतात; आणि त्यामुळें महमुदानें भोजास टाळलें तेव्हां त्याचा भोजानें पराभवच केला असें त्यांनीं म्हणावें हें स्वाभाविकच आहे. भोजानें सोमनाथाचें देवालय बांधिलें असा उदेपूर प्रशस्तीमध्यें जो उल्लेख आहे त्यावरून हेंहि संभवनीय दिसतें कीं प्रशस्तींतील हा उल्लेख या प्रसंगाचाच (सोमनाथाच्या युद्धाचा) असावा.बहुधा महमुदानें सोमनाथाचे देवालयांतील मूर्ती फोडली इतकेंच नाहीं तर तें देऊळहि उध्वस्त केलें असावें. आणि क्षत्रिय व शिवोपासक भोजानें ताबडतोब देवालय पुनः बांधावें आणि मूर्तींची पुनस्स्थापना करावी हें त्याच्या शौर्यास शोभेसें आहे असें म्हणतां येतें.

भोजाच्या राज्यारोहणाचा काल १०१०च्या आधीं जर धरिला तर इ. स. १००९ सालीं आनंदपालानें जमविलेल्या हिंदु राजांच्या फौजेंत भोजानेंहि आपलें सैन्य पाठविलें असण्याचा संभव आहे. प्रशस्तींत जो उल्लेख आहे तो स्वतः भोजाबद्दल नसून त्याच्या सेना-

पतीनीं किंवा पथकांनीं तुर्कादींचा पराभव केला असा आहे. पण या लढाईंत आनंदपालानें तुर्कांचा पराभव केलेला नसल्यामुळें प्रशस्तींतील या उल्लेखाचा संबंध याहि लढाईशीं जोडतां येण्याजोगा नाहीं.

उपलब्ध अशा सर्व ग्रंथांचा उपयोग करून क. ल्युआर्ड व मि. लेले यांनीं आपल्या पुस्तकांत भोजाचे आपल्या भोंवतालच्या हिंदु राजांबरोबरचे राजकीय संबंध आणि त्यांच्यामधील युद्धें यांचे उत्तम वर्णन दिलें आहे. मालव राज्याचे पूर्वेस हद्दीला हद्द भिडून चेदींचें राज्य होतें; उत्तरेस चितोडचें होतें; पश्चिमेस अनहिलवाडच्या चालुक्यांचें होतें; आणि दक्षिणेस कल्याणच्या चालुक्यांचें होतें. शेजारीं असलेल्या राज्यांत कधीं दोस्ती तर कधीं वैर हें चालावयाचेंच व त्यामुळें चितोडचें गुलोहित राज्य वगळलें असतां बाकीच्या तिन्ही राज्यांबरोबर भोजास वारंवार लढावें लागलें. मागें सांगितल्याप्रमाणें गुहिलोतांनीं सम्राट पदाची हांव कधीं धरिली नाहीं; किंवा कधीं आपल्या सरहद्दी वाढविण्याचा उपक्रमहि केला नाहीं. आणि यामुळें भोजानें चितोडबरोबर लढाई केल्याचा उल्लेख सांपडत नाहीं. चेदी, अनहिलवाड व कर्नाट यांच्याबरोबर त्याची सतत युद्धें होत व मधून मधून त्यांत खंडहि पडे; त्या युद्धांत त्याचा कधीं विजय तर कधीं पराजयहि होई आणि पराजय झाला असतां शत्रु नेहमीं धार जवळ जवळ किंवा कदाचित् धारेंतहि घुसत. गुजराथेंत त्याचा प्रतिस्पर्धी भीम होता व त्यानें १०२१ते१०६३पर्यंत राज्य केलें. एकदां भीमाच्या गैरहजेरींत भोजाचा जैन सेनापति कुलचंद्र यानें गुजराथवर स्वारी करून गुजराथची राजधानी अनहिलवाड (पट्टण) ही काबीज केली आणि तेथें इतकी मोठी लूट केली कीं 'कुलचंद्री' लूट हे शब्द लोकांच्या तोंडी कायमचे राहून गेले आहेत. भीमानेंहि याचें उट्टें काढण्याकरितां आपल्या घोडद-

ळानें धारेवर अकस्मात् छापा घातला आणि धार लुटून टाकली. परंतु भीम आणि भोज यांच्यांतील वैर लवकरच शमलें आणि त्यांचे एकमेकांच्या दरबारीं वकीलहि प्रेमानें राहिले. अनहिलवाडचा वकील दामोदर हा विनोदी आणि हुशार मुत्सद्दी म्हणून प्रसिद्ध आहे.

पूर्वेचें चेदी आणि दक्षिणचें कर्नाट राज्य यांच्या बरोबरचे भोजाचें वैर जवळ जवळ पिढीजादच होतें व त्यानें भोजाचें नुकसानहि फार अधिक झालें. कारण चेदीचे हैहय आणि कर्नाटचे चालुक्य यांच्यांत बहुधा सोयरिकीचा संबंध असे. चेदीच्या युवराजाची बहीण ही कर्नाटच्या तैलपाची आई होती. मुंज आणि तैलप यांच्यांत सतत लढाई चालत आली होती आणि सरते शेवटीं मुंज पकडला गेला आणि तैलपाकडून मारलाहि गेला हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे ( भाग २ ). युवराजामागून गांगेयदेव हा राज्यावर आला आणि त्यानें १०१० ते १०३८ पर्यंत राज्य केलें. त्याच्या नंतर कर्णदेव हा गादीवर आला. तो हैहय कुलांतील अत्यंत सामर्थ्यवान् असा राजा होऊन गेला आणि त्यानें १०३८ पासून १०८० पर्यंत राज्य केलें. दक्षिणेंत कल्याण येथें जयसिंह ( १०१८ ते १०४० ) व सोमेश्वर ( १०४० ते १०६९ ) हे भोजाचे समकालीन राजे होत. जयसिंहानें एकदां धारेश्वर स्वारी केली आणि भोजाचा पराभव केला असें दिसतें. या गोष्टीचा उल्लेख जयसिंहाच्या शिलालेखांत केलेला आहे* ( इं. अॅ. भाग ५ पा. १५ ). गांगेयाप्रमाणेंच जयसिंहासहि भोजानें १०४० सुमारास पराभूत केलें असावें. गांगेयाच्या पराभवावरूनच माळव्यांत प्रचलित अस-

---

* मि. लेले यांचे ग्रंथांत मुद्रणदोषानें या प्रसंगाचा सन शके ९०० दिला आहे. हा शक भोजाच्या कारकीर्दीशीं विसंगत असल्यामुळें तो ९४१ म्हणजे इ. स. १०१९ असला पाहिजे.

लेली ' कहां राजा भोज और कहां गंगा तेली ' ही म्हण प्रचारांत आली असावी. (मि. लेले यांनीं मार्मिकपणें सुचविल्याप्रमाणें मुळांत या म्हणींचा संबंध तेलंगणाच्या गांगेयाशीं असावा. तेलंगण त्या वेळीं चेदींच्या राजछत्राखालीं होतें.)* हें कांहींहि असो, जयसिंहा-नंतर त्याच्या गादीवर आलेल्या सोमेश्वरानें माळव्यावर उलट स्वारी केली आणि शूर भोजाचा पुरा पराभव केला. या प्रसंगाचा उल्लेख बिल्हणानें आपल्या विक्रमांकदेवचरित्रांत केला आहे [ पा. १९१ ]. पुढें भोजानें सोमेश्वरावर स्वारी करून त्याचा पराभव केला असावा; आणि वर सांगितलेल्या उदेपूर प्रशस्तींतील उल्ले-खाचा संबंध या किंवा याच्या पूर्वीच्या पराभवाशीं असावा.

परंतु लक्षांत धरण्याजोगी गोष्ट अशी कीं, या लढायांमुळें माळवा किंवा त्याबरोबर लढत असलेलीं त्याचे भोंवतालचीं इतर राज्यें यांची सत्ता किंचितहि कमी झाली नाहीं. कारण राज्याची मर्यादा वाढ-विण्याचे लोभानें हीं युद्धें करण्यांत आलेलीं नव्हतीं. आणि शिवाय माळवा, चेदी, कर्नाट व गुजराथ हीं सर्व राज्यें सारखींच सामर्थ्य-वान् होतीं; आणि त्यांचे सर्वांचे राजेहि सारखेच कर्तृत्ववान् होते. उलट या युद्धांनीं या राजांचे व त्यांच्या सैन्याचे क्षात्रगुण संवर्धित केले. परंतु भोज मृत्यु पावण्याच्या वेळीं ( उदेपूर प्रशस्तींतील शब्द अगदीं स्पष्ट आहेत व त्याप्रमाणें भोज मृत्यु पावल्यावर, त्याच्या मृत्यूच्या अगोदर नव्हे× ) गुजराथचा भीम व चेदीचा कर्ण या दोघांनीं एकवटून माळव्यावर केलेल्या स्वारीमुळें मालवराज्यांत गोंधळ माजला, आणि त्याची सत्ता डळमळली. बिल्हणानें विक्र-

+ कर्णाला त्याच्या एका शिलालेखांत त्रिकालिंगाचा ( तेलंगणाचा ) राजा असें स्पष्ट म्हटलें आहे. (ए. इ. २ )

× तत्रादित्यप्रतापे गतवति सदनं स्वर्गिणां भर्गभक्ते ।
व्याप्ता धारेव धात्री रिपुतिमिरभरै र्मौलिलोकस्तदाभूत् ॥

मांकदेवचरितांत ( ३, ६७ ) सांगितल्याप्रमाणें भोजाचा वारस जयसिंह हा कल्याणचा राजा आहवमल्ल--सोमेश्वर याचे दरबारीं आश्रयाकरितां गेला आणि कर्नाट व माळवा यांमधील पिढीजाद वैर विसरून सोमेश्वरानें त्याला मदत केली आणि त्याचें धारचें वडिलार्जित सिंहासन त्यास परत मिळवून दिलें. त्यावेळचे हिंदुस्थानांतील राजे राज्यविस्तारासाठीं युद्धें करीत नसत हें यावरून स्पष्ट दिसून येतें. आणि या प्रसंगावरून हेंहि आणखी स्पष्ट होतें कीं, त्याकाळीं निरनिराळ्या राज्यांतील जनतेला आपल्यावर पिढीजाद राज्य करीत असलेल्या राजवंशांतीलच कोणा तरी राजानें राज्य करावें अशी इच्छा असे. भाग २ पान २२१मध्यें सांगितल्याप्रमाणें आरब ग्रंथकारांनीं ही गोष्ट नमूद करून ठेविली आहे, कीं कोणत्याहि राजानें दुसऱ्या कोणत्याहि राजांचें राज्य हस्तगत केलें असतां तो पराभूत झालेल्या राजाच्या वंशांतील कोणातरी राजपुरुषास मोकळ्या झालेल्या सिंहासनावर बसवितो. परंतु सांप्रतच्या कालविभागांत ही राष्ट्रीयत्वाची अस्पष्ट भावनाहि हळुहळू मावळत गेली. ( प्रस्तुत प्रसंगीं जयसिंहाला आपलें सिंहासन परत मिळविण्यास तिऱ्हाईत राजाचें साहाय्य घ्यावें लागलें हें आपल्यास दिसत आहे ). याच्या कारणाचें विवेचन पुढें केलें जाईल.

भोज इ. स. १०५५ पूर्वींच मृत्यु पावला असावा, कारण त्याचा पुत्र जयसिंह यानें त्याच वर्षीं धारेहून प्रसिद्ध केलेलें एक शासनपत्र उपलब्ध झालें असून ( ए. इ ३, पा. ४६ ), त्यांत जयसिंहानें आपण भोजाचा पुत्र असल्याचें स्पष्ट म्हटलें आहे. यामुळें व्हिन्सेंट स्मिथ यानें आपल्या अर्ली हिस्ट्री ऑफ इंडिया या ग्रंथाच्या तिसऱ्या आवृत्तींत ( १९१४ ) हि भोजाचा मृत्युशक इ. स. १०६० हा कसा दिला आहे हें समजत नाहीं. स्मिथनें हा शक कोणत्या आधारावर दिला आहे हें नमूद केलें

नसल्याकारणानें या शकाचें अधिक विवेचन करितां येत नाहीं.*

इ.स.१०१९(संवत १०७६)मध्यें किंवा त्याच्या पूर्वीच्या वर्षी भोजानें कोंकण जिंकलें असें त्या सालच्या त्याच्या शासनपत्रावरून स्पष्ट दिसतें (ए. इ.११).आपल्या राज्यारंभीं त्यानें कोंकणाशी युद्ध कां केलें हें समजत नाहीं ( त्यावेळीं त्याचें वय सुमारें वीस वर्षांचें असावें ). भोजानें कोंकण जिंकलें ही गोष्ट नाकबूल करतां येण्याजोगी नसली तरी तो आपल्या राज्याबाहेर इतका लांब गेला कसा हें गूढ अजून उकललेलें नाहीं. बहुधा या कोंकणच्या स्वारीची उत्पत्ति कल्याणच्या पांचव्या विक्रमादित्याच्या ( १००९–१०१८ ) लढाईतून झाली असावी. या लढाईंत क. ल्युआर्ड आणि मि. लेले यांनीं म्हटलें आहे कीं भोजानें विक्रमादित्याला कैद केलें आणि मारून टाकलें. पण विक्रमादित्याचा लढाईचा हा प्रसंग जर निःसंशय घडून आला असता तर भोजानें आपल्या लेखांत कोंकणच्या स्वारीपेक्षां त्याचाच अधिक विस्तृत उल्लेख केला असता; कारण कर्नाटच्या राजापेक्षां कोंकणचा राजा कमी महत्वाचा होता आणि खरोखरच ही लढाई झाली असेल तर ती कोंकणच्या स्वारीचे वेळीं झाली असली पाहिजे. हिंदुस्थानचा सामान्य इतिहास वाचणाऱ्या वाचकांस या लढायांचें महत्व मुळींच नसल्यामुळें त्यांच्याबद्दल अधिक विचार करण्याची आवश्यकता नाहीं.

भोजाच्या मृत्यूच्या थोडेंसें पूर्वी किंवा नंतर कर्णदेव आणि भीम यांजबरोबर झालेलें त्याचें युद्ध मात्र अतिशय महत्वाचें आहे आणि त्याबद्दलच्या उल्लेखांचें आम्ही काळजीपूर्वक परीक्षण करणार आहोंत. भीम आणि कर्ण या दोघांनीं मिळून धारेवर स्वारी केली, धार

---

*आधार करून दिसणारे तरंगिणी आणि विक्रमांकदेवचरित यांचा क. ल्युआर्ड व मि. लेले यांनीं आपल्या परमारांवरील पुस्तकांत योग्य उल्लेख केला असून त्यांतील कथांचें चांगलें विवेचन केलें आहे ( पा. २२-२३)

हस्तगत केली व भोजाला पळवून लाविलें आणि त्यांतच पुढें भोजाला मृत्यु आला अशी जी हकीगत मेरुतुंगानें सांगितली आहे त्यामुळें या बाबतींत एक विपरीत ग्रह उद्भूत झाला आहे अशी आमची समजूत आहे. या प्रबंधांतून सुप्रसिद्ध अनेक राजांविषयीं कल्पित अशा कित्येक कथा सांगितल्या जातात हें लोकविश्रुत आहे. आणि त्यामुळें या कथांचें कसून परीक्षण करणें अवश्यक आहे. मेरूतुंगानें दिलेल्या या गोष्टीला उदेपूर प्रशस्तीमधील एका श्लोकाचा आधार आहे अशी किलहॉर्न यांची प्रथम समजूत होती. परंतु पुढें नागपूर प्रशस्तींतील तश्याच धर्तीचा एक श्लोंक देतांना ही गोष्ट संभवनीय नाहीं आणि तिच्या सत्यत्वाविरुद्ध पुष्कळ प्रमाणें देतां येण्याजोगीं आहेत अशी सूचना त्यानें केली आहे. भोजासारख्या सामर्थ्यवान् व भाग्यवान् राजावर अशी स्वारी केली जावी,तींत त्याचा असा पराभव व्हावा आणि त्याचा अशा दुर्दशेंत अंत व्हावा हें आम्हांस विश्वासार्ह वाटत नाहीं. उदेपूर प्रशस्तींतील नवव्या श्लोकावर कीलहॉर्ननें अशी टीका केली आहे कीं, "शेवटीं भोज हा आपल्या शत्रूंच्या तडाक्यांत सांपडला हें या चरणांत कबूल केलें आहे." परंतु हें म्हणणें चुकीचें आहे. कारण या चरणांत फक्त इतकेंच म्हठलें आहे कीं भोजानें इहलोक सोडल्या **नंतर** धारा ही अंधःकारांत लुप्त झाली (आदित्याप्रमाणें प्रतापवान् आणि शिवभक्त असा भोज राजा स्वर्गाला गेल्यानंतर).× त्याचप्रमाणें नागपूर प्रशास्ति प्रसिद्ध करितांना भोजाचा अंत अमंगल असा झाला असें कीलहॉर्ननें म्हटलें आहे; परंतु पुढें त्यांस मेरुतुंगाची हकीकत सर्वस्वी विश्वसनीय वाटली नाहीं. नागपूर प्रशस्तींतील शब्दरचनेवरूनहि भोजाचा अंत शोचनीय झाला असें दिसत नाहीं. "भोज हा इंद्राच्या बंधुते प्रत

---

× तत्रादित्यप्रतापे गतवति सदनं स्वर्गिणां भर्गभक्ते ।

पावला असतां ( मेला असतां) व राज्य विपद्ग्रस्त झालें असतां "+ या वाक्यावरून भोज शांतपणें मरण पावला आणि त्यानंतरच आपत्तींचा प्रादुर्भाव झाला असें दिसून येतें. या कोणत्याहि लेखांत भोज मृत्यु पावण्याच्या वेळीं दुःखाचा काल प्राप्त झाला असें म्हटलेलें नाहीं. आणि यावरून हें स्पष्ट दिसून येतें कीं भोज मृत्यु पावल्यानंतरच भोजाच्या शत्रूंस माळव्यावर स्वारी करण्यास ही संधि आहे असें वाटलें. भोजानंतर त्याच्या गादीवर आलेला त्याचा पुत्र जयसिंह याचा अंत मात्र अशुभ तऱ्हेनें झाला. त्याचा उल्लेख पुढें येईलच. भोजाचा अंत शोचनीय झाला असे मेरुतुंगानें जें म्हटलें आहे त्यास नागपूर किंवा उदेपूर प्रशस्तींतील कांहीं आधार नाहीं. दुर्दैवानें सर व्हिन्सेंट स्मिथ यांच्या तिसऱ्या आवृत्तींत ही गोष्ट तशीच ठेवण्यांत आली आहे; आणि त्यामुळें ती येथें खोडून काढणें अवश्य झालें आहे. मेरुतुंगानें दिलेली ही हकीकत कशी बनावट आहे हें दाखविण्यास आणखीहि प्रमाणें आहेत. भोजासारख्या सुप्रसिद्ध राजावर केलेल्या या काल्पनिक यशस्वी स्वारीचा उल्लेख चेदी हैहयांच्या कोणत्याहि लेखांत नाहीं. इतकेंच नव्हे तर भीमाच्या या विक्रमाचा उल्लेख गुजराथ चालुक्यांच्या लेखांतहि कोठें आढळत नाहीं. वास्तविक त्यांच्या कित्येक लेखांत भीमाच्या नांवामागें कोणतेंहि विशेषण लावलेलें नाहीं; परंतु जयसिंह सिद्धराजाचें वर्णन सर्वदा अवंतिनाथाचा जेता या शब्दांनीं केलेलें आहे. जर खरोखरच भीमानें भोजाचा पराभव केला असता तर अवंतिराजापैकीं एखाद्या लहानशा राजावर जयसिंहानें मिळविलेल्या विजयापेक्षां भीमाच्या यशस्वी कारकीर्दीस अत्यंत उज्वलता आणणारा हा पराक्रम खास अधिक महत्वाचा मानला गेला असता. दुसरें, नागपूर प्रशस्तींत भोजाच्या मृत्यूनंतर धारेवर ज्या स्वाऱ्या झाल्या म्हणून

---

\+ तस्मिन्वासवबन्धुतामुपगते राज्ये च कुल्याकुले॥

म्हटलें आहे त्यांत भीमाचा उल्लेखहि नाहीं. त्यांत चेदी कर्ण आणि कर्नाटचा राजा यांचा उल्लेख आहे. ते दोघे एकत्र झाले असावेत किंवा माळव्या वरील प्रभुत्वाबद्दल दोघांत चढाओढ सुरू झाली असावी, या मुद्याचें विवेचन आम्ही पुढें करूं. परंतु नागपूरप्रशस्तींत भीमाचा उल्लेख नसल्यामुळें गुजराथच्या राजांच्या पराक्रमाची कल्पित वर्णनें देऊन बहुधा त्यांना खूष करण्यासाठीं ग्रंथ लिहिणाऱ्या मेरुतुंगावरील विश्वास उडावयास ही एकच गोष्ट पुरेशी आहे. सारांश आमची अशी खात्री आहे कीं भोजाचा अंत शांतपणें झाला आणि त्याच्या मृत्यूनंतर शत्रूनीं धारेवर स्वारी केली.

याच प्रसंगाशीं जोडला गेलेला दुसरा असा एक गैरसमज आहे कीं भोज पराभूत होऊन मृत्यु पावल्यानंतर जी अराजकता माजली ती नाहींशी करण्याला गाहडवाल राजा चंद्रदेव यानें मदत केली; नव्हे त्यानेंच ती मोडून काढली. या गैरसमजाचा उगम गाहडवाल राजा चंद्रदेव याचा दोन शासनपत्रांतील त्याच्या स्तुतिपर असलेल्या चरणांचा अर्थ लावण्यांत आहे. मदनपालाच्या शासनपत्रांत ( इ. अँ. १४ पा. १०३ ) भोजाचा स्पष्ट उल्लेख आहे. परंतु भोजाचा मृत्यु किंवा त्या मृत्यूनंतर माजलेली अस्वस्थता यांच्यांशीं गाहडवाल राजा चंद्र याचा कांहीं संबंध होता अशा अर्थी ते चरण लावितां येणार नाहींत. त्याचप्रमाणें दुसऱ्या लेखांतूनहि हा अर्थ काढतां येणार नाहीं ( इं. अॅं. १८ पा. ११. त्या चरणांचा वाजवी अर्थ काय होतो हें आम्ही पुढें लवकरच दाखविणार आहोंत ). तसेंच चंद्रदेवाच्या उत्कर्षाचा काल हा भोजाच्या मृत्युकालाशीं ( स. १०५५ सुमार ) जुळत नाहीं. त्याचा उत्कर्ष पुढें पुष्कळ वर्षांनीं इ. १०८० च्या सुमारास झाला. शिवाय चंद्राच्या मदतीची आवश्यकताच नव्हती. कारण चेदीच्या कर्णदेवानें स्वारी करून अस्वस्थता माजविली असली तरी ल्युआर्ड व लेले यांनीं आपल्या पुस्तकांचें पान

१५ वर म्हटल्याप्रमाणें कर्नाटकाचा राजा सोमेश्वर यानें परमार राजाचें मित्रत्व केलें. (पा २७ वर भोजाचे मागून जयसिंह यास कर्ण व भीम यांनींच सिंहासनावर बसविलें असा अगदीं विरुद्ध उल्लेख यांत आहे ). प्रबंधकारांनीं पुष्कळ काल्पनिक गोष्टी घुसडल्या आहेत; परंतु त्यांनीं देखील गाहडवाल ( किंवा राठोड ) राजा चंद्रदेव याचा कोठें उल्लेख केलेला नाहीं. आणि आपल्याला असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं कीं, हा सर्व गैरसमज वर सांगितलेल्या दोन चरणांचा चुकीचा अर्थ लाविल्यामुळें उत्पन्न झालेला आहे.

हिंदुस्थानच्या वृत्तांतांत ज्यांनीं चिरस्थायी कीर्ति संपादन केली आहे अशा विख्यात राजांत भोजाची गणना प्रामुख्यानें केली पाहिजे. तो आपल्या मालव देशाचा स्वतंत्र राजा होता इतकेंच नव्हे तर त्याची सत्ता सर्व हिंदुस्थानभर मान्य केली जात होती. या गोष्टींचें रहस्य अद्याप पुरतेपणी ओळखिलें गेलें नाहीं. ' तो हिमालयापासून रामाच्या सेतूपर्यंत राज्य करीत होता ' असें उदेपूर प्रशस्तींत जें म्हटलें आहे, तें शब्दशःच पाहूं गेलें तर मिथ्या आहे यांत संशय नाहीं. परंतु पुरातन कालीं सार्वभौमत्वाच्या कल्पनेंत इतर राज्यांत प्रत्यक्ष अंमल बसविण्याच्या पद्धतीचा अंतर्भाव होत नसे. सार्वभौमत्व हें फक्त इतर राजांनीं एखाद्या राजाची सत्ता कबूल केली होती इतकेंच दर्शवीत असे. अशा तऱ्हेची स्तुति त्याच मात्र राजघराण्यांतील शिलालेखांत केली असल्यास ती आश्रित भाटांनीं केलेल्या अतिशयोक्ती--पलीकडे मानली जाणार नाहीं. परंतु अशा तऱ्हेची स्तुति जेव्हां इतर राजघराण्यांतील लेखांतून केलेली आढळते तेव्हां ती सत्यावर उभारलेली आहे हें कबूल केलें पाहिजे. या रीतीनें सार्वभौम गाहडवालांच्या लेखांवरून या स्तुतीचें दृढीकरण झालेलें आपल्याला आढळून येतें. मदनपाल आणि गोविंदचंद्र यांच्या शासन

पत्रांतील ज्या दोन श्लोकांचा अर्थ चुकीनें लावला जातो असें वर सांगितलें आहे त्याच चरणांत भोजाला हिंदुस्थानचा सार्वभौम राजा असें मानण्यांत येत असे याचा पुरावा सांपडतो. दुसऱ्या शासन-पत्रांतील श्लोकांत (इं. अॅ. १४ पा. १०३) असे म्हटलें आहे कीं* ‘ जेव्हां श्रीभोजभूप हा देववधूंच्या नेत्रांचा पाहुणचार मिळविता झाला, व जेव्हां श्रीकर्ण हा कीर्तिशेष झाला आणि भूमि त्रस्त झाली तेव्हां भूमीनें राजा चंद्रदेवाला प्रेमानें आपला पति म्हणून वरिलें व त्राताम्हणून त्याच्या वर तिनें विश्वास टाकला. ’ यावरून असें स्पष्ट दिसून येतें कीं, पृथ्वीवर ( हिंदुस्थानच्या भूमीवर ) चंद्रदेवापूर्वीं होऊन गेलेले सम्राट् पदाची सत्ता धारण करणारे विख्यात दोन राजे भोज व कर्ण हे होते. हा भोज, प्रतिहार सार्वभौम घराण्यांतील भोज नव्हे. कारण तो भोज ( ८४०–८९० ) कधींच मृत झाला होता ( भाग २ पा. १३३ पहा ). हा भोज १०५५ इ. स. मध्यें मृत्यु पावलेला माळव्याचा भोजच असला पाहिजे. या श्लोकांत ज्या कर्णाचा उल्लेख आला आहे तो १०६३ ते १०९३ पर्यंत राज्य करणारा अनहिलवाडच्या चालुक्यापैकीं कर्णदेव असावा किंवा चेदींचा राजा गांयेयदेव याचा पुत्र कर्ण हा असावा. कर्णाच्या मृत्यूनंतर सार्व-भौमत्व चंद्रदेवाकडे आलें असें म्हटलें असल्यामुळें तो चालुक्य कर्णदेव नसावा असा संशय उत्पन्न होतो. गुजराथचा कर्ण ११ व्या शत-काच्या दहाव्या दशकांत मृत झाला असावा असें दिसतें. आणि त्याचा उत्तराधिकारी जो जयसिंह सिद्धराज त्याच्याप्रमाणें, कर्णाचे

---

*याते श्रीभोजभूपे विबुधवरवधूनेत्रसीमातिथित्वं ।
श्रीकर्णे कीर्तिशेषं गतवति च नृपे क्ष्मात्यये जायमाने ॥
भर्तारं यं धरित्री त्रिदिवविभुनिभं प्रीतियोगादुपेता ।
त्राता विश्वासपूर्वं समभवदिह स क्ष्मापतिश्चंद्रदेवः ॥

स्तुतीनें भरलेलें वर्णन केलेलें आढळत नाहीं. चेदीचा कर्ण हा जरी आपल्या कुलांतील अत्यंत सामर्थ्यवान् राजा होता व भोजाच्या मृत्यूनंतर त्यानें माळवा काबीज केला असला तरी त्यानें पुष्कळ वर्षें राज्य उपभोगिलें आणि चंद्रदेव हा सन १०८०च्या सुमारास उत्कर्षास चढूं लागला त्या वेळीं तो हयातहि होता. त्या श्लोकांत असें म्हटलें आहे कीं कर्ण मेल्यानंतर चंद्रदेवाला सार्वभौमत्वाचा मान मिळाला, तेव्हां हा चंद्रदेवाच्या उदयाचे वेळीं मृत झालेला सम्राट् कर्ण कोणता हें निश्चित करणें जरा कठिण आहे. हा कर्ण कोणता या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर कसेंहि दिलें तरी येवढें मात्र खास कीं या श्लोकाचा संबंध माळव्याशीं नाहीं; कारण माळव्यानें चंद्रदेवाला आपला राजा म्हणून कधींच मान्य केलें नाहीं. भोज, कर्ण आणि चंद्र हे तिन्ही राजे माळवा, चेदी आणि कनोज या निरनिराळ्या राज्यांत राज्य करीत होते. श्लोकांत जो उल्लेख आहे तो फक्त अखिल हिंदुस्थानांतील सार्वभौमत्वाचा असून तो अगदीं स्पष्ट आहे. ‘ क्षमात्यये ’ या शब्दानें सूचित केलेला उपद्रव आणि गाहडवालांच्या पहिल्या लेखांतील श्लोकांत स्थूलतः वर्णिलेला उपद्रव ह्यांत कोणतेंच अंतर नाहीं ( ए. इ १८ पा. ११ ). त्या श्लोकाचें भाषांतर असें होईल.* “ राजा चंद्रदेवानें उद्धट आणि धीर अशा योध रूपी तिमिराचा नाश केला आणि आपल्या विक्रमानें सर्व प्रजांचा उपद्रव शमवून टाकिला. ” क्रूर तुर्कांच्या स्वाऱ्यांनीं सर्व हिंदु प्रजांना दिलेल्या उपद्रवाचा यांत स्पष्ट उल्लेख आहे. वस्तुतः भोजानेंहि हा उपद्रव कमी करण्याचें कामांत आपलें सामर्थ्य उपयोगांत

* तस्यासीत्तनयो नयैकरसिकः क्रान्तद्विषन्मडलो ।
विध्वस्तोद्धतधीरयोधतिमिरः श्रीचंद्रदेवो नृपः
येनोदारतरप्रतापशमिताशेषप्रजोपद्रवं ।
श्रीमद्गाधिपुराधिराज्यमसमं दोर्विक्रमेणार्जितम् ॥

आणलें होतें; आणि म्हणूनच अशा संकटाचें निरसन करणारा पहिला सार्वभौम राजा म्हणून त्याची कीर्ति राहिली होती. भोजाची कारकीर्द १०५५ त संपली. त्याच्या नंतर हा अधिकार चेदींच्या कर्णाकडे गेला. परकीयांचा जुलूम नाहींसा करण्याचें हें काम कर्णानंतर चंद्रदेवावर पडलें. आम्ही कनोजच्या वृत्तान्तांत हे पुढें दाखविणार आहों कीं चंद्रदेवानें याच हेतूनें कनोजच्या सार्वभौमाच्या सिंहासनावरून तेथील दुर्बल प्रतिहार राजास काढलें आणि तेथें आपल्या घराण्याची स्थापना केली. या दृष्टीनें पाहिलें असतां उदेपूर प्रशस्तींत भोजाची हिंदुस्थानचा सार्वभौम म्हणून जी स्तुति केली आहे ती अतिशयोक्तीची दिसत नाहीं. शिवाय गाहडवालांच्या या लेखाचाहि तिला प्रत्यंतर पुरावा आहे. हीच दृष्टि कायम ठेविली तर उदेपूर प्रशस्तींतील दुसऱ्या श्लोकाच्या अर्थावरहि एक नवीनच उजेड पडतो. त्या श्लोकांत 'भोजानें गुर्जरांच्या राजाला जिंकलें' असा उल्लेख आहे. हा राजा हल्लीं आपण ज्याला गुजराथ समजतो त्या गुजराथ प्रान्ताचा राजा भीम नसून त्या काळच्या इतर राजांच्या लेखांत ज्यांचा गुर्जर राजे म्हणून निर्देश केला जातो, (भा. २ पा. ९८, १६३), त्यापैकीं म्हणजे कनोजच्या प्रतिहार राजांपैकीं कोणीतरी असला पाहिजे. वास्तविक पाहतां सांप्रतच्या गुजराथला गुजराथ हें नांव इ. स. च्या ११ व्या शतकाच्या शेवटीं मिळालें हें आम्ही पुढें स्पष्ट करून दाखविणार आहों. या श्लोकांतील गुर्जर या शब्दानें बहुशा दुर्बल होऊन तुर्कांचे मांडलिक आणि मित्र बनलेल्या कनोजच्या प्रतिहार राजांचा निर्देश होत असावा. तेव्हां भोजानें पूर्वेस नुसत्या गांगेयदेवाचाच पराभव केला असें नव्हे तर राज्यपालानंतर कनोजच्या गादीवर आलेल्या दुर्बल प्रतिहार राजांचा आणि त्याच्या मदतीस आलेल्या तुर्कांचाहि पराभव केला असावा असा संभव आहे. अशा प्रकारें त्यानें परकीय व

विधर्मी तुर्कांच्या संकटांतून उत्तर हिंदुस्थानची सर्व भूमि मोकळी केली. या श्लोकांत असें म्हटलें आहे कीं भोजानें पाठविलेल्या केवळ सैन्यानें किंवा सेनापतीनें त्या राजांचा पराभव केला. भोजानें आपलें सैन्य उत्तरेस पंजाब आणि दिल्लीपर्यंत पाठविलें असावें हें अत्यंत संभवनीय आहे. सर व्हिन्सेंट स्मिथनें ज्या समुद्रगुप्ताशीं भोजाची तुलना केली आहे त्या समुद्रगुप्ताप्रमाणें जरी भोजानें सर्व पृथ्वीचा दिग्विजय करण्याचा उपक्रम केला नाहीं, तरी सर्व देशभर त्याची सत्ता प्रस्थापित झाली होती किंवा मान्य झाली होती. आणि यामुळें उदेपूरप्रशस्तींत वर्णिल्याप्रमाणें हिंदुस्थानच्या चारी दिशांस सोमनाथ, रामेश्वर, सुंडीर ( पूर्व किनाऱ्यावर ) आणि केदार सारख्या दूरदूरच्या ठिकाणीं त्याला शिवाची देवालयें बांधतां आलीं. त्यानें आपल्या स्वतःच्या राज्यांत महाकालाचें देवालय बांधलें याचा निर्देश करणें नको व त्यांत महत्त्व नाहीं. परंतु ज्या शिवाचा तो धर्मनिष्ठ भक्त होती त्याचीं देवालयें इतक्या दूर दुसऱ्यांच्या राज्यांत त्याला बांधतां आलीं यावरून त्याचें सार्वभौमत्त्व, वैभव आणि कर्तृत्व यांचा पुरावा मिळतो. या ठिकाणीं हिंदुस्थानांतील सर्व तीर्थक्षेत्रांत अशाच तऱ्हेनें देवालयें आणि घाट बांधणाऱ्या, अलिकडील काळां-तील पुण्यश्लोक माळव्यांतीलच राणी देवी अहिल्याबाई, हिच्यांहि सत्तेची, वैभवाची व कर्तृत्वाची आठवण झाल्याखेरीज रहात नाहीं. मल्हाररावानें इतर राज्यांतून लुटून आणलेल्या अगणित संपत्तीचा जी ठेव अहिल्याबाईला लाधली तींतून तिनें निरनिराळ्या क्षेत्रांतील पुण्यस्थानें बांधलीं. भोजानेंहि बहुधा तसेंच केलें असावें. अनहिल-वाडच्या व इतर राज्यांत त्याच्या सेनापतींनीं जी लूट केली ती खर्-चून त्यानें सर्व हिंदुस्थानभर हा धर्मादाय केला असावा. आपल्या समकालीन महमुदाप्रमाणें भोजानें केवळ हांव म्हणून किंवा विष-योपभोगाच्या आसक्तीनें लूट करून द्रव्य सांचविलें नाहीं. स

हिंदुस्थानभर ज्यानें आपली कीर्ति दुमदुमत राहील अशीं पुण्यप्रद देवालयें बांधण्यांत त्यानें तें वेंचून टाकलें. दूरच्या काश्मिरांत देखील, जेथें त्याची सत्ता कोणी कबूल केली नव्हती तेथें, त्यानें आपल्या खर्चानें एक पुण्यकुण्ड बांधलें आणि त्या देशांत आपलें नांव करून ठेवलें.* भोजाच्या थोर कीर्तीस आणि विमलयशास मान देऊनच काश्मीरच्या तत्कालीन राजानें बहुधा हा तलाव बांधूं दिला असावा. पण महमुदाप्रमाणें भोजानें अनेक देश लुटल्याचा उल्लेख इतिहासांत मुळींच सांपडत नाहीं; तेव्हां अशी कल्पना करावयास हरकत नाहीं कीं भोजाची संपत्ति त्याच्याच देशांत उत्पन्न झालेली असावी. त्याच्या कारकीर्दींत माळवा अत्यंत भरभराटींत असावा असें दिसतें. त्याचा राज्यकारभार इतका उत्तम होता कीं त्याच्या राज्याचें उत्पन्न फार मोठें असूनहि प्रजेवर कराचा बोजा फारसा पडत नसे. त्याची ही विपुल संपत्ति त्याच्या देशाची भरभराट व त्याच्या राज्यकारभाराची सुव्यवस्था आणि सुखप्रदता यांची साक्ष पटविते.

भोज हा जसा प्रसिद्ध ग्रंथकार होता तसाच तो विद्वज्जनांचें विख्यात आश्रयस्थान होता. भोज हा विद्वान् लोकांचे बाबतींत अतिशय उदार असे. कदाचित् त्यानें कवींना दिलेल्या उदार देणग्यांच्या कथा अतिशयोक्तीच्या असतील. कोणत्याहि कवीनें एकहि जरी नवीन आणि सुंदर श्लोक आणला तरी त्यास भोज एक लाख रुपये देत असे

---

* कल्हणानें राजतरंगिणीमध्यें याबद्दल एक सरस गोष्ट सांगितली आहे. तो म्हणतो माळव्याच्या भोजानें असा नेम केला होता कीं काश्मीरांतील पापसूदन तीर्थाच्या पाण्यानें दररोज प्रातः काळीं मुखप्रक्षालन करावयाचें. पद्मराज नांवाचा काश्मीरच्या राजाच्या मर्जींतला एक सरदार या तीर्थाचें पाणी कांचेच्या भांड्यांत भरून भोजाकडे नेहमीं पाठवीत असे व अशा तऱ्हेनें त्यानें भोजाचा हा नेम पार पाडला.

असें त्यांत सांगितलें आहे. तथापि त्याचा समकालीन जो महमूद त्याच्यांत व भोजांत या बाबतींत मोठें अंतर आहे. महमुदाची वागणूक याच्या अगदीं विरुद्ध होती. या गोष्टी जरी कथालेखकांच्या अतिशयोक्तीनें भरलेल्या आहेत असें म्हटलें तरी विद्वज्जनांना त्यानें दाखविलेल्या अनुपम उदारतेबद्दल संशय नाहीं. त्याचे राजवैभव किंवा त्यानें बांधविलेलीं विशाल मंदिरें आज अस्तित्वांत नाहींत; किंबहुना त्यांची स्मृतिहि आज शिल्लक उरलेली नाहीं. परंतु त्याच्या ह्या उदारतेनें मात्र त्याची कीर्ति अजरामर केली आहे. त्याच्या दरबारांत कोणी जुना अथवा नवा कालिदास होता असा आमचा विश्वास नाहीं. ही केवळ कथालेखकांची कल्पना असावी; किंवा नवसाहसांकचरिताचा कर्ता आणि भोजाच्या बापाचा राजकवि पद्मगुप्त यालाच कालिदास ही पदवी देण्यात आली असावी. धनपाल नांवाच्या दुसऱ्या कवीचाहि भोजाबरोबर उल्लेख केला जातो. वडनगरचा विद्वान् ऊबट यानें आपली बाजसनेयि संहितेवरील टीका भोजाचे कारकीर्दीतच उज्जयनींत लिहिली (ल्युआर्ड व लेले पा. २१). भोजाचे दरबारांत दुसरेहि पुष्कळ विद्वान् लोक असले पाहिजेत, परंतु त्यांचीं नांवें अजून माहित झालेलीं नाहींत.

सारांश भोजाची कितीहि स्तुति केली तरी थोडीच आहे. त्याची हिंदुस्थानांतील अत्यंत विख्यात राजांत गणना करावयास हरकत नाहीं. इतर देशांतील शिलालेखांनींहि त्याला कविराज आणि मालवचक्रवर्ती असें म्हटलें आहे तें यथायोग्य आहे.* तो माळव्याचा सार्वभौम राजा होता. ( चक्रवर्ती या विशेषणाचा अर्थ आम्ही पुढें विशद करणार आहों ). त्याचा महिमा वर्णन करावयाचा अत्यन्त

---

* क्षिप्रं मालवचक्रवर्तिनगरी धारेति को विस्मयः ॥

( ए. इ. १ पा. २९७ गुजराथच्या चालुक्याची वडनगर प्रशस्ती.)

सुंदर व संक्षिप्त मार्ग म्हटला म्हणजे उदेपूर प्रशस्तींत केलेल्या त्याच्या वर्णनाचा अनुवाद करणें हाच होय. 'ज्याप्रमाणें अन्य कोणाहि राजास करतां आलें नाहीं असें भोजानें राज्य केलें, आज्ञा केल्या, दानें दिलीं आणि शास्त्रें जाणली '.* या एका लहानशा वाक्यांत त्यानें सर्व हिंदुस्थानभर केलेल्या भव्य बांधकामाचा, त्याच्या सार्वभौम सत्तेचा, कवि आणि विद्वान लोक यांना दिलेल्या उदार देणग्यांचा आणि त्याच्या विशाल ज्ञानाचा आणि विविध विषयांच्या अध्ययनाचा उल्लेख सरस रीतीनें केला आहे.

---

* शासितं विहितं ज्ञातं दत्तं तद्यन्न केनस्वित् ।
किमन्यत्कविराजस्य श्रीभोजस्य प्रशस्यते ॥
( ए. इं. १ पा. २२ )

# प्रकरण चौथें.

## भोजानंतरचे परमार राजे.

भोज हा केवळ माळव्यांतील परमार राजांतच नव्हे तर हिंदुस्थानांतील सर्व हिंदुराजांतहि निःसंशय अत्यंत श्रेष्ठ असा राजा असल्यामुळें त्याचा वृत्तांत इतका सविस्तर देण्यांत आला आहे. माळव्याचें परमार राजघराणें भोजाच्या अमदानींत वैभवाच्या शिखराला पोंचल्यामुळें स्वाभाविकपणेंच त्याला भोजानंतर उतरतीकळा लागली. त्याचा मुलगा जयसिंह याची कारकीर्द आपत्तींत गेली आणि बहुधा ती कारकीर्द अल्प काळच टिकली असावी. चेदींचा राजा कर्ण यानें भोजाच्या मृत्यूनंतर थोड्या अवधींतच जयसिंहाला हांकून लावल्यानंतर तो आहवमल्ल सोमेश्वराकडे आश्रयासाठीं गेला आणि सोमेश्वराच्या आज्ञेवरून त्याचा पुत्र विक्रमादित्य यानें जयसिंहाला त्याच्या घराण्यांत पूर्वापार चालत आलेल्या माळव्याच्या सिंहासनावर बसविलें असावें, असें राज्यावर आल्यावर जयसिंहानें १०५६ सालीं धारेहून काढलेल्या शासनपत्रावरून दिसतें. त्यानें अमरेश्वरच्या ब्राह्मणांना पूरणक पट्टकांतील ( पुर्णासा ) नर्मदेच्या तीरावरील मान्धाता हा गांव दान केला. त्याची कारकीर्द अल्प काळांतच संपल्यामुळें, त्याला दुसऱ्यांच्या मदतीनें आपलें राज्य परत मिळवावें लागल्यामुळें आणि कदाचित् पुनःहि हांकून लावलें असल्यामुळें उदेपूर आणि नागपूर येथील परमारांच्या ज्या दोन महत्त्वाच्या प्रशस्ति आहेत त्यांत त्याच्या नांवाचा उल्लेख नाहीं. जयसिंहाच्या कारकीर्दींत माजलेल्या गोंधळांतून एका उदयादित्यानें आपल्या पराक्रमानें माळ-

त्याची सुटका केली.* हा उदयादित्य भोजाचा आप्त होता एवढाच उल्लेख आहे. त्याचें व भोजाचें नातें कोणत्या प्रकारचें होतें याचा उल्लेख केलेला नाहीं व त्याचा अजून शोध लागलेला नाहीं. उदयादित्य राज्यावर आल्यापासून माळव्याच्या राज्याच्या दुसऱ्या वैभवकालाला सुरुवात झाली; परंतु तो मुंज आणि भोजाच्या कालाइतका दैदीप्यमान झाला नाहीं. हा वैभवाचा काल मुसलमानांचा अंमल वसेतों सुमारें दोनशें वर्षें टिकला. उदयादित्य हा सामर्थ्यवान् होता आणि त्याच्यांत त्याच्या पूर्वजांची विद्याभिरुचिहि होती. भोजाप्रमाणेंच त्यानेंहि पुष्कळ बांधकामें केलीं. त्यानें आपल्या नांवानें बसविलेल्या उदेपूर शहरीं शिवाचें भव्य देवालय बांधलें आहे तें त्याच्या वैभवाची आणि कौशल्याची साक्ष अद्याप पटवीत आहे. नागपूर व उदेपूर प्रशस्तींतील उदयादित्याबद्दलचा उल्लेखांवरून त्यानें आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें माळव्याचें राज्य परत मिळविलें; कोणा परक्या राजाचें सहाय्य घेतलें नाहीं असें स्पष्ट दिसतें. नागपूर प्रशस्तींत तर कर्णाट राजाचा उल्लेख माळव्याच्या शत्रूंचा साहाय्यक म्हणून केला आहे; मित्र म्हणून नाहीं.

तस्मिन्वासवबन्धुतामुपगते राज्ये च कुल्याकुले ।
मग्नस्वामिनि तस्य बंधुरुदयादित्योऽभवद्भूपतिः ॥
येनोध्दृत्य महार्णवोपममिलत्कर्णाटकर्णप्रभु-।
त्युर्वीपालकदर्थितां भुवमिमां श्रीमद्वराहायितम् ॥

---

* बिल्हणाच्या काव्यात एका श्लोकावरून क. ल्युवार्ड व लेले यांनीं असें विधान केलें आहे कीं, धार परत मिळविण्याच्या कामीं कल्याणचा चालुक्यराजा ६ वा विक्रमादित्य यानें उदयादित्य राजास मदत केली. आमच्या मतें हें त्यांचें विधान चुकीचें आहे. मौज ही आहे कीं, त्यांनीं याच गोष्टीचा उल्लेख पुनः एकदां १५ व्या पानांतहि केला आहे.

येथें कीलहॉर्ननें प्रभुमुर्वी असा पाठ दिला आहे पण आम्ही त्या ऐवजीं प्रभृत्युर्वी असा घातला आहे. प्र पुढील नष्ट झालेलें अक्षर भु असें वाचलें असतां त्या शब्दाला अर्थहि येत नाहीं व तो अशुद्धहि होतो ). या श्लोकाचें भाषांतर असें होईल कीं, "जेव्हां तो ( भोज ) इंद्राच्या बन्धुतेप्रत गेला ( मेला ) व राज्यांत त्रास उत्पन्न झाला, आणि राज्याचा स्वामी निमग्न झाला, तेव्हां भोजाचा भाऊबंद उदयादित्य राजा झाला आणि त्यानें कर्ण—कर्णाट प्रभृति राजांनीं संयुक्त झालेल्या समुद्रांप्रमाणें त्रस्त केलेल्या भूमीला वराहाप्रमाणें उचलून धरली." येथें आपल्याला स्पष्ट दिसून येतें कीं कर्णाट राजाचा उल्लेख शत्रु म्हणून केला आहे. पहिल्यापासून या प्रसंगाचा यथायोग्य बोधच झालेला नाहीं. किलहॉर्ननें अशी कल्पना प्रचलित केली कीं भोजाचे स्वतःचेच शेवटचे दिवस त्रासांत गेले. या श्लोकांत भोज मेला असतां असे शब्द वापरले आहेत त्यावरून व नागपूर प्रशस्तीतील शब्दप्रयोगावरून त्रास उत्पन्न झाला तो भोज मेल्यानंतर हें उघड आहे. गांगेयाच्या भोजानें केलेल्या पराभवानें चेदींचे मलीन झालेलें यश उज्वल करावयास ही संधि बरी आहे असें मनांत आणून गांगेयाचा पुत्र कर्ण यानें भोज मेल्यानंतर स्वारी केली असावी व तिच्यामुळें हा त्रास उत्पन्न झाला असावा. भोजाचा मुलगा जयसिंह हा दुर्बळ असल्यामुळें पळून गेला आणि कल्याणला जाऊन सोमेश्वराच्या आश्रयास राहिला. सोमेश्वरानें आपलें पिढीजाद वैर विसरून आणि कदाचित् चेदींच्या वाढत्या सामर्थ्याला आळा बसावा म्हणून त्याला मदत केली; आणि माळव्याच्या सिंहासनावर त्यास बसविलें. विक्रमांकदेवचरित सर्ग ३ मधील श्लोकाचा संबंध भोजपुत्र जयसिंह यास सोमेश्वरानें सिंहासनावर बसविण्याशीं असला पाहिजे. दुर्दैवानें त्या श्लोकांत मालव राजाचें नांव दिलेलें नाहीं ( स मालवेन्दुं शरणं प्रविष्टमकटके स्था-

पयति स्म राज्ये-विक्रम ३). परंतु हा राजा भोज किंवा उदयादित्यहि असूं शकणार नाहीं. कर्णानें पुनः स्वारी करून दुर्बल जयसिंहास पुनः पळवून लावलें असावें. यानंतर त्या हतभागी राजाबद्दल कांहींच ऐकूं येत नाहीं ( नागपूर लेखांतील 'मग्ने स्वामिनि ' या शब्दांनीं हीच गोष्ट सुचविली जाते ). दक्षिण आणि उत्तर कडील सैन्यांनीं माळव्यांत समुद्रांप्रमाणें एकवटून राज्य बुडवून टाकलें आणि त्या संकटांतून आपल्या स्वतःच्या शौर्यानें देशाचें उदयादित्यानें रक्षण केलें. ( ए. इं. ९ पा. १०८ पहाः—महाकलहकल्पान्ते यस्योद्दामभिराशुगैः । कति नोन्मूलितास्तुङ्गा भूभृतःकटकोल्बणाः ॥). मेरुतुंगानें हा घोटाळा सुरू केला; परंतु तत्कालीन शिलालेख आणि बिल्हणाचें विक्रमांकचरित योग्य रीतीनें लावलें असतां त्याचें म्हणणें असत्य व काल्पनिक आहे हें पूर्णपणें सिद्ध होतें.

उदेपूरच्या देवालया इतकें उत्तुंग शिखर सर्व हिंदुस्थानांत कोठेंहि नाहीं आणि मध्यें चुना किंवा दुसरें कांहींहि न घालतां त्याच्या शिला एकमेकींवर अढळ बसविलेल्या आहेत. म्हणजे त्यांच्या घडणीच्या कौशल्यामुळेंच त्या एकमेकींत घट्ट बसलेल्या आहेत. या देवालयांत परमार राजाचें कित्येक शिलालेख आहेत; हें देवालय म्हणजे परमारांच्या कुलक्रमागत कीर्तीचें संग्रहालयच आहे. या शिलालेखांतील सर्वांत जुने दोन शिलालेख उदयादित्याचे स्वतःचे आहेत. त्यांवरून या देवालयाच्या बांधकामास सन १०५९ मध्यें सुरुवात झाली व तें १०८० मध्यें संपलें असें दिसतें ( ल्युआर्ड व लेले पा. २९ ). या राजाची कारकीर्द दीर्घकालीन झाली. त्यानें १०५६ तें १०८१ इ. स. पर्यंत राज्य केलें. त्याच्यानंतर त्याचा मुलगा लक्ष्मणदेव हा गादीवर आला. तो शूर योद्धा व प्रसिद्ध विद्वान् होता. नागपूर प्रशस्तींत त्याच्या स्तुतीचे पुष्कळ श्लोक असून त्याचा सर्वांत अधिक गौरव

केलला आहे. त्यांत त्याच्या दिग्विजयाचेंहि वर्णन केलें आहे. या दिग्विजयास त्यानें गौड राज्यापासून सुरुवात केली, व नंतर चेदि, चोल, पांडय, सिंहलद्वीपचें राज्य व इतर राज्यें यांचेवर विजय मिळवून शेवटीं वंक्षु ( ऑक्सस् ) नदीवरील तुरुष्क आणि हिमालयांतील कीर राजा यांचेवर विजय मिळवून आपला दिग्विजय पुरा केला असा या प्रशस्तींत उल्लेख आहे. ( नेहमीप्रमाणें त्यांत 'कीर' शब्दावर श्लेष केला आहे, व कीर राजानें पिंजऱ्यांतील पोपटाप्रमाणें गाऊन लक्ष्मणदेवाची स्तुति केली असें वर्णन केलें आहे ). हा लेख त्याच्यामागून त्याच्या सिंहासनावर आलेला त्याचा धाकटा भाऊ नरवर्मा यानें लिहिला असून त्यांत निःसंशय शिलालेखांत सहज दिसून येणारी अतिशयोक्ति आहे. हा राजा ( नरवर्मा ) उत्कृष्ट कवि असून कालिदासानें रघूच्या पौराणिक दिग्विजयांत उल्लेखिलेल्या वंक्षू नदीचा त्यानें उल्लेख केला आहे यावरून त्यानें कालिदासाच्या ग्रंथावरून आपल्या कविता लिहिल्या आहेत असे दिसतें. ज्या शिलालेखांत ऐतिहासिक वस्तुस्थिति दिली जावी अशी अपेक्षा असते त्यांतहि कशी अतिशयोक्ति केली जाते याचें उदाहरण म्हणून आम्ही या अतिशयोक्तीचा उल्लेख केला आहे. मुख्य हें कीं यावरून समकालीन आणि विश्वासार्ह असे शिलालेखहि सत्याच्या कसोटीवर घांसून घेण्याची अवश्यकता असून त्यांचें योग्य परीक्षण व्हावयास पाहिजे. ही वर्णनें खोटीं आहेत असें दाखविण्यास कोणताहि पुरावा नसला तरी इतर राजांच्या आणि शक्य तर परकीयांच्या लेखांत त्यांस पुष्टि देणारा पुरावा नसेल तर त्यांच्या सत्यत्वाकडे साशंक दृष्टीनें पाहिलें पाहिजे.

लक्ष्मणदेव निपुत्रिक निवर्तला, व त्याच्या मागून त्याचा धाकटा भाऊ वर सांगितलेला नरवर्मदेव हा सिंहासनारूढ झाला. तो मोठा कवि होता. त्यानें इ. स. ११०४सालीं लिहिलेल्या नागपूर प्रश-

स्तींपूर्वी केव्हां तरी तो गादीवर आला असावा. उज्जनीच्या महाकाल देवालयांत सांपडलेल्या एका अप्रसिद्ध शिलालेखाच्या खंडाचा लेखक तोच असावा (ल्युआर्ड व लेले पा. २९). धारेच्या भोजशाळेंत आणि उज्जनीच्या महाकालाच्या देवालयांत कांहीं शिलालेख सांपडले आहेत. ते सर्पाकृति असून त्यांतील श्लोकांत पाणिनीचे संस्कृतांतील नामांचे व धातूंचे प्रत्यय दिले आहेत; व त्याबरोबरच उदयादित्य व नरवर्मदेव यांच्या नांवाचा उल्लेख करून त्यांच्या शौर्याचा व विद्वत्तेचा श्लेषयुक्त निर्देश केला आहे.* हे श्लोक धार व उज्जयिनीच्या पाठशालेंत अभ्यासक्रमांत घातलेले असावेत.

उदयादित्याचा कनिष्ट मुलगा जगदेव हा अत्यंत शूरोदार असा राजपुत्र होता. चालुक्यांच्या आश्रयास असतांना गुजराथेंत, माळव्यांत व इतर देशांत त्यानें केलेल्या अद्भुत पराक्रमांचें वर्णन प्रबंधकारांनीं फार केलेलें आहे. तें खरें असो वा खोटें असो, इतिहासांत त्याच्या नांवाचा व कादंबरी लेखकांना आधारभूत झालेल्या त्याच्या साहसप्रियतेचा उल्लेख करणें आवश्यक आहे.

उदयादित्य व भोज यांचे प्रमाणेंच नरवर्मा हाहि शिभक्त होता. परंतु इतर धर्मांचे बाबतींत, आणि विशेषतः गुजराथ व माळवा या प्रांतात त्याकाळीं प्रसार पावत असलेल्या जैन धर्मांविषयीं, हे सर्व राजे सहिष्णुतेनें वागत. जैन धर्माचे उपदेशक वादविवदांत प्रवीण असत.नरवर्मदेव हिंदु आणि जैन पंडितांतील वादविवाद वारंवार ऐकत असे. महाकाल देवालयांत जैन मुनि रत्नसूरि आणि शैव मतवादी विद्याशिववादी यांचे मध्यें झालेल्या एका वादाचें

---

* उदयादित्यनामांकवर्णनागकृपाणिका ।
.........फणिश्रेणी सृष्टा सुकविबन्धुना ।
कवीनां च नृपाणां च हृदयेषु निवेशिता ॥ (ल्युआर्ड व लेले पा ३० )

वर्णन आहे. प्रायः या वादांत जैन पंडितांना विजय मिळत असल्यामुळें ज्या राजांपुढें हे वाद होत त्या राजांवर जैन पंडितांचा पगडा बसत असे. परंतु परमार राजे हे अखेरपर्यंत शिवभक्तच राहिले; आणि नरवर्मा हा जैन पंडितांची प्रशंसा करी आणि जैन ग्रंथकारांनीं त्याचा सादर उल्लेख केला आहे तरी त्यानें केव्हांहि जैन धर्माचा स्वीकार केला नाहीं ( ल्युआर्ड व लेले पा. ३१ ).

नरवर्म्यानें इ. स. ११३३पर्यंत राज्य केलें. त्याचेनंतर त्याचा मुलगा यशोवर्मदेव हा सिंहासनावर आला. त्यानें आपल्या बापाच्या प्रथम वर्षश्राद्धाबद्दल इ. स. ११९० सालीं दिलेलें दानपत्र उपलब्ध आहे. गुजराथ व माळवा यांच्या दरम्यानचें वैर जुनाट होतें; व नरवर्म्याच्या वेळेपासूनच या दोन देशांत लढाया चालू होत्या. परंतु जयसिंह सिद्धराजाचे अमलांत गुजराथचें सामर्थ्य वाढलें आणि जयसिंहानें यशोवर्म्याला त्याच्या कारकीर्दीचें शेवटीं युद्धांत पराभूत केलें आणि त्याच्या कुटुंबासहित कैद केलें. अनहिलवाडांत त्याला लांकडी पिंजऱ्यांत ठेवण्यांत आलें होतें असें म्हणतात. अनेक प्रबन्धकारांनीं या गोष्टीचें सविस्तर वर्णन दिलेलें असून स्वतः जयसिंहाच्याहि शिलालेखावरून तिचें सत्य प्रत्ययास येतें ( इ. अॅ. १० पा. १५९ ). जयसिंहानें माळवा आपल्या राज्याला जोडून टाकला आणि त्या देशाचा राज्यकारभार पाहण्यासाठीं आपल्या एका जैन प्रधानाला पाठवून दिलें. चालुक्यांच्या शिलालेखांत जयसिंहाला बहुशा अवंतिनाथ असें म्हटलें आहे व त्यावरून कांहीं काळपर्यंत उज्जनी व धार यांचा ज्यांत समावेश झालेला आहे असा माळव्याचा एक विस्तृत भाग चालुक्यांच्या ताब्यांत होता असें सिद्ध होतें. शेवटीं कांहीं तरी युक्ति करून यशोवर्म्यानें कैदेंतून आपली सुटका करून घेतली आणि अजमीरच्या एका चव्हाण राजाच्या मदतीनें आपल्या राज्याचा कांहीं भाग परत मिळविला. त्याच्याशीं

जयसिंहानें तहहि केला. जयसिंह सन ११४२मध्यें मरण पावला. त्याच्या मागून थोड्याच दिवसांनीं मृत्यूनें यशोवर्म्यासहि गांठिलें. अशा तऱ्हेनें यशोवर्म्यानें ११३३ ते ११४३इ. स पावेतों राज्य केलें. त्याच्या अमदानींत माळव्याचें सामर्थ्य कायमचें ऱ्हासास लागलें त्याची आई ममलादेवी ही चेदि राजकन्या होती. तिच्या स्मरणा प्रीत्यर्थ यशोवर्म्यानें इ. स. ११३४मध्यें दिलेलें दानपत्र सांपडलें आहे. या दानपत्राप्रमाणें धारेंत ठिकरीच्या पूर्वेस थोड्याशा मैलावर असलेला रेघवा हा गांव दान केलेला आहे. ( ल्युआर्ड व लेले, पा. ३४ ).

यशोवर्मदेवानंतर जयवर्म हा राजा झाला. त्याच्या कारकीर्दींत गुजराथनें पुनः माळव्याचा पाडाव केला. आपल्या सर्व शत्रूंचा पराभव करून इतिहासप्रसिद्ध कुमारपाळ गुजराथेंतील सिंहासनावर यापूर्वींच बसला होता. बल्लाळदेव नांवाच्या एका मालव राजानें या शत्रूंस मदत केली व त्यामुळें कुमारपालानें त्याचें शिर कापून तें आपल्या राजवाड्याच्या प्रवेशद्वारावर टांगून टेवलें असें प्रबंधकारांनीं वर्णन केलेलें आहे. कुमारपालाच्या वडनगर–प्रशस्तींत या गोष्टीचा उलेख आहे, परंतु वल्लाळदेव या नांवाचा निर्देश केला नाहीं. हा राजा कोण असावा हें अजून निश्चित झालेलें नाहीं, परंतु भोजाच्या घराण्यांतील हा परमार नसावा असा समज आहे. कीलहॉर्ननें अशी कल्पना सुचविली आहे कीं, यशोवर्मा बंदींत पडला असतां माळव्याच्या कांहीं भागांचा ताबा कित्येक साहसिक माणसांनीं घेतला असावा. परंतु या गोष्टीचा उलगडा पुढील तऱ्हेनें करतां येण्याजोगा आहे. तो असा कीं बल्लाळदेव हें जयवर्मदेवाचेंच दुसरें नांव असावें. कारण गुजराथचे किंवा अन्य कोणत्याहि देशाचे राजे भोज घराण्यांतून न आलेल्या व मालव राज्यांतील प्रदेशाचा अपहार करणाऱ्या एखाद्या माणसाला माळव्याचा राजा म्हणून मान्यता देतील अथवा

त्याचा उच्छेद केल्याबद्दल प्रतिष्ठा मिरवितील हें संभवनीय आहे असें आम्हांस वाटत नाहीं. परंतु येथें तर तसें स्पष्ट झालें आहे* तेव्हां अशी कल्पना करावयास हरकत नाहीं कीं कुमारपालाबरोबर झालेल्या लढाईंत स्वतः जयवर्माच मारला गेला असावा.

या लढाईच्या व पराभवाच्या धामधुमींत जयसिंहाचा कनिष्ठ बंधू लक्ष्मीवर्मा यानें आपल्या बाहुबलाच्या जोरावर भोपाळ ते हुशंगाबाद पर्यंतचा माळव्याच्या पूर्वभागांतील डोंगराळ मुलूख काबीज केला, तेथें आपली सत्ता बसविली आणि महाकुमार हें नांव धारण केलें. त्यानें वापरलेलें 'समधिगतपंचमहाशब्द' हें विशेषण तो स्वतंत्र राजा नसून माळव्याचा सामंत होता हें निःसंदेह व्यक्त करीत आहे असें असलें तरी त्यानें मिळविलेली सत्ता त्याला कोणी दान म्हणून दिलेली नसून ती त्यानें आपल्या तरवारीनें प्राप्त करून घेतली होती असें त्याच्या शाखेच्या शिलालेखांत स्पष्टपणें म्हटलें आहे ( इं. अॅ. १९ ). क. ल्युआर्ड व मि. लेले यांनीं प्रस्तुत कालाच्या वृत्तान्तांत उपयोगांत आणलेले Iuterregnum and dual rule (राज्यद्वैविध्य ) शब्द वरील कारणामुळें माळव्याच्या या परिस्थितीला योग्य तऱ्हेनें लागू पडत नाहींत असें आमचें मत आहें. जयवर्म्याच्या अमदानींत माळव्याचा बराचसा भाग गुजराथच्या ताब्यांत गेला आणि त्याच्या मृत्यूनंतर किंवा त्याच्या कारकीर्दीनंतर लक्ष्मणवर्म्यानें माळव्याच्या राज्याच्या कांहीं भाग हस्तगत केला. जयवर्माची कारकीर्द केव्हां आणि कशी संपली हें कळत नाहीं. किलहॉर्नची कल्पना अशी आहे कीं त्याला त्याचा धाकटा भाऊ अजयवर्मा यानें पद-

*वडनगर प्रशस्तींत हे शब्द पुढीलप्रमाणें आहेत. " द्वारालंबितमालवेशशिरः । आणि अबूच्या लेखांत पुढीलप्रमाणें आहेत. " यश्चौलुक्य कुमारपालनृपतिप्रत्यर्थितामागतं गत्वा सत्वरमेव मालवपतिं बल्लाळमालब्धवान् ( ए. इ.८ पा २११ ).

युत केलें. परंतु वर सुचविल्याप्रमाणें कुमारपालानें त्याला लढाईत कैद केलें आणि शेवटीं चंद्रावतीच्या यशोधवलानें त्याचा शिरच्छेद केला असावा हें संभवनीय दिसतें. शिलालेखकांनीं ' राज्येऽयतीते ' हा शब्दप्रयोग बहुधा त्याच्या दुःखकारक झालेल्या अंतामुळें जाणून बुजून केला असावा. इतकें खास कीं त्याची कारकीर्द अचानक रीतीनें संपली. लक्ष्मीवर्म्याच्या दानपत्राचा काल १०६३ इ. स. आहे ( ए. इ. १८ पा. २५४ व १९). त्यापूर्वीं केव्हांतरी, बहुधा इ. स. ११४३ नंतर थोड्याच वर्षांत तो राज्यारून पदच्युत झाला असावा.

यशोवर्मा यास जयवर्मा, अजयवर्मा व लक्ष्मीवर्मा असे तीन पुत्र असावेत. जयवर्म्याची कारकीर्द संपल्यावर स्वाभाविकपणेंच अजयवर्मा माळव्याचा राजा झाला आणि पदाभिषिक्त ' महाराजाधिराज परमेश्वर' हीं नेहमींची विरुद्धें त्याच्या नांवाबरोबर वापरण्यांत येऊं लागलीं. परंतु लक्ष्मीवर्म्यानें आपल्या सामर्थ्यानें भोपाळ व हुशंगाबादच्या भोंवतालीं आपलें संस्थान स्थापलें आणि वर सांगितल्याप्रमाणें सामंत ही पदवी धारण केली. परमारांच्या या दोन्ही शाखा तीन पिढ्यापर्यंत चालल्या व शेवटीं देवपालदेवाच्या कारकीर्दींत एकरूप झाल्या. परंतु माळव्यावर दोन राजांची सत्ता होती हें म्हणणें आम्हांस संमत नाहीं. लक्ष्मीवर्म्याचें घराणें प्रत्यक्ष स्वतंत्र असलें तरी त्यानें सामंतपदानें संतुष्ट होऊन अजयवर्म्याच्या घराण्याचें वर्चस्व मान्य केलें होतें.

भोजाच्या कालापासून माळव्याची राजधानी असलेली जी धारानगरी तिच्या सभोंवतालच्या प्रान्तावर राज्य करणारा आणि माळव्याच्या राजघराण्यांतील क्रमप्राप्त वारस अजयवर्मा याचें नांव फक्त त्याच्यानंतर झालेल्या राजांच्या शिलालेखांत पहावयास सांपडतें.

त्याच्याविषयीं कोणतीहि माहिती उपलब्ध नाहीं. पुष्कळ वेळां जयवर्माखेरीज अजयवर्मा यां नांवाचा दुसरा एखादा राजा होता कीं काय याबद्दल संशय प्रकट केला जातो; परंतु या लेखांवरून अजयवर्माच्या अस्तित्वाची खात्री पटते. संस्कृतांत विशेषतः संधि केलेले असतां कोणता शब्द वापरला आहे हें निश्चयानें सांगणें कठीण असतें. परंतु लक्ष्मीवर्म्याच्या लेखांत जयवर्म आणि विंध्यावर्म्याच्या लेखांत अजयवर्म हीं नांवें स्पष्ट रीतीनें दिसतात. पहिल्या लेखांत अजयवर्माचा उल्लेख कां नाहीं ? याचें असें उत्तर देतां येईल कीं जयवर्म्याच्या हयातींतच आणि कदाचित त्याच्याच संमतीनें लक्ष्मीवर्मा यानें आपलें संस्थान स्थापिलें असावें. अजयवर्मानें कांहीं काल मुख्य घराणें चालविलें. त्याच्यानंतर त्याचा मुलगा विंध्यवर्मा हा राजा झाला व त्यानें आपल्या पैतृक प्रदेशापैकीं बराच भाग परत मिळविला असावा असें दिसतें. उदेपूरच्या प्रख्यात शिवाच्या देवालयांतील शिलालेखावरून हा भाग ११ डिसेंबर ११६३ या दिवशीं गुजराथच्या कुमारपालाच्या ताब्यांत होता असें दिसून येतें. त्या दिवशीं चंद्रग्रहणानिमित्त कुमारपालानें एक दान केलें आहे ( इं. अॅ. १८ पा. ३४३ ). त्याचा प्रतिनिधि महाराजपुत्र श्री वसंतपाल हा होता. चाहडानें लिहून ठेवलेलें सन ११६६ चें एक दानपत्र आहे. चाहड हा वसंतपालानंतरचा प्रतिनिधि असावा. भैलस्वामी ( भेलसा ) जिल्ह्यांतील एका गांवचें ११७३ इ. स. सालचें गुजराथच्या अजयपालदेवाचें दानपत्र आहे. गुजराथच्या अजयपालदेवाची कारकीर्द ११७६त संपल्यानंतर विंध्यवर्म्यानें हा प्रदेश पुनः परत मिळविला असावा; अजयपालाच्या उदेपूरच्या ११७३ च्या शिलालेखावरून तों पावेतों गुजराथची सत्ता पूर्व माळव्यावर होती असें दिसून येतें. अजयपालाच्या नंतरचा राजा बहुधा अज्ञान असावा आणि त्याच्या कारकीर्दींत माळवा पूर्णपणें

परमारांच्या अंमलाखालीं आला असावा. विंध्यवर्म्याचा नातू अर्जुनवर्मा यानें १२१५ सालीं केलेल्या दानपत्रांत विंध्यवर्मा हा मोठा योद्धा होता असें त्याचें वर्णन केलें आहे. धारचा मांडोगड नांवाचा किल्ला ( मंडपदुर्ग ) त्याच्या ताब्यांत होता यांत संशय नाहीं. त्यांतील एका प्रसिद्ध न झालेल्या शिलालेखावरून बिल्हण या नांवाचा एक कवि त्याचा मंत्री होता असें दिसून येतें* ( ल्युआर्ड-आणि लेले पा. ३७ ). यावरून हा राजा कविजनांचा पुरस्कर्ता होता असें दिसतें. ज्याची अधिक माहिती आम्ही पुढें देणार आहोंत त्या आशाधर नांवाच्या जैन ग्रंथकारानें विंध्यवर्म्याच्या या आनुवंशिक वृत्तीचा उल्लेख केलेला आहे. विंध्यवर्म्यानें सुमारें ११६० ते ११८० पर्यंत राज्य केलें ( ल्युआर्ड व लेले, पा. ५८ ) आणि त्याच्यानंतर त्याचा मुलगा सुभटवर्मा राज्यावर बसला. तोहि प्रतापवान् राजा होता आणि त्यानें माळव्याचें सामर्थ्यांत अधिक भर टाकली. त्यानें आपलें राज्य परत मिळविलें इतकेंच नाहीं तर त्यानें गुजराथेवर स्वारीहि केली. देवगिरीच्या एका यादव राजानें माळव्याचा पराभव केल्याचा उल्लेख आहे, परंतु बहुतकरून हा विजय महत्वाचा नसावा. क. ल्युआर्ड आणि मि. लेले यांनीं सुभटवर्मानें ११८० ते १२१० इ. स. पर्यंत राज्य केलें असें लिहिलें आहें. त्याच्यानंतर अर्जुनवर्मा राज्य करूं लागला. त्याचीं १२११,१२१३ व १२१५ इ. स. चीं मंडपदुर्ग ( मांडू ) भृगुकच्छ ( भडोच ) आणि नर्मदेवरील अमरेश्वर ( मांधाता ) या गांवातून प्रसिद्ध केलेलीं दानपत्रें उपलब्ध झालीं आहेत. त्यानें गुजराथचा राजा दुसरा जयसिंह याचा पराभव केला असें म्हटलें आहे. दरबारच्या कवीनें या विजयप्रसंगावर लिहिलेलें व कमालमौला मशिदींत वापरलेल्या

---

* विन्ध्यवर्म-नृपतेः प्रसादभूः । सान्धिविग्रहिक बिल्हणः कविः ॥

शिलांवर कोंरलेले एक नाटक धार येथें राजेश्री लेले यानीं शोधून काढलें आहे. या नाटकाची अक्षरें लावून तें एपिग्राफिआ इंडिकाच्या ८ वे भागांत प्रसिद्ध केलें आहे. जैन पंडित आशाधर याचा शिष्य व राजाचा गुरु मदन—हा गौड ब्राह्मण होता—यानें हें नाटक लिहिलें आहे. एका वसंतोत्सवाचें वेळीं या नाटकाचा प्रयोग सरस्वतीभुवनांत करून दाखविण्यांत आला होता. या नाटकांत अर्जुनवर्मा हा भोजाचा अवतार आहे असें त्याचें वर्णन केलें असून ही त्याची स्तुतिहि अत्यंत उचित अशीच आहे. कारण अर्जुनदेव हा नुसता कवींचें आश्रयस्थानच नव्हता; तो स्वतःहि कवि आणि ग्रंथकार होता.* अमरुशतकावरील रसिकसंजीवनी नांवाची टीका हा त्याचा प्रसिद्ध ग्रंथ आहे. त्यानें भोजाच्या ग्रंथांवरहि टीका लिहिल्या असें म्हणतात. तो आपला पूर्वज जो भोज त्याच्याप्रमाणेंच शूर, विद्वान्, आणि उदार होता असें दिसतें, आणि भोजाप्रमाणेंच तो दैवशालीहि होता; कारण माळव्याचें वैभव त्याच्या मृत्यूनंतर नष्ट झालें. तो इ. स. १२१६ त मेला असावा,कारण त्याच्या नंतरच्या राजाचें १२१८ सालचें दानपत्र सांपडलें आहे.

अर्जुनवर्म्यानंतरचा राजा दुसऱ्या परमार घराण्यांतील लक्ष्मीवर्म्याचा नातु देवपालवर्मा हा झाला. अर्जुनवर्मा बहुधा निपुत्रिक मेला असावा. त्याच्या कारकीर्दींतहि जैन पंडित आशाधर हा जीवमान होता. त्रिषष्टिस्मृति आपण इ. स. १२१५ मध्यें या राजाच्या कारकीर्दींत पुरी केली, असें आशाधरानें म्हटलें आहे.

यानंतरचा राजा जयतुंगदेव याच्या वेळींहि आशाधर हयात होता; कारण आपल्या धर्मामृतावरील टीका जयतुंगाचे अमदानींत

---

*काव्यगान्धर्वसर्वस्वनिधिना येन सांप्रतम् ।
भारावतारणं देव्याश्चक्रे पुस्तकवीणयोः ॥

(ए. इ.९ पा. १०८)

आपण इ. स. १२२४ मध्यें लिहिली असें त्यांचें म्हणणें आहे. देवपालदेवानें इ. स. १२१६ ते १२४० पर्यंत राज्य केलें असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं ( क. ल्युआर्ड व लेले ).

यावरून देवपालदेवाचे कारकीर्दींत इ. स. १२३५ मध्यें अल्तमशानें माळव्यावर स्वारी केली आणि उज्जनीचें महाकालाचें देवालय उध्वस्त केलें. या प्रसंगानंतर अनेक वर्षें माळवा मुसलमानांच्या अंमलाखालीं न जातां स्वतंत्र राहिला होता; आणि देवपालाच्या पुढील पांच वंशजानीं माळव्यावर राज्य केलें. १ जयतुंग ( १२४० ते १२५६ ), २ जयवर्मा ( १२५६—१२६१ ), ३ जयसिंह ( १२६१—१२८० ), ४ दुसरा भोज ( १२८०—१३०१ ) आणि ५ जयसिंह. जयासिंहाचा इ. स. १३०९ चा उदेपुरांतील शिलालेख आतां उपलब्ध झाला आहे. शेवटीं दिल्लीहून आलेला प्रांताधिकारी ऐनुलमुल्क यानें माळवा सर केला. त्यानें चंदेरी, उज्जयिनी. धार आणि मांडू हीं सर्व घेतलीं (ल्युआर्ड व लेले).

अशा तऱ्हेनें चार शतकांच्या उज्वल सत्तेनंतर माळव्यांतील विख्यात परमार घराण्याचा अंत झाला. उमटवाड्यांतील राजगड आणि नरसिंहगड ( भोपाल एजन्सी ) चे राजे आणि मेवाडांतील बिजोलियाचे संस्थानिक हे माळव्याच्या परमार राजांचे हल्लींचे वंशज आहेत ( गौरीशंकर ओझा-टॉडचा राजस्थान ).

जयवर्म्याचे मृत्यूनंतर किंवा तो पदच्युत झाला तेव्हां ११४४ इ. स. चे सुमारास लक्ष्मीवर्म्यानें स्थापिलेल्या स्वतंत्र शाखेचा थोडक्यांत उल्लेख केला म्हणजे या प्रकरणाचें कार्य संपलें. लक्ष्मीवर्म्याचा मुलगा महाकुमार हरिश्चंद्र याचें इ. स. ११७८चें दानपत्र उपलब्ध आहे. हरिश्चंद्राचा मुलगा उदयवर्मा याचें इ. स. १२००चें एक दानपत्र उपलब्ध झालें आहे. वर सांगितल्याप्रमाणें हरिश्चंद्राचा मुलगा देवपालदेव हा सर्व माळव्याचा राजा झाला. या शाखेनें भोपाल व हुशं-

गाबादच्या भोंवतालच्या भागांत राज्य केलें असावें; त्याचीं दानपत्रें भोपाळ व हुशंगाबाद येथें केलेलीं आहेत. माळव्याचा विस्तार पूर्वेस भोपाळपासून पश्चिमेस धारपर्यंत आणि दक्षिणेस नर्मदेपासून उत्तरेस विंध्यपर्वत आणि त्याच्या पलीकडे मदंसौर पर्यंतचें पठार इतका होता. कधीं हा विस्तार कमी होई; कधीं दक्षिणेकडे तापी आणि वऱ्हाड यांचा त्यांत समावेश होई. कधीं कधीं नागपुरासकट मध्य-प्रांतावरहि परमारांचा अंमल बसला होता.

भोजापासून या परमार घराण्याची वंशावळ पुढीलप्रमाणें आहे (ए. इ. मधील किलहॉर्नच्या वंशावळी भाग ८ ).

१ भोज लेख १०२१ ( १०१० ते १०५५ सु.)
|
२ जयसिंह ,, १०५५ ( १०५५ ते १०५९ सु.)
|
३ उदयादित्य [एक आप्त] ( १०५९ ते १०८० सु.)
|
४ लक्ष्मणदेव ( १०८१ ते ११०४ सु. )
|
५ नरवर्मा ले. ११०४व११०७ ( ११०४ ते ११३३ सु. )
|
६ यशोवर्मा ले. ११३४व११३५ ( ११३३ ते ११४२ सु. )
|

७ जयवर्मा ११४३ (११४२ते ११४४ सु.) ८ अजयवर्मा ( ११४४–११६० सु. ) लक्ष्मीवर्मा
|
९ विंध्यवर्मा (११६०--११८०) हरिश्चंद्र (११७८--११७८सु.)
|
१० सुभटवर्मा (११८०--१२१० )
|
११ अर्जुनवर्मा (१२१०-१२१६ १२११,१२१२,१२१५ १२ देवपाल ( १२१६--१२४० ) १२१७,१२२९,१२३२

येणेंप्रमाणें या १२ राजांनीं इ. स. १०१० ते १२४० पर्यंत

राज्य केलें. त्यांच्या प्रत्येकाच्या कारकीर्दीचें सरासरी प्रमाण ( $\frac{२३२}{१२}$ ) २० वर्षांचें आहे. हिंदी राजघराण्यांचें हें नेहमींचें प्रमाण आहे.

ह्या राजघराण्यांत भोजाचा मुलगा जयसिंह हा दुर्दैवी होता. त्यानें चारच वर्षें राज्य केलें; आणि त्यांतहि कर्ण आणि कर्नाट यांच्या दरम्यान त्याची वाताहात झाली. यशोवर्मा त्याच्याहि पेक्षां अधिक दुर्दैवी. त्याचा पराभव झाला, तो कैद झाला, आणि गुजराथच्या जयसिंहिराजानें त्याला पिंजऱ्यांतहि कोंडून ठेवलें. जयत्रम्याच्या दुर्दैवानें तर कडेलोट केला. कुमारपालानें त्याला नुसता पराभूत किंवा बंदिवानच केला नाहीं तर त्याचें शिरहि उडविलें आणि तें आपल्या प्रासादाच्या प्रवेशद्वारावर लटकविलें. कुमारपालाच्या वडनगर प्रशस्तींत म्हटल्याप्रमाणें गुजराथच्या राजांनीं माळव्याच्या राजांच्या केलेल्या या दुर्दशेमुळें इतर राजांच्या उरांत धास्ती बसली.* परंतु गुजराथच्या राजांची हीं कृत्यें हिंदु राजांस न शोभणारीं व त्यांच्या हातून न होणारीं अशींच होतीं. मुसलमानांची बंदिवान् राजांस वागविण्याची जी पद्धत हिंदु राजांच्या ऐकिवांत आली तिचें हें अनुकरण असावें.

---

*दृष्यन्मालवभूपबन्धनविधित्रस्ताखिलक्ष्मापतिः
(ए. इं. १ पा. २९७.)

# प्रकरण पांचवें.

## बुंदेलखंडचे चंदेल्ल.

बुंदेलखंडच्या चंद्रात्रेय म्हणजे चंदेल्ल क्षत्रिय राजकुलाची परंपरा याहि कालविभांत चालू राहिली (इ. स. १००० ते १२००). जरी ती पूर्वीपेक्षां जास्त वैभवयुक्त नव्हती, तरी पूर्वींच्या शतकां इतकीच (भा. २ पहा) ती तेजस्वी राहिली. या कुलाचें नांव गोत्रनांम आहे. गोत्रनांमाचा नियम प्राचीन ब्राह्मणांत व क्षत्रियांत होता. आणि चंद्रात्रेय हें नांव गोत्रकर्त्याचें 'पाराशरे' यांचा गोत्रकर्ता पराशर याप्रमाणें किंवा पिटरसन्, जॉनसन् वगैरे इंग्रजी आडनांवाप्रमाणें होतें. या राज्याचें वर्णन अल्बेरूनीनें बरोबर केलें आहे. त्यांतील मुख्य किल्ले कालंजर आणि ग्वाल्हेर हे त्यानें सांगितले असून त्यांची राजधानी खुजुराहा ही त्यानें सांगितली आहे. इतर अरब लेखक त्यांच्या राजास चंद्रराय म्हणतात. हिंदी शब्द ' चंद्र ' चंदबर्दायीनेंहि या राजांबद्दल रासांत उपयोगिला आहे.

या कुलांतील सर्वांत मोठा राजा धंग होता. हा पूर्वींच्या कालविभागाच्या अंतीं राज्य करीत होता. तो इतका पराक्रमी व प्रसिद्ध होता कीं, पंजाबच्या जयपाल राजानें सबुक्तगीनाविरुद्ध त्यास मदतीस बोलाविलें होतें. आणि चंदेल्लकुलाच्या लेखांत त्यास 'हम्मीरसम ' असें म्हटलें आहे. लेख लिहिणारे अतिशयोक्ति करितात, पण अगदींच खोटीं विधानें करीत नाहींत. म्हणूनअन्यत्र आम्ही सांगितल्याप्रमाणें संयुक्त हिंदु सैन्याची सिंधुपलीकडे सबुक्तगीनाशीं जी लढाई झाली तींत कोणत्याहि पक्षाचा जय झाला नाहीं. अर्थात् धंगाला हम्मीरसम असें जें म्हटलें आहे त्यांत खोटेपणा नाहीं. धंग सुमारें शंभर वर्षांचा म्हातारा होऊन प्रयाग येथें पवित्र अशा गंगायमुनासंगमी करीशचितेंत जळून देहत्याग करिता झाला.

धंगामागून त्याचा पुत्र गंड गादीवर बसला. हाहि तितकाच पराक्रमी निघाला. यानेंहि जयपालाचा पुत्र आनंदपाल ह्यास महमुदाविरुद्ध मदत केली. या लढाईंत मात्र हिंदूंचा पक्का पराभव झाला; व यामुळेंच महमुदाचें चंदेल्लाशीं जें वैर चालू झालें त्याची गति आम्ही अन्यत्र वर्णिली आहे. गंड इ. स. १००० मध्यें गादीवर आला आणि इ. स. १०२३ पर्यंत त्यानें राज्य केलें. त्याचे १००२ व १०२२ इ. स. असे दोन लेख सांपडले आहेत. ३७ मध्यें चंदेल्लावरील सर व्हिन्सेन्ट स्मिथनें एका विस्तृत लेखांत या कुलाच्या राजांची हकीकत दिली आहे. त्यांतून आम्ही मित्या व वृत्तें घेऊन जेथें जरूर दिसली तेथें चंदेल्लांच्या व इतरांच्या मूळ लेखांतून कांहीं विशेष माहिती देत आहों. येथून पुढें महोबा ही चंदेल्लांची राजधानी होती.

गंडाच्या मागून त्याचा पुत्र विद्याधर गादीवर आला. यानें १०२८ पासून १०३० पर्यंत दोनच वर्षें राज्य केलें. युवराज असतांना कनोजवर स्वारी करून महमुदाला शरण जाऊन त्याचे अंकितत्व पतकरून राजपूत नांवाला कलंक लावणाऱ्या राज्यपालाचा यानें पराभव केला. एका कच्छपघात लेखांत असें वर्णिलें आहे कीं, या युद्धांत चंदेल्लांचा मांडलिक अर्जुनदेव यानें बाण मारून राज्यपालाचा कंठ छेदिला.* या लडाईनें विद्याधराचे पराक्रमाबद्दल ख्याति झाली. आणि एका त्याच्या खंडित लेखांत असें वर्णन आहे कीं, हा पलंगावर पडला असतां भोज व कलचूरी राजा त्याची सेवा करीत होते. बहुधा भोज आणि गांगेय यावेळचे दोन बलिष्ट राजे तुर्कांना विरोध करून त्यांस राज्यपालाच्या मध्यदेशांतून हाकलून कनोजच्या

---

*श्रीविद्याधरदेवकार्यनिरतः श्रीराज्यपालं हठात् ।
कंठास्थिच्छिदनेकबाणनिवहैर्हत्वा महत्याहवे ॥ (ए. इं. २ पान २२७).

सम्राटास त्यांच्या तडाख्यांतून सोडविण्याच्या कामीं विद्याधरास मदत करण्यास आले होते.*

याप्रमाणें हिंदुस्थानचे प्रसिद्ध हिंदु राजे विद्याधराच्या सैनापत्याखालीं, राज्यपालानें तुर्कांस शरण जाऊन तुर्कांची एक फौज आपल्या रक्षणाकरितां ठेऊन घेतली होती त्यास शिक्षा लावण्याकरितां त्याजवर चालून गेले. चंदेलांचें राज्य कनोजच्या राज्यास लागून होतें. अर्थात् या संयुक्त सेनेचा मुख्य अधिकार विद्याधराकडे साहजिकच आला. 'तल्पभाजम्' ह्या विशेषणावरून विद्याधर पलंगावरच पडून त्यानें आपला सेनापति व मांडलिक ग्वालेरचा कच्छपघात राजा यास स्वारीवर पाठविलें. भोज व गांगेय यानींहि बहुधा स्वतः न जातां आपल्या तर्फें या लढाईंत फौजा पाठविल्या. त्या अर्थात् विद्याधराच्या हुकुमाखालीं काम देत होत्या.

विद्याधरामागून विजयपाल राज्यावर आला. त्यानें इ. स. १०३० पासून इ. स. १०४० पर्यंत म्हणजे थोडाच काळ राज्य केलें ( स्मिथ ). विजयपालामागून त्याचा ज्येष्ठ पुत्र देववर्मन् राजा झाला. त्यानें इ. स. १०४० पासून इ. स. १०६० पर्यंत राज्य केलें. त्याचा एक लेख इ. स. १०५० चा सांपडला आहे ( इं. ए. १६ पा. २०५ ). या लेखांत देववर्मा आपल्यास कालंजराधिपति म्हणवितो. परमभट्टारकादि नेहमींच्या स्वतंत्र राजाच्या पदव्या त्यास

---

*या लेखांतील शब्द ( ए. इं. १ पा. २२२ ) महत्त्वाचे पण संदिग्ध आहेत. विहितकन्याकुब्जभूपालभङ्गं । समरगुरुमुपास्त प्रौढभीस्तल्पभाजम् सहकलचुरिचन्द्रः शिष्यवद्भोजदेवः ॥ या ठिकाणीं बहुधा लेख वाचण्यांत चुकी झाली असून प्रोढभीः या ऐवजीं प्रौढधीः असें पाहिजे. प्रौढ शब्द भीशीं जोडला असतां कांहीं अर्थ निष्पन्न होत नाहीं. लेखकाचा आशय असा दिसतो कीं, भोजासारखा बुद्धिवान् राजा त्रिपुराच्या प्रसिद्ध कलचूरी गांगेय राजासह युद्धांतील या गुरुशीं शिष्यवत् आचरण करीत होता.

लाविल्या आहेत. हा लेख सहरवास येथील आपल्या सैन्याच्या मुक्कामावरून त्यानें जारी केला असून माता भुवनदेवी हिच्या सांवत्सरिक श्राद्धानिमत्त त्यांत गांव दान दिला आहे.

देववर्मन्च्या मागून त्याचा भाऊ कीर्तिवर्मन् गादीवर आला. यानें भावाहूनहि ज्यास्त कीर्ति मिळविली आणि ज्यास्त वर्षें राज्य केलें; म्हणजे सुमारें १०६० पासून ११०० पर्यंत चाळीस वर्षें राज्य केलें. याचें दोन लेख सांपडले आहेत. एक इ. स. १०९८ चा असून दुसऱ्यावर मिति नाहीं. यांत गंड, भोजाचा समकालीन विद्याधर, गांगेयाचा समकालीन विजयपाल आणि कर्णाचा समकालीन देववर्मन् यांचा उल्लेख आहे. चेदींच्या राजवंशांत त्रिपुरचा कर्ण अतिशय पराक्रमी राजा झाला. त्यानें कीर्तिवर्मन्चा पराभव करून त्यास राज्यांतून हांकून लाविलें. पण शेवटीं कीर्तिवर्मन्नें गोपाल नांवाच्या एका ब्राह्मण सेनापतीच्या सहाय्यानें 'अनेक राजांचा नाश करणारा' कर्ण याचा पराभव केला आणि आपलें राज्य परत मिळविलें. या जयाचा उल्लेख कृष्णामिश्रानें केलेल्या प्रबोधचंद्र नाटकांत आला असून इ. स. १०६५ त हें नाटक राजासमोर करून दाखविलें. वेदांत तत्त्वज्ञानावर हें नाटक रचिलें असून ज्ञान, भक्ति, वैराग्य इत्यादि गुणांस मनुष्यरूप देऊन तीं यांत पात्रें केलीं आहेत. कीर्तिवर्मन्नें चंदेल्ल घराण्याचें पहिलें नाणें पाडून आपली कीर्ति अधिक स्थिर केली. या नाण्याची तऱ्हा गांगेयाच्या नाण्याप्रमाणेंच आहे. मात्र लक्ष्मीच्या ऐवजी हनुमान घातला आहे. हनुमान चंदेल्लांची कुलदेवता नाहीं, परंतु त्यांचें तें आवडतें दैवत होतें असें दिसतें. खजुराहो येथील एका हनुमानाच्या मूर्तीच्या खालीं चंदेल्लांचा एक लेख अद्याप पहावयास मिळतो. देवगड येथें इ. स. १०९८ चा एक लेख मिळाला आहे (इ. ए. १८ पा. २३८). हा त्याचा प्रधान वत्सराज यानें देवगडचा किल्ला चेदींपासून घेतला

त्या विजयस्मरणार्थ खोदला आहे. ललितपूर जिल्ह्यांतील पूर्वेकडील एका डोंगराच्या ओळींत एका रमणीय जागीं हा किल्ला आहे ( स्मिथ ). या लेखावरून इ. स. १०९८ च्या पुढेंहि कीर्तिवर्म्यानें राज्य केलें असें ठरतें.

कीर्तिवर्मन्‌च्या मागून त्याचा पुत्र सल्लक्षण राजा झाला. यानें इ. स. ११०० पासून इ. स. ११९० पर्यंत थोडेच दिवस राज्य केलें. माळवा आणि चेदी यांची लक्ष्मी यानें हरण केली एवढा उल्लेख याविषयीं सांपडतो ( ए. इं. १ पा. ३२७ ). याच्या मागून याचा पुत्र जयवर्मन् गादीवर आला. त्यानेंहि थोडेंच राज्य केलें. ( ११९० ते ११२० ). ह्याच्याविषयीं विशेष सांगण्यासारखें नाहीं. किलहॉर्ननें आपल्या वंशावळींत याच्या नांवावर एक लेख दिला आहे. पण तो याचा प्रसिद्ध पूर्वज धंग याची एक प्रशस्ति गौड कायस्थ लेखकानें केवळ पुनः लिहून ठेवलेली आहे ( ए. इं. १ पा. १४७ ). जयवर्मन्‌ला पुत्र नव्हता. तेव्हां कीर्तिवर्मन्‌चा धाकटा पुत्र पृथ्वीवर्मन् जयवर्मन्‌चा चुलता राजा झाला. त्यानें इ. स. ११२० ते ११२५ पर्यंत पांचच वर्षे राज्य केलें हें साहजिक आहे. या तिन्ही राजांनीं काढलेलीं सोन्यारुन्यांचीं नाणीं सांपडलीं आहेत. शेवटल्याचें एक तांब्याचें नाणेंहि सांपडलें आहे.

आतां आपण चंदेल्ल वंशांतील दुसरा प्रसिद्ध राजा पृथ्वीवर्मन्‌चा पुत्र मदनवर्मन् याच्या कारकीर्दीशीं पोहोंचलों. यानें पुष्कळ वर्षें म्हणजे इ. स. ११२५ पासून ११६५ पर्यंत जोरानें राज्य केलें. किलहॉर्ननें आपल्या वंशावळींत ( ए. इं. ८ ) याच्या नांवावर आठ लेख इ. स. ११२९ पासून इ. स. ११६२ पर्यंत दिले आहेत. चंद बरदाई म्हणतो कीं, गुजराथचा प्रसिद्ध राजा जयसिंह याचा यानें पराभव केला. पण गुजराथचे बखरकार लिहितात कीं, जयसिंहास यानें खंडणी दिली. तथापि ते आणखी मजेची गोष्ट अशी

सांगतात कीं, जयसिंह आपल्या राजधानीशीं पोहोंचला तरी मदनवर्मन् इतका बेफिकीर होता कीं, तो आपल्या विलासबागेंतून हालला नाहीं. जेव्हां बातमीदारांनीं सिद्धराज येऊन पोहोंचला अशी खबर दिली, तेव्हां तो इतकेंच म्हणाला कीं, "हा द्रव्यलोभी मनुष्य कांहीं द्रव्य मागतो आहे. याला कांहीं द्रव्य द्या." जयसिंहाला मदनवर्मनच्या या स्वभावाचें मोठें नवल वाटलें. त्यानें स्वतः जाऊन विलासोद्यानांत मदनवर्मन्ची भेट घेतली, व त्यानेंहि जयसिंहास थाटाची मेजवानी दिली. परंतु कालंजर येथें मदनाचा एक लेख आहे त्यांत गुर्जर राजाचा पराभव केल्याचें विधान आहे. त्यांत माळवा व चेदी या राजांचाहि त्यानें पराभव केल्याचें वर्णन आहे. कनोजचे गाहडवाल म्हणजे बनारसचे राजे याशीं त्याचा स्नेह होता. यानें महोबास एक मोठा तलाव बांधून त्याच्या कांठीं दोन मंदिरें बांधिलीं. हा तलाव मदनसागर म्हणून प्रसिद्ध आहे. बहुतेक चंदेल्ल राजांनीं विस्तीर्ण सुंदर तलाव आणि देवळें बांधिलीं आहेत. त्यांची माहिती पुढील टिप्पणींत आह्मीं देऊं. मदनवर्मनानें काढलेलीं सोन्याचांदीचीं नाणीं पुष्कळच सांपडलीं आहेत.

दीर्घकाल राज्य करणाऱ्या राजांचा नेहमीं अनुभव आहे त्याप्रमाणें याचा ज्येष्ठ पुत्र प्रतापवर्मन् त्याच्या आगोदर मेला व त्याचा धाकटा मुलगा यशोवर्मन्‌हि मेला. त्याचा पुत्र परमर्दि देव हा मदनानंतर गादीवर आला. यालाच परमल असेंहि म्हणतात. हाच चंदेल्ल घराण्याचा शेवटचा प्रसिद्ध राजा होय. यानें इ. स. ११६८ पासून इ. स. १२०३ पर्यंत दीर्घकाळ राज्य केलें. याचें नांव व याच्या दोन शूर सरदाराचें नांव अल्ह व उघल्ल यांची कीर्ति बुंदेलखंडांत घरोघर गाइली जाते. हे दोन वीर बनाफरवंशी राजपूत असून त्यांनीं परमलाकरितां पृथ्विराज चव्हाणाशीं झालेल्या युद्धांत आपला प्राण वेंचला. पृथ्विराज रासाच्या महोबाखंडांत चंदवर्दाईनें

अल्ह व उघल्ल यांचें शूरत्वाचे व स्वदेश–प्रीतीचे पराक्रम गाइले आहेत. ते मेल्यानंतर पृथ्विराजानें परमालाचा पराभव केला. ही लढाई काळीसिंधला मिळणारी एक नदी पहुज हिच्या कांठीं असलेल्या सिसरागडजवळ झाली. पृथ्विराजानें लागलीच मोहोबाचा कबजा करून तेथें आपला सरदार पज्जून यास अधिकारी नेमलें. ही रासांत दिलेली हकीकत मदनवर्मन् यानें स्थापलेल्या मदनपूर गांवीं सांपडलेल्या पृथ्विराजाच्या लेखावरून खरी ठरते. पण परमर्दीचा पुत्र समरजित् यानें पज्जूनास हांकून लाविलें असें जें चंद लिहितो तें खरें दिसत नाहीं. कारण परमर्दीच्या मागून त्याचा पुत्र त्रैलोक्यवर्मन् गादीवर आला असें कोरींव लेखांवरून दिसतें. कदाचित् समरजित् हा त्याचा धाकटा भाऊ असेल.

पृथ्विराजानें केलेला परमर्दीचा पराभव स्मिथच्या मतें फारच जबर होता. त्यामुळें इ. स. १२०३ मध्यें जेव्हां कुतुबुद्दिनानें चेदीवर स्वारी केली तेव्हां त्यास त्याचा चांगला विरोध करतां आला नाहीं. परंतु परमर्दीचा हा पराभव इ. स. ११८२ मध्यें झाला. त्यानंतरच्या वीस वर्षांच्या काळांत त्यास आपलें सामर्थ्य बरेंच परत मिळवितां आलें असावें. तथापि पृथ्विराजाच्या स्वारीमुळें परमर्दीची शक्ति कमी झाली हें मान्य करावें लागेल आणि पृथ्विराजानें अन्यत्र दाखविल्याप्रमाणें ही राष्ट्रीय दृष्ट्या चुकी केली. हिंदुस्थानांतील पराक्रमी क्षत्रिय घराण्यांपैकीं चंदेल्ल प्रसिद्ध होते. असो, परमर्दीनें कुतुबुद्दिनास विरोध केला आणि महोबा सोडून कालंजरच्या किल्ल्याचा त्यानें आश्रय केला. मुसलमान इतिहासकार लिहितात कीं तो शेवटीं शरण आला. कांहीं खंडणी, कांहीं हत्ती व कांहीं किल्ले देण्याच्या अटीवर तो मोकळा झाला. पण या अटी अमलांत येण्यापूर्वींच तो मरण पावला. त्याचा सेनापति कालंजर किल्ल्याचें ठिकाण मजबूत समजून व परमर्दी उगीच शरण गेला असें मानून लढत

राहिला. अर्थात् कालंजरचा वेढा कायम राहिला. शेवटीं अवर्षणामुळें किल्ल्यावर पाणी न राहिल्यानें अजपालास शरण जावें लागलें. किल्ल्यावरील सर्व लढवय्ये बिनशर्त शरण येऊन क्षीण झालेल्या शरीरांनीं किल्ल्याबाहेर पडले. कुतुबुद्दिनानें राज्य खालसा करून तेथें एक प्रांताधिकारी नेमला व तो दिल्लीस परतला. याप्रमाणें परमर्दी घराण्याचें यशस्वी चरित्र संपलें. त्यांचा शेवटचा राजा—पराक्रमानें शेवटचा नव्हे—परमर्दी होता.

परमर्दीच्या नांवावर किलहॉर्ननें सात लेख इ. स. ११६७पासून इ. स. १२०१पर्यंतचे दिले आहेत. त्यानंतर आणखी एक लेख इ. स. ११७३चा सांपडला आहे ( ए. इं. १६ ), त्यांत त्याच्या पूर्वीच्या दोनच राजांचें नांव आलें आहे, पृथ्वीवर्मन् आणि मदनवर्मन्. हे सर्व लेख पाहतां असें दिसतें कीं, परमर्दी हा एक मोठा दाता होता. त्यानें अनेक ब्राह्मणांस अनेक गांव दिले (ए. इं. पा. १७०), इतकेंच नव्हे तर तो मोठा विद्वानांचा आश्रयदाता होता. ए. इ. पा. २०० वर दिलेल्या लेखांत त्याची केलेली स्तुति उतरून घेण्यासारखी आहे. "याच्या राज्यांत विरोधाचें नांवच राहिलें नाहीं. कारण लक्ष्मी आणि सरस्वती यांच्यामधील वैरहि त्यानें काढून* टाकलें." याच्या राज्यांत सर्व लोक सुखांत होते, आणि सर्व तऱ्हेचें धान्य समृद्ध होतें असेंहि वर्णन आहे. हा लेख इ. स. ११९५चा म्हणजे पृथ्वीराजानें परमर्दीचा पराभव केल्यानंतर तेरा वर्षांनीं केलेला आहे.

चंदेल्लघराण्याचा मोठेपणा परमर्दीबरोबर संपला. तथापि हें घराणें बुंदेलखंडांत त्यानंतर बरीच वर्षें राज्य करीत राहिलें. त्रैलोक्यवर्मन् त्यामागून गादीवर आला. त्याचा पुत्र वीरवर्मन् यानें एक

---

*परस्परविरोधस्य तस्य राज्ये कथैव का ।
संगतं श्रीसरस्वत्योरपि येन प्रवर्तितम् ॥

लेख लिहिला आहे त्यांत तुर्कांच्या विपत्तिसमुद्रांतून भूमीस वर काढणारा असें त्रैलोक्यवर्मनचें वर्णन केलें आहे. यावरून त्यानें कालंजर किल्लयांतून तुर्कांस हांकललें व चंदेलांच्या पूर्वींच्या राज्याचा बराच भाग आपल्या अमलाखालीं आणला.* किल्लयावरील एका लेखावरूनहि किल्ला परत घेतल्याचें शाबित होतें ( स्मिथ ). त्रैलोक्यवर्मन् यानें १२०३पासून १२४५ पर्यंत बरींच वर्षे राज्य केलें. त्याच्या मागून त्याचा पुत्र वीरवर्मन् गादीवर आला. त्याचे बरेच लेख सांपडले आहेत. ( किलहॉर्ननें इ. स. १२५१ पासून इ. स. १२८६पर्यंत पांच लेख दिले आहेत ). वर सांगितलेल्या इ. स. १२६१ च्या लेखांत ( ए. इं. १ पा. २२७ ) त्याची राणी राजपूत दधीच वंशांतील ( यांना दाहिमाहि म्हणतात ) कल्याणदेवी नांवाची होती असें सांगितलें असून हा लेख तिनें बांधलेल्या एका विहिरीवर आहे. यावेळीं चंदेल्लांचें राज्य किती मोठें होतें हें सांगतां येत नाहीं. मदनवर्मन्च्या वेळेस चंदेल्लांचें राज्य दक्षिणेस भैल्लस्वामी अथवा भेलसा येथवर होतें यांत शंका नाहीं ( इं. ए. १६ पा. २०८ ). वीरवर्मनच्या मागें भोजवर्मन् राजा झाला. त्याचे दोन लेख सांपडले आहेत. पैकीं एक इ. स. १२८८चा आहे. यापुढें चंदेल्लघराण्याचा थांग लागत नाहीं. पण कीरतसेनानें शीरशहास विरोध केला आणि प्रसिद्ध पराक्रमी राणी दुर्गावती हिनें अकबराच्या सेनापतीशीं लढाई देऊन भा. २ पा. १३३ यांत सांगितल्या प्रमाणें रणांगणावर देह ठेविला, या दोन हकीकती मात्र यापुढें मिळतात. हल्लीं चंदेल्लांचे वंशज प्रसिद्ध बंगाल्यांतील गिधोरचे महाराज आहेत.

---

*त्रैलोक्यमल्लश्च शशास राज्यं प्रसिद्धदुर्गप्रविधानवेधाः ॥
तुरुष्ककुल्यांबुधिमग्नधात्री समद्धर्तिं विष्णुरिव प्रतन्वन् ॥

## महोबाच्या चंदेल्लांची वंशावळ.

१ गंड ( इ. स. १०००ते१०२० ) ले. १००२,१९,२२.

२ विद्याधर ( १०२०--१०३० )

३ विजयपाल ( १०३० -१०४० ) राणी भुवनदेवी

४ देववर्मन् ( १०४०-१०६० ) ले. १०५१

५ कीर्तिवर्मन् ले. १०९८ ( १०६०-११०० )

६ सल्लक्षण ( ११००-१११० )

७ जयवर्मन ले. १११७ ( १११०ते११२० )

८ पृथ्वीवर्मन् (११२०ते११२५)

९ मदनवर्मन् (११२५-११६५) ले. ११२९ ३०,३१,३९,५१, ५५,५८,६२.

प्रतापवर्मन्

यशोवर्मन

१० परमर्दिदेव ( ११६५-१२०३ ) ले. ११६७, ६८,७१,८२,८४,९५,१२०१.

११ त्रैलोक्यवर्मन् ( १२०३-१२४५ )ले.१२१२,

१२ वीरवर्मन् राणी कल्याणदेवी ले. १२६१. ( १२४५-१२८७ )६२,६८,८१,८६.

१३ भोजवर्मन् ले. १२८८.

## टिप्पणी.

खजुराहो व महोबा. (सरव्हिन्सेन्ट स्मिथ. इं. ऍ. ३७.)

चंदेल्लांची जुनी राजधानी खजुराहो हल्लीं छत्रपूर संस्थानांत महोबाच्या दक्षिणेस एक क्षुल्लक खेडें आहे. बुंदेलखंड अथवा जझोती ( जजाकमुक्ति ) याची हुएनत्सांगनें सांगितलेली प्राचीन राजधानी सागर जिल्ह्यांतील एरण होती (मद्रास येथील प्राच्य कोविदांच्या कान्फरन्समध्यें वाचलेल्या निबंधांत हिरालाल ही गोष्ट मान्य करीत नाहींत). जझोतीच्या मर्यादा हल्लीं जझोतिया ब्राह्मण राहातात त्यानें अद्यापहि निश्चित होते. पुढें सांगितल्याप्रमाणें बाराव्या शतकापासून ब्राह्मणांचे भेद त्यांच्या देशावरून पडले. अर्थात् जझोतीमध्यें राहणारे ब्राह्मण जझोतिया व चेदी या देशांत राहणारे ब्राह्मण राजधानी त्रिपुरवरून तिवारी, त्याचप्रमाणें कनोजमध्यें राहणारे ब्राह्मण कनोजिया म्हटले जातात. असो, बुंदेलखंडची राजधानी खजुराहो दहाव्या शतकांत मुसलमानी स्वाऱ्यांच्या बाहेर होती. आणि अकराव्या बाराव्या शतकांत महोबा राजधानी असल्यानें खजुराहो मुसलमानांच्या तडाक्यांतून वांचलें. यामुळें सुदैवानें तेथील प्रचंड व सुंदर देवळें अद्याप जशींच्या तशींच आहेत.आणि त्यामुळें त्या काळचें हिंदूलोकांचें कलाकौशल्य व चंदेल्लांचें वैभव आणि धर्मौत्सुक्य अद्याप आपल्यास दृष्टीस पडतें. खजुराहो येथील सर्वांत मोठें देवालय म्हणजे धंगानें बांधलेलें खंडेरिया महादेवाचें देऊळ होय. त्याच्या खालोखाल त्याच राजानें बांधलेलें विश्वनाथाचें व लालजीचें देवालय आणि त्याचा बाप यशोवर्मन् यानें बांधलेलें रामचंद्राचें देवालय आहेत. याच काळात बांधलेलीं दोन जैन देवालयेंहि पाहण्यासारखीं आहेत. देवी जगदांबी आणि कुंवरमठ हीं स्थानेंहि उत्तमांपैकीं आहेत. वरील खजुराहो येथील देवालयें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व देवालयांत अधिक सुंदर असून त्यांची सुबक रचना, त्यांचें अवाढव्य प्रमाण आणि त्यावरील बारिक कोरीव काम हीं वाखाणण्यासारखीं आहेत. त्यावरील वाटोळीं शिखरें खांबांच्या आधाराशिवाय बनविलेलीं असल्यामुळें विशेष लक्ष देण्यासारखीं आहेत.

या कालविभागांत महोबा चंदेल्लांची राजधानी होऊन तेथेंहि अनेक प्रेक्षणीय स्थळें निर्माण झालीं आहेत. विशेषतः मागील व ह्याहि कालविभागांतील चंदेल्ल राजांनीं बांधलेल्या तलावांनीं महोबा नामांकित झालें आहे. पूर्वींच्या कालविभागांत राहिलानें राहिल्य–सागर बांधला, आणि या कालविभागांत कीर्तिवर्मनानें कीरतसागर बांधला. मदनवर्मन् यानें पूर्वोक्त मदनसागर व त्याच्या कांठावरील दोन काळ्या दगडाचीं देवालयें आणि काकरिया मठ हे बांधले. बांदा जिल्ह्यांत महोबा हें हल्लीं तहशिलीचें ठिकाण आहे; आणि झांशी-माणिकपूर रेल्वेवरील एका स्टेशनावरून त्यास रस्ता जातो.

चंदेल्लांच्या राज्यांत अनेक नामांकित किल्ले होते. सर्वांत जास्त महत्वाचे ग्वाल्हेर व कालंजर हे किल्ले अल्बेरूनीनेंहि सांगितलें आहेत. कालंजर तर महाभारतकाळापासून शिवाचें पवित्र क्षेत्र म्हणून प्रसिद्ध आहे. या पहाडाच्या चारी बाजू उभ्या असून वर पुनः एक भिंत बांधलेली आहे; व वर जाण्याच्या रस्त्याला जागजागीं दरवाजे बांधलेले असून तेहि फार पुराणे आहेत. ज्या वेळेस मुसलमानांनीं कालंजर घेतलें त्या वेळेस त्रैलोक्यवर्मन् हा अजयगड येथें कांहीं काल रहात होता. हाहि किल्ला मोठा मजबूत आहे. कालंजर व अजयगड या दोन्ही किल्ल्यावर अनेक शिलालेख आहेत.

# प्रकरण सहावें.

## चेदींचे कलचुरी हैहय राजे.

मागील कालविभागांत असलेलें व या कालविभागांत जास्तच वैभवास चढलेलें तिसरें राजपूत घराणें चेदींचें हैहय रजपूत कुल होय. भा. २ पा. २११ वर सांगितल्याप्रमाणें हें घराणें प्रसिद्ध शुद्ध क्षत्रियांचें होतें; कित्येक कल्पना करतात त्याप्रमाणें नवीन झालेले अशुद्ध क्षत्रिय नव्हते. ते चंद्रवंशी होते व पुराणांत प्रसिद्ध असलेला रावणाला जिंकणारा सहस्रार्जुन याजपासून उत्पन्न झालेले होते. चेदींच्या या काळांतील लेखांतहि ही गोष्ट सांगितली आहे. किंबहुना एका लेखांत ( इं. ए. १८ पा. ११६ ) त्यांचें गोत्र आत्रेय दिलें आहे. ही गोष्ट या काळच्या इतर कोरीवलेखांत बहुधा सांपडत नाहीं. यावरून असें दिसतें कीं, हें कुल धर्माभिमानी व धर्माचरणी होतें. त्यांच्या इतिहासावरूनहि हीच गोष्ट दिसेल. बहुतेक राजपुतांप्रमाणें यांचें कुलदैवत शिव होतें. आणि त्यांची राजधानी जबलपुराजवळील त्रिपुर होती. त्रिपुर किंवा तिउर येथील तिवारी ब्राह्मण उत्तर हिंदुस्थानांतील ब्राह्मणांची एक प्रसिद्ध शाखा आहे.

या कालविभागाच्या आरंभीं त्रिपुरांत गांगेय राज्य करीत होता. मागील भागांत याचा राज्यारोहण-काल दर पिढीस वीस वर्षे धरून आम्हीं १०२० इ. दिला आहे. पण बहुधा तो राज्यावर यापूर्वी बराच काल आला असावा. या वंशांतील तो सर्वांत अधिक कीर्तिमान् राजा होता. त्यानें सोनें, चांदी व तांबें यांचीं पुष्कळ नाणीं पाडलीं. तीं हल्लीं पुष्कळ सांपडतात. व चमत्कार हा आहे कीं, याचींच नाणीं सांपडतात; याच्या मागून झालेल्या राजांचीं सांपडत नाहींत. या नाण्यांच्या तऱ्हेचें अनुकरण शेजारच्या कित्येक राजांनीं केलें व

महंमद घोरीनेंहि केलें (गौरीशंकरचा डॉड). कनोजच्या प्रतिहार सम्राटांच्या पडत्या स्थितीचा फायदा घेऊन यानें विस्तृत प्रदेश जिंकले. कनोजचे पूर्वेकडील प्रदेश त्या राज्यांतून सुटून गांगेयाच्या ताब्यांत आले. बनारस त्याचे ताब्यांत होतें. हें नियालतगीननें बनारस लुटल्याची जी हकीकत आम्हीं पूर्वी दिली आहे तेथें सांगितलेंच आहे. (ईलि. २. बैहकी.)

त्यानें तेलंगण अथवा त्रिकलिंग यास प्राच्य चालुक्यांपासून (यांस चोलानीं यावेळीं नष्ट केलें) जिंकून घेतलें. माळव्याच्या भोजाशींहि याचें युद्ध झालें त्यांत याचा बहुधा पराभव झाला. पण परमार किंवा चेदी यांच्या लेखांत या गोष्टींचा दाखला मिळत नाहीं. गझनीच्या महमुदानें यास त्रास दिलेला दिसत नाहीं. त्याची स्वारी चंदेल्लांच्या कालंजरपर्यंतच गेली, पलीकडे गेली नाहीं. तथापि गांगेयाची कीर्ति एवढी होती कीं, अल्बेरूनीनें त्याचें नांव सांगितलें आहे. चेदींच्या लेखांत याजविषयीं विशेष हकीकती सांगितल्या नाहींत. पण त्यास विक्रमादित्य ही संज्ञा त्यांत बहुधा लावली आहे (ए. इं.२ पा.३). त्याचा एकच लेख इ. स. १०६७चा सांपडला आहे (किलहॉर्न ए. इं.८) आणि बहुधा तो इ. स. १०३८मध्यें दिवंगत झाला असावा. म्हातारपणीं तो प्रयागास जाऊन राहिला आणि तेथें वारला असें कांहीं लेखांत सांगितलें आहे. त्याच्या चितेवर शंभर राण्या जळून सती गेल्या ही एका चेदी कोरीवलेखांत सांगितलेली गोष्ट बहुधा अतिशयोक्ति असावी (ए. इं. २ पा. ३). त्याच्या मागून त्याचा पुत्र कर्ण गादीवर बसला. हा त्याहूनहि जास्त महान् राजा झाला. त्यानें अधिक विस्तृत प्रदेश जिंकले. त्याची सत्ता बनारस पलीकडे बिहारांत होती. बनारसेंत त्यानें कर्णमेरु नांवाचें देऊळ बांधलें. चेदींच्या लेखांत त्यास त्रिकलिंगाधिपति असें म्हणलेलें आहे (ए. इं. २ पा. ३०८). त्यानें चोलांपासूनहि तेलंगणाचा बराच भाग जिंकला.

त्यानें कर्णावती नांवाचें एक नवीन नगर वसवून तें वेदवित् ब्राह्मणांस अग्रहार दिलें ( ए. इं. २ पा. ३ ). हें हल्लीं तेऊर जवळ कर्ण वेल नांवाचें खेडें आहे. त्यानें अनेक राजे जिंकले. या राजांची यादी नेहमीप्रमाणें चोल, पांडय, मुरल, अंग, वंग, कलिंग या नांवानीं भरलेली आहे. चंपारण्य यानें उध्वस्त केलें असें ( ए. इं. २ पा. १० ) सांगितलें आहे. किलहॉर्नच्या मतें चंपारण्य म्हणजे मध्यप्रांतांतील एखादी अप्रसिद्ध जागा असावी. पण रा. जयस्वालानें हें बिहारांतीलच प्रसिद्ध चंपारण्य होय असें योग्य रीतीनें अलीकडे दाखविलें आहे. आणि त्या देशापर्यंत कर्णानें प्रदेश जिंकला यांत संशय नाहीं ( बिहार व ओरिसाचे जर्नल १९२४ ). एकशें छत्तीस राजे त्याची सेवा करीत होते ( गौरीशंकरचा टॉड ). भोज मेल्यावर त्यानें माळवा उध्वस्त केला, आणि त्याच्या पुत्रास देशोधडीला लाविलें हें पूर्वी सांगितलेंच आहे. ही हकीकत परमारांच्या नागपूर प्रशस्तींत सांगितली आहे. पण चेदीच्या कोरीव लेखांत ती दिलेली नाहीं याचें आश्चर्य वाटतें. बहुधा माळवा कर्णाच्या ताब्यांत थोडाच वेळ राहिला; आणि तो उदयादित्यानें लवकरच परत घेतला, यामुळें चेदीच्या लेखांत ह्या विजयाचें महत्व नाहीं.

दुसरा एक लेख ( इं. ए. १८ पा. २१६ ) त्यानंतर शंभर वर्षांचा असून त्यांत त्यानें जिंकलेल्या दक्षिण देशांत चोल आणि पांड्या, पूर्व देशांत हूण आणि गौड आणि उत्तरेकडे गुर्जर आणि कीर असे सांगितलेले आहेत. अर्थात् त्याचा विजय उत्तरेकडे हिमालयापर्यंत गेला होता. ही गोष्ट खरोखरच संभवनीय दिसते कीं, उत्तरेकडे गुर्जर म्हणजे प्रतिहार सम्राट् तुर्कांचें मांडलिकत्व मानून होते त्यांस कर्णानें जिंकून तुर्कांस देशांतून हाकलून दिलें. ही गोष्ट कर्णाचें नांव गाहडवालांच्या लेखांत ज्या रीतीनें आलें आहे त्यावरून निश्चित दिसते. हा लेख ( इं. ए. १४ पा. १०३ ) पूर्वीच उल्ले-

खिला आहे. परकी राष्ट्रांच्या लेखांत मिळालेला हा पुरावा अत्यंत महत्वाचा असून तो पुढीलप्रमाणें आहे. "भोज स्वर्गास गेला आणि कर्ण कीतिशेष झाला, तेव्हां पृथ्वीला अतिशय त्रास झाला. परंतु तिला गाहडवाल चंद्रदेव याच्या ठिकाणीं आश्रय मिळाला." या वाक्यांतील भोज माळव्याचा आहे आणि कर्ण हा चेदीचा राजा कर्ण आहे. या दोघांनीं तुर्कांशीं युद्ध करून मध्यदेशास त्यांच्या त्रासापासून मुक्त केलें होतें. भोजानें सुमारें १०२० पासून १०४० पर्यंत आणि कर्णानें बहुधा १०४० पासून १०८० पर्यंत. चंद्रदेवानें कनोज जिंकून निर्माल्यवत् झालेल्या प्रतिहारांचा या सुमारास उच्छेद केला. 'जेव्हां पृथ्वीस त्रास झाला' ह्या वाक्यांत तुर्कांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्यांचाच उल्लेख आहे. या काळांत यांचें राज्य पंजाबांत कायम झाल्यानें तेथील राजधानी लाहोर येथून मध्यदेशांत ते वारंवार स्वाऱ्या करीत. या प्रकारची एक स्वारी इ. स. १०५०त लिहिणाऱ्या" बैहकीनें वर्णिली आहे. तो म्हणतो, "लाहोरचा सुभेदार नियाल्तगीन यानें बनारसेवर स्वारी केली. या शहरास महमूद सुद्धां पोहोंचला नव्हता. नियालतगीनानें इ. स. १०३३त काशीस पोचून बाजार लुटला. या वेळेस तेथें गंगाचें (गांगेयाचें) राज्य होतें." पण हें बहुधा पूर्ण बसलें नव्हतें. कर्णानें शेवटीं बनारस आपल्या पक्कें ताब्यांत घेतलें; आणि उत्तरेकडे हिमालयाच्या डोंगरांतील कीर लोकांवरहि स्वारी केली. अर्थात् त्यानें तुर्कांचा जुलूम अगदीं मिटविला. बिहार व चंपारण्य हें सुद्धां त्यानें जिंकलें.

भोजाच्या प्रसिद्ध उदाहरणाचें अनुकरण करण्याचा प्रयत्न प्रत्येक हिंदु राजा करूं लागला, त्याप्रमाणें कर्णानेंहि विद्वानांस आश्रय दिला. ही गोष्ट एका लेखांत सहजगत्या आली आहे. "त्याची कीर्ति

कवींनीं वाढविली व त्याच्या मनाचें इंद्रियाप्रमाणें विनोदन केलें*" ( इं. ए. १८ पा. २१६ ). या कवींचीं नांवें अजून समजलीं नाहींत. कदाचित् संशोधकांचें लक्ष इकडे अद्याप गेलें नसावें.

कर्णानें बरींच वर्षें राज्य केलें असा समज आहे. किंबहुना तो बाराव्या शतकाच्या आरंभापर्यंत राज्य करीत होता असें मानतात. पण वरील बाहडवालांच्या लेखांत चंद्रदेवानें कर्ण वारल्यावर ( इ. स. १०९०च्या सुमारें ) कनोज जिंकलें असें सांगितलें आहे. यासाठीं कर्णाचा राज्यकाळ इ. स. १०४० ते १०८० पर्यंत आम्ही मानतों. त्यानें कलचूरी घराण्यास यशाच्या शिखरास पोहोंचविलें; सुदैवानें त्याचा पुत्रहि हें यश पुढें चालविण्यास योग्य होता.

हा पुत्र यशःकर्ण कर्णाची एक राणी हूण राजकन्या अवल्लदेवी हिच्या पोटीं जन्मलेला गादीवर आला. यानेंहि पुष्कळ वर्षें म्हणजे इ. स. १०८० पासून सुमारें इ. स. ११२४पर्यंत राज्य केलें. यानें आंध्राचा पराभव केला असें लिहिलें आहे. यांत दक्षिणच्या चोल राजांचा किंवा कलिंगनगराच्या गंगांचा त्यानें पराभव केला, असा अर्थ होतो. गोदावरीच्या मुखाजवळ आंध्र देशांत असलेल्या भीमेश्वरशिवाचें त्यानें पूजन केलें असें वर्णिलेलें आहे ( ए. इं. २ पा. ३). याच्याहि लखांत इ. स. ११२२ त ही गोष्ट सांगितलेली आहे. गाहडवालानीं कनोज घेऊन उत्तरेस आपली सत्ता स्थापन केल्यामुळें याचा उत्तरेकडील राज्यविस्तार संकुचित झाला असला पाहिजे. गोविंदचंद्रानें यानें इ. स. ११२० त केलेलें एक दान पुनः कायम केलें, यावरून उत्तरेकडील याच्या राज्याचा कांहीं भाग कनोजच्या ताब्यांत होता असें स्पष्ट दिसतें. काशी तर चंद्रदेवाच्या लेखांत सांगि-

---

* अनीयन्त परामृद्धिं यशःसंवेदनैः श्रियः ।
मनोविनोदनैर्यस्य कवीन्द्रैरिन्द्रियैरिव ॥

तल्याप्रमाणें त्याच्या ताब्यांत गेलीच होती. माळव्याचा लक्ष्मदेव यानेंहि याचा पराभव केला असें सांपडतें.

यशःकर्णामागून त्याचा पुत्र गयकर्णदेव गादीवर आला. यानेंहि पुष्कळ वर्षें जोरानें राज्य केलें असें कोरीवलेखावरून दिसतें. मेवाडच्या गुहिलोत घराण्यांतील राजकन्या आल्हणदेवी ही ह्याची राणी होती. तिनें एक कोरीवलेख केला असून तिची कुलपरंपरा त्यांत येणेंप्रमाणें दिली आहे ( भेराघाट लेख ए. इ. १ पा. १० ). " गोभिलगोत्रांत हंसपाल राजा झाला, त्याचा पुत्र वैरिसिंह, त्याचा पुत्र विजयसिंह, त्याची राणी धारा नगरीचा राजा उदयादित्य याची कन्या शामलादेवी होती. तिची मुलगी आल्हणदेवी. " या वर्णनावरून दोन तीन गोष्टी दिसतात. रजपूत लोक कुलनांवालाच यावेळीं गोत्र मानूं लागले. गोभिल म्हणजे गोहिल कुलनांव होतें. रजपूत ऋषिगोत्र कमी महत्त्वाचें मानूं लागले असावे. कारण ऋषिगोत्र पुरोहिताचे आहे, अशी कल्पना यावेळीं चालू झाली. यावेळच्या कुलनामांसच गोत्र म्हटलेलें कित्येक लेखांत आढळतें. दुसरें, गुहिलोत राजांचा वंश मेवाड लेखकांनीं हंसपाल, वैरिसिंह, विजयसिंह असा दिलेला यावरूनहि बरोबर ठरतो. ह्याविषयीं पूर्वी आपल्यास थोडासा संशय आलेला होता ( इं. ए. १८ पा. २१६ पहा ). ३ यांत मेवाडच्या ऐवजीं प्राग्वाट हा शब्द वापरला आहे. याचा अर्थ काय हें नीट समजत नाहीं. पण प्राग्वाटांत माळव्याचा अन्तर्भाव निःसंशय दिसतो व उदयादित्य परमार माळव्याचा राजा धारानगरींत राज्य करीत होता असें स्पष्ट दिसतें. शेवटली गोष्ट ही कीं, चेदीचें हैहय कुल उत्तम रजपूत कुल मानलें जात होतें; आणि म्हणूनच मेवाडच्या गुहिलोताशीं व माळव्याच्या परमाराशीं त्यांचा विवाहसंबंध झाला. हीं दोन उत्तम रजपूत कुलें होतीं. त्याचप्रमाणें पृथ्विराज चव्हाणाची आई म्हणजे सोमेश्वराची राणी ही कुलचूरी

राजकन्या होती हें पुढें आम्ही सांगूं. ही बहुधा आल्हणदेवीचीच मुलगी असावी किंवा तिचा पुत्र नरसिंहवर्मन् याची कन्या असावी.

हा लेख इ. स. १०५५ चा आहे. यावेळीं बहुधा तिचा पुत्र नरसिंहवर्मन् अल्पवयी असून त्याची प्रतिनिधि ती होती. यशःकर्ण याचें राज्य इ. स.११२४ त, व गयकर्णाचें राज्य इ. स. ११५४ त संपलें असावें. त्याचा एक लेख इ. स. ११५१ चा मिळाला आहे (इं. ए. १८ पा. २१०). नरसिंहवर्मन् याचे तीन लेख सांपडले आहेत,११५५, ११५८, ११५९. हा लौकरच तरुणपणीं वारला. पण याचा राज्यकाळ महत्त्वाचा आहे. कारण याच्या कोरीवलेखाच्या काळापासून चेदीराजांच्या पदवींत एक फरक झाला. हा व याचे पुढचे राजे "स्वभुजसंपादित-नरपतिगजपतिअश्वपतिराज्यत्रयजेता" अशी पदवी घेऊं लागले. 'वामदेवपादानुध्यात' असेंहि ते आपल्यास म्हणवूं लागले. या पदवीचा अर्थ मुळींच लागत नाहीं. कारण यांचे पूर्वज तेच गांगेय, कर्ण, यशःकर्ण, गयकर्ण दिले आहेत. असें दिसतें कीं, पहिली पदवी यानीं कनोजच्या गाहडवालांच्या अनुकरणानें घेतली. गाहडवालहि आपल्या लेखांत यावेळेपासून पुढें ही पदवी घेतात. (गोविंदचंद्राचा दानलेख ११६८ चा इ. ए. १५ पा. ७). कनोजचे प्रतिहार सम्राट् यांस हयपति ही संज्ञा होती हें आपल्यास आठवेलच. आणि बंगालचे राजे गजपति होते (भा. २ परिशिष्ट ६ पा. ४४९). बहुधा आंध्रांचे राजे नरपति संज्ञाक असावेत; आणि ज्यानें या तीन राजांस जिंकले, त्यानें 'नरपतिगजपत्यश्वपतित्रैराज्यजेता' ही पदवी घेण्यास हरकत नाहीं. गाहडवालांनीं कनोज, बंगाल आणि आंध्रहि जिंकलें होतें; आणि चेदीनींहि जिंकलें होतें. यामुळें या दोघांनींहि ही पदवी घेतली असावी. नरसिंहानें घेतलेली ही पदवी भपक्याची दिसते तरी तो शूर होता, आणि त्यानें आंध्रांस जिंकलें होतें. पण त्याचा

पूर्वज कर्ण यानें कनोज, बंगाल, व आंध्र या तिघांस जिंकलें होतें. आश्चर्य हें कीं, कर्णानें आपल्या लेखांत ही पदवी घेतली नाहीं, त्याचा पणतु नरसिंह यानें घेतली.

इ. स. ११६९च्या त्याच्या लेखांत नरसिंहाला ‘ डहालिया महाराज ’ असें म्हटलें आहे ( इं. ए. १८ पा. २१४ ). यावरून बुंदेलखंडच्या कांहीं भागाचा तो राजा असावा असें दिसतें. यमुनानदीवरील कोसंबी जवळच्या घाटावर त्यानें एक देऊळ बांधलें, त्यावरून त्याची सत्ता यमुनेपर्यंत असावी.

नरसिंहानें इ. स. ११५२पासून इ. स. ११७० पर्यंत राज्य केलें असें मानतां येईल. त्याच्या मागून त्याचा भाऊ जयसिंह गादीवर आला. इ. स. ११७५व११७७च्या सांपडलेल्या त्याच्या दोन लेखांत त्यानेंहि वरील पदव्या घेतल्या आहेत. त्यानें बहुधा इ. स. ११७८पर्यंत राज्य केलें. कारण त्याचा पुत्र विजयसिंहवर्मन् याचा ११८०चा लेख सांपडला आहे. याचा ११९६चा आणखी एक लेख सांपडला आहे ( इं. ए. १७ पा. २२८ यांत नक्की तारीख २७ ऑक्टोबर ११९५ दिली आहे ). गौरीशंकरानें यानंतर आणखी दोन राजे म्हणजे शेवटल्याचा पुत्र अजयसिंह आणि त्रैलोक्यवर्मन् सांगितले आहेत. विजयपालाच्या इ. स. ११८०च्या लेखांत अजयसिंहाचें नांव आलें आहे, आणि त्रैलोक्यवर्मन् याचा इ. स. १२४१ चा लेख सांपडला आहे. या घराण्याचा अंत कसा झाला हें सांपडत नाहीं. बहुधा अल्तमश किंवा त्याचा मागचा सुलतान याच्या वेळीं मुसलमानांनीं तें नष्ट केलें असावें. या घराण्याच्या मोहोरेवर दोन हत्ती आणि मध्यें लक्ष्मी असें चिन्ह आहे व त्यांच्या निशाणावर नंदी आहे.

## त्रिपुरच्या हैहयांची वंशावळ.

१ गांगेय ( १०१०–१०३८ ) ले. १०३७
|
२ कर्ण ( १०३८–१०८० ) ले. १०४२
राणी आवेल्हदेवी हूणकन्या.
|
३ यशःकर्ण ( १०८०--११२४ ) ले. ११२०,११२२.
|
४ गयकर्ण ( ११२४--११५२ ) ले. ११५१
राणी आल्हणदेवी गुहिलौत कन्या.
|
५ नरसिंह ( ११५२--११७० ) ले. ११५५,५८,५९.
६ जयसिंह (११७०-११८०) ले. ११७५,७७.
|
७ विजयसिंह ( ११८०--११९८ ) ले. ११८०,११९६
|
८ अजयसिंह ( गौरीशंकर टॉड )
|
९ त्रैलोक्यवर्मन्

## टिप्पणी—कलचुरींची राजधानी तिवर अथवा त्रिपुर.

### ( जबलपूर गॅझेटियर १९०८ )

प्राचीन हिंदुस्थानांत कलचूरींची राजधानी त्रिपुर हें प्रसिद्ध शहर होतें. तें हल्लीं मोडकळीस आलेलें असून जबलपूरपासून दहा मैलावर असलेल्या हल्लींच्या तेवर खेड्याच्या रूपानें अवशिष्ट आहे. हा गांव मार्बल रॉक्स म्हणजे नर्मदेच्या काठीं असलेले संगमरवरी पहाड याजजवळ आहे. तिवरजवळ इसवी सनाच्या तिसऱ्या शतकापासूनचे लेख सांपडतात. त्रिपुरजवळ कर्णानें वसविलेलें कर्णावती शहरहि सध्यां मोडकळीस आलेलें आहे. त्याठिकाणीं हल्लीचें कर्णबेल नांवाचें खेडें आहे. येथें बेलाचीं पुष्कळ झाडें असल्यानें या नांवांत बेल शब्द आला आहे. ( कदाचित् या शहरांत कर्णानें वसविलेले ब्राह्मण बहुतेक शैव असून शिवपूजेस

लागणाऱ्या बिल्व पत्राकरितां त्यांनीं बेलाचीं झाडें लाविलीं असावीं ). शहराच्या अवशेषापैकीं सुंदर कोरलेल्या मूर्तींशिवाय येथें कांहीं उरलें नाहीं. कारण येथील घाट आणि देवळें यांतील दगड व विटा रेल्वेपूल मोऱ्या वगैरे बांधण्याकरितां हल्लीच्या काळांत कंत्राटदारांनीं नेले आहेत. एक जुनी पायऱ्यांची विहीर मात्र नुकतीच सांपडली आहे. ती झाड-झुडपात गडप झाली होती. या विहीरीचें पाणी गांवकऱ्यांना उपयोगी पडतें. एक विस्तीर्ण तलावहि या मोडलेल्या नगराजवळ आहे.

# प्रकरण सातवें.

## अनहिलवाडचे चालुक्य.

गुजराथच्या चालुक्यांच्या ( सोळंखीचा ) इतिहास बॉंबे गॅझेटियर व्हॉ. १ भा. २ यांत जैन लेखांवरून व तत्कालपर्यंत सांपडलेल्या कोरीव लेखांवरून संगृहीत करून विस्तृतरीतीनें व उत्तम तऱ्हेनें दिला आहे.त्याचें मुख्य आधार जैन ग्रंथाचा म्हणजे हेमचंदाचें द्याश्रयकाव्य आणि मेरुतुंगाचें विचारश्रेणी ज्यांत निरनिराळ्या राजांच्या कारकीर्दींच्या मित्याहि दिल्या आहेत हे होत. परंतु हे आधार व इतर प्रबंध यांत अनेक काल्पनिक किंबहुना खोट्या गोष्टी अद्भुतरस वाढविण्याकरितां दिलेल्या असल्यानें सरळ इतिहासाला त्या गोष्टी टाकून देणें भाग आहे.शिवाय हिंदु काळच्या भारतवर्षाच्या सामान्य इतिहासाला या गोष्टींचें फारसें महत्व नाहीं. यासाठीं चालुक्यांची हकीकत देतांना महत्वाच्या व अत्यंत साधार अशाच वृत्तांवर आम्ही लक्ष पुरवूं. ह्याशिवाय गॅझेटियरनंतर जे कोरीव लेख नवीन उपलब्ध झाले आहेत त्यांतील माहिती संग्रहीत करूं.

प्रथम गोष्ट ही सांगितली पाहिजे कीं ही चौलुक्यपरंपरा दक्षिणच्या चालुक्यांहून भिन्न आहे. जरी त्यांचें नांव एक दिसतें आणि जरी प्राचीन कवि व बखरकार यानीं त्यास एक मानलेलें आहे, तरी दुसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें निरनिराळ्या रजपूत कुलांच्या गोत्रांस फार महत्व आहे. आणि ब्राह्मणांत कुलनांव एक असलें तरी ब्राह्मणांत गोत्रभेदानें जसा कुलभेद होतो त्याप्रमाणें क्षत्रियांतहि होतो. कारण हीं गोत्रें त्यांचीं स्वतःचीं असून विज्ञानेश्वराच्या वेळेपासून पुरोहितांचीं गोत्रें आहेत असें मानण्यांत येऊं लागलें, पण तसें तें नाहीं. दक्षिणच्या चालुक्यांचें गोत्र मानव्य आहे. हें त्यांच्या

पुराण्या सहाव्या शतकांतील लेखांतच स्पष्ट आहे.दक्षणचे उत्तरचालुक्य तैलप वगैरे याच कुलांतले होते.त्यांनीं आपल्या लेखांत आपले गोत्र दिलेले नाहीं. गुजराथचे चालुक्यहि आपल्या लेखांत आपलें गोत्र देत नाहींत, तथापि एका चेदींच्या लेखांत त्याचें गोत्र भारद्वाज दिलेलें आढळतें (एपिं. इं. भा. १ पा. २५३ ). हा लेख दहाव्या शतकांतला आहे. तसेंच पृथ्वीराजरासामध्यें चंदानें चालुक्यांचें हेंच गोत्र दिलें आहे. हल्लींहि रेवाचे व गुजराथचे सोळंखी हेंच आपले गोत्र देतात. तेव्हां प्राचीनकाळापासून यांचें गोत्र भारतद्वाज आहे, असें निश्चित दिसतें. अर्थात् सहाव्या व दहाव्या शतकांतील दक्षिणचे चालुक्य आणि गुजराथचे चालुक्य हे भिन्न आहेत. जरी गॅझेटियर व त्याचप्रमाणें पंडित गौरीशंकर ओझा दोन्ही कुलास एक मानतात, तरी आमच्या मतें तें भिन्न आहेत.

दुसरी गोष्ट अशी कीं, ज्या भागांत या चालुक्यांचें राज्य स्थापित झालें, त्यास 'गुजराथ' ही संज्ञा अद्याप मिळाली नव्हती हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.त्यांची अनहिलवाडपट्टण ही राजधानी सारस्वतमंडळांत होती.आणि याचसाठीं मथळ्यांत यांस गुजराथचें चालुक्य न म्हणतां आम्ही अनहिलवाडचें चालुक्य असें म्हटलें आहे. गॅझेटियरनें गुजराथचें चालुक्य असें नांव दिलें आहे. पण या कुलाचा संस्थापक मूलराज याच्याच लेखांत असें म्हटलें आहे कीं, यानें सारस्वतमंडल संपादन केलें ( इं. अँ. ६ पा. १ ). बाराव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास मात्र चालुक्यांच्या लेखांत त्यांच्या देशाचें नांव गुर्जरभूमि असें येऊं लागलें. ( इं. ए. ६ नं. ४ मि. संवत् १२८० अथवा १२२३ इसवी ). या आमच्या मताला अनुकूल रा. दिवाट्या यांचेंहि मत आहे.गुजराथ हें नांव दहाशेतीस इसवीपर्यंत ( अल्बेरूनीनें आपल्या ग्रंथ यावेळीं लिहिला ) जयपुरच्या भोंवतालील प्रांताचें होतें. तें तेथून दक्षिणेकडे कां आले आणि प्रथम

हल्लीच्या गुजराथच्या उत्तरभागास आणि नंतर हल्लीच्या गुजराथच्या दक्षिणभागास लाट ही संज्ञा होती, त्यासहि कां लागूं झालें, या प्रश्नाचा योग्य निर्णय अद्याप झाला नाहीं. परंतु या देशास हें नांव येथील राज्य करणारे चालुक्य गुर्जर किंवा गुजर जातीचे होते म्हणून मिळालें ही कल्पना चुकीची आहे.पूर्वभागांत दिलेले आमचें मत अद्याप कायम आहे. कारण हे चालुक्य अथवा सोळंखी आपल्या कोणत्याहि लेखांत आपल्यास गुर्जर म्हणत नाहींत. दुसऱ्या राजांच्या लेखांत त्यास गुर्जरराजे असें म्हटलें आहे; आणि तेहि आपल्या लेखांत बाराव्या शतकाच्या मध्याच्या पुढें आपल्यास **गुर्जरभूमीचें** राजे म्हणवतात; तरी पण गुर्जरजातीचे किंवा वंशाचे हे राजे होते असें त्यांनींहि किंवा इतरांनींहि म्हटलेलें नाहीं. यामुळें गुजराथ हें नांव या प्रान्तास दुसऱ्या कारणामुळें पडलें हा निश्चय आहे.

तिसरी गोष्ट सांगणें जरूर आहे ती ही कीं, हे राजे शैव म्हणजे शिवभक्त होते. कित्येकांची समजूत आहे त्याप्रमाणें हे कधींहि जैन झाले नाहींत. हे राजे परमतसहिष्णु होते; आणि सर्व हिंदु-लोक तसेच असतात.परंतु याहिपलीकडे जाऊन ते जैनसाधूंचे प्रशं-सक व आदर करणारे होते. पण या वेळच्या इतर सर्व रजपुता-प्रमाणें ते हिंदु आणि शिवभक्तच राहिले. त्यांच्या लेखांत त्यांनीं आपल्यास कोठेंच जैन म्हटलेलें नसून या लेखांच्या प्रारंभीं जिनाची कोठेंहि स्तुति नाहीं, नेहमीं शंकराची स्तुति असते. किंबहुना या कालांतील प्रसिद्ध जैन महापंडित हेमचंद्र याचा कट्टा शिष्य राजा कुमारपाल हाहि आपल्यास शिवभक्त म्हणतो,आणि याचें वर्णन कोरीव लेखांत 'पार्वतीप्रसादलब्धलक्ष्मी' असेंच येतें.शिवाय त्यानें शिवाचीं अनेक देवालयें बांधिलीं. वस्तुतः या कुलाचा देव सोमनाथ होता. सोमनाथाचें प्रसिद्ध स्थान त्यांच्या देशांत व ताब्यांत होतें. कुमार-पालानें पुढें जैनधर्म स्वीकारला असें जैन लेखक दाखविण्याचा

प्रयत्न करितात हें खरें. किंबहुना सोळंखीराजांप्रमाणें चावडा राजेहि जैन होते असें तें म्हणतात. परंतु सोळंखींच्या अमलांत तयार झालेले कोरीवलेख अशा समजुतीस मुळींच आधार देत नाहींत. यामुळें हे राजे नेहमीं शैवच राहिले. जरी जैनधर्माला ते मदत करीत आणि यांच्या राज्यांत पुढें सांगितल्याप्रमाणें जैनधर्माचा जरी उत्कर्ष झाला, तरी हे शैवच होते असेंच आपल्यास मानलें पाहिजे.

या तीन मुख्य मतभेदाच्या महत्त्वाच्या गोष्टी सांगितल्यावर बॉंबे-गॅझेटियर व्हॉ. १ याच्या मुख्य आधारें आम्ही अनहिलवाडच्या चालुक्यांचा इतिहास सारांशरूपानें पुढें देत आहों. या कुळाचा संस्थापक मूलराज होता. तो पाटणच्या शेवटच्या चापोत्कट राजाचा भाचा होता. बहुधा या राजाच्या वेळीं राज्यांत अंदाधुंदी माजली असावी, आणि मूलराजानें आपल्या बाहुबलानें राज्य संपादन केलें आणि व्यवस्था लाविली, असेंच वर्णन नेहमीं कोरीवलेखांत येतें. गुजराथचे बखरकार मूलराजानें आपल्या मामास ठार मारून राज्य अन्यायानें हस्तगत केलें अशी जी हकीकत सांगतात ती बहुधा खरी नसावी. इ. स. ९६१ पासून ते इ. स. ९९६ पर्यंत न्यायानें आणि जोरानें सर्व कुलसंस्थापकांप्रमाणें मूलराजानें राज्य केलें. शेजारच्या राजांशीं म्हणजे कच्छच्या व सिंधच्या राजांशीं त्याचे युद्धप्रसंग झाले. त्यानें पूर्वींच मोठें असलेलें एक राज्य हस्तगत केलें होतें, तेव्हां त्यास आपली सत्ता व आपला हक्क पराक्रमानें कायम करणें जरूरच होतें. कच्छचा खेंगारराजा याच्या मदतीनें उठलेल्या "ग्रहरिपूचा" त्यानें पराभव केला. यास सिंधच्या अरबांचीहि मदत होती, व त्याजपासून त्यानें सोमनाथाच्या कबजा घेतला असें वर्णन आढळतें. ग्रहरिपु हें नांव नसून अन्वर्थानें चावडा कुलापैकीं कोणी मांडलिक बंडखोर असावा. दक्षिण व उत्तर कडील राजे

म्हणजे लाटचा बारप व सांबरचा विग्रहराज यार्शींहि मूलराजास लढावें लागलें. बारप हा कर्नाटकाचा राजा तैलप याचा सेनापति असावा. कारण परमारांच्या लेखांत कर्नाट आणि लाट हे नेहमीं एकत्र येतात. लाट हा एक मांडलिक प्रांत असून तेथें एक कर्नाटकचा प्रांताधिकारी राज्य करी. बारप लढाईंत मारला गेला असें वर्णन आहे. मूलराजानें या दोन्ही राजांशीं निरनिराळी लढाई देऊन त्यांच्या स्वाऱ्यांचा प्रतिकार करून आपलें राज्य सुरक्षित ठेवलें. यानंतर म्हातारपणीं मूलराजानें आपलें आयुष्य धार्मिककृत्यांत घालविलें. त्यानें पाटण येथें एक शिवालय बांधलें. हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांतून विद्वान ब्राह्मण बोलावून त्यानें सिद्धपूर वगैरे ठिकाणीं त्यांस वसविलें. गुजराथेंतील औदीच्य व गौड ब्राह्मण आपण मूलराजाच्या वेळेला आलों असें मानतात.

मूलराजानंतर त्याचा पुत्र चामुंड गादीवर वसला. त्यानें इ. स. ९९७ पासून इ. स. १०१० पर्यंत राज्य केलें असें जैन बखरकार म्हणतात. यानें माळव्याचा सिंधुराज यास लढाईंत ठार मारलें असें कुमारपालाच्या वडनगर–प्रशस्तींत वर्णन आहे. या लढाईची तारीख पंडित गौरीशंकरानें इ. स. १०१० मानली आहे. ( भा. २ पा. १२३ पहा ). या वर्षाच्या नंतर ती मानणें शक्य नाहीं; पण ती यापूर्वींहि झालेली असूं शकेल. कारण पूर्वीं सांगितल्याप्रमाणें माळव्याच्या भोजाचा राज्यारंभ इ. स. १०१० च्या पूर्वींहि दिसतो. मुंजानें मूलराज काशीयात्रेस जात असतां त्याचा अनादर केला आणि चामुंडानें याबद्दल सूड घेतला अशी जी गोष्ट सांगतात ती कल्पित असावी.

चामुंडाला तीन पुत्र होते. वल्लभ, दुर्लभ आणि नागराज. ज्येष्ठ गादीवर बसला व थोडाच वेळ राज्य करून मरण पावला, यामुळें त्याचें नांव कोरीवलेखांत पुष्कळ वेळ येत नाहीं. त्याचा भाऊ दुर्लभ

त्याच्यानंतर गादीवर आला. त्यानें इ. स. १०१० पासून १०२२ पर्यंत बारा वर्षें राज्य केलें. याच्या कारकीर्दीत विशेष गोष्ट झालेली बखरींत किंवा कोरीवलेखांत दिलेली नाहीं. यानंतर त्याचा पुतण्या नागराजाचा पुत्र भीम पहिला गादीवर बसला. हा मोठा पराक्रमी राजा झाला. यानें इ. स. १०२२ पासून १०६४ पर्यंत बेचाळीस वर्षें राज्य केलें. माळव्याचा भोज आणि चेदीचा कर्ण यांच्याशीं तो समकालीन होता. हेहि मोठे बलवान् व पराक्रमी राजे होते. भोजाशीं झालेल्या याच्या लढायांचें वर्णन पूर्वी आलेंच आहे. असें म्हणतात कीं, कर्णानें भोजाचा पराभव केला, त्यावेळीं भोजानें एक सुवर्णाची पालखी त्यास नजर केली. भीमानें भोज व कर्ण या दोघांचाहि पराभव करून कर्णापासून ही सुवर्ण पालखी घेऊन आपलें कुलदैवत प्रभासपाटणचा सोमनाथ यास अर्पण केली. या गोष्टी खऱ्या किंवा खोट्या असोत, हे तिन्ही राजे मोठे पराक्रमी असून यांच्यांत वारंवार लढाया चालत व मधून मधून मैत्री व एकी होई यांत शंका नाहीं. कर्ण आणि भीम मिळून भोजाच्या मृत्यू-नंतर माळव्यावर स्वारी करून माळव्याचा त्यांनीं विध्वंस केला ही गोष्ट खोटी आहे, हें आम्ही पूर्वीं सांगितलेंच आहे. माळव्याच्या लेखांवरून स्पष्ट दिसतें कीं फक्त चेदीच्या कर्णानें माळव्यावर स्वारी केली. अर्थात् गुजराथच्या बखरकारांनीं यासंबंधीं तिखटमीठ लावून सांगितलेली हकीकत खरी नाहीं.

या राजाच्या वेळीं गझनीच्या महमुदाची प्रसिद्ध सोमनाथावरील स्वारी झाली. ही स्वारी खरोखर झाली कीं नाहीं याचा आम्ही अन्यत्र विचार केला आहे. सोमनाथ येथील एका कोरीवलेखांत असें वर्णन आहे कीं, "भीमानें सोमनाथाच्या पूर्वीच्या लांकडी देवळाऐवजीं दगडाचें देऊळ बांधिलें." आतां उदेपूर प्रशस्तीमध्यें भोजानें सोम-नाथाचें देऊळ बांधिलें असें वर्णन असल्याचें आपण पाहिलेंच

आहे. गॅझेटियरमध्यें सोमनाथाच्या लेखाचा ठाव ठिकाणा दिलेला नाहीं, त्यामुळें तो लेख काय किंमतीचा आहे हें आम्हांस सांगतां येत नाहीं. आपल्यास अशी कल्पना करितां येईल कीं, भोज आणि भीम, दोघांनीं मिळून दगडी देऊळ बांधिलें. व खरोखर पाहतां भीमाची मान्यता व मदत मिळाल्याशिवाय भोजास देऊळ बांधणें शक्यच नव्हतें.

भीमाच्या मागून त्याचा दुसरा मुलगा कर्ण हा गादीवर बसला. वडील मुलगा मूलराज बापाच्या हयातींतच मेला होता. कर्णानें इ. स. १०६४ पासून इ. स. १०९४ पर्यंत शांतपणें राज्य केलें. कर्णसर नांवाचा एक तलाव त्यानें बांधला, त्यानें एक नगर बांधून त्यास कर्णावती नांव दिलें. ही त्याची दुसरी राजधानी झाली. हेंच हल्लींचें अहमदाबाद. सर्व पराक्रमी हिंदु राजांप्रमाणें यानेंहि शिव आणि दुर्गा यांचीं अनेक देवालयें बांधिलीं. शेजारच्या राजाशीं याचीं थोडींच युद्धें झालीं. पण हम्मीर–चरित्रांत असें वर्णन आहे कीं, सांबरचा चव्हाण राजा दुस्सल याच्याशीं झालेल्या लढाईंत कर्ण मारला गेला.

किलहॉर्नच्या वंशावळींत (ए. इं. ८) भीमाच्या नांवावर एकच कोरीव लेख दिलेला आहे. तो इ. स. १०२९ मधला असून त्यांत भीमाबद्दल कांहींच माहिती मिळत नाहीं (इ. ए. ६ पा. १९३). कर्णाच्या नांवावरहि एकच आहे. तो इ. स. १०९१ मधला असून त्यांतहि कर्णाबद्दल विशेष माहिती नाहीं (इं. १ पा. ३१७). कुमारपालाच्या वडनगर–प्रशस्तींतहि दोघांबद्दल विशेष माहिती नाहीं. "माळव–चक्रवर्तीची धारानगरी पंचधारामध्यें (धावण्याची तऱ्हा किंवा शस्त्राची धारा) यांत प्रवीण असलेल्या आपल्या कुशल अश्वदलाच्या जोरावर त्यानें जिंकली" असें त्यांत म्हटलें आहे. आणि कर्णाबद्दल मामुली प्रशंसा केली आहे. इ. स. १०९१ मधील कर्णाच्या लेखावरून असें सिद्ध होतें कीं, गुजराथच्या बखरकारांनीं

कर्णाची राज्यमर्यादा इ. स. १०६४ पासून इ. स. १०९४ पर्यंत दिली आहे ती योग्य आहे.

कर्णानंतर त्याचा पुत्र जयसिंह गादीवर बसला. याची आई कर्नाट-कदंब-राजकन्या होती. कर्णाच्या म्हातारपणीं तिचें लग्न झालेलें दिसतें. कर्णाच्या मृत्युसमयीं जयसिंह लहान होता. अर्थात् जयसिंहाच्या आईनें कांहीं दिवस राज्यकारभार चालविला. तिच्या मदतीस लायक व स्वामिभक्त कारभारी होतो. जयसिंह ऊर्फ सिद्ध-राज हा गुजराथ चालुक्यांपैकीं सर्वांत अधिक बलवान राजा झाला. यानें अनेक इमारती बांधल्या. गुजराथेंतील कोणतीहि जुनी इमारत जयसिंहसिद्धराजानें बांधली असें लोक म्हणतात. सिद्धपूर येथील रुद्रमाल ( रुद्रमहालय ) नांवाचें प्रसिद्ध शिवालय त्यानें बांधलें. याचे फक्त अवशेषच शिल्लक आहेत, पण त्यांवरून सुद्धां संपूर्ण देवालय किती प्रचंड आणि उत्तम कारागिरीचें होतें हें लक्षांत येतें. पाटण येथील सहस्रलिंग नांवाचा तलाव त्यानें बांधला. त्यानें मोठालीं युद्धेंहि केलीं. माळव्याशीं त्याचें युद्ध बारा वर्षं चाललें होतें. याचा प्रारंभ नरवर्मन् परमाराच्या वेळीं माळव्यावरील स्वारीनें झाला व अंत यशोवर्मन्चा पराभव व कारागृहवास यानें झाला, हें पूर्वीं सांगितलेंच आहे. धारा काबीज करून तो पुढें मदनपाल चंदेलवर चालून गेला व त्यापासून त्यानें खंडणी घेतली. पण चंदेलांच्या कालंजर येथील एका लेखांत जयसिंहाचा पराभव झाला असें लिहिलें आहे ( जे. बी. ए. एस १८४८ पा. ३१९). माळवा त्यानें जिंकला यांत शंका नाहीं व माळव्याचा बराच मोठा भाग पुष्कळ काळ पावेतों गुजराथच्या ताब्यांत राहिला. यामुळें कोरीवलेखांत ‘ अवंतिनाथ ’ अशी यास संज्ञा पुष्कळदां येते. एका कोरीवलेखांवरून असें दिसतें कीं, त्यानें कच्छ प्रांत जिंकून तो आपल्या राज्यास जोडला व तेथें प्रांताधिकारी नेमून राज्य चालविलें. कोरीव-

लेखांत यास बर्बरकजेता असेंहि म्हटलेलें असतें. या शब्दावर बऱ्याच दंतकथा रचल्या आहेत व बरेच तर्क बांधले गेले आहेत. दंतकथाचें तात्पर्य असें कीं, बर्बरक म्हणजे भूतपिशाच्चांचा राजा. आणि जयसिंहसिद्धराजास भूतपिशाच्चांवर इतकी सत्ता मिळाली होती कीं, त्यास वाटेल तें सिद्ध करतां येई. ह्या गोष्टी अविश्वसनीय असल्यानें ह्या शब्दाची व्युत्पत्ति प्राचीन–इतिहास-संशोधकांनीं निराळ्या तऱ्हेनें लावण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मतें बर्बरक म्हणजे कोणी जंगली लोक असावेत किंवा म्लेच्छ असावेत. पुराणांतरींचे बर्बर हेच ते होत; ह्मणजे बर्बर म्हणजे आफ्रिकेंतील बर्बर होत. व्युहलरच्या मतें हल्लीं काठेवाडच्या दक्षिण भागांत असलेलें बाबरे भिल्ल हे ते असावेत ( गॅझेटियर ). आमच्या मतें बर्बर ह्मजे अरब होत ( व्हॉ. १ पा. ३५४ पहा ). सिंधमधून आलेल्या अरबांच्या स्वारीचा जयसिंहानें पराभव केला असावा.

भोजाच्या प्रसिद्ध उदाहरणाच्या अनुकरणानें जयसिंह हाहि विद्वानांचा चाहता होता. मोटमोठे जैन व हिंदु पंडित याच्या दरबारीं असत. या सर्वांत श्रेष्ठ पंडित जैन हेमचंद्र होता हें सांगावयास नको. त्यानें आपलें संस्कृत व्याकरण या राजास अर्पण करून त्याचें नांव सिद्धहेम ठेविलें. त्याच्या द्वयाश्रय काव्यांत चालुक्यांचा इतिहास असून,त्याच्या व्याकरणसूत्रांची उदाहरणें आहेत. आपल्या समोर पंडितांचा वादविवाद करविण्याची सिद्धराजास हौस असे. अशा एका वादांत एका दिगंबर पंडिताचा एका खंबायत येथील श्वेतांबर जैन सूरीनें पराभव केल्याची गोष्ट सांगतात. दिगंबर पंडितानें बायकांस मोक्ष नाहीं आणि कपडे नेसणाऱ्या यतींसहि मोक्ष नाहीं असें प्रतिपादन केलें होतें. बहुधा ही गोष्ट श्वेतांबर पंथांतून निघालेली असेल. गुजराथेंत श्वेतांबरांचें प्राबल्य आहेच.

क्वचित नव्हत तर वीरहि सिद्धराजाच्या आश्रयास येत. या सर्वांत प्रसिद्ध जगदेव परमार होता. हा उदयादित्याचा कनिष्ठ पुत्र होता. याच्या शौर्याच्या अद्भुत गोष्टी बखरकारांनीं सांगितल्या आहेत. त्या सर्व खऱ्या नसल्या तरी तो एक महाशूर वीर होता हें निःसंशय होय.

गॅझेटियरमध्यें जयसिंह सिद्धराजाची फार स्तुति केलेली असून तो अत्यंत सामर्थ्यवान्, अत्यंत धार्मिक व अत्यंत उदार होता असें योग्यरीतीनें वर्णिलें आहे. सोमनाथास जाणाऱ्या यात्रेकरूंवर जबर कर असल्यानें कित्येक गरीब श्रद्धावान् यात्रेकरू अडकून दुःख करीत बसलेले पाहुन जयसिंहाच्या मातोश्रीस फार वाईट वाटून तिनें रदबदली केली, तेव्हां त्यानें या कराचें उत्पन्न एक लाख रुपये होते तरी तो कर तात्काळ उठवून टाकला. वडनगरप्रशस्तींत तर असें वर्णिलें आहे कीं, त्यानें आपल्या राज्यांतील सर्व कर्जदारांचीं कर्जें फेडून त्यास ऋणमुक्त केलें व यामुळें तो शककर्ता झाला. हिंदुस्थानांत अशी समजूत आहे कीं, नवा शक सुरू करणाऱ्यानें आपल्या राज्यांतील सर्व कर्जदारांचीं कर्जें फेडलीं पाहिजेत आणि औदार्याच्या कमालीचें हें कृत्य सिद्धराजानें खरोखरच सिद्धीस नेलें असें वडनगरप्रशस्तीवरून दिसतें. त्यानें नवा शक सुरू केला यांत शंका नाहीं. कारण या शकांतील कित्येक लेख काठेवाड व गुजराथमध्यें सांपडलें आहेत. सगळ्यांत अलीकडचा लेख विराव-ळचा आहे. यांत तारीख चार शकांत दिली आहे. विक्रमशक १३२०, वलभीशक ९४५, सिंहशक १५१ व हिजरीशक ६४२.* तात्पर्य

* यावरून चार शक गुजराथेंत चार राज्यांचे दर्शक यावेळीं चालू होते. त्यापैकीं मुसलमानी अंमल नुकताच सुरू होत होता. परंतु गुजराथेंत अर्जुनदेव वाघेला यावेळीं राज्य करीत असल्याचा यांत उल्लेख आहे.

जयसिंहास लेखांतून सिद्धराज व चक्रवर्ती या संज्ञा योग्य रीतीनें दिलेल्या आहेत.

किल्हॉर्ननें आपल्या वंशावळींत जयसिंहाच्या नांवावर इ. स. ११३८ व ११३९ असे दोन लेख दिले आहेत. दुसरा लेख चालुक्यांचा नसून त्यांच्या एका मांडलिक राजाचा आहे. त्यांतील पहिल्या श्लोकांत असें म्हटलें आहे कीं, जयसिंहानें सौराष्ट्र आणि माळवा येथील राजांस कैद केलें. पुढील राजांच्या लेखांत अवंतिनाथ, त्रिभुवनगंड, बर्बरकजिष्णु, सिद्धचक्रवर्ती असें जयसिंहाचें नेहमीं वर्णन येतें (इं. ए. ६ नं. १ पहा). जयसिंहानें बखरकारांच्या मतें इ. स. १०९३ पासून ११४३ पर्यंत ५० वर्षें राज्य केलें. तो लहान असतांच गादीवर आला आणि इ. स. ११३९ मधील त्याचा लेख वरप्रमाणें सांपडला आहे यावरून त्यानें पुष्कळ वर्षें राज्य केलें असेंच ठरतें. त्याला भूतपिशाच सिद्ध होतें तरी व त्याजजवळ सिद्धरस अथवा तेजस्वी औषधें होती तरी आणि त्यानें अनेक पुण्यकृत्यें केलीं होतीं तरी त्याला मुलगा झाला नाहीं. आणि वारसा पहिला भीम याचा तिसरा पुत्र कृष्णराजा, याचा नातू त्रिभुवनपाल, याचा पुत्र कुमारपाल याकडे अखेरीस गेला. दुसरेहि वारस असून यावेळीं गादीचा तंटा पडला व बाहेरील राजे तंट्यांत घुसले; पण अखेरीस कुमारपाल आपल्या पराक्रमानें व जैन अमात्यांच्या मदतीनें अजमीरचा अर्णोराज व माळव्याचा बल्लाळ यांचा कोरीवलेखांत वर्णिल्याप्रमाणें पराभव करून अखेरीस गादीवर बसला. यानेंहि आपल्या पूर्वीच्या राजांप्रमाणें शहाणपणानें व न्यायानें पुष्कळ वर्षें–बखरकारांच्या मतें इ. स. ११४३ पासून इ. स. ११७३ पर्यंत तीस वर्षें–राज्य केलें. खरोखरच चार हुशार कर्तृत्ववान् व न्यायी एकामागून एक दीर्घ राज्य करणारे भीम, कर्ण, जयसिंह व कुमारपाल असें राजे इतरत्र थोडेच आढळतात. नहरवालाचे जयसिंह

व कुमारपाल यांच्या गोष्टी अरब ग्रंथकारांनीं इ. स. १२२५ इतक्या पूर्वकालीं सांगितल्या आहेत. ऊफीच्या जम्मीयत्-उल् हिकायतमध्यें पिशाच्चावर सत्ता चालविणारा जो जयसिंह सांगितला आहे, तोच जयसिंह सिद्धराज; व गुर्पाल म्हणजे कुमारपाल असून त्याजविषयीं असें सांगितलें आहे कीं या राजास गादीवर येण्यापूर्वीं पुष्कळ देश फिरावे लागले व पुष्कळ संकटें भोगावीं लागलीं यामुळें हा फार न्यायी निघाला. गुजराथचे बखरकार लिहितात कीं, भावी वारस या दृष्टीनें कुमारपाल जयसिंहास अप्रिय झाला; तेव्हां हेमचंद्राच्या उपदेशानें कुमारपाल गुजराथ सोडून दक्षिणेकडील व पूर्वेकडील राज्यांत फिरत राहिला. हेमचंद्रानें त्याच्या भावी वैभवाचें भविष्य केलें होतें, त्याप्रमाणें त्यास राज्यहि मिळालें. त्यामुळें कुमारपालाची ह्या प्रसिद्ध जैन पंडितावर फार भक्ति जडली; आणि जैनधर्माबद्दल त्यास अत्यंत आदर वाटूं लागला. कुमारपालाचे आत्मसंयमन व उच्चनीति हीं जैनधर्माच्या त्याजवरील पगड्यामुळेंच आलेलीं दिसतात. शेवटली गोष्ट ही कीं, कुमारपाल गादीवर आला त्या वेळेसच पन्नास वर्षांचा होता. अर्थात् राजे लोक ज्या वयांत जुलमी व दुर्गुणी निपजतात त्या वयाच्या तो पलीकडे गेला होता.

त्याची पहिली लढाई अजमीरच्या अर्णोराजाशीं झाली. अर्णोराजास त्याची बहीण दिली होती. त्याच्या भावाच्या तर्फेनें कदाचित् अर्णोराज त्याजवर उठला असावा. ह्या लढाईच्या संबधें अनेक चमत्कारिक गोष्टी सांगतात. पण कोरीव लेखांवरून असें दिसतें कीं, कुमारपालानें या लढाईंत स्वतः मोठा पराक्रम केला आणि अर्णोराजाच्या छातींत बाण मारून रक्त काढलें.* कोरीव-

* अर्णोराजनराधिराजहृदयक्षिप्तैकबाणव्रणाच्योतल्लोहिततर्पणादमदयच्चण्डीं भुजस्थायिनीम् ॥ ( वडनगरप्रशास्ति ) ए. इ. १

लेखांत याचें नेहमींचें वर्णन "स्वभुजपराक्रमनिर्जितशाकंबरी भूपाल" असें येतें. बहुधा याच लढाईंत वडनगरप्रशस्तींत सांगितलेला माळव्याचा बल्लाळ राजा अर्णोराजाचा साथीदार असून लढाईंत मारला गेला. कोंकणचा राजा मल्लिकार्जुन याजवर कुमारपालानें आपला सेनापति अंबड यास दोनदां पाठविलें. दुसऱ्या लढाईंत मल्लिकार्जुनाच्या हत्तीवर चढून अंबडानें त्याचें डोकें कापिलें. आणखी एक गोष्ट अशी सांगतात कीं, चेदीचा राजाहि कुमारपालावर चालून येत होता. पण हत्तीवर बसून जात असतां एका झाडाच्या फांदींत त्याचा कंठा अडकून त्याचा कंठ दाबला जाऊन तोच मेला. पूर्व माळव्यांतील उदेपूरच्या देवळांत कुमारपालाचे शिलालेख सांपडले आहेत; त्यांवरून माळव्याच्या बऱ्याच भागावर गुजराथेचें अद्याप स्वामित्व होतें. पश्चिम राजपुतान्यांतील बालमेर येथें त्याचा लेख सांपडला आहे. खुद्द मेवाडांतील चितोड येथें त्याचा लेख सांपडला आहे. हें जरासें चमत्कारिक आहे; कारण चितोड व तेथील गुहिलोत राज्य यांस कुमारपालानें जिंकलें हें संभवनीय नाहीं. या लेखांत असें सांगितलें आहे कीं, कर्णावर स्वारी करून परत येत असतां हा प्रसिद्ध किल्ला पाहण्यास तो गेला होता. बहुधा चितोडच्या राजानें सन्मान्य पाहुणा म्हणून त्याचा सत्कार केला असावा. कुमारपालाची एक राणी गुहिलोत राजकन्या होती अशीहि दंतकथा आहे. यासंबंधामुळें मित्र म्हणून त्याचें चितोड येथें स्वागत झालें असावें, आणि चितोडच्या राजधानीं किल्ल्यांत त्याचा शिलालेख कोरूं दिला असावा. कुमारपालाच्या सत्तेचा विस्तार फार मोठा होता. पण जैन बखरकार त्याच्या सत्तेचे अतिशयोक्तीनें वर्णन करितात. तो त्यांच्या धर्माचा अत्यंत प्रेमाचा चाहता असल्यानें त्यांनीं असें फुगवून लिहिलें आहे कीं, त्याच्या राज्याची उत्तर मर्यादा तुर्कांच्या राज्याशीं भिडली होती.

कुमारपालहि त्याच्या पूर्वींच्या राजाप्रमाणें मोठा बांधणारा होता. त्यानें कित्येक जैन विहार बांधून दिले आहेत, किंवा त्याच्या प्रधानांनीं बांधले आहेत. सोमनाथाचें देऊळहि त्यानें बांधलें असें जैन बखरकारानींच लिहिलें आहे. किंबहुना 'मी कोणतें पुण्यकृत्य करूं' असें कुमारपालानें विचारलें असतां हेमचंद्रानेंच 'सोमनाथाचें देउळ बांध' असें सांगितल्याचें वर्णन आढळतें. अर्थात् कुमारपालानें सोमनाथाचें दगडी देवालय बांधलें. भोजानेहि सोमनाथाचें दगडी देवालय बांधलें होतें आणि भीमानेहि बांधलें होतें. हेंच काम जयसिंहानेहि केल्याचा स्पष्ट दाखला आहे. बहुधा हें देवालय समुद्राच्या इतकें जवळ होतें कीं, समुद्राच्या लाटा देवळाच्या पायावर आपटत असत. यामुळे पूर्वींचे बांधणारे समुद्राच्या पाण्यांत लांकडी खांब घालीत असावेत. कुमारपालानें दगडी देवालय बांधलें यांत शंका नाहीं. सोमनाथाच्या देवळाच्या आवाराच्या बाहेर असलेल्या भद्रकालीच्या देवळांत इ. स. ११८९चा एक शिलालेख आहे, त्यांत ह्या गोष्टीचा स्पष्ट उल्लेख आहे. एक कनोजिया ब्राह्मण तपस्वी बनारसचा राहणारा सर्व हिंदुस्थानभर देवस्थानांचा उद्धार करीत माळव्याच्या मार्गें सोमनाथास आला. त्यानें सोमनाथाचें देऊळ बांधण्याविषयीं जयसिंहास विनंति केली. आणि जयसिंहानें देऊळ बांधण्यास सुरवात केली व कुमारपालानें तें काम शेवटास नेलें. सोमनाथाचें देउळ बांधण्यासाटीं गुजराथच्या राजांस उद्युक्त करण्याचें श्रेय या शिलालेखावरून 'भावबृहस्पति' नांवाच्या लकुलीश–पंथाच्या या ब्राह्मण यतीस लाहे. परंतु जैन बखरकार तें श्रेय आपण घेतात आणि हेमचंद्राच्या उपदेशानें कुमारपालानें देऊळ बांधलें असें सांगतात. आपल्यास दोघांसहि श्रेय देतां येईल. कारण कुमारपाल हिंदु व जैन, यति व पंडित यांचा सारखा आदर करी. ह्या शिलालेखासंबंधी अधिक चर्चा आम्ही अन्यत्र केली आहे.

कुमारपाल आपल्या कारकीर्दीच्या शेवटीं शेवटीं जैन झाला हें कितपत विश्वसनीय आहे याचा विचार करणें बाकी आहे. जेव्हां सोमनाथाचें देऊळ बांधत होते, तेव्हां हेमचंद्राच्या सांगण्यावरून मद्य, मांस व मैथुन या तीन मकारापासून निवृत्त राहण्याचा त्यानें पण केला होता; आणि दोन वर्षें पर्यंत हें व्रत पाळून जेव्हां देऊळ बांधलें गेलें, तेव्हां तेथें जाऊन त्यानें देवाची पूजा केली. यावेळीं हेमचंद्रानेंहि देवास नमस्कार केला. पण हें व्रत जैनांचेंच नसून मनुस्मृत्युक्त हिंदुंचेंहि आहे.* आपल्या कुलदेवाची भक्ति व आपला पूज्य गुरु हेमचंद्र याची भक्ति ह्या दोहोंची छाप कुमारपालावर होती. हिंदु लोक या बाबतींत नेहमींच परमतसहिष्णु असतात. हल्लींहि अनेक भक्तिमान हिंदु मुसलमान फकिरांचे शिष्य असल्याचें प्रसिद्ध आहे. तेव्हां कुमारपालाने जैन मुनीस मानणें किंवा जैन विहार बांधणें आश्चर्यकारक नाहीं. हेमचंद्रहि आपल्या शिष्याप्रमाणें परमतसहिष्णु होता. त्यानें सोमनाथाच्या मूर्तीस ही जीनाचीहि मूर्ति आहे असें म्हणून नमस्कार केला. कसेंहि असलें तरी आपला कुलदेव सोडून कुमारपाल शेवटीं जैन झाला ही गोष्ट संभवनीय नाहीं. कारण त्याच्या किंवा त्याच्या मागूनच्या राजांच्या कोणत्याहि लेखांत ‘ उमापतिप्रसादलब्धलक्ष्मीः ’ असेंच त्याचें नेहमीं वर्णन येतें. ज्याप्रमाणें हर्षाच्या लेखांत त्यास परम **सौगत** म्हटलें असून त्याचा बाप प्रतापवर्धन यास परम**माहेश्वर** म्हटलेलें असतें, त्याप्रमाणें लेखांत कुमारपालास कोठेंहि जैन म्हटलेलें आढळत नाहीं. तथापि जैनधर्मानें विशेष पुरस्कार केलेल्या अहिंसेच्या तत्त्वाबद्दल कुमारपालाचा इतका आदर वाढला होता कीं, त्यानें हर्षाप्रमाणें

---

* न मांसभक्षणे दोषो न मद्ये न च मैथुने ॥
प्रवृत्तिरेषा भूतानां निवृत्तिस्तु महाफला ॥

आपल्या राज्यांत प्राणिघात, नेहमीं नव्हे तरी पण कांहीं विशिष्ट दिवशीं, बंद करण्यासाठीं आपल्या राजसत्तेचा उपयोग केला असें मानण्यास खचित जागा आहे. जैन बखरकार लिहितात कीं, त्यानें जीवहत्या बिलकुल बंद केली, व तो माळव्याच्या शिलादित्याप्रमाणें घोडे व हत्ती यांना सुद्धां पाणी फडक्यांतून गाळून प्यावयास देई (भाग १ पृ. पहा). परंतु एवढें जरी आपण मानलें नाहीं, तरी एका मांडलिक राजानें कांहीं विशिष्ट दिवशीं प्राणिहत्या बंद केल्याचें कोरीव लेखांत वर्णन आढळतें. मारवाडांतील रतनपूर व हरसोदा येथें दोन शिलालेख सांपडले आहेत (भाव० इन. पान २०६); त्यांत असें म्हटलें आहे कीं, कुमारपालाच्या अमलाखालील दोघा मांडलिक राजांनीं एकादशी आणि अमावास्या या दिवशीं प्राणिहत्या बंद केली. "जो कोणी करील त्यास पांच द्रम्म दंड होईल." जर मांडलिक राजांनीं याप्रमाणें प्राणिहत्या बंद केली, तर ती वरिष्ठ राजांच्या संमतीनेंच बंद केली असली पाहिजे. कदाचित् कुमारपालानेंहि आपल्या राज्यांत असाच हुकुम सोडला असेल, पण हें अनुमान निश्चयाचें नाहीं. असो, पण रतनपूर येथील लेखांतच कुमारपालाचें वर्णन करतांना 'पार्वतीपतीच्या प्रसादानें प्रकर्ष झालेला' असेंच वर्णन केलेलें आहे. तसेंच वडनगरप्रशस्तींत 'कुमारपालानें वडनगराभोंवतीं तट बांधला' असें म्हटलें आहे. नागर ब्राह्मण प्रसिद्ध शिवभक्त असून त्यांचें हें मूलस्थान आहे. या सर्व गोष्टींवरून असें अनुमान निघतें कीं, कुमारपाल आपल्या पूर्वजांप्रमाणेंच कट्टा शिवभक्त होता. जैन धर्माविषयीं त्यास इतका आदर होता कीं, त्यासाठीं व हेमचंद्राच्या वजनामुळें त्यानें जैनांना पवित्र असलेल्या कांहीं तिथींस प्राणिहत्या बंद केली असावी. असे बंदीचे हुकूम जैनांच्या मतास

मान देऊन कित्येक शहरांत विशेषतः जैनांच्या पचोसन दिवसांत अकबरानेंहि बंद केल्याच्या सनदा हल्लीं चालू आहेत.

किल्हॉर्ननें कुमारपालाच्या नांवावर इ. स. ११४५ पासून इ. स. ११६९ पर्यंत सात लेख दिले आहेत (ए. इं. ८). यावरून बखरकारांनीं दिलेली इ.स. ११४३ पासून इ. स. ११७७ पर्यंतची याची राज्यमर्यादा संभवनीय दिसते. कुमारपालाल हि पुत्र नव्हता. यामुळें त्याचा पुतण्या अजयपाल गादीवर बसला. तो मोठ्या तामसी स्वभावाचा हाता. त्यानें जैनांचा जोरानें छळ केला इतकेंच नव्हे, तर हिंदु दिवाणांनाहि तो छळूं लागला. इ. स. ११७९ मध्यें म्हणजे गादीवर आल्यावर लौकरच द्वारपालानें एके दिवशीं त्याचा खून केला. सालुंबर येथील राजास जिंकून त्यास कर देण्यास त्यानें लाविलें असें एका कोरीवलेखांत म्हटलें आहे; पण हें संभवनीय वाटत नाहीं.

त्याच्यामागें त्याचा अल्पवयी मुलगा मूळराज हा गादीवर बसला. यामुळें यास बालमूळराज असेंहि म्हटलेलें आढळतें. त्याची आई नायकीदेवी एका परमाडी कदंबकर्नाटकी राजाची कन्या होती. ती प्रतिनिधि म्हणून राज्य करूं लागली. त्या राजाच्या वेळीं महमद घोरीनें गुजराथेवर स्वारी केली, पण तींत त्याचा पराभव झाला. हा पराभव हिंदूंना भूषणास्पद आहे आणि चालुक्यांच्या लेखांत यामुळें मूळराजाचें प्रशंसापर वर्णन येणें साहजिक आहे.* जयाचें श्रेय राजाला दिलें जातें यांत शंका नाहीं. पण एका लेखांत या जयाचे श्रेय मूळराजाच्या आईस दिलेलें आहे.† राजपूत स्त्रिया शौर्याबद्दल व

---

* आहवपराभूतदर्जुयगुर्जनाधिराज ( इं. ए.६ पा. १९४ )

† चौलुक्यराजान्वयपूजितस्य यस्यानुभावादबलापि संख्ये ।
हम्मीरराजं तरसाजिगाय ॥ ( वेरावळ लेख भा. इं. पा. २४)

मृत्यु तुच्छ मानण्याबद्दल व धर्म आणि अब्रू यांच्या अत्यंत काळजी-बद्दल इतिहासांत प्रसिद्धच आहेत. ही राजपूत राणी कर्नाटकची होती ह्याबद्दल दाक्षिणात्यांस अभिमान वाटणें साहजिक आहे. ती लढाईंत हजर असून तिनें गझनीच्या राजाविरुद्ध गुजराथ सेनेचें नेतृत्व स्वीकारलेलें दिसतें. या लढाईचें वर्णन आपल्यास कोठेंहि आढळत नाहीं. पण गुजराथ सैन्याच्या शौर्यानें ती जिंकली आणि गुजराथच्या सेनापतींनीं घोडदळ व हत्तीदळ उत्तम रीतीनें चालविलें असें दिसतें. गुजराथचे बखरकार म्हणतात कीं, जेत्यांच्या मदतीस पाऊस आला. पण पावसानें जेत्यांसच कां मदत करावी हें समजत नाहीं. आतां हें मान्य करावें लागेल कीं, घोरीजवळ पुरेशी फौज नसावी व गुजराथची फौज जास्त असावी. कारण गोरीस मुलतान व उछ मार्गें रेतस्तानांतून यावें लागलें होतें. पराजयाचें कारण कांहीं असलें तरी या पराजयानें मुसलमानी सत्तेपासून गुजराथेस आणखी शंभर वर्षें वांचविलें आणि नहरवाला राज्याच्या फौजेची कीर्ति वाढली. इ. स. ११७८त ही लढाई झाली. गदरार–घाटाच्या जवळ ही लढाई झाल्याचें गॅझेटियरमध्यें वर्णन आहे (पा. १९५). मुसलमानी इतिहासकार या लढाईचा बहुधा उल्लेख करीत नाहींत. पण मूलराजाच्या मागून भीम गादीवर आला त्याशीं ही लढाई झाल्याचें ते लिहितात. गौरीशंकरच्या मतें ही त्यांची चुकी आहे. कदाचित् महंमद घोरीनें आपला अपजय धुवून काढण्याकरितां दुसऱ्यावेळीं प्रयत्न केला असेल. गझनीच्या महमुदाचें अनुकरण घोरी करीत होता हे स्पष्ट आहे. त्यास प्रारंभीं कमी यश आलें; पण शेवटीं महमुदाहूनहि जास्त यश त्यास आलें हें आपण पुढें पाहूं.

मूळराजानेंहि थोडींच वर्षें राज्य केलें. त्याच्या मागून त्याचा भाऊ भीम गादीवर बसला. तोहि अल्पवयी असल्यानें राज्यकारभार पालक मातोश्रींनीं चालविला. ह्या भीमास भोळा भीम म्हणतात. यानें

जयसिंहासारखे पुष्कळ वर्षें राज्य केलें. इ. स. ११७८ पासून १२४१पर्यंत ६३ वर्षें यानें राज्य केलें असें जें म्हणतात तें विश्वासार्ह आहे. कारण हा अल्पवयांतच गादीवर आला. तो जयसिंहाप्रमाणें आपल्यास सिद्धराजहि म्हणवी. अगदीं बरोबर लिहिणें तर तो आपल्यास 'अभिनवसिद्धराज' अशी पदवी, त्याचे गुण मोठे नव्हते तरी, घेई. याचे राज्यकाळांतील पुष्कळच कोरीव लेख इ. स. ११९९ पासून इ. स. १२३८ पर्यंतचे सांपडले आहेत. अर्थात् बखरकार सांगतात त्याप्रमाणें इ. स. १२४१पर्यंत ह्यानें राज्य केलें यांत शंका नाहीं. त्याची सत्ता मात्र त्याच्या मांडलिकांनीं व सरदारांनीं बळकावली होती. पण ते नेहमीं त्यास अनहिलवाडचा राजा मानीत. उदाहरणार्थ जयंतसिंहाच्या एका लेखांत (याबद्दल पुढें जास्त लिहूं) ह्मटलें आहे कीं, अनहिलवाड येथें भीम राज्य करीत आहे. वाघेला सरदार लवणप्रसाद व त्याचा पुत्र वीरधवल हे पुढें इतके बलवान झाले कीं, भीमानें "वीरधवल माझा वारस आहे' असेंहि जाहीर केलें. हे वाघेले सरदार चौलुक्य कुलाचीच एक शाखा असून त्यांचा संस्थापक अर्णोराज हा कुमारपालाच्या मावशीचा मुलगा होता. त्यानें कुमारपालास गादी मिळवून देण्याच्या कामांत मदत केल्यामुळें कुमारपालानें त्यास अनहिलवाडजवळील व्याघ्रपल्ली हा गांव इनाम दिला. ह्या गांवावरून वाघेला हें कुलनांव उत्पन्न झालें. अर्णोराजाचा पुत्र लवणप्रसाद हा दुसऱ्या भीमाचा मोठा शूर सेनापति होता. व पुढें वीरधवल हा भीमाचा पुढचा वारस त्रिभुवनपाल यानें चार वर्षें राज्य केल्यावर त्यास बाजूस सारून स्वतःच अनहिलवाडचा राजा झाला (गौरीशंकरचान्टॉड). त्रिभुवनपालाचा एक ताम्रपट संवत् १२९९ म्हणजे इ. स. १२४१ चा सांपडला आहे. ह्यावरून या राजानें कांहीं काळ राज्य केलें हें निश्चित दिसतें. पण खरा मालक वीरधवल होता, त्यानें त्यास लवकरच

ाजूस सारून अनहिलवाड येथें बाघेला राजघराण्याची स्थापना
ली त्याच्यानंतर हें घराणें चार पिढ्या चाललें. वीसलदेव, अर्जुनदेव,
ारंगदेव आणि कर्ण ( इ. स. १२८६ ते इ. स १३०४ ). कर्णा-
या वेळेस मुसलमानांनीं गुजराथ कायमचें जिंकलें. हें वाघेला कुल
क मोठें शूर घराणें होतें. त्यांचें दोन प्रसिद्ध जैन प्रधान वस्तुपाल
ाणि तेजपाल यानीं गिरनार येथील प्रसिद्ध जैन मंदिरें बांधिलीं.
ाघेला कुलाचें हल्लींचे वारस रेवा येथील राजघराणें होय; व मूल-
ाजाच्या चौलुक्य कुलाचे वारस लूनावाडा, रूपनगर-मेवाड आणि
ारवाडांतील कोट येथील राजे होत ( गौरीशंकराचा टॉड पहा ).
ांचे वंशज कांहीं मराठ्यांतहि आहेत. सातारा जिल्ह्यांतील कऱ्हा·
चे डुबल हे आपल्यास गुजराथच्या चालुक्यांचे वंशज मानतात.
यांचेहि गोत्र भारद्वाज आहे.

संवत् १२६० म्हणजे इसवी १२०२ मधील कोरीव लेखाचा
र्ता जयंतसिंह कोण होता याचा विचार करणें बाकी आहे ( इं.
. ६ नं. ४ पान १९७). या लेखांत त्याला चालुक्यच म्हटलें आहे.
ण भीमाचा व त्याचा काय संबंध होता, हें ह्यांत सांगितलेलें नाहीं.
थापि ' तदनंन्तरं स्थाने ' ह्या शब्दांवरून तो भीमानंतर भीमाच्या
वजीं राज्य करीत होता असें स्पष्ट दिसतें. शिवाय 'दुष्टकालरूपी
मुद्रांत बुजलेल्या गुर्जरभूमीचा वराहासारखा उद्धार करणारा, आणि
ापत्तींच्या दावानलानें दग्ध झालेल्या गुर्जरबीजास पर्जन्याप्रमाणें
ोषण करणारा,' अशी या लेखांत जयंतसिंहाची प्रशंसा केलेली आहे.
ााशिवाय गुर्जर राजांना लावल्या जाणाऱ्या सर्व पदव्या व बिरुदें
ो आपल्यास लावितो; आणि 'अनहिलवाड येथें प्रतिष्ठित झालेला'
सें आपलें वर्णन करितो. ह्या सर्व गोष्टींवरून इ. स. ११९७मध्यें
ुतुबुद्दीन ऐबक् यानें गुजराथेवरील केलेल्या स्वारीचा यांत बहुधा

उल्लेख आहे (बाम्बे गॅझेटिअर पा. १९५-१९७).महमुदाच्या स्वारीच्या वेळीं जसा पहिला भीम निघून गेला तसा दुसऱ्या भीमानेंहि कुतुबुद्दीनच्या वेळीं अनहिलवाड टाकून एखाद्या दूरच्या किल्लयाचा आश्रय घेतला असें संभवनीय दिसतें. कुतुबुद्दीन अजमीर घेऊन अनहिलवाडवर चाल करून आला; व अबुपर्वताच्या खालीं सरहद्दीवर गुजराथसैन्यानें त्याचा विरोध केला. परंतु धारावर्ष परमार व इतर गुजराथ सैन्याचे अधिपति यांचा पराभव झाला (गौरीशंकर). अर्थात् गुजराथ उघडें पडलें आणि लुटलें गेलें. कदाचित जयंतसिंह या शूर चौलुक्य राजपुत्रानें अनहिलवाडांत राहून त्याचा बचाव केला. कुतुबुद्दीनानें देश लुटून परत कूच केलें, त्यामागें राहिलेल्या मुसलमानी शिपायांस जयंतसिंहानें हाकलून देऊन गुजराथेस मुक्त केलें. याप्रकारें त्यानें केलेल्या कामगिरीचें काव्यातिशयोक्तीचें वर्णन मूलत: खरें असलें पाहिजे* जयंतसिंहानें अनहिलवाड येथें निदान तीन वर्षें राज्य केलें असावें. त्याचा लेख इ. स. १२०२ मधला असून भीमाचा एक लेख भाद्रपद अथवा सप्टेंबर इ. स. ११९९ चा अनहिलवाडहून प्रसिद्ध केलेला मिळाला आहे (इं. ए. ११ पा. ७१); आणि यावरून मुसलमानी फौजा देशांत शिरून लोकांस त्रास देत असतांना भीम कांहीं काळ अनहिलवाड येथें होता असें दिसतें. याननतर केवळ निरुपायानें त्यानें अनहिलवाड सोडलें असावें. सर्व आपत्ति टळून देश मोकळा झाला, तेव्हां तो पाटणला परत आला आणि त्यानें इ. स. १२४२ पर्यंत राज्य केलें. त्याचा शेवटचा कोरीव लेख जो सांपडला आहे, तो इ. स. १२३९चा आहे. भीमानें जीं बिरुदें

*भीमदेवस्तदन्तरं स्थाने परमट्टारक, महाराजाधिराज, परमेश्वर, चौलुक्यकुलकल्पवल्लीविस्तारणदीप दुःसमयजलधिजलमग्नमेदिनीमंडलोद्धरणमहावराह, दुर्दैवदावानलदग्धगुर्जरधराबीजप्ररोहैकपर्जन्यैकाङ्गवीर (इं, ए. ६ पा. १९७)

धारण केलीं तीं फारच फुशारकी मारणारीं आहेत. तो आपल्यास अभिनवसिद्धराज म्हणतो, इतकेंच नव्हे तर सप्तम चक्रवर्तीहि म्हणतो. गुजराथेंतील भरतखंडाचा सातवा सम्राट् असें तो कां म्हणतो हें लक्षांत येत नाहीं. कदाचित् पहिल्या भीमापासून चौलुक्य राजे मोजून सर्वांस चक्रवर्ती ठरवून त्यानें आपल्यास सातवा चक्रवर्ती म्हटलें असावें. या कुलांतील बहुतेक सर्व राजे पराक्रमी होते यांत शंका नाहीं; कदाचित् अपवाद असेल तर या शेवटच्या भीमाचाच होय. याला भोळा योग्यरीतीनें म्हणत. कोरीव लेख लिहिणारांनीं त्याची जी भरीव स्तुति केली आहे, तिचा पोकळपणा त्याच्या लक्षांत आला नाहीं. असो, या चौलुक्य राजकुलाची वंशावळ राजांच्या संभवनीय राज्यारोहणकाळासह आणि त्यांच्या लेखाच्या काळासह आम्हीं पुढें देत आहों. भीम दुसरा याच्या गैरहजेरींत राज्य करणारा जयंतसिंह याचें नांव गौरीशंकर ओझा यांच्या मताप्रमाणें व बॉंबे गॅझेटिअर व्हॉ. १ भाग भाग १ यांत दिल्याप्रमाणें वगळून आम्ही वंशावळ देतों. ( किलहॉर्ननें आपल्या वंशावळींत जयंतसिंहाचें नांव दिलें आहे. )

## अनहिवाडच्या चौलुक्य राजांची वंशावळ.

(मुंबई गॅझेटियर व्हा. १ भा. १ व किलहॉर्नच्या वंशावळी: ए. इ. ८)

१ मूलराज राजीचा पुत्र ( इ. स. ९६१ ते ९९६ )

२ चामुंड ( इ. स. ९९७ ते १००९

३ वल्लभ (१०१०) ४ दुर्लभ (१०१०-१०२१) नागराज

५ भीम पहिला (१०२१-१०६३)

लेख १०२९

६ कर्ण (१०६३-१०९३) ले. १०२९ खेमराज

उर्फ

७ जयासिंह सिद्धराज (१०९३-११४३ हरिपाल

ले. ११३८-११३९

त्रिभुवनपाल

महीपाल ८ कुमारपाल (११४३-११७३)

ले. ११४५,५०.५२,५३,६३,६५

९ अजयपाल ११७३-११७६

ले. ११७३-११७५

१० मूलराज दुसरा ११ भीम दुसरा (११७८-१२४१)

११७६-१७७८) ले. ११९९,१२०७,०९,१६,

१८,२६,३८,३७,३१

१२ त्रिभुवनपाल. ले. १२४२

# प्रकरण आठवें.

## कनोजचे गाहडवाल.

मध्ययुगीन हिंदु भारतेतिहासाच्या तिसऱ्या कालविभागांत ( इ.स. १०००--१२०० ) जीं नवीं रजपूत घराणीं उदयास आलीं, त्यांत सर्वांत प्रसिद्ध व सर्वांत बलिष्ठ कनोजचे गाहडवाल घराणें होतें. गाहडवाल राष्ट्रकूटांची एक पोटशाखा होय असें मानतात. परंतु या प्रश्नाविषयीं विवाद आहे व त्याचा आपण पुढें विचार करूं. गाहडवाल कोठून आले हीहि गोष्ट निश्चित नाहीं; व ह्याहि विषयावरचें आमचें मत पुढें देऊं. या घराण्याचे अनेक लेख सांपडले आहेत; त्यावरून यांतील पहिला प्रसिद्ध पुरुष गाहडवाल महीयल याचा पुत्र चंद्र 'यानें आपल्या बाहुबलानें कान्यकुब्जाचें राज्य मिळविलें आणि देशास त्रासापासून मुक्त केलें.' ही त्याची स्तुति गाहडवालांच्या प्रत्येक लेखांत दिलेली आढळते. कोणत्या वर्षी हा पराक्रम त्यानें केला हें निश्चित नाहीं. तथापि सुदैवानें किलहॉर्ननें इ. स. १९०८ सालीं उत्तरेकडील राजांच्या वंशावळी ए. इं.८ मध्यें दिल्या, त्यानंतर चंद्रदेवाचे खुद्द तीन लेख सांपडले आहेत; त्यांपैकीं पुढील दोन लेखांत त्याची केलेली स्तुति विस्तृत आहे. पण यांतील त्याचीं विशेषणें नीटशीं समजत नाहींत. यांत असें म्हटलें आहे कीं, चंद्रानें नरपति, गजपति व त्रिशंकुपति यांस जिंकून पांचालराजास जिंकलें (ए. इं. १४ पान १९२ ). पांचाल म्हणजे कनोजचें राज्य यांत शंकाच नाहीं. या लेखांचा काळ इ. स. १०९३ पासून १०९९ चा आहे. आणि इ. स. १०९१ चा त्याचा लेख त्यास मामुली विशेषणें लावणारा ए. इं. ९ पा. ३०२

मध्यें छापला आहे. चंद्रानंतरच्या एका राजाच्या लेखांत ( इं.ए. १४ पा. १०३ ) असें सांगितलें आहे कीं, चेदीचा कर्ण मेल्यानंतर चंद्रानें पृथ्वीस तिच्यावर आलेल्या संकटांतून मुक्त केलें. या कर्ण राजानें इ. स. १०८० पर्यंत राज्य केलें असें आह्मी ठरविलें आहे. वरील कारणांवरून चंद्रदेवानें इ. स. १०८० नंतर कनोज जिंकलें असें अनुमान निघतें. याच लेखांत असें म्हटलें आहे कीं, ' चंद्रदेवानें अनेक शत्रु राजे जिंकून कान्यकुब्ज ही आपली राजधानी केली.' कनोज हर्षाच्या वेळेपासून हिंदुस्थानचें रोम किंवा कॉन्सस्टॅन्टिनोपल बनलें होतें. ज्या राजानें तें घेतलें तो हिंदुस्थानचा सम्राट् मानला जाई. अर्थात् जेव्हां चंद्रानें कनोज आपली राजधानी केली, तेव्हां त्यानें जरी प्रतिहार घराण्याचा शेवटचा सम्राट् राजा सहज जिंकला होता, तरी इतर अनेक राजे त्यास आडवे आले असावे. पूर्वोक्त चंद्राच्या दोन लेखांत ( ए. इं. १४ ) पांचाल राजाला ' चपल ' हें विशेषण लाविलें आहे, यावरून असें अनुमान निघतें कीं, त्या प्रतिहार राजाचा, तो दुसऱ्या बाजीरावाप्रमाणें पळत असतां, चन्द्रास ठिकठिकाणाहून पाठलाग करावा लागला असावा.

चंद्रानें याप्रमाणें कनोजचें राज्य जिंकून देशास तुर्कांच्या त्रासापासून मुक्त केलें असावें. पूर्वी सांगितल्याप्रमाणें कनोजचे प्रतिहार राजे गझनीला जी खंडणी देत होते, ती वसूल करण्यासाठीं जागजागीं तुर्कांचे अम्मलदार ठेवलेले होते, त्यांस त्यानें हांकलून दिलें असावें. या खंडणीचें नांव गाहडवालांच्या लेखांतील तुरुष्कदंड या शब्दानें अजरामर करून ठेविलें आहे. ह्याशिवाय चंद्रानें उत्तर हिंदुस्थानांतील मुख्य क्षेत्रें काशी, कुशिक (कनोज), उत्तर कोशल (अयोध्या) व इंद्रस्थान (हें कदाचित् इंद्रप्रस्थ म्हणजे दिल्ली असेल) आपल्या कबजांत घेतली असें वर्णिलेलें असतें. अर्थात् तुर्कांच्या स्वाऱ्यांपासून हिंदू पवित्र क्षेत्रांचें रक्षण करणें हें हिंदु राजांचें कर्तव्य

त्यानें बजाविलें ( इं. ए. १४ ). ही चंद्राची स्तुति गाहडवालांच्या बहुतेक सर्व लेखांत दिलेली आढळते. त्यानें अनेक तुलादानें करून तीं विद्वान् ब्राह्मणांस दिलीं. तात्पर्य चंद्र मोठा पराक्रमी होता इतकेंच नव्हे, तर तो अत्यंत धर्मनिष्ठ हिंदु होता; आणि त्यानें कनोज जिंकलें याचा अर्थ हिंदूंनीं म्लेच्छांच्या त्रासापासून आर्यावर्तास मुक्त करण्यासाठीं जोराचा धार्मिक प्रयत्न केला असा समजला पाहिजे. भोजानेंहि हीच सेवा केली होती (१०४०) व नंतर कर्णानें (१०६७); पण चंद्रानें उत्तर हिंदुस्थानांत कनोजचें राज्य जिंकून व मजबूत करून हिंदूंचें राज्य कायमच्या पायावर बसविलें आणि हिंदु भारताचें आयुष्य शंभर वर्षें आणखी वाढविलें.

चंद्रामागून त्याचा पुत्र मदनपाल गादीवर आला. याच्या व याच्या पुढील राजांच्या लेखांत याची बरीच स्तुति केलेली आहे. पण ती नेहमीच्या वहिवाटीची आहे; त्याच्यापासून विशेष ऐतिहासिक माहिती मिळत नाहीं. याच्यामागून याचा पुत्र गोविंदचंद्र हा गादीवर आला. साधारणपणें तिसऱ्या पिढीचा राजा तेजस्वी व बलवान् असतो या नियमाप्रमाणें गोविंदचंद्र हा खरोखरच गाहडवाल राजांमध्यें सर्वांत अत्यंत पराक्रमी राजा निघाला. लेखामध्यें याचें वर्णन “ नवीन स्थापिलेल्या राज्यास यानें आपल्या बाहूंनीं दोरखंडाप्रमाणें बांधून स्थिर केलें ” असें येतें. ‘ याचे लढाऊ हत्ती तिन्हीं दिशांस सारखे फिरत होतें ’ असेंहि म्हटलेलें आहे. बहुधा हर्षाप्रमाणेंच गोविंदचंद्रानेंहि हें सेनांग फार मोठें ठेवलें असावें व त्याचा सतत उपयोग पूर्व, दक्षिण व पश्चिम या तिन्हीं दिशांस तो करीत असे. उत्तर दिशेस हिमालय पर्वत होता; व ती त्याच्याराज्याची स्वयंरक्षित सीमा असून तिकडे विशेष लक्ष देण्याचें त्यास कारण नव्हतें. ‘ नरपति--हयपति--गजपति--त्रैराज्याविजेता ’ हें विरुद त्यानेंच प्रथम धारण केलें. हें तीन राजे किंवा हीं तीन राज्यें

कोणतीं हें ठरविणें कठीण आहे व याची चर्चाहि झालेली नाहीं. बहुधा हयपतीचें राज्य म्हणजे कनोजच्या प्रतिहारांचें राज्य. गजपति म्हणजे बंगालचें राज्य आणि नरपति म्हणजे चेदींचें राज्य. पहिले दोन शब्द याप्रमाणें अन्यत्र पूर्वी उपयोगिले गेले आहेत; व त्यांचा अर्थ वरप्रमाणेंच भाग २ पा. ३५० यांत आम्ही दिला आहे. नरपति म्हणजे चेदीचें किंवा तेलंगणाचेंहि राज्य असूं शकेल. या "तेलंगणाच्या राजानें त्याच्या पदकमलाचें चुंबन घेऊन त्याचें मांडलिकत्व कबूल केलें" असें वर्णन आलें आहे. चंद्रदेवाच्या लेखांत जो गिरिपति आणखी सांगितला आहे, तो आंध्रराजा किंवा चेदी राजा असावा. कारण दोघांच्याहि राज्यांत पुष्कळ डोंगर आहेत. आणि आंध्र राजाचें गिरिपति असें वर्णन भाग २ पा. ३५० वर दिलेल्या श्लोकांत आहे. कोणताहि अर्थ घेतला तरी गोविंदचंद्रानें आपली सत्ता चारी दिशांस वाढविली आणि वंग, आंध्र व चेदी राज्यांच्या सीमा बऱ्याच आकुंचित केल्या असें मानण्यास हरकत नाहीं. बनारस त्याच्या ताब्यांत निःसंशय होतें व बनारसच्या पूर्वेकडील बराच प्रांत त्याच्या सत्तेखालीं असावा. बनारस प्रांतांतील अनेक गांवें त्यानें दान दिलीं आहेत व हीं दानपत्रें बनारस येथून प्रसिद्ध झालीं आहेत. यावरून कनोजच्या राजांची बनारस ही दुसरी राजधानी होती. किंबहुना जयचंद्रास व इतरांस मुसलमानी लेखक बनारसचा राजाच म्हणतात. ह्यावरून कित्येक असेंहि मानतात कीं, हें राजे मुळांत ह्या शहरचेच होते.

असो, ज्याप्रमाणें पूर्वेस गौड राजांशीं गोविंदचंद्रास युध्द करावें लागलें, त्याप्रमाणें पश्चिमेकडे लाहोरच्या मुसलमानाशींहि गोविंदचंद्रास युद्ध करावें लागलें असलेंच पाहिजे. आणि या रीतीनें खरोखरच गोविंदचंद्र युवराज असतां त्यानें केलेल्या दानलेखांत मुसलमानाशीं झालेल्या या युद्धाचा सरळ व अतिशयोक्तिरहित उल्लेख

आहे. येथील श्लोक फार महत्त्वाचा आहे आणि त्याचें भाषांतर येणें-प्रमाणें:--( या दानलेखाच्या वेळीं यमुना नदीवरील आसटिका गावीं तो होता. या गांवाचा पत्ता लागला नाहीं. पण हा वायव्येस असावा. या दानलेखाच्या वेळीं मदनपाल गादीवर होता. ) " *गौड राजाच्या दुर्वार हत्तींचीं गंडस्थळें फोडण्यानें भयंकर दिसणारा आणि आपल्या असम युद्धानें हम्मीरास वैर बंद करण्यास भाग पाडणारा गोविंदचंद्र आपल्या सतत फिरणाऱ्या अश्वदलाच्या टापांचीं चिन्हें म्हणजे राज्याच्या मोहोरेची चिन्हेंच उमटलीं असलेल्या पृथ्वीचें राज्य संपादन करता झाला." या वर्णनावरून पंजाबच्या तुर्कांशीं गोविंदचंद्राच्या झालेल्या अनेक खटखटींची चांगली कल्पना येते, आणि तुर्कांना तह करणें त्यानें भाग पडलें असें दिसतें. ह्या वर्णनावरून आणखी हेंहि दिसतें कीं, कनोजच्या भोज प्रतिहाराप्रमाणें गोविंदचंद्राजवळहि उत्तम प्रकारचे मोठें अश्वसैन्य होतें; व तो त्याचा नेहमीं उपयोग करून त्यास सतत फिरतें ठेवी.

गोविंदचंद्र अत्यंत प्रबळ राजा होता इतकेंच नव्हे, तर तो स्वतः विद्वान् असून माळव्याच्या भोजाचें उदाहरण पुढें ठेऊन आपल्या दरबारांत विद्वानास आश्रय देत असे. त्याचें वर्णन या बाबतींत विविध–विचार–विद्या--वाचस्पति या विशेषणानें गाहडवाल लेखांत येतें. अर्थात् निरनिराळीं शास्त्रें व तत्त्वज्ञानें यांत तो बृहस्पतिच होता. असेंहि सांगतात कीं, त्याचा लढाई खात्याचा प्रधान लक्ष्मीधर यानें 'व्यवहारकल्पद्रुम' नांवाचा ग्रंथ, धर्मशास्त्र व काम चालविण्याची पद्धत ह्या विषयांवर लिहिला. या कारणांनीं गोविंदचंद्रास

---

*दुर्वारस्फारगौडद्विरदवरघटाकुम्भनिर्भेदभीमो हम्मीरं न्यस्तवैरं मुहुरसमरणक्रीडया यो विधत्ते ॥ शश्वत्संचारिवल्गत्तुरगखुरपुटोल्लेखमुद्रासनाथक्षोणिस्वीकारदक्षः स इह विजयते प्रार्थनाकल्पवृक्षः ॥ १ ॥

समुद्रगुप्त, हर्ष, भोज, शिवाजी, महमूद, अकबर इत्यादि महान् विजेते व विद्वानांचे चहाते अशा राजांच्या मालिकेंत घालवयास हरकत नाहीं.

गोविंदचंद्रानें इ. स. १११४ पासून इ. स. ११५५ पर्यंत दीर्घकाळ राज्य केलें. इ. स. ११०४ पासून इ. स. १११४ पर्यंतची आणखी दहा वर्षे गोविंदचंद्राच्या राज्यकाळांत सर व्हिन्सेन्ट स्मिथनें चुकीनें घातलीं आहेत (E H. I. तिसरी आवृत्ति). पण गौरीशंकर ओझा यांनीं गोविंदचंद्राचा राज्यारंभ इ. स. १११४ हा बरोबर दिला आहे. हा तारखांचा मतभेद महत्वाचा असल्यानें आम्ही यावेळचे लेख मुद्दाम तपासून पाहिले. इ. स. ११०४ पासून इ. स. ११०९ पर्यंतच्या दानलेखांत गोविंदचंद्रानें स्पष्टपणें युवराज नात्यानें मदनपाल राज्य करीत असतां असें स्पष्ट सांगून सही केली आहे. तेव्हां हीं वर्षें मदनपालाच्या राज्यकालांत धरली पाहिजेत. किलहॉर्ननेंहि इ. स. ११०४, इ. स. ११०६, इ. स. ११०७ व इ. स. ११०९ चे लेख मदनपालाच्या नांवावर दिले आहेत. इ. स. ११०४ चा पहिला लेख इं. ए.१४ पा. १०३ यांत छापला आहे. आणि तो इटावा जिल्ह्यांतील बसही गांवचा प्रसिद्ध लेख आहे. त्यांत गोविंदचंद्रास 'महाराजपुत्र' म्हटलें आहे. याचा अर्थ महाराजाचा पुत्र असाच घ्यावा. शेवटल्या वाक्यांत 'हा लेख पुरोहित जागूक याच्या सल्यानें केला आहे.' असें म्हटलें आहे. महत्तम वाल्हण व प्रतिहारी गौतम यांच्या सल्याचाहि उल्लेख आहे. इ. स. ११०५ चा लेख इं. ए. २ पान ३५८ यांत छापला असून तो वरील लेखासारखाच आहे. त्यावर विस्तृत चर्चा पुढें करूं. त्यांत पांचाल देशांतील एक गांव दान दिलें असून देणाराचा मुक्काम गंगाकिनारी सांगितला आहे. शेवटल्या वाक्यांत हा लेख वरील अधिकारी व राजाची मातोश्री राल्ह देवी यांच्या अनुमतीनें केला

आहे असें म्हटलें आहे. इ. स. ११०७ चा तिसरा लेख सारांश रूपानें जे. आर. ए. एस. १८९६ पान ७८६ वर छापला आहे. राणी पृथ्वीश्रीका हिनें मदनपालाकरितां बनारस येथें हा लेख केला. चौथा लेख इ. स. ११०९ चा इं. ए. १८ पान १५ वर छापला आहे. यमुनेवरील उपरिनिर्दिष्ट आसटिका गावीं सूर्यग्रहणानिमित्त गोविंदचंद्र महाराजपुत्रानें "मदनपाल राज्य करीत असतां' हें दान दिलें. ह्या लेखाच्या शेवटीं राज्याधिकाऱ्यांची अनुमति सांगितलेली नाहीं. ही सर्व विस्तृत माहिती आम्ही मुद्दाम देतो याचें कारण, यावरून दोन तीन महत्वाचीं अनुमानें निघतात. मदनपाल इ. स. १०९७ मध्यें गादीवर आला अशी पूर्वी समजूत होती, पण आतां इ. स. १०९९ चा चंद्राचा लेख उपलब्ध झाला आहे. संवत् ११५४ म्हणजे इ. स. १०९७ चा लेख किलहॉर्ननेंहि चंद्राच्या नांवावर दिला आहे. हा लेख (इ. एं. १८ पान ११) मदनपालानें इ. स. १०९७ त चंद्रानें केलेल्या एका दानाला संमति देण्यासाठीं केला. ही संमति किंवा हा लेख केव्हां झाला हें सांगितलेलें नाहीं. पण चंद्र इ. स. १०९९ मध्यें जिवंत होता, त्यानंतर ही गोष्ट झाली असावी. यासाठीं चंद्राचा राज्यकाळ आम्ही सुमारें इ. स. १०८० पासून इ. स. ११०० पर्यंत धरतों व इ. स. ११०० मध्यें मदन पाल राज्यावर आला असें मानतों. तो राज्य करीत असतां इ. स. ११०४, ११०५, ११०७, ११०९ चे चारी लेख गोविंद-चंद्रानें केलें याचें आश्चर्य वाटतें. यापैकीं एक लेख मातुश्री राणी राल्हदेवी हिनें केला आहे; आणि दुसरा लेख मदनपालाची राणी पृथ्वीश्रीका पांचाल देशांत असतां तिच्या संमतीनें झाला आहे. यावरून असें अनुमान निघूं शकतें कीं, या अवधींत मदनपाल आजारीपणामुळें किंवा अन्यकारणानें स्वतः राज्य-कारभार करीत नसून त्याचा पुत्र व राणी दान देणें वगैरे जीं

कामें खुद्द राजानें करावयाचीं असतात, तीं करण्यास अधिकृत केलीं गेलीं होतीं. आणखी असेंहि दिसतें कीं, रजपूत राण्या प्रतिनिधि म्हणून अनेकदां राजांबद्दल काम करण्याचा अधिकार चालवीत. इ. स. ११०९ च्या शेवटच्या लेखांत गोविंदचंद्र वयानें व सामर्थ्यानें इतका मोठा झाला असावा कीं मातुश्री राणीची संमति घेण्याची त्यास आवश्यकता उरली नव्हती. गोविंदचंद्र स्वतः मुक्त्यारीनें इ. स. १११४ त दान देतो ( किलहॉर्न आणि गौरीशंकर ) यावरून दरम्यान म्हणजे १११० मध्यें तो गादीवर आला असें मानतां येतें.

गोविंदचंद्र तरुणपणींच गादीवर आल्यानें पुष्कळ वर्षें राज्य करीत होता. बनारसजवळ एके ठिकाणीं एकवीस ताम्रलेख एकदम सांपडले; यांपैकीं चौदा गोंविंदचंद्राचे इ. स. १११४ पासून इ. स. ११५४ पर्यंतचे असून किलहॉर्ननें ए. इं. ४ मध्यें छापले आहेत. एकंदरींत आजपर्यंत त्याचे चाळीस लेख मिळाले आहेत. अगदीं अलींकडचा केलेला लेख इ. स. ११५४ चा आहे. त्याच्या पुढचा राजा विजयचंद्र याचा इ. स. ११६१ चा सर्वांत अगोदरचा लेख सांपडला आहे. तथापि गोविंदचंद्राचा राज्यकाळ इ. स. १११० पासून इ. स. ११५५ पर्यंत आम्ही धरतों; याच्या अलीकडे धरीत नाहीं. याचीं कारणें लौकरच पुढें येतील. गोविंदचंद्राच्या दोन राण्या नयणकेलीदेवी आणि गोसलादेवी या नांवाच्या होत्या. पहिलीपासून झालेला पुत्र राज्यपाल यानें युवराज नात्यानें इ. स. ११४२ त एक दान दिलें आहे. तो बापाच्या पूर्वीं मेला असें दिसतें.

विजयचंद्र गोविंदचंद्रामागून गादीवर आला. तोहि प्रबल व कुशल होता. त्याच्या पुत्राच्या लेखांत त्यानें दिग्विजय केला असें वर्णन आहे. पृथ्वीराजरासांत याचें नांव विजेपाल असें दिलें आहे, आणि त्यांतहि यानें दिग्विजय केला असें वर्णन आहे. याचेंहि हम्मी-

राशीं युद्ध झाल्याचें इ. स. ११६८ च्या लेखांत वर्णन आहे. या वर्णनांत बापापेक्षां त्यानें हम्मीराची खोड जास्त जिरवली असें ' हम्मीरानें उगीचच्या उगीच पृथ्वीस त्रास देऊन संतप्त केलें तो लोकांचा संताप हम्मीरांच्या स्त्रियांच्या डोळ्यांतील अश्रुप्रवाहानीं त्यानें शमविला ' या काव्ययुक्त वर्णनावरून* दिसतें. शत्रूवरील विजय त्याच्या बायकांच्या दुःखानें वर्णन करण्याची ही संस्कृत कवींची तऱ्हा चमत्कारिक आहे. असो, यावेळीं हम्मीर म्हणजे खुश्रू; हा घोरीच्या भीतीनें गझनी सोडून लाहोर येथेंच येऊन राहिला होता ( ११५२ ). गझनीच्या राजवंशास यावेळीं उतरती कळा लागून तो अंताच्या जवळ पोहोंचला होता, तेव्हां त्याचा विजेपालानें पक्का पराभव केला हें आश्चर्यकारक नाहीं. विजयचंद्राचा पुत्र जयचंद्र हा इ. स. ११६८ त मोठा असून युवराजहि झाला होता. ही गोष्ट याच लेखावरून दिसते ( इं. ए. १५ पा. ७ ). जयचंदाचा राज्यारोहण समारंभ इ. स. ११७०, ३ जून रोजीं झाला असें स्पष्ट त्याच्या एका लेखांत लिहिलें आहे, तेव्हां विजयचंद्राच्या राज्यकाळ इ. स. ११५५ पासून इ. स. ११७० हा निश्चित होतो.

जयचंद्रहि प्रबल राजा होता. पण यावेळीं अजमीरच्या चाहमानांनीं कनोजच्या गाहडवालांपासून हिंदुस्थानच्या सम्राटाचा मान हिसकून घेतला होता. ही गोष्ट विजयचंद्राच्याच वेळीं झाली असें दिसतें. कारण अजमीरच्या विग्रहपालानें दिल्ली जिंकून तेथें आपला लेख इ. स. ११६३त खोदविला आहे. यांत अशी फुशारकी मारली आहे कीं, विग्रहपालानें हिमालय आणि विंध्य यांतील प्रदेश जिंकून आर्यावर्तास म्लेच्छांपासून पूर्ण मुक्त केलें. विजयचंद्राचा दिग्विजय

---

* भुवनदलनहेलाहर्म्यहम्मीरनारीनयनजलदधाराधौतभूतोपतापः ।

इ. स. ११६२च्या पूर्वी झाला असावा आणि त्याचा राज्यारंभ इ. स. ११५५त होऊन त्याचे विस्तृत विजय इ. स. ११५५पासून इ. स. ११६०पर्यंत मानले पाहिजेत.

शेवटीं हें सांगितलें पाहिजे कीं, कनोजच्या गाहडवालांच्या राजवंशातील पांची राजे जयचंद्रासह मोठे कर्तृत्ववान् होते. ते सामर्थ्यवान् व विजयी असून त्यांच्याजवळ मोठ्या फौजा होत्या. त्यांनीं अनेक ब्राह्मणांस दानें दिलीं आणि विद्वज्जनांचा परामर्ष घेतला. संस्कृतांतलि पंचमहाकाव्यापैकीं नैषधकाव्य जयचंदाच्या दरबारांतील श्रीहर्षकवीनें केलें आहे. जरी जयचंद हा गर्विष्ठ होता आणि त्यानें पृथ्विराजाशीं शत्रुत्व करण्यांत सर्वस्वनाशक चूक केली, तथापि त्याचा मृत्यु मानयुक्त झाला. महमद घोरीशीं लढतांना त्याचा हत्ती गंगेंत जाऊन तेथें तो बुडून मेला. यामुळें हल्लींच्या प्रसिद्ध रजपूतराजकुलांपैकीं एक अत्यंत वीर्यशाली कुल म्हणजे जोधपूरचे राठोड हे आपली उत्पत्ति कनोजच्या गाहडवालांपासून झाली असें मानतात यांत आश्चर्य नाहीं. मेवाडचे गुहिलोत वलभीच्या मैत्रकांपासून किंवा अलीकडील सातार्‍याचे भोसले मेवाडच्या गुहिलोतांपासून आपली उत्पत्ति मानतात, तशीच ही गोष्ट आहे. ही राठोडांची समजूत साधार आहे किंवा नाहीं याचा विचार पुढील टिप्पणींत विस्तृत रीतीनें आपण करूं.

---

## टिप्पणी—राठोड आणि गहरवार.

जोधपूरच्या राठोडांची दंतकथात्मक समजूत अशी आहे कीं, त्यांचा जो मूळ पुरुष मारवाडास प्रथम आला तो सीहाजी जयचंदाचा पणतु किंवा भावाचा नातु होता. संयुक्त प्रांताचे गहरवार (यांचा हल्लींचा मुख्य प्रतिनिधि मिर्झापूर जिल्ह्यांतील कांतितचा राजा होय ) हेहि असें मानतात कीं, आम्ही जयचंदाचे सरळ वंशज आहोंत. जयचंदाच्या कुलाचें

नांव कनोजच्या राजांच्या कित्येक लेखांत गाहडवाल असें स्पष्टपणें जेव्हां आढळलें, तेव्हां जोधपूरचे राठोड व संयुक्तप्रांताचे गहरवार हे एका कुलाचे असून ते कनोजच्या गाहडवाल राजांचे वंशज आहेत कीं काय हा प्रश्न चर्चित होऊं लागला. डॉ. होर्नलनें इं. ऍ. १४ मध्यें या प्रश्नाची चर्चा केली आहे; आणि दोन तीन कारणांवरून या उत्पत्तीविषयीं शंका नमूद केली आहे. पहिलें कारण असें कीं, गहरवाराचें गोत्र काश्यप आहे आणि राठोडांचें गौतम आहे. दुसरें, या दोन कुलांत परस्पर विवाह होतो. आणि तिसरें, गहरवारांस इतर रजपूत शुद्ध कुलाचे समजत नाहींत. या तिन्ही गोष्टी खऱ्या असतील किंवा नसतील; पण त्यांवरून जोधपूरचे राठोड त्यांच्यांत प्रचलित असलेल्या दंतकथेप्रमाणें कनोजच्या गाहडवालांपासून उत्पन्न झाले नाहींत असें सिद्ध होत नाहीं. याचीं कारणें पुढें दिल्याप्रमाणें आहेत.

पहिली गोष्ट ही कीं, खुद्द चंद्रदेवाच्या अत्यंत जुन्या लेखांत गाहडवालांचा वंश सूर्यवंश सांगितला आहे ( आसीदसीद्द्युतिवंशजातः वगैरे ), आणि चंद्रदेवानें आपल्या पुढील दोन लेखांत आपलें नांव चंद्रादित्य दिलें आहे. जोधपूरचे राठोडहि आपल्यास सूर्यवंशीं राठोड मानतात. ( गहरवार आपल्यास जयचंदाचे वंशज मानूनहि चंद्रवंशी मानतात हें आश्चर्य आहे ). हे राठोड दक्षिणच्या मालखेडच्या राष्ट्रकूटांहून यामुळें भिन्न आहेत. कारण ते दुसऱ्या भागांत सांगितल्याप्रमाणें चंद्रवंशी रजपूत म्हणून वर्णिलेले आहेत. राष्ट्रकूट हें नांव देशाचा मुख्य अधिकारी या अर्थानें अधिकाराचें नांव आहे. आणि या अर्थानें प्राच्य चालुक्यांच्या लेखांत तो शब्द आलाहि आहे ( भा. २ पा. १४४ ). अर्थात् हें नांव भिन्न कुलांचें अथवा जातींचें अलीकडच्या देशपांडे किंवा जोशी या नांवाप्रमाणें असूं शकेल. अर्थात् उत्तरेस राज्य करणारे राष्ट्रकूट दक्षिणेस राज्य करणाऱ्या राष्ट्रकूटांहून भिन्न आहेत. जरी हे उत्तरेचे राजपूत मुळांत जोधपूरच्या दंतकथेंत मानल्याप्रमाणें दक्षिणच्या कल्याण नगरचे असले तरी ते भिन्न आहेत. गाहड हें गांव कोठें आहे हें अद्याप ठरणें आहे. दुसरें, गाहडवाल या शब्दाचा अर्थ काय आणि तो शब्द या कनोजच्या राजांच्या लेखांत कसा येतो हें आपण पाहूं. हल्लींचें नांव गहर-

वार असून त्याचें मूळ स्वरूप गाहडवाल आहे हें अलीकडेच कळलें आहे. या ज्ञानाच्या अभावीं गहरवार शब्दाची व्युत्पत्ति चमत्कारिक तऱ्हेनें दोन तीन प्रकारें लावीत असत. त्याचा अर्थ घर बाहेर-घराच्या बाहेर किंवा गृहवर म्हणजे शनि ग्रहाचे जिंकणारे ( मिर्झापूर गॅझेटियर पा. २०४ ) असा करीत. पण आतां मूळ नांव गाहडवाल मिळालें आहे त्याचा अर्थ लावतांना क्षत्रियांतील जम्मूवाल वगैरे नावांवरून व वैश्यांतील अग्गरवाल शब्दांवरून गाहडगांवचे राहणारे असा बोध घेतां येतो. तेव्हां हें कुलनाम राहण्याच्या गांवावरून पडलें आहे. बहुधा राठोड वंशाच्या दुसऱ्या शाखांपासून या शाखेचें भिन्नत्व दाखविण्यास हें नांव लोकप्रचारांत प्रिय झालें असावें. कनोजच्या गाहडवालांच्या अनेक लेखांत राष्ट्रकूट नांव दिलेलें नाहीं. बहुधा मुख्यत्वें वंश म्हणजे सूर्यवंश सांगितलेला असतो. चंद्रदेवाच्या अगदीं पूर्वींच्या लेखांत हा वंशच सांगितलेला आहे. गोविंदचंद्र युवराज असतां मदनपालाच्या अमलांत जे लेख त्यानें लिहविले त्यांतच गाहडवाल नांव सांपडतें. कनोजच्या सर्व राजांच्या लेखांचें जें मामुली स्वरूप असतें,त्याहून या लेखांचें स्वरूप निराळें आहे हें सांगण्यासारखें आहे. श्रीच्या नमनाचा ठराविक श्लोक यांच्या प्रारंभीं नसून त्यांत प्रथम दामोदरास नमन आहे. आणि गाहडवाल वंशांत महीयल राजा ( इं. ए. १४ पा. १०३ आणि ए. इं. २ पा. ३५८ ) किंवा महीतल राजा ( इं. ए. १८ पा. १५ ) उत्पन्न झाला असें सांगितलें आहे. हे लेख पांचाल देशांतच तयार झाले आहेत; आणि लोकांत या देशांत प्रिय झालेलें गाहडवाल कुलनांव त्यांत दिलें आहे. या कुलाचें वंशनांव हें नव्हतें असें दिसतें. म्हणूनच इतर लेखांत या दरबारानें ठरविलेल्या मायन्यांत तें नांव नाहीं.

गाहडवाल या विशिष्ट कुलाचें हें वंशनांव नाहीं हें निःसंशय सिद्ध करणारें सर्वांत बलिष्ट प्रमाण आमच्या मतें असें आहे कीं, सर्व रजपूत लोकांत मान्य झालेल्या छत्तीस राजकुलाच्या यादींत हें नांव नाहीं. ही यादी केव्हां तयार झाली आणि छत्तिस संख्या कायम झाली याचा बहुतेक निश्चित अंदाज करता येतो. आपण पाहिलेंच आहे कीं, (भा. २ पा. ७७) कल्हणानें इ. स. ११४८ राजतरंगिणी लिहिली, त्यांत

राजपुत्रांच्या कुलांची छत्तीस संख्या सांगितली आहे. अर्थात् ही यादी या सनापूर्वी झाली असली पाहिजे. तसेंच या यादींत कछवाहांचें नांव आहे. हे दहाव्या शतकाच्या अंताच्या सुमारास प्रसिद्धीस आले. तेव्हां ही मोजदाद अकराव्या शतकांतली आहे असें अनुमान निघतें. ही मोजदाद कां केली गेली याचा विचार या भागाच्या शेवटीं हिंदुस्थानची सामाजिक समालोचना करतांना आपण करूं. पण एवढें येथें सांगणें जरूर आहे कीं, पूर्वींच्या कालविभागांत (इ. स. ८०० ते १०००) जातीचें बंधन ढिलें असून निरनिराळ्या जातींत अनुलोम विवाह होत असत (भाग २ पा. ३२०). पण या तिसऱ्या काल-विभागांत (१००० ते १२००) असले विवाह बंद पडले. आणि प्रत्येक जात आपली मर्यादा कायम करून विवाहांचीं कडक बंधनें अंमलांत आणूं लागली. या रीतीनें आपली जात मर्यादित करणें रजपुतांसहि जरूर वाटलें. यामुळें ही छत्तीस कुळांची मोजदाद अकराव्या शतकांतच झाली हें वरील अनुमान दृढ होतें. किंबहुना गोविंदचंद्राच्या एका लेखांतलि एका श्लोकावरून हें अनुमान दृढतम होतें. या महत्वाच्या श्लोकाबद्दल ज्यास्त पुढें लिहूं. हा लेख गोविंदचंद्रानें युवराज असतां पांचाल देशांत केलेला असून त्या वेळीं प्रचलित असलेल्या समजुती त्यांत प्रतिबिंबित झाल्या आहेत. पहिला गाहडवाल राजा चंद्र याच्या वेळीं हिंदु आस्तिक धर्मानें जी पुनः उसळी मारली, त्याबरोबरच सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रिय कुलांनीं आपलीं जातिबंधनें दृढ केलीं. असो, या वेळेस जर छत्तीस कुलांची परिगणना झाली असें स्पष्ट आहे, तर गाहडवाल हें नांव कुल-नांव असतें तर तें या यादींत निराळें निश्चयानें परिगणित झालें असतें. आतां कनोजचे गाहडवाल प्रसिद्धीस येण्यापूर्वीं ही यादी झाली म्हणजे अकराव्या शतकाच्या पूर्वार्धांत झाली असें मानतां येईल, आणि यामुळें यांत हें नांव नाहीं असेंहि म्हणतां येईल. पण चंद्रभाटानें ज्या वेळेस पृथ्विराजरासा लिहिला आणि त्यांत छत्तीस राजकुलांचीं नांवें सांगितलीं, यावेळेस जयचंदाचें गाहडवालकुल यशाच्या परमावधीस पोहोंचलें होतें; तेव्हां चंदाच्या छत्तीस कुलयादींत हें नांव जरूर आलें असतें. जर

लहान लहान राजांचीं कुलनामेंहि या यादींत आहेत, तर जयचंदासारख्या प्रबळ राजाच्या कुलाचें नांव वगळणें अशक्य आहे. आमच्या मतें चंदाची ही यादी सर्व उपलब्ध यादींत जुनी आहे ( भा. २ पा. ७७). पण रासाग्रंथ अव्वलपासून अखेरपर्यंत सोळाव्या शतकांतला बनावटी आहे,(आमच्या मतें तो मूळांत पृथ्विराजाच्या वेळचा ग्रंथ असून त्याचा विस्तार केवळ सोळाव्या शतकांत झालेला आहे) आणि गहरवार शुद्धकुळ रजपूत नाहींत अशी सोळाव्या शतकांत कल्पना असल्यानें त्यांचें नांव रासांतील यादींत नाहीं. असें मानलें तरी दुसऱ्या दोन याद्या, एक जैनांची व दुसरी कुमारपालचरिताची, टॉडनें दिल्या असून त्या फार जुन्या आहेत. त्या गाहडवालांच्या उदयानंतरच्या आहेत. कारण कुमारपालाचा राज्यकाल इ. स. ११४३ पासून ११५३ पर्यंतचा आपण पूर्वीं पाहिला आहे. त्याहूनहि अलीकडचें कुमारपाल चरित असलें पाहिजे. या दोन्ही यादींत गहरवारांचें नांव निराळें दिलेलें नाहीं. जयचंदाच्या वेळीं व त्याच्यानंतर शंभर दोनशें वर्षें गाहडवाल हिंदुस्थानांत प्रसिद्ध असले पाहिजेत. तेव्हां त्यांचें नांव यादींत न येणें असंभाव्य आहे. ह्या यादीमध्यें ठरलेली संख्या छत्तीसहि भरत नाहीं. तेव्हां त्यांत आणखी कांहीं नांवें सांगतांहि आलीं असतीं. किंबहुना जयचंद्रसूरीच्या इ. स. १४०० च्या सुमारास लिहिलेल्या रंभामंजरी नाटकांत जयचंद्र हा नायक असून सूत्रधाराच्या प्रारंभींच्या वाक्यांत अगदीं प्रथमच "छत्तीस कुळ राजवंशांना शिरोमणिभूत" असेंच जयचंदाचें वर्णन केलें आहे.† तात्पर्य, गाहडवाल हें नांव वंशनांव नसून एका शाखाकुलाचें नांव गांवावरून पडलेलें असलें पाहिजे.

आतां मुख्य कुल अथवा वंश गाहडवाल राजांचा कोणता हा प्रश्न उपस्थित होतो. छत्तिस नांवांच्या यादींत असलेलें राष्ट्रकूट कुल हेंच यांचें मुख्य कुल असलें पाहिजे असा पूर्ण संभव दिसतो. आमच्या मतें या गोष्टीचा निदर्शक बदाऊं राष्ट्रकूट लेख आहे. या लेखाची मिति अद्याप निश्चित होत नाहीं. जयचंदाच्या पराभवाच्या पूर्वींचा तो आहे

---

† षट्त्रिंशद्राजन्यवंशभालस्थललयमान श्री इक्ष्वाकुवंशभूषणस्य.

यांत शंका नाहीं; कारण त्यांत मदनपाल या राजाविषयीं असें म्हटलें आहे कीं, "मुसलमानांच्या हिंदुस्थानावरील स्वाऱ्या यानें अशक्य केल्या" ( ए. इं. १ पा. ६४ ). या लेखाच्या आरंभीं पुढील श्लोक आहे. ' प्रख्याताखिलराष्ट्रकूटकुलजक्ष्मापालदोःपालिता। पाञ्चालाभिधदेशभूषण-करीबोदामयूतापुरी। ' यांत प्रारंभीं अखिल व प्रसिद्ध असें विशेषण राष्ट्रकूट कुलाला लाविलें आहे; यांतलि अखिल शब्द सर्वव्यापि अशा अर्थाचा आहे, व त्यावरून राष्ट्रकूट कुलाच्या अनेक शाखा असून त्या सर्व पांचाल देशाला व्यापून ( यांत कनोजचा अन्तर्भाव होतो ) राज्य करीत आहेत असें म्हटलें आहे. किंबहुना कनोजच्या राज्यास पांचाल राज्य अशीच सर्वत्र संज्ञा आहे. ( अल्बेरूनीनें कनोज पांडवांकरितां प्रसिद्ध आहे असें जें म्हटलें आहे तें पांचालाकरितां असें समजलें पाहिजे. पांडवांचे मुख्य आधार पांचाल असून द्रौपदी त्या देशाची कन्या होती. ) पांचाल देशांत राज्य करणाऱ्या सर्व राष्ट्रकूट शाखा अखिल शब्दानें सूचित होत नसतलि, तर श्लोकांतील तो अखिल शब्द अर्थशून्य आहे असें म्हणावें लागेल. जयचंदाच्या पराभवापूर्वींचा हा पुरावा असून यावरून असें दिसतें कीं, जयचंद राठोड होता ही गोष्ट नंतर जशी सर्वत्र मान्य आहे, तशीच त्याच्या वेळींहि मान्य होती. छत्तीस राजवंशांपैकीं दुसऱ्या कोणत्याहि राजवंशांत गाहडवालांना घालण्यास एखादी दंतकथा किंवा लेख याचा आधार आपणांस मिळत नाहीं. अर्थात् संयुक्त प्रांताचे गहरवार व जोधपूरचे राठोड हे एकाच वंशाचे म्हणजे राष्ट्रकूट वंशाचे आहेत असेंच ठरतें.

या निर्णयाविरुद्ध जीं कारणें दाखविलीं जातात, तीं आमच्या मतें विशेष बलवान नाहींत. गहरवारांचें हल्लींचें गोत्र काश्यप आहे हें खरें. परंतु गाहडवालांचे सरळ वंशज राज्यभ्रष्ट झाल्यानें ऐश्वर्यहीन झाले; त्यांच्यांत पुरोहिताची संस्था कायम राहिली नाहीं, यामुळें ते आपलें मूळ गोत्र विसरले असावेत. क्वचित् प्रसंगीं धार्मिक विधींच्या वेळीं गोत्रोच्चार जरूर असतो, तेव्हां ज्यांना गोत्राचें स्मरण नाहीं, त्यांनीं काश्यप गोत्र घ्यावें हा नियम ठरलेलाच आहे; त्या नियमान्वयें हें गोत्र आलें असेल. किंवा असें अधिक संभवनीय आहे कीं, गहरवारांनीं नवे पुरोहित

आपल्या पडत्या काळांत घेतलें आणि ज्या क्षत्रियांना गोत्र नाहीं, त्यांनीं पुरोहिताचें गोत्र घ्यावें या विज्ञानेश्वराच्या नवीन चालू झालेल्या सिद्धांताप्रमाणें त्यांनीं नवीन गोत्र घेतलें असावें. कदाचित् असेंहि असूं शकेल कीं, याच नियमानुसार सिहाजीच्या जोधपूरच्या वंशजांनीं नवीन गोत्र गौतम घेतलें असावें, आणि गाहडवालांचें जुनें गोत्र काश्यप असावें. गाहडवालांच्या लेखांत दुर्दैवानें त्यांचें गोत्र दिलेलें आढळत नाहीं. किंबहुना यावेळच्या बहुतेक रजपूत कुलांच्या लेखांत गोत्र दिलेलें नसतें. कनोज येथें जाऊन अनेक ब्राह्मण कुलांपाशीं आम्हीं स्वतः जयचंदाच्या गोत्राविषयीं चौकशी केली. त्यानें राजसूय यज्ञ केला अशी प्रसिद्ध बोलवा आहे, व त्यावेळीं अनेक कनोजी ब्राह्मणांचीं कुलें ऋत्विक्, अध्वर्यु वगैरे यज्ञांत काम करणाऱ्या ब्राह्मणांचीं असलीं पाहिजेत. त्या ब्राह्मणांपाशीं यज्ञासंबंधीचा एखादा कागद मिळविण्याचा आम्हीं प्रयत्न केला, परंतु तो सिद्धीस गेला नाहीं. तथापि असा संभव दिसतो कीं, जयचंदाचें गोत्र काश्यप नसावें. कारण उपरिनिर्दिष्ट रंभामंजरी नाटकांत जयचंद आपल्या मुख्य राणीस काश्यपकुलनंदिनी असें संबोधितो. रजपूत घराण्यांत राण्यास त्यांच्या बापाच्या कुलावरून हांक मारण्याची चाल आहे हें प्रसिद्ध आहे. तात्पर्य, या सर्व कारणांवरून गाहडवाल व राठोड यांच्या गोत्रभेदावरून त्यांच्या एकवंशत्वाबद्दलच्या अनुमानास बाध येत नाहीं.

अर्थात् राठोड व गहरवार यांच्यांत परस्पर विवाह होतो या गोष्टीनेंहि बाध येत नाहीं. प्रथम तर ही गोष्ट सत्य नाहीं असेंच पुष्कळ लोक म्हणतात; पण ती सत्य मानली तरी हीं कुलें पूर्वीं एक वंशाचीं होतीं ह्या म्हणण्यास बाध येत नाहीं. कारण क्षत्रियांच्या निरानिराळ्या वंशांत विशेषतः पंजाबांत अशी लग्न करण्याची चाल सुरू झाली आहे. जम्मूस तर एका पंडितानें असें सांगितलें कीं, एकाच गोत्रांत पंचवीस पिढ्यानंतर लग्न करण्यास हरकत नाहीं असें स्मृतिवचन आहे. ही गोष्ट जरी चूक आहे, तरी रजपूतांत एकाच कुलांत लग्नें होऊं लागलीं आहेत हें नाकारतां येणें शक्य नाहीं. आणि गहरवार हें ज्या अर्थीं एक निराळें कुल झालें आहे आणि टॉडनें दिलेल्या छत्तीस कुलाच्या अगदीं अलीकडील चौथ्या यादींत गहरवार व राठोड हे निराळे सांगितले आहेत, त्या

अर्थी असे विवाह क्वचित् झाले असतील. पण येथें हें सांगितलें पाहिजे कीं, राजपुतान्यांतील रजपूत, कुलाच्या बाहेर विवाह करावा हा नियम छत्तीस कुलाच्या यादीबरहुकूम कडकडीत पाळतात. यांत गोत्रांचा नियम पाळला जात नाहीं हें खरें. उदाहरणार्थ 'जाडेजा' आणि 'चूडासमा' हें एक गोत्राचे असले तरी आपसांत विवाह करितात. छत्तीस कुलांच्या पहिल्या तीन यादींत त्यांचें नांव नाहीं, पण चौथ्या यादींत हीं कुलें गहरवार राठोडाप्रमाणेंच निरनिराळीं सांगितलीं आहेत.

शेवटीं गहरवार कमी दर्जाचे रजपूत आहेत अशी जी कल्पना केली आहे. ती चुकीची आहे. आणि ते तसे असतील तर हल्लींच्या गहरवारास तसें करणारीं कांहीं विशिष्ट कारणें असतील. कनोजचें राजघराणें गाहडवाल होतें ही गोष्ट हल्लीं समजली आहे; या गोष्टीनें या कल्पनेस कायमची मूठमाती दिली पाहिजे. कारण जयचंद, गोविंदचंद्र आणि चंद्र हे त्यांच्यावेळीं उत्तम कुलीन क्षत्रिय मानले जात होते. सर व्हिन्सेन्ट स्मिथनें असा तर्क केला आहे कीं, गाहडवाल हे मूळचे 'भर' लोक होते. या तर्काला कांहींच आधार नाहीं. मदनपाल युवराज गोविंदचंद्राच्या पूर्वोल्लिखित ताम्रलेखांत एक महत्वाचा श्लोक आहे.† ( इं. ए. १८ पान १५ ) तो या विषयासंबंधानें येथें देणें महत्त्वाचें आहे. ह्याचें भाषांतर येणेंप्रमाणें:—सूर्य आणि सोम यांपासून झालेलीं प्रसिद्ध क्षत्रिय कुलें विध्वस्त झाल्यावर जगतांत वेदध्वनि बंद झाला. असें पाहून ब्रह्मदेवानें धर्ममार्ग पुनः कायम करण्यासाठीं आणि क्षत्रियांचे प्रसिद्ध दोन वंश पुनः स्थापन करण्यासाठीं स्वतः अवतार घेण्याचें मनांत आणलें. आणि वरील ( गाहडवाल ) कुलांत महाराज

---

† प्रध्वस्ते सूर्यसोमोद्भवविदितमहाक्षत्रवंश-द्वयेस्मिन् ।
उत्सन्नप्रायवेदध्वनि जगदखिलं मन्यमानःस्वयम्भूः ॥
कृत्वा देहग्रहाय प्रवणमिह मनः शुद्धबुद्धिर्धरित्र्या–
मुद्धर्तुं धर्ममार्गान्प्रतियमिह तथा क्षत्रवंशद्वयं च ॥
वंशे तत्र ततःस एष समभूद्भूपालचूडामणिः ।
प्रध्वस्तोद्धतवैरिवीरतिमिरः श्रीचंद्रदेवोनृपः ॥

चंद्रदेव राजचक्राचा चूडामणि उत्पन्न झाला. त्यानें शत्रूंच्या उद्धत वीरांनीं उत्पन्न केलेला अन्धःकार नाहींसा करून टाकला. " यावरून असें दिसतें कीं, ( गाहडवाल राजकुलाचा संस्थापक चंद्रदेव यानें सूर्य-चंद्रवंशी क्षत्रियांची आणि वैदिक धर्माची पुनः स्थापना केली असें त्यावेळीं लोक समजत. तो धर्मशील क्षत्रिय रामासारखा वेद आणि धनुर्वेद या दोहोंत प्रवीण होता असें लोक मानीत असें दिसतें. या श्लोकावरून असेंहि दिसतें कीं, महंमुदाच्या शिपायांनीं व त्याच्या नंतर आलेल्या मसऊद या सुलतानाच्या सैन्यानें त्यावेळीं क्षत्रियांचा बराच नाश केला असावा. आणि राहिलेल्या क्षत्रियांत वैदिक---धर्माचरणाचा बराच लोप झाला असावा. अर्थात् चंद्रदेव गाहडवालास लोक ब्रह्मदेवाचा अवतार मानूं लागले हें साहजिकच होतें. कारण ब्रह्मदेवानेंच प्रथम वेद उच्चारला आणि ब्राह्मण व क्षत्रिय उत्पन्न केले. यावरून हें निश्चित होतें कीं, कनोजचें गाहडवालकुल कम अस्सल क्षत्रिय होते अशी समजूत त्यांच्या वेळीं तरी असणें शक्य नाहीं. आणि छत्तीस राजकुलांमध्यें त्याची गणना व्हावयासच पाहिजे होती. आणि तशी ती मुख्य कुल राठोडांत झाली असेंच मानलें पाहिजे.

हा भाग संपवितांना वरील श्लोकावरून निघणारीं आणखी दोनतीन अनुमानें सांगणें अवश्य आहे. पहिली गोष्ट ही कीं, बाराव्या शतकाच्या पूर्वार्धांत क्षत्रिय वंश दोनच मानले जात होते. अग्निवंशासह तीन मानीत नसत. दुसरी, वंश शब्द दोन अर्थानें वापरला जात असे; महा वंश आणि कुल. वरील श्लोकांत या दोन्ही अर्थानें तो आला आहे. त्याचप्रमाणें भा. २ पा. २२ वर छत्तीस वंशांची यादी रासामधून जी आम्हीं दिली आहे त्यांतहि तो दोन्ही अर्थानें आला आहे. तिसरी गोष्ट ही कीं, कलियुगांत क्षत्रिय उरले नाहींत हा सिध्दांत यावेळीं अस्तित्वांत आला नव्हता. निदान उत्तर हिंदुस्थानांत जेथें हा ताम्रलेख लिहिला गेला आणि त्यांत ब्रह्मदेवानें स्वतः चंद्रदेवरूपानें अवतार घेऊन क्षत्रियांचें सूर्यचंद्रवंश पुनः प्रस्थापित केले असें वर्णिलें आहे, तेथें निदान हा सिध्दांत प्रचालित झालेला नव्हता. यावरून भा. २ परिशिष्ट ४ पान ४१२—४१७ वर आम्हीं जें मत प्रतिपादन केलें आहे त्यास पुष्टि मिळते

## टिप्पणी.

## राठोड म्हणजे गाहडवाल हे दक्षिणचे आहेत काय ?

जोधपूर बिकानेरचे राठोड हे भाग दोनमध्यें वर्णिलेल्या राष्ट्रकूटांहून आमच्या मतें भिन्न आहेत. हे राष्ट्रकूट सात्यकींच्या वंशांत जन्मलेले चंद्रवंशी क्षत्रिय आहेत असें त्यांच्या कोरीव लेखांत सांगितलेलें असतें. परंतु जोधपूर-बिकानेरचे राठोड ( राष्ट्रकूट ) व कनोजचे गाहडवाल हे त्यांच्या लेखांत सूर्यवंशी वर्णिलेले असतात. तेव्हां ते जरी दक्षिणेंतून आले असले, आणि ते राष्ट्रकूट हें हुद्याचें नांव जरी एकच घेतात तरी मलखेडच्या राष्ट्रकूटाहून भिन्न मानले पाहिजेत. हे राठोड दक्षिणेंतून आले अशी सामान्य समजूत आहे ही तरी खरी आहे काय ? या प्रश्नाचा विचार आम्ही या टिप्पणींत चारणांच्या लेखांवरून व रंभामंजरी नाटिका ( यांत जयचंद हा नायक आहे ) हिच्या आधारें करणार आहोंत.

गाहडवाल आपल्या लेखांत आम्ही दक्षिणेंतून आलों असें, ज्याप्रमाणें बंगालचे सेन आपल्या लेखांत आम्ही कर्नाटकांतून आलों, आम्ही कर्नाटक क्षत्रिय आहोंत असें स्पष्ट म्हणतात. त्याप्रमाणें, म्हणत नाहींत. पण असें न म्हणणें कांहींच अनुमानाला जागा देत नाहीं. विधान अवश्य असल्याशिवाय विधान नसणें यावरून अनुमान कांहींच निघत नाहीं. बिकानेर दरबारच्या ग्रंथसंग्रहालयांतील सरकारी ख्यात लेखांवरून असें दिसतें कीं, राठोड हे मूळचे अयोध्येचे व तेथून एका राजानें येऊन परस्पर कनोज शहर घेतलें. पण ही हकीकत विश्वसनीय नाहीं. कारण ऐतिहासिक काळांत इ. स. ४०० पासून इ. स. ११०० पर्यंत कनोज, हें मौखरी, वर्धन, वर्मा व प्रतिहार इतक्या राजकुलांच्या ताब्यांत होतें. शिवाय हे, ख्यात जयचंद आणि त्याचा बाप विजयपाल यांचा उल्लेख करतात, पण गोविंदचंद्र आणि त्याचे पूर्वज यांचा उल्लेख करीत नाहींत. गोविंदचंद्र व त्याचे पूर्वज यांचा उल्लेख जोधपूर दप्तरांतील लेखांतहि नाहीं. जोधपूर येथील एका ख्यात वहींत बिकानेर प्रमाणेंच दक्षिणचा उल्लेख नाहीं. पण दुसऱ्या एका वहींत असें आढळतें कीं, विपुलाचा पुत्र नंदपाल कर्नाटकचा राजा झाला, आणि त्याचें वंशज कनोजेस येऊन

राज्य करूं लागले. या कनोजच्या वंशांत विजयपालाचा पुत्र जयचंद हा शेवटचा राजा झाला. विजयपालाच्या बापाचें नांव अभयचंद असें दिलेलें आहे. (हें नांव गोविंदचंद्राचें अन्य नांव असावें.) आणि त्याच्या बापाचें नांव ब्रम्ह असें दिलें आहे. कोरीवलेखांत चंद्रदेव ब्रम्हाचा अवतार होता असें वर्णिलें असल्याचें आपण आतांच पाहिलें आहे. तेव्हां या दंतकथेवरून गाहडवाल दक्षिण कर्नाटकांतून आलें असें दिसतें. पण जोधपूर येथील लेखांतहि कल्याणचें नांव नाहीं. याच सरकारी वहीसारखा राजपुरोहितापाशीं जो वंशलेख आहे त्याच्या मथळयांत असे शब्द आहेत— " अयोध्या पीछे कुंकनदेश, गड कल्याण, कर्नाटकदेश पीछे कनोज ' हें वाक्यहि संदिग्ध आहे. कारण कल्याण कोकणांतील आहे व कर्नाटकांतहि आहे. कर्नाटकचे कल्याण सोमेश्वर चालुक्यानें अकराव्या शतकाच्या मध्याचें सुमारें स्थापन केलें; तेव्हां गाहडवाल बहुधा तेथून आले नसावेत. असेंहि असूं शकेल कीं, ते प्रथम अयोध्येहून कोकणांत गेले व तेथून कर्नाटकांत व शेवटीं कनोजेस आले.

ही एक संदिग्धता आहे तरी राठोड ऊर्फ गाहडवाल हे दख्खन म्हणजे महाराष्ट्रांत उत्तरेकडे गेले असें कित्येक कारणांवरून दिसतें. पहिली गोष्ट ही कीं, ह्याचें नांव राष्ट्रकूट हें दक्षिणेकडील लेखांतच सांपडतें. किंबहुना देश किंवा प्रांतवाची राष्ट्र शब्द दक्षिणेंतच येतो. (मल्ल राष्ट्र, गोपराष्ट्र, पांडुराष्ट्र हें महाभारतांतील देशांच्या यादींत दक्षिणेंतले देश आहेत. तसेंच अशोकाच्या शिलालेखांत राष्ट्रीक हा शब्द दक्षिणेंतच येतो. ) दुसरें, जोधपूर येथें अशी समजूत आहे कीं, राठोडांच्या कुलदेवीची मूर्ति जोधपूरच्या एका राजानें दक्षिणेंतून आणली. तिचें हल्लींहि नांव ' नागनोची ' असें मराठी आहे. तिसरें नयचंद्रसूरी यानें रंभामंजरी नांवाची एक नाटिका लिहिली असून तींत जयचंद नायक आहे. ही नाटिका जयचंदानंतर दोनशें वर्षांनीं प्राकृत महाराष्ट्रींत लिहिलेली आहे. यांत एक शुद्ध मराठींत रचलेली कविता पाहून आम्हांस आश्चर्य वाटलें. पहिल्या अंकाच्या प्रारंभींच वैतालिकांच्या तोंडांत जयचंद्राच्या स्तुतिपर गावयाचें जें पद्य घातलेलें आहे तें मराठींत आहे.

जरि पेखिला मस्तकावरि केशकलापु। तरि परिखुखटा मयूराचे पिच्छप्रतापु॥

जरि नयनाविषयु केला वेणिदण्डु। तरी साक्षात्जाला भ्रमरश्रेणीदण्डु ॥
जरि दृग्गोचरि आला विशालभालु। तरी अर्धचन्द्रमण्डल भईलऊर्णयुजालु ॥
भ्रूजुराल जाणूद्द्वैधीकृत कंदर्पचायु। नयननिर्जित सुजला खंजनु निःप्रापुत ॥
मुखमण्डलु जाणु शशांक देवताचे मण्डलु। सर्वांग सुंदर मूर्तिमंतकामु।
कल्पन्द्रुम जैसे सर्वलोकआशाविश्रामु ॥

बहुतेक सर्व नाटक दरबारी महाराष्ट्री भाषेंत असून हें एवढेंच पद्य मराठींतलें घातलें आहे. ह्यावरून असें अनुमानें निघेल कीं, नयचंद्र हा दक्षिणचा जैन पंडित असावा. पण ह्याहिपेक्षां विशेष संभवनीय अनुमान असें कीं, जयचंदाच्या दरबारचे वैतालिक दक्षिणचे असावेत. आणि यांचीं स्तुतिपर पद्यें मराठींत गावयाचा परिपाठ असावा. तात्पर्य, गाहडवाल कुल दक्षिणेंतून आलेलें दिसतें, आणि ही त्यांची परंपरा नयचंद्रसूरीच्या कालापर्यंत माहित असावी. दहाव्या व अकराव्या शतकांत दक्षिणचे क्षत्रिय व उत्तरेचे क्षत्रिय असा भेद पडला नव्हता. आणि महाराष्ट्रांतील गाहडवाल हे उत्तम क्षत्रियांत गणिले जात होते. याच नाटकांतील जयचंदाच्या प्रशंसापर पहिल्याच विशेषणावरून हें दिसतें. हें दक्षिणचें राष्ट्रकूट कुल उत्तर हिंदुस्थानांत सर्व देशभर बदाऊंपासून मिथिलेपर्यंत पसरलें, ही गोष्ट अकराव्या शतकांतील लेखांवरून स्पष्ट दिसते. या कुलाची गाहडवाल नांवाची एक शाखा असून तिनें कनोज जिंकून तेथें आपलें साम्राज्य स्थापन केलें.

ही टिप्पणी संपवितांना या नाटकावरून दोन गोष्टी दिसतात त्या अन्यत्र सांगितल्या असल्या तरी येथें पुन्हां आम्ही सांगतों. जयचंदाच्या पहिल्याच विशेषणावरून छत्तीस राजकुलांचें शिरोभूषण गाहडवाल कुल मानलें जात होतें. अर्थात् तें निराळें कुल असतें तर छत्तीस कुलांच्या प्राचीन यादींत त्यांचें निराळें नांव यावयास पाहिजे होतें. दुसरें, जयचंद आपल्या मुख्य राणीस 'काश्यपकुलनंदिनी' असें संबोधितो. राजपुतांत राण्यांस त्यांच्या जन्मकुलावरून संबोधण्याचा प्रघात हल्लींहि आहे. अर्थात् या राणीचा बाप काश्यप–गोत्री होता, तेव्हां गाहडवालांचें गोत्र काश्यप किंवा शांडिल्य असूं शकत नाहीं.

# प्रकरण नववें

## बंगालचे पाल राजे.

आमच्या इतिहासाच्या दुसऱ्या कालविभागांतील पाल राजांचा इतिहास भाग २ प्रकरण ९ यांत आम्हीं दिला आहे. तेथें महीपाल पहिला येथपर्यंत हकिकत आली आहे. तिसऱ्या काल-विभागांतहि हें पालघराणें राज्य करीत होतें. (इ. स. १०००ते इ. स. १२००). अर्थात् पुष्कळ काळपर्यंत राज्य करीत असलेलें हें राजघराणें संस्मरणीय आहे असें जें सर व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो तें बरोबर आहे. तथापि, या राजघराण्याच्या राज्यकालाचे दोन ठळक विभाग पडतात; आणि आश्चर्य हें कीं, पहिला विभाग महीपाल पहिला याच्या शेवटीं म्हणजे या भागांत घेतलेल्या कालविभागाच्या आरंभींच पडतो. बहुतेक पालांच्या लेखांत असें लिहिलेलें आढळतें कीं, महीपालाचें राज्य ( किंवा त्याच्या बापाचें ) या सुमारास कांहीं वेळ नष्ट झालें. कारण महीपालानें ' अनधिकृत लोकांनीं बळकाविलेलें आपलें पैतृक राज्य पुनः मिळविलें ' असें नेहमीं या लेखांत वाक्य* येतें ( सारनाथ लेख इ. स. १०२६ इं. ए. १४ पान १३९ ). सर व्हिन्सेन्ट स्मिथ यानें इ. स. १९०९च्या इं. ए. मध्यें पालांच्या उपलब्ध सर्व लेखांची यादी विस्तृत माहितीसह दिली असून त्यांची वंशावळहि प्रत्येक राजाच्या राज्यारोहणाच्या संभवनीय काळासह दिलेली आहे. त्या यादींत महीपालाचा राज्यारोहण-काल स्मिथनें इ. स. ९८० धरला आहे. कारण यानें पुष्कळ वर्षें राज्य केलें, इतकेंच नव्हे तर लेख नंबर १७ मध्यें त्याचें राज्यवर्ष ४८ दिलें आहे. तर इ. स. ९८०

---

* अनधिकृतविलुप्तं राज्यमासाद्य पित्र्यम् ।

हा त्याचा राज्यारंभकाल धरला असतां अनधिकृत लोकांनीं राज्य बळकावल्याचा काल हाच धरला पाहिजे. मागेंपुढें धरणें योग्य होणार नाहीं. दुर्दैवानें कोणीं राज्य बळकाविलें व कसें याचा तपशील कोणत्याही लेखांत मिळत नाहींत. मागच्या भागांत (पा. २३४) आम्हीं असा तर्क केला आहे कीं, महमुदाच्या स्वाऱ्यांनीं जो धक्का हिंदुस्थानास बसला तो बंगालपर्यंत पोहोंचला. आमचें असें म्हणणें नाहीं कीं, मुसलमानधर्मी तुर्क त्यावेळीं इतके दूर पूर्वेस पोहोंचले. पण हें मानणें शक्य आहे कीं, जे रजपूत राजे पंजाबांतून किंवा वायव्येकडील प्रांतांतून राज्यभ्रष्ट होऊन देशोधडी लागले, त्यांच्यापैकीं कोणी तरी इतके पूर्वेस येऊन हें राज्य बळकाविलें. हिंदुस्थानच्या इतिहासांत असा प्रकार कित्येकदां घडला आहे. (उदाहरणार्थ, अल्लाउद्दिनानें चितोडांतून स्थानभ्रष्ट केलेले शिसोदिये नेपाळांत जाऊन राज्य बळकावून बसले. किंवा राठोड हे जयचंदाच्या पराभवानंतर मारवाडांत जाऊन राज्य बळकावून बसले.) पण हल्लीं, दिनाजपूर लेख जे. आर. ए. एस्. बंगाल १९११ यांत छापला आहे. त्यांत गौडाच्या एका कांबोज राजानें दिनाजपूर येथें शिवाचें देवालय बांधलें असें वर्णन आहे.[1] यावरून असा तर्क बांधला आहे कीं, या लेखाची तारीख शके ८८८ म्हणजे इ. स. ९६६ ही वरील वृत्ताच्या जवळ असून एखाद्या कांबोज राजानें गौडावर स्वारी करून राज्य बळकाविलें असावें. (काम्बोज म्हणजे पश्चिम तिबेट). या राजापासून किंवा त्याच्या वारसापासून आपल्या बापाचें गौडराज्य महीपालानें घेतलें असावें. परंतु हा प्रकार फारच लवकर उत्पन्न होतो. आणि विग्रहपालाच्या वेळीं राज्य दुसऱ्या कोणीं बळकाविलें असें कोणत्याही लेखांत सांगितलेलें नाहीं. आणि विग्रहपालानें इ. स. ९६०पासून इ.

---

[1] काम्बोजान्वयजेनगौडपतिना तेनेन्दुमौलेरयम् ।
प्रासादो निरमायि कुंजरघटावर्षे जगद्भूषणः ॥

स. ९८०पर्यंत राज्य केलें. शिवाय वरील दिनाजपूर लेखांत कांबोजानें पालांचें राज्य घेतलें असें वर्णन नाहीं. आणि पालांच्याहि लेखांत त्यांचें राज्य एखाद्या कांबोजराजानें घेतलें असेंहि वर्णन नाहीं. तेव्हां असेंहि म्हणतां येंते कीं, गौडराज्यांतीलच एखाद्या मांडलिकानें हा बखेडा उत्पन्न केला असेल आणि तो महीपालानें मोडून त्यास हुसकावून लाविलें असेल.

या मध्यंतरीं राज्य बळकावण्याची खरी हकीकत कांहीं असो, महीपाल पहिला यानें पाल–राजघराण्याच्या नवीन आयुष्यास प्रारंभ केला. आणि न्यायानें व पराक्रमानें ४८ वर्षांवर राज्य केलें. सर्व पालराजांमध्यें त्यानें आपलें नांव बंगालच्या लोकांच्या स्मृतींत कायम ठेविलें आहे. “ ओरिसा व कुचबहारच्या कोपऱ्यांत सुद्धां त्याच्या स्तुतिपर गाणीं अद्याप ऐकूं येतात. ” त्यानें आपलें राज्य पश्चिमेकडे मगध व बिहार यांवर पूर्ण बसविलें आणि पूर्वबंगाल व उत्तरबंगाल किंबहुना ओरिसा व आसाम त्याच्या राज्यांत अन्तर्भूत होतें. त्याच्या कारकीर्दींत बौद्ध धर्माला पुनः जोर आला. व धर्मपाल आणि इतर कित्येक साधु मगधांतून इ. स. १०१३ मध्यें तिबेटांत गेले. त्या देशांत गौतमाच्या धर्मास त्यानीं पुनः पूर्वींच्या उज्वलतेस आणलें. ( स्मिथ. पा. ४०० ) अतिश नांवाचा दुसरा धर्मप्रचारक विक्रमशीलाहून महीपालाच्या पुढचा राजा नयपाल याच्या कारकीर्दींत इ. स. १०४२त तिबेटास गेला. असो, महिपाल पहिला यानें इ. स. ९८०पासून इ. स. १०३८पर्यंत स्मिथच्या मतें राज्य केलें. त्याच्या मागून त्याचा पुत्र नयपाल व त्याच्यामागून त्याचा पुत्र तिसरा विग्रहपाल इ. स. १०५९मध्यें राजा झाला. चेदीचा कर्ण प्रतिहार सम्राटांच्या उतरत्या काळांत आपली सत्ता बनारसच्या पूर्वेस विशेषतः चंपारण्यांत वाढवीत होता. त्याचा पराभव विग्रहपालानें केला असें वर्णन आहे. याचा ‘ आमगाछी ’ लेख भाग दोन यांत आम्हीं वर्णि-

लाच आहे. हा तीनदां प्रसिद्ध झाला आहे. डॉ. होर्नेल यानें (इं. ए. १४ पा. १६२) नंतर किलहॉर्ननें दुरुस्त करून (इं. ए. २१ पा. ९७) आणि शेवटीं आर. डी. बानर्जीनें, विग्रहपाल इ. स. १०८०मध्यें मरण पावला. त्याचा ज्येष्ठ पुत्र महीपाल दुसरा गादीवर आला. येथपर्यंत पाल घराण्याचा दुसरा विभाग सुमारें शंभर वर्षें उत्कर्ष पावला. आणि येथून त्याच्या सत्तेस उतरती कळा लागली. महीपाल दुसरा आपल्या भावास कैदेंत टाकून जुलमानें राज्य करूं लागला. यामुळें कैवर्तांनीं एका दिव्योकाच्या नेतृत्वाखालीं बंड केलें. महीपाल या बंडांत मारला गेला. तेव्हां त्याचा धाकटा भाऊ शूरपाल यानें थोडा वेळ राज्य केलें. पण वरेंद्रामध्यें म्हणजे उत्तर बंगालमध्यें कैवर्तांची ही बंडाळी मोडली नाहीं. आणि दिव्योकाच्या मागें तेथें त्याचा पुत्र भीम सत्ताधारी झाला. विग्रहपाल तिसरा याचा कनिष्ठ पुत्र रामलाल हा मोठा जोरदार आणि लायक राजा निपजला. त्यानें शूरपालानंतर वरेंद्र जिंकण्याची तयारी केली. त्याची राजधानी अद्याप गौड म्हणजे पश्चिम बंगालांतील मोंघीर येथेंच बहुधा असावी. याचा मामा ' मोहन ' मिथिलेचा मांडलिक राष्ट्रकूट कुलांतला होता. त्यानें व इतर मांडलिकांनीं व कांहीं दोस्त राजांनीं—यांपैकीं पीथीचा देवरक्षित एक होता—अशा सर्वांनीं मदत केल्यानें रामपालानें भीमास जिंकलें. भीम शेवटीं मारला जाऊन वरेंद्रांत रामरायाची सत्ता कायम झाली. हा तपशील एका काव्यावरून मिळाला आहे. हें काव्य ' संध्याकरनंदि ' रामपालाच्या सांधिविग्रहिक प्रधानाचा पुत्र यानें केलेलें असून त्यांतील प्रत्येक श्लोक द्व्यर्थी आहे, अर्थात् हें काव्य समकालीन पुराव्यासारखें आहे. तें बरेंद्राची राजधानी पौंडवर्धन येथें लिहिलें गेलें. त्यांत एका अर्थानें रामपालाचा इतिहास दिला आहे; व दुसऱ्या अर्थानें अयोध्येचा अवतारी राजा राम याचा इतिहास दिला आहे. या काव्याच्या पहिल्या सर्गावरच टीका असून

अर्थबोध होतो. बाकीचे तीन सर्ग अजून लागले नाहींत. आणि ताराप्रसादशास्त्री यांनीं या सर्व हकीकती प्रोसीडिंग आर. ए. एस्. बेंगॉल १९०० इसवी यांत प्रसिद्ध झालेल्या आपल्या या रामचरित्रावरील लेखांत दिल्या असून, आणखी असें म्हटलें आहे कीं, या द्व्यर्थी श्लोकांच्या तीन सर्गांत बरीच ऐतिहासिक माहिती भरलेली सध्यां अज्ञात आहे. ( पान ७३ ).

सुदैवानें गोविंदचंद्राची एक राणी कुमरदेवी हिच्या अतिशय महत्त्वाच्या सारनाथ लेखावरून वरील हकीकतीस चांगला दुजोरा मिळतो. हा लेख ए. इं. ९ पान ३१९ वर छापलेला आहे. या लेखांत तीन रजपूत कुलांची म्हणजे पाल, राष्ट्रकूट व गाहडवाल या कुलांची अतिशय महत्त्वाची माहिती आपणांला मिळते. आम्ही या तिन्ही राजांच्या विषयीं माहिती पालास प्रारंभ करून देतों. यांत असें सांगितलें आहे कीं, रामपालाचा उत्कर्ष, त्याचा मामा मथन अंगदेशाचा राजा ( मांडलिक ) यानें पीर्थीचा राजा देवरक्षित यास जिंकून करविला.* हें पीथी कोठें आहे हें सांगतां येत नाहीं. पण हा लेख प्रसिद्ध करणारा स्टेन कोनौ यांच्या मतें वेंगी देशांतील पीठापूर हें तें होय. महण हा गौड देशांतील निर्भय वीर होता असें वर्णन आहे. यावरून गौड राजा रामपाल याचा तो मांडलिक ठरतो. तो अङ्गापहि वर्णिला आहे. अङ्ग म्हणजे मिथिल येथील तो राजा असावा. त्याला शंकरदेवी नांवाची कन्या होती. देवरक्षिताचा पराभव केल्यानंतर रजपुतांच्या चालीप्रमाणें त्यासच त्यानें ती मुलगी

---

* गौडेऽद्वैतभटःसकांडपटिकःक्षत्रैकचूडामणिः ।
प्रख्यातो महणोऽङ्गपःक्षितिभुजां मान्योऽभवन्मातुलः ॥
तं जित्वा खलु देवरक्षितमधात् श्रीरामपालस्य यो ।
लक्ष्मीं निर्जित-वैरिरोधन तया दैदीप्यमानो दयाम् ॥

दिली. तिच्यापासून प्रसिद्ध राणी कुमरदेवी उत्पन्न झाली; व तिनें या लेखानें संस्मरणीय केलेला बौद्ध विहार बांधला. यावरून असें दिसतें कीं, देवरक्षित हा बौद्ध होता. व त्याची मुलगी कुमरदेवी हीहि बौद्ध होती. गोविंदचंद्र हा कट्टा हिंदु असून त्याशीं तिचा विवाह झालेला होता. त्याचें वर्णन गहडवाल वंशांतील चंद्रराजाचा पौत्र व मदनचंद्राचा पुत्र असें यांत केलें आहे. गहडवालांना प्रसिद्ध क्षत्रवंश असें म्हटलेलें आहे. ह्यावरून ते उत्तम क्षत्रिय त्या वेळीं समजले जात होते. तसेंच महनाला क्षत्रचुडामणि म्हटलेलें आहे, ह्यावरून तोहि उत्तम राजपूत होता असें ठरतें. वर निर्दिष्ट केलेल्या रामचरित्रांत तो राष्ट्रकूट म्हणजे राठोड होता असें सांगितलें आहे. त्याची बहीण ही रामपालाची आई होती. यावरून रामपालहि रजपूत ठरतो. महनाची कन्या देवरक्षिताला दिली होती ह्यावरून तोहि रजपूत दिसतो. या विवाहसंबंधानें राष्ट्रकूट व गाहडवाल एक असा जो आम्हीं सिद्धांत प्रतिपादिला आहे त्यास बाध येत नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे. कारण देवरक्षिताची मुलगी राष्ट्रकूट कुलांतील स्त्रीपासून झालेली गाहडवालाला दिली; म्हणजे राष्ट्रकूटाच्या मुलीची मुलगी गाहडवालाला दिलीं, अर्थात् राष्ट्रकूट आणि गाहडवाल यांत हा शरीरसंबंध झालेला नाहीं. असो, आणखी एक महत्त्वाची गोष्ट पालाशीं संबद्ध नसली तरी या लेखांत आलेली येथें सांगण्यासारखी आहे. गोविंदचंद्राच्या ताब्यांत बनारस होतें हें आपल्यास ठाऊकच आहे. या लेखांत असें वर्णिलें आहे कीं, तुरुष्क शिपायांनीं दूषित केलेल्या वाराणशीचें रक्षण करण्याकरितां हरानें सांगितल्यावरून हरीनें गोविंदचंद्ररूपानें अवतार घेतला. † स्टेन कोनौनचे असें मत आहे कीं,

---

† जगति गहडवाले क्षत्रवंशेप्रसिद्धे जनि नरपतिचन्द्रश्चन्द्रनामा नरेन्द्रः ।
वाराणसीं भुवनरक्षणदक्ष एको दुष्टां तुरुष्कसुभटादवितुं हरेण ।
उक्तो हरिःस पुनरत्र बभूव तस्माद्गोविंदचंद्र इति सुप्रथिताभिधानः ॥

या श्लोकावरून गोविंदचंद्राच्या वेळीं बनारसेवर तुर्कांच्या स्वाऱ्या झाल्याचें दिसतें. पण वरील श्लोकाचा अर्थ तुर्की शिपायांनीं पूर्वींच विटाळलेल्या बनारसेचें रक्षण करण्यासाठीं गोविंदचंद्र आला. म्हणजे तुर्की शिपायांनीं या शब्दाचा संबंध रक्षणाकडे न घेतां, दुष्टाकडे घ्यावा. त्याशिवाय बनारसाला दुष्ट म्हणतां येणार नाहीं. या लेखांवरून बनारसेवर तुर्कांचीं स्वारी झाली ही गोष्ट निश्चित होते. परंतु हें दूषण पूर्वींच घडलें असावें; किंबहुना या शब्दांत अहमद नियाल्तगीन यानें केलेल्या स्वारीचा उल्लेख दिसतो. कोनौनें जें भाषांतर दिलें आहे त्यांत ‘ दुष्टाम् ’ या शब्दांचें भाषांतर चुकीनें राहिलें आहे. ( श्लो. १६ पान ३२७ ).

हा लेख आपली मिति सांगत नाहीं, तरी यांत जो राजांचा संबंध-म्हणजे रामलाल याचा मामा महन होता आणि गोविंदचंद्राची राणी कुमरदेवी ही महनाच्या मुलीची मुलगी होती असा-दाखविला आहे, यावरून रामलाल हा गोविंदचंद्राच्या पूर्वीचा दिसतो. स्मिथनें याचा राज्यारंभ इ. स. १०८० दिला आहे तो अर्थात् बरोबर आहे. व त्यानें सर्व बंगालवर पुष्कळ वर्षें राज्य केलें. मिथिल देश त्यानें जिंकला आणि भीमासहि त्यानें लढाईंत मारलें या गोष्टी वैद्यदेवाच्या कमोली येथील लेखांतहि सांगितल्या आहेत. ( ए. इं. २ पा.३५० ) यांत त्याचा पुत्र कुमारपाल हा कामरूपाचा राजा एका द्व्यर्थी श्लोकांत उल्लेखिला आहे. आणि रामपालानें रामाप्रमाणें भीमरूपी रावण मारला व मिथिलेची कन्या म्हणजे भूमि मिळविली असें खुबीनें वर्णन केलें आहे.* त्यावरून भीमानें उठाविलेलें बंड फार मोठें होतें. आणि त्याशीं लढणें रामाच्या समुद्रोल्लंघनासारखें कठीण होतें. जे. आर. ए. एस. बंगाल ५९ पान ६८ वरील लेखांतहि या बंडाचा उल्लेख आहे. याचा जास्त उल्लेख पुढें येईल.

रामपालामागून इ. स. ११३० मध्यें कुमारपाल गादीवर बसला. उपरिनिर्दिष्ट ए. इं. २ यांतील लेखांत त्याचें नांव नाहीं. आणि त्याच्या मागून इ. स. ११३६ त याचा मुलगा गोपाळ तिसरा गादीवर आला. या दोन राजांविषयीं विशेष गोष्टी सांगितलेल्या मिळत नाहींत. गोपाळाचें नांव तर, त्याचा चुलता मदनपाल इ. स. ११४० त त्याच्या मागून गादीवर आला, त्याच्या एका अलीकडे सांपडलेल्या लेखांत मिळालें आहे. याचा एक ताम्रलेख जे. आर. ए. एस. बंगाल ६९ भा. १ पा. ६६ मध्यें प्रासिद्ध झाला असून त्यांतही

*तेने येन जगत्त्रये जनकभूलाभाद्यथावद्यशो ।
क्षोणीनायकभीमरावणवधाद्युद्धार्णवोल्लंघनात् ॥

मनोरंजक माहिती दिली आहे कीं, हा गांव एका ब्राह्मणास, त्याची राणी चित्रमटिका हिला समग्र महाभारत ऐकवल्याबद्दल दान दिला गेला. यावरून हा राजा बौद्ध होता तरी तो ब्राह्मणांस अनुकूल होता व त्याची राणी ब्राह्मणाकडून महाभारत ऐकण्याइतकी भक्तिमान् हिंदु होती असें दिसतें. दुसरें या पालांचें बहुतेक दानलेख पौंड्रवर्धन भुक्तीमधले म्हणजे वरेंद्र अथवा उत्तर बंगालमधले आहेत आणि सेनांचेहि दानलेख याच प्रांतांतले आहेत. सेनांची सत्ता मुख्यतः पूर्व बंगल्यांत होती, आणि उत्तर बंगाल पाल व सेन यांत वाटलेलें असावें. पश्चिम बंगाल व मगध बिहारासह पालांच्या सत्तेखालीं असावें. मदनपालाच्या कारकीर्दींतील राजकीय घडामोडी आपल्याला विशेष माहीत नाहींत. परंतु त्याच्या वेळेस पालांच्या राज्यास उतार लागला. मदनपालाच्या मागें त्याचा मुलगा गोविंदपाल इ. स. ११६१ मध्यें गादीवर आला. एक लेख विक्रम संवत् १२३२ चा त्याच्या राज्यकाळाच्या चौदाव्या वर्षींचा ( स्मिथची यादी पहा. ) सांपडला आहे. त्यावरून हें वर्ष निश्चित होतें. याच्यामागून महींद्रपाल गादीवर आला. याचे लेख सांपडलेले आहेत. त्यांतील शेवटचा ११९३ चा आहे. लोकांच्या दंतकथेंत बिहारवर स्वारी करणारा मुसलमान महंमद बखत्यार खिलजी यानें ज्या इंद्रद्युम्नाचा नाश केला, तोच हा असावा.

बाराव्या शतकांत बंगालचे दोन भाग पडून एकमेकांशीं विरोध करणारीं दोन राज्यें म्हणजे पश्चिमबंगाल्यांत मोंघीर येथील पालांचें आणि पूर्व बंगाल्यांत गौर येथें राज्य करणाऱ्या सेनांचें अशीं दोन राज्यें झालीं हें दुर्दैव आहे. हे दोन्ही प्रांत वंश व भाषा यांनीं एक असून यांची सीमाहि स्पष्ट आहे. अशा प्रांतांत दोन सत्ता उत्पन्न होण्यापासून दोघांचेंहि बल कमी झालें. आणि दोहोंत धर्मभेद असल्यानें हा दुष्ट परिणाम जास्तच झाला. याचा परिणाम असा झाला

कीं, दोघांनाहि एका परकी सत्तेनें व धर्मानें सहज एक मनुष्यहि खर्ची न घालतां जिंकलें. याचा इतिहास पुढें येईलच.

सुदैवानें पाल राजांच्या मित्यांबद्दल फारसा तंटा नाहीं. आणि पालवंशाच्या या दुसऱ्या भागांतील राजांची वंशावळ, त्यांच्या लेखांच्या मित्या व सर व्हिन्सेन्ट स्मिथ यानें सुचाविलेले त्यांचे राज्यारोहण-काल ( इ. ए. १९०९ ) यांसह आम्हीं पुढें देत आहों. या मित्यांवरून सेनराजांच्या मित्यांबद्दल दुर्दैवानें जो फारच विवाद आहे त्याचा निर्णय करण्यास आपल्यास बरीच मदत मिळेल.

## बंगालच्या उत्तर पाल राजांची वंशावळ.

( सर व्हिन्सेन्ट स्मिथ इं. ए. १९०९ पा. २४४ )

महीपाल पहिला ( ९८० ) लेख १०२६.
|
नयपाल ( १०३२ ) ले. १०४२.
|
विग्रहपाल तिसरा ( १०३६ ) ले. १०५७.

महीपाल दुसरा (१०८०)   शूरपाल दुसरा (१०८२)   रमापाल (यक्षपाल १०८४ )

रमापालाचे पुत्र:

कुमारपाल (११३०)
|
गोपाल तिसरा (११३६)

मदनपाल (११४०)
राणी चित्रमटिका
|
गोविंदपाल (११६४)
| ले. ११७५, ११७८
महेंद्रपाल (११८०) ले. ११९३
ऊर्फ दंतकथेंतील इंद्रद्युम्न.

# प्रकरण दहावें.

## लखनौतीचे ( बंगाल ) सेन.

बंगालचे सेन राजे मुख्य तीनच असले तरी फारच कडाक्याच्या विवादाचे आस्पद झाले आहेत. त्यांच्याविषयीं असलेली माहिती थोडी आणि संशयित आहे. इतकेंच नव्हे, तर इतिहासकार व इतिहाससंशोधक यांनीं आपापल्या पूर्वग्रहानुरूप दुर्दैवानें याकडे भिन्नदृष्टि लाविली आहे. मुसलमानी इतिहासकारांनीं निदान यांच्या बाबतींत तरी अतिशयोक्ति करून महंमद बख्त्यार याचें धाडस आणि हिंदु राजांचा भित्रेपणा कमालीचा दाखविला आहे. डॉ. डी. आर. भांडारकर यांचा पूर्वग्रह रजपुतांची अनार्यांपासून उत्पत्ति झाली या कल्पनेकडे असल्यानें ते, सेन हे मुळांत परकी ब्राह्मण अथवा पुजारी असून पुढें क्षत्रिय झाले असें दाखवितात, तर बंगालचे हल्लींचे सेन हे वैद्य जातीचे असल्यानें सेन राजे वैद्य जातीचेच होते असें म्हणतात. तेव्हां या तिन्ही गोष्टींचा आपल्यास विस्तारपूर्वक विचार करावयास पाहिजे. पण त्या पूर्वीं या मतभेदांतून जितका निर्विवाद सेन घराण्याचा इतिहास आपल्यास मिळतो तो आपण प्रथम पाहूं.

सेनांचा प्रारंभीचा इतिहास देवपाडा शिलालेखांत स्पष्टपणें दिला आहे. ( ए. इं. १ पा. २०० ). या लेखांत असें सांगितलें आहे कीं, दाक्षिणात्य एक सरदार सामन्तसेन कर्नाटक राजाचा मांडलिक होता, व कर्नाटक लुटण्यास आलेल्या अनेक शत्रूंस त्यानें ठार केलें होतें. तो वृद्धपणीं तेथून निघून गंगाकिनारीं येऊन राहिला. आणि पूर्व बंगाल्यांतील काशीपूर येथें ( स्मिथ ) त्यानें एक लहान राज्य स्थापिलें. त्याचा पुत्र हेमंतसेन बलवान् राजा झाला, त्यापासून राणी यशोदेवीच्या पोटीं विजयसेन या घराण्याचा पहिला विख्यात राजा

जन्मला. यानें कामरूप राजावर स्वारी करणाऱ्या गौड राजास जिंकलें व एका कलिंग राजासहि जिंकलें, असें या लेखांत सांगितलें आहे. गौड राजा म्हणजे पश्चिम बंगाल्यांतील मोंघीरचा पाल राजा होय. तो व कलिंग म्हणजे ओरीसाचा राजा हेच दोन सेनांचे प्रबल प्रतिस्पर्धी होते हें उघड आहे. विजयसेन हा धर्मनिष्ठ हिंदु होता. आणि पाल राजे बौद्ध होते. अर्थात् सेनसत्तेचें स्थापन म्हणजे बंगाल्यांत आस्तिक हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन होय. किंबहुना देवपाडा लेखांत विजयसेनानें अनेक यज्ञ केल्याचे उल्लेख आहेत. सर व्हिन्सेन्ट स्मिथ, विजयसेन हा ह्या घराण्याचा पहिला स्वतंत्र राजा, असें म्हणतो तें योग्य आहे. पण याच्या स्वतंत्रतेची मिति १११९ इसवी त्यानें दिलेली बरोबर दिसत नाहीं. याच्या पूर्वींची ती मिती असावी. लक्ष्मणसेन–शकाचा प्रारंभ १११९ इसवी आहे. कित्येक लेखांच्या या शकांत आणि शालिवाहन शकांत दिलेल्या मित्यांवरून किलहॉर्ननें हें आरंभ वर्ष निश्चित केलें आहे. अबुलफजलनेंहि सेन शकारंभवर्ष १०४१ शालिवाहन दिलें आहे. तिरहूतचे लोक सेनशकारंभ १०२८ शा. शक मानतात हें चूक आहे असें किलहॉर्न मानतो. ( इं. ए. १९ पा. ७ ) पण हा मुद्दा निश्चित झाला तरी सेनशक कोणीं सुरू केला आणि कधीं या प्रश्नाबद्दल फारच मतभेद आहे. सेनांचे तीन राजे सामंत, हेमंत व विजय यांचे राज्यारंभ स्मिथ इ. स. १०८०,११०० आणि १११९ मानतो ( हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास आवृत्ति ३ री पा. ४१९ ) ह्यावरून त्याच्या मतें लक्ष्मणसेनानें आपला शक आजा विजयसेन याच्या राज्यारंभापासून सुरू केला. गौरीशंकर ओझा असें म्हणतो कीं, हा शक विजयसेनाचा पुत्र बल्लाळसेन यानें मिथिलदेश जिंकल्यावेळीं आपल्यास लक्ष्मणपुत्र झाल्याची खबर ऐकून सुरू केला. ( प्राचीन लेखमाला पा. ४२ व हिंदी टॉड, पा. ५३६). मिस्टर डी. आर. बानर्जी यांनीं बल्लाळसेनाचा

एक नवीन लेख ए. इं. १४मध्यें छापतांना असें म्हटलें आहे कीं, ( पा. १६९ ) हा शक लक्ष्मणसेनानें आपल्या राज्यारंभाच्या स्मरणार्थ सुरू केला. हें मत साधारणरीत्या सरळ आणि शकस्थापनेच्या नेहमींच्या कल्पनेस अनुसरून आहे. किंबहुना तत्कालीन मुसलमानी पुरावा ( तबकात्-इनासिरी ) असा आहे कीं, बल्लाळसेन वारला त्यावेळेस त्याची राणी गर्भवती असून गर्भांतील लक्ष्मणसेनावर जन्मापूर्वीच मुकुट ठेविला गेला. ही तबकातनें ज्या अनेक असंभाव्य गप्पा मारिल्या आहेत त्यांपैकीं एक गप्प असेल; परंतु इतिहासदृष्ट्या असें मानतां येईल कीं, लक्ष्मणसेनाचा जन्म आपल्या बापाच्या मरणानंतर इ. स. १११९त झाला. आणि लक्ष्मणसेनानें हा शक स्थापन केला. ही गोष्ट मानली तर त्यानें आपल्याच राज्यारंभापासून म्हणजे जन्मापासून तो शक सुरू केला असें मानणें साहजिक आहे. पण यावरहि एक शंका उपस्थित होते; तीही कीं,लक्ष्मणसेनाच्या एका लेखांत त्याचें राज्यवर्ष ७ दिलें असून त्याला परम वैष्णव म्हटलें आहे. ( जे. आर. ए. एस. बंगाल ४४ भा. १ पा. ७ ). ज्याअर्थी जन्मापासून तो राज्य करूं लागला त्याअर्थीं तो सात वर्षांचा लहान असतां त्याच्या पालकानें हा लेख केला असें मानिलें पाहिजे. पण ज्याअर्थीं त्याचा बाप आणि त्याचा आजा हे दोघेहि शैव होते, त्याअर्थीं हा सात वर्षांचा शैवच मानला जावा. परमवैष्णव कसा होऊं शकेल ? तात्पर्य हा प्रश्न अद्याप संशयितच आहे. जोंपर्यंत या सेन राजांच्या एखाद्या लेखांत त्यांच्या राज्यवर्षाबरोबर विक्रम किंवा शकवर्ष दिलेलें मिळणार नाहीं, तोंपर्यंत याचा निकाल लागणार नाहीं. पालराजांच्या प्रमाणेंच या सेनराजांच्या दानलेखांतहि दान देणाऱ्या राजाचें केवळ राज्यवर्षच दिलेलें असतें. यामुळें या राजांची वंशावळ तर्कावरून दोन तऱ्हेनें देणें आम्हांस भाग आहे. एक सर व्हिन्सेन्ट स्मिथ यानें सुचविलेल्या मित्यांची व दुसरी आर. डी.

बानर्जी यांनीं सुचविलेल्या मित्यांची. कित्येकांनीं असाहि तर्क केला आहे कीं, लक्ष्मणसेन दोन होते, परंतु मुसलमानी लेखकांनीं लिहि-ल्याप्रमाणें लक्ष्मणसेन एकच होता. आणि तो इ. स. ११९९ त ८०व्या वर्षीं वारला असें आम्हीं निश्चित धरतों.

हा मित्यांचा घोटाळा बाजूस ठेऊन सेन राजांचा इतिहास निश्चित झाला आहे तो थोडक्यांत पुढीलप्रमाणें आहे. विजयसेन हा प्रथम स्वतंत्र राजा असून तो पूर्व बंगालवर राज्य करीत होता. पश्चिम बंगालवर पालांचें राज्य होतें. त्याचा पुत्र बल्लाळसेन त्याहूनहि सामर्थ्यवान् होता. त्यानें मिथिल देश जिंकून पालांची सत्ता आणखी कमी केली. येथील कैवर्तांनीं बंड करून दुसरा महीपाल किंवा रामपाल यास कैद केलें होतें. त्या कैवर्तास यानें जिंकलें. हा आस्तिक हिंदु होता. व त्यावेळच्या इतर रजपूत राजांप्रमाणें स्वतः विद्वान् असून विद्वानांचा चाहता होता. त्यानें दानसागर नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. आणि दुसरा एक ग्रंथ लिहिणें त्यानें सुरू केलें; तो त्याचा पुत्र लक्ष्मण सेन यानें संपविला. वृद्धपणीं आपल्या राणीसह क्षेत्र प्रयागास जाऊन त्रिवेणीच्या पवित्र संगमांत त्यानें जलसमाधि घेतली. ( गौरीशंकर )

याच्या मागून लक्ष्मणसेन गादीवर आला. तोहि आपल्या बापा-सारखाच पराक्रमी व विद्वान् होता. सेनांची राजधानी गौर ही होती. हें शहर हल्लींच्या मालडा जिल्ह्यांत बंगाल्यांत आहे. आणि अद्याप हें जुनें नगर तेथें दाखवितात. पण लक्ष्मणसेनानें जवळच नवीन नगर वसविलें, त्यास लक्ष्मणावती म्हणजे लखनौती असें नांव आहे. लक्ष्मणसेनानें या रीतीनें अनेक राजाप्रमाणें या काळांत आपल्या नावाचें शहर कर्णाच्या कर्णावतीप्रमाणें किंवा विक्रमाच्या विक्रमपूर-प्रमाणें (या जुन्या राजधान्या त्रिपूर व कल्याणजवळ स्थापिल्या गेल्या आहेत.) स्थापिलें. लक्ष्मणसेन अनहिलवाडचा जयसिंह व कल्याणचा

विक्रमादित्य यांच्यासारखा पराक्रमी असून त्यांच्याप्रमाणें एक नवीन शकहि त्यानें सुरू केला. या शकाचें आरंभ वर्ष किलहॉर्ननें इ. स. १११९ ठरविलें आहे. वरील इतर दोन शकाप्रमाणें हा बंद न पडतां अद्याप तिरहूतमध्यें चालू आहे.

आपल्या वडिलाप्रमाणेंच लक्ष्मणसेन विद्वान् असून विद्वानांचा आश्रयदाता होता. ज्यांचें ग्रंथ कालाच्या महोदधीवर अद्याप तरंगत आहेत असे पंडित त्याच्या दरबारांत होते. हलायुध, उमापतिधर, शरण, गोवर्धनाचार्य, धोरी, जयदेव, ( गीतगोविंदाचा कर्ता ) आणि श्रीधरदास हे त्यांपैकीं प्रसिद्ध आहेत. या राजाचे पूर्वज शैव होते, पण हा वैष्णव होता असें त्यानें आपल्या लेखांत लिहिलें आहे. हरीची भक्ति करणारे बंगाल्यांतील आधुनिक कवी त्याच्या वेळेपासून उत्पन्न झाले. बंगाल्यांत हरिभक्तीचा उगम याजपासून आहे. आणि वर्णाश्रम धर्माची पुनः स्थापना किंबहुना कुलीन विवाहाची चमत्कारिक संस्था अमलांत आणणारा त्याचा बाप बल्लाळसेन होता. या दोन्ही गोष्टींबद्दल हिंदुस्थानची सामाजिक परिस्थिती या भागांतील वर्णनाच्या वेळीं आम्हांस जास्त लिहावें लागेल. लक्ष्मणसेन स्वतः फारच उत्तम वैयक्तिक गुणांचा आगर होता. विश्वसनीय लोकांनीं असें सांगितलें आहे कीं कोणीहि लहान मोठा त्याच्यापासून अन्याय पावला नाहीं. त्याचें औदार्य तर कर्णासारखें दृष्टांतभूत होतें.

या राज्याच्या अन्ताविषयीं आम्हीं पुढील एका प्रकरणांत लिहूं. परंतु पूर्वबंगाल्यांतील सेन राजांची सत्ता याबरोबर नष्ट झाली आणि देश मुसलमानांनीं जिंकला. तथापि पूर्वभागांत याही पलीकडे कांहीं सेन राजे तेराव्या शतकाच्या अंतापर्यंत राज्य करीत होते. लक्ष्मणसेनाचे तीन पुत्र माधवसेन, केशवसेन आणि विश्वरूपसेन विक्रमपुरांत राज्य करीत होते. आणि केशव आणि विश्वरूप यांचे लेखहि सांपडले आहेत. तबकात्‌वरून असें दिसतें कीं, जेव्हां नासिरुद्दी-

ननें लखनौतीवर स्वारी केली, तेव्हां बंगालचा बंडखोर खिलजी सुभेदार पूर्वेकडे वंगराजावर स्वारी करण्यास गेला होता. [ म्हणजे ही स्वारी वर सांगितलेल्या सेन राजांवर होती. ] गौरीशंकर ओझा म्हणतात कीं, ( हिंदी टॉड पा. ४३८ ) दनुजमाधव हा यावेळीं विक्रमपूर सोडून चंद्रद्वीपांत गेला होता. त्यानें पुढें बालबनला बंडखोर सुभेदारास शासन करण्यास मदत केली व त्यास नदींतून पळून जाऊं दिलें नाहीं. शिवाय दनुजमाधवानंतर चार राजे चंद्रपुरांत झाले, शेवटचा जयदेव असून त्याबरोबर सेन घराण्याचा अंत झाला असेंहि गौरीशंकर यांनीं लिहिलें आहे.

सेन घराण्याचा उपलब्ध झालेला वृत्तांत थोडक्यांत वरप्रमाणें आहे. शेवटीं हे राजे कोणत्या जातीचे होते या वादग्रस्त प्रश्नाविषयीं विचार करूं. लखनौती मुसलमानांनीं कशी जिंकली याविषयीं वाद आहे तो पुढें एका प्रकरणांत सांगूं. डॉ. डी. आर. भांडारकर सेनराजे हल्लीं सर्व हिंदुस्थानांत प्रसृत असलेल्या ब्रह्मक्षत्र जातीचे होते असें म्हणतात. पण हे राजे आर्य क्षत्रिय म्हणजे रजपूत असून चंद्रवंशी होते असें स्पष्ट आहे. भांडारकर म्हणतात त्याप्रमाणें ब्रह्मक्षत्र नव्हते किंवा हल्लींचे बंगाल्यांतील वैद्य म्हणतात त्याप्रमाणें वैद्य जातीचेहि नव्हते. कारण, उपरिनिर्दिष्ट देवपाडा लेखांत प्रारंभींच असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, सामंतसेन **चंद्रवशांत** उत्पन्न झाला होता. हा शब्द रजपूतांनाच लागू पडतो. ब्रह्मक्षत्रांना किंवा वैद्यांना लागत नाहीं. त्यांच्यांत सूर्यवंशी चंद्रवंशी हा भेदच नाहीं. पूर्वोक्त पूर्व ग्रहानें मन भरलें असल्यानें भांडारकरांचें लक्ष या लेखांतील सामंत सेनाविषयींच्या श्लोकांत असलेल्या 'ब्रह्मक्षत्रियाणाम्' शब्दाकडेच गेलें. पण या श्लोकाच्या पूर्वींच्याच श्लोकांत काय सांगितलें आहे हें त्यांनीं पाहिलें नाहीं. व तेथें हे राजे चंद्रवंशांत जन्मले असें सांगितलेलें आहे हें लक्षांत घेतलें नाहीं. यामुळें या

विधानाशीं जुळतां असा 'ब्रह्मक्षात्रियाणाम्' या शब्दाचा अर्थ घेतला पाहिजे. भाग २ मध्यें (प्र. २ पहा) आम्हीं दाखविलें आहे कीं, हा शब्द हिंदुधर्माभिमानी व त्या धर्माप्रमाणें आचरण करणाऱ्या रजपुतांना लावलेला सांपडतो. किलहॉर्ननेंहि याचें भाषांतर दिलेलें चुकीचें आहे, आणि ह्याच्या अर्थांत ब्राह्मणांचा समावेश होऊं शकत नाहीं. ब्राह्मण व क्षत्रिय कुलांचा शिरोमणि असा याचा अर्थ नसून ब्रह्मयुक्त म्हणजे ब्रह्म अथवा वैदिक कर्म करणाऱ्या क्षात्रिय कुलांचा शिरोमणि असा याचा अर्थ आहे. किंबहुना पहिल्या ओळींत असलेला ब्रह्मवादिन् शब्द सामन्ताला याच अर्थानें लाविलेला आहे. धर्माभिमानी क्षत्रिय शब्द, बौद्ध झालेल्यापासून अथवा इतर क्षत्रियांपासून आपला भिन्नपणा दाखविण्यासाठीं ब्रह्मक्षात्रिय असा शब्द आपल्यास लावून घेत. तात्पर्य, या शब्दांत जातिवाचक अर्थ मुळींच नाहीं. जाति पूर्वींच्याच श्लोकानें ठरली आहे; त्यांत हे चंद्रवंशी आहेत असें सांगण्यांत हे रजपूत आहेत असेंच निष्पन्न झालेलें आहे.

पण थोडा वेळ भांडारकर म्हणतात त्याप्रमाणें वरील शब्दानें हें ब्रह्मक्षत्र **जातीचे** आहेत असें मानले तरी यापुढें जें आणखी विधान त्यांनीं केलेलें आहे आणि जें मान्य करून सर व्हिन्सेन्ट स्मिथनें आपल्या इतिहासांत उध्दृत केलें आहे त्याला आधार काय? हें विधान असें आहे. (स्मिथचा इतिहास तिसरी आवृत्ति पा. ४२०) "मीं अन्यत्र आपलें मत सांगितल्याप्रमाणें **नवीन आलेल्या लोकांचे हे ब्राह्मण असून** पुढें हें हिंदुसमाजांत समाविष्ट होण्यापूर्वीं क्षत्रिय झालेले आहेत. ही कल्पना केवळ कपोलकल्पित निराधार आहे. यांना ब्रह्मक्षात्रिय म्हणतात म्हणून आणि ती एक निराळी जात आहे म्हणून ते एका बाहेरच्या परकी जातीचे मुळांत ब्राह्मण (?) होते आणि पूर्वीं ब्राह्मण असून मागून क्षत्रिय

झाले आणि हा बदल ते हिंदुसमाजांत समाविष्ट होण्यापूर्वी झाला हे एकावर एक चढविलेले तर्क कसे उत्पन्न होतात ? बाहेरून आलेल्या जाति हिंदु लोकांत समाविष्ट झाल्या किंवा नाहीं ह्या प्रश्नाची चर्चा आम्ही भाग दोनमध्यें केलीच आहे. पण वरील तर्क येथें भांडारकरानीं केवळ पूर्वग्रहानें केले आहेत आणि स्मिथनेंहि पुष्कळ रजपूत कुलें परकी लोकांपासून उत्पन्न झालीं आहेत ह्या कल्पनेच्या पूर्व ग्रहानें हा तर्क मान्य केला आहे.

हा निश्चय सेनांचा चंद्रवंश सांगितला आहे एवढयावरूनच अनुमान काढून होतो असें नसून बंगाल जे. आर. ए. एस. व्हा. ५ प्रोसीडिंग पा. ४८७ यांत छापलेल्या लक्ष्मणसेनाच्या माढरीनगर दानलेखांत क्षत्रिय शब्द स्पष्ट वापरला असल्यानें पक्का होतो. या लेखांत वीरसेनाच्या **कर्नाट क्षत्रिय** कुलांत सामन्तसेन जन्मला असें स्पष्ट म्हटलें आहे. हा कुल-संस्थापक वीरसेन कर्नाटकी किंवा दाक्षिणात्य होता हा प्रश्न महत्त्वाचा नाहीं. देवपाडा येथील बल्लाळसेनाच्या पूर्वीच्या लेखांत दाक्षिणात्य शब्द आलेला आहे. त्याचा अर्थ महाराष्ट्र देशांतील ब्राह्मण किंवा क्षत्रिय असा होतो. पण मराठा क्षत्रिय किंवा कर्नाटक क्षत्रिय हा भेद अगदींच थोडा आहे. त्या काळांत उत्तरेकडील क्षत्रिय आणि दाक्षिणेकडील क्षत्रिय असाहि भेद उत्पन्न झाला नव्हता; निदान विकोपास गेला नव्हता. त्यांच्यांत विवाहसंबंध चालूच होते. जेव्हां हे क्षत्रिय बंगाल्यांत गेले तेव्हां सर्व व्यवहारांत ते बंगाली झाले. उत्तरेकडील क्षत्रियांशीं त्यांचें विवाह, इतकेंच नव्हे तर त्यांचे नोकरचाकर व अधिकारी बंगाली होते. त्या काळांत मराठा किंवा कर्नाटक क्षत्रिय बंगाल्यांत जाऊन राज्य स्थापन करतो, ही गोष्ट आणि अलीकडीच्या काळांत शिंद्यासारखा मराठा सरदार राज्य स्थापन करतो यांत फार भेद आहे. शिंद्याचे मुख्य नोकरचाकर दाक्षिणी व त्यांचे विवाहसंबंध उत्तरेकडील लोकांशीं

न होता, दाक्षिणेतील लोकांशींच होतात. तात्पर्य, सेन राजे पुढें पूर्णपणें बंगाली झाले. 'आम्ही दाक्षिणेंतून आलो' एवढी स्मृति मात्र त्यांनीं ठेविली. ही ध्यानांत धरण्यासारखी गोष्ट आहे कीं, महाराष्ट्र–कर्नाटकांतून, विशेषतः कल्याणहून आम्ही आलों अशी स्मृति हल्लींचे दोन उत्तरेचे रजपूत अद्याप ठेवतात. राठोड व सेन त्यावेळेस सर्व हिंदुस्थानभर क्षत्रिय होते हें लक्षांत घेतले म्हणजे या गोष्टीस कांहीं महत्त्व नाहीं. असो. आम्हीं हें पुनः नमूद करतो कीं, लखनौतीचे सेन राजे रजपूत म्हणजे वर्णानें *क्षत्रिय होतें. अलीकडे उत्पन्न झालेल्या ब्रह्मक्षत्र जातीचे नव्हते. त्यांस लावलेला ब्रह्मक्षत्र हा शब्द त्यांचे वैदिकधर्माभिमानित्व केवळ सुचवितो. किंबहुना सर व्हिन्सेन्ट स्मिथनें स्वतः लिहिलें कीं, लक्ष्मणसेनाचें कुल हिंदुस्थानांतील सर्व राजांस आदरणीय होतें. आणि तो भारत वर्षाचा खलीफा वंशपरंपरेचा ( अर्थात् धर्मदृष्टया नेता ) मानला जात असे.

---

* सेन राजे द्रविडी वंशाचे होते किंबहुना चोल होते असें कित्येकांनीं सुचविलें आहे. पण द्रवीड कर्नाटकाहून अत्यंत भिन्न आहेत. व द्रविड शब्द लेखांत नाहीं. चोल वंशांत ते जन्मले असल्याचा संभवहि नाहीं.

# प्रकरण अकरावें.

## ठाण्याचे शिलाहार.

दक्षिण हिंदुस्थानांतील हिंदु राजांकडे वळलें असतां प्रथम ठाण्याच्या शिलाहारांचें राज्य आपल्या समोर येतें. मध्ययुगीन हिंदु इतिहासाच्या या कालविभागांत (इ. स. १०००पासून १२००पर्यंत) हें राज्य पूर्वीपेक्षां जास्त महत्त्वास चढलें. आणि तें बहुतेक स्वतंत्र होतें. यांचा देश म्हणजे प्राचीन महाभारताचा अपरान्त होय. त्याची राजधानी तेव्हां शूर्पारक ( सोपारें ) होती; व बुद्धानें आपला धर्म उपदेश करण्यास तेथें आपला शिष्य पूर्ण यास पाठविलें होतें. आणि नंतर ख्रिस्त-पूर्वकाळांत या देशांत अरब व ग्रीक जहाजें येऊन मालांचीं व कल्पनांची आयात व निर्गत करीत. शिलाहारांचें राजकुलहि फार जुनें होतें. त्यांचे शिलालेख कपरदिन् पासून सुरू होतात. हा अमोघवर्ष राष्ट्रकूटाचा मांडलिक होता. त्यानें बौद्ध यतीस कांहीं दानें देऊन त्यांचा शिलालेख शक ७६५ म्हणजे इ. स. ८४३ ह्या वर्षीं ठाणें जिल्ह्याचा प्रसिद्ध कन्हेरी ( कृष्णागिरी ) लेण्यांत खोदला आहे. ह्या लेण्यांत शातवाहनांच्या काळापासून म्हणजे सुमारें ख्रि. पू. १००पासून तों अलीकडे१५००इसवीपर्यंत, म्हणजे पोर्तुगीजांचा काळपर्यंत बौद्ध संन्याशी रहात आले. शिलाहारांचें राज्य सुमारें पांचशें वर्षें इ. स. ८००ते१३००पर्यंत ठाणें जिल्ह्यावर होतें. ते प्रारंभीं राष्ट्रकूटाचें मांडलिक होते. आणि पुढें अपराजितांच्या वेळेपासून स्वतंत्र राजे झाले. यांचा ले. इ. स. ९९७ चा सांपडला असून प्रासिद्ध झाला आहे. (भदात ताम्रपट ए. इं. ३ पा. २५७). या लेखांत अपराजित आपल्यास अद्याप 'महामंडलेश्वर' म्हणतो आणि आपले वरिष्ठ राजे म्हणचे राष्ट्रकूट यांची समग्र

वंशावळ देऊन, शेवटचा राजा कक्कल ह्यास चालुक्य तैलपानें मारलें असें सांगतो. ही गोष्ट दुसऱ्या भागांत आम्हीं याच राजाच्या इ. स. ९९३ सालांतील म्हणजे चार वर्षांपूर्वींच्या एका अद्याप प्रसिद्ध न झालेल्या लेखावरून सांगितलीच आहे. ह्यांतहि राष्ट्रकूटांची वंशावळ विस्तृत रीतीनें दिली असून राष्ट्रकूटांच्या राज्याचा अन्त झाला ह्याबद्दल दुःख प्रदर्शित केलें आहे. ह्या अंतानंतर बहुधा अपराजित स्वतंत्र झाला असावा. तरी त्यानें मामुली वहिवाटीस अनुसरून व पूर्वींच्या राजाबद्दलच्या आदरानें महामंडलेश्वर हीच आपली पदवी कायम ठेविली आहे. याच कारणांनीं औंधचे वझीर, हैद्राबादचे निजाम व पुण्याचे पेशवे आपल्या पूर्वींच्या परतंत्रतेच्या पदव्या स्वतंत्र झाल्यावरहि कायम ठेवतात. ह्या कुलाच्या पुढील लेखांत अपराजितास ‘ मृगांक ’ व ‘ बिरुदकराम ’ अशा दोन पदव्या दिल्या आहेत; व गोमराजाचा त्यानें उत्तम सत्कार केला, ऐय्यपदेवाशीं त्यानें लढाई केली व भिल्लमास ( सेडणदेशचा ) मदत केली असें आणखी सांगितलेलें आहे. यावरूनहि त्यानें स्वतंत्रपणें राज्य केलें असें दिसतें. याचें राज्य ‘ कोंकण चोदाशें राजधानी पुरी ’ असें वर्णिलेलें असतें. या शब्दांत राज्याचा जुना विस्तार (चौदाशें गांवें व जुनी राजधानी यांचा उल्लेख आहे. पण यावेळीं त्याचें राज्य मोठें असून त्यांत ठाणा व कुलाबा हे जिल्हे, रत्नागिरी जिल्ह्याचा चिपळूणचा भाग व घांटावरील मावळचा डोंगराळ प्रदेश इतक्यांचा अन्तर्भाव होत होता असें वर सांगितलेल्या अद्याप अप्रसिद्ध असलेल्या लेखावरून दिसतें. एवढया प्रदेशांत १४०० हून जास्त गांवें आहेत, तेव्हां १४०० ही संख्या पुरीच्या राज्यास पूर्वकाळापासून मामुलीप्रमाणें लागत आली असावी. नवीन राज्य नवीन राजधानी ठाणें (स्थानक) सह बरेंच विस्तृत उत्तर शिला-

हारांच्या वेळीं[1]असावें. ह्या शिलाहारांच्या अमलाखालीं कोंकणचे राज्याच्या प्रकर्षहि झाला होता. कारण एका अरबी लेखकानें (इ. स. ९७६) असें लिहिलें आहे कीं, खंबायतपासून सैमूर-पर्यंतच्या देशांत गांवें जवळ जवळ असून पुष्कळ जमीन शेतीखालीं आहे. (भाग २ पा. )

अपराजितापासून शिलाहार राजे स्वतंत्र होऊन उत्कर्षास चढले आणि यामुळें त्यांची गणना हिंदुस्थानच्या महत्त्वाच्या राजघराण्यांत होऊं लागली. पुढील राजांच्या कारकीर्दीपासून दुसऱ्या अपराजिताच्या वेळेपर्यंत ह्या घराण्याची जास्तच कीर्ति झाली. या दुसऱ्या अपराजिताचें इ. स. ११८५ व इ. स. ११८७ चे दोन लेख सांपडले आहेत.( J. R. S. मुंबई १२ पान ३३ ). हा आपल्यास कित्येक पूर्वींच्या राजाप्रमाणेंच कोंकण चक्रवर्ती म्हणवितो. ही पदवी नादयुक्त असून स्वातंत्र्य व सामर्थ्य दाखविते. त्यांच्या वंशावळींत दाखविल्याप्रमाणें अपराजितापासून अपरादित्यापर्यंत अकरा राजे होतात आणि सुमारें दोनशें दहा वर्षांचा काळ होतो ( इ. स. ९९० ते इ. स. १२०० ). म्हणजे दर पिढीस नेहमींची सरासरी वीस वर्षें पडतात. या सरासरीचा उपयोग करून व विशिष्ट राजांचा सांपडलेल्या लेखांची मिति मिळवून घेऊन प्रत्येक राजाचे राज्यकाल संभवनीय दिसतात ते त्यांच्या वंशावळींत आम्हीं दिले आहेत.

---

[1]स्कंद पुराणांतील देशांच्या यादींत कोंकणाला छत्तीस हजार गांवें दिलेलीं आहेत, आणि लघु कोंकणाला १६०० दिलीं आहेत. (भाग २ पा. ५१६) हा दुसरा आंकडा शिलाहारांच्या लेखांतील पुरी कोंकणच्या आंकड्याला जवळ आहे. मोठ्या कोंकणांत सात कोंकणांचा अन्तर्भाव होत असे. कराटंच वराटंच मराठं मालवं तथा । हविगं तौलवं चाथ केरलं चेति सप्तकम् ॥ ( सह्याद्रि खंड ).

या रीतीनें विचार करतां अपराजिताचा राज्यकाळ इ. स.९९० पासून इ. स. १०१०पर्यंत आम्हीं धरला आहे. त्यामागून त्याचा वडील पुत्र वज्जड गादीवर बसला व वज्जडामागें त्याचा बंधु अरिकेसरी हा गादीवर आला. याचा ताम्रलेख ( ठाणा ताम्रपट A.R.I. पा. ३५७ किल्हॉर्नच्या वंशावळी ) सांपडला असून त्याची तारीख इ. स. १०१७ आहे. वज्जडाचा राज्यकाल आम्ही यामुळें इ. स. १०१०पासून इ. स. १०१५पर्यंत धरतों. व अरिकेसरीचाहि राज्यकाल थोडा धरावयास पाहिजे. याच्याच वेळीं भोज परमाराच्या इ. स. १०२०च्या दानलेखांत ( भाग २ पहा आणि ए. इं. ११ पा. ८१ ) सांगितलेला कोंकणचा पराभव भोजानें केला असें दिसतें. याचा उत्तराधिकारी वज्जडाचा पुत्र छित्तराज याचा एक लेख इ. स. १०२८चा सांपडला आहे. हा लेख म्हणजे प्रसिद्ध भांडुप शिलालेख होय. ( इं. ए. ५ पा. २७७ ). यामुळें अरिकेसरी याची राज्यमर्यादा इ. स. १०१५पासून इ. स. १०२५पर्यंत धरून छित्तराजाचें राज्य इ. स. १०२५पासून इ. स. १०४५पर्यंत वीस वर्षांचें आम्हीं धरलें आहे. छित्तराजाचें हें भांडुप दानपत्र फार महत्त्वाचें असून त्याजविषयीं आम्ही पुढें लिहूं.

त्याच्यानंतर त्याचा भाऊ नागार्जुन गादीवर आला व त्यानें दहा वर्षें राज्य केलें असावें. त्यानंतर त्याचा धाकटा भाऊ माम्वानी यानें बरेंच वर्षें राज्य केलें असावें. याचा राज्यकाल इ. स. १०५५ पासून इ.स.१०८५ पर्यंत तीस वर्षें हा आम्हीं धरला आहे.कारण त्याचा एक लेख इ. स. १०६० चा सांपडला आहे. तो 'आम्रनाथा'च्या देवळांत म्हणजे कल्याणापासून सहा मैल असलेल्या जी. आय. पी. स्टेशनाजवळील प्रसिद्ध अंबरनाथाच्या देवळांत आहे. त्यांत राजाचें नांव महमवानी दिलें आहे. ( हें नांव कोठें मामवानी कोठें मुम्मुनी असें आढळतें ). या लेखांत असें म्हटलें आहे कीं,

जुन्या कच्च्या देवळांऐवजीं दगडाचें देऊळ राजगुरूनें बांधविलें. (G. R. A. S मुंबई ९ पान. २१९ ). देवळाजवळ आणखी एक शिलालेख सांपडला आहे; त्यांत एका स्थानिक अधिकाऱ्यानें देवळाजवळ आणखी एक इमारत बांधल्याचें लिहिलें आहे. ( J. R .S. मुंबई १२ पान ३२९ ) हा लेख त्याच मितीचा म्हणजे इ. स. १०६० चा आहे.

मामूवानी–राजा याचा पुतण्या अनंतदेव ( नागार्जुनाचा पुत्र ) हा याच्या मागून गादीवर आला. तो मोठा पराक्रमी असावा असें दिसतें. यानें आपल्या इ. स. १०९४ च्या लेखांत कोंकणचक्रवर्ती असें आपल्यास म्हणवून घेतलें आहे. हा ताम्रलेख ( खारेपाटण इं. ए. ९ पा. ३३ ) सुप्रसिद्ध संस्कृत पंडित जास्टिस तेलंग यांनीं प्रसिद्ध केला आहे. त्याबरोबर तोंपर्यंत सांपडलेल्या लेखांची माहिती एकत्र करून शिलाहारांची वंशावळहि त्यांनीं दिली आहे. एका मंत्र्याचीं (श्रेष्ठी=व्यापारी) जहाजें कोंकणच्या बंदरांत येतील, त्यावरलि जकात माफ केल्याबद्दल हा ताम्रपट आहे. या राजाचें नांव अनंतपाल असेंहि आढळतें. यानें इ. स. १०८५ पासून इ. स. ११२५ पर्यंत राज्य केलें असावें. याचा पुत्र अपरादित्य पहिला, हाहि प्रसिद्ध राजा झाला. काश्मीरांत एक पंडित–सभा भरली होती त्यासभेस याचा एक पंडित प्रतिनिधि गेला होता असें मंखानें श्रीकंठचरित्रांत सांगितलें आहे. यानें इ. स. ११२५ पासून इ. स. ११४५ पर्यंत राज्य केलें असावें. याचा पुत्र हरपाल याचे लेख इ. स. ११४९, ११५० व ११५३ असे सांपडले आहेत, हे ध्यानांत घेऊन आम्ही अनंतपाल राज्यकाल चाळीस वर्षें, अपरादित्य वीस वर्षें आणि हरपाल दहा वर्षें धरला आहे. हरपालाचे लेख शिलालेख असून ते आम्हांस पाहावयास मिळाले नाहींत. बॉंबे गॅझेटियर

व्हॉ. १ भा. १ यांत शिलाहारांची एकंदर हकीकत जुळवून प्रथमच दिली आहे, त्यांतील उल्लेखांवरून हे लेख आम्ही सांगितले आहेत. या हकीकतींत असें वर्णन आहे कीं, अनंगपालाच्या राज्यांत आपसांत तंटे होऊन देवाब्राह्मणांचा छल झाला. हे तंटे कशाविषयीं होते हें जाणणें कठीण आहे. मुसलमान लोकांची वस्ती या राज्यांत बरीच झाली होती असें दिसतें. कारण राष्ट्रकूट राजे हे अरबांस अनुकूल असत. उत्तरेकडील राजाप्रमाणें ते परधर्मद्वेषी नव्हते. ( व्हा० २ प्र. १० ) बहुतेक प्रत्येक बंदरी शहरांत सोमनाथपाटण आणि खंबायत यांपासून चौल ( सैमूर ) पर्यंत अरब लोकांच्या वसाहती होत्या; आणि कांहीं गांवांत त्यांनीं आपल्या मशिदीही बांधल्या होत्या. अग्निपूजक ( पार्शी ) आणि मुसलमान यांच्यामधील एका तंट्याची हकीकत अरबी लेखकांनीं दिली आहे. अनहिलवाडच्या जयसिंह राजाकडे हा तंटा गेला तेव्हां तो स्वतः तोडलेली मशीद पहाण्यास गेला व त्यानें ती आपल्या खर्चानें बांधून दिली ( इलियट २ पान १८३ )–हा कोंकणांतील तंटा राजा आणि त्याचे संबंधी यांच्यामधील असावा व मुसलमान लोकांनीं या संधीस उत्तर हिंदुस्थानांतल्याप्रमाणें देव–ब्राह्मणांचा छळ केला असावा. परंतु शेवटीं अनंतपाल विजयी झाला व त्यानें बंडाचा बींमोड करून आपले विरुद्ध नातेवाईक आणि देवब्राह्मणांचे छळ करणारे यांना जबर शिक्षा केल्या. (इं. ए. ९ पान १७ ). यामुळें कोंकण आणखी दोन शतकें हिंदु राहिले.

हरपालाबद्दल आपल्यास विशेष माहिती मिळत नाहीं. इ. स. ११५३ मधील त्याचा मिळालेला लेख जमेस धरून यानें इ. स. ११४५ पासून इ. स. ११५५ पर्यंत राज्य केलें. याचा पुत्र मल्लिकार्जुन यानें बरींच वर्षें राज्य केलें. यानें राजपितामह ही पदवी धारण केल्यामुळें गुजराथचा चालुक्य राजा कुमारपाल यानें कोंकण

ंकण्यास आपला सेनापति अंबड यास पाठविलें. बलसाड जवळ ढाई होऊन तींत अंबडाचा पराभव झाला. पण अंबड पुनः तयारी रून आला व दुसऱ्या लढाईंत मल्लिकार्जुनाचा पराभव झाला. इतच नव्हे, तर गुजराथच्या इतिहासांत सांगितल्याप्रमाणें जगदेव रमारानें मल्लिकार्जुनास ठार मारिलें. यानें इ. स. ११५५ पासून . स. ११७५ पर्यंत राज्य केलें असावें. याचे दोन लेख इ. स. १५६ व ११६० ( चिपळूण व वसई ) मिळाल्याचे गॅझेटियर ध्यें लिहिलेलें आहे. परंतु त्यांचा पत्ता तेथें दिलेला नाहीं.

याचा पुत्र दुसरा अपरादित्य हा या वंशांतील या काळांतील ावटचा राजा होय. तो सर्वांत श्रेष्ठहि होता. तो आपल्यास लेखांत हामंडलेश्वर न म्हणतां महाराजाधिराज आणि कोंकण–चक्रवर्ती सें म्हणवितो. त्यानें स्वतंत्रपणें कोंकणच्या बऱ्याच मोठ्या भागार राज्य केलें. त्याच्यानंतरहि कोंकण बरींच वर्षें स्वतंत्र राहिलें. ंभर वर्षांनंतर येथें मार्को पोलो नांवाचा प्रवासी आला त्यावेळींहि ोंकण स्वतंत्र होतें. अपरादित्य अनेक नामांकित हिंदु राजाप्रमाणें वतः मोठा विद्वान् होता आणि याज्ञवल्क्यस्मृतीवरील प्रसिद्ध ीका अपरार्क ही त्यानेंच लिहिली. हा ग्रंथ हिंदुधर्मशास्त्रावर ग्रद्यापहि आधारभूत मानला जातो. काश्मीर सारख्या दूर देशांत ाचा मुख्य आधार घेतात. ह्यावरून त्यावेळच्या निरनिराळ्या हिंदुस्थानच्या राज्यांत बरेंच दळणवळण असावें. पूर्वी सांगितलेंच आहे कीं, मंखाच्या श्रीकंठचरित्रांत (हा काश्मीरी कवि इ० स० ११३५ ते ११५५ पर्यंत होता) काश्मीरांत पंडित सभा भरल्याचें वर्णन आहे. त्या सभेंस कोंकणच्या पहिल्या अपरादित्यातर्फे तेजःकंठ नांवाचा पंडित गेला होता. ह्या पंडिताच्या दळणवळणामुळें दुसऱ्या अपरादित्याचा हिंदु धर्मावरील ग्रंथ काश्मीरांत लवकरच प्रसिद्ध झाला असावा. याचा एक लेख इ० स० ११८४चा सांपडला

असून प्रसिद्ध झाला आहे. (G. R. A. S. मुंबई १२ पान ३३३) याचा राज्यकाळ इ० स० ११७५ ते इ० स० १२०० धरावयास हरकत नाहीं.

ठाण्याच्या शिलाहार राजवंशांतील पुढील राजाशीं आपल्यास कर्तव्य नाहीं. आणि त्याविषयीं फारशी माहिती उपलब्ध नाहीं. किलहॉर्नच्या वंशावळींत (ए. इं. ८) आणखी सोमेश्वराचें नांव आहे. याचा लेख इ. स. १२७९ चा सांपडला आहे; आणि गॅझे-टियरमध्यें केशीदेवाचें आणखी एक नांव आहे. पण सोमेश्वरानंतर बरींच वर्षें हा वंश राज्य करीत असावा. महाराष्ट्र इ. स. १३२८ मध्यें मलिक्काफरनें जिकल्यानंतर मुबारक् याच्या सेनापतीनें १४ व्या शतकांत ठाणें जिंकलें. पाटणहून (सोमनाथ किंवा अनहिलवाड) एक बिंब नांवाचा राजा व पैठणहून कांहीं क्षत्रिय आल्याची कथा बॉंबे गॅझेटियर व्हॉ. १ भा. २ ह्यांत दिली आहे. आणि महाराष्ट्रांतील प्रसिद्ध इतिहास–संशोधक वि. का. राजवाडे यांनीं नुकतीच विस्तृत रीतीनें वर्णिली आहे. ही कथा ह्या ग्रंथाच्या आटोक्याच्या बाहेरची आहे. पण एवढें येथें सांगितलें पाहिजे कीं, शिलाहारांचें राज्य नष्ट झाल्यावर, निदान इ. स. १२६० नंतर हे लोक कोंकणांत आले असावे.

कांहीं महत्त्वाच्या गोष्टी या शिलाहार राजांबद्दल व त्यांच्या लेखां-बद्दल सांगणें जरूर आहे. पहिली गोष्ट सांगणें ही कीं, सर्व क्षत्रिय राजे आपल्यास सूर्य किंवा चंद्रवंशाचे म्हणतात, त्याप्रमाणें हे म्हण-वीत नसून हे आपली उत्पात्ति, जीमूतवाहन नांवाच्या प्रसिद्ध दंत-कथांत नागास वांचविण्याकरितां आपलें शरीर गरुडास अर्पण कर-णाऱ्या पुराणांतील, देवयोनि विद्याधरापासून झाली असें आपल्या लेखांत लिहितात. यावरून हे शिलाहार क्षत्रिय नसावे अशी कल्पना होणें साहजिकच आहे. परंतु हे शिलाहार क्षत्रिय होते इतकेंच नव्हे

र ते क्षत्रिय मानलेहि जात असत याबद्दल शंका नाहीं. कारण त्यांचें नांव छत्तीस राजकुलांच्या यादींत सर्वत्र दिलेलें आढळतें. रकराव्या शतकाच्या अंतीं किंवा बाराव्या शतकाच्या प्रारंभीं ही ादी बनली असावी. कनोजचा गाहडवाल धर्माभिमानी सम्राट् वन्द्र यानें क्षत्रियांच्या सूर्यचंद्र वंशाचें पुनरुज्जीवन केलें, त्याच्या अमलांत किंवा फार झालें तर गोविंदचंद्राच्या अमलांत ही क्षत्रिय-कुलगणना झाली असावी हें आम्हीं पूर्वीं दाखविलेंच आहे. या कालनिश्चयाचा आणखी पुरावा शिलाहारांचें नांव या छत्तीसांत आहे ह्यावरून मिळतो. विद्याधर-वंश आमच्या समजुतीप्रमाणें असेंच दाखवितो कीं, हे क्षत्रिय होते. कारण आपले मांस तोडून गरुडास खाऊं घालणें हें कठिण कर्म क्षत्रियच करूं शकेल. ( येथें महाभारतांतील कर्णाच्या गोष्टीची आठवण होते. ) आणि कदाचित् शिलाहार क्षत्रियांनीं दक्षिणेंतील नागवंशी लोकांस मदत केल्याचाहि या कथेंत उल्लेख असावा. हे शिलाहार आपल्या लेखांत आपण तगरपुरापासून आलों असें नेहमीं सांगतात. या शहराचें नांव टॉलमीनें दिलें असून, तें तो पैठणच्या पूर्वेस गोदावरीवर सांगतो. यावरून मराठ देशाच्या ऐन मध्यांतले हे शिलाहार क्षत्रिय दिसतात. अनंतदेव ऊर्फ अनंतपाल याच्या वेळीं हे हिंदुस्थानांत स्वतंत्र व प्रबळ राजे प्रसिद्धीस आले. याचा राज्यकाळ इ. स. १०८५ पासून इ. स. ११२५ पर्यंत आम्हीं दिला आहे. क्षत्रियांचीं प्रत्यक्ष राज्य करणारीं घराणीं छत्तिसांच्या यादींत सांगितलीं गेलीं, तेव्हां ठाण्यांच्या शिलाहारांचें नांव त्यांत साहाजिकच आलें. ते जरी आपल्यास विद्याधरवंशी म्हणवीत, तरी ते क्षत्रिय व रजपूत म्हणून प्रसिद्ध होते. आणि त्यांची कीर्ति काश्मीरापर्यंत गेली होती. मंखानें वर्णिलेल्या काश्मीर पंडित सभेस दोन राजांचे प्रतिनिधि आल्याचें वर्णन आहे. कोंकणच्या अपरादित्य राजाचा तेजःकंठ प्रतिनिधि आणि कनो-

जच्या गोविंदचंद्राचा सुबल. अर्थात् कनोज, कोंकण आणि काश्मीर यांचा इ. स. १०८५ मध्यें निकट संबंध आला. (H. B. R. R. A. S. १२ जादा अंक पान ५१ ). यामुळें छत्तिस राजकुलांच्या यादींत शिलाहारांना जागा मिळाली आहे याचें आश्चर्य नको. २ इ. स. ११५४ च्या कल्हणाच्या राजतरंगिणींत छत्तिस राजकुलांचा उल्लेख आहे. ३ या यादींतील शिलाहार उत्तरहिंदुस्थानांत दिसत नाहींत. ते केवळ दक्षिणचेच आहेत. राठोड व चालुक्य हे उत्तरेचेहि रजपूत आहेत व दक्षिणेचेहि आहेत; पण शिलाहार केवळ मराठे रजपूत आहेत. ४ शिलाहार मराठे अजूनहि दक्षिणेंत उत्तम रजपूत मानले जातात. याचा दाखला कोल्हापूर येथें नुकतेच प्रसिद्ध झालेल्या ‘ सिद्धांतविजय ’ ग्रंथांत १०५ पानावर भोज शिलाहाराचा शके १११३ म्हणजे इ. स. ११९१ चा एक समग्र लेख दिला आहे त्यावरून मिळतो. यांत या शिलाहार राजानें आपल्यास क्षत्रिय–शिखाचूडामणी म्हटलें आहे. ५ हे शिलाहार मराठयांच्या ९६ कुळांच्या यादींतील शेलार असून यादव किंवा चंद्रवंशांतले मानले गेले आहेत.

या कोरीव लेखांतील दुसरी विशिष्ट गोष्ट सांगण्याची ही कीं, देणगी देणाऱ्या राजाच्या बरोबर पांच प्रधानांचा त्यांच्या नांवांसह उल्लेख असतो. या कोंकणच्या राज्यांतच प्रधानांचें इतकें महत्त्व मानलें जात होतें हें चमत्कारिक आहे. कदाचित् राजा जबाबदार नसून प्रधान जबाबदार असतात हें अलीकडच्या काळांतील तत्त्व त्यावेळीं कोंकणांत मान्य होऊन त्याची अंमलबजावणी होत असे. मुख्य प्रधानाच्या नांवामागें सर्वाधिकारी हें विशेषण लागत असे, किंवा ‘राज्यचिंताभारसमुद्वहनमाहात्म’ असें लागें (इ. ए. पा२५७). संधि आणि विग्रह करणारे प्रधान कधीं दोन असत. आणि जमीनीचें रजिस्टर ठेवणारा प्रधान निराळा असून ( स्त्रीकरण ) खजि-

त्याचे प्रधान ( भांडागारिक ) दोन असत. कदाचित् खाजगीकडचा एक व बाहेरच्या खात्याकडचा एक किंवा जमिनीचा वसूल ऐनजिनसी होई त्याचा एक आणि नगदीचा दुसरा. ऐनजिनसी वसुलीचा हिशोब ठेवणें बरेंच कठिण असावें. कारण हा वसूल तालुक्यांत किंबहुना गावांतच राहात असावा. हे प्रधान नेहमीं पांच म्हटलेले आहेत. शिवाजीनें जेव्हां इ. स. १६६० त अष्टप्रधान-व्यवस्था अमलांत आणली, त्यावेळेस या देशांत इ. स. १०००च्या सुमारास असलेली जुनी व्यवस्थाच अमलांत आणली. आणि यांच्या लेखांत नेहमीं वापरलेला शब्द ‘ प्रधान ’ हाहि पुनः उपयोगांत आणला.

तिसरी चमत्कारिक गोष्ट अशी कीं, या प्रधानांच्या नांवाच्या शेवटीं नेहेमीं ‘ ऐरय ’ हें उपपद येतें. याजवरून कित्येक विद्वानांनीं असा तर्क केला आहे कीं, हे तगर येथून आलेले शिलाहार आंध्र देशांतून आले असावे. आणि आंध्र देशांतले हुषार लोक आणून त्यांसच तेथें प्रधान नेमीत असत. आंध्र देशांतील लोकांच्या नांवांत ‘ ऐय्य ’ उपपद असतें. पण तगर आंध्रांत आहे हें आम्हांस मान्य नाहीं; किंबहुना तें महाराष्ट्राच्या मध्यावर आहे असें आम्हीं पूर्वीं म्हटलें आहे. जरी तें आंध्रांत होतें असें मानलें, तथापि शिलाहार महाराष्ट्रांत विशेषतः कोंकणांत इतकीं शतकें येऊन राहिले होते कीं, ते कणकणशः मराठे बनले होते. त्यांचे संबंध, त्यांची सहानुभूती व त्यांची भाषा मराठी झाली होती. यामुळें इ. स. १००० पासून इ. स. १२०० शेंच्या काळांत आंध्र देशांतील लोकांविषयीं भाषा, चालीरीति व शरीरसंबंध यांनीं अत्यंत भिन्न असलेल्या लोकांविषयीं त्यास प्रेम असेल असें आम्हांस वाटत नाहीं, यामुळें हें प्रधान आंध्र देशाचे रहिवाशी असतील असें आम्हांस वाटत नाहीं. कर्नाटकांतले हे अधिकारी असतील असा एक संभव आहे. कारण

मालखेडचे राष्ट्रकूट हे जातीनें मराठे होते तरी देशानें कर्नाटकाचे राजे असल्यानें, त्यांचे मांडलिक होते. पण राष्ट्रकूटांच्या व उत्तर चालुक्यांच्या लेखांत दान घेणारे किंवा इतर लोक, यांचीं नांवें 'ऐय्य' उपपदान्त नाहींत. हें गूढ आमच्या मतें पुढील प्रमाणें सोडवितां येईल. पूर्व किनाऱ्यावरील आंध्र देशांतल्याप्रमाणेंच पश्चिम किनाऱ्यावरहि वरिष्ठ वर्णाच्या लोकांस आर्य म्हणण्याची चाल असे. त्याचेंच प्राकृत ऐय्य रूप आहे. कोकणांत सामान्यतः अनार्य कोळी लोकांची वस्ती आहे. आणि हे खालचे लोक पाठीमागून आलेल्या ज्या आर्यवंशीय लोकांनीं हा देश जिंकून त्यास सुधारण्याच्या दशेस आणला, त्या वरिष्ठ लोकांस नेहमीं आर्य म्हणून संबोधीत. टॉलमीच्या भूगोलांत देशाच्या या भागास विशेषतः ' अर्याके '( म्हणजे आर्यदेश ) अशी संज्ञा आहे. घाटावर मात्र शेती करणारे लोक, भाग एक यांत सांगितल्याप्रमाणें मिश्र आर्य अथवा मराठे आहेत. म्हणून तेथें वरिष्ठ वर्णाच्या लोकांस आर्य म्हणण्याची चाल उद्भवली नाहीं. आंध्र देशांतहि खालच्या जातीचे लोक हे कोकणांप्रमाणेंच अद्याप अनार्य आहेत. तेथें आर्य अथवा ' ऐय्य म्हणण्याची चाल कोकणांप्रमाणेंच उद्भवली. या बाबतीसंबंधें आम्हीं आपल्या स्वतःचा पुरावा देऊं शकतों. कोंकणांतील एक कोळी जातीचा गांवढळ वरिष्ठ जातीच्या कारकूनास ' अज्जा ' असें संबोधितांना आम्हीं ऐकलें आहे. हा शब्द ऐकून आम्हांस आश्चर्य वाटलें. पण वरिष्ठवर्णाच्या लोकांस आर्य म्हणण्याच्या चालीचा हा अवशेष आहे असें आमच्या लक्षांत आलें. शिलाहारांच्या लेखांत ' अय्य ' उपपदांत नांवें नेहमीं ब्राह्मणांचींच नसतात. उदाहरणार्थ, खारेपाटण लेखांत ' महादेवय्या प्रभू आणि श्रीसोमणय्या प्रभु ' अशीं दोन नांवें आलीं आहेत. हे प्रभु हल्लींच्या कोंकण कायस्थ प्रभूंचेच पूर्वज दिसतात. तसेंच अपराजित्याच्या इ. स. ११८७ च्या लेखांतील ( B. B. R. A. S.

१२ पा. ३३३ ) अनंत पै हाहि प्रभू असावा. परंतु हल्लींच्या कायस्थ प्रभूंस ही गोष्ट संमत नाहीं. ब्राह्मणांचीं नांवें कधीं कधीं भट्ट उपपदांत असतात आणि क्षत्रियांच्या नांवांच्या शेवटीं भट आणि राऊळ हीं उपपदें येतात.

शेवटची चमत्कारिक गोष्ट सांगावयाची ही कीं, ह्या शिलाहारांच्या कित्येक लेखांत ' हजमनगरपौरन्तिवर्गप्रभृति ' असें एक कठीण पद येतें; पण ह्याचा अर्थ नीट लागत नाहीं. 'हैय्यमन' किंवा हञ्जमन ' हें एक निःसंशय नगर आहे; आणि तें दहाव्या शतकांतील अरब लेखकांचें व हल्लींचेंहि ' सञ्जान ' शहर होय असेंहि दिसतें. पण दोन लेखांत एका हञ्जमन लोकांच्या नगराचेंच नांव कां यावें? आणि हे त्रिवर्ग कां? शहरांचे व तालुक्यांचे व प्रांतांचे अधिकाऱ्यांचा उल्लेख सामान्यतः त्यांत यावा हें साहजिक आहे. याचें कारण असें कोणीं सुचविलें आहे कीं, ' हञ्जमन ' ही पूर्वींची राजधानी असावी. पण हें खरें नव्हें; पूर्वींची राजधानी पुरी व हल्लींची ठाणें; आणि दोघांच्याहि रहिवाशांचा उल्लेख लेखांत येत नाहीं. अशी कल्पना केली कीं, या ठिकाणचे तीन प्रकारचे लोक अत्यंत महत्त्वाचे होते, तर त्यांचें नांव सांगणें जरूर होईल. असें संभवनीय आहे कीं, या विशिष्ट बंदरांत बाहेरचे लोक फार येऊन बसले होते. चीन व जपान प्रमाणें बाहेरचे कोण लोक येतात या गोष्टीवर दुर्दैवानें हिंदुस्थानच्या राजांनीं नजर ठेविली नाहीं; आणि वाटेल त्या धर्माच्या लोकांस वाटेल तेथें येऊन वसाहत करण्यास मुभा दिली. किंबहुना हे लोक आपल्याच मॅजिस्ट्रेटांचा अधिकार मानण्याचा हक्क संपादन करीत. हे तीन प्रकारचे लोक संजान येथें बरेच येऊन राहिले असावे. पारशी, अरब आणि ज्यू किंवा नीग्रो. हे तिन्ही जातीचे लोक व्यापारी असून सर्व राज्यांतील लोकांशीं व्यापार करीत आणि वारंवार तंटेहि उपस्थित करीत. त्यांना आपल्या

जातींत विशिष्ट अधिकार असत. ही गोष्ट अरब लेखकांनींहि लिहिली आहे. हंजमन नगराचे तीन जातीचे लोक विशिष्ट महत्त्वाचे असल्यानें या दान--सनदा त्यांनाहि उद्देशून निघत असेंहि मानतां येतें.

असो. हिंदुस्थान देशाच्या अन्य महत्त्वाच्या सामान्य बाबीसंबंधानें आणखी कांहीं गोष्टी या लेखांत आहेत त्यांचा आम्ही सामान्य निरीक्षणाच्या वेळीं उल्लेख करूं. बाहेरील देशाचा व्यापार कोंकणाच्या अनेक बंदरांशीं चाले. संजान, सोपारा, वसई, ठाणें, कल्याण, चौल आणि चिपळूण वगैरे बंदरांतून येणाऱ्या मालावरील जकातीच्या उत्पन्नाचा आंकडा मोठा असे. ठाण्याचा किल्ला मुळांत बहुधा शिलाहारांनीं बांधला असावा. कारण तेथील पाया खोदतांना अनंतराजाचा इ. स. १०१७ चा ताम्रपट सांपडला. एलिफंटाचीं सुंदर कोरीवलेणीं यांचें वर्णन टिपणींत देऊं.

## टिप्पणी–घारापुरीचीं एलिफंटा लेणीं.

मुंबईपासून समुद्रानें कांहीं मैलावर दूर, ठाणें व पनवेल यांच्या रुंद खाडींत हीं लेणीं असून त्यांत पुष्कळ सुंदर खोदीव कोरीव काम व मूर्ति आहेत. मुख्य लेण्याच्या तोंडावर दोन मोठमोठ्याल्या दगडांचे हत्ती कोरले आहेत. ते समुद्रांत दूरवर दिसतात यामुळें पोर्तुगिजांनीं हीं लेणीं प्रथम पाहिलीं तेव्हां त्यास हत्तींचीं लेणीं असें नांव दिलें. येथेंच पुरी शहर होतें. तें हल्लीं उध्वस्त आहे. तें पूर्वीं कोंकणची राजधानी होतें. सहाव्या शतकापासून दहाव्या शतकापर्यंतची मुंबई पुरी होती, ही गोष्ट शिलाहारांच्या लेखांत 'पुरीकोंकणचतुर्दशशत' असे शब्द येतात ह्यावरून सिद्ध आहे. एका मोठ्या खाडीच्या तोंडाशीं हें बेट असल्यानें किनाऱ्यावरील व्यापार करणारी व दूर अरबांच्या देशास जाणारीं जहाजें येथें आश्रय घेऊं शकत असल्यामुळें हें बेट कोंकणची राजधानी होण्यास योग्य आहे असें प्राचीन काळींच दिसलें असावें. ह्या बेटांत बौद्धकालीन इमारतींचे अवशेष आहेत. पण येथील महत्त्वाच्या इमारती हिंदु आहेत. व त्या आठव्या शतकापासून शिलाहारांच्या राज्याच्या वेळच्या आहेत.

भगवानलाल इंद्राजी असें म्हणतो कीं, त्यांतील बांधण्याची तऱ्हा व सुंदर मूर्ति येलोरा येथील कोरीव कामाच्या वेळच्या दिसतात; आणि म्हणून हीं लेणीं आठव्यापासून नवव्या शतकांपर्यंतचीं असावीं.राष्ट्रकूट राजा कृष्ण यानें येलोरा येथील देवालय खोदून तयार केलें. राष्ट्रकूटांचे मांडलिक शिलाहार यांनीं त्याचें अनुकरण करून आपल्या पुरी नगरच्या शेजारीं हीं लेणी खोदलीं असावींत. शिलाहारांची राजधानी आठव्या व नवव्या शतकांत होती. बलरामाच्या तीर्थयात्रेंत भागवतांत आर्या द्वैपायिनी ( बेटांतली देवी ) सांगितली आहे. ती बहुधा या बेटांतल्या एका लेण्यांतील पार्वतीची मूर्ति असावी. आणि या उल्लेखावरूनहि भागवत पुराणाचा काल दहावें शतक ठरतो. सगळ्यांत मुख्य लेण्यांतील अत्यंत भव्य मूर्ति म्हणजे त्रैमूर्ति (एलिफंटा) लेण्यांतील मुख्य काम आहे. हें खोदण्याचें श्रेय कोणत्या शिलाहार राजास आहे हें सांगतां येत नाहीं. राजधानी ठाण्यास गेल्यानें पुरी विध्वस्त झाली असावी. ठाणें शहर जास्त आंत असून तेथील बंदर अधिक सुरक्षित आहे. ठाण्याच्या शिलाहारांची हकीकत पुरी तेथील एलिफंटा लेणीं यांच्या वरील वर्णनाशिवाय संपूर्ण होऊं शकत नाहीं.

## टिप्पणी–हञ्जमननगर.

वरील हकीकतींत हंजमन म्हणजे संजान असें जें अनेकांनीं ठरविलें आहे, तें आम्हीं मान्य केलें आहे. परंतु चित्तराजाचा भांडुपचा ताम्रपट डॉ. फ्लीट यांनीं ए. इं १२ पान २७५ वर पुनः प्रसिद्ध केला आहे; त्या लेखांत याजविषयीं त्यांनीं संशय प्रकट केला आहे. इ. स. ७६६ मध्यें आपण संजानास प्रथम आलों असें पारशी लोक सांगतात. इराणांतून सुटून प्रथम काठेवाडांतलि दीवला आलों आणि तेथून संजानला असें ते म्हणतात. आणि ते असेंहि म्हणतात कीं, या वस्तीला संजान हें नांव आपण दिलें आहे. डॉ. फ्लीट यांचें असें म्हणणें आहे कीं, मुळांतल्या हंजमनाचें संजमन असें नांव व्हावयाचें नाहीं; आणि आरबी प्रवाशांनीं सांगितलेलें सिंदान म्हणजे कच्छच्या किनाऱ्यावरील खंबायत जवळील सिंदान होय; हें संजान नव्हे. आमच्या मतें ह्या अडचणी अ

रिहार्य नाहींत आणि डॉ. फ्लीट यानीं कोरीव लेखांत असलेलें हंजमन म्हणजे कोणतें दुसरें शहर हें सुचविलें नाहीं. त्यांची अशी कल्पना आहे कीं, हंजमन म्हणजे शिलाहारांच्या राज्यकारभाराचें एक दुसरें मुख्य ठिकाण, ठाण्याच्या राजधानी शिवाय होतें ( पा. ५९). परंतु ही कल्पना हंजमननगर या वर्णनाशीं जुळत नाहीं; आणि त्रिवर्ग म्हणजे वरिष्ठ तीन वर्ण असेंहि मानतां येत नाहीं. कारण दानशासन सगळयाच लोकांस माहित झालें पाहिजे. आम्हीं या शब्दाचा असा अर्थ लावला आहे कीं संजान येथें तीन जातीचे परकी लोक होते, आणि त्यांचा कारभार स्वतंत्र असे; देशांतील लोकांशीं त्यांची देवघेव असे; म्हणून त्या लोकांसहि इनाम गांव दिल्याची माहिती जरूर असे. कारण इनामदारास विशिष्ट हक्क असत. हंजमन हें नांव अडचण उत्पन्न करतें हें खरें. पण आम्हांस असें वाटतें कीं, पूर्वीं असलेल्या एखाद्या गांवाजवळ पारशी लोकांनीं संजानची नवी वस्ती टाकली. संजानचें ठिकाण समुद्रास लागून असलेलें लहान पण सुरक्षित बंदर या नात्यानें फारच चांगलें आहे. आम्हांस अशी माहिती मिळाली आहे कीं, बंदराजवळ एका जुन्या किल्ल्याचा अवशेष हल्लीं आहे. आणि संजान गांवाभोंवतीं असलेल्या तटाचेहि अवशेष आहेत. हें पुराणें ठिकाण संशोधन करण्यासारखें आहे. बादामीचे चालुक्य सम्राट असतां पारशी लोक संजान येथें आले. त्यावेळीं कोंकणांत अनेक मांडलिक राजे होते. बंदराजवळ वस्ती करण्यास ज्या जाधवानें त्यांस परवानगी दिली, तो या मांडलिकांपैकीं एक असावा. हें ठिकाण परकी लोकांच्या वसतीचें झालें. ते लोक आपल्या संबंधींचा राजव्यवहार आपणच पहात. व त्यांचेच मॅजिस्ट्रेट (न्यायाधिकारी) असत. संजान हें नांव पारशांनीं दिलें असावें. आणि कोंकणचे गांवकरी त्याचा उच्चार हंजमन अथवा हंय्यमन असा करीत. हाच उच्चार कोरीव लेखांत येणें साहजिक आहे. अरबी प्रवाशांनीं सांगितलेलें सिंदान आणि संजान एक किंवा भिन्न हा येथें प्रश्नच नाहीं. संजान हें एका पार्शियन गांवाचें नांव आहे; आणि पारशानीं आपल्या नव्या वसतीस तें नांव दिलें, हंजमन नांव नव्हे. हंजमन हा स्थानिक उच्चार असून तो कोरीव लेखांत आला, हें साहजिक आहे.

हंजमन हें निराळें नांव दिलें असें डा. जे. मोडी म्हणतात, तसें मानण्याची आवश्यकता नाहीं. नांवांत 'म' कोणीकडून शिरला हें सांगण्याची खरी अडचण आहे. त्रिवर्ग म्हणजे पारशी, मुसलमान आणि हिंदु असाच अर्थ असूं शकेल. कारण पारशांत तीन वर्ण नाहींत. शेवटली गोष्ट ही कीं, अल्बेरूनीनें भूगोलिक माहिती देऊन अंतरेंहि दिलीं आहेत. त्यांतील सिंदान हें संजानच दिसतें. तें सोपाऱ्याच्या उत्तरेस लागून सांगितलेलें आहे. आणखी एक अशी कल्पना आहे कीं, हंजमन नगर म्हणजे हंजमन नांवाचें नगर नव्हे, तर हंजमनचें ( षष्ठीतत्पुरुष ) म्हणजे अंजुमनचें नगर असा अर्थ करतां येईल.

## ठाण्याच्या शिलाहारांची वंशावळ.

( बॉंबे गॅझेटियर व्हा १ भाग २, किलहॉर्नच्या वंशावळी ए. इं. ८ आणि गौरीशंकरचा टॉड. )

( १ ) अपराजित ले. ९९७ इ. ( ९९० ते १०११ )

(२) वज्जड (१०१०--१०१६ (३) अरिकेसरी ले. १०१७ ( १०१५-१०२५ )

(४) छित्तराज ले. १०२६ (१०२५ ते १०४५) (५) नागाराज (१०४५--१०५५) (६) मामवानी राजे ले. १०६० (१०५५--१०८५)

( ७ ) अनंत देव कोंकण चक्रवर्ती ले. १०२४ (१०८५ ते ११२५)

( ८ ) अपरादित्य पहिला ले. १०३८ ( ११२५ ते ११४५ )

( ९ ) हरपाल ले. ११४९, ५०, ५३ ( १०४५ ते ११५५ )

( १० ) मल्लिकार्जुन ले. ११५६ ( ११५५ ते ११७५ )

( ११ ) अपराजित्य दुसरा कोंकण चक्रवर्ती ले. १०८४, ८७ (११७५--१२००)

केशिदेव लेख १२०३, १२३८

सोमेश्वर लेख. १२५९

# प्रकरण बारावें

## कल्याणचे उत्तर चालुक्य.

ह्या कालविभागांत महाराष्ट्रावर चालुक्यांची सत्ता होती. पहिल्या भागांत वर्णिलेल्या पहिल्या कालविभागांतील पूर्व चालुक्याप्रमाणेंच आणि दुसऱ्या भागांत वर्णिलेल्या मालखेडच्या राष्ट्रकूटाप्रमाणेंच हेहि अत्यंत बलवान् होते. पूर्वींचे चालुक्य आणि राष्ट्रकूट हे मराठे क्षत्रिय होते. विशेषतः राष्ट्रकूट हे दक्षिणचे आर्यवंशाचे अत्यंत प्राचीन लोक होत. ह्या प्राचीन राष्ट्रकूटांना जिंकून पूर्व चालुक्यांनीं आपलें राज्य स्थापन केलें. पण त्यांना जिंकून राष्ट्रकूटांनीं पुनः आपलें राज्य चालविलें. पुनः राष्ट्रकूटांना उत्तर चालुक्यांनीं जिंकून आपण सत्ताधीश झाले, हे आपल्या येउरच्या शिलालेखांत (इ. ए. ८ पा. १९) पूर्व चालुक्यापासून राष्ट्रकूटांचा शेवटचा राजा कक्कल यास जिंकणारा चालुक्य तैलप ह्या पर्यंतची मध्यंतरीची सर्व वंशावळ देतात. उत्तर चालुक्यांचा पूर्व चालुक्यांशीं संबंध आहे. ह्याबद्दल पुष्कळ शंका घेतात. पण आपल्या लेखांत उत्तर चालुक्य पूर्व चालुक्याशीं जो संबंध जोडतात, तो अमान्य करण्यास कांहीं कारण नाहीं. हे पूर्व चालुक्यांच्याच पदव्या धारण करतात. आणि आपले मानव्य गोत्रच सांगतात. ( ए. इ. ९ पान २०६ ). ते चंद्रवंशी क्षत्रिय होते आणि त्यांनीं अयोध्येंत एकूणसाठ पिढ्या राज्य केलें, ही कल्पना त्यांनीं वेंगीच्या प्राच्य चालुक्यापासून घेतली. भाग १ यांत सांगितलेंच आहे कीं, पूर्व चालुक्यांच्या कोणत्याहि लेखांत या गोष्टी सांगितलेल्या नाहींत. तथापि या दोन्ही गोष्टी मानण्यास हरकत नाहीं. ह्यावरून ते इ. स. ४०० च्या सुमारास दक्षिणेंत आले असें ठरतें. त्यांचा वंशज तलप हा विक्रमादित्य आणि चेदीच्या राजा लक्ष्मण याची कन्या

बोंधादेवी यांचा पुत्र होता. त्रिपूरचे हय, दक्षिणचे चालुक्य आणि राष्ट्रकूट मराठे क्षत्रिय राजे यांस आपल्या मुली नेहमीं देत असें दिसतें. शेवटचा राष्ट्रकूट राजा कक्कल याचा प्रारंभीं तैलप एक बलवान् मांडलिक असावा. त्याचें मांडलिकी राज्य कोठें होतें हें स्पष्ट कळत नाहीं. तें बादामी भोंवतीं असणें शक्य आहे. पण या चालुक्यांच्या लेखांत त्यांच्या मूळ राजधानीचें नांव सांगितलेलें नाहीं. राष्ट्रकूटांच्या सत्तेस उतरती कळा लागण्याची संधि साधून तैलपानें कक्कलास जिंकून आपलें चालुक्य राज्य दक्षिणेंत स्थापिलें. त्यानें लढाईंत कक्कलाचे दोन सेनापति मारल्याचें एका लेखांत म्हटलें आहे. ह्या सेनापतीवर कक्कलाचा मोठा भरंवसा असून ते त्याच्या जुलुमी कृत्याचेहि मदतगार होते. (येऊर लेख इ. ए. ८ पान १७). तैलपानें चोल, आंध्र, उत्कल व इतर दक्षिणचे मराठे मांडलिक राजे यांस जिंकून राज्य स्थापन केलें आणि कुंतल देशांत न्यायानें आणि प्रतापानें राज्य केलें. *कुंतलाचें नांव या वंशाच्या लेखांत स्पष्टपणें येतें. ( इं. ए. ८ पान १८ ); ' आणि लोकांस सुख दिलें ' या

---

*टीप—चालुक्यांच्या देशास पुष्कळ लेखांत कुंतल शब्द लावलेला आढळतो. कुंतल म्हणजे हल्लींचा सदर्न मराठा कंट्री. यांतील पुष्कळ भागाची भाषा कानडी आहे. भाग २ पा. २७७ यांत सांगितलेले पुलकेशीचे तीन महाराष्ट्र म्हणजे पूर्वी सांगितल्याप्रमाणें विदर्भ, मध्य महाराष्ट्र व कुंतल असे होत. हे सर्व मिळून मोठा महाराष्ट्र. यासच १ उत्तर महाराष्ट्र म्हणजे तापी आणि वर्धा नदीचा प्रदेश. २ मध्य महाराष्ट्र म्हणजे गोदावरीचा प्रदेश आणि ३ दक्षिण महाराष्ट्र म्हणजे कृष्णा नदीचा प्रदेश म्हणतां येतें. कुंतल देशाची मुख्य खूण कृष्णा नदी सांगितली आहे. ( इं. ए. ८ पा. १८ ). या ठिकाणीं महाराष्ट्र आणि कर्नाटक यांचा मिलाफ होतो. तुंगभद्रेच्या पलीकडे मुख्य कर्नाटक. येथें यावेळीं गंग व त्यानंतर होयसल राजे राज्य करीत होते.

शब्दांवरून राष्ट्रकूट राजांच्या काळांत बहुधा लोकांवर जुलूम होत असावा असें दिसतें.

तैलप.नें इ. स. ९७३ पासून इ. स. ९९७ पर्यंत २४ वर्षें राज्य केलें. मुंजाशीं झालेल्या त्याच्या युद्धाचें वर्णन दुसऱ्या भागांत आलेंच आहे. या युद्धाचे शेवटीं अपमानास्पद रीतीनें त्यानें मुंजाचा वध केला असें गुजराथचे बखरकार सांगतात. पण ह्या हकीकती-विषयीं आम्हीं पूर्वीच शंका प्रदर्शित केली आहे. बहुधा मुंज लढा-ईंत मारला गेला असें आमचें मत आहे. परंतु येऊर लेख आणि मिरज लेख एका प्रसिद्ध कविराजास तैलपानें कैद केल्याचें सांग-तात. मिरज लेख १०२४ इसवीचा आहे; आणि या हकीकतीच्या जवळचा आहे. तेव्हां लढाईंत पाडाव झाल्यावर मुंजाला तैलपानें कैदेंत ठेवलें असावें. परंतु त्याला पिंजऱ्यांत ठेवलें, दारोदार भिक्षा मागावयास लाविली व शेवटीं त्याचा वध केला, या गोष्टी असंभ-वनीय दिसतात. हिंदुराजे इतके क्रूर असत नाहींत. शिवाय ह्या लेखांत ह्या गोष्टींचा उल्लेख नाहीं. (इ. ए. १३ पा. १७. या लेखां-तील कित्येक श्लोकांचें जें भाषांतर येथें केलें गेलें आहे, त्याहून भिन्न अर्थ श्लोकांचा आम्ही समजतों ). एक हूण राजा आणि मारवाडचे राजे तसेंच चेदी व उत्कल यांचा पराभव तैलपानें केल्याचें या लेखांत वर्णन आहे. ही अतिशयोक्ति असली तरी ही गोष्ट अशक्य नाहीं. कारण तैलप यावेळीं राष्ट्रकूटांच्या विस्तृत राजशक्तीचा स्वामी झाला होता; आणि राष्ट्रकूटांनीं तर कनोजपर्यंत स्वाऱ्या केल्या होत्या. तैलपाचा सेनापति भारप हा लाट देशावर राज्य करीत होता यांत शंकाच नाहीं. तैलपाच्याच वेळेच्या सुमारास मूलराज सोळंखीनें गुजराथेवर आपला ताबा बसवून पाटण येथें राज्य सुरू केलें, त्याशीं विरोध करून भारप्यानें युद्ध केलें हें पूर्वी सांगितलेंच आहे.

राष्ट्रकूट वंशांतील जाकव्वा नांवाची राजकन्या हिच्या पोटी तैलपास दोन पुत्र झाले, ते सत्याश्रय आणि देववर्मन्. पैकीं सत्याश्रय गादीवर बसला. मिरज किंवा येऊर लेखांत त्याजविषयीं विशेष कांहीं सांगितलेलें नाहीं. परंतु याच्या साम्राज्याच्या वेळीं दक्षिण कोंकणांतील एका मांडलिक शिलाहार राजानें खारेपाटण येथील दानलेख लिहिला ( B. B. R. A. S. भा. १ ). या लेखाविषयीं दोनतीन महत्त्वाच्या गोष्टी सांगण्यासारख्या आहेत. यांतील शिलाहार राजा रट्टराज आपल्या सम्राटाचें नांव सत्याश्रय स्पष्ट सांगतो. पण उत्तर कोंकणच्या शिलाहारांच्या लेखांत कोणा सम्राटाचें नांव येत नाहीं. पूर्वींच्या त्यांच्या लेखांत राष्ट्रकूट सम्राटांचा उल्लेख आहे. यावरून असें दिसतें कीं, उत्तर चालुक्यांच्या ताब्यांत उत्तरकोंकणांतील शिलाहार नव्हते. दुसरी गोष्ट, प्रधानांचीं नांवें ह्या लेखांत उत्तर शिलाहारांच्या लेखांप्रमाणें नाहींत. तिसरें, दान घेणाऱ्या ब्राह्मणांचें नांव ' ऐय्य ' उपपदांत नसून ' आर्य ' पदांत आहे. यावरून असें दिसतें कीं निदान संस्कृत लेखांत कर्नाटकांत ' ऐय्य ' उपपद लावीत नसून आर्य लावीत.

सत्याश्रयानें इ. ९९७ पासून इ. स. १००८ पर्यंत राज्य केलें. तो निपुत्रिक असल्यानें त्याचा पुतण्या म्हणजे देशवर्मन् अथवा यशोवर्मन् आणि भगवती यांचा पुत्र विक्रमादित्य गादीवर बसला. राज्यावर बसल्याच्याच वर्षीं कोरिलेला त्याचा एक लेख सांपडला आहे ( J. R. A. S. ४ पा ४ ). यानें थोडाच वेळ राज्य केलें. याच्या मागून याचा भाऊ जयसिंह गादीवर बसला. याचा एक लेख १०१९ इसवीचा सांपडला आहे. (इं. ए. ५ पा. १७). त्यांत असें म्हटलें आहे कीं, ' भोजकमलास हा सूर्य झाला आणि माळव्याच्या संयुक्त राजांचा यानें पराभव केला. ' माळव्याचा भोज राजाचा यानें खरोखरीच पराभव केला असावा. मुंजाला मारल्याबद्दल दक्षिणच्या

चालुक्यांचा सूड घेण्याचा भोजाचा प्रयत्न विफल गेला. गुजराथ बखरकारांनीं भोजानें तैलपावर सूड काढून त्यास ठार मारलें अशी सांगितलेली हकीकत खोटीच आहे. ( बॉंबे गॅझेटियरनेंहि हें सांगितलेंच आहे ). कारण भोज तैलपाच्या मृत्यूनंतर गादीवर आला. गॅझेटियर जें म्हणतो कीं हा सूड तैलपाच्या नंतरचा राजा विक्रमादित्य याजवर भोजानें काढला तेंहि शक्य दिसत नाहीं. कारण त्यानें १००८ ते १०१८ पर्यंत राज्य केलें. हा काळ भोजाच्या राज्यकाळांत पडतो हें खरें; पण ही गोष्ट दक्षिणच्या चालुक्यांच्या कोणत्याहि लेखांत सांगितलेली नाहीं व माळव्याच्या परमारांच्या लेखांतहि नाहीं. तेव्हां ही नेहमींची सूडाची गोष्ट पृथ्वीराजानें शिहाबुदीनचा सूड घेतला या रासांत सांगितलेल्या सुडाच्या गोष्टीप्रमाणें काल्पनिक आहे. भोजास एखाददुसऱ्या लढाईंत जय मिळाला असेल पण शेवटीं वर सांगितल्याप्रमाणें जयसिंहानें त्याचा पराभव केला.

तथापि चोलराजा राजराज यावेळीं दक्षिणेकडे उदयास येत होता. त्याच्या स्वारीपासून विक्रमादित्यास बराच त्रास झाला. नऊलक्षा एवढी प्रचंड सेना घेऊन त्यानें सर्व महाराष्ट्र उद्ध्वस्त केला. व बायकापोरांसहि ठार केलें असें वर्णन आहे. हें लेखकांच्या अतिशयोक्तीमुळें झालेलें आहे, तरी विक्रमादित्याचा पराभव झाला ही गोष्ट खरी. चालुक्यांचा आणि चोलांचा अथवा महाराष्ट्राचा आणि मद्रासचा हा वंशपरंपरेचा तंटा पुष्कळ वर्षे चालला होता. आणि राजराजानें सत्याश्रय किंवा विक्रमादित्य यांचा पराभव केला होता, तर राजराजाचा पुत्र चोलराजा राजेन्द्र याचा पराभव जयसिंहानें केला. मिरज लेखांत असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, दक्षिणेकडे चोलांना जिंकून व पश्चिमेकडे सप्त कोंकणांना जिंकून उत्तरेकडे दिग्विजय करण्याकरितां निघाला असतां, जयसिंहानें कोल्हापुर येथें मुक्काम केला; तेव्हां हें दान त्यानें दिलें. सप्त कोंकण कोणतीं हें

पूर्वी सांगितलें आहे. हे सात राजे नव्हते. यापैकीं उत्तर कोंकण जयसिंहानें जिंकलें नसावें. हें दान शके ९४६ म्हणजे १०२४ इसवीचें आहे. यानंतर जयसिंह ऊर्फ जगदेकमल्ल यानें माळव्याचा भोज याचाहि पराभव करून पुष्कळ वर्षें राज्य केलें. गौरीशंकराचें मत आहे कीं, भोजाशीं झालेल्या लढाईंतच जयसिंह मारला गेला. पण हा तर्क पूर्वीच्या विक्रमादित्याला लागू आहे; जयसिंहाला लागू नाहीं. कारण विक्रमादित्याच्या काळांत लिहिला गेलेला येऊर येथील लेख जयसिंहाचा असा अंत झाला ही गोष्ट सांगत नाहीं.

जयसिंह १०४० मध्यें मेला असावा. त्याच्या मागून त्याचा पुत्र सोमेश्वर गादीवर बसला. हा आपल्या सर्व पूर्वजांपेक्षां अधिकच नामांकित झाला. येऊर शिलालेखांत त्याचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. " माळव्याचा राजा पराजित होऊन आश्रयाकरितां एखादें मंडळ पहात रानोरान फिरत आहे. चोलांचा राजा समुद्रकिनाऱ्यावरील तालवनांत दडून राहिला आहे. कान्यकुब्जाचा राजा हिमालयाच्या एका दरींत सोमेश्वराच्या प्रतापाच्या भीतीनें मन व्यग्र होऊन लपला आहे. " हा माळव्याचा राजा स्वतः भोज असावा. कारण भोजाच्या मागूनच्या राजास सोमेश्वरानें स्वतःच मदत केली. कान्यकुब्जाचा राजा प्रतिहारांचा दुर्बळ वंशधर ज्याचा पराभव महमुदानें केला तो राज्यपाल असावा. चोलांचा राजा राजेंद्रच स्वतः असूं शकेल. बिल्हणाच्या विक्रमांकदेवचरितामध्यें या हकीकतींचें उत्तम वर्णन आहे. सोमेश्वराचा पुत्र विक्रमांक याचा राजकवि तो असल्यानें त्याचें वर्णन काव्यमय असलें तरी समकालीन इतिहासासारिखें आहे. त्यांत सोमेश्वरानें भोजाला जिंकून धारसुद्धां कबजांत घेतली असें वर्णन आहे. अर्थात् भोज आश्रयासाठीं रानोमाळ भटकत राहिला. चेदीचा कर्ण याचाहि त्यानें पराभव करून त्यास लढाइत ठार मारिलें असें वर्णन आहे ( विक्र १ श्लो. १०२–१०३);

पण हें संभवनीय दिसत नाहीं. ही उत्तरेकडील विजयी स्वारी कनोजपर्यंतहि गेली आणि कनोजचा प्रतिहार राजा महमुदाच्या वेळेप्रमाणें राजधानी सोडून हिमालयांत पळाला असावा. येऊरच्या लेखांत चोलराजाच्या मृत्यूविषयीं वर्णन नाहीं, तथापि असें सांगितलेलें आढळतें कीं, इ. स. १०३७ त राजेंद्र चोलाशीं सोमेश्वराची जी लढाई कोप्पन येथें झाली, त्यांत राजेंद्र मारला गेला. या गोष्टीचा उल्लेख येऊर लेखांत यावयास पाहिजे होता. पण त्यांत तो समुद्रकिनाऱ्यावर पळाला एवढेंच वर्णन आहे. हा लेख विक्रमांकाच्या वेळेस लिहिला गेला, तेव्हां त्यांत तुंगभद्रेवरील कोप्पमच्या लढाईचा, ज्यांत राजेंद्र मारला गेला, दाखला नाहीं याचें आश्चर्य वाटतें.

सोमेश्वरानें 'कल्याण' हें नवें नगर बसवून तेथें आपली राजधानी नेली असें म्हणतात. उत्तर चालुक्याची राजधानी येथपावेतों कोठें होती हें निश्चित दिसत नाहीं. कदाचित् पूर्वींच्या राष्ट्रकूटांची मलखेड किंवा त्याच्याहि पूर्वींच्या चालुक्यांची म्हणजे त्यांच्या पूर्वजांची राजधानी बदामी हेंच त्यांचें मुख्य ठिकाण असावें. बिल्हणानें कल्याण नगर ( अलीकडच्या बेदरजवळचें ) सोमेश्वरानें बसविल्याचें स्पष्ट सांगितलें आहे. कुलपरंपरागत शत्रु चोल यांना अधिक जवळ म्हणून तेथें राजधानी केली असावी. भरतखंडाच्या अनेक प्रसिद्ध हिंदु राजांप्रमाणें सोमेश्वर कवीचा व विद्वानांचा चाहता होता ( येऊर लेख आणि बिल्हण १ व ४ ). इ. स. १०६८ त इतर प्रसिद्ध धंग वगैरे नामांकित हिंदु राजांप्रमाणें सोमेश्वर जेव्हां तापानें आजारी पडला, तेव्हां तुंगभद्रा नदींत शंकराचें स्तोत्र गात चैत्र वद्य अष्टमी आदितवार रोजीं त्यानें जलसमाधि घेतली.

सोमेश्वर जिवंत असतांनाच त्याचा दुसरा पुत्र विक्रमादित्य आपल्या शौर्यानें व शहाणपणानें नांवास चढला होता. बहुधा सोमेश्वराच्या युद्धांत विक्रमादित्यच सेनापति असावा. बिल्हणानें कांची शहर

सोमेश्वरानें घेतलें असें जें वर्णन केलें आहे त्याचा अर्थ विक्रमानें खरोखर सदर शहर घेऊन लुटलें असाच होतो. कारण एकदां बापानें आणि नंतर मुलानें असें कांची दोनदां घेतलें गेलें हें संभवनीय नाहीं. बाप जिवंत असतांच विक्रमानें चारी दिशा जिंकल्या असें बिल्हणानेंहि वर्णन केलें आहे. त्यानें चेर, सिंहल, गंगैकोंड, चोल, वेंगी, वंग आणि आसामहि जिंकलें, असें बिल्हण लिहितों. बहुधा या दरबारी कवीची ही अतिशयोक्ति असावी. त्यानें दक्षिणहिंदुस्थान सबंध जिंकलें यांत शंका नाहीं. हे विजय संपादित असतां बाप मेल्याची खबर मिळाली तेव्हां तो राजधानीस परतला. तेथें त्याचा वडील भाऊ सोमेश्वर गादीवर बसला होता. त्यास त्यानें राजा म्हणून नमस्कार केला. दोघां भावांत कांहीं दिवस प्रेम राहिलें. परंतु शेवटीं नेहमींप्रमाणें तंटा उपस्थित होऊन विक्रमादित्य राजधानी सोडून कांचीकडे गेला. वडील भावानें त्याच्यावर फौज पाठविली तिचा त्यानें पराभव केला. विक्रमादित्य बनवासीस पोहोंचून तेथें कांहीं दिवस राहिला. तेथून तो गोव्याकडे गेला तेथील मराठा कदंब राजा जयकेशी यानें त्याचा अंकितपणा मान्य करून त्यास मोठी खंडणी दिली. ( विक्रमादित्यानें पुढें या जयकेशीच्या नातवाला आपली मुलगी दिली B. B. J. R. A S. ९ पान २४२, २६८, २७९ ). यानंतर अलूप आणि चेर यांस जिंकून तो चोलाकडे वळला. चोल राजानेंहि त्याशीं सख्य करून त्यास आपली मुलगी दिली. याप्रमाणें आपलें सामर्थ्य वाढवून विक्रमादित्य तुंगभद्रेकडे वळला.

पण लौकरच अशा हकीकती घडून आल्या कीं, कुंतल देशाचा मुकुट विक्रमाच्या डोक्यावर बसला. चोल राजा इतक्यांत मरण पावला; त्याचा पुत्र म्हणजे विक्रमाचा मेहुणा यास दुसऱ्या वारसानीं हरकत केली. विक्रमानें कांचीस पोहोंचून आपल्या मेहुण्यास

चोलांच्या गादीवर बसविलें व तो परतला. पण चोलांचा एक प्रबल मांडलिक राजिग यानें त्या मेहुण्यास पुनः पदभ्रष्ट केलें आणि दुसऱ्या बंडखोर सरदारांस घेऊन तो विक्रमावर चालून आला. त्यानें विक्रमाचा भाऊ सोमेश्वर यास विक्रमावर पश्चिमेकडून हल्ला करण्यास बोलाविलें. विक्रम याप्रमाणें दोन सैन्याच्या कचाटींत सांपडला, पण यानें निरानिराळ्या दिवशीं दोघांना एकामागून एक युद्ध देऊन त्यांस इतकें पराभूत केलें कीं सोमेश्वर कैद झाला. तेव्हां विक्रमानें एकदम कल्याणावर चाल करून सोमेश्वरास पदच्युत करून राजमुकुट आपल्या डोक्यावर चढविला. हे वृत्त शके ९९८ म्हणजे इ. स. १०७६ मध्यें घडलें. अर्थात् दुसऱ्या सोमेश्वरानें इ. स. १०६९ पासून १०७६ पर्यंत सात वर्षें राज्य केलें.

विक्रमादित्य उत्तर चालुक्यापैकीं सर्वांत प्रबलतम राजा झाला. त्यानें राज्यहि फार वर्षें केलें. इ. स. १०७६पासून इ. स. ११२६ पर्यंत पन्नास वर्षें तो गादीवर होता. त्यानें त्रिभुवनमल्ल ही पदवी धारण केली. ज्याप्रमाणें पूर्व चालुक्य वल्लभपदांत पदवी धारण करीत किंवा राष्ट्रकूट राजे वर्ष-पदांत पदवी घेत, त्याचप्रमाणें उत्तर चालुक्य मल्लपदांत एक नांव घेत. पहिला राजा तैलप यानें आहव-मल्ल हें बिरुद घेतलें होतें व तेंच विक्रमाचा बाप सोमेश्वर यानेंहि घेतलें होतें. आपला समकालीन गुजराथचा चालुक्य राजा जयसिंह याप्रमाणें विक्रमादित्यानेंहि आपल्या नांवाचा शक सुरू केला. हा एक लक्षांत घेण्यासारखा योग आहे कीं, हे दोघे समकालीन राजे मोठे पराक्रमी होते आणि दोघानींहि आपले शक सुरू केले व ते शक कांहीं वेळ चालून नष्ट झाले. (इं.ए.१३पृ.१८९ मध्यें फ्लीटचा लेख.)

कऱ्हाडच्या शिलाहार राजाची कन्या चंद्रलेखा हिनें विक्रमास स्वयंवरांत वरिलें असें बिल्हणानें वर्णन केलें आहे. पण हें वर्णन अनैतिहासिक दिसतें. कारण स्वयंवराची चाल या वेळेस बंद पडली

होती. शिवाय दाक्षिणचा सम्राट् विक्रम खुद्द जेथें वर उपस्थित झाला, तेथें कन्येस दुसरा एखादा राजा वरणें शक्यच नव्हतें. इतर राजे त्याचे मांडलिकच असावेत. ही राजकन्या विलक्षण सुस्वरूप होती. कल्हणानें असें लिहिलें आहे कीं, काश्मीरचा राजा हर्ष यानें तिच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून कर्नाटक जिंकून तिचें हरण करण्याचा निश्चय सभेंत प्रसिद्धपणें उच्चारला.* आमच्या मतें हीहि एक दुसऱ्या कवीची कल्पना आहे. तत्कालीन राजाप्रमाणें विक्रमालाहि कित्येक बायका होत्या. या बायकांना निरनिराळीं गांवें खर्चाकरितां तोडून दिलेलीं असत.

विक्रमाचा धाकटा भाऊ जयसिंह यास त्यानें बनवासीवर प्रान्ताधिकारी नेमलें होतें. त्यानें बंड करून मोठ्या सैन्यानिशीं विक्रमावर चाल केली. परंतु शेवटीं त्याचा पराभव होऊन ते कैदेंत पडला. विक्रमानें शेवटीं त्यास माफी दिली असें बिल्हण म्हणतो.

विक्रमाच्या दीर्घराज्यकाळात सर्वत्र शांतता राहिली; परंतु एकदा होयसल राजा विष्णुवर्धन याच्या नेतृत्वाखालीं व गोव्याच्या कदंब राजाच्या मदतानें दक्षिणच्या अनेक राजांच्या एका संघानें विक्रमावर स्वारी करून कृष्णेपर्यंतचा मुलुख उद्ध्वस्त केला. ( इ. ए. २ पा. ३०० आणि B B R. A S ११ पान २४४ ). शिंदे घराण्यांतील आचगी नांवाच्या सरदारास विक्रमानें या संघावर पाठविलें व त्यानें त्याचा पूर्ण पराभव केला. विमाकादित्य चोलराजाशीं स्वतः एकदां लढला व या युद्धांतहि त्यास जय आला. आचगीनें गुजराथच्या व माळव्याच्या राजांनाहि जिंकल्याचें वर्णन आहे; पण हीं युद्धें महत्त्वाचीं नसावींत.

*कर्नाटभर्तुः पेर्माडेः सुंदरीं चंदलाभिधाम् । अलेख्यलिखितां वीक्ष्य सोऽभूत्पुष्पायुधाहतः ॥ १ ॥ स विटोद्रेचितो वीतत्रपश्चक्र सभान्तरे । प्रतिज्ञां चन्दलावाप्त्यै पेर्माडेश्च विलोडनें ॥ २ ॥ ( राजतरंगिणी ७. ११२४

असो, विक्रमाचा राज्यकाळ म्हणजे दक्षिणच्या लोकांचा सौख्य-काळ असें म्हणतां येतें. त्यानेंहि विक्रमपुर नांवाचें शहर वसविलें. त्याच्यावेळीं वाङ्मय उत्कर्ष पावलें. त्याच्या राज्यांत सुव्यवस्थित कायदे चालू असत ही गोष्ट त्याचा प्रधान विज्ञानेश्वर यानें याज्ञवल्क्यस्मृतीवरील आपली प्रसिद्ध टीका मिताक्षरा यावेळीं लिहिली, ह्या एकाच गोष्टीवरून सिद्ध होईल. बंगाल व्यतिरिक्त सर्व हिंदुस्थानभर ही टीका अद्यापहि हिंदु कायद्यावरील श्रेष्ठ पुस्तक म्हणून मानली जाते. आणि पश्चिमेकडील कायदेपंडित व ब्रिटिश कोर्टेंहि हिला मान देतात. यावेळीं हिंदुस्थानांतील सर्व मोठ्या राज्यांत हिंदुधर्माचा खोल अभ्यास होत होता असें दिसतें. कारण मिताक्षरेखेरीज ठाण्याचा शिलाहार राजा अपरादित्य यानें स्वतः लिहिलेली अपरार्क नांवाची ह्याच स्मृतीवरील विद्वत्तापूर्ण टीका यानंतर थोड्याच काळांतील आहे. तसेंच कनोज येथें गोविंदचंद्राच्या आश्रयानें लक्ष्मीधरानें व्यवहारकल्पतरु हा कायद्यावरील ग्रंथ लिहिला. असो, मिताक्षरेच्या तीन्ही भागाच्या शेवटल्या तीन श्लोकांत तीन गोष्टींची अत्यंत स्तुति केली आहे. अत्यंत सुंदर कल्याणनगर, अत्यंत विद्वान पंडित विज्ञानेश्वर आणि अत्यंत प्रतापी हिमालयापासून रामेश्वरापर्यंत व पूर्वसमुद्रापासून पश्चिमसमुद्रापर्यंत राज्य करणारा विक्रम.

विक्रमादित्याच्या मागून त्याचा पुत्र सोमेश्वर तिसरा गादीवर बसला. तो बापाइतकाच पराक्रमी असुन बापाहूनहि जास्त एका बाबतींत म्हणजे विद्वत्तेंत होता. त्यानें केलेला ग्रंथ मानसोल्लास ऊर्फ अभिलषितार्थचिंतामणि सर्व शास्त्रांचें आधारस्थान आहे. राजनीतिशास्त्र, युद्धशास्त्र, अश्वशास्त्र, गजशास्त्र, काव्य, तर्क,दान, ज्योतिष्य, किंबहुना सर्व शास्त्रें जीं जीं मनुष्याच्या सुखाकरितां उत्पन्न झाली आहेत तीं, सर्व ह्या ग्रंथांत आहेत. ज्योतिष्य शास्त्रांत तर शके १०५१ चैत्र शुद्ध प्रतिपदा शुक्रवार या दिवसाचे ग्रहगणित करण्याचे

ध्रुवांक त्यानें दिले आहेत.यावरून हा ग्रंथ त्यानें आपल्या राज्याच्या पांचव्या वर्षीं लिहिला. एका दीर्घकाळाच्या राज्यानंतर तो गादीवर आला, तेव्हां तो वयानें मोठा होता हें सांगावयास नको. त्यानें थोडेंच म्हणजे अकरा वर्षें राज्य केलें.

सोमेश्वराच्या मागून इ. स. ११३८ त त्याचा पुत्र जगदेकमल्ल गादीवर आला. आणि त्याच्यामागून इ. स. ११५० त त्याचा भाऊ तैल दुसरा गादीवर आला. यावेळी चालुक्यवंशाची शक्ति कमी झाली आणि तैलपाचा सेनापति विज्जल एक कलचुरी क्षत्रिय यानें त्याविरुद्ध बंड केलें. कोल्हापुरचा मांडलिक राजा विजयार्क व तेलंगणचा स्वतंत्र काकतीय राजा यानें बिज्जलास मदत केली. कांहीं वर्षे कल्याणमध्यें बहुतेक कैद भोगल्यावर तो तेथून निसटला, आणि धारवाड जिल्ह्यांतील अण्णेगिरी येथें येऊन कांहीं दिवस एक लहानसें मांडलिक राज्य त्यानें स्थापिलें. विज्जलानें चालुक्यांची सत्ता बळकावून कल्याणास राज्य चालविलें इ० स० ११६२ मध्यें तैलपावर विज्जलानें हल्ला केला आणि त्यास बनवासीकडे पिटाळून लावून त्यानें आपले स्वातंत्र्य पुकारिलें. या कलचुरींच्या बळकाविलेल्या राज्याचा थोडक्यांत पुढें इतिहास सांगूं.

कल्याण येथें लिंगायतांचा पंथ याच वेळीं निर्माण होऊन विज्जलाचा खून झाला आणि कलचूरीची सत्ता ऱ्हास पावली. तेव्हां तैल दुसरा याचा पुत्र सोमेश्वर यानें चालुक्य राज्य पुनः स्थापिलें आणि आपली राजधानी इ. स. ११८२ त आण्णेगिरी येथें केली. यांत ब्रह्म नांवाचा एक मांडलिक ( इ. ए. ११ पा. ) मदतगार होता. पण देवगिरीचे यादव व द्वारसमुद्राचे यादव यावेळीं उदयास येत होते: आणि त्यांनीं ब्रह्मावर हल्ला केला होयसल वंशांतील वीरबल्लाळ यानें ब्रह्माचा पराभव केला. आणि यादवानीं उत्तर चालु-

ांच्या सत्तेचा अंत केला. शके १११९ म्हणजे. इ. स. ११८९
ंतर सोमेश्वराचा पत्ता लागत नाहीं.

चालुक्यांच्या लहान लहान शाखा महाराष्ट्रांत निरनिराळ्या ठिकाणीं
य करीत असल्या पाहिजेत. एक शाखा कोंकणांत निःसंशय
ी. कल्याणच्या चालुक्य वंशाच्या एका शाखेंतील राजाचा
लेख सांपडला आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत चाळके नांवाचे मराठे
ळ ठिकाणीं आहेत. कऱ्हाडेच डुबल कुल मात्र चालुक्यांचे
लें तरी ते त्या चालुक्या पैकीं नसून पूर्वी सांगितल्याप्रमाणें
ाग २ ) भारद्वाजगोत्री उत्तरेकडील चालुक्यांपैकीं आहेत.

असो, ह्या उत्तर चालुक्यांचे इतके लेख सांपडले आहेत कीं,
णि ते इतक्या पूर्वकाळीं सांपडले आहेत कीं, बऱ्याच वर्षामागें
येक विद्वानांनीं त्यांचा इतिहास लिहिलेला आहे. रॉयल एशि-
टेक सोसायटी लंडन पुढें मद्रास सिव्हिल सर्व्हिसपैकीं वॉल्टर
यट यानें एकट्यानें इ. स. १८३५ त दक्षिण हिंदुस्थानच्या या
ांच्या५९६कोरीव लेखांच्या नकला ठेवल्या ( J. R. A. S. ४).
यतः या सर्व साधनावरून डॉ. भांडारकर ( रा. गो. )
णि डॉ. फ्लीट यानीं या चालुक्यांचा इतिहास दिला आहे. वरील
क हकीकतींत आम्ही भांडारकरांनीं डेक्कनचा प्राचीन इतिहास
दिलेल्या वृत्तांताला धरूनच इतिहास दिला आहे. आणि कांहीं
ोन माहिती मिळालेली व आमच्या थोड्याशा कल्पना त्यांत मिळ-
्या आहेत. किलहॉर्ननें कल्याणचे उत्तर चालुक्य या सदरा-
ळीं दक्षिणच्या कोरीव लेखांच्या आपल्या यादींत जे अनेक लेख
गितले आहेत, ते सर्व तपासून पाहणें अशक्य आहे. कारण
ांहि संख्या नंबर १४० पासून नंबर ३१५ पर्यंत १७५ इतकी
ते. पण या उत्तर चालुक्यांचा इतिहास विद्वानांनीं उत्तम निश्चित
ा आहे त्यामुळें शंकास्थानें बहुतेक उरलेली नाहींत असें आम्हांस

वाटतें. कदाचित् हे मराठे होते किंवा कर्नाटकी होते हा तंटयाच
प्रश्न निघेल.पण हा भेद केवळ दिखाउ आहे असें आमचें मत आहे

या राजांनीं इ. स. ९७३ पासून इ. स. ११८९ पर्यंत म्हण
सुमारें २१६ वर्षें राज्य केलें. पुढील वंशावळींत दाखविल्याप्रमा
हे राजे ११ झाले. अर्थात् नेहमीचीच वीस वर्षांची सरासरी द
पिढीस पडली या राजांच्या अमलांत दक्षिणेंत जी धार्मिक व साम
जिक स्थित्यंतरें झालीं, किंबहुना सर्व हिंदुस्थानांत झाली म्हण
बौद्ध धर्माचा अन्त तसेंच जैनधर्माचा उत्कर्ष व उतार वगैरे बाबी
बद्दल आम्ही या पुस्तकाच्या शेवटीं देशाच्या सामान्य परिस्थिती
निरीक्षण करणार आहों तेथें जास्त लिहूं.

## कल्याणच्या उत्तर चालुक्यांची वंशावळ.

( बॉंबे गॅझेटीयर व भांडारकर आणि किलहॉर्न वंशावळी ए. इं. ६ )

(१) तैलप ९७३–९९७ इं.
(उ. नूरमाडि, आहवमल्ल, रणरागभीम) ले. श. ८९५, ९०२.4, 71११

(२) सत्याश्रय ( ९९७–१००८ ) ले. श. ९२४, ३०.

देशवर्मन् ( यशोवर्मन् )

(३) विक्रमादित्य त्रिभुवनमल्ल ( १००९–१०१८ ) ले. शं. ९३०

(४) जयसिंह जगदेकमल्ल (१०१८-१०४०) ले. शं. ९४०, ४१, ४४, ४६, ५०, ५५, ५७, ६२

(५) सोमेश्वर पहिला, आहवमल्ल ( १०४०–१०६८ )

(६) सोमेश्वर दुसरा (१०६८-१०७६) भुवनैकमल्ल ले. शं. ९९३, ९६, ९७.

(७) विक्रमादित्य दुसरा* त्रिभुवनमल्ल पर्मांडी (१०७६-११२५) ले. शं. ९९९; १००१, ४, ६, ८, ९, १३, ५; १७, १८, २० वगैरे.

(८) सोमेश्वर तिसरा (११२६-११३८) ले. शं. १०५१, ५२

(९) प्रतापचंद जगदेकमल्ल (११३८-११५०) ले. शं. १०६१, ६४, ६६, ६९, ७३

(१०) तैलप दुसरा (११५० ११८२) नूर्मांडि त्रैलोक्यमल्ल ले. सं. १०७६, ७७

(११) सोमेश्वर चौथा ( ११८२–११८९ ) त्रिभुवनमल्ल ले. शं. ११०६, ११.

---

*किलहॉर्न विक्रमादित्य दु. याचा भाऊ जयसिंह व त्याचा पुत्र

# कल्याणचे कलचूरी.

यांचा इतिहास येथें थोडक्यांत आम्ही देतों. त्यांनीं फार वर्षे राज्य केलेंहि नाहीं व ते बहुतेक बंडखोरच राहिले. विज्जन (बिज्जल) हा एक कलचूरी मांडलिक होता. त्रिपुरचे कलचूरी हे आपल्या मुली दक्षिणच्या राजांस नेहमीं देत. तेव्हां एखाद्या राणीचा भाऊबंद या नात्यानें जाहगीरदार झालेल्या सरदाराचा तो वंशज असावा. आर्किआलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट पश्चिमहिंदुस्थान नंबर १० यांत प्रसिद्ध झालेल्या एका दानलेखांत तो जगदेकमल्लाचा महामंडलेश्वर होता असें वर्णिलें आहे. लौकरच सेनापतिनात्यानें प्रबल होऊन त्यानें आपल्या मालकास बाजूस सारिलें आणि इ. स. ११६५ त कल्याणचा राजा असें आपलें नांव प्रसिद्ध केलें. एका धार्मिक तंटयांत त्याचा लौकरच खून झाला. त्याचा ब्राह्मण प्रधान बसव यानें जैनधर्माच्या विरोधी—ब्राह्मण धर्माच्या नव्हे—असा आपला लिंगायत पंथ यावेळीं स्थापन केला. या भिन्न मताचे विशेष वर्णन आम्ही पुढें देऊं. बिज्जन हा जैन झाला होता. तो लिंगायतांच्या यतींचा म्हणजे जंगमांचा छळ करूं लागला. यामुळें जो तंटा उपस्थित झाला, त्याची हकीकत जैनांनीं व लिंगाइतांनीं अगदीं भिन्न दिली असल्यामुळें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. या तंटयांत इ. स. ११६७ त विज्जनाचा खून झाला यांत शंका नाहीं. त्याचा पुत्र सोम अथवा सोयीदेव राज्य करूं लागला. त्याच्या राणीनें एका ब्राह्मणाला दिलेलें दान त्यानें एका लेखांत मंजूर केलेलें आहे (इ. ए. १० पान १८३). यानें इ. स. ११७६ पर्यंत राज्य केलें. तेव्हां त्याच्या मागून त्याचा

---

विष्णुवर्धन विजयादित्य यासहि देऊन विक्रमाचा पुत्र जयकर्ण याचा १०८७-११२१ पर्यंत स्वतंत्र उल्लेख करतो. हा बापाच्या अगोदर मेला.

मुलगा संकट हा गादीवर आला. याचेहि कांहीं लेख सांपडले आहेत. इ. स. ११८३ मध्यें पूर्वीं सांगितल्याप्रमाणें चालुक्य सोमेश्वरानें आपलें राज्य यापासून हिसकावून घेतलें. या रितीनें कलचूरी राजांनीं इ. स. ११६० पासून इ. स. ११८४ पर्यंत चोवीस वर्षेंच राज्य केलें. पण यांचा राज्यकाळ लिंगायतांच्या धर्ममताच्या उदयामुळें प्रसिद्ध आहे. यांच्या वेळीं वैश्यलोकांतून जैनमताचा लोप होत चालला आणि बौद्धमत तर बिलकुल नष्ट झालें. दक्षिण महाराष्ट्रांत यावेळीं वैश्य बहुतेक लिंगायत झाले. ( बॉ. गॅ. व्हा. १ भा. २ पान २८८ )

J. R. A. S. ( १८३७ ) यांत असें सांगितलें आहे कीं या कलचूरी राजांची उत्पत्ति मलखेडच्या जैन गुरूनीं सांगितल्या प्रमाणें कल्याणचाच महामंडलेश्वर सन्तरस नांवाच्या कालंजरपुरनिर्गत कलचूरी वंशातल्या एका सरदारापासून झाली ( पा. १९ ). यांत विज्जनाचा वंश संतरसापासून आठवी पिढी धरून पुढें दिल्याप्रमाणें सांगितला आहे.

विज्जन त्रिभुवनमल्ल

सोमेश्वर देव उर्फ रायमुरारी — संकटदेव आहवमल्ल

# प्रकरण तेरावें.

## त्रिकलिंगाचे प्राच्य गंग.

हिंदु इतिहासाच्या या कालविभागांत कलिंग देशांत एक नवीन राजघराणें उदयास आलें. ' त्रिकलिंगाच्या प्राच्य गंगास ' किलहॉर्ननें उत्तर हिंदुस्थानांतील मानलें आहे हें योग्यच आहे. पण कलिंग तेथील ( हल्लींचें विजागापट्टम व गंजाम जिल्हे ) लोकांचे वंश आणि भाषा यांच्या दृष्टीनें दक्षिण हिंदुस्थानांत समाविष्ट केलें पाहिजे. तरी पण प्राचीन काळापासून अंग, वंग, कलिंग अशी जोडी लागलेली आहे. आणि बिहार, बंगाल व ओरिसा हे अलिकडच्या इतिहासांतहि नेहमीं सांधलेले असतात. कलिंग देशांत फार प्राचीन काळीं आर्य स्वारी करणाऱ्यांनीं वसति केली, त्याच्याहि पूर्वींच्या काळांत कलिंग देशास जाणें आर्य लोक पाप समजत असत; मग तेथें राहण्याची गोष्टच नको. तथापि अशोकाच्या वेळेपासून आणि त्याहि पूर्वी ब्राह्मण–काळापासून आर्यांची बरीच संख्या कलिंगांत वस्ती करूं लागली. अशोकानें मोठा प्रयत्न करून व एक लाख लोक मारून हा देश जिंकला, तेव्हां तो बौद्ध झाला. या देशांचें प्लिनीच्याहि काळीं तीन भाग मानीत असत; यामुळेंच त्रिकलिंग ही संज्ञा उत्पन्न झाली असावी ( विजागापट्टम गॅझेटियर पा. २६ ). दक्षिणच्या कित्येक देशांच्या नांवांस या रीतीनें एक संख्या अगोदर जोडणें ही तऱ्हा तीन महाराष्ट्र, सप्तकोंकण, त्रैराज्यपल्लव (भा. १ पा.२।२०१) अशा उदाहरणांत दिसून येते. कलिंगाचे हे तीन भाग कोणते होते हें ठरविणें कठिण आहे. बहुधा ते ( १ ) मुख्य कलिंग म्हणजे पूर्व किनाऱ्यावरील हल्लीचे गंजाम, विजागापट्टम आणि गोदावरी हे जिल्हे ( २ ) आंध्र म्हणजे पूर्वघाटाच्या वरचा मुलूख आणि ( ३ ) ओड्र

अथवा ओरिसा, महानदीच्या उत्तरेकडे, हे तीन प्रदेश असावेत. त्रिकलिंगाहून वेंगी भिन्न मानला जात असे (भा. १ पान ३०४). नवव्या शतकाच्या अखेरपर्यंत कलिंग वेंगीच्या प्राच्य चालुक्यांच्या सत्तेखालीं होतें. त्यांची राजधानी गोदावरीच्या दक्षिणेस होती. या प्रदेशांतील सामान्यजन द्रविडी वंशाचे आहेत.आणि बाहेरून आलेले आर्यहि, अनार्य तेलगू भाषा तेव्हां बोलत होते व हल्लीं बोलतात.

अकराव्या शतकाच्या आरंभीं या प्रदेशांत प्राच्य गंग उदयास आले. ते आपल्या कोरीव लेखांत गंगवाडींतील कोलाहल शहरांतून म्हणजे दक्षिणेकडून आपण येथें आलों असें सांगतात (जर्नल बंगाल ६४ भा. १ पा. २३७). पण या देशांत यांची वस्ती बरेच दिवस होती. नवीन उदयास येणाऱ्या चोल सत्तेपुढें प्राच्य चालुक्य-वेंगी येथें पडले, या संधीचा फायदा घेऊन हे प्राच्य गंग वज्रहस्ताच्या नेतृत्वाखालीं स्वतंत्र झाले. ह्याचा पुत्र राजराज, चोलांचा प्रसिद्ध वेंगीची सत्ता नष्ट करणारा राजा राजेंद्र, याची मुलगी रूपसुंदरी हिचा नवरा होता. त्यांचा पुत्र अनंतवर्मन् यास अर्थात् गंग आणि चोल यांच्या वंशांत उत्पन्न झाल्यामुळें चोडगंग म्हणत. नेहमींप्रमाणें हा वंशांतील तिसरा असल्यानें अतिशय प्रबल राजा झाला व नेहमीं-प्रमाणें त्यानें पुष्कळ वर्षेंहि राज्य केलें. या राजांचे कोरीव लेख सांपडले आहेत. ज्याअर्थीं वेंगीच्या प्राच्य चालुक्यांची सत्ता याज-कडे आली आणि त्यांची राज्यव्यवस्थाहि आली, त्याअर्थीं यांचे लेखहि प्राच्य चालुक्यांच्या लेखाप्रमाणें विस्तृत व निश्चित माहितीनें भरलेले आहेत. त्यांत नेहमीं शकवर्ष दिलेलें असतें व प्रत्येक राजाचा निश्चित राज्यकाल दिलेला असतो. किंबहुना शेवटच्या किंवा महत्त्वाच्या राज्याच्या राज्यारोहणाचा काल वर्ष, महिना, वार, मिति इतक्या निश्चित तऱ्हेनें दिलेला असतो. त्याचप्रमाणें या लेखांत

यांच्या कुलाचें गोत्र व चंद्रापासूनची विस्तृत वंशावळ दिलेली असते. यामुळें या वंशांतील राजांच्या संबंधीं मितींचा घोटाळा मुळींच नाहीं. यांच्या लेखावरून यांचा मिळणारा इतिहास निश्चित रीतीनें आम्ही पुढें देतो. मात्र राजांच्या स्तुति नेहमींप्रमाणें अतिशयोक्तिपूर्ण असल्यानें त्यांतून ऐतिहासिक वृत्तें फार थोडी सांपडतात. समकालीन राजांचे थोडथोडे उल्लेख त्यांत आहेत, त्यावरून मध्ययुगीन हिंदु इतिहासावर कांहीं थोडासा प्रकाश पडतो.

वर सांगितल्याप्रमाणें त्रिकलिंगांत पहिला प्रसिद्धीस आलेला राजा दुसरा वज्रहस्त होय. याचा दानलेख इ. स. १०५८ चा इ. एं. ४ ( पा. १७५ ते १८८ ) यांत छापला आहे, त्यांत ह्या कुलाची संपूर्ण हकीकत दिली आहे. हें चंद्रवंशी कुल असून त्याचें गोत्र आत्रेय आहे. कुलास नांव देणारा राजा गांगेय ( भीष्म नव्हे ) होता. हें कुल कालिंगांत येऊन 'गोकर्ण' शिवाच्या प्रसादानें कलिंगांत सत्ता पावलें. या महादेवाचें देऊळ महेंद्र पर्वतावर आहे. हे प्रथम मांडलिक होते, व पंचमहाशब्द (पांच राजकीय वाद्यें) त्यास मिळाले होते. यांच्या पांच शाखा झाल्या, त्या ९ व्या शतकांत पुनः एकत्र झाल्या. वज्रहस्ताला 'परमभट्टारक' इत्यादि स्वतंत्र राजांचीं विरुदें या लेखांत लाविलीं असून याचा राज्याभिषेक काळ इ. स. १०३८ दिला आहे. या कालांतील इतर राजकुलाप्रमाणें हें कुल शैव असून वज्रहस्तहि परम माहेश्वर होता. यानें वेंगी आणि ओरिसा दोन्ही राजांचा पराभव केला. यानें तीस वर्षें राज्य केलें. याचे कित्येक लेख मिळाले असून त्यांपैकीं दोन किलहॉर्ननें याच्या नांवावर दिले आहेत. याचा इ. स. १०५८ चा लेख गद्यांत असून फारच संकलित आहे. या लेखांत याचा राज्याभिषेक काळ इतका निश्चित दिला आहे कीं, वर्ष, महिना सांगितला आहे इतकेंच नव्हे तर चंद्राचें नक्षत्र व बरोबर लग्नहि दिलें आहे. हा

कलिंगनगराहून प्रसिद्ध झाला आहे. गंजाम जिल्ह्यांतील पार्लाकिमेडी तालुक्यांतील मुखलिंगम् हें गांव समुद्र किनाऱ्यापासून कांहीं मैलावर असून तेंच कलिंगनगर होय असें आतां निश्चित झालें आहे.

वज्रहस्तामागून त्याचा मुलगा राजराज इ. स. १०५८त गादीवर आला. यानें आठ वर्षें राज्य केलें. याचा पुत्र अनंतवर्मन् याच्या एका लेखांत (इं. ऍं १८ पा.१६६) असें सांगितलें आहे कीं, यानें वेंगीच्या विजयादित्यास चोल राजाविरुद्ध मदत केली. आणि उत्कलाच्या राजासहि (बहुधा सेन राजाविरुद्ध) मदत केली. प्राच्य चालुक्यांचा इतिहास भा. १ पा. २३४ यांत सांगितलेला आहे, त्यावरून विजयादित्य* इ. स. १०६३ पासून इ. स. १०७८ पर्यंत राज्य करीत होता, त्याच्यापूर्वीं २७ वर्षांचें अराजक होतें असें सांगितलें आहे. या अराजकामुळें कलिंगाच्या प्राच्य गंगांस स्वतंत्र होण्यास संधि मिळाली. राजराजाचा एक ब्राह्मण मांडलिक वनराज याच्या लेखांत (ए. इ. ४ पा. ३१४) असें म्हटलें आहे कीं, वनराजानें चोलाशीं प्रथम युद्ध केलें (कदाचित् विजयादित्यास मदतीस गेलें असतां). नंतर त्यानें वेंगी जिंकून ती लुटली, आणि दानार्णवास ठार केलें. हा लेख इ. स. १०७५ चा आहे. अर्थात् राजराज इ. स. १०७६ पर्यंत राज्य करीत होता.

राजराजाची राणी प्रसिद्ध चोल राजा राजेंद्र याची मुलगी रूपसुंदरी होती. तथापि यामुळें वेंगीचें रक्षण करण्याकरितां चोलाशीं लढण्याचें त्यानें सोडलें नाहीं. राजराज आणि रूपसुंदरी यांचा पुत्र अनंतवर्मन् हा प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें या कुलांतील सर्वांत बलिष्ठ राजा होता. याचे अनेक लेख सांपडले आहेत. (किल्हॉर्ननें

*येथे मागील भागांत चुकीनें विजयादित्या ऐवजी विक्रमादित्य पडलें आहे.

आपल्या वंशावळींत ए. इं. मध्यें याच्या नांवावर चार लेख दिले आहेत) इ. स. १०८१ चा पूर्वोल्लिखित (इ. एं. १८ पा. १६५) लेख फारच विस्तृत आहे. यांत राजराजानें द्रामिल (चोल) याशीं युद्ध करून विजयादित्याचें रक्षण केलें असें सांगितलें आहे. अनंतवर्मन् यानेंहि स्वतः उत्कल राज्यास पश्चिमेस मदत दिली आणि वेंगीस पूर्वेस दिली; व या रीतीनें दोन दिशांस दोन जयस्तंभ उभे केले. चोलानीं कलिंगाला जिंकलें असें आपल्या लेखांत लिहिलें आहे; पण तें ठीक दिसत नाहीं. अनंतवर्मन्चे अधिक प्रसिद्ध नांव चोलगंग आहे; याचें कारण आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे. याचें राज्याभिषेक-वर्ष इ. स. १०७६ दिलें असून त्याचा नक्की शुभमुहूर्तहि दिला आहे. यानिमित्त त्यानें एक दानहि केलें (इं. ए. १८ पा. १६३). याचे आणखी तीन लेख इ. स. १०८१ ११८८ आणि इ. स. ११३५ इ. ए. १८ मध्येंच छापिलें आहेत. यापैकीं एकांत राजराजेश्वर नांवाचें त्याच्या पित्यानें बांधलेलें एक शिवालय होतें त्यास यानें गांवदान दिला आहे.

बंगाल J. R. A. S. ६५ भा. १ पा. २४० यावर एक लांबलचक ताम्रलेख याचा प्रसिद्ध झाला आहे. त्यांत यानें उत्कल अथवा ओरिसा जिंकून आपल्या राज्यांत सामील केल्याचें व तेणेंकरून भूमि, द्रव्य, हजार हत्ती, दहा हजार घोडे उत्कलरूपी समुद्र मंथन करून यास मिळाले असें लिहिलें आहे.* यावरून असें ठरतें कीं, ओरिसांत केसरी घराण्याचा अंत यावेळीं झाला. जगन्नाथाचें प्रसिद्ध देवालय चोलगंगानें बांधिलें असेंहि यांत लिहिलेलें आहे. "जो जगन्नाथ सर्व जगाचा उत्पत्तिकर्ता आणि सर्वजग

---

*निर्मथ्योत्कलसिन्धुरापमपरं गंगेश्वरः प्रसवनेकः कीर्तिसुधाकरं तथा लक्ष्मीं घरण्यासमम् । मात्यद्दन्तिसहस्रमश्वनियुतं रत्नान्यसंख्यानि वै । तं सिन्धोः किमियं प्रकर्षमथवा भूयस्तदुन्माथिना ॥

व्यापून राहणारा तो या सुंदर देवळांत येऊन राहिला आणि लक्ष्मीहि रत्नाकराचें घर सोडून येथें आनंदानें राहिली " असें २८ व्या श्लोकांत या देवळाचें काव्यमय वर्णन केलें आहे. चोडगंग आपल्यास परमवैष्णव लेखांत म्हणवितो; यावरून या कुलाचें दैवत बदलून विष्णुभक्ति या कुलांत या वेळीं सुरू झाली. विष्णुभक्ति यावेळीं कलिंग, उत्कल आणि वंग येथें प्रचलीत होऊन लक्ष्मणसेन हा वंगांत परमवैष्णव राजा झाला. धर्मविषयक प्रकरणांत वैष्णव मताचा उदय व प्रसार याविषयीं विस्तारानें लिहूं.

या एकशे सात लांब वृत्तांच्या श्लोकांच्या लेखांत ( शिवाय शेवटीं गद्यभाग आहेच ) चोडगंगाची फारच स्तुति केलेली आहे. यानें एका मंदार राजाचा पराभव करून त्याची राजधानी उध्वस्त केली आणि तो गंगेपलीकडे पळून गेला असें वर्णन यांत आहे. हा राजा कोण आणि मंदार कोठें आहे हें कळत नाहीं. चोडगंगानें पुष्कळ वर्षे राज्य केलें. या लेखांत सत्तर वर्षे राज्य केलें असें लिहिलें आहे. पण याचा पुत्र कामार्णव याचा राज्याभिषेक काळ १०६४ शक म्हणजे ११४२ इसवी दिला आहे. या पुत्रानें दहा वर्षेच राज्य केलें. दीर्घ राज्यानंतर हा गादीवर आल्यानें त्यानें थोडीं वर्षे राज्य केलें हें साहजिक झालें. कारण गादीवर बसतांनाच तो वयानें मोठा असावा. इ. स. ११५२ त याचा सावत्रभाऊ राघव गादीवर बसला, त्यानें पंधरा वर्षे राज्य केलें. त्याच्यानंतर चोडगंगाचा तिसरा पुत्र राजराज हा इ. स. ११६७ त गादीवर आला. त्यावेळेस तो बहुधा वयानें लहान होता. त्यानें पंचवीस वर्षे राज्य केलें. त्याच्या मागून ११९२ त चोडगंगाचा चौथा पुत्र अनियंकभीम राज्यावर आला. या सर्व राजांची स्तुति या दीर्घ लेखांत ( बंगाल ६५ भा. २ ) नेहमींचीच आहे; व शत्रूंचे पराभव यानीं केलें इतकेंच वर्णिलें आहे. पण यांचे राज्याभिषेक काळ शुभमुहूर्तयुक्त दिलेले नाहींत. यावरून असें दिसतें

कीं, त्यांच्या कारकीर्दी महत्त्वाच्या झाल्या नाहींत. अनियंक ऊर्फ अनंगभीम यानें सहजच दहा वर्षे राज्य केलें. ओरिसा यावेळीं गंगाच्या पूर्णपणें ताब्यांत होता. कारण एका चंद्रवंशी गौतमगोत्री ओरिसाच्या क्षत्रिय मांडलिकानें ( त्याचें नांव स्वप्नेश्वर होतें. ) अनियंकभीमातर्फे कित्येक लढाया जिंकल्या आणि त्याच्या कारकीर्दींत ओरिसांत स्वप्नेश्वर मेघवाहन नांवाचें शिव देवालय बांधलें आणि तेथें एक प्रशस्ति कोरविली. ( बंगाल J. R. A. S. ६१ पा. १८ )

अनियंकभीमामागून इ. स. १२०२ मध्यें त्याचा पुत्र राजराज गादीवर आला. त्यानें सतरा वर्षें राज्य केलें. या प्रकरणांत आम्ही या राजराजापर्यंतच इतिहास देतो. तथापि त्याच्यानंतर कित्येक राजे दोन शतकेंपर्यंत राज्य करीत होते. या वंशाचा शेवटचा लेख नरसिंव्हाचा आहे.तो १३८४चा पूर्वोक्त बंगाल ६५ भा.२ पा.२६० चा जो दीर्घ लेख आम्ही सांगितला आहे तोच होय. या घराण्याचा कसा व केव्हां अंत झाला हें सांगता येत नाहीं. परंतु पुढील एका भागांत सांगितल्याप्रमाणें बहामनी राजांच्या वेळीं या प्रदेशावर दुसऱ्या एका राजवंशाची सत्ता कायम झाली.

या वंशाविषयीं कांहीं सामान्य माहिती देऊं. गंगांचें हें कुल चंद्रवंशी होतें. आणि त्यांच्या लेखांत प्राच्य चालुक्यांच्या लेखांच्या अनुकरणानें चंद्रापासून वंशावळ दिलेली असते. ययातीचा पुत्र तुर्वसु, त्याचा पुत्र गांगेय, असें यांत म्हटलें आहे. यदु आणि तुर्वसु या दोघांचा उल्लेख ऋग्वेदांत आलेला आहे (भा. २ पा. ४३४). परंतु हे तुर्वसु नष्ट झाले आणि पांचालांत सामील झाले असे वेदांत म्हटलें आहे. तेव्हां गंगांच्या लेखांत तुर्वसु अपुत्र असल्यानें गंगेला प्रसन्न करून त्यानें पुत्र मिळविला ही कथा कोंठून आली ? चोल, पांड्य, केरल आणि कोल हे दाक्षिणेकडील राजवंश हरिवंशातहि तुर्वसूचे वंशज म्हणून सांगितले आहेत. आणि पृथ्वीच्या वाटणींत

यतातीनें त्यास आग्नेय दिशा दिली असें म्हटलें आहे. चोल, पांड्य वगैरे फार प्राचीन राज्यें आहेत. पण ते यादवांपासून आपली उत्पत्ति मानीत नाहींत यावरून ते महाराष्ट्रीय आर्यांहून भिन्न आहेत. गंगहि आपली उत्पत्ति तुर्वसूपासून आपल्या लेखांत माननात. तेव्हां ते दाक्षिणच्या हिंदुस्थान मिश्र आर्यशाखेपैकीं आहेत. तथापि हे गंग पूर्णपणें हिंदु व वैदिकधर्माभिमानी होते. ते पूर्वी शिवपूजक होते. आंध्रांत शैव मताचा पुरस्कार त्यानीं केला. आंध्र अद्यापहि मुख्यत्वें शैव आहे. अलीकडचे राजे मात्र वैष्णव झाले. ह्या परिणाम ओरिसा-मधून आलेल्या धर्ममताच्या पगड्याचा असावा. ओरिसाहि प्रथम शैव होतें, पण ह्या कालविभागांत तें वैष्णव मताचें माहेरघर झालें.

हे राजे इतर देशांतील यावेळच्या राजांप्रमाणें स्वतः विद्वान् असून विद्वानांचे आश्रयदाते होते. या राजदरबारांत असलेल्या प्रसिद्ध संस्कृत विद्वानांचीं नांवें अद्याप मिळालेलीं नाहींत. तथापि राजराज आणि अनंतवर्मन् चोडगंग यांची लेखांत जी स्तुति या बाबतींत सांपडते ती खरी मानण्यास हरकत नाहीं. राजराजाच्या मुखांत ‘ श्री आणि सरस्वती दोनी वसत होत्या. ’ तसेंच ‘ चोडगंग वेदांत आणि शास्त्रांत किंबहुना शिल्प व इतर ललितकलामध्यें निष्णात होता. जणूं काय लहानपणीं खुद्द सरस्वती त्याची दायी होती ”* त्याचें स्थापत्यशास्त्रांतील प्रावीण्य जगन्नाथाच्या देवालयानें अजरामर झालें आहे. या तऱ्हेनें माळव्याच्या भोजाचा तो खरा अनुयायी

---

*धात्री तस्य सरस्वतीसमभवत्प्रूनं नचेत्पीतवान् ।
तत्सारस्वतमार्यबालकतमः श्रीचोडगंगेश्वरः ॥
ताग्दवेदमतिः कथं निपुणता शास्त्रेषु तादृक्कथम् ।
तादृक्काव्यकृतिः कथं परिणतिः शिल्पेषु तादृक्कथम् ॥
(J. R. A. S. बंगाल ६५ पा. ३३१)

होता. या गंगांच्या काळीं तेलगु भाषेस आणखी उन्नति मिळाली. राजराजाच्या एका लेखांत तेलगूचा प्रत्यक्ष उपयोग सांपडतो. (ए. इं ४ पा. ३१४ ) या गंगांचें लांछन नंदी होतें.

## ओरिसा.

हें प्रकरण संपवितांना आम्ही ओरिसाचा थोडासा इतिहास देतों. कारण या कालविभागांत ओरिसा त्रिकलिंगाचाच एक भाग झाला. ओड् आणि पौंड् अतिप्राचीन काळीं द्रविड म्हणजे अनार्यवंशीं होते. अद्यापहि हें शबरांचें स्थान आहे. तसेंच खोंड, भूर्य आणि हमय ह्याहि द्रविड जाति येथें आहेत. ह्यालाच उत्कल आणि मेकल म्हणतात ( कटक गॅझेटियर पा. १७ ). आर्यांची येथें लौकरच वसती झाली. पण पुढें येथील ब्राह्मण व क्षत्रिय येथें बौद्ध–कालांत धर्महीन झाले. केसरींच्या राज्यकाळीं नवीन ब्राह्मण व क्षत्रिय येथें आले व त्यानीं अशोकानें चालू केलेल्या बुद्ध-पूजेऐवजीं शिवपूजा प्रस्थापित केली. या केसरीराजांचा इतिहास भा. १ प्रकरण १२ यांत दिला आहे. त्यांनीं आठव्या शतकापासून बाराव्या शतकापर्यंत राज्य केलें. कित्येकांचें असें मत आहे कीं, केसरी राजांचे कोणतेहि लेख अद्याप सांपडले नसल्यानें यांच्या अस्तित्वाबद्दल शंका आहे. परंतु कटक गॅझेटियरमध्यें असें म्हटलें आहे कीं अशी शंका घेण्याची आतां आवश्यकता नाहीं. कारण उद्योत केसरींचे दोन लेख हल्लीं मिळालेले आहेत. एक खंडगिरीच्या टेकड्यांतील एका गुहेंत आणि दुसरा भुवनेश्वर येथील ब्रम्हेश्वराच्या देवळांत. एम्. सिल्व्हन् लेव्ही यानीं असेंहि दाखविलें आहे कीं, एका बौद्धसूत्राच्या जपानी भाषान्तरांत बौद्धसंन्यासी भाषांतरकारानें इ. स. ७९६ त उत्कलाच्या राजाकडून जपानच्या बादशाहाकडे आपण आलों आणि या राजांचें नांव परम–माहेश्वर महाराज शुभकेसरी असें होतें असें म्हटलें आहे.

(कटक गॅझेटियर पा. २२). या गोष्टी या गॅझेटियरनें नवीन दिल्या आहेत, आणि त्या भाग १ यांत दिलेल्या माहितीशिवाय आणखी आपल्यास अलीकडे मिळाल्या आहेत; यामुळें इतिहासाच्या पूर्ततेसाठीं येथें आम्हीं त्या देतों. केसरी राजांनीं भुवनेश्वर येथें बांधलेल्या अनेक देवालयांचें विस्तृत वर्णनहि या गॅझेटियरमध्यें दिलेलें आहे. ही प्रचंड देवालयें त्यावेळच्या उत्तम शिल्पज्ञानाची आणि केसरी राजांच्या ऐश्वर्याची साक्ष पटवितात.

चोलांच्या लेखांवरून आपल्यास असें कळतें कीं, राजेद्रानें ओरिसा इ. स. १०२१ त जिंकला; परंतु हें जिंकणें कायमचें नव्हतें. यानंतर प्राच्य गंग उदयास आले, त्यांनीं मात्र ओरिसा जिंकून कायमचा आपल्या राज्यास जोडला. चोडगंगाचा इ. स. १११८चा एक लेख असें सांगतों कीं, तो ओरिसाचा पूर्ण मालक होता. जगन्नाथाचें हल्लींचें प्रसिद्ध देवालय पूर्वी सांगितल्याप्रमाणें त्यानें बांधिलें (सुमारें ११५० इसवी). त्यानें जयपूर येथें आणखी एक देवालय बांधून त्यांस आपलें नांव गंगेश्वर दिलें. चोडगंगाचा पुत्र राघव याचा पराभव बंगालच्या विजयसेनानें केला (पूर्वोक्त गॅझेटियर पा. २४). पण हाच राघव तो होय याविषयीं शंका आहे. कारण ह्या राघवाचा राज्यकाल इ. स. ११५६ पासून ११७० पर्यंतचा आहे. विजयसेनाचा राज्यकाल इतक्या अलीकडे येऊं शकत नाहीं. भुवनेश्वर येथें मेघेश्वर नांवाचे प्रचंड देवालय याच्या पुढचा राजा अनियंक भीम याच्या मेहुण्यानें बांधलेलें आम्ही पूर्वी उल्लेखिलेंच आहे (११९३ आणि ११९८).

बंगालच्या म्हणजे लखनौतीच्या सुलतानांनीं ओरिसावर कित्येक स्वाऱ्या केल्या. आणि कटक जिल्ह्यांतील चाटेश्वर येथील एका जगन्नाथाच्या देवळांत एक लेख आहे, त्यांत विष्णु, भीमाचा एक ब्राह्मण प्रधान, यानें यवनाशीं लढाई देऊन त्यास परास्त केलें असें

वर्णन आहे. तबकात व इतर मुसलमानी इतिहास ओरिसांत झालेल्या मुसलमानांच्या अनेक स्वाऱ्यांचें वर्णन देतात, व दिल्लीच्या फिरोज तघलकानेंहि ओरिसावर स्वारी केल्याचें सांगतात. विजयानगरचे राजे आणि बहामनी राजे यानीं ओरिसावर व तेथील गजपति राजांवर स्वाऱ्या केल्या. शेवटीं १४३५त शेवटला गंगराजा मेल्यावर त्याचा प्रधान कपिलेंद्रदेव यानें, बहामनी सुलतान दुसरा आदिलशाहा याच्या मदतीनें, हें राज्य बळकाविलें आणि येथें नवीन सूर्यवंशी राजघराणें स्थापन केलें ( कटक गॅ. पा. २५ ).

## त्रिकालिंगच्या प्राच्य गंगाची वंशावळ.

वज्रहस्त पाहिला रा. ३५ वर्षें ( 984–१०१९ )
|
मधुकामार्णव रा. १९ व. ( १११९–१०३७ )
|
१ वज्रहस्त दुसरा रा. ३० वर्षें (१०३८–१०६८) ले. १०५८
|
२ राजराज रा. ८ वर्षें ( १०६८–१०७६ )
राणी राजेंद्र चेलाची कन्या राजसुंदरी
|
३ अनंतवर्मन् चोड गंग रा. ७० (१०७६–११४२ )
प्रसिद्ध जगन्नाथ देऊळ बांधणारा

| | | | |
|---|---|---|---|
| ४ कामार्णव १० वर्षें (११४२-११५२) | ५ राघव रा. १५ वर्षें (११५२-११६६) | ६ राजराज १५ वर्षें (११६७-११८२) | ७ अनियंकभीम रा. १० वर्षें (११८२-११९२) |

|
८ राजराज रा. वर्षें १७ (११९२-१२०९)

# प्रकरण चौदावें.

## तंजावरचे चोल.

हा एक इतिहासांतील ध्यानांत घेण्यासारखा चमत्कार आहे कीं, ारतवर्षाच्या निरनिराळ्या भागांत पराक्रमी राजे बहुतेक एकाच ेळीं होऊन मध्ययुगीन भारत इतिहासाच्या या कालविभागाच्या प्रारंभीं यानीं नवीं राज्यें स्थापन केलीं, किंवा जुन्या राववंशास नव्या वैभ-ास चढविलें.( कदाचित् दुर्दैवानें मध्यदेश अथवा कनोज यास अप-ाद झाला ). याप्रमाणें मूळराजानें गुजराथेंत इ. स. ९७४ इस-ींत चालुक्य वंश नवीन स्थापन केला; मुंज परमारानें माळव्यांत ाच सुमारास परमारवंशास कीर्तीस चढविलें. तैलप चालुक्यानें उत्तर चालुक्य वंश दाक्षिणेंत इ. स. ९७७ त स्थापन केला. उत्तरेस ाझनीस याचवेळीं सबुकत्गीनानें तुर्की राजवंश स्थापिला, तर ्क्षिण हिंदुस्थानांत चोलराजा राजराज यानें चोलांच्या वंशास वैभ-ास इ. स. ९८५ त चढविलें. आणि पूर्वेस महीपालानें मोडलेल्या ालसत्तेस इ. स. ९८०त पुन्हां स्थिर केलें. ( धंगानें बुंदेलखंडाची ीर्ति सबुक्तगीनाशीं झालेल्या इ. स. ९८० तील लढाईंत पर-ोच्चास पोहोंचविली ). तात्पर्य १० व्या शतकाच्या चौथ्या पादांत हुतेक एकाच वेळीं झालेले हे निरनिराळे पराक्रमी व महत्त्वाकांक्षी ाजे एक अनुमान सुचवितात. पण तें इतिहासाच्या मर्यादेच्या ाहेर आहे. म्हणून त्याची चर्चा आम्हीं येथें करीत बसत नाहीं.

या पराक्रमी पुरुषापैकीं राजराज चोल हा कमी दर्जाचा नव्हता. ो आदित्यचोलाच्या मागून गादीवर आला. आदित्यचोलानेंच ल्लव सत्तेपासून चोलवंशास मुक्त करून अधिकारास चढविलें होतें. ाजराज पहिला यानें आपल्या पराक्रमानें व उद्योगानें दक्षिण हिंदु-

स्थान–यास तामलिभू म्हणतां येईल–साम्राज्यपदास चढविलें. चोलांनीं साम्राज्यैश्वर्य एक शतकपर्यंत दक्षिणहिंदुस्थानांत नव्हे, तर उत्तरेकडेहि भोगिलें. या चोल राज्याचा इतिहास या भागांतील कालविभागांत बरोबर पडत असून तो श्री. के. व्ही. सुब्रह्मण्य ऐय्यर यानीं चांगला सांगितला आहे; व डॉ. स्मिथनेंहि आपल्या हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत दिला आहे. या दोन ग्रंथकारावरून पुढील संक्षिप्त हकीकत आपल्या कांहीं अधिक विधानांसह आम्हीं देतों. याचें मुख्य कारण असें कीं, या चोल राजांचे लेख अनेक आहेत इतकेंच नव्हे तर ते सर्व तामील व कानडी भाषेंत आहेत यामुळें ते प्रत्यक्ष आम्हांस तपासतां येत नाहींत.

दक्षिण हिंदुस्थान म्हणजे तामील प्रदेश हा हवा,जमीन-उत्पन्न, लोक आणि भाषा या दृष्टीनें भरतखंडाचा अगदीं स्वतंत्र भाग पडतो. प्राचीन संस्कृत ग्रंथांत यास द्रविड देश म्हटलें आहे. ( कोरींव लेखांत यास द्रमिल असाहि शब्द लाविलेला आहे ). ज्याप्रमाणें पंजाबचे लोक प्राधान्यानें आर्यवंशी आहेत, त्याप्रमाणें येथील लोक प्राधान्यानें द्रविडवंशी आहेत. तथापि अतिशय प्राचीनकाळीं सुद्धां येथील तामिल संस्कृति उच्च होती. यामुळें आर्य जातीचे बाहेरून येथें आलेले लोक थोडे असल्यानें भाषा आणि वंश याहि दृष्टीनें द्रविडी झाले. चोल, पांड्य आणि केरल हे येथील तीन राजवंश महाभारतांत व हरिवंशांतहि प्रसिद्ध आहेत. ययातीचा पुत्र तुर्वसु याच्या वंशांत हे झाले असें हरिवंशांत सांगितलें आहे. हा देश अतिशय सुपीक पण गरम आहे. पूर्वेकडे सपाट आणि पश्चिमेकडे डोंगराळ आहे. येथील उत्पत्तीच्या वस्तु अगदीं विशिष्ट ( अनन्य ) आहेत. म्हणजे मोतीं, मिरीं आणि लसण्या ( रत्न ) हीं येथेंच उत्पन्न होत असल्यानें येथें प्राचीन काळापासून पाश्चात्य रोमन साम्राज्यांतील सोनें प्रभूतत्त्वानें येत असे ( स्मिथ ). आम्ही

आणखी एक चौथी वस्तु यांत सामील करतों. ती कार्पास वस्त्र होय. महाभारतकाळीं सुद्धां सूक्ष्म कार्पास वस्त्राबद्दल तामिल देशाची प्रसिद्धि होती. राजसूय यज्ञाच्या ( साम्राज्याभिषेकाच्या ) वेळीं युधिष्ठिराला चोल व पांड्य राजांनीं सूक्ष्मकार्पास वस्त्रें नजर केली असें महाभारतांत वर्णन आहे. तात्पर्य, तामिल प्रदेश नेहमीं समृद्ध असे; आणि प्राचीन काळापासून आर्य बौद्ध व जैन धर्म या देशांत चढाओढीसाठीं प्रयत्न करीत. हीच धार्मिक विशिष्ट चढाओढ व हाच द्वेष याहि काळांत या देशांत आपल्यास दृष्टीस पडतो. याचें वर्णन पुढील एका प्रकरणांत येईल. ही चढाओढ अद्यापहि चालू आहे.

या द्राविडांच्या प्राचीन देशांत आणि चोलांच्या प्राचीन वंशांत इ. स. ९८५त पहिला राजराज गादीवर आला. सर्व महत्त्वाकांक्षी राजांप्रमाणें त्यानें प्रथम एक जोरदार सैन्य तयार करण्याकडे लक्ष दिलें. आणि नंतर त्या सैन्याच्या जोरावर त्यानें आपलें राज्य वाढविलें. वेल्लाकुरी म्हणजे तद्देशीय धनुर्धारी भिल्ल यांस त्यानें शिवाजीनें जसे मावळे तयार केलें त्याप्रमाणें तयार केलें व त्यांच्या अनेक पलटणीस आपल्या निरनिराळ्या बिरुदांचीं नांवें दिलीं ( ऐय्यंगरचा प्राचीन दक्षिणापथाचा इतिहास पा. २४५ ). त्यानें हत्तींचें पथक तयार केलें आणि पायदळहि तयार केलें. यांत बहुधा तेलंग्यांची भरती असे. महमुदाप्रमाणें यानेंहि एक निवडक शरीररक्षकांचें पथक तयार केलें. हा तंजावर येथें राज्य करीत होता. येथून तिन्ही दिशांस त्यानें आपलें राज्य वाढविलें. दाक्षिणेस पांड्य, पश्चिमेस केरळ आणि उत्तरेस पल्लव राजांस त्यानें जिंकलें. पश्चिम किनाऱ्यावरील चेरांच्या जहाजांचें आरमार त्यानें बुडविलें. या विजयापासून सोनें, चांदी, मोतीं या रूपानें त्यास अतिशय लूट मिळाली. ही गोष्ट असंभवनीय नाहीं. त्यानें गंगवाडी, कुडमलै ( कुर्ग ), नोलंबवाडी, ( बल्लारी ) आणि पूर्व चालुक्यांचें वेंगी जिंकून कलिंगाहि जिंकलें. या जिंक-

ाचा अर्थ त्यानें हीं राज्यें खालसा केलीं असा नव्हे, त्यानें या राजांस केवळ मांडलिक बनविलें. याप्रमाणें शक्तिवर्मन् यास पूर्व चालुक्यांच्या राज्यावर मांडलिक म्हणून त्यानें बसविलें. त्याच्या पुढचा राजा विमलादित्य यास त्यानें आपली मुलगी दिली ( भा. १ पा. ३१० पहा ). आणि हा संबंध विमलाचा पुत्र व नातु यानींहि चोल राजकन्या वरून चालू ठेवला. अशा प्रकारचे विवाह म्हणजे मातुलकन्यापरिणय दाक्षिणात्य लोकांतच चालू आहे. अनेक स्मृतीनीं असा विवाह निषिद्ध केला आहे. तरी श्रीकृष्ण आणि रुक्मिणी, अर्जुन आणि सुभद्रा यांच्या काळापासून असे विवाह दाक्षिणात्यांत रूढ आहेत.राजराजानें सिलोनहि जिंकलें आणि तेथून येणाऱ्या उत्पन्नाचा एक हिस्सा त्यानें यानंतर राजराजेश्वर नांवाचे शिवाचें देवालय तंजावर येथें बांधलें त्याच्या खर्चाकडे लावून दिला. या देवळानें त्याचें नांव दक्षिण हिंदुस्थानांत अजरामर झालें आहे (ऐय्यर पा. २४८). शेवटीं पाश्चात्य चालुक्य राजा सत्याश्रय याजवर त्यानें हल्ला करून त्याचा पक्का पराभव केला. या वेळेस त्याची फौज नऊ लाख होती व त्यानें पोरें, बायका, ब्राह्मण यांचीहि कत्तल केली असें अतिशयोक्तीचें वर्णन आहे. कारण असें क्रौर्य हिंदूंच्या युद्धांत केव्हांच दिसलें नाहीं. या विजयानें त्याच्या कीर्तीची आणि सत्तेची वृद्धि झाली व पुष्कळ द्रव्यहि त्याला मिळून तंजावर येथें राजराजेश्वराचें प्रचंड व सुंदर देवालय त्यास बांधतां आलें; व त्यानें आणखीहि देवालयें बांधिलीं. या वेळेच्या उत्तम कारागिरांच्या कौशल्याची हीं देवळें साक्ष पटवितात.

पण राजराज पहिला केवळ मोठा जेता किंवा मोठा बांधणारा होता असें नाहीं. तर तो मोठा राजकार्यकुशलहि होता. प्राचीन काळापासून दक्षिण हिंदुस्थान कालव्याकरितां प्रसिद्ध आहे. पण कावेरीचे जे तीन प्रचंड कालवे आहेत ते राजराज पहिला यानें

बांधले आहेत. त्यानें मोजणी करवून धाऱ्याचाहि बंदोबस्त इ. स. १०११त केला. ही सर्व्हे–सेटलमेंट इतकी बारीक आहे कीं, वेल्लीचा ( बिघ्याचा ?) १ ५२, ४२८, ८००००० इतका हिस्सा त्यांत मोजून त्याच्यावर धारा बसविला आहे (ऐय्यर पा. २४९). दक्षिण हिंदुस्थानांतील त्यावेळच्या जमाबंदी अधिकाऱ्यांची व गणित्यांची कीर्ति या मोजणीनें कायम झाली आहे. अद्यापहि तिकडील गणिती व जमाबंदी अधिकारी हे हुशार म्हणून गणले जातात. राजराजाच्या मागूनच्या राजानें इ. स. १०८६ त म्हणजे ज्यावर्षी इंग्लंडांत डूम्सडे नांवाचें मोजणी रजिस्टर तयार झालें, त्यावर्षी आपल्या राज्याची जमाबंदीकरितां मोजणी केली असें स्मिथनें म्हटलें आहे, (हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास पा. ४८६ तिसरी आवृत्ति).

राजराज हा शिवभक्त असल्यानें अप्पार वगैरे त्रेसष्ठ पुराणे शैवसंत कवि यानीं केलेलीं तामिल भाषेंतील शिवाचीं स्तुतिपर पदें त्यास फार आवडत. यानें त्यांच्या मूर्ति ह्या राजराजेश्वराच्या देवळांत बसवून ही पदें नेहमीं गाववण्याचा त्यानें बंदोबस्त केला. आपल्या आईबापांच्याहि मूर्ति या देवळांत त्यानें बसविल्या. त्याची आई सती गेली असून ही स्त्रीपुरुषें तामील देशांत पुण्य दंपत्य म्हणून अद्याप पूज्य मानलीं जातात.

शेवटली महत्त्वाची गोष्ट ही कीं, राजराज गायन आणि नर्तन यांचा पुरस्कर्ता होता आणि त्यानें अनेक कुशल नाचणाऱ्या त्याचप्रमाणें गाणारे, सनईवाले आणि मृदंगादि वाद्यें वाजविणारे बोलावून तंजावरास बसविले. याच्या वेळीं नाट्यशास्त्राचा अभ्यास विशेष झाला. आणि याच्या वेळीं मुद्दाम त्याकरितां बांधिलेल्या नर्तनशालांत गायननर्तनाचा प्रत्यक्ष अभ्यास होत असे. विद्यालयेंहि बांधलीं गेलीं आणि त्यावर विद्वान् आचार्यांची नेमणूक झाली. ते विद्यार्थ्यांस विद्यालयांतून व देवळांतूनहि वाङ्मय व शास्त्र शिकवीत (ऐय्यर पा. २५१).

राजराज अतिशय धर्मशील होता हें सांगावयास नकोच. त्यानें ब्राह्मणांस व मंदिरांस अनेक दानें दिलीं. त्याच्या राण्यानीं व अधिकाऱ्यानींहि दानें दिलीं. परंतु तुलादान त्यानें केलें तें येथें सांगण्यासारखें आहे. म्हणजे राजाचें वजन सोन्यानें करून तें ब्राह्मणांस दिलें गेलें. हें दान त्याकाळीं राजे लोकांत फार प्रिय असावें. कारण या कालविभागांतील कनोज आणि त्रिकलिंग राजांच्या लेखांतहि याचा उल्लेख पुष्कळ येतो. या ठिकाणीं आणखी एक अशी गोष्ट सांगितली आहे कीं, राजराजाची मुख्य राणी एका सुवर्णधेनूच्या उदरांतून या दानाच्या वेळीं गेली. अर्थात् ब्राह्मणांना पुष्कळच सुवर्ण मिळालें (या प्रकारच्या दानाची मात्र दुसरीकडे कोठें हकीकत किंवा कल्पना मिळणार नाहीं). ब्राह्मण म्हणजे खरे ब्राह्मण धर्माचरणांत आयुष्य घालविणारे. आणि यजन, अध्ययन, अध्यापन यांत काळ घालविणारे यांचा चरितार्थ राजानें चालविणें इष्ट आहे. तेव्हां अशा दानांनीं हल्लींचें विद्याखातें आणि धर्मखातें जीं कामें करितात, तींच पूर्वीं होत असत.

राजराजाच्या वेळची राज्यव्यवस्था फारच बारकाईची आणि सुधारलेली होती. आणि राज्यकारभाराच्या सर्व खात्यांत रजिस्टर वगैरे सर्व दप्तर चोख ठेवलें जाऊन त्याजवर तपासणी-दार ठेवलेले असत. दक्षिण हिंदुस्थानांत जी बारकाईची पंचायत गांवव्यवस्था चालू होती, तिचा उल्लेख ऐय्यरनें केला नाहीं याचें आश्चर्य वाटतें. तिचा उल्लेख डॉ. स्मिथ यानें केला आहे; आणि ती हल्लीं नष्ट झाली आहे ह्याबद्दल त्यानें दु:खोद्गारहि काढला आहे. पुढील राज्यकारभाराच्या सामान्य प्रकरणांत आम्हीं याचा जास्त उल्लेख करूं.

राजराजाच्या मागून इ. स. १०१४ त त्याचा पुत्र राजेंद्र गादीवर आला तो आपल्या बापाहूनहि (शक्य असेल तर) अधिक पराक्रमी निघाला. त्यानें पुष्कळ वर्षें म्हणजे इ. स. १०४४ पर्यंत

राज्य केलें. त्यानें पूर्वींहून अधिक विस्तृत देश जिंकले.पांड्य व केरल राजांनीं बंडें केलीं त्यांस पुनः जिंकून त्यांचे देश त्यानें खालसा केलें; व तेथें आपल्यातर्फें प्रतिनिधि नेमले. यांस चोल पांड्य व चोल केरल अशी संज्ञा होती. ( या संज्ञेवरून हे प्रतिनिधि पांड्य व केरल या हक्कदार राजाबद्दल राज्य करीत असा अर्थ होतो. ) यानें पाश्चात्य चालुक्य ( जयसिंव्ह तिसरा ) याचा पुनः पराभव केला. सिलोनच्या राजासहि यानें जिंकलें. या विजयानें उत्साह वाढून त्यानें आपला विजय गंगाकिनाऱ्यापर्यंत नेला. आणि कलिंग, वंग ( महीपाल पहिला ), इंद्ररथ ( ? ) कोसल आणि कनोजसुद्धां जिंकलें. या विजयावरून त्यानें गंगैकोंड ही पदवी धारण केली व त्रिचनापल्लीजवळ ' गंगैकोंड चोलपुरम् ' नांवाचें शहर वसविलें. त्रिचनापल्ली जिल्ह्यांत याचे अवशेष अद्याप लोक प्रशंसितात. येथें एक त्यानें प्रचंड तलाव बांधला आहे. याचा बंधारा सोळा मैल लांब आहे. शेताला पाणी देण्याकरितां त्याला योग्य ठिकाणीं मोऱ्या ठेविल्या आहेत ( स्मिथ प्राचीन इतिहास पा. ४६६ ). यानें एक मजबूत आरमारहि बांधविलें आणि बंगालचा उपसागर ओलांडून ब्रम्हदेशाचा एक भाग जिंकला. हे अनेक विजय त्याच्या कोरीव-लेखांत जरी अतिशयोक्तीनें वर्णिले आहेत, तरी याचें राज्य फार विस्तृत होतें ह्यांत शंका नाहीं. कारण अल्बेरूनीनें सुद्धां असें वर्णिलें आहे कीं, खुद्द प्रयागपासून सर्व आग्नयीचा देश ( म्हणजे हल्लींचा मद्रास इलाखा व मध्य प्रांताचा व निजामच्या राज्याचा पूर्व भाग ) चोलांच्या अमलाखालीं होता. एवढें विस्तृत राज्य फार दिवस टिकणें शक्य नव्हतें आणि त्रिकलिंग आणि चेदी यानीं इ. स. १०४० च्या सुमारास कृष्णेच्या उत्तरेस पूर्वीं सांगितल्याप्रमाणें आपली सत्ता बसविली.

राजेंद्र वीर होता आणि विद्वान्‌हि होता. कोरीव लेखांत त्याला पंडित ही पदवी लावलेली आढळते. चीनकडे त्यानें एक वकील पाठविला होता. त्यानें मोठें आरमार ठेवलें होतें हें निश्चित आहे. राजेंद्रानें उत्तर हिंदुस्थानांतून ब्राह्मण आणवून त्यांस दक्षिण हिंदुस्थानांत वसविलें. दाक्षिण व पूर्वेचे धार्मिक राजे बल्लाळसेन वगैरेंनीं ही व्यवस्था केलेली दिसते. राजेंद्राच्या वेळीं चोल साम्राज्य वैभवाच्या शिखरास पोहोंचलें. यांतील पराक्रमी पुरुषांपैकीं नेहमींप्रमाणें हा तिसरा होता.

याच्या मागून याचा पुत्र राजाधिराज गादीवर आला. हाहि बलिष्ठ राजा होता. पण मांडलिक राजांस यानें क्रूरतेनें वागविलें. सिलोन राजास यानें ठार मारविलें. एका चेर राजास हत्तींच्या पायीं दि‍ले. याबद्दल विशेष माहिती देणें आवश्यक नाहीं; पण यावरून राज्यास उतरती कळा लागली हें स्पष्ट आहे. आहवमल्ल सोमेश्वर याचा एका लढाईंत यानें पराभव केला. पण इ. स. १०५२ त झालेल्या कोप्पम् येथील दुसऱ्या लढाईंत तो स्वतः मारला गेला. तात्काळ त्याचा धाकटा भाऊ राजेंद्रदेव यास रणमैदानावरच राज्याभिषेक झाला. हिंदुस्थानच्या इतिहासांतील ही एकच लढाई आहे कीं ज्या लढाईंत राजाच्या मृत्यूनें सेनेचा पराभव झालेला नाहीं. राजेंद्रदेवानें आपल्या शौर्यानें त्या दिवसाचा हा अपघात भरून काढला आणि आहवमल्लाचा पराभव केला आणि तो तुंगभद्रेपलीकडे पळून गेला. चोलांचा आणि उत्तर चालुक्यांचा, या कालविभागांत पहिल्या कालविभागांतील ( ६००–८०० ) पल्लव व पूर्व चालुक्याप्रमाणें नेहमीं तंटा चालत असे. दोन शेजारचीं बरोबरीचीं राज्यें, फ्रान्स आणि जर्मनीप्रमाणें, एकमेकांशीं युद्ध करण्यांत आनंद मानतात. पण दोन्ही पराक्रमी असल्यास एकाचा दुसऱ्यावर जास्त काळ पगडा बसत नाहीं.

राजेंद्रदेवानें इ. स. १०५२ पासून १०६२ पर्यंत दहा वर्षें राज्य केलें. त्या मागून त्याचा भाऊ वीरराजेंद्र राजा झाला. हाहि पराक्रमी होता. नेहमींप्रमाणें पांड्य व केरळ यांशीं याचीं युद्धें झालींच. पण पाश्चात्य चालुक्याशीं याच्या तीन लढाया झाल्या. नर्मदेच्या दक्षिणेकडील भरतखंडांत चोल आणि चालुक्य हेच दोन सम्राट होते. म्हणजे महाराष्ट्र आणि मद्रास यांची तुंगभद्रा ही जरी सहाजिक सीमा होती, आणि विशेष तंट्याचें कांहीं कारण नव्हतें, तरी हे सम्राट आपसांत लढत. वीरराजेंद्राचा कांहीं वेळ जय झाला. पण इ. स.१०७०च्या लढाईंत तो मारला गेला. बेलगोळच्या जैनांवर त्यानें जुलूम केला यामुळें त्यांनीं शाप दिल्यानें तो मेला ( अय्यर पा. २६२ ) अशी समजूत होती.

ऐय्यरनें दिलेली हकीकत या राजाच्या राज्यकालाबरोबर संपते. पण बाराव्या शतकाच्या अंतापर्यंत आपल्यास चोलांचा इतिहास देणें आहे. बिल्हणानें, वीरराजेंद्रानें विक्रमांक चालुक्याला आपली मुलगी दिली असें वर्णिलेलें आहे. ही गोष्ट ऐय्यरनें सांगितली नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें. इ. स. १०७०त वीरराजेंद्राचा मृत्यू झाल्यावर त्याच्या मागून कोणी गादीवर बसावें याचा तंटा पडला आणि विक्रमांकानें जाऊन कांची येथें आपल्या बायकोचा भाऊ अधिराजेंद्र यास गादीवर बसविलें. पण तो निघून गेल्याबरोबर अधिराजेंद्राचा खून झाला. आणि पहिल्या राजेंद्राच्या मुलीचा मुलगा ( प्राच्य चालुक्य राजाचा पुत्र ) राजेंद्र चोल दुसरा राजा झाला. हा राजेंद्र लहानपणापासून चोलदरबारींच रहात होता. आणि त्यानें आपला बाप वेंगी येथें इ. स. १०६२ त मेल्यावर वेंगीवरचा आपला हक्क सोडून चुलत्यास दिला होता. राजेंद्र गंगैकोंड यानें त्यास दत्तकहि घेतलें होतें असें म्हणतात. ( पण क्षत्रियांत मुलीचा मुलगा दत्तक होत नाहीं. ) खरी गोष्ट कांहीं असो, हा योग्य रीतीनें चोलांच्या गादीवर बसला आणि

त्यानें एक नवा वंश सुरू केला. या वंशास स्मिथ चालुक्य-चोल म्हणतो. हा इ. स. १०७४ गादीवर बसला. स्मिथनें इ. स. १०७० पासून १०७४ पर्यंतचीं चार वर्षें अधिराजेंद्राचीं म्हणजे मारला गेलेल्या विक्रमांकाच्या मेहुण्याचीं धरलीं आहेत. राजेंद्रानें मोठ्या पराक्रमानें ४८ वर्षें राज्य केलें. म्हणजे १०७० पासून १११८पर्यंत राज्य केलें.याची राजधानी गंगैकोंड चोलपूर ही होती. अनन्तवर्मन् चोडगंग याचा त्यानें पराभव केला असें स्मिथनें सांगितलें आहे. हा पराभव नांवाचाच असला पाहिजे. कारण कलिंगाचा हा राजा चोडगंग फार पराक्रमी होता असें आपण पाहिलेंच आहे. या युद्धाचें वर्णन एका तामील कवीनें कलिंग तुप्परणी नांवाचे काव्यांत केलेलें आहे. ( गौरीशंकरचा टॉड पा. ४२८ आणि इं. ए. १९ ) तामिल मुलुखाचीं जमीन मोजणी व जमाबंदीं स्मिथनें सांगितलेली या राजाच्या वेळीं झालेली आहे. याचा काळ आणखी एका गोष्टीसंबंधानें महत्त्वाचा आहे. श्रीवैष्णव मताचा संस्थापक रामानुज हा याच्या राज्यकाळीं होता.याच महान् साधूच्या शापानें अधिराजेंद्र मारला गेला अशी समजूत आहे. याविषयीं आणि याच्या माताविषयीं धर्मविषयक सामान्य प्रकरणांत आम्हास अधिक लिहावयाचें आहे. येथें येवढेंच सांगणें आहे कीं, शैवमत आणि वैष्णवमत यांमधील मोठा तंटा यावेळीं सुरू झाला. तेव्हांपासून या तंटयानें हिंदुधर्माची दुर्दशा केली व पूर्वींच्या शतकांत जी एकी हिंदुधर्मांत होती, ती ह्यापुढें कायमची नष्ट झाली.

राजेंद्र दुसरा यानें कुलोत्तुंग ही नवीन पदवी धारण केली. याच्या मागून इ. स. १११८त विक्रमचोल राज्यावर आला. तोहि पराक्रमी होता. त्याचे चालुक्य, पांड्य, कलिंग इत्यादि कुलक्रमागत शत्रूंशीं युद्धप्रसंग झाले आणि याच्या पराक्रमाचेंहि वर्णन एका स्वतंत्र काव्यांत केलेलें आहे. ( इं. ए. २२ पा. १४२ ).

याच्या मागून इ. स. ११३५ त दुसरा कुलोत्तंग गादीवर आला. त्यानें अकरा वर्षें राज्य केलें. त्या मागून इ. स. ११४५त त्याचा पुत्र राजराज दुसरा गादीवर बसला. त्यानें १९ वर्षें राज्य केलें. इ. स. ११६५ पासून इ. स. १२६७ पर्यंत आणखी चार राजे झाले; राजाधिराज ( ११७२ ), कुलोत्तंग (तिसरा) (११७८) राजराज तिसरा ( ११९०) आणि राजेंद्र चोड तिसरा (१२१६). शेवटीं चोलांची सत्ता पांड्य राजा जटावर्मन् सुंदर पांड्य यानें नष्ट केली. दक्षिण हिंदुस्थानचे मुसलमानानीं मलिक काफूर, अल्लाउद्दीन खिलजी याचा सेनापति, याच्या वेळीं इ. स. १३१० ते १३११ पर्यंत केलेलें शेवटचें निर्मूलन प्रसिद्ध आहे.

या चोल राजांविषयीं कांहीं सामान्य विधानें करण्यासारखीं आहेत. चोल आपल्यास शिबीच्या कुळांत जन्मलेले सूर्यवंशी क्षत्रिय लेखांनीं दाखवितात; परंतु पूर्वीं सांगितल्याप्रमाणें चोल, पांड्य, केरळ, व कोल हे चंद्रवशांत तुर्वसुपासून उत्पन्न झाल्याचें हरिवंशांत सांगितलें आहे. हे राजे शिवभक्त होते; आणि चोलांच्या पहिल्या वंशाच्या शेवटीं दुर्दैवानें ते जास्त धर्मभोळे झाले आणि हिंदुराजांची परमतासहिष्णु नेहमींची वृत्ति सोडून त्यांनीं आपल्या सत्तेचा उपयोग जैन धर्म व वैष्णव मत दाबून टाकण्याकडे केला, ही मोठी त्यांनीं चूक केली. हा विषय पुढें विस्तारानें येईलच. चोलांचें ध्वजचिन्ह व्याघ्र होतें. या राजांनीं पुष्कळ सोन्या–चांदीचीं नाणीं पाडलीं; तीं हल्लीं उपलब्ध आहेत.

## तंजावरच्या चोलांची वंशावळ.

( गौरीशंकरचा टॉड पा. ४२५—४२६ )

परांतक
|
आदित्यवर्मन्
|
१ राजराज ( ९८५--१०१२ )
| (कन्या) कुमारदेवी-लग्न विनयादित्य चालुक्य वेंगीच.
२ राजेंद्र ( १०१२–१०१८ )
| (कन्या) राजराज-लग्न-अम्मगा

३ राजाधिराज ( १०१८–१०५२ ) — ४ राजेंद्रदेव ( १०५२–१०६२ )
|
५ वीरराजेंद्र ( १०६२–१०७२ )
|
६ अधिराजेंद्र १०७२ त खून झाला.
|
७ राजेंद्रकुलोत्तुंग ( १०७०–१११८ )
|
८ विक्रमचोड ( १११८–११३५ )
|
९ कुलोत्तुंग दुसरा ( ११३५--११४६ )
|
१० राजराज तिसरा ( ११४६--११६५ )
|
अराजक कांहीं काळ
|
११ राजाधिराज दुसरा वगैरे ११७२

# प्रकरण पंधरावें.

## दक्षिणेंतील महत्वाचीं मांडलिक राजघराणीं.

नर्मदेच्या दक्षिणेस दोन मोठीं राज्यें किंबहुना साम्राज्यें होतीं; पाश्चात्य चालुक्यांचें महाराष्ट्र कर्नाटकांतील व दक्षिण हिंदुस्थानांतील चोलांचें वर्णन येथवर झालें. त्याचप्रमाणें पश्चिम किनाऱ्यावर शिलाहारांचें एक स्वतंत्र राज्य होतें. आणि पूर्व किनाऱ्यावर त्रिकलिंगाच्या प्राच्यगंगांचें राज्य होतें; यांचींही वर्णनें झालीं. ह्या महत्त्वाच्या राज्याशिवाय हिंदु इतिहासाच्या तिसऱ्या कालविभागांत (इ. स. १००० ते १२०० ) कांहीं महत्त्वाचीं मांडलिक राज्यें होतीं. तीं बाराव्या नंतर तेराव्या शतकांत ज्यास्त बलवान् होऊन स्वतंत्रहि झालीं. त्यांचे कित्येक कोरीव लेख सांपडलेहि आहेत. त्यांचा तेराव्या शतकाचा इतिहास या पुस्तकाच्या मर्यादेच्या बाहेर आहे, तरी त्यांचा प्रारंभींचा मांडलिकी इतिहास या भागांत देणें जरूर आहे. दक्षिण हिंदुस्थानचा उच्छेद चौदाव्या शतकाच्या आरंभीं अल्लाउद्दीन खिलजी आणि त्याचा सेनापति यानें केलेला इतका महत्त्वाचा आहे कीं, त्याकरतां एक स्वतंत्र भाग करावा लागेल. पण हीं उच्छेद केलेलीं राज्यें बाराव्या शतकांत मांडलिक स्वरूपाचीं होतीं, तरी त्यांचा इतिहास या कारणानें महत्त्वाचा असल्यानें या भागांत देणें जरूर आहे आणि तो आम्ही या पुढील प्रकरणांत देतों.

या प्रकारचें पहिलें महत्त्वाचें राज्य म्हटलें म्हणजे देवगिरी (दौलताबाद ) येथील यादवांचें होय. हेमाद्रीनें यांची विस्तृत प्रशस्ति लिहिली आहे, त्यावरून या कुलाचा संस्थापक दृढप्रहार यानें नाशिक जिल्ह्यांतील चंद्रपुरी अथवा चांदोड येथें इ. स.

८४३च्या सुमारें एक लहान राज्य स्थापिलें, ( गौरीशंकराचा टॉड आणि बॉंबे गॅझेटियर भा. १ छेद १ ). याच्या वंशजांपैकीं भिल्लम दुसरा कल्याणच्या चालुक्य तैलपाचा बलवान् मांडलिक होता माळव्याच्या मुंजाबरोबर झालेल्या तैलपाच्या युद्धांत हा मोठ्या शौर्यानें लढला. यांत मुंज कैद झाला हें पूर्वीं सांगितलेंच आहे. भिल्लमाचा एक लेख इ. स. १०००चा सांपडला आहे. याच्या मागून त्याचा पुत्र वेसुगी आणि त्याच्यामागून त्याचा पुत्र भिल्लम तिसरा राजा झाला. चालुक्य जयसिंह तिसरा याची कन्या त्याची राणी होती आणि मांडलिकी नात्यानें त्याच्या अनेक लढायांत यानें भाग घेतला. या मागून तीन राजे झाल्यानंतर सेडणचंद्र गादीवर आला. हेमचंद्राच्या प्रशस्तींत असें लिहिलें आहे कीं, परमाडी विक्रमादित्य चालुक्य यास कल्याणची गादी मिळविण्यास त्यानें मदत केली. इ. स. १०६९ चा एक लेख सांपडला आहे. सात राजे आणखी झाल्यानंतर अपर गांगेयाचा पुत्र भिल्लम चौथा यानें स्वातंत्र्य धारण केलें. सोमेश्वर चालुक्य कल्याण येथें कलचुरी राजांच्या बंडामुळें दक्षिणेस शक्तिहीन झाला होता, यामुळें भिल्लमास महाराष्ट्राच्या उत्तर भागांत स्वतंत्र राज्य स्थापितां आलें. आणि यानें देवगिरी वसवून इ. स. ११८७मध्यें तेथें आपली राजधानी केली. याचें राज्य नर्मदेपासून कृष्णेपर्यंत होतें. अर्थात् याला शेजारच्या राजाशीं युद्धें करावीं लागलीं. विशेषतः दक्षिणेंत होयसळ यादवांनीं आपली नवीन सत्ता स्थापन केली ( हें आपण पुढें सांगूं ) त्याशीं ह्यास लढावें लागलें. याचा पुत्र जैतुगी अथवा जैत्रपाल यास काकटीय आंध्रराजाशीं लढावें लागलें. आंध्रराजा रुद्र लढाईंत मारला जाऊन त्याचा पुत्र गणपति कैद झाला. पण जैतुगीनें त्यास मुक्त करून आंध्राच्या गादीवर बसविलें. जैतुगी स्वतः विद्वान् असून विद्वानांचा आश्रयदाता होता. प्रसिद्ध दाक्षिणात्य ज्योतिषी भास्कराचार्य याच्या पूर्वीं

थोडासा झाला. त्याचा पुत्र लक्ष्मीधर हा जैतुगीचा मुख्य दरबारी पंडित होता. हा इ. स. १२१०त मरण पावला आणि याच्यामागून सिंघण, या कुलांतील दुसरा प्रतापी राजा गादीवर आला. देवगिरीच्या यादवांचा इतिहास आम्हीं येथेंच सोडतों. पुढील इतिहास पुढें देतां येईल. या राज्याचा उच्छेद अल्लाउद्दीनानें केला हें प्रसिद्धच आहे.

दुसरें मांडलिकी राज्य सांगण्यासारखें देगगिरीच्या पूर्वेस काकतीयांचें आंध्र राज्य होय. हे काकतीय आपल्यास सूर्यवंशी क्षत्रिय म्हणवितात. त्यांचें राज्य आंध्रांत पूर्वेकडील घाटाच्यावर असून त्यांची राजधानी अभ्रमकोंड ( याचें नांव पुढें उरंगलु–वरंगळ झालें ) ही होती चांदोडच्या यादवाप्रमाणेंच हे प्रारंभीं पश्चिम चालुक्यांचे मांडलिक होते. यांचा पहिला स्वतंत्र राजा बेटाचा पुत्र प्रोल हा होता आणि यानें इ. स. १११७ इसवीमध्यें राज्य करण्यास प्रारंभ केला. याचा एक लेख सांपडला आहे ( ऐय्यर पा. २७७ ). या लेखाचा काल चालुक्य–विक्रम ४२ असाहि दिला आहे, यावरून हा मुलुख अद्याप चालुक्यांच्या सत्तेखालीं होता. प्रोलानें दीर्घकाल म्हणजे ११६०पर्यंत राज्य केलें. यानें तैल तिसरा याचा पराभव केल्याचें वर्णन आहे. याच्यामागून याचा पुत्र रुद्र गादीवर बसला. तो निःसंशय प्रबल राजा होता. यानें पुष्कळ शहरांवर हल्ला करून तीं उध्वस्त करून तेथील लोकांस ओंरगळू येथें आणून तें वसविलें असें सांगतात. यानें पुष्कळ देवालयें बांधिलीं आणि अनेक विद्वानांस आश्रय दिला. याची सत्ता इतकी प्रबळ झाली कीं, कांचीपासून विंध्यापर्यंतचे राजे याचा आश्रय घेत ( ऐय्यर ). याच्यामागून याचा धाकटा भाऊ महादेव इ. स. ११९१मध्यें गादीवर बसला. ऐय्यरचा असा तर्क आहे कीं, पूर्वीं सांगितल्याप्रमाणें जैतुगी यादव याच्या लढाईंत जो काकतीय राजा मारला गेला तो हा असावा. गणपति हा

महादेवाचा पुत्र असून तो ११९८त गादीवर आला आणि त्यानें प्रतापयुक्त राज्य ६२ वर्षें केलें. याच्यावेळचे अनेक कोरीव लेख सांपडलेले आहेत; पैकीं राजवर्ष ६२चाहि एक आहे. यानें चोल, कलिंग, सेउण, कर्नाट, लाट, वेलनाडु यांच्याशीं युद्ध केलें. याची देवगिरीच्या यादवाशीं झालेली लढाई म्हणजे कुलागत शेजारी शत्रूशीं लढाई होय. यांत जय दोन्ही पक्षाकडे क्रमाक्रमानें जात असे. याचा शेवटचा लेख इ. स. १२५०चा आहे. याला मुलगा नसून मुलगी होती. त्या रुद्रम्मा मुलीनें त्याच्यानंतर तीस वर्षें राज्य केलें. तिच्या पाठीमागून शेवटचा राजा प्रतापरुद्र गादीवर आला. (इ. स. १३१६). हा कवींचा प्रसिद्ध आश्रयदाता होता आणि वैद्यनाथ यानें अलंकारशास्त्रावर केलेला उत्तम ग्रंथ यालाच अर्पण केलेला असून त्याचें नांव याच्या नांवावरून प्रतापरुद्रीय असें ठेवलेलें आहे. हें राज्य शेवटीं मुसलमानांनीं उच्छिन्न केलें हें विश्रुत आहे. मध्यप्रांतांतील हल्लींचें बस्तर संस्थानचे राजे हे काकतीयांच्या वंशांतील आहेत.

तिसरें महत्त्वाचें राज्य हळेबीड अथवा द्वारसमुद्र येथील होयसल या यादवांचें होतें. हेही प्रारंभीं पाश्चात्य चालुक्यांचे अंकित होते. किंबहुना राष्ट्रकूटांच्या वेळेपासून ते तसे असावे. यांचा पहिला प्रसिद्ध राजा विनयादित्य असून त्याचा इ. स. १०४०चा लेख सांपडला आहे. (गौरीशंकर टॉड पा. ३३३). याचा पुत्र एरयंग यास तीन मुलगे होते. पैकीं ज्येष्ठ बल्लाळ हा चालुक्यराजा जयसिंह तिसरा याचा प्रसिद्ध मांडलिक होता. त्याचें मुख्य शहर बेलापूर (हल्लींचें बेळूर) हें होतें. पण बल्लाळच्या नंतर बेट्टिग ऊर्फ विष्णुवर्धन हा राजा स्वतंत्र होऊन त्यानें निराळी राजधानी केली. कल्याणचा विक्रमांक या बलवान् वरिष्ठ राजाशीं लढून त्यानें आपलें स्वातंत्र्य नष्ट केलें. त्याचा जरी त्यास पक्का मोड

करितां आला नाहीं तरी शेजारचे राजे गंग, कंदब, तुलुव आणि पांड्य यांचा त्यानें पूर्ण पराभव केला. याच्या वेळचे बरेच लेख इ. स. १११५ पासून ११३८ पर्यंत सांपडले आहेत (गौरीशंकर).

यानें रामानुजाला आश्रय देऊन वैष्णवमताचा प्रसार केला. यामुळें याचा राज्यकाळ फारच प्रसिद्ध आहे. या सत्पुरुषानें यास मतांतर करावयास लाविलें. आणि त्यानें द्वारसमुद्र येथें आपली राजधानी करून, तेथें विष्णूचें देवालय बांधलें. हें अद्यापही पाहाणारास चाकित करून सोडतें. यानें बेलूर येथेंहि दुसरें प्रचंड विष्णुमंदिर बांधलें.

याच्यामागून याच पुत्र नरसिंह गादीवर आला. यानें ११७३ पर्यंत राज्य केलें. त्याचा पुत्र वीरबल्लाळ या कुलांतील अत्यंत बलिष्ठ राजा झाला. शेवटचा चालुक्य राजा सोमेश्वर याचा सेनापति ब्रम्ह याचा यानें पराभव केला. इ. स. ११९१त देवगिरीचा यादव राजा याचाहि पराभव करून कुंतलदेश यानें आपल्या राज्यास जोडला. तेव्हां दक्षिण हिंदुस्थानांत हीं दोन प्रबळ साम्राज्यें झालीं. म्हणजे देवगिरीचे यादव आणि द्वारसमुद्राचे होयसल. स्वतंत्र राजांचें महाराजाधिराज हें उपपद यानें प्रथम धारण केलें. पुष्कळ वर्षें राज्य केल्यावर हा १२२०च्या सुमारें वारला, तेव्हां याचा पुत्र नरसिंह राजा झाला. होयसल सत्ता याच्या वेळेपासून कमी होऊं लागली. तरी शंभर वर्षेंपर्यंत त्यांचें राज्य बलवान् होतें. तें शेवटीं मलिक्काफूर याच्या मुसलमानांच्या स्वारीनें इ. स. १३१०च्या सुमारास उध्वस्त केलें.

चौथें राज्य सांगण्यासारखें, जरी तें स्वतंत्र झालें नाहीं, या कालविभागांत मांडलिकच राहिलें, असें प्राचीन कालापासून प्रसिद्ध असलेलें पांड्यांचें राज्य होय. महाभारतांत चोलांसह पांड्यांचा उल्लेख आहे आणि रामायणांत त्यांचे हे नेहमींचे साथी सोडून त्यांचा स्वतंत्र

उल्लेख आहे. कालिदासानें इंदुमतीच्या स्वयंवरांत एका पांड्य राजाचा उल्लेख केलेला आहे आणि त्याची राजधानी उरगपूर होती असें सांगितलें आहे. ही राजधानी व तीबरोबरच पांड्यांची सत्ता करिकाल चोल यानें (इ. स. सुमारें १००) उच्छिन्न केली; तेव्हांपासून कित्येक शतकें पांड्य चोलांचे किंवा इतरांचे मांडलिक होते. त्यांची राजधानी मदुरा होती. हिचा उल्लेख प्लीनीनेंहि केला आहे. ह्यावरून असें ठरतें कीं, कालिदास प्लिनीच्या पूर्वी म्हणजे इ. स. पू. पहिल्या शतकांत होऊन गेला. कारण त्यानें पांड्यांच्या मदुरा राजधानीचा उल्लेख केला नसून उरगपूर राजधानीचा उल्लेख केला आहे. असो, हा एक प्रासंगिक विषय आम्हीं सांगितला. पांड्य या कालविभागांत (१०००–१२००) परतंत्रच राहिले. ११व्या शतकाच्या प्रारंभींच चोल राजा राजराज यानें दक्षिण हिंदुस्थानावर आपलें साम्राज्य स्थापिलें हें आपण पाहिलेंच आहे. तेराव्या शतकांत जटावर्मन् सुंदर पांड्य हा स्वतंत्र झाला आणि त्यानें आपलें विस्तृत राज्य स्थापिलें (१२५१–१२७१). किलहॉर्ननें पांड्यांची संलग्न वंशावळ ११००पासून १५६७पर्यंत दिली आहे; परंतु ती येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. कारण पांड्य १२०० नंतर स्वतंत्र झाले. मलिक्काफुराची स्वारी १३००च्या सुमारास झालेली, पांड्यांच्या सत्तेस खिळखिळी करून सोडणारी होती तरी दक्षिण हिंदुस्थानांत (मदुरा आणि तिनेवल्ली जिल्ह्यांत) पांड्य बरींच वर्षें राज्य करीत होते. त्यांना नेहमीं ताम्रपर्णी नदीच्या मुखांतील मौक्तिकांच्या उत्पत्तीपासून मोठाच करभार मिळे. याप्रमाणें पांड्यांचा थोडासा या काळांतील इतिहास सांगून आपण चेर अथवा केरळ यांच्या इतिहासाकडे वळूं.

केरळ अथवा मलबार आणि त्रावणकोर याचा या काळविभागांतील इतिहास पी. सुंदर पिल्ले एम्. ए. यांनीं प्रयासानें शोधून काढून

वाचकांपुढें इं. ए. ३५ मध्यें मांडला आहे ( पा. २४९–२५५ ). आम्ही त्यांतील मुख्य मुख्य गोष्टी त्यांची परवानगी न घेतां येथें वाचकांपुढें मांडतों. केरळ अथवा चिरल याचा अर्थ डोंगराळ देश असा असून हिंदुस्थानच्या पश्चिम किनाऱ्यावरील उत्तरेकडे मलबार व दक्षिणेकडे त्रावणकोर इतका मुलूख त्यांत येतो. कधीं कधीं कोंगूभूमि म्हणजे हल्लींचे सेलम आणि तिनेवल्ली जिल्हे यांत मोडत. पण नेहमीं किंवा सहजरीतीनें नव्हे. या दक्षिणच्या कोंपऱ्यांत उत्तरेकडील हिमालयाप्रमाणेंच अत्यंत पुराणे द्रवीड व आर्यवंश, त्यांच्या समाजव्यवस्था, त्यांच्या चालीरिती व धर्म जशाचे तसे एखाद्या दगडांतील अवशेषाप्रमाणें संभाळून ठेवले आहेत. म्हणजे द्रविडी, कनिकर अथवा डोंगरी माणसें यांपासून तों आर्य ब्राह्मणांचा उच्चत्तम नमुना म्हणजे नंबुद्री ब्राह्मण ( याच जातींतील आद्य शंकराचार्य आहेत. ) यांपर्यंत आपल्यास सर्व प्रकार पहावयास सांपडतात. भाषा, मनुष्यवंशस्वरूप, सामाजिक व्यवस्था, विवाहचाली इत्यादींचा अभ्यास या प्रांतांत करण्यासारखा आहे. कारण येथें अंतर घडामोडी किंवा बाहेरील स्वाऱ्यांच्या आपत्ति मुळींच कोसळल्या नाहींत. किंबहुना नंबुद्री ब्राह्मणांचा व नायर ( नागर ) क्षत्रियांचा हा देश एका रीतीनें संस्मरणीय आहे. कारण येथून शंकराचार्यांच्या नेतृत्वाखालीं एक धार्मिक स्वारी बाहेर पडून तिनें सर्व हिंदुस्थानास जिंकलें. पूर्व किनाऱ्यावरच्या पांड्याप्रमाणें पश्चिम किनाऱ्यावरच्या या केरलांचा इतिहास महाभारत--रामायण--कालापर्यंत मागें जातो. संस्कृत ग्रंथांत पांड्य, चोल, केरल यांची नेहमीं सांगड सांपडते.

हल्लींची त्रावणकोरांत राज्य करीत असलेली क्षत्रिय कुळा फार प्राचीन आहे. तिच्या दप्तरचे लेख हल्लींच्या राजापासून पस्तीस पिढ्या मागें म्हणजे इ. स. १३३५ पर्यंत जातात. या कुळाचा यापूर्वीचा इतिहास आपल्यास कोरीव लेखावरून काढला पाहिजे.

तसा इतिहास पिले यांनीं काढून एक जुळविलेली हकीकत दिलेली आहे. त्रावणकोरांत असलेली अक्षरवटिका संस्कृत अक्षराहून भिन्न आहे हें प्रथम सांगितलें पाहिजे. या अक्षरास वत्तेलथें किंवा चेर पांड्य म्हणतात. त्रावणकोरचा शकहि निराळा आहे. त्याचें नांव कोल्लमशक असून त्याचें पहिलें वर्ष ८५५ इसवी आहे. शिलालेखांत प्रथम त्रावणकोरच्या राजाचें नांव आढळतें तें. वरिकेरलवर्मन् असें आहे. हें ११३५च्या लेखांत मिळतें. हा राजेंद्र चोलांचा मांडलिक होता. त्याच्या नांवानें महादेवाचें देवालय यानें बांधलें. वेनाड म्हणजे त्रावणकोर एक सुशासित देश असून तेथें कर ऐनजिनसी व नगदी वसूल होई असें दिसतें. चोल आणि चालुक्य यांच्यापासून यानेंच प्रथम बरीच सत्ता मिळविली. इ. स. ११२४च्या दुसऱ्या एका शिलालेखांत याचें नांव आहे. यावेळच्या राज्यपद्धतींत ग्रामसंस्था आणि मंदिराचे अधिकारी या दोघांचाहि समावेश झालेला दिसतो.

इ. स. ११६१ च्या एका शिलालेखांत याच्या पुढच्या राजाचें रविवर्मन् असें नांव मिळतें. यानें त्रावणकोरवर अगदीं दक्षिणच्या इलाख्यासह अगदीं स्वतंत्रपणें राज्य केलें. कारण यावेळीं राजेंद्र मरून चोलांची सत्ता कमी झाली होती. याच्या पुढच्या राजाचें वीर उदय मार्तंड असें नांव ११७३ च्या एका लेखांत मिळतें. आणि इ. स. ११८९ च्या लेखांत आदित्यराम राजाचें नांव मिळतें. पिल्ले यांच्या मतें उत्तरेकडे कपदेश किंवा कुपकांचा मुलूख आणि मलबारचा कांहीं प्रांत जिंकून यानें आपलें राज्य वाढविलें. याच्यामागून दुसरा केरलवर्मन् या राजाचें नांव इ. स. ११९३च्या शिलालेखांत मिळतें. एका ग्रंथांत त्रिखडी असें याचें नांव आहे. याचा पुढचा राजा वीर-रामवर्मन् त्रिखडी याचें वर्णन इ. स. ११९६ च्या विस्तृत शिलालेखांत आहे. या लेखांत देवळांच्या कारभारावर नजर ठेव-

णाऱ्या एका ६०० जणांच्या सभेचें वर्णन आहे. त्याचप्रमाणें राज्याच्या अठरा विभागांच्या अधिपतींच्या सभेचें वर्णन आहे. यावरून राज्यकारभार मुख्यत: येथें लोकांच्या प्रतिनिधींच्या हातांत दिसतो. ही व्यवस्था प्राचीन काळच्या व्यवस्थेचा अवशेष आहे. पुढील राजे वीरराम, केरळवर्मन् आणि वीर रविवर्मन् होते. दुसऱ्याचा एक लांब लेख इ. स. १२३५चा सांपडला असून त्यावरून त्या काळीं जमाबंदीची व्यवस्था कशी होती हें पिळे यानीं दाखविलें आहे. त्रावणकोरचें हल्लींचें राजघराणें १२ व्या शतका इतकें जुनें आहे. त्याची राजधानी तेव्हांच त्रिवेंद्रम होती आणि प्राचीन काळापासून राज्यव्यवस्था सुरक्षित व ग्रामसंस्थेच्या हातांत असे.

तुंगभद्रेच्या उत्तरेस कुंतल म्हणजे हल्लींच्या दाक्षिण महाराष्ट्र देशांत चार मांडलिक घराणीं होतीं. त्यांचा उल्लेख ह्या भागांत केला पाहिजे. तीं याच कालविभागांत पडत असून स्वतंत्र नव्हतीं तरी बलिष्ठ होतीं. हल्लींच्या निजामच्या राज्यांतील येलबुर्ग येथील शिंदे घराणें पहिलें होय. यांचे लेख कानडी भाषेंतील सांपडले आहेत. बॉंबे गॅझेटियर व्हॉ. १ भा. २ ( पा. ५७२–५७५ ) यांत यांचा इतिहास दिला आहे. त्यावरून पुढील संक्षिप्त माहिती कांहीं आमच्या विधानासह देतों. या देशांस 'शिंदवाडी, नाड' असें या लेखांत म्हटलें आहे; यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, हे शिंदे मराठे असून कानडी बोलणाऱ्या मुलुखावर त्यांचें राज्य होतें. ( भा. १ यांत सांगितल्याप्रमाणें मराठे आणि कानडे हा भेद काल्पनिक आहे; म्हणजे हा वंश नसून भाषाभेद आहे ). विजापूर जिल्ह्यांतील बदामीपासून यांचा मुलूख लागतो, आणि त्यांत धारवाड जिल्ह्यांतील बागलकोट आणि नेरळ यांचा समावेश होतो. इं. ए. ७ पा. ३०६ वर दुसऱ्या एका शिंदे कुलाचा उल्लेख आहे. त्यांत मुंजाचें असें वर्णन केलें आहे. 'भोगावती पुरवराधीश्वर नागवंश तिलक प्रत्यंडक चतु:सहस्र

राजा* आमच्या मतें पहिल्या कालविभागांत सेंद्रक या नांवानें आलेल्या कुलाचीच ही परंपरा आहे. तेथें पुलकेशी चालुक्य याचा मामा सेनानंदराज सेंद्रक याचा उल्लेख कर्नाटकांतील कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांमधील एका जमिनीचें दान देण्याबद्दल विनंति केली, असा आला आहे. ( भा. १ पान २११). हें कुल नागवंशी होतें व येल्बुर्गचे शिंदेहि नागवंशी होते. हल्लींचें शिंदे कुलहि त्यांचेच प्रतिनिधि असून नागवंशी आहेत.

उत्तर चालुक्यांच्या अमलाखालीं हे येलबुर्गचे शिंदे फार बलवान् मांडलिक होते. यांतील पहिला प्रसिद्ध राजा आचुगी. यास दोन पुत्र होते. ते बम्म आणि सूर्य होत. यांचा उल्लेख इ. स. १०७६ च्या एका लेखांत आला आहे. बम्माचा पुत्र आच ऊर्फ आचुगी दुसरा हा विक्रमादित्याचा पराक्रमी सेनापति होता. यानें एका होयसल राजाचा पराभव केला. इ. स. ११२२ च्या एका लेखांत याचा उल्लेख आहे. आचुगीचे दोन पुत्र पेरमाडी आणि चोकंड दुसरा. यांचा उल्लेख इ. स. ११४४ व ११६३ च्या लेखांत आहे. चोकंडाला चार पुत्र होते. एका राणीपासून आचुगी तिसरा व पेरमाडी आणि दुसऱ्या बायकोपासून बिज्जल आणि विक्रम. या चौघांचा उल्लेख इ. स. ११६८ त ११९० च्या लेखांत मिळतो, कल्याणचे उत्तर चालुक्य नष्ट झाल्यावर आणि होयसळांचा उत्कर्ष झाला तेव्हां या शिंदे कुलाची सत्ता कमी होऊन ते स्वतंत्र होऊं शकले नाहींत. यांचा देश शेवटीं देवगिरीच्या यादवांच्या तुंगभद्रेपर्यंत पसरलेल्या राज्यांत समाविष्ट झाला.

दुसरें महत्त्वाचें मांडलिक कुल येथें सांगितलें पाहिजे तें सौंद-

---

*किंबहुना शिंद्यांचीं अनेक कुलें आहेत. उदाहरणार्थ इं. ए. १४मध्यें कऱ्हाड तालुक्यांतील आणखी एका शिंदे कुळाचा उल्लेख आहे.

त्तींच्या रट्टांचें होय, यांचा इतिहास बाँबे गॅझेटियर व्हॉ. १ भाग २ पा. ५४९-५५५ वर डाक्तर फ्लीटनें दिला आहे तो आम्ही येथें सारांश रूपानें देतों. हे राजे स्पष्टपणें महाराष्ट्राच्या एका राष्ट्रकूट सम्राटाच्या वंशातले असावेत. यांचें राज्य ' कुंडी ३००० ' म्हणजे हल्लीच्या बेळगांव व धारवाड जिल्ह्यांच्या एका भागावर होतें. यांची राजधानी प्रथम सौंदत्ती ( सुगंधावती ) आणि मागून खुद्द वेळगांव ( वेणुग्राम ) होती. गॅझेटियरला हे राष्ट्रकूट वंशांत जन्मले असल्याविषयीं संशय आहे. परंतु राष्ट्रकूटांबद्दल 'रट्ट' हा शब्द नवव्या शतकाइतका जुना आहे आणि हल्लींचें रेड्डी हेहि रट्ट किंवा राष्ट्रकूट आहेत. ते आपल्यास मूळचे लट्टलूरपुरवराधीश्वर म्हणतात. यांचें लांछन सिंदूर ( हत्ती ) असून ध्वजावर सोन्याचा गरुड असे. हाच त्यांच्या मोहोरेवर आहे. हे राजे प्रथम पाश्चात्य चालुक्यांचे अंकित होते. पण कलचूरींचें बंड झालें, तेव्हां ते स्वतंत्र झाले. ते शिंधा-इतके बलवान नसल्यानें त्यांचा होयसलानीं पराभव केला. पण शेवटीं याचाहि प्रदेश देवगिरीच्या यादवांच्या राज्यांत सामील झाला.

यांचा पहिला मुख्य राजा कार्तवीर्य पहिला ऊर्फ कत्त होता. याचा उल्लेख इ. स. ९८० च्या शिलालेखांत आहे. हा तैल दुसरा, आहवमल्ल याचा मांडलिक होता. यानें आपल्या कुंडीच्या राज्याची सीमा ठरवून घेतली. याचे पुत्र दावरी आणि कन्नकैर असे दोघे होते. दुसऱ्याचा पुत्र एरग यानें इ. स. १०४० त एक संस्कृत लेख लिहविला आहे (इं. ए. १९ पा. १६१). त्यांत तो आपल्यास जयसिंह जगदेकमल्ल याचा सामंत म्हणवितो. याच्या बिरुदांत 'रट्ट-वंशोद्भवलट्टलूरपुरवराधीश्वर गरुडध्वज' वगैरे पदें आहेत. एका पदांत यास गायनांतील विद्याधर असें म्हटलें आहे. एका जैन दानलेखांतहि याचा उल्लेख आला आहे. प्रो० पाठक यांनीं इं. ए. १४ पा.

२३ वर हा छापला आहे. याचा भाऊ अंक सौंदत्तीच्या १०४८ च्या शिलालेखांत उल्लेखिला असून त्याचा पुत्र सेन पहिला होता. याचा पुत्र कन्नकैर दुसरा यानें इ. स. १०६९पासून इ. स. १०८७ पर्यंत बरेच लेख केलेले सांपडले आहेत. आपला भाऊ कार्तवीर्य दुसरा याच्यासह यानें बरींच वर्षें राज्य केलें. विक्रमादित्य सहावा याचा सामंत असें यांचें वर्णन आहे. याचा पुत्र सेन दुसरा इ. स. १०९१ पासून ११२१ पर्यंतच्या अनेक लेखांत उल्लेखित आहे. याचा पुत्र कार्तवीर्य तिसरा याचे कित्येक लेख इ. स. ११४३ ते ११६६ पर्यंतचे सांपडले आहेत. त्यांत यास कत्त किंवा कत्तम असेंहि म्हटलें आहे. कल्याणच्या कलचूरीच्या बंडाचा फायदा घेऊन यानें इ. स. ११६५ नंतर आपलें स्वातंत्र्य पुकारलें व एका लेखांत आपल्यास चक्रवर्तीहि म्हणवून घेतलें आहे (बॉंबे जे. आर. ए. एस. १० पा. १८१). हें स्वातंत्र्य सोमेश्वरानें विरोध केला तरी त्यानें तीन पिढयां पावेतों भोगिलें; म्हणजे याचा पुत्र लक्ष्मीधर पहिला, त्याचा पुत्र कार्तवीर्य चवथा, त्याचा पुत्र लक्ष्मीधर दुसरा. यास शेवटीं देवगिरीच्या सिंगण यादवाचा अधिकारी विचण यानें १२२८च्या सुमारें जिंकलें. हे रट्ट शिवभक्त होते. परंतु यांची जैनावरहि कृपा असून जैन देवालयांस त्यानीं दानें दिलीं आहेत.

तिसरें महत्त्वाचें मांडलिक राज्य हनगळच्या कदंबाचें होतें. हे कदंब फार पुराणें मराठे कुळ आहे. अशोकाच्या राष्ट्रकूटाच्या म्हणजे रट्टांच्या अथवा राष्ट्रिकांच्या इतकें तें जुनें आहे. प्राचीन चालुक्याच्या समकालीन कदंबापैकींच बहुधा ते असून, त्याच वंशाचे व गोत्राचे असल्यानें, आपल्या लेखांत चालुक्यांचें मानव्यगोत्र व हारीतिपुत्र-वंश लावीत. ते मुळांत बनवासी येथें राज्य करीत होते. हेहि कदंब (कादम्ब रूपहि आढळतें) आपल्यास बनवासी पुराधीशच म्हणत आणि ह्याच मुलुखावर त्यांचें राज्य असून धारवाड जिल्ह्यांतील

हनगळ ५०० चा प्रदेश आणखी त्यांच्या ताब्यांत होता (शिलालेखांत हन्नुराळ असें येतें). यांचें लांछन सिंह असून ध्वजावर वानरराजा हनुमान असे. हे विष्णूचे भक्त म्हणजे बनवासी ऊर्फ जयन्ती येथील मधुकेशवाचे ते उपासक होते. बॉंबे गॅझेटियर व्हा. १ भा. २ पा. ५५९–५६३ वर फ्लीटनें दिलेल्या यांच्या इतिहासाचा सारांश आम्ही येथें देतों.

या कदम्बांची विस्तृत वंशावळ प्रथम इं. ए. १० पा. २४९ वर छापलेल्या त्यांच्या लेखांत ( ११०८ इ. ) मिळते. या कालविभागांत राज्य करणारा पहिला राजा कीर्तिवर्मन् (दुसरा) इ. १०५८ त राज्य करीत होता; हा सोमेश्वर चालुक्य व विक्रमादित्य सहावा यांचा सामंत होता ( इं. ए. ४ पा. २०६ ). पुढें याचा चुलता शान्तिवर्मन् दुसरा हा बनवासी १२०० व हनगळ ५०० वर विक्रमादित्य सहावा याचे वेळीं १०८९ इ. त राज्य करीत होता. याचा पुत्र तैल याचे अनेक लेख सांपडले आहेत. ते १०९९ पासून ११२८ पर्यंत असून त्यांपैकीं करगुदरीचा ११०८ चा लेख आम्हीं प्रथम उल्लेखिलेला हे सर्व लेख हनगळ तालुक्यांत मिळाले आहेत. हनगळ राजधानीस पांथीपुर व विराटनगर अशींहि नांवें आहेत. ही होयसळ विष्णुवर्धनानें वेढा देऊन हस्तगत केली. ११३५ इ. त हा वारला, त्या वेळीं त्याचें पुत्र मयूरवर्मन् आणि मल्लिकार्जुन त्याच्या सहकारानें राज्य करीत होते. हे येथें सांगण्यासारखें आहे कीं, या दक्षिणच्या राज्यांत युवराज, पुत्र किंवा बन्धु, बरोबरच राज्य करितात. इ. ११३४ त त्याचा तिसरा पुत्र तैलम हनगळांत एकटा राज्य करीत असल्याचें मिळतें. याचा पुत्र कामदेव ११८९ इ. त हनगळ बनवासी आणि पुलिगेरी वर चालुक्य शेवटचा राजा सोमेश्वर चौथा याच्या अमलाखाली राज्य करीत असल्याचा दाखला आहे. त्यास शेवटीं होयसळ राजा प्रसिद्ध वीर-

बल्लाळ यानें जिंकिलें. याशिवाय दुसरे लहान मांडलिक कदंब कुळापैकीं होते, पण ते कमी महत्त्वाचे असल्यानें त्यांचा इतिहास न देतां आम्ही याच कुलाच्या गोवा शाखेकडे, ती महत्त्वाची असल्यानें, वळतो.

हे गोव्याकडचे ( गोपकपट्टणचे ) कदंब वरील कदंब घराण्याचीच शाखा होती. पण हनगळच्या कदंबाच्या लेखांत जी कदंबाची उत्पत्ति दिली आहे त्याहून ह्यांच्या लेखांत निराळी उत्पत्ति दिली आहे. दक्षिण कोंकणच्या शिलाहारांपासून यांनीं कोंकणांत गोवा हस्तगत करून घेतलें. आणि ह्याशिवाय बेळगांव जिल्ह्याच्या खानापूर तालुक्याचा घाटावरचा प्रदेश ( ह्याला पळसिंगें म्हणत ) त्यांनीं आणखी मिळविला. सप्तकोटीश्वर नांवाच्या शिवलिंगाचे हे उपासक होते, विष्णूचे नव्हते आणि हे आपल्या लेखांत कलियुगसंवताचा उपयोग करतात; शालिवाहन शकाचा करीत नाहींत. यांचे लेख संस्कृतांत आहेत; कानडींत नाहींत. कारण गोवा प्रदेशांत म्हणजे दक्षिण कोंकणांत कानडी भाषा बोलत नाहींत. ह्याशिवाय यांची व अन्यकदंबांची एकवाक्यता आहे. म्हणजे मूळचे हे बनवासीचे आहेत आणि लांछन सिंव्ह व ध्वज वानर. यांचेहि आहेत. यांचे गोत्र मानव्य आहे; वंश हारितीपुत्र आहे. आणि महासेन मातृगण–प्रसाद–लब्ध–लक्ष्मी असें हेंहि विशेषण लावतात. हें विशेषण जुन्या कदंबाच्या लेखांतून येतें. ( बॉंबे जर्नल ९ पा. २३५ ). ते आपल्या पूर्व राजांचीं नांवें देत न बसतां वंशावळ गुहल्ल पासून सुरू करितात. याचा पुत्र षष्ठदेव ऊर्फ छट् याचा एक लेख इ. स. १००७ चा सांपडला आहे. या कदंब घराण्यांतील हनगळ शाखेंत छट् म्हणून जो पहिला राजा सांगितला आहे आणि ज्याची सरासरी मिति इ. स. १००० ठरते तोच हा असावा. आणि याच्यापासून हा शाखा-भेद झाला असावा. याचा पुत्र जयके-

शिन् बलिष्ठ राजा होता. गुडिकट्टिलेखांत याचें फारच वर्णन केलें आहे (बाँबे जे. आर. ए. एस.भा. ९ पा. २९२) कपर्दिद्वीपाचा एक राजा मावनी यास यानें ठार मारलें असें वर्णन आहे. कपर्दिद्वीप म्हणजे गॅझेटियरच्या मतें हल्लींचें साष्टी बेट होय. ठाण्याचा अनंतदेव राजा याच्या लेखांत ज्या आपत्तींचें वर्णन आहे त्याच्याशीं ह्या स्वारीचा कांहीं संबंध नसावा असें आम्हांस वाटतें. चोल* आणि चालुक्य ( विक्रमादित्य ६ ) राजे यांची मैत्री यानें संपादन केली असेंहि वर्णन आहे; आणि यानेंच प्रथम गोवा हीं आपली राजधानी केली.याची निश्चित मिति इ. स १०५२ आणि १०५३ आहे. गुजराथच्या कर्णाची राणी मैनल्लदेवी ही एक कदंबापैकीं राजकन्या होती असें वर्णन आहे, ती याच राजाची मुलगी गॅझेटियरच्या मतें असावी. याच्या नंतरचा राजा विजयादित्य याचा पुत्र जयकेशिन् दुसरा यास विक्रमांक चालुक्यानें आपली मुलगी म्हणजे सोमेश्वराची बहीण दिली होती† ( इ. ए. १४, पा. २८८ ). हा विवाह बालविवाह दिसतो; या राजाची निश्चित मिति इ. स. १११९ आणि ११२५ इसवी आहे. विक्रमचालुक्य शकवर्ष पन्नास असा शक या दुसऱ्या लेखांत दिला आहे. याचें मुख्य राज्य पळसिंगे १२०० आणि कोंकण ९०० हेंच होतें; पण ह्याशिवाय अन्य प्रदेशहि विक्रमाचा जांवई या नात्यानें त्याजकडे होते. तो आपल्यास कोंकण

---

*चालुक्यचोलभूपालौ कांच्यां मित्रे विधाय यः ।
पेर्माडितूर्यनिर्घोषेऽप्यासीद्राजपितामहः ॥ बाँबे जे. आर. ९ पा.१४२

†श्रीपेर्माडिनृपः पयोनिधिनिभः सोमानुजां कन्यकां ।
यस्मै विस्मयकारिभूरिविभवैर्दत्त्वेभकोशादिभिः ॥
..............................
ख्यातः श्रीपतये स मैललमहादेवीं कृतार्थोऽभवत् ।

चक्रवर्ती म्हणूं लागला आणि स्वातंत्र्य मिळविण्याची त्यानें इच्छा धरली. यामुळें याच्यावर आचुगी पहिला विक्रमाचा मांडलिक यानें हल्ला करून त्याचा पराभव केला. आचुगीच्या लेखांत त्यानें गोवा व कोंकण घेतलें असें वर्णन आहे. इ. स. ११४७ च्या लक्ष्मणाच्या लेखांत सोमनाथाला कांहीं देणगी देण्याच्या वेळीं यास नजराणे मिळाले असा उल्लेख आहे (गॅ. पा. ५६९). जयकेशीला दोन पुत्र होते, पेर्माडी आणि बिजयादित्य. हे शिव आणि विष्णु यांचे अनुक्रमें भक्त होते. यास मलवेरमार अशीहि पदवी आहे. ही पदवी होयसळांची आहे. विजयादित्य हा फार विद्वान् होता आणि वाणीभूषण अशी यास पदवी मिळाली. ही पदवी एका लेखांत त्यास लावलेली आहे. तेथील उतारा देण्यासारखा आम्ही खालीं देतों.* पेरमाडीची राणी सोमवंशोत्पन्न कमलादेवी हिनें दोन सुंदर कोरीव दगडाचीं देवालयें एक नारायणाचें व दुसरें लक्ष्मीचें बांधलीं. हीं धारवाड जिल्ह्यांतील संपगांव तालुक्यांत अद्याप आहेत. त्यांत लेखहि आहेत. त्यांत पेरमाडीची इ. स. ११४७ ही मिति मिळते. विजयादित्य या मितीनंतर त्याचे बरोबर राज्य करूं लागला असें दिसतें. दोघांचें नांव इ. स. ११५८ च्या कोरीव लेखांत (इ. ए. ११ पा. २७३) त्याचप्रमाणें हळशी येथील इ. स. ११७१ च्या लेखांत (कलियुगवर्ष ४२७२) मिळतें. कऱ्हाडचा राजा विजयादित्य यानें या गोव्याच्या राजास पुनः गादीवर बसविलें असें एका शिलाहार लेखांत सांगितलें आहे. त्यावरून यांचें राज्य मध्यंतरीं दुसऱ्यानें हिसकलें असावें. तथापि हे राजे बलवान् असून त्यांनीं आपलीं

---

*भृगौ कुन्ते प्रासे धनुषि विषमे चासिफलके । वरे वाद्ये गीते सरसकविताशास्त्रविसरे । तुरंगाद्यारोहे स्मृतिषु च पुराणेषु पुरुजित् । परिज्ञानाद्योभूज्जगति बहुविद्याधर इति ॥

नाणींहि पाडलीं होतीं. पेरमार्डीचे इ. स. ११८२ चें सोन्याचें नाणें सांपडलें आहे.

विजयादित्याचा पुत्र जयकेशिन् हा इ. स. ११८७ त गादीवर आला असें दिसतें. याचें राज्यवर्ष तेरा व पंधरा ( इ. स. ११९९) व ( १२०१ ) यांतील याचे लेख मिळाले आहेत. त्याची १२०० व १२१० चीं सोन्याचीं नाणींहि मिळालीं आहेत. याचा पुत्र त्रिभुवनमल्ल व त्याचा पुत्र छट्ट अथवा षष्ठदेव दुसरा. हा इ. स. १२४६ त गादीवर आला. राज्यवर्ष पांच इ. स. १२५० यांतील याचा गोव्याचा लेख मिळाला आहे. हुबळी तालुक्यांत याचा दुसरा लेख इ. स. १२५७ चा मिळाला आहे, त्यावरून हा स्वतंत्र राजा दिसतो. हें राजघराणें केव्हां व कसें विलयाला गेलें हें समजत नाहीं. यापुढील यांचे कोणतेहि लेख सांपडले नाहींत. बहुधा देवगिरीच्या यादवांनीं यांस जिंकलें. (जे. बी. आर. एस.९ पा. २४७). यांचे अगदीं प्रारंभीचे पूर्वज हरिवर्मन् वगैरे आपल्यास ‘ मानव्यसगोत्र ’ इत्यादि विशेषणें जैनलेखांतहि घेतात. बेळगांव जिल्ह्यांतील पळसिंगे येथें हे कित्येक जैन लेख सांपडले आहेत. ( बॉंबे जे. आर. ए. एस्. पा. २३५ ते २४१ )

शेवटलें मांडलिकी घराणें वर्णावयाचें म्हणजे कऱ्हाड अथवा कोल्हापूर येथील शिलाहार घराणें होय. हें शुद्ध मराठा क्षत्रिय घराणें असून याचे लेख संस्कृतांत आहेत. मूळ शिलाहारांच्या तीन शाखा झाल्या. ठाण्याचे, राजापूरचे ( खारेपाटण ) आणि कोल्हापूरचे. हे राष्ट्रकूटांचे मांडलिक होते. यापैकीं ठाण्याचे शिलाहार पूर्वीं सांगितल्याप्रमाणें राष्ट्रकूटांनतर स्वतंत्र झाले. पण कऱ्हाडचे शिलाहार चालुक्यांच्या सत्तेच्या केंद्राला जवळ असल्यानें महामंडलेश्वरच राहिले. तथापि ते बलवान् होते; आणि त्यांनीं कोंकणच्या शिलाहारांचा प्रदेश आपल्या सत्तेखालीं आणला. सणफुल्ल यानें स्थापि-

लेली दक्षिण कोंकणची ( राजापूरची ) शाखा या कालविभागांत नष्ट झाली. अर्थात् या भागांत दोनच शिलाहार राहिले, ठाणे व कऱ्हाड येथील.

हे शिलाहार कऱ्हाड १४०००, मिरज ३०००, कुंडी ४००० आणि दक्षिण कोंकण एवढ्या प्रदेशावर राज्य करीत होते. यांची राजधानी कऱ्हाड होती. यांचा मुख्य किल्ला पनाळ ( प्रणालक ) होता; अर्थात् अलिकडील मराठ्यांच्या इतिहासाशीं या किल्यानें सांखळी लागते. यांची उत्पत्ति पूर्वी सांगितल्याप्रमाणें विद्याधर वंशांत असून हे प्रारंभीं तगरांत राज्य करीत होते. यांचें लांछन सुवर्ण गरुड असून ते आपल्यास "महाक्षत्रिय" म्हणवीत. ( ए. इं. ३ पा. २०९ ). हे कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे भक्त होते. तिच्या प्रसादानें आपल्यास हें ऐश्वर्य मिळालें असें ते मानीत. ठाण्याचे शिलाहार शिवभक्त होते. आणि त्यांची कुलस्वामिनी पार्वती अथवा आर्या द्वैपायनी भागवतांत सांगितलेली होती. ह्या सर्व गोष्टींवरून हीं दोन्ही शिलाहार राजघराणीं मुळांत निःसंशय एक ठरतात.

कऱ्हाडच्या या शिलाहारांचा इतिहास बॉंबे गॅझेटियर व्हॉ. १ भा. २ यांत डॉ. फ्लीट यानीं पा. ५४४मध्यें दिला आहे. आणि डॉ. भांडारकर यांनीं दक्षिणच्या इतिहासांत पा. ९२ वर दिला आहे. दोघांस कोरीव लेखांचाच आधार आहे. आणि त्यावरूनच या काल-विभागांतील ( १००० ते १२०० ) जेतिग दुसरा यापासूनचा इति-हास आम्ही येथें सारांश रूपानें देतों. त्याला चार मुलगे होते. पैकीं गोंकाचा पुत्र नरसिंह याचा इ. स. १०५८चा लेख सांप-डला आहे. हा बलिष्ठ असून यानें कित्येक देवळें बांधिलीं. बहुधा याच्या पूर्वीच गोंकानें दक्षिण कोंकण जिंकलें होतें. हा खिलिगिली या किल्ल्यावरून राज्य करीत असे असें लिहिलें आहे. फ्लीटच्या मतें हा किल्ला निश्चित करितां येत नाहीं, परंतु हा पन्हाळ्याहून दूर

असावा. पण भांडारकर यास पन्हाळाच मानतात. फ्लीटच्या मतें विक्रमांकाची प्रसिद्ध राणी चंद्रलेखा ही याचीच मुलगी असावी. ती शिलाहार राजकन्या होती यांत शंका नाहीं व विक्रमाचा कल्याण येथील राज्यारोहणाचा काल इ. स. १०७६ आहे. तेव्हां हा तर्क संभवनीय आहे. नरसिंहानें बरींच वर्षें राज्य केलें.

नरसिंहाला पांच पुत्र होते. ते त्याच्या मागोमाग राज्यावर आले. ज्येष्ठ गूवल व त्याचा धाकटा भाऊ भोज पहिला ह्यांचे लेख सांपडले आहेत. त्याचा धाकटा भाऊ बल्लाळ याचा एका कानडी लेखांत उल्लेख आहे ( इं. ए. १२ ). शेवटला पुत्र गंडरादित्य याचे अनेक लेख सांपडले आहेत. यानें प्रयाग येथें लक्षब्राह्मण-भोजन घातलें असें वर्णन आहे. मिरज प्रांतांत एक मोठा तलाव यानें बांधला व त्याच्या कांठीं शिव, बुद्ध आणि जिन यांचीं देवालयें बांधिलीं. याची राज्यव्यवस्था चांगली व न्यायाची होती (भांडारकर).

याच्यामागून विजयादित्य गादीवर बसला. याचे दोन लेख इ. स. ११४८ व ११६३ चे सांपडले आहेत. एका लेखांत एका जैन देवळास गांव दिला असून जिनाचें नमन प्रारंभीं आहे ( ए. इं. ३ पा. २०७ ). यांत विजयादित्याची थोडक्यांत वंशावळ सुटसुटित स्तुतिविरहित दिली असून दान करणाऱ्याची प्रशंसा मात्र विस्तारानें दिली आहे. विजयादित्याला अनेक बिरुदें लाविलेलीं आहेत. त्यांत कित्येक कानडी आहेत. पैकीं शनवारसिद्धि हें चमत्कारिक असून त्याचा अर्थ लक्षांत येत नाहीं. या जैन लेखांतहि महालक्ष्मीच्या प्रसादानें यास वैभव मिळालें असें वर्णन आहे. त्यावरून हे शिलाहार हिंदु होते यांत शंका नाहीं. पण हे राजे जैनांचे चहाते होते असें दिसतें. यामुळें कुमारपालाच्या वेळेस जसा गुजराथेंत जैनधर्माचा प्रसार झाला, तसा दक्षिण महाराष्ट्रांत यांच्या वेळीं जैनधर्माचा प्रसार झाला. याचा पुत्र भोज दुसरा याच्या दानलेखा-

वरून असें दिसतें कीं, विजयादित्य हा प्रतापी राजा असून ठाण्याचा शिलाहार राजा ( बहुधा मल्लिकार्जुन ) यास आपलें राज्य परत मिळविण्यास यानें मदत केली. यानें गोव्याच्या कदंबासहि मदत केली. कल्याणच्या चालुक्यांची सत्ता इ. स. ११५७ च्या सुमारें विज्जल कलचूरीनें बळकाविली. त्यासहि ह्यानें मदत केल्याचें दिसतें. तेव्हां विजयादित्याची सत्ता पुष्कळच वाढली. याचा पुत्र भोज दुसरा यानें स्वातंत्र्य धारण केलें यांत नवल नाहीं. अर्थात् यावेळीं लिहिलेल्या एका जैन ग्रंथांत ह्यास महाराज पश्चिम--चक्रवर्ती असें म्हटलें आहे. उत्तरेचे शिलाहार याचवेळीं आपल्यास कोंकण चक्रवर्ती म्हणवूं लागले हें स्मरणांत येईल.

भोज दुसरा याचे अनेक लेख इ. स. ११७९ पासून १२०५ पर्यंतचे मिळाले आहेत. त्यानें ब्राह्मणांस व जैन देवालयांसहि दानें दिलीं आहेत. ए. इ.३ पा.२१४ यावर छापलेल्या दानलेखांत दोन करहाटक घैसास ब्राह्मणांचा उल्लेख आहे. या नावांचें महत्त्व आम्ही पुढें सांगूं. पण ब्राह्मणांचें गोत्र–शाखाभेदाशिवाय उपनांव किंवा पोटभेदांचें नांव प्रथमच या लेखांत येतें. तसेंच मराठे सरदारास नायक ही संज्ञा या लेखांत प्रथम दिसते. भोज जरी बलवान् होता, तरी त्यास आपलें स्वातंत्र्य कायम राखतां आलें नाहीं, आणि या कुलास प्राच्य चालुक्यानंतर साम्राज्य मिळविणाऱ्या यादवानीं जिंकलें. इ. स. १२०५ नंतर या कुलाचा कोठें उल्लेख सांपडत नाहीं; तेव्हां हा बहुतेक निश्चय होतो कीं, राज्य करणारें कुल या नात्यानें शिलाहार ( शेलार ) पुढें राहिले नाहींत.

# वंशावळी.

## (१) शिलाहारांची वंशावळ.

१ जाटिग २ रा.

गोंक — तीन बंधु.

गोंक → नरसिंह १०५८

नरसिंह १०५८ → गुवल, भोज, बल्लाळ, गंडरादित्य, विजयादित्य

विजयादित्य → भोज दुसरा ११७९-१२०५

## (२) सौंदत्तीच्या रट्टांची वंशावळ.

कीर्तवीर्य १ ला ( ९८० इ. स. )

कन्नकैर पहिला

एरंग ( १०४० इ. ) — अंक ( १०४८ )

एरंग → सेन पहिला

सेन पहिला → कन्नकैर दुसरा (१०५८-१०७६ १०८२-१०७७) — कार्तवीर्य दुसरा १०६९,१०७६,१०८६,८७

कार्तवीर्य दुसरा → सेन दुसरा ( १०९६,११०२,११२८ )

कार्तवीर्य तिसरा ( ११४३.११६५ )

लक्ष्मीदेव दुसरा

कार्तवीर्य चौथा ११९९व१२१८ — मल्लिकार्जुन १२०१,६

कार्तवीर्य चौथा → लक्ष्मीदेव दु. १२२०

### (३) गोव्याच्या कदंबाची वंशावळ.

गुहल्ल
|
छट्ट ऊर्फ षष्ठदेव ( १००७,१००८ )
|
जयकेशिन् पहिला (१०५२,५३ )
|
विजयादित्य
|
जयकेशिन् दुसरा ( ११२९-११२५ )
| राणी मैनलदेवी विक्रमादित्य ६ ह्याची कन्या.

शिवचित्त पेरमाडी (११४७,४८,) — विष्णुचित्त,विजयादित्य दु. ( ११५८-११७२ )
|
जयकेशिन् तिसरा ( ११८७--१२१० )
|
त्रिभुवनमल्ल
|
छट्टय शिवचित्त, शष्ठदेव दुसरा
( १२४६,४७, आणि १२५७ )

### (४) हनगलच्या कदंबाची वंशावळ.

छट्ट ( १००० )
|
जयसिंह ( १०२० )

मावली तैल पहिला (१०४०) — शांतिवर्मन् (१०८९)

मावली तैल पहिला → कीर्तिवर्मन २ रा

शांतिवर्मन् → तैल दुसरा (१०९९,११२९)

तैल दुसरा → मयूरवर्मन दुसरा (११३१); मल्लिकार्जुन (११३२--११४५); तैलम (११४९)

मल्लिकार्जुन → कीर्तिदेव दुसरा (१०६८)

तैलम → कामदेव (११८१--१२०३)

# प्रकरण सोळावें

## उत्तर हिंदुस्थानांतील महत्त्वाचीं मांडलिक घराणीं.

या कालविभागांत उत्तर हिंदुस्थानांत राज्य करणाऱ्या ज्या मांडलिक घराण्यांचे कोरीव लेख मिळाले आहेत, त्यांचा संक्षिप्त इतिहास या प्रकरणांत देण्याचा विचार केला आहे. उत्तरेच्या पूर्वेकडील कोपऱ्यास प्रारंभ करितांना आपल्यास प्रथम आसामचें राज्य दिसेल. भारतेतिहासाच्या एकंदर काळांत आसाम कधीं स्वतंत्र तर कधीं बंगालचे मांडलिक रहात आलें आहे. या काळांत एक ब्राह्मण सेनापति वैद्यदेव येथें राज्य करीत असून त्यानें आपला अधिराज गौडाचा कुमारपाल याच्या तर्फे एक दानलेख केला आहे ( ए. इं. २ पा. ३५१ ); याचा उल्लेख आम्हीं पूर्वी केलाच आहे. नंतर बिहार अथवा अंग येथील मांडलिक राजा राष्ट्रकूट महण गौडाच्या रामपालाचा मामा मांडलिक असून त्याचाहि उल्लेख पूर्वी आला आहे.बंगालबहारांत आणखी मांडलिक असावेत पण त्यांत हे आसाम (कामरूप) व बहार ( अंग ) मुख्य दिसतात.

आतां पालांच्या गौड राज्याच्या दक्षिणेस आपल्यास दक्षिण कोसलांत रत्नपूर येथें हैहय कलचुरींची एक शाखा दिसते. किलहॉर्ननें यांची वंशावळ पुढीलप्रमाणें दिली आहे (ए. इं. ८). कोकल्ल यास अठरा पुत्र असून त्यांपैकीं एका धाकट्या पुत्राचा वंशज कलिंगराज यानें हा देश जिंकला. याच्या मागून याचा पुत्र कमलराज व त्यामागें त्याचा पुत्र रत्नराज गादीवर आले. यानेंच रत्नपूर वसविलें व तेथें एक सुंदर शिवालय बांधिलें."यामुळें शिवाच्या सतत सान्निध्यानें हें शहर कुबेरपुरीशीं स्पर्धा करूं लागले." याचा पुत्र पृथ्वीराज होता. व त्याचा पुत्र जाजल्ल पहिला.याचा लेख ११४चा सांपडला आहे.ए.इं.

१ पा. ३४ यांत एक गांव आपल्या गुरु रुदनसिंगासाठीं एका शिवदेवालयास दिलें आहे. यानें जाजल्लपुर नांवाचें शहर वसविलें. याचा पुत्र रत्नदेव दुसरा यानें त्रिकालिंगाच्या प्राच्य गंगांचा पराभव केल्याचें वर्णन आहे. याचा पुत्र पृथ्वीदेव दुसरा याचा एक लेख ११४१चा सांपडला आहे. (इं. ए. १० पा. ८४). याचा पुत्र जाजल्ल दुसरा यानें इ. स. ११६७त केलेला दानलेख सांपडला आहे. (ए. इं. १ पा. ४०); आणि याचा पुत्र रत्नदेव तिसरा याचा लेख ११८१चा ( इ. ए. २२ पा. ८२ ) सांपडला आहे. याचा पुत्र पृथ्वीदेव तिसरा याचाहि लेख ११९०चा ( ए. इं. १ पा. ४७ ) मिळाला आहे. हें घराणें स्वतंत्र दिसतें. त्रिपुराच्या हैहय राजकुलाशीं त्यांचें मांडलिकी नातें नांवापुरतेंच असावें. या देशास त्यांच्या लेखांत तोमर म्हटलेलें आहे. हे शिवभक्त व वैदिकधर्माभिमानी क्षत्रियकुल होतें. कारण यांच्या लेखांत यांचें कृष्णात्रेय गोत्र प्रवरासह दिलेलें असते ( ए. इं. १ पा. ४० ).

हल्लींच्या यू. पी. कडे वळून पाहतां औध, अंतर्वेद आणि बुंदेलखंड यांत बरींच मांडलिक घराणीं असावींत. परंतु आपल्यास दोनच रजपूत घराण्यांचा उल्लेख मिळतो व तीं अद्याप कायम आहेत. हल्लींच्या यू. पी. मध्यें गौतमाचें प्रसिद्ध रजपूतघराणें आहे. फत्तेपूरगॅझेटियरमध्यें हें घराणें फारच प्राचीन असून याचें गोत्र भारद्वाज आहे असें सांगितलें आहे. अर्गळच्या एका गौतमराजास जयचंदाची बहीण दिली होती. जयचंदाचा खजिना अस्नीच्या किल्ल्यांत होता असें वर्णन आहे, तो बहुधा यांच्या ताब्यांत असावा. दुसरें घराणें सेंगरांचें होय. यांचा एक लेखहि सांपडला आहे. छत्तिस राजकुलांच्या यादींत यांचें नांव आहे. यांचें हल्लीचें राजघराणें जगमनपूरचे महाराज होत. जगमनपूर जालोन जिल्ह्यांत आहे. यांची एक लहान शाखा इटावा जिल्ह्यांतील भरेह येथें आहे. ऋष्यशृंग आणि दशरथाची कन्या, रामाची

बहीण शांता यांपासून हें कुल झालें असें मानतात. हें प्रथम अंग अथवा बिहार येथें होतें. तेथें सेंगारांचा पहिला राजा दशरथ-कन्या शांता हिचा पुत्र चतुरंग राज्य करीत होता. दुर्योधनानें कर्णास अंग राज्य दिल्यावर सेंगार मध्यप्रांत ( पश्चिम ) आणि मध्य हिंदुस्थान (पूर्व) असा पसरलेला डहाल देश आहे तेथें आले. तेथें त्यांनीं पुष्कळ वर्षें राज्य केलें. तेथें त्यांचीं हल्लीं संस्थानेंहि अवशिष्ट आहेत. महाराष्ट्रांत व गुजराथेंतहि त्यांचें राज्य होतें असें तें म्हणतात; आणि कांहीं सेंगार पूर्वेकडे जाऊन बंगालच्या राढ प्रांतांत त्यानीं एक राज्य बरद्वान येथें स्थापिलें. आणि बरद्वानचा एक राजपुत्र सिंव्हलद्वीपास जाऊन तेथें त्यानें आपलें राज्य स्थापिलें. या राजपुत्राचा बाप सिंहबाहु यावरून सिंव्हल हें नांव पडलें असा महावंशोत दाखला मिळतो. यांचा एक राजा कर्ण यानें यमुनेच्या दक्षिण किनाऱ्यावर असलेलें कनार ( कर्णावती) हें शहर स्थापिलें.जगमनपूरच्या सेंगारांच्या सत्तेचें मूळ ठिकाण कनार हें आहे. येथें अद्याप एक पुराण्या किल्ल्याचा अवशेष असून तेथें जगमनपूरचे महाराज दसऱ्याच्या दिवशीं दर्शनास जातात. माळव्यांतील सिरोंज येथेंहि (गुजराथ येथून येथें ते आले) अलीकडे मोंगलांच्या वेळेपर्यंत यांचें राज्य होतें.

या कुलाचा जो लेख सांपडला आहे तो बनारसहून प्रसिद्ध झाला आहे. तेथें बहुधा हा दान देणारा राजा यात्रेनिमित्त गेला असावा. इ. स. ११३४ ( संवत् ११९१ ) त, गोविंदचंद्र राज्य करीत असतां,सिंगरान्व यवत्सराज यानें ब्राह्मणांस एक गांव दान दिला. या लेखाची तऱ्हा गाहडवालांच्या लेखाप्रमाणें आहे. यांत ज्यानें प्रथम राजपट्टी म्हणजे मांडलिकी राजमुकुट मिळविला तो सिंगरोटाहून आला असें वर्णन आहे. वत्सराजाच्या पूर्वजांचीं नांवें येणेंप्रमाणें दिलीं आहेतः—१ कमलपाल, २ ल्हण, ३ कुमार, ४ लोहडदेव आणि ५ दान देणारा, वत्सराज यावरून कुलस्थापक कमलपाल हा इ.

स. १०५० च्या सुमारास येतो. अर्थात् त्याचें राज्य गाहडवालांच्या उदयापूर्वींपासून होतें. कनारच्या विशोकदेवास जयचंदाची मुलगी दिली होती, अशी यांच्यांत माहिती चालू आहे. हें राजकुल धर्मनिष्ठ वैदिकधर्मी क्षत्रियकुल होतें. यांचें गोत्र शांडिल्य या लेखांत सांगितलेंहि आहे ( ए. इ. ४ पा. १३१ ). बहुधा या काळाच्या लेखांत गोत्र सांगितलेलें मिळत नाहीं.

हें सांगण्या सारखें आहे कीं राजा भगवन्तदेव हा कनारच्या मुख्य घराण्याची शाखा भरेह येथील राजा होता. भोजादि राजाप्रमाणें विद्वान असून तो पंडितांचा आश्रयदाता होता. याच्या वेळीं हिंदुधर्मावरील एक प्रसिद्ध ग्रंथ नीलकंठभट्टानें लिहून त्यास या राजाचें नांव भगवंत-भास्कर असें दिलेलें आहे. व्यवहारमयूख हा या ग्रंथाचा एक भाग असून तो कोंकण, गुजराथ वगैरे मुंबई इलाख्याच्या कित्येक भागांत हिंदु लॉचा आधारभूत ग्रंथ मानला जातो.

आतां येथून पश्चिमेकडे जातां मथुरा आणि महावन येथें सुमारें ११५० पर्यंत राज्य करीत असलेले यादव हे आपल्या समोर येतात. या यादवांच्या एका शाखेनें इ. स. ९९३ मध्यें बियाना येथें एक राज्य स्थापिलें. यांचा एक लेख इ. स. ११४३ चा बियाना येथें सांपडला आहे. मुसलमानी बखरींतून या जागेवर शिहाबुद्दिनानें हल्ला केल्याचें आपल्यास समजतें. त्यानें इ. स. ११९३ त कुंवरपालास येथून पश्चिमेकडे हांकललें. त्यापासून हल्लींचें केरोलीचें राजघराणें उत्पन्न झालें आहे ( गौरीशंकर टॉड ).

मिरत आणि बदाऊं येथील राजांचा उल्लेख यानंतर करावयास पाहिजे. मीरत येथें महमुदाच्या इतिहासांत सांगितलेले डोर रजपूत राज्य करीत होते. हस्तिनापूर मीरत जिल्ह्यांत गंगेच्या किनारी आहे. आणि हे डोर रजपूत कदाचित् पांडवांच्या वंशांतील असतील. पांडवांचे हल्लींचे वंशज तुवर मानले जातात. बदाऊं येथें राष्ट्र-

कूटांची एक शाखा राज्य करीत होती असें तेथील जुन्या किल्ल्यांत सांपडलेल्या लेखावरून सिद्ध आहे (ए. इं. १ पा. ६४ ). या लेखाचा काल दिलेला नाहीं. या लेखावर विस्तृत विवेचन पूर्वी आलेंच आहे. त्यांत राजे सांगितलें आहेत ते १ चंद्र, २ विग्रहपाल, ३ भुवनपाल ४ गोपाल, ५ त्रिभुवनपाल व त्याचा पुत्र ६ मदनपाल ( याच्याविषयीं असा उल्लेख केला आहे कीं, याच्या पराक्रमानें हम्मीर गंगेवर येऊं शकला नाहीं.) ७ देवपाल बंधू, नंतर ८ भीमपाल ९ शूरपाल, नंतर १० अनंतपाल ११ लक्ष्मणपाल भाऊ. बदाऊं कुतुबुद्दीननें इ. स. १२०८ मध्यें घेतलें, तेव्हां हे अकरा राजे सुमारें इ. स. १००० पासून १२०० पर्यंत मानतां येतील.

हे राठोड आणि गाहडवाल, तसेच अंग देशांतील राष्ट्रकूट एकाच वंशाचे आहेत आणि ते सूर्यवंशी असून दक्षिणच्या मालखेडच्या राष्ट्रकूटांहून (हे चंद्रवंशी होते ) भिन्न आहेत, हें आमचें मत पूर्वी सांगितलेंच आहे. मध्य हिंदुस्थानांतील राठोड व गुजराथचे व हथोंडीचे ( राजपुताना ) राठोड दक्षिणच्या राठोडांच्या वंशातले आहेत असें गौरीशंकरांचें मत आहे (टॉड पा. ३६४). जोधपूरचे राठोड हे उत्तरेकडील राठोड वंशांतील असून गाहडवालाप्रमाणें सूर्यवंशी आहेत. आणि दक्षिणेंतील कल्याण येथून आल्याची दंतकथा जरी त्यांच्यांत असली तरी राष्ट्रकूट हें नांव अधिकाराचें असल्यानें सामान्य असूनहि भिन्न कुलाचें असूं शकल्यानें ते मालखेडच्या राष्ट्रकूटांहून भिन्न आहेत.

काठेवाडामध्यें चूडासमा हे यादव आहेत.आणि जाडेजा हेहि यादव आहेत.हीं दोन्हीं कुलें या कालविभागांत राज्य करीत असल्याचा दाखला नाहीं.यांतील कच्छचे जाडेजा गझनीहून आले अशी समजूत आहे महमुदाच्या वेळेपूर्वींच ते आले असतील. पण या बाबतींत कोरीव

लेखाचा आधार नाहीं. काठेवाडांतील सर्वांत महत्त्वाची गुहिल रजपूत कुळी (भावनगरचे हल्लींचे राजे याच कुळींतील आहेत) असून त्यांचा एक लेख मिळाला आहे. त्यावरून ते गुजराथच्या चालुक्यांचे मांडलिक होते. हे गोहिल मेवाडच्या गुलोहिताहून भिन्न आहेत; व चंदाच्या रासामधील छत्तीस रजपूत कुलांच्या यादींत त्यांचा निराळा उल्लेख आहे.

यांच्यानंतरचें महत्त्वाचें मांडलिक घराणें म्हणजे अबूचे परमार होत. परमार मूळचे अबूचेच असावेत. कारण त्यांच्या उत्पत्तीच्या कथेंत पहिला परमार अबूपर्वतावर वसिष्ठाच्या अग्निकुंडांतून उत्पन्न झाला असें सांगितलें आहे. अबूचा पहिला प्रसिद्ध राजा धूमराज होय.पण आपल्या कालविभागाच्या काळाच्या आरंभीं जो परमार राजा होता त्याचा प्रधान देवल यानें देलवाडा येथें इ. स. १०२३ त आदिनाथाचें सुंदर देवालय बांधल्याचा दाखला सांपडतो. त्याचा पुत्र पूर्णपाल हा गुजराथच्या भीमाचा सामंत असून इ.स. १०४५त राज्य करीत होता.याचा पुत्र ध्रुवभट आणि त्याचा पुत्र रामदेव यांचा उल्लेख अबू पर्वतावरील तेजपाल–वस्तुपाल यांच्या प्रशस्तींत आहे. रामपालाच्या नंतर त्याचा पुत्र विक्रमसिंह राजा झाला. कुमारपालाचा अर्णोराजाशीं जो युद्धप्रसंग झाला, त्यांत विक्रमसिंह अर्णोराजाच्या बाजूस जाऊन मिळाला, तेव्हां कुमारपालानें अबूचें मांडलिक राज्य त्याचा पुतण्या यशोधवल यास दिलें. याचा पुत्र प्रसिद्ध वीर धारावर्ष हा होता. हा महमद घोरीशीं झालेल्या युद्धांत गुजराथसेनेचा अधिपति होता. हें युद्ध इ. स. ११७८ मध्यें झालें व त्यांत घोरीचा पराभव झाला, असें मुसलमान इतिहासकारांनींहि लिहिलें आहे. चालुक्यांच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे कीं, यावेळीं गुजराथचा राजा मूलराज अल्पवयी होता. कुतुबुद्दीनाशीं इ. स. ११९७ त झालेल्या युद्धांत गुजराथ सेनेच्या अधिपतींपैकीं एक

धारावर्षच होता. या युद्धांत त्याचा पराभव झाला. याच्या वेळचे अनेक लेख इ. स. ११६३ पासून इ. स. १२०८ पर्यंत मिळाले आहेत ( गौरीशंकराचा टॉड पा. ३८४ ). रासामध्यें अबूचे राजे जेता आणि सलख दिले आहेत हे गौरीशंकराच्या मतें काल्पनिक आहेत. परंतु धारावर्षाचे हे बंधु असतील आणि ते धाकटे असल्यानें पृथ्विराजाकडे जाऊन त्याचे सरदार बनले असतील.

नड्डूलचे चव्हाण हें एक पराक्रमी मांडलिक घराणें असून त्याचा येथें उल्लेख केला पाहिजे. सांबरच्या चव्हाणांची ही एक शाखा होती. पहिला राजा लक्ष्मण हा वाक्पति राजाचा पूर्वी सांगितल्याप्रमाणें धाकटा भाऊ होता ( भा. २ पा. १५१ ). याचे वंशज नड्डूल येथें राज्य करीत होते. आणि ते गुजराथच्या चालुक्यांचे मांडलिक असून त्यांच्या तर्फे नेहमीं लढत. उदाहरणार्थ, एक राजा आसराज कुमारपालाचा सेनापति म्हणून माळव्याशीं लढला. हा एक प्रतापी राजा असून अनेक तलाव व देवळें त्यानें बांधलीं व विद्वानांस आश्रय दिला. याचा धाकटा बंधु माणिकराय याजपासून हल्लीचें बुंदीकोटयाचें प्रसिद्ध घराणें उत्पन्न झालें आहे ( गौरीशंकरचा टॉड पा. ४०८ ). याचा पुत्र अल्हण आणि पौत्र कल्हण यांचे दोन लेख संवत् १२०९ व १२३४ म्हणजे ११५२-११६७ इसवीचे सांपडले आहेत. कल्हणाचा धाकटा भाऊ हाहि एक प्रसिद्ध राजा झाला. अबूजवळ झालेल्या शिहाबुद्दीन घोरी याच्या पराभवाच्या लढाईत हा हिंदुसैन्यांत होता. जालोर व इतर किल्ले याच्या ताब्यांत होते. जेव्हां अल्लाउद्दीनानें जालोरवर स्वारी केली व अल्‌तमशनें मंडावर वर स्वारी केली, त्यावेळीं हा मुसलमानाशीं लढला. गौरीशंकरच्या मतें शेवटचा राजा कन्हडदेव याच्या वेळीं जालोरवर अल्लाउद्दीनानें स्वारी केली ( टॉड पा ४० ).

शेवटचे दोन महत्त्वाचे उत्तर हिंदुस्थानांतील रजपूत येथें नमूद

करण्यासारखे म्हणजे ग्वालेरचे कच्छपघात व दिल्लीचे तोमर हे होत. यांपासूनच हल्लींचे प्रसिद्ध रजपूत कच्छवा आणि तवर हे उत्पन्न झाले आहेत. कच्छपघात कुलाचे अनेक लेख सांपडले आहेत. त्यांत ग्वालेर किल्यावरील प्रसिद्ध सासबहू मंदिरांतील लेख आणि ग्वालेर संस्थानांतील ग्वालेरपासून नैर्ऋत्येस ७६ मैलांवर असलेले दुभकुंड येथील जैन देवालयांतील शिलालेख मुख्य आहेत. त्यावरून कच्छपघातांची पुढील हकीकत आम्ही देतों. गौरीशंकरचा टॉड व किलहॉर्नच्या वंशावळी (ए. इं. ८) याहि आधारास घेतल्या आहेत.

या कच्छपघातांचें राज्य ग्वाल्हेर संस्थानांतील नरवर जिल्ह्यांत प्रारंभीं होतें. महाभारतांत प्रसिद्ध असलेल्या नळाचा निषध देश हाच होय; आणि भवभूतीचा मालतीमाधवांतील सिंधुपारासंगम येथेंच आहे. या राजघराण्याचा एक राजा वज्रदामन् यानें ग्वालेरचा किल्ला कनोजच्या प्रतिहारांच्या साम्राज्याच्या पडत्या काळांत बळकाविला. याचें राज्य ग्वालेरीस इ. स. ९७७च्या सुमारें होतें ( जे. आर. ए. एस. बंगाल ३१ पा. ३९३ ). या लेखांत त्यास महाराजाधिराज म्हटलें आहे, यावरून तो बहुधा स्वतंत्र असावा. परंतु लौकरच त्यास बुंदेलखंडाच्या चंदेलांचें अधिराज्य कबूल करणें भाग पडलें असावें. अर्थात् अल्बेरूनीनें चंदेलांच्या राज्यांत दोन मजबूत किल्ले ग्वालेर व कालंजर सांगितले आहेत तें योग्यच आहे. वज्रदामन् याचा पुत्र मंगलराज याच्या धाकटया पुत्रापासून अलवर आणि जयपूर येथील हल्लींचीं कछवाह रजपूत राजघराणीं उत्पन्न झालीं असें मानतात. ग्वालेरीस मंगलराजाचा पुत्र कीर्तिराज गादीवर बसला. यानें माळव्याचा पराभव केला असें वर्णन आहे, म्हणजे भोजाचा त्यानें पराभव केला असावा. गझनीच्या महमुदानें कीर्तिराजाच्या वेळीं ग्वालेरीवर स्वारी केली असावी. आणि कीर्तिराजानें आपल्या राज्याचा बचाव त्यास तीस हत्ती देऊन आणि

त्याचें नांवाला मांडलिकत्व कबूल करून शहाणपणानें केला. याचा पुत्र मूलदेव यासच त्रैलोक्यमल्ल आणि भुवनमल्ल अशीं नांवें होतीं. याचा पुत्र देवपाल ऊर्फ अपराजित आणि त्याचा पुत्र पद्मपाल. याचा पुतण्या महीपाल ऊर्फ भुवनैकमल्ल. यानें इ. स. १०९३त वर उल्लेखिलेला सासबहूचा लेख लिहविला (इं. ए. १५ पा. ३६). वरील सर्व हकीकत या लेखांत दिली आहे. कीर्तिराजानें पार्वतीपतीचें देऊळ सिंहमन नगरांत बांधलें असें यांत आणखी सांगितलें आहे. ग्वालेर किल्यावरील सासबहू मंदिरांतील हा लेख (११५० संवत्) लिहण्यापूर्वीं थोडाच काळ महीपाल गादीवर आला होता. हें विष्णूचें मंदिर आहे; आणि तें पद्मपालानें सुरू केलें असल्यामुळें या देवास पद्मनाथ असें नांव दिलें आहे. या राजाच्या वेळेपासून कच्छवाह वैष्णव झालेले दिसतात. हें त्यांचें लक्षण अद्याप कायम आहे. वर सांगितलेलें या देवळाचें सासबहु हें नांव कसें पडलें याविषयीं बराच गैरसमज आहे. आमच्या मतें याचा अर्थ मोठें व लहान देऊळ एवढाच आहे. ग्वालियार गॅझेटियरमध्यें हा शब्द सहस्रबाहूवरून व्युत्पादिण्याचा प्रयत्न केला आहे. पण सहस्रबाहु हें नांव शिवाचें किंवा विष्णूचें प्रसिद्ध नाहीं. यामुळें ही व्युत्पत्ति बरोबर दिसत नाहीं. सासबहूचें धाकटें देवालय मोठ्या देवालयासारखेंच असून तें इ. स. ११०८मध्यें बांधलें गेलें (इं. ऍ. १६ पा. ३०१).

महीपालानंतर गौरीशंकरानें पुढील राजे मित्यांसह दिले आहेत (टॉड पा. ३७३); पुत्र त्रिभुवनपाल ऊर्फ मधुसूदनपाल (ग्वालेर गॅझेटियर), इ. स. ११०४; त्याचा पुत्र विजयपाल इ. स. ११३३; त्याचा पुत्र शूरपाल इ. स. ११५५ आणि युवराज अनंगपाल, याचा पुढचा राजा शहाबुद्दीननें इ.स. ११९६त ग्वालेर किल्ल्याला वेढा दिला त्यावेळीं नेथें असलेला सोळंखपाल असावा. परंतु ग्वालेर गॅझेटियरमध्यें असें सांगि-

तलें आहे कीं, इ. स. ११२९तच परिहारानी कच्छवाहापासून ग्वालेरचा किल्ला घेतला. हें खरें असेल तर हा सोलंखपाल परिहार ठरतो. हा किल्ला शेवटीं कुतुबुद्दीनच्या स्वाधीन झाला असें दिसतें. पण श्रीमन्त बळवंतराव भय्यासाहेब शिंदे यानीं प्रसिद्ध केलेल्या ग्वालेरनाम्यांत असें सांगितलें आहे कीं, तो किल्ला परिहारानीं पुनः घेतला; आणि अल्तमशनें तो पुढें सांगितल्याप्रमाणें परत घेतला. मुसलमानांची नवी राजधानी दिल्ली जवळ आहे असें वाटून कच्छपघातांनीं तो किल्ला सोडुन दूर प्रयाण केलें असावें किंवा ते नरवरला परत गेले असावे.

ग्वालेरच्या नैऋत्येस ७६ मैलांवर असलेल्या दुभकुंडास या घराण्याची एक शाखा राज्य करीत होती, तिचे दोन लेख सांपडले आहेत (इं. ए. १४ पा. १०) आणि (ए. इं. पा. २९३). या लेखांत फार मनोरंजक माहिती मिळते. यांत सांगितलेला पहिला राजा युवराज होय; आणि याचा पुत्र अर्जुन. यानें राज्यपाल कनोजचा प्रतिहार राजा यास बाणांनीं ठार केलें.चंदेल्ल राजा गंड व त्याचा मदतगार ग्वालेरचा कच्छपघात राजा कीर्तिराज यांच्या नेतृत्वाखालीं रजपूत संयुक्त सैन्यानें राज्यपालावर स्वारी केली त्यावेळेस ही गोष्ट झाली असल्याचें वर्णन पूर्वीं आलेंच आहे. याचा पुत्र अभिमन्यु याचें घोड्यावर बसण्यांत व शस्त्रास्त्रें चालविण्यांत विलक्षण कौशल्य माळव्याच्या भोजानें प्रशंसिलें असें वर्णन आहे.* याचा पुत्र विजयपाल ह्याची मिति इ. स. १०४४ आणि त्याचा पुत्र विक्रमसिंह याची मिति १०८८ निश्चित आहे. हें राजघराणें ग्वालेरच्या

* यस्यात्यद्भुतवाहवाहनमहाशस्त्रप्रयोगादिषु । प्रावीण्यं प्रविकत्थितं पृथुमतिश्रीभोजपृथ्वीभुजा ॥ दुभकुंड ले. इं ए. ३.

घराण्याचें मांडलिक असावें ग्वालेरचे राजे मात्र चंदेल्लांचे जरी नांवाला मांडलिक होते, तरी ते वस्तुस्थितींत स्वतंत्रच होते.

या कुलाचें नांव 'कच्छपाघात' लेखांत 'कच्छपारि' असेंहि आढळतें. कच्छपघात शब्दावरूनच प्राकृत भाषेच्या नियमानुसार कच्छवाह हें हल्लींचें नांव निघतें. कुलांचीं नांवें निरनिराळ्या प्रकारानें उत्पन्न होतात हें आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे; आणि कच्छपघात नांव कसें निघालें हें समजणें दुर्घट आहे. याची व्युत्पत्ति कांहीं असली तरी कच्छवाह कुल उत्तम रजपूत कुलांत नेहमींच गणलें गेलें आहे; आणि चंदाच्या छत्तीस राजकुलांच्या यादींत त्यांचें नांव पहिलें आहे. गाहडवालांच्या उदयापूर्वी यांचा उदय असल्यानें गाहडवालांच्या वेळीं जी यादी पहिली बनली त्यांत यांचें नांव प्रथमच येणें साहजिकच होतें. कारण कनोजच्या नीतिभ्रष्ट झालेल्या प्रतिहार राजास शासन करण्यास निघालेल्या संयुक्त रजपूत सैन्याचें आधिपत्य कच्छपघातांकडेच होतें.

शेवटीं आपल्यास तुवरांचा इतिहास द्यावयास पाहिजे. जसें कच्छपघात शब्दावरून कच्छवाह हें हल्लींचें नांव सहज निघतें तसें शिलालेखांत आलेलें तोमर नांव यावरून तुवर हें नांव सरळ निघतें. अनंगपाल तोमरानें नवव्या शतकांत दिल्ली शहर वसविलें असें मानतात. पण अल्बेरूनीच्या वेळीं हें शहर महत्त्वाचें नव्हतें; आणि प्रतिहारांच्या सत्तेखालीं असलेली दिल्लीची मांडलिकी त्यावेळीं क्षुल्लक असावी. हे तोमर प्राचीन दिल्ली म्हणजे इंद्रप्रस्थ प्रथम स्थापणारे पांडव यांचे सरळ वंशज आहेत असें मानतात. कुतुबुद्दीनाच्या वेळीं दिल्लीजवळ इंद्रपत नांवाचें खेडें होतें, हें तत्कालीन इतिहास ताज्-उल्-मासर् यावरून स्पष्ट आहे (इलियट २पा. २१०). तोमरांचें नांव पूर्वी सांगितल्याप्रमाणें चव्हाणांच्या लेखांत आलेलें आहे. त्यांचे हे शेजारी आणि अर्थात् सहजशत्रु होते. अद्यापपर्यंत तोमरांचें

स्वतःचे लेख सांपडले नाहींत. परंतु इतरांच्या लेखांत त्यांच्या दिल्ली येथील राज्याचा उल्लेख मिळतो, त्यावरून आणि दिल्ली गॅझेटियर-वरून त्यांचा त्रोटक इतिहास आम्हीं पुढें देतों.

दिल्ली येथील प्रसिद्ध लोहस्तंभ मथुरेहून उपटून आणून जुन्या दिल्लीजवळ अनंगपाळ दुसरा यानें इ. स. १०५२ मध्यें उभा केला असें या स्तंभावरील लेखांत म्हटलें आहे. (निदान १५०० वर्षें हा स्तंभ उन्हापावसांत असून बिलकुल गंजला नाहीं व त्यावरील अक्षरें अद्याप स्पष्ट आहेत.). हा राजा कनोजच्या सम्राटांची सत्ता महमुदानें तोडल्यामुळें प्रबळ झाला. अनंगपालाच्या वंशानें दिल्ली व त्या भोंवतालचा प्रदेश यावर सुमारें एक शतक राज्य केल्यावर त्यास वीसलदेव ऊर्फ विग्रहराज तिसरा चाहमान, प्रसिद्ध पृथ्वीराजाचा चुलता, यानें इ. स. ११५२च्या सुमारें जिंकलें. तेव्हांपासून दिल्ली चाहमानांच्या सत्तेखालीं आली. रासामध्यें जी कथा दिली आहे कीं, तोमरांचा शेवटचा राजा अनंगपाल तिसरा निपुत्रिक होता, त्यानें आपल्या मुलीचा मुलगा पृथ्वीराज यास राज्य देऊन बदरिकाश्रमास स्वतः प्रयाण केलें ती कथा काल्पनिक आहे. कारण पृथ्वीराजाची आई तोमर कुलांतील नसून चेदीकुलांतील होती. किंबहुना रासांतील बहुतेक हकीकत काल्पनिक आहे. यामुळें त्यांत सांगितलेल्या अनेक गोष्टी ऐतिहासिक मानण्यास मोठी अडचण आहे. दिल्ली गॅझे-टियरमध्यें असें सांगितलें आहे कीं, लालकोटचा किल्ला ( हा अद्याप दिसतो ) प्रथम अनंतपाल दुसरा यानें बांधला. आणि पृथ्वीराजानें दिल्लीच्या पुराण्या शहराची बाहेरची भिंत बांधली. ती अद्यापहि दाखवितां येते. जेव्हां कुतुबुद्दीननें हल्ला करून शहर घेतलें तेव्हां ही भिंत आणि हा किल्ला कायम होता,आणि तो घेणें अशक्य दिसत होतें.

'दिल्लीचा' गोविंदराय मुसलमानी इतिहासकारांनीं सांगितला असून त्यानें पहिल्या लढाईंत शहाबुद्दीन घोरीला पकडलें असें वर्णन

आहे; आणि दुसऱ्या लढाईंत तो मारला गेला. हा चौहाण होता किंवा तुवर होता हें सांगतां येत नाहीं. या लढाईनंतर तुंवर चोहीकडे पसरले. पण त्यांचा मुख्य भाग चंबलच्या अलीकडे हल्लींच्या ग्वालेरच्या संस्थानांत बसला यामुळें या भागास तवरघार असें म्हणतात. महाराष्ट्रांतहि तवर आले असून माने वगैरे घराणी तवर मानलीं जातात.

जनरल कनिंगहॅम यानें अबुलफजलनें दिलेल्या हकीकतीवरून आणि भाटांच्या लेखांवरून तवरांची वंशावळ दिली आहे; आणि ती गौरी शंकरनें पा. ३४८ वर (टॉड) उतरून घेतली आहे. परंतु तिच्या पुराव्याला कोरीव लेखांचा आधार मिळत नाहीं. दिल्लीचा लालकोट किल्ला बांधणारा अनंगपाल दुसरा याची तांब्याचीं नाणीं मिळाली आहेत (१०५१ इसवी). तोमरांनीं दिल्ली वसविली, तिच्या भोंवतालचा मुलुख हरियान याजवर प्रथम तोमरांचें राज्य असून नंतर चौहानांचें होतें, या गोष्टी संवत् १३८४ म्हणजे इ.स. १३२७ चा एका विहिरींत शिलालेख सांपडला आहे त्यावरून सिद्ध होतात. चौहानांचे तीन राजे येथें झाले, वीसलदेव, सोमेश्वर आणि पृथ्विराज (दिल्ली म्युझियम शिलालेख इं. ए. पा. २१८)*

## टिप्पणी—कच्छपघातांच्या उत्पत्तीविषयीं हरप्रसादशास्त्री यांचें चुकीचें मत.

या भागांत एका प्रसिद्ध हिंदुस्थानच्या पंडिताचे चुकीचें मत आम्हांस खोडावें लागत आहे ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मागील भागांत चंदेल्लांच्या उत्पत्तीविषयीं चुकीचें सर व्हिन्सेन्ट स्मिथ या युरोपियन पंडिताचे मत आम्हांस खोडावें लागलें होतें. भाटांच्या ख्यातांच्या संशोधनाबद्दलचा

---

*देशोऽस्ति हरियानाख्यः पृथिव्यां स्वर्गसंनिभः
ढिल्लिकाख्या पुरी तत्र तोमरैरस्ति निर्मिता ॥
तोमरानन्तरं तस्यां राज्यं निहतकटकम् ।
चाहमाना नृपाश्चक्रुः प्रजापलनतत्पराः ॥

रिपोर्ट ( इ. स. १९१६ ) करितांना महामहोपाध्याय हरप्रसादशास्त्री लिहितात: " कच्छवाह आपली उत्पत्ति रामाचा पुत्र कुश यापासून मानतात. आणि ते असें म्हणतात कीं आम्ही नरवरहून आलों. नरवर हा निषादांचा देश आहे. येथें प्राचीन काळीं कच्छपघात वंशाचे लोक होते. हल्लीचे कच्छवा हे त्यांचे प्रतिनिधि असून अस्पृश्य आहेत. तेव्हां त्यांचे हे राजे केव्हां तरी क्षत्रिय झाले. " यासारखा वेडसर लेख आम्ही आजपर्यंत पाहिला नाहीं. असलीं विलक्षण तर्कबाह्य अनुमानें काढण्यास पंडितांनाहि मोह व्हावा ही दुःखाची गोष्ट आहे. बहुतेक युरोपियन पंडितांचा व थोड्याशा एतद्देशीय पंडितांचा एक दुर्ग्रह असा आहे कीं, क्षत्रिय जाति अस्पृश्यादि मूळच्या रहिवाशांपासून किंवा बाहेरच्या म्लेच्छांपासून उत्पन्न झाल्या हें आम्ही पूर्वीं सांगितलेंच आहे. कित्येक तर्करहित वेडसर अनुमानें या दुर्ग्रहामुळें कशीं निघतात याचें हें फारच लक्ष्यांत राहण्यासारखें उदाहरण आहे.

पहिली गोष्ट अशी कीं, नरवर हा निषादांचा देश नाहीं. याचें खरें नांव निषध हें आहे. या निषधांचा राजा नैषध नल येथें राज्य करीत होता. दुसरी गोष्ट नरवराच्या भोंवतीं कच्छवा नांवाचे कांहीं अस्पृश्य लोक आहेत यावरून असें अनुमान निघूं शकत नाहीं कीं तें पूर्वीच्या कच्छपघातांचे हल्लीचे प्रतिनिधि आहेत. कारण नरवर जिल्ह्यांत राहणारे एकटे कच्छवाच लोक नाहींत; आणि 'कच्छवाहा' हा शब्द 'कच्छवाहून भिन्न आहे. शिवाय कच्छवा लोक येथें पुष्कळ असले तरी त्यांचे राजे हेहि कछवाच असले पाहिजेत असा तर्क करतां येत नाहीं. ही अनुमानदोषाची तऱ्हा नेहमींच्या प्रकारची आहे. याच दोषी रीतीनें व्हिन्सेंट स्मिथ यानें चंदेल्ल गोंड लोकांत राज्य करितात म्हणून स्वतः गोंड आहेत असें अनुमान काढलें. वस्तुतः हिंदुस्थानच्या इतिहासाचा नेहमींचा क्रम असा आहे कीं,रजपूत वीर आपल्या जन्मभूमीतून म्हणजे मध्य देशांतून निघून दूर भिल्ल-गोंडांच्या मुलखांत जाऊन राज्यें स्थापन करितात. याच प्रकारानें बाप्पा रावळानें भिल्लांच्या मुलखांत जाऊन राज्य स्थापन केलें. पण तेवढ्यानें बाप्पा रावळ स्वतः भिल्ल होता असें ठरत नाहीं. ब्रिटिश लोकांनीं बंगाल्यांत राज्य स्थापन केलें म्हणून ब्रिटिश

बंगाली होऊं शकत नाहींत. तेव्हां कच्छवाहा हल्लींच्या अस्पृश्य असलेल्या कच्छवांच्या देशांत राज्य करीत होते म्हणून ते प्रारंभीं स्वतःच कच्छवा होतें असें ठरवितां येणार नाहीं.

तिसरी गोष्ट ही कीं, कच्छवा आणि कच्छवाहा हे शब्द एकच मानले तरी हे दोन्ही लोक एकच जातीचे आहेत असें अनुमान काढण्यापूर्वींहि आपल्यास थोडेसें थांबलें पाहिजे. कच्छवाहा रजपूतानीं तें नांव देशांवरून घेतलें असेल. दुसऱ्या भागांत आम्हीं दाखविलें आहे कीं, गुर्जर प्रतिहार हें नांव प्रतिहारानीं ते गुर्जरांच्या देशांत राज्य करीत होते म्हणून घेतलें. ते स्वतः गुर्जर नव्हते हें आम्ही दाखविलेंच आहे. कदाचित् उलट कच्छवांनीं आपलें नांव आपल्या राज्यकर्त्यांपासून घेतलें असेल. वरिष्ठ जातीचें नांव खालच्या अस्पृश्य जातीनें घेतल्याचीं कित्येक उदाहरणें दाखवितां येतील. उदाहरणार्थ चांभारांत चौहाण वगैरे नावें आहेत. माळव्याच्या सोंदिया लोकांतहि चौहाण, परमार वगैरे नावें आहेत. तेव्हां क्षत्रिय जातीचें नांव व दुसऱ्या एका जातीचें नांव एकच असलें तरी क्षत्रिय जात त्याच वंशाची आहे असें अनुमान काढण्यापूर्वीं थोडेसें थांबलें पाहिजे. आणि कच्छपघात क्षत्रिय तर प्राचीन काळापासून उत्तम रजपूत मानले गेले आहेत; चंदाच्या छत्तीस राजकुलांच्या यादींत त्यांचें नांव पहिलें आहे; तेव्हां कच्छवाहाविषयीं असें अनुमान काढणें गैर आहे. हिंदुस्थानांत जातिभेद पहिल्यापासून फार जोराचा आहे, यामुळें अस्पृश्यांचे अस्पृश्य राजे वरिष्ठ दर्जाचे क्षत्रिय होऊं शकत नाहींत. निदान त्यांनीं धर्माच्या बाबतींत कांहीं तरी विलक्षण पराक्रम करावयास पाहिजे होता; परंतु या अस्पृश्यांच्या कल्पित राजानीं कांहीं पराक्रम केले असल्याचा कोठेंच ठाव ठिकाण लागत नाहीं. तेव्हां अशा प्रसिद्ध रजपूत कुलावर हा केलेला आरोप आश्चर्यजनक आहे.

सर्वांत आश्चर्याची गोष्ट ही कीं, या सर्व तर्काचा जो पाया त्याचा पत्ताच नाहीं असें चौकशी अंतीं कळलें. ग्वालेर संस्थानांतील नरवर येथील मुलकी अधिकारी रा. भालेराव यांचेकडे चौकशीकरितां नरवरांत किंवा नरवराच्या भोंवतीं कच्छवा नांवाची कोणी अस्पृश्य जात नसल्याचें आम्हांस कळलें आहे.

शेवटीं हें सांगावयास पाहिजे कीं, कच्छपघात या शब्दावरून कच्छवाह हा शब्द प्राकृताच्या नियमाप्रमाणें योग्य रीतीनें निघतो. हा शब्द किंवा त्याचा समानार्थक शब्द कच्छपारि हा लेखांत आलेला असून त्याजवरून अशी कल्पना करणें साहजिक आहे कीं, हे कच्छवाहा रजपूत या कल्पित अस्पृश्य कच्छवांचे शत्रु होते आणि ते स्वतः कच्छवा नव्हते. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें कच्छपघात नांव कसें निघालें हें आम्हांस सांगतां येत नाहीं. तरी नरवरजवळ कच्छवा नांवाचे कांहीं अस्पृश्य लोक आहेत (ही गोष्ट वरप्रमाणें खोटी ठरली आहे) असें मानूनहि या नांवाची व्युत्पत्ति सहज लागते. कच्छवा लोकांस मारून यांनीं येथें राज्य केलें म्हणून त्यास कच्छपघात नांव मिळालें असें सरळ अनुमान निघत असतां हरप्रशाद उलटें अनुमान ते स्वतः कच्छवा आहेत असें काढतात हें आश्चर्य नव्हे काय ?

# प्रकरण सतरावें.

## हिमालयांतील राज्यें.

या कालविभागांतील हिमालयांतील राज्यांचा इतिहास देणें बाकी आहे. हीं राज्यें म्हणजे मुख्यतः काश्मीर व नेपाळ, आणि चंपा, नुरपूर, कांगडा, मंडी, सुकेत वगैरे होत. नेपाळचा इतिहास जितका ठाऊक आहे तितका हिंदुकालाच्या शेवटपर्यंतचा आम्ही पूर्वीं दिलेलाच आहे.या भागाच्या कालविभागांत म्हणजे इ.स.१०००पासून १२०० पर्यंत या राज्यांचा इतिहास जो येतो तो आम्ही थोडक्यांत पुनः येथें सांगतों. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या संशोधनावरून विशेषतः पंजाब हिस्टॉरिकल सोसायटीच्या लेखावरून कित्येक गोष्टी नवीन किंवा दुरुस्तीच्या आणखी येथें देतां येतील.

### १ काश्मीर.

या कालविभागाच्या प्रारंभीं काश्मीरच्या राज्यावर लोहरवंश होता. कुप्रसिद्ध दिद्दा राणी मेल्यावर हा वंश आला. ती लोहरच्या एका राजाची मुलगी आणि काबूलच्या भीमशहाची नात होती. आपले पुत्र व पौत्र यांची पालक या नात्यानें व पुढें स्वतःच्या अधिकारानें पुष्कळ वर्षें राज्य केल्यावर ती इ. स. १००३ मध्यें मेली. तेव्हां तिच्या भावाचा पुत्र तिच्या आज्ञेनें काश्मीरच्या गादीवर आला. त्याचाच वंश या सर्व कालविभागांत राज्य करीत होता. या वंशाचे सर्व राजे लायक असल्यामुळें मुसलमानी विजयाच्या लाटेंतून काश्मीरचें राज्य बचावलें. या लाटेनें महमुदाच्या वेळीं पंजाब बुडविलें आणि नंतर शहाबुद्दीन घोरीच्या वेळीं सबंध उत्तर हिंदुस्थान बुडविलें. लोहरवंशाचा इतिहास राजतरंगिणीवरून इ.स.११४३पर्यंत प्रथमभागांत दिलाच आहे. कल्हणचा इतिहास या सालापर्यंतच आहे.पुढील

इतिहास जोनराजाचा पीरिशिष्ट ग्रंथ आहे त्यावरून देतां येईल.पहिल्या भागांत ( पा. २२७–२३२ ) दिलेला इतिहास प्रथम थोडक्यांत आणखी कांहीं माहितीसह देऊं.

सर्व वंशस्थापकांप्रमाणेंच संग्रामराज शहाणा आणि समर्थ राजा होता. त्यानें इ. स. १००३ पासून इ. स. १०२९ पर्यंत राज्य केलें. या भागांत पूर्वीं दाखविलेंच आहे कीं, महमुदानें काश्मीरचा सरहद्दी किल्ला घेण्याचा प्रयत्न दोनदां केला पण तो दोन्ही वेळां फसला. काश्मीर एक मोहोरबंद राज्य होतें. त्याची मोहोर महमुदास तोडतां आली नाहीं. काश्मीराचा बचाव त्याच्या दुर्लंघ्य पर्वतामुळें झाला असें जें स्मिथनें म्हटलें आहे तें बरोबर आहे. पण काश्मीरचा पराभव झाला असें दिसत नाहीं. तथापि भा. १ पा. २२८ वर आम्हीं जें विधान केलें आहे कीं, संग्रामाच्या वेळेस काश्मीरवर स्वारी झालीच नाहीं तें थोडेंसें बदलून असें विधान करणें जरूर आहे कीं, काश्मीरावर दोनदां स्वारी झाली, परंतु महमुदास काश्मीरांत शिरतां आलें नाहीं. शाही राजा त्रिलोचनपाल यानें संग्रामानें पाठविलेल्या काश्मीरच्या फौजेच्या मदतीनें जी लढाई इ. स. १०२१ त केली, तींत त्याचा पराभव झाला हें आम्ही या भागांत व भा. १ पा. २२७ वर वर्णन केलेंच आहे.यापुढें त्रिलोचनपाल एका ठिकाणाहून दुसरीकडे असा पळत राहिला. त्याचा पुत्र भीम याचा मृत्यु इ. स. १०२७ त झाला. परंतु त्याचे दुसरे मुलगे किंवा पुतणे रुद्रपाल वगैरे काश्मीरांतच संग्रामाच्या संरक्षणाखालीं तो त्यांचा संबंधी असल्यामुळें राहिले.

हे शाही राजपुत्र संग्रामाचा पुत्र व उत्तराधिकारी अनंतराज ( १०२९ ते १०३९ ) याच्या फार उपयोगी पडले. याच्या कारकीर्दींत काश्मीरच्या एका राजद्रोही सरदारानें काश्मीरवर तुर्कांची स्वारी आणली व तीस दरदांनीं मदत केली. पण शाही राजपु-

त्रांच्या पराक्रमानें व खुद्द अनंतराजाच्या विक्रमानें या भयंकर सैन्याचा पूर्ण पराभव झाला आणि काश्मीर मुसलमानांच्या सत्तेपासून तीनशें वर्षें बचावलें. या लढाईचें वर्णन भा. १ पा. २२८ वर आम्ही केलेंच आहे. अनंतराज आणि त्याची राणी सूर्यमती एका त्रिगर्त राजाची कन्या हें जोडपें फारच धार्मिक होतें. त्यांनीं बरींच वर्षें न्यायानें व पराक्रमानें राज्य केलें. म्हातारपणीं त्यानीं वनवास पत्करून पुत्र कलश यास गादीवर बसविलें. पण या पुत्रानें त्यांचे फारहाल केले. त्या दुःखानें अनंत मेला आणि त्याची राणी सूर्यमती सती गेली. इतर बाबतींत कलश चांगला राजा निघाला. त्याचा पुत्र हर्ष यानें बंड केलें, पण तो पराभव पावून कैदेंत पडला. कलश इ. स. १०७३ त मेला. तेव्हां त्याचा दुसरा पुत्र उत्कर्ष गादीवर बसला. परंतु लोकांचें प्रेम हर्षावर होतें. कारण त्यावेळच्या सर्व राजामध्यें हर्ष मोठा गुणवान् होता. तो स्वतः विद्वान, संगीताचा भोक्ता आणि विद्वानांचा चहाता होता. किंबहुना त्याची तुलना त्याच्याच नांवाचा कनोजचा हर्ष अथवा माळव्याचा भोज याशीं करितां येईल. पण दोघांच्या अगदीं विरुद्ध त्याचा अंत अत्यंत दुर्दैवी झाला. त्याच्या तर्फें त्याचा दुसरा भाऊ विजयमल्ल यानें उत्कर्षाविरुद्ध बंड केलें. त्यांत उत्कर्षाचा पराभव होऊन तो लढाईंत इ. स. ११८९ त मारला गेला. विजयमल्लानें हर्षास कैदेंतून काढून गादीवर बसविलें व त्यानें इ. स. १०८९ ते ११०१ पर्यंत राज्य केलें. विजयमल्लानें कित्येक निःशंक सल्लागरांच्या नादीं लागून शेवटीं हर्षाविरुद्धहि बंड केलें. पण त्यास त्यांत जय आला नाहीं. हर्षानें यानंतर त्याच्या साथीदारावर निर्दयतेनें जुल्म चालविला आणि त्यामुळें अंदाधुंदी आणि जुल्म इतका माजला कीं, चुलत घराण्यांतील एक राजपुत्र उच्चल यानें एका बंडांत पुढाकार घेतला. हर्षाचा पराभव होऊन राजधानी उच्चलाच्या कबजांत आली. हर्षाच्या राण्यांनीं

राजवाड्यांत आपणांस जाळून घेतलें आणि हर्षानें स्वतः एका मठांत आश्रय घेतला.त्याचा पुत्र भोज काश्मीरांतून हद्दपार केला गेला होता तो त्याच्या मदतीकरितां आला. पण उच्चलाशीं झालेल्या लढाईंत तो मारला गेला. याप्रमाणें दैव चोहोंकडून प्रतिकूल झालेलें पाहून हर्ष मठास वेढा देऊन बसलेल्या सैनिकांवर तलवार घेऊन धावला आणि मारला गेला. याप्रमाणें लोहरवंशाची पहिली शाखा काश्मीरावर सुमारें शंभर वर्षें पराक्रमानें राज्य करून ( इ. स.१००३ ते ११०१ ) उच्छिन्न झाली.

उच्चलानें इ. स. ११११ पर्यंत राज्य केलें. आणि त्याचा भाऊ सुस्सल यानें इ. स. ११२८ पर्यंत राज्य केलें. कल्हणानें इ. स. ११४८ त आपली राजतरंगिणी संपविली, त्यावेळेस सुस्सलाचा पुत्र जयसिंह राज्य करीत होता. हे तिन्ही राजे पराक्रमी व चांगले होते. कल्हणानें बारक्या सारक्या राजकारणाच्या गोष्टी सांगितल्या आहेत, त्याकडे लक्ष देण्याचें कारण नाहीं.

हा लोहरवंश रजपूत होता. अर्थात् काश्मीरांत हिंदुस्थानांतील इतर सर्व भागाप्रमाणें अकराव्या बाराव्या शतकांत रजपूत राजेच होते. यापूर्वींचा पर्वगुप्ताचा वंश वैश्य होता. आणि त्याच्या पूर्वींचा यशस्कराचा वंश ब्राह्मण होता. हे दोन्ही वंश वस्तुस्थितींत क्षत्रियच मानले पाहिजेत. कारण त्यांचा विवाहसंबंध क्षत्रिय घराण्याशीं होत असे. आणि त्यांचा आयुष्यक्रम क्षत्रियांचाच होता. लोहरराज घराणें भट्टी रजपूत होते असें सांगतात.

काश्मीरांतील डामर हे एक लढाऊ, तंटेखोर देशी लोक होते. हे नेहमीं बंडखोरांस मदत करीत. हर्षराजानें या डामरांची कत्तल करण्याचा हुकूम दिला होता. परंतु त्यांनीं दोन बंडखोर राजपुत्रांस मदत देऊन शेवटीं हर्षाचा जीव घेतला (पंजाब जनरल भा. २ पा. ८१).

अर्थात् उच्चलास गादी मिळाली ती सामर्थ्यवान् डामरांच्या मदतीनेंच मिळाली.

जोनराजानें आपल्या तरंगिणींत जयसिंहानंतर १२०० पर्यंत दोनतीन राजे सांगितलें आहेत. त्यांची नांवें सांगण्याची आवश्यकता नाहीं. जयसिंहानें एका त्रिगर्तराजास मुसलमानाच्या विरुद्ध मदत केल्याचें वर्णन पुढें येईल.

## २ नेपाळ.

हिमालयांतील दुसरे मोठें राज्य नेपाळचें होतें. त्याचा पहिल्या कालविभागांतील इतिहास पहिल्या भागांत आम्ही दिला आहे. ( ६०० ते ८०० ). दुसऱ्या कालविभागांत (८०० ते १०००) नेपाळांत एक रजपूत राजवंश राज्य करीत होता. यानेंच नेपाळ शक इ. स. ८८५ चालू केला तो अद्याप चालू आहे. तिसऱ्या कालविभागांत ( इ. स. १००० ते १२०० ) हाच वंश नेपाळांत राज्य करीत असावा. त्यास हिंदू किंवा मुसलमान इतर राजांकडून उपसर्ग झाला नाहीं. त्या वंशांतील राजासंबंधानें कांहीं विशिष्ट माहिती उपलब्ध झालेली नाहीं एवढें सांगून काश्मीर व नेपाळ यांच्या दरम्यान असलेलीं कित्येक महत्त्वाचीं राज्यें पुढें वर्णन करूं अलीकडील संशोधनांत त्याजविषयीं बरीच माहिती मिळाली आहे.

## ३ चंबा.

भाग १ मध्यें चंबा संस्थानबद्दल आम्ही संक्षिप्त माहिती दिलीच आहे. काश्मीरच्या आग्नेयीस हें संस्थान असून ते बहुतेक काश्मीरच्या ताब्याखालीं असे. सूर्यवंशी आदिवर्मन् यानें इ. स. ६२० च्या सुमारें येथील राजवंश स्थापिला असें कनिंगहॅमनें निश्चित केलें. परंतु अलीकडील शिलालेख व ताम्रलेख यांच्या

संशोधनावरून डॉ. व्होजेलनें जी माहिती मिळविली आणि तिच्या वरून अर्कलॉजिकल सर्व्हे रिपोर्ट नवीन माला भाग ३६ हिस्सा १ इ.स. १९११ यांत प्रसिद्ध झाली, आणि पंजाब हिस्टॉरिकल सोसायटीचे जर्नल व्हॉ. २ यांत डॉ. हचिन्सन यांनीं त्याचा संक्षिप्त लेख लिहिला ( पा. ७५ ते ८० ) त्यावरून असें दिसतें कीं, सूर्यवंशी मेरुवर्मन् यानें गंगाकिनाऱ्यावरील कलापग्रामहून येऊन येथें ७०० इसवी सुमारें राज्य स्थापन स्थापन केलें. हळूहळू हें राज्य रावीच्या खोऱ्यांत विस्तार पावलें. त्यावेळीं राजधानी ब्रह्मपूर अथवा ब्रम्होर येथें होती. याचा एक वंशज साहिलवर्मन् यानें हल्लीची राजधानी चंपा स्थापिली. याचें नांव या राज्यांत सर्वतोमुखी आहे. याचा पुत्र युगाकरवर्मन् याचे दोन ताम्रलेख सांपडले आहेत. अद्याप सांपडलेल्या सर्व लेखांत हेच जुने आहेत या सर्व लेखांत इ. स. १३३० पूर्वीं कोणतेंहि शक वर्ष दिलेलें नसून केवळ राज्यवर्ष दिलेलें असतें. इ. स. १३३०च्या लेखांत प्रथम शास्त्रशक ( कलियुग शक ) व विक्रमसंवत् दिला आहे. हे लेख बहुतेक गुप्तकालीन अक्षरांत लिहिले आहेत. पुढील लेखांत शारदा अक्षरें व शेवटीं नागरी अक्षरें उपयोगिलीं आहेत. अक्षरांच्या तऱ्हेवरून वरील दोन लेख १०व्या शतकांतले दिसतात. राजतरांगिणीवरून असें समजतें कीं, काश्मीर राजा अनंत ( १०२८ ते १०६३ ) यानें चंपावर स्वारी करून सालवर्मन् यास जिंकलें. आसटवर्मन् हा कलशाच्या वेळीं काश्मीरास गेला होता. याची बहीण बप्पिका ही कलशाची राणी होती. प्रसिद्ध दुर्दैवी हर्ष हा यांचा पुत्र होता. आणि आसटानें त्यास व त्याचा पुत्र भोज यास मदतहि केली. आसटाचा पुत्र जासट यानें भोजाचा पुत्र भिक्षाचार यास इ. स. ११०३मध्यें मदत केली; परंतु तिचाहि कांहीं उपयोग झाला नाहीं. जासटाच्या नंतरचा राजा उदयवर्मन् यानें मात्र

इ. स. ११२१त सुस्सलाला मदत केली. कारण सुस्सलानें दोन चंपा राजकन्या विवाहिल्या होत्या. काश्मीरांतील भाऊबंदकीच्या या लढाईमुळें चंबा बहुधा स्वतंत्र झाले ( पा. ७९ ).

यानंतरचे चंबाचे राजे इ. स. १२००पर्यंतचे झाले त्यांचीं नुसतीं नांवें आम्हीं देत नाहीं. हें राजघराणें चंबांत हल्लींहि राज्य करीत आहे हें सांगण्यासारखें आहे. या डोंगरी राज्यास मुसलमानी स्वाऱ्या करणाऱ्यानीं,गझनवी महमुदाच्या घराण्यानें किंवा महमदघोरीनें किंवा त्यानंतरच्या बादशहानीं, अकबरापर्यंत उपसर्ग केला नाहीं.

हे सूर्यवंशी क्षत्रिय असून यांचें गोत्र योपनाश्व ( युवनाश्व ? ) दिलेलें आढळतें. या राज्यांत यांच्या पूर्वी आलेले कांहीं स्थानिक राजे आहेत, त्यांना राणा म्हणतात ( कोरीव लेखांत राजानक शब्द येतो ). यांच्याहि पूर्वीं आलेल्या लोकांस राठी किंवा ठाकूर अशी संज्ञा आहे. हे राणाहून कमी दर्जाचे मानले जातात. ( चनाल जेठा, राठी कनेठा अशी येथील म्हण येथें देण्यासारखी आहे ).

## ४ नुरपूर.

नुरपूरचे राज्य हें हिमालयांतील पुराणें संस्थान नाहीं. दिल्लीहून आलेल्या एका तुवर राजपुत्रानें तें स्थापिलें अशी नूरपूरची दंतकथा आहे. त्यानें एका पठाण सरदारास पथानकोट येथून हांकून दिलें व त्यानें डोंगरांत जाऊन नूरपूरचा किल्ला बांधला. याचें मूळचें नांव धनेर होतें; नूरपूर हें नांव नूरजहानवरून पडलें अशीं समजूत आहे. पथानकोट येथें राज्य स्थापण्याचा काल ११ व्या शतकाचा मध्य मानला जातो, पण ही सर्व गोष्ट असंभवनीय दिसते. कारण पंजाब यावेळीं गझनीच्या सामर्थ्ययुक्त राज्याखालीं होतें, तेव्हां एखाद्या रजपूत राजपुत्रानें पथानकोट येथून पठाणांच्या फौजेस हाकून लावून तेथें एक राज्य स्थापिलें हें शक्य नाहीं. ही दन्तकथा पथानकोट या शब्दावर भ्रांत समजुतीनें रचलेली स्पष्ट दिसते. पण पथान हा

शब्द प्रतिष्ठान याचें प्राकृत रूप आहे, आणि आम्हांस असें वाटतें कीं, महमुदाच्या पूर्वीचे प्रतिष्ठान असून येथें एक तोमर राजा असावा, आणि महमुदाच्या स्वाऱ्यामुळें त्यानें पथानकोट सोडून डोंगरांत जाऊन धनेर येथें राज्य स्थापिलें असावें. त्यानें हल्लीं पडक्या स्थितींत असलेला नूरपूरचा किल्ला एका नदीच्या कांठावर मजबूत जागा पाहून तेथें बांधला. या भागांतील कालविभागांत हाच वंश नुरपूर येथें राज्य करीत राहिला, किंबहुना अद्याप पावेतों याच वंशातले राजे येथें आहेत, पण हल्लींच्या राजास राज्याधिकार नाहीं.

या पथानिया रजपूतांचें गोत्र अत्रि आहे. याजवरून अशी शका येते कीं, हे खरोखर तोमर नसावेत. हे आपल्यास पंडीर ( पांडवांचे वंशज ) म्हणवितात. पण पांडवांचें गोत्र आणि त्यांचे हल्लीचे वंशज तोमर यांचें गोत्र वैयाघ्रपद्य आहे. कदाचित् हे पेथानिया धनेर येथें आले तेव्हां नवे पुरोहित करून त्यानीं नवें गोत्र घेतलें असेल. पंजाब हिस्टॉरिकल सोसायटीचें जर्नल व्हॉ. २ पा. १७ यांत असें सांगितलें आहे कीं, पथानकोटचे मूळचें गांव जुन्या किल्ल्याच्या पूर्वेकडील उंचवट्यावर होतें. या किल्ल्याचें ठिकाण तेथें उंच पडलेल्या ढिगाऱ्यानें निश्चित होतें व तेथें जुनीं नाणींहि सांपडतात. यावरूनहि असें दिसतें कीं, पथानकोट हें पठाणानीं वसाविलेलें नवें शहर नसून पुराणें शहर आहे; व त्याचें जुनें नांव प्रतिष्ठान असावें. नुरपूरच्या राजघराण्याच्या दोन वंशावळी एकमेकांहून भिन्न मिळाल्या आहेत. कनिंगहॅमनें इ. स. १०९५ असा नूरपूर घराण्याच्या स्थापनेचा काळ दिला आहे; आणि हा संस्थापक दिल्लीच्या एका राजाचा धाकटा भाऊ जेठपाल होता अशी समजूत आहे. वंशावळींत जस्पाल याजवर अशी टीप दिली आहे कीं, हा संस्थापकापासून पंधराव्या पिढीवर होता, व यानें अल्लाउद्दीन खिलजी ( १२९५ते१३१५ ) यास विरोध केला. वीस वर्षांचें

पिढी धरून ज्येष्ठपालाचा काळ इ. स. १००० सुमारें येतो. अर्थात् हे तोमर दिल्लीहून आलेलें नाहींत असेंच दिसतें. कारण दिल्लीची या वेळेस स्थापनाहि नव्हती. तेव्हां हे पंजाबांतीलच तोमर असावेत आणि त्यानीं महमुदाच्या स्वाऱ्याच्या वेळीं पूर्वींच अस्तित्वांत असलेलें प्रतिष्ठान घेतलें असावें व तेथून ते पुढें नुरपूर येथें डोंगरांत गेले असावे.

## टिप्पणी—नुरपूर येथील किल्ला व देवळें.

घनेर अथवा नुरपूर येथील पडका किल्ला फार मजेची जागा असून नुरपूरच्या गांवालगतच आहे, व हल्लीं तहशील व इस्पिताळ या किल्यांतच आहे. किल्यांत बरेच तलाव आहेत यावरून पूर्वी किल्यास पाण्याचा चांगला पुरवठा होता. यांत एक महादेवाचें लहान मंदिर चांगल्या स्थितींत आहे. पण किल्यांतील सर्वांत महत्त्वाची इमारत म्हणजे एका ढिगारांतून अलीकडे खोदून काढलेला एका जुन्या देवळाचा खालचा चबुतरा ही होय. देवळाचा वरचा भाग नष्ट झालेला आहे. पण चबुतरा चांगल्या स्थितींत असून त्याच्या दगडांवर फारच सुंदर चित्रें कोरलेलीं आहेत. त्यांत पुराणांतील देखावेहि आहेत आणि मध्ययुगीन हिंदु काळांत लोकांच्या राहणींत प्रत्यक्ष फिरणारीं माणसें, हत्ती, घोडे, उंट, गाई ही दाखविलीं आहेत. ही चित्रें हुबेहुब असून त्यांवरून त्यावेळच्या खोदणाऱ्यांची उच्च कला सिद्ध होते. जुन्या दिल्लींतील कुतुब मशिदींतील खांबावर जें खोदकाम आहे तितकेंच, किंबहुना त्याहून सुंदर हें खोदकाम आहे. हें मंदिर विष्णूचें देवालय असावें. मुसलमान मूर्तिभजकांनीं प्रत्येक चित्राचें डोकें टाकीनें उडविलें आहे.

या जुन्या देवळापासून कांहीं अंतरावर एक नवीन देऊळ आहे. हें अकबराचे वेळीं बहुधा बांधलें असावें. यांत मुरलीधराची काळ्या दगडाची एक सुंदर मूर्ति आहे. हीं मूर्ति वरच्या मजल्यावर ठेवलेली आहे. अर्थात् नेहमींच्या सांप्रदायाविरुद्ध ही गोष्ट आहे. खालच्या मजल्यावरलि मोठ्या दालनांत व वरच्या मजल्यावरहि सर्व भिंतीवर कृष्णाच्या बाललीलांची अनेक रंगित चित्रें काढलीं आहेत, तीं फारच

प्रेक्षणीय आहेत. त्यांवरून अकबराच्या वेळीं नुरपूरच्या लोकांचे पोशाख, दागिने व रहाण्याच्या चालीरीति यांची योग्य कल्पना होते.

## ५ मंडी आणि सुकेत.

या डोंगरी संस्थानाचा संक्षिप्त इतिहास पहिल्या भागांत आम्ही दिलाच आहे (पा. ३७९, ३८०). येथें आम्ही कांहीं आणखी माहिती हाचिन्सन आणि व्होजेल् यांच्या लेखावरून (पंजाब जर्नल ७ पा. १४) आमच्या कांहीं विधानासह देतों. हा हिमालयांतील भूभाग कुलूसह एक प्राचीन राज्य होता. त्यांत राहणारे मूळचे लोक कुनिंद नांवाचे होते. हल्लीं येथें शेती करणारे जे मुख्य कनेत हेच ते होत. या देशांत तिबेटहून बौद्ध लोक दरसाल येतात. कारण प्रसिद्ध साधु पद्मसंभव हा मंडी इलाख्यांतील रावळसर तलावावर रहात होता अशी समजूत आहे. हिंदु लोक असें मानतात कीं हें ठिकाण लोमश ऋषीच्या राहाण्याचें होतें.

मंडी सुकेत येथील राजघराणें अत्रिगोत्री चंद्रवंशी रजपूतांचें आहे. यांच्या नांवाच्या शेवटीं नेहमीं सेन उपपद येतें. या उपपदावरून एक चुकीची दंतकथा अशी उत्पन्न झाली आहे कीं, हे लोक बंगाल्यांतून येथें आले व बंगाल्यांत यांचा शेवटचा मोठा राजा लखनौतीचा लक्ष्मणसेन होता ( इ. स. ११६९—११९८ ). सर लेपल् ग्रिफिननें सुद्धां ‘ पंजाबचे राजे ’ ह्या आपल्या पुस्तकांत ही दंतकथा मान्य केली आहे. पण कानिंगहॅम यास ती मान्य नसून त्यानें लक्ष्मणसेनापूर्वीं पांचशें वर्षें सुकेतचे राजघराणें स्थापन झालें असें म्हटलें आहे. हाच सिद्धान्त हाचिन्सन् आणि व्होजेल् यांनीं पूर्वोक्त लेखांत कित्येक कारणांनीं मान्य केला आहे. आमच्या मतें याच सिद्धांताचा आणखी पुरावा बंगालच्या सेनराजांच्या कोरीव लेखांत असा मिळतो कीं, ते कर्नाटकांतून मुळांत आलेले क्षत्रिय होते, असें त्यांत स्पष्ट म्हटलें आहे. याविरुद्ध सुकेतमंडीची दंतकथा अशी आहे कीं, त्यांचे पूर्वज प्रथम इंद्रप्रस्थांत राज्य करीत होते, तेथून ते बंगाल्यांत जाऊन त्यांनीं लखनौतीची स्थापना केली. तात्पर्य नांवावरून उत्पन्न झालेल्या स्थानिक दंतकथा बहुतेक अनैति-

हासिक असतात आणि त्या सोडाव्या लागतात. पथानियांनीं पथानकोट येथून पठाणास हाकलून दिलें ही नांवावरून निघालेली गोष्ट जशी आपणांस सोडून द्यावी लागली, त्याचप्रमाणें सेन नांवावरून निघालेली बंगालमधून लक्ष्मणसेनानंतर लखनौतीहून आपण आलों ही मंडीसुकेत राजांच्या संबंधाची दंतकथा आपल्यास सोडून दिली पाहिजे.

तथापि या संस्थानांतील वंशावळींस आधारभूत मानून त्या आपल्यास विचारांत घेतल्या पाहिजेत. कोरीव लेखाहून जरी त्यांची किंमत कमी आहे तरी या वंशावळींतून कांहीं इतिहास काढतां येईल. भा. १ पा. ३३० मध्यें सांगितल्याप्रमाणें कानिंगहॅमच्या मतें सुकेतमंडी राजवंशाचा संस्थापक वीरसेन यानें हें राज्य इ. स. ७६५ च्या सुमारास स्थापिलें. हें वर्ष कानिंगहॅमनें असें निश्चित केलें कीं, वीरसेनापासून बाहुसेन आणि बाहुसेनपर्यंत ( यांच्यावेळीं राज्याचे दोन भाग सुकेत आणि मंडी असे झाले ) दहा पिढ्या गेल्या. आणि निर्मंडी येथील शिलालेख खोदवणारा समुद्रसेन यापर्यंत सहा आणखी पिढ्या गेल्या. अजबरसेन याचा एक ताम्रलेख सांपडला असून त्यांत प्रथम विक्रम संवत् दिला आहे. तो सं. १५८४ म्हणजे इसवी १५२७ चा आहे. या अजबरसेनापर्यंत समुद्रसेनापासून आणखी अकरा पिढ्या झाल्या. तेव्हां वीरसेनापासून इ. स. १५२७ च्या अजबरसेनापर्यंत २७ पिढ्या होतात आणि दर पिढीस तीस वर्षें धरतां वीरसेनाचा काळ इ. स. १५२७-८१० = ७१७ इसवी होतो; आणि मंडिसंस्थान स्थापणारा बाहुसेन याचा काळ १०१७ किंवा ९८७ इसवी येईल. ढोकळ मानानें बाहुसेनानें १००० इसवीच्या सुमारें मंडी स्थापिली असें धरतां येतें आणि समुद्रसेनानें निर्मंडचा लेख ११५० च्या सुमारें खोदविला. हचिन्सन् आणि व्होजेल यांचें मत असें आहे कीं आपण पंचवीस वर्षांची सरासरी घेतली तरी कांहीं नांवें वंशावळींतून गळलीं असतील याचा विचार करतां कानिंगहॅमनें जो काळ ठरविला आहे तो योग्य दिसतो. या काळाचा मेळ आणखी चंपा येथील दंतकथेशीं मिळतो. चंपाच्या एका राजाची गर्भवती राणी सुकेतच्या राजाकडे आश्रयाला गेली आणि तिचा पुत्र मोषनाश्व यास या राजानें चंपाच्या गादीवर बसाविलें अशी ही दंतकथा आहे.

आपण पंचवीस वर्षें दर पिढीस घेतली तर वीरसेनाचा काळ १५२७ –६७५=८५२ येतो. आणि बाहूसेनाचा काळ ८५२+२५० = ११०२ आणि समुद्रसेनाचा काळ ११०२+१५०=१२५२ येतो. तात्पर्य सुकेत च्या संस्थानाची स्थापना ८०० च्या अलीकडे येऊं शकत नाहीं, आणि मंडीची ११०० च्या अलीकडे. समुद्रसेनाचा शिलालेख १२२७ संवत् म्हणजे ११७० इसवी कानिंगहॅम मानतो, त्याप्रमाणें डॉ. फ्लीट मानीत नाहीं. या लेखांत काळाचा आंकडा फक्त सहा दिला आहे. हा शास्त्र-शकाचा मानतां येईल आणि अक्षरवटिकेच्या तऱ्हेवरून हा लेख सातव्या शतकाच्या अलीकडचा नाहीं असें तो म्हणतो. पण हा अडचण आपण केलेल्या वरील गणितास बाध आणीत नाहीं. कारण निर्मंड लेखाचा लेखक समुद्रसेन वंशावळींतील समुद्रसेनाहून भिन्न धरतां येईल. आणि हीच गोष्ट खरी दिसते; कारण लेखांत सांगितलेले त्याचे पूर्वज वंशावळीं-तील सांगितलेल्या पूर्वजांहून भिन्न आहेत. कांहीं असो; आपण मंडीची स्थापना १००० किंवा ११०० धरली तरी पंजाबांत महमुदाच्या वेळीं किंवा नंतर झालेल्या मुसलमानांच्या स्वाऱ्यामुळें सुकेत राज्य सेन रज-पुतांनीं स्थापन केलें असें दिसतें. शाहुसेन व बाहुसेन हे दोघे भाऊ होते व ते आपसांत भांडले ही दंतकथा नेहमींच्या स्वरूपाची आहे. अशा दंतकथेंत दोन भाऊ जवळ जवळ उच्चाराच्या नांवाचे असतात. तथापि सुकेत हे जुनें राज्य आहे आणि ते ८०० च्या सुमारास स्थापन झालें असें मानतां येईल. ही चमत्कारिक गोष्ट आमच्या नजरेस आली कीं, कांगड्याचे कटोच रजपूत सुकेतच्या घराण्याशीं विवाहसंबंध करितात, पण मंडीच्या घराण्याशीं करीत नाहींत. पण मंडी व सुकेत एकच वंश आहे. ही गोष्ट गुलेरच्या महाराजांनीं आम्हांस सांगितली.

मंडी अथवा सुकेत यांचा १२०० पुढील इतिहास या पुस्तकाच्या बाहेरचा आहे. या डोंगरी रजपूत राज्यावर बराच काळपावेतों मुसलमा-नांच्या स्वाऱ्या झाल्या नाहींत आणि या व पूर्वींच्या कालविभागांत हीं राज्यें काश्मीरच्या अमलाखालीं नसून स्वतंत्र होतीं ( ८००ते१२०० ).

## ६ कश्तवार.

कश्तवारचें (प्राचीन काष्ठवाट) लहानसें संस्थान या कालविभागांत एका रजपूत घराण्याच्या अमलाखालीं काश्मीरच्या साम्राज्यांत अंतर्भूत होतें. आणि काष्ठवाटचा उत्तमराज हें नांव राजतरंगिणीमध्यें १०८७ इसवींत काश्मीरचा राजा कलश याच्या दरबाराला जे आठ मांडलिक आले होते त्या नांवांमध्यें आलें आहे (भा.१ पा.२-१२७). सुकेत आणि मंडीचे राजे या दरबार वर्णनांत नाहींत हें लक्षांत ठेवलें पाहिजे. हचिन्सन आणि व्होजेल यांनीं पंजाब जर्नल भा. ४ (पा. २९-४१) यांत कश्तवार संस्थानच्या इतिहासावर जो लेख लिहिला आहे त्यावरून येथील राजे मंडी व सुकेत येथील घराण्यापैकींच आहेत. आणि हेहि आपण गौड देशाहून आलों असें मानतात. यांच्या नांवाच्या अंतींहि सेन उपपद येतें. पण या नांवावर रचलेली गौड देशाहून आल्याची दंतकथा चुकीची आहे हें आम्हीं वर सांगितलेंच आहे. कश्तवार येथील हल्लींचे राजे मुसलमान असून त्यांनीं दिलेल्या वंशावळींत वर १०८७ चा उत्तमराज नाहीं, यावरून तो या वंशाचा नसावा. तेव्हां सुकेतहून आलेला पहिला राजा कन्हपाल हा यानंतर येथ येऊन त्यानें १२०० च्या सुमारें हें संस्थान जिंकलें असें ठरतें. १२०० नंतरच्या काळांत किंवा मोंगल काळांत झालेल्या राजांची हकीकत व्होजेल आणि हचिन्सन् यांनीं आपल्या लेखांत दिली आहे, तरी ती येथें आपल्यास देण्याची आवश्यकता नाहीं. हल्लीं हें संस्थान काश्मीरचा भाग आहे. रणजितसिंगानें तें जिंकलें. हें घराणें चंद्रवंशी आणि अत्रिगोत्री आहे. उत्तमराज हा कोणत्या गोत्राचा व रजपूत कुलाचा होता तें सांगतां येत नाहीं.

## ७ बल्लापुर (बालोर) अथवा बसोहली.

हें एक दुसरें डोंगरी संस्थान काश्मीरच्या ताब्यांत हल्लीं आहे. येथील राजाचे नांव वर सांगितलेल्या कलशाच्या दरबारांतील आठ मांडलिकांच्या यादींत आहे. ह्यांचा इतिहास हचिन्सन व व्होजेल यांनीं पंजाब जर्नल व्हॉ. २ पा. ७७ ते ९७ वर दिला आहे. त्यावरून आम्ही

आमच्या कालभागांतलि त्यांचा इतिहास देतों. हा राजवंश पांडवांपासून झालेला आहे असें मानतात. ते अलाहाबादेहून प्रथम अलमोड्यास आले, तेथून हरद्वार, तेथून सुकेतमार्गे पहाडांत आले अशी दंतकथा आहे ती, मान्य करण्यासारखी आहे. कारण पांडवांचे शेवटचे पौराणिक वंशज कौशांबी येथें राज्य करीत होते. आणि ऐतिहासिक कालांतील त्यांचा मोठा प्रसिद्ध राजा कथासरित्सागरांतील उदयन होता. हा आपला प्रधान यौगंधरायण यासह कोशांबी येथें राज्य करीत होता. असो, हें कुल चंद्रवंशी ठरतें; पण यांचें गोत्र सांगितलेलें नाहीं. हा राजवंश हल्लीं नष्ट झाला आहे. तथापि यांच्या भावाबंदाचें वंशज बालोरिया रजपूत म्हणून प्रसिद्ध आहेत. या राज्याची स्थापना ९०० इसवीच्या पूर्वी भोगपालानें केली. त्याची प्राचीन राजधानी वल्लापूर(बालोर) होती. या राजाच्या नांवाच्या शेवटीं पाल उपपद येतें. त्रिलोचनपाल ११ व्या शतकाच्या पूर्वार्धांत राज्य करीत होता. त्याचा पुत्र तुंग व नातू कलश होता. या कलशाचें नांव काश्मीरच्या कलशाच्या दरबारयादींत आहे. पद्मक आणि त्याचा पुत्र आनंद हीं वल्लापूरच्या राजाचीं आणखी दोन नांवें तरंगिणींत आहेत. पण तीं बालोरिया राजांच्या वंशावळींत मिळत नाहींत. ह्या दोघांनीं हर्षाचा नातु भिक्षाचार यास उच्चल व सुस्सल यांनीं बळकाविलेली काश्मीरची गादी परत मिळविण्याच्या कामीं, ते संबंधी असल्यानें, मदत केली. परंतु त्यांस यश मिळालें नाहीं, व ते शेवटीं उलट पक्षास जाऊन मिळाले. जयसिंहानें बालोरच्या एका राजास राज्यभ्रष्ट केलें असें वर्णन आहे. परंतु जयसिंहाच्या नंतरच्या काळांत या भागचे राजे स्वतंत्र झाले असें दिसतें. त्यांचीं नुसतीं नांवें १२०० पर्यंतची येथें देण्याची आवश्यकता नाहीं.

## ८ कोट-कांगडा.

जालंदर राज्याची हकीकत पूर्वी भा. १ पा. ३३७ यावर दिलीच आहे. हें राज्य, भारतीयुद्धांत सुशर्म्यानें कौरवांच्या बाजूनें युद्ध केलें, तेव्हांपासून चालत आलेलें होतें. हाच कटोच राजांचा ज्ञात पूर्वज होय. त्याच्या वंशांतील हल्लींचे सरळ वारस, महाराजा सर जयचंद, कांगडा

जिल्हा लंबाग्राम येथें राहतात. हे रजपूत राजे विद्वान् असून पूर्व हिमालयांतील रजपूत लोकांत मोठे वजनदार आहेत. त्रिगर्त देशांत मैदानांतील जालंधर व डोंगरांतील कांगडा यांचा समावेश होत असे. त्यांत महमुदाचे वेळीं कोण राजा होता हें अद्याप आम्हांस ठरवितां आलें नाहीं. हा राजा, काबूल पंजाबचा शाही राजा आनंदपाल, याचा मांडलिक असावा हें आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे आणि ह्यानें संयुक्त हिंदूंच्या शेवटल्या लढाईत भाग घेतला असावा. हिंदूंचा पराभव झाल्यावर कांगड्याचा राजा परत येण्यापूर्वीच महमुदानें झपाट्यानें कोट-कांगड्यावर स्वारी केली असावी. किल्याचा कांहीं काळपर्यंत तेथील रखवालदारानीं बचाव केला. परंतु किल्ला शेवटीं पडला आणि आंतील अमोप संपत्तीसह महमुदाच्या ताब्यांत गेला. पूर्वी दिलेल्या टिप्पणींत सांगितल्याप्रमाणें कोट-कांगडा अजेय होता, आणि म्हणूनच तेथें अमोप संपत्ति जमली होती. महमुदाचा समकालीन इतिहासकार उत्बी याच्या लेखावरून असें दिसतें कीं, महमुदाचें प्रचंड सैन्य पाहून संरक्षकांचा धीर खचला, आणि जोराचा विरोध न करितां त्यांनीं शरणचिठ्ठी दिली. आमच्या मतें हे लोक भाडोत्री होते, आपल्या देशाच्या स्वातंत्र्याकरितां लढणारे शूर वीर नव्हते. कारण उत्बी म्हणतो, “ ते शरण आले आणि त्यांनीं सुलतानाच्या निशाणाखालीं नोकरी करण्याचें कबूल केलें. नंतर त्यांनीं दरवाजा उघडला आणि नम्रपणें सुलतानाची नोकरी धरली ” (उत्बी पा. ३४१). याप्रमाणें हा अजेय किल्ला आंतील प्रचंड निधीसह महमुदाच्या हातांत पडला. महमुदानें त्यावर कायमचा कबजा करून जेव्हां तो तेथून परतला तेव्हां तेथें आपले विश्वासू रक्षक ठेविले. त्रिगर्त राजांचें मैदानी राज्य यापुढें नाहींसें झालें आणि त्यांनीं डोंगराचा आश्रय घेतला. त्यांनीं १०४४ त दिल्लीच्या राजांच्या प्रोत्साहनानें चार महिन्यांच्या वेढयानंतर किल्ला पुनः परत घेतला. उत्बीनें एखादें मंदिर किंवा एखादी मूर्ति येथें तोडल्याचें वर्णन केलेलें नाहीं. इतर इतिहासकार मात्र तसें करतात. पण कोणती मूर्ति तोडली याचा कोठें उल्लेख मिळत नाहीं. कांगडा येथें आम्हीं माहिती मिळविली, त्यावरून अंबिका किंवा वज्रेश्वरी देवीचें येथें प्रसिद्ध देवालय होतें. हें देवालय ज्वालामुखीच्या

देवीहून भिन्न होतें. ज्वालामुखी कोट-कांगड्याहून वीस मैल दूर आहे. पूर्वी सांगितल्याप्रमाणें या देवीची मूर्ति महमुदानें तोडली असावी आणि कांगडा राजांनीं किल्ला परत घेतला तेव्हां ती मूर्ति पुनः बसविली असावी.

कांगडा राजांचा १२०० पर्यंतचा इतिहास थोडक्यांत सांगतां येईल. कल्हणानें राजा इंद्रचंद्र याचा उल्लेख १०४० त केला आहे. आणि यानेंच किल्ला परत घेतला असावा. कांगड्यांतील दुसऱ्या राजाचें नांव आपल्यास सांपडत नाहीं. पण जोनराजाच्या तरंगिणींत तुर्कांनीं एका त्रिगर्त राजाचा पराभव केला आणि तो काश्मीरांत पळाला. त्यानें जयसिंहाच्या मदतीनें स्वारी करणाऱ्या तुर्कांचा पराभव करून आपलें राज्य परत मिळविलें असें वर्णन आहे. कटोच राजांच्या वंशावळींतून पुढील राजांचीं नुसतीं नांवें देणें जरूर नाहीं. ही कटोच राजांची वंशावळ हिमालयांतील राजांच्या सर्व वंशावळींत भरंवशालायक आहे हें सांगण्याची जरूरी नाहीं. कांगड्याचें वर्णन आम्ही अन्यत्र प्रकरणांत केलेंच आहे.

# प्रकरण अठरावें

## शेवटचा हिंदु सम्राट् रायपिठोरा.

या वीर्यशाली हिंदु सम्राटाचें चरित्र चंदभाटाच्या रासांत संपूर्णपणें दिलें आहे. चंद भाटास पृथ्विराजाच्या समकालीन मानतात. परंतु हल्लीचा रासा ग्रंथ एका मूळग्रंथाचें अतिशय वाढलेलें स्वरूप आहे आणि त्यांतील कित्येक वृत्तें व विधानें विश्वसनीय आधारावरून ( शिलालेखादि ) खोटीं ठरलीं आहेत. तेव्हां रासांतील चरित्रापैकीं कोणता भाग खरा आहे हें ठरविणें मुष्किल झालें आहे. तथापि आणखी दोन ऐतिहासिक काव्यें आपल्या मदतीस घेण्यासारखीं आहेत. पहिलें पृथ्विराजविजय काव्य. हें पृथ्विराजाचा दरबारकवि एक काश्मीरी पंडित यानें लिहिलें आहे. हें प्रथम ब्यूल्हर यास सांपडले; आणि यांतील सारांश अजमीरचे हरविलास सारडा यानीं अलीकडे प्रसिद्ध केला आहे (जे. आर. ए. एस्. १९१३). दुसरें हमीरकाव्य जे. बी. कीर्तनें यानीं प्रसिद्ध केलेलें. पण पहिलें काव्य अपुरें असून त्यांत पृथ्विराजाची शेवटपर्यंतची हकीकत दिलेली नाहीं. आणि दुसऱ्यांत पृथ्विराजाचा वंशज हम्मीर याचा मुख्य पराक्रम वर्णिलेला आहे. असो, या तीन आधारांवरून पृथ्विराजाचें चरित्र बनविण्याचा प्रयत्न करूं. रासांतील हकीकत जितकी संभाव्य व अविरोधित आहे तितकी आम्ही ग्रहण केली आहे.

पृथ्विराजाचाच एक शिलालेख मदनपूर येथें सांपडला आहे. परमर्दिदेव चंदेल्ल याचा पराभव केल्यानंतर इ. स. ११८२ त ह्या खोदवला गेला. यांत पृथ्विराज सोमेश्वराचा पुत्र आणि अर्णोराजाचा नातु वर्णिला आहे; पण पृथ्विराज व सोमेश्वर यांच्या आईचीं नांवें यांत दिलेली नाहींत. दिल्लीच्या अनंगपालाची मुलगी पृथ्विराजाची

माता होती असें रासा म्हणतो. पण हम्मीरकाव्य आणि पृथ्विराजविजय यांत चेदी हैहय राजपुत्री कर्पूरदेवी त्याची माता होती असें सांगितलें आहे. अर्थात् हें दुसरें विधान जास्त संभवनीय आहे. रासांत पृथ्विराजाचा जन्मकाळ आनंदसंवत् १११५ म्हणजे इ. स. ११४९ दिला आहे व मृत्युसमयीं त्याचें वय त्रेचाळीस वर्षांचें सांगितलें आहे, म्हणजे त्याचा मृत्यु इ. स. ११९२ त योग्य तऱ्हेनें पडतो. पण टॉडनें त्याचा जन्मन्संवत् १२१५ ( इ. स. ११५८ ) दिला आहे. अर्थात् त्याचें मृत्युसमयीं वय चौतीस वर्षांचें ठरतें. रायबहादूर गौरीशंकर ओझा यांच्या मतें जन्मकाळ संवत् १२२५ म्हणजे इ. स. ११६८ असावा. तेव्हां मृत्युसमयीं त्याचें वय चोवीस वर्षांचें येतें, पण हें असंभवनीय दिसतें. बिजोलिया शिलालेखांत ( जे. ए. एस्. बंगाल ५४ भा. १ पा. ३१, ४० ) वीसलदेव ऊर्फ विग्रह तिसरा यानें दिल्ली जिंकली असें सांगितलें आहे व हें वृत्त वीसलाचा दिल्ली येथील लोहस्तंभावर लेख आहे त्यांतहि सांगितलें असून ह्या लेखाचा नक्की काळ ९ एप्रिल ११६४ ( किलहॉर्न इं. ए. १९ पा. २१८ ) असल्यानें हा विजय ११६३ डिसेंबरांत मानतां येतो. बिजोलिया लेखांत वीसलानंतरचा राजा पृथ्विराज दुसरा सांगितला आहे. त्यानें एका जैन देवळास दान दिलें, त्यानंतर सोमेश्वर गादीवर आला व त्यानें दुसऱ्या एका जैन मंदिरास दान दिलें इतकी हकीकत आहे. या लेखाचा काळ इ. स. ११७० आहे. पृथ्वीभट म्हणजे पृथ्विराज दुसरा याचे इ. स. ११६७ व ११६९ चे लेख मिळाले आहेत ( किलहॉर्न ए इं. ८ ). यावरून असा निश्चय होतो कीं, तो ११६४ आणि ११६७ यांच्या दरम्यान गादीवर आला व त्यानें ११६९ पर्यंत राज्य केलें. त्यामागून सोमेश्वर गादीवर आला. त्यानें इ. स. ११७० नंतर किती वर्षें राज्य केलें हें सांगतां येत नाहीं. गौरीशंकरच्या मतें त्यानें १२३६

(इ. स. ११७९) पर्यंत राज्य केलें. बापाच्या मृत्युसमयीं पृथ्विराज लहान होता. त्याच्या वतीनें पृथ्विराज–विजयकाव्यांत सांगितल्याप्रमाणें त्याची आई राज्यकारभार करीत होती. पण ११८२ मध्यें तो इतका मोठा व सामर्थ्यवान् झाला होता कीं, त्यानें परमर्दिदेवाचा पराभव केला. यावेळीं त्याचें वय २१ वर्षांचें धरलें तर त्याचा जन्म ११६१ त येऊन त्याचें वय सोमेश्वराच्या मृत्युसमयीं म्हणजे ११७९ त १८ वर्षें पडतें. या वयाचा हिंदुराजपुत्र अल्पवयी समजला जाणार नाहीं, आणि येथें पृथ्विराजविजय लेखाशीं विरोध येतो. तेव्हां आमच्या मतें ११७९ पर्यंत सोमेश्वरानें राज्य केलें नसावें. असो, पृथ्विराजाच्या जन्माच्या तीन मित्या येणेंप्रमाणें मिळतात. रासा ११४९ इसवी वैशाख वद्य द्वितीया देतो. पृथ्विराज–विजयमध्यें पुढील मिति व ग्रहांची स्थिति दिलेली आहे. ज्येष्ठवद्य द्वादशी-वेशाख शुक्ल पक्ष संपल्यावर मंगळ मकरीं, शनि कुंभांत, गुरु मीनेंत, सूर्य मेषांत, चंद्र वृषभांत आणि बुध मिथुनांत असतां जन्म झाला.* टीड ११५८ इसवी देतो आणि गौरीशंकराच्या मतें ११६८ इ. जन्मकाळ आहे. पृथ्विराजाच्या जन्माच्या वेळीं सोमेश्वर राजा झाला नव्हता. त्याचा भाऊ विग्रह तिसरा राजा असल्यानें तो अनहिलवाडच्या जयसिंह सिद्धराजाच्या दरबारीं रहात असे. सिद्धराजाची मुलगी कांचनदेवी सोमेश्वराची आई होती. पृथ्विराज दुसरा मरण पावल्यावर सोमेश्वर अजमीरास आला आणि त्यानें कांहीं वर्षें राज्य केलें, अशी हकीकत नक्की आहे. ही गोष्ट त्याचीं कांहीं तांब्याचीं नाणीं सांपडलीं असल्यानें सिद्ध आहे. पृथ्विराजाच्या जन्माची

*ही ग्रहस्थिति काल्पनिक दिसते. कारण ज्येष्ठ शु. द्वादशीस सूर्य मेषांत असूं शकणार नाहीं किंवा चंद्र वृषभांत. अर्थात् या काव्यांतहि काल्पनिक ग्रह उच्च व स्वगृहीचे दिले आहेत. या ग्रहस्थितीवरून जन्म वर्ष काढणें शक्य नाहीं. पण जन्माची तिथि व महिना खरा असावा.

जागा रासांत दिल्ली सांगितली आहे, पण ती अनहिलवाड किंवा चेदीची राजधानी त्रिपुर असावी. पृथ्विराजविजय काव्यांत अनहिलवाड सांगितली आहे ( जे. आर. एस्. १९१३ पा. २७३ ).

पृथ्विराजाच्या जन्माचा काल व स्थल यांचा विचार केल्यावर आपण त्याच्या लग्नाकडे वळूं. तो सहजच अल्पवयांतच मोठा मजबूत असावा, आणि त्यावेळच्या हिंदु रिवाजाप्रमाणें त्याचें लग्नहि लवकर झालें असावें. रासांत त्याच्या अनेक राण्या सांगितल्या आहेत. पण पहिली व मुख्य राणी अबूचा जेता परमार याची कन्या इंछिनी ही होती. या लग्नाची हकीकत रासांत दिलेली वेडसर आहे. अबूच्या या परमार सरदाराची थोरली कन्या चालुक्य राजा भीम यास दिली होती. तिच्या धाकटया बहिणीचें विलक्षण लावण्य ऐकून त्यानें तीहि राजकन्या लग्नांत मागितली. पण बापानें तिचें लग्न पृथ्विराजाशीं केलें. यामुळें अबू राज्यावर भीमानें स्वारी केली. इकडून पृथ्विराज भीमावर चालून गेला. तेव्हां भीमानें शिहाबुद्दीन घोरीला पृथ्वीराजावर उत्तरेकडून स्वारी करण्यास उद्युक्त केलें; आणि आपण स्वतः दक्षिणेकडून त्याजवर चालून गेला. पृथ्विराज व त्याचा सेनापति कैमास यांनीं दोघांचा निरनिराळ्यां वेळीं पराभव केला. या वेळीं शहाबुद्दीन पकडला गेला. रासाच्या आश्चर्यकारक अतिशयोक्तीनें शिहाबुद्दीन पृथ्विराजाच्या कैदेंत कित्येकदां सांपडला आहे, आणि दरवेळीं औदार्यानें पृथ्विराजानें त्यास सोडून दिलेलें आहे. परंतु ही गोष्ट असंभवनीय दिसते. असो, पृथ्विराज व परमार राजकन्या इंछिनी यांचें लग्न झालें व या कारणानें गुजराथचा भीम याशीं पृथ्विराजाचें युद्ध होऊन त्यांत भीमाचा पराभव झाला असें मानण्यास हरकत नाहीं.

पृथ्विराजाच्या दुसऱ्या राण्या वर्णन करण्याची जरूरी नाहीं. पण त्याची शेवटची राणी कनोजचा गाहडवाल राजा जयचंद याची

कन्या संयोगिता हिजबद्दल दोन शब्द लिहिले पाहिजेत. रासांत या लग्नावर कादंबरीच रचली आहे. जयचंदानें हिचा स्वयंवर मांडला, तेव्हां त्याचा शत्रु पृथ्विराज यास त्यानें बोलावलें नाहीं, इतकेंच नव्हे तर त्याची थट्टा करण्यासाठीं स्वयंवर मंडपाच्या दरवाजावर त्यास भालदार बनवून त्याची प्रतिकृति उभी केली. पण कलीनें स्वप्नांत संयोगितेचें लग्न पृथ्विराजाशीं पूर्वीच लाविलें असल्यानें तिनें लग्नाची माळ त्या भालदाराच्याच गळ्यांत घातली; वरोदात्त पृथ्विराज लागलीच तेथें पोहोचून त्यानें राजकन्येचें हरण केलें. यावेळीं जयचंदाच्या प्रचंड सैन्याशीं त्यास लढावें लागलें व या युद्धांत दोन्हीकडचे अनेक वीर रणांगणांत पडले. ही सर्व कथा इतकी रमणीय आहे कीं, ती खरी वाटत नाहीं. परंतु कित्येक म्हणतात त्याप्रमाणें ती सर्वथैव खोटी नाहीं असें आम्हांस वाटतें. ज्यूलियटप्रमाणें संयोगितेनें आपली प्रीति पृथ्विराजास कळविली असावी आणि त्यानें एका एकीं कनोजवर हल्ला करून तीस युद्ध करून नेलें असावें. चंदानें रासांत आणि बिल्हणानें यापूर्वी विक्रमांकचरितांत ( ११३५ इ. ) वर्णन केला असला तरी स्वयंवरविधि त्यावेळीं लुप्त होता. असो, या प्रीतिकथानकानें पृथ्विराजाचें नांव लोकांत अजरामर झालें आहे. सर व्हिन्सेंट स्मिथ या लग्नाची मिति-बहुधा रासावरून-११७५ देतो ( प्राचीन इतिहास पा. ३८७ शें. आवृ. ). परंतु टॉडप्रमाणें पृथ्विराजाचा जन्म ११५८ मानला तर ११७५त तो सतरा वर्षांचाच ठरतो. रासाप्रमाणें त्याचें वय सव्वीस वर्षांचें ठरतें. कांहीं झालें तरी पृथ्विराजाचा अंत (इ. ११९२ ), ११७५त लग्न धरलें तर लग्नानंतर १७ वर्षांनीं होतो; पण लग्नानंतर रासाप्रमाणें लवकरच त्याचा अंत झाला. तेव्हां असें संभवनीय दिसतें कीं, हें लग्न ११८५त झालें. हीच मिति रासांत दिलेली आम्हांस आढळली आहे.

११७५ इ. हें वर्ष स्मिथच्या इतिहासांत चुकीनें पडलें असावें असें आम्हांस वाटतें. पृथ्विराजाची एक राणी देवगिरीच्या यादवांपैकीं होती असें रासांत वर्णन आढळतें.

रासामध्यें दिलेल्या पृथ्विराजाच्या चरित्रांतील अनेक गोष्टी ( त्याचा हुशार प्रधान व शूर सेनापति कैमास याचा वध वगैरे ) येथें देण्याची आवश्यकता नाहीं. मुसलमानांच्या युद्धाशिवाय इतर त्याचीं युद्धें झालेलीं जीं संभवनीय दिसतात तीं आम्हीं येथें देतों. त्याच्या शेजारचीं महत्त्वाचीं सामर्थ्यवान् राज्यें गुजराथ, बुंदेलखंड आणि कनोज हीं होतीं. व त्यांवर चालुक्य, चंदेल व गाहडवाल कुलांतले यावेळीं राजे होते. तेहि पराक्रमी व हुशार होते. भीम, परमर्दिदेव आणि जयचंद या प्रत्येकाशीं पृथ्विराजाचें युद्ध झालें. आणि त्या प्रत्येकास पराजित करून त्यानें आपलें वर्चस्व स्थापिलें. या प्रत्येक लढाईत जीं अनेक शूरत्वाचीं कृत्यें झालीं तीं वर्णन करणें जरूर नाहीं. पण अल्ह आणि उदल्ह बनाफरवंशी रजपूत परमर्दिदेवानें आपल्या राज्यांतून हाकून दिले होते; आणि पृथ्विराजानें मोहोबावर स्वारी केली तेव्हां स्वदेशाकरितां तुम्ही परत या अशी आपल्या मातेचा काकुळतीचा निरोप ऐकून परत आले आणि पृथ्वीराजाशीं लढून युद्धांत मरण पावले इत्यादि अनेक वीर्योत्साहजनक व हृदयद्रावक हकीकती चंदाच्या रासांत दिलेल्या आहेत. त्या शूर रजपुतांस अत्यंत प्रिय असल्यानें राजपुतान्यांत चंदाचें काव्य पृथ्वीराजरासा सर्वतोमुखीं झालें आहे. पण इतिहासकारास या सर्व गोष्टी मजबूत समकालीन लेखी पुराव्याच्या अभावीं कितपत खऱ्या आहेत हें ठरवितां येत नाहीं. परमर्दिदेवाशीं लढाई इ. स. ११८२ मध्यें झाली, आणि त्याचा पराभव झाला, ही गोष्ट चंदेल्लांच्याच राज्यांत मदनपूर येथें खोदलेल्या पृथ्विराजाच्या लेखावरून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सिद्ध होत आहे.

हरबिलास सारडा यांनीं जे. आर. ए. एस्. १९१३ मध्यें पृथ्विराजविजय काव्याचा जो सारांश दिला आहे त्यांत पृथ्वीराजाच्या युद्धाचा किंवा त्याच्या विवाहांचा उल्लेख नाहीं. त्यांत दोन प्रधानांचें नांव आलें आहे. एक कदंबवास (कैमास) आणि दुसरा भुवनैकमल्ल. हे मोठे शूर होते, पण त्यांच्या पराक्रमाची हकीकत दिलेली नाहीं. तथापि गुजराथेंतून एक दूत आला आणि त्यानें 'गुजराथेंत शिहा-बुद्दीनचा पराभव केला' ही शुभवार्ता सांगितली असें वर्णन आहे. पृथ्विराज वयांत येऊन स्वतः राज्य करूं लागल्यानंतरची ही हकी-कत आहे. ही लढाई पूर्वीं सांगितल्याप्रमाणें ११७९ मध्यें झाली हें गुजराथच्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. यावेळीं पृथ्वीराज वयांत आला होता. अर्थात् त्याचें लहान वयांतील राज्य अल्पावधीचेंच दिसतें.

या शेजारील राज्यांबरोबर झालेल्या युद्धांचे हानिकारक परिणाम कसे झाले याबद्दल पुढें बोलूं. पण या युद्धांतील विजयानें पृथ्वि-राजाची कीर्ति वाढली आणि उत्तर हिंदुस्थानाचा तो सम्राट् सहजच मान्य झाला. म्हणजे अजमीर आणि दिल्लीचा तो राजा असून उत्तर हिंदुस्थानचा सम्राट् म्हणजे चक्रवर्ती झाला. (ज्याप्रमाणें जॉर्ज पांचवा इंग्लंडचा राजा आणि हिंदुस्थानचा सम्राट् आहे). हे चक्रवर्तित्व रजपूत राजांत नेहमीं तंट्याचें मूळ असे; आणि प्रत्येक राजा पराक्रमी झाला म्हणजे चक्रवर्ती होण्याचा प्रयत्न करी. आपण पाहिलेंच आहे कीं, कोंकणचे शिलाहार राजे आपल्यास कोंकण–चक्रवर्ती म्हणवीत. सम्राटाचा मान मिळविण्याकरितां यावेळीं दोन प्रतिस्पर्धी होते. अजमीरचा पृथ्वीराज आणि कनोजचा जयचंद. जयचंदाचा आजा गोविंदचंद्र हा खरोखरच सर्व उत्तर हिंदुस्थानावर सम्राट् झाला होता. पण त्याच्या पुत्रापासून वीसलदेवानें हा मान हिसकावून घेतला व त्यानें दिल्ली जिंकून आपल्या राज्यास जोडल्यानें चौहानाची सत्ता प्रबळ झाली. पृथ्वीराज आणि जयचंद यांच्यामध्यें

हीच स्पर्धा चालली आणि त्यामुळें हिंदूंची मुसलमानांस घोरीच्या वेळीं विरोध करण्याची ताकद कमी झाली. त्यामुळें दोघांचा नाश कसा झाला हें पुढील प्रकरणांत पाहूं.

टिप्पणी—रासांत पृथ्वीराजाच्या चरित्राच्या पुढील मित्या दिल्या आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | जन्म | आनंद सं. | ११९५=११४९ इ. | =१२०५ | विक्रम सं. |
| २ | दिल्ली येथें दत्तक | ,, | ११२२=११५६ ,, | =१२१३ | ,, |
| ३ | कैमासाशीं युद्ध | ,, | ११४०=११७४ ,, | =१२८१ | ,, |
| ४ | कनोजवर स्वारी | ,, | ११५१=११८५ ,, | =१२४२ | ,, |
| ५ | शेवटचें युद्ध व मृत्यु | | ११५८=११९२ ,, | =१२४९ | ,, |

( रासाची बनारसची आवृत्ति पा. १४० )

# प्रकरण एकोणिसावें

## शहाबुदीन घोरी आणि हिंदूंची शेवटची लढाई.

गझनीचा तुर्की राजा महमूद यानें पंजाबचा उच्छेद केला, आणि घोरचा अफगाण राजा शिहाबुद्दीन यानें उत्तर हिंदुस्थानचा उच्छेद केला. तेव्हां ज्याप्रमाणें गझनीच्या तुर्की राज्याचा उदय पंजाबच्या उच्छेदाचा इतिहास देण्यापूर्वी आम्हांस वर्णन करणें जरूर पडलें, त्याचप्रमाणें उत्तरहिंदुस्थानांतील राजपूतांच्या उच्छेदाचा इतिहास देण्यापूर्वी आम्हांस या घोरच्या राज्याचा इतिहास देणें जरूर आहे.

गझनीच्या वायव्येस घोरचा डोंगरी इलाखा आहे. त्यांत अफगाण जातीचे लोक राहतात. अफगाणिस्थानाच्या इतर भागाप्रमाणेंच येथील राजे व लोक पूर्वी हिंदु होते. गझनीच्या महमुदाच्या वेळीं किंवा थोडेपूर्वी हे मुसलमान केले गेले. गझनीच्या सुलतानांच्या अधिपत्याखालीं पुष्कळ काळ घोरचे राजे राहिले. पण सुलतान बहिरामाच्या वेळीं त्याशीं यांचा तंटा उपस्थित झाला. बहिरामनें अनावश्यक रीतीनें कुतुबुद्दीन घोरीचा वध केला व नंतर सैफुद्दीन त्याचा भाऊ यास गझनी येथें अत्यंत हाल करून ठार केलें. त्याचा तिसरा भाऊ अल्लाउद्दीन यानें सूड घेण्याची प्रतिज्ञा केली आणि तो गझनीवर चालून आला. सुलतान बहिरामहि एक प्रचंड फौज घेऊन गझनीच्या बाहेर पडला. त्याच्या फौजेचें महत्त्वाचें अंग गजसैन्य होतें. कांहीं वीरांच्या शौर्यानें अल्लाउद्दीनानें या गजसैन्याचा पराभव केला. बहिरमाच्या इतर सैन्याचा शेवटीं पराभव झाला तेव्हां तो गझनीस अल्लाउद्दीनच्या रोषास बळी सोडून पळून गेला. अल्लाउद्दीनानें गझनीवर आपला सूड भयंकर रीतीनें उगवला. त्यानें तें शहर सारखें सात दिवस लुटलें व जाळलें. जो जो पुरुष सांपडला तो तो त्यानें

ठार केला, व बायका व मुलें गुलाम केलीं. महमुदी राजांचे वाडे पृथ्वीमध्यें अद्वितीय होते त्या सर्वांचा त्यानें विध्वंस केला. याप्रमाणें क्रूर कृत्य करून आपल्या भावांचे मृतदेह घेऊन तो घोरला परतला व आपल्या पूर्वजांच्या स्मशानांत त्यांस त्यानें पुरलें ( तबकात् नासिरी. इलियट २ पा. २८९ ). राजाच्या गुन्ह्याबद्दल लोकांवर केवढा हा भयंकर सूड !!! बाहिराम हिंदुस्थानांत पळून गेला, पण तो रस्त्यांतच्च मेला. या त्याच्या निर्दय कृत्यामुळें अल्लाउद्दीन घोरीस जहान–सोज ( जगाचा जाळणारा ) असें योग्य रीतीनें म्हणतात. त्याच्या मरणानंतर त्याचा मुलगा गादीवर बसला. पण तो लौकरच मेल्यानें त्याचा पुतण्या घियासुद्दीन महम्मद बिन साम घोरची राजधानी फिरोजकोह येथें राज्य करूं लागला, व त्याचा भाऊ मुएजुद्दीन महम्मद बिन साम गझनी येथें ११७२ त राजा झाला. महमुदी सुलतान खुश्रु हा हिंदुस्थानांत पळाल्यावर गोझ् तुर्कांनीं १२ वर्षें गझनीचा कबजा केला होता, त्यास घोरीनें पिटाळून लाविलें. तो आपला बंधु घियासुद्दीन याच्या तर्फें म्हणून जरी गझनींत राज्य करीत होता तरी वस्तुतः मुखत्यार होता. तो महत्त्वाकांक्षी आणि उत्साही असल्यानें गझनीच्या महमुदी सुलतानांचें हिंदुस्थानांतील सर्व मुलुख किंबहुना सर्व हिंदुस्थान जिंकण्याचा त्यानें विचार करावा हें साहजिक आहे. महंमद घोरीस शिहाबुद्दीन (धर्माचा प्रज्वलित तारा) असा किताब होता.

त्यानें प्रथम मुलतान आणि त्या भोंवतालचा प्रांत ११७५ इसवींत जिंकला. आणि ११७८ त उछ–मुलतानच्या मार्गें नाहरवालावर त्यानें आपली फौज नेली. नाहरवालाचा राजा यावेळीं अल्पवयी होता. तबकातमध्यें त्याचें नांव भीम चुकीनें दिलें आहे. गुजराथच्या इतिहासांत आम्ही सांगितलेंच आहे कीं, याचें नांव मूलराज होतें व तो भीमाचा वडील भाऊ होता. मूलराज अल्पवयी होता तरी त्याज-

वळ मोठी फौज आणि अनेक हत्ती होते. या लढाईत सुलतानाचा पराभव झाला तेव्हां तो परतून गेला.

११७९ इसवींत त्यानें पेशावर घेतलें, व दोन वर्षानंतर सुलतान खुश्रु याची राजधानी लाहोर हिजवर त्यानें हल्ला केला. गझनीच्या राजांची शक्ति कमी होऊन त्यांचें राज्य यावेळीं नष्ट होत चाललें होतें. खुश्रु मलिकनें आपला मुलगा ओलीस पाठविला आणि एक हत्ती नजर केला, तेव्हां घोरीनें यावेळीं त्याची गय केली. त्यानें सिंधकडे लक्ष फिरवून देवाळ जिंकून समुद्रापर्यंतचा सर्व प्रदेश काबीज केला. ११८४ मध्यें तो लाहोरवर पुनः चालून आला. रस्त्यांतील सर्व प्रदेश त्यानें लुटून फस्त केला. पण यावेळीं शियालकोट हें शहर व किल्ला त्यानें बांधला. खुश्रु मलिक यास त्याचा विरोध करितां येईना, तेव्हां तो लाहोरच्या बाहेर येऊन सुलतानाच्या स्वाधीन झाला. त्यास घोरीनें कैद करून फिरोजकोह घोरची राजधानी येथें पाठविलें. तेथून त्याच्या मुलासह ११९१ त एका किल्ल्यावर त्याची रवानगी झाली, तेथेंच सुमारें १२०५ इसवीत तो मारला गेला. गझनवी शेवटचा सुलतान याची ही वर्तणूक आणि मृत्यु, विजापूरच्या शेवटच्या सुलतानाच्या अवरंगजेबाशीं झालेल्या वर्तनाप्रमाणेंच होता. मुएज्जुद्दीन घोरीनें लाहोरास एक अधिकारी नेमला. तेथें तबकात् लिहिणारा ग्रंथकार याच्या बापास हिंदुस्थानच्या फौजेचा त्यानें काजी नेमिलें, असा बंदोबस्त करून तो गझनीस परतला ( इलि. २ पा. २९५ ). याप्रमाणें पंजाबांत जुन्या निःशक्त झालेल्या महमुदी राजवंशाच्या ठिकाणीं नवीन पराक्रमी व महत्वाकांक्षी राजा गझनवींच्या गादीवर आला. त्याचा उत्साह व उरक महमुदासारखाच होता, आणि त्यानें उत्तर हिंदुस्थानच्या रजपूत राजांशीं युद्धें सुरवात करून त्यांचा अंत केला. शेजार शेजारजे राजे याचप्रमाणें इतिहासांत एकमेकांशीं युद्ध करीत आले आहेत.

# प्रकरण विसावें.

## पृथ्विराजाशीं युद्ध.

घोरीच्या राज्यास लागूनच यावेळीं अजमीर व दिल्लीचा राजा पृथ्विराज याचें राज्य होतें. वैयक्तिक गुणांत आणि राज्याच्या सामर्थ्यांत हे दोघे सम्राट् बरोबरीचे होते. या सम्राटांच्या झगडण्याचा इतिहास चंदभाटानें रासांत निराळा दिला आहे आणि निजामउद्दीननें ताजुल्–मासर या ग्रंथांत ( याचाच अनुवाद तबकांत मध्यें आहे) निराळा दिला आहे. दोन्ही बाजू आपापल्या नायकाचे गुण अतिशयोक्तीनें दाखवतात. पण ऐतिहासिक रीतीनें विचार करितां ताज आणि तबकात यांत दिलेली हकीकत, या वृत्तानंतर वीस आणि पन्नास वर्षांनीं लिहिली असल्यानें, रासाच्या हकीकतींपेक्षां अधिक विश्वसनीय आहे. रासाचें हल्लींचें स्वरूप पृथ्विराजानंतर सुमारें तीनशें वर्षांचें असल्यानें त्यांत बहुतेक कथेला अद्भुत रसाची जोड मिळाली आहे. आम्ही या कारणास्तव मुसलमान लेखकांनीं दिलेली हकीकत धरून व त्यास ऐतिहासिक छाननीचा कस लावून पुढील वृत्त देतों. तथापि येथें हें सांगितलें पाहिजे कीं, ताजमधील हकीकत ज्यास्त तपशीलवार आणि काव्ययुक्त नाहीं याबद्दल वाईट वाटतें. अर्थात् ताजचा घोरीचा इतिहास उत्बीनें लिहिलेल्या महमुदाच्या इतिहासाबरोबर मांडतां येत नाहीं.

प्रथम तबकातमधून दिलेला उतारा वाचकांसमोर मांडला पाहिजे ( इलि. २ पा. २९५ ). महमद घोरीनें हिंदूंच्या प्रदेशावर स्वारी करून युद्धास सुरवात केली, आणि सिरहिंदचा किल्ला घेऊन तेथें मुसलमान अधिकारी नेमला. '' रायपिठोरा या किल्ल्यावर चालून आला, तेव्हां सुलतानानें नरायन येथें त्याचा विरोध केला. यावेळीं

हिंदुस्थानचे सर्व राजे 'रायकोला' बरोबर होते." (कोला शब्द निंदाव्यंजक आहे). पृथ्विराजानें या युद्धाकरितां बहुधा हिंदू लोकांचें संयुक्त सैन्य, मुसलमानांची ही हिंदु लोकांच्याविरुद्ध आगाळिक मुळांतच उपटून काढण्यासाठीं, जमविलें असावें; आणि मग सुलतानावर चढाई केली असावी. परंतु संयुक्त सैन्य जमा झाल्याचा उपोद्बलक पुरावा कोरीव लेखांत मिळत नाहीं. "या लढाईंत सुलतान एक भाला घेऊन दिल्लीचा गोविंदराव याजवर चालून गेला. तो हत्तीवर असून सुलतान घोड्यावर होता. गोविंदरायाच्या तोंडावर सुलतानानें भाला मारला आणि त्याचे दोन दांत तोडले; परंतु गोविंदरायानें आपल्या भाल्याच्या फेकीनें सुलतानाच्या बाहूवर जोराची जखम केली. सुलतानानें घोड्याचें तोंड वळवून बाजू काढली. घोड्यावरून कांहीं वेळानें तो पडूं लागला तेव्हां एक तरुण धाडसी अफगाण सुलतानाच्या घोड्यावर उडी मारून बसला आणि त्यास सांवरून त्यानें सुरक्षितपणें घोड्यासह बाहेर काढलें. पण फौजेनें सुलतान मेला असें समजून कच खाऊन पळ काढला. याप्रमाणें मुसलमानांचा हा महत्वाचा पराभव झाला."

हा वृत्तांत खरा आहे किंवा हा पराभव नेहमींप्रमाणें अधिक संख्याबलानें किंवा विशिष्ट युद्धकौशल्यानें किंवा शौर्यानें हिंदूंस मिळाला याची चर्चा करणें आवश्यक नाहीं. एक गोष्ट तथापि येथें सांगण्यासारखीं मुसलमानांच्याच वर्णनावरून दिसते ती ही कीं मुसलमान हिंदुप्रमाणेंच खरोखर पराजय झाला नसला तरी सेनानायक राजा मेल्याची खबर ऐकून पळतात. पण हें आश्चर्यकारक नाहीं. पूर्वेकडील फौजा राष्ट्राकरितां लढत नसून राजाकरितां लढतात. राष्ट्रीय भावना जशी हिंदूंच्या अंतःकरणांत नसते तशी मुसलमानांच्याहि अंतःकरणांत नसते, राष्ट्रीय भावनेऐवजीं धार्मिक भावना असते ती यावेळीं दोन्ही बाजूला सारखींच होती. असो, या लढाईंत

शहाबुद्दीन घोरीचा पक्का पराभव झाला यांत शंका नाहीं (११९१ इ.)

हिंदु लोकांमध्यें अशी समजूत आहे चालत आली आहे कीं, यावेळीं सुलतान पकडला गेला. रासांत वर्णिलेला धीर पुंडीराचा कथाभाग स्पष्टपणें काल्पनिक आहे, तरी पण जेव्हां गोविंदरायानें (याचें नांव रासांत मुळींच आलें नाहीं आणि हा पृथ्विराजाच्या पुढच्या लढाईंत मारला गेला) सुलतानला जबर जखम केली आणि सुलतान आपल्या घोड्यावर डळमळूं लागला, त्यावेळेस पुंडीरनें घोड्यावर उडी मारून त्यास पकडलें असेल आणि शेवटीं कैद केलें असेल. पृथ्विराजानें तीस हत्ती आणि पांचशें घोडे घेऊन सुलतानास परत जाऊं दिलें अशी आणखी समजूत आहे. ही हकीकत ऐतिहासिक रीत्या खरी दिसते. ताजमध्यें या पराजयाचें वर्णनच नाहीं व सुलतानच्या पृथ्विराजावरील दुसऱ्या स्वारीपासूनच हा इतिहासकार शहाणपणानें इतिहास देतो. ही गोष्ट अशक्य आहे कीं, रासांत सांगितल्याप्रमाणें सुलतान अनेक लढायांत पुन्हां पुन्हां कैद झाला आणि पृथ्विराजानें औदार्यानें त्यास दरवेळीं बंधमुक्त केलें. कृष्णाच्या व जरासंधाच्या वेळेपासून तों मुंजापर्यंत लोक असल्या गोष्टी एकाच्या अनेकपट करितात. कल्याणच्या तैलप चालुक्यास मुंजानें सहा वेळ पराजित करून पकडलें आणि सहा वेळ खंडणी घेऊन सोडून दिलें असें गुजराथचे बखरकार अतिशयोक्तीनें सांगतात. पण अतिशयोक्तीला सुद्धां कांहीं आधार असतो, आणि म्हणून शहाबुद्दीनला या लढाईंत कैद झाली आणि पृथ्विरारानें त्यास खंडणी घेऊन सोडून दिलें ही गोष्ट मान्य करण्यासारखी आहे. महमुदानेंहि जयपालास पहिल्या लढाईनंतर अशीच खंडणी घेऊन कैदेंतून मुक्त केल्याचें आपण पाहिलेंच आहे.

या वृत्तासंबंधानें खरी हकीकत कांहीं असो, सुलतानाचा पराभव झाला हें दोन्ही बाजूस मान्य आहे. या लढाईचें ठिकाण नरा-

यन म्हणून दिलें आहे. हें मुळांत तरायन असावें. "लढाईची जागा सरस्वतीच्या मैदानांत सांगितली आहे. पण कनिंगहॅमच्या मतें लढाईचें नक्की ठिकाण रौक्षी नदीच्या कांठीं तराइन पासून चार मैल आणि कर्नालच्या उत्तरेस दहा मैल होतें. तराइन याचें नांव अझीमा बाग असेंहि आहे." (इलियट २ पा. २९५). कर्नाल गॅझेटियर (१९१८) यांत अगदीं अलीकडची माहिती पा. १० वर येणेंप्रमाणें दिली आहे. "ही लढाई नारदकमध्यें नईवाडी नार्दिना गांवाजवळ ठाणेश्वरच्या दक्षिणेस तैरा मैल आणि तरावडीपासून तीन मैलावर झाली."

तबकात नासिरीमध्यें पुढील हकीकत अशी दिली आहे कीं, सुलतान परत फिरल्यावर पृथ्विराजानें सिरहिंदच्या किल्ल्यास वेढा दिला व तो अकरा महिने चालला. हें जर खरें असेल तर सुलतान पकडला जाऊन नंतर बंधमुक्त झाला हें संभवनीय दिसत नाहीं. कारण सुलतानाला सोडतांना त्यानें अन्यायानें घेतलेला किल्ला सोडून देण्याची शर्त त्याजवर निःसंशय घातली गेली असती आणि युद्ध पुढें सुरू राहिलें नसतें. किंबहुना इतक्या लवकर लढाईहि झाली नसती. सुलतानानें परतून तयारी केली आणि एक फारच मोठें सैन्य घेऊन तो लढाईसाठीं पुनः पृथ्वीराजावर चालून आला.

ताज्-उल्-मासिरमध्यें ही सर्व हकीकत गाळून इतिहासास असा प्रारंभ केला आहे कीं, एक विश्वासु आणि पूज्य इसम सुलतानानें अजमीरला पाठविला, आणि पृथ्विराजास असा निरोप कळवला कीं, त्यानें इस्लामी धर्म स्वीकारून सुलतानाचें मांडलिकत्व कबूल करावें. या रीतीनें या ग्रंथांत या प्रकरणास धार्मिक स्वरूप दिलें आहे. महमुदाच्या स्वाऱ्यांप्रमाणें महंमद घोरीच्या या युद्धांत कांहीं धार्मिक हेतु होता असें आम्हांस वाटत नाहीं. जरी मुसलमान लेखक तीस धार्मिक स्वरूप देतात तरी ही लढाई केवळ राज्य-

विस्ताराकरितांच होती; आणि अधिक ऐतिहासिक स्वरूप असलेल्या तबकात ग्रंथांत हिचें वर्णन असेंच केलेंलें आहे.

ताजमध्यें या शेवटल्या लढाईची तपशीलवार हकीकतहि दिली नाहीं. त्यांत एवढेंच म्हटलें आहे कीं, या लढाईंत इस्लामाच्या फौजेचा जय झाला, आणि एकलाख हिंदु तात्काळ नरकाच्या अग्नींत जाऊन पडले. तबकात हा खरा इतिहासग्रंथ आहे. त्यांत महत्त्वाचा तपशील दिला आहे. इस्लामी फौजेंत असलेल्या एका शिपायापासून प्रत्यक्ष हकीकत ऐकून हा लेखक लिहतो कीं, इस्लामी फौज एक लक्ष वीस हजार चिलखत घातलेल्या घोडेस्वारांची होती. ( हिंदूकडील फौजेची संख्या दिलेली नाहीं). सुलतानाची फौज येण्य पूर्वींच किल्ला सर झाला होता. हिंदुफौज परतून नरेनाजवळ पडली होती. ( तेव्हां या दुसऱ्या लढाईचें ठिकाण पूर्वींचेंच होतें असें दिसतें ). या लढाईंत मुसलमानांच्या चालीचें वर्णन तबकातमध्यें पुढील प्रमाणें केलेलें आहे. " सुलतानानें आपली फौज अशी लावली कीं, आपल्या फौजेचा मुख्य भाग निशाणांसह मागेंच ठेविला व तेथें हत्ती ठेवले. हलकीं चिलखतें घातलेले घोडेस्वार यांच्या दहा दहा हजाराच्या चार तुकड्या केल्या व त्यांना पुढें पाठवून शत्रूस पूर्वबाजूस आणि डाव्या बाजूस त्रासवून सोडण्यास सांगितलें. याप्रमाणें शत्रु त्रस्त झाला तेव्हां चौघांनीं मिळून त्याच्यावर भरधांव हल्ला केला. या चालीनें शत्रू विस्कळित झाला आणि पराभव पावला. ईश्वरानें आम्हांस जय दिला आणि शत्रू पळाला. " ( पा. २९७ ).

या लढाईची जी तऱ्हा मुसलमानी इतिहासकार लिहितात त्यावरून जयपाळ व आनंदपाळ यांच्याशीं झालेल्या महमुदाच्या लढाईप्रमाणेंच ती दिसते. म्हणजे घोडेस्वारांच्या तुकड्यांनीं वारंवार हल्ला करणें आणि शेवटीं रिझर्व्ह फौजेनें एकदम हल्ला करणें. अहमदशहा अबदालीचीहि युद्धाची तऱ्हा अशीच होती. हिंदूंनीं कोणत्या तऱ्हेन

या हल्ल्याचा प्रतिकार केला हें कळत नाहीं. रासांतील युद्धाचीं वर्णनें काल्पनिक आहेत आणि चंद हा महाभारतांतील व्यूहांची वर्णनें नक्कल करून निरनिराळ्या प्राण्यांचीं आकृति व्यूहास देतो. रासांतील वर्णनें प्रत्यक्ष पाहणाऱ्यांचीं नसून कित्येक शतकांनंतर कवीच्या कल्पनेंतून निघालेलीं आहेत. कांहीं असो, युद्ध घनघोर झालें आणि लढाईचा परिणाम पुष्कळ वेळ अनिश्चित होता, ही गोष्ट 'परमेश्वरानें आम्हांस जय दिला' ह्या तबकातमधील एका वाक्यावरून दिसून येतें. असई किंवा प्लासी येथील लढायांप्रमाणें शत्रूपाशीं असलेलें हत्यार अधिक सुधारलेलें नसल्यानें किंवा हिंदूहि शूरत्वांत कमी नसल्यानें कित्येक लोक म्हणतात त्याप्रमाणें ही लढाई सहज विजयाची नव्हती. पृथ्विराजानें या शेवटच्या लढाईंत अतिशय पराक्रम केला हें निर्विवाद आहे. यावेळीं त्यास दैव प्रतिकूल होतें. रासामध्यें असें वर्णन केलें आहे कीं, संयोगितेशीं विवाह झाल्यावर पृथ्विराज केवळ ऐषआरामांत दंग झाला आणि त्यानें सैन्याकडे दुर्लक्ष केलें; पण हें सर्व काल्पनिक दिसतें. पृथ्विराज यावेळीं रासांत दाखविल्याप्रमाणें दिल्लींत नसून अजमीरांत होता. दिल्लीचें महत्त्व कुतुबुद्दीनापासून वाढलें. जे इतिहासकार अलीकडच्या काळांत लिहितात त्यांस व खुद्द फिरिस्ता यास, दिल्ली मध्यें आणण्याचा मोह सुटत नाहीं; आणि रासांमध्यें तर सर्व हकीकत दिल्लीचीच दिली आहे. यामुळें रासांतलीं वर्णनें व लढणाऱ्या वीरांचीं नांवें सर्व काल्पनिक आहेत; विशेषतः चितोडच्या समरसिंहाची दिलेली हकीकत त्याज्य आहे, हें पूर्वीं सांगितलेंच आहे.

पृथ्विराजाचा अंत कसा झाला याबद्दल रासांत दिलेली हकीकत अनैतिहासिक कल्पनेची कमाल आहे. यांत नेहमींची सूडाची गोष्ट बनविली आहे. महमद घोरी गक्खरांच्या हातून सिंधुनदीच्या किनाऱ्यावर मारला गेल्याचा वृत्तांत विसरला गेल्यावर कित्येक शतकांनीं

ही सूडाची गोष्ट निघाली. परंतु पृथ्विराज कसा मेला याचें अद्या-पहि पानिपतच्या लढाईंत भाऊसाहेब किंवा जनकोजी शिंदे कसे मेले याप्रमाणेंच गूढ आहे. ताज व तबकात यांत भिन्न वृत्तांत दिला आहे. तबकात इतकेंच म्हणतें कीं, " रायपिठोरा हत्तीवरून खालीं उतरला आणि घोड्यावर बसून भरधांव बाहेर निघाला. पण सरस्वतीजवळ पकडला जाऊन नरकास पाठवला गेला ' ताजची निराळी हकीकत अशी आहे कीं (पा. इ. २ २१५) "अजमीरचा राय पकडला गेला आणि त्यास जीवदान दिलें गेलें. पुढें तो अजमीर येथें नेला गेला तेव्हां तो कांहीं विरुद्ध बेत करतांना पकडला गेला ( या बेताचें स्वरूप स्पष्टपणें लक्षांत येत नाहीं ). तेव्हां त्यास ठार मार-ण्याचा हुकूम दिला गेला आणि त्याप्रमाणें एका तलवारीनें या दैव-हीन नीचाचें शरीर धडापासून वेगळें केलें गेलें." अशी भिन्न हकी-कत असल्यानें पृथ्विराज कसा मेला हें ठरविणें कठिण झालें आहे.

## टिप्पणी नं. १—महमद घोरी आणि पृथ्वीराज.

रॅव्हर्टीनें तबकातचें भाषांतर केलें आहे. त्यांत इलियटनें दिलेल्या उताऱ्याहून पहिल्या लढाईविषयीं कांहीं भिन्न वर्णन केलें आहे. " दोन्ही फौजा जेव्हां शिस्त लागून एकमेकांवर चालून गेल्या, तेव्हां सुलतानानें एक भाला घेऊन दिल्लीचा गोविंदराय हत्तीवर बसून सैन्याच्या पुढें येत होता त्याजवर हल्ला केला. सुलतानानें गोविंदरायाच्या तोंडावर भाला मारला व गोविंदरायानें सुलतानावर एक सांग फेकली. तिनें त्यास मोठी जखम केली. सुलतानानें घोड्याचें तोंड वळवून मागें प्रयाण केलें. परंतु जखमेच्या वेदनेनें त्यास घोड्यावर फार वेळ बसवेना. इस्लामच्या फौजेचा पराभव झाला आणि ती पक्की उधळून गेली. सुलतान घोड्यावरून खालीं पडत होता तें पाहून एका खिलजी तरुण पोरानें सुलतानास ओळखून त्याच्या घोड्यावर उडी मारून मागें बसून सुलतानास धरलें व घोड्यास आपल्या आवाजानें इशारा करीत सुलतानास रणांगणाच्या बाहेर काढलें. फौजेंत सुलतान नाहीं असें पाहून फौजेनें मोठा दुःखाचा आक्रोश केला;

आणि फौज मागें हटत पाठलागापासून सुरक्षित अशा ठिकाणीं तिनें मुक्काम केला. इतक्यांत एकाएकीं सुलतानहि येऊन पोहोंचला." (पा. ४६१—३).

या ठिकाणीं रॅव्हर्टीनें एका टिपेंत नंतरच्या इतिहासकारांनीं व फिरिस्तानें दिलेली हकीकत व हल्लींच्या इंग्रजी इतिहासकारांनीं फिरिस्तावरून दिलेली हकीकत दुसऱ्या टीपेंत दिली आहे. फिरिस्तानें पिठोराची फौज दोन लाख माणसें आणि तीन हजार हत्ती अशी दिली आहे. तो आणखी असें सांगतो कीं, मुसलमानी डाव्या व उजव्या बाजूचा पराभव झाला होता व त्यांनीं तोंडहि फिरविलें होतें. पण मध्यावर असलेल्या सुलतानानें तें मनांत न आणतां शत्रूवर जोराचा हल्ला केला. शेवटली सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, एका हकीकतींत पुढील वर्णन आहे. " सुलतान घोड्यावरून खालीं पडला आणि तो कोणास रात्र पडेपर्यंत समजला नाहीं. रात्रीं रणांगणावर गुलाम त्याचा तलास करण्याकरितां आले, तेव्हां तो त्यास प्रेतामध्यें सांपडला." या भिन्न वर्णनावरून रासांत दिलेली सुलतान पकडल्याची हकीकत संभवनीय दिसते. तबकातच्या वर्णनावरून सुद्धां ज्या वेळेस त्यास जखम झाली त्यावेळेस तो आपल्या फौजेहून दूर होता असें दिसतें; आणि परत फिरल्यावर तो कसा बसा घोड्यावर राहिला. या वेळीं हिंदूंकडील तरुण राजपूत धीर धुंडीर त्याची ती दशा पाहून झपाट्यानें पुढे आला असावा आणि त्यानें त्यास पकडलें असावें. त्यास मुक्त करून 'माझ्याशीं पुनः लढ' असें वीरोदात्त पृथ्वीराजानें सांगणें त्याच्या स्वभावाला अविरोधी नाहीं. याच गोष्टीवरून मुंजानें तैलाला सहा वेळां सोडलें ही कथा उत्पन्न झाली असावी. महमुदानें खंडणी घेऊन जयपालास सोडलें त्यावेळेस सुद्धां आपल्यास पुनः युद्ध करावें लागेल असेंच महमुदासहि वाटलें असावें.

## टीप नं. २—शेवटल्या लढाईंतील मुसलमानांची चाल.

टॅव्हर्टीनें केलेल्या तबकातच्या भाषांतरांत पृथ्वीराजाच्या शेवटच्या लढाईंतील चालीचें थोडेसें निराळें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. (पा. ४६७) "सुलतानानें आपल्या फौजेची मांडणी केली. फौजेच्या मध्यावर

सामानसुमान, निशाणें आणि हत्ती यांस कित्येक मैल मागें ठेवलें. त्यानें आपल्या फौजेचा रांगा नीट लावून सावकाशपणें चाल केली. पण हलक्या हत्याराचें व चिलखताचें घोडेस्वार चार टोळ्यांत विभागले, व त्यास (पुढें जाऊन) शत्रूवर चारी बाजूनें हल्ला करण्यास सांगितलें. डावी व उजवी बाजू, अघाडी व पिछाडी यावर दहा हजार घोड्यावरील धनुष्यवाल्यांनीं शत्रूच्या फौजेस सारखें गुंतवावें आणि त्यांचें हत्ती, घोडे आणि पायदळ लढाईस पुढें होतील तेव्हां एकदम तोंड फिरवून एका घोड्याच्या टप्यावर त्यांच्यापुढें पळत सुटावें अशी सुलतानानें मुसलमानी फौजेस आज्ञा केली आणि ती तिनें अक्षरशः पाळली. परमेश्वरानें इस्लामास जय दिला आणि शत्रूची फौज मारली गेली. "

मेजर रॅव्हर्टी हा एक फौजी अधिकारी असून या वर्णनावर अशी टीप देतो कीं या लढाईतील वर्णिलेली मुसलमानांची चाल नीट लक्षांत येत नाहीं. फौजी दृष्टीनें आम्हांस या वर्णनावर कांहीं टीका करतां येत नाहीं. पण एवढें सांगण्यासारखें आहे कीं मुसलमानानीं जिंकलेल्या तीन्ही मोठ्या लढायांत ( दोन महमुदाच्या आणि एक शिहाबुद्दीनाची ) मुसलमानी घोडदळानें मोठें काम बजाविलें. हिंदूचा भर नेहमीं त्यांच्या हस्तिसैन्यावर दिसतो. किंबहूना कोरीव लेखांतहि वीरांची मोठी स्तुति म्हणजे त्यानीं हत्तींचे मस्तकांचे कुंभ फोडले अशीच येते. परंतु अलेक्झँडरच्या वेळेपासून हिंदुस्थानांतील हत्ती सरावलेल्या घोडदळापुढें टिकूं शकत नाहींत. महमुदानें तुर्कस्थानच्या तुर्कांविरुद्ध हत्तीचा उपयोग केला हें खरें. परंतु त्याचें घोडदळ हत्तीपुढें जाण्यास सरावलेले नव्हतें. दुसरें, शत्रूच्या फौजेला अघाडीवर व पिछाडीवर वारंवार त्रास देण्यापासूनहि जय मिळविण्याच्या कामांत बराच फायदा होतो. शिहाबुद्दीनानें मुख्य फौज सावकाश चालविली याचें कारण आपल्या घोड्यांच्या विभागास शत्रूच्या अघाडीवर व पिछाडीवर हल्ला करण्यास वेळ मिळावा हें होतें. प्राचीन हिंदूंची लढाईची तऱ्हा व महाभारतांतील व्यूह हलीच्या फौजी विशिष्टज्ञांनीं अभ्यासण्यासारिखे आहेत. परंतु आम्हांस असें दिसतें कीं, हिंदु सरळ लढणारें असत; शत्रूस फसविणें किंवा एकाएकीं त्यावर छापा घालणें इत्यादि युक्त्या ते योजीत नसत. शेवटलें सांगणें हें कीं,

एक मजबूत राखीव भाग ( रिझर्व ) ठेवणें आणि त्या भागानें ऐनवेळीं शेवटीं जोराचा हल्ला करणें पुष्कळ वेळां फायदेशीर असतें. ह्याशिवाय हत्ती पराजित झाले म्हणजे आपल्याच फौजेंत भीति पसरवून नाशहि करितात हें सांगण्यासारखें आहे. हें लक्षांत घेऊन बहुधा शिहाबुद्दीनानें या लढाईंत आपले हत्ती कित्येक मैल मागें ठेविलें.

## टिप्पणी नं. ३–शेवल्या लढाईचें रासांतील वर्णन.

शिहाबुद्दीन घोरीशीं झालेल्या पृथ्विराजाच्या शेवटच्या लढाईचें वर्णन रासांत दिलेलें बहूतेक सर्व काल्पनिक असलें तरी येथें थोडक्यांत देणें मनोरंजक होईल. रासा ग्रंथ महाभारताच्या धर्तींवर स्पष्टपणें बनविला आहे हें आम्ही कित्येकदां सांगितलेंच आहे. महाभारताचें अनुकरण करून युद्धापूर्वी झालेलें अनेक अपशकुन रासांत प्रथम सांगितले आहेत. पृथ्विराजाला शाप झाल्याची एक कथा यांत सांगितली आहे. नवी राणी संयोगिता हिच्या नादानें पृथ्विराजानें राज्यकारभार अगदीं टाकून दिला असेंहि वर्णन आहे. एक सरदार हाहुलीराय याचा पृथ्विराजानें अपमान केला त्यामुळें त्यास सोडून तो कांगडा येथें गेला व तेथून त्यानें शिहाबुद्दीनचें मन वळवून त्यास पृथ्विराजावर हल्ला करण्यास लाविलें असेंहि वर्णन आहे. मुसलमानी हकीकतींत या वर्णनांस दुजोरा सांपडत नाहीं. प्रत्यक्ष युद्धाच्या सर्व वर्णनांत असा दोरा चालतो कीं, भावी अपयशाची काळी छाया राजपुतांच्य अंतःकरणांत पानिपत येथें मराठ्यांच्या प्रमाणें भरून गेली होती. पण मुसलमानी हकीकत वर्णनावरून आपल्यास असें दिसत नाहीं. पृथ्विराजाचा पूर्व लढाईंत जय झाला होता आणि फाजिल आत्मविश्वासानें त्यानें घोरीस सोडुन दिलें होतें. सिरहिंदचा किल्ला नुकताच स्वाधीन झाला होता. पण रासांत सर्व वृत्त भलतेंच करून या युद्धाला निराळी जागा व निराळा काळ दिला आहे. पहिल्या लढाईनंतर दुसऱ्याच वर्षी ही लढाई झाली, आणि पृथ्विराज सिरहिंदहून अजमीर किंवा दिल्ली येथें परतलाहि नव्हता. रासामध्यें शिहाबुद्दीन पकडल्यानंतर कित्येक वर्षांनीं ही लढाई झाली आणि दिल्लींत संयोगितेशीं पृथ्विराज मौज

कित्येक वर्षें करीत राहिला असें वर्णन आहे. लढाईची जागा पानिपतचें मैदान दिसतें. सर्व कुरुक्षेत्रास पानिपतचे मैदान म्हणतां येईल. या रीतीनें मैदानाची जागा जरी जवळ येते तरी या लढाईस पानिपतची लढाई म्हणतां येणार नाहीं.

शिहाबुद्दीनची फौज एकलक्ष घोडा, नऊ लक्ष पायदळ आणि दहा हजार हत्ती सांगितली आहे. ही स्पष्टपणें अतिशयोक्ति आहे. हिंदूची फौज एके ठिकाणीं ८३ हजार आणि दुसरे ठिकाणीं सत्तर हजार सांगितली आहे. हा अंदाज बरोबर दिसतो. पूर्वीच्या लढाईतील मृत्यूंनीं आणि सिरहिंदच्या वेढ्यांतील मृत्यूंनीं पृथ्विराजाची फौज बरीच कमी झाली असावी. या लढाईत एक लक्ष पंचवीस हजार घोडा मुसलमानी फौजेची मुसलमानी इतिहासकारांची सांगितलेली संख्या असल्यानें हिंदूंच्या संख्येपेक्षां मुसलमानांची संख्या जास्त होती असें दिसतें.

रासांत हिंदूच्या फौजेची मांडणी (काल्पनिक) येणेंप्रमाणें दिली आहे. डाव्या बाजूस तेहतीस हजार फौजेनिशी अनेक सरदारांसह समरसिंह होता. उजव्या बाजूस एकवीस हजार फौजेनिशीं जेतराव परमार होता. अघाडीला एकोणीस हजार फौजेनिशीं हाहुलीराय होता. आणि मध्यावर सर्व युद्धावर नजर ठेवीत पृथ्विराज दहा हजार फौजेनिशीं होता. येथें महाभारताच्या वर्णनानुसार अनेक रजपूत घराण्यांचे प्रसिद्ध पूर्वज कोणत्याना कोणत्या फौजेबरोबर असल्याचें वर्णन आहे. ही तपशीलवार हकीकत हिंदुस्थानांतील रजपूत कुलांना शाश्वत महत्त्वाची वाटते हें सांगावयास नको.

ऐन लढाईच्या प्रसंगीं प्रत्येक पक्षानें दुसऱ्यास तहाचे निरोप पाठविणें व एकमेकांस दूषणें देणें हा ठराविक प्रकार भारती युद्धापासून परवांच्या युरोपीय भारती युद्धापर्यंत चालत आलेला रासांतहि अवमानिलेला नाहीं. पण रासांत वर्णिलेले संदेश किती अनैतिहासिक आहेत, हें "मला अर्धा पंजाब दे आणि तुझा युवराज ओलीस दे" ह्या शहाबुद्दीनच्या मागण्यावरून दिसेल. कारण सर्व पंजाब प्रांत घोरीच्या पूर्वीच ताब्यांत होता. किंबहुना लाहोर राजधानीसह सबंध पंजाब या लढाई पूर्वी मुसलमानांच्या ताब्यांत सुमारें दोनशें वर्षें होता.

प्रत्यक्ष युद्ध तीन चार दिवस चाललेले दाखविलें आहे. आणि दर दिवशीं निरनिराळे व्यूह महाभारतांतल्याप्रमाणें वर्णिले आहेत. बहुधा सामुदायिक युद्ध न वर्णितां निरनिराळ्या योद्धयांचीं द्वंद्‌युद्धें महाभारतांतल्या प्रमाणेंच वर्णिलीं आहेत. आणि युद्धाचें वैचित्र्य तितकेंच काल्पनिक पण मनोरंजक आहे. तींच वर्णनेंहि पुनः पुनः आलीं आहेत. पृथ्विराज पकडल्याचें वर्णन चारदां आहे. पृथ्विराजानें आपल्या बाणांनीं अनेकांस मारलें, नंतर तलवारीनें, नंतर कट्यारीनें मारिलें शेवटीं पकडला जाऊन त्यास गझनीस नेलें व तेथें कारागृहांत त्याचे डोळे काढले गेले. अंध असतांनाहि आपल्या शद्बवेधी धनुष्य चालविण्याच्या चातुर्यानें शिहाबुद्दीनचा त्यानें प्राण घेतला आणि नंतर त्यानें आपल्या स्वतःस मारून घेतलें. अशा रीतिचा हा शेवटचा काल्पनिक चमत्कार आपल्या कथानकावर चंदानें कलशरूपी चढविला आहे. ही सूडाची कथा खरी मानण्यास योग्य नाहीं हें आम्हीं पूर्वीं सांगितलेंच आहे.

महाभारतांतील युद्धाप्रमाणेंच पृथ्विराजाकडील सर्व वीर मोठे पराक्रम करून शेवटीं रणांगणांत मारले गेले असें दाखविलें आहे. या युद्धाचें वर्ष आनंदसंवत् ११५८ म्हणजे ११९२ इसवी मात्र रासांत बरोबर दिलें आहे.

# प्रकरण एकविसावें.

## अजमीर व दिल्ली यांचा उच्छेद.

पृथ्विराज दुसऱ्या लढाईंत पराजित होऊन मारला गेल्यावर, पंजाबच्या हिंदूंच्या स्वातंत्र्यनाशाच्या पहिल्या लढाईप्रमाणेंच ( १००८ ) हा दुसरा प्रसंग उत्तराहिंदुस्थानाचा स्वातंत्र्यनाशक झाला. रणनीतिकुशल सेनापतीप्रमाणें शिहाबुद्दीन घोरीनें शत्रूची मुख्य राजधानी अजमीर याजवर एकदम चाल केली. ती विरोध केल्याशिवाय पडली आणि लुटली गेली हें सांगणें नको. ताज वर्णन करतो, " द्रव्य इतकें मिळालें कीं, समुद्र व डोंगर यानीं लपविलेली सर्व संपत्ति येथें बाहेर काढली असेंच वाटलें. सुलतान अजमिरास असतां त्यानें सर्व मूर्ति तोडल्या व देवळें पाडिलीं आणि त्यांच्या जागीं मशिदी आणि शाळा बांधल्या. " विग्रहराज तिसरा यानें संस्कृत पाठशाळा बांधली होती, तिचें रूपान्तर ' अढाई दिनकी झोंपडी ' या नांवाच्या मशीदींत घोरीच्या हुकमानें झालें हें आम्हीं पूर्वी सांगितलेंच आहे ( ताज पा. २१५ ). अजमीर जिंकून व लुटून घेतल्यावर राजनीतिनिपुण मुत्सद्याप्रमाणें शहाबुद्दीननें अजमीरचें राज्य पृथ्विराजाच्या मुलाच्या स्वाधीन केलें; तें एकदम खालसा केलें नाहीं. पण पृथ्विराजाचा पुत्र रेनसी यास एक वार्षिक खंडणी देण्याचें कबूल करवून आपला मांडलिक बनविलें. ताज म्हणतो, " त्याच्या ठिकाणीं शहाणपणाचीं चिन्हें आणि चांगुलपणाचीं लक्षणें दिसत होतीं. " याचा अर्थ असा कीं, परिस्थिति ओळखण्याइतका व खंडणी आणि मांडलिकत्व कबूल करण्याइतका तो शाहणा व चांगला होता. ह्या हकीकतीवरून पृथ्विराज लढाईंत मारला गेला हेंच खरें दिसतें. कारण अजमीरांत पृथ्विराजाचा शिरच्छेद झाला असता तर रेनसीनें मांडलिकत्व कबूल करून राज्य पतकरिलें नसतें.

अजमीरचा बंदोबस्त केल्यावर चौहाणांची दुसरी राजधानी दिल्ली इजवर सुलतान चालून गेला. " तेथें त्याच्या समोर सर्व हिंदुस्थानांत उंच व मजबुतपणा यांत अद्वितीय असलेला एक किल्ला उभा राहिला. किल्ल्यानें विरोध केला आणि दोन्ही बाजूस रक्ताचे पूर वाहिले. सरतेशेवटीं किल्ल्याच्या अधिकाऱ्यानें गुलामीच्या रस्त्यावर येऊन खंडणी देण्याची व नोकरी करण्याची शर्त मान्य केली. नंतर सुलतान गझनीला परत गेला. परंतु फौज दिल्लीजवळ मौजे इंदरपत येथें राहिली. " जिंकलेल्या मुलुखांत ताबेदारी आणि खंडणी अमलांत आणण्यासाठीं फौज ठेवणें जरूर असतें हें सहज लक्षांत येईल.

तबकात लिहिणारा ग्रंथकार म्हणतो कीं, " अजमीर राजधानी, सर्व शिवालिक डोंगर आणि हांसी, सरसूती आणि दुसरे प्रांत या लढाईंतील जयाचीं फलें होत. " ५८८ हिजरी ( ११९२ इ. स. ). शिवालिक डोंगर याचा अर्थ सपादलक्ष म्हणजे अजमीर देशाच्या सरहद्दीवरील डोंगर. या सर्व प्रांतांचा अधिकार कुतुबुद्दीनकडे सांगितला गेला व तो कोहरामच्या किल्ल्यांत राहूं लागला. कोहरामचें हल्लींचें नांव निश्चित नाहीं. दिल्लींत जो अधिकारी प्रथम लढला आणि नंतर शरण आला तो कोण होता हें ठरवितां येत नाहीं. तबकात असें म्हणतो कीं, दिल्लीचा गोविंदराय पृथ्विराजाशीं झालेल्या शेवटल्या लढाईंत मारला गेला. तेव्हां चौहाणांच्या तर्फे कदाचित् तेथें दुसरा अधिकारी असेल व त्यानें अजमीरचा राजा रेनसी यानें मांडलिकी कबूल केली हें जाणून आपणहि तेंच मान्य केलें असावें.

पण हा कांहीं वेळ मिळालेला अधिकार टिकला नाहीं. कारण अशा मांडलिकी मागून शेवटचा उच्छेद लौकर येणारच. ताजमध्यें जतवान् म्हणून नांव दिलें आहे ( हें नांव पर्शियनमध्यें चौहानाच्या ऐवजीं स्पष्टपणें चुकीनें वाचलें गेलें आहे ), या नांवाच्या सरदारानें हांसीवर हल्ला केला. त्याचा प्रतिकार करण्यासाठीं कुतुबु-


द्दीन एकदम चालून आला आणि एक खडाजंगीची लढाई झाली. "दोन पोलादाचे डोंगर एकमेकावर आदळले. आणि रणभूमि वीरांच्या रक्तानें लाल झाली. जतवान् मारला गेला आणि हिंदूंचा पूर्ण पराभव झाला. हांसीचा किल्ला मुक्त होऊन दुरुस्त केला गेला. कुतुबुद्दीननें मीरतकडे वळून तोहि किल्ला घेतला. शेवटीं त्यानें दिल्लीवर हल्ला करून तोहि किल्ला घेतला. त्यानें शहरांत शिरून मूर्ति आणि मूर्तिपूजा यांपासून शहरास मुक्त केलें, आणि मंदिरांच्या ठिकाणीं मशीदी बांधल्या." दिल्लीवर हा हल्ला करण्यास काय कारण झालें हें ताजमध्यें सांगितलें नाहीं. तबकातमध्येंहि जास्त खुलासा नाहीं. त्यांत थोडक्यांत असें म्हटलें आहे कीं, तेथून (कोहरामहून) निघून कुतुबुद्दीननें ११९३ त मीरत घेतलें आणि त्याच वर्षीं त्यानें दिल्ली काबीज केली. तथापि कारण असें कल्पितां येईल कीं, कुतुबुद्दीनला राजधानी करण्यासारखें मजबूत व महत्त्वाचें ठिकाण पाहिजे होतें. अजमीर पृथ्विराजाच्या मुलास दिलें गेल्यानें आपल्या सत्तेची राजधानी करण्यास दिल्लीच योग्य आहे असें त्यानें पाहिलें. याप्रमाणें दिल्ली मुसलमानी राज्यास जोडली जाऊन लौकरच ती हिंदुस्थानची राजधानी पुढें सांगितल्याप्रमाणें झाली.

## टिप्पणी १–पृथ्विराजाची जुनी दिल्ली.

गॉर्डन साहेबाच्या "दिल्लीचीं सात शहरें" या पुस्तकावरून आणि जुनें मुसलमानी वृत्तांत व भारतीय कोरीव लेख, तसेंच एकंदर जागेचें आम्हीं स्वतः केलेलें निरीक्षण, यांवरून ज्या दिल्लींत पृथ्विराज राज्य करीत होता त्या दिल्लीची योग्य कल्पना देतां येते. पृथ्विराजाच्या दिल्लीहून इंद्रप्रस्थ गांव कुतुबुद्दीनच्या वेळीं निराळें होतें ही गोष्ट मुसलमानी लेखांवरून स्पष्ट आहे. हें गांव व हल्लीं प्रसिद्ध असलेलें इंद्रपत् एकच होय. याच्या नैऋत्येस सरासरी दोन मैलावर अनंगपाल तोमरानें लालकोट नांवाचा किल्ला बांधला आणि एक शहर वसविलें तेंच हल्लींचें

मेहेरोली नांवाच्या लहान गांवाजवळ असलेलें मूळ दिल्ली शहर होय. लालकोट किल्ला हल्लीं जेथें कुतुबुद्दीनची मशीद आहे तीच जागा असावी. कारण मथुरेहून आणलेली लोखंडी लाट या मशीदीच्या चौकाच्या मध्यभागीं उभी केलेली आहे. ( ही लाट अनंगपालानें मथुरेहून आणली अशी समजूत आहे ). हल्लीं कुतुब् मशीदींची पश्चिमेकडील भिंत उभी नाहीं. अनंगपालानें बांधलेल्या लालकोट किल्ल्यांत पुष्कळ जैन व हिंदू देवालयें होतीं, तीं सर्व पाडून त्यांचे सुंदर कोरलेले खांब आपल्या मशीदीच्या चौकाच्या चार बाजूंचीं द लानें बांधण्यांत कुतुबुद्दीननें उपयोगांत आणले. कुतुबुद्दीननें या खांबावरचीं कोरीव चित्रें जशीच्या तशींच राखिलीं आणि लोहस्तंभास आपल्या जागींच राहूं दिलें यावरून या पहिल्या हिंदु बादशहाचें चांगुलपण दिसतें. "पांचव्या शतकापासून हा लोहस्तंभ उघड्या हवेंत व पावसांत गंजल्यावांचून कसा उभा आहे ह्याचें आश्चर्य हल्लींच्या पाश्चात्य लोखंड बनविणाऱ्यांसहि वाटतें. हा एक उभा बिनसंधी खांब असून याचें वजन सतरा टन असावें. त्यावरील एका लेखांत चंद्र नांवाच्या राजानें हा स्तंभ विष्णु देवतेस अर्पण केला असें वर्णिलें आहे. हा जेथें उभा केला तेथेंच ठेवून तो मध्यावर घेऊन आपल्या मशिदीचा चौक कुतुबुद्दीननें बनविला, हें त्याचें कृत्य गौरव करण्यासारखें आहे. कारण ऱ्होडस् जिंकणाऱ्या मुसलमानांनीं तेथील स्तंभ त्यांतील पितळयासाठीं उपटून ज्यू लोकांस ( यूरोपांतील मारवाड्यांस ) विकला ( फर्ग्यूसन). जैन देवळांचें स्तंभ अबूच्या पाहाडावर असलेल्या जैन देवळांच्या स्तंभां सारखेच आहेत ( फर्ग्यूसन ). पण हिंदु देवळांचेहि आणखी येथें स्तंभ आहेत, त्यांच्यावरील कृष्ण, त्याची माता यशोदा व गाई आणि वांसरें यांचीं चित्रें फारच सुंदर आहेत ( फनशवे ). ह्याशिवाय प्रसिद्ध शिवदूत कीर्तिमुखाचीं डोकीं, त्यांतील दंतपंक्ति स्पष्ट दिसणारीं, आपल्यास दिसतात. अनंगपालाचा किल्ला पुष्कळ विस्तृत असून त्यांत अनेक वाडे व हिंदु देवळें या वरून होतीं.

हा किल्ला आणि दिल्लीचें शहर अनंगपालानें १०५२ च्या सुमारें बांधलें व त्याच सालीं स्तंभ येथें लाविला ही गोष्ट स्तंभावरीलच एका लेखानें सिद्ध आहे. सुमारें शंभर वर्षांनतर चाहमानांनीं शहर व किल्ला


फेरोजाबाद
इंदरपत
पुराणा किल्ला
यमुना नदी
कुतुब मिनार
लोखंडी लाट
कुतुब मशीद
पृथ्वीराजाच्या जुन्या दिल्लीची भिंत
मेहरोली यांस चुकीनें
हस्तिनापुर म्हणतात

जिंकला आणि तोमरराज्य आपल्या राज्यास जोडलें, त्यावेळीं पृथ्विराजानें शहर वाढवून त्या भोंवतीं आणखी भिंत बांधली. "पृथ्विराजानें बांधलेली ही भिंत कुतुब् मशीदीच्या भोंवतीं हल्लींहि निश्चित करितां येते." हल्लीं या मशीदीच्या पश्चिमेस सुमारें पाव मैलावर भिंतीचा एक बराच लांब भाग त्याच्या वर्तुळघसांसह दिसतो. ही शहराची भिंत असावी किंवा किल्ल्याची आणखी बाहेरची भिंत असावी. हल्लीं किल्ला दिसत नसला तरी कुतुब्मिनाराच्या भोंवतीं एक भुईकोट किल्ला कल्पनेंत आणतां येतो. हा डोंगरासारखा पुढें उभा राहिला असें वर्णन ताजुल्मासर मध्यें आहे.

नव्या शहराचें व किल्ल्याचें नांव मुळांत ढिल्लिका असावें. हें तोमरानीं नांव दिलें असें आम्हांस वाटतें. दोन शिलालेखांत या रूपानें हें नांव आलें आहे. संवत् १२२० (इ. ११६३) चा बिजोलिया लेख आणि १३३६ ईसवीचा पूर्वोक्त विहिरींतील लेख यांत हें शहर तोमरानीं वसविलें असें स्पष्ट आहे. आणि नंतर येथें चाहमानानीं राज्य केलें. तात्पर्य दिल्ली हें नांव १०५० इसवी इतकें जुनें आहे. या नांवाचा अर्थ काय हें सांगतां येत नाहीं. कारण मूळरूप ढिल्लिका याचें संस्कृत मूळ लक्षांत येत नाहीं. हा बहुधा प्राकृत देशी शब्द असावा, आणि याचा अर्थ हल्लीच्या भाषेंतल्याप्रमाणें ढिला असा असावा. या शहराच्या नांवाविषयीं प्रसिद्ध जनवार्ता या अर्थानें आधारभूत असावी असें वाटतें.

## टिपणी नं. २–कुतुबमिनार.

कुतुबमिनार याचा आकार, याची कल्पना व याची रचना प्रारंभापासून मुसलमानांची आहे किंवा पूर्वीं असलेल्या एका कीर्तिस्तंभाला कुतुबुद्दीन व अल्तमश यानीं मिनाराचें रूप दिलें, या मनोरंजक प्रश्नाचा उहापोह, संशोधकांनीं जनरल कनिंगहॅमपासून हल्लींचे रायबहादूर दयाराम साहनी, पंजाब सर्कलचें आर्कीऑलॉजिकल सुपरिटेंडंट, यांपर्यंत केला आहे. हा पूर्वीं असलेला कीर्तिस्तंभ मानून मिनार केला गेला हें मत कांहीं वर्षांपूर्वीं कंवरसेन एम्. ए. (त्या वेळचे लाहोरच्या लॉ कॉलेजचे प्रिन्सिपॉल, हल्लीं काश्मीर संस्थानचे चीफ जस्टिस) यानीं प्रथम पुढें मांडलें आणि हल्लींहि त्याचें मत तसेंच आहे. मात्र सहानी यांनीं दाख-

विल्याप्रमाणें मिनारावर असलेल्या एका संस्कृत लेखाचा काळ संवत् १२०४ नसून संवत् १७०४ आहे, हें त्यानीं मान्य केलें आहे. हें येथें सांगितलें पाहिजे कीं, मिनाराच्या खालच्या मजल्यावर भिंतीवर बाहेरून कुराणांतील अरबी वचनें खोदलीं आहेत. तसेंच कित्येक पर्शियन भाषेंतील लेख खोदले असून त्यांत शिहाबुद्दीन, घियासुद्दीन, कुतुबुद्दीन आणि अल्तमश यांचीं नांवें आहेत. पण ह्याशिवाय कांहीं संस्कृत व हिंदी लेखहि मिनाराच्या निरनिराळया मजल्यावर खोदलेले आहेत हें आश्चर्य करण्यासारखें आहे. तथापि हे सर्व इ. स. ११९३ च्या अलीकडचे आहेत, तेव्हां त्यांचा फारसा विचार करावयास नको. फक्त एक लेख संवत् १२०४ (इ. स. ११४७) इतका जुना कंवरसेन मानीत होते, पण तोहि हल्लीं संवत् १७०४चा आहे हें त्यानीं मान्य केलें आहे.

तथापि कंवरसेन यानीं आणलेलीं मुख्य प्रमाणें अजून शिलक राहतात. हा मिनारा माआझिना म्हणजे प्रार्थनेस बोलावण्यासाठीं उंच बांधलेला मनोरा नाहीं ही गोष्ट सर्वांस मान्य आहे; व ती कुतुब् मशीदीशीं या मिनाऱ्याचा कांहीं संबंध नाहीं यावरूनहि स्पष्ट होते. दुसरें कुतुबुद्दीन किंवा अल्तमश यानीं हा मनोरा बांधला असा लेख मिनाऱ्यावर कोठें नाहीं, त्यांचीं फक्त नांवें मात्र दिसतात. तिसरें, भिंतीच्या बाहेरील बाजूवर असलेली अरबी कुराण–वाक्यें जर नीट पाहिलीं, तर तीं भिंतीवर मागून खोदलीं आहेत असें स्पष्ट दिसतें. मुळांतले दगड बाहेर काढून पुनः बसविले गेले आहेत हें जनरल कानिंगहॅमचे आर्कियॉलॉजिकल असिस्टंट मि. बेग्लर यांस प्रत्यक्ष दिसून आलें. ह्याशिवाय हे अरबी लेख मागून खोदले याचीं आणखीहि चिन्हें आहेत. या प्रश्नावरचीं दोन्ही बाजूचीं अनुकूल प्रतिकूल कारणें यापेक्षां विस्ताराने या टिप्पणींत देणें जरूर नाहीं. परंतु अरबी, पर्शियन, नागरी लिपींत असलेले यावरील लेख डॉ. हॅरोविट्झ यानीं प्रसिद्ध केले आहेत, त्यावर गॉर्डन सँडरसन लिहितांना वरील विवाद विषय बाजूस ठेऊन म्हणतात कीं, "मिनार मुळांत हिंदु आहे किंबा मुसलमानी आहे हा वाद अद्याप चालू आहे. पण रचनेवरून मिनार हिंदु असल्याचें प्रमाण एकच पुढें आणलें जातें कीं, याची ताऱ्याच्या आकृतीची रचना जुन्या हिंदु

देवळांच्या आकृतीसारखी आहे. पण या प्रमाणाचें महत्त्व गझनी येथें असले मिनार आणखी असल्याचें समजतें त्यावरून कमी होतें." संस्कृत व हिंदी लेख अद्याप सर्व तपासले गेले नाहींत व अभ्यासिले गेलेहि नाहींत. आणि रा. ब. दयाराम साहनी आपलें मत अद्याप ठाम नाहीं असें म्हणतात. अशा परिस्थितींत हा विषय अद्याप अनिश्चित आहे असें म्हणावें लागतें. पण हेंहि दाखविणें जरूर आहे कीं, कवर-सेन यांनीं दाखविलेलें रचनेवरचें प्रमाण केवळ तास्काकृतींवर नसून अरबी कुराणलेख भिंतीवर मागून खोदलेले आहेत ह्यावर आधारभूत आहे आणि बेग-लर यांनीं दगड पुनः बसविलेले आहेत ही गोष्ट मान्य केलेली आहे.

शेवटीं हें सांगतां येतें कीं, कीर्तिस्तंभ उभारण्याची चाल प्राचीन काळापासून हिंदुस्थानांत चालू होती. उदाहरणार्थ रघुवंश सर्ग बारांत कीर्तिस्तंभाचा उल्लेख आहे. ( कीर्तिस्तम्भद्वयमिव तटे दक्षणे चोत्तरेच।) तसेंच एका सेन कोरीव लेखांत लखनौतीच्या लक्ष्मणसेनानें प्रयाग, बनारस आणि जगन्नाथ या तीन ठिकाणीं कीर्तिस्तंभ उभारले असें वर्णन आहे. असें संभवनीय दिसतें कीं, हा कीर्तिस्तंभ पहिल्या मजल्यापर्यंत वसिल-देव चौहाणानें बांधला. यानें उत्तर हिंदुस्थान जिंकून सर्व आर्या-वर्तांतून म्लेछ लोकांना हांकलून त्यास खरा आर्यावर्त केलें ही त्याची कृति कीर्तिस्तंभ बांधण्यासारखी होती. आणि ती शिवालिकस्तंभावर खोद-लेल्या पूर्वोल्लिखित श्लोकांत वर्णन केलेली आहे. दिल्ली प्रयासानें जिंकल्या-नंतर ( ढिल्लिकाग्रहणश्रान्तम्—बिजोलिया लेख ) त्यानें अनंगपालाच्या लालकोट किल्ल्यांत हा कीर्तिस्तंभ उभारला असावा. वीसल आणि लक्ष्मणसेन बहुतेक समकालीन होते आणि उत्तर हिंदुस्थानांतील पश्चिम व पूर्व भागांत बहुतेक सम्राट् झाले होते. लक्ष्मणसेनानें वर सांगितल्याप्रमाणें कीर्तिस्तंभ उभारिले, तेव्हां वीसलानेंहि दिल्लीस कीर्तिस्तंभ बांधणें शक्य आहे.

चौहाणांच्या प्रकरणांत आम्ही दाखविलेंच आहे कीं. वीसलानें अज-मीर येथें संस्कृत विद्यालय बांधलें. तेंच हल्लीं शिहाबुद्दीनच्या हुकुमानें मुसलमानांनीं रूपांतर करून ' अढाई दिनकी झोंपडी ' नांवाची हल्लीची मशीद बनविली आहे. यावरून वीसलाचा कल नामांकित इमारती बांधण्या॰

कडे दिसतो. आपल्या विजयानंतर तो लौकरच मृत्यु पावला. आणि त्याचा सुरू केलेला कीर्तिस्तंभ पहिल्या मजल्याशींच थांबला. त्याच्या नंतरचा राजा पृथ्विराज दुसरा व तसाच सोमेश्वर हे लौकरच वारले. पृथ्विराज तिसऱ्याच्या कारकीर्दींत कीर्तिस्तंभाचें काम पुढें चाललें असावें. कुतुबुद्दीननें दिल्ली जिंकल्यावर किल्ल्यांतील देवळें तोडून व त्यांच्या सुंदर स्तंभांचा उपयोग करून त्यानें आपली मशीद बांधली, तेव्हां त्यानें वीसलाच्या कीर्तिस्तंभाचें रूपांतर करून मुसलमानी मिनार बनविला आणि अल्तमशनें त्याजवर तिसरा व चवथा मजला चढवून त्यास पुरें केलें असें दिसतें.

याप्रमाणें मूळ बांधणारा वीसल असो व अन्य असो, आमच्या मतें रचनाप्रमाणानें हल्लीचा मिनार मूळचा कीर्तिस्तंभ मुसलमानी मिनार केला आहे यांत संशय नाहीं.

अजमीरची पाळी यानंतर लौकरच आली. ताज अशी हकीकत देतो कीं, पृथ्विराजाचा भाऊ हिरज ( हें नांव हरिराजाबद्दल स्पष्टपणें चुकीनें वाचलें गेलें आहे) यानें रणथंभोर येथील चौहाण राजाविरुद्ध बंड केलें. तेव्हां त्याच्या बंदोबस्तास कुतुबुद्दीन धांवून गेला. हरिराज पळाला, तेव्हां ताज म्हणतो, " पृथ्विराजाच्या मुलाला पोशाख दिला गेला व रेनसीनें दोन सोन्याचीं कलिंगडें, मोठ्या चातुर्यानें मुशींत बनविलेलीं, व पुष्कळसें धन नजर केलें " याप्रमाणें मुसलमानांच्या मदतीनें रेनसीनें कांहीं दिवस राज्य केलें. त्याचें पुढें काय झालें हें कळत नाहीं. पण तो लवकरच मेला असावा. आणि बहुधा हरिराजानें येऊन स्वतः अजमीरचें राज्य बळकावलें असावें. ताज हरिराजासच अजमीरचा राजा म्हणतो ( इलियट २ पा. २२५ ). त्यानें अर्थातच पारतंत्र्य मान्य न करून बंडाचें निशाण उभारलें. " जेहतर (?) दिल्लीच्या सीमेपर्यंत चालून आला. आणि तेथील लोक एकाएकीं जुलमाच्या अंधःकारांत सांपडले. " कुतुबुद्दीननें आपल्या फौजेचा मोठा भाग त्याजवर पाठविला, तेव्हां त्याचा पराभव झाला. गरमी असतांहि कुतुबुद्दीन खुद्द अजमीरवर

चालून गेला. ' जिहितर ( हरिराज ) डोंगरावरील किल्ल्यांत गेला, तेव्हां त्याला वेढा दिला गेला. शेवटीं निराश होऊन त्यानें आपल्यास चितेवर जाळून घेतलें; आणि किल्ला सहजच हस्तगत झाला. अजमीरचा मुलुख पूर्वकाळच्या वैभवास पोहोंचला. आणि धर्म पुनः प्रस्थापित झाला. रस्ते चोरांच्या भीतीपासून मुक्त केले गेले आणि त्रस्त झालेली रयत त्यांच्या त्रासापासून सोडविली गेली. " याचा अर्थ अजमीरचें राज्य खालसा केलें जाऊन तेथें मुसलमानी राज्याची व्यवस्थित सत्ता चालू झाली." अंकित रईस व राणे ( जमीनदार ) शरण आले आणि सरदारांच्या कपाळांनीं व हिंदच्या प्रसिद्ध लोकांच्या डोक्यानीं जमीन घांसली गेली. याप्रमाणें अजमीरची व्यवस्था लावून कुतबुद्दीन दिल्लीस परत गेला." ही हकीकत ११९४त घडली, तेव्हांपासून पुढें अजमीर मुसलमानी साम्राज्याचा प्रांत बनला.

या गोष्टी मंगलाना ( मारवाड ) येथें सांपडलेल्या एका शिलालेखावरून आणखी सिद्ध होत आहेत. इं. ए. २१ पा. ८७ वर हा लेख छापला असून तो संवत् १२७२ ( १२१५ इ. ) चा आहे. एक पायऱ्याची विहीर या लेखानें लोकांस अर्पण केली असून त्यांत एका मांडलिक दाहिमा राजानें कांहीं लाग ( कर ) बसाविले आहेत. या लेखांत प्रथम त्यावेळच्या मुसलमान बादशाहाचें नांव शमसुदीन सुरत्राण हम्मीर गोरगजिंस्तानचा राजा हें देऊन त्याच्या सत्तेखालीं रणथंबोर येथें वल्लणदेव राज्य करीत आहे असें म्हटलें आहे. यावरून चव्हाणांची राजधानी यावेळीं रणथंबोर होती. हा लेख छापणारे जोधपूरचे रमाकरण पंडित यांच्या मतें पृथ्विराजाचा नातु म्हणजे हम्मीरकाव्यांत सांगितलेल्या गोविंदाचा पुत्र वल्लण होता. असें दिसतें कीं रेनसी अजमीरचा राजा झाला तेव्हां गोविंदाला रणथंबोर दिलें. हरिराजानें रणथंबोरेवर प्रथम हल्ला केला. नंतर रेनसी मेल्यावर त्यानें अजमीर बळकाविलें, व त्याचें बंड शेवटीं कुतुबुद्दीनानें मोडलें.

# प्रकरण बाविसावें.

## कनोज आणि बनारस यांचा उच्छेद.

अजमीर आणि दिल्ली यांचा उच्छेद होऊन चाहमानांनीं मांडलिकी कबूल केल्यावर उत्तरहिंदुस्थानांतील दुसरें प्रबळ राष्ट्र म्हणजे कनोज आणि बनारस येथील गाहडवालांचें, त्याचा उच्छेद करण्याकडे शिहाबुद्दीनानें आपलें लक्ष फिरविलें. अशी साधारण समजूत आहे कीं, जयचंदानें आपला शत्रु पृथ्विराज याजवर हल्ला करण्यास शिहाबुद्दीनास प्रवृत्त केलें, व त्यामुळें ज्या शत्रूस त्यानें घरांत घेतलें त्यासच तो बळी पडला. परंतु आमच्या चौकशींत जयचंदानें बाहेरील शत्रूस आंत घेतलें असा पुरावा मिळत नाहीं. त्यानें पृथ्विराजास मदत केली नाहीं हें खरें. पृथ्विराजानें घोरीचा निरोध करण्यासाठीं जमविलेल्या संयुक्त सैन्यांत त्यानें भाग घेतला नाहीं हें खरें असावें. बहुधा त्याची मदतहि पृथ्विराजानें मागितली नसेल. पृथ्विराजानें एक संयुक्त फौज जमा केली ही गोष्ट पूर्वीं दाखविल्याप्रमाणें तबकात मध्यें सांगितली आहे. याप्रमाणें कोणकोण राजे पृथ्विराजाच्या मदतीस आले होते हें समजण्यास ऐतिहासिक पुरावा मिळत नाहीं. रासांतील हकीकती इतिहास मानण्या इतक्या विश्वसनीय नाहींत. कोणी गुहिलोत राजा मदतीस आला होता याबद्दलहि शंका आहे. आलाच असेल तर तो समरसिंह नसून सामंतसिंह ( समत्‌सिंग ) असावा. हें कांहींही असो, जयचंदानें शिहाबुद्दीनास हल्ला करण्यास लाविलें हें सिद्ध नाहीं, एवढेंच आम्हांस येथें सांगणें आहे. त्याच्यावर जी आतां पाळी आली ती देशद्रोहाबद्दल शिक्षा म्हणून नव्हे तर शिहाबुद्दीनच्या हिंदुस्थान जिंकण्याच्या महत्त्वाकांक्षेतील पुढची पायरी होय.

अतिशयोक्तीनें वर्णन करणाऱ्या ताजग्रंथांत ह्या युद्धाचा तपशीलवार वृत्तांत दिलेला नाहीं. तो थोडक्यांत म्हणतो कीं, "सुलतान चिलखत घातलेले ५०००० स्वार घेऊन गझनीहून निघाला. मूर्तिपूजकांचा मुख्य आणि बनारसचा राजा जयचंद हा त्यास समुद्रकांठच्या वाळूप्रमाणें असंख्य सेना घेऊन विरोध करण्यास सामोरा झाला. आपले असंख्य वीर आणि अनेक लढाऊ हत्ती यांचा गर्व वाहणारा राय एका उंच हौद्यांत बसून पुढें होता. त्यास एका बाणानें प्राणांतिक जखम झाली आणि तो खालीं पडला." (इलियट २ पा.२२२–२३). "मूर्तिपूजेचें पाप या भूमींतून नष्ट केलें गेलें, आणि अमर्याद लूट हातीं आली; ती पाहतां पाहतां डोळे थकले. नंतर बादशाही फौजेनें असनीचा किल्ला ताब्यांत घेतला. यांत रायाचा खजिना सुरक्षिततेसाठीं ठेवला होता" तबकातमध्यें ही लढाई एका वाक्यानें सांगून सोडून दिली आहे. "सुलतान गझनीहून परत आला आणि बनारस व कनोजपर्यंत येऊन ५९० हिजरीमध्यें (११९३ इ.) 'चंदनवा'जवळ राय चयचंदाचा त्यानें पराभव केला आणि ३०० हत्ती पकडून आणले." तबकात लिहिणारा या लढाईचा जास्त तपशीलवार वृत्तांत देत नाहीं हें दुर्दैव आहे. बहुधा पृथ्विराजाच्या लढाईपेक्षां ही लढाई त्यास कमी महत्त्वाची वाटली असावी. पण जयचंद हा हिंदुस्थानचा सर्वांत अधिक बलवान राजा होता आणि तो गर्वयुक्त व शूर राठोड होता. तो राज्यपालाप्रमाणें पळून न जातां स्वतः आपल्या धर्माच्या व स्वातंत्र्याच्या भयप्रद शत्रूशीं लढण्यास समोर झाला. अर्थात् या लढाईचें जास्त वर्णन द्यावयास पाहिजे होतें. लढाईची जागा चंदवाह हें कनोज आणि इटावा यांच्या दरम्यान आहे असें समजतात. हिंदुस्थानचे लेखहि या वृत्ताबद्दल कांहीं माहिती देत नाहींत. पण अबुलफजलच्या ग्रंथांत अशी दंतकथा नमूद आहे कीं, जयचंदाचा हत्ती गंगा पोहून जात

असतां जयचंद बुडून मेला. वरील समकालीन मुसलमानी लेख व ही दंतकथा एके ठिकाणीं केली असतां आपल्यास असें मानतां येतें कीं, जयचंद लढाईंत घायाळ झाला, तेव्हां शत्रूच्या हातांत न सांपडण्यासाठीं त्यानें आपला हत्ती गंगेंत नेऊन शूर आणि धर्मशील हिंदूप्रमाणें गंगेमध्यें जलसमाधि घेतली. तबकातमध्यें असें आणखी सांगितलें आहे कीं, रणभूमींवर जयचंदाच्या मृत देहाचा पुष्कळ तपास केला गेला, परंतु तें सांपडलें नाहीं. एक आणखी विधान त्यांत असें आहे कीं, पुष्कळ तपासानंतर एक प्रेत सांपडलें व त्याच्या वृद्ध स्वरूपावरून तें जयचंदाचें समजलें गेलें. ( हें विधान तबकात नंतरच्या एका वृत्तांतावरून रॅव्हर्टीनें पा. ४७०च्या टिपेंत केलेलें आहे ). परंतु आमच्या मतें जयचंद हा वृद्ध नसावा. तो तरुण असतांच ११६९मध्यें राज्यावर आला आणि ११९३मध्यें २४ वर्षें राज्य केल्यावर मरण पावला.

कनोज आणि अस्नी लुटल्यावर शिहाबुद्दीन बनारस जिंकून लुटण्याकरितां पुढें धांवला हें साहजिकच आहे. बनारस गाहडवालांची दुसरी राजधानी होती. या वृत्तांचें वर्णन ताजमध्यें पुढील प्रकारचें आहे. "बादशाही सैन्य बनारसवर चालून गेलें; आणि तेथें एक हजार देवळें तोडलीं गेलीं आणि त्यांच्या चबुतऱ्यावर मशिदी उठविल्या गेल्या. दिनार आणि दिऱ्हम् या नाण्यांच्या चेहऱ्यावर बादशहाचें पुण्यकारक नांव आणि पदव्या ठोकल्या गेल्या." याचा अर्थ असा कीं, हा प्रांत खालसा केला जाऊन हिंदूंचीं सोन्याचांदीचीं नाणीं टांकसळींत नेऊन त्यावर शिहाबुद्दिनाचें नांव ठशांनीं उमटविलें.

" शिहाबुद्दीननें शहराचा आणि भोंवतालच्या प्रांताचा बंदोबस्त करून या प्रसिद्ध प्रवित्र युद्धाचा वृत्तांत इतिहासांत लिहून जगभर प्रसिद्ध केला आणि तो परतला. परततानां अस्नी येथें त्यानें कांहीं दिवस मुक्काम केला; तेथें भोंवतालचे मुख्य व वृद्ध लोक येऊन

त्यांनीं आपलें अंकितत्त्व कबूल केलें आणि दुर्मिळ वस्तु नजर केल्या." यावरून असें दिसतें कीं, देशानें कांहींच विरोध केला नाहीं व ही राजसत्तेची बदल लोकांनीं तावडतोब मान्य केली. या गोष्टीवर आम्हीं पुढें टीका करणार आहों. हिंदुस्थानांत कुतुबुद्दीनास व्हॉइसरॉय (राजप्रतिनिधि) नेमून शिहाबुद्दीन गझनीला परत गेला.

## पुढील हालचाली.

कुतुबुद्दीनाचें चरित्र आम्ही पुढें देणार आहों. पण येथें हें सांगणें जरूर आहे कीं, तो मोठा लायक अधिकारी होता. आणि इतक्या निःपक्षपात रीतीनें तो न्याय करीत असे कीं, "लांडगा आणि बकरी एका तलावावर पाणी पिऊं लागलीं." (ताज इलियट २ पा. २२५). यामुळें देशांत लौकरच स्वस्थता झाली. पण बंडखोर लोकांचें तो कडक शासनहि करीत असे. "कोलजवळ एक त्रास देणारी जात होती; ती फार त्रास देऊं लागली तेव्हां त्यांची सबंध कत्तल करवून लोकांच्या डोक्यांचे तीन बुरूज त्यानें केलें." पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अजमीर येथील हरिराजाचें बंड ११९५ त कुतुबुद्दीनानें तात्काळ मोडलें. ११९६ त शिहाबुद्दीन हिंदुस्थानांत पुनः आला आणि कुतुबुद्दीन जाऊन त्यास मिळाला. थंगर येथील किल्ला मजबूत असून विरोधी झाला होता, त्याजवर चालून जाऊन दोघांनीं त्याजला वेढा दिला. विरोध चालविणें अशक्य आहे असें पाहून तेथील राजा कुंवरपाल शरण आला. "त्याला जीवदान दिलें गेलें परंतु त्याचें राज्य खालसा केलें गेलें." (ताज इलियट २ पा. २२७), हें ठिकाण अद्याप निश्चित झालें नाहीं. गौरीशंकरच्या मतें हा कुंवरपाल केरोलीच्या यादव घराण्यापैकीं होता आणि त्यास या-वेळीं बियानांतून हांकलून दिलें गेलें (टॉड पा. ३४६). सुलता-

नाचा जिंकलेल्या इलाख्यांत विरोध करणारे सर्व किल्ले जिंकण्याचा बेत होता. तो यानंतर ग्वालेरवर चालून जाऊन त्या किल्ल्यास त्यानें वेढा दिला. ताज ग्रंथ असें सांगतो कीं, "ग्वालेरचा राजा सोलंखपाल यानें मांडलिकी व खंडणी कबूल केली, तेव्हां त्यास क्षमा करून किल्लाहि परत दिला." नंतर सुलतान कुतुबुद्दीनास पुनः राजप्रतिनिधि नेमून गझनीस परत गेला. कुतुबुद्दीननें बंडखोर मांडलिकांस ताळ्यावर आणण्याचें काम पुरें केलें. सुलतान त्रास देणाऱ्या गख्खार लोकांस जिंकण्यासाठीं हिंदुस्थानांत परत आला त्यावेळीं कुतुबुद्दीनानें त्यास मिळून मदत केली व त्यांचा मोड केला. पण शेवटीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें याच गख्खार लोकांनीं सुलतान सिंधुनदीच्या कांठीं मुक्काम करून उतरला असतां १२०५ इसवींत त्याचा खून केला.

यानंतर हिंदुस्थानांतील तुर्की सरदार व सेनापतीनीं कुतुबुद्दीन यास सुलतान व हिंदुस्थानचा बादशहा निवडिलें. आणि हा त्याचा अधिकार घोरचा राजा, शिहाबुद्दीनचा भाऊ, यानेंहि मान्य केला; कारण त्यास गझनी व हिंदुस्थान हीं दोन्ही राज्यें भोगण्याची महत्त्वाकांक्षा नव्हती. याप्रमाणें हिंदुस्थानची स्वतंत्र तुर्की गुलाम बादशाही सुरू झाली व त्याची राजधानी दिल्ली होऊन तेथें मुख्यतः कुतुबुद्दीन राहूं लागला.

# प्रकरण तेवीसावें.

## उत्तर हिंदुस्थानांतील इतर रजपूत राज्यांचा उच्छेद.

### भाग १

अजमीर व दिल्ली, कनोज व बनारस हीं शहरें घेऊन तेथील दोन पराक्रमी रजपूत राज्यें, चव्हाण आणि राठोड, उच्छिन्न करून खालसा केल्यावर शिहाबुद्दीनासमोर उत्तर हिंदुस्थानांतील दुसरीं राजपूत घराणीं भराभर पडलीं; किंबहुना आश्चर्यकारक झपाटयानें पंचवीस वर्षांच्या आंत पडलीं; आणि सर्व उत्तर हिंदुस्थान मुसलमानांनीं गुलामींत आणलें. या उच्छेदाचा मुसलमान इतिहासकारांनीं दिलेला वृत्तांत साहजिकच मनास थक्क करून सोडणारा असला पाहिजे. पण तो अतिशयोक्तिपूर्ण असला तरी अविश्वासास पात्र नाहीं. कारण पुढें एका प्रकरणांत दिलेल्या कारणांनीं उत्तर हिंदुस्थान यावेळीं पडण्यास योग्यच झालें होतें. हा सर्व वृत्तांत १२०० इसवी नंतरचा असला तरी या इतिहासाशीं इतका संबद्ध आहे कीं, तो दिल्याशिवाय हें पुस्तक संपूर्ण करतां येत नाहीं. किंबहुना मध्ययुगीन हिंदुभारतेतिहासाचा तो शेवटचा अध्याय आहे. दक्षिणेंत मात्र हिंदु राज्यें एक शतकपर्यंत आणखी राहिलीं हें सांगितलें पाहिजे.

उत्तर हिंदुस्थानांतील हीं दुसरीं हिंदु राज्यें जिंकण्याचें काम शिहाबुद्दीनाच्या सेनापतीनीं सिद्धीस नेलें. विशेषतः त्याचा गुलाम कुतुबुद्दीन यानें नेलें. मुसलमानांत त्यावेळीं गुलामांची प्रथा असून या गुलामांना, विशेषतः तुर्कस्थानांतून आणलेल्या गुलामांना, ख्रिश्चन लोक ज्या निर्दयतेनें अमेरिकेंत व इतरत्र नीग्रो गुलामांना वागवीत त्याहून फारच निराळ्या रीतीनें, वागवीत हें पाहून आश्चर्य वाटतें. कुतुबुद्दीनचाच इतिहास घ्या; तो फारच आश्चर्यकारक आहे. साध्या

गुलामाच्या स्थितींतून चढत चढत तो हिंदुस्थानचा पहिला बादशहा झाला. तो सुस्वरूपहि नव्हता, त्याच्या उजव्या हाताची करंगळी तुटली असल्यानें त्यास ऐबक म्हणत. पण तो शरीरानें मजबूत होता आणि युद्धांत पराक्रमी असे. ह्याशिवाय त्यास विलक्षण शहाणपण होतें; ह्यामुळें तो एका जागेवरून दुसऱ्या जागीं चढतच गेला. त्याचें औदार्य इतकें होतें कीं, या औदार्याच्या गोष्टी सांगतांना मुसलमानी इतिहासकारांस मोठा आनंद वाटतो. यापैकीं एक गोष्ट अशी आहे कीं, त्यानें हिंदुस्थानचा बादशहा झाल्यावर एक लक्षाहून कमी इनाम कधींच दिलें नाहीं. लहान असतां खुरासानची राजधानी निशापूर येथील काजीला तो विकत मिळाला. त्याच्या घरीं त्याच्या मुलाबरोबर घोड्यावर बसणें व शस्त्र चालविणें ह्या कला तो शिकला. या कला त्यास काजीनें शिकूं दिल्या हें त्याच्या त्या मुसलमान धन्यास फारच भूषणावह आहे. काजीपासून विकत घेऊन एका व्यापाऱ्यानें त्यास गझनीस आणले; तेथें शिहाबुद्दीन घोरीनें त्यास विकत घेतलें आणि प्रथम फौजेंत व नंतर आपल्या साम्राज्याच्या मुलकी कारभारांत त्यास लाविलें. या नोकरींत तो वाढतच गेला, आणि शेवटीं पृथ्विराजाचा पाडाव झाल्यानंतर पंजाबच्या पलीकडील आपल्या हिंदुस्थानी प्रांतावर कोहराम येथें त्यास त्यानें प्रांताधिकारी ( गव्हर्नर ) नेमिलें.

या मोठ्या सेनापतीचा थोडक्यांत इतिहास देण्याचा आमचा हेतु इतकाच कीं, इतिहासामध्यें वैयक्तिक महत्त्व फार परिणामकारक असतें. मोठीं माणसें वेळोवेळीं उत्पन्न होऊन ते राष्ट्राची भवितव्यता बदलतात. हिंदुस्थानांतील मुसलमानी सत्तेचा उदय आणि हिंदु राज्याचा उच्छेद यांच्या कारणापैकीं महमूद, शिहाबुद्दीन, कुतुबुद्दीन अशा व्यक्ति यावेळीं निर्माण झाल्या हें एक होय. 'तबकातनासिरी' या इतिहासाचा कर्ता कुतुबुद्दीनाची हकीकत लिहितांना

प्रारंभीं योग्य तऱ्हेनें म्हणतो, "जेव्हां सर्व शक्तिमान् ईश्वर आपल्या लोकांस मोठेपणाचें आणि राजास योग्य अशा स्वभावाचें उदाहरण देऊं इच्छितो त्यावेळीं उत्पन्न केलेल्या एखाद्या मनुष्यास शौर्य आणि औदार्य हे गुण तो देतो आणि मग शत्रु आणि मित्र या दोघांवरहि त्याच्या उदारतेचा आणि युद्धसामर्थ्याचा परिणाम होतो" (इलियट २ पा. २९८). असलीं माणसें, उदाहरणार्थ शिवाजी किंवा बाजीराव घ्या, आपल्या भोंवतीं शूर वीरांचीं पथकें सहज जमवितात आणि ते शेवटीं राज्य स्थापून राजवंश चालू करतात. असो, उत्तर हिंदुस्थान जिंकण्याचें काम कुतुबुद्दीनानें चालविलें व अल्तमशनें पुरें केलें. हाहि तुर्कस्थानांतील एक गुलाम असून कुतुबुद्दीनाप्रमाणें शूर, उदार आणि भाग्यवान् होता आणि कुतुबुद्दीनानें त्यास आपली मुलगी दिली. हें आश्चर्यकारक आहे कीं, हे गुलाम उच्च पदवीस पोहोंचले तरी गुलामच राहिले व बऱ्याच उत्तर वयांत गुलामीपासून मुक्ततेची सनदापत्रें त्यांस मिळालीं. आम्ही त्यांच्या विजयाचा इतिहास पूर्वीच सांगितलेला समकालीन ग्रंथ ताजुल्मास्सर यावरून आणि तबकात-इ-नासिरी या बहुतेक समकालीन म्हणजे नासिरुद्दीनच्या वेळीं लिहिलेल्या ग्रंथावरून देतों.

दिल्ली—कनोज पडल्यावर गुजराथ म्हणजे अनहिलवाडचें राज्य पडलें. याचा इतिहास गुजराथ चालुक्यांच्या लेखावरून आम्ही दिलाच आहे. पण याच वृत्ताचा मुसलमानी इतिहास समकालीन ताज-उल-मासर यांत जो प्रकार वर्णन केला आहे तो आम्हांस येथें दिला पाहिजे. त्यांत असें वर्णन आहे कीं, ११९५ त कुतुबुद्दीन अजमिरास आला असतां, त्यास अशी खबर लागली कीं मेर लोकांनीं (हे त्यावेळीं हिंदु होते) नहरवाल्याकडून फौज बोलावली आहे. या हालचालीचा बंदोबस्त करण्यासाठीं त्यानें आपली फौज पाठविली; त्या फौजेचा पराभव होऊन तिचा अजमीरपर्यंत पाठलाग झाला, आणि

नाहरवाला फौजेनें अजमीरच्या किल्यास वेढा दिला. कुतुबुद्दीनानें गझनीहून कुमक मागिवली व ती आली. ती पाहून गुजराथची फौज परतली. मुसलमानांनीं अर्थात् चढाईची चाल स्वीकारून गुचराथेवर स्वारी केली. "पाली आणि नदूल येथील उंच किल्ले टाकून दिलेले सांपडले आणि हिंदूची फौज अबूच्या डोंगराच्या पायथ्याशीं एका घाटाच्या तोंडावर राय कर्ण आणि धारावर्स यांच्या अधिपत्याखालीं उभी दिसली. याच खिंडींत पूर्वी शिहाबुद्दीन घोरीचा पराभव झाला असल्यामुळें मुसलमान हिंदूंवर हल्ला करीनात. तेव्हां एक युक्ति योजिली गेली, आणि मुसलमानी फौज भ्याल्यासारखें दाखवून अजमीरकडे परतली. यामुळें हिंदु खिंड सोडून मुसलमानांवर हल्ला करण्यास मैदानांत आले. मैदानांत खडाजंगीची लडाई झाली आणि शेवटीं हिंदूंचा पूर्ण पराजय झाला. हिंदूंचें सेनापति मारले गेले किंवा हस्तगत झाले. राय कर्ण पळून गेला पण वीस हजार गुलाम, वीस हत्ती व अमर्याद शस्त्रें जेत्यांच्या हातांत पडलीं. शिवाय इतकी लूट मिळाली कीं, जणूं काय सर्व पृथ्वीतील राजांचें खजिने मुसलमानांच्या ताब्यांत आले. नहरवाला शहर व गुजराथचें राज्य मुसलमानांज्या सत्तेखालीं आले. विजयी खुश्रूची ( सुलतानाचीं ) निशाणें अजमीरला परत येऊन दिल्लीस आलीं. कुतुबुद्दीनानें नाना प्रकारच्या मौल्यवान् व दुर्मिळ वस्तु गझनीस पाठविल्या." ( इलियट २ पा. २८० )

या वर्णनावरून असें दिसतें कीं, अबू पर्वताजवळ एका ठिकाणीं पूर्ण जय मिळाल्यावर कुतुबुद्दीन एकदम नहरवाला ( पाटण ) वर चाल करून गेला; आणि तें शहर काबीज करून त्यानें लुटलें. हें वृत्त ११९७ मध्यें घडलें असें म्हटलें आहे. पण पूर्वी सांगितल्याप्रमाणें भीमानें ११९९ त अनहिलवाड पाटणहून एक दानलेख केला आहे. तेव्हां असें मानावें लागतें कीं, अनहिलवाडचा कबजा

उशीरानें म्हणजे ११९९ त घेतला गेला. गुजराथेचा विध्वंस करून राजधानी मुसलमानांनीं कबजांत घेतली ही गोष्ट जयंतसिंहाचा १२०२चा दानलेख यांत सांगितलेली, गुजराथची भयंकर स्थिति सिद्ध करते. भीम पळाल्यानंतर या जयंतसिंहानें चालुक्यांच्या सत्तेचें दैव पुनः फिरविलें आणि मुसलमानांस हांकलून देऊन गुजराथचें राज्य व त्याची राजधानी मोकळी करून त्यानें भीमाच्या ऐवजीं अनहिलवाडांत कांहीं वर्षे राज्य केलें. जयसिंह सिद्धराजानें बांधलेल्या कांहीं मंदिरांचा नाश या वेळीं झाला असें मानतां येतें. या हल्लयानें गुजराथचें राज्य बरेंच खिळखिळे झालें; परंतु आणखी शंभर वर्षें तें कायम राहिलें.

गुजराथेची सत्ता याप्रमाणें उध्वस्त करून आणि अजमीर कबजांत ठेवून कुतुबुद्दीनानें आपल्या सरहद्दीवरील दुसऱ्या सामर्थ्यवान् हिंदु राजाकडे म्हणजे कालंजरकडे लक्ष फिरविलें व त्या किल्ल्यावर हल्ला केला. चंदेल्लांच्या प्रकरणांत या हल्ल्याचें आम्ही वर्णन केलेंच आहे. मात्र समकालीन ताजुल्--मासिर् यांत दिलेल्या हकीकतीवरून दोन चार आणखी तपशीलाच्या गोष्टी आम्ही येथें देतों. "५९९ हिजरी ( १२०२ इसवी ) कुतुबुद्दीन अल्तमशला बरोबर घेऊन कालंजरवर चालून गेला. परमार ( परमर्दिदेव ) किल्ल्यांत पळून गेला. परंतु पुष्कळ काळपावेतों जीवावर उदार होऊन लढल्या नंतर तो शरण आला आणि महमुदानें मांडलिकीच्या ज्या शर्थी चन्देल्लांवर घातल्या होत्या त्याच पुनः त्यावर घातल्या गेल्या. पण त्या अमलांत येण्यापूर्वींच तो मरण पावला. त्याचा मेहता अजदेव हा इतक्या सहजरीतीनें नमण्यास तयार होईना व त्यानें बराच विरोध केला. पण त्यानंतर मोठें अवर्षण पडल्यानें किल्ल्यावरील पाण्याचीं सर्व कुंडें सुकून गेल्यानें त्यास शरण यावें लागलें. कालंजरचा किल्ला सगळ्या पृथ्वींत प्रसिद्ध असलेला घेतला गेला आणि तेथील देवळें

पाडून त्यांच्या मशिदी केल्या गेल्या. पन्नास हजार लोक गुलाम-करून नेले. वीस हत्ती व असंख्य शस्त्रें लुटींत मिळालीं. नंतर विजयी निशाणें महोबावर चाललीं, व त्या प्रांताच्या राज्याची व्यवस्था हसन अमीर अली याकडे दिली गेली. " हीहि हकीकत गुजराथच्या हकीकतीप्रमाणें चंदेल्लांच्या कोरीव लेखांवरून प्रत्यंतरानें सिद्ध होते. चंदेल्लानीं कालंजर किल्ला आणि राज्याचा बराचसा भाग परत मिळ-विला आणि गुजराथेप्रमाणेंच हा राजवंश स्वतंत्रतेनें आणखी शंभर-वर्षें चंदल्लांच्या प्रकरणांत सांगितल्या प्रमाणें राज्य करीत होता.

अजमीर, दिल्ली, कनोज व बनारस येथें पूर्णपणें बसलेल्या मुसल-मानी सत्तेच्या सरहद्दीवरील तिसरें महत्त्वाचें हिंदु राज्य बंगालच्या सेनांचें होतें. मुसलमानी इतिहासकारांनीं बंगालच्या उच्छेदाचा जो इतिहास लिहिला आहे तो अत्यंत आश्चर्यजनक आहे. बखत्यार खिलजीचा पुत्र महंमद यानें हा देश जिंकला; कुतुबुद्दीनानें नव्हे. याचा वृत्तांत ताजुल्-मासर् या समकालीन ग्रंथांत नसून तबकात--इ-नासरीमध्यें स्पष्ट निर्देशानें ऐकलेल्या हकीकतीवरून सांगितला आहे.

हा तबकातमध्यें सांगितलेला वृत्तांत आमच्या टीकेसह आम्ही पुढें देतों. महमद बख्त्यार हा एक खिलजी ( अफगाण, तुर्की नव्हे ) धाडसी मनुष्य असून नोकरीच्या शोधार्थ शिहाबुद्दीन घोरीजवळ त्याच्या विस्तार पावणाऱ्या सत्तेच्या वेळीं आला. विजयी लोक दूर-दूरचे प्रांत जिंकूं लागले म्हणजे त्या लोकांच्या मुळच्या देशांतील अनेक धाडसी माणसें आपलें नशीब काढण्यास पुढें येतात. शिवाजी किंवा बाजीराव यांच्यावेळीं मराठे वीरगडी अशाच रीतीनें नोकरींत राहून नवीन जिंकलेल्या प्रांतांवर फौजबंद अधिकारी झाल्याचें आप-ल्यास अवगत आहेच. महमद बखत्यार खिलजी असाच धाडसी वीरगडी असून कित्येक वेळां नाकारला जाऊन शेवटीं मिर्झापूरचा प्रांताधिकारी नेमला गेला. तुर्क व अफगाण यांचें सैन्य जमा करून

त्यानें प्रथम बिहारावर हल्ला केला व तो जिंकून देश आणि शहरें त्यानें लुटलीं. बिहार नांवाचें एक बौद्ध वसतिस्थान लुटल्याचें यांत आणखी वर्णन आहे. हें बहुधा विक्रमशील असावें, आणि त्यानें तेथील डोकें मुंडलेले, विरोध न करणारे, सर्व बौद्ध भिक्षू कत्तल केले आणि त्यांची सर्व पवित्र पुस्तकें फेंकून दिलीं. 'कारण तीं वाचण्यास किंवा त्यांचा अर्थ सांगण्यास कोणी उरला नाहीं.' हें वृत्त बहुधा ११९९ त झालें. कारण महमद बख्त्यार कुतुबुद्दीना समोर औध व बिहार जिंकून, नजराणे घेऊन आल्याचें वर्णन ताजुल्मा-सिरमध्यें आहे. ( ह्यावेळीं कुतुबुद्दीन मोहोबा येथें बहुधा असावा ). कुतुबुद्दीनानें त्यास पोशाक देऊन त्याचा सत्कार केला व बिहारांत त्यास पुनः पाठविलें.

" नंतर त्यानें बंगाल जिंकण्याचा बेत करून गुप्तपणें एक फौज तयार केली आणि बंगालची राजधानी नडिया हिजवर एकाएकीं हल्ला केला. औत्सुक्यानें फौजेच्या पुढें चालत तो एकच घोडेस्वारा-सह नडियास पोहोंचला व बेधडक निरुपद्रवी रीतीनें घोड्याचा व्यापारी अशा स्वरूपानें शहरांत शिरून राजवाड्याजवळ आला. तेथें तलवार काढून पाहरेकऱ्यावर त्यानें एकदम हल्ला केला. अर्थात् राजवाड्यांत गडबड उडाली, पण त्यास कोणीच विरोध केला नाहीं. वृद्ध राजा लक्ष्मणसेन जेवणास बसण्याच्या तयारींत होता; तो गड-बड ऐकून व चौकशी अंती खबर कळून तात्काळ पाठीमागच्या दर-वाजानें पळाला तो जगन्नाथास जाऊन पोहोंचला. महमदाची फौज लौकरच येऊन थडकली आणि तिनें राजवाड्याचा आणि शहराचा कबजा घेऊन प्रांत स्वाधीन करून घेतला. अर्थात् कोणीहि विरोध न केल्यानें शहर लुटलें जाऊन उध्वस्त केलें गेलें. महमद बखत्यार यानें बंगालची मुख्य राजधानी गौर ऊर्फ लखनौती ही कबजांत घेऊन ती आपलीहि राजधानी केली. "

या वर्णनाच्या सत्यतेबद्दल अनेक विद्वानांनीं शंका घेतल्या आहेत. बंगालचें सरकार राजकीय बाबींत इतकें बेफिकिर व निद्रिस्त होतें कीं, त्याला एक मोठी फौज इतक्या दूरवर चालून येत आहे ( विक्रमशीलाहून नडियापर्यंत ) याची खबरच लागली नाहीं, किंवा दिल्ली व कनोज पडल्याचा डंका सर्व हिंदुस्थानभर वाजत असतां अशा भयंकर शत्रूशीं टक्कर देण्याची त्यानें कांहींच तयारी केली नाहीं, किंवा प्रत्यक्ष शत्रू येऊन पोहोंचल्यावर नडियाच्या किंवा बंगालच्या राज्याच्या वतीनें एक हातहि उठविला नाहीं याचें आश्चर्य वाटतें. तबकात-इ-नासिरी या ग्रंथाच्या कर्त्याला ज्या मुसलमानांनीं माहिती दिली त्यांनीं फारच अतिशयोक्ति केली असावी किंवा खुद्द इतिहासकाराचीच ही अतिशयोक्ति असावी. लक्ष्मणसेन राजाच्या जन्माची अशी एक वेडसर गोष्ट यांत सांगितली आहे कीं ज्योतिष्यांनीं सांगितलेला उत्तम जन्माचा मुहूर्त साधण्यासाठीं त्याच्या गर्भिणी आईचे पाय बांधून वर टांगले होते. या वेडसर हकीकतीवरूनच तबकातमध्यें दिलेला सर्व वृत्तांत वेडसर आहे असें सिद्ध होतें. या वृत्तांताचें वर्ष तबकातमध्यें ११९९ दिलें आहे व लक्ष्मणसेन शकाचे ८० वें वर्ष म्हणून आणखी सांगितलें आहे. परंतु आम्हांस असें वाटतें कीं, ही हकीकत १२०२ च्या सुमारास घडली. लोकांनीं मुळींच प्रतिकार केला नाहीं याचें कारण यांत असें दाखविलें आहे कीं, त्या वृद्ध राजाच्या ब्राह्मण मंत्र्यानीं भोळसटपणें त्यास पूर्वी असें सांगितलें होतें कीं, 'एक तुर्क येऊन तुझें राज्य घेईल असें आमच्या ज्योतिषांत भविष्य निघतें आहे.' एक आणखी अशी गप्प मारली आहे कीं, या जेत्याचें लक्षण काय निघतें असा राजानें प्रश्न केला तेव्हां त्या विद्वान् ज्योतिष्यांनीं उत्तर दिलें कीं, जेता आजानुबाहु आहे; तेव्हां राजानें कोणत्या तुर्काचें हें लक्षण आहे याची चौकशी केली आणि महमद बख्त्यार याचे असे लांब हात आहेत असें

कळलें. यांत कांहीं तथ्य असेल कीं, हिंदु लोकांचा विरोध भारतवर्ष म्लेच्छाच्या ताब्यांत जाणार या पुराणांतील कथांनीं किंवा तत्कालीन ज्योतिष्यांच्या वेडसर भयप्रद भविष्यानीं लंगडा पडला. परंतु तबकातनें दिलेली वरील हकीकत सकृद्दर्शनींच इतकी वेडसर दिसते कीं, ती खरी नसावी; आणि आम्ही त्यानें दिलेला बंगालचा उच्छेदाचा वृत्तांत अतिशयोक्तीचा अर्थात् असत्य मानतो. महमद बख्त्यारचा बराच विरोध झाल्यानंतर बंगाल पडला. आणि तोहि एकदम नव्हे तर गुजराथ आाणि बुंदेलखंड याप्रमाणें हळू हळू पडला असेंच दिसतें.

तबकातमध्यें ही उलट सुलट केलेली हकीकत १२५०च्या सुमारास लिहिली गेली व ती महम्मद बखत्यार बरोबर असलेल्या दोन गप्पीदास वीरांनीं, जेत्यांचें शौर्य आणि जितांचा भ्याडपणा वाढवून, सांगितलेली दिसते. तसेंच एका अपरिचित देशांत परकी लोक एकदम आले म्हणजे तेथील लोकांचे स्वभाव व विचार न समजल्यानें साहजिकच जे गैरसमज उत्पन्न होतात त्यामुळें व तिसरें, हिंदु लोकांच्या ज्योतिषविषयक भोळसट कल्पनांची थट्टा करण्याच्या हेतूनें ही हकीकत बनली असावी. या परकी वृत्तांताचें सत्यत्व एका हिंदुस्थानांतील समकालीन लेखाच्या कसोटीनें तपासलें पाहिजे. हा लेख म्हणजे केशवसेनाचा बाकरगंज येथील शिलालेख होय ( जे. आर. ए. एस्. बंगाल व्हॉ. ७ पा. ४० ते ५० ). या लेखांतील हकीकत दुसऱ्या बाजूला लक्ष्मणसेनाच्या पराक्रमाची व दान देणाऱ्या केशवसेनाच्या पराक्रमाची अतिशयोक्तीनें तारीफ करणारी आहे हें खरें. पण त्यांत लक्ष्मणसेनाच्या या अत्यंत अपमानास्पद पराजयाची कांहींच गंधवार्ता नाहीं. असें कदाचित् म्हणतां येईल कीं, कोरीव लेखांत लेख लिहिणाऱ्याच्या पराजयाचें वर्णन न करणें मनुष्य स्वभावास साहजिक आहे. तुरुष्कांशीं झालेल्या लढायांचा प्रतिकूल

उल्लेख बुंदेलखंड आणि गुजराथ यांतील लेखांतल्याप्रमाणें येतो, नाहीं असें नाहीं. पण आपल्यास निदान असें म्हणतां येतें कीं लक्ष्मणसेन हा एक शूर राजा होता व त्यानें बनारस, जगन्नाथ व प्रयाग येथें तीन जयस्तंभहि उभारले होते. तसेंच केशवसेन हा अद्याप पूर्व बंगाल्यांत एक शक्तिमान् राजा होता हेंहि मान्य केलें पाहिजे. लक्ष्मणसेनाचे वंशज पूर्व बंगाल्यांत त्यानंतर बरींच वर्षें राज्य करीत होते. तेव्हां शूर लक्ष्मणसेन लढाई केल्याशिवाय पळून गेला ही गोष्ट संभवनीय दिसत नाहीं. यामुळें असेंच मानणें वाजवी होईल कीं, लक्ष्मणसेन मेल्यानंतर माधवसेनाच्या लहानपणाच्या राज्याच्या वेळीं हें वृत्त घडलें. माधवसेनाचें नांव या बाकरगंज ताम्रपटांतून खोडून काढलेलें स्पष्ट दिसतें ( सदर पा. ४२ ). या सर्व कारणांवरून दोन विरोधी विधानांचा मेळ घालतां बंगालचा उच्छेद बऱ्याच विरोधानंतर झाला व तोहि एकदम न होतां हळुहळु झाला.

पण तबकातनें दिलेली हकीकत एक वेळ खरी मानली तरी सुद्धां ती हकीकत जितकी मानली जाते तितकी अपमानास्पद नाहीं. प्रथम हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, नडिया ही सेनांची मुख्य राजधानी नव्हती. ही एक ब्राह्मणांची नवीन वसाहत होती. गंगेमधील एका बेटांत हा ब्राह्मणविहारच होता. आणि तेथें लक्ष्मणसेन कधीं कधीं रहात असे. राजवाड्यावरील पाहरेकरी फारच थोडे असावे आणि शहरांतहि फौज नांवापुरतीच असावी. दुसरें अशा ठिकाणावर एकाएकीं हल्ला करणें अशक्य नाहीं. किंबहुना इतिहासांत असे अचानक हल्ले कित्येक नमूद आहेत. दक्षिणेंतील देवगिरीवर अशाच प्रकारचा अचानक व फसवेगिरीचा हल्ला यानंतर शंभर वर्षांनीं अल्लाउद्दिनानें केला. फार कशाला ? या वृत्तानंतर पांचच वर्षांनीं हिंदुस्थान जिंकणारा शिहाबुद्दिन सिंधु नदीच्या पूर्व किनाऱ्यावर मुक्काम करून तंबूंत निजला असतां दहा पांच गक्खरांनीं पाहरे-

कऱ्यांची नजर चुकवून पाण्यांतून जाऊन, तंबूंत घुसून शिहाबुद्दीनाचा खून केला.* तिसरी गोष्ट अशी कीं, अशा अचानक हल्ल्यांतून जीव वांचवून पळून जाऊन दुसऱ्या ठिकाणीं राजधानी करून तेथून विरोध चालू ठेवणें मुळींच अपमानास्पद नाहीं; उलट योग्य आणि प्रशंसनीय आहे. कनोजचा राज्यपाल व गुजराथचा भीम यांनीं महमुदाविरुद्ध हेंच केलें आणि अर्वाचीन मराठ्यांच्या इतिहासांत राजारामानें औरंगजेबाविरुद्ध हेंच केलें. किंबहुना अलीकडील सरकारें सुद्धां हेंच करितात. वेढा दिलेली राजधानी सोडून दुसरी राजधानी करून तेथून ते विरोध चालू ठेवतात. लक्ष्मणसेन व त्याचे वंशज यानीं हेंच केलेलें दिसतें. नडियाच्या पूर्वेस महत्त्वाचें शहर विक्रमपुर होतें. तेथून प्रसिद्ध केलेला लक्ष्मणसेनाचा एक दानलेख सांपडलाहि आहे. ती आपली राजधानी करून तेथून पूर्वबंगाल्यावर शंभर वर्षें त्यांनीं आणखी राज्य केलें, व गुजराथ आणि बुंदेलखंडाप्रमाणेंच मुसलमानाशीं तेथून त्यानीं विरोध केला. खुद्द तबकात मध्यें लिहिलें आहे कीं, ज्यावेळेस नासिरुद्दीन लखनौतीवर चालून गेला, तेव्हां खिलजी तेथें नसून आपली फौज घेऊन "बंगच्या प्रांतांत घुसण्याच्या इराद्यानें" पूर्वेकडे गेला होता. याचा अर्थ त्यानें सेनराजावर स्वारी केली होती (रॅव्हर्टी पा. ६२९). हाहि विरोध शेवटीं हिंदु राज्य स्थापन करण्यास उत्तर हिंदुस्थानच्या इतर ठिकाणांप्रमाणें बंगाल्यांतहि कां समर्थ झाला नाहीं हा खरा प्रश्न आहे आणि या असमर्थतेचीं कारणें पुढील प्रकरणांत आम्ही विस्तारानें देऊं.

---

* मुलसमानी घोडयाचे व्यापारी त्या वेळीं राजधानींत येणें ही एक नेहमीची गोष्ट होती. हिंदु राजांना आरबी व इराणी घोडे नेहमीं पसंत असत व त्यांजबद्दल ते मोठमोठ्या किंमतीहि देत. यामुळें मुसलमान घोड्याचे व्यापारी त्या काळीं हिंदु राजांकडे वारंवार येत; यामुळें त्यांच्या येण्यानें कोणालाहि संशय उत्पन्न होत नसे.

# प्रकरण चोविसावें.

## उत्तर हिंदुस्थानचा उच्छेद, भाग २.

मुसलमानी साम्राज्याच्या अगदीं सरहद्दीवर असलेलीं मजबूत हिंदु राज्यें चालुक्य, चन्देल्ल व सेन यांप्रमाणें कुतुबुद्दीननें व महम्मद बखत्यारनें जिंकलीं किंवा नरम केलीं. त्यापलीकडे असलेलीं हिंदु राज्यें जिंकण्याचें काम त्याच्या मागचा सुलतान अल्तमश यानें केलें. तोहि तितकाच शूर आणि दैववान् होता. कुतुबुद्दीनाप्रमाणेंच तो प्रथम गुलाम होता. त्याचें गुण व शौर्य शिहाबुद्दीनच्या लक्षांत आलें. त्यानें त्यास गुलामींतून मुक्त केलें व कुतुबुद्दीनाप्रमाणेंच एका जागेवरून दुसऱ्या जागेवर सारखी बढती दिली. कुतुबुद्दीननें त्यास आपली मुलगी दिली. तबकातमध्यें अशी एक गोष्ट सांगितली आहे कीं, अलतमशला शिहाबुद्दीन गझनी येथें खरेदी करूं लागला तेव्हां व्यापारी पुढें केलेली किंमत घेईना. तेव्हां शिहाबुद्दीननें हुकूम केला कीं, यास गझनी येथें कोणी विकत घेऊं नये. कुतुबुद्दीनानें बादशहाचा हुकूम पाळून त्यास दिल्ली येथें खरेदी केलें (इलियट २ पा. ३२२). "कुतुबुद्दीन लोहूर (लाहोर) येथें मरण पावला तेव्हां शम्सुद्दीन अल्तमश् हा बदामी येथें प्रांताधिकारी होता. तेव्हां एकंदर सरदारांच्या संमतीनें दिल्लीच्या सेनापतीनें त्यास दिल्लीस बोलाविलें आणि सुलतान निवडिलें. कांहीं फौजेचे व प्रांताचे अधिकारी, कुब्राचा इत्यादि, या निवडणुकीस विरोधी झाले. परंतु ईश्वरकृपेनें त्यांचा पराभव झाला आणि प्रत्येक इसम जो विरोधी किंवा बंडखोर झाला तो पराजित होऊन दिल्ली, बदायुं, औध, बनारस आणि शिवालिक डोंगर हे सर्व प्रांत त्याच्या कबजांत आले. यिल्दुस् यापासून लाहोर प्रांतहि सोडविला गेला आणि सिंध व बखर १२१७

त कुबाच्यापासून घेतला गेला. घियासुद्दीन बख्त्यार याच्या ताब्यांतील बंगाल प्रांतहि जिंकला गेला; व त्यानें आल्त्मशचें मांडलिकत्व मान्य करून खंडणी दिली."

याप्रमाणें दिल्लीचें मुसलमानी साम्राज्य दुसऱ्या एका लायक राजाच्या सत्तेखालीं आलें आणि त्यानें आपलें लक्ष प्रथम राज्यांतील बंडखोर हिंदु सरदार जिंकण्याकडे दिलें. ६२३ हिजरीमध्यें (१२२७ इसवी) तो रणथंबोरवर चालून गेला. "या किल्ल्यापुढें सत्तर राजांनीं हात टेकले होते. सुलतानाच्या नोकरांनीं ईश्वराच्या कृपेनें तो किल्ला घेतला. ६२४ हिजरीमध्यें (१२२७ इसवी) तो शिवालिक प्रांतांतील मंडावर वर चालून गेला आणि ईश्वराच्या कृपेनें तेंहि हस्तगत करून पुष्कळ लूट संपादून सुलतान दिल्लीस परत आला" (रॅव्हर्टीचा तबकात पा. ६१८). ह्या दोन जागा बहुधा चौहाण सरदारांच्या ताब्यांत असाव्या, आणि ते बंडखोर झाल्यानें त्यांच्यावर हल्ला केला गेला.

रणथंबोरवर कुतुबुद्दीनानेंहि हल्ला केला होता हें आपण पूर्वी पाहिलें आहे, व तेथील सरदार शरण आल्यानें बचावला होता. चौहाणांनीं रणथंबोर पुनः घेतलें व तेथला शेवटचा राजा हम्मीरमहाकाव्याचा नायक–शूर हम्मीर हा होता. हल्लीं मंडावर बद्दल थोडासा विवाद आहे, आणि शिवालिकमध्यें तें शहर होतें असें म्हटलें आहे (इलियट २ यांत डोंगर म्हटलें आहे, पण रॅव्हर्टीनें प्रांत म्हटलें आहे), यामुळें हा विवाद उत्पन्न झालेला आहे. मंडावर प्रमाणेंच हांसी शिवालिक डोंगरांत आहे असें वर्णन येतें, परंतु तें शहर हिमालयाच्या पायथ्याशीं नसून कर्णाल जिल्ह्यांत आहे. आम्ही पूर्वी सांगितलेंच आहे कीं, शिवालिक शब्दानें सांबरच्या चौहाणांचा सपादलक्ष देश बोधित होतो (भा. २ पा. ३६). बहुधा मंडावर हें मुळांत नाहरराय प्रतिहाराचें असून पृथ्विराजानें तें जिंकल्यावर

चौहाणांच्या राज्यांत आलें व यावेळीं तेथें चौहाण राजा राज्य करीत असावा. मंडावर हल्लीं पडक्या स्थितींत आहे; आणि जोधपूरच्या अर्वाचीन शहरापासून चार मैलावर आहे.

अल्तमशनें यानंतर ग्वालेरच्या किल्ल्यावर चाल केली. कुतुबुद्दीनानें हा किल्ला शरण आल्यामुळें सोडला होता. मुसलमानी साम्राज्यांत हें एक मजबूत ठिकाण होतें, आणि तें कबजांत घेणें महत्त्वाचें होतें. यावेळीं हा किल्ला कछवाहांच्या ताब्यांत नव्हता. ते तेथून अंतरावर असलेल्या अंबरच्या किल्ल्यास गेले होते. यावेळीं हा किल्ला प्रतिहारांच्या ताब्यांत होता. श्रीमंत बळवंतराव भय्या साहेब शिंदे यांनीं प्रसिद्ध केलेल्या ग्वाल्हेरनाम्यांत परिहारांनीं हा किल्ला कबजांत घेतल्याचें सांगितलें आहे. ग्वाल्हेर गॅझेटियर असें म्हणतें कीं, परिहारानीं हा किल्ला कछवाहांपासून ११२९ त हिसकावून घेतला, आणि कुतुबुद्दीनानें सोलखपाल प्रतिहार याजपासून तो घेतला होता. १२१० त अलतमशाच्या ताब्यांत तो किल्ला होता. पण परिहारांनीं तो परत घेतला. यामुळें त्याजवर हल्ला करणें भाग पडलें. "६२९ हिजरी ( १२३२ इसवी ) मध्यें अल्तमशनें किल्ल्यास वेढा दिला. मलिक्देव ( रॅव्हर्टी याठिकाणीं मंगल देव म्हणतो ) बसिल देवाचा पुत्र ( रॅव्हर्टी मालदेव वाचतो ) यानें ही लढाई चालविली. अकरा-महिनेपर्यंत मुसलमानी फौज वेढा देऊन बसली होती. शेवटीं मलिकदेव रात्रीं पळून गेला. सुलतानाच्या तंबूसमोर १७०० लोकांना शिक्षा दिली गेली. ग्वाल्हेर येथें अधिकारी नेमून सुलतान दिल्लीस परत आला" ( इलियट २ पा. २२७ ). आम्हांस असें वाटतें कीं ज्या लोकांस शिक्षा झाली ते लोक सुलतानाच्या फौजेपैकींच असावे. मलिकदेवास पळण्यास त्यांनीं वाव दिला हा त्यांचा अपराध होता. हे लोक मलिकदेवाचे नसावेत. मलिकदेवाचे लोक पकडले गेले असें येथें सांगितलें नाहीं; आणि शिक्षा दिली हे शब्द त्या लोकांस लागू

होणार नाहींत. ह्याशिवाय आणखी गोष्ट अशी कीं, बाबरच्या काळीं ह्या किल्ल्यांत एक शिलालेख होता. त्यांत रजपूत स्त्रियांनीं किल्ल्यावर चिता रचून आपल्यास जाळून घेतलें असें वर्णन होतें; आणि त्या जागेस अद्याप जोहारताल म्हणतात ( ग्वाल्हेर गॅझेटियर पा. १२५ ). रजपूत शिपाई वेढा घातलेल्या फौजेंतून फुटून जातांना मारले गेले असावे व कांहीं सुटलेहि असावे. ग्वाल्हेर किल्ल्याचा नंतरचा इतिहास प्रिन्स बळवंतराव भय्यासाहेब यांनीं दिलेला येथें विस्तारानें देण्याची आवश्यकता नाहीं. त्याचे स्वामित्व नेहमीं बदलत गेलें. तैमूरलंगाच्या वेळीं हा किल्ला तोमरांनीं घेतला. तो पुनः बाबरनें घेतला. मोंगलांच्या अमदानींत राजपुत्रांना कैदेंत ठेवण्याचें हें ठिकाण होतें. पुढें भदोरा राजांनीं तो घेतला व त्यांपासून शिंद्यांनीं घेतला. इंग्रजांनीं शिंद्यापासून दोनदां घेतला पण हल्लीं तो शिंद्याकडेच आहे.

" ६३२ हिजरी मध्यें ( १२३४ इसवी ) अल्तमशनें माळव्यावर फौज नेली व त्यानें भेलशाचें शहर किल्ल्यासह घेतलें. तेथें एक देऊळ होतें, तें तीनशें वर्षें बांधीत असावें. तें १०५ गज उंच होतें. तें उध्वस्त केलें गेलें. " ( इलियट २ पा. ३२८ ). हें देऊळ बहुधा अल्बेरूनीनें सांगितलेलें भैल्लस्वामी (विष्णु) चें देऊळ असावें. इ. स. पू. पहिल्या शतकांतील लेख असलेला गरुडस्तंभ बेतवानदीच्या पलीकडच्या किनाऱ्यावर असलेल्या विष्णूच्या देवळाचा असावा. हें देऊळ पूर्वींच पडलेलें असावें. तें कांहीं असो, उदेपूरचें शिवाचें देवालय अद्याप उभें आहे आणि मुसलमानांच्या तडाक्यांतून तें वाचलें ह्याचें आश्चर्य वाटतें. या शिवाच्या देवळाचा वर उल्लेख नाहीं. उदयादित्य परमारानें हें देऊळ बांधलें असून याचेंहि शिखर फार उंच आहे. आणि तें अद्याप परमारांच्या वैभवाची साक्ष देत

आहे. भेलशाचा उच्छेद शेवटचा परमार राजा देवपाल याच्या कारकीर्दींत झाला. उत्तर परमारांच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें यानें १२१६ पासून १२४० पर्यंत राज्य केलें.

" भेलशाहून अल्तमश उज्जनीवर चालून गेला. तेथें महाकालाचें प्रसिद्ध देवालय होतें, तें त्यानें तोडलें आणि या काळापूर्वी १३४६ वर्षां राज्य करणाऱ्या विक्रमादित्याची मूर्तिहि फोडली. हिंदूंचा शक याच्या राज्यापासून चालतो. ( या आंकड्यावरून १२८९ इसवी हा काळ येतो. पण उज्जनीचा उच्छेद १२३४ त झालेला आहे. तेव्हां आपल्यास असें मानतां येईल कीं, विक्रमानें ५५ वर्षे राज्य केलें ). कांहीं तांब्याच्या मूर्ति सांपडल्या त्या व महाकाळाची दगडी मूर्ति दिल्लीस नेली " ( इलियट २ पा. ३२८ ). वरील हकीकतींत अतिशयोक्ति नसून थोडक्यांत सांगितलेलें वृत्त खरें मानण्यास हरकत नाहीं. तत्कालीन हिंदु लेख आपणांस पुराव्याच्या मजबुतीस मिळत नसला तरी महाकाळाचें देऊळ त्यावेळीं तोडलें जाऊन त्याच्या ठिकाणीं मशीद बनली ही गोष्ट निःसंशय आहे. कारण इतिहास असें सांगतो कीं, राणोजी शिंद्याच्या वेळीं या मशिदीचें रूपांतर केलें जाऊन पुनः हिंदु महाकालाचें देऊळ बनलें. राणोजी शिंद्याचे वंशज अद्याप उज्जनीवर राज्य करीत आहेत व ते महाकालाचे भक्त आहेत. महाकाळाचे हल्लींचें उंच शिखराचें देऊळ राणोजी शिंद्याचे शेणवी दिवाण रामचंद्रबाबा यांनीं बांधलें असून हा निपुत्रिक असल्यानें त्यानें आपली सर्व संपत्ति हें देऊळ बांधण्याकडे लाविली ( १७४५ इसवी ). बहुधा हल्लींचें देऊळ पूर्वींच्याच देवळाच्या ठिकाणीं आहे. हें येथें सांगण्यासारखें आहे कीं, उज्जनीच्या मुसलमान राज्यकर्त्यांनीं मूळ तोडलेल्या देवळापासून जवळच महाकाळाची दुसरी मूर्ति स्थापन करण्याची परवानगी दिली आणि त्यास हल्लीं वृद्ध म्हणजे जुना महाकाळ या नांवानें संबोधितात.

ही माळव्यावरील स्वारी बहुधा प्रसिद्ध हिंदु देवालयें तोडण्याच्याच इराद्यानें झाली असल्यानें महमुदाच्या सोमनाथावरील स्वारीसारखी धार्मिक स्वारी होती. माळवा जिंकून त्यास मुसलमानी सत्तेखालीं आणण्याचा यांत प्रयत्न नव्हता. बहुधा हा प्रांत दूर म्हणजे ग्वालेरप्रमाणें मुसलमानी राज्यास लागून नव्हता, यामुळें परमारांची सत्ता यापुढें आणखीं शंभर वर्षें गुजराथ येथील चालुक्य सत्तेप्रमाणें टिकली. माळव्याचा शेवटीं विजय अल्लाउद्दीन खिलजीच्या वेळीं झाला.

याप्रमाणें आम्हीं उत्तर हिंदुस्थानांतील मुख्य मुख्य राज्यांचा उच्छेद म्हणजे चौहाण, राठोड, चालुक्य, चंदेल्ल, सेन, कच्छवाह आणि परमार यांचा उच्छेद वर्णिला. मेवाडच्या गुहिलोतांची पाळी यानंतर आली. याची फारशी हकीकत मिळत नाहीं. मेवाडवर हल्ला नासिरुद्दीनच्या वेळीं झाला. त्यावेळीं जैत्रसिंह राजा होता (१२५३ इ.) आणि गुहिलोतांची राजधानी नागदा उच्छिन्न झाली. तथापि जैत्रसिंहानें मुसलमानांचा पराभव केला व मेवाडची डोंगरी राजधानी शाबूत राहिली. गुहिलोत तेथें पराक्रमानें पुढें राज्य करीत राहिले, ते अल्लाउद्दिन खिलजीनें चितोड घेईपर्यंत, सु. १३०० इ. पर्यंत, होते.

# प्रकरण पंचविसावें.

## उत्तर हिंदुस्थानचा उच्छेद.

### –मुख्य कारणें–

उत्तर हिंदुस्थानाच्या उच्छेदाचीं कारणें पंजाबाच्या उच्छेदाच्या कारणांहून निराळीं असलीं पाहिजेत व आहेत. पंजाबांत राजपूत राज्यें नव्हतीं. पंजाब पूर्वी सांगितल्याप्रमाणें नेहमीं बाहेरच्या राजांच्या सत्तेखालीं होता. त्यावर प्रथम सिंध, नंतर काश्मीर, नंतर काबूलची सत्ता होती. उत्तर हिंदुस्थानावर आतांपर्यंत हिंदु व स्थानिक राजे राज्य करीत होते. उत्तर हिंदुस्थानानें बाहेरून आलेल्या स्वारी करणाऱ्यांस नेहमीं पराजित करून बाहेर हांकलून दिलें होतें. अलेक्झांडरनें सतलज नदी मुळींच ओलांडली नाहीं. मिनँडर अयोध्येपर्यंत आला; पण पुष्पमित्रानें शेवटीं त्यास हांकलून दिलें. शक मथुरेपर्यंत आले होते, पण त्यांसहि विक्रमादित्यानें हांकलून दिलें. कुशन व हूण उत्तर हिंदुस्थानाच्या पश्चिम भागांत बरींच वर्षे राज्य करीत राहिले हें खरें. पण त्यांस अनुक्रमें पाटलीपुत्राचा स्कंदगुप्त व मंदसोरचा विष्णुवर्धन आणि शेवटीं ठाणेश्वरचा प्रतापवर्धन यांनीं हांकलून दिलें. ६००इसवीपासून १०००इसवीपर्यंत बाहेरच्या स्वाऱ्या हिंदुस्थानावर झाल्या नाहींत. १०१९मध्यें महमुदानें राज्यपालास जिंकून उत्तर हिंदुस्थानावर खंडणी बसविली, पण गाहडवालांनीं लौकरच या बाहेरच्या शत्रूस हांकलून देऊन ही खंडणी बंद केली; व महमुदाच्या सत्तेखाली मान वांकविण्याबद्दल चंदेल्ल व व कच्छवाहा यांनीं राज्यपालावर स्वारी करून त्यास ठार मारिलें होतें. तात्पर्य उत्तर हिंदुस्थानच्या आर्य राजांनीं आपलें राज्य बाहेरच्या स्वाऱ्यांपासून नेहमीं कायम ठेविलें होतें. हिंदु काळांतील

राजपूत राजवंश निःसंशय जास्त पराक्रमी असून त्यांस पारतंत्र्य बिलकुल खपत नव्हतें. त्यांचा शिहाबुद्दीन घोरीपुढें उच्छेद कसा झाला ? शस्त्रांची कमतरता मुळींच नव्हती व लायक सेनापतींचीहि नव्हती. किंबहुना अजिंक्य चौहाणांनीं मुसलमानांच्या हल्ल्यास तोंड देणारा सर्व श्रेष्ठ वीर पृथ्विराज पुढें केला होता. त्यानें एकामागून एक चार राजांना जिंकलें होतें. मुसलमानांच्या विजयाच्या लाटेला मजबूत बंधाप्रमाणें त्यानें अडवून धरलें होतें. हा बंध तुटल्याबरोबर मुसलमानांच्या जयाचा पूर उत्तर हिंदुस्थानभर लोंढ्याप्रमाणें पसरला व पांच वर्षांच्या अवधींत सर्व रजपूत राज्यें त्यानें उलथून टाकलीं. चौहाण आणि राठोड, चंदेल्ल आणि सोळंखी, यांसारखी शूर राजपूत राजघराणीं कां उच्छिन्न झालीं आणि उत्तर हिंदुस्थान पुनः उठूं शकत नाहीं अशा रीतीनें कां पडलें ? हा प्रश्न आहे.

विरुद्धपक्षांत शरीरबल व शौर्यबल यांत अंतर नव्हतें. रजपूत लोक तुर्क किंवा अफगाण जेत्या इतकेच शक्तिमान्, शूर व कष्टसह होते. शस्त्रांचाहि अधिक उत्कर्ष कोणाकडेहि नव्हता. अफगाण व राजपूत दोहोंजवळ अग्न्यस्त्रें नव्हतीं. ते एकाच शस्त्रांनीं म्हणजे तलवारी, बाण व भाले यांनीं लढत होते; आणि दोघांजवळहि हत्ती आणि तेहि सारख्याच संख्येचे होते. मोंगलांनीं मात्र रजपुतांस तोफांच्या सहाय्यानें जिंकलें व उत्तर इतिहासांत शिंद्यांच्या मराठ्यांनीं रजपुतांस तोफांनींच जिंकलें. पूर्वी सांगितल्याप्रमाणें सुधारलेलीं शस्त्रें पाश्चात्य देशांमध्यें भौतिक शास्त्राच्या जोरावर जीं निघालीं आहेत त्यापुढें हिंदुस्थान पडणें ठरलेंच होतें. पण शिहाबुद्दीनच्या काळीं कोणत्याहि पक्षाजवळ अग्न्यस्त्रें नव्हतीं. त्यांचा उल्लेख चंदबर्दाई व फिरिस्ता कालातिक्रमानें करितात.

शिहाबुद्दीन घोरी व त्याचे मुसलमान यांचा धार्मिक उत्साह राजपुतांच्या धार्मिक उत्साहापेक्षां जास्त होता असेंहि म्हणतां येत

नाहीं. जरी शिहाबुद्दीन याचें वर्णन मुसलमान इतिहासकार धार्मिक युद्ध करणारा म्हणून करितात, तरी तो वस्तुतः प्रदेश जिंकण्याकरितां युद्ध करीत होता, धर्माचा विस्तार करण्याकरितां नव्हे. किंबहुना उत्तरहिंदुस्थान जिंकण्यांत त्याचा हेतु लोकांस मुसलमान करण्याचाहि दिसत नाहीं. आणि उत्तर हिंदुस्थानांत धर्मांतर मोठ्या प्रमाणावर झालेलेंहि दिसत नाहीं (याचीं कारणें लौकरच पुढें देऊं). दुसऱ्या पक्षीं राजपूत व उत्तर हिंदुस्थानचे लोक यांचा धार्मिक उत्साह पंजाबच्या लोकांच्या धार्मिक उत्साहापेक्षां अधिक तीव्र होता. पूर्वी सांगितलें आहेच कीं, पंजाबांतील हिंदुधर्मभावना नेहमींच मृदु होती व आहे; आणि सरस्वती, यमुना आणि गंगा यांचा प्रदेश हिंदु धर्माची जन्मभूमि असल्यानें हिंदु धर्मभावनेचे मजबूत ठिकाण होतें व आहे. यामुळें आमचा समज असा आहे कीं, दोन्ही पक्षाकडे धार्मिक भावना या काळीं सारखीच बलवान होती.

सर्वांत मुख्य कारण या उच्छेदाचें जें समजलें जातें व योग्य रीतीनें समजलें जातें तें राजपुतांचीं आपसांतील युद्धें हें होय. राजपूत राजवंश आपसांत आपला प्रदेश वाढविण्याकरितां युद्धें करीत नसत हें खरें. पण आपलें वर्चस्व स्थापित करण्यासाठीं ते नेहमीं आपसांत लढत. याच वेळीं उदाहरणार्थ पृथ्विराज आपल्या शेजारील गुजराथ, बुंदेलखंड आणि कनोज या तीन राष्ट्रांवर वर्चस्वासाठीं चालून गेला. या लढाया नेहमींच कसोशीच्या असत; किंबहुना युरोपांतील राष्ट्रांतील युद्धाप्रमाणें त्या चिकाटीच्या असून दोन्ही पक्षाकडील शूर वीर पुष्कळ संख्येनें युद्धांत मरत. यामुळें या चारी राष्ट्रांची म्हणजे चौहाण, राठोड चंदेल्ल आणि सोळंखी यांची युद्धशक्ति कमी झाली; आणि प्रत्येक राष्ट्र एकेकटें समानशत्रूशीं लढून उच्छिन्न झालें. आपसांतील लढाई हें राजपूत लोकांचें सदाचें व्यंग आहे. राजपुतांनीं तोफखान्याकडे नेहमींच दुर्लक्ष केलें असल्यानें अर्वाचीन युद्धांत तें नेहमींच बलहीन

राहिलें; तथापि तेव्हांहि तें जर आपली सर्व शक्ति एकवटते तर मोंगलांस तें केंव्हांहि हांकलून देते असें मनूचीनें आपल्या बखरींत स्पष्ट लिहिलें आहे. आणि याचरीतीनें त्यांनीं मराठयांसहि दाद दिली नसती ( इंग्लिशांस नव्हे ), कारण मराठयांचा तोफखाना युरोपीयांच्या हातांत होता. शिहाबुद्दीन उत्तर हिंदुस्थान जिंकण्याची महत्त्वाकांक्षा धरून होता ही गोष्ट रजपुतांस खबर देणाऱ्यांकडून कळलीच असली पाहिजे होती. तेव्हां त्याच्या विरुद्ध आपसांतील भांडणें बाजूस ठेऊन त्यांनीं एकजूट करावयास पाहिजे होती. सर्वांस खाऊन टाकणाऱ्या ह्या समान शत्रूविरुद्धहि त्यांनीं आपलीं भांडणें बंद केलीं नाहींत आणि ते एकामागून एक उच्छिन्न झाले.

यावेळची हिंदुस्थानची स्थिति १८व्या शतकाच्या अंतीं असलेल्या जर्मनीच्या स्थितीसारखी होती. त्यावेळीं जर्मनींतहि अनेक लहान लहान पण बलवान् राज्यें होतीं व त्या प्रत्येकांतील राजा पवित्र रोमन साम्राज्याच्या बादशाहीचा भव्य मान मिळविण्याचा प्रयत्न करी, आणि दुसऱ्या जर्मन राजांस नष्ट करण्याचा नव्हे, पण नम्र करण्याचा प्रयत्न करी. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतहि प्रत्येक रजपूत राजा चक्रवर्ती होण्याचा प्रयत्न करी व दुसरीं राज्यें खालसा न करितां मांडलिक बनविण्याचा यत्न चालवी. यामुळें इतर राज्यें बलहीन होऊन जेताहि बलहीन होत असे. कारण त्याचा प्रदेश व उत्पन्न न वाढल्यानें त्याची शक्तिहि वाढत नसे. उदाहरणार्थ माळव्याचा भोज इतर राजपूत राजांशीं लढला आणि त्यांस नमवून आपल्यास मालवचक्रवर्ती त्यानें म्हणवून घेतलें. त्याचप्रमाणें चेदीचा कर्ण ह्यानेंहि चक्रवर्ती होण्याचा प्रयत्न केला आणि गुजराथचा कुमारपाल यानेंहि सम्राटाचा मान मिळविण्यासाठीं धडपड केली. याकाळीं गाहडवाल आणि चौहाण यामध्यें सुमारें तीस वर्षेंपर्यंत ही चडाओढ चालली. प्रथम विजयचंद आणि विग्रहराज

यामध्यें चालून नंतर जयचंद आणि पृथ्विराज यामध्यें चालली आणि दोघेहि बलहीन झाले. रासांत सांगितलें आहे कीं, पृथ्विराजाच्या शंभर सामंतापैकीं ९० सामंत जयचंदाची कन्या संयोगिता हरण करण्यांत पडले. तात्पर्य शिहाबुद्दीनपुढें सर्वच राजपूत राजवंश पडले ह्यांत आश्चर्य नाहीं. अशाच परिस्थितींत जर्मन राज्येंहि नेपोलियन पुढें निरानिराळीं पडलीं.

पण जर्मनीचा कायमचा पराभव झाला नाहीं, आणि जर्मनी परसत्तेखालीं कायमची गेली नाहीं. याउलट उत्तर हिंदुस्थान कायमचें जमीनदोस्त झालें. तेव्हां आपल्यास खरोखर कारण शोधून काढावयाचें तें तात्पुरते विजय झाल्यावर म्हणजे एखाददुसऱ्या सढाईंत हार आल्यानें कांहीं काळ परसत्ता स्थापित झाली तरी उत्तर हिंदुस्थान आपल्या पायांवर पुनः उभें राहून स्वतंत्र कां झालें नाहीं या गोष्टीचें कारण पाहावयाचें आहे. आमच्या मतें या काळाच्या सुमारास जातिबंधनें हिंदुस्थानांत अधिक दृढ झालीं हें ह्या अधःपाताचें कारण आहे. सामान्य निरीक्षणाच्या भागांत आम्ही दाखविणारच आहों कीं, या कालविभागाच्या आरंभीं जातिबंधन बरेंच शिथिल होतें, तें बाराव्या शतकाच्या अंतीं फारच घट्ट झालें, आणि हिंदुस्थानांतील हल्लीची जातिव्यवस्था तिच्या असंख्य पोटजाति आणि त्यांचे बारिकसारिक भेद यांसह अंमलांत आली. क्षत्रिय पूर्वी वैश्य स्त्रिया करीत आणि ब्राह्मण क्षत्रिय आणि वैश्य स्त्रिया करीत. कधीं या उलटहि गोष्ट घडून येई. पण आतां प्रत्येक जात व पोटजात लग्नें आपल्यांतच करूं लागली व रोटीव्यवहारहि त्यांनीं आपल्यांतच ठेविला. रोटी व बेटी व्यवहार पूर्वीं खुला असल्यानें सामाजिक सहानुभूति हिंदु लोकांच्या निरानिराळ्या विभागांत चालू होती ती अर्थात् नष्ट झाली, आणि त्याच्या ऐवजीं आपसांत उदासीनता किंबहुना द्वेष उत्पन्न झाला.

पण जातिबंधनें अधिक कडक होण्याचा याहिपेक्षां जास्त हानिकारक परिणाम झाला तो हा कीं, राष्ट्रांची युद्ध करण्याची शक्ति कमी झाली. हल्लींहि या कारणानें कमी होणारी हिंदुस्थानची युद्धशक्ति आपल्या चांगली लक्षांत येत नाहीं. तेहतीस कोटी लोकांचें एक राष्ट्र चार कोट लोकांच्या राष्ट्रानें २ लाख सैन्यानें कसें ताब्यांत ठेविलें आहे, याबद्दल सर्व पृथ्वीभर आश्चर्य वाटतें. पण हें नेहमीं लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, हिंदुस्थान देशांत लढाऊ जातींची संख्या कदाचित् चार कोटी सुद्धां भरणार नाहीं. ब्रिटन मध्यें शिपाई भरती करण्यासाठीं सबंध भूमि, समग्र लोकसंख्या चार कोटींची आहे, तर हिंदुस्थानांत एक पंजाब खेरीज करून इतरत्र लोकांचे वंशामुळें आर्य आणि द्रविड असे दोन भाग मुख्यतः पडतात आणि त्यांतहि जातीमुळें लढणारे आणि न लढणारे असे दोन भेद पडतात. हिंदुस्थानांतील द्रविडवंशीं लोकांची संख्या निम्यापेक्षां अधिक आहे, आणि त्यांत न लढणारेच जास्त आहेत. आर्य-वंशीयांतहि प्राचीन परंपरेनें व हल्लीच्या धंद्यानें केवळ क्षत्रियच लढण्यास तयार असतात. याचा परिणाम असा झाला आहे कीं, हिंदुस्थानांतील लोकसंख्येपैकीं सुमारें एक दशांश लोक लढाईस लायक असतात आणि त्याहूनहि कमी लढाईस तयार असतात. बाकीचे नऊ दशांश स्वभावानें आणि परंपरेनें लढण्यास अयोग्य असून कोणीहि बाहेरचा मजबूत राजा किंवा राष्ट्र येऊन विजय पावून राज्य स्थापन करील तर त्याची सत्ता कबूल करण्यास तयार असतात. अन्यत्र आम्ही दाखविणार आहों कीं, राष्ट्राची कल्पना हिंदुस्थानांत मुळांत होती तरी ती कायम राहिली नाहीं; आणि सर्व लोकांनीं बाहेरच्या लोकांच्या सत्तेस कधींहि विरोध केला नाहीं. विशेषतः या काळीं जातिबंधनें अति कडक झाल्यानें स्वातंत्र्याकरितां लढणाऱ्या लोकांची संख्या आपसांतील भांडणामुळें फारच कमी झाली होती आणि हे

लोक म्हणजे राजपूत पडल्या बरोबर सर्व देश कांहीं विरोध न करितां परकी सत्तेस मान्य करिता झाला.

कडक जातिसंस्थेचा हानिकारक परिणाम देशाच्या स्वातंत्र्या-करितां लढणाऱ्या लोकांची संख्या कमी झाल्यामुळें होतो, ही गोष्ट प्राचीन स्मृतिकारांच्या लक्षांत आली होती आणि त्याचा प्रतिकार करण्यासाठीं त्यांनीं असा उपाय योजला होता कीं, सामान्यतः शस्त्र धरणें हें क्षत्रियांचेंच काम असलें तरी तीन्ही वरिष्ठ वर्णाचें कर्तव्य जेव्हां धर्मावर घाला येतो त्यावेळीं शस्त्र धरण्याचें आहे. धर्म शब्दांत आपल्याकडील हिंदु कल्पनेप्रमाणें राजशासनशास्त्राचाहि अन्तर्भाव होतो, आणि परधर्मी व परदेशी लोकांची सत्ता स्थापन होणें म्हणजे धर्मावरच घाला होय. ' शस्त्रं द्विजातिभिर्ग्राह्यं धर्मो यत्रोपरुध्यते ' असें मनूचें वचन आहे. परंतु जेव्हां पिढ्यानुपिढ्या लोक शांत-तेचा धंदा करितात आणि शस्त्र न घेतां नम्रपणानें राजकीय सत्ता मान्य करण्यास सरावलेले असतात, तेव्हां ते एकदम शस्त्र घेऊन लढवय्ये होतील अशी आशा करणें चुकीचें आहे. किंबहुना पूर्वी सांगितलेंच आहे कीं, शिहाबुद्दीननें कनोज जिंकलें तेव्हां देशांतील रईस आणि जमीनदार यांनीं त्यासमोर येऊन त्याची सत्ता खुषीनें कबूल केली. आणखी हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, उत्तरहिंदुस्था-नांत लोकवस्ती मुख्यतः द्रविड वंशी आहे, पंजाबांतल्याप्रमाणें आर्य-वंशी नाहीं. हल्लींहि क्षत्रियांची लोकसंख्या तेथें फारच कमी आहे. तात्पर्य शिहाबुद्दीन घोरी यास आपली फौज भरती करण्यास पंजाबची सर्व लोकसंख्या, तसेंच अफगाणिस्थान आणि खुरासान किंबहुना तुर्कस्थान या देशांतील समग्र लोकसंख्या, उपयोगांत आणतां आली तर राजपूत राजांस हिंदुस्थानांत सैन्यें उभारण्यास फारच थोडी लोक-संख्या उपयोगी पडली आणि याच कारणानें लोकांनीं एकवटून परकी सत्तेस विरोध केला नाहीं. हें येथें सांगण्यासारखें आहे कीं,

हल्लीच्या काळीं पाश्चात्य देशांत समग्र लोकसंख्या फौजेच्या भरतीस देशाच्या स्वातंत्र्यावर घाला येण्याच्या प्रसंगीं उपयोगी पडते. उदाहरणार्थ गेल्या महायुद्धांत जर्मनीनें सत्तर लाख शिपाई रणांगणांत उभे केले. आणि तेथें राष्ट्रीय भावना इतकी बलवान् आहे कीं, या राष्ट्रीय प्रयत्नांत सर्व राष्ट्रांतील लोकांनीं आपापल्या परी भाग घेतला. या दृष्टीनें उत्तर हिंदुस्थानचा यावेळचा विचार केला तर त्याची स्थिति अगदीं उलट होती. फौजेंत भरती होण्यास एक क्षत्रिय जातच उपयोगांत पडली. कांहीं वैश्य व कांहीं ब्राह्मण यावेळीं लढले ही गोष्ट खरी. पण या अपवादक उदाहरणांनीं मुख्य सिद्धांतच निश्चित होतो. तो हा कीं, ब्राह्मण व वैश्य तेव्हां आतांप्रमाणेंच सामान्यतः लढाईस नाखुष किंबहुना नालायक होते. गुप्तांच्यावेळीं किंवा वर्धनांच्या वेळीं किंवा दाहर किंवा लल्लियाच्या वेळीं परिस्थिति याहून भिन्न होती. दुसरें, चाललेल्या तंट्याविषयीं लोकांमध्यें मुळींच आत्मभाव नव्हता, म्हणजे परकी सत्ता मान्य करण्यास ते विरोध न करतां तयार होते. याचें एक आणखी कारण असें होतें कीं हें नवीन मुसलमानी राजे आपला धर्म वाढविण्यास महमुदाप्रमाणें जोराचा प्रयत्न करीत नव्हते हें आम्ही दाखविणार आहों.

स्वातंत्र्यप्रिय व शूर रजपूत जे युद्धांत बाकी राहिले ते बहुतेक राजपुतान्यांतील रेतस्थानांत व डोंगरांत किंवा इतरत्र जाऊन त्यांनीं आपलें स्वातंत्र्य तेथें कायम ठेवलें आणि ह्यामुळें सामान्यतः उत्तर हिंदुस्थान व विशेषतः मध्य देश अधिकच निर्वीर्य झाला. यामुळें उत्तर हिंदुस्थान इतकें बलहीन झालें कीं त्यास पुनः उठतां आलें नाहीं व त्यानें राष्ट्रीय विरोध केला नाहीं. युरोपांत लहान लहान राष्ट्रांनीं सुद्धां त्यांना गुलामींत आणण्याच्या प्रयत्नांस नेहमीं विरोध करून कसें यश संपादन केलें याचें कारण वर प्रमाणें आहे. या उलट हिंदुस्थानांत मोठमोठाले देश, सांबर-कनोजसारखीं राज्यें सुद्धां, मुस-

लमानांनीं कायमची जमीनदोस्त केलीं. हे देश किंवा हीं राज्यें एके-कटीं सुद्धां मुसलमानी जेत्यास यशस्वी रीतीनें विरोध करण्यांइतकीं मोठी होतीं. पण वस्तुस्थिति अशी होती कीं, यांनीं राष्ट्रीय विरोध कधींच केला नाहीं. केवळ रजपुतांनींच विरोध केला तो त्यांच्या आपसांतील लढायांनीं त्यांचें संख्याबल कमी झाल्यानें यशस्वी झाला नाहीं. सोबिएस्की, पोल लोकांचा सर्वश्रेष्ठ पुढारी, व्हियन्ना येथें तुर्कांचा पुढें वाढणारा लोंढा बंद करूं शकला याचे कारण दैवयोग नव्हे. पोलंडचे लोक ग्रीसच्या लोकांपेक्षां जास्त शूर होते यांत तर शंका नाहीं, पण पोलंडचे लोक सर्वराष्ट्रशक्तीनें लढले, आणि म्हणून विजयी झाले. उत्तर हिंदुस्थानांत पृथ्विराज आणि जयचंद यांचा पराभव दैवयोगानें झाला असें म्हटलें तरी लोकांनीं सार्वत्रिक विरोध केला असता तर मुसलमानांस उत्तर हिंदुस्थान जिंकतां आलें नसतें.

सार्वराष्ट्रिक विरोधाची आवश्यकता व शक्ति हिंदुस्थानांत प्रथम शिवाजीनें जाणली अशी आमची समजूत आहे.त्याच्या उदात्त कल्पनेनें प्रेरित होऊन महाराष्ट्रानें सार्वराष्ट्रिक विरोध केला, आणि औरंगजेबाशीं प्राणान्तिक युद्ध केलें. मराठ्यांनीं म्हणजे क्षत्रिय, ब्राह्मण व सामान्य लोक म्हणजे शूद्र यांनीं एकवटून राजारामांच्या वेळीं पूर्ण एकदिलानें युद्ध केलें आणि मोंगल साम्राज्याची सबंधशक्ति महाराष्ट्रास चिरडून टाकण्यासाठीं औरंगजेबानें आणली होती तरी तिच्यावर ताण करून त्यांनीं ती निर्जीव केली. याप्रमाणें शिवाजी आणि राजाराम यांच्या वेळच्या मराठ्यांनीं हिंदूस्थानाच्या इतिहासांत सार्वराष्ट्रिक विरोध केला आणि स्वातंत्र्य मिळविलें व राखिलें. पाश्चात्य राष्ट्रशास्त्रांत जो सिद्धांत हल्लीं मान्य झाल आहे कीं, ' कोणतीहि सत्ता कितीहि मोठी असली तरी ती, जर लोक मग ते कितीहि थोडे असोत सार्वराष्ट्रिक विरोध करतील तर त्यांचें स्वातंत्र्य हिरावूं शकत नाहीं ' त्या सिद्धांताचें उदाहरण हिंदुस्थानच्या इतिहासांत मराठ्यांनीं दाखविलें आहे. जेव्हां

हिंदुस्थानांतील राज्यांवर हिंदुच राजे मग ते कोणत्याहि कुलाचे असोत राज्य करीत असत, तेव्हां राष्ट्रीय विरोधाची आवश्यकता जाणणें हिंदुस्थानास शक्य नव्हतें. मुसलमानांचें परकी राज्य तीन शतकें झाल्यानंतर मराठ्यांना त्याची प्रथम कल्पना आली. शिखांनींहि धार्मिक फौजबंदी करून पुढें मराठ्यांचें अनुकरण केलें. हल्लीं इंग्रजीं राज्याखालीं हिंदुस्थानच्या लोकांस राजकीय स्वातंत्र्य मिळविणें असेल तर त्यांनीं सार्वराष्ट्रीय प्रयत्नाची आवश्यकता पूर्णपणें जाणली पाहिजे.

असो, या इतिहासावरून भविष्यकाळाकरितां बोध घेणें तर तो हा कीं, रजपुतांनीं एकत्र होऊन एकी करण्यास शिकलें पाहिजे, इतकेंच नव्हे तर हिंदुस्थानच्या सर्व लोकांनीं विशेषतः हिंदूंनीं, ज्यांच्यांत जातिसंस्थेमुळें बेकी हें त्यांचें नेहमींचें लक्षण ठरलें आहे त्यांनीं, एकत्र कार्य करण्यास शिकलें पाहिजे. जाति नष्ट करून टाका हें हिंदूंस सांगणें शक्य नाहीं हें खरें; कारण आज हजारों वर्षें हिंदु-समाजाची जी उत्क्रांति होत आहे तीमुळें जातिसंस्था येथें उत्पन्न होऊन वाढली आहे; आणि यामुळें हिंदु लोकांस जाति,निदान चातुर्वर्ण्य टाकण्यास उद्युक्त करणें शक्य नाहीं. आणखी गोष्ट अशी कीं जाति-बंधनानेंच राजपूतांचा विशेष शौर्ययुक्त आणि धीरोदात्त स्वभाव वाढलेला आहे, व तो आनुवंशिक संस्काराचें फळ आहे. किंबहुना जातीची शुद्धता राखण्यास राजपूत विशेष काळजी घेतात ती योग्य आहे असेंच म्हणतां येतें. पण सर्व प्रांतांतील राजपुतांनीं एकत्र येण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि बरोबरीच्या नात्यानें एक झालें पाहिजे. ह्याहिपेक्षां अत्यंत आवश्यक हें कीं, हिंदूंनीं आपले जातीचे अनेक भेद विसरून एकोठिकाणी समान हक्काच्या तत्त्वावर जम-ण्याचा व आपापली मुख्य जात स्वतंत्र ठेऊनहि एकत्र होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. निरनिराळ्या उपजाति काल्पनिक कारणानें उत्पन्न झाल्या आहेत त्या नष्ट करावयास मुळींच हरकत नाहीं. स्वतंत्र

निरनिराळे भाग राजकीय कारणांकरितां एकत्र होऊं शकतात ही गोष्ट अमेरिकेंतील संस्थानांनीं प्रथम मनांत आणून प्रत्यक्ष अमलांत आणली; आणि तेंच उदाहरण जर्मनीनें प्रत्यक्ष सोडविलें. तेव्हां हिंदु लोक स्वतंत्र जातींत विभागिले असले तरी त्यांचें राजकीय कारणांकरितां एकीभवन हाच पुढील काळापुढें महत्त्वाचा प्रश्न आहे; आणि पूर्वीचा इतिहास आपल्यास तेंच शिकवितो. तो सिद्धीस नेणें शक्यहि आहे. जर त्याकरितां रोटीव्यवहार, खानपानादि एकी, याची आवश्यकता असल्यास आणि कोणत्याहि एका देवतेची भक्ति जरूर असल्यास, दोन्ही गोष्टी अमलांत आणाव्या. असो, शेवटीं हें सांगणें कीं, राजपुतांमधील बेकी म्हणजे हिंदुस्थानच्या बाहूमधील बेकी आणि जातीचें कडक बंधन, ज्यामुळें लोकांचे नऊ दशांश परकीय सत्तेस विरोध करण्यास अशक्त किंवा अनिच्छु झाले, हीं दोन कारणें उत्तर हिंदुस्थानाच्या कायमच्या गुलामीचीं मुख्यतः झाली असें दिसतें.

# प्रकरण सत्त्विसावें
## उत्तर हिंदुस्थानचा उच्छेद–
### आनुषंगिक कारणें.

उत्तर हिंदुस्थानच्या उच्छेदाची मुख्य कारणें आमच्या मतें (१) निरनिराळ्या राजपूत राज्यांच्या आपसांतील लढाया आणि त्यामुळें उत्पन्न होणारे दौर्बल्य व (२) जातीचें दृढीकरण व त्यामुळें राष्ट्रांतील रजपुतांखेरीज इतर लोक युद्धास अनिच्छु व असमर्थ होणें, हीं मागील प्रकरणांत आम्ही विस्तारानें सांगितलीं. या प्रकरणांत ज्या कित्येक आनुषंगिक कारणांनीं ही हिंदु राज्यें पडण्यास मदत झाली, त्या कारणांचा ऊहापोह आम्ही करतों. हीं कारणें स्वतंत्ररीत्या उच्छेद करूं शकत नव्हतीं म्हणून त्यास आम्ही आनुषंगिक म्हटलें आहे. देशाच्या सामान्य निरीक्षणाच्या भागांत येथें सांगितलेल्या कित्येक गोष्टींचा निर्देश येणार आहे. पण या कारणांच्या विचारांत त्या स्वतंत्र सांगितल्या असल्या तरी पुनरुक्तीचा दोष येणार नाहीं.

(१) प्रथम गोष्ट ही पुनः सांगितली पाहिजे कीं सर्व राज्यांतील लोकांच्या अंतःकरणांत **राष्ट्रीय भावनेचा अभाव** होता. हिंदुस्थानांत यावेळीं किंबहुना सर्व आशिया खंडांत सर्वत्र **राज्यें** होतीं, **लोक्यें** नव्हतीं. लोकांस राज्य आमचें आहे आणि राजा आमच्यापैकींच असला पाहिजे असें वाटत नव्हते. उलट देश राजाचा आहे, आणि ज्याला देवानें सत्ता दिली त्यानें राजा व्हावें अशीच कल्पना होती. लोकांची अशी कल्पना असल्यानें राष्ट्रीय भावना उत्पन्न होणें शक्य नव्हतें व त्याचप्रमाणें स्वदेशप्रीति हा गुणहि उत्पन्न होणें शक्य नव्हतें. (भा. १ पा. १७८ व भा. २ पा. ३४९). राजभक्तीचा गुण उत्पन्न होत असे, किंबहुना पृथ्विराजरासांत वारंवार राजभक्तीचाच

उपदेश केलेला आढळतो. मालकाकरितां प्राण देणें हाच राजपूत वीरांचा परमधर्म आहे; अर्थात् त्या मालकाच्या ऐवजीं ईश्वरेच्छेनें दुसरा मालक आला तर त्याच्या करितांहि रजपूत वीरानें मरावें असें मानलें जाई. ह्यामुळेंच आपल्याला इतिहासांत मुसलमान राजांसाठीं-हि व इतर मालकासाठीं प्राण देणारे क्षत्रिय आढळतात. ही गोष्ट ज्या जातीचा स्वभावधर्म राज्य करणें आहे त्याहि रजपुतांची होती, मग इतर जातींच्या सामान्य लोकांची तीच मनोभावना होती हें सांगावयास नको.

(२) राष्ट्राच्या हल्लींच्या कल्पनेंतील मूलभूत तत्त्वापैकीं एक तत्त्व म्हणजे एकभाषा हें त्या काळच्या राज्यांमध्यें उत्पन्न झालें होतें हें खरें. म्हणजे गुजराथ, राजपुताना, अंतर्वेद, बंगाल, महाराष्ट्र, तेलंगण, तामिल नाडु आणि मल्यालम् या प्रांतांत भिन्न भिन्न भाषा म्हणजे हल्लीच्या गुजराथी, राजस्थानी, हिंदी, बंगाली, मराठी, तेलंगी तामीळ आणि मल्याळी ह्या स्वतंत्र भाषा उत्पन्न झाल्या होत्या. परंतु हे देश राष्ट्रें बनलीं नाहींत व त्यांत एकभाषत्त्वानें एकराष्ट्रीयत्त्वाची कल्पना उत्पन्न झालीं नाहीं. उलट या प्रत्येक प्रांतांत अनेक राज्यें असून तीं एकमेकाशीं झगडत असत. याचें कारण वर सांगितलेली राष्ट्राची चुकीची कल्पना हेंच होय. याजविषयीं जास्त विस्तार पुढें येईल. पण एकभाषत्त्वानें या प्रांतांत राष्ट्रीय भावना उत्पन्न झाली नाहीं हें येथें स्पष्ट सांगावयाचें आहे.

३ राष्ट्रीय भावना उत्पन्न न झाल्यानें परकी लोकांनीं देशांत येऊन राहणें याला वहुधा विरोध कोठेंचें झाला नाहीं. काश्मीर आणि तिबेट या अपवादाखेरीज ( यांच्या सीमा दूर्लंघ्य होत्या ) इतर ठिकाणीं परकीयांना देशांत येऊन राहण्यास मनाई नव्हती; किंबहुना त्याकडे लक्षहि नव्हतें. यामुळें मुसलमान लोक निरनिराळ्या देशांत बिनहरकत येत जात आणि पुष्कळ वेळां वसति करून

रहात. याप्रमाणें नाहरवाला, खंबायत, सोपारा आणि महाराष्ट्र किंबहूना सबंध कनोजचें राज्य यांत मुसलमान येऊन राहिलेले आपल्यास आढळतात.*

हे मुसलमान आमच्याच अधिकाऱ्यांनीं आमचा इनसाफ करावा असा हट्ट धरीत, ही गोष्ट मुसलमानी लेखकांच्याहि विधानावरून सिद्ध होते. आणि ठाण्याच्या कोरींवलेखांतील हंजमन—नगर—त्रिवर्ग या पूर्वोल्लिखत शब्दावरून तीस दुजोरा मिळतो. राष्ट्रांत परकी लोक असल्यास राष्ट्राची शक्ति हीन होते ही गोष्ट हल्लींच्या पाश्चात्य राष्ट्रांच्या लक्षांत आलेली आहे व ते परकी लोकांच्या येण्या जाण्यावर सक्त नजर ठेवतात. हिंदू राष्ट्रांना राष्ट्रीय भावनेच्या अभावामुळें या गोष्टीची जाणीव झाली नाहीं; किंवा परकीयांवर करडी नजर ठेवण्याची आवश्यकता त्यांस भासली नाहीं. प्रत्यक्ष पुरावा नसला तरी ही गोष्ट सहज लक्षांत येईल कीं, निरनिराळ्या राष्ट्रांत मुसलमानांची वसति झाल्यानें त्यांच्या उच्छेदास मदत झाली.

४ राष्ट्राच्या उच्छेदास भोळसट समजुतींचाहि कांहीं कारणभाव लागतो हें सांगण्यासारखें आहे, आणि हिंदूस्थानाच्या उच्छेदास भोळसट समजुती दुधारी तलवारीप्रमाणें दोहोंकडून कारणीभूत झाल्या. मुसलमानांची अशी समसूत होती कीं, त्यांचा जय ठेवलेलाच आहे. उत्बीनें कुराणांतलें वाक्य दिलें आहे कीं, " जे लोक ईश्वराच्या विरुद्ध आहेत त्यांच्यावर ईश्वराचा कोप आहे आणि तो

---

* बनारस गॅझेटियरमध्यें असें सांगितलें आहे कीं मुसलमानांनीं बनारस जिंकण्याच्या पूर्वींचें कांहीं मुसलमानी मोहल्ले बनारसेंत आहेत. ही दंतकथा कदाचित् विश्वसनीय नसेल. तथापि चंद्र, गोविंदचंद्र किंवा जयचंद यांनीं परवानगी दिली नसली तरी त्याच्या पूर्वी प्रतिहारांच्या वेळीं हे मुसलमान येऊन बसले असावे.

कधींहि टाळतां यावयाचा नाहीं. " या उलट हिंदु लोकांची अशी कल्पना होती कीं, हिंदूंचा पराजय ठेवलेलाच आहे आणि कलियुगांत भारतवर्ष म्लेंच्छांनीं उध्वस्त होणारच. लोकांच्या मनावर भोळसट समजुतींचा ह्याप्रमाणें दुष्परिणाम झाल्याचीं कित्येक उदाहरणें इतिहासांत आहेत. मेक्सिकोच्या अझटेक लोकांत अशी समजूत होतीं कीं, पूर्वेकडून येणारे लोक आपण्यास जिंकणार. ज्यावेळीं गॉथ आणि व्हँडल या रानटी लोकांनीं रोमन साम्राज्य उद्ध्वस्त केलें, त्यावेळीं वायबलांत भाविष्य केल्याप्रमाणें जगताचा अंत होत आहे असें ख्रिस्ती लोकांस वाटलें, व त्यांनीं त्या लोकांस विरोध केला नाहीं. जरी अद्याप लेखी पुरावा आम्हांस मिळाला नाहीं, तरी हिंदुस्थानांत यावेळीं हिंदूंस असें वाटलें असावें कीं, नवीन होणारा फेरबदल अलंघ्य आहे आणि अशा भोळसट समजुतीनें त्या फेरबदलास त्यांनीं निमुटपणें मान दिली.

५ प्रत्येक राष्ट्राचें हें आद्य कर्तव्य आहे कीं, त्यानें एक मजबूत आणि पुरेशी फौज नेहमीं बाळगावी. यावेळीं हिंदु राष्ट्रांनीं बहुधा ह्या कर्तव्याकडे दुर्लक्ष केलें असावें. पूर्वींच्या भागांत सांगितल्याप्रमाणें हिंदूस्थानची या बाबतींत पूर्वीं. कीर्ति होती पण ती यावेळीं नष्ट झालेली दिसते. हर्ष किंवा भोज ( प्रतिहार ) यांच्या वेळीं जशा खड्या फौजा होत्या, तशा यावेळीं कोणत्याहि राष्ट्रांत बहुधा नव्हत्या. राज्याची फौज मुख्यतः सामंतांनीं आणावयाच्या पथकांची असे. हे सामंत तंतोतंत नसले तरी बहुतेक इंग्लंडांतील बॅरनसारखे असत. ते राज्याच्या उपयोगासाठीं कांहीं ठराविक संख्येचे लढवय्ये बाळगीत व त्यांचा खर्च आपापल्या संस्थानांतून करीत. मोंगलांच्या वेळींहि अशीच व्यवस्था दिसते, आणि हजारी व पंचहजारी असे सरदार असत. पृथ्विराजाच्या जवळ राज्याची स्वतंत्र खडी फौज असावी असें दिसतें. परंतु ही हुजूर

फौज बहुधा थोडी असावी. आपल्यास ठाऊकच आहे कीं, पानपतच्या लढाईनंतर पेशव्यांनीं एक मजबूत हुजूर फौज ठेवण्याकडे दुर्लक्ष केलें आणि राजधोरणी अहल्याबाई नाना फडणविसाची हुजूर पथकाकडे दुर्लक्ष करण्याबद्दल वारंवार कानउघाडणी करी. सामंतांनीं आणलेलीं पथकें याजवर विश्वास ठेवणें, संख्येच्या किंवा लायकीच्या दृष्टीनें, नेहमीं शक्य नसतें हें सांगावयास नकोच. महमुदाची व शिहाबुद्दीन घोरीची स्वतंत्र ठेवलेली फौज, हिंदुराजांनीं घाईनें जमविलेल्या सामंतांच्या पथकांच्या फौजेपेक्षां जास्त काम करणारी होती. कारण सामंत ऊर्फ फौजी सरदार हे बहुधा जोरानें लढत नाहींत. तसेंच त्यांना आपापली जहागिर संभाळण्याचा मोह पडत असतो व ते प्रसंग विशेषी जड होऊं लागणाऱ्या परसत्तेकडे वळून आपली जहागिर संभाळतात, हा इतिहासांतील अनुभव आहे. तात्पर्य यावेळीं हिंदु राज्यांत स्वतंत्र व मजबूत खड्या फौजा नव्हत्या हेंहि त्यांच्या परिणामी उच्छेदाचें एक कारण होतें असें आम्हांस वाटतें.

६ हिंदुस्थानची बुद्धिमत्ता युद्धशास्त्राच्या अभ्यासाकडे या काळी दुर्लक्ष करीत होती व त्याचप्रमाणें राष्ट्रशास्त्राच्या खऱ्या सिद्धांताकडेहि दुर्लक्ष करीत होती असें आम्ही मोठ्या मिनतवारीनें म्हणतो. ब्राह्मण–क्षत्रियांची बुद्धिमत्ता यावेळीं अलंकारशास्त्राच्या अभ्यासांत गुंतली असून त्यापेक्षां विशेष उपयोगी शास्त्राच्या जरूरी अभ्यासाकडे तिनें दुर्लक्ष केलें. संभोगविप्रालंभ शृंगारांतील नायिकांचे बारीक भेद व काव्याचे रसादिगुण आणि काव्याचे दोष यांच्या मूलतत्त्वाच्या छाननीकडे आणि भाषेच्या सौंदर्याकडे देशांतील उत्तम उत्तम बुद्धींचें लक्ष लागलें होतें. किंबहुना राजेहि काव्यशास्त्रावर व नाट्यशास्त्रावर विद्वत्तापूर्ण ग्रंथ लिहिण्याकडे वेळ देत. या काळांतील या शास्त्रावरील ग्रंथांवरून हिंदूंच्या बुद्धीचें सूक्ष्मत्व सिद्ध होतें हें खरें, तथापि यापेक्षां जास्त महत्त्वाच्या विषयांकडे ती बुद्धि वळाव-

यास पाहिजे होती. राजांची दृष्टि आणि संपात्ति सेनापतींपेक्षां राजकवींकडे जास्त वळे, आणि सैन्यभूमीपेक्षां रंगभूमि त्यांस अधिक गुंतवी. अलंकारशास्त्राचा सूक्ष्म अभ्यास, जनरुचि व नीति यांच्या दूषित प्रवाहासहि कारणीभूत झाला. आणि तो राजशेखराच्या कर्पूरमंजरीपासून तो नयचंद्रसूरीच्या रंभामंजरीपर्यंत शृंगाररसाच्या वाढत्या लोंढ्यांत आपल्यास दृष्टीस पडतो. लोकांची अभिरुचि किती बिघडली होती हें नियमयुक्त ब्राह्मणांस दिलेल्या दानपत्रासारख्या दरबारी लेखांच्या आरंभींसुद्धां जो शृंगारयुक्त श्लोक कनोजच्या लेखांत आढळतो त्यावरून दिसून येईल. किंबहुना या काळविभागांत ऐषआराम वाढणें अपरिहार्य होतें. कारण मागील कालविभागाच्या अंतीं, दुसऱ्या भागाच्या शेवटल्या प्रकरणांत सांगिल्याप्रमाणें, हिंदू राज्यांच्या वैभवाचा कळस झाला होता. उत्कर्षाचा कळस झाला म्हणजे नीतीस उतार लागून ऐषआराम वाढतो आणि लोकांचे मानसिक व शारीरिक सामर्थ्य कमी होतें ही गोष्ट इतिहासांत रोमन लोकांत, अरबांत, मोंगलांत व इतर लोकांतहि आपल्यास दिसून येते. तेव्हां ह्याहि कारणानें १२ व्या शतकाच्या अंतीं हिंदू राज्यें कमजोर झालीं होतीं.

७ शेवटीं उत्तरहिंदुस्थानांतील रजपूत राज्यांच्या उच्छेदाची कारणमीमांसा करितांना आम्हांस बौद्ध अहिंसा–तत्त्वाचा पुनरुदय या काळीं झाला ह्याकडे वाचकांचें लक्ष वेधावयाचें आहे. या काळीं नवीन वैष्णवधर्माचा उदय, त्याचप्रमाणें जैनधर्माचा अधिक प्रसार आणि लिंगायत आणि इतर मतें यांची स्थापना यांवरून हा प्रभाव आपल्या दृष्टीस पडतो. वैष्णवधर्म किंवा जैनधर्म किंवा इतर मतें यांचा उदय हे उत्तरहिंदुस्थानच्या उच्छेदाचें मुख्य व प्रत्यक्ष कारण नाहीं; म्हणजे ज्याप्रमाणें सिंधच्या उच्छेदाचें बौद्धधर्म हें प्रत्यक्ष कारण होतें तसें नाहीं ही गोष्ट आम्हांस मान्य आहे. पण यावेळीं सर्व हिंदु समाजांत अहिंसा तत्त्वाचा जास्त पुरस्कार झाला, यामुळें

तो समाज शमप्रधान आणि अहिंसाप्रवण झाला हें नाकबूल करितां यावयाचें नाहीं. सर्व धर्मनिष्ठ ब्राह्मण, शैव किंवा वैष्णव, त्याचप्रमाणें सर्व वैश्य शैव, वैष्णव किंवा जैन, यांनीं प्राणिहिंसात्याग हेंच धर्माचें मुख्य तत्त्व मान्य केलें आणि पुढें वर्णन केल्याप्रमाणें त्यांनीं मांसभक्षणाचा पूर्ण परित्याग केला. यामुळें असा परिणाम झाला कीं, रजपुतांशिवाय बाकीचा हिंदुसमाज युद्धास अनिच्छु व अशक्त झाला. अशा प्रकारचा परिणाम मनुष्यस्वभावावर होणें अपरिहार्य आहे असें आम्हांस वाटतें. याची जास्त चर्चा येथें करणें अनावश्यक होय. रजपुतांशिवाय हिंदुस्थानचा समाज सर्व राज्यांतून (शूद्रांनींहि ब्राह्मण—वैश्यांचे अनुकरणानें व तसेच दारिद्र्यानें मार्ग उचलावे हें साहजिक आहे ) हिंदुस्थानांतील हत्तीसारखा झाला. त्याचा प्रचंड आकार व त्याची प्रचंड शक्ति याच्या विरोधानें हत्ती स्वभावानें भित्रा आणि नरम असतो. व हत्तीचें प्रतिकार करण्याचें शस्त्र म्हणजे त्याची सोंड, ही मृदु असून सहज तोडतां येते. हत्ती प्राण देण्यास नेहमीं भितो आणि दारूचा थोडासाहि त्याच्यावर सोसाटा फेंकला तर तो आपलें अंग संकुचित करतो. अशा हत्तीलाहि लढण्यास शिकवितां येतें व धैर्यानें दारूच्या सोसाट्यापुढेंहि उभें राहण्यास तयार करितां येतें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. तसेंच वनस्पत्याहारी हिंदूंस सुद्धां युध्दास समर्थ आणि वीर्यकृत्यें करण्यास धाडसी बनवितां येतें. पण असें शिक्षण नसल्यास हिंदु स्वभावानें भित्रा असल्यानें त्यास जिंकतां येतें आणि परसत्तेस वाकवितां येतें. इतिहासांस ब्राह्मणशूर सेनापतींची व जैन वीर सेनापतींची या कालविभागांत कित्येक उदाहरणें आहेत. परंतु सामान्यतः लोक लढाईस सरावलेले नसल्यानें व स्वभावानें शांतताप्रिय असल्यानें जेव्हां राजपुत्रांचा पराभव झाला तेव्हां सतलजपासून ब्रह्मपुत्रापर्यंत आणि हिमालयापासून विंध्यापर्यंत सर्व हिंदु राज्यें मुसलमानांच्या

सत्तेखालीं एका पंचवीस वर्षाच्या थोड्या अवधींत खुशीनें विरोध न करितां गेलीं. पहिल्या भागाच्या प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें हिंदूंस, विशेषत: त्या हिंदूंस जे आपल्या धार्मिक समजूतीनें मांसाहार त्याज्य समजतात त्यांस, इतिहासाचा संदेश असा आहे कीं, त्यांनीं शारीरिक शिक्षणानें व मानसिक विचारानें आपल्यास असें समर्थ केलें पाहिजे कीं, या जगतांत मानवी वंशाच्या भिन्न शाखांत शारीरिक झगडे कधींहि बंद व्हावयाचे नाहींत हें लक्षांत ठेऊन अशा झगड्यांत आपल्यास माननीय रीतीनें भाग घेतां येईल व आपलें अस्तित्व कायम ठेवतां येईल.

# पुस्तक आठवें

## सामान्य परिस्थिति

## प्रकरण पहिलें.

### जातींचें उपजातीकरण.

आम्हीं या भागाचे प्रारंभीं सांगितल्याप्रमाणें या कालविभागाच्या आरंभीं हिंदु भारताची सामाजिक परिस्थिती कशी होती हें निश्चित करण्याचें अत्यंत महत्त्वाचें साधन म्हणजे अल्बेरूनीचा हिंदुस्थानावरील इ. स. १०३०मध्यें लिहिलेला ग्रंथ होय. अल्बेरूनी मुलतान येथें व पंजाबांत इतरत्र हिंदु लोकांत राहिला असून तो एक मार्मिक निरीक्षण करणारा होता. पण दुर्दैवानें हिंदुधर्मपुस्तकें त्यानें स्वतः अभ्यासिलीं असल्यानें पुस्तकांत वाचलेल्या गोष्टी व प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टी यांची तो मिसळ करितो. यामुळें दुसऱ्या भागांत अरबी प्रवाश्यांचे जे लेख आम्हीं उध्दृत केले आहेत, त्या मानानें अल्बेरूनीचीं विधानें इतकी विश्वसनीय वाटत नाहींत. तथापि या कालविभागांत हिंदुस्थानच्या सामाजिक स्थितीचें वर्णन देतांना हिंदुस्थानांवरील आपल्या पुस्तकांत जात या विषयावर जें अल्बेरूनीनें लिहिलें आहे तें आम्ही प्रथम उध्दृत करितों. सुदैवानें त्यास पर्शिया व ग्रीस यांच्या इतिहासाची माहिती असून हिंदुस्थानच्या परिस्थितीच्या तुलनेस या पाश्चात्य देशांतील गोष्टी तो देतो.

अल्बेरूनीनें ग्रीक आणि रोमन लोकांतच नव्हे तर पर्शियन लोकांतहि प्राचीनकाळीं जाति उत्पन्न झाल्या असें दाखविलें आहे.

" प्राचीन खुश्रू ( बादशहा ) यांनीं ह्या तऱ्हेच्या मोठया संस्था उत्पन्न केल्या होत्या. त्या एखाद्या व्यक्तीच्या विशिष्ट सद्‍गुणामुळें किंवा लाचलुचपतीनेंहि मोडतां येत नव्हत्या. जेव्हां अर्देशिरनें इराणी बादशाही पुनः प्रस्थापिली, तेव्हां जाति अथवा वर्ग त्यानें पुढील-प्रमाणें पुनः कायम केले. ( १ ) सरदार आणि राजपुत्र ( २ ) जोगी, अग्नीचे पुजारी आणि कायदेपंडित ( ३ ) वैद्य, ज्योतिषी व इतर शास्त्रज्ञ ( ४ ) शेतकरी व कारागीर. या चार वर्गामध्यें एक-मेकापासून भिन्न सामान्यांत विशेषाप्रमाणें पोटभेद होते. याच प्रका-राच्या व्यवस्था हिंदु लोकांत आहेत. आम्ही मुसलमान सर्व लोक बरोबर मानतों, केवळ सद्‍गुणामुळें त्यांत उच्चनीच भेद करितों. या कारणानें आमच्यांत आणि हिंदु लोकांत समजूत पडण्यास मोठा अडथळा आहे."

"हिंदुलोक जातीस वर्ण अथवा रंग म्हणतात आणि उत्पत्तीच्या दृष्टीनें ते त्यास जाति म्हणतात. प्रारंभापासून या जाति चार आहेत. सर्वांत वरिष्ठ ब्राह्मण होत. त्यांच्याखालीं क्षत्रिय येतात, पण त्यांचा दर्जा ब्राह्मणांच्या फारसा खालीं नाहीं. यानंतर वैश्य आणि शूद्र येतात. या दोन वर्गांमध्येंहि फारसें अंतर नाहीं. पुष्कळ गोष्टींत या सर्वांची भिन्नता असली तरी ते एकाच शहरांत अगर गावांत राहतात. किंबहुना एकाच घरांत अगर बिऱ्हाडांत ते सामील असतात." ( सचाऊ भा. १ पा. ९९ ते १०१ ).

या लांब उताऱ्यावरून असें दिसून येईल कीं, हिंदूंच्या जातींचें हें वर्णन भाग २ मध्यें पूर्वीच्या अरब लेखकांनीं दिलेल्या वर्णना इतकें तपशीलवार व खरें नाहीं. क्षत्रियांचे दोन भेद म्हणजे राज्य करणारे क्षत्रिय आणि शेती करणारे क्षत्रिय, इब्न खुरदादबा यानें सांगितलेले ( भा. २ पा. १७९ ), येथें मुळींच दिलेले नाहींत. बहुधा इ. स. १०३० पर्यंत पंजाबांत रजपुतांची इतकी कत्तल झाली

असावी कीं, निदान त्यांची परिस्थिति इतकी खालावली असावी कीं, त्यांचें भिन्नत्व आल्बेरूनीच्या लक्षांत आलें नाहीं. गाहडवाल कोरीव लेखांतील पूर्वी दिलेलें विधान या वेळच्या समाजाच्या परिस्थितीला सत्यत्त्वानें लागू दिसतें. म्हणजे " क्षत्रिय राजघराणीं बहुतेक पंजाब व यू. पी. मध्यें नष्ट झालीं होतीं, आणि वेदाचें अध्ययन बहुतेक बंद झालें होतें, तेव्हां चंद गाहडवालानें या दोहोंची पुनः स्थापना केली. " दुसरें, धर्मपुस्तकावरून कदाचित् हीं विधानें अल्बेरूनी करीत आहे. प्रत्यक्ष निरीक्षणावरून नव्हे. शिवाय लग्नाविषयीं तो कांहींच येथें लिहीत नाहीं. इब्न खुरदादबा यानें असें लिहिलें आहे कीं, ब्राह्मण आणि क्षत्रिय आपल्या खालच्या वर्गाच्या मुली करितात. आणि आपल्या समोर प्रत्यक्ष राजशेखराचें उदाहरण चव्हाण स्त्रीशीं विवाह केल्याचें आहे. बहुधा अल्बेरूनीच्या काळीं ( किंवा पुढें जातिबंधनें दृढ झाल्यावर ) असले मिश्रविवाह बिलकुल बंद झाले होते. तिसरें, चार वर्गांच्या दरम्यानच्या जातींचा उल्लेख अल्बेरूनी मुळींच करीत नाहीं. पण त्या पुष्कळ असाव्या. शिवाय मुख्य मुख्य जातींच्या पोटविभागांचाहि तो उल्लेख करीत नाहीं. हे विभाग बहुधा त्याच्यानंतर उत्पन्न झाले.

पर्शियन लोकांमधील जाति सर्व आर्यवंशीं असल्यामुळें हिंदुमधील जातींहून त्या भिन्न आहेत. हिंदूंच्या जाति आर्य आणि अनार्य असे लोक एकवटून झाल्या आहेत. साहजिकच शूद्रांचा वर्ण पर्शियन लोकांत नाहीं. शिवाय पर्शियन जातींत धंद्यांचा निर्बंध असून विवाहाचाहि निर्बंध होता कीं काय हें आपल्यास ठाऊक नाहीं. प्रतिलोम विवाह हिंदुलोकांत बुद्धपूर्वकाळांतच बंद झाले होते, आणि अनुलोम विवाह या काळीं बंद झाले. शेवटीं सर्व जाति एकाच घरांत व बिऱ्हाडांत सरमिसळ राहतात असें अल्बेरूनी लिहितो, हें विधान पंजाबाच्या संबंधानें सत्य दिसतें. कारण निरनिराळ्या वर्णांत खाण्या-

पिण्यांत व चालीरीतींत सर्व मांसाहारी असल्यानें तेथें फारसा फरक नव्हता. बाकीच्या देशांत अशीच स्थिति नसावी. निदान १०३० त अशी स्थिति असली तरी पुढील दोन शतकांत अहिंसा तत्त्वाचा पुनः जोर होऊन परिस्थिति इतकी बदलून गेली कीं, अनेक जातींनीं मांसाहार सोडला. अर्थात् मांसाहारी व शाकाहारी लोक एकाच घरांत राहणें शक्य नव्हतें. याचमुळें जातींची वाढ अल्बेरूनीनंतर तुटकपणांत इतकी झाली कीं, मूळच्या हिंदुस्थानांतील चार जातींच्या ऐवजीं या कालविभागांत शेंकडों किंबहुना हजारों पोटजाति पुढें सांगितल्याप्रमाणें उत्पन्न झाल्या.

पहिल्या भागांत आम्ही सांगितलें आहे कीं, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांची एकेकच अविभक्त जात पहिल्या कालविभागांत होती ( ६०० ते ८०० ). हीच परिस्थिति दुसऱ्या कालविभागांतहि राहिली ( ८०० ते १००० ). परंतु तिसऱ्या कालविभागांत या प्रत्येक जातीचे शेंकडों पोटविभाग पडले असें कोरीव लेखावरून सिद्ध होतें. याचीं कारणें वर सांगितल्याप्रमाणें पुढील दिसतात. ( १ ) खाण्याच्या व्यवहारांतील फरक. ( २ ) जातीच्या कमीअधिक शुद्धतेच्या कल्पना. ( ३ ) निरनिराळ्या देशांतील निरनिराळे रिवाज. या कारणांनीं प्रत्येक वर्ण निराळा घेऊन या कालविभागांत त्याचे पोटविभाग कसे पडले हें आपण आतां पाहूं.

## ब्राह्मणांच्या पोटजाति.

आरंभीं सर्व हिंदुस्थानवर ब्राह्मण जात निःसंशय एक होती. एक हजार इसवीच्या पूर्वी ब्राह्मणाचें वर्णन नेहमीं त्यांच्या गोत्रानें व शाखेनें कोरीव लेखांत येतें. णाणि त्यांत कोणत्याहि पोटविभागाचें नांव दिलेलें आढळत नाहीं. या कालविभागांतहि कांहीं काळ अशीच तऱ्हा दृष्टोत्पत्तीस येतें. उदाहरणार्थ, इ. स. १०५० चा चंदेल्लांचा

एक दानलेख इंडियन अँटिक्वेरी १६, पृ. २०६ वर छापला आहे, त्यांत दान घेणाऱ्या ब्राह्मणाचें वर्णन भारद्वाज गोत्र त्रिप्रवर यजुर्वेद शाखा इतकेंच केलें आहे. कलचूरी दानलेख कहला, जिल्हा गोरखपूर, इ. स. १०१७ मधील एपिग्राफिका इंडिया भाग ७, पृ. ८६ यांत छापला आहे, त्यांत दान घेणाऱ्या अनेक ब्राह्मणांचें वर्णन त्यांचें गोत्र प्रवर व शाखा आणि राहण्याचें गांव देऊन केलें आहे. याचप्रमाणें एक दाक्षिणेंतील उत्तर चालुक्यांचा लेख इ. स. १०७० चा बी. बी. आर. ए. एस्. भा. १२, पृ. ५१ यांत दिला आहे, त्यांत दान घेणारा ब्राह्मण कौशिक गोत्र बव्हृच होता, एवढेंच वर्णन आहे. यानंतर आपणांस ब्राह्मणांचें राहण्याचे देश कोरींव लेखांत दिलेले आढळतात. उदाहरणार्थ, वडनगर येथील कुमारपालाच्या प्रशस्तीचा लेखक नागर ब्राह्मण होता असें वर्णन आहे. हा लेख संवत् १२०८, म्हणजे इ. स. ११५१ चा आहे. चंदेल्ल आणि गाहडवाल यांनीं दिलेल्या कांहीं दानलेखांत दान घेणारे ब्राह्मण यांचें वर्णन ठक्कुर शब्दानें केलें आहे. (एपि. इं. ४, पृ. १२१). तसेंच गाहडवाल आणि हैहय यांच्या कांहीं दानलेखांत ब्राह्मणांचें वर्णन राऊत या शब्दानें केलेलें आहे (एपि. इं. भा. १४, पृ. २७४). दाक्षिण माळव्यांतील एका सामंताच्या दानलेखांत इ. स. ११३५ त दान घेणाऱ्या ब्राह्मणाचें वर्णन गोत्रप्रवर देऊन शिवाय कर्णाट या शब्दानें केललें आहे (इंडियन अँटिक्वेरी भा. १५). कऱ्हाडचे शिलाहार यांच्या एका दानलेखांत दान घेणारे ब्राह्मण करहाट घैसास असें दिलेले पाहून आम्हांस आश्चर्य वाटलें. (घैसास व पट्टवर्धन हीं आडनांवें कोकणस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणांत अद्याप आहेत, व तीं धंदेसूचक आहेत; पण हे धंदे कोणतें हा निश्चय होत नाहीं). याप्रमाणें राहण्याच्या देशाचें नांव सांगणें इतकें महत्त्वाचे झालें कीं, पुढें पुढें ब्राह्मणांचें गोत्र व शाखा देणें बंद झालें. उदाहरणार्थ सास-

बाहू (ग्वाल्हेर) मंदिरांतील शिलालेखांत दान घेणाऱ्या ब्राह्मणांची नांवें गोत्राशिवाय दिलेलीं आढळतात. हा लेख १०९३ इसवीचा आहे (इं. अँटि. भा. १५ पा. ३९). गुजराथचा भोळा भीम याच्या एका दानलेखांत दान घेणाऱ्या ब्राह्मणाचें वर्णन गोत्र व शाखा न देतां नुसतें त्याचें नांव रैकवालजातीय अशा शब्दानें पोटजातीचा निर्देश करून दिलेलें आढळतें. इ. स. १२०७ चा हा लेख आहे (इं. अँटि. भा. ११ पा. ७२ ). १२४९ इसवीच्या कोंकणांतील एका दानलेखांत ३२ दान घेणाऱ्या ब्राह्मणांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांत त्यांचीं गोत्रें दिलीं आहेत, पण शाखा दिलेली नाहीं. त्याऐवजीं प्रत्येक ब्राह्मणांचें आडनांव दिलेलें आहे. यावेळीं आडनांवें उत्पन्न झालेलीं होतीं असें दिसतें. तीं धंद्यावरून किंवा राहण्याच्या गांवावरून किंवा इतर विशेषावरून उत्पन्न झालेलीं दिसतात. शाखेचें महत्त्व नाहींसें होऊन यावेळीं आडनांवांचें महत्त्व वाढलें. हीं आडनांवें ब्राह्मणांत दीक्षित, राऊत, ठक्कुर, पाठक, उपाध्याय तसेंच पट्टवर्धन वगैरे दिसतात.* याप्रमाणें गोत्राचा उल्लेख कांहीं काळ येतो, कारण ब्राह्मणांत त्याचें महत्त्व अद्यापपर्यंत आहे, पण प्रवर आणि शाखा यांचा उल्लेख येणें बंद झालें. हल्लीं ब्राह्मणांत यांची माहिती बहुधा लुप्त होत चालली आहे ही दुर्दैवाची गोष्ट होय.

ब्राह्मणांचें हल्लींचे मुख्य दोन भेद पंचगौड आणि पंचद्राविड यांचा उल्लेख कोरीव लेखांत अजूनहि १२०० पर्यंत नाहीं. स्कंदपुराणांतहि हा उल्लेख नाहीं, याचें आश्चर्य नको; कारण स्कंदपुराण नवव्या शतकांतलें आहे हें आम्हीं मध्ययुगीन भारत, भाग २, यांत दाखविलें आहे. हा भेद मध्ययुगीन कालानंतर म्हणजे इ. स. बाराशें-

---

* त्रिवाडी हें नांव या लेखांत आलें आहे, तसेंच क्रमित हें नांव आलें आहे, यांचा अर्थ लक्षांत येत नाहीं.

नंतर उत्पन्न झाला असावा असें दिसतें. या भेदाची कल्पना गौड मांसाहारी आहेत, आणि द्राविड शाखाहारी आहेत, यावर बसविली असावी. हे भेद नसले तरी ब्राह्मणांचे अनेक पोटभेद राहण्याच्या देशावरून किंवा शहरावरून इ. स. १२०० च्या पूर्वींच उत्पन्न झाले होते हें निर्विवाद आहे. या भेदाचीं कारणें निरनिराळ्या चालीरीति व तसेंच जातीच्या शुद्धतेची कल्पना हीं झालीं असावीं. स्कंदपुराणांतील नागरखंडांत नागरब्राह्मणांचा इतिहास आणि त्यांचा मुख्य देव हाटकेश्वर शिव याची कथा दिली आहे. तेथें एक गोष्ट अशी सांगितली आहे कीं, एक अविज्ञात ब्राह्मण त्यांच्या शहरीं आला व त्याला एका नागर ब्राह्मणानें आपली मुलगी दिली. पुढें तो ब्राह्मण नसून चांडाळ आहे, असें कळलें तेव्हां जातींत मोठा घोंटाळा उत्पन्न झाला; आणि नागरांनीं तेव्हांपासून असा नियम केला कीं, नागरज्ञातींतील ब्राह्मणाशिवाय दूसऱ्या कोणास मुलगी द्यावयाची नाहीं. यासाठीं त्यांनीं नागरांचीं कुळें परिगणित केलीं. हळु हळु हीच व्यवस्था बहुतेक सर्व जातींत आणि पोटजातींत अमलांत आली. किंबहुना पोटजातीला ज्ञाति हा शब्द योग्य रीतीनें लागू झाला. अबू येथील शिलालेखांत लिहिणारा नागर-ज्ञाति-भाजा असें आपलें वर्णन करतो ( संवत् १३३१ म्हणजे १२७४ इसवी ). ही गोष्ट कल्पित असेल आणि स्कंदपुराणांत मागून घुसडली गेली असेल; परंतु या गोष्टीवरून लग्नसंबंध त्याच देशांतील ज्ञातीच्या कुलांतच संकुचित कसा झाला, यावें कारण बरोबर दिलेलें सांपडतें. आणि याच कारणानें राहाण्याच्या देशावरून ब्राह्मणांच्या पोटजाति उत्पन्न झाल्या असें अनुमान होतें. या मोठ्या पोटजाति काश्मिरापासून दक्षिणेपर्यंत झालेल्या पुढीलप्रमाणें दिसतात. १ काश्मिरी, २ नगरकोटिया (नगरकोट म्हणजे कांगडामधील कटोच राजाची राजधानी) ३ मुहियाळ, ( पंजाबांत ही पोटजात आहे ), ४ सारस्वत, ५ गौड ( गुड म्हणजे

बंगाल नव्हे तर ठाणेश्वराभोंवतालचा प्रदेश ), ६ नारनोळ, ( पतयाळा ), ७ कनोजिया ( कनोज देशांत राहणारे ), ८ सरजुपारिया ( शरयु पलीकडील), ९ जझोति, ( जझोती म्हणजे बुंदेलखंडांत राहणारे ) १० तिवारी ( त्रिपुर हैहयांच्या राजधानीमध्यें राहणारे ) ११ सिंधी, १२ नागर, ( नगर म्हणजे वडनगरमध्यें राहणारे ), १३ श्रीमाली ( श्रीमाळ राजपुतान्यांत आहे ). १४ पुष्करणा ( पुष्कर येथें राहणारे, १५ दसोरे ( दशपूर ऊर्फ मंदसोर ), १६ माळवी, १७ मोढ ( मोढ अथवा धर्मारण्य येथें राहणारे ), १८ गुजराथी, १९ बंगाली, २० मैथिल, २१ ऊरिया २२ देशस्थ, २३ चित्पावन ( चित्तपोळण म्हणजे चिपळूणभोंवतीं राहणारे, ) २४ कऱ्हाडे, (कऱ्हाडच्या शिलाहारांच्या देशांत राहणारे), २५ गौड सारस्वत, २६ कर्नाटक, २७ आंध्र अथवा तेलगु, २८ तामिळ आणि २९ मल्याळी ( नंबुद्री ). या व अशा ब्राह्मणांच्या मुख्य पोटजाति त्यांच्या राहण्याच्या देशावरून नांवें पावलेल्या आपल्या दृष्टीस पडतात. यांतहि आणखी पोटविभाग आहेतच. दशा विशा वगैरे इतर पोटभेद कित्येक कारणांवरून पडलेले उत्तरेस दिसतात, आणि दक्षिणेंत ऐय्यर ऐयंगार आचार्य वगैरे दिसतात. तत्त्वज्ञानाच्या भेदांवरूनसुध्दां असे भेद पडले आहेत. आय्यर हे स्मार्त आहेत; म्हणजे शिव आणि विष्णु यांस ते सारखेच समजतात. पण अयंगार हे नारायणाला सर्वांत श्रेष्ठ देव मानतात, आणि रामानुजाच्या तत्त्वज्ञानाचे ते अनुयायी आहेत. यानंतर मध्वाचार्यांचे अनुयायी द्वैततत्त्वज्ञानी यांचाहि एक निराळा पोटविभाग झालेला दिसतो; आणि त्यास आचार्य म्हणतात. या सर्व पोटभागांत विवाहसंबंध बंद झाले, पण कांहीं कांहींत अन्नव्यवहारहि बंद झाला.

या कालविभागाच्या प्रारंभीं उत्तर हिंदुस्थानच्या ब्राह्मणजाति, वंश व आचार, यांत अधिक शुद्ध आहेत अशी कल्पना असल्याचें दिसून

येतें, हें आश्चर्य आहे. दंतकथात्मक पुरावा असा सांपडतो कीं, दक्षिणेंतील कित्येक राजांनीं आपल्या देशांत वसति करण्यास या काळांत उत्तर हिंदुस्थानांतील ब्राह्मण कुटुंबांस बोलाविलें. उदाहरणार्थ बंगालचा राजा बल्लाळसेन यानें पांच कनोजिया ब्राह्मणांस बंगाल्यांत वसति करण्यास बोलाविलें. हे ब्राह्मण आदिसूर याच्या वेळेस आले, अशी दंतकथा आहे. पण हें काल्पनिक नांव आहे, किंवा आदिसूर म्हणजे सेनांचा पहिला राजा असा अर्थ घ्यावा. याचप्रमाणें केसरी राजाच्या वेळेस उत्तर हिंदुस्थानांतून ओरिसांत वसति करण्यास ब्राह्मण बोलाविले गेले, असा इतिहास दिसतो. गुजराथेंत मूलराजानेंहि उत्तरेकडील शंभर ब्राह्मण वस्ती करण्यास बोलाविले. त्यांस हल्लीं गुजराथेंत औदीच्य म्हणतात. किंबहुना थेट दक्षिणेस तामिळ देशांतहि एका चोल राजानें उत्तर हिंदुस्थानांतून ब्राह्मण वस्तीस बोलाविले, अशी कथा आहे. या सर्व ठिकाणीं नवीन आलेल्या ब्राह्मणांनीं निराळी पोटजात बनवून तद्देशीय ब्राह्मणांशीं रोटीबेटीव्यवहार, त्यांस कमी दर्जाचें मानून, बंद केला. या रीतीनें आणखी पोटजाति उत्पन्न झाल्या. याचप्रमाणें असें आपल्यास मानतां येतें कीं, पंजाब, आणि यू. पी. मधून कित्येक ब्राह्मण मुसलमानांच्या स्वाऱ्यामुळें व पुढें मुसलमान जेत्यांच्या जुलुमामुळें दक्षिणेकडे निघून आले. गोव्यांतील गौडसारस्वत ब्राह्मण याप्रमाणें सरस्वतीच्या प्रदेशांतून यावेळीं इकडे आले असावे. त्यांची अशी कल्पना आहे कीं ते बंगाल्यांतून आले, पण ही कल्पना अनैतिहासिक वाटते. गुड हें नांव ठाणेश्वराभोंवतालच्या प्रदेशास वराहमिहिरानें दिलेलें आढळतें. आणि या ब्राह्मणांचा मुख्य म्हणजे विशेष जो मत्स्याहार तो महाभारतांतहि एका दीर्घ दुष्काळांत सरस्वतीच्या तीरावरील ब्राह्मणांनीं मत्स्याहार करून वेदरक्षण केलें, या कथेंत वर्णिलेला आहे. बंगाली ब्राह्मणहि याच मूळ सरस्वती देशां-

तून पूर्वेकडे गेले, आणि म्हणून त्यांच्या देशांस गौड हें नांव पडलें. गोव्याचे गौड सारस्वत ब्राह्मण बंगाल्यांतून आल्याची दंतकथा मानण्यासारखी नाहीं असें आम्ही म्हणतों, याचें एक कारण असें कीं, बंगाल सोडून ते इकडे येण्याचें ऐतिहासिक प्रयोजन दिसत नाहीं, आणि दुसरें बंगाल्यांच्या भाषेंत ज्या उच्चाराच्या विशेष गोष्टी आहेत त्या त्यांच्यांत दिसत नाहींत; म्हणजे स चा ष, अ चा ऑ, असा उच्चार गौडसारस्वतांत दिसत नाहीं.*

त्याचप्रमाणें कांहीं दक्षिणी ब्राह्मण चालुक्यांनीं वेंगी ( पूर्व किनारा) देश जिंकल्यावर जेत्यांबरोबर आंध्र देशांत गेले. आणि तेथें त्यांची एक निराळी पोटजात बनली, त्यांस हल्लीं नियोगी म्हणतात. तात्पर्य ब्राह्मणांच्या हालचाली जेत्यांबरोबरहि या काळांत झालेल्या आहेत, तशा अर्वाचीन इतिहासांत मराठ्यांच्या विजयानंतर झाल्या.

नागर ब्राह्मणांनीं आपली ज्ञात ठरविण्याची, गोत्रें व कुटुंबें मोजून, जी व्यवस्था केली, ती या सर्व ब्राह्मणांच्या पोटविभागांनीं अमलांत आणली, आणि लग्नसंबंध व अन्नव्यवहार आपल्यांतच मर्यादित केला. या सर्व पोटविभागांना वर सांगितल्याप्रमाणें राहाण्याचा देश अथवा शहर यांजवरून नांवें पडलीं; अर्थात् ही नांवें लग्नसंबंध मर्यादित झाल्यानें महत्त्वाचीं झालीं आणि गोत्र व शाखा यांचें महत्त्व नाहींसें झालें.

परंतु हें सांगितलें पाहिजे कीं, या सर्व पोटविभागांनीं आपला

---

* चित्पावनांतहि आपण बाहेरून आलों अशी दंतकथा आहे. त्यांच्या गौरवर्णावरून पंजाबच्या डोंगरी प्रदेशावरून ते इकडे आले असावे, आणि कांहीं काळ वसईजवळ राहिल्यानंतर चिपळून इलाख्यांत म्हणजे दोन शिलाहारांच्या राजांच्या सरहद्दीवरील तंट्याच्या डोंगरी प्रदेशांत त्यांनीं आपली याच सुमारास वस्ती केली. परशुरामाचें मूळ स्थान वसईजवळ आहे, हें आम्हीं महाभारतमीमांसेंत दाखविलेंच आहे.

प्राचीन वैदिक धर्म निश्चयानें पाळला. त्यांनीं आपले वेद व शाखा व तदनुरूप संस्कार पाळले, इतकेंच नव्हे, तर आपल्या गोत्रप्रवराची आठवण कायम ठेविली. वैदिक सूत्रांनीं हें गोत्र व प्रवर सांगितलेले असून तेच हल्लीं सर्व हिंदुस्थानांत प्रचलित आहेत, व स्मृतींचा सगोत्रविवाहाचा निषेध सर्व ब्राह्मण पाळतात. ब्राह्मणांच्या हजारों पोटजाति असल्या तरी गोत्रप्रवर एकच असून सगोत्रनिषेध सर्वांनीं अद्याप पाळला आहे. ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यांत आडनांवें सुरू झालीं आणि त्यांस महत्त्व प्राप्त झालें आणि त्यामुळें गोत्राचा उल्लेख कोरीव लेखांत येणें बंद झालें; तरी पण गोत्रांची स्मृति ब्राह्मणांनीं विशेषतः दक्षिणेंत कायम राखिली आहे हें अभिनंदनीय आहे.

## **टिप्पणी** मार्कोपोलोनें वर्णिलेले लाड ब्राह्मण.

मार्को पोलो यानें लार देशांतील ब्राह्मणांचें केलेलें वर्णन येथें उद्धृत करून त्याची चर्चा करणें अवश्य आहे. मार्को पोलो हिंदुस्थानांत १२८० सुमारें आला होता व त्यानें १३००इ. सुमारें आपलें प्रवासवृत्त लिहिलें. हें वृत्त अर्थात् आमच्या काळानंतर शंभर वर्षांचें आहे; तथापि तें गैरलागू आहे असें म्हणतां येत नाहीं. देशाची परिस्थिति त्याच्या वेळीं १२०० इ. प्रमाणेंच असावी; कारण मुसलमानांनीं दक्षिण देश इ. १३०० नंतर जिंकला. लार देशाविषयीं तो म्हणतोः–( मिस-यूलचा मार्को पोलो भाग दोन पा. ३६०) " हे सर्व ब्राह्मण पश्चिमेकडील त्या देशांतून आलेले आहेत. ते उत्तम व्यापारी आणि अत्यंत सत्यनिष्ठ आहेत. ते मांस खात नाहींत आणि दारू पीत नाहींत आणि स्वधर्मनिष्ठेनें व एकपत्नीव्रतानें राहातात. खांद्यावरून पाठीवर व छातीवर येईल असें घातलेले कापसाचें सूत्र ते बाळगतात. त्यांचा राजा शक्तिमान् व संपत्तिमान् असून तो या ब्राह्मणांस चोल देशांत उत्तम हिरे व उत्तम मोतीं खरेदी करण्यास पाठवितो. आठवड्याच्या प्रत्येक दिवशीं निरनिराळ्या शुभ व अशुभ वेळा आहेत असें ते मानतात आणि शुभ वेळींच ते व्यापार करि-

तात. ते तपस्वी वृत्तीनें राहणारे असल्याकारणानें दीर्घायुषी असतात. ते नेहमी एक वनस्पती दातांनीं चावितात आणि त्यामुळें त्यांचें दांत उत्तम असतात.

" दुसरे कांहीं ब्राह्मण चुगी ( जोगी ) नांवाचें येथें आहेत, ते प्रतिमापूजन करून असतात. ते यांच्याहूनहि दीर्घकाळ म्हणजे १५० पासून २०० वर्षेंपर्यंत जगतात. ते भात व दूध एवढेंच खातात. गंधक आणि पारा यांपासून तयार केलेलें एक पेय ते दिवसांतून दोनदां पितात; त्यानें त्यांचें आयुष्य वाढतें. यांपैकीं कांहीं तपस्वी अजून केवळ नग्न स्थितींत फिरतात. जस्ताचा किंवा सोन्याचा एक लहान बैल ते आपल्या कपाळावर बांधतात. गाईच्या शेणाच्या गोवऱ्यांची राख ते आपल्या अंगाला फासतात. कोणीं त्यांची सेवा केली तर त्याच्या कपाळाच्या मध्यभागीं ती राख ते लावितात. स्वर्गफळाच्या ( केळीच्या? ) झाडाच्या वाळलेल्या पानावर ते जेवतात. ते कोणाही प्राण्याची हिंसा करीत नाहींत. फार काय माशी किंवा मच्छरहि ते मारीत नाहींत. ते पुष्कळ दिवसांचा उपास करितात तेव्हां ते पाण्याशिवाय कांहीं खात नाहींत. ते जमिनीवर निजतात; असें असूनहि ते दीर्घकाळ जगतात. ते प्रेत दहन करितात."

या वर्णनावर मिस् यूल एका टिपेंत म्हणते कीं, ' लार देशांत दक्षिण गुजराथ, ठाणे आणि चौल यांचा अन्तर्भाव होतो. कोंकणी ब्राह्मणांनीं, गोव्यांतून त्यांना हांकलून दिलें तेव्हांच व्यापार पत्करिला. ब्राह्मणांच्या सत्यवादित्वाची ही प्रशंसा वाजवी आहे, आणि ती ग्रीकांइतकी जुनी आहे. ग्रीक लेखकांनीं तर ती केलीच आहे पण नंतर हुएनत्सांगनें व त्या अलीकडे अरबी प्रवाशांनींहि केली आहे. "

वरील वर्णन मार्कोपोलोचे कोणास उद्देशून आहे हें ठरविणें बरेंच कठिण आहे. लार देशांत अरब प्रवाशांच्या वर्णनावरून ठाणें व कुलाबा जिल्ह्यांचा अन्तर्भाव होतो हें खरें व त्याची भाषा ही स्वतंत्र लारी नांवाची होती. पण मार्को पोलोनें पुढें ठाण्याच्या राज्याचे निराळें वर्णन दिलें आहे. ठाण्यांत शिलाहार राजे राज्य करीत होते हें आपण पाहिलेंच आहे. लार देश गुजराथेहूनहि निराळा होता. कारण गुजराथेचें मार्कोपोलोनें निराळें वर्णन केलें आहे; आणि १३०० इसवी सुमारें गुज-

राथचे निराळें राज्य असून पाटण राजधानींत वाघेला राजे राज्य करीत होते. या भागाची भाषा निराळी व चमत्कारिक आहे असेंहि त्यानें वर्णन केलें आहे ( पा. ३९२ ). अर्थात् १३०० पर्यंत हल्लींचा दक्षिण गुजराथ म्हणजे लार देश उत्तर गुजराथेहून निराळा, भाषेनें तसाच राजसत्तेनें, होता.लार देशांतील लोकांचा एक निराळा स्वतंत्र राजा असावा. पण पूर्वींच्या शतकांत ते राष्ट्रकूटांच्या सत्तेखालीं आणि नंतर कल्याणच्या पश्चिम चालुक्यांच्या सत्तेखालीं होते. या लार देशांतील ब्राह्मणांची हल्लीं एक निराळी जात आहे असें प्रसिद्ध नाहीं. परंतु बहुधा त्या काळीं लाड ब्राह्मण अशी निराळी जात असावी आणि ते व्यापाराकरितां चोल व पांडय यांच्या देशा इतक्या दूर प्रदेशांत जात. या देशांत हिरे व मोतीं उत्पन्न होत. कोंकणी ब्राह्मण यांची सत्यभाषणाबद्दल इतर ब्राह्मणाप्रमाणें प्रसिद्धि असली तरी व्यापाराबद्दल प्रसिद्धि नाहीं. पट्टवर्धन, घळिस आणि घैसास हीं आडनांवें कोंकणस्थ व कऱ्हाडे ब्राह्मणांतच हल्लीं आहेत. त्यांचा उल्लेख गोव्याच्या कदंबांच्या शक ११७१ म्हणजे इ. स. १२४९ च्या कोरीव लेखांत ( जे. आर. ए. एस. मुंबई ९ पा. २४३ ) आला असून या नांवावरून असें दिसतें कीं, हीं कुटुंबें व्यापारी होतीं. या आडनांवांवरून कोणत्या व्यापाराचा बोध होतो हें आम्हांस ठरवितां येत नाहीं. कऱ्हाडचा शिलाहार राजा भोज दुसरा याच्या ११९० इसवीच्या कोरीवलेखांत चार ब्राह्मणांची नांवें आलीं आहेत तीं येणेंप्रमाणें:- ( १ ) आदित्यभट्ट ( २ ) लक्ष्मीधरभट्ट ( ३ ) कऱ्हाटक प्रभाकर घैसास आणि ( ४ ) वासियन घैसास ( गोत्राचा कोठेंच उल्लेख नाहीं ). येथें कऱ्हाटक हा शब्द ब्राह्मणउपजातिवाचक स्पष्ट आहे, आणि घैसास ह्या शब्दांत धार्मिक नव्हे अशा एखाद्या धंद्याचा बोध होतो. परंतु मार्कोपोलोनें सांगितलेला हिरा आणि मोतीं यांचा धंदा निश्चयानें हे करीत नव्हते. तेव्हां आम्हांस असें वाटतें कीं दक्षिण हिंदुस्थानभर पसरलेली लाड ब्राह्मणांची एक निराळी जात असावी. ती हिऱ्यामोत्यांचा धंदा करणारी असून तिच्या सत्यभाषित्वाबद्दल ख्याति असावी. मार्कोपोलोची गांठ या ब्राह्मणांशीं पांडय देशांत पडलेली दिसते. कारण पांडय देशाच्या बहुतेक पाठोपाठ त्यानें लार देशाचें वर्णन केलें

आहे. माबार नांवानें त्यानें वर्णिलेला देश निश्चयानें पांडय देशच होय. कारण मोतीं येथेंच सांपडतात. तसेंच पुढील वर्णन या देशालाच तंतोतंत लागू पडते. "या देशांत शिंपी मुळींच नाहींत. सर्व लोक, पुरुष व स्त्रिया, श्रीमंत व गरीब, राजासुद्धां, बहुतेक नागवे फिरतात. एक ढुंगणाभोंवतीं वस्त्र मात्र असतें. शिपाई सुद्धां भाला व ढाल घेऊन अशाच नग्न स्थितींत लढाईस जातात. नग्न राजाची खूण एवढीच कीं, त्याचें नेसण्याचें वस्त्र सूक्ष्म असतें आणि गळ्यांत मौल्यवान् रत्नांचा हार असतो" या वर्णनावरून रघुवंशांतील कालिदासानें केलेल्या वर्णनाची ( पाण्ड्योयमंसार्पितलम्बहारः वगैरेची ) आठवण होते. द्रविड देशांतील ब्राह्मण हल्लींहि बहुतेक नग्न स्थितींतच फिरतात. या नंतर मार्को पोलो मुताफिली देशाचें वर्णन करितो. या नांवाचा माग लागत नाहीं, पण हा देश म्हणजे वरंगळचें आंध्र राज्य निश्चयानें होय. कारण त्यावेळीं येथें राणी राज्य करीत होती असें वर्णन आहे ( ही प्रसिद्ध प्रतापरुद्राची मुलगी होय ). आणि येथील डोंगरांत हिरे सांपडतात हें वर्णन गोवळकोंड्याच्या खाणीला लागू पडतें. या दोन देशांत बहुधा लाड देशांतील ब्राह्मणाची गांठ त्यास पडली असावी. कारण लागलीच त्यानें पश्चिम किनाऱ्यावर असलेल्या लाड देशाचें वर्णन केलें आहे. अर्थात् हा लाट म्हणजे हल्लींचा दक्षिण गुजराथ होय.

ज्या जोगींचे पुढें वर्णन केलें आहे ते शैव जोगी दिसतात. पण कपाळावर धातूचा बैल बांधणारे हे लोक जंगम नसावेत. कारण जंगम प्रेतें जाळींत नाहींत, पुरतात. वीर शैव लिंगायत मत यावेळीं उत्पन्न झालें होतें हें खरें. पण लिंगायत अद्याप कोंकण किंवा लाट देश येथें गेले नव्हते. तेथें अजूनहि ते थोडेच सांपडतात. मिस यूल म्हणते त्याप्रमाणें असे जोगी हल्लीं सांपडत नाहींत.

ते जैनहि होऊं शकत नाहींत. हे प्राणिहिंसा करीत नाहींत, माशी किंवा मच्छरहि मारीत नाहींत, दीर्घ उपवास करितात, यावरून जैनांची कल्पना होईल. पण जैन गोवऱ्यांची राख वापरीत नाहींत किंवा आपल्या शिष्यांच्या कपाळास लावीत नाहींत. तेव्हां हे हल्लीं अस्तित्वांत नसलेल्या पंथाचें शैव तपस्वी असावे. ते कदाचित् लकुलीशाचे अनुयायी

असतील. याचें पुण्यस्थान पूर्वी सांगितल्याप्रमाणें भडोच जवळ आहे. तात्पर्य एकंदर वर्णनावरून लाड ब्राह्मण म्हणजे कोंकणी ब्राह्मण नसून हल्लीं दक्षिण गुजराथेंत नसणारे पण सर्व दक्षिणदेशांत (हैदराबादसुद्धां) सांपडणारे व्यापारी ब्राह्मण असावेत असा आमचा तर्क आहे. हे व्यापारी असून अत्यंत धार्मिक जुन्यामताचे असत. या प्रदेशांतील ब्राह्मण आपल्यास लाड म्हणवीत नाहींत असें चौकशी अंतीं समजतें, तेव्हां मार्को पोलोनें वर्णिलेले लाड ब्राह्मण कोणते हा प्रश्न अनिश्चितच राहतो.

## रजपूतांच्या पोटजाति.

पुढच्या महत्त्वाचा वर्ण म्हणजे क्षत्रिय वर्ण. याचा विचार करितां आपल्यास असें दिसतें कीं, या कालविभागांत याचेहि पोटभाग ब्राह्मणांइतके पुष्कळ नसले तरी पडले. हें स्पष्टच आहे कीं राहाण्याच्या देशावरून किंवा शहरावरून रजपुतांचे भाग पडणें शक्य नव्हतें. क्षत्रियांचे दोन मुख्य विभाग या पूर्वीच पडले होते, शेती करणारे व शेती न करणारे. शेती न करणाऱ्यांचा दर्जा साहाजिकच दुसरा लागला. शेती न करणारे क्षत्रिय म्हणजे देशाचे राजे आणि गांवचे मुख्य किंवा प्रांताचे अधिकारी, यांचा दर्जा मोठा मानला गेला. या क्षत्रियांसच विशेषत्वानें आतां राजपूत म्हणूं लागले. हा शब्द या काळच्या कोरीव लेखांत साधारणपणें राज्य करणारे क्षत्रिय अशा अर्थानें येतो. उदाहरणार्थ, ए. इं. १४ पा. १५९ बल्लाळसेनाचा लेख यांत ‘ जज्ञिरे राजपुत्राः ’ असा प्रयोग आला आहे. राजपुतांचा दर्जा भाग २ यांत दाखविल्याप्रमाणें (पा. १७८) ब्राह्मणांपेक्षांहि मोठा प्रथम ठरला. मागील शतकांतील अरब लेखकांनीं वर्णिलेला हा रजपुतांचा वरिष्ठ दर्जा अल्बेरूनी सांगत नाहीं. कारण पूर्वी सांगितल्याप्रमाणें तो पुष्कळ वेळां प्रत्यक्ष स्थितीकडे न पाहतां हिंदुधर्मशास्त्रावरून विधानें करितो. किंवा असेंहि असूं शकेल कीं मुसलमानी स्वाऱ्यांचे काळांत बहुतेक राज्य करणारीं

पंजाबांतील रजपूत घराणीं नष्ट झालीं. गाहडवाल राजा चंद्र यानें उत्तर हिंदुस्थानांतून जुलूम करणाऱ्या मुसलमानांस हांकलून दिलें आणि क्षत्रिय वर्णाची पुनर्घटना केली त्यावेळीं साहजिकच धर्मशास्त्रांत सांगितलेली क्षत्रियांची जागा त्यांस मिळाली; म्हणजे ब्राह्मणांच्या नंतर त्यांचा वर्ण लागला. परंतु सर्व बाबतींत ते ब्राह्मणांच्या बरोबरीचे होते. कारण अल्बेरूनी स्वतः कबूल करितो कीं, त्यांचा दर्जा ब्राह्मणांहून विशेष खालीं नव्हता. उदाहरणार्थ, वेदांचें अध्ययन करण्याचा त्यांस अधिकार होता, व ते वेदांचा व शास्त्रांचा अभ्यास करीतहि. आपण पाहिलेंच आहे कीं, भोज, गोविंदचंद्र वगैरे प्रसिद्ध राजे वैदिक व लौकिक विद्येंत विद्वान् ब्राह्मणांप्रमाणें प्रवीण होते.

नेहमींच्या रीतीनें रजपूत म्हणजे हिंदुस्थानांतील राज्य करणाऱ्या क्षत्रियांनीं ११०० इसवीच्या सुमारें त्यावेळची धर्मनिष्ठ शुद्ध क्षत्रिय राजघराण्यांची यादी करून एक आपली पोटजात बनविली. या यादींत पंजाब साहजिकच बाहेर राहिला. कारण तेथें मुसलमानांचें राज्य होतें. आणि खरोखरच पंजाबांत राज्य करणारीं क्षत्रिय घराणीं उरलींहि नव्हतीं. हिमालयांतील राज्य करणारीं घराणींहि या यादींत आलीं नाहींत. याचें कारण दुसरें असून तें आम्ही पुढें सांगूं. दक्षिण हिंदुस्थानांतील राज्य करणारीं घराणीं सुद्धां ह्या यादींतून वगळलीं गेलीं. हीं शुद्ध आर्यवंशी क्षत्रिय वर्णाचीं नाहींत असें बहुधा समजलें गेलें असावें. महाराष्ट्रांत मात्र राज्य करणारीं क्षत्रिय घराणीं या यादींत घेतलीं गेलीं आहेत. कारण उत्तर हिंदुस्थानांत राज्य करणाऱ्या क्षत्रिय घराण्यांशीं त्यांचें विवाहसंबंध चालत आले होते. अशा राजपूत घराण्यांची संख्या ३६ ठरली. आणि ही संख्या लौकरच ठराविक होऊन ११५९ इ. मध्यें लिहिलेल्या कल्हणाच्या राजतरंगिणींत आपल्यास या संख्येचा उल्लेख सांपडतो. प्रारंभीच्या

छत्तिसाच्या यादींत कोणतीं घराणीं होतीं हें ठरविणें कठिण आहे. कारण त्यावेळेस लिहिलेली विश्वसनीय यादी हल्लीं आपल्यास उपलब्ध नाहीं. रासा हल्लीच्या स्थितींत १६ व्या शतकांतला निःसंशय असला तरी (भा. २ पा. ७० पहा) रासांत आलेली यादी पृथ्विराजाच्या समकालीन आहे असें आम्ही मानतों. रासांतील ही यादी हिंदुस्थानच्या ११०० इ. च्या सुमारास असलेल्या राजकीय स्थितीशीं खरोखर जुळते कीं नाहीं याचा आम्ही एका टिप्पणींत विचार करूं. या परिगणनेनें निरनिराळ्या राजकुलांची कुलनामें जास्त महत्त्वाची झालीं व प्रत्येक कुलाचें गोत्र निराळें होतें तरी त्या गोत्राची किंमत विवाहाच्या बाबतींत सुद्धां कमी झाली. किंबहुना या कालांतील कोरीव लेखांत कुलनामच गोत्रनाम झालें आणि गुहिलगोत्र, प्रतिहारगोत्र असा शब्दव्यवहार चालू झाला (भा. २ पा. १७७ पहा).

रासांतील यादींत लखनौचे सेन यांचें नांव नाहीं ही गोष्ट प्रथम नजरेस येते. यावरून बंगाल्यांत त्यांची सत्ता ११०० इसवी नंतर प्रस्थापित झाली या मतास पुष्टि मिळते. दुसरी गोष्ट लक्षांत येते ती ही कीं दक्षिण हिंदुस्थानांतील राज्य करणारीं सर्व घराणीं म्हणजे गंग, चोल, पांड्य आणि केरल या यादींत नाहींत. याचें एकच कारण असें दिसतें कीं पूर्वीं सांगितल्याप्रमाणें क्षत्रियत्वाबद्दल यांचा दावा उत्तर हिंदुस्थानांतील कोणत्याहि क्षत्रियांशीं यांचा विवाहसंबंध नसल्यानें मान्य केला गेला नाहीं. महाराष्ट्रांतील राज्य करणारीं क्षत्रिय घराणीं भौगोलिकदृष्ट्या मध्यवर्ति असल्यानें वंश-दृष्ट्याहि मध्यस्थितींत होतीं. शिलाहार हेंच एक खरें मराठे घराणें छत्तिसाच्या यादींत गणलें गेलें आहे हें आम्ही पूर्वीं सांगितलेंच आहे. दक्षिण देशचे चालुक्य व राष्ट्रकूट आमच्या मतानें उत्तर हिंदुस्थानच्या त्याच नांवाच्या कुलांहून भिन्न असले तरी त्या नांवाखालीं छत्तिसाच्या यादींत त्यांचा अन्तर्भाव होतो ही गोष्ट नाकबूल करितां येत नाहीं.

पण गोव्याच्या कदंबाचें नांव छत्तिसाच्या यादींत नाहीं ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. याच कालविभागांत गुजराथच्या चालुक्य कुलांत कदंबांच्या दोन राजकन्यांचा विवाह झाल्याचा पुरावा आहे.* बहुधा उत्तर हिंदुस्थानांतील रजपुतांनीं आपली पोटजात उत्तरहिंदुस्थानालाच मर्यादित केली आणि महाराष्ट्रांतील क्षत्रिय कुलाशीं विवाह-संबंध चालू ठेवणें बंद केलें. उदाहरणार्थ कर्ण वाघेलानें आपली मुलगी देवगिरीचे यादवास देण्याचें नाकारिलें ( इ. स. १३०० ). याचें कारण असें दिसतें कीं, दक्षिण हिंदुस्थानच्या अनार्य मानलेल्या राजघराण्याशींहि त्यांचा विवाहसंबंध होत असे. यामुळें मराठा क्षत्रियांनीं शिलाहारासह या काळानंतर आपली एक निराळी पोटजात केली आणि हीं कुळें मोजून ९६ कुळांतच विवाहसंबंध मर्यादित केला.

पश्चिम हिमालयांतील रजपूतांचा एक निराळा संघ होऊन एक निराळी पोटजात बनली. ते बाजूला पडले होते इतकेंच नव्हे तर त्यांच्यांत चमत्कारिक विवाहाच्या रीति चालू होत्या. प्राचीन हिंदुस्थानांत वरिष्ठ वर्णानें खालच्या वर्णांतील स्त्रिया करण्याची चाल होती, ती हिमालयांत तेव्हां अवशिष्ट होती व अद्याप आहे. यांत विवाहाची संतति कमी दर्जाची न होतां बापाच्याच जातीची होत असे. ह्याप्रमाणें हल्लींहि पंजाबालगतच्या हिमालयाच्या प्रदेशांत क्षत्रियांचे तीन दर्जे आहेत, म्हणजे रजपूत, राणा अथवा ठाकूर आणि राठी. रजपूत ठाकुरांच्या मुली विवाहितात आणि ठाकूर राठींच्या मुली; पण ते त्यांस आपल्या मुली देत नाहींत. ह्याप्रमाणें

---

* कुमारपाल चरितांत अशा विवाहाचा उल्लेख आहे.

कर्णोऽपि कर्नाटनृपाङ्गजायाश्चकारपाणिग्रहणं जयायाः ।

त्याचें एका काश्मिरी राजकन्येशीं विवाह झाल्याचें वर्णन त्यांत आणखी आहे. कर्णाय काश्मीरपतिः स्वपुत्रीं प्रैषीदथो मैणलदेविनाम्नीम्।

हिमालय प्रदेशांत जुनी मिश्रविवाहाची चाल रजपुतांत चालू आहे तरी त्यांच्या वंशाच्या शुद्धतेंत कांहीं फरक नाहीं. कारण राठी हे मोंगलवंशी नसून आर्यवंशी आहेत. किंबहुना ते केवळ शेतकी करीत असल्यानें दुसऱ्या दर्जाचे क्षत्रिय आहेत. शिवाय त्यांच्यांत कारेवा म्हणजे विधवाविवाह प्रचलित आहे. पण रजपुतांत ब्राह्मण आणि वैश्यांप्रमाणेंच तो निषिद्ध आहे. " पंजाबांतील जाति व उपजाति " या पुस्तकांत हिमालय प्रदेशांतील रजपुतांच्या पोटविभागांची सविस्तर माहिती दिली आहे. या रजपुतांत कटोच जात अग्रणी असून त्यांतील मुख्य कुल लंबाग्रामच्या महाराजाचें आहे. पण या सूर्यवंशी आणि चंद्रवंशी श्रेष्ठ*, मध्यम व कनिष्ठ कुलांचीं नांवें जमुवाल, गुलेरिया वगैरे, राहाण्याच्या ठिकाणावरून पडलेलीं येथें विस्तारानें देण्याची आवश्यकता नाहीं.

खुद्द पंजाबांत पश्चिमेकडील क्षत्रिय, महमुदाच्या आणि शिहाबुद्दीनाच्या वेळेस जबरदस्तीनें मुसलमान केले गेले. हे लोक रजपूत नांव वापरीत नाहींत व तें त्यांस आवडतहि नाहीं. पण त्यांत महाभारत म्हणजे ग्रीक काळांतील क्षत्रिय नांवें यौधेय ( जोहिया), आनव (जंजुआ)वगैरे अद्याप बाकी आहेत;आणि कांहीं हिंदु चाली-मूल झाल्यावर किंवा लग्नाच्या वेळीं ब्राह्मणांस बोलावणें-इत्यादि अद्याप शिल्लक आहेत. पंजाबच्या पूर्वभागांत रजपूत अजून सांपडतात; परंतु ते पूर्वेकडील व दक्षिणेकडील देशांतून मुसलमानी काळांत आलेले असावेत. कारण छत्तिसाच्या यादींतील ठराविक कुलनामें परमार, चव्हाण, तुवर, राठोड, कछवाह वगैरे ते घेतात आणि त्यांचे विवाह संबंधहि दिल्ली आणि रजपुतान्यामधील क्षत्रियांशीं होतात.पंजाब आणि

---

*यांस मिया म्हणतात. हा शब्द मुसलमानी असून त्याचा अर्थ परमपूज्य असा आहे.

सरस्वतीचा प्रदेश तसेच पांचालदेश हा ब्राह्मणक्षत्रियाची मूळ भूमि आहे. हिंदुस्थानच्या दक्षिण व पूर्व भागांत असलेले सर्व ब्राह्मण व क्षत्रिय येथूनच गेलेले आहेत. तेव्हां परमार व चव्हाण, राठोड आणि कछवाह हीं कुलनामें मूळचीं पंजाबांतून आलेलीं असावींत. किंवा हीं नांवें महाभारतांत आलेलीं नसल्यानें दक्षिण व पूर्व देशांत म्हणजे मध्यदेशांत व राजपुतान्यांत सहाव्या शतकांत किंवा नंतर कुशान व हूण लोकांच्या स्वाऱ्यामुळें जे क्षत्रिय पंजाबांतून बाहेर पडले त्यांच्यांत मागाहून उत्पन्न झालीं असावींत. छत्तिसाच्या यादींतील कुलनामें महाभारतांत सांपडत नाहींत हें निश्चित आहे आणि ज्याअर्थी पंजाबाच्या पूर्वभागांत ३६ तीलच् नांवें सांपडतात, त्याअर्थी हे रजपूत दक्षिणेकडून तेथें गेले असावेत. स्थानिक दंतकथाहि या अनुमानाला अनुकूल आहेत. कारण पूर्वपंजाबचे रजपूत असें मानतात कीं, आम्ही राजपुताना व दिल्लीचा प्रदेश येथून पंजाबांत आलों. याकरितां या राजपुतांचा निराळा संघ न मानितां राजपुताना संघांतच त्यांचा अन्तर्भाव केला पाहिजे.

याप्रमाणें हिंदुस्थानच्या क्षत्रियांचे तीन पोटविभाग होतात व ते ११०० पासून १२०० किंवा १३०० इसवीपर्यंत उत्पन्न झाले. (१) छत्तिस कुलाचे रजपूत, राजपुताना, गुजराथ, काठेवाड, माळवा, यू. पी. आणि पूर्व पंजाब येथें राहणारे. (२) पश्चिम हिमालयांतील रजपूत आणि (३) मराठा क्षत्रिय. हे तीन विभाग आपसांत विवाह करीत नाहींत व रोटी व्यवहारहि करीत नाहींत, तेव्हां नेहमींच्या व्याख्येप्रमाणें त्यांस ठराविक निर्बंधाच्या पोटजाति म्हणण्यास हरकत नाहीं. याप्रमाणें शुद्ध क्षत्रियांच्या पोटजाति तीनच आहेत तरी दुसऱ्या अनेक पोटजाति आपल्यास क्षत्रिय मानतात. यांचेहि अस्तित्व आपल्या कालविभागापर्यंत बहुधा मागें जातें. शेतकीचा धंदा करितात म्हणून ज्यांस कमी दर्जाचें लेखिलें जातें, त्यांचा अन्त-

र्भाव वरील क्षत्रियांत करणें अवश्यक आहे. उदाहरणार्थ, हिमालय प्रदेशांतील राठी व दक्षिण देशांतील मराठे; राठी आणि मराठे हे शद्ब मूळ राष्ट्र शद्बावरूनच निघालेले दिसतात आणि ही व्युत्पत्ति असें दाखवितें कीं, हे लोक राष्ट्र* आहेत म्हणजे वस्ती करून राहिलेले शेतकरी अथवा सामान्य जन असून ते शूद्र म्हणजे मजूर यांहून भिन्न आहेत. अल्बेरूनीनें चार वर्णांचें जें वर्णन केलें आहे त्यावरून मात्र असा बोध होतो कीं, रजपूत म्हणजे क्षत्रिय हे ब्राम्हणांच्या बरोबरचे मानले जात, तर शेती करणारे क्षत्रिय व वैश्य यांचा दर्जा शूद्रांहून फारसा अधिक मानला जात नसे. कारण दोघांसहि वेदाध्ययनाचा अधिकार नव्हता. या शेतकरी क्षत्रियां व्यतिरिक्त दुसऱ्या पोटजातिहि क्षत्रियाचा दर्जा सांगत आहेत, त्या ह्याच कालविभागांत उत्पन्न झाल्या असाव्या. तथापि बुंदेले, रघुवंशी वगैरेंच्या वर्गांबद्दल निश्चित पुरावा आपल्यास उपलब्ध नाहीं. हिंदु समाजाचा कल नेहमीं अनेक पोटजाति उत्पन्न करण्याकडे असून त्या आपल्या जवळच्या वरच्या वर्णांत समाविष्ट होण्याचा हक्क नेहमींच बाळगतात.

दक्षिण हिंदुस्थानचे म्हणजे मद्रास इलाख्यांतील क्षत्रित्र आपल्यास सूर्यवंशी व चंद्रवंशी मानतात. त्यांची एक निराळी पोटजाति आहे, ती वरील गणनेंत आम्हीं धरली नाहीं. जेथपर्यंत आम्हांस पुरावा मिळाला तेथपर्यंत कोरीवलेखांत दक्षिणेकडील क्षत्रियांचे उत्तरेकडील क्षत्रिय कन्याशीं विवाह झाल्याचें उदाहरण आम्हांस मिळालें नाहीं. मनुस्मृतींत द्रविड वीरजाति व्रात्य क्षत्रिय मानल्या आहेत, आणि पुराणांत तर त्यांची उत्पत्ति सूर्यवंशांत अस-

---

* अशोकाच्या शिलालेखांतील राष्ट्रिक शद्बाचा अर्थ स्मिथच्या मतें पश्चिम घाटावरील राहणारे असा आहे. पण हिमालय प्रदेशांतील वरील राठी लोकांचाहि त्यांत निर्देश होईल.

त्याचा आधार आहे. आंध्र क्षत्रियांस राजू म्हणतात; हा शद्ब संस्कृत आहे; आणि वेल्लाळहि म्हणतात. दक्षिण हिंदुस्थानच्या क्षत्रियांच्या दर्जाबद्दल जास्त चर्चा करण्याचीं सबळ साधनें आम्हांस उपलब्ध झालीं नाहींत. कारण हा विषय विंस्तृत रीतीनें व माहितीनें विवेचिलेला आम्हांस कोठें आढळला नाहीं.

## टिप्पणी–(क्षत्रियांचीं छत्तीस राजकुलें.)

आम्हीं असें वर मानलें आहे कीं, क्षत्रियांची ही छत्तिस राजकुलांची यादी गाहडवाल चंद्रराजानें, एका कोरींव लेखांत सांगितल्याप्रमाणें सूर्य व चंद्रवंशीं रजपूत कुलांची जेव्हां पुनःस्थापना केली त्यावेळेस तयार केली गेली. चंद्रानें १०८० पासून ११०० इसवी पर्यंत राज्य केलें. अर्थात् ही परिगणित केलेलीं छत्तीस कुलें त्यावेळेस प्रत्यक्ष राज्य करीत असलीं पाहिजेत. ही मूळ बनलेली यादी आपल्यासमोर नाहीं. आणि टॉडनें ज्या दोन पुराण्या याद्या अधुऱ्या व बऱ्याच चुकीच्या दिल्या आहेत, त्या म्हणजे रासांतील यादी आणि कुमारपालचरित संस्कृत यादी ह्या होत. ( टॉडनें आणखी दोन याद्या ज्या दिल्या आहेत त्या अलीकडच्या आहेत. कारण त्यांत धडधडीत अलीकडचीं नांवें आहेत ). या दोन जुन्या याद्या आपण जुळवून पाहिल्या तर त्या एकाच मुळावरून नक्कल केलेल्या दिसतात. त्या कशा जुळतात किंवा न जुळतात तें आपण येथें पाहूं.

| रासांतील यादी. | कुमारपालचरित्रांतील यादी. |
|---|---|
| रवि | इक्ष्वाकु |
| शशि | सोम |
| यदु | यदु |
| ककुस्त्थ | + |
| परमार | परमार |
| सदावर | + |
| चव्हाण | चव्हाण |
| चालुक्य | चालुक्य |

| | |
|---|---|
| रासा | कुमारपालाच. |
| छिंदक | छिंदक |
| शिलार | शिलार |
| आभीर | + |
| दोयमत मक्कान | मक्कान |
| चापोत्कट | चापोत्कट |
| परिहार | परिहार |
| धान्यपालक | धान्यपालक |
| राज्यपालक | राज्यपालक |
| निकुंप | निकुंप |
| हूल | हूण |
| गुहिल, गुहिलपुत्र | गुहिल |

गौरीशंकर ओझा यानें या यादीवरील लिहिलेल्या टिप्पणींत आणखी आठ नऊ नांवें कुमारपालचरित्रांत असलेलीं पण टॉडनें गाळलेलीं दिलीं आहेत. त्यांपैकीं तीन आणखी जुळतात तीं अशीं—

| | |
|---|---|
| राठोड | राठ |
| कारट्टपाल | कारट्टपाल |
| अनिग | अनग |

दोन्ही यादींत पुष्कळ नांवें अशीं आहेत कीं, त्यांचा ठावठिकाण आपणांस लागत नाहीं, आणि टॉडलाहि लावतां आला नाहीं. शिवाय कित्येकांचा त्यानें जो ठिकाणा लावला आहे तो चुकीचा आहे. हल्लीं आपल्यास जो कोरीव लेखांचा पुरावा मिळाला आहे, तो त्यावेळीं उपलब्ध नसल्यानें चुकी होणें अपरिहार्य होतें. आपण ही रासांतील यादी हिंदुस्थानांतील ११०० इसवीच्या वेळच्या परिस्थितीशीं तंतोतंत कशी जुळते हें आपण पाहूं. भाग २ मध्यें नांवांचा जो अर्थ आम्हीं केला आहे तोच आम्ही येथें घेतों.

पहिलीं पांच नांवें ककुस्थ ( कच्छपघात ), परमार, सदावर (तोमर), चाहमान, छंदक ( चंदेल्ल ) म्हणजे प्रसिद्ध ग्वालेर, माळवा, दिल्ली, सांभर, बुंदेलखंड येथील राजघराणीं या भागांत वर्णिलेलीं आहेत तीं

होत. सहावे शिलार म्हणजे ठाण्याचे शिलाहार घराणें होय. सातवें अभीयर अथवा आभीर यांचें राज्य कोठें होतें हें टॉडनें सांगितलें नाहीं. चापोत्कट आणि परिहार म्हणजे अनहिलवाड आणि कनोज येथील नुकतींच मोडलेलीं राजघराणीं होत. पण त्यांचे लहान अवशेष प्रतिहारांच्या मंडावरप्रमाणें असलेच पाहिजेत. मेवाडचे गुहिलोत राजघराणें प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणें मांगरोळचें (काठियावाड) गुहिल राजघराणें त्यांच्या प्रकरणांत वर्णिलें आहे.यादवांच्या नांवाखालीं यादव, भाटी आणि काठेवाडचे जाडेजा व चूडासमा हे येतात. पण त्या वेळेस बियानाचे यादव आणि मथुरा अथवा महाबनचे यादव होते. जैसलमीरचे भाटी या यादींत सांगितले नाहींत. याचें कारण बहुधा असें दिसतें कीं, सलमीरची अद्याप स्थापना नव्हती. तें शहर ११५७ मध्यें स्थापिलें गेलें (गौरीशंकरचा टॉड पा. २२४). आणि काठेवाड आणि कच्छमध्यें अद्याप दुसरीं दोन कुळें आलीं नव्हतीं, ते प्रांत त्यावेळीं अनहिलवाडच्या चालुक्याखालीं होते. टाक यांचें राज्य यावेळीं यमुनेवरील काष्ठ येथें होतें असें टॉड म्हणतो. आमच्या मतें कित्येक समजतात त्याप्रमाणें ते तक्षकनागाचे वंशज नाहींत. चंबल नदीच्या पूर्व किनाऱ्यावर भैसरोडासमोर बडोली येथें हूणांचें राज्य होतें. येथील सुंदर कोरलेल्या दगडांचें मंदिर हूणविवाहमंडप म्हणून प्रसिद्ध आहे. गौड अथवा गौर यांचा बंगालच्या सेनाशीं कांहीं संबंध नाहीं. सेनांची सत्ता बंगाल्यांतच ११०० नंतर स्थापित झाली आणि यामुळें त्यांचें नांव यादींत नाहीं. हे गौड गुड म्हणजे ठाणेश्वराभोंवतालचा देश येथील राहणारे असून यांचें मोठें राज्य अजमेराभोंवतीं होतें. त्यांपासून अजमेर चौहाणांनीं घेतली अशी दंतकथा टॉडनें दिली आहे. (कित्येक ही दंतकथा खरी मानत नाहींत). बडगूजरहि यावेळीं एक समर्थ राजकुळ होतें. त्यांची सत्ता आंभेरभोंवतालच्या प्रदेशावर होती व राजपुर राजधानी होती. टॉडनें दुसरी दंतकथा अशी दिली आहे कीं, कछवाहानीं हा देश त्यांजपासून हिसकून घेतला. रासांतील यादींत त्यांचें नांव गरुअ असें दिलें आहे, हे गुर्जर शद्बांचें प्राकृत रूप आहे. शेवटीं निकुंपाचें एक राज्य त्यावेळीं खानदेशांत होतें. गौरीशंकरनें दाखविलेल्या ११५३ इसवीच्या एका

कोरीव लेखावरून ही गोष्ट सिद्ध होते. जयपूर इलाख्यांतहि यांचें छोटें राज्य होतें. यावरून निकुंप हे उत्तर व दक्षिण हिंदुस्थानचे क्षत्रिय दिसतात. तसे शिलाहार नाहींत. मराठ्यांत हल्लीं त्यांचें नांव निकम आहे.

ह्याशिवाय राठोड अथवा राठ आणि राज्यपाल यांचीं नांवें म्हणजे कनोज आणि मोंघीर येथील राजघराण्यांचीं नांवें आहेत. तसेंच चेदीचे कलचूरी हैहय रासांतील यादींत आहेत. बाकीच्या नांवाचीं राजघराणीं कोठें होतीं हें ठरविणें कठीण आहे; आणि टॉड, गौरीशंकर व मोहनलाल पांड्या यांनाहि ठरवितां आलें नाहीं. मात्र दाहिमा हे त्यावेळीं प्रसिद्ध होते, आणि दधिचिऋषीचे वंशज म्हणून कोरीवलेखांत वर्णिले आहेत. पण रासांतील यादींत यांचें नांव दधिपट् दिलें आहे. हा वंश १०४० इसवीच्या एका कोरीवलेखांत जोधपूर संस्थानांतील परबत्सर जिल्ह्यांतील कन्सेरू देवळांत वर्णिलेला आहे (ए. इ. १२ पा. ६१). सांभरच्या चाहमानांचे ते मांडलिक आहेत. गोदावरीवरील खालेनर येथून ते मारवाडांत गेले व तेथें परबतसर, जालोर व साचोर या प्रांतांत १३०० इसवीपर्यंत ते राज्य करीत होते. हा कोरीवलेख लिहिणारा "छच राजा प्रत्यक्ष राज्य करणारा होता आडा रजपूत नव्हता." असो, कारट्टपाल म्हणजे काठी नव्हे आणि काठियावाडांत ११०० इसवींत काठींचे कोठेंच राज्य नव्हतें. तसेंच जाट या यादींत येऊं शकत नाहींत आणि जाटांना क्षत्रिय मानलेलें नाहीं व त्याचें यावेळीं राज्यहि नव्हतें. येणेंप्रमाणें, ऐतिहासिक पुराव्याच्या अभावीं आम्हांस इतकेंच म्हणतां येतें कीं बाकीचीं राजघराणीं कोठें होतीं याचा अद्याप ठाव लागला नाहीं.

## कायस्थ.

कायस्थ आपल्यास वंशानें क्षत्रिय मानतात. या कालविभागांतील कोरीवलेखांत त्यांचें नांव वारंवार येतें. जरी स्मृतीप्रमाणें त्यांची जात दरम्यानी आहे तरी त्यांचा समावेश क्षत्रिय वर्णांत करितां येईल. कायस्थ धंद्यानें लेखक होते. अर्थात् कोरीवलेखांचे लेखक या नात्यानें त्यांचें नांव नेहमीं येतें. राहण्याच्या देशावरून यांचेहि या

कालविभागांत पोटविभाग पडलेले दिसतात. कारण एका लेखांत १००० इसवीच्या ( ए. इ. १२ पा. ६ ) एका गौडकायस्थाचें नांव आहे. येथें अन्वय हा शब्द योजिलेला नाहीं. जेथें त्याचा उपयोग केला जातो तेथें तो कुलाचा सूचक दिसतो. उदाहरणार्थ बिजोलिया लेखांतील नैगमान्वय ( बंगाल जे. आर. ए. एस. ५५ पा. ४० ) किंवा गौडान्वय शिवालिक स्तंभलेखांतील ( इं. ए. १९ पा. २१८ ). हें सांगितलें पाहिजे कीं दक्षिण हिंदुस्थानांतील कोरीवलेखांत कायस्थ लेखकांचीं नांवें कधीं कधीं येतात; जसें, कोंकणांतील अपराजिताच्या लेखांत आलीं आहेत. कोंकणांतील कायस्थ प्रभूंची अशी दंतकथा आहे कीं, ते उत्तर हिंदुस्थानांतून या कालाच्या नंतर येथें आले. ११०० इसवीमधील कायस्थाच्या उल्लेखाशीं या दंतकथेचा मेळ घालतां, असें म्हणतां येईल कीं, लेखांतील कायस्थांचे वंशज हल्लींचे दवणे-कायस्थ असावेत.*

## वैश्य.

या कालविभागांत ब्राह्मणांचे अनुकरणानें राहण्याच्या देशावरून वैश्यांचेहि अनेक पोटभाग पडले; परंतु या काळांतील लेखांत उत्तर हिंदुस्थानांतील वैश्यांचें चौऱ्याशीं विभागांचें कोठेंच नांव आलेलें नाहीं. कांहीं कुलनामें येतात. उदाहरणार्थ प्रागवाटान्वय किंवा बिजोलिया लेखांतील कारापकवंश, त्याचप्रमाणें पोरवाल आणि मोढ ( इं. ए. ११ पा. ७२ मोढान्वयप्रसूतमहाक्षपटलिक ) हीहि नांवें येतात. पण अन्वय शब्दावरून हीं पोटजातींचीं नांवें नसून कुलनामें दिसतात. हे वैश्य पुष्कळ ठिकाणीं जैन असावेत. यामुळें पोटजातींतच विवाह होण्याची मर्यादा नसावी. दक्षिणेंत आणि हिमालयांतील प्रदे-

---

* या कोरीवलेखांत प्रभु हा शब्द अमात्याच्या नांवांशीं जोडलेला आहे, कायस्थ लेखकाच्या नांवाशीं जोडलेला नाहीं.

शांत वैश्य शैवहि दिसतात. कांगडांतील वैजनाथ देवळांतील लेखांत तें देऊळ दोघा वैश्यबंधूंनीं बांधल्याचें वर्णन आहे. आणि दक्षिणेंतील वीरशैव म्हणजे लिंगायत वैश्य प्रसिद्धच आहेत.

## शूद्र.

शूद्रांचेंहि या कालविभागांत अनेक पोटविभाग राहण्याच्या देशावरूनच नव्हे तर आणखी त्यांच्या हजारों धंद्यावरून पडले हें सांगावयास नकोच. प्रत्येक धंदा व पेशा यांनीं आपापली एकेक पोटजात बनवून विवाह-संबंध आपल्याच पोटजातींत मर्यादित केले. यावेळेस अनुलोम विवाहाची चाल पुढें सांगितल्याप्रमाणें तर अगदींच बंद पडली; आणि प्रत्येक जात व पोटजात, ब्राह्मणापासून खालपर्यंत, विवाह आपल्यांतच करूं लागली. यामुळें, तसेंच जातिशुद्धतेच्या कल्पनामुळें आणि खाण्यापिण्याच्या व इतर व्यवहारांच्या फरकामुळें सर्व हिंदुसमाजभर पोटजाति उत्पन्न झाल्या. प्रत्येक वर्णांत म्हणजे मुख्य व उप जातींत हजारों पोटजाति हल्लीं हिंदुसमाजांत दिसत आहेत त्या आमच्या समजुतीनें या कालविभागांत ( १००० ते १२०० ) उत्पन्न झाल्या. पण यापूर्वींच्या कालविभागांत मुख्य व पोटजाति एकेएकच, भेद न पावलेली, सर्व हिंदुस्थानभर असे. तेव्हां अल्बेरूनीनें जरी शास्त्रास अनुसरून चारच वर्ण सांगितले आहेत, तरी त्या वर्णांत पोटजाति उत्पन्न होण्याचा कल त्याच्या वेळेस सुरू झाला असावा, आणि प्रत्यक्ष विभाग त्याच्या नंतर पडले असावेत.

## अस्पृश्यजाति

अत्यंत प्राचीन काळापासून बहिष्कृत म्हणजे अस्पृश्य ह्यांच्या पुष्कळ जाति असत व ते नेहमीं शहराच्या व गांवाच्या बाहेर रहात. कोरीवलेखांत वारंवार नांव मेद आणि चांडाळ यांचें येतें, म्हणजे

भंगी आणि गर्दन उडवणारा. हे सर्वांत नीच मानले जात. पण अल्बेरूनीनें आणखी नांवें दिलीं आहेत. अस्पृश्यांचें तो पुढील प्रमाणें वर्णन करितो. " शूद्रानंतर अत्यंज म्हटलेल्या जाति येतात. या निरनिराळ्या प्रकारचीं खालचीं कामें करितात आणि कोणत्याहि वर्णांत यांचा समावेश होत नाहीं. यांच्यांत आठ वर्ग आहेत. ते सर्रास आपसांत विवाह करितात. फक्त धोबी, चांभार आणि कोळी ह्यांत आपसांत विवाह होत नाहीं. हे आठवर्ग येणेंप्रमाणें:—धोबी, चांभार, गारुडी, टोपल्या व ढाली करणारे ( बुरूड ), कोळी, मासे-मारणारे, जंगली पशु व पक्ष्यांची शिकार करणारे आणि कोष्टी. हे आठ वर्ग गांवाच्या बाहेर पण जवळच राहतात.

दुसरे लोक हाडी, डोंब, चांडाळ आणि बधतो हे कोणत्याच जातींत किंवा वर्गांत नाहींत हे गांवांतील अत्यंत खराब, म्हणजे झाडण्याचें काम करितात. यांचा एकच वर्ग मानला जातो. किंबहुना हे शूद्र बाप आणि ब्राह्मणी आई यांची गैरकायदेशीर झालेली संततीप्रमाणें मानले जातात. यासाठींच ते बहिष्कृत आहेत " ( सजाऊ भा. १ प्र. १० )

हा वरील उतारा असें दाखवितो कीं, अल्बेरूनीच्याहि वेळीं ( १०३० इ. ) दोन वर्ग अस्पृश्यामध्यें असत; त्यांत दुसरा अधिक नीच मानला जाई. किंबहुना खुर्दादबानेंहि ( ९०० इसवी ) अस्पृश्यांत दोन वर्ग चांडाल आणि लहुड असे सांगितले आहेत. दुसरा म्हणजे लहुड दोऱ्यावर नाचणारा ( नट ) आहे असें त्यानें वर्णिलें आहे. तात्पर्य हा दुभेद फार जुना आहे, आणि लहुड जातीचे अल्बेरूनीनें सांगितलेले आठ वर्ग एका स्मृतिवचनांत दिलेले बरोबर मिळतात. यांत तिघांखेरीज आपसांत विवाह होत असत हें अल्बेरूनीचें वाक्य चमत्कारिक दिसतें आणि तें चूक असावें. निदान एकंदर हिंदु पोटजातींच्या रिवाजाप्रमाणें हल्लींच्या काळीं ते आप-

सांत विवाह करीत नाहींत. धोबी, कोष्टी आणि बुरूड यांस अस्पृश्य कां मानिलें गेलें याचें कारण मुळींच ध्यानांत येत नाहीं. त्यांस अगदीं अलीकडे पर्यंत अस्पृश्य मानीत हें मात्र खरें. यांचें काम मुळींच वाईट दिसत नाहीं आणि यांचा विवाह दुसऱ्याशीं होत नसे असें अल्बेरूनीनेंहि लिहिलें आहे. तेव्हां यांची अस्पृश्यता नांवाची असावी आणि हल्लीं ज्याअर्थीं ते स्पृश्य झाले आहेत, त्याअर्थीं त्यांच्या यादींतील बाकीचे वर्ग अस्पृश्य राहण्याचें कारण दिसत नाहीं. डोम आणि हाडी हा शब्द स्मृतींत सांपडत नाहीं, बधतौ शब्द तर अश्रुत आहे. या चार अस्पृश्य जाति घाणेरडें काम करितात आणि यामुळेंच त्यांस अधिक अस्पृश्य मानलें गेलें असावें.

आम्ही अन्यत्र दाखविल्याप्रमाणें जातींची संस्था वंश आणि धंदा या दोन्ही भेदावर बसविली आहे. पहिले तीन वर्ण वंशानें आर्य असून शूद्र वर्ण आणि अस्पृश्य द्रविडवंशी आहेत. धंद्यांचा विचार करितां ब्राह्मणांचा धंदा याजन आहे आणि क्षत्रियांचा युद्ध आहे. वैश्यांचा प्राचीनकाळीं धंदा कृषि होता; परंतु बौद्ध काळांत त्यांत कृमिहत्या घडत असल्यानें तो त्यांनीं सोडला ( भा. २ पा. १८२ पहा ). मध्ययुगीन काळांत कृषीचा धंदा शूद्रांकडे गेला आणि खुर्दा-दबानें ९०० इसवींत शूद्रांचें वर्णन शेती करणारे असेंच केलें आहे तें बरोबर आहे ( सदर पा. १७२ ). पण वैश्यांनीं शेती सोडल्या-नंतर मध्ययुगीन काळांत कित्येक ब्राह्मण व क्षत्रिय यांनीं शेतकी धरली आणि पराशरस्मृतीमध्यें एका विशिष्ट वचनानें तसें करणें मान्य केलें गेलें ( भा. २ पा. १८३ ). परंतु यामुळें त्यांचा दर्जा कमी होऊन शूद्रांप्रमाणें ते लेखले जाऊं लागले. अशी स्थिति हिमालयांत विशेषतः व दक्षिणेंत दिसते. कांगड्यांत आम्हांस असें सांगितलें गेलें कीं, नगरकोटिया ब्राह्मण तद्देशीय ब्राह्मणांशीं रोटीबेटी-व्यवहार करीत नाहींत. कारण ते शेती करतात किंबहुना मुजरीचें

काम करितात. हिमालय प्रदेशांतील शेती करणारे राठी हे तिसऱ्या दर्जाचे क्षत्रिय आहेत असें मानलें जातें. वरिष्ठ दर्जाच्या क्षत्रियांस मुली देण्याचा त्यास अधिकार आहे; पण त्यांच्या मुली घेण्याचा अधिकार नाहीं. ओरिसांत नवीन आलेल्या ब्राह्मणांनीं तद्देशी शेती करणारे ब्राह्मण शूद्र मानिले हें आपण पाहिलेंच आहे ( भा. २ ). दक्षिणेंतहि कांहीं शेती करणारे ब्राह्मण आहेत; त्यांस नीच मानलें जातें. आणि शेती करणारे क्षत्रिय, माळी आणि इतर, यांस शूद्र अयोग्यरीतीनें लेखिलें जातें.

ही गोष्ट सांगण्यासारखी आहे कीं, राजपुतांचा मुख्य धंदा युद्धाचा असला तरी या कालविभागांत राजपुतांनीं आपलें नांव शौर्यानेंच नव्हे तर विद्वत्तेनेंहि गाजविलें. किंबहुना कांहीं विद्वान् प्रसिद्ध राजे या कालांत असे झाले कीं, त्याचें नांव निरनिराळ्या विषयावरील त्यांच्या ग्रंथांनीं अजरामर झालें आहे. भोज, गोविंदचंद्र, बल्लाळ व लक्ष्मणसेन, अपरादित्य, सोमेश्वर चालुक्य, राजेंद्र चोल यांच्या कृति कालसमुद्रावर अद्याप तरंगत आहेत आणि वाचकांस आनंद व ज्ञान देत आहेत. गायन व नृत्य यांची कला या काळीं वृद्धिंगत झाली. अनेक राजांनीं आश्रय दिल्यानें काश्मीरचा हर्ष, माळव्याचा उदयादित्य व सर्वांत अधिक तंजावरचा राजराज यांनीं तीस चांगला आश्रय दिला. गायन व नृत्य यांबद्दल तंजावरची अद्याप ख्याति आहे. तात्पर्य क्षत्रिय ब्राह्मणांच्या बहुतेक बरोबर आहेत असें अल्बेरूनीनें केलेलें वर्णन सत्य आहे. ते शस्त्र व शास्त्र या दोन्ही विद्येंत प्रवीण असून आर्यवंशाचा विशेष गुण म्हणजे स्वातंत्र्याची चाड व ज्ञानाची प्रीति या बद्दलची त्यांची परंपरागत ख्याति त्यांनीं कायम ठेविली.

# प्रकरण दुसरें.

## विवाह वगैरे चालींत बदल.

या कालविभागांत हिंदूंच्या विवाहाच्या रीतींत अत्यंत महत्त्वाचा फरक पडला. पूर्व शतकांत ब्राह्मणक्षत्रियांस आपल्या खालच्या वर्णाच्या स्त्रिया करण्याचा अधिकार असून त्याप्रमाणें ते करीतहि असत. ९०० इसवी सुमारें लिहिणारा खुर्दादबा हा सुद्धां लिहितो कीं, ब्राह्मण कतरिया ( क्षत्रिय ) यांच्या मुली घेऊं शकतात पण ते त्यांस आपल्या मुली देत नाहींत; आणि ९०० इसवीच्याच सुमाराचे चव्हाण स्त्रीशीं लग्न केल्याचें राजशेखराचें प्रसिद्ध उदाहरण आपल्या समोर आहे. पण अल्बेरूनी लिहितो, "हिंदूला पूर्वी आपल्या खालच्या वर्णाच्या स्त्रिया करण्याचा अधिकार होता. पण आमच्या काळांत ब्राह्मणांत खालच्या जातीची स्त्री कधीं करीत नाहींत." साहजिकच सर्व जातींत व पोटजातींत जातीच्या बाहेर विवाह करणें बंद झालें. ही मर्यादा कां उत्पन्न झाली याचें कारण स्पष्ट दिसत नाहीं. बहुधा खालच्या जातींच्या स्त्रियांच्या संततीस जो कमी दर्जा नवीन स्मृतिवचनांनीं दिला गेला त्यापासून ही अडचण उत्पन्न झाली असावी. अल्बेरूनीनेंहि या कमी दर्जाचा उल्लेख "अशा खालच्या जातींच्या स्त्रियांची संतति आईच्या जातीची मानलीं जाते" या वाक्यांत सांगितला आहे. उदाहरणार्थ, एकाच घरांत ब्राह्मण बापाला ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य अशीं मुलें होऊं लागलीं. भाग २ यांत दाखविल्याप्रमाणें मनुस्मृतिनियमानें हीं सर्व मुलें ब्राह्मणच समजलीं जात होतीं. किंवा क्वचित् प्रसंगीं आईच्या जातीपेक्षां श्रेष्ठ पण मधल्या जातीची मानली जात. ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्या खानपानव्यवहारांत याचवेळीं भेद उत्पन्न झाला.

विशेषतः मध्यदेश व दक्षिण हिंदुस्थान यांतील ब्राह्मण–वैश्यांनीं मांसाहार सोडला. अर्थात् अशा मिश्र कुटुंबांत अडचण पडूं लागली असावी. त्याचा परिणाम साहजिकच असा झाला कीं विवाह त्याच जातींत किंबहुना जातींच्या पोटविभागांत मर्यादित झाला.

हिंदु समाजांत दुसरा महत्त्वाचा फेरबद्दल असा झाला कीं, बालविवाहाची चाल ज्यास्त रूढ झाली. बालविवाह प्रथम केव्हां होऊं लागले हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. अल्बेरूनीच्या काळीं बालविवाह सर्वत्र रूढ झाले होते हें निश्चित आहे. कारण तो म्हणतो ( सचाउ भा. २ प्रा. १९ पा. १५५) " हिंदूमध्यें लग्नें लहान वयांत होतात आणि यामुळें मुलांची लग्नें आईबाप ठरवितात. " हीच व्यवस्था हल्लींहि अमलांत आहे. हें अल्बेरूनीचें विधान प्रत्यक्ष निरीक्षणाचें आहे, स्मृत्यांवरून केलेलें नाहीं. पण पराशरस्मृतीचें वाक्य ' अष्टवर्षामुद्वहेत ', मुलीची वयोमर्यादा आठ वर्षें ठरविणारें, त्याच्या पूर्वींच उत्पन्न झालें असावें. पृथ्विराजाचें पहिलें लग्न बालविवाह होतें हें आपण पाहिलेंच आहे. कल्याणच्या विक्रमांक चालुक्याच्या मुलीचें लग्न गोव्याच्या कंदब युवराजाशीं झालें तेंहि बालविवाहच होतें. रजपुतांमधील अशा उदाहरणांवरून त्यावेळच्या सर्व हिंदूंत बालविवाह प्रचलित होता. बाणानें राज्यश्रीच्या विवाहाचें वर्णन इ. स. ६०० मध्यें केलें आहे, त्यांत राज्यश्री पूर्णवयांत आलेली असून विवाहसमारंभांत लग्नाच्या दिवशींच संभोग झाल्याचें वर्णन केलेलें आहे. तेव्हां ६०० पासून १००० इसवींपर्यंत बालविवाह रूढ झाले असें दिसतें. ते कां रूढ झाले याचें कारण सांगणें कठीण आहे. १०३० त बालविवाह पूर्ण रूढ होते, तेव्हां मुसलमानांच्या जुलमामुळें ते रूढ झाले असें जें कित्येक म्हणतात तें बरोबर नाहीं. आम्हीं अन्यत्र म्हटलें आहे त्याप्रमाणें स्त्रियांस बौद्धभिक्षुणी होऊं न देण्यासाठीं ही चाल लोकांत प्रचारांत आली असावी. बौद्धधर्मानें वयांत

आलेल्या अविवाहित स्त्रीस भिक्षुणी होण्याचा अधिकार असे. तेव्हां मुलीचें लहान वयांतच लग्न करण्यानें याचा प्रतिकार होत असल्या-मुळें असेच विवाह लोकांस आवडूं लागले. आठव्या व नवव्या शत-कांच्या अंती बौद्धधर्म नष्ट झाला तेव्हां बालविवाहाचा प्रचार लोकांत जास्तच रूढ झाला असावा. असो, कारण कांहींहि मानलें तरी या कालविभागाच्या आरंभीं बालविवाह रूढ झाले होते आणि या कालांत ते जास्तच प्रचारांत आले.

क्षत्रिय आणि वैश्य यांमध्यें शाखा आणि गोत्र या कालविभागांत नष्ट झाले, आणि त्यांच्या निरनिराळ्या पोटजातींनीं आपल्यांतील कुलें म्हणजे नुख नांवानीं परिगणित केले आणि कुलाच्या व नुखाच्या बाहेर पण पोटजातीच्या आंत विवाह करावा असा निबंध केला. हाच निमय हल्लीं अमलांत आहे. या नियमांचें अनुकरण शूद्रांच्या किंब-हुना अस्पृश्यांच्या सर्व पोटजातींनीं केलें. सारांश सर्व हिंदु समाजांत त्याच जातीस किंबहुना पोटजातीस किंबहुना पोटजातीच्या पोट-विभागास विवाह-संबंध मर्यादित झाले. अर्थात् हिंदु समाजांत एक-त्वाची सहानुभूति नष्ट झाली आणि हिंदु लोक यामुळें समाज या दृष्टीनें नेहमींच दुर्बल रहात आले आहेत. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें हिंदूंतील वर्णविभाग नष्ट करणें अशक्य आहे, कारण हा विभाग भिन्न मानव-वंश व भिन्न कर्म यांवर रचला आहे. परंतु पोटजातींची संख्या कमी करणें हें शक्य व जरूर आहे. निरनिराळे पोठविभाग रक्ताच्या शुद्धतेच्या चमत्कारिक कल्पना किंवा इतर वेडसर कारणें यानीं उत्पन्न झालेले एकत्रित होण्यास मुळींच हरकत नाहीं.

आर्यवर्णामध्यें हिंदुलोकांत प्राचीन काळापासून विधवा-विवाह-प्रतिषेध प्रचलित आहे. हा वैदिक सूत्रां इतका किंबहुना वैदिक संहितां इतका जुना असेल. अल्बेरूनी आपल्या काळाविषयीं लिहि-तांना "विधवांस पुनर्विवाह करितां येत नाहीं, त्या सती जातात किंवा

तपस्वीरीतीनें आयुष्य कंठितात" असें योग्य रीतीनें लिहितो. (सचाऊ भा. १ पा. १५५). तो आणखीं लिहितो कीं, "राजांच्या विधवा फार वृद्ध नसतील तर किंवा त्यांचे पुत्र जिवंत नसतील तर बहुधा सती जातात." बालविवाहाची नवी चाल व विधवा विवाह-निषेधाची जुनी चाल यांच्या एकीनें लौकरच वरिष्ठ वर्णांच्या हिंदूंत बालविधवारूपी अनुकंपनीय स्थितींतल्या स्त्रिया दिसूं लागल्या. आणि आश्चर्य हें कीं, संभोगापूर्वीं वैधव्य आल्यास त्या मुलीचा पुनर्विवाह करावा असा मनुस्मृतीचा नियम असून तोहि ह्यावेळीं बंद पाडला. या कलिवर्जाबद्दल आम्ही पुढें लिहिणार आहोंत, व तें या काल-विभागांत उत्पन्न झालें असें दाखविणार आहोंत. बालविधवांचा पुनर्विवाहहि कां बंद केला गेला हें कल्पनातीत आहे.

हिंदूंस चारपेक्षां जास्त बायका करितां येत नाहींत असें अल्-बेरूनी लिहितो तें चमत्कारिक आहे. बायकांच्या संख्येबद्दल धर्म-शास्त्रांत कोठें नियमन नाहीं व परंपरेंत व इतिहासांतहि दिसत नाहीं. विशेषतः राजे लोक वाटतील तितक्या बायका करीत आणि प्रत्यक्ष श्रीकृष्णाला १०८ राण्या होत्या. पृथ्विराजाला सुद्धां आठा-पेक्षां अधिक राण्या असल्याचें वर्णन रासांत आहे. हिंदूंत घटस्फो-टाची चाल नाहीं ही गोष्ट मात्र अल्बेरूनीनें लिहिली आहे. ही व्यवस्था हिंदूंतच दृष्टीस पडते आणि ती अद्यापहि तशी कायम आहे हें त्यांस निःसंशय भूषणावह आहे.

हिंदुलोकांत आप्तांशीं लग्न करीत नाहींत, बाहेरच्याशीं करितात असें अल्बेरूनीहि लिहितो (सचाऊ भाग २ पा. १५५). गो-त्राच्या बाहेर परंतु जातीच्या आंत विवाह करावा असा जो निर्बंध आहे त्याचा हा अनुवाद आहे. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें जातीच्या बाहेर विशेषतः खालच्या जातीशीं विवाह करणें यावेळीं निषिद्ध होतें. परंतु एकाच जातींत आचारावरून व रक्तशुद्धतेच्या कल्प-

नांनीं कित्येक विभाग पडले, त्यामुळें या कालविभागांत बंगाल्यांत कुलीन विवाहाची विलक्षण पद्धत उत्पन्न झाली. बल्लाळसेनानें पांच ब्राह्मण व पांच कायस्थ कुटुंबें बाहेरून आणलीं. तो हिंदुधर्मशास्त्रांत स्वतः प्रवीण असल्यानें त्यानें अशी आज्ञा केली कीं, स्थानिक जाति रक्तशुद्धतेंत व आचारांत हीन असल्यानें त्यांच्याशीं यानीं विवाह करूं नये. परंतु काळांतरानें हळूहळूं ह्याहि कुटुंबांतील मुली श्रेष्ठ मानलेल्या कुटुंबांत जाऊं लागल्या आणि हे कुलीन नवरे आंदणाच्या लालचीनें अनेक बायका करूं लागले. बंगाल जर्नल ३४ यांत एका लेखकानें असें लिहिलें आहे कीं ही परवानगी लक्ष्मणसेनाच्या वेळीं मिळाली. तो असेंहि म्हणतो कीं, हीं बाहेरचीं कुटुंबें आल्यापासून आतांपर्यंत २८ पिढया झाल्या आहेत.

विवाहासंबंधीं अल्बेरूनीचें सर्वांत चमत्कारिक विधान असें आहे कीं, हिंदुलोकांत रंडीबाजीची परवानगी आहे. भाग २ पा. १८५ वर खुर्दादबाचें असेंच विधान दिलेलें आहे. याचा अर्थ त्याच्या मतें असा दिसतो कीं हिंदुस्थानांत व्यभिचाराला शिक्षा नाहीं. सर्व देवळांत, विशेषतः शिवाच्या मंदिरांत, वेश्या पूजेच्या वेळीं नाचण्यासाठीं वाहिलेल्या वेश्या—असत हें खरें. आणि या मंदिरापासून राजे लोकांस पुष्कळ उत्पन्न असे. परंतु अल्बेरूनीची अशी समजूत दिसते कीं, देवळांत वेश्या असल्यानें ज्यास्त लोक दर्शनास येतात आणि देवळाचें उत्पन्न वाढतें. अल्बेरूनी चांगुलपणानें आणखी असें लिहितो कीं, "ब्राह्मण लोकांचें चालेल तर ते देवळांत एकाहि वेश्येस नाचूं देणार नाहींत. पण राजे लोक शिपायांस पगार देण्यासाठीं उत्पन्नाच्या लालचीनें परवानगी देतात" पण हें म्हणणें आमच्या मतें ब्राह्मणांसंबंधीं किंवा राजासंबंधीं खरें मानतां येत नाहीं.

हिंदुलोकांच्या या वेळच्या दुसऱ्या चालीरीति वर्णन करतांना प्रथम सतीच्या चालीचा उल्लेख केला पाहिजे. ही चाल यावेळीं

जिवंत व सर्वत्र प्रसृत होती. तसेंच वृद्धपणीं गंगेंत किंवा इतर पवित्र नदींत बुडून प्राण देण्याची चाल ह्यावेळीं होती. कल्याणचा सोमेश्वर या सारख्या कित्येक राजांनींहि ह्यारीतीनें प्राण दिल्याची उदाहरणें आहेत. प्रयाग येथील गंगायमुनासंगमावर असलेला वटवृक्ष अजून प्रसिद्ध होता व अल्बेरूनीनें त्याचा उल्लेख केला आहे. ' ब्राह्मणांस व क्षत्रियांस जळून मरणें हें एका विशेष वचनानें मना आहे म्हणून ते गंगेंत जलसमाधि घेतात" हें त्याचें आणखी विधान ( सचाऊ भा. २ प्र. ६५ पा. १५८ ) लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या विशेष वचनाचा या विषयावरील कलिवर्जवचनाकडे कटाक्ष दिसतो. ( भृग्वग्निपतनैश्चैव वृद्धादिमरणं तथा ). या वाक्याचा शब्दशः अर्थ लावला तर वृद्धलोक व इतर यांनीं अग्नींत किंवा कड्यावरून उडी टाकून मरूं नये असा होईल. अर्थात् नदींत बुडून मरण्याची परवानगी कायम राहिली. कांहींहि असो, अल्बेरूनीच्या या विधानांत कलिवर्जवचनाचा स्पष्ट उल्लेख आहे.

पोशाख व अलंकार या संबंधीं विशेष लिहिण्यासारखें नाहीं. कारण अल्बेरूनीच्या ग्रंथांत ह्या विषयावर विशिष्ट विधानें आम्हांस मिळालीं नाहींत. भाग २ यांत सांगितल्याप्रमाणें सिंध, पंजाब आणि जवळचे प्रदेश यांतील लोकांचा पोशाख मिश्र असावा, म्हणजे हिंदूंचा जुना पोशाख दोन धोतरें ह्याशिवाय कुडता व तुमान हीं ज्यास्ती असावीं. दागिने घालण्याचा सोस लोकांत पूर्वीसारखाच कायम होता. सासबाहु देवळांतील लेखांत ( इं. ए. १६ ) देवाच्या अलंकारांचें जें वर्णन आहे त्यावरून राजे लोकांत व श्रीमंतांत कोणते दागिने वापरीत याची कल्पना होईल. पण कनोजच्या स्त्रियांच्या पोशाखांचें मनोरंजक वर्णन राजशेखरानें काव्यमीमांसेंत पुढीलप्रमाणें केलें आहे. " कानांतले तांटक गालांवर नाचत असून गळ्यांतील लांब हार, नाभीपर्यंत असलेला, हलत आहे आणि उत्तरीय गुल्फा-

पासून कंबरेपर्यंतच्या सर्व भागाभोंवती गुंडाळलें आहे, अशा रीतीचा कनोजांतील स्त्रियांचा [illegible] नमस्कार करण्यासारखा* आहे. यावरून असें दिसतें कीं उत्तर हिंदुस्थानांतल्या स्त्रिया दोन वस्त्रें वापरीत. पैकीं उत्तरीय खांद्यावरून घेतलेलें असेंच, परंतु पायांपर्यंत खालचें शरीर सर्व त्यानें झाके. चेहरा मात्र उघडा रहात असावा, त्याशिवाय तांटक दिसणार नाहींत; आणि हार उत्तरीयावरून घालीत असावेत. दक्षिणच्या स्त्रियांना ( गुजराथेसुद्धां ) उत्तरीय हल्लीं असत नाहीं. पण त्यांचें एकच वस्त्र इतकें लांब असतें कीं उत्तरीयाचेंहि काम त्यानें होतें. उत्तरेस आणि गुजराथेंत तोंड झांकण्याची जी चाल आहे ती मुसलमानी काळांत मागाहून उत्पन्न झालेली दिसते.

शेंवटीं लोकांच्या अन्नाविषयीं आम्ही पूर्वीं विस्तारानें लिहिलेंच आहे. उत्तरेकडील ब्राह्मण कांहीं विशिष्ट प्राण्यांचेंच मांस खात, पण दारू निषिद्ध मानीत. दक्षिणेंत ब्राह्मण दोन्हीं निषिद्ध मानीत. किंबहुना जैन धर्म बराच प्रसृत असल्यानें व वैश्य बहुतेक जैन असल्यानें ब्राह्मणांनीं जैनांचें अनुकरण केलें व अहिंसा तत्त्वाचा पूर्ण आणि न्यायप्राप्त पुरस्कार केला असें म्हणतां येईल. या कालविभागांत अहिंसा तत्त्वाची लाट हिंदुस्थानावर परतलेली होती आणि जैनांशिवाय वैष्णव आणि लिंगायत हेहि पक्के शाकाहारी बनले. यामुळें रोटीव्यवहारहि जातींच्या जातींत मर्यादित झाला. पूर्वकाळीं ब्राह्मणांना क्षत्रिय, वैश्य किंबहुना कित्येक सच्छूद्र यांचें अन्न खाण्यास हरकत नव्हती तर ह्या कालांत ते आपल्याच जातींत किंवा पोटजातींत अन्नव्यवहार करूं लागले. तात्पर्य हिंदुसमाजाचे या कालविभागांत निरनिराळे पोटविभाग पडून त्यांत रोटी व बेटी हे व्यवहार बंद पडले.

---

* ताटंकवल्गनतरंगितगण्डलेखमानाभिलंम्बिदरदोलिततारहारम् ।
आश्रोणिगुल्फपरिमंडलितोत्तरीयं वेशं नमस्यत महोदयसुंदरीणाम् ॥

अहिंसेचा क्षत्रियांवराहि पगडा बसला आणि कांहींनीं ठराविक दिवशीं मांस वर्ज केलें. कांहीं थोडे वैष्णव क्षत्रियहि आहेत; ते मुळींच मांस खात नाहींत. दारू न पिण्याविषयीं त्यांचा पूर्वीचा लौकिक राहिला नाहीं असें दिसतें. (मागच्या कालविभागांतील अरब लेखकांनीं राज्य करणारे क्षत्रिय दारू पित नाहींत असें लिहिलें आहे). कारण अल्बेरूनी लिहितो, " कांहीहि खाण्याच्या पूर्वीं ते दारू पितात आणि मग जेवावयास बसतात. " ( सचाऊ व्हा १ पा. १८० ). हें विधान सर्व हिंदूंसंबंधीं केलेलें दिसतें, पण तें क्षत्रियांसच लागू केलें पाहिजे. याच्या पुढचें विधान " ते गोमांस खात नाहींत" हें सर्व हिंदूंना लागू आहे. हिंदूंनीं फार प्राचीन काळापासूनच गोमांस वर्ज केलें आहे व गोमांसभक्षण महापातक मानिलें आहे. गाईबैलांची हिंसाहि प्राचीन काळींच बंद झालेली आहे; आणि या काळीं अहिंसेची लाट परत फिरली असल्यानें गोहत्यानिषेध हें हिंदुधर्माचें एक महान् तत्त्वच बनलें. हल्लींप्रमाणेंच या नाजुक प्रश्नावर हिंदुमुसलमानांचें त्यावेळींहि वैर असावें.

हल्लीं प्रमाणेंच तेव्हांहि हिंदु प्रेतें जाळीत व सुतकें पाळीत. अल्बेरूनीनें जन्माचें सुतक सांगितलें आहे. ब्राह्मणाला आठ दिवस, क्षत्रियाला बारा, वैश्याला पंधरा व शूद्राला एक महिना; हें थोडें चमत्कारिक दिसतें. स्त्रियांच्या रजस्वला स्थितींतील चार विटाळाचे दिवस यांचाहि उल्लेख त्यानें केला आहे. 'गोदान म्हणजे केशकर्तन विधि तिसऱ्या वर्षीं होत असे आणि कर्णच्छेदन सातव्या किंवा आठव्या वर्षी.' ही दुसरी चाल हिंदुलोकांतच असून ती विशेषतः मुसलमानांहून त्यांचा भेद दाखविते. अल्बेरूनीनें गर्भाधान संस्काराचाहि उल्लेख केला आहे. बालविवाह प्रचारांत आल्यानें अर्थातच या संस्काराचें महत्त्व वाढलें असावें.

# प्रकरण तिसरें.

## धर्मैक्यनाश व धार्मिक द्वेष.

जर पूर्वीच्या कालविभागांत सिंधखेरीज सर्व हिंदुस्थानांत एकच धर्म म्हणजे हिंदुधर्म असल्याची सुखप्रद स्थिति होती, तर ह्या कालविभागांत पुनः हिंदुस्थान पूर्वीच्या तीन धर्म असल्याच्या दुःखद स्थितींत, आणि प्रत्येक धर्मांत विशेषतः हिंदुधर्मांत भिन्न भिन्न द्वेष करणारीं मतें असल्याच्या शोचनीय स्थितींत,जाऊन पडला. या कालविभागांत सिंधखेरीज गझनी, काबूल आणि पंजाब या प्रांतांत मुसलमानी धर्माची सत्ता चालू झाली, आणि गुजराथ आणि राजपुताना यांत जैनधर्माची सत्ता चालू झाली. ( दक्षिणेंत मात्र जैनधर्म मागें पडला) आणि हिंदुधर्माच्या अन्तर्गत निरनिराळीं तत्त्वज्ञानें आणि निरनिराळ्या देवांच्या उपासना यांत तंटे उपस्थित होऊन ते विकोपास गेले. अर्थातच मजबूत राष्ट्राचें जें एक मुख्य लक्षण धर्मैक्य तें नाश पावून हिंदुस्थान दुर्बल झालें. ह्या प्रकरणांत वायव्येकडे मुसलमानी धर्माचा प्रसार आणि पश्चिमेकडे जैनधर्माचा प्रसार आम्हास वर्णन करणें आहे, तसेंच हिंदुधर्माच्या अन्तर्गत उत्पन्न झालेल्या द्वेषयुक्त मतांचें वर्णन करावयाचें आहे.

### मुसलमानी धर्म

गझनी येथें मुसलमानी तुर्की राज्य स्थापन होऊन सबुक्तगीन आणि महमूद यानीं काबूल आणि पंजाब प्रांत जिंकले हें आम्ही पूर्वीच वर्णन केलें आहे. याचा परिणाम असा झाला कीं, " गौर-भारत " ( सिंधूच्या पश्चिमेकडील भाग काबूल व झाबूल ) हा तर मुसलमानी झालाच पण पंजाबचेंहि स्वातंत्र्य नष्ट होऊन तेथील

लोकांचा बराच मोठा भाग जबरदस्तीनें मुसलमान केला गेला. ही गोष्ट ह्या कालविभागाच्या प्रारंभीं ( ९७५ ते १०२५ इ. ) घडली. सबुकत्गीन आणि महंमद या दोघांनींहि जिंकलेल्या प्रांतांतील लोकांस जबरदस्तीनें मुसलमानी धर्मांत खेंचण्याची नीति, एक राजकीय सोय या दृष्टीनें आणि दुसरें धर्माच्या कडवेपणानें, चालविली. येथील लोकांनीं अशा जबरदस्तीच्या बाटाविण्यास केलेला विरोध दुर्बल होता, याचें कारण बहुधा येथील लोकांची हिंदुधर्म भावना-विशेषतः सिंधुनदाच्या पश्चिमेस-दुर्बल होती. हे पश्चिमेकडचे लोक हल्लीं इतके पूर्णपणें मुसलमान झाले आहेत कीं ९०० वर्षांपूर्वींच आम्ही हिंदु होतों-घोरच्या डोंगराळ प्रांतांतहि हिंदु होतों-ही गोष्ट ते अजिबात विसरले आहेत. अफगाण आणि पठाण हल्लीं असें मानतात कीं असीरिया व अरबस्थान येथून आलेल्या सेमेटिक लोकांचे आम्ही वंशज आहोंत.परंतु पंजाबच्या पश्चिम भागांतील लोक बहुतेक मुसलमान झाले असले तरी त्यानीं मात्र आपल्या राजपूत अगर जाट जातींची जुनीं नांवें कायम ठेविलीं आहेत, आणि आपले विवाह संबंध आपल्यासच मर्यादित ठेवले असून हिंदु काळांतील कांहीं विधि ते अद्याप पाळतात. सर्व पंजाब प्राधान्यानें मुसलमान या काळाच्या शेवटीं झाला ( १२०० इ. ); कारण शिहाबुद्दीन घोरीनेंहि बऱ्याच अंशीं पूर्वींचीच जबरदस्तीनें जितांस मुसलमान बनविण्याची नीति चालविली. पंजाबचा डोंगरी प्रदेश मात्र आणि काश्मीर हा स्वतंत्र असल्यानें हिंदु राहिला.

पंजाबच्या पूर्वभागांत जबरदस्तीनें बाटविण्याची नीति पश्चिमे इतक्या जोरानें चालविली गेली नाहीं हे आपण पाहिलेंच आहे. शिहाबुद्दिननेंहि तसेंच केलें. सरस्वती, यमुना आणि गंगा यांच्या प्रदेशांत ही नीति तर बहुतेक टाकून दिली गेली. यामुळें संयुक्त प्रांत मुख्यतः अद्याप हिंदु आहे. हा नीतींत बदल कशामुळें झाला

याचीं कारणें अशीं दिसतात कीं ( १ ) मुसलमानी धर्मवेडे जेते सुद्धां दुसऱ्यांस जबरदस्तीनें बाटाविण्याच्या कामांत थकून जातात. ( २ ) कदाचित् लोकांस, विशेषतः राजधानीपासून दूर असलेल्या प्रांतांतील लोकांस, धर्मांत दुभंगलेले ठेविल्यापासून राजनीतिदृष्ट्या फायदा आहे हें महमुदाच्या लक्षांत आलें असेल (३) कुतुबुद्दीन आणि अल्तमश हे धर्मवेडे मुसलमान नसून शहाणे राज्यकर्ते होते. त्यांस इंग्रज लोकांप्रमाणेंच लोकांच्या धर्मांत हात न घालणें न्यायाचें व शहाणपणाचें आहे हें समजलेलें दिसतें. (४) शेवटचें कारण हें कीं येथील लोकांची हिंदुधर्मभावना पंजाबांतील लोकांपेक्षां व त्याहून सिंदुनदीच्या पलीकडच्या लोकांपेक्षां जास्त जोरदार होती. हा प्रदेश ब्राह्मणी धर्माचे जन्मस्थान आहे. हिंदु तत्त्वज्ञानाच्या आचार्यांची ही उपदेशभूमि आहे. हिंदूनीं ईश्वराचे अवतार मानलेले राम व कृष्ण यांचें जन्म-कर्म-क्षेत्र हेंच आहे. या अनेक कारणांनीं आम्हांस असें वाटतें कीं, या प्रांतांतील लोकांच्या धर्मांत अडथळा आला नाहीं; आणि यामुळें ते अद्याप सर्व हिंदुस्थानच्या हिंदु लोकांमध्यें धर्मनिष्ठेंत बलवान् आहेत. या प्रांतांतील हल्लीचे मुसलमान लोक बाटलेल्या हिंदूचे वंशज नसून अफगाण किंवा मोंगल दिल्लीपतींच्या राज्याच्या काळांत अधिकारी नात्यानें आलेल्या मुसलमानांचे वंशज आहेत. अर्थात् हे त्या प्रांतांत अल्पसंख्याक आहेत आणि जो हिंदुस्थानचा राजकीय नकाशा या भागास आम्ही जोडला आहे त्यांत हा प्रांत हिंदु समजण्यास हरकत नाहीं. पूर्वेंकडे बंगाल्यांत जबरदस्तीनें बाटविण्याची पद्धत यापुढें खिलजी सुभेदारानीं व त्या पुढील राजांनीं चालविली आणि यामुळें कांहींसा बंगाल्यामध्यें मुसलमानी लोकांचा जमाव अधिक आहे. परंतु ही गोष्ट आमच्या कालविभागानंतर झाली, यामुळें वर सांगितलेल्या नकाशांत बंगाल प्रांत हिंदूच समजला पाहिजे. याप्रमाणें सतलजपासून ब्रह्मपुत्रापर्यंत आणि हिमा-

लयापासून विंध्यापर्यंत या कालविभागाच्या प्रारंभीं हा सर्व प्रदेश हिंदु होता तरी या कालविभागाचे शेवटीं धर्माचें ऐक्य या प्रदेशांतहि गुजराथ आणि राजपुताना या प्रांतांत जैन धर्माचा प्रसार आणि बंगाल्यांत वैष्णव धर्माचा प्रसार झाल्यानें नष्ट झालें. जैनधर्माचा एका प्रांतांत प्रसार व दुसऱ्या प्रांतांत संकोच कसा झाला याचा इतिहास मनोरंजक असून त्याचीं कारणें काय झाली हें आम्ही उपलब्ध ऐतिहासिक पुराव्यावरून येथें सांगण्याचा प्रयत्न करितों. हा इतिहास नीट समजण्यासाठीं जैनधर्माच्या उदयापासून या कालविभागापर्यंत त्याच्या प्रसाराचा इतिहास थोडक्यांत देणें अवश्य आहे.

## जैनधर्म.

जैनधर्म व बौद्धधर्म यांचा घोटाळा कित्येक पाश्चात्य विद्वान् व कित्येक पुराणांचे लेखक करतात. कारण दोघांचेंहि बलवान् तत्त्व अहिंसा आहे आणि बुद्ध ( बोध झालेला ) आणि जिन ( जिंकणारा ) हीं नांवें दोघानांहि लावलेली आढळतात ( उदाहरणार्थ बुद्धो जिनःपातु वः ). तसेंच महावीराच्या अनुयायांस जैन हें नांव मागून पडलें आहे, पूर्वीचें त्याचें नांव निग्रंथ होतें. शिवाय महावीर आणि गौतम हे समकालीन होते. तथापि यांत शंका नाहीं कीं, गौतम दोघांपैकीं अलीकडचा होय. वैदिक धर्माच्या विरुद्ध बंड करणारा शेवटचा तत्त्वज्ञानी बुद्ध होय आणि महावीर काल आणि विचार ह्या दोन्ही दृष्टीनें त्याच्या पूर्वीचा होय. वैदिक धर्माच्या कोणकोणत्या मुद्यांचा यांनीं निषेध केला हें आपण पाहूं. उपनिषदिक तत्त्ववेत्यांनीं विश्वाच्या अत्यंत श्रेष्ठ आध्यात्मिक प्रश्नांबद्दल विचार करून कांहीं सिद्धांत यापूर्वीच प्रतिपादन केले होते; तरी ते अद्याप वैदिक धर्माला चिकटून होते. या औपनिषदिक विचारासह वैदिक धर्मांत मान्य असलेले पुढील मुद्दे आहेत. ( १ ) वेद परमेश्वरानें

उच्चारलेले आहेत. (२) वेदांतील देव इंद्र, वरुण इत्यादि आणि उत्तर वैदिक कालांत शिव आणि विष्णु हे पूज्य आहेत. ( ३ ) या वैदिक देवतांची हिंसायुक्त वैदिक यज्ञांनीं पूजा करणें अत्यंत श्रेयस्कर आहे. ( ४ ) चातुर्वर्ण्यव्यवस्था ईश्वरनिर्मित असून यज्ञकर्म चालविणारे ब्राह्मण धर्मदृष्टया श्रेष्ठ आहेत. ( ५ ) आश्रम चार असून त्यापैकीं तिसरा तपाकरितां आहे आणि चौथा संन्यासानें मोक्ष मिळविण्यासाठीं आहे. हे दोन आश्रम ब्राह्मणांसच मोकळे आहेत असें ब्राह्मण यावेळीं म्हणूं लागले होते. ( ६ ) शरीरांत जीवात्मा असून तो परमेश्वराचा म्हणजे परमात्म्याचा अंश आहे. ( ७ ) कर्मांप्रमाणें आत्म्याचें अनेक योनींतून संसरण होतें.

उपनिषत् कालांतच तिसऱ्या मुद्याबद्दल तत्त्ववेत्ते असें सांगूं लागले होते कीं, हिंसायज्ञानें परम पुरुषार्थ साधत नाहीं आणि मोक्ष संन्यासानेंच साधेल. भगवद्गीतेमध्यें दोहोंना एकाच दर्जावर ठेवले आहे, म्हणजे पूर्वीच्या धर्मनिष्ठ लोकांचे यज्ञ व संन्यास, चातुर्वर्ण्य चातुराश्रम्य, तसेंच तपाचें आणि संन्यासाचें तत्त्वज्ञान, योग व सांख्य, या सर्वांसच भगवद्गीतेनें समान लेखिलें आहे. पण याशिवाय भगवद्भक्तीनें नवीन मत पतिपादिलें असून त्या मार्गानें, स्त्रिया आणि शूद्र, ज्यांस ब्राह्मण मोक्ष नाहीं असें ह्मणत, त्यांस सुद्धां मोक्षास जातां येतें असें प्रतिपादिलें आहे.

इ. स. पू. १००० पर्यंत भारतीय आर्यधर्माच्या प्रगतीचा इतिहास थोडक्यांत वरप्रमाणें आहे.जुने धर्माभिमानी लोक हे साती मुद्दे मानीत तर निरनिराळे तत्त्ववेत्ते कांहीं मान्य करून इतरांचा निषेध करीत. यानंतर अनेक प्रतिषेधक तत्त्वज्ञानी झाले, पण शेवटचे दोन महावीर आणि गौतम हे जास्त जोरदार असल्यानें त्यांनीं स्थापिलेले प्रतिषेधक धर्म अद्याप जिवंत आहेत. गौतम आणि महावीर या दोघांनीं

पहिल्या पांच तत्त्वांचा निषेध केला आणि सातवें तत्त्व म्हणजे कर्मसिद्धांत मान्य केला. पण महावीर तप आणि संन्यास हे दोन्ही आश्रम मान्य करितो आणि गौतम त्याच्याहि पुढें जाऊन तप खोटें मानतो आणि केवळ संन्यास मान्य करितो. अर्थात लोक त्याचें अधिक ऐकूं लागले. विशेषतः त्यानें सर्व लोकांस, आर्य व अनार्य, त्रैवार्णिक व शूद्र यांस, आपल्या संन्यास-संस्थेंत घेतलें आणि तप म्हणजे शरीरकष्ट यास बिलकुल फाटा दिला, यामुळें त्याच्या धर्माचा प्रसार जास्त झाला. त्याच्या मतें ईश्वरहि नाहीं व आत्माहि नाहीं. निदान या विषयीं विचार करूं नका असें आपल्या अनुयायास त्यानें सांगितलें. गृहस्थांनीं नीतीचें आचरण करावें व भिक्षूंनीं सर्व संसार–परित्याग करावा या गोष्टीवर त्यानें जास्त जोर दिला. महावीराचा निषेध गौतमाहून कमी होता असें म्हणतां येईल. कारण उपवासादि शरीरक्लेश त्यास मान्य होता आणि त्याचा संन्यास पूर्णपणाचा होता म्हणजे भिक्षूंनीं कपडा सुद्धां वापरूं नये असा त्याचा उपदेश असे. गृहस्थांच्या नीतिमत्तेवर त्याचाहि पूर्ण कटाक्ष होता. दोघांनाहि योग आणि सांख्य तत्त्वज्ञानें मान्य होतीं आणि वेद व ब्राह्मण दोन्ही अमान्य होते हें सांगावयास नको.

याप्रमाणें ब्राह्मणी धर्माचा शेवटचा व सर्वांत अधिक निषेध करणारा बौद्धधर्म असल्यानें तो सहजच जैन धर्मापेक्षां जास्त प्रसार पावला. शिवाय आम्हांस असें वाटतें कीं, बुद्धानें सामान्य लोकांस त्यांच्या भाषेंत उपदेश केला तर महावीरानें तसा केला नाहीं. त्यामुळें बौद्धधर्मशास्त्र पाली भाषेंत लौकर उत्पन्न झालें; ह्या उलट जैनधर्मशास्त्र दीर्घ काळपावेतों लिहिलें गेलें नाहीं. तसेच बौद्ध भिक्षूचा जीवनक्रम अगदीं सोपा होता. या उलट महावीरानें मुनींना नग्न राहून शरीर–शोषण करण्याचें व्रत सांगितल्यानें जैन तपस्या आचरण्यास कठीण होती. आणि शेवटची गोष्ट ही कीं, अशोक

आणि कनिष्क दोन बौद्ध धर्माचे अनुयायी सम्राट् यांच्यामुळें बौद्धधर्मास फारच जोर आला. या कारणांनीं हिंदुस्थानांत विशेषतः उत्तरेकडे पुष्कळ शतकें बौद्धधर्म बहुजनसमाजाचा धर्म राहिला; आणि जैनधर्म अल्पसंख्यांक होता. हूएनत्सांग याच्या तपशीलवार प्रवासवृत्तावरून हिंदुस्थानचा जो धार्मिक नकाशा आम्ही तयार करून पहिल्या भागास जोडला आहे, त्यावरून असें दिसेल कीं, हिंदुस्थानाच्या कित्येक भागांत म्हणजे कपिश, सिंध, मगध, माळवा वगैरेंत बौद्धधर्म सर्वव्यापी असून हिंदुस्थानच्या इतर भागांत हिंदुधर्माच्या बरोबरीनें तो प्रसृत होता. पण जैनधर्म कांहीं थोड्या भागांत आणि तोहि थोड्या लोकांत सातव्या शतकांत प्रसृत होता. बिहार, ओरिसा अथवा कलिंग, चोल आणि कर्नाटक यांतच तो दिसत होता. यापुढें कुमारिल आणि शंकर यांनीं जेव्हां बौद्धधर्मावर शेवटला हल्ला चढविला, त्यावेळेस जैनधर्म कमी महत्त्वाचा शत्रू असल्यानें त्याजवर विशेष हल्ला झाला नाहीं आणि यामुळें तो चालू राहिला. पण बौद्धधर्मावर निकराचा हल्ला होऊन त्याचा हिंदुस्थानांत बहुतेक उच्छेद झाला. तथापि ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, बुद्धिसामर्थ्यांत बौद्धधर्माहून जैनधर्म कधींच कमी नव्हता; आणि बादरायणाच्या ब्रह्मसूत्रांत जैनधर्माचें तत्त्वज्ञान महत्त्वाचें मानलें असून त्याचेंहि खंडन करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. किंबहुना आमचें मत असें आहे कीं, जैनधर्मी प्रारंभापासूनच वादाला जरूरी असलेल्या सर्व शास्त्रांत, विशेषतः न्याय आणि व्याकरण यांत, निष्णात असल्यानें त्यांच्याकडे लोकांचें लक्ष बरेंच वेधलें जाई. बुद्धिवान् ब्राह्मण ज्याप्रमाणें बौद्ध होत त्याप्रमाणें जैनांच्याहि धर्मांत वेळोवेळीं मनाची खात्री पटल्यानें व त्याचप्रमाणें मान मिळविण्यासाठीं जात आणि जैनांची विद्वत्ते बद्दलची ख्याति कायम ठेवीत असें दिसतें.

बौद्धधर्माप्रमाणें किंबहुना इतर प्रत्येक धर्माप्रमाणें जैनधर्मांत

लौकरच दोन शाखा झाल्या. दिगंबरांचा कटाक्ष मुनींच्या नग्नात्वावर असे तर श्वेतांबरांनीं मुनींना दोन पांढरीं वस्त्रें वापरण्याची परवानगी दिली. ज्या जैनांनीं दक्षिणेस जाऊन प्रथम धर्मोपदेश केला ते दिगंबर शाखेचे होते. दक्षिण हिंदुस्थानांत जे श्वेतांबर हल्लीं दिसतात, ते अलीकडच्या काळांत गुजराथ आणि राजपुताना येथून बहुतेक व्यापाराकरितां आलेले आहेत. पहिला जैन महान् उपदेशक दक्षिण देशांत आला त्याचें नांव भद्रबाहु आहे. हा एका दीर्घ दुष्काळांत उज्जनी सोडून पुष्कळ अनुयायांसह दक्षिणेंत आला आणि म्हैसूर इलाख्यांतील श्रवण बेळगोळ येथपर्यंत गेला. दुसरे जैन बिहारमधून कलिंग मार्गें पूर्व किनाऱ्यानें दक्षिणेंत गेले असले पाहिजेत. ह्याप्रमाणें जैनधर्म आंध्र, तामिळनाड आणि कर्नाटक या प्रांतांत प्रस्थापित झाला. ख्रिस्ती शकाच्या प्रारंभीच्या शतकांतच, तसेंच हुएनत्सांग याच्या काळांत व नंतर, जैनधर्माचा या प्रांतांत प्रसार होता; पण महाराष्ट्रांत नव्हता. जैनमुनी विद्वान् असल्यानें या देशांतील तिन्ही लोकभाषांचा त्यांनीं अभ्यास केला आणि तामिल, कानडी व तेलगू या भाषांत त्यानीं पहिले ग्रंथ लिहिले; आणि त्यामुळें या प्रांतांतील सामान्य जनांवर त्यांचा बराच पगडा बसला. अर्थातच या प्रांतांतील सामान्य लोकांतहि पूर्वीं जैन होते व हल्लीं आहेत. उत्तर हिंदुस्थानांतील अशिक्षित जनसमूहांत फारच थोडे जैन असतात, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

जैन पंडितांनीं लोकभाषेंतील आपल्या ग्रंथांत संस्कृत शब्दांचा मूळ अविकृत स्वरूपांत ( तत्सम ) उपयोग केला आणि यारीतीनें तामिल, कानडी आणि आंध्र वाङ्मयास फारच शोभा आणिली. बौद्धाप्रमाणें नरम उच्चार केलेल्या प्राकृत शब्दांचा त्यानीं उपयोग केला नाहीं. यामुळेंच त्यांच्या या देशी ग्रंथलेखांस गोडी आली आहे. त्यांनीं देशी भाषांचें संस्कृतांत व्याकरणहि लिहिलें. त्यांनीं

मुलांच्या शिक्षणाकरितां शाळाहि घातल्या असें दिसतें. कारण आंध्र, तामिल आणि कर्नाटक या प्रांतांत, किंबहुना महाराष्ट्रांत, मुलांस वर्णमाला शिकविण्याचा प्रारंभ करितांना पहिलें नमनाचें वाक्य ' ॐ नमः सिद्धम् ' असें जें शिकवितात तें जैन आहे हें आश्चर्य करण्यासारखें आहे. तेलगू लोक ' ॐ नमः शिवाय सिद्धं नमः ' असा मंत्र वापरतात ( आंध्रकर्नाट जैनिझम पा. ६४ दक्षिणेंतील जैनधर्माचा इतिहास; रामस्वामी ऐयंगार. एम्. ए. ). वरील मंत्रांतील दुसरा भाग बौद्ध आहे असें रामस्वामी म्हणतात. पण तो जैन आहे असें दिसतें. " पहिला भाग मागून शैवांनीं दक्षिणेंतील जैनांचा प्रभाव नष्ट करण्याकरितां जेव्हां शैवांनीं स्वतः मठ आणि पाठशाला म्हणजे प्राथमिक शिक्षणाच्या शाळा शहरांत व खेडेगांवांत स्थापिल्या तेव्हां जोडला. " " कलिंग म्हणजे ऊरिया देशांत हा मंत्र ' सिद्धिरस्तु ' एवढाच आहे. हा स्पष्टपणें जैन आहे. महाराष्ट्रांत ' ॐ नमः सिद्धम् ' ह्याला ' श्रीगणेशाय नमः ' असें अगोदर जोडतात. या जुन्या मंत्रावरून दक्षिण देशांतील मुलांस शिकविण्याच्या कामांत मोठा भाग प्राचीन काळीं जैन तपस्वी घेत असें दिसतें.

जैन लोक हिंदु राजांच्या दरबारांतहि मान्यता मिळविण्याचा अत्यंत प्रयत्न करीत. तामिल देशांत पांड्य आणि चोल राजांनीं जैन गुरूंस दानें दिलीं आहेत. पांड्यांचीं राजधानी मदुरा हिच्याजवळ,खिस्ती शकाच्या प्रारंभींच, मोठमोठालीं जैन देवळें व तपस्विगृहें बांधिलीं गेलीं. म्हैसूर प्रांतांतील गंगवाडींत गंगराजांनीं जैनांस विशेष आश्रय दिला आणि बहुधा ते स्वतःच जैन होते. स्यमंतभद्र नांवाचा एक दिगंबर महान् धर्मोपदेशक होता. श्रवण वेळगोळ येथील डोंगरांतील शिलालेख नं. ४४ यांत असें वर्णन आहे कीं, यानें पाटलीपुत्र, माळवा, सिंध व टक्क देश ( पंजाब ) येथें " ढोल

पिटला " ( प्रत्यक्ष आणि वादी लोकांस आव्हान केलें ); नंतर दक्षिणेंत कांचीस तो आला व तेथून कर्नाटकांत आला. याच्यामागून सिंहानंदी झाला. यानेंच गंगवाडीचें राज्य स्थापन केलें अशी समजूत आहे. स्यमंतभद्र हा 'आप्तमीमांसा' या महत्त्वाच्या जैनग्रंथाचा कर्ता आहे. या ग्रंथांत 'स्याद्वाद' सिद्धांताचें सर्वांत अधिक मान्य विवरण आहे. पूज्यपाद हा आणखी एक विद्वान जैन होता. 'जिनेन्द्र व्याकरण' नांवाच्या जैन संस्कृत व्याकरणाचा तो कर्ता आहे. "'कांची येथील 'हिमशीतल' राजाच्या दरबारांत अकलंकानें बौद्धांचा पराभव केला, आणि या पराभवानें बौद्धांची दक्षिण हिंदुस्थानांतून हकालपट्टी त्यानें साध्य केली." ( वरील अयंगारचा ग्रंथ पा. ३३ ). तात्पर्य दक्षिणेंतील निरनिराळ्या राज्यांतील दरबारांत जैनांनीं आपल्या विद्वत्तेनें आणि तपश्चर्येनें कृपा संपादिली; आणि पुष्कळ राजांनीं त्यांस गांवें इनाम दिलीं, तसेंच त्यांच्याकरितां मंदिरें बांधिलीं आणि जिनाच्या प्रचंड मूर्ति कोरल्या. हें येथें सांगण्यासारखें आहे कीं, जैनधर्म व बौद्धधर्म ह्या दोहोंत ईश्वर आणि मूर्तिपूजा यांचा निषेध आहे तरी शेवटीं बुद्ध आणि जिन यांचीच देवासारखी पूजा मान्य झाली, आणि मंदिरें बांधून त्यांत त्यांच्या मूर्ति ठेविल्या गेल्या. ( हें येथें कबूल केलें पाहिजे कीं, कांहीं जैन मतशाखा मूर्तीस मानीत नाहींत, किंवा कोणत्याहि रूपाची पूजा करीत नाहींत ). जैनांनीं तीर्थंकराच्या मूर्ति केल्या आणि त्या प्रचण्ड व भव्य मंदिरांतून पूजूं लागल्या. " ही ईश्वरभक्तीची पद्धति मनोवेधक असून फारच भव्य दिसते, आणि तिचेंच अनुकरण हिंदु लोकांनीं केलें." ( सदर पा. ७७ ). याचा परिणाम असा झाला कीं दक्षिणेंत निरनिराळ्या राजवंशाच्या कारकीर्दींत भा. १ व २ यांत पूर्वी सांगितल्याप्रमाणें प्रचंड हिंदु देवळें उत्पन्न झालीं; आमचेंहि मत असेंच आहे कीं, हिंदूंतील मूर्तिपूजा बौद्ध व जैन

यांच्या मूर्तिपूजेमुळें सुरू झाली नसली तरी तिच्या अनुकरणानें जास्त वाढली यांत संशय नाहीं.

याप्रमाणें दक्षिणेंत जैन धर्माच्या प्रसाराचा इतिहास थोडक्यांत दिल्यावर या भागांत वर्णिलेल्या कालविभागांत दक्षिणेंत जैनधर्माचा ऱ्हास किंबहुना त्याचा अंत कसा झाला याचें संक्षिप्त वर्णन मुख्यतः रामस्वामी अय्यंगार यांच्या उपरोक्त ग्रंथाच्या आधारानें आम्हीं करितों. जैनांस विरोध शैव मताच्या पुनरुज्जीवनानें व त्याच्या जोरदार प्रचारकांनीं केला. "सम्बन्दर ( एक शैव साधु ) यानें पांड्य राज्यांत जैनधर्माचा उच्छेद केला, तर अप्पर यानें पल्लव राज्यांतून जैनांस हांकलून दिलें." ( पा. ६६ ). ही गोष्ट आठव्या शतकाच्या प्रारंभीं झाली. पण दहाव्या शतकाच्या अंतीं सत्ता पावलेले चोल राजे शिवाचे कट्टे भक्त होते आणि त्यांनीं पूर्वींच्या राजांपेक्षां जैनांचा जास्त क्रूरतेनें छळ केला. आपण पूर्वी पाहिलेंच आहे कीं, छळ झालेल्या जैनांच्या शापामुळें एक चोल राजा मेला अशी दंतकथा आहे. तेव्हां चोलांनीं जैनधर्म नष्ट करण्याकरितां आपल्या राजसत्तेचा उपयोग केला याजबद्दल शंका नको. मदुरा येथें राजराज चोल यानें बांधलेल्या मोठ्या शिवदेवालयांत तामिळ देशांतील प्रसिद्ध ६३ 'नायनार' म्हणजे शैवसाधु यांच्या मूर्ति त्यानें पूजेसाठीं बसविल्या. पण ह्याहिपेक्षां "मदुरेच्या मिनाक्षीच्या मंदिरांतील 'गोल्डन लिली टँक' म्हणजे सुवर्ण पद्मसरोवरावरील मंडपाच्या भिंतीवर काढलेल्या वेलबुट्टींत जैनधर्म आणि हिंदुधर्म यांतील तीव्र झगड्यांत झालेल्या भयंकर प्राणहानीच्या प्रसंगाचीं जीं चित्रें आहेत,"त्यावरून जैन धर्माचा कसा उच्छेद झाला हें लक्षांत येतें ( पा. ७९ ).

तामील देशाकडून कर्नाटकाकडे म्हणजे दक्षिण मराठादेश व म्हैसूर यांकडे वळून पाहतां पहिल्यांत पूर्व चालुक्य हे जरी स्वतः कट्टे हिंदु होते तरी त्यांनीं जैनांस आश्रय देऊन जैन देवळें व साधु

यांस दानें दिलीं. यानंतर दुसऱ्या कालविभागांत (८०० ते १०००) राष्ट्रकूटांच्या सत्तेखालीं जैनधर्माचा उत्कर्षच राहिला. आणि भाग २ (पा. २०३) यांत सांगितल्याप्रमाणें कांहीं राष्ट्रकूट राजे जैन साधूंचे भक्तहि बनले आणि दक्षिण महाराष्ट्रदेशांतील शेतकरी प्रजेंतहि जैनधर्माचा प्रसार झाला. वैश्य तर इतर प्रांतांप्रमाणेंच अहिंसा धर्माचे चाहते असल्यानें बहुतेक जैन होतेच. म्हैसुरांतील गंग राजे स्वतः जैन होते. राष्ट्रकूट घराण्याचा अधिकारी इंद्र चौथा हा कृष्ण तिसरा याच्या पाश्चात्य गंगवंशी राणीपासून झालेला पुत्र असल्यानें धर्मशील जैन होता. जेव्हां पुढें उत्तर चालुक्यांनीं शेवटचा राष्ट्रकूट राजा कक्कल याचा उच्छेद केला तेव्हां इंद्र चौथा यानें राष्ट्रकूट सत्तेचें पुनःस्थापन करण्याचा प्रयत्न केला, पण तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां सल्लेखन विधीनें (हें एक जैन व्रत आहे) त्यानें कट्टया जैनांप्रमाणें आपला प्राण दिला (भा. २ पा. १५१). मालखेड येथें आम्ही गेलों होतों तेव्हां किल्ल्यांत एक्या जैन मठाचा अवशेष आम्हांस दिसला (भा. २ पा. ३५४), आणि गांवांतहि एक जैन बस्ती आहे. यावरून असें स्पष्ट होतें कीं, दहाव्या शतकाच्या शेवटीं दक्षिण महाराष्ट्रदेशांत जैन धर्माचा उत्कर्ष होता. पण पाश्चात्य उत्तर चालुक्य यांची सत्ता या कालविभागांत (१००० ते १२००) प्रस्थापित होऊन त्यांतील तैलप वगैरे राजे कट्टे शैव असून त्यांनीं जैनधर्माचा छळ केला. "या प्रांतांतील परंपरागत दन्तकथा मानल्यास बस्तींतील जैन मूर्ति व देवता फेंकून दिल्या जाऊन त्यांच्या ठिकाणीं पौराणिक देवतांच्या मूर्ति बसविल्या गेल्या." (वरील ग्रंथ पा. ११२). रामस्वामी उत्तर चालुक्यांची सत्ता थोडे दिवस राहिली असें चुकीनें म्हणतात. कलचूरींनीं त्यांची सत्ता ११२६ त नव्हे तर ११५९ त उलथली; आणि कलचूरींची सत्ताच उलट थोडे दिवस राहिली. तथापि कलचूरींचें बंड म्हणजे एक धार्मिक बंड बहुधा

असावें. कारण विज्जन कलचूरी हा जैन होता. पण विज्जन आणि कलचूरींची सत्ता शैवमताच्या परत फिरलेल्या लाटेपुढें लवकरच नष्ट झाली; आणि लिंगायत पंथाच्या रूपानें पुढें सांगितल्याप्रमाणें शैवमतास नवें स्वरूप प्राप्त झालें.

तुंगभद्रेपलीकडील मुख्य कर्नाटकांत गंगांचें राज्य दीर्घकाळ होतें. ते जैन साधूंचे अनुयायी होते. गंगांची सत्ता तंजावरच्या चोलांनीं इ. स. १००४ सुमारें उलथून पाडली; पण त्यांचीहि सत्ता गंगवाडींत होयसलांनीं नष्ट केली. होयसल प्रारंभीं जैनधर्माचे अनुयायी होते. पण प्रसिद्ध विष्णुवर्धन राजास रामानुजानें वैष्णवधर्म मान्य करण्यास लाविलें; तेव्हांपासून वैष्णव मत म्हैसूर इलाख्यांत मजबूत पायावर बसलें आहे. "यापमाणें म्हैसुरांत राजाश्रय सुटल्यानें, तामिल देशांत चोलांनीं छळ केल्यानें, आणि दक्षिण महाराष्ट्र देशांत लिंगायत पंथानें त्याची जागा पटकाविल्यानें, जैनधर्माचा दक्षिण हिंदुस्थानांत साहजिकच कायमचा ऱ्हास झाला. जरी बरीच मोठी संख्या या धर्माची अनुयायी अद्याप आहे तरी यापुढें लोकांत किंवा राजदरबारांत प्रिय असल्यानें मिळणारा राजकीय मोठेपणा जैन लोकांना यापुढें राहिला नाहीं."

जैनधर्माचा आंध्र देशांतहि कसा ऱ्हास झाला हें वर्णन करणें बाकी आहे. बिहार देशाहून परभारें दिगंबर जैन आंध्र देशांत खारवेल नांवाच्या राजाच्या वेळीं आले तेव्हांपासून आंध्रांत जैनधर्माची प्रतिष्ठापना झाली होती. वर सांगितलेल्या ग्रंथांस आंध्रासंबंधें जो एक लेख वी. शेषगिरिराव यांनीं जोडला आहे त्यावरून असें दिसतें कीं, स्थानिक परंपरा आणि कैफियती यांवरून आंध्रांतहि शैवमताचा जोर झाल्यानेंच जैनधर्माचा पाडाव झालेला सिद्ध होतो. पूसपाति आणि इतर आंध्रातील राजपूत वैदिक धर्माचे अभिमानी होते. प्राच्य चालुक्यांनीं पुढें शैव कवींना आश्रय दिला, त्यांपैकीं नन्नयानें

महाभारताचें तेलगूंत भाषांतर केलें. यामुळें शैवमताचा जोर अधिक होऊन त्यास आधार मिळाला. शैवमताच्या पुनर्जीवनाची ही लाट प्राच्य गंगांच्या वेळीं अधिकच जोरावली, कारण हे राजे प्रारंभीं शैव होते. वरंगळचे काकतीय हेहि शैवच होते, आणि त्यांनीं जैनांचा अधिकच छळ केला. शेवटची गोष्ट ही कीं, " वरंगळच्या गणपति देवासमोर तेलगू महाभारताचा कर्ता टिक्कण याशीं झालेल्या वादांत जैनांचा पराभव झाला, तेव्हां त्यानें जैनांस अगदींच चेपिलें; ही गोष्ट विशेष प्रसिद्ध असून मद्रास म्युझियममधील हस्तलिखित प्राच्यपुस्तकांच्या संग्रहांतील एका काव्यांत वर्णिलेली आहे. " (पा. २८ सदर ).

या कालविभागांत दक्षिण हिंदुस्थानांत झालेल्या जैनधर्माच्या पीछेहाटीचा व ऱ्हासाचा थोडक्यांत इतिहास वरीलप्रमाणें आहे. हा ऱ्हास मुख्यतः शिवभक्तीच्या लोकप्रियतेची जी लाट परतली तिच्या कारणानें झाला. शैव साधूंनीं अनेक चमत्कार केल्याच्या गोष्टी किंवा जैनवादींचा विजय किंवा दोघांची यौगिक सिद्धि यांचें वर्णन करण्याची आवश्यकता नाहीं. ( दोन्हीं धर्मांत योगमार्ग मान्य केलेला असून त्याची फारच प्रशंसा केलेली आहे ). याचप्रमाणें जैनांच्या छळाच्या गोष्टी किंवा असहिष्णु चोल राजांनीं हिंदुराजांची परंपरागत शांत व समतोल वृत्ति सोडून जैनांस सूळींहि दिलें या गोष्टी विस्तारानें सांगण्याची जरूरी नाहीं. तेव्हां जैनधर्म दक्षिणेंत मागें हटला तरी पश्चिमेकडे याच कालविभागांत कसा उत्कर्ष पावला याच्या वर्णनाकडे आतां आपण वळूं.

भाग २ मध्यें आम्ही सांगितलेंच आहे कीं या पूर्वीच्या कालविभागांत ( ८०० ते १००० ) गुजराथेंत व राजपुतान्यांत जैनधर्माचा वरचढपणा नव्हता. तेथें त्याचा उत्कर्ष याच कालविभागांत झाला असें आम्ही मानितों. या कालविभागांत शैव राजपूत राजांचे

अमदानींत त्यांचा आयुधांचा गर्व व प्राण घेण्याचा धंदा चालू असतांहि हा अहिंसा-प्रधानधर्म तेथें प्रसृत झाला याचें आश्चर्य वाटतें. सर्व राजपूत राज्यांत, सांबर व मेवाड, माळवा व गुजराथ यांत, या काळांत सर्व राजे शिवभक्त, दक्षिण हिंदुस्थानांतील क्षत्रिय राजाप्रमाणेंच कट्टे शिवभक्त, असूनहि जैन धर्माचा प्रसार झाला. बौद्ध किंवा जैन अहिंसेविषयींचा आदर यावेळीं देशभर पुनः वाढला होता हें खरें. किंबहुना उपनिषदांच्या वेळेपासून हा अहिंसेचा आदर हिंदु लोकांत पुनः पुनः परतलेला दिसतो; आणि वैदिक प्राणिहिंसा-युक्त यज्ञांची मान्यता त्यांनीं पुन. पुनः सोडलेली दिसते. यावेळीं मूळचा हिंदुधर्म अथवा वैदिक आर्य धर्म यांचें पुनरुज्जीवन, कुमारिल व शंकर यांच्या काळीं झालेलें शांत झालें होतें; आणि बौद्ध अहिंसा मतांची लाट सर्व देशभर परतली होती हें खरें. पण या लाटेनें दक्षिणेंत जैन धर्मास मदत केली नाहीं. (याची कारणें आम्ही पुढें सांगू). याउलट गुजराथ, माळवा आणि राजपुताना यांत जैनधर्म जास्त लोकप्रिय होण्यास तिनें मदत केली. या चमत्काराचें कारण, म्हणजे हिंदुस्थानच्या पश्चिम भागांत जैनधर्माच्या प्रगतीचें कारण, वैयतिक सामर्थ्य झालें. व्यक्तीच्या सामर्थ्याचे मोठे बलवान् परिणाम होतात असें आम्ही मानतों. या कालविभागांत जैन मताचा उत्कर्ष पश्चिमेकडे जैन महापंडित हेमचंद्र याच्या वजनामुळेंच झाला असें आमचें मत आहे.

या महान जैन उपदेशकाचें चरित्र कुमारिल किंवा शंकर यांच्या चरित्राप्रमाणें अंधुक नाहीं. कारण गुजराथचे दोन मोठे राजे जयसिंह सिद्धराज आणि कुमारपाल यांच्या राज्याशीं त्याचा निकट संबंध आहे. आम्हांला एकदां असें वाटलें होतें कीं, हा दक्षिणचा जैन असावा निदान त्यास दक्षिणेकडून स्फूर्ति मिळाली असावी; परंतु तसें दिसत नाहीं, किंबहुना दक्षिणचे जैन उपदेशक दिगंबर होते.

( दिगंबर लोक संन्यासाचें तत्त्व त्याच्या सर्व न्याययुक्त परिणामासह पाळतात हें कबूल केलें पाहिजे ). गुजराथ आणि राजपुतान्याचे जैन हे बहुतेक श्वेतांबर होते व आहेत. ते आपल्या मुनींना दोन शुभ्र वस्त्रें वापरण्याची परवानगी देतात. शिष्य आणि गुरु या दोन्ही परिस्थितींत हेमचंद्र श्वेतांबर होता. गुजराथेंतील एका वैश्य कुलांत त्याचा जन्म झाला. त्याच्या आईनें त्याच्या लहानपणींच आपल्या जैनगुरूस त्यास अर्पण केलें. गुरूच्या लक्षांत त्याची अत्यंत बुद्धिमत्ता व त्याचें भावी महत्त्व आलें होतें. हेमचंद्र शेवटीं आचार्य झाला आणि अनहिलवाड येथील एका जैनमठाचा मुख्य होऊन तेथें आला. त्याचा जन्म १०८४ इसवींत मानतात, आणि मृत्यु ११६८ इ. म्हणजे वयाच्या ८४ वर्षी मानतात. यानें तीन मोठे ग्रंथ लिहून आपली कीर्ति अजरामर केली. एक संस्कृत व प्राकृत भाषांचें व्याकरण; दुसरा द्व्याश्रयकाव्य ( यांत गुजराथच्या चालुक्यांचा इतिहास दिलेला असून त्यांतच आपल्या व्याकरणांच्या नियमांची उदाहरणें एकामागून एक दिलीं आहेत ); आणि तिसरा देशी नाममाला अथवा देशी शद्बांचा कोश. असें म्हणतात कीं एका हिंदु पंडितानें ' तूं हिंदूंचेंच व्याकरण उपयोग करितोस ' असा टोमणा हेमचंद्रास मारला, तेव्हां त्यानें स्वतः संस्कृत व प्राकृत भाषांचें स्वतंत्र संपूर्ण व्याकरण लिहिलें. हें व्याकरण हत्तीच्या गंडस्थळावर ठेऊन हत्तीवर हेमचंद्रास बसवून मोठ्या समारंभानें राजवाड्यांत नेऊन खजिन्यांत ठेविलें गेलें. तें जयसिंहसिद्धराजास अर्पण केलें असून त्याचें नांव सिद्धहेम यासाठींच ठेविलें आहे. हेमचंद्र हिंदुस्थानांत पुष्कळ फिरला होता असें दिसत नाहीं. पण त्याचें वजन कुमारपालावर इतकें बसलें कीं, त्यानें कुमारपालापासून जैनांकरितां अनेक सवलती संपादन केल्या. विशेषतः जैनांस पवित्र असलेल्या दिवशीं प्राणिहिंसा बंद असावी

असा हक्क त्यानें मिळविला.* गुजराथेंत जैनधर्माचें जें वर्चस्व आहे निदान त्या देशांत अहिंसा तत्त्वाला जो अत्यंत मान मिळतो तो हेमचंद्राच्या वेळेपासून आहे.

चौहाणांच्या मुलुखांत, किंबहुना सतलज नदीपर्यंत, जैनधर्माचा याच काळांत प्रसार झाला. तो इतका कीं, मारवाडांतील बहुतेक सर्व वैश्यांनीं जैनधर्माचा स्वीकार केला. हे मारवाडचे व्यापारी हिंदुस्थानच्या दूरदूर भागांत व्यापाराकरितां जातात व तेथें आपला जैनधर्म नेतात. माळवा आणि मेवाडमध्येंहि मागूनचे राजे जरी स्वतः कट्टे शैव होते, तरी ते जैनधर्मास अनुकूल असून या काळीं जैनधर्माचा प्रसार होण्यास कारण झाले. या इतिहासांतील निर-निराळ्या प्रकरणांत जैनधर्मास अनुकूल असणाऱ्या राजांचीं उदा-हरणें आलींच आहेत; त्यांचा येथें पुनः निर्देश करण्याची आव-श्यकता नाहीं.

## नवें वैष्णव मत.

उत्तर हिंदुस्थानच्या बाकीच्या प्रदेशांत जैनधर्म राजांस किंवा लोकांस विशेष प्रिय झाल्याचें दिसत नाहीं. (सर्व देशभर अनेक वैश्य मात्र जैन असल्याचें दिसतें). गाहडवालांच्या किंवा पालांच्या अथवा सेनांच्या अमदानींत जैनधर्म विशेष प्रिय झाल्याचें दिसत नाहीं. उत्तरहिंदुस्थानच्या मध्यभागांत किंवा पूर्वभागांत याप्रमाणें जैनधर्माचा उत्कर्ष झाला नाहीं तरी अहिंसा वृत्तीचें पुनरुज्जीवन तेथें पश्चिमेपेक्षां या कालविभागांत कमी होतें असें नाहीं. आपण पाहिलेंच आहे कीं, मगधामध्यें बौद्धधर्मास नवीन आचार्यांनीं जास्त जोर आणला; आणि कित्येक विद्वान् बौद्ध तिबेटमध्यें नेहमींप्रमाणें

*वृद्धपणीं कुमारपालास हेमचंद्रानें जैन केलें अशी गुजराथेंत समजूत आहे; पण ती चालुक्यांच्या प्रकरणांत सांगितलेल्या कारणांसठीं खरी नाहीं.

उपदेश करण्यासाठीं गेले, आणि त्यांनीं तिबेटांत या शांततेच्या धर्माची सुधारणा केली. पण अहिंसासिद्धांताचा जास्त पुनरुज्जीवनाचा जोर नव्या वैष्णवमताच्या उत्पत्तींत दिसतो. हें नवें वैष्णवमत या काळीं बंगाल्यांत जैन किंवा बौद्ध धर्मा इतकेंच अहिंसातत्त्वाभिमानी होतें. किंबहुना नवें वैष्णवमत श्रीकृष्णाच्या भक्तीस जोडलेलें जैनमतच होय असें, ज्याप्रमाणें ख्रिस्ती मत म्हणजे ज्यू लोकांच्या मताला जोडलेलें बौद्धमतच म्हणतां येतें त्याप्रमाणें म्हणतां येतें. हिंदुस्थानांत यावेळीं मगधाशिवाय इतरत्र बौद्धधर्म उच्छिन्न झाला होता. बुद्धाचें रूपांतर होऊन तो विष्णूचा एक अवतार मानला गेला होता, आणि सामान्यपणें बौद्ध वैष्णव झाले होते. साहजिकच या लोकांत अहिंसातत्त्व परतलेल्या लाटेच्या जोरानें वाहूं लागलें आणि नव्या वैष्णवमतानें पूर्वींपेक्षांहि जोरानें अहिंसेचा पुरस्कार केला. बुद्धाच्या जन्माच्या पूर्वीं फार प्राचीनकाळीं भगवद्गीतीनें अहिंसेचा उपदेश केला हें खरें; परंतु भगवद्गीतेची आहिंसा वैदिक धर्मांतील प्राणिहत्यायुक्त यज्ञाशीं विरोधी नाहीं हें महाभारतावरून सिद्ध होतें. वैदिक हिंसा ही हिंसा नाहीं असा महाभारताचा सिद्धांत आहे. पण ईश्वराच्या आराधनेकरितां प्राणिहत्या करणें हें केव्हांहि अमान्य ठरणार, आणि यामुळें वैदिक धर्माचा हा एक भाग ज्यू धर्मांतल्या प्रमाणेंच दुर्बळ होता. आणि या मुद्यावर जैन आणि बौद्ध हल्ला करीत व त्यांच्या उपदेशकांचा हिंदु म्हणजे वैदिक प्रतिवाद्यांवर विजय होत असे. नवीन वैष्णव मतांत अहिंसा सिद्धांत पूर्वींपेक्षां जास्त निश्चयानें प्रतिपादिला असल्यानें जैनांचें त्याविरुद्ध चालेना; आणि यारीतीनें हा धर्म सामान्य लोकांस अधिक प्रिय झाला. कारण त्यांत त्यांच्या प्राचीन विष्णुदेवतेची भक्ति असून शिवाय प्राणिहिंसायुक्त वैदिक यज्ञ बंद केले गेले. या नवीन वैष्णव धर्मांत हिंसायुक्त यज्ञ बंद केले गेले इतकेंच नव्हे तर मांसाहारापासून

निवृत्तीचें तत्त्व जैनाप्रमाणेंच अंगिकारिलें गेलें. यामुळे यावेळीं सिंधु-नदीपासून ब्रह्मपुत्रापर्यंत या नवीन वैष्णव मताचा प्रसार झाला आणि वैष्णवांनीं प्राणिहिंसा आणि मांसाहार टाकून दिला. हल्लींहि पंजबांत वैष्णव अन्न म्हणजे मांसरहित अन्न असा शब्दव्यवहार होतो.

हे नवीन वैष्णवमत दक्षिणेकडून आलें किंवा वैष्णव भागवत पुराणाच्या उपदेशामुळें उत्पन्न झालें असें दिसत नाहीं. शंकराचार्यांच्या उपदेशानें तें उत्पन्न झालें असेंहि नाहीं, कारण शंकराचार्य वैदिक विधींचें पक्के मानणारे होते. उत्तर हिंदुस्थानांत हें मत कशानेंहि पसरलें असो, तें भागवत पुराणामुळें नाहीं हें निश्चित आहे. कारण भागवताचा काळ आम्ही अन्यत्र दाखविल्याप्रमाणें इ. स. १० व्या शतकापूर्वी मानतां येत नाहीं. आणि काश्मीरच्या इतिहासांत राजा अवंतिवर्मन् ( ८५५ ते ८८४ ) हा नवीन तऱ्हेचा पक्का वैष्णव होता. त्यानें पूर्वीच्या मेघवाहनाच्या काळाप्रमाळेंच काश्मीर राज्यांत प्राणिहिंसा बिलकुल बंद केली (भा.१ पा. २२१). याप्रमाणें ९व्या शतकांतच बौद्ध अहिंसा–प्रीति परतलेली दिसते आणि अवंतिवर्मन् यानें तो स्वतः कट्टा वैष्णव असल्यानें आपली राजकीय शक्ति अहिंसातत्त्व अमलांत आणण्यास उपयोगांत आणली. सम्राट् प्रतिहार भोज हाहि परम वैष्णव होता ( भा. २ पा.१७४). आणि त्याचा नातूहि वैष्णव होता. परंतु हे राजे अवंतिवर्मन्च्या तऱ्हेचे म्हणजे मांसाहारनिवृत्त आणि प्राणिहिंसा बंद करणारे होते कीं नाहीं हें सांगतां येत नाहीं. गाहडवाल राजे लक्ष्मी अथवा श्री इचे उपासक दिसतात. कारण त्यांच्या कोरीव लेखांत प्रारंभीं तिचें व दामोदराचें नमन आहे. ते तत्त्वतःस्मार्त होते. ते माहेश्वर असल्याचें वर्णन कोरीव लेखांत असले तरी भूमिदानाच्या वेळीं त्यांनीं वासुदेवाचेंहि पूजन केल्याचें वर्णन आहे. मगधांत तर बौद्ध राजे होते आणि ते अहिंसातत्त्वाचे कट्टे आधारस्तंभ होते. येथेंहि एका राणीनें सबंध

महाभारत ऐकल्याचें आपण पाहतों. पूर्व बंगाल्यांत सेन राजे प्रारंभीं शिवोपासक होते, पण त्यांच्यांतील सर्वांत प्रसिद्ध राजा लक्ष्मणसेन हा परम वैष्णव होता, आणि तो अहिंसा तत्त्वाला पक्का आधार देणारा होता असें मानलें पाहिजे. तो स्वतः मांसानिवृत्त असलाच पाहिजे. तरी पण आपल्या राज्यांत त्यानें प्राणिहिंसा बंद केल्याचा पुरावा आपल्याजवळ नाहीं. याचें वैष्णवमत ओरिसांतील जगन्नाथाहून आलेलें दिसतें. ओरिसांत वैष्णवमत यावेळीं प्रबल होतें. (याची कारणें पुढें देऊं ). याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत पश्चिमेकडे जैन धर्म व पूर्वेकडे आणि उत्तरेकडे वैष्णवधर्म याकाळीं त्यांतील प्रमुख तत्त्व अहिंसामत यासह प्रबल झाला होता.

परंतु हें नवीन वैष्णममत आणि जैनधर्म यांचें अहिंसेबद्दल याप्रमाणें ऐक्य असलें तरी तपस्ये संबंधानें त्यांच्यामध्यें फारच विरोध होता. तपस्येच्या बाबतींतही हिंदु समाजाचें मत पुनः पुनः बदललेलें आहे. शरीराचें शोषण करावें किंवा पोषण करावें या तत्वा संबंधें पुनः पुनः लोक मतांत बदल झालेला आहे. श्रीकृष्णाच्या चरित्रावरून प्रत्यक्ष असा उपदेश निघतो कीं, जगतांतील सुखें उपभोगावीं हा खरा सिद्धांत आहे. तथापि श्रीकृष्णाच्या उपदेशांत दोन्ही मार्गांमधील मध्याबिंदूचा मार्ग श्रेष्ठ आहे असें सांगितलेलें दिसतें. परंतु कृष्णभक्तीचा कल यापुढें उपभोगाकडे ( एपिक्यूरियन तत्त्वज्ञानाकडे ) वळला; आणि बंगाल व मध्यदेश यांत यावेळीं लोकांत हें मत प्रिय झालें. तेव्हां जैनधर्माप्रमाणेंच वैष्णवमतानें अहिंसेचा पुरस्कार केला तरी जैनधर्माविरुद्ध त्यानें उपभोगाचा पुरस्कार केला. लंबक जसा एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे वळला म्हणजे तिकडे शेवटास जातो, या रीतीनें या नव्या वैष्णवमताचें चैनबाजींत पर्यवसान झालें. राधाभक्तीचा पंथ अद्याप उत्पन्न झाला नव्हता असें दिसतें कारण भागवतांत राधा सांगितलेली नाहीं. पण कृष्ण–गोपींच्या

लीला हा यावेळच्या वैष्णवमताचा अग्रेसर सिद्धांत दिसतो. वैष्णव-मताचें नवीन पुराण भागवत, यांतहि या लीला अनुकरणीय नाहींत असें स्पष्ट सांगितलें आहे. कारण परीक्षितानें महतांचें हें अनीतीचें कृत्य सामान्य जनांनीं अनुसरावें कीं काय? असा प्रश्न केला असतां शुक भागवतांत असें उत्तर देत नाहीं कीं या लीला म्हणजे, जीवात्म्याची परमात्म्याविषयीं लालसा दाखविणाऱ्या कल्पित गोष्टी आहेत.या उलट स्पष्ट असें उत्तर तो देतो कीं महतांचीं कृत्यें नव्हेत, तर महतांचे उपदेश अनुसरणीय आहेत. अर्थात् भागवताचें असें स्पष्ट मत दिसतें कीं, हें कृष्णाचें वर्तन ऐतिहासिक आहे पण तें अनुकरणीय नाहीं. तथापि कृष्णाच्या या कामलीलांविषयीं लोकांच्या कायम असलेल्या विश्वासांतून राधापंथ निघणें अपरिहार्य होतें. कारण कोणीतरी एक कृष्णाची मुख्य प्रिय स्त्री मानल्यावांचून लोकांचें समाधान होत नाहीं. आणि लक्ष्मणसेनाच्या दरबारांतील कवि जयदेव याच्या गीतगोविंदांत फारच मोहक रीतीनें कृष्ण आणि राधा यांच्या अनुचित कामलीलांचें वर्णन या काळांत उत्पन्न झालें.

राधापंथाचा यापुढें परिपोष होऊन राधा पुढें प्रत्यक्ष कृष्णाची बायको ठरली. पण हें स्थित्यंतर १२०० इसवीनंतर झालें असल्यानें आपल्यास त्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. लक्ष्मणसेनाच्या वेळीं हा राधापंथ नुकताच उदयाला येत होता, आणि ओरिसा-मधून जें वैष्णवमत त्याच्यावेळीं बंगाल्यांत आलें त्यांत राधेस जागा नव्हती. तथापि त्यांतहि शृंगारोत्तेजक पुष्कळ गोष्टी होत्या हें नाकारतां येणार नाहीं. पूर्वीं म्हटल्याप्रमाणें हिंदुसमाज यावेळीं तपस्ये-कडून चैनीकडे वळला होता. हिंदु राज्यांच्या या वेळच्या अत्यंत वैभवाचाहि याच दिशेकडे परिणाम होणें अपरिहार्य होतें. अलंकार-शास्त्र यावेळीं लोकांत प्रिय झालें होतें, हेंहि आपण पाहिलेंच आहे.

या प्रश्नाची काळजीपूर्वक छाननी होणें अद्याप बाकी आहे. परंतु त्यावेळच्या बंगाल्यातील व ओरिसांतील वैष्णव मतांत श्रीकृष्ण आणि गोपी यांच्या कामलीलांच्या कथांचा पूर्ण अन्तर्भाव होता; आणि शरीरशोषणापेक्षां शरीरपोषणाकडेच त्याचा जास्त कल होता.*

वल्लभ आणि चैतन्य हे अद्याप यावयाचे होते आणि या शृंगारिक कल्पनांना जास्त अशुद्ध किंवा शुद्ध स्वरूप मिळावयाचें होतें. पण एवढें खरें कीं, याचें बीज यावेळीं पेरलें गेलें. असो, वैष्णवमतांतील हें उपभोगतत्त्व आणि त्यांतील अहिंसातत्त्व यामुळें जैनधर्मापेक्षां तें लोकांस जास्त प्रिय झालें असलें पाहिजे आणि यामुळें उत्तरहिंदुस्थानांत जैन धर्माच्या प्रसारास अडथळा आला असावा. यावेळीं दक्षिणेंतहि वैष्णवमत पसरलें. परंतु त्यांत ह्या निकृष्ट स्वरूपाचा अन्तर्भाव नव्हता. त्यांत अहिंसा तत्त्व मान्य केलें गेलें आणि यारीतीनें जैनांचा आक्षेप दूर केला गेला; पण त्याबरोबरच तपस्येचें तत्त्व अंगिकारलेलें दिसतें. शिवाय वेदप्रामाण्य आणि वर्णाश्रमधर्म, अर्थात् ब्राह्मणांचें धार्मिक श्रेष्ठत्त्व,त्यांत मान्य असून दक्षिणच्या लोकांच्या पुराणधर्माभिमानी वृत्तीस तें अधिक पसंत पडलें. शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानांत भक्तियोगाला फारशी जागा नाहीं; आणि भक्तियोग तर प्राचीन काळापासून वैष्णवधर्माचा मुख्य सिद्धांत आहे. तेव्हां शांकरतत्त्वज्ञानाला विरोध करून उपनिषद्, भगवद्गीता आणि ब्रह्मसूत्रें हीं जीं पुराणमताभिमान्यांचीं मुख्य पवित्र स्थानें त्यांचा निराळा अर्थ लावून निराळें तत्त्वज्ञान उपदेशिण्याची आवश्यकता होती. एक नवीन, जोरदार वैष्णव उपदेशक या कारणानीं दक्षिणेंत उत्पन्न झाला. तामिल देश हा भागवत पुराणांत सांगि-

* चोल गंग यानें यावेळीं ( ११५० इ. ) बांधलेल्या जगन्नाथाच्या देवळावरील अश्लील चित्रांची उपपत्ति अन्यथा लागत नाहीं.

तल्याप्रमाणें पूर्वीपासून वैष्णवमताचा मुख्य किल्ला आहे; आणि आलवार म्हणजे वैष्णव साधु तेथें प्राचीन काळापासून, जसे शैव साधु नायनार शिवाचीं स्तोत्रें गात आले आहेत, त्याप्रमाणें विष्णूचीं स्तोत्रें गात आले आहेत. पण वैष्णवमताला शांकर-सिद्धांत-विरोधी तत्त्वज्ञानाचा आधार पाहिजे होता, तो देण्याचें काम यावेळीं रामानुजानें केलें.

रामानुजाचें चरित्र प्रसिद्ध असून तें डॉ. भांडारकरांच्या वैष्णव-धर्मावरील पुस्तकांत उत्तम रीतीनें दिलें आहे. याचा जन्म इ. स. १०१७ त झाला; आणि त्यानें कांची येथें यादवप्रकाश नांवाच्या अद्वैत ( शांकर ) तत्त्वज्ञान्यापाशीं प्रथम तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्याच्या उपदेशानें त्याच्या मनाचें समाधान न झाल्यानें आलवारांच्या प्रबंधाचा त्यानें खोल अभ्यास केला, आणि त्यांच्या "भक्तिरसाचें पान केलें." त्रिचनापल्ली जवळील श्रीरंगम् येथील वैष्णव-मठांत यामुनाचार्याच्या मागें तो उपदेशक ( महंत ) झाला. आणि वर निर्देशिलेल्या आर्यांच्या पवित्र ग्रंथावर आपलीं नवीं भाष्यें लिहून त्यानें आपल्या आयुष्याचें महत् कर्तव्य केलें. त्यावेळचे चोल राजे शैव होते, त्यांनीं रामानुजानें वैष्णव मत सोडावें याविषयीं प्रयत्न चालविला, तेव्हां तो तेथून पळून म्हैसूर मधील होयसल राजा विष्णुवर्धन याच्या आश्रयास गेला. हा राजा जैनमतानुयायी होता. परंतु रामानुजानें त्यास उपदेश करून आपल्या मताकडे वळविलें. ( इ. स. १०९६ )

रामानुजाचें मत अर्थात् दक्षिणेंत पसरिलें; आणि नंतरच्या शतकांत त्याचा भावी अनुयायी रामानंद यानें तें उत्तरेकडे नेलें. "रामानुजाचा वैष्णव सिद्धांत जुना पांचरात्र सिद्धांतच असून त्यांत नारायण आणि विष्णु ह्या दोन तत्वाचा आणखी समावेश आहे. त्याच्या मतें ईश्वराचें अत्यंत पूज्य नांव नारायण आहे. त्याच्या तत्त्व-

ज्ञानांत गोपालकृष्ण हें नांव कधींच सांपडावयाचें नाहीं" ( पा. ५७ ). तेव्हां रामानुजाच्या सिद्धांतांत राधापंथाचा निकृष्ट भाग नाहीं हें सांगणें नको. "भगवद्गीतेचा भक्तियोग त्यानें घेतला आहे हें खरें, पण भक्तीचें स्वरूप त्याच्या मतें परमेश्वराचें संतत ध्यान याच प्रकाराला येऊन पोहोंचतें.याप्रमाणें प्राचीन चालत आलेल्या भक्तिसिद्धांताला कांहींसें ब्राह्मण धर्माचें स्वरूप त्यानें दिलें आहे. कारण त्याच्या मतानें शूद्र परम मोक्ष मिळण्यास योग्य नाहींत. पण रामानुजाचा जो पंथ रामानंदानें पुढें उत्तरेस चालविला त्यांत शूद्रांनीं आपला अधिकार मिळविला " ( सदर ). याप्रमाणें रामानुजाचें मत मुळांत पुरातनमताभिमानी ब्राह्मणांच्या श्रेष्ठत्वाचें होतें तरी त्याच्या उत्तरेकडील निघालेल्या पंथांत तें सुटलें आणि वर्णधर्म जरी सुटला नाहीं, तथापि जातीच्या कारणानें उत्पन्न होणारा वरील विद्विष्ट भाग त्यांतून नाहींसा झाला.

## नवीन अथवा वीर शैवमत.

याप्रमाणें नवीन वैष्णवमत निरनिराळ्या स्वरूपानें शैवमताच्या विरुद्ध पूर्वेस आणि दक्षिणेस म्हणजे आंध्र आणि तामिल देशांत वाढत असतां कर्नाटकांत याच वेळीं लिंगायत पंथ उत्पन्न होऊन शैव धर्माचा पुनः जोर बसला. खरें म्हटलें तर हा जोराचा उपक्रम जैनधर्माच्या विरुद्ध होता. उत्तर कर्नाटकांत कलचूरी बंडामुळें थोडीं वर्षें जैनधर्माचा विजय झाला,त्याच्या विरुद्ध शैवधर्मानें आपली जागा पुनः व्यापण्याचा हा जोरकस प्रयत्न केला. या नव्या शैवमताचा इतिहास देण्यापूर्वीं प्राचीन काळापासून शैवधर्माचा इतिहास थोडक्यांत देणें जरूर आहे.ज्याप्रमाणें जैनधर्माचा आम्ही प्रारंभीचा थोडक्यांत इतिहास दिला त्याप्रमाणें लिंगायतमत नीटपणें लक्षांत येण्यासाठीं शैवधर्माचा प्राचीन इतिहास देणें जरूर आहे.

शैवधर्म निःसंशय वेदांइतके जुने आहे. वैदिक ऋषींनीं या देवाचें भयंकर म्हणजे रुद्रस्वरूपांत तसेंच मंगल म्हणजे शिव स्वरूपांत स्तवन केलें आहे. वैदिक तत्त्वज्ञान्यांनींच, ज्याची इतर देवता केवळ भिन्न स्वरूपें आहेत अशा परमेश्वराची, कल्पना उद्भूत केली आणि उपनिषत्कालीन तत्त्ववेत्त्यांनीं परब्रह्माचा सिद्धांत प्रस्थापित केला. यापुढें वेद-धर्मीयांत मतभेद झाला. कांहींनीं विष्णूस परमेश्वर मानलें तर इतरांनीं शिवाला मानलें. बहुमत विष्णूच्या तर्फे होतें, हें 'अग्निर्वै देवानामवमो विष्णुः परमः' या ऐतरेय आरण्यकांतील वाक्यावरून दिसतें. परब्रह्माशीं शिवाचें तादात्म्य ही मागूनची कल्पना आहे. प्राचीन दशोपनिषदांत ती सांपडत नाहीं, नंतरच्या श्वेताश्वतरांत ती प्रथम स्पष्टपणें मिळते. असा मतभेद व्हावा हें ठरलेलेंच आहे. पूर्वीं सांगितल्याप्रमाणें प्रत्येक धर्माच्या वाढींत झाडाप्रमाणें दोन स्कंद नेहमीं फुटतात. वैदिक आर्यधर्मांत याच न्यायानें वेदोत्तर कालांत वैष्णवमत आणि शैवमत असा विभाग पडला. तरी पण लौकरच सामान्य जनांत शैवमताचा प्रसार अधिक झाला, कारण सामान्य लोकांत भूतांचा व पिशाच्चांचा जास्त धाक असतो, व निसर्गाच्या भयंकर आपत्तींची भीति जास्त असते. पिशाच्चांचा व रोगांचा अधिपति रुद्रशिव आहे असें मानलें गेलें होतें. ह्याशिवाय हिंदुस्थानांतील मूळच्या लोकांत लिंगपूजा प्रसृत असून त्याजविषयीं वेदांत कित्येक स्पष्ट उल्लेख आहेत. उत्तर वैदिक काळांत या लिंगपूजेचें आणि शिवपूजेचें ऐक्य झालें. हें ऐक्य डॉ. आर. जी. भांडारकर मानतात ( पा. ११५ ) त्याहून प्राचीन काळीं झालें असें आमचें मत आहे. आम्ही पूर्वी अनेकदां सांगितलें आहे कीं, अनुल्लेख हें निश्चित प्रमाण नव्हे. जरी पतंजलीनें शिवाच्या मूर्तीचा उल्लेख केला असून शिवलिंगाचा केलेला नाहीं, किंवा 'वेम कॅडफिशिस्' याच्या नाण्यांवर शिवाचें मानवी स्वरूप दाखविलेलें आहे

तरी यावरून असें सिद्ध होत नाहीं कीं, त्यांच्या काळीं लिंगपूजा प्रचारांत नव्हती. महाभारतांत शिवपूजेचें लिंगपूजेशीं तादात्म्य स्पष्ट-पणें वर्णन केलें असल्यानें महाभारत-काळीं म्हणजे इ. स. पू. ३०० च्या काळीं लिंगपूजा लोकांत पूर्ण मान्य झाली होती. तेव्हां त्या-काळींहि हल्लींप्रमाणें शिवाचीं दोन स्वरूपें होतीं, म्हणजे पंचमुखी मानवी स्वरूप आणि लिंगस्वरूप अशीं होतीं हें खरें, तरीपण लिंग-पूजा ही लोकांत जास्त प्रसृत झाली. कारण त्या पूजेला एक उदात्त तात्त्विक किंवा आध्यात्मिक अर्थ प्राप्त होऊन त्यांतील मूळची कल्पना बिलकुल नष्ट झाली. हल्लींहि लिंगपूजेंत कोणाच्याहि मनांत अश्लील कल्पनेची भावना येत नाहीं. या रीतीनें आर्य आणि अनार्य पूजांचा आध्यात्मिक मेळ होऊन ती फार प्राचीन काळीं सामान्य लोकांचा पूजामार्ग बनला.

वैष्णवमताप्रमाणेंच शैवमतांत प्राचीनकाळीं निराळें तत्त्वज्ञान उत्पन्न झालें. महाभारतांत पाशुपत तत्त्वज्ञानाचा पांचरात्र, सांख्य, योग आणि वेदांत या तत्त्वज्ञानांबरोबर उल्लेख आहे. किंबहुना या प्रमाणें पांच ज्ञानें आहेत असें त्यांत स्पष्ट वचन आहे. बादराय-णाच्या वेदांतसूत्रांतहि (इ. स. पू. १५०) पांचरात्र आणि पाशुपत या दोन्ही मतांचें खंडन केलेलें आहे. हें पाशुपत मत मूळांत काय आहे हें मूळ ग्रंथ आपल्या समोर नसल्यानें सांगतां येत नाहीं. शंकरा-चार्यांनीं आपल्या भाष्यांत त्या मताचा उद्धार केला आहे आणि माधवानेंहि सर्वदर्शनसंग्रहांत केला आहे. शैव आगम पुष्कळ आहेत, पण ते अलीकडचे आहेत. सर्व शैव मतें तप मानतात, आणि हुएनत्सांगनें शैव तपस्वी शिवाच्या देवालयांत राहतात असें सांगि-तलें आहे. हे लकुलीश आगमाचें अनुयायी दिसतात. लकुलीश हा प्रसिद्ध शैव तत्त्वज्ञानी सहाव्या शतकांत गुजराथेंत झाला असें दिसतें. भडोच जिल्ह्यांत कायावतार नांवाचें त्याचें तीर्थ आहे. या

व पूर्वीच्या कालविभागांतील कोरीवलेखांत ह्या शैवतपस्व्यांचें बारीक वर्णन आढळतें. यांच्या नांवाच्या शेवटीं शिव किंवा राशि असें उपपद येतें. उदाहरणार्थ, बाप्पा रावळचा गुरु हारीतराशि होता. त्यांच्यांत गादीची परंपराहि असे, आणि एका कोरीवलेखांत राजाच्या वंशावळीप्रमाणें यांचीहि वंशावळ दिली आहे. पण आपल्या या विषयाच्या चर्चेतील मुख्य मुद्दे अनिश्चित राहतात. हे शैव तपस्वी ब्राह्मणच जातीचे असत किंवा सर्व जातींचे, लकुलीशाच्या आगमांत प्राणिहिंसायुक्त वैदिक यज्ञ मान्य आहेत कीं नाहींत आणि त्यांत मांसान्न निषिद्ध आहे कीं काय हें समजत नाहीं. या मुद्यांच्या निर्णयाकरितां शैव तांत्रिक ग्रंथांचा काळजीपूर्वक अभ्यास झाला पाहिजे. आमची माहिती अल्प असल्यानें या मुद्यांवर निश्चित मत देणें शक्य नाहीं, व खुद्द लकुलीशाचा ग्रंथ अद्याप उपलब्ध नाहीं.* पण निरनिराळ्या शैवपंथांत सर्व जातींस त्यांच्यांतील तपस्वी होण्याची परवानगी असावी हें संभवनीय आहे. आणि या तपस्व्यांना मांसान्न वर्ज असावें, परंतु गृहस्थ अनुयायांस शैवमतानें वैष्णवमताप्रमाणें मांसान्न निषिद्ध केलें असावें असें दिसत नाहीं. या कारणांनीं सामान्य लोकांचा-विशेषतः शूर रजपुतांचा ज्यांनीं सातव्या व आठव्या शतकांत मुसलमानांच्या वाढत्या लाटेस विरोध करून हाणून पाडलें त्यांचा-धर्म शैवधर्मच होता. या संबंधानें बाप्पा रावळचा महान पराक्रम त्याचा शैवगुरु हारीतराशि यानें प्रेरित केलेला होता. इतर रजपूत कुळांतहि या व मागच्या कालविभागांत, कांहीं थोडे अपवाद खेरीज करून, शिवभक्तीचाच धर्म अंगीकृत होता. असो, हिंदुस्थानची व विशेषत कुंतलदेशाची धार्मिक स्थिति या बाबतींत

---

*लकुलीशाच्या पंचाध्यायिचा उल्लेख पुष्कळदां येतो पण तो ग्रंथ अद्याप मिळालेला नाहीं.

उत्तर चालुक्यांच्या अमदानींत (हे कट्टे शैव होते) अशा रीतीची होती; इतक्यांत एकाएकीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें कलचूरींच्या बंडामुळें जैनधर्म पुढें सरसावला.

जैनांची हकीकत आणि लिंगायतांनीं बसव पुराणांत दिलेली हकीकत भिन्न असली तरी दोहींत कांहीं मध्यवर्ती गोष्टी एक आहेत. लिंगायत पंथाचा संस्थापक बसव हा ब्राह्मण असून चालुक्यांचा कलचूरी सेनापति, त्यांची सत्ता बळकावणारा विज्जन, याचा कांहीं काळ तो प्रधान होता. आमच्या मतें बसव स्वतःच मोठा तत्त्वज्ञानी व धर्मसुधारक होता. डॉ. रा. गो. भांडारकर असें म्हणतात कीं, तत्पूर्वी सुरू झालेल्या आराध्य नांवाच्या मताचा केवळ तो एक जोरदार पुरस्कर्ता होता, पण आम्हांस तसें वाटत नाहीं. आम्ही डॉक्टरांच्या मताहून त्यांचा योग्य आदर करून आपला मतभेद नमूद करितों.बसवाचे सिद्धांत इतके नवीन व निराळे आहेत कीं,त्यासच या नवीन मताचा संस्थापक मानलें पाहिजे. बसव पुराणांतील, नारदानें भारतवर्षांत शैवमत नष्ट झालें असें सांगितल्यावरून शंकरानें नंदीस शैवमत स्थापन करण्यास पाठविलें त्या नंदीचा अवतार बसव होय, या कथेचें तात्पर्यहि तेंच आहे. आराध्य नांवाच्या पूर्वीच असलेल्या पंथातून त्यानें कांहीं मतें घेतलीं असतील, पण त्यांस त्यानें अगदीं नवीन निराळें स्वरूप दिलें. त्याचा मामा बलदेव हा त्याच्यापूर्वी राजाचा दिवाण होता, आणि मामाच्या मृत्यूनंतर तो स्वतः दिवाण झाला. त्याची बहीण राजास विवाहिली होती असें म्हणतात. पण जैन म्हणतात कीं, ती राजाची राख होती. बहुधा ही जैनांची गोष्ट बनावट असावी, आणि बसव याचा वर्णधर्मावर विश्वास नसल्यानें या प्रतिलोम विवाहासंबंधानें त्यास हरकत नसावी. यावरून स्पष्ट दिसतें कीं, प्राचीन परंपरा सोडण्यास बसव पूर्ण तयार होता. या रीतीनें बसव आणि त्याचा जैन राजा दोघांनाहि जुन्या मतांच्या लोकांच्या

जातिकल्पनेविषयीं अनादर होता. पण इतर महत्त्वाच्या धर्माच्या बाबतींत त्यांचा मतभेद असल्यानें दोघांत जोराचा तंटा उपस्थित झाला. बसवानें खजिन्यांतून लिंगाइतांचे धार्मिक पुढारी 'जंगम' यां करितां पुष्कळ रकमा खर्च केल्या; तेव्हां राजानें बसवावर काम चालविलें, यामुळें बसव पळाला. यानंतर काय झालें यासंबंधानें भिन्न हकीकती आहेत. पण विज्जनाचा एका जंगमानें खून केला हें निश्चित आहे (इ. ११६७). या रीतीनें जैन आणि लिंगायत यांचा तंटा सुरू झाला. कलचूरींचें बंड थोडेंच दिवस टिकलें, आणि हक्कदार राजा चालुक्य सोमेश्वर यानें तें ११८२ इसवींत मोडलें. पण लिंगायतांचा पंथ कुंतलांत म्हणजे दक्षिण महाराष्ट्र देशांत जोरानें वाढला आणि त्यानें कर्नाटक देशांतून जैनधर्माचा कायमचा पाडाव केला.

या नवीन वीर शैवपंथाचे विशेष सिद्धांत, ज्यामुळें त्यांस जैनधर्माचा पाडाव करितां आला ते, येथें सांगितले पाहिजेत. प्रथम गोष्ट ही कीं, बसवानें अहिंसा धर्मास मुख्य स्थान दिलें, आणि यावेळीं हिंसेविरुद्ध लोकमताचा जो प्रवाह चालला होता त्यास मान दिला. अर्थात् हिंदुधर्माच्या ज्या दोषी भागावर जैन हल्ला करून जय पावत तो भाग हिंदुधर्मांतून त्यानें काढून टाकला. दुसरें, ब्राह्मणांना धार्मिक श्रेष्ठत्व आहे हें मत त्यानें नाकरलें; आणि प्रत्येकास परमगति मिळविण्याचा अधिकार आहे हें मत प्रदिपादलें. अगदीं दक्षिणचे वैष्णव हिंदुमधील प्राचीन वर्णव्यवस्था न सोडतां तीस चिकटून बसले हें आपण पाहिलेंच आहे. बसवानें धैर्यानें पुढें येऊन जाति झुगारून दिल्या आणि त्याच्या वेळीं तरी ब्राह्मणांचा आणि चांडाळांचाहि विवाह झाला. त्यानें संन्यास आणि तप हे दोन्हीहि नाकबूल केले, आणि जैनांच्या पुढें जाऊन त्यांच्यावर एक मुद्दा अधिक गांठला. त्याचा उपदेश असा आहे कीं प्रत्येकानें उद्योग

करून आपलें पोट भरावें, कोणी भिक्षा मागूं नये. त्यांचे धार्मिक गुरु जंगम यांनींहि भिक्षा मागूं नये." उद्योगाचें महत्त्व व श्रेष्ठत्व प्रतिपादणारा व भिक्षा बंद करणारा असा हिंदुस्थानांतील पहिला तत्त्ववेत्ता बसव होय. त्यानेंच एकट्यानें उपदेशिलें कीं, कायकानेंच (कर्मानें) कैलास (मोक्ष) मिळेल. तसेंच सर्व लोकांनीं नीत्याचरण करावें ह्याबद्दल त्याचा अत्यंत कटाक्ष असून यांत त्यास जैन आणि बौद्ध धर्मापेक्षांहि अधिक जय आला. कारण एकंदर लिंगायत समाज छचोरपणा सोडून विशेष नीतिमत्तेचें आचरण करतो. शेवटली गोष्ट ही कीं, सामान्य जनांच्या लिंगपूजेसच त्यानें उचलून धरिलें आणि यारीतीनें त्यांचा देव त्यानें बदलला नाहीं. या लिंगकल्पनेंत एक परमोच्च आध्यात्मिक अर्थ घालणें त्यास जरूर होतें. त्याप्रमाणें करून त्यानें आपल्या पंथीयांनीं शिवाचें पवित्र लिंग शरीरावर नेहमीं धारण करावें असें प्रतिपादिलें. ब्राह्मणांचें जानवें त्यानें टाकूनच टाकलें होतें, त्याऐवजीं लिंगायतांकरितां लिंग बांधलेला एक चांदीचा दोरा त्यानें घातला. ब्राह्मण आणि जातिव्यवस्था यांस काढून टाकल्यानें बसवास साहजिकच लोकांस त्यांच्याच भाषेंत उपदेश करितां आला. जुन्या धर्मवादि पंडितांशीं संस्कृत भाषेंत जैनांप्रमाणें वादविवाद करण्याकडे त्यानें लक्षच दिलें नाहीं; आणि कानडी भाषेंत आपल्या धर्माचा त्यानें लहान लहान जोरदार वाक्यांनीं उपदेश केला. हेच लिंगायतांचे पवित्र ग्रंथ झाले आहेत. या कारणानेंहि सामान्य जनांच्या दृष्टीनें त्यानें जैनांवर आणि जुन्या धर्माभिमानी पंडितांवर जय मिळविला. तेव्हांपासून हल्लींपर्यंत कर्नाटकांत शेतकरी व व्यापारी वर्गांत लिंगायतांचा अधिक भरणा आहे.

लिंगायत पंथाचीं निरनिराळीं तत्त्वज्ञानविषयक मतें रामानुज किंवा शांकर यांच्या तत्त्वज्ञानाच्या तुलनेनें काय आहेत हें आम्हांस येथें पाहण्याची आवश्यकता नाहीं. वाचकांची इच्छा असल्यास डॉ.

रा. गो. भांडारकर यांचा शैवधर्मावरील विद्वत्ताप्रचुर ग्रंथ पहावा. पण हें येथें सांगितलें पाहिजे कीं, लिंगायतांनीं जातीचें तत्त्व जरी काढून टाकिलें, तरी हिंदूंच्या स्वभावाप्रमाणें त्यांत थोडीशी जाति-व्यवस्था उत्पन्न झाली आहे. ह्यांत आचार्य आणि जंगम हे ब्राह्मणां-सारखे असून जंगम विवाहित असतात. पंचमांत कित्येक जाति आहेत पण त्या फार नाहींत. सामाजिक सुधारणेच्या दृष्टीनें लिंगा-यत पंथ स्त्रियांचा कैवारी आहे.त्यांच्यांत स्त्रियांनाहि लहानपणीं उपनयन संस्कार आहे. त्यांस रजस्वलाकाळीं विटाळांत बाजूस बसावें लागत नाहीं. आणि पुरुषाप्रमाणेंच स्त्रिया परमगति म्हणजे सामरस्य मिळ-विण्यास योग्य आहेत असें ते मानतात. ह्या पंथांत एक निराळी गायत्री आहे ( ॐ नमःशिवाय ) आणि निराळी गोत्रव्यवस्थाहि आहे. हे मांस आणि मद्य यांपासून अत्यंत निवृत्त असतात.

## टिप्पणी.

## वीरशैव पंथ व त्याचे संस्थापक याविषयीं राईसचा लेख.

कर्नाटकी वाङ्मयाच्या इतिहासावरील राईसच्या ग्रंथांतून ' लिंगायत पंथ व त्यांचे बसव आणि इतर संस्थापक ' याविषयींचा पुढील उतारा आम्ही येथें देतों ( पा. ४० ते ५५ ). " वीरशैव म्हणजे कट्टे शैव इतर शैवांपासून म्हणजे (१) सामान्य (२) मिश्र (हे शिव आणि विष्णु दोघां-ची पूजा करितात ) आणि (३) शुद्ध शैव (हे शिवाचीच पूजा करितात पण लिंग बाळगीत नाहींत) यांपासून भिन्न आहेत.वीरशैवांची विशिष्ट खूण ही कीं ते (स्त्रिया व पुरुष) गळ्यांत अडकवलेलें व चांदीच्या किंवा लाक-डाच्या लहान पेटींत घातलेलें दगडाचें लिंग नेहमीं अंगावर बाळगतात. जंगम म्हणजे लिंगाइताचे धार्मिक गुरु लिंग डोक्यावर बांधतात. हा लिंग बांधण्याचा विधि उपनयनाप्रमाणें अत्यंत पवित्र असून लहानपणां-तच केला जातो."

"बसवानें असा उपदेश केला आहे कीं, सर्व जातीचे लोक किंबहुना

अंत्यज, लिंगाइत पंथांत सामील होण्यास अधिकारी आहेत. लिंगाइतांचें दुसरें विशेष हे कीं ते प्रेतें दहन करीत नाहींत आणि त्यांच्यांत विधवांचा पुनर्विवाह मान्य आहे. त्यांचा धर्मग्रंथ २८ शैवागमांचा आहे. शिवगीताहि ते श्रेष्ठ मानतात. त्यांचे मुख्य सिद्धांत अष्टावरण आणि षट्स्थल आहेत. प्राचीन त्रेसष्ट तामिल साधूंनां ते मानतात. पण यापैकीं आठच वीरशैव आहेत. अलीकडील साधु म्हणजे बसव आणि त्याचे मुख्य शिष्य हे होत. यांचा मुख्य मठ म्हैसूर प्रांतांतील चित्तलदुर्ग येथें आहे."

"या पंथाचा प्रसिद्ध संस्थापक बसव हा एक आराध्य ब्राह्मण होता. लहानपणीं तो मलप्रभा आणि कृष्णा यांच्या संगमीं कप्पडी गांव आहे व तेथें संगमेश्वर नांवाचें शिवाचें पूज्यस्थान आहे तेथें रहात असे. येथें वीरशैव पंथाचा उद्धार करावा अशी परमेश्वराची प्रेरणा त्यास वाटूं लागली. त्याचा मामा आणि सासरा बिज्जलाचा मंत्री होता. तो मेला तेव्हां त्यास त्याच्या जागीं नेमलें. त्याची बहीण पद्मावती हिचें लग्न राजाशीं झालें होतें. त्याच्या दुसऱ्या बहिणीचा मुलगा चन्नबसव हा त्याचा मुख्य शिष्य होता. त्याच्या मदतीनें आपल्या सिद्धांताचा व शिवपूजेच्या नवीन मार्गाचा तो उपदेश करूं लागला. राजाचा खजिना त्याच्या ताब्यांत असल्यानें जंगमाच्या मदतीसाठीं त्यानें मोठाल्या रकमा खर्च केल्या. मंचन नांवाचा दुसरा एक ब्राह्मण मंत्री होता-त्यानें बसवावर सरकारी पैसा खाल्याचा आरोप आणला. राजानें त्यास पकडण्याचा प्रयत्न केला परंतु तो पळाला आणि आपल्या अनुयायांस मिळून त्यानें राजाचा पराभवहि केला. तेव्हां राजानें त्यास निरुपायानें पूर्वीच्या जागेवर नेमलें."

"यानंतर जें वृत्त घडलें त्याची हकीकत भिन्न सांगतात. लिंगाइत म्हणतात कीं, राजानें दोघा लिंगाइत भक्तांचे डोळे काढण्याचा प्रयत्न केला, तेव्हां बसवानें कल्याणनगरास शाप देऊन व आपल्या अनुयायांस राजास ठार मारण्यास सांगून तो संगमेश्वर येथें एकांतांत राहिला; आणि शेवटीं तेथील शिवलिंगांत विलीन झाला. जैन लोक म्हणतात कीं, बसवानें एक विष भरलेलें फळ राजास पाठविलें; आणि पश्चिम घाटाच्या पायथ्याशीं असलेल्या उळवी गांवास तो पळुन गेला; तेथें राजाच्या पुत्रानें वेढा दिला तेव्हां निराशेनें बसवानें विहिरींत उडी टाकून जीव दिला.

"बसवानें लिंगाइत पंथाचीं तत्त्वें प्रतिपादन करणारे कानडी गद्य ग्रंथ पुढील लिहिले आहेत. षट्स्थलवचन, कालज्ञानवचन, सच्चरित्रवचन, राजयोगवचन आणि मंत्रगोप्य."

"बसवाचा मुख्य शिष्य चन्नबसव हा होय. यास बसवाहूनहि अधिक मानतात. त्यास प्रत्यक्ष शिवाचा अवतार समजतात. बसव राजकारणांत गुंतलेला असल्यानें धर्मप्रसाराचें काम मुख्यतः चन्नबसवाच्या देखरेखीं-खालीं असे. मामाच्या मरणानंतर राजकृपेंत तो घेतला गेला असेंहि म्हणतात. दुसरें मुख्य सहकार्यकर्ते माडिवाल, माचय्य, प्रभुदेव आणि सिद्धराम होतें. यांनीं केलेल्या चमत्कारांच्या गोष्टी चन्नबसव व इतर पुराणांत अनेक दिल्या आहेत."

---

याप्रमाणें या कालविभागांत पश्चिमेकडे जैनधर्माचा प्रसार झाला तर दक्षिणेकडे शैवधर्माचा झाला आणि पूर्वेकडे, किंबहुना काश्मीरपर्यंत उत्त-रेकडे, वैष्णव धर्माचा प्रसार झाला. या दोन धर्मांत कित्येक पंथ उत्पन्न झाले व त्यांची निरनिराळीं तत्त्वज्ञानें, निरनिराळ्या कल्पना व परिभाषा यांसह उत्पन्न होऊन देशांतील बुद्धिवान् लोकांची पारलौकिक प्रश्नांविषयीं विरोधी सिद्धांतांनीं धांदल उडाली. या पंथांत निरनिराळे देव मुख्य ईश्वर मानले गेले इतकेंच नव्हे तर आपल्या मुख्य परमेश्वराचें इतर देव अंकित आहेत असें दाखविलें जाई. शैव आणि वैष्णव या मुख्य जोर-दार मतांशिवाय दुर्गा आणि गणपति यांचीहि भक्ति, निराळी तत्त्वज्ञानें व आगम यांसह, उत्पन्न होऊन आणखी दोन पंथ उत्पन्न झाले व त्यांत हे देव सर्वांत श्रेष्ठ मानले गेले. हे शाक्त व गाणपत्य पंथ बहुधा याच काळांत उत्पन्न झाले असावेत. तथापि याबद्दल आमचे जवळ निश्चित पुरावा नाहीं. या निरनिराळ्या पंथामुळें कित्येक सामाजिक बदल होऊन या पंथांचे गृहस्थ अनुयायी, ज्यांस उच्च तत्वज्ञानाच्या प्रश्नावर विवाद करितां येत नसे ते, लहान मुद्यांवरच भांडू लागले. हा देव मोठा कीं तो देव मोठा ? ब्राह्मण धार्मिक दृष्टया श्रेष्ठ कां ? मुनींना नग्न राहणेंच जरूर आहे कीं नाहीं ? स्त्रियांत मोक्षाची पात्रता आहे कीं नाहीं? इत्यादि

प्रश्नांवर सामान्यलोकहि विवाद करूं लागले. यामुळें हिंदु जनता, तींत अनेक एकमेकाला विरोधी आणि आपसांत झगडणारे पंथ उत्पन्न होऊन विभागली गेली. अर्थात् धार्मिक ऐक्य ही जी राष्ट्रीय शक्तीची मुख्य एक बाब आहे ती नष्ट झाली. हे भिन्न भिन्न पंथ ज्या एका मुद्यावर मात्र एकमत होते, तो अहिंसा सिद्धांत होय. प्राणिहत्या आणि मांसाहार यांचा सर्वांनीं प्रत्यक्ष निषेध नसला तरी अव्हेर केला; आणि यामुळेंहि हिंदुराष्ट्राची संरक्षणशक्ति दुर्बल झाली. अभिनवगुप्त आणि कल्लट यांनीं काश्मिरांत जो नवा सिद्धांत प्रतिपादिला त्यांतहि अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार केलेला दिसतो. भाग २ यांत हा श्रीकल्लट कोण असा आम्हीं प्रश्न केला आहे. " देशाच्या उद्धाराकरितां अवंतिवर्मन्च्या वेळीं हा झाला " असें कल्हणानें याचें वर्णन केलें आहे. हा वैष्णव ग्रंथकार असावा असें आम्हांस वाटलें, पण डॉ. भांडाकरांच्या शैवधर्मावरील पुस्तकावरून हा शैव तत्त्ववेत्ता होता असें दिसतें. तथापि वर सांगितल्याप्रमाणें यानें अहिंसेचाच पुरस्कार केला असावा. असे नसतें तर अवंतिवर्मन् या कट्टया वैष्णव राजाच्या पूर्वीं वर्णिलेल्या अमदानींत त्याचा प्रसार झाला नसता. तथापि हें मान्य केलें पाहिजे कीं, उत्तरहिंदुस्थानांतील आणि महाराष्ट्रांतील बहुजनसमाज स्मार्त धर्माचाच अनुयायी होता. स्मार्त मतांत हिंदुधर्माचे पांची मुख्य देव सारखेच मोठे मानलेले आहेत. दक्षिणेंत शैव धर्म आणि पूर्वेस वैष्णव धर्म यांनीं मात्र जैनधर्माचा पाडाव केल्यानंतर आपसांत इतक्या द्वेषानें युद्ध चालविलें कीं, राजेलोकांनीं आपली राजकीय सत्ता विरोधी धर्म पादाक्रांत करण्याकडे उपयोगिली. एका चोल राजानें रामानुजास ' शिव सर्वांत श्रेष्ठ देव आहे ' असें कबूल करण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला हें आपण पूर्वीं पाहिलेंच आहे. अद्यापहि शैव आणि वैष्णव धर्मांच्या गृहस्थ अनुयायांमध्यें कर्नाटक, आंध्र आणि तामिल देश यांत द्वेष चालू आहे. माध्व मत आणि तत्वज्ञान १४ व्या शतकांत उत्पन्न होऊन या तंट्यांत आणखी तिसरा पंथ उत्पन्न झाला.

शिव आणि विष्णु यांच्या भक्तींतील विरोध काढून टाकण्याचा प्रयत्न बंगालच्या विजयसेनानें केलेला त्याच्या देवपारा कोरीव लेखावरून ( ए. इं. पा. ३०७) दिसून आलेला पाहून आम्हांला आश्चर्य वाटलें. विजयसेन

शैव होता पण ओरीसामधून बंगाल्यांत बहुधा त्याच्याच वेळीं वैष्णवमत पसरत आलें असावें. कारण त्याचा नातु लक्ष्मणसेन हा परम वैष्णव होता हें आपण पाहिलेंच आहे. तेव्हां विजयसेनास या दोन्ही भक्ति शिव आणि विष्णु एकाच मूर्तींत आणून एकत्र करण्याची कल्पना सुचली असावी. आणि त्यांनें आपल्या बांधलेल्या देवालयास प्रद्युम्नेश्वर हें योग्य नांव देऊन शिव आणि विष्णूची एकत्र केलेली मूर्ति त्या देवालयांत ठेवली. या शिलालेखांत मूर्तीचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे. "लक्ष्मी आणि शैलकन्या या दोघांचे पति ज्या मूर्तींत एकत्र आहेत आणि एकीनें खेळतात, त्या प्रद्युम्नेश्वर नांवाच्या मूर्तीस आम्ही नमस्कार करितों. या दोघींनीं आपल्या पतींच्या मध्यें उभे राहून अभिन्न मूर्ती करण्याच्या कामांत कांहींसा अडथळा केला आहे. जगाचा नाश करणारा शिव याचें भूषण जें गजचर्म तेंच चित्रित पीतांबर आहे, आणि गळ्यांतला हार तोच महानाग आहे. अंगाला लावलेलें चंदन हेंच भस्म आहे. हातांत घेतलेली नीलमण्याची माळ हीच रुद्राक्षमाळ असून त्यांतील गरूडमणि गोनस आहे. आणि मोत्याचा हार हाच अस्थींची माला आहे." या *वर्णनावरून आम्हांस असें वाटतें कीं एकच मूर्ति शिव आणि विष्णूसारखी दिसत असावी.

विजयसेन कर्नाटक ऊर्फ दक्षिण येथील क्षत्रिय होता, आणि महाराष्ट्रांत खुद्द पंढरपूरच्या विठोबाच्या भक्तीचें या कालविभागाच्या अंतीं जें एक नवीन वैष्णव मत उत्पन्न झालें त्यांत हीच दोन्हीं मतें एक करण्याची भावना दृष्टोत्पत्तीस येतें. डॉ. रा. गो. भांडारकर यांच्यामतें ही भक्ति महाराष्ट्रांत दक्षिणेकडून आली असून विठोबा हा शब्द विष्णु

---

* लक्ष्मीवल्लभशैलजादयितयोरद्वैतलीलागृहम् प्रद्युम्नेश्वरशब्दलाञ्छनमधिष्ठानं नमस्कुर्महे । यत्रालिङ्गनभङ्गकातरतया स्थित्वान्तरे कान्तयोः देवीभ्यां कथमप्यभिन्नतनुताशिल्पेन्तरायःकृतः ॥ १ ॥ चित्रक्षौमेभचर्मा हृदयविनिहतस्थूलहारोरगेन्द्रः श्रीखण्डक्षोदभस्मा करनिहितमहानीलरत्नाक्षमालः । वेशस्तेनास्य तेने गरुडमणिलतागोनसः कान्तमुक्ता–नेपथ्यन्नस्थिमालासमुचितरचनः कल्पकापालिकस्य ॥ २ ॥

शब्दाचें कानडीरूप आहे. परंतु विठोबाच्या भक्तीचें वैष्णव मत दक्षिणच्या रामानुजाच्या वैष्णव मताहून फार भिन्न आहे. तसेंच बंगाली आणि ऊरिया भाषेंत विष्णु शब्दाचें प्राकृत रूप विठ्ठु आहे.* परंतु पंढपूरचें वष्णव मत बंगालच्या वैष्णव मताहूनहि भिन्न आहे. त्यांत भोगाचें स्वरूप मुळींच नाहीं. त्यांत गोपींचा मुळींच उल्लेख येत नाहीं. पंढरीस रुक्मिणी सुद्धां मागाहून आली. पंढरपुरची विष्णूची मूर्ति स्त्रीदेवतेविरहित आहे. तिची तऱ्हा सुद्धां अद्वितीय आहे. कारण दोन्ही हात कमरेवर ठेवले असून डोक्यावर शिवलिंग आहे. ही मूर्ति कोणी बसविली हें अद्याप निश्चित झालें नाहीं. कारण पुंडलिक हा विठोबाचा भक्त पौराणिक आहे. डॉ. भांडारकरांनीं ऐतिहासिक दाखले दिले आहेत त्यावरून हें ठिकाण या विष्णुमूर्तीवरूनच मुळांत पुण्यक्षेत्र मानलें गेलें असें दिसतें. इ. १२४९ च्या कोरीव लेखांत भीमरथीचा उल्लेख आहे. तेव्हां यावरून असें अनुमान निघतें कीं, पंढरपूरचा विठोबा यापूर्वी १०० वर्षें, निदान ५० वर्षें, प्रसिद्ध असावा. इ. १२७० च्या पंढरपूर येथेंच असलेल्या एका शिलालेखांत केशवाचा पुत्र भानु यानें एक आत्पोर्याम यज्ञ केला, त्या यज्ञांत लोकांच्या झुंडी आणि विठ्ठल व इतर देव संतुष्ट झाले असें वर्णन आहे ( भांडारकरांचें वैष्णव मत पा. ८१,८८ ). पांडुरंग हें नांव हेमचंद्राच्या मतें शिवाचें नांव आहे, आणि पंढरपूर येथें एक शिवाचें देवालयहि आहे. तेथें यात्रेकरूंस विठोबाच्या दर्शनापूर्वी जावें लागतें. ह्याशिवाय पंढरपूर येथील विठ्ठलमार्गाचा कोणत्याहि तत्त्वज्ञानाशीं संबंध नाहीं. हा एक केवळ भक्तिमार्ग असून तो प्रथम नामदेव ( सुमारें १२७० इ. ) आणि ज्ञानदेव महाराष्ट्रांतील सर्वांत मुख्य जुने वैष्णवभक्त, यांनीं वाढविला. विठोबाचें मंदिर सर्व महाराष्ट्रभर वर्गणी जमवून बांधलें गेलें असें देवळांतील चौऱ्यांशीच्या १३०० इसवीच्या सुमाराच्या लेखावरून दिसतें. त्याप्रमाणें १३व्या शतकांत महाराष्ट्रांत विठोबाची भक्ति प्रसृत झाली, तरी पण पंढरपुरास ती प्रारंभीं १२व्या शतकाच्या अंतीं किंवा मध्याच्या सुमारास आली असली

* कानडींत बिट्टीदेव रूप येतें.

पाहिजे; म्हणजे या भागांतील कालविभागांतलीच ती आहे. तेव्हां हें आश्चर्य आहे कीं, त्यांत शिवभक्तीचा किंवा वैदिक यज्ञमार्गाचा बिलकुल द्वेष नाहीं; आणि कोणत्याहि तत्त्वज्ञानांशीं तिचा संबंध नाहीं. तींत जातिभेदहि टाकलेला नाहीं. या मतांत सर्व जातीचे लोक जाति ठेऊन घेतले जातात; आणि ते ईश्वरासमोर समान असून भक्तिमार्गानें सर्वांस मोक्ष साध्य आहे, मग ते पुरुष अथवा स्त्रिया, ब्राह्मण अथवा ब्राह्मणेतर असोत. तात्पर्य या रीतीनें भगवद्गीतेचा शुद्ध भक्तियोग–सिद्धांत यांत खऱ्या रीतीनें अंमलांत आणला आहे.

याप्रमाणें शैवमत आणि वैष्णवमत एक करण्याचे हे दोन प्रयत्न झाले असून त्यांचा जास्त प्रसार झालेला नाहीं आणि हिंदुधर्म अद्याप या दोन मतांत दुभंगलेला आहे हें दुर्दैव होय. हिंदुधर्मास किंवा जैन धर्मास अहिंसा टाकण्यास सांगणें शक्य नाहीं, कारण त्यांच्या अध्यात्मिक प्रगतीचा हा न्यायप्राप्त परिणाम आहे. तसेंच अद्वैत खरें कीं द्वैत खरें हें ठरविणें कठीण आहे, आणि परमेश्वर आणि जग एक आहेत कीं दोन या प्रश्नावर भिन्न मतें बाळगण्याविषयीं लोकांचें एकमत झाल्यास कांहीं नुकसान नाहीं. पण निःसंशय हिंदुधर्मानें शिव मोठा कीं विष्णु मोठा हा विवाद सोडून देणें शक्य आहे. असें असून एका चोळराजानें विष्णु मोठा असें मानण्याबद्दल लोकांचा छळ केला. आणि अधिराजेन्द्र (यास वैष्णव क्रमिकंठ म्हणतात) यानें चिदम्बरम् टेकडीवरील विष्णु देवालयाचा विध्वंस केला (इ. ए. ११९२). अलीकडील तत्त्ववेत्त्यांनीं तुलसीदासाप्रमाणें महाभारतांत केलेल्या अशा स्पष्ट प्रयत्नास अनुसरून या दोन्ही भक्तींचा विरोध काढून टाकण्याचा प्रयत्न केला. हा विरोध महाभारताइतका जुना आहे हें खरें, पण महाभारतांत विष्णूस मुख्य देव मानून खुद्द शिव त्याची पूजा करितो आणि विष्णु शिवास मुख्य मानून त्याची स्तुति करितो (अनुशासन पर्वांतलि उपमन्यु आख्यान पहा). परंतु प्रद्युम्नेश्वराच्या मार्गानें आणखी असा प्रयत्न झाला पाहिजे कीं, या दोन्ही देवांची एकच मूर्ति करावी, किंवा पंढरपूर येथील विठोबाच्या मूर्तीप्रमाणें विष्णूच्या डोक्यावर शिवलिंग दाख-

वावें आणि शिवलिंगाच्या डोक्यावर विष्णूचें स्वरूप दाखवावें. याप्रमाणें या दोन्ही भक्ति एक करण्याचा पद्धतशीर प्रयत्न केल्यास, हिंदुधर्मांतील ही फूट नाहींशी होऊन हिंदूंच्या दुर्बलतेचें एक कारण निघून जाईल.

---

## टिप्पणी १.

### मोक्षाविषयींच्या भिन्न कल्पना.

मोक्ष कोणास मिळेल म्हणजे जन्ममरणाच्या फेऱ्यापासून मुक्त होण्यास कोण योग्य आहे याविषयीं हिंदूंमध्यें भिन्न कल्पना होत्या व जैनांत सुद्धां होत्या. प्रत्येक धर्मामध्यें मोक्षाची कल्पना असते आणि त्यांचें एक विशिष्ट स्वरूप मानलें गेलेलें असतें. पण इतर धर्मांत एखाद्या विशिष्ट लोकांस मोक्षाचा अधिकार नाहीं अशी कल्पना नसते. अल्बेरूनीनें या विषयावर पुढीलप्रमाणें लिहिलें आहे (भा. १ प्रा. २ पा. १०४). "मोक्ष कोणास मिळूं शकेल याविषयीं हिंदूलोकांत भिन्न कल्पना आहेत. कांहीं लोक असें मानतात कीं ब्राह्मण व क्षत्रिय यांसच मोक्ष मिळेल. कारण त्यांसच वेदाध्ययनाचा अधिकार आहे. पण कित्येक असें मानतात कीं व्यासवचन 'पंचवीस जाणा म्हणजे तुमचा कोणताहि धर्म असला तरी तुम्हीं मुक्त व्हाल' असें असल्यानें प्रत्येकास मोक्षाचा अधिकार आहे. तसेच भगवद्गीता म्हणते 'स्त्रिया, वैश्य व शूद्र सुद्धां माझी भक्ति करतील तर मला येऊन पोहोंचतील. मग ब्राह्मण व क्षत्रिय यांची गोष्टच काय!'" या विषयाची अल्बेरूनीची माहिती स्पष्टपणें बारकाईची दिसते. फक्त वेदमार्गानेंच मोक्ष मिळेल अशी प्राचीनकाळीं समजूत होती हें आश्चर्यकारक नाहीं. कारण ख्रिस्ती लोक बायबलाच्याच द्वारें उत्तम गति मिळेल आणि मुसलमान लोक कुराणाच्याच द्वारें मिळेल असें मानतात. औपनिषदिक आर्य तत्त्ववेत्त्यांनीं आणखी एक असा सिद्धान्त प्रतिपादिला कीं, मोक्ष संन्यासानेंच मिळेल. हीच कल्पना बौद्ध व जैन धर्मानें घेतली. (ख्रिस्तानेंहि हाच सिद्धांत उपदेशिलेला दिसतो). ज्याअर्थी स्त्रिया आणि शूद्र यांस वेदाध्ययनाचा आणि संन्यासाचा अधिकार नाहीं,

त्याअर्थी त्यांस मोक्ष मिळणें शक्य नाहीं असें पूर्वी मानीत. प्राचीन धर्माभिमानी पण उदार भगवद्गीतेनें भक्तीचा नवीन सिद्धांत प्रतिपादिला, आणि या मार्गानें स्त्रिया आणि शूद्र ( यांत वैश्यहि मिळविले गेले ) यांस वेदाध्ययन किंवा संन्यास यांचा अधिकार ब्राह्मणक्षत्रियांप्रमाणें नसला, तरी भक्तिमार्गानें परमेश्वरापाशीं पोंचून त्यांस मुक्ति मिळेल असा सिद्धांत उपदेशिला. व्यासानें सांख्यमतानुरूप ज्ञान मुख्य मानलें आणि परमेश्वराचें खरें ज्ञान झालें म्हणजे मोक्ष मिळालाच असें प्रतिपादिलें. भगमद्गीतेचें उदार मत श्रीकृष्णकालीन तत्त्ववेत्त्यांस भूषणास्पद आहे. आणि असें अल्बेरूनीहि कबूल करितो. पण श्रीकृष्ण स्वतः शूद्र होता म्हणून हें मत त्यानें प्रतिपादिलें असें तो म्हणतो. हिंदुधर्मग्रंथांची बारीक माहिती असलेल्या अल्बेरूनीनें हें चुकीचें विधान कसें केलें हें आश्चर्यकारक आहे. श्रीकृष्ण हा नंदाचा मानीव पुत्र होता आणि नंद खरोखर वैश्य होता. पण अल्बेरूनीच्या काळांत वैश्य शूद्रापेक्षां फारसा वर नव्हता. विशेषतः गायी पाळणारे शूद्र होते. यामुळें अल्बेरूनीची ही श्रीकृष्णाच्या जातीविषयीं बहुधा चुकीची कल्पना झाली. असो, हल्लींच्या कालविभागांत (१०००–१२००) ब्राह्मण व क्षत्रिय हेच मोक्षास जाऊं शकतात असाच हिंदूमध्यें समज दिसतो. क्षत्रियांचा वेदाध्ययनाचा अधिकार अद्याप कायम होता. पण पुढें क्षत्रियांस संन्यास घेतां येत नाहीं असा सिद्धांत ठरून ब्राह्मणच मोक्ष मिळवूं शकतात असा समज झाला.

शेवटच्या गतीची कल्पना वेदांत्याहून वैष्णवांची निराळी होती. पण रामानुज हा पक्का पुराणधर्माभिमानी तत्त्ववेत्ता असल्यानें मोक्ष मिळण्यास संन्यासाची आवश्यकता आहे असेंच त्याचें मत असल्याचें आम्हांस वाटतें. लिंगायत अथवा वीरशैव यांची मोक्षाची कल्पना वैष्णवांहून निराळी आहे. कारण त्यांचा सर्वांत श्रेष्ठ देव शिव आहे. पण त्यांच्या मतें स्त्रियांसह प्रत्येकांस मोक्षाचा म्हणजे कैलासांत शिवाच्या सेवेचा अधिकार आहे. बौद्धांची मोक्षाची कल्पना या सर्वांहून निराळी असून त्याचें नांवहि त्यांच्यांत 'निर्वाण' आहे. पण निर्वाणाला संन्यासाची आवश्यकता आहे असें ते मानतात. हा संन्यास त्यांच्या मतें स्त्रियांसह सर्वांस मोकळा आहे. जैन प्रारंभीं पूर्वी सांगितल्याप्रमाणें बौद्धापेक्षा

कमी उदार मताचे होते. कारण दिगंबर कैवल्य मिळविण्यास कट्टया संन्यासाची आवश्यकता आहे असें मानतात. दोघा दिगंबर आणि श्वेतांबर तत्ववेत्त्यांमध्यें धार येथें एका परमार राजापुढें झालेला वाद आम्ही पूर्वीं उल्लेखिलाच आहे. यांत दिगंबराचें असें मत होतें कीं स्त्रिया आणि वस्त्रें परिधान केलेला संन्यासी यांस मोक्ष मिळणार नाहीं. याप्रमाणें मोक्ष म्हणजे जन्ममरणापासून मुक्ति हा जरी भिन्न मतांचा एकच अभिप्राय आहे, तरी ही मुक्ति कोणास मिळेल याबद्दल निरनिराळ्या लोकांत निरनिराळीं मतें होतीं. अर्थात् देशांतील धर्ममतभेदांत यानें जास्तच भर पडली.

---

## टिप्पणी २.

### कित्येक भागांतील परमतसहिष्णुता.

हें येथें सांगण्यासारखें आहे कीं, उत्तर हिंदुस्थानांतील राजे परधर्ममतसहिष्णु असत, आणि शैव राजांनीं वैष्णवांचा छळ केल्याबद्दल किंवा हिंदूंनीं बौद्ध जैनांचा छळ केल्याबद्दल अथवा या उलट उदाहरणें उत्तरेंत सांपडत नाहींत. किंबहुना तेथील राजे इतके परमतसहिष्णु होते कीं, त्यांनीं परधर्मास दानेंहि दिली आहेत. उदाहरणार्थ, गोविंदचंद्र हा परममाहेश्वर असून त्यानें बौद्ध साधूंस जेतवनांतील एका विहारांत भिक्षूंच्या चरितार्थाकरितां सहा गांवें दिलीं (ए. इं. ११ पा. २२). उलट मदनपाल बौद्धराजा असून त्यानें आपल्या राणीस महाभारत ऐकविणाऱ्या ब्राह्मणांस एक गाव दिल्याचें पूर्वीं वर्णन आलेंच आहे. ही राणी हिंदु असावी. हें सांगण्यासारखें आहे कीं, शैववैष्णवांत व बौद्धहिंदूंत विवाह होत असत. गोविंदचंद्र परममाहेश्वर असून याची एक राणी बौद्ध राजकन्या होती. उत्तर हिंदुस्थानांत जैन व हिंदु यांच्यातहि विवाह होत होते व हल्लीं होतात. असो, गाहडवाल राजे, त्यांच्या कोरीव लेखावरून, विशेष परमतसहिष्णु दिसतात. भूदानाच्या वेळीं केलेल्या धार्मिक विधींत ते माहेश्वर असतांहि शिवाची आणि विष्णूची दोघां-

चीहि पूजा करीत. इतर राजांच्या लेखांत शिव किंवा विष्णु यांपैकीं एकाचीच पूजा केल्याचा उल्लेख येतो.

ह्याशिवाय मुसलमानानीं उत्तर हिंदुस्थानांत या कालविभागांत अनेक हिंदु देवळांचा विध्वंस केला असतांहि गुजराथ व महाराष्ट्र येथील हिंदु राजे व लोक इतके परमतसहिष्णु होते कीं, त्यांनीं मुसलमानांस आपल्या शहरांत-विशेषतः समुद्र किनाऱ्यावर-मशिदी बांधूं दिल्या. किंबहुना इराणी आखातांतील होर्मज येथून आलेल्या एका खोजा व्यापाऱ्यास खुद्द सोमनाथ येथें 'मिजिगिती' (मशीद) बांधूं देण्यास परमपाशुपताचार्य, महापंडित, महत्तर, धर्ममूर्ति आणि अभय ह्या पंचकुलीनें, अनहिलवाड येथें राज्य करणाऱ्या अर्जुनदेव चालुक्या तर्फे मलिकदेव स्थानिक अधिकारी असतां, संमति दिली. या मिजिगितीला बांधण्यास जमीन दिली गेली इतकेंच नव्हे तर तिच्या नित्य खर्चास हिंदूंनीं कांहीं बाजार लावून दिले. आणि ही सर्व गोष्ट एका संस्कृतांत लिहिलेल्या शिलालेखांत नमूद केली. हा लेख संवत् १३२०, वलभी ९४५, सिंव्ह संवत् १५१, आणि हिजरी ६६२ या सालचा असून "जो कोणी मशिदीला किंवा तीस दिलेल्या दानाला हरकत करील त्याला ठराविक शाप व शासन होईल" असें नेहमींप्रमाणें त्यांत म्हटलें आहे (भावनगर कोरीवलेख पा. २२५). यावरून गुजराथचे हिंदु परमतसहिष्णु किती होते याचें उदात्त चित्र दिसून येतें. जयसिंह सिद्धराज, पारशांनीं खंबायतमध्यें आपली मशीद पाडली अशी एका मुसलमानाची तक्रार ऐकून खुद्द स्वतः तेथें गेला आणि त्यानें मशीद आपल्या खर्चानें बांधून दिली ही गोष्ट (इलि. २) आम्हीं पूर्वीं सांगितलीच आहे. याचप्रमाणें राष्ट्रकूट व त्यांच्या पूर्वींचे चालुक्य राजे यांनीं आपल्या देशांत मुसलमानांस मशिदी बांधूं दिल्या व मुसलमानांस आपल्या जातीचे इनसाफ करण्याचा अधिकारहि दिला (भा. २ पा. १६६). तसेंच ठाण्याचे शिलाहार संजान येथें वसलेल्या पारशी व मुसलमानांस विशिष्ट हक्क देऊन गांवांचीं दानपत्रें त्यांसहि कळवीत असत. गुजराथ आणि महाराष्ट्र यांतील हिंदु राजे व हिंदुलोक यांची ही परमतसाहिष्णु वृत्ति प्रशंसेस पात्र असून इतिहासांत विशेष नमूद करण्यासारखी आहे. अर्थात् हे हिंदुराजे जैनांसहि सहिष्णु-

तेनें वागवीत ह्यांत आश्चर्य नाहीं. या कालविभागांतील गुजराथचे चालुक्य राजे आणि नंतरचे वाघेल राजे यांनीं जैनधर्मास उत्तेजन दिलें, जैन पंडितांचा आदर केला आणि जैन देवळांस दानें दिलीं. कल्याणचे चालुक्य जैनधर्मांचा विरोध करीत तरी कऱ्हाडचे शिलाहार राजे, (विशेषतः विजयादित्य ), ते कोल्हापूरच्या महालक्ष्मीचे कट्टेभक्त असूनहि, जैनांना उदार असत आणि जैन मंदिरांना आणि जैन मुनींना त्यांनीं कित्येक गांव इनाम दिले ( ए. इं. ३ पा. २०७ ). बहुधा गुजराथेंत आणि दक्षिण महाराष्ट्र देशांत जैनधर्मांचा प्रसार या दोन्ही राजांच्या वेळीं झाला.

# प्रकरण ४ थें.

## हिंदुधर्माचें बदललेलें स्वरूप.

पूर्वींच्या प्रकरणांत आम्ही जातींचें उपजातीकरण तसेंच विवाह व इतर चालींतील बदल हिंदु इतिहासाच्या या कालविभागांत कोणते झाले याबद्दल विवरण केलें आहे. तसेंच पुढें या कालविभागांत शैव आणि वैष्णव यांचे नवे पंथ उत्पन्न होऊन हिंदु समाजांत ज्या धार्मिक भेगा पडल्या त्याजविषयींहि विवेचन केलें. आतां या प्रकरणांत हिंदु धर्माच्या साधारण इतर स्वरूपाविषयीं चर्चा करून हिंदु धर्माला मध्ययुगीन हिंदुकालाच्या अंतीं हल्लींचें स्वरूप कसें प्राप्त झालें आणि हिंदु धर्माच्या वैदिक स्वरूपाहून तें कसें भिन्न आहे हें दाखवावयाचें आहे. व्यासानें वेदसंहिता जुळवून तयार केल्या तेव्हांपासून मुसलमानांनीं उत्तर हिंदुस्थान जिंकलें तेंथपर्यंतच्या चार हजार वर्षांच्या दीर्घ कालांत हिंदु धर्माचें स्वरूप एकच रहावें हें अशक्य आहे. तथापि हिंदु धर्म हा अद्याप वैदिक ऋषींच्या धर्मांशीं संबंध ठेवीत आहे असें पुढील विवेचनावरून दिसून येईल.

### वेद.

आपल्या विवेचनास वेदांपासून प्रारंभ करूं.हिंदु धर्माचे हे ईश्वरदत्त ग्रंथ आहेत असें मानलें जातें. वेदांचा अभ्यास ब्राह्मण अद्याप तोंडपाठ करून करीत. कारण ब्राह्मणांचें वेदरक्षण करणें हें कर्तव्यच आहे. या विषयासंबंधीं अल्बेरूनीनें पुढील विधानें केलीं आहेत. "ब्राह्मण लोक अर्थ समजल्याशिवाय वेद उच्चारतात आणि अशा रीतीनेंच ते तो घोकतात. फारच थोडे लोक त्याचा अर्थ जाणतात आणि त्याहूनहि थोडे वेदांत एकंदर काय सांगितलें. आहे याची पूर्ण माहिती मिळवितात" (सचाऊ भा. १ पा. १२८). ही

परिस्थिति अद्यापहि कायम आहे, आणि वेदांत निष्णात असलेले ब्राह्मण हल्लीं फारच थोडे आहेत. ही स्थिति प्राचीन म्हणजे बुद्ध-पूर्व काळाहून अगदीं भिन्न आहे. त्यावेळीं प्रत्येक ब्राह्मण किंबहुना क्षत्रिय व वैश्य यांस वेदाध्ययन करावें लागे. अल्बेरूनी पुढें लिहितो. " ब्राह्मण क्षत्रियांस वेद शिकवितात. परन्तु त्यांस तो ब्राह्मणांसहि शिकविण्याचा अधिकार नाहीं. वैश्य आणि शूद्र यांस वेद शिकण्याची परवानगी नाहीं." बौद्ध काळांत पुष्कळ वैश्य बौद्ध झाल्यानें वेदाध्ययन सोडून बसले आणि यामुळें त्यांचा वेदाशीं संबंध सुटला. धर्मनिष्ठ क्षत्रिय अद्याप वेद पठण करीत आणि त्यांस आतांहि अधिकार असला तरी पण थोडेसेच वेद शिकतात.तथापि हल्लीचा कलियुगांत क्षत्रिय नाहींत असा जो समज तो अद्याप उत्पन्न झाला नव्हता, याविषयीं हा स्पष्ट पुरावा आहे. अल्बेरूनीच्या विधानावरून क्षत्रियांचें आस्तित्व तेव्हां मान्य होतें इतकेंच नव्हे, तर ११ व्या शतकांत त्यांना वेदाध्ययनाचा अधिकार मान्य होता असें सिद्ध होतें. अर्थात् 'कलावाद्यन्तयोः स्थितिः' हें विरोधी वचन त्यापुढें उत्पन्न झालेलें १४ व्या शतकांतलें दिसतें, असा भाग २ यांतील परिशिष्टांत दिलेला आमचा सिद्धांत अल्बेरूनीच्या वरील विधानांनीं जास्त मजबूत होतो.

" वेदांत बहुतेक स्तुतिपर पद्यें आहेत आणि अग्नींतील निरनिराळ्या यज्ञांची विधानें आहेत. हे यज्ञ इतकें पुष्कळ व कठिण आहेत कीं, ते तुम्हांला चांगलें मोजतां येणार नाहींत." हल्लीं धर्मनिष्ठ ब्राह्मणांसहि हे यज्ञ किती आहेत हें सांगतां येणार नाहीं. कारण अल्बेरूनीनें हिंदुस्थानची मनोरंजक माहिती दिली त्या काळानंतर वैदिक यज्ञ बहुतेक लुप्त झाले आहेत हें आम्ही पुढें सांगणारच आहों.

" वेद लिहूं नयेत असें हिंदु मानतात. कारण ते विशिष्ट उच्चारानेंच म्हटले पाहिजेत. यासाठीं चुकी होऊं नये म्हणून वेदांस कलम लावीत नाहींत. यामुळें वेद बरेच नष्ट झाले आहेत." या

अशा भोळया समजुतीमुळें वैदिक वाङ्मयाचा बराच भाग, ११व्या शतकापूर्वी लुप्त झालेला दिसतो. पण अल्बेरूनीनें आणखी महत्त्वाची माहिती येथें अशी दिली आहे कीं, त्याच्यापूर्वी थोडींच वर्षें काश्मीरच्या एका प्रसिद्ध वसुक्र नांवाच्या ब्राह्मणानें वेदांचा अर्थ सांगण्याचें काम हातीं घेतलें आणि वेद नष्ट होईल या भीतीनें समग्र वेद लिहून काढला. "सर्व ब्राह्मण ज्या कामाबद्दल मागें सरत तें काम यानें अंगावर घेतलें." याप्रमाणें काश्मीरांत प्रथम वेद इ. स. १०००च्या सुमारास लिहिला गेला असें दिसतें व त्यावर वसुक्रानें भाष्य केलें. हें वसुक्राचें पहिलें वेदभाष्य हल्लीं उपलब्ध आहे कीं नाहीं हें माहीत नाहीं. दक्षिणेंत माधव विद्यारण्यानें विजयानगर येथें केलेल्या व हल्लीं उपलब्ध असलेल्या वेदभाष्यांत त्याचा उपयोग झाला असलाच पाहिजे.

## वैदिक यज्ञ.

प्राचीन वैदिक आर्यांचा मुख्य धर्म अग्नि ठेऊन त्यांत नित्य आणि नैमित्तिक वेदविहित यज्ञ करणें हा होता. छांदोग्य उपनिषदांत अश्वपति राजा आपली प्रजा किती धार्मिक आहे हें वर्णन करितांना 'न मे स्तेनो जनपदे नानाहिताग्निः' 'माझ्या राज्यांत चोर नाहीं आणि ज्यानें अग्नि ठेवला नाहीं असा गृहस्थ नाहीं.' असें म्हणतो. ही प्राचीन परिस्थिति ह्यावेळपर्यंत इतकी बदलली होती कीं एखाद्या हिंदु राजानें माझ्या राज्यांत अग्नि ठेवला आहे असा एकहि गृहस्थ नाहीं असें म्हटलें असतां चाललें असतें. हल्लीं तर ब्राह्मणांनीं सुद्धां अग्नि ठेवणें सोडून दिलें आहे. तथापि अल्बेरूनीच्या काळीं थोडे ब्राह्मण अग्नि ठेवीत असत. तो म्हणतो, "जे ब्राह्मण एक अग्नि ठेवतात त्यांना इष्टिन् म्हणतात आणि जे तीन ठेवतात त्यांना अग्निहोत्री म्हणतात (सदर पा. १०२). याशिवाय जो अग्नीस विशेष आहुति देईल (रोजच्या यज्ञापेक्षां मोठा यज्ञ

करील ) त्याला दीक्षित म्हणतात. " दीक्षित आणि आवस्थिक या ब्राह्मणांच्या सन्मानाच्या पदव्या या काळच्या कोरीव लेखांत येतात. हल्लींच्या काळीं या संज्ञा केवळ आडनांवें बनल्या आहेत. कांहीं थोडे वरचे यज्ञ कधीं कधीं सर्व हिंदुस्थानांत विशेषतः दक्षिणेंत हल्ली केले जातात हें खरें. पण ही वेदविहित कर्मसंस्था म्हणजे गृह्याग्नींत नित्य होम देणें बहुतेक लुप्त झाली आहे असें म्हणतां येतें.

## नैमित्तिक यज्ञ.

पण नैमित्तिक यज्ञ, उदाहरणार्थ उपनयन किंवा विवाह यावेळीं केलेले होम, हल्लींप्रमाणें त्यावेळीहि होत असावेत. भूदानाच्या संस्कारांत या कालविभागांत नेहमीं अग्नींत होम केला जात असे. किंबहुना या कालविभागांतील कोरीव लेख भूमीदानाच्य पवित्र व बडेजावाच्या प्रसंगीं जे दीर्घ धार्मिक विधि केले जात त्यांचें विस्तारानें वर्णन करितात. हीं वर्णनें फारच महत्त्वाचीं आहेत, व त्यावरून सर्व हिंदुस्थानभर हिंदुधर्म आचारांत वैदिक आणि पौराणिक विधि या दोहोंच्या मिश्रणानें कसा झाला होता हें सिद्ध होतें. दान देणारा राजा एखाद्या पुण्यनदींत, एखाद्या प्रसिद्ध घाटावर, स्नान करून देव, मनुष्य आणि पितर यांचें तर्पण करी ( हा विधि वैदिक सूत्रांतला आहे ), सूर्याचें उपस्थान करी ( हाहि वैदिक विधि आहे), नंतर शिव आणि विष्णु यांची पूजा करी ( ह्या पौराणिक देवता आहेत ); आणि शेवटीं पुण्य व पवित्र अग्नींत घृताचे हवि देई ( वैदिक विधि ) आणि नंतर दान घेणाऱ्याच्या हातावर दानजल सोडी.* या विधिवर्णनावरून या वेळचे रजपूत राजे पुराण-

---

* यमुनायां स्नात्वा यथाविधि देवऋषिमनुष्यभूतपितॄंश्च तर्पयित्वा सूर्यभट्टारकयुपस्थाय सर्वकर्तारं भगवन्तं शिवं विश्वाधारं वासुदेवं समभ्यर्च्य हुतवहं हुत्वा ॥ ( इं. ए. १४ पा. १०३ ). कांहीं ठिकाणीं वासुदेवाचें नांव गाळलेलें असतें.

धर्माभिमानी होते इतकेंच नव्हे तर वैदिक यज्ञ करणें महत्त्वाचें मानीत आणि यज्ञ करण्याचा आपला हक्क प्रत्यक्ष बजावीत. पण हे यज्ञ घृत हवींनीं होत असत हें कांहीं लेखांत सांगितलेंहि असतें. जैन सुद्धां हिंदु राजांनीं दिलेल्या दानांच्या मजबुतीकरितां अशा वैदिक यज्ञांनीं दिलेलीं दानें घेत हें सांगण्यासारखें आहे.

## मूर्तिपूजा

यापमाणें या कालविभागांत हिंदुधर्म वैदिक आणि पौराणिक विधींचा मिश्र बनलेला होता आणि हल्लींहि आहे. पण वैदिक तर्पण, सूर्योपस्थान आणि हवन त्यावेळीं होतें, तरी तें हळुहळू पुढें कमी झालें. आणि पौराणिक देवता शिव, विष्णु, देवी, गणेश आणि सूर्य यांचीच पूजा मुख्य होऊन हिंदूंच्या नेहमींच्या धर्मविधींत आली.मूर्तिपूजा वेद-मान्य आहे कीं नाहीं या प्रश्नाचा आम्ही येथें विचार करीत नाहीं. पण वैदिक सूत्रांत ईश्वराच्या नित्यपूजेंत मूर्तींची पूजा सांगितलेली नाहीं. बौद्धधर्मांत ईश्वर नाहीं येथून प्रारंभ झाला आणि शेवटीं बुद्धाच्याच मूर्तीची पूजा सर्वत्र अमलांत आली. असा हा बौद्धधर्म उ-च्छेद पावला तेव्हां हिंदुधर्मांत मूर्तिपूजा जास्त वाढली, आणि प्र-त्येक घरीं लहान लहान मूर्तींची प्रत्यहीं पूजा करण्याचा परिपाठ पडला. किंबहुना निरनिराळ्या निबंधांत आणि धार्मिक विधीवरील ग्रंथांत याजविषयीं वचनेंहि आलीं. हल्लीं चालू असलेली पंचायतन-पूजा या काळांत उत्पन्न झाली किंवा निरनिराळ्या देवतांच्या भक्ती-मधील विवाद काढून टाकण्यासाठीं शंकराचार्यांनीं ती पूर्वीं प्रचारांत आणली हें सांगतां येत नाहीं. पण हें निश्चित आहे कीं, हल्लीं प्र-माणें याकाळीं सुद्धां निरनिराळ्या देवतांच्या लहान मूर्ति प्रत्येक घरांत असत. कारण भूमिदान करितांना कोरीव लेखांत वर्णिलेली शिव किंवा विष्णु किंवा दोन्ही देवता ह्यांची पूजा देवळांत जाऊन

केली असावी असें वाटत नाहीं. ह्या मूर्ति राजगृहांत असलेल्या चलमूर्ति असाव्या. ह्या धातूच्या असत किंवा विशिष्ट खुणांचे, आकाराचे व रूपाचे लहान दगड त्या त्या देवतांचीं माननेलीं प्रतीकें असत. प्रत्येक घरांत होणाऱ्या या मूर्तिपूजेनें गृह्याग्नींतील वैदिक होम शेवटीं मागें पडले.

या देवतांशिवाय प्रत्येक शहरांत व गावांत निरनिराळ्या देवतांचीं मंदिरें असत, व त्यांत दगडांच्या किंवा धातूंच्या मूर्ति ठेविल्या जाऊन त्यांची पूजा होत असे. राजे, राण्या, प्रधान, श्रीमंत व्यापारी किंबहुना भिक्षा मागणारे ब्राह्मण तपस्वी ज्यांस त्यांच्या पवित्र आचरणाच्या आदरानें शेंकडों देणग्या मिळत, असे सर्व, स्पर्धेनें प्रचंड व सुंदर देवळें आपापल्या इष्टदेवतेंचीं विशेषतः शिवाचीं आणि विष्णूचीं बांधीत. अर्थात् सर्व हिंदुस्थान देश अशा मंदिरांनीं या कालविभागांत भरून गेला होता. या देवळांत ठेविलेल्या मूर्ति बहुधा दगडाच्या असत. परंतु कित्येकदां सोन्याचांदीच्या किंबहुना रत्नांच्याहि मूर्ति असत. श्रीमंत राजे व व्यापारी ह्यांच्या मदतीला या बाबतींत अंधश्रद्धाहि उपयोगी पडली. आणि निरनिराळ्या द्रव्याच्या मूर्ति बनविण्याचे निरनिराळे अधिक फळ मानलें गेलें. अल्बेरूनी लिहितो, " रत्नाची मूर्ति केली असतां राष्ट्रांतील स्त्रीपुरुषांचें कल्याण होईल. सोन्याच्या मूर्तीपासून ती करणाऱ्यास सत्ता मिळेल. चांदीच्या मूर्तीनें कीर्ति आणि पितळेच्या मूर्तीनें दीर्घराज्य मिळेल. दगडाची मूर्ति जमीनीची मिळकत ज्यास्त देईल " ( सदर पा. १२१ ). याप्रमाणें धनवान् राजे व व्यापारी यांस सोन्याचांदीच्या किंबहुना रत्नाच्या मूर्ति करण्यास प्रोत्साहन मिळे, पण त्याचा उपयोग लुटारू व जेते यांना धर्महानि करण्याच्या कामीं बोलावणें करण्यांत होई. अल्बेरूनी यानें युक्तीनें येथें आणखी असें लिहिलें आहे कीं, " मूर्तींचा आदर हिंदुलोक, जे मूर्तींची प्रतिष्ठा करितात त्यांच्यामुळें करितात.

मूर्ति ज्या द्रव्याची बनली आहे त्यामुळें करीत नाहींत." अर्थात् दगडाची मूर्ति सोन्याच्या मूर्ति इतकीच भक्ताला फलप्रद होई. परंतु मौल्यवान् मूर्ति चोरांच्या आणि लुटारूंच्याच फायद्यावर पडत. महमुदानें शेंकडों देवालयें लुटून सोन्याच्या मूर्ति नेल्या तरी हिंदुलोक सोन्याच्या मूर्ति करीतच राहिले, किंवा दगडाच्या मूर्तींना मोल्यवान् दागिने घालीतच राहिले, हें या कालविभागांतील पूर्वी सांगितलेल्या कोरीव लेखांवरून सिद्ध होतें. सोन्याच्या मूर्ति करणें मागें पडलें आहे तरी मूर्तींना दागिने घालण्याचा सोस चालूच आहे.

पु. ६ प्र. १६ यांत यावेळीं हिंदुस्थानांत मूर्तिपूजेचा भोळसटपणा किती वाढला होता हें आम्ही वर्णिलेंच आहे. अल्बेरूनीच्या तत्त्व-विवेचक बुद्धीस हिंदूंतील मूर्तिपूजेचा भर आश्चर्यकारक वाटे. तथापि त्यानें हें मान्य केलें आहे कीं, प्राचीनकाळीं सर्व मनुष्यजात, अरब सुद्धां, मूर्तिपूजक होती. अल्बेरूनीनें प्रांजलपणें हेंहि कबूल केलें आहे कीं, हिंदुस्थानांत मूर्ति न पूजणारे तत्त्ववेत्ते लोक होते. हिंदूंच्या मूर्तिविषयक चमत्कारिक कल्पना संबंधें लिहितांना त्यानें असें म्हटलें आहे कीं या कल्पना सामान्य अशिक्षित लोकांच्या आहेत. "जे मोक्षाच्या मार्गाला लागले आहेत किंवा जे तत्त्वज्ञानाचा विचार करितात ते परमेश्वराची म्हणून बनविलेली मूर्ति पूजिण्याचें स्वप्नांतहि आणीत नाहींत." अल्बेरूनीनें अंबरीष आणि नारद ह्यांच्या कथा, हिंदु मूर्ति कसे पुजूं लागले ह्याचा इतिहास सांगण्यासाठीं दिल्या आहेत, त्या येथें देण्याची आवश्यकता नाहीं. पण हिंदुस्थानांतील त्यावेळच्या प्रसिद्ध मूर्ति त्यानें विस्तारानें वर्णिलेल्या आहेत, तें वर्णन येथें देण्यासारखें आहे. प्रथम मुलतान येथें सूर्याची मूर्ति होती. "ही मूर्ति लाकडाची असून कोरडोव्हा येथील चर्मानें ती वेष्टिलेली आहे. तिच्या डोळ्याच्या ठिकाणीं दोन लाल बसविले आहेत. ही गेल्या कृतयुगांत ( म्हणजे सुमारें ४३ लक्षवर्षांपूर्वी ) बन-

विली गेली अशी समजूत आहे. महमद कासमनें मुलतान जिंकलें तेव्हां त्या मूर्तीचें पुष्कळ उत्पन्न आहे असें पाहून त्यानें ती राहूं दिली. पण त्याच जागेवर त्यानें एक मशीद बांधली. जेव्हां कार्मेतियन पंथी मुसलमानांनीं मुलतान घेतलें तेव्हां जालम इबन शैबान यानें ही मूर्ति फोडून पूजाऱ्यांची कत्तल केली. त्यानें खलिफांची बांधलेली मशीद बंद करून सूर्यदेवाच्या मंदिराचीच कार्मेतियन मशीद बनविली. जेव्हां यशस्वी महमुदानें कार्मेतियन सत्तेस तेथून हांकून लावलें तेव्हां जुनी मशीद त्यानें उघडून तीच जुम्मा प्रार्थनेची जागा केली आणि कार्मेती मशीद ओस पडूं दिली." ही मुलतानच्या सूर्यदेवाच्या मंदिराच्या दैवविलसिताची मनोरंजक हकिकत नमूद करण्यासारखी आहे.

अल्बेरूनीनें यापुढें जी माहिती दिली आहे ती फारच महत्त्वाची आहे. माहितीच्या या खजिन्याची यापूर्वी आम्ही पूर्ण तपासणी केली नाहीं याबद्दल वाचकांची क्षमा मागावयास पाहिजे. येथील वर्णन इलियटलाहि कसें सांपडलें नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें. त्यास व आम्हांस जी दोन गूढें पडली होतीं त्यांचा खुलासा या वर्णनावरून होतो. अल्बेरूनी लिहितोः—(सचाऊ भा. १ पा. ११७) "ठाणेश्वर येथें सर्व हिंदूंस अत्यंत आदर असलेली चक्रस्वामिन् नांवाची मूर्ति, होती. ती पितळेची असून मनुष्याच्या उंचीची आहे. ही मूर्ति, सोमनाथाचा स्वामी महादेवलिंग यासह, हल्लीं गझनीच्या भुयारांत पडली आहे. चक्रस्वामीची मूर्ति भारताच्या वेळीं त्या नांवाच्या युद्धाच्या स्मरणार्थ केली असें मानतात." या वर्णनावरून दोन गूढ सुटतात. पुढील मुसलमानी इतिहासकारांनीं ठाणेश्वराच्या मूर्तीचे नांव जगसोम असें दिलेलें, चक्रस्वामी या नांवाबद्दल पार्शी लिपींत चुकीनें वाचलें गेलेलें स्पष्ट आहे; आणि ही मूर्ति शिवाची नसून विष्णूची होती. दुसरें उत्बीनें जरी सोमनाथावरील महमुदाच्या

स्वारीचें वर्णन केलें नाहीं, तरी १०३० इसवीमध्यें केलेल्या या अल्बेरूनीच्या विधानावरून, तें तत्कालीन असल्यानें, सोमनाथावरील स्वारीच्या सत्यतेबद्दल कांहीं एक शंका उरत नाहीं.

या मूर्ति हजारों किंवा लाखो वर्षांपूर्वी बनविल्या गेल्या असें भोळसटपणानें समजलें गेल्यामुळें त्यांच्याविषयीं अत्यंत आदरभाव होता आणि त्यांच्या ठिकाणीं अद्भुत शक्ति आहे अशीहि लोकांची कल्पना असे. अथात् मुलतान आणि ठाणेश्वर यांत अमूप संपत्ति लोटली आणि त्याचा परिणाम या देवस्थानांचा नाश करण्यांत झाला.

अल्बेरूनी आणखी एका प्रसिद्ध मूर्तीचा उल्लेख करितो, ती काश्मीरांतील शारदेची मूर्ति होय. हिच्या दर्शनास शंकराचार्य गेले होते. ह्याशिवाय हिंदुस्थानांतील ज्या प्रसिद्ध मूर्तीविषयीं ऐतिहासिक दाखला मिळतो त्या काशी व उज्जयिनी येथील शिवाच्या मूर्ति, भोलसा येथील भैल्लस्वामी नांवाची विष्णुमूर्ति, जगन्नाथ येथील विष्णूची मूर्ति आणि पंढरपूरचा विठोबा व कोल्हापूरची महालक्ष्मी या होत. याशिवाय कांची येथील शिवाची मूर्ति व अल्बेरूनीनें स्वतः सांगितलेली रामेश्वरची मूर्ति यांचा उल्लेख केला पाहिजे. कोट कांगडा येथील देवीविषयीं आम्ही पूर्वीं लिहिलेंच आहे. आणि उत्बीनें वर्णन केल्याप्रमाणें मथुरा आणि कनोज येथील शेंकडों मूर्ति महमुदानें फोडल्या.

येथें अल्बेरूनीनें वराहमिहिराच्या बृहत्संहितेचा नामनिर्देश करून निरनिराळ्या देवांच्या मूर्ति कशा असाव्या याविषयीं माहिती दिली आहे. यावरून दोन तीन मनोरंजक गोष्टी स्पष्ट होतात त्या प्रथम सांगूं. पहिली गोष्ट ही कीं, रामानंदाच्या पूर्वीं रामाचीं देवळें नव्हतीं अशी शंका पुष्कळ लोक घेतात. पण वराहमिहिरानें दशरथपुत्र राम याच्या मूर्तीचें वर्णन केलें आहे आणि अल्बेरूनीनें तें घेतलें आहे, यावरून सहाव्या शतकापासून अकराव्या शतकापयत

रामाच्या मूर्तीची पूजा होत असे असें सिद्ध होतें. दुसरें, विष्णूच्या मूर्तींना आठ हात, चार हात आणि दोन हात असल्याचें वर्णन आहे आणि या हातांत निरनिराळ्या वस्तु किंवा आयुधें द्यावयाचीं आहेत. दोन हाताची विष्णूचीं मूर्ति केल्यास एका हातांत शंख असे आणि दुसऱ्या हातानें पाणी काढीत आहे असें दिसे. हें वर्णन चमत्कारिक आहे, आणि पंढरपूरच्या विठोबाच्या मूर्तीस लागू नाहीं. तिसरें, बलदेव, प्रद्युम्न, सांब, ब्रह्मा, इंद्र, यम, सूर्यपुत्र रेवंत, सूर्य, सप्तमातृ, भगवती आणि 'मनुष्याच्या शरीरावर हत्तीचें डोकें असलेला' विनायक यांच्या मूर्तीचें वर्णन आहे. शेवटल्या दोहोंशिवाय बाकीच्या सर्व मूर्ति अलीकडे दिसत नाहींत. कांगड्यांतील वैजनाथाच्या देवळांत द्वारांत शिरतांनाच एक गणेशाची मूर्ति आहे; तिला सहा हात असून भगवद्गीतेवरील आपल्या प्रसिद्ध ( ज्ञानेश्वरी ) टीकेंत ज्ञानेश्वरांनीं वर्णिलेल्याप्रमाणें ह्या सहा हातांत आयुधें आहेत. या वैजनाथ देवळाच्या भिंतीवर आणि शिखरावर बाहेरून निरनिराळ्या देवतांच्या मूर्ति कोरल्या आहेत, त्या इतक्या मनोहर आणि निरनिराळ्या देवतांचें सांगितलेले परिषद, वाहनें व आयुधें यांच्या बारीक वर्णनाप्रमाणें हुबेहुब व अगदीं प्रत्यक्ष असल्यासारखें तंतोतंत कोरल्या असून त्यांचा अभ्यास करण्यासारखा आहे. हें देऊळ त्यांत कोरलेल्या लेखावरून इ. स. १२०० च्या सुमाराचें बांधलेलें आहे.

"या मूर्तींचे भक्त मेंढे आणि टोणगे कुऱ्हाडीनें मारतात, व त्यांचे रक्त पिऊन स्वतःस पुष्ट करितात." हें अल्बेरूनीचें विधान चमत्कारिक आहे. तें प्रत्यक्ष निरीक्षणाचे नसून शाक्ततंत्रांतलें असावें. निरनिराळ्या देवांच्या पूजाऱ्यांविषयीं अल्बेरूनी पुढील माहिती देतो. "विष्णूचे पूजारी भागवत असतात. सूर्याचे मग ब्राह्मण आणि महादेवाचे पूजारी जटा वाढविलेलें, अंगाला राख लाविलेले, गळ्यांत मेलेल्यांच्या हाडांचीं माळा घातलेले आणि तळ्यांत डुबक्या मारणारे

असे तपस्वी असतात" (पा. १२०). ह्या विधानाला या काळां-तील कोरीव लेखांत विशेषतः महादेवाच्या पूजाऱ्यांसंबंधानें दुजोरा मिळतो. बदाऊं येथील शिलालेखांत (ए. इं. भा. १ पा. ६४) दोन शैव तपस्व्यांचें विस्तृत वर्णन आहे. पहिल्याचें नांव वर्मशिव असून तो अनहिलपाटणचा राहणारा होता. लहानपणीं दाक्षिण देशांत गेला असतां बौद्धांनीं बसविलेली एक मूर्ति त्यानें काढून टाकली. पुढें उत्तर वयांत तो तपश्चर्येनें व विद्वत्तेनें प्रसिद्धि पावला आणि फिरत फिरत बदाऊं येथें आला. तेथें रुल्ह नांवाच्या तेथील राजाच्या एका दिविर मंत्र्यानें बांधलेल्या शिवादेवालयांत त्यास पूजा सांगितली. "दुसरा तपस्वी मूळचा हरियान (दिल्ली भोंवतालच्या) देशांतील राहणारा ब्राह्मण असून त्यानें शिवाच्या सेवेसाठीं धनाचा व संसाराचा त्याग केला. त्याचा एक शिष्य पंचप्रवरी वत्सगोत्री गौड देशांतील ब्राह्मण असून त्याचें नांव ईशानशिव होतें, व त्यास गुरूनें पूर्ण परीक्षा करून तपस्व्याच्या गादीवर बसविलें. त्यानें त्या भरतपुरींत उंच शिखराचें एक सुंदर शिवालय बदाऊंच्या राजाच्या त्याच रुल्ह मंत्र्याच्या मदतीनें बांधलें. त्या देवालयांतील पूजाहि वरील तपस्व्यास सांगितली." या वर्णनावरून शैव तपस्वी ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर दोन्ही दिसतात. आणि ते एकाच प्रकारचे कठीण तप आचरून आयुष्य ईश्वरसेवेंत घालवीत. ब्राह्मणेतर तपस्वी शिव-देवालयांतील मूर्तींची पूजा संभाळी. हल्लींहि अशीच चाल आहे. देवालयाचा पूजाक्रम याप्रमाणें शैव तपस्व्यांच्या स्वाधीन केल्याचा दाखला पुष्कळ कोरीव लेखांत मिळतो. उदाहरणार्थ, आल्हणदेवीच्या भेराघाट शिलालेखांत तिनें बांधलेल्या शिवदेवालयाची संभाळ एका

लाट तपस्व्याकडे दिल्याचें विधान आहे. (इं. ए. १ पा. ५२) तसेंच वत्सगोत्री एका ब्राह्मण तपस्व्यानें बांधलेलें शिव देवालय व दुसरें मध्यदेशांतील एका गंगाधर नांवाच्या धर्मशील व विद्वान् ब्राह्मणानें बांधलेलें, शैव तपस्व्यांच्या स्वाधीन केल्याचा दाखला ए. इं. २ (पा. ५२ व ४१) यांत आहे.

## मठ.

हे तपस्वी, शैव किंवा वैष्णव, देवळांच्या शेजारीं रहात. हुएन-त्सांगनेंहि लिहिलें आहे कीं, "शैव तपस्वी आणि जैन अथवा निर्ग्रंथ मुनि आपापल्या मठांत व देवालयांत राहतात." याप्रमाणें मठांची संस्था इ. स. ६०० इतकी जुनी निश्चयानें आहे आणि ती बहुधा बौद्ध विहारांची नक्कल आहे. या कालविभागांत बौद्ध धर्म मगधा-खेरजि इतरत्र नष्ट झाला, आणि बहुधा बौद्ध मंदिरे आणि विहार शिवाची आणि विष्णूची मंदिरें व मठ यांत रूपांतरित झाले. पण या काळच्या कोरींव लेखांत मठ बांधल्याचा स्पष्ट दाखलाहि मिळतो ए. इं. २ (पा. ३१०). यांत एक व्याख्यानशाला बांधल्याचा व तसेंच शिवमंदिराच्या जवळ उद्यानशाला बांधल्याचा उल्लेख आहे. तेव्हां तपस्व्यांच्या व्याख्यानाकरितां जागा व राहण्याकरितां मठ बहुधा बांधीत असावेत. दाक्षिण हिंदुस्थानाशिवाय असे मठ आतां बहुधा दिसत नाहींत. म्हणजे हल्लीं आपल्यास जसे बौद्ध संन्याशाचे विहार दिसत नाहींत तसेच पाशुपत योग्यांचे मठहि दिसत नाहींत.

## आगम आणि तंत्रग्रंथ.

निरनिराळ्या देवांच्या निरनिराळ्या पूजांचे प्रकार, त्याचप्रमाणें तप आणि संन्यास यांचे निरनिराळ्या तपस्व्यांच्या भिन्नभिन्न पंथांत

---

* लाटान्वयः पाशुपतः तपस्वी श्रीरुद्रराशिर्विधिवत् व्यधत्ताम्। स्थानस्य रक्षाविधिमस्य तावद्यावन्निमीते भुवनानि शंभुः ॥

चालू असलेले आचार यांनीं या कालविभागांत नवीन धर्मग्रंथ, आगम आणि तंत्र या नांवाचे, उत्पन्न केले, व त्यांत हे निरनिराळे प्रकार विधि म्हणून सांगितले गेले. असे आगम पुष्कळ आहेत; पण ते हल्लींच्या हिंदु धर्मांतील पांच मुख्य देवांच्या पूजेसंबंधाचेच आहेत. या पांच देवांच्या निराळ्या पूजाविधींतहि भिन्नभिन्न पंथ आहेत, व एक पंथ दुसऱ्या पंथाहून पाहिल्याबरोबर भिन्नपणें ओळखण्यासाठीं प्रत्येक पंथांत कपाळावरील गंध लावण्याची तऱ्हा निराळी सांगितली आहे. वेदाला निगम संज्ञा असून या नवीन धर्मग्रंथांना आगम म्हणतात; आणि आगमांचा अधिकार वेदाहूनहि जास्त समजला जातो. तंत्र म्हणजे अशाच प्रकारचे दुसरे ग्रंथ असून त्यांत निरनिराळ्या पूजाविधींबरोबर अनेक मंत्र व गुप्तपणें करण्याचे कित्येक विधि सांगितलेले असतात. या तंत्रविधींत ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर यांचा समान हक्क असे असें दिसतें. वैदिक तप आणि संन्यास यांची मोकळीक फक्त ब्राह्मणांसच मानीत, पण आगमांतील तपश्चर्या सर्व हिंदूंना सारखी मोकळी मानल्याचें दिसतें. हें आगम आणि तंत्रांचें वाङ्मय निरनिराळें आणि विस्तृत असून त्याचा ऐतिहासिक दृष्ट्या विचार करण्यास त्यांचा अभ्यास करणें जरूर आहे. तथापि शंकराचार्यांच्या पूर्वींच असें वाङ्मय उत्पन्न झालें होतें हें निश्चित दिसतें. कारण पाशुपतादि अनेक मतवाल्याशीं शंकराचार्यांचा विवाद झाला. या कालविभागांत हें वाङ्मय जास्त महत्त्वास आलें, आणि म्हणूनच या काळांतील कोरीवलेखांत निरनिराळ्या तपस्व्यांचें वर्णन येतें.

## संस्कार व कर्में यांची वाढ.

हे नवीन धार्मिक वाङ्मय उत्पन्न झाल्यानें धार्मिक कर्में, विधि व संस्कार वाढले हे सांगावयास नको. प्रत्येक देशांत धर्मशास्त्राचा अभ्यास अधिक झाला, आणि अनेक संस्कार व विधि यांवर विस्तृत

ग्रंथ विद्वान् ब्राह्मणांनीं किंबहुना राजांनीं लिहिले. या कालांतील धर्मावरचा पहिला ग्रंथ म्हटला म्हणजे विज्ञानेश्वराची मिताक्षरा होय. हा ग्रंथ याज्ञवल्क्य स्मृतीवर दक्षिणेंतील कल्याण येथें लिहिला गेला, ठाण्याचा राजा अपरादित्य यानें अपरार्क नांवाचा दुसरा विस्तृत ग्रंथ लिहिला. बंगाल्यांत बल्लालसेनानें निरनिराळ्या अनेक दानांवर दानसागर ग्रंथ स्वतः लिहिला आणि त्याचा पुत्र लक्ष्मण-सेन याच्या दरबारांतील विद्वान् पंडितांनीं अनेक ब्रह्मकर्मसमुच्चयासारखे दुसरे ग्रंथ लिहिले. गोविंदचंद्राच्या अमदानींत कनोज येथेंहि धर्म-शास्त्रावर ग्रंथ झाले. आणि शेवटीं हेमाद्रीच्या चतुर्वर्गचिंतामणि नांवाच्या प्रचंड ग्रंथाचा उल्लेख केला पाहिजे. हा ग्रंथ आमच्या कालानंतर सुमारें १०० वर्षांनीं देवगिरी येथें निर्माण झाला. या अनेक ग्रंथावरून हल्लींचा हिंदुधर्म या कालविभागांत पुराणें आणि आगम यावरून कसा निघाला आणि मूळच्या साध्या वैदिक आर्य-धर्म—स्वरूपाहून त्यास निराळें कसें स्वरूप आलें हें दिसून येईल. उदाहरणार्थ, बाणानें प्रतापवर्धनासारख्या एका मोठ्या राजाच्या उत्तरक्रियेचें जें साधें वर्णन केलेलें भाग १ यांत आम्ही विस्तारानें दिलेलें आहे त्याची, व गरुड पुराणांतील वर्णिलेलीं अंत्यविधीचीं निरनिराळीं श्राद्धें व दानें यांची, तुलना करावी. सर्वच बाबतींत संस्कार वाढले; आणि अनेक व्रतें व क्रिया, पौराणिक देवतांच्या भक्तीसंबंधें उत्पन्न होऊन प्रचारांत आल्या; त्या विस्तारानें येथें सांगणें आवश्यक नाहीं. विशेषतः ब्राह्मणाचें आन्हिक धार्मिक कृत्य इतकें निरनिराळ्या कर्मांनीं भरलेलें सर्वव्यापी झालें कीं, त्यास फुर-सत थोडीच राहत असे. नैमित्तिक संस्कार व कर्मेंहि पुष्कळ वाढलीं. वैदिक यज्ञांच्या ऐवजीं प्राणिहिंसाविरहित नवीन यज्ञ निरनिराळ्या भानगडीच्या संस्कारांसह विशेषतः विष्णु आणि देवी यांच्या भक्ति-संबंधें सांगितले गेले. पौराणिक देवतांच्या रथयात्रा जैन रथयात्रांच्या

अनुकरणानें प्रचारांत आल्या. तात्पर्य नवीन आगमांप्रमाणें आणि विस्तारलेल्या पुराणांप्रमाणें पौराणिक देवतांची भक्ति इतकी वाढली कीं, वैदिक सूत्रांत सांगितलेलें धर्मविधि मागें पडले. तरी पण ब्राह्मण-क्षत्रियांत हे विधि आणखी पौराणिक विधींसह चालू राहिले.

अल्बेरूनीनें त्याच्या काळीं पंजाबांत चालू असलेले उपवास आणि उत्सव यांचे दिवस विस्तारानें वर्णिले आहेत;ते आम्हां पुढें टिप्पणींत देतो. ते बहुतेक हल्लींच्या सारखेच आहेत, पण कांहीं हल्लीं लुप्त झाले आहेत. हे मुख्यतः शिव आणि विष्णु यांच्या भक्तिसंबंधें असून कांहीं देवी आणि सूर्य यांच्या भक्तिसंबंधीं आहेत. अल्बेरूनीनंतरच्या काळांत आगम आणि पुराण यावरून आणखी कित्येक पवित्र दिवस उत्पन्न झाले असावे. किंबहुना अल्बेरूनीची यादीच परिपूर्ण नसावी. असे विशेष पवित्र दिन शिलालेखांत आढळतात. उदाहरणार्थ एका कलिंग दानपत्रांत ( ए. इं. ४ )आपल्यास गोविंद-द्वादशीचा उल्लेख आढळतो. या लेखाच्या प्रसिद्ध करणाऱ्यानें गोविंद-द्वादशीची व्याख्या दिली आहे, त्यांत कित्येक ग्रहांचे विशेष योग दिलेले आहेत.* सूर्यचंद्रांच्या व ग्रहांच्या निरनिराळ्या नक्षत्रांतील व राशींतील स्थितींवरून अनेक पवित्र योग उत्पन्न झाले आणि पवित्र दिवसांची संख्या वाढली. श्राद्धांचीहि संख्या वाढली हें सांगावयास नको. कन्यागत श्राद्धाचा उल्लेख गुजराथच्या वीसळदेवाच्या १२५४ इसवीच्या एका कोरीवलेखांत आला आहे ( इं. ए. २ पा. १९४ ).

## पुराण ग्रंथांची वाढ.

पंथापंथांचे आगम आणि तंत्र यांशिवाय मध्ययुगीन हिंदुकालांत प्राचीन पुराणांच्या विस्तृत आवृत्ति निघाल्या. प्राचीन अठरा पुराणें

---

* फाल्गुनस्य च द्वादश्यां कुंभस्थितदिवाकरे । नक्रस्थिते सूर्यसुते जीवे कार्मुकसंस्थिते ॥ पुष्यर्क्षे बवसंयुक्ते शोभने भानुवासरे । गोविंदद्वादशी प्रोक्ता देवानामपि दुर्लभा ॥

लहान असून त्यांत यावेळीं या पांच देवतांच्या भक्तिसंबंधें विशिष्ट-पंथयुक्त भाग आणखी घातले गेले. यामुळें या देवतांस पौराणिक योग्य रीतीनें म्हणतात. पुराणांत शिव, विष्णु, देवी आणि गणपति यांचें महत्त्व वर्णिलेलें आहे, आणि त्यांच्या भक्ति संबंधाची अनेक व्रतें सांगितलीं आहेत. शिवाची भक्ति एकंदर जनसमाजांत जास्त असल्यानें दहा पुराणांत शिवाचें महत्त्व वर्णिलेलें आहे; विष्णूच्या माहात्म्याचीं चार असून देवी व गणपतीचें महात्म्य वर्णिणारीं दोन दोन आहेत.* या कालविभागांत सूर्याची भक्ति मागें पडलेली दिसते; पण दहाव्या शतकांत भागवत पुराण उत्पन्न झाल्यानें विष्णुभक्तीस फार जोर आला. या देवतांच्या भक्तीचे निरनिराळे विधि व पंथ प्रचारांत आले. शिव, विष्णु, देवी आणि गणपति यांच्या अनेक मान्य मूर्तिसंबंधानें सबंध हिंदुस्थानांत प्रसिद्ध असलेलीं क्षेत्रें पुराणांत परिगणित केलीं असून त्यांचें माहात्म्य वर्णिलें आहे. स्कंदपुराणांत हिंदुस्थानांतील चौऱ्याशी प्रसिद्ध शिवलिंगें सांगितली असून प्रत्येक लिंगाच्या माहात्म्यासंबंधें विशिष्ट पौराणिक गोष्टी दिल्या आहेत. इतर पुराणांत विष्णु, देवी आणि गणपति यासंबंधीचीं पुण्यस्थानें वर्णिलीं आहेत व त्यांच्या गोष्टी दिल्या आहेत. हें सर्व वाङ्मय पहिल्या आणि दुसऱ्या कालविभागांत वाढलें जाऊन तिसऱ्या कालविभागांत हल्लीं आहे तसें झालें असावें.

## उपस्मृत्या आणि उपपुराणें.

हिंदुधर्माचें बदललेलें स्वरूप आणि त्यांत वाढलेलीं व्रतें आणि संस्कार यांनीं उत्पन्न झालेली गरज, आगमांच्या उत्पत्तीनें व अठरा पुराणांच्या विस्तारानें, भागली न जाऊन जुन्या अठरा स्मृतींशिवाय

---

* अष्टादशपुराणेषु दशभिर्गीयते शिवः ।
चतुर्भिर्गीयते विष्णुर्द्वाभ्यां शक्तिश्च विघ्नपः ॥

उपस्मृत्या आणि जुन्या अठरा पुराणांशिवाय उपपुराणें या किंवा पूर्वीच्या कालविभागांत उत्पन्न झालीं. आम्ही इतस्त्र दाखविलें आहे कीं, याप्रमाणें भागवतपुराण १०व्या शतकांत उत्पन्न झालें. उपस्मृत्या आणि उपपुराणें यांत कोणते नवीन विधि सांगितले आहेत हें पाहून त्यांचा काल ठरविणें हें फार महत्त्वाचें व मनोरंजक आहे; पण हें वाङ्मय फार मोठें असून त्याचा अभ्यास करण्यास फार मेहनत लागणार आहे. तथापि बहुतेक असें निश्चयानें म्हणतां येतें कीं, हें वाङ्मय या कालविभागांत उत्पन्न झालें, कारण कलिवर्जांचा उल्लेख या उपपुराणांत विशेषतः आदित्यपुराणांत सांपडतो. या कलिवर्जांवरून सूत्रकाळाच्या वैदिक धर्माहून हल्लीचा हिंदुधर्म कसा भिन्न आहे ह्याची संपूर्ण कल्पना येते. या पुराणांत सांगितलेले कलियुगवर्ज धर्म म्हणजे, वैदिक सूत्रकालापासून (इ. स. पू. १००० ) मध्ययुगीन काळाच्या अंतापर्यंत ( सुमारें १२०० इसवी ) जे धर्म किंवा विधि लुप्त झाले तेच होत. हल्लीच्या हिंदुधर्मांत काय चालू आहे आणि वैदिक सूत्रांत किंबहुना स्मृत्यांत काय मान्य आहे ह्यांच्या तुलनेनें हे कालिवर्ज नियम सहज काढतां येतात. या यादीवरून हिंदुधर्माची बदललेली स्थिति पूर्णपणें लक्षांत येते. अशा बदलास कांहीं तरी आधार पाहिजे म्हणून हें कलिवर्ज प्रकरण उपपुराणांत दिलें गेलें आणि निबंधकारांनीं म्हणजे धर्मशास्त्रावरील ग्रंथकारांनीं उपपुराणांतील हीं वचनें आधारास घेतलीं.

## कलिवर्ज

कलिवर्ज वचनें ( हीं परिशिष्टांत दिलीं आहेत ) बारकाईनें तपासलीं असतां आपल्यास असें दिसून येतें कीं, यांतले कांहीं निषेध या कालविभागांत उत्पन्न झाले व अनेक निषेध ह्याहि पूर्वकालीं उत्पन्न झाले. चितेंत अथवा कड्यावरून उडी घेऊन प्राण देण्याच ।

निषेध ( एका विशेष वचनानें हा निषेध आहे असें अल्बेरूनीनेंहि लिहिलें आहे ) पूर्वीं दाखविल्याप्रमाणें १००० इसवीच्या सुमारास उत्पन्न झाला असावा. पूर्वीच्या कालविभागांत धर्मशील हिंदूंनीं चितेंत जाळून घेतल्याचीं उदाहरणें आहेत. खुद्द कुमारिल यारीतीनें चितेंत जळून मेला. तसेंच शेण्यांच्या होळींत कुमारगुप्त जळून मेल्याचा उल्लेख एका कोरीव लेखांत आहे ( भा. १ पा. ९७ ). याचप्रमाणें अनुलोम असवर्ण विवाहाचा निषेध स्पष्टपणें या काळांतला आहे. कारण राजशेखरानें ( सुमारें ९४० इ. ) क्षत्रिय स्त्री केली होती. संन्यासाचा निषेध बौद्धकाळांतला दिसतो,आणि अग्निहोत्राचाहि तसा दिसतो. कुमारिल आणि शंकरानंतर हे निषेध काढून टाकलेले दिसतात. कारण संन्यास व अग्निहोत्र अद्याप थोडे तरी ब्राह्मण घेतात. यामुळें या दोन विषयांवर कलिवर्ज वचनांत विरोधी वाक्यें आहेत. दुसरें असें कीं, कांहीं कलिवर्ज-निषेध बुद्धीस पटणारे असून दया किंवा नीतीची शुद्धता यांनीं स्पष्टपणें प्रेरित आहे. पण कांहीं निषेध केवळ धर्मवेडामुळें घातलेले दिसतात. सर्व जातींत विशेषतः ब्राह्मणांत जातीच्या शुद्धतेच्या कल्पना इतक्या वाढल्या कीं, जातीच्या बाहेर विवाह तर बंद झालाच पण खाणें पिणेंहि बंद झालें. कांहीं उत्तर हिंदुस्थानच्या ब्राह्मणांच्या पोटजातींत कधीं कधीं जातींतीलच पण परकीय इसमाच्या हातचें अन्नहि चालत नाहीं व पाणीहि चालत नाहीं. दक्षिण हिंदुस्थानांत अस्पृश्यांची छायाहि दोषी समजतात. पूर्वीच्या कालविभागांत क्षत्रिय व वैश्य यांच्या येथें ब्राह्मण अन्न खात, किंबहुना कित्येक शूद्रांचेंहि खात, ही गोष्ट आतां कलिवर्जवचनानें बंद झाली. पण ब्राह्मणा-ब्राह्मणांत किंवा क्षत्रियांत व वैश्यांत आपसांत जेवण्याची मनाई कोणत्याच वचनानें नाहीं. पण हीहि प्रथा या कालविभागांत जातीच्या शुद्धतेच्या कल्पनेनें बंद झाली.

## शुद्धीकरणाचा निषेध.

पण सर्वांत धर्मवेड्या मतांचा व जातीच्या शुद्धतेच्या कल्पनांचा जास्त हानिकारक परिणाम शुद्धीकरणाच्या निषेधानें झाला. हा निषेध अल्बेरूनीच्या काळीं झालेला दिसतो, आणि यासंबंधें कलिवर्ज वचनहि नाहीं.एका विद्वान्ब्राह्मणाशीं या विषयावर अलबेरूनीचें भाषण झालें असें दिसतें. कारण तो असें स्पष्ट म्हणतों कीं मुसलमानी देशांत गुलाम करून नेलेले लोक परत आले असतां त्यांच्या शुद्धीकरणार्थ प्रायश्चित्त सांगितलेलें आहे. पण हें प्रायश्चित्त वर्णन करून तो पुढें असें लिहितो कीं, असे लोक पुनः जातींत घेतले जात नाहींत, असेंच तो ब्राह्मण म्हणाला (सचाऊ भा. २ पा. १६३ ). अल्बेरूनीच्या काळांत सुद्धां लोकमताची ही स्थिति होती, मग या कालविभागांत आणि नंतर, हिंदु लोकांच्या धर्मवेडाला जास्तच जोर आला हें सांगणें नको. त्यामुळें जबरदस्तीनें बाटविलेल्या लोकांस त्यांच्यावर जबरीनें लादलेल्या धर्मांत राहण्याशिवाय गत्यंतर राहिलें नाहीं. 'एकदां बाटला कीं पक्का बाटला असाच' हिंदुधर्माचा सिद्धान्त ठरला. यामुळें हजारों हिंदु पुष्कळदां अपराधाशिवाय कायमचे मुसलमान किंवा खिस्ती झाले हें आपल्यास माहितच आहे.

टिपणी

## अल्बेरूनीनें परिगणित केलेलें उपास व उत्सवदिवस

(१) अल्बेरूनीनें हिंदूंतील उपवासदिन विस्तारानें दिले आहेत, ते पंजाब व काश्मीरांतील आहेत. कांहीं थोड्याशा फरकानें ते व हल्लीचे एकच आहेत. तो लिहितोः—( सचाऊ भा. १ पा. १७५ ) "शुद्ध पक्षांतील अष्टमी व एकादशी उपासाचे दिवस आहेत. एकादशी विशेषतः वासुदेवाच्या भक्तीसंबंधानें आहे, आणि ते लोक रात्रभर जागतात." या रीतीनें एकादशीचें केलेलें वर्णन हल्लींहि लागू पडतें. अष्टमीचा उपवास बहुतेक लुप्त आहे. तो देवीसंबंधाचा आहे. जैनांत तो अजून पाळतात.

भाद्रपद कृष्णाष्टमीचें जन्माष्टमी म्हणून वर्णन अल्बेरूनीनें केलें आहे. ह्यावरून त्याचे महिने पौर्णिमान्त दिसतात. "चैत्राचा साहवा दिवस सूर्यपूजेसंबंधें पवित्र आहे." हा उपास हल्लीं फारसा पाळीत नाहींत. कारण सूर्योपासना लुप्त झाली आहे. "आषाढांत अनुराधा नक्षत्राचा दिवस उपासाचा मानतात."हा नीट समजण्यांत येत नाहीं. पण या देवशयनी एकादशीचें त्यानें योग्य वर्णन केलेलें आहे. हा दिवस सर्व हिंदुस्थानभर उपासाचा मानतात. "श्रावण पौर्णिमा सोमनाथाच्या उपासाचा दिवस आहे." हल्लीं हा उपास नसावा. पण त्यावेळीं समुद्रकिनाऱ्यावरील सोमनाथ येथें नारळीपौर्णिमेचें महत्त्व असावें. पावसाचे वारेहि यावेळीं कमी होऊन समुद्र शांत होतो. "अश्विनी अष्टमी भगवतीच्या उपासाचा दिवस आहे. चंद्र उगवला म्हणजे उपास सोडतात." हा उपास अद्याप बायकांत पाळतात. "भाद्रपद पंचमी सूर्याच्या उपासाचा दिवस आहे. खिडकींतून आंत आलेल्या सूर्यकिरणांची धूपानें व पुष्पांनीं पूजा करितात." हा दिवस विशेषतः मुलतानांत पाळीत असावेत. तेथील प्रसिद्ध सूर्यमंदिर आम्हीं पूर्वीं वर्णिलेंच आहे. कार्तिकांतील वासुदेवाच्या उठण्याचा दिवस ( एकादशी ) हाहि वर्णिला आहे. पण चंद्र रेवतींत असल्यास त्याचें महत्त्व अधिक असें जें सांगितलें आहे तें हल्लीं ठाऊक नाहीं. "भीष्म पांचरात्र–उपासाचा पहिला दिवस हाच आहे. ब्राह्मण मात्र दुसऱ्या दिवशीं उपास सोडतात." ही गोष्ट अलीकडे ठाऊक नाहीं. "पौष षष्ठी सूर्याचा उपास दिवस आहे." हा रथसप्तमीच्या पूर्वीचा दिवस होय; पण हल्लीं या दिवशीं उपवास करीत नाहींत. "माघ तृतीया बायकांचा उपास दिवस आहे. ह्यास गौरीतृतीया म्हणतात." रामनवमीचा उपास त्यानें सांगितला नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें.

---

( २ ) अल्बेरूनीनें वर्णिलेले उत्सवादिन पुढीलप्रमाणें आहेत ( पा. १७६). "चैत्र शुद्ध द्वितीया हा काश्मीरांत मोठाच उत्सवदिन मानतात. तेथील राजानें या दिवशीं तुर्कांवर मोठा जय मिळविला." हा विजय हिंदुस्थानांत दिग्विजय करणाऱ्या ललितादित्यानें तुर्कांवर मिळविलेला असावा.

हा एक संस्मरणीय विजय असून भाग १ यांत "हिंदुस्थानच्या मध्ययुगीन इतिहासांत त्याचा प्रामुख्यानें उल्लेख केला पाहिजे" असें आम्हीं त्याचें वर्णन केलें आहे. "चैत्र एकादशीस वासुदेवाच्या हिंडोल्याचा उत्सव होतो. आणि पौर्णिमेस बायकांचा वसंतोत्सव असतो." दोन्ही दिवस आपल्या इकडे प्रसिद्ध नाहींत. वैशाख तृतीया ही गौरी तृतीया "वैशाखी दशमीस राजाच्या आज्ञेनें ब्राह्मण चार दिवस गांवाबाहेर जाऊन यज्ञ करितात." मेष संक्रांतीचा उत्सव पंजाबांत विशेष आहे;आणि अजूनहि वैशाखी या नांवानें प्रसिद्ध आहे. "ज्येष्ठशुद्ध पौर्णिमा बायकांचा उत्सव आहे. आषाढाचे सर्व दिवस उत्सवदिन आहेत. आणि श्रावण पौर्णिमेच्या दिवशीं ब्राह्मणांस दानें देतात. अश्विन महानवमीच्या दिवशीं उसाचा रस भवानीला अर्पण करितात आणि कोकरें मारितात. अश्विन पौर्णिमेच्या दिवशीं जनावरांचा उत्सव असतो व त्या दिवशीं लोक कुस्त्या खेळतात." भाद्रपद पितृपक्षाचाहि उल्लेख आहे व मघायुक्त चंद्र असेल तो दिवस विशेष महत्त्वाचा सांगितला आहे. (पौर्णिमांत महिन्याप्रमाणें यास अश्विनवद्य म्हटलें पाहिजे होतें). "भाद्रपद तृतीयेस स्त्रियांचा उत्सव असतो. त्या टोपल्यांतून रोपें करितात आणि रात्रीं देवीची पूजा करितात. कार्तिक प्रतिपदेस दिवाळीचा उत्सव असतो. त्या दिवशीं लक्ष्मी एक दिवसाकरितां बळिराजास सोडते. मार्गशीर्ष तृतीया स्त्रियांचा उत्सवदिवस आहे. माघ तृतीया हि स्त्रियांचा उत्सवदिन आहे. स्त्रिया माघ महिनाभर थंड पाण्यानें स्नान करितात. फाल्गुन पौर्णिमा स्त्रियांचा दोला उत्सवदिन आहे. लोक गांवड्यांतून होळी पेटवितात. फाल्गुन १६ वा शिवरात्रीदिन आहे. लोक महादेवाची पूजा करून सर्व रात्र जागून काढतात." शिवरात्रीचें हें वर्णन बरोबर आहे. पण तिथींत हस्तदोष आहे चतुर्दशी पाहिजे. "मुलतान शहरांत सूर्याचा एक विशेष उत्सव असतो. त्यास सांब परियात्रा म्हणतात." वरील वर्णनांत आलेले बहुतेक उत्सव आपण हल्लींहि पाळतो, यावरून ते निदान अल्बेरूनीच्या काळाइतके (१०३० इसवी) जुने आहेत.

# प्रकरण पांचवें.

## राजकीय परिस्थिति.

भाग २ यांत वर्णिल्याप्रमाणें इ. सनाच्या दहाव्या शतकाच्या अंतीं काबूलपासून कामरूपपर्यंत आणि काश्मीरपासून कुमारीपर्यंत भारतवर्ष अनेक राज्यांत विभागिलें असून या लहान मोठ्या राज्यांवर अनियंत्रित सत्तेचे हिंदु राजे (बहुतेक रजपूत) राज्य करीत होते. तथापि हीं राज्यें एका दृष्टीनें लिमिटेड् मॉनर्कीज (मर्यादित राज्यें) होतीं. कारण पाश्चात्य देशांतील राजनीतिशास्त्राच्या अलीकडील सिद्धांताप्रमाणें राजसत्तेस वाटेल तो कायदा करण्याचा मर्यादारहित अधिकार असून ज्या राष्ट्रांत कायदा करण्याची राजाची ही सत्ता पार्लमेंटच्या म्हणजे लोकसभेच्या कायदा करण्याच्या अधिकारानें मर्यादित असते त्या राष्ट्रास लिमिटेड् मॉनर्की म्हणतात. भाग २ यांत दाखविल्याप्रमाणें भारतवर्षांत राजास किंबहुना लोकांस नवीन कायदे करण्याचा किंवा जुने बद्लण्याचा अथवा ते रद्द करण्याचा मुळींच अधिकार नव्हता. राष्ट्रास लागणारे सर्व कायदे सृष्टिकर्त्यानें मनूस लोकांवर राज्य चालविण्याकरितां प्रारंभींच दिले आहेत अशी समजूत आहे. हा ईश्वरदत्त स्मृत्युक्त कायदा हिंदुस्थानांतील सर्व ठिकाणीं यावेळीं चालू होता. आणि यामुळें अनियंत्रित राजसत्तेला मर्यादा होऊन वाटेल तसे कायदे करून जुलमी अमलाला जसा जोर दुप्पट येतो तसा प्रकार त्यावेळच्या राष्ट्रांत मुळीच नव्हता. तेव्हां हिंदुस्थानांतील ही निरनिराळीं अनियंत्रित सत्तेची राज्यें वस्तुतः लिमिटेड् मॉनर्कीज (मर्यादित राजसत्तेची राज्यें) होतीं आणि त्यामुळें राज्यकारभार चांगला चालत असून लोक सुखी असत.

दुसरें असें कीं भाग २ यांत दाखविल्याप्रमाणें जमीन,हवा,देशाची

परिस्थिति, लोकांची भाषा आणि भिन्न प्रांतांच्या लोकांतील इतर निरनिराळेपणा, या फरकामुळें देशांत निरनिराळीं राज्यें असणें हीच देशास योग्य आणि जरूरीची परिस्थिति होती. या कालविभागांत असलेलीं राज्यें वरील कारणांनीं हिंदुस्थानचे साहजिक पडणारे निरनिराळे भाग याशीं तंतोतंत जुळतात. या रीतीनें काश्मीर, यू. पी, राजपुताना ( रेतस्थान व डोंगरी मुलूख ), गुजराथ, कोंकण, माळवा, बुंदेलखंड, मध्यप्रांत, बंगाल, तेलंगण, द्रविड, केरळ, कर्नाटक आणि महाराष्ट्र हीं निरनिराळीं राज्यें असून त्यांचे प्रांत नैसर्गिक देशविभाग होते. या सर्व राज्यांचें एकच साम्राज्य होण्यास अनुकूल कारणें म्हणजे वंश,धर्म व प्राचीन परंपरा यांचें यांत ऐक्य, होतें हें खरें. पण ज्याप्रमाणें मध्ययुगीन युरोपांत पवित्र रोमन साम्राज्याखालीं सुद्धां निरनिराळ्या राज्यांचा एक जीव झाला नाहीं, त्याप्रमाणें मध्ययुगीन भारतांतहि या राज्यांचा एकजीव होऊन एक साम्राज्य उत्पन्न झाले नाहीं. याची कारणें दोन्ही ठिकाणीं एकच झालीं. भारतवर्षीय साम्राज्याची कल्पना मात्र भारतीय राजापुढें नेहमीं असे. तथापि या कल्पनेंत मांडलिक राज्यें नष्ट करण्याचें मत नसून त्यांनीं साम्राज्य धन्याचें नांवाला मांडलिकत्व कबूल करावें एवढीच कल्पना असे. अशा रीतीचें साम्राज्य, म्हणजे सम्राट् अगर चक्रवर्ती होण्याचा मान, मिळविण्याच्या हेतूनेंच बहुधा भिन्न हिंदु राजांतील सर्व लढाया असत. कारण हा सम्राटाचा मान बापापासून मुलाला वंशपरंपरेनें चालावा अशी कल्पना नव्हती, तर तो प्रत्यक्ष सामर्थ्यावर अवलंबून असे. यामुळें या निरनिराळ्या राज्यांतील प्रत्येक महत्त्वाकांक्षी व कर्तृत्ववान् राजास दिग्विजयानें असा साम्राज्यमान मिळविण्याचा अधिकार असे. राजशेखरानें सम्राट् आणि चक्रवर्ती यांत एक बारीक चमत्कारिक भेद सांगितला आहे. “ जो भारतवर्ष दक्षिण समुद्रापर्यंत जिंकतो तो सम्राट् आणि जो कुमारीपुरापासून हिमालयापलीकडील बिंदुसरापर्यंत

एक हजार योजन लांबीचा सर्व देश जिंकतो तो चक्रवर्ती " असें त्यानें म्हटलें आहे. यांतला स्पष्ट दिसणारा फरक असा कीं चक्रवर्तीनें काश्मीर आणि नेपाळ जिंकले पाहिजे आणि दक्षिणेकडे चोल आणि पांड्य यांस जिंकले पाहिजे. परंतु या कालविभागांतील कित्येक लहान लहान राजे सुद्धां आपल्यास चक्रवर्ती म्हणवितात. उदाहरणार्थ, बाराव्या शतकांतील एक ठाण्याचा शिलाहार राजा आपल्यास कोंकण-चक्रवर्ती म्हणवितो; आणि लक्ष्मणसेनानें आपल्यास कामरूपावनी-मंडळ-चक्रवर्ती हें नांव घेतले आहे (प्रो. बंगाल ५ पा. ४६७). मोठमोठालीं नांवें हळूहळू महत्त्वानें कमी व्हावीत, हें साधारण आहे. उदाहरणार्थ अनेक लहान राजानीं सुद्धां कोरीव लेखांत महाराजाधिराज ही पदवी घेतलेली दिसते. तथापि चक्रवर्ती ही पदवी माळव्याच्या भोजास (१००० ते १०४० इ.) योग्य होती, कारण त्याचा शब्द काश्मीरांत सुद्धां मानला जात असे. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासांत अशोक आणि समुद्रगुप्त आणि मध्ययुगीन इतिहासांत ललितादित्य हे राजशेखराच्या व्याख्येप्रमाणें खरोखर चक्रवर्ती होते; आणि अर्वाचीन इतिहासांत औरंगजेब होता. तथापि या कालविभागांत चोल, चालुक्य, गाहडवाल,आणि पाल ही राज्यें साम्राज्यें होतीं असें सामान्यतः म्हणतां येतें; कारण त्या प्रत्येकाखालीं कित्येक मांडलिक राजे असत.

हिंदुराजांच्या ह्या साम्राज्य--मान मिळविण्याच्या धडपडीच्या हानिकारक परिणामाविषयीं आम्ही पुर्वी लिहिलेंच आहे. हिंदु राजनैतिक तत्त्वज्ञानांत साम्राज्य म्हणजे मोंगल किंवा ब्रिटिश साम्राज्याप्रमाणें लहान राज्यें खालसा करणें नव्हतें. भोज किंवा कर्ण यांनीं राज्यें जिंकली तरी तीं नष्ट न करितांहि त्यास चक्रवर्ती ही पदवी मिळाली, अर्थात् त्यांचा मुलुख किंवा सामर्थ्य वाढलें नाहीं. यामुळें साम्राज्याच्या मानाकरितां होणाऱ्या चुरशीमुळें विजय पावणाऱ्या राजाचें

सामर्थ्य न वाढतां भांडणारे दोन्ही राजे दुर्बल होत. अजमीरच्या विग्रहराजानें मात्र दिल्लीचें जिंकलेलें राज्य खालसा केलें, ( याचें कारण बहुधा अनंगपालाला पुत्र नसावा ), आणि यामुळें विग्रहराजाचें बल कनोजच्या गाहडवालांच्या बरोबर झालें. चौहाण आणि राठोड यामध्यें लागलेली साम्राज्यमानाबद्दलची ही चुरस पृथ्विराज आणि जयचंदाच्या काळापर्यंत पोहोंचली आणि या दोघांमधील तीव्र शत्रुत्व दोघांच्याहि दुर्बलतेस कारण होऊन दोघांचाहि तिसऱ्या शत्रूनें नाश केला.

मागील कालविभागाच्या अंतीं असलेलीं निरनिराळी राज्यें या कालांतहि एक दोन विशिष्ट अपवादांखेरीज नांदत होतीं. यापैकीं महत्त्वाचा अपवाद पंजाबचा होता. हें राज्य प्रारंभीं वर्णिल्याप्रमाणें या कालविभागाच्या आरंभीं गझनीच्या महमुदापुढें पडलें; आणि पंजाब हिंदुभारतांतून वगळला गेला. पंजाबाच्या नाशाचीं कारणें आम्हीं इतरत्र दिलींच आहेत, पण त्यांपैकीं एक महत्वाचें कारण पुनः सांगण्यासारखें आहे. तें राज्यांत पुरेसें मजबूत खडें सैन्य नसणें हें होय. सर्व मध्ययुगीन हिंदु राज्यांत अशींच स्थिति होती. याची चिकित्साहि आम्हीं पूर्वीं केली आहे ( भा. २ पा. ३५० ). अरबी प्रवाशी सुलेमान यानें लिहिलें आहे कीं, हिंदु फौजा मुख्यतः सामंतांनीं आणलेल्या मदती पथकांच्या असतात व त्यांचा पगार ते आपल्यास लावून दिलेल्या मुलुखाच्या उत्पन्नांतून देतात. मागच्या कालविभागांतील कनोजच्या सम्राट् प्रतिहारांनीं मात्र मजबूत खडें सैन्य बाळगलें होतें.पण अलीकडील इतिहासांतील पेशव्याप्रमाणें पुढील कनोजच्या प्रतिहारांनीं मजबूत हुजूर फौज ठेवण्याकडे दुर्लक्ष केलें आणि त्यामुळें राज्यपालास तुर्कांस शरण जावें लागलें. तथापि गझनीच्या सत्तेंतून यू. पी. दोन कारणांनीं वाचलें. एक महमुदाच्या पुढचे राजे कर्तृत्वहीन झाले आणि दुसरें कनोजचें राज्य गाहडवालांनीं

जिंकलें. गोविंदचंद्रापर्यंत गाहडवालांनीं मजबूत खडी फौज ठेवली असें दिसतें. पायदळ, घोडदळ व गजदळ यांचें खडे सैन्य गोविंदचंद्रानें ठेवल्याचा उल्लेख एका कोरीवलेखांत असून त्यानें हम्मीरास आपल्या राज्याची सीमा पाळण्यास भाग पाडले असें वर्णन आहे असो, प्रतिहार यानंतर स्वतंत्र राज्य करणारे दिसत नाहींत.

या कालविभागाच्या आरंभीं दुसरीं दोन राज्य करणारीं कुलें नाहींशी झालीं तीं दक्षिणचे राष्ट्रकूट आणि गुजराथचे चावडा. दोन्ही देशांत त्यांच्या जागीं दोन नवीन समर्थ राजकुलें येऊन महाराष्ट्र आणि गुजराथ या राज्यांचें बल पुनः कायम झालें. बंगाल्यांत पालांची सत्ता कमी होऊन एक नवीन राज्य सेनांचें स्थापित झालें; आणि त्यांनीं पालांची बंगाल्यांतील सत्ता विभागिली. द्रविड देशांत चोलांची सत्ता उत्कर्षास पावली आणि त्यांनीं उत्तरेस गंगेपर्यंत किंबहुना हिमालयापर्यंत दिग्विजय केला. तथापि लौकरच प्राच्य गंगांनीं कलिंग अथवा तेलंगण येथें निराळें राज्य स्थापिलें; आणि चोलांची सत्ता तामील अथवा द्रविड देशांतच मर्यादित केली. याप्रमाणें हिंदुस्थानाचे भाषा,हवा, जमीन यांच्या फरकांनीं पडणाऱ्या निरनिराळ्या भागांत याहि कालांत वस्तुतः निराळीं राज्यें होतीं. मध्ययुगीन किंबहुना अलिकडील युरोपांतील राज्यांहून हीं राज्यें मोठी असतांहि त्यांच्या इतकीं मजबूत राष्ट्रें कां झालीं नाहींत हा मध्ययुगीन हिंदु भारताचा इतिहास लिहिणाऱ्यापुढें प्रश्न आहे. युरोपांतील खिस्ती लहान राष्ट्रांनीं अरब व तुर्क यांच्या हल्लयांचा प्रतिकार करून आपलें स्वातंत्र्य राखलें. पण हिंदु राज्यें मोठी असूनहि तुर्क आणि अफगाण यांपुढें या कालविभागाच्या अंती नष्ट झालीं. याचें कारण काय ?

अन्यत्र सांगितल्याप्रमाणें याचें कारण असें कीं या निरनिराळ्या हिंदु राज्यांत राष्ट्रिय भावना उत्पन्न झाली नाहीं. राष्ट्रीय भावनेच्या जोरावर युरोपांतील लहान राष्ट्रें हॉलंड किंवा बेलजम, हंगेरी किंवा

पोलंड, जर्मनीच्या किंवा तुर्कांच्या हल्ल्यास शेंकडों वर्षें दाद न देतां स्वतंत्र राहिलीं आहेत. हिंदु राज्यांत मागील कालविभागांत थोडीशी राष्ट्रीय भावना होती,तीहि या कालविभागांत नष्ट झाली.''याचें कारण आम्ही पुढील भागांत सांगूं'' असें आम्ही भाग २ (पा.३५९) यांत म्हटलें आहे. हें कारण आमच्या मतें या कालविभागांत पूर्वी वर्णिल्याप्रमाणें जातीचें जें दृढीकरण झालें तें होय.

या कालविभागांत जातिशुद्धतेच्या वाढलेल्या कल्पना, त्याचप्रमाणें अहिंसा तत्त्वाचें वाढलेलें प्राबल्य, व यामुळें अनेक जातींनीं स्वीकारलेला शाकाहार इत्यादि अनेक कारणांनीं प्रत्येक जात किंबहुना पोटजात रोटीबेटी-व्यवहारांत अलग पडली. यामुळें हिंदु समाजाचे लहान लहान स्वसंकुचित शेंकडों समाज पडून त्याची एकी नष्ट झाली; आणि आपलें राज्य स्वतंत्र असावें याबद्दलची सामुदायिक शुद्ध स्वहिताची कल्पना नष्ट झाली. पूर्वीच्या कालविभागांत आपसांतील विवाहसंबंधानें निरनिराळ्या वर्णांत एकीची कल्पना जागृत असे; आणि सर्वांत रोटीव्यवहार असल्यानेंहि एकीच्या कल्पनेंत आणखी भर पडे. दुसरें, हिंदु धर्माच्या पुराण मताच्या पुनरुज्जीवनानें आतां असें मान्य झालें कीं, राज्य करण्याचें कर्तव्य क्षत्रियांचें आहे, किंबहुना त्यांचाच हा अधिकार आहे. या कालविभागांत राज्य करणारीं सर्व राजघराणीं हिंदुस्थानभर क्षत्रिय होतीं, निदान तीं आपल्यास क्षत्रिय म्हणवीत हें लक्षांत घेण्याजोगें आहे. या राज्य करणाऱ्या घराण्यांनीं विशेषतः रजपुतांनीं या जातीच्या दृढीकरणाच्या कल्पनेवरूनच आपलाहि एक निराळा संघ बनविला. यामुळें इतर जातींशीं किंबहुना शेती करणाऱ्या क्षत्रियांशींहि त्यांचा संबंध तुटला. या स्थितींत देशाविषयींचें लोकांचें राजकीय औदासीन्य भयंकर वाढलें. राज्यें राजांची खासगी मिळकत आहे अशी समजूत

झाली आणि राजपूत राजांनीं जर आपली मिळकत घालविली तर लोकांचें काम इतकेंच उरतें कीं, ज्याकडे ती मिळकत गेली त्याची सत्ता मान्य करून त्यास कर द्यावे. राजांच्या हक्काचें संरक्षण राज्य करणाऱ्या जातीनेंच करावें, कारण हा त्यांचाच अधिकार आहे. लोकांचें कर्तव्य इतकेंच कीं, परमेश्वरानें जो राजा त्यास लढाईंत यश देऊन पाठविला असेल त्याची आज्ञा पाळावी. याप्रमाणें राष्ट्रीयत्वाची भावना या काळीं लोकांतून समूळ नाहींशी झाली. राजपुतांतहि देशभक्ति किंवा राष्ट्रीयत्व उरलें नाहीं, केवळ स्वामिभक्तीची कल्पना कायम राहिली. राज्यांतील लोकांचें स्वातंत्र्य रक्षण करणें हें आपलें कर्तव्य आहे हें रजपूतहि विसरले. रजपूत शिपायांत जी मनोवृत्ति राहिली किंवा ज्या मनोवृत्तीला जागृत करण्याचा वारंवार प्रयत्न होई ती वृत्ति स्वामिभक्तीची असे, म्हणजे जो धनी आपल्यास वेतन देतो त्याच्या इमानीं नोकरीची. यामुळें अन्यत्र लिहिल्याप्रमाणें रजपूत शिपाई मुसलमान राजांकरितांहि प्राण देण्यास तयार असत. काबूलचे शाही हिंदु राजे नष्ट होऊन त्यांच्या जागीं गझनीच्या मुसलमान राजांची सत्ता कायम झाली तेव्हां त्यांच्याहि नोकरींत रजपुतांनीं प्राण दिल्याचीं उदाहरणें पूर्वीं आलेलीं आहेत. तेव्हां या कालविभागांतील हिंदु राज्यें दुर्बल होतीं ह्यांत आश्चर्य नाहीं. आणि पृथ्विराज आणि जयचंद यांच्या राजपूत सैन्यांचा एकेकाच लढाईंत पराभव होऊन हे दोघे वीर राजे लढाईंत मारले गेले, तेव्हां परकीय सत्तेस लोकांनीं राष्ट्रीय विरोध केला नाहीं ह्यांतहि आश्चर्य नाहीं.

हिंदूंच्या तीव्र बुद्धिमत्तेनें राष्ट्राचीं खरीं अंगें कोणतीं याचा शोध केला नाहीं आणि राष्ट्राचा खरा सिद्धांत बनविला नाहीं हें दुर्दैव आहे. पण याचेंहि आश्चर्य नको, कारण पाश्चात्य देशांतहि अठराव्या शतकापर्यंत राजा म्हणजे पिता हा सिद्धांत मानला गेला होता. हिंदुस्थानांत धर्मशास्त्रांत हीच कल्पना मांडली गेली आहे.

किंबहुना हिंदु राजांच्या याहि काळांतील वर्तनाविषयीं सामान्यतः असें म्हणतां येतें कीं, ही पितृकल्पना ते प्रत्यक्ष अमलांत आणीत आणि आपल्या प्रजेवर ते सहसा जुलूम करीत नसत. ही गोष्ट हिंदु राजांस भूषणावह आहे. दीर्घायुष्याच्या वल्लीविषयीं ऊफीनें जमियत-उल–हिकायत यांत जी गोष्ट सांगितली आहे ( इलि. भा. २ पा. १७४ ) ती या दृष्टीनें मनोरंजक आहे;आणि त्यावरून असें दिसतें कीं मुसलमानी राजांपेक्षां हिंदुराजे कमी जुलमी असत. कारण त्यांचा पक्का विश्वास असे कीं, गांजलेल्या प्रजेच्या शापांनीं जुलमी राजाचें आयुष्य कमी होतें. या गोष्टीचें महत्त्व कांहीं असो, हिंदुराजांपुढें प्राचीन भारताचा नमुनेदार राजा श्रीरामचंद्र याचें उदाहरण नेहमीं असे. आणि यामुळें मध्ययुगीन लेखांत जुलमी राजांचा उल्लेख फारच थोडा येतो. ( यास कदाचित् काश्मीरचा इतिहास अपवाद असेल ). दुसरें असें कीं, हिंदु राज्यांचा खर्च फार मर्यादित असे. त्यांत खड्या फौजा नव्हत्या किंवा बाहेरील नोकरशाह्या नव्हत्या; या कारणांनीं मध्ययुगीन हिंदु राज्यांचा खर्च कमी असे. तिसरें,साधारणतः हिंदु स्वभाव कमी क्रूर असतो, यामुळें अनियंत्रित राजसत्तेचीं मध्ययुगीन हिंदू राज्यें सुद्धां व्यवस्थित चालून सुखी असत. मुख्य गोष्ट ही कीं, अंतस्थ व बाहेरील शत्रूंपासून संरक्षण कमींत कमी खर्चानें त्यांत होत असे. मध्ययुगीन अनियंत्रित सत्तेचा हिंदूराजा अलीकडच्या परकी नोकरशाहीपेक्षां कमी खर्चाचा असे हें कदाचित् उलट वाटेल. पण पुढें दाखवेल्याप्रमाणें मध्ययुगीन कालांतील हिंदू राज्यांचा मुलकी व फौजी कारभार हल्लींच्या ब्रिटिश किंवा मोंगल राज्यांपेक्षां पुष्कळ कमी खर्चाचा असे. शेवटली गोष्ट ही कीं, हिंदू राजांस कायदे करण्याची सत्ता नसे, म्हणजे नवीन कायदे करणें किंवा जुने बदलणें किंबहुना नवीन कर लादणें त्यांच्या अधिकारांत नव्हते. त्यांचा जुलूम होतें असेल तर तो व्यक्तिविषयक असे. अशा मर्यादित सत्तेच्या

राज्यांत सामान्य लोक अर्थात् आनंदानें रहात; आणि यामुळेंच लोकसभेच्या मार्फत राजकीय सत्ता मिळविण्याचा लोकांनीं पश्चिमे-प्रमाणें कधीं प्रयत्न केला नाहीं. याशिवाय हिंदूंच्या धार्मिक समजुती प्रमाणें लोकसभांना सुद्धां नवीन कायदे करण्याचा किंवा जुने बदल-ण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार नाहीं. दिवाणी कायदा आणि गुन्ह्यांचा व शिक्षांचा कायदा, त्याचप्रमाणें करांचे प्रकार व करांची किमान मर्यादा स्मृतींत ठरविली आहे. यामुळेंहि लोकस-भांची गरज हिंदु राज्यांत कधीं भासली नाहीं. असें आहे तरी अशा संस्था नसल्यानें त्याचप्रमाणें राज्याचा मालक राजा आहे, लोक नाहींत, अशी चुकीची राष्ट्राची कल्पना असल्यानें एक हानिकारक परिणाम असा झाला कीं, राष्ट्रीय भावना दुर्बल झाली आणि ती या कालविभागांत नष्ट होऊन भारतीय हिंदु राज्यें सहजच नाश पावलीं.

असो, राजास याप्रमाणें देशाच्या कारभारांत लोकसभा किंवा लोकसभाधिकृत प्रधान यांची मदत नसून तो आपल्या खुषीप्रमाणें वाटेल ते प्रधान नेमी; आणि त्यांचे अधिकारायुष्य राजाच्या मर्जी-पर्यंतच असे. हे प्रधान किती होते आणि त्यांचीं कामें काय असत हें पाहणें मनोरंजक आहे. नीतिशास्त्राच्या ग्रंथांवरून तें न पाहतां ( कारण यांचे काळ अनिश्चित आहेत ) तें आपल्यास या कालवि-भागांतल्या कोरीव लेखांवरूनच पाहिलें पाहिजे.मौज ही कीं, कोरी-वलेखांत इनामगांवाचीं दानें नोंदलेलीं असतात पण त्यांत सर्व प्रधानांचीं आणि स्थानिक अधिकाऱ्यांचीं नांवेंहि दिलेलीं असतात.बंगाल्यांतील कोरीवलेखांत तर ही यादी नेहमीं विस्तृत तपशीलवार असते त्यांत पुढील प्रधान सांगितलेले सांपडतात:–(१) राजामात्य. (२) पुरोहित. ( ३ ) महाधर्माध्यक्ष ( ४ ) महासांधिविग्रहिक ( ५ ) महासेनापति. ( ६ ) महामुद्राधिकृत. ( ७ ) महाक्षपटलिक ( ८ ) महाप्रतिहार ( ९ )

महाभोगिक ( १० ) महापीलुपति ( ए. इं. १४ पा. १५९ ). या नांवामागें लागलेला महाशब्द असें दाखवितो कीं, त्यांचा हाताखालीं त्या नांवाचे दुसरे अधिकारी असत पण हे आपापल्या खात्याचे मुख्य असून राजाकडे जाण्याचें काम यांचें असे. ( हा महाशब्द एका काश्मीर राजानें प्रथम लाविला भा. १ पा. २०९ ). याशिवाय मुख्य राणी, मुख्य राजपुत्र ( युवराज ) आणि मांडलिक राजे यांचा उल्लेख कोरीवलेखांत येतो, पण ह्यांस प्रधान म्हणतां येत नाहीं, किंवा त्यांचा सल्ला नेहमीं घेत नसत. तरी पण जमिनीचीं दानें त्यांनाहि कळवावीं लागत. गाहडवालांच्या दानलेखांत पुढील अधिकारी सांगितलेले आढळतातः–( १ ) मंत्री. ( २ ) पुरोहित (३) प्रतिहार (४ ) सेनापति ( ५ ) भांडागारिक ( ६ ) अक्षपटलिक. ह्याशिवाय (७) वैद्य (८) ज्योतिषी आणि (९) खासगी कारभारी (अन्तःपुरीक). दूताचेंहि नांव येतें व राज्ञी आणि युवराजांचें. ( गोविंदचंद्राचे कोरीवलेख इं. ए. १८ पा. १५ व ए. इं. ४ पा. १०१).चेदीचा कर्ण याच्या लेखांत पुढील नांवें आहेतः–( १ ) महाराज्ञी ( २ ) महाराजपुत्र ( ३ ) महामंत्री ( ४ ) महासांधिविग्रहिक ( ५ ) महामात्य ( ६ ) महाधर्माधिकरणिक ( ७ ) महाप्रतिहारी ( ८ ) महाक्षपटलिक ( ९ ) महाभांडागारिक ( १० ) महासामंत ( ११ ) महाप्रमत्तकरी आणि ( १२ ) महाश्वसाधनिक ( ए. इं. ११ पा. ४१ ). दुर्दैवानें परमार चंदेल्ल आणि चालुक्य राजांच्या दानलेखांत दरबारी अधिकाऱ्यांचीं नांवें येत नाहींत. पण पूर्वी सांगितल्या प्रमाणें ठाण्याच्या शिलाहारांच्या दानलेखांत पुढील अधिकाऱ्यांचें नांव येतें व त्यांच्या संम-

---

* मदनपालाच्या दानपत्रांत ( जे. बी. ५९ पा. ७१ ) १, ४, ५, ७८. याशिवाय महासामन्त आणि महाकुमारामात्य हे दोन आणखी सांगितले आहेत.

तीची सहीहि असतेः–( १ ) महामात्य ( २ ) महासांधिविग्रहिक ( ३ ) श्रीकरण ( ४ ) व ( ५ ) दोन भांडागारिक. भदानलेखांत ( ए. इं. १२ पा. २५१ ) ह्याशिवाय ( १ ) राजपुत्र, ( २ ) मंत्री, ( ३ ) पुरोहित आणि ( ४ ) अमात्य यांचा उल्लेख आहे. मुख्य प्रधानाचा उल्लेख करितांना "सर्व राज्याच्या चिंतेचा भार त्यावर आहे" असें ठाण्यांत वर्णन येतें. वरील निरनिराळया राज्यांतील वर्णनांवरून ( यांत फारसा फरक नाहीं ) राजाचे प्रधान किती व कोणते या मध्ययुगीन इतिहासाच्या काळांत असत तें आपण पाहूं.

पट्टराणी आणि युवराज त्याचप्रमाणें वैद्य, ज्योतिषी व पुरोहित हे प्रत्येक राज्यांत महत्त्वाचे अधिकारी असत, पण हे प्रधान नव्हत. एक मुख्य प्रधान असे त्याचें नांव कांहीं ठिकाणीं मंत्री व कांहीं ठिकाणीं महामात्य असें येतें. मंत्रिन् शब्दाचा अर्थ 'सल्ला देणारा, आणि अमात्य शब्दाचा 'नेहमीं जवळ असणारा' असा आहे. परराज्याचा प्रधान महासांधिविग्राहिक सर्वत्र आहे. तसेंच जमिनींचा मुख्य कारभारी महाक्षपटलिक सर्वत्र आहे. ठाण्यांत मात्र याऐवजीं 'श्रीकरण' म्हणजे जमिनीच्या पत्रकांचा अधिकारी हें नांव आहे. जमाखर्च आणि खजिना भांडागारिकाच्या स्वाधीन असत. महाप्रतिहारी म्हणजे राजाचा द्वाररक्षक हा सर्वत्र आहे,तसाच सेनापतिहि आहे. बंगाल्यांत हत्तींचा मुख्य अधिकारी निराळा असे, कारण बंगाल्यांत गजदल मोठ्या प्रमाणावर बाळगलेलें असे ( यामुळेंच बंगालच्या राजास गजपति संज्ञा होती ). आणि इतर राज्यांत निराळा घोडदळाचाहि मुख्य अधिकारी असे. मुख्य न्यायाधीशांचा उल्लेख कोठेंच येत नाहीं ह्याचें आश्चर्य वाटतें. बहुधा वरिष्ठ कोर्टांत येणाऱ्या सर्व कामांचा निकाल सर्व मंत्र्यांच्या व सभ्यांच्या मदतीनें राजा स्वतःच करीत असे हें पुढें सांगूं. मंत्र्यांची सल्ला घेतलीच पाहिजे असा निर्बंध नव्हता, पण राजा बहुधा असा सल्ला घेई. ठाण्यांत

मात्र असा सल्ला घेणें राजास प्राप्त असे, इतकेंच नव्हे तर पांच प्रधानांच्या मान्यतेची सही दानलेखांवर व इतर राजकीय लेखांवर घेणें जरूर असे; तरच तें पक्कें मानलें जाई. ही वहिवाट ठाण्याच्या शिलाहारांच्या राज्यांत विशेष होती. यावरून तेथील कारभार अधिक संस्कृत असून मंत्र्यांच्या जबाबदारीची कल्पना तेथें उत्पन्न झाली होती. कदाचित् असें असेल कीं, ठाण्याचें राज्य राष्ट्रकूटांचें मुळांत मांडलिक असल्यानें तेथील महत्त्वाचे कारभारी साम्राज्य दरबारांतून नेमले जात; आणि त्यांची संमति सर्व महत्त्वाच्या कामांत अवश्य मानली जाई. हीच पद्धत शिलाहार स्वतंत्र झाल्यावरहि चालू राहिली असावी. असो, मध्ययुगीन कालांतील ही प्रधानसंस्था त्यांच्या नांवा-सह मुसलमानी काळांत इतकी लुप्त झाली कीं, शिवाजीनें हिंदुराज्य पुनः प्रस्थापित केलें, तेव्हां त्यानें दिलेलीं प्रधानांचीं नांवें व त्यांचीं कामें अगदीं भिन्न आहेत हें पुढील टिप्पणीवरून दिसेल.

## टिप्पणी—शिवाजीचे अष्टप्रधान.

बाराव्या शतकांतील हिंदु राज्यांतील प्रधानांचीं नांवें सतराव्या शतकांत हिंदु राज्य शिवाजीनें स्थापन करून जी प्रधानसंस्था निर्माण केली त्यांत यावीं असें आपल्यास सकृद्दर्शनी वाटतें. पण उत्तर व दक्षिण हिंदुस्थान या दोन्ही ठिकाणच्या मुसलमानांनीं कारभाराची सर्व पद्धत इतकी बदलून टाकली कीं, मध्ययुगीन पद्धत किंवा नांवें यांचा अल्पशेषहि उरला नाहीं. यावरून मुसलमानी राज्यकारभार चालविणारे किती स्वतंत्र व कल्पक-बुद्धीचे होते हें दिसून येतें. हल्लीच्या ब्रिटिश राज्यव्यवस्थेंतहि पूर्वींच्या मुसलमानी किंवा मराठी राज्यव्यवस्थेचीं कांहीं अंगें बाकी आहेत. असो, शिवाजीच्या प्रधानांचीं नांवें व कामें मध्ययुगीन हिंदु कालांतील नांवाहून भिन्न आहेत हें पुढीलवरून दिसेल. शिवाजीचे अष्टप्रधान येणें-प्रमाणें होतेः-( १ ) पेशवा अथवा मुख्य प्रधान, मुलकी व फौजी दोन्हीं कारभाराचा मुख्य. ( २ ) सेनापति ( ३ ) अमात्य ( ४ ) सचिव

( ५ ) मंत्री ( ६ ) सुमंत ( ७ ) पंडितराव ( ८ ) न्यायाधीश. अमात्य हा जमीन महसुलाचा अधिकारी असे; आणि सुमंत परराज्याधिकारी. सचिव हा दप्तर ठेवणारा आणि मंत्री हा खाजगी अधिकारी होता ( राजवाड्यांचा मराठी सत्तेचा उदय. पा. १२६ ). मुख्य प्रधानांचें पेशवा हें नांव मुसलमानांपासूनच घेतलें गेलें.लोकांना त्या नांवाची इतकी संवय झाली होती कीं; तें नांव न बदलतां तसेंच ठेवणें शिवाजीलाहि फायदेशीर वाटलें. कदाचित् शिवाजीनें असाहि विचार केला असेल कीं आपण विजापूरच्या सुलतानाप्रमाणेंच स्वतंत्र आणि सामर्थ्यवान् आहोंत, आपलाहि पेशवा आहे असें लोकांस समजावें. मुसलमानांनीं ठेवलेलीं दुसऱ्या प्रधानांचीं नांवें मुजुमदार, सुरनीस, सबनीस, डबीर वगैरे त्यानें बदललीं आणि नवीन संस्कृत नांवें देऊन त्यांच्या कामांतहि थोडा बदल केला. भारतेतिहाससंशोधकमंडळ पुणें यांच्या जुलै आक्टोबर १९२३ च्या त्रैमासिकांत राजेश्री शेजवलकर यांचा एक निबंध छापला आहे, त्यावरून शिवाजीनें शुक्रनीतिसारांतून अष्टप्रधानांचीं नांवें घेतलीं हें दाखविण्याचें श्रेय त्यांनीं घेतलें आहे. हीं नांवें अशीं:—( १ ) सुमंत ( २ ) पंडित ( ३ ) मंत्री ( ४ ) प्रधान ( ५ ) सचिव ( ६ ) अमात्य ( ७ ) प्राड्विवाक् ( ८ ) प्रतिनिधि† यांत प्रतिनिधीच्या ऐवजीं सेनापति शिवाजीनें घातला हें बरोबरच केलें. पण दुसऱ्यांचीं कामेंहि शिवाजीनें थोडी अधिक नीतिसाराहून बदललीं. "सुमंत हा जमाखर्चाचा प्रधान होता, पण शिवाजीनें त्यास परराज्याचा प्रधान नेमिलें. अमात्य जमिनीचा प्रधान होता, पण शिवाजीच्या व्यवस्थेंत तो जमाखर्चाचा प्रधान झाला. मंत्री हा परराज्याचा प्रधान होता, पण तो खासगी कारभारी झाला. सचिव युद्धमंत्री होता, पण तो दसराचा अधिकारी झाला." हा तपशील कदाचित् कोठें चुकलेला असेल, पण हें स्पष्ट आहे कीं हीं नांवें व हीं कामें मध्ययुगीन कोरीवलेखाहून फारच भिन्न आहेत. म्हणजे शुक्रनीतिसारांतहि बाराव्या शतकांत प्रच-

---

†सुमन्त्रः पंण्डितो मन्त्री प्रधानः सचिवस्तथा ।
अमात्यः प्राड्विवाकश्च तथा प्रतिनिधिः स्मृतः ॥ पा. ७५

लित असलेला नांवाचा व कामांचा उल्लेख नाहीं. तेव्हां हा ग्रंथ मुसलमानी काळांत निर्माण झाला असा तर्क होतो. पंडित हें अगदींच नवीन नांव आहे. मध्ययुगीन काळांतील धर्माध्यक्षाचें मात्र हें काम आहे. प्राड्विवाक हें नांव शिवाजीनें न ठेवतां न्यायाधीश ठेवलें. पण स्मृत्यांत व मध्ययुगीन कोरीव लेखांतहि न्यायाधीश हें नांव नाहीं. अक्षपटलिक, भांडागारिक व सांधिविग्रहिक हीं नांवें नीतिसाराच्या काळांत अगदीं विसरलेलीं दिसतात. अमात्याला नवीन काम व अर्थ दिलेला आहे, आणि सचिव हें नांव अगदींच नवीन आहे व त्याचें कामहि नवीन आहे. मध्ययुगीन कालांत दप्तराच्या कामाचा कोठें बंदोबस्त दिसत नाहीं ह्याचें आश्चर्य आहे. असो, मध्ययुगीनकालांतील राजदरबारांतील कारभाराची पद्धत पुढील काळांत अगदीं विसरलेली दिसते. स्थानिक कारभारांतहि मध्ययुगीनकालांतील नांवें व कामें बदललीं हें पुढील प्रकरणावरून दिसेल.

# प्रकरण ६ वें.

## राज्यकारभार.

मुलकी आणि फौजी कारभाराची पद्धत या कालविभागांत सर्व देशांत एकच असून त्यांत बारीकसारीक भेद होते. ही पद्धत स्मृत्यांमधून व त्याचप्रमाणें निरनिराळ्या नीतिशास्त्रांतून चांगली वर्णिलेली आहे; व कौटिल्याचें अर्थशास्त्र सांपडल्यापासून चंद्रगुप्त मौर्य याच्या इतक्या जुन्या काळीं ( इ. स. पू. ३०० ) हिंदु राज्यांत राज्यव्यवस्था कशी होती याची आतां आपल्यास पूर्ण कल्पना मिळाली आहे. हीच जुनी कारभाराची पद्धत कांहीं महत्वाच्या बदलानें या पुस्तकांत वर्णिलेल्या मध्ययुगीन कालांत अमलांत होती. पहिल्या कालविभागांत ( ६०० ते ८०० ) जी पद्धत चालू होती तिचें वर्णन आम्हीं पहिल्या भागां केलें आहे; आणि दुसऱ्या कालविभागांतील पद्धतीचें वर्णन ( ८०० ते १००० ) दुसऱ्या भागांत केलें आहे. या कालविभागांत ( १००० ते १२०० ) चालू असलेल्या कारभारपद्धतीचें वर्णन या प्रकरणांत आम्ही करितों. ही पद्धत बहुतेक पूर्वीच्या सारखी असली तरी त्यांत कांही फेरबदल दिसून येतात. दुर्दैवानें या विषयांत आपल्यास अल्बेरूनीची मदत मिळत नाहीं, कारण त्याच्या हिंदुस्थानावरील ग्रंथांत त्याच्या वेळच्या हिंदु राज्यांत मुलकी व फौजी कारभाराची पद्धत कशी होती याजाविषयीं वर्णन नाहीं. परंतु या कालविभागांत कोरलेल्या इनाम गांवांच्या सनदांतून या विषयावर बरीच विस्तृत माहिती मिळते;आणि या मनोरंजक माहितीवरून निरनिराळ्या देशांतील कारभाराच्या पद्धतीचा तपशील आम्ही पुढें देत आहों. आम्ही पुढें दाखविणारच आहों कीं, मुसलमानी काळांत मध्ययुगीन हिंदु राज्यांतील ही कारभारपद्धति अगदींच नष्ट झाली.

मराठ्यांनीं हिंदु राज्याचा पुनः उद्धार केला त्यांत तिचा लवलेशहि दिसत नाहीं हें आश्चर्य आहे.

## अमली कारभार.

पूर्वीं सांगितल्याप्रमाणें भारतवर्ष या कालविभागांतहि कित्येक लहान मोठ्या राज्यांत विभागलेला राहिला. दक्खनच्या चालुक्यांच्या येऊरच्या शिलालेखांत [ इं. ए. ८ पा. १८ ] यांची संख्या ५९ दिलेली आहे. यानंतरच्या मराठी कवींच्या काव्यांत छपन्न राज्यांचा उल्लेख येतो तो या संख्येवरून असावा. गाहडवाल, पाल, चालुक्य व चोल यांची मोठालीं राज्यें असून त्यांत त्यांच्याखालीं कित्येक मांडलिक राज्यें होतीं.तथापि त्यांचा कारभार बहुतेक स्वतंत्र चाले;आणि यामुळें परंपरेच्या ५९ संख्येंत त्यांची गणती असावी. अमली कारभाराचा मुख्य अधिकार प्रत्येक राज्यांत राजाचा असें हें सांगावयास नको. हा राजा क्षत्रिय किंवा रजपूत असे; आणि राजाचा अधिकार वंशपरंपरेनें चाले. हल्लीच्या राष्ट्रांतील कारभाराची महत्त्वाची शाखा म्हणजे कायदेमंडळ मध्ययुगीन हिंदु राज्यांत कोठेंच नसे, आणि यामुळें राजास केवळ बजावणीचे व न्याय देण्याचें देशांतील वरिष्ठ काम करावयाचें असे. शिवाय राजापासून सर्व मानमतराब व सन्मान मिळे हे सांगावयास नको.

राजाची मुख्य राणी म्हणजे पट्ट* महिषी आणि मुख्य राजपुत्र म्हणजे युवराज हे राजाच्या खालोखाल महत्त्वाचे अधिकारी असत. म्हणजे राज्यकारभारांत त्यांना कांहीं अधिकार असे. राजाच्या गैरहजेरींत किंवा आजारीपणांत राजाचें काम ते करीत हें उघडच आहे. गाहडवालांचे कांहीं दानलेख मदनपालाच्या नांवें त्यांनीं

* राजाच्या राज्याभिषेकाच्या वेळीं जवळ बसलेल्या राणीच्या डोक्याभावतीं सोन्याचा पट्ट बांधीतात त्यावरून हें नांव पडलें आहे.

केले हें त्यांच्या प्रकरणांत वर्णिलेंच आहे. प्राचीन काळापासून ( रामायण पहा ) युवराजाची नेमणूक मोठ्या समारंभानें होत असे. एका गाहडवाल कोरीवलेखांत जयचंदास युवराज नेमल्याचा उल्लेख आहे ( इं. ए. ४ पा. १२३ ). कांहीं दक्षिणच्या कोरीव लेखांत राजाचा भाऊ बहुधा युवराज असून त्याचेंहि नांव लेखांत नेहमीं येतें. याची अधिकारमर्यादा काय होती हें सांगतां येत नाहीं. मागच्या प्रकरणांत राजाच्या प्रधानांचे अधिकार व हुद्दे यांचें वर्णन आम्ही केलेंच आहे.

हिंदु राज्यांतील जमीनमहसुली कारभाराकडे प्रथम लक्ष देतां प्रत्येक राज्याचे जिल्हे व तालुके असे विभाग असत. यांचीं संस्कृत नांवें भिन्न राज्यांत भिन्न दिसतात. उत्तरेकडे जिल्ह्याचें नांव भुक्ति आणि माळव्यांत मंडल व महाराष्ट्रांत राष्ट्र असे. अगदीं दक्षिणेस आपल्यास बहुधा नांव मिळत नाहीं,(नाड आणि तर अशीं नांवें केरळ लेखांत येतात ), पण गांवाची संख्या नेहमीं सांगितलेली असते त्यावरून जिल्ह्याचा किंवा तालुक्याचा बोध होतो. सबंध कोंकण राज्याचेंहि वर्णन 'पुरी–कोंकण–चतुर्दशशत' असें येतें. हे जिल्हे कधीं कधीं फार मोठे असत, आणि त्यांच्या मर्यादाहि कित्येक वेळां बदलत. उदाहरणार्थ, चालुक्यांच्या पूर्वीच्या अमदानींत ' करहाटक बारा हजार' यांत पुण्याचाहि समावेश होत असे. पुणें हें फार जुनें शहर असून स्टेन कुनाऊ यानीं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या एका दानलेखांत ( ए. इं. १२ ) पुण्याचा उल्लेख आहे. तालुक्याचा हिस्सा बहुधा त्यांत असलेल्या गांवांच्या संख्येवरून बोधित होई. ही तऱ्हा पुढें सांगितल्याप्रमाणें उत्तरेकडेहि दिसते. तहसील अथवा तालुका याचें बहुधा विषय हें नांव असे; आणि त्याच्या मर्यादा बहुतेक बदलत नसत. विषयाऐवजीं गाहडवालांच्या यू. पी. मध्यें सांपडलेल्या लेखांत नेहमीं पत्तला हें नांव येतें. हा शब्द नवीन असून

त्याचा अर्थ किंवा अलीकडचें त्याचें रूप मिळत नाहीं. या गाहड-वाल लेखांत पुष्कळदां जिल्ह्याचें नांव येतच नाही. फक्त पत्तला सांगितलेली असते. पण खरोखरच पत्तला सांगणें पुरेसें आहे. बंगाल्यांतील सेनांच्या दानलेखांत भुक्ति आणि मंडल दोन्हीं सांगितलेलीं असतात; आणि पालांच्या लेखांत भुक्ति, विषय आणि मंडल असे येतात. पैकीं मंडल हा विषयाचा लहान भाग आहे. माळव्याच्या एका लेखांत मंडल आणि प्रतिजागरणक ( हा शब्द नवीन आहे) असे दोन शब्द आले आहेत आणि त्याच्यांतला लहान विभाग वोडशिर ४८ असा सांगितला आहे ( परिशिष्ट पहा ). ग्राम आणि नगर हा शेवटचा विभाग असून ( बंगाल्यांत मात्र याचा अपवाद दिसतो ) त्यांचे लहान हिस्सें सांगितलेले असत नाहींत.

या निरनिराळ्या विभागांचे कारभार करणारे अधिकारी पुढीलप्रमाणें दिसतात. भुक्ति अथवा प्रांत याचा अधिकारी राजस्थानयि असून जिल्ह्याच्या अधिकाऱ्याचें नांव दख्खनच्या लेखांत राष्ट्रपाति असें येतें. बहुतेक सर्व राज्यांत तालुक्याच्या अधिकाऱ्याचें नांव विषयपाति असें येतें. गांवाच्या मुख्य अधिकाऱ्याचें नांव फक्त माळव्यांत पट्टकिल येतें. उत्तर हिंदुस्थानच्या दानलेखांत दान दिलेल्या गांवांतील एकंदर रहिवाशीं तसेच शेजारचे गांवचे रहिवाशी यांना दानपत्र संबोधिले असून त्यांस ब्राह्मण व ब्राह्मणोत्तर म्हणून त्यांचा तपशील कुटुंबी,* कायस्थ, दूत, वैद्य, महत्तर, मेदचांडालपर्यंत असा दिलेला असतो ( परिशिष्टांतील परमर्दिन्‌चा लेख पहा ). अन्यत्र कित्येक वेळां यांचें वर्णन फक्त जानपद या एका शब्दानें केलें जातें. ज्या लोकांचा नांवानें उल्लेख केलेला आहे त्यांकडे त्या गांवांतील

---

*यावरून मराठींतील कुळंबी हा शब्द निघाला आहे. त्याचा अर्थ स्थायिक कुटुंबयुक्त शेतकरी.

काम आणि त्याजबरोबर कांहीं उत्पन्नहि असलेलें दिसतें. ह्याशिवाय कित्येक जिल्हा अधिकाऱ्यांचीं नांवें येतात तीं शौल्किक, गौल्मिक आणि तरिक म्हणजे जकातीचा अधिकारी, गुल्म म्हणजे पोलीस ठाण्याचा अधिकारी आणि तरिक म्हणजे गलबतांतून होणाऱ्या दळणवळणाचा अधिकारी अशीं होत. यू. पी. आणि बंगाल यांमध्यें नदीमार्गानें उतारूंची व मालांचीं बरीच नेआण चालू असे त्याजवर निराळा अधिकारी असणें अवश्य होतें. दक्षिण हिंदुस्थानांतहि जेथें नद्या ओलांडल्या जात तेथें सरकारला व नाविकांना कांहीं कर द्यावा लागे; यांच्यावरहि एक अधिकारी असे. सरकारी जंगलाकरितां आणि राजाच्या गोशाळेकरितां व जनावरें निपजविण्याच्या कार्याकरितां निराळे ' अध्यक्ष ' नांवाचे अधिकारी असत. आणि शेवटीं या सर्व मुलकी अधिकाऱ्यांच्या हाताखालचे शिपाई यांस चाट म्हणत. फौजेंतल्या शिपायांस भट म्हणत. या सर्व लोकांस म्हणजे सरकारी इसमांस इनाम गांव दिल्याची माहिती होणें अवश्य असें, कारण प्रत्येक गांवासंबंधानें त्यांस विशिष्ट कर्तव्य असे. उदाहरणार्थ, इनाम गांवांत चाट व भट यांनीं शिरूं नये असा दानलेखांत अधिकार दिलेला असतो, अचाटभटप्रवेश्यः याचा अर्थ कोणत्याहि मुलकी अथवा फौजी नोकरानें जिन्नस खरेदी करण्यास किंवा वेठीस माणसें धरण्यास इनाम गांवांत जाऊं नये अशी मनाई असे.

माळव्यांतील लेखांत वर सांगितल्याप्रमाणें गांवच्या मुख्यास पट्टकिल म्हणत; पण गाहडवाल लेखांत ग्रामपति म्हटलें आहे आणि गुजराथ व दक्षिण इकडील लेखांत ग्रामकूट म्हटलें आहे.हा शब्द गुजराथ, माळवा आणि कोंकण येथें गामोट या रूपानें हल्लींहि अवशिष्ट आहे.प्रत्येक गांवचा कारभार स्वतः पूर्ण असे. गांवचा चौकीदार, तसाच दूत, वैद्य आणि जोशी त्याचप्रमाणें भंगी आणि गर्दन उडविणारा मांग म्हणजे मेद व चांडाळ असे नोकर असत.

गावांच्या दानलेखांत दान घेणाऱ्याचे अधिकार स्पष्ट तपशिलानें सांगितलेले असतात, व त्यावरून खालसा गांवांत सरकारचे किंवा स्वतः सर्व लोकांचे काय हक्क असत याची मनोरंजक माहिती मिळते. गाहडवालांच्या यू. पी. मधील दानलेखांत गांवाच्या हद्दींत सांपडणारे लोह व लवण यांचा हक्क दिलेला असतो; तो फार महत्वाचा असे. लोखंडाची व पोलादाची जरूर सुतार व शिपाई यांना असे. तसेंच समुद्र दूर असून माल नेआणीची साधनें कठीण असल्यानें यू. पी. मध्यें मीठ ही एक किंमती वस्तु असे; यामुळें गांवांतील खाऱ्या विहिरीच्या पाण्यापासून उत्पन्न होणाऱ्या मिठावर इनामदारास पूर्ण हक्क दिला जाई. भा. १ यांत सांगितल्याप्रमाणें बहुधा सर्व राज्यांत मिठावर सरकारी कर असावा, आणि मिठाच्या कराच्या उत्पन्नावर एका स्वतंत्र अधिकाऱ्याची देखरेख असावी. त्याचप्रमाणें गांवांतील गर्त व ऊषर म्हणजे खड्डे सुड्डे व ऊसर जागा याहि महत्वाच्या असतात; व त्या इनाम गांवांत इनामदाराच्या असत. खालसा गांवांत अशा जागा सरकारच्या किंवा गांवकऱ्यांच्या समाईक असाव्यात. तसेंच इनाम गांवांतील ज्या ज्या वस्तु दिलेल्या आहेत त्यांचा तपशीलहि महत्वाचा असतो आणि त्यावरून या मध्ययुगीन काळांतील राज्यांत जमीनमहसुली खात्याची व्यवस्था दिसून येते. गाहडवालांच्या दानलेखांत दिलेल्या वस्तूंची यादी येणें प्रमाणें आहेः—" जल, स्थल, ऊषर, पाषाण, डोंगर, नदा, वन, आम्र आणि मधूक, लोह व लवण, जे जे जमिनीच्या वर व खालीं आहे तें. " यू. पी. मध्यें आंब्याची व मोहाचीं झाडें हींहि महत्वाचीं असतात, आणि ज्या झाडांचे विशिष्ट मालक नसत तीं खालसा गांवांत सरकारी मानलीं जात. त्याचप्रमाणें दगडाच्या खाणी, लोखं-

डाच्या खाणी, खाऱ्या विहिरी, डोंगर आणि जंगलाचे भाग* हे सरकारी समजले जात. पण जंगलासंबंधे आपल्यास ही आणखी गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, सरकारी जंगलाचे कांहीं हिस्से लोकांस जळाऊ लाकडें तोडण्यासाठीं मोकळे असत. सर्व इनाम लेखांत आणखी असें वर्णन असतें कीं तृणयूतिगोचरपर्यंत ( सुद्धां ) गांव दिला आहे, याचा अर्थ गवताची कुरणें व गाई चरावयाची जागा यांसहित गांव दिला आहे. यावरून असें दिसतें कीं प्रत्येक गांवास गवताचें कुरण आणि गुरचरणाची जागा तोडलेली असे; व त्यामुळें गाईचें दूध आणि नांगराकरितां बैल यांचा पुरवठा निश्चित असे. अशीं गवताचीं कुरणें आणि गुरचरणाच्या जमिनी—ज्यांत गांवांतील गुरांस चारण्याची मोकळीक आहे—हल्लींच्या काळीं गांवांतून राखलेल्या दिसत नाहींत. परमर्दिन्‌च्या ११६६ इसवींच्या दानलेखांत [ परिशिष्ट ] ऊस, कापसाचीं झाडें आणि सण हेंहि आम्रमधूका बरोबर दिल्याचा उल्लेख आहे. बुंदेलखंडांत या तीन उत्पन्नाच्या बाबी महत्त्वाच्या दिसतात, आणि म्हणून त्यांचा स्पष्ट निर्देश केलेला आहे. परंतु खालसा गांवांत या उत्पन्नावर कांहीं सरकारी हक्क असे असें दिसत नाहीं.

आतां गांवांतून कोणते कर वसूल होत इकडे वळून पाहतां यांचाहि उल्लेख तपशिलानें दानलेखांत मिळतो, कारण ते कर गांवच्या इनामदारास मिळावयाचे असत हें उघड आहे. हें आश्चर्य करण्यासारखें आहे कीं पहिल्या कालविभागांत नेहमीं येणारा ‘ उद्रंग ’ शब्द या कालविभागांत कोठेंच येत नाहीं ( ठाण्याच्या

---

*मैदान बंगाल्यांत जंगल नाहीं, त्यामुळें तेथें लहान लहान सूरटीं झाडें सुद्धां महत्त्वाचीं असतात. तीं बंगालच्या लेखांत ‘सझाटविटपः’ अशा शब्दानें इनामदारास दिलेलीं असत. झाट हा शद्ब हल्लींच्या भाषेंत झाड असा झाला आहे.

एका लेखांत इ. ए. ३ पा. २६७ मात्र आला आहे.) सर्व लेखांत येणारे शब्द भाग–भोग–कर–हिरण्य असे आहेत. यांचा अर्थ जमिनीच्या उत्पन्नापैकीं ऐनजिनसी दिलेला भाग ( $\frac{१}{६}$ ) आणि व्यापार व उद्योग यांच्या नफ्यावर दिलेला नगदी कर ( $\frac{१}{५०}$ ) प्राचीन काळापासून महाभारतात व स्मृत्यांत जो कर सांगितलेला आहे तोच असावा. पण कनोजच्या राज्यांत उत्तर प्रतिहारांच्या वेळीं याशिवाय कित्येक लहान लहान कर लादले गेले असें दिसतें. यापैकीं पुष्कळांचा अर्थहि लागत नाहीं. ही यादी येणेंप्रमाणें:— (१) कूटक (२) दशबंध (३) विंशत्युक्थ (४) अक्षपटलिकप्रस्थ (५) प्रतिहारप्रस्थ (६) आकर (७) तुरुष्कदंड आणि (८) वरवइझे ( बसही दानलेख इं. ए. १४ पा. १०३ ). गाहडवालांच्या इनामलेखांत ह्याशिवाय दोन आणखी चमत्कारिक कर सांगितले आहेत ते (९) कुमरगदियानक ( इं. ए. १८ पा. १५ ) आणि (१०) प्रवणीकर ( ए. इं. ४ पा. १६९ व १२३ ). ए. इं. ९ ( पा. १०२ ) यांत पुढील शब्द–प्रयोग घातला आहे:— " कुमरगदियानक वगैरे नित्य व अनित्य कर. " प्रतिहारांच्या उतरत्या काळांत जमीन महसुलाचा कारभार कसा त्रासदायक झाला होता आणि हीच स्थिति गाहडवालांच्या वेळींहि कशी राहिली हें यावरून दिसेल. पूर्वी सांगितल्याप्रमाणें तुरुष्कदंड हा कर तुर्कांना खंडणी देण्यासाठीं लादला होता हें दिसतेंच आहे. पण बहुधा याचें उदाहरण घेऊन दुसरे बारके कर लादले गेले. अक्षपटलिक म्हणजे जमीन महसुलाचा कारभारी याच्या करितां एक प्रस्थ ( मूठभर धान्य ) प्रतिहार ( द्वाररक्षक ) याच्या करितां दुसरा प्रस्थ वगैरे कर लादले गेले. दहावा हिस्सा आणि विसावा हिस्सा कोणाकरितां किंवा कशाकरितां लादला हें समजत नाहीं. पण येथें

मराठ्यांनीं मोंगली मुलुखावर लादलेल्या चौथ व सरदेशमुखीची आठवण येते. हे कर प्रत्यक्ष ऐनजिनसी असत हें सांगावयास नको.

नगदी कर, खरेदीविक्रीवर व तयार केलेल्या मालाच्या नफ्यावर, नगरांत मंडपिका म्हणजे चावडीवर घेतला जाई; आणि गांवढ्यांत बाजारांत घेतला जाई. यांतहि एक पन्नासांश सरकारी कराशिवाय धार्मिक कारणांकरितां किंवा विशिष्ट लोकांच्या फायद्याकरितां बारिक सारिक कर लादलेले दिसतात. काठेवाडांतील एका शिलालेखांत ( भावनगर कोरीव लेख पा. १५७ ) या करांचें एक मनोरंजक वर्णन आढळतें. " मंगलपूर ( मंगरोळ ) मंडपिकेंत प्रत्येक धान्याच्या गाडीवर चार कार्षापण, प्रत्येक गाढवाच्या ओझ्यावर अर्धा, विड्याच्या पानांच्या उंटाच्या ओझ्यावर एक, पानांच्या गाडीच्या ओझ्यावर -॥- वगैरे " मंडपिकेंत येणाऱ्या सरकारी उत्पन्नांतूनहि दररोज धर्मार्थ कांहीं दिलें जाई. येथें आणखी तपशील आहेत त्यांतल्या कांहीं बाबी लक्षांत येत नाहींत. या सर्व नगदी कराला शुल्क म्हणत आणि तो मंडपिकेंत वसूल होई.

मुलकी अधिकाऱ्यांत पूर्वी सांगितल्या प्रमाणें तहशीलदार म्हणजे मामलेदार याबद्दल सर्व दानलेखांत विषयपति हा शब्द हेतो. दक्षिणच्या लेखांत जिल्हा अधिकाऱ्याचें राष्ट्रपति असें नांव येतें; आणि बंगालच्या लेखांत राजस्थानीय येतें ( याचा अर्थ जिल्ह्यांतील राजप्रतिनिधि असा होतो ). गाहडवालांच्या दानलेखांत कोणत्याहि मुलकी अधिकाऱ्याचें नांव नसतें. पण पत्तलावर मुख्य अधिकारी असलाच पाहिजे. माळव्यांत मंडलोई हें नांव अद्याप बाकी आहे, आणि तें मंडलपति याचें प्राकृत रूप आहे. तात्पर्य या निरनिराळ्या विभागांच्या मुख्य मुलकी अधिकाऱ्याचें नांव पतिशब्दांत आहे. हा अधिकार बहुधा वंशपरंपरेचा नसावा; तर राजानें किंवा मुख्य मुलकी प्रधानानें काढता येण्यासारखा असावा. हें सांगण्यासारखें

आहे कीं, देशमुख व देशपांडे हीं नांवें दक्षिणेंत मुसलमानी काळांत दिसत असून हल्लींहि शिल्लक आहेत, पण तीं या काळच्या कोरीवलेखांत मुळींच येत नाहींत. यावरून तीं, मुसलमानी नसून संस्कृत असलीं तरी, मुसलमानी काळांत उत्पन्न झालेली दिसतात. शिवाय जिल्ह्याचे दप्तर ठेवणारा देशपांडे याच्यासारखा मध्ययुगीन कोरीवलेखांत कोणी अधिकारी दिसत नाहीं. तथापि प्रत्येक खेड्यांत दप्तर ठेवलेलें निश्चित दिसतें. कारण खेड्याचा दप्तर ठेवणारा करणिक याचा उल्लेख कोरीवलेखांत अनेकदां येतो. भा. १ यांत दाखविल्याप्रमाणें कौटिल्याच्या अर्थशास्त्रांत 'अक्षपटल' याचा अर्थ जमाबंदी दप्तर ठेवण्याची जागा असा आहे. अर्थात् अक्षपटलिक म्हणजे गावांतील दप्तराचा मुख्य. याच शब्दाचें स्वरूप संक्षिप्त होऊन वर्णव्यत्यासानें माळव्याच्या लेखांतील पट्टाकिल शब्द झाला आहे, आणि ह्याच मुळावरून हल्लीचा पटेल किंवा पाटील शब्द निघाला आहे. गांवच्या मुख्यास दुसऱ्या देशांतील लेखांत ग्रामपति (जे. बी ५९ पा. ७१) किंवा ग्रामकूट किंवा नुसते महत्तर (कोकणांत याचें हल्लींचें रूप म्हात्रे आहे) अशीं नांवें येतात. गांवच्या कारभारांत पाटिलास मदत करणिक करी. याजवळ करण म्हणजे खातेदारांची यादी असे. हा शब्द कोकणांत कर्णिक म्हणून येतो, घाटावर कुलकर्णी आणि दक्षिण हिंदुस्थानांत कर्णम् असें रूप येतें. उत्तर हिंदुस्थानांत कोठें कराणिक तर अन्यत्र कायस्थ म्हणत (परमर्दिदेवाचा लेख पहा ए. इं. ४). या लेखांत दुसरे नोकर सांगितले आहेत ते दूत, वैद्य, महत्तर 'मेद आणि चांडालपर्यंत' असे वर्णिले आहेत. गांवकऱ्यांत ब्राह्मण असत, त्यांचा निर्देश नेहमीं प्रामुख्यानें येतो (उदाहरणार्थ परमारलेख इं. ए. १६ पा. २०४). यांत नुसतें वैषयिक म्हणजे तालुक्यांतले अधिकारी, पट्टाकिल, जानपद, ब्राह्मण आणि ब्राह्मणोत्तर असा उल्लेख आहे. शहर म्हणजे

पट्टण याकरितां विशेष अधिकारी असे (ए.इं.४पा.१०१). हे गांवचे व शहरचे अधिकारी हल्लींप्रमाणें त्यावेळींहि वंशपरंपरेचे असावेत.

जमिनींचा मोजणी होत असे (भा.१पा.१-१९२), आणि निवर्तन हा शब्द बिघ्याऐवजीं बहुधा उपयोगीत. पण कधीं कधीं दान दिलेल्या जमिनींचें माप 'अमुक नांगरांनीं जोतलेली' अशा रीतीनें दिलेलें आहे (इं. ए. १८ पा. १५). बल्लाळसेनाच्या नैहट्टी दान लेखांत (ए. इं. १४ पा. १५९) दान दिलेल्या गांवाची चतुःसीमा इतकी तपशीलवार व बारकाईनें दिली आहे कीं, त्यावरून जमिनींचे दप्तर किती तपशीलवार असे हें दिसून येतें. यांत गांवचे एकंदर क्षेत्रहि उन्मानांत दिलें आहे (हें माप नीट लक्षांत येत नाहीं); त्याचप्रमाणें गांवचा ऐनाजिनसी वसूल किती होतो हें सांगितलें आहे [ ह्यांचेंहि माप नीट लक्षांत येत नाहीं ]; आणि नगदी वसूलहि दिलेला आहे. तो पांचशें जुने कपर्दिक इतका थोडा दिलेला पाहून आश्चर्य वाटतें. एक कपर्दिक म्हणजे पाव आणा धरला तर हें उत्पन्न सरासरी आठ रुपये होतें. पण हें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, पैशाची किंमत त्यावेळीं हल्लीं पेक्षां फार मोठी होती. आणि शिवाय, त्या गांवच्या नगदी वसूलाचा हा आंकडा आहे, गांवचा मोठा वसूल म्हणजे उत्पन्न झालेल्या धान्याचा षष्ठांश धान्यस्वरूपांतच असे. जमिनींची विंक्री किंबहुना इनाम गांवांची दानविक्री करण्यास हरकत नव्हती. ही गोष्ट परमर्दिदेवाच्या सेम्रा दानपत्रांत स्पष्टपणें सांगितली आहे (ए. इं. ४ पा. १५३). हे व्यवहार बहुधा सरकारी दप्तरांत नमूद केले जात. कारण त्यांत त्यांचा भाग लावतां येत असे (भा. २ पा. ३७५ पहा).

हें स्पष्ट दिसतें कीं या व्यवहाराचे दस्तऐवज विशेषतः सरकारी लेख मोठ्या काळजीनें आणि दरबारीपणानें तयार होत असावेत. कारण सर्व भूमिदानें ताम्रपटावर लिहिलीं जाऊन त्याच्यावर सही

शिका केला जात असे. दान देणारा राजा दानपत्रावर स्वतः सही करी, आणि सहीचा दर्शक 'स्वहस्त' शब्द घाली. ही सही मूळांत भुर्जपत्राच्या लेखावर केली जात असे; आणि नंतर ताम्रपटावर त्याची नक्कल केली जाई. कधीं कधीं दान देणारा राजा सहीच्या ऐवजीं मजकुराच्या शेवटीं 'मंगलं महाश्रीः' एवढाच शद्व लिही व केव्हां केव्हां आणखी सहीहि घालीत असे [ उदाहरण इं. ए. १४ पा. ३४९ ]. जमीनीचें दान गांवांतील रहिवाशांसमोर तसेंच भोंवतालच्या गांवाच्या रहिवाशांसमोर प्रसिद्ध केलें जाई. विशिष्ट दरबारचे अधिकारी असें दान प्रसिद्ध करीत व त्यांचें नांव ताम्रपटांत शेवटीं दिलें जाई. माळव्याच्या राज्यांत दानलेख फारच संकलित तयार होत, तर इतर ठिकाणीं ते फारच तपशीलाचे असून त्यांत बंगाल्यांतल्या लेखांप्रमाणें दान देणाऱ्या राजाचा वंशेहितास विस्तारानें दिला जाई.असा इतिहास देण्याबद्दल स्मृतींतून स्पष्ट आज्ञाहि आहे.

जमीन महसूलाशिवाय इतर उत्पन्नाचें खातें म्हणजे व्यापार व कारागिरी यांच्यावरील कर म्हणजे शुल्क याचें महत्त्वाचें होतें. आणि प्रत्येक विषयांत ( म्हणजे तालुक्यांत ) हल्लींच्या जकातदाराप्रमाणें शौल्किक नांवाचा अधिकारी निराळा असे. तसेंच तरिक म्हणजे नदी उतारावरील अधिकारी, त्याचप्रमाणें खाणी म्हणजे आकर यांचा अधिकारी, गाई, म्हशी, बकऱ्या, मेंढ्या यांच्या वाढीवर देखरेख ठेवणारा अधिकारी,याचीं नांवें येतात [ जे. बी. ५९ पा. ७१]. बंगालच्या कोरीवलेखांत अधिकाऱ्यांची विशेष तपशीलवार यादी येते त्यांत वरशिवाय आणखी अधिकारी सांगितले आहेत ते:—१ क्षेत्रपाल शेतावर नजर ठेवणारा, २ प्रांतपाल देशाच्या सरहद्दीवर नजर ठेवणारा आणि ३ कोट्टपाल म्हणजे किल्लयावरील अधिकारी. या सर्व यादीवरून बंगाल्यांत आणि तत्दनुरूप इतर देशांतहि वसूली कारभार तपशीलवार आणि हल्ली प्रमाणें व्यवस्थित होता.

या निरनिराळ्या देशांत कोणतें नाणें काय किमतीचें चालत असें हें पाहणें मनोरंजक आहे. द्रम्म आणि दीनार यांचा वारंवार उल्लेख लेखांत येत असून द्रम्म चांदीचें व दीनार सोन्याचे असत. मुसलमानी काळांतील दाम शब्द द्रम्मापासूनच निघाला आहे. हल्लीं हा दाम स्मृतिशेष आहे.दामाची किंमतपूर्वी चार रुपयाइतकी असावी.* मोगल दाम तांब्याच्या असून चाळीस दामाचा एक रुपाया असे.ठाण्याच्या लेखांत द्रम्मांचा उल्लेख आहे. एका कोंकणलेखांत मलवर निष्क शब्द आला आहे ( मुंबई. जे. आर. ए. एस्. ९ पा. २४१ ). मलवर म्हणजे मलबार आणि यावरून निष्काचें वजन आणि किंमत मुसलमानी व मराठी कालांतील रुपयाप्रमाणें निरनिराळ्या देशांत भिन्न असल्याचें दिसतें. निष्क सोन्याचें नाणें महाभारतांतहि उल्लिखित आहे. लहान नाण्यापैकीं कार्षापणाचें नांव येतें. बहुधा हल्लीच्या आण्या इतकी त्याचीं किंमत असावी. किंबहुना आणा शब्द त्याचेंच संक्षिप्तरूप आहे. त्याच्या खालीं कपर्दिकाचा उल्लेख मिळतो. कपर्दिक म्हणजे पांव आणा दिसतो. एखाद्या राष्ट्राचें एकंदर उत्पन्न किंमतीच्या रूपांत कोठें सांगितलेलें आढळलें असतें तर त्यापासून फारच महत्त्वाची माहिती मिळाली असती. म्हणजे मध्ययुगीन काळांतील नाण्याची किंमत व मध्ययुगीन राज्यांची उत्पन्नाची इयत्ता हल्लींच्या आकड्यांच्या तुलनेनें आपल्यास नीट कळली असती; परंतु दुर्दैवानें असे उल्लेख कोठेंच आम्हांस मिळाले नाहींत.

---

*रुपया शद्ब मागील कालविभागांत काठेवाडांतील एका वि. सं. १०१० च्या लेखात प्रथम दिसतो ( भाग. इ. पा. ६८ ). त्यांत " द्रम्ममेकं करी दद्यातुरगो रूपकद्वयम् " असें वाक्य आहे, त्यावरून हें प्रमाण दिसतें.

# न्यायपद्धति.

कारभाराची पुढची बाब, आणि हिंदु कल्पनेप्रमाणें राज्याच्या अधिकाराची अत्यंत महत्त्वाची बाब, न्यायदानाची होय. अतिप्राचीन काळापासून हिंदु राजे प्रजेचा न्याय स्वतः करीत आणि रोज प्रातःकाळीं फिर्यादी ऐकून घेण्यास दरबारांत बसत ( मनु ). त्यांच्या गैरहजरींत प्राड्विवाक त्यांचे जागीं काम करीत. मध्ययुगीन कालांत हीच पद्धति चालू होती असें राजतरंगिणीवरून स्पष्ट दिसतें ( भा. १ पा.२-१००). पण या कालांतील कोरींवलेखांत दरबारी अधिकाऱ्यांत प्राड्विवाकाचें नांव आलेलें नाहीं; यावरून पूर्वीं सांगितल्याप्रमाणें सर्व प्रधानांच्या व सभ्यांच्या मदतीनें आपल्या दरबारांत येणाऱ्या विवादांचा निकाल राजा स्वतः करी असें दिसतें. दंडनायक नांवाचा अधिकारी सर्व कोरींवलेखांत येतो, तो जिल्ह्यांतील न्यायाधिकारी असावा. आरोपी त्याच्या कोर्टांत येऊन सभ्यांच्या मदतीनें आरोपाचा निकाल झाल्यावर तो आरोपीस शिक्षा करीत असे. स्मृतिनियमाप्रमाणें दिवाणी आणि फौजदारी असा व्यवहारांत भेद नाहीं. सर्व दिवाणी फौजदारी व्यवहाराचे ठरलेले विषय (विवाद) असत; आणि त्या प्रत्येकांत जो पक्षकार हरेल त्यास दंड द्यावा लागे किंवा अपराध्यास कैदेची किंवा वधाची शिक्षा होई. पोलिस आणि जेल हे बहुधा दंडनायकाच्या हाताखालीं असावे, आणि त्यांजवर त्याच्याच बरोबरीचे दांडिक आणि दंडपाशिक हे अधिकारी असत ( बंगाल. जे. आर. ५९ पा. ७१ ). प्रत्येक जिल्ह्यांत चोर व दरोडेखोर यांचा पत्ता लावण्याकरितां चौरोद्धरणिक नांवाचे अधिकारी असत. हिंदुधर्मशास्त्रांत व हिंदु राज्यांत चोर व दरोडेखोरांना हुडकून काढण्याच्या कामास अत्यंत महत्त्व दिलें जाई; आणि चोरांस प्रत्यक्ष चोरी करीत असतांना पकडले गेले असतां निर्दय शासन म्हणजे

डावा हात तोडला जाण्याची शिक्षा दिली जाई. लहान फौजदारी विवाद गांवची पंचायत किंवा गांवचे अधिकारी कायमच्या निकालांत काढीत.प्रत्येक इनामाच्या दानलेखांत 'सदशापराधः' असा शब्द येतो; याचा अर्थ आमच्या मतें असा आहे कीं, दहा लहान अपराधांची चौकशी गांवच्या अधिकाऱ्यांनीं करावी, अर्थात् त्यांत होणाऱ्या दंडाची रक्कम इनामदारास मिळे. यापेक्षां मोठालें गुन्हे तसेच मोठाले दिवाणी दावे यांत वादीनें आपली फिर्याद प्रत्यक्ष राजापुढें किंवा जिल्ह्यांतील राजस्थानीयापुढें अथवा दंडनायकापुढें मांडावी अशी पद्धत दिसते; व या अधिकाऱ्यांस राजा इतकेच निकालाचे अधिकार असत, म्हणजे तेहि सभ्यांच्या मदतानें निकाल करीत. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, हिंदुन्यायपद्धतींत अपीलें नव्हतीं. जिल्हा कोर्टांत हरणाऱ्या पक्षकारास राजापुढें आपला न्याय नेण्याची परवानगी असे; व राजास योग्य वाटल्यास त्या विवादाची चौकशी प्रारंभापासून पुनः केली जाई. पेशव्यांच्याहि काळापर्यंत अशीच पद्धति असल्याचें दिसतें.

शेवटीं अल्बेरूनीनें याविषयीं जें लिहिलें आहे तें पुढें देऊं. (प्रकरण ६५ पा. १५८). "वादीस आपली लेखी फिर्याद व आपला दस्तऐवज द्यावा लागे. दस्तऐवज नसल्यास साक्षीदार कमीत कमी चार आणावे लागत. साक्षीदारांच्या उलट तपासणीची परवानगी नसे. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांस खुनाबद्दल शिक्षा नसे; पण त्यांस राज्यांतून हांकलून दिलें जाऊन त्यांची मिळकत जप्त केली जाई. चोरीबद्दल ब्राह्मणांस डोळे काढले जाऊन डावा हात व उजवा पाय तोडल्याची शिक्षा असे. क्षत्रियांस डोळे काढण्याची शिक्षा मात्र दिली जात नसे. इतर जातीच्या लोकांस देहांत शिक्षा असे." या पुराव्यावरून ब्राह्मणांस सुद्धां या कालविभागांत चोरीबद्दल कशी कडक शिक्षा होई हें दिसून येतें. साक्षीदारांची संख्या

अमुकच असावी असा स्मृत्यांत नियम दिसत नाहीं. वकिलांची संस्था ब्रिटिश अमलांतच उत्पन्न झालेली असून पूर्वकालीं नव्हती; अर्थात् साक्षीदारांच्या उलट तपासणीची तेव्हां कल्पनाच नसे. परंतु त्यांना मोठ्या समारंभानें शपथ दिली जाई आणि शपथेवर खोटें सांगितलें असतां पुढील जन्मांत आपल्यास भयंकर परिणाम भोगावा लागेल अशी भीति असे, यामुळें त्याकाळीं हल्लींपेक्षां साक्षीदार जास्त खरें बोलत. प्रत्यक्ष राजाच्या दराऱ्यामुळेंहि पूर्वीं साक्षी जास्त खऱ्या होत असाव्या. आणि याच कारणानें एकंदर दाव्यांचीं विशेषतः दिवाणी दाव्यांची पूर्वीं संख्याहि कमी असावी.

जेथें विवादाचा निकाल होण्यांत अतिशय शंका पडे, तेथें निरनिराळीं दिव्यें करीत असल्याचें अलबेरूनीनें वर्णन केलें आहे. कदाचित् हें वर्णन धर्मग्रंथांवरून त्यानें केलें असावें; प्रत्यक्ष निरीक्षणावरून नव्हे. कारण कोणताहि पक्षकार वर्णिलेलीं दिव्यें करण्यास कसा तयार होत असे याचें गूढ आहे. दिव्यें करणारा खरा असो किंवा खोटा असो अग्नि,जल इत्यादिकांच्या दिव्यांत निसर्ग आपला धर्म सोडणार नाहीं. कांहीं युक्ति गुप्तरीतीतें योजिली तर गोष्ट निराळी. या शंकेचें समाधान कसेंहि असो, दिव्यें हिंदु धर्मशास्त्रांत सांगितली आहेत; आणि अलबेरूनीच्या पुराव्यावरून या कालविभागांत न्यायपद्धतींत दिव्यांचा उपयोग होत असे असें दिसतें.

## दक्षिण हिंदुस्थानांतील लोकसभा.

दक्षिण हिंदुस्थानांत म्हणजे केरळ आणि तामिळ राज्यांत हिंदुस्थानच्या इतर भागांहून कांहीं विशिष्ट परिस्थिति असल्यानें लोकसभा असत; आणि त्यास अंमलबजावणीचे व न्यायदानाचे अधिकार असत. या देशांतील मूळच्या द्रविडवंशी लोकांची वस्ती फारच मोठी होती; इतकेंच नव्हे तर हे लोक इतर प्रांतांतल्यापेक्षां जास्त

सुधारले होते. तसेंच यांच्यावर येऊन बसलेल्या आर्यवंशी लोकांचा थर अगदीं थोडा होता, आणि शिवाय हे लोक आपल्यास इतके शुद्ध मानीत कीं, ते तद्देशीय लोकांपासून अगदीं तुटक रीतीनें निराळे रहात. तथापि सुद्धां प्रत्येक ठिकाणीं खेड्यांच्या पंचायती, जिल्ह्यांच्या लोकसभा आणि सर्व राष्ट्राची लोकसभा असल्याचा दाखला कोरींवलेखांत मिळतो. हे कोरींवलेख तामिळ व मल्याळी भाषेंत असल्यानें आमच्या अभ्यासाच्या बाहेर आहेत. परंतु के. पी. मेनान यांच्या 'मलबारच्या इतिहासा'वर जर्नल ऑफ इंडियन हिस्टरी (एप्रिल १९२५) मध्यें एक परीक्षणलेख आला आहे त्यांतील पुढील उतारा या विषयासंबंधें आम्ही देतों. आम्हीं पूर्वी रा. पिले यांच्या इं. ए. २४ यांतील लेखावरून देवळांच्या कार्यावर देखरेख करणाऱ्या सहाशे लोकांच्या सभेचा उल्लेख केलाच आहे.

"तीन प्रकारच्या लोकसभा म्हणजे 'कुट्टम' असत. 'तर' म्हणजे खेड्याकरितां एक, "नाडू" म्हणजे जिल्ह्याकरितां एक आणि सबंध केरळ देशाकरितां एक. पहिल्या खेड्याच्या सभेंत गांवांतील कुटुंबांचें मुख्य म्हणजे 'करणवर' जमून स्थानिक महत्त्वाच्या गोष्टींचा विचार करीत. नाडूची सभा याहून विस्तृत गोष्टींचा विचार करी. तिला प्रातिनिधिक संस्थेचें स्वरूप असून मोठे अधिकार असत; व कधीं कधीं ती राजाचाहि अधिकार अमान्य करी."

"'केरलोत्पत्ति' ग्रंथावरून असें कळतें कीं, त्या देशावर जेव्हां पेरुमाल राज्य करूं लागले तेव्हां राजाच्या सत्तेला कांहीं आळा असावा म्हणून ब्राह्मणांनीं देशाचे अठरा विभाग पाडले; आणि राजास अठरा लोकसभा देऊन त्यांचें मत महत्त्वाच्या बाबतींत नेहमीं घ्यावें असें ठरविलें. 'पांचशें' 'सहाशें' आणि 'सहा हजार' अशा नांवाच्या सभा लोगान साहेबानें जमविलेल्या सहाव्या शतकांतील एका सिरियन ताम्रपटांत (नं. ३) उल्लेखिल्या आहेत. ज्यू आणि

ख्रिस्ती यांनांहि त्यांच्या सभांतून विशिष्ट अधिकार असत." (ख्रिस्ती लोक आणि मुसलमान लोक बऱ्याच प्राचीन काळीं येऊन मलबारांत वसती करूं लागले होते.)

"राजेश्री पी मेनॉन यांनीं खेड्यांच्या सभांचा उल्लेख करणाऱ्या अनेक कोरीव लेखांचा दाखला दिला आहे. केरळांतील स्थानिक सभांची वाढ तामिल देशांतील स्थानिक सभांच्या प्रसिद्ध वाढीप्रमाणेंच झालेली दिसते. उत्तर पल्लव, चोल आणि पांड्य यांच्या कोरीवलेखांत तामील देशांतील लोकसभेचे वर्णन पुष्कळ आलें आहे. केरळांतील खेड्यांच्या सभा आशान म्हणजे पाटील याच्या अध्यक्षतेखालीं जमत, सामाजिक तंट्यांचा निकाल करीत, लहान मुकादम्यांचा फैसला करीत, आणि देवळांच्या निरनिराळ्या गरजांची व्यवस्था लावीत. मलबारांत प्रथम आलेल्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं नायरांच्या 'तर' (गांवच्या) लोकसभेचा अव्हेर केला. सर्व देशाची मोठी सभा बारा वर्षांनीं एकदां भरे. तिचा अध्यक्ष वल्लुवनाड असे किंवा वल्लितिरि राजा असे. तेराव्या शतकांत झामोरिन राजानें हा अधिकार आपल्याकडे घेतला. अशी शेवटली सभा १७४३ इ. त भरली होती."

"स्थानिक व्यवस्था वंशपरपरेनें चाललेल्या अधिकाऱ्यांच्या हातीं असलेली दिसते. देशाचे नाडू विभाग म्हणजे जिल्हे नाडूवाली यांच्या अधिकारांत असत. नाडूचे पोटविभाग देशम् असत, त्याजवर देशवालींचा अधिकार असे. देशम् याचे आणखी पोटविभाग असत; पण ते जातींच्या संघवार असत; म्हणजे नंबुरींचें गांव, नायरांचें 'तर' आणि खालच्या जातींच्या लोकांचे 'चेरी' असे असत. याप्रमाणें पश्चिम किनाऱ्यावरील 'नाडू' आणि 'देशम्' पूर्व किनाऱ्यावरील त्याच विभागांहून भिन्न असत; कारण त्यांत अमुक नगरें व गांवें असे विभाग नसून नायरांचे अमुक संघ वगैरे विभाग असत." (पा. ११५ ते ११७).

## फौजी व्यवस्था.

या कालविभागांतील हिंदु राज्यांच्या फौजी व्यवस्थेचें आपणांस वर्णन करणें बाकी आहे. पूर्वीच्या कालविभागांत आम्हीं फौजी व्यवस्थेचें वर्णन केलेंच आहे (भा.२पा३८०-५); आणि तीच व्यवस्था याहि कालविभागांत राहिली. या राज्यांत खड्या फौजा थोड्याच असत, आणि राज्याची फौज सरदारांच्या पथकांची असे. गोविंदचंद्रानें मात्र खडी मोठी फौज ठेविलेली दिसते. गजसैन्य प्रत्येक राज्यांत राजाचें ठेवलेलें असे; कारण त्याचा जबरदस्त खर्च करण्याचें सामर्थ्य राजासच असें. बंगालच्या फौजेंत परदेशांतील भाडोत्री शिपाई असत; हें या कालांतील मदनपालाच्या लेखावरूनहि दिसतें (बंगाल ५९ पा. ७१). आणि त्यांत पूर्वीच्या काळांतील भागलपूर कोरींवलेखांत सांगितलेलेच परदेशी शिपाई आहेत; म्हणजे गौड, मालव, खस, हूण, कुलिक, कर्नाट आणि लाट यांचेंच नांव असून चोडांचें नांव मात्र अधिक आहे. या कालविभागांत चोल (चोडहि लिहिलें जातें) मोठे सत्तावान् झाले, तेव्हां चोड शिपायांची शौर्याबद्दल ख्याति पसरून बंगालच्या फौजेंत त्यांची भरती झाली ह्याचें आश्चर्य नको. कर्नाट शिपायांची ख्याति अल्बेरूनीनेंहि नमूद केली आहे, व 'कन्नर' शिपाई पंजाबपर्यंत उत्तरेकडे फौजेंत भरती होत. कर्नाटक देशाचें वर्णन करितांना "जेथून कन्नर नांवाचे फौजेंत प्रसिद्ध असलेले शिपाई येतात तो देश" असें वाक्य त्यानें घातलें आहे (सचाऊ भा. १ पा. १७३). ही परिस्थिति आतां उलट झाली आहे. लोकांचे स्वभाव बदलतात असें जें मत भा.२ (पा.३८२) मध्यें आम्ही दिलें आहे त्या मतास या गोष्टीनें पुष्टि मिळते. कारण कन्नड लोक अद्याप मजबूत आणि लढवय्ये असले तरी ते दूरदूरच्या देशांत शिपायाची नोकरी करण्यास जात नाहींत.

महनपालाच्या कोरींवलेखांत पूर्वकालविभागांतील भागलपूरच्या कोरींवलेखांत सांगितलेलेच फौजी अधिकारी सांगितले आहेत ते असेः—( १ ) महासेनापति ( २ ) दौःसाध्य–साधनिक (३) गज, अश्व, उष्ट्र आणि नाविक यांचे अधिकारी ( ४ ) प्रेषणिक ( दूत किंवा हेर ) ( ५ ) गमागमिक आणि ( ६ ) अभित्वरमाण ( या दोन शब्दांचा अर्थ लागत नाहीं हें भा. २ मध्यें सांगितलेंच आहे). बंगालशिवाय इतर राज्यांतहि नाविकांच्या अधिकाऱ्यांखेरीज हेच अधिकारी असावेत. अश्वदलाचा कोठें मुख्य अधिकारी निराळा बुंदेलखंडाप्रमाणें असे. साधारण शिपायास भट म्हणत. पोलिसखातें फौजखात्याहून निराळें असावें. पोलिसांचे गुल्म म्हणजे ठाणीं असत; आणि त्यांचे अधिकारी गौल्मिक असून ते जिल्ह्यांच्या दांडिक अधिकाऱ्याच्या हाताखालीं किंवा राजस्थानीयाच्या हाताखालीं असावेत. हे तर्क आम्ही ज्या क्रमानें अधिकाऱ्यांचा उल्लेख कोरींवलेखांत येतो त्या क्रमावरून करीत आहोंत (परिशिष्ट पहा.).

या कालविभागांतील लेखांतहि शिपायांस किंवा अधिकाऱ्यांस वेतन कसें व काय मिळे याजबद्दल विधानें मिळत नाहींत. बहुधा भा. २ यांत तर्क केल्याप्रमाणें त्यांस कांहीं नगदी वेतन मिळून सरकारी कोठारांतून धान्य मिळे. मुलकी अधिकाऱ्यांना जमिनी आणि गांवें लावून दिलेलीं असत असें दिसतें. श्रेष्ठ अधिकारी, मुलकी व फौजी, यांस नगरें लावून दिलीं असावींत.

समरांगणांत सेनेचें आधिपत्य नेहमीं राजाकडे असे; आणि हत्तीवर राजा सेनेपुढें चाले.

## सन्मानाचें उगमस्थान.

सर्व पदव्या राजा देत असे. व्यापारी लोकांची श्रेष्ठी ही पदवी सुद्धां राजा देई ( ए. इं. भा. २ पा. २३७ ).

# प्रकरण सातवें.

## भाषा व वाङ्मय.

दुसऱ्या भागांत वर्णन केल्याप्रमाणें हिंदु मध्ययुगीन इतिहासाच्या दुसऱ्या कालविभागांत ( ८०० ते १००० ) हिंदुस्थानच्या हल्लींच्या देशभाषा देशांतील राजकीय, विशेषतः धार्मिक, कारणांनीं उत्पन्न झाल्या. कारण बौद्धधर्म उच्छिन्न होऊन हिंदुधर्म नवीन तऱ्हेचा बनला, त्या वेळेस संस्कृताचा अभ्यास ज्यास्त जोरानें होऊं लागला. मुख्यतः शंकराचार्यांचें नवीन तत्त्वज्ञान लोकांस त्यांच्या भाषेंत समजून द्यावें लागलें. यामुळें अपभ्रंश भाषा जरी आर्य हिंदुस्थानांत प्रचलित होत्या, तरी त्यांत पुष्कळ बदल होऊन संस्कृतांतून जसेच्या तसेच घेतलेले ( तत्सम ) शद्ब पुष्कळ वापरले गेल्यानें आणि संस्कृतांतून विभक्त्यंत रूपें व धातुसाधित रूपें जशींच्या तशींच वापरूं लागल्यानें बदल झाला. आर्येतर भाषांतहि शुद्ध संस्कृत शद्ब वापरले जाऊं लागल्यानें नवें रूप येऊन सौंदर्यहि आलें.या रीतीनें हल्लींच्या संस्कृतोत्पन्न देशी भाषा मागील कालविभागांत अस्तित्वांत आल्या; म्हणजे बंगाली, हिंदी पूरबिया, हिंदी पश्चिमी ( राजस्थानी ), पंजाबी, गुजराथी आणि मराठी. व त्याचप्रमाणें हल्लींच्या आर्येतर देशीभाषा, कानडी, तेलगू, तामील व मल्यालम् याहि जन्मास आल्या. या कालविभागांत या सर्व भाषा इतक्या उत्कर्ष पावल्या कीं त्यांत संस्कृतांतल्याप्रमाणें आप्त वाङ्मय उत्पन्न झालें. या निरनिराळ्या भाषांच्या प्रांतांत जुन्या एकाच देवनागरी लिपीवरून निरनिराळ्या लिपीहि उत्पन्न झाल्या हें आश्चर्य करण्यासारखें आहे. या लिपींचीं नांवें अल्बेरूनीनें पुढीलप्रमाणें दिलीं आहेत ( भा. १ पा. १७३ ). " सर्वांत अधिक प्रसिद्ध लिपि म्हणजे सिद्धमातृका होय. ही

काश्मीरांत आणि वाराणशींत चालते. हिंदुशास्त्राच्या अभ्यासाची हीं वरिष्ठ ठिकाणें आहेत. हीच लिपि मध्यदेशांत म्हणजे कनोज भोंवतालच्या आर्यावर्तांत चालते. " ही लिपि म्हणजे पूरबिया हिंदी होय. " माळव्यांत नागरी म्हणून निराळी लिपि आहे. तिच्यांत व वरील लिपींत आकारांत थोडासा भेद आहे. तिसरी एक लिपि अर्धनागर नांवाची वरील दोन्ही लिपि मिळून झालेली आहे. ही भाटियांत आणि पंजाबच्या कांहीं भागांत चालते. " (भाटियाशहर आणि देश, हा सिंधच्या उत्तरेस असून पंजाबचा एक भाग झेलमच्या पश्चिमेस होता असें आम्हीं प्रारंभीच्या भूगोलिक प्रकरणांत जें मत दिलें आहे त्याचें येथें दृढीकरण सांपडतें ). हीच बहुधा हल्लीची पंजाबी लिपि असावी. " दुसऱ्या लिप्या म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांत समुद्र किनाऱ्यावर चालू असलेली मलयबरी, अल्मन्सूराची सैंधव, कर्नाट देशांत " जेथून कन्नर नांवानें प्रसिद्ध असलेले फौजेंतील शिपाई येतात, " चालू असलेली कर्नाटकी, आंध्र देशांत चाललेली आंध्री, दिरवर देशांतली दिरवरी ( द्रविडीं ), लाड देशांतली लारी आणि पूर्व देशांत बौद्ध वापरीत असलेली गौरी या होत. "

हिंदुस्थानांत चालू असलेल्या लिप्यांचें हें संपूर्ण वर्णन आहे; आणि ह्यावरून असें आपणांस अनुमान काढतां येतें कीं, या वर्णनांत भाषेसंबंधानेंहि परिस्थिति पूर्ण प्रतिबिंबलेली आहे. याच भाषा हल्लीं प्रचलित आहेत. पूर्वपंजाब व काश्मीरपासून बनारसेपर्यंत पूर्व हिंदीभाषा व तिची लिपी आहे. माळव्यांत आणि राजपुतान्यांत पश्चिमी-हिंदी आहे. उत्तर सिंधांत आणि पश्चिम पंजाबांत एक निराळी भाषा आहे; आणि सिंधांत सिंधी आहे. पश्चिम किनाऱ्यावरील भाषेस व लिपीस मलबरी म्हटलें आहे. बहुधा समुद्रानें मलबारांतून सिंधपर्यंत ती गेली असावी; आणि अल्मनसुरांत निराळी भाषा सैंधवी अरबी आणि हिंदी यांच्या मिश्रणानें बनली असावी.

या दोन्ही हल्लीं जिवंत नाहींत असें वाटतें. १०३०इसवींत म्हणजे अल्बेरूनीच्या काळांत गुजराथी भाषा व लिपी अस्तित्वांत आली नव्हती असें वाटतें. त्याचप्रमाणें अल्बेरूनी मराठी लिपीचा उल्लेख करीत नाहीं. बहुधा लाट देशाची लाडी भाषा ही उत्तर कोंकणांत बोलली जात होती; आणि हीच जुनी मराठी असावी. ही यादवांच्या अमदानींत तेराव्या शतकांत हल्लीच्या मराठींत रूपांतरित झाली. मार्कोपोलोनें असें लिहिलें आहे कीं गुजराथेंत आणि ठाण्यांत निरनिराळ्या भाषा होत्या. मराठी ही आतां सामान्य भाषा झाली असून तिच्या निरनिराळ्या पोटभाषा म्हणजे उत्तर कोंकणांतील लाडी, दक्षिण कोकणांत कोंकणापर्यंतची कोंकणी आणि मुख्य महाराष्ट्र, खानदेश आणि विदर्भ यांतील भाषा, यांस यादवांच्या सर्वव्यापी सत्तेमुळें आणि पंढरपूरच्या सर्वव्यापी भागवत भक्तीमुळें मराठी हल्लीं व्यापून आहे. या दोन्ही गोष्टी या कालविभागाच्या अंतीं म्हणजे ११७० पासून १२००पर्यंत घडल्या. मराठीची स्वतंत्र स्थिति या काळांतील महानुभाव ग्रंथावरून दिसते आणि इ.१३००च्या सुमारें ज्ञानेश्वरीसारखा सर्वोत्कृष्ट ग्रंथ निर्माण झाला, यावरून या पूर्वी शंभर वर्षे तरी मराठीची चांगलीच वाढ झालेली असावी. ठाण्याच्या शिलाहारांच्या एका राजाच्या लेखांत एक मराठी वाक्य आलें आहे. बंगालमध्यें त्या प्रांताची भाषा या काळांत चांगलीच उदयास आलेली असावी; आणि तेथील निराळी लिपी गौडी हिचा उल्लेख अल्बेरूनीनें केलाच आहे.

दक्षिण हिंदुस्थानांतील निरनिराळ्या देश भाषा म्हणजे कानडी, तेलगू, तामिल ऊर्फ द्राविडी आणि मल्याळम् या पूर्वीच वाढून त्यांत वाङ्मय उत्पन्न झालें होतें. आम्ही भा. २ यांत डा. सर ग्रियरसन यांच्या 'हिंदुस्थानच्या भाषांचें परीक्षण' या ग्रंथांतून उतारे देऊन कानडी, तेलगू आणि मराठी वाङ्मय किती प्राचीन काळपर्यंत

मागें जातें हें दाखविलें आहे. ( टिप्पणी परिशिष्टांत दिली आहे ).

याशिवाय या कालविभागांत कानडी, तामिल आणि तेलगू या भाषांत लिहिलेले अनेक कोरीव लेख मिळाले आहेत. प्राच्य गंगांच्या १०७५ इसवीच्या एका संस्कृत शिलालेखांत शेवटीं तेलगू वाक्यें दिलीं आहेत ( ए. इ. ४ पा. ३१४ ). तात्पर्य सर्व हल्लींच्या हिंदुस्थानांत बोललेल्या देशभाषा, संस्कृतोत्पन्न व तामिलोत्पन्न, भाषा या स्वरूपानें, पूर्ण वाढून त्या प्रत्येकींत या काळांत सुंदर वाङ्मय निर्माण झालें. मराठींत महानुभाव ग्रंथ व त्यानंतर १००वर्षांनीं ज्ञानेश्वरी, कानडींत पंपाचें आदिपुराण, तेलगूंत नन्नयाचें महाभारत हे या वेळचे ग्रंथ अजून कालाच्या पाठीवर अद्याप तरंगत आहेत. प्राच्य हिंदी आणि राजस्थानी म्हणजे डिंगल यांतहि त्यावेळचे ग्रंथ आहेत, पण त्यांचा अद्याप अभ्यास झाला नाहीं. आणि शेवटीं पृथ्विराज रासा जरी हल्लींच्या स्थितींत फार वाढलेला ग्रंथ आहे तरी मूळ स्वरूपांत आपल्या या कालविभागाच्या शेवटीं तो तयार झाला असें आम्हास वाटतें.

हें देशी वाङ्मय मुख्यतः पद्यमय आहे; आणि बहुतेक संस्कृत काव्यांचें किंवा पुराणांचें भाषांतर अथवा अनुकरण या रूपानें आहे. पण खुद्द संस्कृतांत या कालविभागांत जे निरनिराळ्या अनेक विषयावर नवे ग्रंथ लिहिले गेले त्यांकडे वाचकांचें लक्ष वेधणें गैर होणार नाहीं. विद्येचीं मुख्य स्थानें काश्मीर आणि बनारस होतीं हें अल्बेरूनीनें लिहिलेंच आहे. आणि शिवाय बंगाल्यांत नडिया, दाक्षिणेंत तंजावर आणि महाराष्ट्रांत कल्याण याहि राजधान्या विद्यांची पीठें होत्या. कनोज आणि उज्जयिनी हींहि ठिकाणें पूर्वीप्रमाणेंच विद्येकरितां कदाचित् प्रसिद्ध होतीं; आणि मध्य देशाचे विद्वान् लोक बाण आणि कुमारिल यांच्या वेळीं जसे महामीमांसक होते, त्याचप्रमाणें या वेळींहि वेदांचा अभ्यास करून वैदिक यज्ञहि

उत्साहानें पूर्वीप्रमाणें करीत.* असो, या विषयांच्या यादींत अलंकार, तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, न्याय, व्याकरण, ज्योतिष, वैद्यक, आणि संगीत इतके विषय प्रामुख्यानें येतात. राजेश्री पी. व्ही काणे यानीं अलंकारशास्त्राच्या वाढीचा इतिहास तपशीलवार दिला असून मम्मट (११००इ.) व इतर शास्त्रकार यांनीं यावेळीं ध्वनीचा सिद्धान्त कसा उत्क्रांत केला हें दाखविलें आहे. तत्त्वज्ञानांत या काळांत रामानुज वगैरेच्या ग्रंथानें भर पडली, व सांख्य आणि योग, बौद्ध आणि जैन कौमारिल आणि शांकर या तत्त्वज्ञानांनीं पूर्वीच प्रचंण्ड असलेलें हिंदुस्थानचें तत्त्वज्ञानवाङ्मम आणखी वाढलें.† धर्मशास्त्राचा अभ्यास सर्व हिंदु राज्यांत कसा होत होता आणि मिताक्षेरेसारखे भरीव ग्रंथ कसे निर्माण होत होते हें आम्ही पूर्वीं सांगितलेंच आहे. न्यायांतहि नडिया येथील हिंदु नैय्यायिकांनीं एक नवीन दिशा घेतली. हेमचंद्राचें नवें सम्कृत-प्राकृत-व्याकरण याचा आम्ही पूर्वी उल्लेख केलाच आहे. ज्योतिषांत कल्याणच्या विक्रमाचा पुत्र हा एक विद्वान् राजग्रंथकर्ता झाला आणि भास्कराचा सिद्धांत-शिरोमणि, ज्योतिष विषयावरील हिंदूंचा उत्कृष्ट ग्रंथ (११७५), याच काळांतील आहे. त्याचप्रमाणें वैद्यकांत मथुरेजवळील भदावरचा डल्हण आणि बंगालच्या नयपालाचा राजवैद्य चक्रपाणि यांनीं याच कालांत चरक-

---

* अश्रान्तक्रतुकुंडमण्डलचलध्दूमावलिश्यामलव्योमाशावलयं विलोक्य विलसन्नीलाम्बुदालिभ्रमात् । विप्रास्येरितवेदराशिविततोद्धोषोद्धरे यद्गृहे सत्पक्षप्रसरा रटन्ति पटवो हृष्टा मुहुः केकिनः ( ए. इं. १ पा. ४१ ).

† हें सर्व तत्त्वज्ञान त्यावेळचे विद्वान् लोक शिकत ही गोष्ट ए. इं. १ (पा. ५१) यांत एका महान् पंडिताचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे, त्यावरून दिसेल. मीमांसाद्वयपारगो गुरुरसौ यः काश्यपीये नये । सांख्ये चाप्रतिमल्लतानयानिधिर्व्यक्षोक्षपादोक्तिदृक् ॥ यश्चार्वाकविशालमानमलनो दुर्वारबौद्धाम्बुधेः । पानानन्दितकुम्भसम्भवगुनिर्दिग्वाससामन्तकः ॥

संहितेवर विस्तृत व विद्वत्तापूर्ण टीका लिहिल्या. माळव्याचा राजा भोज याची विलक्षण विद्वत्ता आणि त्याचे अनेक विषयावरील प्रमाणभूत ग्रंथ हे पूर्वीच उल्लेखिलेले आहेत. केरळ देशाची फलज्योतिष आणि वैद्यक याबद्दल विशेष प्रसिद्धि असल्याचें मार्कोपोलोनें लिहिलें आहे (पा. ३७६). पश्चिम किनाऱ्यावर आणि पूर्व किनाऱ्यावर कदंब आणि चोल यांच्या अमदानींत संगीताचा पुष्कळ अभ्यास झाला; आणि नृत्यकलेची विशेष प्रगति झाली. काश्मीरांत हर्षराजाची त्यानें केलेल्या सरस संगीतपद्यांबद्दल आणि गायनास दिलेल्या आश्रयाबद्दल मोठी ख्याति झाली. याप्रमाणें या कालविभागांत हिंदुलोकांच्या सूक्ष्म व तेजस्वी बुद्धिमत्तेबद्दलची कीर्ति काव्यप्रकाश आणि सिद्धांत–शिरोमणी, नैषध (पंचमहाकाव्यापैकीं एक ) आणि गीतगोविंद (सर्व पृथ्वींतील अत्यंत मनोहारि वीणाकाव्य), अशा प्रकारच्या ग्रंथोत्पत्तीनें कायम राहिली. तात्पर्य भोज आणि मम्मट, भास्कर आणि रामानुज, जयदेव आणि श्रीहर्ष इत्यादि अनेक चमकणाऱ्या ग्रंथकर्त्यांच्या तारकापुंजानें मध्ययुगीन हिंदु इतिहासाचा हा अंधःकारयुक्त भाग कांहींसा दीप्तिमान केला आहे.



# परिशिष्ट

## (१) डॉ. ग्रियरसन यांच्या 'हिंदुस्थानच्या भाषांचें निरीक्षण' या ग्रंथांतील जुन्या ग्रंथाच्या कालाविषयीचा उतारा:—

(१) कानडी—यांतील जुने ग्रंथ १० व्या शतकापर्यंत मागें जातात. कानडी वाङ्मयाचा उगम जैनांच्या प्रयत्नानें झाला आणि पहिल्या वाङ्मय ग्रंथावर संस्कृताचा बराच परिणाम दिसतो. कानडी वाङ्मयाचे तीन विभाग करितां येतात. (१) जुनी कानडी १० व्या शतकापासून तेराव्या शतकापर्यंत. यांतील मुख्य ग्रंथ व्याकरण आणि छंदःशास्त्र यांतील मूळ संस्कृत ग्रंथावरून बनविलेले आणि भिन्न पंथांचे ग्रंथ त्याचप्रमाणें अत्यंत कृत्रिम तऱ्हेचे लिहिलेले काव्यग्रंथ आहेत. हें वाङ्मय ज्या जुन्या भाषेंत लिहिलें आहे ती सारखी असून विलक्षण दरबारी दिसते. त्यांत संस्कृतांतून घेतलेले तत्सम शब्द फारच येतात. तींतील उच्चार हल्लींच्या कानडीहून निराळे आहेत आणि विभक्तीचीं रूपेंहि भिन्न आहेत. उदाहरणार्थ पंपाचें आदिपुराण (९४१ इ.) वगैरे ग्रंथ आहेत. (२) मध्यकाळांतील कानडी. पूर्वींचे विभक्तीचे आणि वाक्यरचनेचें नियम सर्व बदलून नवीन रूपें हींत अमलांत आलीं —तेरावें तें पंधरावें शतक. (३) हल्लींची कानडी. यांतील वाङ्मय १६ व्या शतकाइतकें जुनें आहे. पुष्कळशी वैष्णवांची कविता दुसऱ्या काळांतली आहे.

(२) तेलगू—पहिला तेलगू ग्रंथकर्ता कण्व होता अशी दंतकथा आहे, पण त्याचे ग्रंथ मिळत नाहींत. हल्लीं मिळणारा सर्वांत जुना ग्रंथ १००० इसवीच्या सुमाराचा आहे. यावेळीं विष्णुवर्धन ऊर्फ राजराजनरेंद्र या राजानें (१०२२–१०६०) तेलगू वाङ्मयास मोठा आश्रय दिला. याच्या दरबारांत हल्लीं असलेल्या जुन्यांत जुना तेलगू व्याकरणाचा कर्ता आणि महाभारताच्या तेलगू भाषांतराचा कर्ता नन्नयभट्ट होता. आंध्रांची निराळी भाषा असून त्यांची लिपी उत्तरेकडील लिपीहून

फारशी भिन्न नव्हती असें हुएनत्संग लिहितो; आणि कुमारिलानें आंध्र–द्रविड भाषेचा उल्लेख केला आहे. (त्यानें फक्त द्रविड भाषेचा उल्लेख केला आहे. याशिवाय आंध्र उत्तरेचीच लिपि लिहीत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे ).

( ३ ) बंगाली—मागधीच्या एका पूर्वेकडील पोटभाषेंतून बंगाली निघाली आहे. ८०० वर्षांपूर्वी बंगाल्यांस जे उच्चार करितां येत नव्हते ते अजूनहि करितां येत नाहींत. क्ष्म, स आणि ह्य ह्यांच्याऐवजी ते च्छम, ष आणि ज्झ उच्चारितात. वाङ्मयांत जुन्या कवींपैकीं चंडिदास नांवाचा एक होता. १४ व्या शतकांत कृष्णभक्तिपर त्यानें पद्यें केलीं.

( ४ ) प्राच्य हिंदी—फार प्राचीन कालापासून औधमध्यें वाङ्मय उत्पन्न झालें होतें; त्याचें वर्णन करणें कठीण आहे. जेव्हां तुळशीदासानें आपला ग्रंथ लिहिला तेव्हां तें नष्ट झालें ( १६२४ इसवी मृत्यु ), आणि प्रत्येक ग्रंथकार पुढें तुळशीदासाच्या तऱ्हेनें लिहूं लागला. मलिक महमद जैसी यानें पद्मावती काव्य त्याच्यापूर्वीं लिहिलें आहे ( १५४० ), व त्यांत मेवाडच्या रतनसिंग राजाचा पराक्रम आणि अल्लाउद्दीन यानें चितोडास वेढा देऊन घेतल्याची हकीकत वर्णिली आहे.

( ५ ) पश्चिमी हिंदी—राजपुतान्याचे आणि खानदेशचे भिल्ल द्रविडी वंशाचे आहेत तरी आपली भाषा टाकून पश्चिमी हिंदी बोलतात. तीस भीली म्हणतात. राजस्थानी आणि मारवाडी यांत पुराणें वाङ्मय आहे; पण त्याचा अभ्यास अजून झाला नाहीं. चंदाचा पृथ्विराज रासा हेंच हल्लीं सर्वांत जुनें हिंदी काव्य आहे, पण तें संशयित आहे. मारवाडी भाषेंतील जुनें वाङ्मय डिंगल भाषेतलि म्हणतात. मिराबाईची पद्यरचना ब्रज भाषेंत आहे, त्यास पिंगल म्हणतात.

( ६ ) मराठी—रामतर्कवागीश आणि क्रमदीश्वर यांनीं दाक्षिणात्या म्हणजे महाराष्ट्र–अपभ्रंश असें म्हटलें आहे. पण साहित्यदर्पणांत दाक्षिणात्या म्हणजेच वैदर्भिका होय असें म्हटलें आहे. हल्लींची मराठी इतकी जुनी आहे कीं तिला दाक्षिणात्या आणि वैदर्भिका हीं नांवें असावींत. जुना मराठी लेख १११५ इसवींतला सांपडला आहे आणि दुसरा एक १२०७ इसवीचा (ए. इं. भा. १पा. ३४३ आणि भा. ९पा. १०९ ).

## (२) कांहीं आक्षेपांस उत्तर.

### १ डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार यांचे अग्निकुलाविषयीं आक्षेप

डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार आपल्या जर्नल ऑफ इंडियन हिस्ट्रीमध्यें ( १९२५ एप्रिल पा. १२३. १२४ ) रजपुतांचें गोत्र व प्रवर या विषयींच्या आमच्या सिद्धांतास मान्यता देऊन आमचें म्हणणें मजबूत आहे असें कबूल करितात. परंतु 'अग्निकुल-कल्पना निराधार आहे' ह्या आमच्या सिद्धांताविषयीं त्यांनीं आपला मतभेद प्रदर्शित केला आहे; आणि ते असें म्हणतात कीं, ही कल्पना रासाच्या पूर्वीं कित्येक शतकें सांपडते. भा. २ मध्यें आम्ही असें प्रतिपादलें आहे कीं, ही कल्पना रासानंतर रासांतील कथेचा भलताच अर्थ होऊन उत्पन्न झाली. डॉ. मजकूर असें म्हणतात कीं, संगममधील एका तामिलकाव्यांत अग्निवंशांत उत्पन्न झालेल्या एका सरदाराचा उल्लेख आहे. परमारांची परंपरा आपला मूळपुरुष वशिष्ठाच्या यज्ञकुंडांतून उत्पन्न झाला अशी असल्याचें आम्ही पूर्वींच दाखविलें आहे. परंतु हे परमार सुद्धां आपल्यास वसिष्ठोद्भव सूर्यवंशी क्षत्रिय मानतात. तसेंच या कालविभागांतील ( १००० ते १२०० ) कोरीवलेखांत कोठेंच असा उल्लेख मिळत नाहीं.कीं रजपुतांचे वंश सूर्य, सोम आणि अग्नि असे तीन आहेत. गाहडवालांच्या एका कोरीवलेखांत चंद्रानें क्षत्रियवंश पुनः स्थापिल्याचा उल्लेख आहे, पण तेथेंहि सूर्य आणि सोम असे दोनच वंश मानिले आहेत. या चंद्रानेंच बहुधा छत्तीस राजकुलांची यादी केली. तेव्हां हें निश्चित आहे कीं,मध्ययुगीन कालांत सूर्य आणि चंद्र असे दोनच क्षत्रियांचे वंश मानले गेले होते.

दुसरी गोष्ट ही कीं, डॉ. कृष्णस्वामी अय्यंगार प्रतिहार लक्ष्मणापासून उत्पन्न झाले ही परंपरा दक्षिणेंत माहीत होती असें म्हणतात; आणि पल्लव विष्णूच्या बंधूपासून उत्पन्न झाले असा उल्लेख असल्याचें प्रमाण दाखवितात. पण डॉ. साहेबांचें हें प्रमाण त्यांच्या स्वतःच्या विरुद्ध जातें. जर लक्ष्मणापासून उत्पन्न झाल्याची प्रतिहारांची परंपरा खरी आहे तर मग अग्निकुळाची परंपरा निर्मूल आहे असें अनुमान म्हणजे वाटेल तें अनुमान काढणें नव्हे. कारण या अनुमानाशिवाय गत्यंतरच रहात

नाहीं. प्रतिहार जर सूर्यवंशी आहेत तर त्यांस अग्निवंशी कसें म्हणतां येईल ? किंबहुना अग्निकुलकल्पना इतिहासांत निर्मूल आहे; तिचा या कालांतील कोरीवलेखांत कोठेंच उल्लेख नाहीं. उलट चौहाण, परमार, प्रतिहार आणि चालुक्य हीं चारी अग्निवंशी मानलेलीं कुलें या कालांतील कोरीवलेखांत सूर्यवंशी किंवा चंद्रवंशी उल्लेखिलीं आहेत. दक्षिणच्या मराठ्यांतहि परमार, पल्लव, चव्हाण, चालुक्य हीं कुलें असून अग्निवंश मुळींच मानलेला नाहीं.

२ रजपुतांचीं गोत्रें याविषयीं पंडित गौरीशंकर यांचें मत.

अजमीरचे रायबहादूर गौरीशंकर ओझा या उलट अग्निकुलकल्पना निर्मूल आहे हें कबूल करितात; पण रजपुतांची गोत्रें त्यांचीं नसून पुरोहितांची आहेत म्ह० ती उत्पत्तिदर्शक नसून शिष्यत्वदर्शक आहेत असें प्रतिपादतात; अर्थात् मिताक्षरेंतील विज्ञानेश्वराचा सिद्धांत ते मानतात. नागरीप्रचारिणी जर्नल भा. ५ नं. ४ पा. ४३५ वर प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या निबंधांत ते म्हणतात कीं, " जोंपर्यंत क्षत्रिय वैदिक कर्म करीत होते तोंपर्यंत ते आपलीं गोत्रें पुरोहितापासून घेत. हेंहि त्यांनीं आतां सोडून दिलें आहे. यामुळें त्यांचें गोत्र व पुरोहिताचें गोत्र हल्लीं भिन्न आहे. " पण ही त्यांची चुकीची कल्पना आहे, कारण क्षत्रिय अद्यापहि वैदिक कर्म करितात. तेव्हां रजपुतांचे गोत्र पुरोहितांच्या गोत्राहून हल्लीं भिन्न कां असावें ? आम्हीं रजपुतांचीं स्वतःचीं गोत्रें पूर्वींपासून होतीं आणि विज्ञानेश्वराचा सिद्धांत चूक आहे, असें आमचें मत भा २ प्र.५ मध्यें प्रतिपादिलें आहे, त्याविरुद्ध पंडित गौरीशंकर दोन प्रमाणें आणतात. "एक, अश्वघोषाच्या सौंदरानंद काव्यात असें दाखविलें आहे कीं श्रीकृष्ण आणि बलराम यांनीं आपल्या निरनिराळ्या गुरूंपासून निरनिराळीं गोत्रें घेतलीं. त्याचप्रमाणें शाक्यांनींहि गुरुपासून गौतम गोत्र घेतलें. दुसरें, कोरीवलेखांत रजपुतांनीं गोत्रें बदललेल्याची उदाहरणें आहेत. " हीं दोन्ही प्रमाणें कशी निरर्थक आहेत तें आपण पाहूं.

क्षत्रियांचीं स्वतःचीं गोत्रें आहेत ही गोष्ट प्राचीन इ. स. पू. २०० इतक्या जुन्या वैदिक सूत्रांवरून सिद्ध होतें हें आम्हीं भाग २ यांत दाखविलें आहे; आणि हेंच प्रमाण सर्वांत बलवत्तर आहे. वैदिक सूत्रांच्या

प्रमाणाविरुद्ध २०० इसवीच्या सुमारें झालेल्या एका बौद्ध काव्यांत आलेल्या गोष्टींचें प्रमाण कांहीं किंमतीचें नाहीं. किंबहुना हा प्रश्न धर्मशास्त्राचा आहे, विशेषतः वैदिक वचनांचा आहे. वीरेश्वरशास्त्री द्रविड यांचें शास्त्रयुक्त मत पुढें दिलें आहे त्यावरून क्षत्रियांना स्वतःची गोत्रें आहेत असाच वैदिकसूत्रांचा स्पष्ट आशय आहे हें दिसून येईल.

श्रीकृष्ण आणि बलराम यांनीं निरनिराळे गुरु केले म्हणून त्यांचीं निरनिराळीं गोत्रें झालीं, ही बौद्धांची दंतकथा वेडसर दिसते. हिंदु पुराणांस ती अज्ञात आहे. कारण दोघांचा गुरु भागवत आणि हरिवंश यांत सांगितल्याप्रमाणें उज्जनीचा सांदीपिनी होता. दुसरें, सौंदरानंदांत सांगितल्याप्रमाणें ( पत्रिका पा. ४३९ ) श्रीकृष्णाचें गोत्र गौतम होतें असें दिसत नाहीं. श्रीकृष्णाचें गोत्र अत्रि असावें. कारण त्याचे वंशज चूडासमा वगैरे आपलें गोत्र अत्रिच सांगतात. सौंदरानंद काव्यांतील हें विधान चमत्कारिक आहे, आणि कदाचित् तें प्रक्षिप्तहि असेल. बौद्धांनीं हिंदु कथांचा विपर्यास केला हें प्रसिद्धच आहे. त्यांच्या कथेंत सीता रामाची बहीणहि आहे व बायकोही आहे. तेव्हां याविषयींच्या बौद्ध कथेला फारसें महत्त्व देतां येत नाहीं.

पंडित गौरीशंकर यांनीं पुढें आणलेलें ऐतिहासिक प्रमाणहि निरर्थक आहे. ज्या कोरीवलेखांत गोत्रें बदलल्याचा दाखला त्यांनीं दिला आहे ते सर्व विज्ञानेश्वराच्या काळाच्या ( बारावें शतकाच्या ) नंतरचे आहेत. अर्थात् अशी गोत्रें बदलण्याला विज्ञानेश्वराचें मत कारणीभूत झालें. किंबहुना विज्ञानेश्वराच्या मताचा अजूनहि रजपुतांवर बराच पगडा आहे. पण आम्हीं भा. २ मध्यें ख्रिस्ती सनापूर्वीचेहि कोरीवलेख दाखविले असून त्यांत क्षत्रियांच्या गोत्रांचा उल्लेख आहे. तसेंच दख्खनचे चालुक्य आणि मद्रासचे पल्लव सहाव्या शतकाइतक्या जुन्यालेखांत आपली गोत्रें मानव्य आणि भारद्वाज द्यावयास विसरत नाहींत. हीं सर्व गोत्रें पुरोहितापासून घ्यावयाचीं असतीं तर तीं कोरीवलेखांत कधीं सांगितली गेलीं नसतीं. आणि अलीकडच्या काळांतील कोरीवलेखांत तर गोत्रर्षि हा त्या क्षत्रियकुलाचा उत्पत्तिकर्ता असल्याचें स्पष्ट वर्णन आहे हें पुढें दाखवतों.

प्रथम अग्निवंशी मानलेलीं चारकुळें घेऊं. ( १ ) परमारासंबंधीं, ते

वसिष्ठगोत्राचे आहेत, कारण ते त्याच्या यज्ञकुंडांतून उत्पन्न झाले, (वसिष्ठ त्यांचा पुरोहित होता म्हणून नव्हे ) असा स्पष्ट उल्लेख आहे. उदेपूर प्रशस्तींत ' वसिष्ठगोत्रोद्भव एष लोके ख्यातस्तदादौ परमारवंशः ' असें वाक्य आहे. परमारांचें हेंच गोत्र रजपुतांतच नव्हे तर मराठ्यांतहि चालू आहे. ( २ ) चाहमान वत्सगोत्री आहेत. एका कोरीव लेखांत पहिला चाहमान वत्स ऋषीच्या आनंदाश्रूपासून उत्पन्न झाला असें विधान आहे. आणि बिजोलिया लेखांत पहिला चाहमान वत्सगोत्री ब्राह्मणापासून उत्पन्न झाला ( किंवा वत्स ऋषि-गोत्रांत उत्पन्न झाला ) असें विधान आहे. वत्स त्यांचा पुरोहित होता असें कोठेंच म्हटलेलें नाहीं. (३) प्रतिहार एका प्रतिहार ब्राह्मणापासून उत्पन्न झाले असें एकेठिकाणीं विधान आहे.दुसऱ्या लेखांत रामाचा भाऊ लक्ष्मण यापासून उत्पन्न झाल्याचें विधान आहे. ( यांचें गोत्र अद्याप कळलें नाहीं ). ( ४ ) चालुक्य द्रोणाच्या चुलुकापासून उत्पन्न झाले आणि म्हणून भारद्वाजगोत्री आहेत असें स्पष्ट विधान एका कलचूरी कोरीवलेखांत आहे. तात्पर्य, हीं चारी राजपूत कुलें जीं गोत्रें प्रारंभापासून आतांपर्यंत सांगत आहेत त्या गोत्रांत तीं उत्पन्न झाल्याचा कोरीवलेखांत उल्लेख आहे; आणि हे सर्व लेख विज्ञानेश्वराच्या पूर्वींचे आहेत. यावरून हें स्पष्ट आहे कीं, त्यावेळीं त्याचा सिद्धांत ठाऊक नव्हता.

चंद्रवंशी राजपुतांचा विचार करितां त्यांचें गोत्र बहुधा अत्रि असतें. आणि पुराणांत चंद्राचा अत्रि पिता असल्यानें अत्रि हा त्यांचा निःसंशय प्रारंभीचा उत्पन्नकर्ता होय. आणि ही गोष्ट कलचूरी हैहयांच्या आणि सेनांच्या लेखांत स्पष्टपणें सांगितलेली आहे. यादव, चूडासमा आणि जाडेजा हे आपले गोत्र अत्रि देतात. तेव्हां यांचें गोत्र उत्पत्ति दाखवितें, शिष्यत्व दाखवीत नाहीं हेंच यांच्यासंबंधानें स्पष्ट आहे.

सूर्यवंशी रजपुतांच्या संबंधानें अडचण उत्पन्न होते हें खरें. मेवाडचे गुहिलोत, जयपूर-अलवरचे कछवाह आणि जोधपूर-बिकानेरचे राठोड हे सूर्यवंशी रजपूत आहेत; आणि त्यांचीं गोत्रें अनुक्रमें बैजवाप, मानव आणि गौतम अशीं आहेत. आतां मनूपासून जी वंशावळ दिली जाते त्यांत ह्या ऋषींचीं नांवें येत नाहींत. भा. २ मध्यें आम्हीं दाखविलें आहे

कीं, कित्येक ब्राह्मणांचे गोत्र-प्रवर ऋषि गार्ग्य, मुद्गल वगैरे क्षत्रिय आहेत. परंतु बैजवाप, मानव व गौतम हे सूर्यवंशी राजर्षि असल्याचें पुराणांत आम्हांस वाक्य मिळालें नाहीं. किंबहुना हे असतीलहि. जोंपर्यंत वाक्य मिळालें नाहीं तोंपर्यंत या फरकाचें योग्य कारण असें सांगतां येतें कीं, हीं कुळें अतिप्राचीन काळीं जेव्हां वेगळीं झालीं, तेव्हां आपल्या वैदिक कर्माकरितां तीं या ऋषींच्या कुळांत दत्तक झालीं, म्हणून त्यांचे हे गोत्रप्रवर आहेत. हारीत तसेंच मुद्गल आंगिरसपक्षास मिळाले असें पुराणांतलें वाक्य असून त्यावरून हें अनुमान निघतें. एके ठिकाणीं पुराणांत पुत्र शब्दहि वापरला आहे.* तात्पर्य शिष्यत्वानें नव्हे तर पुत्रत्वानें हीं गोत्रें यांचीं अतिप्राचीन काळीं झालीं. कारण पुरोहिताच्या गोत्राची कल्पना असती तर निराळा पुरोहित झाला त्या वेळीं गोत्र बदलेल; पण ते कायम राहतें अशीच परंपरा व पद्धति आहे. यामुळें कित्येकांचा असा सिद्धांत आहे कीं, राजपुतांचीं गोत्रें अतिप्राचीनकाळीं पुरोहितांपासून घेतलीं गेलीं, पण तीं पुढील काळीं कधींहि बदलस नाहींत. ( मधुसूदनशास्त्री यांचें पुढें दिलेलें मत पहा ). हेंहि एकतऱ्हेनें दत्तविधानच आहे; आणि यामुळेंच क्षत्रिय कुलांचीं गोत्रें हजारों वर्षें बदलल्याशिवाय तशींच आहेत. गोत्रप्रवर, तसेंच वेद आणि शाखा, वैदिककर्म करण्यासाठीं अतिप्राचीनकाळीं क्षत्रिय कुलांनीं जीं घेतलीं तीं बदलूं शकत नाहींत.

ब्राह्मणांचीं गोत्रें बदलत नसून उत्पत्तिसूचक आहेत; शिष्यत्वसूचक नाहींत; मग क्षत्रियांच्या गोत्रांची अशी अन्य कल्पना कां ? हा प्रश्न आम्हांस प्रारंभीं पडला; त्याचप्रमाणें प्राचीन कोरीवलेखांत क्षत्रिय आपलीं गोत्रें अभिमानानें सांगतात; या दोन्ही कारणावरून क्षत्रियांचीं गोत्रें पुरोहितांपासून घेतलेलीं नाहींत असें आमचें मत झालें आणि या मताबद्दल ऊहापोह, जयपूर येथील प्रसिद्ध विद्वान् शास्त्री मधुसूदन ( मैथिल ) आणि वीरेश्वर ( द्रविड ) यांच्याशीं आम्हीं केला; आणि त्यांनीं आमचें

---

* हरितो युवनाश्वस्य हारिताः शूरयः स्मृताः । एतेऽह्यंगिरसः पुत्राः क्षत्रोपेता द्विजातयः ॥

जेव्हां मत मान्य केलें तेव्हांच निःशंकपणें दुसऱ्या भागांत आम्ही हें मत प्रतिपादिलें. यानंतर निरनिराळ्या लोकांनीं या माताविषयीं शंका प्रदर्शित केली तेव्हां वरील दोघा विद्वान् शास्त्र्यांपासून त्यांचे लेखी मत आम्ही घेतलें तें येणें प्रमाणें.

१ श्री जयपुर चै. शु. ५ सौ सं. १९८२

सन्ति ब्राह्मणानामिव क्षत्रियस्य वैश्यस्य च प्रातिस्विकानि गोत्राणि नवेति प्रश्ने उत्तरम् । दर्शपूर्णमासादियागप्रकरणस्थे 'आर्षेयं वृणीते' इति विधौ कल्पसूत्रकाराणां सांप्रतिके ग्रन्थान्तेच प्रकरणे प्रवरनिर्णायकसूत्रेषु गोत्राणां वर्णनस्य क्षत्रियवैश्यसंबंधेन बहुशो विद्यमानत्वेन सन्ति तयोरपि प्रातिस्विकगोत्राणि । याज्ञवल्क्यस्मृतिव्याख्यायां मिताक्षरायां तदभावकथनं तु प्रबलहेत्वनिर्देशेन न विश्वासार्हमन्येषामपि तथोपवर्णनं तदनुयायित्वेनेति तत्तुल्यमेवेति मन्यते द्राविडो वीरेश्वरशास्त्री.

२ श्री

क्षत्रियोंका उत्पत्तिदृष्ट्या गोत्र मनु है और वैश्योंका भलन्दन है. क्षत्रियोंके जो भारद्वाजवत्सादि गोत्र प्रसिद्ध है, वे पूर्वकालमे उनके प्राचीन पुरोहितोंसे प्राप्त हुवें है. वे अब बदल नही सकते, क्योंके नया पुरोहित करता मना है. हालमें पुरोहितोंका गोत्र इसी सबबसे भिन्न है. यह पुराणे पीढियोंसे चला हुवा गोत्र एक तऱ्हेसे प्रातिस्विक गोत्र हो गया है क्योंके वुह बदल नही सकता.

सम्मतोयमर्थो जयपुरस्थस्य राजपण्डितस्य मधुसूदनशर्मणो विद्यावाचस्पते: जयपुरस्थानम् ३०।३।२५.

वरिल दोन मतें निराळ्या मार्गांनीं एकाच निश्चयास पोंहोंचतात असें वाचकांस दिसून येईल. वीरेश्वरशास्त्री आपलें मत सूत्रांच्या आधारानें देतात; आणि विज्ञानेश्वराचा सिद्धांत चुकला आहे असें स्पष्ट म्हणतात. मधुसूदनशास्त्री अतिप्राचीनकाळीं पुरोहितापासून गोत्रें घेतलीं असें म्हणतात पण तीं बदलूं शकत नहींत, असें स्पष्ट मत आणखीं देतात. म्हणजे एका दृष्टीनें तीं प्रातिस्विकच आहेत असें मान्य करितात. त्यांनीं जयपूरच्या सूर्यवंशी कच्छवाहांचें गोत्र मानव कसें आहे ही अडचण एकारीतीनें काढून टाकिली. असो, यारीतीनें गोत्राचें भिन्नत्व कुलभिन्नत्व दर्शवितें

तेव्हां भावनगरचे गुहिल मेवाडच्या गुहिलोताहून भिन्न आहेत आणि जोधपूर-बिकोनरचे राठोड दक्षिणच्या राठोडाहून भिन्न आहेत.

## (३) निरनिराळ्या प्रांतांतील लोकांच्या संस्कृत-प्राकृत उच्चाराची तऱ्हा ( राजशेखर )

पठन्ति संस्कृतं सुष्ठु कुण्ठाः प्राकृत-वाचिते ।
वाणारसीतः पूर्वेण ये केचिन्मगधादयः ॥
ब्रह्मन् विज्ञापयामि त्वां स्वाधिकारजिहासया ।
गौडजस्त्यजतु वा गाथामन्या वास्तु सरस्वती ॥
नातिस्पष्टो न चाश्लिष्टो न रूक्षो नातिकोमलः ।
न मन्द्रो नातितारश्च पाठी गौडेषु वाडवः ॥
रसः कोप्यस्तु काप्यस्तु रीतिः कोप्यस्तु वा गुणः ।
सगर्वं सर्वकर्णाटाष्टकारोत्तरपाठिनः ॥
गद्ये पद्येथवा मिश्रे काव्ये काव्यमना अपि ।
गेयगर्भे स्थितःपाठे सर्वोपि द्रविडःकविः ॥
पठन्ति लटभं लाटाः प्राकृतं संस्कृतद्विषः ।
जिव्हया ललितोल्लापलब्धसौन्दर्यमुद्रया ॥
सुराष्ट्रत्रवणाद्या पठन्त्यर्पितसौष्ठवम् ।
अपभ्रंशवदंशानि ते संस्कृतवचांस्यपि ॥
शारदायाः प्रसादेन काश्मीरः सुकविर्जनः ।
कर्णे गुडूचीगण्डूषस्तेषां पाठक्रमः किमु ॥
ततः पुरस्तात्कवयो ये भवन्त्युत्तरापथे ।
ते महत्यपि संस्कारे सानुनासिकपाठिनः ॥
मार्गानुगेननिनदेननिधिर्गुणानां सम्पूर्णवर्णरचनो यतिभिर्विभक्तः ।
पांचालमंडलभुवां सुभगः कवीनां श्रोत्रे मधुक्षरति किञ्चन काव्यपाठः ॥

# (४) मूळ कोरीव लेखांतील महत्वाचे उतारे.

(1) Bijolia inscription A. S. J. Bengal Vol. LV pp. 41-43

विप्रश्रीवत्सगोत्रेभूदहिच्छत्रपुरे पुरा । सामन्तोऽनन्त सामन्त पूर्णतल्लो नृपस्ततः ॥१२॥ तस्माच्छ्रीजयराज विग्रहनृपौ श्रीचन्द्रगोपेन्द्रकौ तस्माद्दुर्लभगूर्वकौ शशिनृपो गूवाकसच्चन्दनौ । श्रीमद्वप्पयराजविंध्यनृपतिः श्रीसिंहराड्विग्रहौ श्रीमद्दुर्लभगुन्दुवाक्पतिनृपाः श्रीवीर्यरामोनुजः ॥ १३ ॥ श्रीचण्डोवनिपेतिराणकधरश्रीसिंहलो दूसलस्तद्भ्राताथ ततोपि वीसलनृपः श्रीराजदेवीप्रियः ॥ पृथ्वीराजनृपोथ तत्तनुभवो रासल्यदेवीविभुस्तत्पुत्रोऽजयदेव इत्यवनिपः सोमल्लदेवीपतिः ॥ १४ ॥ हत्वापाधिगमिंचलाभिधयशो राजादिवीरत्रयं क्षिप्रं क्रूरकृतान्तवक्रकुहरे श्रीमार्गदुर्गान्वितं । श्रीमत्सोल्हणदण्डनायकवरः संग्रामरंगांगणे जीवन्नेव नियन्त्रितः करभके येनेष्टानि...सात् ॥ १५ ॥ अर्णोराजोऽस्य सूनुर्धृतहृदयहरिः सत्ववाशिष्टसीमो गाम्भीर्यौदार्यवर्यः समभवदपरालब्धमध्योनदीत्सः ॥ तच्चित्रं जंतुजाद्यस्थितिरनृतमहापंकहेतुर्नमथ्यो न श्रीमुक्तो न दोषाकररचितरातिर्नाद्विजिह्वाधिसेव्यः ॥ १६॥ ... कृतान्तपथसज्जोभूत्सज्जनो सज्जनो भुवः । वैकुन्तं कुन्तपालोगाद्यतो वैकुन्तपालकः ॥ २० ॥ जाबालिपुरं ज्वालापुरं कृता पल्लिका पल्ली । वाततूलतुल्यं रोषात्तद्धलं च सौर्येण ॥ २१ ॥ प्रतोल्यां च वलभ्यां च येन विश्रामितं यशः । ढिल्लिकाग्रहणश्रान्तमाशिकालाभलम्भितः ॥ २२ ॥ तज्ज्येष्ठभ्रातृपुत्रोभूत्पृथ्वीराजः प्रभूपमः ॥ तस्माद्‌र्जितश्येनागोहेमपर्वतदानतः ॥ २३ ॥ अतिधर्मरते—पि पार्श्वनाथस्वयम्भुवे । दत्तं मोराकरीग्रामं भुक्तिमुक्तिश्चहेतुना ॥ २४ ॥ स्वर्णादिदाननिवहैर्दशभिर्महद्भिस्तौलानरैर्नगरदानचयैश्च विप्राः । येनार्जिताश्चतुरभूपतिवस्तुपालमाक्रम्य चारुमनसिद्धिकरी गृहीतः ॥२५॥ सोमेश्वराल्लब्धराज्यस्ततः सोमेश्वरो नृपः । सोमेश्वरनतो यस्माज्जनसोमेश्वरोऽभवत् ॥ २६ ॥ प्रतापलंकेश्वर इत्यभिख्यां यः प्राप्तवान् प्रौढपृथुप्रतापः । यस्याभिमुख्ये वरवैरिमुख्याः केचिन्मृताः केचिद्भिद्रुताश्च ॥ २७ ॥ येन श्रीपार्श्वनाथाय रेवातीरेस्वयंभुवे । शासने रेवणाग्रामो दत्तः स्वर्गायकांक्षिणा ॥ २८ ॥.........(संवत् १२२६ फाल्गुनविद ३)...

षड्विंशे द्वादशगते गुरौतारे च हस्तके। वृद्धिनामनि योगे च करणे तैत्तिले तथा। गुहिलपुत्र सदाम्चर महंघणसीहाभ्यां दत्त...नैगमान्वयकायस्थछोतिगसूनुकेशवेन लिखितं। नानिगगोविंदसूनुपाल्हणपुत्रदेल्हणेनोत्कीर्णम् ॥

(2) Govindchandra's inscription (1109) I. A. XVIII p. 15.

ओम् परमात्मने नमः। अकुंठोत्कंठवैकुंठकंठपीठलुठत्करः। संरंभः सुरतारंभे स श्रियः श्रेयसेस्तु वः। अभून्नृपो गाहडवालवंशे महीतलो नाम जितारिचक्रः। शेते धराभारमशेषमेष शेषः सुखी यस्य भुजे निधाय ॥ प्रध्वस्ते सोमसूर्योद्भवविदितमहाक्षत्रवंशद्वयेस्मिन्। उत्सन्नप्रायवेदध्वनिजगदखिलं मन्यमानः स्वयंभूः ॥ कृत्वा देहग्रहाय प्रवणमिह मनः शुद्धबुद्धिर्धरित्र्याम् उद्धर्तुं धर्ममार्गान् प्रथितमिह तथा क्षत्रवंशद्वयं च ॥ वंशे तत्र ततः स एष समभूत् भूपालचूडामणिः प्रध्वस्तोद्धतवैरिवीरतिमिरः श्रीचंद्रदेवो नृपः ॥ येनोदारतरप्रतापशमिताशेषप्रजोपद्रवं श्रीमद्गाधिपुराधिराज्यमसमं दोर्विक्रमेणार्जितम् ॥ तीर्थानि काशिकुशिकोत्तरकोशलेंद्रस्थानीयकानि परिपालयिताभिगम्य ॥ हेमात्मतुल्यमनिशं ददता द्विजेभ्यो येनांकिता वसुमती शतशस्तुलाभिः ॥ तस्यात्मजो मदनपाल इति क्षितींद्रश्चूडामणिर्विजयते निजगोत्रचंद्रः। यस्याभिषेककलशोल्लिखितैः पयोभिः प्रक्षालितः कलिरजःपटलं पृथिव्याम् ॥ ख्यातस्ततो रजनिजानिरिवांबुराशेः गोविंदचंद्र इति कांतिभराभिरामः। राजात्मजेन भवता समुपार्जितानि रामेण दाशरथिनेव यशांसि येन ॥ दुर्वारस्फारगौडद्विरदवरघटाकुंभनिर्भेदभीमो हम्मीरं न्यस्तवैरं मुहुरसमरणक्रीडया यो विधत्ते ॥ शश्वत् संचारिवल्गत् तुरगखुरपुटोल्लेखमुद्रासनाथ क्षोणीस्वीकारदक्षः स इह विजयते प्रार्थनाकल्पवृक्षः ॥ ...परमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरपरममाहेश्वरनिजभुजोपार्जितकान्यकुब्जाधिपत्यश्रीचंद्रदेवपादानुध्यात परमभट्टारकमहाराजाधिराजपरमेश्वरपरममाहेश्वरश्रीमन्मदनपालदेवविजयराज्ये ॥ अस्यैवात्मजो महाराजपुत्रगोविंदचंद्रदेवः ॥ सिंधुरोढपत्तलायां रामैठग्रामे समस्तमहत्तमजनपदनिवासिलोकान् प्रतिवासिलोकांश्च ॥ राजराज्ञीमातृपुरोहितामात्याक्षपटलिकभांडागारिकभिषक्नैमित्तिकसेनापत्यन्तःपुरिकसमस्ताधिकारिपुरुषादीन् समाज्ञापयति संबोधयति च यथा। अस्तु वो विदितं अनित्यायुर्गता युष्माभिः

वातातपवशात् तृणाग्रलग्नाश्यायविंदुरिव न स्थिरपदम् बध्नाति जीवितम् मत्वा ॥ ...अस्मिन् ग्रामे हलानां चतुर्भिप्रमायुः । सजलस्थलः सोपरपाषाणगिरिनदीवनवाटिकाम्रमधूकलोहलवणाकरऊर्ध्वाधः सिद्धियुतः सदशापराधदण्डःतृणपर्णाद्याकरआदायसहितः संवत् ११६६ पौष वद्य १५ रवौ अद्येह आसटिकायां देवतामुरैठघट्टे यमुनायां यथाविधिना स्नात्वा देवमनुष्यपितृतर्पणाद्यनंतरं भगवंतं सूर्यमुपस्थाय तदनु चाभीष्टदेवतामहेश्वरं पंचभिरुपचारैः समभ्यर्च्य भगवते जातवेदसे पूर्णाहुतिं दत्वा राहुग्रस्ते सवितरि मातापित्रोरात्मनश्च पुण्ययशोभिवृद्धये भट्टब्राह्मणाय गूगापौत्राय रिल्हेपुत्राय भट्टकवडग्रामविनिर्गताय सांख्यायनशाखिने गौतमऐतिथ्य आंगिरसत्रिप्रवराय श्रुताध्ययनसंपन्नब्राह्मणगुणचंद्राय विशुद्धेन मनसा कुशपूतहस्तोदकेन क्षित्यब्धिपवर्तांबरं यावत् । राणकश्रीलवणप्रदाहेन चासनत्वेव प्रदत्तो इति मत्वा यथादीयमानं भागभोगकूटकविंशतिच्छवया तुरुष्कदंडं अक्षपटलादाय वलदीकुमरगादियानकआकराहिरण्यबाह्याभ्यंतरासिद्धि एतत् सर्वं अन्यदपि भूम्यावारणउत्पत्स्यमानं मदाज्ञापालनप्रवणैर्भूत्वा एतत् सर्वं अस्मै उपनेतव्यम् । एतत् संतत्यैअपि ॥ न केनाप्यत्र बाधा कार्या श्रुत्वा मुनीनां वचः.............. लिखितोयं महत्तकश्रीगांगेयानुज्ञया त्रिभुवनपालेन ठक्कुरश्रीदेवांगसुतेन सुनरकुडनेन सातेहरसुतेन

(3) Extract from another Gāhadavāla grant.

अकुंठोत्कंठ० ॥ १ ॥...चतुष्पंचाशदधिकशतैकादशसंवत्सरे माघे मासि शुक्लपक्षे तृतीयायां सोमदिने वाराणस्यामुत्तरायणसंक्रान्तौ अंकतः संवत् ११५४ माघसुदि ३ सोमे। वाराणस्यां देवश्रीत्रिलोचनघट्टे गंगायां स्नात्वा श्रीमद्राजाधिराज श्रीचन्द्रदेवेन...प्रचुरपायसेन हविषा हविर्भुजं हुत्वा...कौशिकगोत्राय विश्वामित्रौदलदेवरातत्रिप्रवराय छंदोगशाखिने...गोकर्णकुशलतापूतकरतलोदकपूर्वमापद्मसद्मनो हूहूकान्तं यावत् शासनीकृत्य प्रदत्त इति ज्ञात्वाऽस्माभिः पितृदानशासनप्रकाशनार्थं निजनामाङ्कितमुद्रया ताम्रपट्टके निधाय प्रदत्तो...श्रीमन्मदनदेवेन पितृदानप्रकाशकः । शासनस्य निबन्धोयं कारितः स्वीयमुद्रया ॥ १० ॥ लिखितं करणिक ठक्कुर श्रीसहदेवेन । शिवमत्र मङ्गलं महाश्रीः श्रीमदनपालदेवेन ॥

(4) Extracts from Gāhadavāla grants E, I, IV

( p. 101. ) हलदीयप्रत्तलायां महाशोणसौग्रामनिवासिनो निखिलजनपदा-नुपगतानपिच राजराज्ञीयुवराजमंत्रिपुरोहितप्रतिहारसेनापतिभाण्डागारिकाक्षपटालिकभिषङ्नैमित्तिकान्तःपुरिकदूत करितुरगपट्टनाकरस्थानगोकुलाधिकारिपुरुषांश्चाज्ञापयति बोधयत्यादिशति च...ग्रामः सजलस्थलः सलोहलवणाकरः समत्स्याकरः सपर्णाकरः सगर्तोषरः समधूकचूतवनवाटिकाविटपतृणयूतिगोचरपर्यन्तः सोर्ध्वाधः श्चतुराघाटविशुद्धः...श्रीवास्तव्यकुलोद्भूत कायस्थोल्हणसूनुना। लिखितस्तामापत्रोयं कीठनेन नृपाज्ञया ॥

( p. 109 ) ... यथा दीयमानभागभोगकरप्रवणिकरतुरुष्कदण्डकुमरगादियानकप्रभृति समस्तदायान् दास्यतेति ।

( p. 120 ) वैष्णवपूजाविधिगुरवे

( p. 121 ) प्रचुरपायसेन हविर्भुजं हुत्वा

( p. 123 ) प्रवणीकरहिरण्यानियतानियतान् दायान्

(5) Extract from Basahi grant inscription of Govinda-chandra I. A. xiv p. 103

नमो वासुदेवाय ।...संवत् ११६१...यमुनायां स्नात्वा यथाविधानं मन्त्रदेवऋषिमनुष्यभूतापितृंश्च तर्पयित्वा सूर्यं भट्टारकं सर्वकर्तारं भगवन्तं शिवं विश्वाधारं वासुदेवं समभ्यर्च्य हुतभुजं हुत्वा जीवन्तीपत्तलायां वसभीग्रामे समस्तजनपदान् संबोधयति यथा। ग्रामोयं मया क्षेत्रवनमधूकाम्राकाशपातालसहितः सदशापराधदण्डः भागकूटकदशबन्धविंशत्युक्तयप्रस्थाक्षपटलप्रस्थप्रतिहारप्रस्थआकरतुरुष्कदण्डवरवक्षेहिरण्यसर्वादायसंयुक्त....चतुराघाटविशुद्धः....गौतमगोत्राय....मेमे पौत्राय....ज्योतिर्विद्ब्राह्मण अल्हेकाय प्रदत्तः...लिखितंच पुरोहितजागूकमहत्तकश्रीवाल्हणप्रतिहारश्रीगौतम एषां सम्मत्या...

(6) Naihatti grant of Ballālasena E. I. XIV p. 159

ॐ नमः शिवाय...स श्रीकंठशिरोमणिर्विजयते देवस्तमीवल्लभः ॥ वंशे तस्याभ्युदयिनि सदाचारचर्यानिरूढी प्रौढां राढामकलितचरैः भूषयन्तोनुभावैः ।

शश्वद्विश्वाभयवितरणस्थूललक्ष्यावलक्ष्यैः कीर्त्युल्लोलैः स्नपितवियतो जज्ञिरे राजपुत्राः । तेषां वंशे महौजाः प्रतिभटपृतनाम्भोधिकल्पान्तसूरः...सत्यशीलो... निरुपधिकरुणाधामसामन्तसेनः । तस्मादजनि वृषध्वजचरणाम्बुजषट्पदो गुणाभरणः । हेमन्तसेनदेवो वैरिसरःप्रलय हेमन्तः । ...तस्मादभूदखिलपार्थिवचक्रवर्ति निर्व्याजविक्रमतिरस्कृतसाहसाङ्कः । दिक्पालचक्र पुटभेदनगीतकीर्तिः पृथ्वीपतिर्विजयसेनपदप्रकाशः...अस्य प्रधानमहिषी जगदीश्वरस्य शुद्धान्तमौलिमणिरास विलासदेवी । देवी सुतं सुतपसं सुकृतैरसूत वल्लाळसेनमतुलं गुणगौरवेनं...स खलु श्रीविक्रमपुरसमावासितश्रीमज्जयस्कंधावारात् । महाराजाधिराज श्रीविजयसेन देवपादानुध्यात परमेश्वर-परममाहेश्वर-परमभट्टारकमहाराजाधिराज श्रीमद्वल्लाळसेनदेवः कुशली समुपजातअशेषराजराजन्यराज्ञीराणकराजपुत्रराजामात्यपुरोहित-महाधर्माध्यक्षमहासांधिविग्रहिक महासेनापतिमहामुद्राधिकृतअंतरंगबृहदुपरिक महाक्षपटालिक महाप्रतीहार महाभोगिक महापीलुपति महागणस्थ दौस्साधनिकचौरोद्धरणिकनौबलहस्त्यश्वगोमहिषाजाविकादिव्यापृतक गौल्मिकदण्डपाशिकदण्डनायक-विषयपत्यादीन् अन्यांश्च सकलराजपादोपजीविनो अध्यक्षप्रचारोक्तांश्च इह अकीर्तितान् चट्टभट्टजातीयान् जनपदान् क्षेत्रकरांश्च ब्राह्मणान् ब्राह्मणोत्तरान् यथार्हं मानयति बोधयति समादिशति च । मतमस्तु भवतां यथाश्रीवर्धमान भुक्त्यन्तःपाति उत्तरराढामण्डले स्वल्पदक्षिणवीथ्यां खाण्डयिल्लशासनशासनोत्तर-स्थितः संघाटियानद्युत्तरः नारीचाशासनोत्तरस्थशिंघाटियानदीपाश्चिमोत्तरः ... एवं चतुःसीमावच्छिन्नवाल्लहिट्ग्रामः श्रीवृषभशंकरनलेन सवास्तुनालखिलादिभिः नालत्रयाधिकचत्वारिंशत्उन्मानसमेत आढकनवद्रोणोत्तरसप्तभूपाटकात्मकः प्रत्यब्दं कपर्दक पुराणपञ्चशतोत्पत्तिकः सझाटविटपः सगर्तोषरः सजलस्थलः सगुवाकनारिकेरः सह्यदशापराधः परिहृतसर्वपीडः तृणयूतिगोचरपर्यन्तः अचाटभटप्रवेशः अकिंचिद्प्रग्राह्यः समस्तराजभोगकरहिरण्यप्रत्यायसहितः । वराहदेवशर्मणः प्रपौत्राय भट्टेश्वरदेवशर्मणः पौत्राय लक्ष्मीधरदेवशर्मणः पुत्राय भारद्वाजसगोत्राय भारद्वाजाङ्गिरसबार्हस्पत्यप्रवराय सामवेदकौथुमशाखाचरणाध्यायिने **आचार्य**श्रीओवासुदेवशर्मणे अस्मन्मातृश्रीविलासदेवीभिः सुरसरिते सूर्योपरागे दत्तहेमाश्वमहादानदक्षिणात्वेन उत्सृष्टः मातापित्रोरात्मनश्च पुण्ययशोभिवृद्धये आचंद्रार्कं क्षितिसमकालं

यावद्भूमिछिद्रन्यायेन ताम्रशासनीकृत्य प्रदत्तोस्माभिः अतःभवद्भिः सर्वैरनुमन्तव्यं भाविभिरपि भूपतिभिरपहरणे नरकपातभयात् पालने धर्मगौरवात् पालनीयम् । भवन्ति चात्र धर्मानुशंसिनः श्लोकाः........जितनिखिल क्षितिपालः श्रीमद् बल्लाळसेनभूपालः । ओवासुशासने कृतदूतं हरिघोषसान्धिविग्रहिकं । संवत् ११ वैशाखदिने १६ श्रीः

(7) Extract from Madanapāla's Insc. LXIX J. B. (p. 11).

...रमावतीनगरपरिसरसमावासितश्रीमज्जयस्कन्दावारात् । परमसौगतो महाराजाधिराजश्रीरामपतिदेवपादानुध्यातः परमेश्वरः परमभट्टारकः महाराजाधिराज श्रीमन्मदनपालदेवः कुशली ? श्रीपौण्ड्रवर्धनभुक्तौ कोटीश्वरविषये हलावर्तमण्डले काष्ठगिरिसंविंशायाबाधिकोपेतसैकेवदार्वचट्टरट्टके त्रिंशतिकायां भूमौ समुपागताशेषराजपुरुषान् राजराजन्यकराजपुत्रराजामात्यमहासान्धिविग्राहिकमहाक्षपटलिकमहासामन्तमहासेनापति महाप्रतिहार दौःसाध्यसाधनिकमहाकुमारामात्यराजस्थानीयोपरिक चौरोद्धरणिकदाण्डिकदण्डपाशिकशौनिकक्षेत्रपप्रान्तपालकोट्टपालाङ्गरक्षकतदायुक्तविनियुक्तक हस्त्यश्वोष्ट्रनौबलव्यापृतक किशोरबडवागोमहिषाजाविकाध्यक्ष दूतप्रेषणिकगमागमिकअभित्वरमाण विषयपतिग्रामपति तरिक शौल्किकगौल्मिकगौडमालवचोडखसहूणकुलिककर्णाटलाटचाटभटसेवकादीन् । अन्यांश्चाकीर्तितान् राजपादोपजीविनः प्रतिवासिनो ब्राह्मणोत्तरान् महत्तमोत्तमकुटुंबिपुरोगचण्डालपर्यन्तान् यथार्हं मानयति बोधयति समादिशति च । विदितमस्तु भवताम् । यथोपरिलिखितोयं ग्रामः स्वसीमातृणपूळुतिगोचरपर्यन्तः सतलः सोद्देशः साम्रमधूकः सजलस्थलः सगर्तोषरः सझाटविटपः सदरचापसारः सचौरोद्धरणिकः परिहृतसर्वपीडः अचाटभटप्रवेशः अकिंचित्करग्राह्यः समस्तभागभोगहिरण्यादिप्रत्यायसमेतः रत्नत्रयराजसंभोगवर्जितः । भूमिछिद्रन्यायेन आचन्द्रार्कक्षितिसमकालं पित्रोरात्मनश्च पुण्ययशोभिवृद्धये कौत्ससगोत्राय शांडिल्यासितदेवलप्रवराय पंडितश्रीभूषणसब्रह्मचारिणे सामवेदान्तर्गतकौथुमशाखाध्यायिने चम्पाहिट्टीयाय चम्पाहिट्टिवास्तव्यायवत्सश्वामिप्रजापतिश्वामिपौत्राय शौनकश्वामिपुत्राय पंडितथपुत्रश्रीवरेश्वरश्वामिशर्मणे पट्टमहादेवीश्रीचित्रमंटिकायाः वेदव्यासप्रोक्तप्रवाचितमहाभारतसमुत्सर्जितदक्षिणात्वेन भगवन्तं बुद्धभट्टारकमुद्दिश्य शासनीकृत्य प्रदत्तोस्माभिः श्रुतो भवद्भिः

सर्वैरेवानुमन्तव्यः भाविरपिभूमिपतिभिर्भूमेर्दानफलगौरवात् अपहरणमहानरकपात-भयाच्च दानमिदमनुमोदानुमोघपालनीयम् । प्रतिवासिभिश्च क्षेत्रकरैराज्ञाश्रवणविधेयीभूय यथाकालं समुचितभागभोगकराहिरण्यादिप्रत्यादेयोपनयःकार्यःइति संवत् ८ चंद्रगत्याचैत्रकर्मदिने ५। ...कृत सकलनीतिज्ञो...श्चैर्यमहोदधिः । सान्धिविग्रहिकःश्रीमान् भीमदेवोत्र दूतकः ॥ राज्ये मदनपालस्य अष्टमे परिवत्सरे। ताम्रपट्टमिमं शिल्पीं तथारीतसरोखनत् ॥

8) Extract from Semra plates of Paramadideva (Chandella) St 1223 (1166 A. D.) E. I. IV p. 153.

ओम् । स्वस्ति । जयत्याल्हादयन् विश्वं विश्वेश्वराशिरोधृतः । चन्द्रात्रेय नरेन्द्राणां वंशश्चन्द्र इवोज्वलः । तत्र प्रवर्द्धमाने विरोधिविजयभ्राजिष्णुजयशक्तिविजयशक्तिवीराविर्भावभास्वरे परमभ. म० प० पृथ्वीदेवपानुध्यात...मदनवर्म ...पर०परममाहेश्वरकालंजराधिपति श्रीमत्परमर्दिदेवो विजयी ॥... विकौरविषये खट्टौडा द्वादशक तथा राष्ट्रसत्क टांटद्वादशक...ग्रामाणामुपगतान् ब्राह्मणानन्यांश्च मान्यानधिकृतान् कुटुम्बिकायस्थदूतवैद्यमहत्तरान् मेदचण्डालपर्यन्तान् सर्वान् संबोधयति समाज्ञापयति चास्तु वः संविदितं यथोपरिलिखिताः ग्रामाः सजलस्थलाः सस्थावरजङ्गमाः स्वसीमावच्छिन्नाः साधऊर्ध्वाः भूतभविष्यद्वर्तमानानिःशेषादायसहिताः प्रतिपिद्धचाटादिप्रवेशाः ... अजयसागरसंबद्धलटिआनां हलचतुष्टयावच्छिना मदनपुरे भूमिः संवत् १२२३ वैशाखसुदि ७ गुरुवासरे...विधिवत्स्नात्वा देवमनुष्यपितॄन् संतर्प्य भास्करपूजापुरःसरचराचरगुरुं भगवन्तं भवानीपतिमभ्यर्च्य हुतभुजि हुत्वा कुशलतापूतेन हस्तोदकेन नानागोत्रेभ्यो नानाप्रवरेभ्यो नानाशाखाध्यायिभ्यो नानानामभ्यो ब्राह्मणेभ्यो प्रदत्ताः...पराशरगोत्रजयशर्मपुत्रहारिशर्मा एषां पदमेकं...इति मत्वा भवद्भिः भागभोगादिकं सर्वमेभ्यः समुपनेतव्यम् । अमीषां समन्दिरप्राकारान् सनिर्गमप्रवेशान्ससर्वांशनेक्षुकपीससणाम्रमधूकादिभूरुहान् सवनश्वभ्रिनिधानान् सलोहाद्याकरान् सगोकुलान् अपरैरपि सीमान्तर्गतवस्तुभिः सहितान् सबाह्याभ्यंतरदायान् भुञ्जानानां कर्षतां कर्षयतां दानाधानविक्रयं वा कुर्वतां न केनचित् काचिद्बाधा कर्तव्या। स्वहस्तोयं राजश्रीपरमर्दिदेवस्य मतं मम ॥ लिखितं वास्तव्यवंश्येन पृथ्वीधरेण। उत्कीर्णं च पित्तलहारपाल्हणेन। मंगलं महाश्रीः ॥

(9) Bhopal plates of Udayavarman Paramāra I. A. XIV p 254-5

ॐ स्वस्ति जयोऽभ्युदयश्च । जयति व्योमकेशोऽसौ यः सर्गाय बिभर्ति तम् । ऐन्दवं शिरसा लेखं जगद्बीजाङ्कुराकृतिम् ॥ तन्वन्त वः स्मरारातेः कल्याणमनिशं जटाः । कल्पान्तसमयोद्दामतडिद्वलयपिङ्गलाः ॥ परमभ० महारा० परमे० श्रीमद्यशोवर्मदेवपादानुध्यात प. भ. म० प० श्रीमज्जयवर्मदेवराज्ये व्यतीते निजकरकृतकरवालप्रसादावाप्तनिजाधिपत्यसमस्तप्रशस्तोपेतसमाधिगतपञ्च-महाशब्दालंकार विराजमान महाकुमार श्रीमल्लक्ष्मीवर्मदेवपादानुध्यात समस्त-प्रशस्तोपेत समधिगतपञ्चमहाशब्दालङ्कार विराजमान महाकुमार श्री हरिश्चंद्र-देवसुत श्रीमत् उदयवर्मदेवो विजयोदयी ॥ विन्ध्यमण्डले नर्मदापुर प्रतिजागरणक वोढशिरासत्कअष्टाचत्वारिंशन्मध्ये गुणोराग्रामनिवासिनः प्रतिग्रामनिवासिनश्च समस्तराजपुरुष वैषयिक पट्टकिल जनपदादीन् ब्राह्मणोत्तरान्बोधयत्यस्तु वः संविदितम् यथा ॥ अस्माभिः श्रीविक्रमकालातीत षट्पञ्चाशदधिकद्वादशशत संव त्सरान्तःपाति अङ्के १२५६ वैशाख शुदि १५ पौर्णमास्यां तिथौ विशाखा नक्षत्रे परिघयोगे रविदिने महावैशाख्यां पर्वणि गुवाडा घट्टे रेवायां स्नात्वा सितपवित्रवाससी परिधाय देवऋषिमनुष्यान्संतर्प्य चराचरगुरुं भगवन्तं भवानीपतिं समभ्यर्च्य समित्कुशतिलाभाष्टाभूतिभिः हिरण्यरेतसं हुत्वा भानवे अंर्घ विधाय कपिलां त्रिः प्रदक्षिणीकृत्य उपस्पृश्य च संसारस्यासारतां दृष्ट्वा नलिनीदलगत जललवतरलतरं यौवनं धनं जीवितं चावेक्ष्य...गर्गगोत्राय गर्गशैन्याङ्गिरस इति त्रिप्रवराय वाजसनेयशाखिने अग्निहोत्रि यज्ञधरसुत द्विवेद पुरोधास माल्हुशर्मणे ब्राह्मणाय उपरिलिखित गुणोराग्रामो निधिनिक्षेप कल्याण धनसहितः सवृक्षमालाकुलः । चतुष्कंटकविशुद्धो वापीकूपतडागारामनदीश्रोत वाडवाटिकाद्युपयुक्तः सर्वाभ्यंतर-सिद्धया सह यावच्चंद्रदिवाकरसमुद्रसरिच्छासनीकृत्य प्रदत्तः तदत्र ग्रामनिवासि पट्टकिलादि लोकैः तथा कर्षकैश्च यथोत्पद्यमानभागभोगकरहिरण्यादिकमाज्ञाश्रवण-विधेयैर्भूत्वा अत्र ग्रामीयं सर्वं अस्मैः प्रदातव्यम् । सामान्यैतद् पुण्यफलं बुध्द्वा अस्मद्वंशैरन्यैरपि भाविभोक्तृभिरस्मत् प्रदत्तधर्मादायोयमनुमन्तव्यः पालनीयश्च ...स्वहस्तोयं महाकुमार श्री उदयवर्मदेवस्य दूतकः श्रीमण्डलिक क्षेमवराजःश्रीः

(10) Extract from Goharwa plates of Karṇadeva E. I. XI p. 141

(शिवस्तुतिः...चन्द्रवंशः...भरतः...हैहयः...) स एष परम वामदेव-पादानुध्यात प०--परममाहेश्वरत्रिकलिंगाधिपतिश्रीमत्कर्णदेवः निजभुजोपार्जिताश्वपतिगजपतिनरपतिराजत्रयाधिपतिः कुशली ।...महादेवी महाराजपुत्रो महामंत्री महासान्धिविग्रहिको महामात्यो महाधर्माधिकरणिको महाप्रतीहारो महाक्षपटलिके महाभाण्डागारिको महासामन्तो महाप्रमत्तवारो महाश्वसाधनिको एतानन्यांश्चाकीर्तितान् यथास्थाननियुक्तराजपुरुषान् कोशाम्बपत्तलायां चन्द्रपहाग्रामनिवासिनो निखिलजनपदान्यथार्हं मानयति बोधयति समाज्ञापयति विदितमस्तु भवतां यथा ग्रामोयं सजलस्थलः साम्रमधूकः सगर्तोषरः सलोहलवणाकरः स्वसीमापर्यंतः सवनतृणयूतिगोचरपर्यन्तः।विद्भीकौण्डिनगोत्रायाङ्गिरसाम्बरीषयौवनाश्वत्रिप्रवराय वाजसनेयशाखिने उपाध्याय सीलुपौत्राय अवसथिक मालुपुत्राय पण्डितश्रीशान्तिशर्मणे ... गंगायां स्नात्वा भगवन्तं शिवभट्टारकं समभ्यर्च्य—प्रदत्तः इति मत्वा यथादीयमानभोगभागहिरण्यादिसमस्तराजप्रत्यादायाः एतस्याज्ञाश्रवणविधेयैर्दातव्या ...लिखितं करणिकश्योसर्वानन्देन । उत्कीर्णं च विद्यानन्देन । मंगलं

(11) Extract from Miraj plates of Jayasinha, [Western Chlālukya of Kalyan A. D. 1024 ( I. A. VIII, p. 18 ).

...स तु श्रीपृथ्वीवल्लभमहाराजाधिराजपरमेश्वरपरमभट्टारकसत्याश्रयकुलतिलकसमस्तभुवनाश्रयचालुक्याभरणश्रीमज्जगदेकमल्लदेवः श्रीमद्वल्लभनरेंद्रदेवः कुशली । सर्वानेव यथासंबध्यमानकान् राष्ट्रपतिविषयपतिग्रामकूटकआयुक्तकनियुक्तकाधिकारिकमहत्तरादीन् समादिशत्यस्तु वः संविदितम् यथा अस्माभिः शकनृपकालातीतसंवत्सरशतेषु नवसु षट्चत्वारिंशदधिकेषु अंकनः संवत ९४६ राक्षसी संवत्सरान्तर्गतवैशाखपौर्णमास्यामादित्यवारे यं च द्रमिलाधिपतिं बलवन्तं चोलं निर्घास्य सप्तकोंकणाधीश्वराणां सर्वस्वं गृहीत्वा उत्तरादिग्विजयार्थं कोल्हापुरसमीपसमावासितनिजविजयस्कन्धावारात् ... विषयान्तःपाति मुहुनीरग्रामजाताय कौशिकगोत्राय बह्वृचशाखिने ब्रह्मचारिणे श्रीधरभट्टपौत्राय रेवणार्यभट्टपुत्राय वासुदेवार्यशर्मणे यजनयाजनादिषट्कर्मनिरताय वेदवेदांगपारगाय पडदोरेद्वि सहस्रान्तःपातिकरटिकन्नाचिशतमध्ये मडभूरुग्रामः सधान्यहिरण्यादेयः निधि-

निधानसमेतः राजकीयानामनङ्गुलिप्रक्षेपणीयः सशुल्कः सर्वकरबाधापहृतः सर्वनमस्योऽग्रहारो दत्तः...शासनाधिकारिमहाप्रचण्डदण्डनायकश्रीमत्प्रोणार्यप्रतिबद्धलेखक माइय्येण लिखितम् । मंगलं महाश्रीः श्रीः श्रीः ॥

(12) Extract from Bhadan grant of Aparājita Śilāhāra E. I. III, p. 267.

ओं ... ( समग्रराष्ट्रकूटवंशो वर्णितः ) ... श्रीमत्कक्कलदेवसंजातव्यपायनष्टभ्रष्टराज्ये स्वतेजोनुभावात्समधिगतपंचमहाशद्बो तगरपुरे...मलगलगण्ड...नन्निसमुद्रप्रतापमार्तंड शनिवारविजयादिसमस्तराजावालिसमलंकृत...अपराजितदेवराजः सर्वानेव यथासंबध्यमानकान् आगामिग्रामप्रभोक्तृसामन्तराजपुत्रपुरपतित्रिवर्गस्थानप्रभृतिप्रधानाप्रधानान्जनान् प्रणतिपूजासमादेशैः समनुबोधयति ... संवत् ९१९ आषाढवदि ४ श्रीस्थानके समवस्थितस्य राज्ञो दक्षिणायनकर्कसंक्रान्ति ... चतुर्दशग्रामशतोपलक्षितकोंकणान्तःपातिमहिरिहारविषयान्तर्गतभादानग्रामो...आघारपडिगह...(दोषसमान्वित ? ) सोद्रंगसपरिकरःअचाटभटप्रवेशः.... श्रीलोणादित्यदेवाय ... आम्ब्रश्रेष्ठिवापैयाश्रेष्टिमणिकचेलापैयभोजकविप्रगो वणेयादिगुणपौरनगराधिष्ठितहस्तोदकं विधाय हरिहरहिरण्यगर्भदहनादिदेवान् श्रद्धया संपूज्य पुत्रपौत्राद्युपभोगवृत्तित्वेन ग्रामः प्रदत्तः । भुंजतो भोजयतो वा कृषतः कर्षयतो वा न केनचित् परिपन्था कर्तव्या । ...महामण्डलेश्वरश्रीमदपराजितदेवो लेखकहस्तेनारोपयति स्वमतम् मतं मम श्रीमदपराजितदेवस्य विरुदंकराजनियमान् महामात्य श्रीसंगलैये महासान्धिविग्रहिकसीहपैये च सति जसंगवैय्यसूनुना सजाताभ्यनुज्ञेन प्रतिहस्तकअन्नपैयेन शासनमिदं लिखितं तच्च स्थानके ध्रुवम् ... तथा भूयोपि व्यवस्था चात्र नन्वव्यावशप्रतिवीर्षनगरेण राजकुलस्य अर्हणाभाव्यार्थं द्रमणौ २६० अंकतः दातव्यम्।मंङ्गलं महाश्रीः

(13) Extract from Bhandup plates of Chhittarāja E. I. XII. Śilāhāra seal has a raised Garuda and a golden Garuda banner.

...तथैतद्राज्यचिन्ताभारसमुद्वहत्सु सर्वाधिकारिश्रीनारायणैय्य सांधिविग्रहिकश्रीसीहपैय्य कर्णाटसांधिविग्रहिकश्रीकपर्दि श्रीकरणादिपंचप्रधानेषु सत्सु समा-

गामिराजपुत्रमंत्रिपुरोहित अमात्यप्रधानाप्रधाननैयोगिकांस्तथाराष्ट्रपातिविषयपातिनग-रपतिग्रामपातीनियुक्तानियुक्तराजपुरुषजनपदांस्तथा हैयमननगर पौरत्रिवर्गप्रभृतींश्च प्रणतिपूजासत्कारसमादेशैः समादिशति शक नृप ......९४८ कार्तिकशुद्ध १५ आदित्यग्रहणपर्वणि स्नात्वा सवित्रे अर्घ्यं दत्वा ...उमापतिमभ्यर्च्य...पाराशरगो-त्राय छन्दोगशाखिने आमदेवाय ... बलिचरुवैश्वदेवअग्निहोत्रक्रतुक्रियाखपरिग्रह–पोषणार्थ १ स्थानकान्तर्गतषट्पष्टिविषयान्तःपातिगौराग्रामान्तर्वर्तिक्षेत्रं ।...

(14) Extract from Bhavnagar Insc. p. 157.

ॐ...राज्येऽमुष्यमहीभुजोभवदिहश्रीगूहिलाख्यान्वये श्रीसीहार इति प्रभूत-गरिमाधारो धरामडनम् । चौलुक्यांगनिगूहकः सहाजिगः ख्यातस्तनूजस्ततस्तत्पुत्रा बलिनो बभुवुरवनौ सौराष्ट्ररक्षाक्षमाः ॥.. ओ० श्रीसहाजिगपुत्रठ० श्रीमुलुकेन-श्रीसहजिगेश्वरदेवस्यानाविरतपञ्चोपचारपूजाहेतोःश्रीमन्मंगलपुरमंडपिकायां का० १ दिनंप्रति । तथा बलीवर्दछाटमाणकाभव्ये छाटं प्रतिका०१कणभृतगडकं प्र० का० ४ तथारासभछाटाप्र०. ॥ ०तथा समस्तलोकेन निःशेषवाहिकारैः पञ्चहरा-बेरीवाटयाप्र० ॥ तथापत्रभरकउंटभरंप्रतिका० २ तयापत्रंभरगंत्री प्रतिद्र.१ क्षेत्रं प्रतिउच्चाराभाव्येका.१ आगरमध्ये खुंटितखरालिहासाका. । ... तथालाटिवद्रापथ-के बहन्तशुल्कमंडापिकायामध्याव दिनंप्रातिठ० श्रीमुलकेन रूपकेकःप्रदत्तः ॥... ? द्यूतमध्येदिनंप्रतिका१...तयावीडहराकेरीप्रभृतीनां प्रत्येक पत्र ५०...मडावापूग १ ...विक्रमसं १२०२ सिंहसं० ३२ अश्विनवदि १३ ॥ कृतिरियं परमपाशुपताचार्य महापंडितश्रीसर्वज्ञस्य

## (५) निर्णयसिन्धौ कलिवर्ज्यानि

बृहन्नारदीये–समुद्रयातुः स्वीकारः कमण्डलुविधारणम् । द्विजानामसवर्णासु कन्यासूपयमस्तथा ॥ देवराच्चसुतोत्पत्तिर्मधुपर्के पशोर्वधः । मांसदानं तथा श्राद्धे वानप्रस्थाश्रमस्तथा ॥ दत्ताक्षतायाः कन्यायाः पुनर्दानं परस्य च ॥ दीर्घकालं ब्रह्मचर्यं नरमेधाश्वमेधकौ ॥ महाप्रस्थानगमनं गोमेधश्च तथा मखः । इमान्धर्मा-न्कलियुगे वर्ज्यानाहुर्मनीषिणः ॥

हेमा. आदित्यपु.–विधवायां प्रजोत्पत्तौ देवरस्य नियोजनम् । बालिका-क्षतयोन्याश्च वरेणान्येन संस्कृतिः ॥ कन्यानामसवर्णानां विवाहश्च द्विजातिभिः ॥ आततायिद्विजाग्र्याणां धर्मयुद्धेन हिंसनम् । द्विजस्याब्धौ तु नौयातुः शोधितस्यापि संग्रहः ॥ सत्रदीक्षा च सर्वेषां कमण्डलुविधारणम् । महाप्रस्थानगमनं गोसंज्ञप्तिश्च गोसवे । सौत्रामण्यामपि सुराग्रहणस्य च संग्रहः ॥ अग्निहोत्रहवन्याश्च लेहो लीढापरिग्रहः । वृत्तस्वाध्यायसापेक्षमघसंकोचनं तथा । प्रायश्चित्तविधानं च विप्राणां मरणान्तिकम् । संसर्गदोषस्तेयान्यमहापातकनिष्कृतिः ॥ वरातिथिपितृभ्यश्च पशूपाकरणक्रिया । दत्तौरसेतराणां च पुत्रत्वेन परिग्रहः ॥ सवर्णान्याङ्गनादुष्टैः संसर्गः शोधितैरपि । अयोनौ संग्रहे वृत्ते परित्यागो गुरुस्त्रियः ॥ परोद्देशात्मसत्याग उद्दिष्टस्यापि वर्जनम् । प्रतिमाभ्यर्चनार्थाय संकल्पश्च सधर्मकः ॥ अस्थिसंचयना-दूर्ध्वमङ्गस्पर्शनमेवच । शामित्रं चैव विप्राणां सोमविक्रयणं तथा ॥ षड्भक्तानशने चान्नहरणं हीनकर्मणः ॥

माधवीये पृथ्वीचन्द्रोदये च—शूद्रेषु दासगोपालकुलमित्रार्द्धसीरिणाम् । भोज्यान्नता गृहस्थस्य तीर्थसेवातिदूरतः ॥ शिष्यस्य गुरुदारेषु गुरुवद्वृत्तिशीलता ॥ आपद्वृत्तिर्द्विजाग्र्याणामश्वस्तनिकता तथा । प्रजार्थे तु द्विजाग्र्याणां प्रजारणि-परिग्रहः ॥ ब्राह्मणानां प्रवासित्वं मुखाग्निधमनक्रिया । बलात्कारादिदुष्टस्त्रीसंग्रहो विधिचोदितः ॥ यतेश्च सर्ववर्णेषु भिक्षाचर्या विधानतः । नवोदके दशाहं च दक्षिणा गुरुचोदिता ॥ ब्राह्मणादिषु शूद्रस्य पचनादिक्रियापि च । भृग्वग्निपतनैश्चैव वृद्धादिमरणं तथा ॥ गोतृप्तिशिष्टे पयसि शिष्टैराचमनक्रिया । पितापुत्रविरोधे तु साक्षिणां दण्डकल्पनम् ॥ यतेः सायंगृहत्वं च सूरिभिस्तत्त्वदर्शिभिः । एतानि लोकगुप्त्यर्थं कलेरादौ महात्मभिः ॥ निवर्तितानि विद्वद्भिर्व्यवस्थापूर्वकं बुधैः ।

निगमः—अग्निहोत्रं गवालम्भं संन्यासं पलपैत्रिकम् । देवराच्चसुतोत्पत्तिं कलौ पञ्च विवर्जयेत् ॥ एतत्सर्वाधानपरम् । स्मृतिचन्द्रिकायाम् । चत्वार्य-ब्दसहस्राणि चत्वार्यब्दशतानिच । कलेर्यदा गमिष्यन्ति तदा त्रेतापरिग्रहः ॥ संन्यासश्च न कर्तव्यो ब्राह्मणेन विजानतेति व्यासवचनं व्याख्यातम् ॥ सर्वाधानेपि विशेषमाह देवलः । यावद्वर्णविभागोस्ति यावद्वेदः प्रवर्तते । संन्यासं चाग्निहोत्रं च तावत्कुर्यात्कलौ युगे ॥

# ( ६ ) महत्वाची सनवारी.

७६६ पारशी संजानास येतात.
८५५ कोल्लम शकारंभ
८८५ नेपाळ शकारंभ
९०३ इस्माइल १--बुखाऱ्याचा सामानी बादशहा.
९०३--१०१५सामानी साम्राज्य
९१२ याकुब-इ-लेस कासार प्रथम हिंदुस्थानांत गझनीवर येतो.
९४२ नूर-सामानी; तुर्क गुलाम सामानी राज्यांत शिरतात.
९५९ मनसूर-सामानी
९६१-९९६ मूलराज (अनहिलवाड)
९६७ सप्टंबर ३० } महमूद जन्म
९७१ आक्टोबर २ }
९७३-९९७ तैलप २ उत्तर चालुक्य
९७७ सबुक्तगिन तक्तनशीन होतो.
,, शक्तिकुमार ( गुहितलोत )
,, वज्रदामन् ( कच्छपघात )
९८० सबुक्तगिनाची वहिंड व काबूल राजा जयपालवर स्वारी
९८०-१०३८ महिपाल-पालसत्ता पुनः स्थापन करतो.
९८४-वज्रहस्त १ ( प्राच्य गंग )
९८५-१०१२ राजराज १ ( चोल )
९८६-१००१ नूह २ रा
९८८ गोविंद ( चाहमान )
९८९ सबुक्तगिन व संयुक्त हिंदु राजे यांत लढाई
९९०सु. अंबाप्रसाद ( गुहिलोत )
९९०-१०१० अपराजित-(ठा. शि.)
९९७-१००८सत्याश्रय उत्तर चालुक्य
९९७-१०१० मुंज ( परमार )
,, चामुंड ( अनहिलवाड )
१०००-१०२२ गंड ( चंदेल्ल )
१००१ मह० ची जयपालवर स्वारी.
१००३ वाक्पति ( चाहमान )
,, शुचिवर्मा ( गुहिलोत )
,, दिद्दा राणीचा मृत्यु (काश्मीर)
१००३-१०२९संग्रामराज काश्मीर लो.
१००४ मह० भाटियावर स्वारी
१००८ मह० संयुक्त हिंदू राजाशी लढाई.
१००९ मह० नगरकोटची स्वारी
१००९ विक्रमादित्य ५ वा कल्याण
१०१०सु.१०५५भोज परमार
१०१० वज्जड-शिलाहार ठा.
१०१० दुर्लभ--अनहिलवाड
१०१०--१०३८ गांगेग हैहय
१०११ राजराज ( चोल ) जमीन मोजून धारा आकारतो
१०१३ मह० त्रिलोचनालशी लढाई
१०१४ मह० ठाणेश्वरची स्वारी
१०१४--१०४४ राजेंद्र-चोल
१०१५ अरिकेसरी-शिलाहार ठा.
१०१६ नरवर्मा-गुहिलोत
१०१७ रामानुजाचार्य जन्म
१०१८ मह मथुरा कनोज स्वारी
१०१८-१०४० जयसिंह-कल्याण
१०१९ महमुदाची कनोजवर दु.स्वारी
१०१९ भोज कोंकण जिंकतो
१०१९ मह० राज्यमालास जिंकून त्यावर खंडणी बसवितो.
१०१९ मधुकामार्णव-प्राच्यगंग

१०२१ राज्यपालास रजपूत ठार मार.
१०२१ मह० राहीव नदीवरील लढाई
१०२१ राजेंद्र ओरिसा जिंकतो
,, त्रिलोचनपालशाही मह० यु.
१०२१–१०६३ भीम ( अनाहिलवाड )
१०२२ मह० स्वातवर स्वारी
१०२३ मह० कालंजवर स्वारी
१०२५ मह० सोमनाथावर स्वारी
१०२५–१०४५ छित्त ठा.शिलाहार
१०२७ भीम--शाहीचा मृत्यु
१०२८ विद्याधर-चंदेल्ल
१०२८–१०६३ अनंत लोहर काश्मीर
१०२९ महमुदाचा मृत्यु
१०२९ कीर्तिवर्मा–गुहिलोत
१०३० इंडिया ग्रथ अब्ल्वे.
१०३० विजयपाल--चंद्वेल्ल
१०३२ नयपाल ( पाल )
१०३३ श्रीचंद्–चाहमान
,, नियाल्तगीन काशी बाजार लु.
१०३८–१०६८ वज्रहस्त–प्राच्यगंग
१०३८–१ ८० कर्ण–चेदी
१०४० भोजकृत जयासिंहाचा पराभव
१०४० देववर्मन–चंदेल्ल
१०४०–१०६८ सोमेश्वर १ उ. चालु
१०४२ योगराज–गुहिलोत
१०४४ विजयपाल–कच्छपघात
१०४४ राजाधिराज चाले
१०४५ नागार्जुन–शिलाहार. ठा.
१०५२ अनंगपाळ २ ( तोमर ) दिल्लीस लोहस्तंभ आणतो
,, कोप्पमची दुसरी लढाई
१०५२ राजेंद्र चोल

१०५५ वैरट गुहिलोत
,, भोज परमार मृत्यु.
१०५५ जयसिंह परमार
१०५५ मामवानी–ठा. शिलाहार
१०५९–१०८० उदेपूरशिवालय बांध.
,, सु. उदयादित्य–परमार
,, विग्रहपाल ३ रा–पाल
१०६० कीर्तिवर्मन्–चंदेल्ल
१०६२ वीरराजेंद्र चोल
१०६३ वीसल ३ रा–चाहमान
१०६४–१०९४ कर्ण–अन. चालु.
१०६५ प्रबोधचंद्र नाटकप्रयोग.
१०६८–१०७६ राजराज–प्राज्यगंग
१०६९ सोमेश्वर–उ. चा मृत्यु
१०६९ हंसपाल गुहिलोत
१०६९–१०७६ सोमेश्वर २ उ. चा.
१०७०–१११८ राजेंद्र कुलोत्तुंग चोल
१०७२ अधिराजेंद्र मृत्यु
१०७३ उत्कर्ष ( काश्मीर )
१०७६–११२६ विक्रमांक उ. चालुक्य
१०७६–११४२ अनंतवर्मन–प्राच्यगंग
१०७८ पृथ्वीराज १ ला–चाहमान
१०८०–११०० चंद्र–गाहडवाल
१०८० महीपाल २ रा ( पाल )
,, सामंतसेन ( बंगाल )
१०८०–११२४ यशःकर्ण–चेदी
१०८१ वैरिसिंह ( गुहिलोत )
१०९३–११०४ लक्ष्मणदेव परमार
१०८२ शूरपाल ( पाल )
१०८४–११३० रामपाल ( पाल )
१०८४–११६८ हेमचंद्र–जैनपंडित
१०८४–१११५ अनंतपाल ठाणेशिला.

१०८८ विक्रमसिंह–कच्छपघात
१०८९ हर्ष ( काश्मीर )
१०९३ अजयदेव–चाहमान
१०९३–११४३ जयसिंह (अनहिल.)
१०९४ विजयसिंह–गुहिलोत
११०० हेमन्तसेन ( बंगाल )
,, सु. मंडीराज्यस्थापना
११०० सल्लक्षण–चंदेल्ल
११०१ उच्चल्ल ( काश्मीर )
११०४ त्रिभुवन ऊर्फ मधुसूकच्छ.
११०४–११३३ नरवर्मा–परमार
१११० जयवर्मन–चंदेल्ल
१११०-११५५ गोविंदचंद्र गाहडवा.
११११–११२८ सुस्सल (काश्मीर )
१११७–११६० प्रोल–आंध्र
१११८ अरिसिंह ( गुहिलोत )
१११८ विक्रम चोल
१११९–११९९ लक्ष्मणसेन बंगाल
११२० पृथ्वीवर्मन्–चंदेल्ल
११२५ आर्णोराज–चाहमान
११२५ अपरादित्य–ठाणे शिलाहार
११२५ गयकर्ण–चेदी
११२५–११६५ मदनवर्मन्–चंदेल्ल
११२६ सोमेश्वर ३ रा उ. चा.
११२९ चंड गुहिलोत
११२९ परिहार ग्वाल्हेर किल्ला कछ-
वाहापासून घेतात
११३० कुमारपाल ( पाल )
११३३ नरवर्मा-परमार
,, विजयपाल कच्छपघात
११३३ यशोवर्मा ( परमार )
११३५ कुलोत्तुंग २ रा–चोल
११३६ गोपाळ ३ ( पाल )
११३८ जगदेकमल्ल उत्तर चालुक्य
११४० विजयसिंह ( गुहिलोत )
,, मदनपाल ( पाल )
११४२ जयवर्मा–परमार
११४२ कामार्णव प्राच्यगंग
११४३–११७३ कुमारपाल (अन.)
११४४–११६० अजयवर्मा–परमार
११४४–११५५ हरपाल–ठाणे शिल.
११४६–११६५ राजराज ३ रा चोल
११४८ राजातरंगिणीग्र. रचना.
११४९ पृथ्वीराज जन्म
११५० चोलगंग जगन्नाथमंदिर बां.
,, कुमारपालाची अजमीरवर स्वा.
११५०–११८२ तैल २, उ. चा.
११५२ वीसल चाह० दिल्ली घेतो
११५२ राघव–प्राच्यगंग
११५२ नरसिंह–चेदी
११५३ विसल–चा. रु. हरकेली ना.
११५५ रणसिंह–गुहिलोत.
,, शूरपाल–कच्छपघात
११५५–११७० विजयचंद्र–गाहडवाल
११५५ मल्लिकार्जुन–ठाणे शिलाहार
११५७ अजमीरची स्थापना
११६० विंध्यवर्मा–परमार
११६० जयसिंह–चेदी
११६१ गोविंदपाल ( पाल )
११६१–११९१ रुद्र–आंध्र
११६२ भीमसिंह गुहिलोत
,, विज्जन कलचूरीचें बंड
११६५ विज्जन कल.
११६७ सोयीदेव–कलचूरी

११६७ राजराज २ रा–प्राच्यगगं
११६८–१२०३ परमर्दि चंदेल्ल
११७० जयचंद–गाहडवाल
११७२ राजाधिराज चोल
,, मुएज़ुद्दीन गझनी
११७३ सामंतसिंह गुहिलोत
११७३ अजयपाल–( अनहिलवाड )
११७३–१२२० वीरवलाळ होय.
११७४ पृथ्वीरा. कैमासाशीं युद्ध
११७५ घोरी मुलतान घेतो
११७५–१२०० अपरादित्य–ठाणे शि.
११७६ मुलराज २ रा (अनहिलवाड)
११७६ संकट कलचूरी
११७८ हरिश्चंद्र–परमार
,, घोरीचा गुजराथेंत पराभव
,, कुलोत्तुंग ३ रा
११७८–१२३१ भीम (भोला) अन.
११७९ सामंतसिंह गुहिलोत
,, घोरीचा पृथ्वी. पराभव
,, घोरी पेशावर घेतो
११८० महेंद्रपाल ( पाल )
११८०–११४८ विजयसिंह–चेदी
११८०–१२१० सुभटवर्मा–परमार
११८१ घोरीची लाहोरवर स्वारी
११८२ पृथ्वीकृ परमल चंदेल्लचा परा.
,, कलचूरीचें बंड तुटलें
११८२–११८९ सोमेश्वर ४ उ. चा.
११८४ कुमारसिंह गुहिलोत
,, घोरीची लाहोरवर दुसरी स्वारी
११८५ पृथ्वी संयो. विवाह
११८७ भिल्लम ४ –देवगिरी राजधानी करून स्वतंत्र होतो.

११९० राजराज ३ रा ( चोल )
११९१ पृथ्वीकृ. घोरीचा पराभव.
११९१ महादेव–आंध्र
११९२ पृथ्वी. पराभव व मृत्यु
११९२ अनियंकभीम–प्राच्यगंग
११९३ कुतुबुद्दीन मीरत दिल्ली घेतो
,, जयचंदाचा घोरीकृत पराभव
११९५ मथनसिंह–गहिलोत
,, कुतुबुद्दीन हरिराजाचें अजमीर येथील बंड मोडतो.
११९६ शिहा. ग्वालेर कि. घेतो
११९७ कुत. गुजराथवर स्वारी
११९८–१२६० गणपति–आंध्र
११९९ कुतु. अनहिलवाड घेतो.
,, महमद् बखत्यार बौद्धस्थान विहार (विक्रमशील ) लुटतो
१२०२ महंमद् बखत्यार बंगाल घेतो
,, कुतुबु, कालंजरवर स्वारी
१२०२ राजराज ३ रा–प्राच्यगंग
१२०३ कुतुबुद्दीनाची चेदीवर स्वारी
११०३–१२४५ त्रै. लो. व. चंदेल्ल
१२०५ घोरीचा खून
१२०६ पद्मसिंह गुहलोत
१२०८ कुत. बदाऊं घेतो
१२१० अर्जुनवर्मा–परमार
१२१६ मेवाडवर तुर्कांची चढाई
१२०५ राजेंद्र ३ चोल
१२१६ देवपाल ( परमार )
१२२७ अल्त. रणथ घेतो
१२३२ अल्त. ग्वा. किल्ला घेतो
१२३४ ,, ची माळव्यावर स्वारी
१२३५ महाकाल.–विध्वंस

# सूचि.


अ.

अकलंक जैनपंडित ५९४
अग्निकुलकल्पना ६९०
अजमीर ६, ४०, २२५,-वर कुतु०ची स्वारी ४९६,-मुसलमानांचा ताबा ५०५;
-चे चाहमान २२१-२३०
अजयवर्मा २६९, २७०
अढाई दीन कीं झोंपडी = मशीद झालेलें विद्यालय २२९
अण्णेगिरी-तैल-चे मांड०राज्य ३९०
अत्रसा किल्ला २८
अधिकारी-मुलकी ६७० व इतर ६७१, ६७३
अन्न प्रकार व व्यवहार ५८३
अनहिलपाटण २४४, ६३७, इ०
अनहिलवाड ७,-चे चालुक्य २९८-३२०, वाघेला ३१७
अनंगपाल-तोमर दिल्ली शहर वसवितो ४५१;-२ रा ४५२
अनंतदेव ( शिलाहार ) ३६५, ३६६,३६९,३७४
अनंतरा-काश्मी ४५८,४५९,४६२
अनंतवर्मन्-प्राच्यगंग ३९९
अपराजित = शिलाहारांचा पहिला स्वतंत्र राजा ३६१-३६४
अपराजित २ रा ३६३
अपरादित्य १ ( शिला ) ३६५
—२ रा शेवटचा ३६७
अपरान्त-शिलादेश ३६१
अपरार्क-टीका याज्ञवल्क्य स्मृतीची ३६७, ६४०
अबदुल फतेह ६०,६१
अबदुल मलिक १८,१९
अबूबकर १०५
अभयचंद ३४०
अभिलषितार्थचिंतामणि ३८९
अमली कारभार ३६३
अमीर पदवी १५,४६
अयोध्या—उत्तर कोशल ३२२
अरबांच्या वसाहती ३६६
अर्जुनवर्मा २७१,२७२
अर्णोराज ऊर्फ आना २२६
अल्उत्बी—महमूदाचा समकालीन इतिहासकार १९,२२,२७
अल्तमश ५१३,५२२; ची माळव्यावर स्वारी २७३
अल्पतगीन १८
अल्बेरूनी १-३ वगैरे
अल्लाउद्दीन घोरीची गझनीवर स्वारी ४८१-४८२
असद-सामानीसाम्राज्यसंस्थापक १५
अस्नीचा किल्ला ४४२
अस्पृश्यता ५७३-५७५

अहमद-अमीरशहीद १५
अहमद नियाल्तगीन ३४८
अहमदाबाद -उर्फ कर्णावती ३०४
अंग–मिथिल ३४६—राज्य ४४३
अंतर्वेदी ४,१३
अंबरचा किल्ला ५२४
अंबरनाथ-आम्रनाथ ३६४

**आ.**

आगम ६३८,६३९
आचुगी–शिंदेवंशीय विक्रमाचा सरदार ३८८,४२८
आचुगी १ ला ४३४
आडनांव=गोत्रनाम २७६
आदित्य चोल ४०७
आदिनाथ मंदिर-देलवाडा ४४६
आनंदपाल ३३,५०,५४,५६,६८ महमुदाशीं लढाई ६१; चे मदतनीस राजे ६७; मृत्यु ८६
आर्य अभिधान ( ऐक्य ) ३७२, ( उपपद ) ३८२
आर्यावर्त देश व गुण १२; ३९६
आर्यधर्मप्रगतीचा तत्वज्ञानमूलक इतिहास ५८८, ५८९
आशाधर-जैनपंडित २७२
आसाम ( =कामरूप ) चें मांडलिकी राज्य ४४१
आंध्र ४०३,–काकतीय ४२१

**इ**

इतिहासाची पुनरावृत्ती २१, २३ —४६, ६९, ८७, ८८, ९०
इतिहासापासून बोध ५३७
इनामगांव ६६५,–दार हक्क ६६७–६८
इब्राइम २०९
इलेकखान ५०, ५९,–ची बुखाऱ्यावर स्वारी १८, १९ राजा (तुर्कांचा) १०४
इस्माइल गझनीचा राजा ४३
इस्माईल-सामानी १ ला १५
ईश्वरभाव १०९
इंद्रपत-दिल्लीजवळचें खेडें ४५१ ४९७, ४९८, ५००

**उ**

उत्कल-ओरिसा ४००
उच्चार भिन्नदेशीयांचे ६९६
उज्जनी ५२६
उत्बी—अल्उत्बी १०८, १२०
उत्तर चालुक्य ३७९, ३९३;
उत्तर हिंदु राजे व पंजाब १९३
उत्तर हिंदुस्थान-चा उच्छेद भा. १ १६२--१७३; भाग २-५२२–५२७
-चीं कारणें मुख्य ५२८-३८;
इतर ५३९-४६;धर्मांतर५३०;
-तील रजपूत २०२, २०५
-वरील परकीय स्वाऱ्या ५२८
उत्तरेकडील राजे ३६६
उदयादित्य ( परमार )२६१,२६२

उदेपूर २६३
उपपुराणें ६४३
उपवासदिनांची वाढ ६४१, ६४५
उपस्मृत्या ६४२, ६४३
उरगपूर-पांड्यराजधानी ४२४
ऊबट -वाजसनेयी संहितेचा टीकाकार २५८
उत्सवदिनांची वाढ ६४६

ऐ

ऐय्य—उपपद ३७१,३७२, ३८२

ओ

ओहिंड २६
ओरिसा ४०३-४०६
औढप्रांत २००

क.

कच्छपघात-( ग्वालेर ) १२४, कुल ४४८--४५१;– व कच्छवा ४५४–५६
कच्छवाह ५२४,–अलवर आणि जयपूरचीं रजपूत घराणीं ४४८
कटोच-७९,८३; ४७१-७२ ५६५
कदंब राजे ( गोंवा ) ३८६,४३२; --हनगळ ४३५,४४०
कनार-( कर्णावती ) शहर ४४३
कनोज ३,४,९,१३,११३,३२२ -चे गाहडवाल ३२१-३०; -चे प्रतिहार सम्राट १६९,३३९, ३८५, चें राज्य १६५; वर महमुदाची स्वारी १०६,११३-११५,११८;चा उच्छेद५०६-५०८
कन्हेरी=कृष्णागिरी लेणें ३६१
कंथड ( काठे. किल्ला ) १३५
कंदाहार-रजपूतांचा देश २९
कपिलेंद्रदेव ४०६
कर ६६७,–७०
करमाती मुसलमानी पंथ ६०, ६२
कर्णराजा ( चेदी ) २५३,३८४;-ची धारेवर स्वारी २६०,२६२;
–चालुक्य ३०४-५;
–सेंगार-कनारशहर संस्थापक ४४३
–हैहय कलचूरी २८९-९२
कर्णावती २९०,२९३,३०४
कर्नाटक-प्रांत ३८०
करहाटक ४३४,४३६;—कऱ्हाडे ब्राह्मण ५५९
कलचूरी २०२; २८८-९७;
–कल्याण ३९४-९५;
कलजंदचा-किल्ला २०७,—शेवट १०७;--राजा १०९-१०
कल्लट ६१८
कलश ( काश्मीर ) ४५९
कल्हण ४६०
कलापग्राम ४६२
कलियुग संवत् ४३३,--उ. शास्त्र शाक ४६२
कलिवर्ज प्रकरण ६४३
कालिंगराज (हैहय कलचूरी )४४१

कालिंग दे. ३९६;--नगर ३९९
कल्याण ३४०;--नगर ३८५
कश्तवार संस्थान ४६९
कसदार--' पांढऱ्या हिंदुस्थान ' ची राजधानी ३५
कानडी भाषा व वाङ्मय ६८८
कान्यकुब्ज १२४
काबूल--किल्ला १६,२९,३१;-च्या उच्छेदाचीं भासमान कारणें १६३--१७२; = जलालाबाद १८६; चे शाहीराजे१३०-३१
कायदे करणें ६५५
कायस्थ ५७१-७२
कारकीर्द सरासरी२२४ २३४ २७५
कार्तवीर्य--कत्त-रट्ट ४२९,४३०
कार्पासवस्त्र-( तामिल देश ) ४०९
कालवे व दक्षिण हिंदु.४१०,४११
कालंजर किल्ला ५,२८७,-वर मह. स्वारी १२६-१२९कुतु०५१५
कालिदास—कालनिर्णय ४३४
काव्यमीमांसा व भूगोलवर्णन ११
काशी-कनोजराजधानी ३२२,३२४
काश्मीर प्रांत व शहर ८-ची पंडितसभा ३६७,३६९;
—राज्येतिहास ४५७-६१;
कांगडा,--किल्ला व त्यांतील देवळें ७९-८४;-चे रजपूत ४६८
कांची ३८५,३८६
कांबोज–( तिबेट ) ३४३
कीर्तिराज--ग्वालेर राजा ४४८-४९
कीर्तिवर्मन्–चंदेल्ल २७९,
,, –१ ला कदंब ४६१
कीर्तिस्तंभाची चाल ५०३
कुतुबमिनार ५०१-५०२,
--ची विसलदेवकृत स्थापना ५०३
कुतुबुद्दीन३१७,३१८,४४५,४८९ ५०९-१०;-चरित्र५११-५१२; -ची मशीद ४९९,५००
कुनिंद लोक=मंडीसं०(कनेत)४६६
कुमारपाल-चालुक्य गु.३०८-३१४
कुमारिलभट्ट मृत्यु ६४४
कुलीनविवाह ३५६, ५८१
कुंडी राज्य ४२९, -प्रदेश ४३६
कुंतल ३८०, ४२३, ४२७
केरळ प्रांत व वैशिष्टय ४२५
केरोलीचे यादव ४४४
केशवसेन ( बं. ) ५२०
केसरी वंश ( ओरिसा ) ४०४
कैमास प्रधान ४७६,४७८-७९
कैवर्ताचें बंड ३४५
कोट--कांगड्याचें राज्य४७०-४७२
कोहराम ५१२
कोंकण--चक्रवर्ती ३६३, ३६५, ३६७,४३४; सप्त ३८३,३८४
कोलाहल--गंगांचें मूल नगर ३९७
श्रीकृष्ण व अल्बेरुनी ६२३;--उपदेश व तपस्या ६०४
कृष्णात्रेयगोत्र हैहय ४४२

ख

खडें सैन्य ६५१,६५२

खवासखान ८१

खिलगिर्ली किल्ला ४३६

ख्रिस्तीमत (ज्यूमतास जोडलेलें बौद्धमत) ६०२

खुश्रुमलिक ४८३

ग

गख्खार ६९,५१०

गजपति ६५८; = बंगालरा. ३२४

गझनी ८,१६,२९,५८,१२२;-चा नाश २०२, २१०;—ची लूट ४८१--८२;—च्या राजांचीं नाणीं २११;

गणपति (काकतीय आंध्र) ४२२

गणेश देवता ४२२,६४२;
—षड्भुजा मूर्ति ६३६

गर्जिस्तान = जॉर्जिया ९०

गहरवाल = गाहडवाल ३३१-३२,

गंगप्राच्य ३९७;--व ओरिसा प्रांत ४०५;-कुलवगोत्र ३९८-४०४; --वंशावळ ४०६

गांगेय १९८--२००;

गंग (म्हैसूर) ३८०

'गंगातेली०' (म्हण) २४६

गंगेश्वर--जयपूरमंदीर ४०५

गंगैकोंड--चोलपूर ४१६

गंड--(चंदेल्ल) १२६--१२९,२७७

गंडरादित्य (शिं. कऱ्हाड) ४३७

गाहडवाल ३२१,३३१--३३५;-चें गोत्र ३४१; दक्षिणचे ३३९-४१

गांगेयदेव (हैहय डाहाल) ६,२४५, २८८,२८९,२९१

गिधोरचे महाराजे (बंगाल) २८४

गिरनार येथील मंदिरें ३१७

गुजराथ २५५,—नांवाचा काल २९९-३००;-प्रांत मर्यादा ६;
-मधील चार शक ३०७;
-मुसलमानांच्या ताब्यांत जातो ३१७;—वर कुतुबुद्दीनाची स्वारी ५१३-५१५

गुरु गोविंदसिंग १९२

गुर्जर २५५,२९०,२९९-३००
-प्रतिहार ४५५

गुहिलोत २३७

गोत्र—श्री कृष्णाचें ६९२;--कुलनांव २९३,५६३; बलरामाचें ६९२; रजपुतांचीं २९८

गोपाल-सेनापति (चंदेल्ल) २७९

गोविंदचं ३३९,३२३,३२८,३४७;

गोविंदराय (दिल्ली) ४५३
—व महमूद युद्ध ४८५,४९०

गोविंदद्वादशी ६४१

गोव्यांतील गौडसारस्वत ५५५-५६

गोहिल—रजपूत ४४६

गोंक—कऱ्हाड शि० ४३६

गौतम--रजपूत ४४२;
—तत्त्वज्ञान ५९०

गौर ५१७;-भारत ५८५
ग्रंथ १०००-१२०० तील-६४०
ग्रंथ-शास्त्रीय६८६, ६८७
ग्रामसंस्था ४२६-२७
ग्रामाधिकारी ६६५, ६६६
ग्वालेर कच्छपघात ४४८ दुबकुंड १२४,५१० मह० स्वारी१२६ १२७;घोरीची ५२४, ५२५

घ

घळिस (उपनांव) ५५९
घारापुरीचीं लेणीं ३७४—३७५
घियासुद्दीन बखत्यार (बं.) ५२३
घैसास ४३८, ५५१, ५५९
घोरी ८८, ८९;राज्य ४८१-४८३

च

चक्रवर्ती–व्याख्या १२;४३८ इ पद४७९;गुणदोष ५३१ ५३२ –चा मान व राजे ६४९--६५०
चक्रस्वामिन् ६३४, ५३५
चतुर्वर्गाचिंतामणि ग्रंथ ६४०
चव्हाण–नड्डूलचें घराणें ४४७, ४५१;–कुल व काळ ५६६
चंगीझ १४६
चंदवाह जयचं. घोरी-युद्धस्थल५०७
चंदेल्ल ५--धंग ३९;-चंद्ररा.१२५; -बुंदेलखंडचे राजे २७६-२८७; ची महमूदाशीं लढाई ११४–११६; २०२ व्युत्पत्ति २७६; नाणें; २७८ वंशावळ २८५; —राजधानी व भव्य मंदिरें २८६-२८७ व गौंड ४५४
चंद्रदेव २५४, २५५; २९१; गाहडवाल३२१-३,३२७,३३७-८
चंद्रलेखा ३८७, ३८८, ४३७
चंपा(वा)५,४० इतिहास ४१६-३
चंपारण्य २९०
चातुर्वर्ण्यांचीं उपपद नामें ३२
चालुक्य ३७०,–तील दोन भेद २९८; (अनहिलवाड)३००– वंशावळ ३२०;—उत्तर चा. ३८०; ३९३; ४१५, ११६ गोत्र ६९३
चावडा राज्यकाळ ६५२
चाळके ३९१
चाहमान ( सांबर ) २२१--२३० —कूल व गोत्र ६९३ च दिल्ली ४५२; ची वंशावळ २२२-२३
चांडाल ५७४
चांदोड = चद्रपुरी ४१९
चित्तलदुर्ग ( म्हैसूर )·लिंगायतांचा मुख्य मठ ६१६
चित्पावन ५५६
चितोरगड = चित्तोर ७
चूडासमा--४४५; रजपूत ६९३
चेदि कलचूरी २८८-२९६
चोडगंग ३९७, ४००-४०३
चोल साम्राज्य ५, ४०७-४१८
चोलपूर ४१३,

चौहान ( चाहमान ) ४०, ४५३
—जतवान् ४९७; ५२३ ५२४

छ

छट-कदंब ( गोवा ) स्थापक ४३२
छप्पन्न राज्यें ६६३

ज

जगदेव २६५
जगन्नाथ मंदिर ४००, ४०५
जगमनपूर ४४२, ४४३
जझोति २८६ ब्राह्मण ५५४
जटावर्मन सुंदर-पांडय ४२४
जमाबंदी ४११
जमीन—मोजणी ६०२
जयकेशिन्--कदंबराजा ४३३,४३४
जयचंद्र गाहडवाल ३२९,३३० व पृथ्वीराज ५०६ व महंमद घोरी ५०७, मृत्यु ५०८
जयपाल—कुल व गोत्र ३३१ राजधानी २४, २९; ३८ मोह्याल ब्राह्मण३३, ४० ४२, ४७, ६, ९२, ९८—वंश २८; ची सबुक्तगीनाशीं पहिली लढाई ३४; दुसरी लढाई ३७, ४१;—तह ३६ ४० कैद४८, ४९; मृत्यू ५०
जयपूर ( ओरेसा ) देवालय ४०५
जयवर्म धार २६७, २६९; २७५
जयसिंह परमार २४७, २६०, २६२, २७५
जयसिंह उर्फ सिद्धराज गुज. चालुक्य ३०५--३०८,३१७ १८ शक ३८७,ची धारेवर स्वारी२४५,
जयसिंह उत्तर चालुक्य३८२-३८४
जयन्ती (बनवासी ) ४३१
जलंदर ८
जहांगीर ८०, ८२
जंगम ६१५
जंगीसखान १६६
जंजुआ रजपूत १९१
चंदुबाल राजा ११४
जाजमहू ५
जाजल्लपूर ४४२
जाडेजा-४४५,६९३
जातिसंस्था ५३७,५७५ दृढ बंधन काळ ३३३,चा परिणाम ५३२ ५३५; चे पोटविभाग५४७-५०
जिल्हा ६६४, अधिकारी ६६५-६
जैतुगी-जैत्रपाल देव० यादव ४२०
जैत्रसिंह–गुहिलोत-२३३,५२७
जैनधर्म,-प्रसार४३७,५९९,६०१, ६०४,-व महाराष्ट्र ५९६ व गुजराथ ६०१; च्या दोन शाखा ५९२-तील उपवासदिन ६४५; पंडित व संस्कृत भाषा ५९२- ग्रंथ व ग्रंथकर्ते ५९४;-लोक व राजदरबार ५९३; व बौद्धधर्म ५८८--५९२ व शैव ५९८; --चा ऱ्हास ३९५,५९५-९६;

—चें कारण ५९८
जोहारताल ५२५
ज्योतिष २०५-२०६
ज्वालामुखीचें देवालय ७६;४७१-२

झ.

झाबुलिस्तान १९१

ट.

टाहिरटी १०५
टांकराजे ३१
टांकसाळ २१२
ठाणें-शिला. राजधा. ७;किल्ला ३६२; ३७४-मलिकाफर घेतो ३६८
ठाणेश्वर १००-१०३

ड.

डहाल ४४३—चें राज्य ५
डामर लोक-काश्मीर ४६०
डुबल (चालुक्यवंश) ३१७
डोर-रजपूत १०९; ४४४

त.

तगरपूर ३६९,३७१
तपस्या ६०४
तबकात—मुसलमानी ग्रंथ—काल ४८४,४८८; बंगाल वृतांत ५१८,५१९
तंत्र ग्रंथ ६३८,६३९
ताज मुसलमानी-ग्रंथ ४८४
तामील प्रदेश ४०८; ६०७
तालुका ६६४,-चे अधिकारी ६६५
तिबेट ३४३
तिवारी ब्राह्मण २८८
तुरुष्कदंड व मराठ्यांची चौथाई १५६-१५७; २०२,३२२
तुर्की गुलाम १७,१८
तुर्वसुवंश ४०८
तुलसीदास ६२१
तुवर-पांडववंशज ४४४
तेलगू वाङ्मय ६८८
तैमुरलंग ५७,१४६,१६६
तैलप-उत्तर चालुक्य ३८०-८१
तोगनखान १०४
तोफेचा शोध १६८; उल्लेख ५२९
तोमरदेश ४४२; (नूरपूर) ४५१--४६३; वंश ४६४—६५
तौशी नदी--पंजाब ९३
त्रावणकोर ४२५; = वेनाड ४२६
त्रिकलिंगाचे प्राच्य गंग ३९६-४०६
त्रिगर्त देश ४७१
त्रिपुर-तेउर हैयय राजधानी ५,२८८ २९६, ४७६
त्रिलोचनपाल (शाही) ६३, ६४, ९३, ९८ महमुदाचा मांडलिक होतो ८६, ८७;--स्वातंत्र्यार्थ लढाई ९०,९१;१२४;२००-१
त्रिवेंद्रम--केरल राजधानी ४२७
त्रैलोक्यवर्मन् -२८३--२८४

द

दरद ४५८
दलचंद ५७

दक्षिणापथ १२, १३
दक्षिणेकडील राजवंश (हरिवंश) ४०२; क्षत्रियघराणीं ५६३
दानसागर ग्रंथ ६४०
दिद्दाराणी (काश्मीर) १३०
दिल्ली १०, ४०;–चें मूळ शहर ४९९, ५००—ची स्थापना ४५१; नांव ५०१;--वर महमुदाची स्वारी ४९७ चे तोमर ४४८; लोहस्तंभ १६९, ४५२
दिऱ्हम--नाणें ११५
दुभकुंड--कच्छपघात ४५०
देवगड किल्ला २७९--२८०
देवगिरी दौलताबाद ४२०
देवालयें ४२४
देवाळ प्रांत ४८३
देवी, मुख्य दैवत ६४२
देश नामें ३९६;--वरून जातिनामें ५५३--५५५
दृढप्रहार-यादवकुलसंस्थापक-४१९
द्वारसमुद्र--होयसल राजधाना ४२२
द्वैपायनी देवी ४३६
ध
धनेर (नुरपुर सं०) ४६३
धर्मोत्साहपरिणाम १७२
धर्मांतर ४२, ४८-४९, ५३, ८९; ९४-९५;१०७,१०९,१२६
धंग--चंदेल्ल २७६--चें राज्य १६५
धार ६,७;--वर स्वारी २४५--४६; २४९-२५१;
धारेबंदी ४११
धारावर्ष--घोरीशी लढाई ४४६
धूमराजा (परमार) ४४६
न
नगरकोट = भीमनगर ७६, ७७;
नडिया--(बंगालची राजधानी)वर बख्त्यारची स्वारी ५१७;
नरपति ३२४
नरवर्म देव २६४--२६६
नरवर देश ४५४,४५५
नरसिंह (शि० कऱ्हाड) ४३६
नवें वैष्णवमत=६०२
नस्र (दुसरा) १५
नहरवाल--अनहिलवाड ८६ पाटण ५१३,५१४
नंदनचा किल्ला ९४, ९५
नागदा--गुहि० राजधानी--५१७
नाट्यशास्त्र ४११
नाणीं ६७४
नामें ४५५;
नायक संज्ञा--४३८
नायकी-देवी घोरीचा पराभव करते ३१४-३१५
नारदिन किल्ला ८५–८६
नासिरुद्दीन, सबुक्तगीन पहा.
निआल्तगीन १९७;-ची बनारसेवर स्वारी २९१

निशापूर, खुरासानची राजधानी ४३, ४५,५१२
निषध–नलराज–देश ४४८, ४५४
नुरपूर सं० ४६३–४६६
नूह १७.१८,४२
नेपाळ राज्य व शक ४६१
नैषधकाव्य ३३०
न्यायपद्धति ६७५–६७७

प.

पट्टमहिषी ६६३
पट्टवर्धन ५५१, ५५९
पथानकोट ४६३, ४६४
पदव्या ३६२; ३८७; ६८१;
पन्हाळा (प्रणालक) ४३६
परकीय प्रवेश ३७३, ३७६
परकीय राजे १९१
परकी सैन्य १७
परमतसहिष्णुता ६२४,··६
परमर्दिदेव चंदेल्ल २८१-८३;५१५
परमार-कुल व गोत्र ६९३; धार-२३९-२५९ नाम ५६६ भोज इतर २६०-७५ अबू ४४६–वंशावळ २७४
पळसिंगे ४३२, ४३५
पंचमहाशब्द ३९८
पंजाब १८५; ५८७; व महमूद ८६, ८७; खालसा--९०--९८ -चे शाहीराजे १३०-१३१;—वरील सत्ताधारी ५२८;—चे सैनिक १६७; चें दीर्घ पारतंत्र्य १८४; च्या उच्छेदाचीं कारणें १६३–१८५ व महाभारत १९३-१९४ व हिंदुधर्म ५३० व क्षत्रिय जाती १८९-१९२
पंडीर (पांडव वंश) ४६४
पाखंडी मुसल. व त्यांचे हाल १०५
पाटण ३६८ ५१४;
पानपत ६९, ७५
पारशी हिंदु० येतात ३७५–३७६
पाल (बंगाल) ३४२--३५१; राज्य ३५५;–उपपद ४७०
पाशुपत ६३८, ६३९
पांचाल (कनोज) ३२१, ३३५
पांडे ब्राह्मण १६२
पांड्य ४२३-४२४
पीथी–पीठापूर ३४६
पुजारी वर्ग ६३६
पुराणग्रंथ वाढ ६४१-६४२
पुरी–कोंकण राजधानी ३६२, ३७४
पूर्ण–बुद्धशिष्य ३६१
पूर्व चालुक्य ८७
पेशावर (पुरुषपूर) २८, ४२, ४७; ४८३
पोट जाती ५७३
पोषाल ५८२ ५८३
पौंडवर्धन—वरेंद्रराजधानी ३४५
प्रतापरुद्र–आंध्र ४२२

प्रतिहार--सम्राट ४०; २०२; ४१ ६९३
प्रद्युम्नेश्वर शिववैष्णवैक्य-मंदीर ६१९—६२१
प्रधान संस्था ३७०, ३७१, ६५६, ६५९
प्रबोध चंद्रोदय नाटक २७९
प्रभु उपपद ३७२, ३७३
प्रयाग २००
प्रतिनिधीक व्यवस्था ४२७
प्रोल आंध्र ४२१
पृथ्वीराज २८१, ४७३, ४७४; राज्यारोहण २२४, --विवाह ४७६, ४७७—पराक्रम ४७८ ४७९---महमद घोरी युद्ध ४८४-४९५; —वयोमान व मित्या ४७५; ४८०—मृत्यु ४८९, ४९०, ४९५
पृथ्वीराजरासाग्रंथकाल ६८५

फ

फिरदोसी कवी १४७, १४८
फिरस्ताकार ११५
फिरोजकोह-राजधानी ४८२,४८३
फिरोजशहा ८०, ८२
फिरोज तघलघ ४०६
फौजिव्यवस्था ६८०, ६८१

ब

बझान गुर्जरराजधानी ६
बदाउं—राष्ट्रकूट राज्य ४४,४४५
बदामी ३८५
बनवासी जयन्ती ४३१
बनारस १९८, १९९;(राजधानी) ५०८;चा उच्छेद ५०८,५०९
बर्बरक ३०६
बरद्वान-सेंगारराज्य ४४३
बरण बुलंद शहर १०८
बल्लापुर(वंश व राज्य) ४६९,४७०
बल्लाळसेन ३५५
बसव--लिंगायतपंथ स्थापक ३९४; चीं मतें ६१२—६१४; मृत्यू व ग्रंथ ६१६, ६१७
बस्त शहर सबुक्तगीन घेतो ३५
बस्तर संस्थान ४२२
बंगाल,-चे दोन भाग ३५०,३५१ -वाङ्मय ६८८
बंदुकीच्या दारूचा शोध १६८
बाथिंडा २९, ४१
बारी शहर ४, १२५
बियाना ४४४
बिहार ( अंग ) ४४१
बिल्हण कवी २७१
बिंब राजा ३६८
बुंदी कोटा ( चव्हाण ) ४४७
बुंदेलखंड राज्य ५
बेक्तुझून ४५
बेळगांव ( वेणुग्राम ) रट्ट राजधानी ४२९
बेलुर ( बेलापुर ) यादव ४२२

बौद्धधर्मप्रसार ३४४
ब्रह्मपूर ( ब्रह्मोर ) चंबा राजधानी ४६२
ब्रह्मक्षत्रीय शब्दार्थ ३५८, ३६०
ब्राह्मण-काबूल, सिंध व पंजाब १६ राज्य १६२;काश्मीरराज्य४६०
ब्राह्मणक्षत्रीय ३२, ५५, १६२; -ची मूळ भूमी ५६६-चे निरनिराळे उल्लेख ५५०--५५२चे पोटभेद २८६; ५५०-५६१; -चे तत्वज्ञानभेद ५५४;—तील पंच गौड व द्राविड ह्या भेदाचा काळव विशेष५५२-५५३; -घराण्याची वसाहत ४१४; व तिची कारणें ५५५-५५६; -तील गोत्र शाखा ५५६; विहार ५२०वधर्माचें जन्मस्थान५८७

भ

भगवन्त देव ( सेंगर ) ४४४
भगवन्तभास्कर मयूख ग्रंथ ४४४
भट उपपद क्षत्रियांचें ३७३
भट्ट तुर्क ८
भट्टी राजे ५४, ५८
भडोच ( लाड राजधानी ७ —भृगुकच्छ २७१
भातिंडा २६, ५७
भद्रबाहू जैन उपपशक पहिला ५९२
भरतलोक ३३७
भरतपुरी ( बदाऊं ) ६३७
भरेह ४४२, ४४४
भागवत पुराणकाल ३७५, ६ ३, ६४२
भाटिया शहर ५२, ५५, ५७ -वर स्वारी ५४-५७,६८३
भाटी राज्य ( झाबूल प्रांत ) १६
भाटी रजपूत १९१
भारप तैलपाचा सेनापती ३८१
भाषा व वाङ्मय ६८२-६८४
भिल्लम- ( यादव ) राजे ४२०
भीम—अनहिलवाड १३५-१३७; ३०३-३०४; (भोला) ३१५-३१९ शिहा. स्वारी ४७६
भीम—८२,८४,९८,१३०,१३१
भीमनगर ८४,१३०
भीमदेव—शाही शिलालेख ३२
भीमाचें बंड ३४९
भुवनेश्वर ४०५
भुवनैकमल्ल (पृथ्वीराजप्रधान)४७९
भेरा शहर ( पंजाब ) ९६,९७
भेलसा ६,७,२८४--वर अल्तमशची स्वारी ५२५,५२६
भोज—परमार ४०; २०२,२३९--२५९; ३८२-८४; राज्यारोहण २४२,२४४,२४६,२४८, २५४-२५६ ग्रंथ कर्तृत्व २४० -४१ दातृत्व २५६-५८ मंदीर जीर्णोद्धार २४३, २५६ स्नान २५७ मृत्यु २४७

भोज २ रा ( शिलाहार ) ४३८

म.

मठ ६३८
मथुरा १०९,४४४-ची लूट ११०-१११, देवालयें १२१
मदनपाल (राठोड) १०१ (बदाउं राष्ट्रकूट ) ४४५
मदनवर्मन् (चंदेल्ल) २८०,२८१
मद्रासकडील क्षत्रियजाती ५६७
मदुरा ( पांड्य राजधानी ) ४२४
मनसूर बादशहा १८,१९,४२
—दुसरा ४५
मराठ देश ७
मराठी वाङ्मय ६८९
मराठे व कानडे ४२७
मर्यादित राज्य(Leimited monarchy ) ६४९
मालिक काफूर ४१७,४२३,४२४
मलिकदेव ५२४
मल्लिकार्जुन ( शि० ) ३६६,३६७
मसऊद-१०५;--ची दुर्दैवी कारकीर्द २०२–२०९२ रा २०९
महंमद ( गझनी )–कारभारपद्धती १९७ खोरासान ४२, ४३, ४५, ४६ गझनी घेतों ४४ चरित्र लेखक १४३,१४९,१५० जन्म ३८, द्रव्यलोभ १४६ धर्मबुद्धि १०५, १४५, ४१७ नीति व न्याय १४३, १४४, पदवी १४१,१४२ फौज १६६ बुद्धिचातुर्य ३६,३८ राजनीति १४३, १४९ लढाईत प्रवेश १८;—तील धोरण व तडफ ११७, ११८ लष्करव्यवस्था १५०-१५१ विद्याप्रियता १४५ शिक्षा ( फारशी व संस्कृत ) २१२ व शिवाजी १५३-१६१ सैन्य १४२; संपत्ति भांडार ७७-७८,१४२ स्वभाव १४२, १४९ स्वाऱ्या—इलेक्खानावर ५९;–कनोजवर स्वारी १०६–११६; कालंजर १२६ काश्मीर ४५८; किरात, स्वात वगैरेवर स्वारी १२५; गर्जिस्तान घेतो ९०;--ग्वालेरवर १२६,१२९; जयपालवर ४७.४८;ठाणेश्वरावर हल्ला १००–१०३; दबलवार शहरची कत्तल १३६; नगर कोटावर स्वारी ७६-८४;भाटियावर स्वारी ५५; मुलतानवर स्वारी ५९–६४; राहिब नदीवरील लढाई ११९; सोमनाथवरील स्वारी १३२–१४१; स्वाऱ्यांची संख्या ५२ स्वाऱ्यांचा हेतु व परिणाम १५३–१५७, ३४३, ४८७; साम्राज्य ९८, ९९, १२१, १४८--१४९; १५४, ५६; साम्राज्यशेवट

१४१, १४२; १५१, १५२; २०८, २१०; हिंदू १७०, १९९, २००
महमद तघलक ८०
महमद बखत्यार ३५०; ५१६, ५१७
महंमद--महमूद गझनीचा मुलगा १९५, १९६-कारकीर्द २०८
महाकाळ मंदिरविध्वंस ५२६
महादेवाचीं मंदिरें ४२६
महामंडलेश्वर ४३५
महाराष्ट्र--तीन ३८०;–वर चोलांची —स्वारी ३८३
महालक्ष्मी–कोल्हापूर ४३६
महावन ( यादव ) ४४४
महावीराचें तत्त्वज्ञान ५९०
महीपाल ( पाल ) ३४२--३४४; —दुसरा ३४५
महोबा ( चंदेल्ल राजधानी ) २७७ २८७, ५१६
मंडावर शहर व स्वारी ५२३-५२४
मंडी व सुकेत ४६६–४६८
मंदहकूर २७
मंदार ४०१
मातुलकन्यापरिणयाची चाल ४१०
माध्वमत ६१८
माने ( तवर वंश ) ४५३
माबार-पांड्य देशवर्णन ५६०
मारवाड-मंगलाना ५०५
मार्कोपोलो ३६७
मालखेड (राष्ट्रकूट-कर्नाटक) ३७२
माळवा प्रांतविस्तार २७४
—तील अराजकता व युद्धें २४६, २४२, २५१
—वर अल्तमशची स्वारी ५२६–५२७
—चा शेवट २७३
मांझा प्रदेश व शीख १६७
मांडलिक राजघराणीं–दक्षिण हिंदुस्थान ४१९-४४० उत्तर हिंदुस्थान ४४१ ४५५
मांसान्न ५४६ ६११,६१५,६१८
मिताक्षरी ३८९, ६४०
मिरज ४३६, ४३७
मिरत--(डोर रजपूत) ४४४, ४९८
मिश्रविवाह बंदिकाल ५४९,५६५
मिसकाल-एक वजन विशेष १११
मुत्फिली (आंध्र) देशवर्णन ५६०
मुलतान ९,—(प्रल्हादपूर) १२६
मूलराजा-अनहिल चालुक्य राज्यसंस्थापक ३०१, ३०३ ३८१
मुसलमानची-तुर्कांशी लढाई १०४, १०५, ५४१
मुसलमानी धर्म, हिंदुलोक ५८७;-च्या स्वाऱ्या ४२, ५२७,५६५
मुंज (परमार) २३९, २४२,३८१
मुंतसीर-सामानी १९
मूर्ति-पूजा ५९४, ६३१, ६३२,

६३५-तत्त्वज्ञान ६३३
—चे परिणाम २१३-२१७
—विध्वंस ४९६, ४९८, ५०८, ५१६, ५२६
मेकल-ओरिसा ३०३
मेद-अस्पृश्य जाती ५७३,५७४
मेर लोक ५१३
मेरुवर्मन ( चंबा ) ४६२
मेवाड ( गुहिलोत ) २३१-२३८; वर मुसलमानांची स्वारी ५२७
मोह्याल ब्राह्मण ३३
मोक्ष कल्पना ६२२-६२४
मोंगीर मुद्गगिरी(बंगाल राजधानी)५
मौदूद-२०३,-च्या स्वाऱ्या २०८

य.

यशोवर्म परमार २६६,२६९,२७५
यश:कर्ण कलचूरी १९२
यश:पाल (पाल) २०१
यज्ञ ६२९; नैमित्तिक ६३०
याकूब-इ-लेस, कासार हिंदुस्थानावर प्रथम येतो १६
यादववंश ३९०; (देवगिरी) राज्य ४१९-४२१, ४२८-४३०-८-मथुरा व महावन येथील घराणें ४४४;—चूडासमा ४४५;--केरोलीचे घराणें ५०९
यायावरील ( राजशेखर )
युवराजपद ६६३,६६४
येलबुर्ग शिंदे ४२७,४२८

र.

रजपूत १६,४५४,३३६-७,३६० कच्छवाह ४४८ कांगडा ४६८ तवर४४८पर्यानिया४६४बालोरिया ४७० भट्टी लोहर ४६० गोत्रें ६९१-६९६, ५६२—५७१—चा दर्जा ५६१; तील दोष ५३०, ५३१, ५३८ व भांडारकर३५२ राज्यें व उच्छेद ५११-५२१ मुसलमान ९४, ९५ शस्त्रशास्त्रज्ञता ५७६ शहाबुद्दीन ५२९-५३१ स्वामिभक्ति ६५४ हिंदुसमाज ५४५
रट्ट—सौंदत्ती ४२९,४३०,४३९
रणजितसिंग ८०, ४६९
रणथंबोर चव्हाण राजधानी ५०४, ५०५ वर अल्तमशची स्वारी५२३
रथयात्रा ६४१
रत्नपूर ४४१
रत्नराज ( कलचूरी ) ४४१
रंभामंजरी नाटिका ३४०
राऊळ ( उपपद ) ३७३
राजकीय—एकी ५३८;-औदासीन्य १८७,१८८; सोय ५८६
राजद्रोही ४५८
राजपट्टी ४४३
राजराज ( प्राच्य गंग ) ३९९, ४०३,४१२
राजराजेश्वर ( तंजावर ) ४१०

राजशेखर ३, ११, १३,६९६
राजाधिराज ( चोल ) ४१४
राजापूर ( शिलाहार ) ४३६
राजेंद्र ( चोल ) ४१२, ४१३; व चीनदेश ४१४; ४१५
राज्य—च्या उच्छेदाच्या पायऱ्या ८७,८८,१०० कारभार ६६२ खर्च ६५५ राजाच्या पिढ्यांची सरासरी ३६३
—मर्यादित ६४८
राज्यपाल १०४, ११२, ११६, ११८; १२४, १२५, १२८, १२९, २७७; ३८४
राठी-क्षत्रिय ४६३; ५६५
राठोड व राष्ट्रकूट ३३९ शाखा ४४५ कुल व नामाचा काळ ५६६ जोधपुर ३३०, ३३१, ३३५ ३३६, ३४३, ३७०
राढ ( बंगाल प्रांत ) ४४३
राणा--चंबा सं० ४६३
राधा व कृष्ण ६०४, ६०५
रामचंद्रबाबा शेणवी ५२६
राममंदिरें ६३५
रामानुजाचार्य ६२३; चरित्र ६०७,८
रायपिठोरा-हिंदुसम्राट ४७३,४८०
रावळ २३७
रासाग्रंथ ३३४, ४८४, ४७३ ४८९, ४९३, ४९४
राष्ट्रकूट ३३१, ३३५, ३७९ व अरब ३६६ कुल ३४१ पदवी ३८७ बदाऊं ४४५
राष्ट्र—३४०, चे उच्छेद १७३ शास्त्र-सिद्धांत व विद्वान् वर्ग ५४३,५४४ सामर्थ्य ९८ खडी फौज ५४२-५४३
राष्ट्री ( कपर्द्दिद्वीप ) ४३३
राष्ट्रीय—भावना ६५२, चा अभाव, कारण ६५३, ६५६ जर्मनी ५३५, ५३९ परकीय प्रवेश ५४१ भाषा ५४० राजभक्ती ५४० ६५५ लढाई ५३५-५३६
राहीब नदी ११९, १९८
रुद्र ( आंध्र ) ४२१
रुद्रम्मा ( आंध्र ) राज्यकर्ती ४२२
रुप्यांचें घर मह० नेलें ७८
रेड्डी=राष्ट्रकूट ४२९
रेनसी-पृथ्वीराज पुत्र ४९६, ५०४, ५०५
रोटी बेटी व्यवहार ५३२, ६४४
रोम, लूट १११,
ऱ्हास कारण १७४, १७५

ल

लकुलीश ( शैवतत्त्वज्ञानी ) काळ व मत ६१०, ६११
लखनौती ३५५
लल्लिय ( शाही ) २५, ३० ३१,
लक्ष्मणदेव (परमार) २६३, २६४
लक्ष्मणसेन (बंगाल) ३५५ वर बख-

त्यार स्वारी ५१७,५२० ५२१
लक्ष्मीधर सेनापति ग्रंथकर्ता ३२५
लक्ष्मीवर्मा २६८, २६९
लाग=कर ५०५
लाट ( गुजराथ ) ३००, ३०२
लाड ब्राह्मण ( मार्कोपोलोक्त वर्णन ५५७, ५६०
लारदेश ५५८, ५६०
लालकोट ( दिल्ली ) ४५२,४५३, ४९८,४९९
लाहोर २८,३१,४८३
लिपी ६८२,६८४
लिंगायतपंथ ३९०, ३९४, ६१३-६१५; व अस्पृश्य ६१६
लेखनपद्धति ६७३
लोककाळ ८०
लोकसभा ६७७,६७९
लोमशऋष्याश्रम ४६६
लोहकोट (काश्मीर किल्ला) १२६
लोहरवंश काश्मीर ४५७, ४६०
लोहस्तंभ ४९९;५००

व

वज्रहस्त ( प्राच्यगंग ) ३९८
वत्सगोत्र ६३७, ६३८
वत्सराज ( चंदेल्ल ) २७९;
—( सेंगर ) ४४३
वडनगर (नागरांचें मूलस्थान)३१३
वरंगळ आंध्रराजधानी—४२१
वरेंद्र ( उत्तरबंगाल ) ३४५
वर्ण—गुण व कर्म ३२—पोट जाती;—भेदनिरास ५७९—विभाग५७९
वाहिंड राजधानी ८,२९,३०,४२-९
वंश—दोन अर्थ (रजपूत) ३३८
वारणावत-बुलंदशहर १०८
वाघेला (व्याघ्रपल्ली) ३१६-१७
विक्रमपूर ३८९
विक्रमशील येथील कत्तल ५१७
विक्रमादित्य (उत्तर चालुक्य) सोमेश्वर २ चा पुत्र ३८५ ३८६, ३८७, चीं लग्नें ३८८-३८९.
विक्रमादित्यउज्जैनमूर्तिविध्वंस५२६
विग्रहराज (चाह०) २२४ २२५
पाल वीसल विग्रहपाल ४था २२६
विज्जल (कलचूरी) ३९०, ३९४.
,, शिंदे ४२८
विजयचंद्र ( गाहड ) ३२८,३२९
विजयराज (भाटी) ५३, ५५,५७
विजयसेन-सेन ३५२,३५३—शिव-वैष्णवैक्यप्रयत्न ६१८,६१९-२१
विजयादित्य (कऱ्हाड)४३४,-७—८
विठोबा (पंढरपूर) ६१९-६२१
विद्याधर १२४, चंदेल्ल २७७—८
वंश ३६८, ३६९
विद्यापीठें ६८५-चा नाश २२९, २४०, ४९६
विधवाविवाह ५७९, ५८०
विनयादित्य होयसल ४२२-४२३
विराटनगर (हनगल) ४३१

विवाहसंबंध ४६०, ६२४, ६४४, अनुलो ३३३ क्रांति५७७
विज्ञानेश्वर मिताक्षरा टीकाकार३८९
विष्णुभक्ति ४०१,-माहात्म्य ६४२ मंदिर ४२३, ५२५, ६३६
विष्णुवर्धन (होयसल यादव) ४२२
विंध्यवर्मा ( परमार ) २७०-२७१
वीर केरलवर्मन् (त्रावणकोर) ४२६
वीरबल्लाळ (होयसल ) ४२३
वीरराजेंद्र ४१५
वीरशैव मत ६०८,६१३-६१६
वीसलदेव विग्रहराज पहा.
वेद ६२७, व क्षत्रिय वैश्य ६२८ लेखन ६२९
वेश्यांचा वर्ग ५८१
वेंगी देश ३९७
वैदिक काळ १८७, संस्कृति व भाषा ८
वैद्यदेव (बंगाल) ४४१
वैद्यनाथ--अलंकारशास्त्रकार ४२२
वैयाक्तिक महत्त्व १७७, ५१२, —तबकातचें मत ५१३
वैश्यजाति ५७२-५७३ लिंगायत पंथी ३९५ बौद्ध कालीन ५७५
वैष्णवमत—नवें ६०१—६०८ —प्रसार ४२३, ६०४
व्यापारी बंदरें ३७४
व्याख्यान गृहें ६३८

श

शक कर्त्यांचें एक लक्षण ३०७ —कलियुग ४६२—कोल्लम ४२६ —नेपाळ ४६१लोककाल (शास्त्र ८०, ४६८ सेन ३५३
शनिवारसिद्धि ४३७
शहाजी व सबुक्तगीन २३,४३
शिहाबुद्दीन घोरी ४४४,-चीं युद्धें व हेतु ५३०,-चीं नाणीं ५०८ — हिंदूशी लढाई ४८१-४८३
श्री शंकराचार्य-आद्य ४२५
शारदालिपी ४६२
शाही—राजे काबूल पंजाबचे १३०, १३१—ब्राह्मण ३९, ४०—ची नाणीं २१२—राज्य१५७,१६५
शियालकोट ४८३
शिलाहार ३६१—च्या तीन शाखा ४३५ कऱ्हाड, कोल्हापूर४३५—४३९ ठाणें ४३६ —मराठे रजपूत ३७०,३७१-वंश ४३६ वंशावळ ३७८ चा शेवट ३६८ चें क्षत्रियत्व ३६९
शिवलिंगपूजा ६०९,६१०
शिवाजीचे अष्टप्रधान ६५९-६६१ -ची धर्मभावना १४५-व महमूद २१-२४, ४४, ४६, ४७,७३, ७८,८९,१७८
शिवमाहात्म्य ६४२
शिवालयें ४४१,५२५,६२७

शिवालिक-डोंगर ४९७
प्रांतावर अल्तमशची स्वारी ५२३
शिसोदे ३४३ गुहिलोत पहा.
शिक्षणारंभाचें वाक्यप्रकार ५९३
शिंदे घराणें, ४२७-चा प्रांत ४२८
शिंदेनाड ४३७
शीखधर्म १९२
शुद्धीकरण ६४५,६४६
शूद्र जाति ५७३
शेतकी व ब्राह्मण ५७५,५७६
शेलार-शिलाहार ३७०,४३८
शैवतपस्वी ६११, ब्राह्मण ६३७
शैव धर्माचा इतिहास ६०९ व वैष्णवतंटा ४१ संत ४११

स.

सचाऊ-अल्बे०चाभाषांतरकार १३०
सणफुल्ल ( शिलाहार ) ४३५
सतीची चाल २८९,५८२
सप्त कोंकण ३८३-३८४
सबुक्तगीन १८,२१-चा न्याय २२, २३-चें राज्य २४,२९,३०,३८ व जयपाळ ३५ मूर्तिविध्वंस ३६ च्या लढाया ३७ मृत्यु ४३
समरसिंह (गुहिलोत) २३२
सम्राट व्याख्या १२; ६४९
सरसूती प्रांत ४९७
संकट ( कलचूरी ) ३९५
संग्रामराज ( लोहर ) ४५८
संजान नगर ३७३,३७५,३७७,
संभाजी व मसाऊद १९६,२०५-७
संयोगिता पृथ्वीराजविवाह ४७७.
संसारचंद ८२
संस्कार,-व कर्म-वाद ६३९ ६४१
सादी व सोमनाथ १४०-१४१.
सामंत फौजा ६५१
सामंतसेन ( बंगाल ) ३५२
सामानी साम्राज्य संस्कृति १९-२०; —वंश व नाश १९
सामान्यपरिस्थिति ५४७—६९६
साम्राज्य कल्पना ६४९—चा परिणाम ६५०-६५१; १५५
—संस्थापक २३१,२४६-७ २५२
सार्वराष्ट्रीय विरोध व त्याचें महत्त्व ५३६,५३७; व शिवाजी ५३६
सासबहु मंदीर ४४८, ४४९
साहिलवर्मन् (चंबाराजा) ४०
सांबरचें चाह० ६,२२१-२३०
—ची शाखा ४४७
सिंघण (यादव) ४२१
सिंधप्रांत व त्यांतील शहरें ७,८;-
—चा उच्छेद १६२,१७३
सिंधूनदी (=सिहून) ५२,७४
सिंह-नृसिंह उपासना १२५,१२६
सिंहलद्वीप (सेंगारराज्य) ४४३
—तिसरा ३८९,३९०
सिद्धराज—जयसिंह चालुक्य पहा.
सिरोंज ( सेंगार ) ४४३
सिलोन (सेरेंदिब) ६१

सुकेतराज्य व वंश इ. ४६८
सुरुंगी दारूचा शोध २०४
सुलतान पदवी ४६, २१२
सुलेमान (प्रवासी) ६५१
सुवर्णधेनु दान ४१२
सूर्यपूजा दिन(३)६४६-७,-भक्ति ६४२मंदिर व मुसलमान६३३-४
सेन ( बंगाल ) ३३९,—उपपद ४६७, ४६८, ४३९ नांवावरूनचें अनुमान ४६६, ४६७ —राजे (पूर्वबंगाल) ३५० ची जात ३५७, ३६० लखनौती व रजपुतकुल यादी ५६३, वंश व शक ३५३, ३५६, ३५७
सेवकपाल जयपाल नातू १३१
सेंगर ( रजपूत ) घराणें ४४२ —वंश व राज्यविस्तार ४४३
सेल्जुकी तुर्कांचें बंड २०३,२०५
सैनिकांची भावना ( हिंदु व मुसलमान ) ४८५,४९०
सोपारे (शिलाहार राजधानी) ३६१
सोमनाथ ७, पट्टण १३८, —देवालय १३९, ३११ उपवासदिन ६४६; वरील स्वारी १३२-१४१ ची संपत्ति १३७ —ही मूर्ति नव्हे १३४
सोमेश्वर उत्तर चालुक्य ३८४,३८५ —दुसरा ३८६;३८७
सोलंखपाल ४५०, ५१०,४५२
सोळंखी (चालुक्य) २९८
सौंदत्ती-रट्टराजधानी १ ली ४२९
स्कंदपुराणाचा काळ ५५२
स्यमंतभद्र-जैनउपदेशक ५९३-४
स्वप्नेश्वर (ओरिसा) ४०२

ह

हत्तींचें सैन्य ४९२, ४९३
हनगळ ४३१
हम्मीर १५; ३२९
हयपति ३२४
हरिभक्ति ( बंगाल ) ३५६
हरिराज पृथ्वी० भाऊ ५०४,५०५
हरियान मुलुख ४५३, ६३७
हेलबीड ४२२
हर्ष १८१, ४५९, ४६० ऱ्हासकारणें ५४४, ५४५
हान्सी किल्ला स्वारी २०३,२०४प्रांत ४९७, ४९८;कुतु०स्वारी५२३
हिमालयांतील राज्यें ४५७, ४७२
हिरात १६
हिंदी प्राच्य व पाश्चिम वाङ्मय६८९
हिंदु जाति अल्बेरूनी ५४७, ५४९ धर्म १२५ पराभव कारणें ७१—७३ धर्मभावना नरम असल्याचा परिणाम १८२ १८३, १९२ विवाहपद्धतींतील विशेष ५८०;—महिने व ऋतु ९; मुसलमान १६३—१७०, १७६; राजे ६६, ६७;—चा

दोष १८१;—राज्यें १६५ राज्यनाशाचीं मुख्य कारणें १८२ —१८५ राष्ट्रीय विरोध ५३७ लोकांतील वैगुण्य १३७ शिपाई ४३, ४८, ५९, १८९ १९९, २००, ५३३ ची शेवटची लढाई ६५-७५ व सबुक्तगिन १ली लढाई ३७,४१ संयुक्ताची ३ री लढाई ९१ सैन्य १७०
हिंदुस्थान (स. ९१२ तील ) १६ —व जर्मनी ५३१-५३२-चा जुना रस्ता ९९ तील तलवारी १६९ चे दोन भाग ३—तील १२ व्या श. तील धार्मिक स्थिति ५८४-५८५ पांढरें ३५ —चा भूगोल ३-१४ चीराजकीय स्थिति अल्बेरुनी १०
हिंसाबंदी—कुमारपाल, अकबर ३१३ ३१४
हूण २४२
हेमचंद्र जैनपंडित-व्याकरणकार ३०६ —चें चरित्र ५९९,६०१
हैहय—चेदी-२४४, २४५ —रजपूत २९३मुद्रा २९५—वंशावळ २०६ —शाखा कलचूरी ४४१
होयसल ३८०, —ची विक्रमावर स्वारी ३८८, ४२२–४२३
ह्युएनसंग १, २, १८६

क्ष

क्षत्रिय ३५९-चें अस्तित्व ३३८, ६२८ जाति (मद्रास) ५६७, ५६८ दर्जे ( हिमालय प्रांत ) ५६४–वंश ३३८,–ची उत्पत्ति, गोत्रें व शाखा आणि त्यांचा काळ ५७९ भेद ५४८, ५६१, ५६६ विवाहसंबंध ५६२, ५६३ ५६४

ज्ञ

ज्ञानेश्वरी ६८४

# शुद्धिपत्र.


( प्रस्तावनेंत लिहिल्याप्रमाणें शुद्धिपत्र देण्याचा विचार नव्हता. तरी कित्येक जरुरीच्या विशेषतः सनाच्या दुरुस्त्या पुढें दिल्या आहेत. )

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| १२९ | २७ | १९२३ | १०२३ |
| १५९ | २५ | लिहिलें नाहीं. | ठेविलें पाहिजे. |
| १७३ | ११ | १०९९ | १००९ |
| २३८ | ३ | ११७९ | ११७३ |
| २६३ | २४ | १०५६तें११८१ | १०५९—१०८० |
| २८९ | १७ | १०६७ | १०३७ |
| २९५ | ५,१० | ११६९व११७० | ११५९व११६० |
| २९६ | ९ | ११७०(दोन ठिकाणीं) | ११६०(दोन ठिकाणीं) |
| ३१४ | ६,१० | ११७७,११७९ | ११७३,११७६ |
| ३३४ | १२ | ११५३ | ११७३ |
| ३५१ | १३,१४,२० | १०३२,१०३६,११६४ | १०३८,१०५९,११६१ |
| ३७० | ६ | ११५४ | ११४८ |
| ३८५ | ६ | १०३७ | ११४८ |
| ३९९ | ५ | १०५८ | १०६८ |
| ४०६ | १९,२० | १५,११८२,११९२ | २५,११९२,१२०२ |
| " | २१ | ११९२-१२०१ | १२०२-१२११ |

| पृ. | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४०७ | ८ | ९७४ ९७७ | ९६१—९७३ |
| ४१८ | ८,१० | १०१२-१०१८ | १०१४–१०४४ |
| ७०९ | २६ | १००१ | १००८ |
| ७१२ | १९ | ‘ ११७९ सामंतसिंह गुहिलोत ’ हें सर्व काढून टाकलें आहे. | |
| ” | २० | ” | ११७९ |
| ” | २३ | ११४८ | ११९८ |



काबुल
पेशावर
गड़ज़नी
बन्नु
भेरा
रावीनदी
लाहोर
मुलतान
सतलजनदी
कांगड़ा
नदी
नूरपुर
सिन्धुनदी
तो म र
दिल्ली
मथुरा
अजमेर
ग्वालेर
यमुनानदी
कन्नौज
गंगा नदी
कालंजर
महोबा
मे वा ड
चितोड
उज्जनी
प्रयाग
बनारस
पाटणा
मोंगीर
सिथिल
लखनोती
ब्रह्मपुत्रानदी
आसाम
रत्नपुर
पाटण




Poona Litho Works 68.

ET

DS
457
V318
1920
v.3

Vaidya, Chintman Vinayak
Madhyayugina Bharata

[redacted]

PLEASE DO NOT REMOVE
CARDS OR SLIPS FROM THIS POCKET

UNIVERSITY OF TORONTO LIBRARY

UTL AT DOWNSVIEW
D RANGE BAY SHLF POS ITEM C
39 13 10 06 04 014 9